पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

३३

जंजिऱ्याची मोहीम

(पुरवणी)

[किंमत—९ रुपये १४ आणे किंवा ९ शिलिंग ९ पेन्स

संपादक—गो. स. सरदेसाई, बी. ए.

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३३

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि जबाबदारी सरकारावर नाहीं.)

Selection No. 33

SHAHU'S CAMPAIGN AGAINST THE SIDIS OF JANJIRA

(Supplementary Papers)

It will have been observed that the processes of selecting and editing papers from the Daftar have proceeded simultaneously. It was, therefore, inevitable that further documents would turn up in the course of subsequent investigations and these have been set aside for publication in supplementary selections. This has particularly been the case with the Maratha activities against the Sidi on the West Coast where a number of Indian and European powers waged against one another an interminable contest. King Shahu personally directed Maratha operations from his headquarters and was at great pains to bring them to a successful issue.

The main incidents of the four years' campaign against Janjira may be thus summarised :—(1) the capture of Raigad by the Pratinidhi on 8th June 1733, (2) the capture of Vijaygad and Mandangad by Sekhoji Angria in July 1733, and (3) the Peshwa's triumphant march up to the gates of Janjira. With the death, however, of Sekhoji Angria on 28th August following, the series of successes closed. The Pratinidhi who after his initial successes had invested Gowalkot was repulsed with heavy losses and withdrew to Satara. The Peshwa pressed on the siege of Janjira for some time, but deprived of the co-operation of the Angria's navy, his attempts ended in failure, and realising the futility of further operations, he returned to Poona in December after patching up a hollow treaty.

During the next two years 1734 and 1735 the contest was confined to the region of Gowalkot and Anjanwel, round which a fierce struggle raged : many experienced leaders had to return discomfited from their impregnable walls. This exasperated the king so much that he directed Chimaji Appa and Pilaji Jadhav to take the field and bring the undertaking to a successful issue. Chimaji in a short campaign of two months—March and April 1736—met Sidi Sat near Rewas and killed him in a fierce battle. Gowalkot, however, held on and with the break-down of Pilaji's health the siege had to be given up, so that the fort continued in the possession of the Sidi for another twenty-five years. The papers in Selections 3 and 33 will be found to appertain to one or another of the incidents mentioned above.

It may be a matter of surprise that what at first sight appear to be a disproportionately large number of papers on this subject have been selected for publication. Nearly all of them, however, are from the pens of prominent individuals who took a personal share in this protracted and memorable struggle of which so little has been hitherto known,—Sekhoji Angria and his brothers Sambhaji and Manaji, Pilaji Jadhav, Khandoji and other members of the Mankar family, Santaji Jadhav, Udaji Pawar,

Baji Bhivrao Retrekar, Tubaji Anant, Vasudeo Joshi, these and many others were specially deputed for service against the Sidi and left behind full records of their experiences. Many heroic engagements are herein described in graphic detail : the capture of Raigad, Bankot, Mahad, Underi and other strongholds and the obstinate struggle before the fort of Gowalkot (near Chiplun) in which both the sides put forth their utmost strength for over three years—all these, added to the bitter domestic struggle between the Angria brothers and the insubordinate or luke-warm attitude of several others, will be found accurately and fully recorded in the order in which they occurred. In fact the student who desires to grasp fully the strong and weak points of the Maratha character,—their stubborn heroism, their perseverence and resourcefulness, as well as their utter lack of the spirit of co-operation, their impatience of control and their want of method,—will find all these traits so well exemplified in this single campaign, that a careful study of it will supply in it something like a miniature of the whole of Maratha history. The disputes between members of the Angria family which first came to light in the course of this campaign, may now be clearly grasped and will enable us to obtain a clue to the history of subsequent developments, finally resulting in the annihilation of the Angria's navy in 1756.

Many places changed hands so often that it has been a difficult task to assign accurate dates to some of these papers and they should be regarded as provisional.

The map given in Selection No. 3 may be conveniently used for this Selection also.

No. 1] [8-8-1729

छ ३० मोहरम

श्रीजयति

श्रीमंत राजश्री पंतप्रधान व

राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आऊजी नीलकंठ साष्टांग दंडवत प्रणाम विनंती. येथील क्षेम ताा छ २३ मोहरम मुाा अलीबाग येथास्थित असें विनंती. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालों ते लोहगडास आलों. तेथून पर्जन्य बहुत लागला. दों दिवसी पेणेस आलो. गलबतें थावयास दोन मुकामें जाली. तेथून येऊन राजश्री सेखोजी आंगरे सरखेल यांची भेटी अष्टमी मंगलवारीं घेऊन स्वामीची वस्त्रे दिल्ही. कितेक अर्थ संकलितार्थें आज्ञेप्रमाणें सांगितला. बहुत संतोषी जाले. सारांश या उभयतांचा हेत पूर्वी सरखेल स्वामीसी श्नेहे वर्तत होते त्यापेक्षां अतिशयेसी श्नेहभाव धरितात, दुसरा अर्थ किमपि नाही. राजश्री स्वामीकडील वस्त्रे पदाची काल गुरुवारी नवमीस दिल्ही. पुढे वरकडहि बोलीचाली होऊन यांचे सौरष्ये समाधानें आज्ञा घेऊन सत्वरीच सेवेसी येतो. विदित जालें पाहिजे हे विज्ञापना.

¶*Auji Nilkanth assures the Peshwa of the fidelity of Sekhoji Angria to whom the robes of honour from the King were delivered by the writer.*

No. 2] [22-9-1734

श्रीमंगलमूर्ति

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनीत सेवक कृष्णाजी राम सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील कुशल ताा छ १९ माहे जावल स्वामीचे कृपेकरून मुाा जंजिरे मुंबै येथास्थित असे विशेष. येथून आम्ही पोहचल्यावर इंगरेजाचा येक माणूस व आमचा येक यैसी जोडी पत्रें देऊन रवाना जाहाली ती सेवेसी सादर जाहाली असावी; तिचे उतर पावल्याचें व लिहिल्याचें अद्याप न आलें; व दुसरा मनुष्य येथून पेणचे मार्गे विनंतीपत्र लिहून (रवाना) जाहाला तोहि सेवेसी सादर जाहला असेल. यानंतर छ * मिनहू शुक्रवारीं विलाइती * * वर पत्रें येकाकी * हार्न जनराल बहाल, राबर्ट कोविन तगीर म्हणून आली, यैस तारवाच्या कपितानाने

लिहिलें. शनवारी दुसरे दिवसी संध्याकाळीं संदुक उतरली. छ ९ रोज रविवारापासून कार्भार करूं लागले. सेवेसी श्रुत होये. येविसीं राजश्री पंत आपास विनंतीपत्र लिहून हकीकत निवेदन केली होती ती सेवेसी सादर जाहाली असेल. जनराल कोईन यांचे तीर्थरूप विलायतीस होते ते वारले म्हणून लिहिलें आलें. या उभयतांस यथायोग्य पत्रें लिहावयास स्वामी समर्थ आहेत. पेशजी सेवेसी जोड्या गेल्या दोन, त्यांच्या उताराची वाट उभयता लक्षिताहेत. हा कालवर येकमेकांचे सौरस्य बाह्यात्कारी बरे चालत आहे. जुने जनराल स्वस्वामिलौकिक इष्टत्व रक्षायास निपुण तैसेच हे सांप्रत अपूर्वक कारभार करावयास लागले आहेत. कोणीहि सांगितले बोलिले मन घालून यैकतात. माहा भले दक्ष आहेत. सेवेसी श्रुत होये. स्वामीच्या पत्राचा मार्ग लक्षिताहेत. येथें पत्रें आलियावर सविस्तर सेवेसी लिहून सादर होईल. खर्चास येथें असावें; येक दोन महिने जरी येते तरी प्रसंगोपात खर्चास कार्यास येते. च्यार चाकर बा होते, पैकीं येथील दोन ठेविले व पहिले चहूंपैकीं दोन करार असेत, सेवेसी श्रुत होये. येथें नवे जनराल बसले स्वपदी, तेव्हां सर्व माहाजन व थोर थोर जाऊन हरयेक पाच रुपये कनिष्ट, मध्यम पांच पुतली, उतम ९ मोहरा यैसी नजर केली. आम्ही पांच मोहरा घेऊन गेलों होतों त्यास न घ्यावयास आग्रह करीत होते. हे गावीचें आहेत, तुम्हास योग्य नाही. शकुन आहे म्हणून बोलिलो, त्यावर दोन मोहरा आनून उचलून घेतल्या. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News-letter from Bombay to Peshwa Bajirao by Krishnaji Ram, reporting the appointment of Governor Horn and the dismissal of Cowan.*

No. 3] *[27-4-1732*

श्री

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री चिमाजीपंत आपा यांस सिऊबाई अनेक आशीर्वाद. येथील कुशल वैशाख सुधी ८ शुकुरवार दोन प्रहर जाणऊन स्वानंद लेखन केला पाहिजे. यानंतर किले पालगड याचे वर्तमान पूर्वी आपणास लिहिले होते त्याची उत्तरे आपण पाठविली ती पावोन सविस्तर अर्थ चितांत आला. त्यास तेथील वृत पूर्वी जे आम्हास कलले ते लिहिलेच होते. त्याअलीकडील वर्तमान आपणाकडे पत्रे लिहिल्यावरी * * * आले की किले तिकोने-करानी गड घेतला, याकरिता तिकोन्यावरी * * * * वर्तमान आले त्यावरी * * * * * च्या आसपास आम * * ते त्या

लोकानी आम्हाकडे * * पाठविले, तैसेच चिरंजीव कृष्णरायासीहि टाकोटाक माणसाबो पाठविले. त्यास चिरंजीव कृष्णराऊ होते त्यांस आपण पुण्यास आले हे वर्तमान आम्हीं पहिले लिहिले होते. त्यावरून ते त्या स्थलीची मजबुदी करून कांहीं स्वार थोडेसे व थोडेच पाईचे लोकानसी जरूर आपल्या दर्शनास यावया बोरघाटाखाले मढास आले. तो पालीकडील माणसे जात होती त्याची त्यांची भेटी जाहली. वर्तमान कलताच ते त्या कार्यावरी जावयानिमित्य मढातच राहून आम्हाकडे जमाव लौकरी पाठविणे यैसीं पत्रें पाठविल्यावरून आम्ही रा। सेखोजी नाइक सिंदे चालीस पनास माणसानसी पुढें रावाना जाले. मागून रा। लक्षमण विस्वनाथ या बराबरी लोहगडकरी व कोरींकर व इतर काही यैसे से सवासे माणसानसी रवाना जाले व चिरंजिवानी मढाहून कल्याणासहि जमावाबो माणसें पाठविलीं. तिकडूनहि काही स्वार व लोक येतील. यानंतर काली सतमीस पेणहून पत्र आले की (स)रखेलीकडील पांच लोक पहिलेच पालीवरी चाकरीस कबिलासुधा गेले होते. त्यानी वरीसभरी चाकरीस राहून त्यानीं गड बलावला, आणि नारोपंतास पेणेस सांगूं पाठविले कीं आपण किला बलावला, लौकरी येऊन मदत करणे. येसे सांगू पाठविले. त्यवरून तेहि से दीडसे माणसानसी गेले. यसे तेथून वर्तमान आले. आजी किले (तिं)कोनीहून लक्ष देणे त्यानी पुढें स्वार होऊन जातो लिहिले की (फाटल्या व पुसटल्या ओळी आठ) कलत नाही. आम्ही आपले आज्ञेप्रो जो यत्न करावयाचा तो करून जे वर्तमान होईल ते वरचेरी लिहून पाठऊ आपणास पहिले पत्र पाठविले तेव्हा रा। गोविंद कृस्ण यासीहि लिहिले होते, त्यावरून त्यानी ढमढेरे याचे स्वार २९ व बरखंदाज २९ घेऊन येथे आले यांसहि रवाना करितो. मागती जे तिकडून वर्तमान येईल ते लिहून पाठवितो. बहुत लिहिणे नलगे. लोभ असो दीजे हे आसीर्वाद.

¶*Shiubai Chaskar writes to Chimaji Appa, communicating troubles at the fort of Tikona and the work that the writer's son Krishnarao was doing there.*

No. 4] [*1732?*

- पुरवणी राजश्री चिमाजीपंत अपा यासी. पत्री सविस्तर लिहिले त्यावरून कदाचित आपण चिंती आणिजेल कीं यै(से करावे) नलगे तरी यैसी गोस्टी न म्हणावी. जोवरी तेथे येक जणाचे लक्ष लागे तोवरी येत्न सोडू नये. आम्ही चिरजिवाकडून जे वर्तमान येईल ते टाकोटाक लिहून पाठवितो. आपण कांहीं स्वार तयार असो द्यावे. स्वारांची सलाबत अधिक आहे. हबसियाचीहि स्वारी (पोख्त) तेथे आली आहे व पहिलेहि त्याचे तर म (तरफेचे?) आहे, तेथें हमेश

से दीडसें लोक राहतात. यैशास मुख्य गोस्टी राजश्री प्रधानपंताच्या व आपल्या पुन्येकरून बहुत मुखे तो आपल्या हातास यावे यैसे आहे. यात श्री करील ते प्रमाण. बहुत काय लिहिणे नलगे हे आसीर्वाद.

¶Chaskar Shiubai to Chimaji Appa, assuring him of her son's co-operation in the campaign against the Sidi and asking him to be better equipped to meet the enemy.

No. 5] [*18-1-1733*

छ १९ साबान.

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ वडिलांचे शेवेसी

आपत्ये नानाने सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता माघ शुा १५ पौर्णिमा गुरुवार पावेतो मौजे जेजुरी येथे सुखरूप असो विशेष. वडिलांनी आज्ञापत्रें पाठविली ती पावली. राजश्री स्वामीचे साहित्य करणे म्हणून आज्ञा. ऐसियास आम्ही खासगत गाव व मावले व जुनर ऐसे मिळोन हजार नवसे वेठे जमा केले आहेत. शाकभाजी थोडीबहुत आणिली आहे व आम्ही राजश्री आबाजीपंत तात्या सांगतात त्याप्रमाणे वर्तणूक करितों. आपण संक्रमणाचे तिलसह शर्करा पाठविली ती पावली. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Nana Saheb informs Bajirao that he has made every arrangement for the reception of the King at Jejuri.

No. 6] [*23-8-1743 ?*

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवसी

आज्ञाधारक खंडोजी माणकर चरणावरी मस्तक ठेऊन सा दडवत विज्ञापना. ता छ १२ माहे रज(ब) पावतो प्रांत मजकूरचे व आज्ञाधारकांचे वर्तमान येथास्थित असे विषेष. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा, की "तुमचे स्वाध्यान मामला व गड किले तालुका आहेत येथील बंदोबस्ताचे वर्तमान व राजपुरीकडील वृतांत सविस्तर लेहून पाठवणे व तुम्ही बहुत सावधपणे राहोन मामलीयाचा बंदोबस्त राखणे. चिरंजीव सदोबा तुम्हास आज्ञा करीत जातील त्याप्रमाणे वर्तणूक करीत जाणे" म्हणोन आज्ञा आज्ञा ते सिरसा. आज्ञेप्रमाणे

स्वामीचे पुने करून मामलियाचा व किलेकोटांचा बंदोबस्त करणे तो केला आहे. सेवकापासून बंदोबस्तास अंतर पडल यैस नाही. शामलाकडील वर्तमान तरी सारे हबसी मिलोन सिदी संबूल यासी मारिला. हाली अकरा हबसी कारभार करितात, त्यामध्यें सिदी याकूद म्हणोन हबसी आहे तो प्रधान होऊन अजम सिदी हसन खानजादे यास बाहुले मात्र बैसऊन हबसी कारभार करितात. त्यासी सिदी हसन यासी धाशतच आहे. का की सिदी संबूल याची गत यैसी केली. पुढेहि येथे हाबशियापुढे चालणार नाही. आपलाहि परिणाम यैसाच आहे. त्यामुले हबशियाचे अपरोक्ष सेवकास लिखापडो[1] करितो की मी श्री (मंताच्या पदरीचा) आहे जे * * * * * * * * * चालविले तेप्रमाणे माझे चालवावे आणि (बुधी) इकडील धरतो. सेवकास येकदोन पत्रे त्याची आली. त्यासी जाबसाल कोण्हे प्रकारे करावा त्याची आज्ञा केली पाहिजे. हे वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिले होते त्याजवरून निवेदन जालेच असेल. तरी जाबसालांची आज्ञा करणार खावंद आहेत. विषेष. 'चिरंजीव दादजी माणकर सुखरूप आहेत त्याची फिकीर न करणे' म्हणोन आज्ञा, यैसियासी स्वामीचे पदरी अ(सलिया से)वकाने चिंता करावीसी काये आहे? (आस्था) सेवकाची व चिरंजिवाची स्वामीस आहे. स्वामीचे चरणाखेरीज दुसरे काही नाही. चिरंजीवास पैदा[2] करून अन्नवस्त्र देणार खावंद समर्थ आहेत. विषेष. स्वामीसेवेची इशारत दाखविली, की 'चहूकडील बातमी राखोन जे स्वामिकार्य आढलल त्यास न चुकणे' म्हणोन आज्ञा. यैसियास स्वामीचे आज्ञापत्र नव्हते ते अगोधरच तरतुदीत आहो. स्वामिसेवेसी सेवक चुकेल यैसे होणार नाही. परंतु सेवकाचे आता कोण्ही हरयेक गोष्ट पूर्ववतप्रमाणे सांगितली तरी खरे मानीत नाही. कां कीं खावंदाने च्यार गोष्टी खावंदाने आपले स्वमुखे सांगितल्या नाहीं व सेवकानीहि सांगितल्या नाही. यास्तव लोकास खरे वाटत नाही. येखादेयाजवल बोलीचाली केली तरी परिणामी सेवट लागल की नलगे. यास्तव लोक आपले व परकी इतबार[3] धरीत नाही. त्यासी सेवक काही चाकरीस चुकतो यैसे नाही. सेवकाचे धडावर सीर आहे तोपरयेंतु मामलेयाची व किलेकोटाची चिंता आहे यैसे नाही. कृपा पूर्ण आसो द्यावी सेवेसी शृत्य होये हे विज्ञाप्ति.

¶*Khandoji Mankar to the Peshwa, giving him assurance of his devoted and strenuous services in the cause entrusted to him.*

---

१ पत्रे लिहितो. २ वाढवून. ३ विश्वास.

No. 7] [18-3-1733 ?

छ १२ सवाल

श्री

पुरवणी राजश्री राऊस्वामीचे
सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी राजपुरीकडील मजकूर लेहून पाठविला. त्याचा विचार लेहून पाठवणे म्हणून आज्ञा केली. त्यास दरबारीचा विचार तरी पूर्वीच लेहून पाठविला होता, त्यावरून विदित जाले आसेल. सांप्रत स्वामीकडे राजपुरीकडील वर्तमान तत्वता आले आसेल ते लिहिले पाहिजे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*The writer solic ts from the Peshwa news about Rajpuri*

No. 8]

छ १ सवाल.

श्री

पुरवणी राजश्री चिमणाजी पंडित
दाजी गोसावी यांसी

विनंती उपरी. राजश्री राऊ राजश्री स्वामीची आज्ञा घेऊन मजल दरमजल येत आहेत म्हणोन लिहिले. त्यावरून बहुत बहुत समाधान जाहालें. पुणियासी येऊन पावलेच असतील. पत्रेहि पुणियासी पाठविली आहेत. बहुत काये लिहिणे? कृपा असो दीजे. रा छ २२ माहे रमजान हे विनंती.

¶*The writer expresses to Chimaji Appa his satisfaction at the Peshwa's having undertaken the expedition against Rajpuri.*

No. 9] [6-4-1734 ?

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व ता राजश्री
आपा स्वामी वडिलांचे सेवेसी

विनंती. काली मंगलवारी साइंकाली गोवलकोटीहून पत्रे आली ती आजी बुधवारी प्राथःकाली राजश्री गोविंदराऊ चिटणीस याणी राजश्री स्वामीस वाचून

दाखविली त्याची नकल बजिनस स्वामीपासी पाठविली आहे त्यावरून विदित होईल. साराऊष त्यातील मजकूर की बाबाजी म्हसके जमात्र सुधा तोफा घेऊन येऊन काळुस्ताच्या डोंगरावर मोर्चा बसविला. भांडी लागू केली. (अ)क्षत्रितीयेस मोर्चे काइम केले. आम्हीही दल * * * हून कूच करून (पुढे दोन ओळी फाटल्या आहेत) * * ही दोन्ही तो * * * फौज व हशाम पोख्त * * * ऐसे लिहिले आहे. हा मजकूर आइकिल्यावर राजश्री (स्वा)मी बोलिले कीं स्वार नवसे आहेत. तितकेच पुरतील * * * पाइचा जमाव मात्र पाठवावा, ऐसे बोलिले. स्वामीस विदित व्हावे यास्तव लिहिलें असे. पुढे होईल वर्तमान ते लेहून पाठऊं. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Bajirao and Chimaji are informed that Maratha artillery has started firing on the fort of Gowalkot.*

No. 10] *[24-4-1733*

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान

दाजी गोसांवी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय अवगत जाहला व कितेक अर्थ मुखता राजश्री बालाजीपंत याही निवेदिला. यैशास याच विशाईचा पर्याय पेशजी लेहून पाठविला आहे त्यावरून अवगत जाहालेच असेल. हा समय मनसबियाचा नसतां आपण कबूल करून आले, ते समई हा अर्थ चित्तीं आला नसेल यैसें काहीं नाहीं. राजश्री स्वामीच्या आग्रहास्तव योजिला. याउपरी योजिला मनसबा सिधीस पाववावयास पाहिजेच. त्याचाहि विचार जो करणें तो बराच केला असेल. या प्रसंगी आम्ही आपणासनिध येऊन आपले आमचे विचारें जो विचार होईल तो कधींहि ज़ुमस खाणार नाही, हे गोष्ट यथार्थच आहे. परंतु आमचा मामिला पाण्यातील, जंजिरियाची बेहबुदी करणें, गुराब गलबतें धक्यावरी घेणे इत्यादिक कार्यें पर्जन्याआलाकडेस समुद्रास तुफान जाहाले नाहीं तों अगोधर करावे हेहि आपणास कलतच आहे. व दुसरी गोष्ट रत्नागिरि

---

१ तोफा २ पायदल.

जागा नवीन, तेथील फाफटपसारा वेहबुदी होऊन जागा सजुंदो[1] व्हावा व शामलांकडील वरातदार(र) बाहेर घातले ते दुख त्याचे चितीं येऊन मुल्कात आवाडाव करावी, व रत्नागिरि आम्हाकडेस जाहाली हे दुख वाढणाराचे चिती वाढोन मुल्कात जमाव वरघाटचे आले आहेत, यैसे कितेक विचार येऊन प्राप्त जाहाले म्हणौन राजश्री रघुनाथजी याजबराबर लोकांचा जमाव देऊन रवाना करावे लागले. त्यामुले तिकडेसहि जमाव गुंतला. इकडीलहि जमाव जागजागा गुंतला. अन्यथा आम्हास यावयास अगाध काय होते ? हाली नौकामार्गें जमाव आणवावयाचा तो आणविलाच आहे. जलमार्गाचा विचार येका रोजास आठ रोज लागतील. तथापि तोहि जमाव येईल. तूर्त पाचकसें माणसाचा जमाव करून चिरंजीव मानाजी आंगरे यास व राजश्री माहादाजी कृष्ण यास रवाना करितों. आम्ही यावयाचे कितेक दोषे[2] आहेत ते राजश्री बालाजीपंत यांस सागितले आहेत ते आपणास लेहून पाठवितील व कितेक अर्थ मुखता राजश्री खंडो चिमणाजी हे सांगतां कलेल. आम्हास कायवाङमनसा राजश्री स्वामीचे आज्ञेपेक्षा व आपले वचनापेक्षां व उभयतां तीर्थरूप यांचे मनोभिष्ट सिधीस न्यावे याजपेक्षां दुसरे अधिकोतर कांही आहे यैसें नाही. सर्व प्रकारें या मनसबियाचें परम आवश्यकच आहे. सारांश जे गोष्टीने धण्याचे कार्य होऊन यश पदरी पडे तो अर्थ केला पाहिजे. जाणिजे. रा छ २० माहे जिलकाद बहुत काय लिहिणें लोभ असों दिजे हेविनंती. (मोर्तब सूद)

¶Sekhoji Angria explains to the Peshwa the difficulties that he had to meet in sending his contingent of men and joining personally in the campaign as desired by the King. He had to attend, he says, to several affairs in Konkan before the rainy season and the Sidi was likely to create some trouble round about Ratnagiri.

No. 11] [*9-5-1733*

श्रीमलारिर्जयति

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचें
सेवेसी

पो॥ जिवाजी खंडेराऊ दंडवत प्रणाम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. राजश्री सेखोजी आंगरे सरखेल यांस आपणाकडे सामील करावे येविषींची आज्ञा राजश्रीनी करून आम्हास रवाना

१ तयार, सिद्ध. २ दोष=देश, पर्याय ?

केलें. आम्हीं स्वार होऊन छ ९ जिल्हेजी किले सरसगडास आलो. येथे वर्तमान कलले की सरखेल आपणाकडे जलमार्गे स्वार होऊन गेले. पुढे आम्हास आपणाकडेच यावे लागतें. तरी पत्र पावताच शंभर स्वार रवाना केले पाहिजेत. स्वार आले म्हणजे आम्हीं स्वार होऊन येतो. स्वार लोकर येत तैं करावें. नाहीं तर येथेच गुंतोन राहावासे होते. बहुत काय लिहिणें कृपा असो दिल्ही पाहिजे. हे विनंति.

¶*Jivaji Khanderao Chitnis going to meet Sekhoji asks the Peshwa to furnish him with an escort of 100 men to repair to Rajpuri where Sekhoji then was conferring with the Peshwa.*

No. 12] [*13-5-1733* ?

श्री

पुरवणी राजश्री चिमणाजी पंडित
दाजी गोसावी यांसी

विनंती, उपरी. रयत शामलाचे भयास्तव उठोन जात आहे व शामलहि मुलकात चोरीछपी करून उपसर्ग केला असे. रयतीस म्हणतो की त्या प्रांती रयेतीचा तह मांडले बिरवाडी वगैरा कुलमुलुकाचा जाहला व सुवर्णदुर्ग प्रांतीचाहि जाहला. या गोष्टीवरून रयेतीस भय प्राप्त ज्ञाहाले व शामलास बलकवडे माणकर सुवर्णदुर्ग येथील बंदोबस्त जाहलियावरून येथें बजीद व्हावयासी निमित्य जाहले असे. व इंगरेजहि तोच दाखला देऊन रयेतीच्या तहाविशी लिहीत आहे. हेविशी आपण काय विचार काढितील तो लेहून पाठवावा. वरकड शामलास ठेचगा तरी द्यावाच लागतो व बैसले जागाहून उखलावा लागतो. पुढे रयेतीचे संरक्षणास्तव आपले विचारे होईल ते करावें इतकाच अर्थ काय असेल तो असो; परंतु प्रांतात टिको देऊ नये व जागा बलाऊ देऊ नये हा सर्व सिधांत असे. बहुत काय लिहिणे ? कृपा केली पाहिजे. रा छ ९ माहे जिल्हेज हे विनंती.

(मोर्तब सूद)

¶*The harassment of the ryots by the Sidi is communicated to Chimaji Appa in this letter.*

No. 13] [*25-5-1733*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीन्चे सेवेसी

सेवक मल्हार हरि कृतानेक साष्टांग दंडवत प्रा विनंती. येथील कुशल जेष्ट बहुल अष्टमी भृगुवासरपर्यंत स्वामीचे कृपेकडून यथास्थित असे विशेष. स्वामीची

आज्ञा घेऊन निघालों ते खोकरीच्या दरवाजियाबाहेर अस्तमानपर्यंत घोडियाचा मार्ग लक्षीत राहिलों. दिनांती घोडा बेलगाम जीन खोगीर बेसामान आला. राजश्री सरखेल निघोन पुढेंच गेलें. समागमें चौघे पोरगे मात्र उरलें. सीवसिवो[1] करीत मुरूडच्या डोंगराआलाकडेस आलों. पुढे निभाव न होय. यास्तव तेथेंच राहून दुसरे दिवसी त्रितीय प्रहरी खाडीवर आलों. तो लोक देखील गेले. खाडीस तुफान जाहालें. मार्ग न चाले म्हणून सालावासच राहिलो. च्यार घटका रात्रीस चेहुलास आलो. शुक्रवारी दोन प्रहरा कुलाबियास आलो. हे सविस्तर वृत स्वामीस कलावे म्हणून लिा असे. मार्गी श्रम चालता जाहाले ते श्री जाणे! असो. होणीर बलवतर. मातुश्री लक्ष्मीबाईच्या गावाच्या सनदा सिके करून अंताजीपंताजवल ठेविल्या त्या आणून देणे म्हणून राजश्री बालाजीपंतास माझे रुबरू स्वामीनी आज्ञा केली परंतु त्यास फुकाचे येश घेवविले नाहीं. हैदर भालदार याजवल द्यावयाचे मान्य मारनिले याहीं केले तेंहि न केले. बहुधा पत्रेंच जाली नसतील. अन्यथा शरीरसंमधी लोकांपासून अंतर न पडते. आम्हा चाकर लोकांपासून यैसे अंतर होते तर जन्मवरी बोल पदरीं येता. याउपरी पत्रें देविली तरी रयतेची दिलभरी करून काही किफायत होयेसी होईल. सविस्तर निवेदन जालें पाहिजे. कृपा निरंतर वर्धमान केली पाहिजे हे विनंती.

¶*Malhar Hari informs the Peshwa of his arrival at Kolaba and describes the hardships that he met with in the journey.*

No. 14] [*27-5-1733*

श्री

राजश्री बाजीराव पंडित

प्रधान दाजी गोसावी यांसी

७ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय केले पाहिजे विशेष. आपला निरोप घेऊन निघालों ते अस्तमानी मुरुडानजीक आलो. तेथून तसेच निघालों तो प्रहर रात्रीस घाट उतरोन नांदगावास मुक्काम केला. दुसरे दिवसी स्वार होऊन चेउलास भोजनाचे करून अस्तमानी कुलाबा दाखल जाहालो. पुढें अरमारची अेलाथ[2] अवदा काठ्या आदिकरून उतरणी करीत असो. उतरणी जाल्यावरी गुराबा धड्यावरी घ्यावयाचा विचार करून

---

१ शिमगा करीत, शिव्या देत. २ अलात, The blade of an oar वल्हे.

छावणीचाहि विचार होईल. येक महिना याच कामास लागेल. तदुतर मोर्चे-याचा विचार करून, सध्याच करीन म्हटल्यास लोक अरमाराकडेस गुंततील. अल्प जमावानें निभाव न होय. उंदेरीस पाच सातसे नवे माणसाचा जमाव व दोन तीनसें पहिले येकूण आठ नवसें जमाव जाहाला आहे. याकरितां व मुलकी पेराणियाचा हगाम, चोरीछपीने उतरोन मुलूक मारील, यास्तव सध्या उंदेरी-कडील विचार पाहात नाहीं. येक उद्योग विल्हेस लाऊन दुसरा विचार पाहून. आपणास कलावें म्हणून लिा असे. जाणिजे रा छ २३ माहे जिल्हेज. बहुत काय लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती. (मोर्तब सूद)

¶*Shekhoji Angria informs the Peshwa of his arrival at Kolaba and offers his calculations for further action against the enemy.*

No. 15] [*31-5-1733*

श्री

राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसावी यासी

८ सकलगुणालंकरण अंखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. आपणापासी बोली केली, त्या उद्योगास लागून आपणास लेहून पाठविले जे, अरमारचे खटपटीस येक महिना लागेल. तदुतर उद्योग करून म्हणौन व आम्ही दोनी उद्योग बाह्यरंग रक्षून चौबुर्जीचा यत्न मांडिला. इंग्रजाकडेस व फिरंगी याजकडेस लेहून व सांगोन पाठऊन रसायण संपादिले. तेथील लिहिल्याची उतरे लौकरीच येतील. तैसेच चेऊलकर मोगल याजविशी आपण निर्वणूक केली व समाधानपत्र द्यावे म्हणून सांगितले त्याजवरून आपणाजवल बोलावयाचे ते बोलोन आलो व पत्रहि पाठविले. यैशास त्याचे वर्तते रीतीचा अर्थ तरी जंजिरियाचे हात पाय उंदेरी व अजनवेल. अजनवेलीचे साह्यकर्ते मंडणगड व गोवलकोट व विजयगड येकूण तीन ठिकाणें. त्याजमध्ये मंडणगड जागा बाका व लोकाची जमियतहि भारी होती. तो श्रीकृपे व धण्याचे पुण्यप्रतापे हस्तगत जाहाला. राहिले दोनी जागे. त्याचा मुंजाखा[१] फारसा नाही. आठा पांचा रोजा तेहि विल्हेस लागतील. रायगडचाहि विचार आपण करणे तो केलाच असेल. अंजनवेलीस शह द्यावयासी राजश्री येमाजी शिवदेव यास राजश्री स्वामीनी रवाना केले होते ते उतरलेच असतील. त्याही

---

१ पर्वा, हिशेब, प्रतिष्ठा.

मोर्चेबंदी करून अंजनवेलकरास आटोपिला तर उतमच जाहाले. नाही तर भाद्रपद मास होतांच अरमारानसी राजपुरीचे नस्तावरी यावे लागेल. तेच संधीस काही अरमार जलमार्गे व काही लोक खुशकीचे मार्गे आम्ही रवाना करून व आपणहि लस्कर पाठवितील यैसे येकाचवछेदे यालगार करून तोफा जोडून मारागिरीखाले जेर करावा म्हणजे आयास येऊन स्थल सोडून जाईल अथवा कौल घेईल यांत संदेह नाही. याकरितां अंजनवेलीचे आगाधसे आम्हास वाटत नाही. येक जंजिरा दुसरी उंदेरी दोनी स्थले कठिण. त्याजमध्यें अंजनवेलीस वेढा बसलियाने जंजिरियाचे हातपाय तुटलेसे होतील. याकरिता उंदेरीस पायेबंद देऊन बाहेरील चौबुर्जी हाताखाले घालून त्याची उतरावयाची बंदरे जागजागा आहेत तेथे मेटे ठेवावी. तरांडी फिरती जाहालियावरी पांच सात गलबते याच प्रवाही ठेऊन दर्यात येक गलबत आगर येक माहेगिरी बाहेर न पडे यैसे केले जाईल. शनैःशने श्रीकृपे व धण्याचे पुण्यप्रतापे आपला मनोदय सिधीस पावविला जाईल परंतु उंदेरीचे हात पाय छेदिल्याविना हा मनसबा सिध होतो यैसे नाही. त्यास प्रथमता चेऊलकरास निग्रह करावा. दुसरा मुंबैकरासी सख्य संपादून इंग्रज आपले ममतेत आणावा. तिसरा थलेची चौबुर्जी घेऊन किनारा बंद करावा. खांदेरीचे बंदरांत पांच गलबते ठेऊन गलबत आगर माहगिरी निघेल ते दस्त करावी. इतके उद्योग करावे तरीच जेर होईल. अन्यथा होणे नाही. यैशास आपण म्हणिजेल कीं, वरकड उपाय लिहिले ते यथार्थच परंतु चेऊलकर याच परिमालकेंत योजावा यैसे नाही. याणे साह्य काय करणे? याचे बल ते किती? यास त्यास अंतर बहुत व हा आपले कैदेदाखल आहे व निष्टेनेच वर्तणूक करीत आहे. यावरी निष्ठुरता न करावी. यद्यपि येखादे अंतर जाहाले अशिले तर धास्तदपट करून बंदावरी आणावा. नाही तेव्हां निग्रह करावा यैसे म्हणतील तरी त्याजपासून अंतरे कितीक जाहाली ती असोत. त्याजमध्ये अगत्याअगत्य प्रथम अंतर शामलाचे आमचे व याचे सख्य चालत असता रत्नागिरीचा मनसबा आम्ही उभा करून धारकरी नेमून गलबते रवाना केली, त्यासमई सिदी संबूल यास पत्र पाठविले तेच पत्र बजिनस पाठविले आहे. त्याजवरून त्याचे कौटिल्यतेचे वर्तणुकेचा अर्थ चितात येईल. तैसेच आम्ही चेउलास आल्यानंतर भेटीस येणे म्हणून सांगोन पाठविले. तथापि आपण न आला व भावासहि न पाठविले, ना कोणी कारभारी पाठविला व खबर बखर वरचेवरी उंदेरीस लेहून पाठवितों व सारेवाद (?) व पठाण राजपुरीहून रुसखत केले ते चेऊलास आले, त्यांस गलबतावरून कबिलेसुधा उंदेरीस रा केले व कांहीकांचे कबिले रेवदंडियात ठेविले व जीर्ण देऊल राजकोटानजीक होते त्यात दारू भरून उडविले. त्यावरून त्यास सांगोन पाठविले त्याचे उत्तर मगरुरीचेच सांगोन पाठविले जे देऊळ आपल्या कोटास मोर्चा

5198

याकरिता उडविले. यामुळे काजिया पडिला तरी कबूल असो. यैसे कितेक त्याचे वैगुण व दुराचरण औधत्य देखोन तीन च्यारसे माणूस व च्यार पांच तोफा पाठऊन येकसमयावछेदे यालगार करून मारून गर्देस मेळवितों. हे साद्यंत वर्तमान आपणास कळावे म्हणून विशेद लिहिले आसे. आपण निर्वेणूक येते समई केली होती म्हणौन तपसिले लिहावे लागले. याउपरी येक दोन दिवस लागतील ते लागोत परंतु यास सोडीत नाही. यास घेतल्यानंतर उंदेरीस मोर्चे देऊन बाहेरील चौबुर्जी घेतो. जागजागा बंदरोबदरी जमाव ठेऊन जे जागा उतरेल तेथे ठेचगा देऊन. कळले पाहिजे. जाणिजे रा छ २७ माहे जिल्हेज बहुत काय लिहिणे? कृपा असो दीजे हे विनती.

¶Sekhoji Angria after recapitulating the various acts of hostility committed by the Mogal of Cheul expresses his readiness to go and capture Underi at an early opportunity.

No. 16] *[About May 1733*

श्रीअंबावरद

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामी गोसावी यांसी

विनंती. सेवक अंताजी कृ(तानेक) साष्टांग दंडवत विनंती. इकडील कुषल स्वामीचे कृपेकडून येथास्थित असे विशेष. हाली राजश्री स्वामींनी राजश्री सेखोजी आंगरे सरखेल याकडे रवाना केले. आरमारची तयारी त्वरेने होऊन राजपुरी फते ते करणे म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणे यासी सांगितले. तयारी करीत आहेत. राजश्री जिऊबा चिटनविसी याणी स्वामीस पत्र लिहिले ते पाठविले असे. चेऊल प्रांताची सरदेसमुखीयाची मांडले तपा * पलीकड आहे. त्यास सरदेसमुखी आमल स्वाधीन केली आहे. तरी स्वामी आपणा कडील कमाविसदारास ताकीद करून सरदेसमुखीचा यैवज दरसदे दाहा प्रा वसूल सरकारचा वसूल * * * प्रा घेतील, घेऊन देणे म्हणोन हवालदार व जमीनदारास दोन पत्रे पाठवावया आज्ञा पाहिजे हे विनंती.

¶Antaji writes to the Peshwa that he has delivered the King's messages to Sekhoji Angria about capturing Rajpuri.

5199

No. 17] [2-6-1733

श्री

राजश्री बाजीराव पंडित
प्रधान गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला. दर्यावर्दी व सुतार लोहार पाठवाव म्हणून लिा त्याजवरून दर्यावर्दी काली आा २५ पंचवीस व सुतार २ व लोहार २ याजप्राा पाठविले असेत व ते जागा तीस कोली आहेत, यैसा माहगिरीयाचा सज करून गनिमाची होडी न फटके यैसी केली पाहिजे. गलबतास अवजारे नाहीत म्हणून येथील अरमारी गलबतांची अवजारे २ दोन पाठविली आहेत. कलले पाहिजे. जाणिजे रा छ २९ माहे जिल्हेज. बहुत काय लिहिणे कृपा असों दीजे हे विनंती.

¶*Sekhoji Angria to Bajirao, despatching some artizans as requested and suggesting measures against the enemy.*

No. 18] [3-6-1733

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान
दाजी गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. हबशियाणी जंजिरेयातून जमाव पाठऊन लस्करावरी घालावे यैसा विचार केला आहे. म्हणौन ब्राम्हणाने आम्हाकडील राघोजी दिसला सिपाई गुमटे येथे आहे त्याजवल वर्तमान सांगितले. त्यावरून त्याणे बखर[१] पाठविली तेच बजिनस आपणास कलावी म्हणौन पाठविली असे. यैशास हबसी बाहेर उतरोन लस्करावरी घालितील हे गोष्ट होत नाही, परंतु हव पोलत[२] करून दाहापांचानिसी छपा घालायास अंतर होणार नाहीं. याजकरितां आपणास कलावे म्हणोन लिहिले असे. मेटे चौक्याची खबरदारी रोजबरोज करविली पाहिजे. जाणिजे रा छ १ माहे मोहरम. बहुत काये लिहिणें कृपा असों दीजे हे विनंती.

¶*Sekhoji while rejecting the probability of an open attack by the Sidi asks the Peshwa, who was then encamped at Rajpuri, to be on his guard against a surprise.*

---

१ वर्तमान, हकीकत. २ पाळत ठेऊन, भेद घेऊन.

No. 19] [3-6-1733

छ २ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव
पंडित प्रधान दाजी गोसावी यासी

विनंती उपरी. अजम सेखे[1] याकूब याचा पुत्र अष्टमीस येऊन तमाम मुकासी लोकांस ताकीद सांगोन पाठविलीं कीं सुरगड, अवचितगड, बिरवाडी तीनी ठिकाणें आपले ताबीने[2] केली आहेत. तुम्हीं आपापले कबिले घेऊन जागाचे जागा येणे. त्याजवरून आपण मुकासी कल्याण प्रांते रा। केले ते व पालीखाले आले ते कबिलेदेखील घेऊन गेले. यैशास आपले आमचे विचारें जंजिरा हस्तगत होय तोवरी मुकासी लोकांचे कबिले या प्रांतें ठेऊन लोक बेवसवस[3] करून आपणाजवल मोर्चेयास ठेवावे यैसा विचार करून सरदार रजावंद[4] केले, त्याजप्रा लोकांहीं वर्तणूक केली आणि प्रस्तुत सदरहू वर्तमान कलो आले तरी याचा विचार करणे तो आपण पोख्ताच केला असेल. आम्हास आढलले वर्तमान आपणास कलावे म्हणोन लिहिले असे. जाणिजे रा। छ ३० माहे जिल्हेज. बहुत काये लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Sekhoji informs Bajirao that the Mokasis took back their families to their places at the instigation of the son of Shekh Yakub who gave out that the Talukas of Surgad and Birwadi had been made over to him.*

No. 20] [3-6-1733

छ २ मोहरम

श्री

राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसावी यासी

᳀ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ कलो आला. रायगडचे मलतसर[5] लोक आले. त्याचे मुदे कबूल करून किलेदाराचा कबिला व यैवज व पालखी असा जमाव बाबर देऊन रवानगी केली. हे हैव[6] जंजिरेयात

---

१ सेखजी. २ ताब्यात दिलीं आहेत.

३ निश्चित. ४ कबूल करविले.

५ हक्कदार किंवा कामदार नव्हत असे काही गांवांत जुने वतनदार 'मल्तसर' या हुद्यानें मोडत असत. ६ हव – पाळत.

हबसी यानी नेऊन च्यार गलबतावरी लोक पाठऊन भालगावी जमावावरी छपा घालून हबशी याचा कबिला घेऊन गेले. काही लोक मारिले. किले मारचे कार्य फसले म्हणून गलबते अथवा दर्यावर्दी पाठवावे, येविशी विशदे शब्द लाऊन लिहिले. तरी पूर्वी आपणास वीस रोजपावेतो निरंतर सांगत होतो जे, बिघाड करणे तेव्हा पुर्ता करावा. जंजिरेयात राबता होऊ न द्यावा. राजपुरी, खोकरीतील सारेवाद[1] व हबसी पठाण मुसलमान आहेत ते झाडून बाहेर घालणे ते घालावे. कितेकांची डोचकी मारावी, दहशत पाडावी. या प्रकारे पक्ष छेदावे. कोळी बंदरकिनारा आहेत ते खबर बखर देतात. त्यास स्थलांतर करावे. करणे तो विचार दृढ करावा. शामल मायावादी आहे. विश्वास न धरावा. बोलीचा संदर्भ लाऊन परजन्याचा मार्ग लक्षितो. सामानपूर होतो म्हणून सागत असता आजीपावेतो आपण उपेक्षाच करीत आले. प्रथम दिवसापासून येकच विचार केला असता तरी इतके अगाध न लागते. शामल लोकांचे कबिले सिदी संबूल वगैरा यांचे होते, ते असते तरी मोठेसे काम होते व सामान कोठे (कोट) जाता आद्यापहि जंजिरेयाची तर वाहाते म्हणौन ऐकिजेते. हेच अपूर्व आहे. आपले राजकारण होते तेथे त्याजकडील माणसे असतात तेव्हा हैत्र[2] न्यावया कठिण काय आहे? तथापि आपण पोख्ता यैवज देऊन रा केली तेव्हा रा मानाजी आंगरे यांजबाबरील पनास माणूस बाबरी दिले असते तरी इतका नाश न होता. यद्यपि अंतर लोकापासून पडते तरी जिवे मारिले जाते. आपण भारी जमाव बाबरी दिला. त्याणी खाडीकिनारेयास जाऊन काय बदल राहावे? पनास साठ हबश्यास पाठ देऊन कैमी[3] केली, आण आपण क्षमा करितात हेहि अपूर्व! येक दोघांस शासन केले म्हणजे दहशत पडोन सावधतेने वर्ततील. पुढे बंदोबस्तीचा विचार लिहिला तरी आपण निष्ठरता करून तरीचा बंद करावा. रातबिरात होडी दोणी[4] आली तरी दस्त करावी. कोळी दर्यावर्दी बंदरकिनारा आहेत त्याचा आटोप करावा म्हणजे सहजेच बंदेजे[5] होईल. गलबते आथवा दर्यावर्दी पाठवावे म्हणून लिा तरी येसमई गलबते रवाना करावयाचा विचार आहे नाही आपणास विदितच आहे. दर्यावर्दी व सामान आवजारे आपले पत्र प्रविष्ट होताच रवाना केले ते प्रविष्ट जाहालेच असतील. माहेगिऱ्याचा सज करावयाविशी मानाजी आंगरे यासी आज्ञा केलीच आहे. तयार करितील. गलबताची तयारी न जाहाली तरी उठोन जाऊ, जमावाचा भरोसा कलतच आहे म्हणौन लिहिले. तरी गलबते तयार होतील. जमाव आहे तो आपलाच आहे. जे जागा आपण आज्ञा

१ सारेवाद (?) २ बातमी. ३ नामर्दी.
४ नौकेचा एक प्रकार. ५ बंदोबस्त.

करितील तेथे नीटें[1] व्हाव्यां अंतर करितील यैशी गोष्टी कदापि होणार नाही. येवढे महत्कृत्याची अंगेजणी आपण केली असतां हे गोष्ट लिहिणे उचित आहे यैसे नाही. हवीमुळे येक वेल गनिमाने संधी साधिली म्हणौन सर्वदा येसाच प्रसंग आहे यैसे नाही. आपण सावध असतां हबश्यानी काय करणे आहे? आम्हास निरोप दिल्हा म्हणोन राजश्री स्वामीचा शब्द लागला म्हणौन लिहिले तरी आम्ही आपणाजवळून ज्या कार्यास आलो त्याच कार्याचे तरतुदेत आहों, त्याचा विचार आलाहिदा पत्री लिहिला आहे, त्यावरून कलेल. आपण आहेत तेथे आम्ही आहों. आपणास शब्द कधी लागणार नाही. वरकड जंजिरेयाचे बदोबस्तीचा विचार आपणाजवल पूर्वी सांगतां अंतर केले नाही. प्रस्तुत आपल्याहि चितात बंदेजाचा आर्थ आलाच आहे. याउपर तऱ्ही उपेक्षा न करावी. जे गोष्टीने गनिमाचे पक्षछेदन होय आर्थ करावा. तमाम मुसलमान राजपुरी, खोकरीत आहेत. त्यांस शोस्ती[2] करून बाहेर घालावे. काहीकाच्या दावणी देऊन डोचकी मारावी. दहशत पाडावी तरीच बाहेरील खबर आंत जाणार नाही. नानवली, दिघी, मुडो ये जागा जमाव ठेऊन किनारा बंद कराव म्हणजे केला मनसबा लौकीकें[3] न होतां सिधी होईल. कलले पाहिजे जाणिजे. रा छ ३० माहे जिल्हेज. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे हे विनंती.

¶Sekhoji Angria writes to Bajirao regretting that the addressee's attack on Raygad should have failed and suggests several measures for subduing the Sidi.

No. 21] [*3-6-1733*

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसांवी यासीं

विनंती उपरी. अबदुल रसुलखान याची बोली नरसिंह घाटपांडा याणें आपले रुबरु घातली त्याचा जबाब करणें तो आपणा केला. पैक्याचीं खतें आहेत ती पाहून निकाल करून द्यावा. आम्ही लोक उठऊन आणावे यैसी निश्चयात्मक बोली आपणच केली. यैसें असतां येकबयेक पाचसातसे स्वार व सातआठसे माणूस चाकणेहून उठोन कालोसाभवते येऊन बसले. दाहाकजण (दाहा जण) बाहेरून लोक येत होते ते धरून नेले. यैशास निकालाची गोष्ट आपण केली असतां यैसे त्याणी विचार करावे हे आपले चितास आलें की काय? वतन आपलें आपले स्वाधीन करून घ्यावें. आपण कबूल न करीत तरी माहाराजास नजर करावी

---

१ नेट, निकड. २ शासन, ताकीद. ३ वाच्यता न होता.

हेंहि आपणाजवल बोली केली. आपण वचनहि दिलें त्याजवरून निश्चिंति मानून आम्ही लोकहि कांही तेथून आणिले आणि मागें मुकदमा यैसा जाहाला. येथून मदत करून गनीम वाटेस लावावा तरी आपणाजवल जमाव गुंतला. काही दमाजी ना बाराबर व काही येथे, याप्रा जमावाची फुटाफूट जाहाली. याउपरी आपण विचार करणें तो करावा. त्या वतनदारीस आम्ही बेजार असो. आजीपर्यंत टका पैका खर्च जाहाला तो फुकटच जाहाला. कर्जखते घेऊन कर्ज घेतलें ते पैसे द्या म्हणतां, जबरदस्ती दाखवीत आहे. त्यांचे जबरदस्तीचे अगाध फारसे होते यैसे नाही. आले आहित त्यापुरतें औषध होतें, परंतु जमावाची त्रिफाट जाहाली यास्तवच विचारांतर प्राप्त जाहाले आहे. ये गोष्टीचा अभिमान आपण धरून परिछिन लेहून कालोसचा-गनीम उठवावा. यास अलस आपण करितील तरी आम्हास कोण्ही हासेल यैसें नाही. आपले चितास येईल तें अत:पर करावे. आम्ही लेहून उतराई व्हावे हेच आम्हास उचित. आपले उचितास येईल तें करावें. हजारा पत्राचे जागां हे पत्र मानून कालोसचा निकाल करावा. जाणिजे. रा छ१ माहे मोहरम. बहुत काये लिहिणे लोभ असों दीजे हे विनंती.

¶*The Peshwa is informed of the aggressive attitude shown by Abdul Rasul Khan in laying a siege to Kalosa (near Chakan) in defiance of the terms agreed upon with the Peshwa and in pursuance of which the writer had taken off his men.*

No. 22] [*3-6-1733*

छ २ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव
पंडित प्रधान दाजी गोसावी यांसी

विनंती उपरी. थल येथील चौबुर्जीस मोर्चे देऊन हस्तगत करावी म्हणौन आपण सांगितले व पत्रे पाठविली कीं, त्वरा करणें. यैशास कुलाबा येतांच परजन्याने वृष्टि केली, तन्मुले कितेक कार्याचा तट जाहाला. गलबतें आद्यापि जाग्यास लावायाची आहेत. तैश्याच गुराबा साकरीचे बंदरी लाऊन ठेविल्या आहेत. त्या ठिकाणीं लाऊन शाकार करावी हे कार्य उरकून जमाव स्वारी सिकारीस सिध करावा. त्यास आरमारच्या प्रसंगास मासपक्ष लागणार. तथापि आपण सांगितल्या विचाराची तरतूद करावी, त्यास विचार पाहातां राजपुरीतील हबशी व पठाण वगैरा जमाव मागा पुढा निघोन आला तो व किल्यावरील लोक सोडिले ते तमाम उंदेरीस जमा जाहाले. काही लोक मुबैस गेले त्यास आणवीतच

आहो. काही आले. वरकड येत आहेत. हाली बारा पंधरासे माणूस जमा जाहाले. रोज बरोज नवा जमाव करीतच आहे. जंजिरेयाची गलबते दाहों उरणचे बंदरी तयार करून तरती राखिली आहेत. वरकड माहेगिरया आहेत. जमावाचे बले उरणाहून पेण प्रांते उतरोन मुलूक मारावा. तैसाच थलाहून चेऊल प्रांत मारावा यैसा विचार केला आहे. सीदी आनोल जमाव घेऊन राजकोट चेऊल येथे येऊन आकसी, नागावे येथील ब्राह्मण लोक दस्त करून भ्रष्ट करावे म्हणून स्वारी उंदेरीहून निघाली, हे वर्तमान कलताच इकडून स्वारी त्याजवरी पाठविली. त्यांची यांची गाठ पडतांच स्वारी माघारी उंदेरीस गेली. सीदी अनोल राजकोटांत गेला. मोठा हरामजादा हबसी संपूर्ण प्रातास दंडास आणिले होते. परतु राजकोटांत हबसी मार दस्त जाहाला. प्रस्तुत इकडील शह मुलकाचा वारिला. परतु उंदेरी व उरणाहून मुलूक मारावा, ब्राह्मण धरून न्यावे, यैसा विचार केला आहे. आठा चहू रोजात काय अर्थ तो कलेल. आजीच चौबुर्जीस मोर्चे द्यावे तेव्हा उरणाहून मुलुकांत स्वारी करील ते जागा जमाव अगोधर पाठविला पाहिजे. येथे जमाव पांचसे माणूस आहे. हजार अकरासे जमाव राजपुरीस गुंतला. वरकड जागा जागा जमावाचा गुता जाहाला आहे. जमाव येवढियाने गला पडता येत नाही आणि परजन्यहि बहुत, याजकरिता जमावाची तरतूद करून मोर्चे देणे तेव्हा स्वारांचे प्रयोजन लागेल, तरी आपणास लेहून आणवावे आणि उघाड मानमार्ग पाहून कार्य करावे यैसा विचार योजिला आहे. आपणांस सविस्तर कलावे म्हणौन लिा आसे. जाणिजे रा छ ३० माहे जिल्हेज बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनती.

¶*Sekhoji Angria writes to the Peshwa about the measures taken bu him for opening an attack on the fort of Thal.*

No. 23] [*3-6-1733*

पौ छ २ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराऊ
पंडित प्रधान दाजी गोसावी
यासी

विनंती उपरी. अजम ताजुदीन अलीखान मा राजकोट चेऊल याजविशी आपण विशदे लिहिले. यैशास त्याच्या दुराचरणाचा अर्थ पूर्वी आपणास लेहून पाठविला, त्याजवरून कललाच असेल. आम्हास आपण कार्यभाग सांगितला त्याप्रमाणे करावा, त्याचा विचार पाहतां राजकोटकराने उंदेरकर हबसियाचा येक

हात करून त्याजकडील जमावास जागा द्यावा. आकसी, नागावे येथील ब्राह्म(ण) शामलाकडून धरून न्यावे व आपणाकडील जमाव बाहेर ठेऊन घेतला त्याजवरी परस्पर शामलाची स्वारी वाढून मारावे. थलच्या कोटास मोर्चे दिले त्यावरी मोर्च्यावरी घालावे. उंदेरीची मदत करावी यैसा उभयेतांचा विचार जाहाला म्हणौन लोक आले. त्यास तुकोजी कडू याजबाबरी स्वारी देऊन सामान राजपुरीस रा केला. त्यास चेऊलात उंदेरीची स्वारी सिदी आनोल याजबा आली त्याची व इकडील लोकाची गांठ पडिली तेव्हा काही जमाव माघारे उंदेरीस गेला. सीदी अनोल व काही लोक राजकोटांत गेले. हबश्याकडील लोक कोटात गेले म्हणौन तुकोजी कडू आपले बाबरील जमावानिसी कोटाबाहेर चौकीस राहिला. आपणाकडील लोकास सावध केले. दुसरे दिवसी मुंबैहून तीस पठाण तरीवरून मेढेखार मोगलाची आहे तेथे आले. मनास आणितां राजकोटकराने शामलाकडील पठाण आणविले. आपणाकडील लोकास परभारेच पठाणाकडून मारावे म्हणून आणिले होते. त्यास इकडील जमाव चेउलात आहे हे वर्तमान पठाणास कलताच उंदेरीस गेले. उंदेरकराचा व याचा येक हात होऊन मुलुकास उपसर्ग करणार. हा प्रसिधच अर्थ दिसोन आला. त्याजवरून उंदेरकराचा पक्ष छेदावा हा विचार करून भाऊ व लोक रा केले. त्याणे रेवदंडकर मदतीस आणून कोट भांडविला, तेव्हा सहजेच निष्कर्ष करून कोट हस्तगत करावा लागला. अन्यथा आपले वचनास आम्हापासून अंतर पडते यैसे नाही. जाणिजे रा छ ३० माहे जिल्हेज बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती.

¶*Sekhoji Angria explains to Bajirao the reasons why he was obliged to capture Rajkot and Cheul.*

No. 24] *[4-6-1733*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री येसवंतराऊ गोसांवी यासी

स्नेहपूर्वक बाजीराऊ बलाल प्रधान आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशेल लिहीत जाणे विशेष. पत्र पाठविले ते पावले. आपणास व राजश्री हरि मोरेश्वर राजाज्ञा यांस राजश्री स्वामीनी पाठविले आहे. मजल दरमजल येतो म्हणौन लिहिले ते कलले. यैसियास तुम्ही उभयेता बहुत लौकर येणे. रा छ १२ मोहरम लोभ आसो दीजे हा+ आसीर्वाद.

¶*Bajirao welcomes Yeshvantrao Potnis who was sent by the King.*

+ अक्षर बाजीरावाचें.

5206

No. 25] [7-6-1733 ?

पाा छ ९ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंति उपरी. स्वामीनी राजश्री पिलाजी जाधवराऊ यास आपणाजवल बोलाऊन आणून सविस्तर वर्तमान सांगोन लोक रवाना करावयाची तरतूद केली पाहिजे. राजश्री आनंदराऊ पवार याजकडे करोल असतील ते आणविले पाहिजेत. दरबारी प्रसंग आढ(ल)ला तो स्वामीस लिहिला याची तरतूद करणार स्वामी धणी खावंद आहेत. अंजनवेलीस राजश्री विठोजी सिरके पाठवायाची तजवीस आहे. परंतु तेथील हपसी मजबूद जाला आहे. तो जंजिरियाची मदत करितो यैसा प्रसंग आहे. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Letter to Chimaji Appa from Shahu's Court advising him to prosecute the campaign vigorously in consultation with Pilaji Jadhav, Anandrao Pawar and others.*

No. 26] [8-6-1733

श्री

राजश्री चिमणाजी पंडित गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनति उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केलें पाहिजे विशेष. आपणाकडून बहुत दिवस कागदपत्र येऊन कुश(ल)वृत कलों येत नाही. प्रस्तुत उतरेचा जय संपादून स्वदेशास आपण आले हे आइकोन संतोषातिशय जाहला. आपणासारिखे यशश्वी जेथें असतील तेथे सर्वत्र यशच आहे. तरी आपण उतरे गेल्यादारम्य सविस्तर वृत लेहून पाठविजे. राजश्री राऊ दाजी राजपुरी मसलतेस आलियावरी राजपुरीच्या मुाा आम्ही भेटीस गेलों; परस्परे भेटीचे सौरश्य होऊन आले. येते समई चिरंजीव मानाजी आंगरे हजार माणसानसी रायाजवल ठेऊन आम्ही कुलाबियास आलो. आम्हास चेऊल प्रांतीचा मनसबा सांगितला असे. त्यास चेऊलकर मोगलाकडे राजकोट चेऊल होता तो श्रीकृपे फते जाहाला. राहता उंदेरी राहिली. तिचाहि उपाय करीत असों. जे समई वेढा घालणें तेव्हा फौज आणऊन वेढा घालून. आपणास कलावे म्हणून लिहिलें असे. जाणिजे. राा छ ६ माहे मोहरम बहुत काय लिहिणें ? लोभ असों दीजे हे विनंती. (कान्होजीची मुद्रा)

¶*Sekhoji Angria to Chimaji Appa, congratulating the latter on his successes in the North. The writer speaks also about his interview with Bajirao at Rajpuri and about his own achievement at Cheul.*

5207

No. 27] [8-6-1733

छ ११ मोहरम

श्री

राजश्री पंतप्रधान

गोसावी यासी

§ श्रीमतसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम ता छ ६ मोहरम मुा वाघोली जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केला पाहिजे विशेष. पत्र पाठविले पावले. "राजश्री स्वामीचे आज्ञेवरून आपण व राजश्री फतेसिंगबावा शामलाचे जिल्हियात आलो. राजपुरी, खोकरी, राजकोट, अरमार, खुषकीचे बारा तेरा किले घेतले. रायेगडचेहि राजकारण आहे. लक्षप्रकारे येईल" म्हणून लिा, तरी स्वामीचे पुण्यप्रतापेकडून आपण येशस्वी आहेत. चितावर जे कर्म धरतील ते सिधीस पाववितीलच. "पाणियातील दुर्ग बलाविले आहेत. याखेरीज स्वाऱ्या सिकाऱ्या करितात त्याचे संरक्षणास पंधरासहस्र माणोस पाहिजे," ये रीतीचे वर्तमान लिा त्यावरून कलो आले. राजश्री आपानी या मनसुबियाचा विचार सांगितला त्यावरून कलो आला. उतर सविस्तर रा आपानी पत्री लिहिले आहे त्यावरून विदित होईल. स्वारीहून सुखरूप गावास आलो हा अर्थ विस्तारे लिहितील त्याजवरून श्रृत होईल. विशेष काये लिहिणे. कृपा केली पाहिजे हे विनंति.

¶*Pilaji Jadhav to the Peshwa, congratulating him on his successes in Konkan and communicating Chimaji Appa's return from the north.*

No. 28] [8-6-1733

छ १० मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित

प्रधान दाजी गोसावी यांसी

विनंती उपरी. रा बकाजी ना माहाडीक याणी राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि यांचे मनोदयाचा अर्थ लिहिला आहे तो सविस्तर आपणास कलावाया-निमित्ये तीं बजिनस पत्रेंच आपणाकडे पाहावयास पाठविलीं आहेत. याचा विचार जो करणे तो केला पाहिजे. आम्ही धण्याचे आज्ञेप्रमाणे उरकेल ती

करितों, आणि यैसे विचार होतात ! असो. आचरणानुरूप होणे ते होईल ! जाणिजे. रा छ ६ माहे मोहरम. बहुत काय लिहिणें. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*The letters of Bakaji Mahadik giving the plans of the Pratinidhi are sent by Sekhoji Angria to the Peshwa for his perusal.*

No. 29] [*8-6-1733*

छ १० मोहरम

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान
दाजी गोसांवी यांसी

ᔆ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. आपण तीन च्यार पत्रे पाठविली ती प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला व कितेक अर्थ मुखता राजश्री खंडो चिमणाजी यांही सांगितला. सारांश "शामलाची गलबते हस्तगत केलियाविना लोकीं कमी केली त्याचें परिमार्जन होत नाही. याकारिता अरमारी गलबतें जरूर जरूर जाणून पाठवावी. जायां जाहालीं तर आणिखी आहेत व मिलतील परंतु गेला आब येणार नाही. सर्व प्रकारें यश रक्षून धनी कृपालु करून घ्यावा" म्हणौन विशदें लेख केला. यैशास आपण ज्या ज्या गोष्टी लिहिल्या त्या त्या यैशाच आहेत. आपण ते स्थलीं मसलतसीर असतां आम्ही निघोन यावें यैसें नव्हतें. परंतु ग्रहछिद्रास काय करावे ? आपणास अवघेंच ठावकें म्हणून चितात येऊन गेलें. इतरांस काय कले. तसेंच दर्यावर्दीचा विचार उकलून लिहिला अथवा सांगितला तथापि चित्तीं येणे नाही. कदाचित् कलावयास अगाध काय म्हणून आपण म्हणतील तरी या मृग आरद्रांचे नक्षत्रांमधे समुद्राचें तारुण्यबल, नौका-मार्ग कैचा चालेल ? हे पर्याये अनुभवावाचून प्रत्ययास येणेंच नाहीत. आपले वचनावरून गलबतें रवाना करावी, खटारियांची आशा न धरावी, हे उचित, परंतु गलबतें जायां जाली यांचे सुखदुख नाही. दोन तीनसे माणूस विनाकार्य आपलें आपले हाती हातपाय बाधोन बुडवावे आणि स्वामीकार्यहि नाही. अन्यथा खटारियांचा हिसाब काय होता ? च्यार खटारे जायां होते तरी दाहा नवे केले जाते. अरमारी माणूस गेल्यास तसें मिलतां सायास, याकरितां आपले

लिहिल्यास अतराय करून तुकोजी ना। कडू व राम तांडेल व अमद तांडेल लोक व सफरी रवाना केले. तेथें अरमारी लोक आहेतच व खलासी भरीस पाहिजेत ते तेथील लोक घेऊन गलबतें मोठमोठीं सिलेपोस च्यार पाच सजावी व च्यार पांच माहेगिरिया सजाव्या आणि गनिमाचा मानमार्ग पाहून ठेचगा द्यावा यैसा सिधात करून लोक पाठविले आहेत; व लोकासहि ताकीद हेच केली आहे की, सात आठ गलबतें लाहान थोर सिलेपोस समजून येक नागरी बदरात राहावें. गनीम रात्रीचा निघोन खाडीत जाईल तो बरा लांब गाव दीड गाव जाऊ द्यावा. तिकडून हावभर होऊन जड[1]गीर होईल आणि यावयास लागेल ते समई बरा मानां[2]त येईल तेव्हा येकसमयावछेदे यालगार करून गनीम नाहीसाच करावा. काव्यादाव्यांत गनीम सापडला आणि अनी चोरिली म्हणजे जिवा-जाग्यानसी जाल यैसी ताकीद समजोन वर्तणूक करणें म्हणौन लोकास ताकीद केली आहे. याउपरी गनिमाची गांठ पडिल्यास उलगंडू देतील यैसे कदापि होणें नाही. यैसा भरवसा तों पुर्ता आहे. होश्यमाणानुरूप होणें तें धण्याचे पुण्यप्रतापें होईल. येथें गलबतें सजलिसी पाहिल्यावरी बंदरातून बाहेर पडत यैसें नाही. पुढे नारेलीपोर्णिमा जाहाल्यावरी तमाम अरमार पाण्यात लोटून दसऱ्याआलाकडे साऱ्या अरमारचा सज करून नस्तावरी अरमार ठेऊन आंतील बाहेर न पडे व बाहेरील आत न जाय यैसेच होईल. ये गोष्टीचा आपण खातीरजमा राखावा. वरकड ये समई गलबतें रवाना करावयाचा मान(मा)र्ग असोन कोताई केली असेल तर आपलाच शफत आहे. कार्यप्रयोजनावेगल माणसे खपवावी या काकुलतीस्तव अनमान करावा लागला. पायमार्गे लोक पा।, गलबते न पाठविली म्हणून अनसारखा अर्थ चितात न जाणावा. जे आपली शरम तेच आमची. आपले वचनास आम्हापासून अतर कदापि होणे नाही. श्रीकृपे व धण्याचे पुणेकडून अल्पदिनी अल्पायासें गनीम नेस्तनाबूद होईल. आपणासारिखे यशस्वी अंगेजाचे असतां कितीक रोज गनीम टिकाव धरणार आहे हे कलतच आहे. वरघाटे फौजा आल्या आहेत. राजश्री आपा व जाधव यासी आणवावे. उंदेरीचा कार्यभाग आम्हास सागितला. यैशास लस्करच्यां उपरालियावाचून आहे जमाव येवढीयानेच जाऊन बसवत नाही. याकरितां पाचसे राऊत पत्र पावतांच पाठवावे. राऊत निघाले यैसें कललियावरी लोकांची तयारी करून ठेवितो. राऊत व लोक येकाच दिवसी जाऊन वेढा घालून बसतो. तोफा नेऊन जोडितो. धण्याचे पुण्यें आठ पाच रोज तोफाची मारगिरी करून काम फते करितो; व नारेली पौर्णिमे आतबाहेर निवाती पडतील त्या संधीस पाच गलबतें

---

१ सामान भरून येईल.

२ मानांत=आटोक्यांत, लागांत, हकेटकेंत.

सिलेपोर्स सजून खांदेरीच्या बंदरी ठेऊन उंदेरीची गलबते मान्यास गवसऊन एछाडितों. तरी स्वार लौकर रवाना करावे. स्वारास यावयास दिसगत लागली म्हणजे मजबुदी गनिमाची होईल. दो दिवसांचे कामास पंधरा रोज लागतील यास्तव जलदी होय तर उतम. कलले पाहिजे, जाणिजे रा॥ छ ६ माहे मोहरम बहुत काय लिहिणें कृपा असों दीजे हे विनंती

¶*Sekhoji Angria assures Bajirao of his intention of starting operations against Underi and doing his utmost to carry them out successfully.*

No. 30] [*8-6-1733*

छ १० मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव

पंडित प्रधान दाजी गोसावी यांसी ·

विनंती उपरी. उंदेरीचे वेढियास बसावयास स्वाराचा उपराला असावा. निमित्य कीं, उरणकर फिरंगी याणें हात रेवसकरांसी बांधिला आहे. रेवस म्हणजे नागोठणे, आबिटे, पेण, पनवेल या खाडीयाच्या नस्तोवरी[2] आहे. दाहा पाच मचवे सजिले तर नागोठणे, पेण, पनवेल, आबिटे, या खाडियाचे मुतसील[3] गाव आहेत तेथे स्वारी सिकारी करून मुलूक मारील. येका गावी उतरोन आवाडाव केली यैसे जाले म्हणजे रयत आवल्याची मोट या हंगामामध्ये फुटली म्हणजे आवरणार नाहीं. दो ती लक्षाचा मुलूक आजी हातचा जातो. याकरितां आधीं आधीं या उपायास लागावें लागतें. तरी तीन च्यारसें माणसांचा जमाव आम्ही केला आहे. पांचसें राऊत आले म्हणजे येकच दिवसी थलची चौबुर्जी व रेवसचा कोट यासी वेढा घालून बसतो. तोफा जोडितो. याउपरी दिरंगीवर घातल्यास मुलूक हातचा जाईल. येकदा मुलूक फुटल्यावरी पुन्हा भरतो यैसें नाहीं. याकरितां लौकर राऊत सदरहूप्रा॥ पाठऊन द्यावे व फिरंगी उरणकर यास ताकीदपत्र पाठवावें कीं, हबशाकडील लोकांस जागा देतोस गुरू ढोर, मुले माणसे, वस्तवाणी, दाणा गला, तुझे गावात ठेविला आहे व

---

१ जहाजाचा प्रकार, हत्यारबंद. २ तोंडावर.

३ ताब्यांतील, कबज्यांतील, जोडलेला.

माहेगिरीयाहि तुझे बंदरात सजून ठेविल्या आहेत, तरी देखतपत्र हबशाकडील लोक व लोकांचे कबिले गुरू ढोर, दाणा गला आदिकरून बाहेर घालणे व पुढेंहि जागा न देणें. ये गोष्टीस नौदिगर मनात असेल तर साफ लेहून पाठवणे, तरतूद पाहिली जा(ई)ल म्हणौन ल्याहावे. व वसईकरासहि याच अन्वये लिहावे. तो कांही आपले लिहिल्यास अमान्य होईल यैसे नाहीं. हाबशाचा आश्रा इग्रेज फेरंगी याचा तुटल्यावरी जेर सहजेच होईल व खाडीतहि फिरणार नाही. याचा सविस्तर अर्थ मुखता राजश्री खंडो चिमणाजी यांस सांगितला आहे हे सांगतील. सारांश आपण आम्हास कार्य सांगितले आणि आम्हापासून घडोन न आलें यैसें होईल. यास्तव राऊत जलदीने पाठवावे व फिरंगी इग्रेज यास लेहून पाठवावे. जाणिजे. रा छ ६ माहे मोहरम, बहुत काये लिहिणें? लोभ असों दीजे हे विनती.

¶*Sekhoji Angria asks Bajirao to post guards and men at certain places and detach the Portuguese and others who carry succour to the Sidi.*

No. 31] [*9-6-1733*

छ १० मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित
प्रधान गोसावीं यांसीं

विनंती उपरी. राजश्री रघुनाथजीस लौकर आणवावे म्हणून लिहिले; यैशास आपणासी शफतपूर्वक बोली केली तसीच पत्रें मारनिलेकडेस रवाना केली व कुलाबां आलियांवरी मुजरद जोडेकरी दुसरे रोजीं रवाना केले. त्यास आजी सतरा दिवस जाहाले. काहीच वर्तमान कलो येत नाहीं. कोणे प्रवाही गुंतले आहेत, न यावयास कारण काय हें काहीच कलत नाही. याकरितां हालींहि मुजरद जोडेकरी रवाना केले आहेत. पत्रदर्शनी येणे म्हणून लेहून पाा आहे. येतील. वरकड आपणाजवल बोली येक व अंतःकरणीं येक यैसें कदापि होणें नाही. कललें पाहिजे. जाणिजे, रा छ ७ माहे मोहरम. बहुत काये लिहिणे? लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Sekhoji Angria writes to Bajirao, promising to send Raghunath Hari as soon as possible.*

No. 32] [14-6-1733

छ १४ मोहरम

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान
दाजी गोसांवी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला. रयत लस्करच्या धास्तीने रेवदंडे चेऊल प्रांते उतरली. प्रस्तुत मुलकास कौल दिल्हा. रयत इकडे यावया उमेदवार, त्यास आपले लोक येऊ देत नाही. तथापि कोणी तरी उतरावयास आलाच तरी त्यास लुटितात. वरकडहि उपद्रव देतात. यैशास हा मुल्क शामलाचाच होता. प्रस्तुत तोच विचार आहे कीं काय? पलीकडील मुलूक कोण्हाचा व हा मुलूक कोण्हाचा कलत नाही, या मुलकाचे अशाश्वत तो मुलूक शाश्वत कोण्हे गोष्टीवर आहे, इतका विचार बारीक चितांत न आणावा, सर्व आपलेच समजोन मामुरी होय ते करावे म्हणौन विशदें लिहिले. यैशास आपण तेथे स्थिरत्व केलें असतां हा व तो मुलूक व मामिला निराला मानावा यैसें काय आहे? दोनी प्रांत आपलेच व आंम्हींहि आपलेच पदरीचे. आपणाजवल विनाभाव असता तरी जसी कल्पना केली तसी चालती तो तों अर्थच किमपि नाही. तेथे शाश्वत अशाश्वत हा कोणे गोष्टीवर विचार? हे बारीकाई कशास पाहिजे? हा मुलूक भरला तर आपणास संतोष नाही यैसे तों काही नाही. कोणता तरी मुलूक भरो. कोठे तरी रयत नादोन धन्याचे जागे जतन होऊन आमदानीचा विचार होऊ. हाच विचार आमचा व आपलाहि मनोदय हाच असे. वरकड प्राचीन दंडक या प्रांतीचा तरी या प्रांतीची रयत त्या प्राती गेली, इकडे तिकडील आली, तरी जे रजाबंदीने राहेल ते राहेल. जाईल ते जाईल. रयतेवरी जबरदस्ती करावी यैसें नाही. व लस्करच्या गर्गशामुलें उन्हालियात आगोधरच आली. त्याही या प्राती येऊन घरेंदारे केली, सेतेहि काही केली व कोणकोण्ही कर्जवामहि घेतलें, यैसें असतां ती कुलें रजावंदीनें जातील यैसें नाहीं. जो कोण्ही आपले रजावंदीनें जाणार तो जातच आहे. मार्गी तरी उतरतां लुटितात म्हणून तरी कोणे ठिकाणी कोण्हास कोण्हें लुटिलें हें काहीच लिहिले नाही. आम्ही कोण्हास सजा द्यावा. याकरितां जे आपणाजवल सांगावयास आले आसतील तेच येथे पाठऊन द्यावे. ज्याणे लुटिले असेल त्यास सज्या देऊन ज्याची चीजवस्त जे असेल ते त्यास

देविली जाईल. गौलियाचा चारीवितरी राजपुरीचे मुकामी चर्चा निघाली ते समई सागावयाचें तें सागितले. हालीहि लिहिले तरी आपण घाटावरीच असतां गौली कबिलासुधा गुरूढोर आले. त्यांच्या म्हैसी माजने वगैरा ठिकाणी सागरगडचे घेरीयास ठेऊन कबिले अलीबागात घरे करून देऊन ठेविले आहेत. त्यास पोटास गलाहि कोठीपैकी दिल्हा. ते आता जाऊ म्हणतील तर निरोप द्यावा यैसे आपले चितास येतें कीं काय? याचा विचार आपणच करावा. आम्ही आपले बाहूबलें हर-कोण्हास जबरदस्ती सागतों? यैसें असतां आम्हावरी शब्दानुसंधान योजावें यैसे काय आहे? आपण ते ठिकाणी येऊन कृष्णमुखास नातिजा दिल्हा नसता तरी काय होते? व त्या प्रांतीची रयत या प्रांती कशास येती? सारांश धण्याचे पुण्येकडून या मयशास आपण पात्र जाहाले तन्मुलेंच आवघा आनंदमय विचार होऊन स्वधर्म-स्थापना जाहाली, येवढें यश आपले पदरी पडिलें, त्याचा विभाग आम्ही इछिजेत असतां क्षुद्र मनुश्ये मनमाने तैसी सांगितील त्या गोष्टी आपण व आम्ही चितात आणाव्या यैसा आपला आमचा रुणानुबंध आहे यैसे नाही. येविशी विशदे लिहावें तरीं आपण वडील आहेत. कललें पाहिजे. जाणिजे रा छ १२ माहे मोहरम. बहुत काये लिहिणें? कृपा असों दीजे हे विनती.

¶Sekhoji Angria represents to Bajirao his own position and activities and asks him not to believe the false reports circulated by interested parties against him.

No. 33] [*14-6-1733*

छ १४ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसांवी यांसी

विनती उपरी. श्रीचेवनभार्गव वास्तव्य चेऊल येथील देवालयाचा जीर्णोधार करून आर्च्या शुध्य करावी लागते. यैशास देवाल्यास चुना असावा. त्यास या पर्जन्याचे दिवसांत सिध होत नाही. याकरितां आपणास ल्याहावे लागतें. तरी शामलानी पूर्वी ढोलकीयाचे इमारतीस चुना जंजिराहून पाठविला तो अस्ट-मीस आहे. देवलाचे कामास देविला तरी जीर्णोधार होऊन श्रीची आर्च्या शुध्य होईल. यदंनिमित्ये जरूर जाणोन पंचवीस खंडी चुना देविला पाहिजे. माहागिऱ्या पाठऊन आणविला जाईल. धर्मकृत्य आहे कलले पाहिजे रा छ १२ माहे मोहरम बहुत काय किहिणें लोभ असो दीजे हे विनती. मोर्तब.

¶Sekhoji Angria asks Bajirao to order one Khandi of chunam to be given for the repairs of the temple of Bhargav at Cheul.

No. 34] [14-6-1733.

छ १४ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित

प्रधान दाजी गोसांवी यांसी

विनंती उपरी. आपल्या सांगितल्याप्रो उंदेरीच्या राजकारणाची तरतूद करावी लागते. यैशास राऊत पांचसेपर्यंत पाठवावे म्हणौन राजश्री खंडो चिमणाजी याजबराबर सांगोन पाठविले आहे त्यावरून राऊतांची तयारी आपण केलीच असेल. ह्यालीं कार्याची त्वरा केलियास उतम आहे. तरी पांचसे राऊत पाठवावयास अनकूल न पडे तरी तीनसे दोनसे काय अनकूल पडेल ते अविलंबे पाठविले पाहिजेत. या प्रसंगी राऊत येऊन पोंहचलियास कार्य लौकर होईलसे आहे. नाहीं तर अंतर पडेल. चौबुर्जी हातास यावयास दिसगत लागेल. याकरितां त्वरा करविली पाहिजे. जाणिजे रा छ १२ माहे मोहरम. बहुत काये लिहिणें ? लोभ असो दीजे हे विनती.

¶*Sekhoji Angria requests Bajirao to send as many men as possible for the undertaking of Underi.*

No. 35] [14-6-1733

छ १४ मोहरम

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान

दाजी गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो सेखोजी आंगरे सरखेल राम राम विनती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला. उंदेरकरास पत्रे देऊन ब्राह्मण व जासूद व मुसलमान यो तिघे पाठविले होते. त्यास त्याणी कैद करून ठेविले आहे म्हणौन वर्तमान कलीं आले. यैशास त्याणी कैद केले असिले तरी आपण त्यांस लेहून आणवावे म्हणौन लिहिलें. तरी जासूद वगैरा त्याणी कैद करून ठेविले होते हे वर्तमान आम्हास कलतांच आपले पत्रापूर्वीच उंदेरकरास लेहून त्यांची सुटका करविली असे. येऊन पोहचले असतील. जाणिजे रा छ १२ माहे मोहरम. बहुत काय लिहिणे. कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Sekhoji Angria reports to Bajirao that the messengers sent to Underi who had been confined by the officer in charge have been set at liberty.*

No. 36] [17-6-1733

छ १६ मोहरम

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान

दाजी गोसांवी यांसी

ꣻ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ आवगत जाहाला. अजम अबदुल अजीजखान कालोसास मोर्चेबंदी करून बसले होते. त्यास चिरंजीव राजश्री नानानी पत्र लेहून व शाहाजी नाईक जगथाप याजबरावर सख्तीने सांगोन प्राठविलें त्यावरून उठोन गेले म्हणौन आपण लिहिले ते कलों आलें. यैशास वतन आमचें तेच आपलें, निराले आहे यैसी वाटत नाही. कायवांमनसा हेच गोस्ट कीं, वनतदारी आपली, आपण जेणेप्रमाणे निर्वाह करितील त्याप्रमाणें सुरलीत चालेल. वरकड जो विचार होता तो सविस्तर राजपुरीचे मुकामी निवेदिलाच आहे. त्यावरून जो विचार करणे तो केलाच असेल. सारांश गोस्ट हेच की, आपण आम्हास वडील जेण्हेकडून वतनदारी सुरलीत चाले, पैका उगवे ते गोस्ट करावी. आपले वचनाविना दुसरा अर्थ आहेसा नाही. जाणिजे रा छ १९ माहे मोहरम बहुत काये लिहिणें कृपा असों दीजे हे विनती.

¶*Sekhoji Angria learns from the Peshwa that Abdul Majidkhan had agreed to raise the siege of Kalos. He further writes to the Peshwa of his thorough reliance on him and says that the Peshwa is sure to have the Angrias' good at heart.*

No. 37] [17-6-1733

छ १६ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित

प्रधान दाजी गोसांवी यांसी

विनती उपरी. उदेरीच्या राजकारणानिमित्य राऊत पाठवावयाचें लिहिलें होतें त्याचा मजकूर लिहिला तो कलला व याचा विचार करणे तो आपणच करून लेहून पाठवावा, तदनुसार विचार करणे तो केला जाईल म्हणोन आपण लिहिलें. यैशास सातआठसें माणसाचा गोहा[१] त्याणी केला आहे. याकारितां रावतांवाचोन

---

१ जमाव.

दबाव पडत नाही. तरी जरूर जाणोन पांच शांपैकी दोनसे राऊत व पांचसे पाईचा जमाव याप्रों त्वरेने पाठवावे, म्हणजे जाऊन गांठ घालोन बसोन. अन्यथा गांठ घालवत नाही. तरी सीघ्रवत् सदरहू दोनसे राऊत व पांचसे माणूस याप्रों पाठवावे. दोनसेहि राऊत अनकूल न पडेत तरी लोक तरी लौकर पाठवावे. आपणाकडील स्वार काही येते म्हणजे दबाव पडता. कललें पाहिजे. रा। छ १९ माहे मोहरम बहुत काय लिहिणें ? लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Sekhoji Angria requests the Peshwa to send at once some fighting men for the action at Underi.*

No. 38] [*17-6-1733*

छ १६ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित

प्रधान दाजी गोसावी यासी

विनती उपरी. अजनवेलीचा अर्थ राजश्री खंडो चिमणाजी याजबराबर सांगोन पाठविला त्याजवरून आपण विचार करणें तो केलाच असेल. यैशास अरमारचा जागा जसा म्हणावा तसा आहे. याकरितां प्रतिनिधीचें जाणें तिकडे नव्हे तें करावें. पर्जन्य काल जसातसा जोबाळून ठेवावा. नौकामार्ग चालता जाहाल्यावरी जलमार्गे अरमार व खुशकीने आपणाकडील लस्कर नेऊन मोर्चेबंदी करून किले मार हस्तगत करावा हा विचार उतम आहे. त्याहीमधे आपले विचारें विचार होईल तो करावा लागेल. वरकड आपले आज्ञेप्रमाणे बकाजी नाइकास लेहून पाठविले आहे. आधी पिसे; दुसरे हाती दिली चूड, यैसी गत जाहाली. कदाचित प्रतिनिधीकडून उतावली जाहाली तरी तो चुकणार नाही. व आधी आपणाकडून अंतरहि पडो देणार नाही. त्याकडून जाल्यास अंतर करणार नाही. आपणासहि कललें असावे. यास्तव पेशजी लिहोन व सागोन पाठविलेंच आहे व हालीहि लिहिलें आहे. इरेने इरे वाढोन नासाडी होईल. सारांश आपणास बोल न लागे यैसा विचार करावा. राजश्री रघुनाथजीस आणवावयाविशी लि। तरी तीन जोडे रवाना केले आहेत. त्याचा काही जाब आला नाही. पंचवीस दिवस वर्तमानहि तिकडील कलत नाही. हाली आपले लिहिले आल्यावरीहि मुजरद माणसें पाठविलीं आहेत. बोली येक करणी येक यैसे आम्हापासून होणार नाही. निशा असों द्यावा. कललें पाहिजे. जाणिजे रा। छ १९ माहे मोहरम बहुत काय लिहिणे लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Sekhoji agrees to execute Bajirao's plans for preventing the Pratinidhi from going against Anjanwel.*

जोबाळणें = सांभाळणें, निभावणें.

No. 39] [*19-6-1733*

छ २० मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित प्रधान दाजी गोसावी यांसी

विनंती उपरी. उंदेरीच्या कार्यभागाचा अर्थ पूर्वी आपणास लेहून पाठविला आहें ; त्यावरून राऊत व जमाव पाठवावयाची सिधता आपण केलीच असेल. तथाप राऊत पाठवावयास अनकूल न पडे तरी पाईचा जमाव लिहिलेप्रो पांचसे माणूस अविलंबे पाठविलें पाहिजे. म्हणजे दबदबियाने कार्य सिध होऊन येईल. आम्ही आपल्या उपराल्याची प्रतीक्षा करीत असों. येद्यपि आम्हीच अगोधर गेल्यास जमावाचे बल थोडके, याकरितां जमाव आला म्हणजे नूरबारीनें जाऊन धडकेच सारिखा रेवसचा कोट घेऊन ते जागा मजबुदीने बसोन पुढे मोर्चे लागू करून तेहि स्थल हस्तगत करून. तरी लिहिलेप्रमाणें जमाव लौकर पाठविला पाहिजे. जाणिजे रा। छ १७ माहे मोहरम बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनती.

¶*Sekhoji informs Bajirao that he is anxiously awaiting the succour that the addressee was requested to send for proceeding against Underi.*

No. 40] [*19-6-1733*

छ २० मोहरम

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान दाजी गोसावी यांसी

८ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये लेखन केलें पाहिजे विशेष. अंजनवेलीचा विचार पूर्वी आपण लेहून व सांगोन पाठविलाच आहे व हलींहि काल लेहून पाठविले आहे. त्यावरून जो विचार करणे तो आपण केलाच असेल. यैशास प्रस्तुत राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यांचा निकडीचा विचार आहे म्हणौन रा। बकाजी ना। माहाडीक यांणी लेहून पाठविलें, त्यावरून मारनिलेकडील यावयाचा विचार न जाहाला तों बकाजी नाइकास जावयाची आज्ञा केली असे व जयगडीहून राजश्री रघुनाथ हरि यांस

जमावानसीं यावयाची आज्ञा केली असे. मारनिले तिकडून जमाव घे(ऊ)न येतील, त्यास ये प्रसंगी आपणाकडील निशाण व दोनसें माणसांचा जमाव त्यांत सामील असिल्याने अवघेच निमित्ये वारल. याकरितां हे गोष्ट चितात आणून अनमान न करितां दोनसे माणूस निशाणसहवर्तमान रा करावे. रा बकाजी नाईक व हे सामील होऊन इकडून जातील व तिकडून मारनिले जमावसहवर्तमान येतील आणि कार्यसिधी करितील. कळलें पाहिजे. रा छ १७ माहे मोहरम बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Sekhoji Angria impresses on the Peshwa the urgency of sending a few of his own men to succour Shrinivas Pratinidhi and requests him to send a contingent of 200 and says that he will also depute Bakaji Naik and Raghunath Hari against Anjanwel.*

No. 41] [*19-6-1733*

छ २० मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पं-
डित प्रधान गोसांवी यांसी

विनंती उपरी. खानजादा व सेखजी यांजकडील राबिता रोजबरोज जंजिन्यात होतो तो होऊ न द्यावा म्हणौन पूर्वी आपणास लिहिलेच आहे. येशास हाली खानजादा व सेखजी यांचा माणसाचा राबिता होडीवाल्यावरून होतच असतो. माणसें आमच्याच मोर्च्यावरून जात येत असतात. येण्हेकडून येवढी गोष्ट होते कीं, आपणाकडील खबर बखर सारी जंजिरियांत जाते, परंतु तिकडील इकडे कळत नाही. भलतेहि गोष्टीचा भ्रम आहे तों बरे आहे. दबदब्याने कार्य होईल येसें शत्रु सावध जाहालियावरी होईल कीं काय? याकरितां होडीवाल्याचा राबिता होतो तो मना करऊन लस्करची खबर जंजिरियांत न जाय ते गोस्ट केली पाहिजे. वरकड आपण खानजादा व सेखजी यांजकडे जाऊन मनसबियाचा विचार करीत असतात म्हणौन कळों आलें. येशास तोहि विचार सविस्तर आम्हास कळविला पाहिजे. कोणेके विचारास आपण न चुकेत, परंतु आम्हास सुचेल तें आम्ही लेहून पाठवावें हे उचित जाणून लिा असे. कळले पाहिजे. रा छ १७ माहे मोहरम बहुत काय लिहिणें? लोभ असों दीजे हे विनंती.

¶*The Peshwa is warned against news reaching the enemy through Khanjada and Sekhji. He is requested to stop the practice as it discloses to the enemy the plans about the Maratha movements.*

No. 42] [21-6-1733

छ २३ मोहरम श्री

पुरवणी राजश्री बाजीराव
पंडित प्रधान दाजी गोसांवी यास

विनंती उपरी. राजश्री खंडो चिमणाजी याजसमागमे तीन बोल्या सागोन पाठविल्या. यैशास हा मनसबा अवघा तुम्हीच कबूल करा. खर्चाची अनकूलता पाहिजे, ते साहुकार करून देतो. आम्ही आवघे निघोन जातो हे येक. दुसरी गोष्ट या कामास सता येक असावी. याकरितां फतेसिंगबावास निरोप देतो. तुम्ही आम्ही मिळोन येका चिते राहून मनसबा करावा. मुल्क व किले यथाविभागे वाटून घ्यावे. राइरी तख्त आहे त्याखाले मामिला आहे तो मात्र तख्ताखाले राहेल. वरकड विभाग होईल. टका पैका पाहिजे त्यास साहुकार करून जो टका लागेल तो दोहीकडील याप्रो करून गनीम घ्यावा. या दोनी गोष्टीतील येकहि गोष्ट कबूल न करा तरी हबशाचे जागे मुल्क त्याचे त्याचे स्वाधीन करून जाहाल्या मनसब्याचे अपयश तुम्हावरी. याचें उतर साफ लिहावें म्हणौन:—तरी हा मनसबा आम्हीच अथवा आपणच करीन म्हटल्यास सिधीस पावेल यैसे नाही; व इतकें महदकृत्य संपादिलें असतां टाकून जावें यांतहि लैकिक बरा नाही. याकरितां वरकडास निरोप देऊन येक सता करून आपण व आम्ही येकरूप येकचित्तें मनसबा करून शतृ पादाक्रांत करून कीर्ति संपादावी हेच गोष्ट आपणास व आम्हास श्लाघ्य व श्रेयस्कर. याकरितां सर्व प्रकारें याच गोष्टीची उभारणी करावी. आम्हास काय उद्योग सांगणे तो सागावा. सध्या उद्योग पाहातां अंजनवेल व उंदेरी हे दोनीच जागे आहेत. जंजिरियाचा मनसबा येव्हा काय पाच सात गलबते फिरतात ती फिरों न द्यावीं, इतकाच मात्र आहे. त्याची तरतूद होणें ते होतच आहे. अरमारी गलबतेहि तयार करविली आहेत. मानमार्ग पाहून रवानगी करून. व गनिमाची गलबते फिरल्याने होणे तरी काय आहे? नौकामार्गाचे अनकूल होईल ते समई अरमार अवघेच येईल. सारांश उतावेिळी कोणेके गोष्टीची न करावी. मानमार्ग पाहून करणें विचार करावा. आम्ही कायवाङ्मनसा जसे आपा तसे आम्ही. त्यास जसी आज्ञा करणें तसी आम्हासहि करावी. ये गोष्टीचा संशय तिळमात्र चितीं न आणावा. याउपरी आपण वडील आहेत. कळलें पाहिजे. रा छ २१ माहे मोहरम. बहुत काय लिहिणे? कृपा असो दीजे हे विनती.

¶*The Peshwa proposed to Sekhoji three alternatives for prosecuting the Konkan campaign and asked his definite replies to them. Sekhoji suggests to the Peshwa to have the sole command of the campaign centred in one and not to allow any one else to thrust himself in,*

No. 43] [22-6-1733

छ २३ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव
पंडीत प्रधान दाजी गो-
सांवी यासी

विनंती उपरी. "राजश्री स्वामीकडून राजश्री येशवंतराव खासनिवीस आले. राजश्री स्वामीची आज्ञावचने मारनिलि यांणी सांगितल्याचा अर्थ व राजपत्र पाठविलें व कितेक अर्थ मुखता राजश्री खंडो चिमणाजी व बाळाजी रुद्र याजसमागमे सांगोन पाठविले. जें करणें तें साफ चितें करून उतर पाठवावे, इकडील मोहिमेचे यश तरी पदरी घ्यावे अथवा अपयश तुमचेच पदरी यैसे समजोन उतर पाठवणे, तरतूद करणें, नाही तर साफ उतर पाठवणे त्यासारिखा विचार केला जाईल" म्हणौन लिा. यैशास अजीपर्यंत आम्हापासून कोती अंदेशा कोणती कोणेसमई घडोन आली, कोठे कौटल्यता वर्तणूक केली जे साफ उतर पाठवावें. कायवाङ्मनसा आपल्या बंधूबलयोगें तीर्थरूप कैलासवासी यांणीं जोडिले. कीर्तीस सपुष्टता देऊन खावदास कृपालु करून घेऊन कीर्तीस पात्र व्हावे हे मनोभिष्ट. तदनुसार पूर्वपुण्ये आपला निकट वास व स्वकर्म यैसा योग घडोन आला. यैसें असतां येसमई मागेंपुढें घेऊन अन्यत्र सार्थकता तरी कोणती? याकरितां स्वधर्मी निधनच श्रेयावह हाच कृतनिश्चय आहे. अन्यत्र किमपि विचार नाही. आपण ते स्थलीं मसलतगीर असतां आम्ही घरी न यावेच. परंतु होता विचार तो आपणास निवेदिला. तदनुसार आपले चिती येऊन आम्हास निरोप दिल्हा. आपणापासून आम्ही आलियातागाईत येक दिवस धण्याचे शेवेविना वाउगा जाऊ दिल्हा नाही. प्रस्तुत उतरेकडील चौबुर्जी व रेवसचा कोट याचा विचार करितो. राऊत पाठऊन द्यावे म्हणौन आपणास लिा त्याचे उतर राऊत अनकूल पडत नाही, आपणच विचार करून लेहून पाठवावे, यैसे आपलें लिहिले आले. त्याजवरून पाचसें माणूस पायचे पाठऊन द्यावे, नौकामार्गाचा अवरोध आहे तों हें काम उरकून घेतों. पुढें मासपक्षी निवाती पडिल्या म्हणजे गलबतें रवाना करावी. आम्ही येऊन आपले आमचे विचारें बंदोबस्त करावा. शत्रू चतुर्थ[1] उपाये वश्य करावा हा विचार चितात आणून लोक आणविले. त्याचा जाबसाल कांहींच न येतां यश घ्यावे अथवा अपयश आम्हीच घ्यावे यैसें काये आहे! आजीपर्यंत आपलेच आज्ञेप्रमाणें

---

१ भेद.

वर्तणूक केली व पुढेंहि आपले मनोदयेनुरूप खावदाची सेवा करावी हाच निश्चय आहे. आपण व आम्ही येक हाते असल्यास शत्रूचा हिसाब काय? परंतु सता येकरूप येक असावी म्हणजे चाकर लोक हालखुद राहून शत्रु पादाक्रांत केला जाईल. तदनुसार आपणहि तोच विचार करून राजश्री खंडो चिमणाजी व बालाजी रुद्र याजसमागमें सागोन पाठविलें तरी अवश्यमेव योजिला मनसबा सिध करून आम्हास काय विचार सागणे तो सागावा. उंदेरीचा मनसबा सध्या न करावा. रयतेकरिता सल्य रक्षिलें आहे तैसेंच असो द्यावे. आम्ही आपणाजवळ यावें व अजनवेलीकडेस बकाजी नाा रवाना केला आहे. राजश्री रघुनाथजीसहि तोच उद्योग सागितला आला. त्यासहि तो विचार न करणे म्हणून लेहून पाठवावें येसें आपले विचारे येत असेल, तरी तैसेंच लेहून पाठवावे, तदनुरूप विचारणा करून. येदर्थी तिलतुल्य संशय चिती न आणावा व राजश्री येशवतराव खासनिवीस यांची रवानगी करणें तरी आमचा मनोदय हाच आहे, याप्रमाणें मारनिलेस समजाऊन सागोन रवाना करावे व खंडोबानी सागितले की, आपलें निश्चयात्मक पत्र गेले म्हणजे राजश्री जिऊबा चिट(नि)वीस यास आपणाकडस पाठवणार आपण आहेत म्हणौन तरी याजपेक्षा आधिकोतर काय आहे. आपण ज्या पाण्यांत बुडा म्हणिजेल त्या पाण्यात बुडावयास सिध आहो. हा भरवसा असों द्यावा. जे गोष्टीनी सर्वात्र आपला उपर आहे तेच गोष्ट आम्ही करून. येविशी विस्तार लिहावा तरी अपण वडील आहेत. अत:पर आम्हास काय विचार सागणें तो सागावा. कलले पाहिजे जाणिजे. रा छ २० माहें मोहरम बहुत काय लिहिणे कृपा असो दीजे हे + विनती.

¶*The writer (Sekhoji Angria) expresses his regret at the misgivings entertained about him by the Peshwa and tries to give an explanation about his conduct. He ardently assures the Peshwa of his readiness to join in any plan that he might form for prosecuting the campaign.*

No. 44] [*22-6-1733*

छ २३ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसांवी यासी

विनती उपरी. सुरतेस हबसी आहे त्याजविशी सुरतचे सुभ्यास लेहून तेथील अमल बंद करावा म्हणून राजपुरीचे मुकामी आपणास सांगितले होतें. आपणहि

मान्य केले यैसें असतां काली मुबैस राजश्री बावाजी बल्लाळ पाठविले आहेत त्याणीं लेहून पाठविलें तेच पुरवणी बजिनस आपणाकडेस पाठविली आहे. तरी ये गोष्टीची विवंचना करणें ते करून सुभ्यास व साहुकारास परिछिन लेहून सुरतेस हबसी कैद होये ते गोष्ट केली पाहिजे. जाणिजे रा छ २० माहे मोहरम बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती.

¶*Sekhoji to the Peshwa: requests him to write to the Subha of Surat to take strict measures against the Sidi of Surat carrying help to Janjira.*

No. 45] [*22-6-1733*

छ २३ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित

प्रधान दाजी गोसांवी यासी

विनती उपरी. कालोसास[1] लोक आहेत ते आणवावे म्हणून आपण सागोन पाठविले. यैशास यासमई अवघे लोकांचा जडाव येकेजागा करावा याच विचारें लोक आणविले होते. त्याच समई मोगलाकडील दणगे[2] कालोसावरी पडिले. आपले पुण्येकडून मोगल पैजार खाऊन दंतभग्न जाहाला. ये गोष्टीचें वैशम्य चिती आणून पुन्हा कालोस पाहावी हा विचार करीत आहेत, म्हणौन बातमी वर्तमान आलें आहे. तरी ये गोष्टीचा बंदेज काय करणें तो आपण करून लेहून पाठवावे. आपले लिहिले आल्यावरी तेक्षणी लोक आणवितो. लोक आणवावयास आणिखी संशय आहे यैसें नाहीं. कललें पाहिजे. जाणिजे रा छ २० माहें मोहरम बहुत काय लिहिणे कृपा असों दीजे हे विनती.

¶*A skirmish at Kalos (Kalose ?) preventing the recall of troops is reported to the Peshwa.*

No. 46] [*23-6-1733*

छ २३ मोहरम

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान

दाजी गोसावी यासी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणन स्वकीय लेखन

१ आंग्र्यांचे चाकणाजवळील गांव. २ हल्ला.

केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय अवगत जाहाला. शामलाची गलबते उंदेरी, अजनवेल येथील फिरतात आणि कुलाबाहून राजपुरीस न येत अपूर्व आहे. येथील रहत्रई लोक काय म्हणतात तें परभारें मनास आणावें. लहान माहेगिरिया सजल्या आहेत. त्याचे वस्तू शामलाचे गलबतासी अडावणी करवत नाही. याकरितां पाचसात गलबतें थोर पाठविलीं पाहिजेत म्हणौन लिहिले व राजश्री खंडो चिमणाजी व बाळाजी रुद्र याही मुखता निवेदिलें. यैशास जे गोष्ट आम्ही लिहितो ते मिथ्याच भासतें व तेथील रवई कोण सागतात तेंच सत्य भासतें ये गोष्टीस येत्न नाही. आपणाजवळ कृत्रिम वर्तणूक करून आपल्या लिहिल्यास पर्याय लावीत असोन यैसें असिलें तर उभयता तीर्थरूप कैलासवासी स्वर्गी हासतील व आपणासी कुटिलतेने वर्तणूक करून कोणता शतक्रतु संपादणें आहे याचा विचार आपणच चिती आणावा. वरकड तमासगिरांस भलत्या गपा मारिता संकट काय आहे ? परंतु ज्यास करणें विचार तो बरा पोख्ता करावा लागतो. जे गोष्टीनें नगाचा नंग राहोन स्वामी कार्य होईल तरीच केल्या कष्टांची सार्थकता. येरेवी सताबलें अविचार करून अविलंबिला विचार होऊन येईल अथवा अपयश येईल. तवकलीचा विचार केलिया सार्थकताहि नाही, वेर्थच आपले हाते लोकांची घरें बुडवावी यास्तव आजीपर्यंत अनमान केला. आपले चिती विकृत वाटली तरी आपले श्नेहापेक्षां दुसरी जोड काय ? हाली आपले लिहिल्यावरून गलबतांची तयारी करविली आहे. संकटाच्या समयांत समय पाहून रवाना करितों. लोकांच्या व खटारियांच्या प्राक्तनी होणार असेल तें होऊ. कळलें पाहिजे. रा छ २१ माहे मोहरम बहुत काय लिहिणें ? लोभ असो दीजे हे विनती.

¶*Sekhoji Angria to the Peshwa explaining to him why he could not send any ships to Janjira against the Sidi. "It was no indifference", he says, "but some personal difficulties that prevented him". He expresses his readiness however soon to send them.*

No. 47] [*23-6-1733*

छ २९ मोहरम

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान

दाजी गोसावी यासी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री

सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन

केले पाहिजे विशेष. गोसावी याही पत्र पाठविले प्रविष्ट होऊन लेखनार्थ कलो आला. राजपूरकर भडारी यांचे कबिले आलिबागात ठेऊन भंडारी पाठवावे म्हणोन लिहिले यैशास काही भंडारी चाकर राहिले. वरकड चाकरमाने व रयेत आले त्याणीं माड घेऊन कष्ट कामास लागले. मनास आणितां चाकरीस कबूल जाहाले तेवढे चाकर केले. त्याजमध्यें काही लोक तें जागा रवाना केलेच आहेत. बाकी चाकरमाने असते तरी रवाना केले जाते. आपणास कलावे म्हणून लिहिले आसे. जाणिजे रा। छ २१ माहे मोहरम बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती.

¶*Sekhoji Angria entertains some Bhandaris in service and sends them to the Peshwa.*

No. 48] [*25-6-1733*

छ २४ मोहरम

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान

दाजी गोसांवी यासी

ॐ सकलगुणालंकरण अंखडितलक्ष्मीआलकृंत राजमान्य श्रो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला. "अजनवेलीकडील राजकारण असिले आठा पंधरा रोजांत कार्य होतें यैसे असिलें तरी लेहून पाठवावे. लोक निशाण पाठऊन देऊन. जरी मोर्चे लाऊन जबरदस्तीने घ्यावयाचा प्रसंग योजिला असेल तरी राजश्री स्वामीनी राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि यास अजनवेलीकडे जावयास आज्ञा केली आहे ते जाणार. रायगडचे राजकारणासारिखे होईल. राजकारणाचा विच्यार आसिला तर टाकोटाक राजश्री स्वामीकडेस लेहून पाठऊन. प्रतिनिधीचे जाणे तिकडे न होय यैसे करून. नाही तर प्रतिनिधीचा दम पुरो द्यावा. आपले लोक तेथे पाठऊन त्यांचे चाकरीस लावावे यैसें नाही. ते गेल्यावरी लोक उठवितांहि न ये." म्हणौन लिहिले. यैशास आपण जो विचार लिहिला तो यथार्थच. राजकारणाचा विचार म्हणावा तरी राजश्री बकाजी नाईक याणे लेहून पाठविलें होते जे, आपणास तिकडे रवाना करावें म्हणून. त्यावरून त्यास आज्ञा करितां हेच केली कीं, भारी जमाव असिल्याविना हे गोष्ट करितां येत नाही. तुम्ही उतावली न करणें. अरमार चालतें जाहाल्यावरी लगटे करून काम होईल.

यैसे लेहून पाठविलें असतां च्यार पाचसे लोकांचा जमाव करून आधिक बहुल प्रतिपदेस स्वार होऊन गेले. राजश्री रघुनाथजीस सामील व्हावयास लेहून पाठवावें म्हणौन येथें लेहून पाठऊन हुकूम नसतां निघोन गेला. त्याजवरून भासतें की पूर्वी परवारी यांचे राजकारण होतें. पनास पाऊणसे परवारी भेदला होता. ते राजकारण तैसेंच होते. त्याचा पैगाम येऊन उतावली केली असिली तर न कले. राजकारण आलें आहे यैसे काही लेहून पाठविलें नाही. आणि निघोन तो गेला. तेव्हा जरूर होऊन राजश्री रघुनाथजी यास सामील होणें यैसें लेहून पाठवावें लागलें. आतां आपले लिहिल्यावरून फिरोन येणें तो उद्योग येव्हां करावयाचें नाही, म्हणौन फिरवावे तरी ठिकाणी जाऊन बैसले नसिले तरी फिरोन आल्यास कार्यास येईल. ठिकाणी आदलले असिले आणि फिरोन आणिले तरी लौकिक येक प्रकार होईल. राजकारणे करून काम होऊन आल्यास उतमच. नाही तेव्हा जबरदस्तीने मोर्चेबंदी करून घ्यावे, त्यास दीसगत लागतील. दीसगतीवर पडल्यास प्रतिनिधीकडील होश आहे. आपण काम सिजवावे. आणि त्याचे हवाला करून येश त्यास द्यावे यैसे जाहले म्हणजे केल्या श्रमाचे सार्थक काय? तेहि गोष्ट कामाची नाही. याकरितां याचा विचार कसा काय करावा हे मोठीसी चिंता निर्माण जाहालीच आहे. परंतु जाहाल्या गोष्टीस उपाय तो केला पाहिजे. त्यास आपले विचारें होईल तरी राजश्री फतेसिंग बावास अजनवेलीकडील मनसबियास रवाना करावे म्हणजे अवघेच गोष्टीचे संगोपन होऊन स्वामीकार्य होईल व आम्हीराजपुरीस आपणाजवल असतां हा विचार आपण योजिलाच होता. हालीहि तोच विचार ठराऊन मारिनिलेबराबरी आपणाकडील कांही जमाव देऊन रवाना करावे. राजश्री रघुनाथजी व बकाजी नाईक यासी सामील व्हावयाचे लिहावें. राजकारणेच करून कार्य उरकले तर बरेच जाहालें. नाही तरी जयगडीहून पाच सात तोफा आणऊन मोर्चेबंदी करून माराखाले गनीम आयास आणावा तरीच जाहाले गोष्टीचे यश पदरी येईल. अन्यथा रायगडची गोष्ट होईल. याकरिता आमचे मतें हा विचार करावा. दुसरी गोष्ट मारनिलेस जावयास अनकूल न पडे तरी आपणाकडील लोक व आम्हाकडील लोक जाऊन काम सिजविलें आणि मागाहून प्रतिनिधि जाऊन येश घेऊ म्हणतील तरी कोण घेऊ देईल? आपला आमचा येक हात असिल्यास त्याही येऊन काय करणें आहे. चाले कुचाले करून कार्य नाश करू म्हणतील तरी बऱ्या विचाराच्या गोष्टी च्यार सागोन थंड करावे. हे गोष्ट न करितां अविचारास प्रवर्तले तर तेहि अगाध नाही. याकरितां यांचा विचार आपणच करावा. जे गोष्टीने लौकिक उतम होऊन यश पदरी येई तेच गोष्ट करावी. प्रतिनिधीस काय लिहिणे असेल तें अगोधर लेहून बंदेज करावा. लक्ष

प्रकारे प्रतिनिधि तिकडेस न जातसें करावें. राजश्री स्वामीकडेस विनतीपत्रें लिहावी व त्या जागेयाची हामी आपण भरावी. श्रीकृपे व धण्याचे पुण्यप्रतापे काम उरकोन येश आपणास येतेच आहे व आपले लिहिल्यावरून मुजरद का(ग)द देऊन जोडेकरी राजश्रीं रघुनाथजीकडे व बकाजी नाइकाकडे लेहून पाठविले आहे कीं, तुम्ही अजनवेलीचे गला पडिले नसिले तरी गला न पडणें. विजयगडचे काम करणें. पुढे अजनवेलीच्या मोर्च्याची आज्ञा करणे ते समई केली जाई(ल) तूर्त गला न पडणे. यद्यपि गला पडोन मोर्चे लाविलेत यैसे असिले तरी उठतां लोकांचे हासें होईल. माराखाले आयास आणून काम फते करणे म्हणौन दोनी विचार लेहून पा। आहेत. आपणहि लेहून पाठवावें. ठिकाणी दाखल जाले नासिले तर विजयगडास जाऊन तो विचार उरकतील. कळलें पाहिजे. उदेरीकडील मनसबियास लोक लौकर लौकर पाठवावे. जाणिजे रा। छ २३ माहे मोहरम. बहुत काय लिहिणें कृपा असों दीजे हे विनती.

¶*Sekhoji Angria approves of the proposal of the Peshwa in not allowing the Pratinidhi to have any share in the capture of Anjanwel. He promises him not to send any assistance to the Pratinidhi. The writer does not like the idea that the Pratinidhi should have the credit of capturing Anjanwel as was the case with Raigad.*

No. 49] *[26-6-1733*

छ २३ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री बाजीराऊ पंडित
प्रधान दाजी गोसावी यांसी

विनती उपरी. शामलाकडील गलबते बदरात असतात, ती भांडियाच्या माराने फोडावी म्हणजे गलबतावरून स्वारी सिकारी करितात ते मना होईल. यैशास चिरंजीव मानाजी आंगरे याणी मोर्चा मुस्तैद केला आहे. तरी मोर्चेयाची बलकटी मनास आणून भांडी दोन च्यार लागू करून रोजबरोज गलबतावरी मारामार करावी आणि बदरातच गलबते बुडवावी यैसा मानस आहे. प्रस्तुत त्यास दुसरे बंदर माफीक नाही. त्याचा मार मोर्चेयावर घेऊन मारामार करावी यैसा विचार आहे. तरी चिरंजिवास आज्ञा करून भांडियाचा मार करविला पाहिजे. येविशी येथूनहि आज्ञा केली आसें. आपणास कलावे म्हणोन लिहिले असे. जाणिजे रा। छ २१ माहे मोहरम बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती.

¶*A proposal for destroying the ships of the Sidi by firing guns on them was communicated by the Peshwa to Sekhoji who approves of it and orders his brother Manaji to execute it.*

No. 50] [Recd. 28-6-1733

छ २६ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

सेवक रघुनाथ हरि साष्टांग दंडवत प्रणाम विनती उपरी. येथील कुषल. स्वामीचे कृपेकडून असे विशेष. स्वामीनी कृपा करून पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन सविस्तर कलों आलें. राजपुरीची मसलत प्राप्त जाहाली असतां तुम्ही सनिध (नाहीं) हे गोष्ट उचित नसे. याउपरी पत्र पावतांच स्वार होऊन यणें म्हणौन आज्ञा. यैशास स्वामीचें पत्र आलें त्यापूर्वीच राजश्री सरखेल यांजकडून पत्र आलें, त्याजवरून स्वार होऊन यावयाचा निश्चय केला. परंतु सिदी साद अंजणवेलीस आहे. त्याणें या प्रांती स्वारी सिकारी करून मुलूक मारणार. याचा बंदोबस्त होणें याकरितां गुता जाहाला आहे. त्याचा विचार करणें तसा करून लौकरीच स्वार होऊन स्वामीसंनिध येतों. भेटीनंतर सविस्तर विदित करून. स्वामी कोकणच्या मनसबियास आले असतां आम्ही सेवेसी नसावे उचित नव्हते. परंतु या प्राती खावंदाचे आज्ञेप्रा येणे जाहाले. येथे पडल्या प्रसगाची निर्वाहकता प्राप्त जाहाली ते करून याउपरी अविलंबेच स्वामीचे सेवेसी येतों. पुढे स्वामी आज्ञा करितील त्याप्रा वर्तणूक करून. राजश्री सरखेल दुराग्रेहे गेले म्हणौन लिा; तरी आपण वडील, यास्तव च्यार दिवस आपली आज्ञा घेऊन घरचे वोढीने गेले असतील. अन्यथा स्वामीचे आज्ञेवेगले त्यांस दुसरे काही विशेष आहे यैसे नाही. मासपक्षाने तेहि येतील व आम्हीहि आज्ञेप्रा सर्व धंदे सोडून स्वामीजवली येतों. देवाब्राह्मणाचे स्थापनेचा मनसबा स्वामी करीत असतां तेथे कोणी अनी चोरील तरी त्यापेक्षा अधम कर्म तें काय? राजश्री सरखेल यांस स्वामी वडील आहेत. वडीलपणे बुधीवाद त्यास सागणे तों सागोन स्वामी महद्यशाचे पात्र होतील त्याचे विभागी त्यांसहि केले पाहिजे. बहुत काय लिहिणे कृपा वर्धमान करावी हे विनती.

¶*Raghunath Hari to the Peshwa, saying that he is detained at Anjanwel by the troubles created by Sidi Sad which he has to check; otherwise, he says, he would have started for Rajpuri to join the Peshwa as desired. He assures the Peshwa of the most loyal attitude of Sekhoji Angria.*

5228

No. 51] [28-6-1733
[25-6-1736 ?

पौ छ २७ सफर तालीक

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री येशवंतराऊ स्वामीचे
सेवेसी

विनंती. ये प्रांतीचे वर्तमान तर शामलाची बहुत प्रबलता जाहाली आहे. सातसे आठसे लोकानसी स्वारी करितो. बाणकोटासमोर खाडी उतरोन दालदी[1] लोकास हाती धरून त्याचे तजविजेने महिंगिरी ज्या बाणकोटास होत्या त्या दालदियाचे स्वाधीन केल्या होत्या, त्याही बहाना करून सामानाकारणे पेलाड माडले याचे थडीस नेऊन त्यावर शामलाचे लोकास बैसऊन वेसवीस हे थडीस नेऊन त्यावर शामलाचे लोक उतरिले. त्याही राजश्री पंतप्रधान स्वामीचे लोकाच्या चौक्या दोन होत्या त्यावर छपा घाल्हन साठसतर लोक जखमी केले आणि येकजण मारिला आणि त्याच मागिरीवर बैसोन माहागिऱ्या घेऊन गेले. गोवेल गोरेगाव पावेतो इकडे बिव्हेर तुंडल्यापावेतो त्याचा याचा येक विचारे वर्तणूक जाली. येक माहाड व बिरवाडी पोलादपूर नाते हे च्यार महालावर शामलाचा नीर[2] आला. या माहालाचे रयेतीचा वतनदारांचे जीवासी गाठ पडली आहे, का कोण वेलेस काये होईल ते श्री जाणे. स्वारीयां[3] माहाड पाचाड रायेगडच्या येकंदर फिरोन शामलास दबाव होत नाही. सेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विनंती.

¶*News-letter addressed to Yashvantrao Potnis at Satara communicate the depredations committed by the Sidi near the Bankot Creek.*

No. 52] [30-6-1733

छ २९ मोहरम

श्री

राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सेखोजी आंगरे सरखेल राम राम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. गोसावी यानी पत्रे पाठविली ती प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय कळो आला. कितेक विचाराचा सिधांत करावा लागतो तरी

---

१ मुसलमान कोळी. २ शह. ३ स्वाऱ्या.

राजश्री मल्हार हरि अथवा आणखी कोणी मातबर येथे पाठविले पाहिजेत. त्याज-पासी जे बोलणे ते बोलोन म्हणौन लिहिले. यैशास राजश्री मल्हार हरि आम्हाजवल असिले पाहिजेत. त्यास पाठवायासी आनकूल पडत नाही. यास्तव राजश्री विसाजी हरि व राजश्री खंडो चिमणाजी याची रवानगी केली आसे. तरी उभयतास दोन घोडे मौजे सालाऊ ये जागा रवाना केले पाहिजेत. या उभयतांची रवानगी आजीच केली असे. उदैक रविवारी सालावास मार्ग पाहातील तरी घोडे सालावास लौकर पाठवावे. कळले पाहिजे रा छ २८ माहे मोहरम बहुत काय लिहिणे लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Sekhoji Angria informs Bajirao that he has sent his two agents to meet the addressee instead of Malhar Hari.*

No. 53] [*June 1735?*

(या महत्त्वाच्या पत्राचा बराच आद्यन्त गहाळ आहे.)

स सामील करून गोवलकोट घ्यावा यैसा हुकूम नाहीं. परंतु तुम्ही येथे आहा याजमुळे तुम्हास खबर करावी लागली. याउपरीं येतां तरी सुखरूप आपली फौजबंदी करून तुम्ही मोपाहून मधिले खंदकाकडून समोर चालोन घेणे. आम्ही हिरबारायाचे बागेकडून चालोन घेऊ म्हणून बोलिले. परंतु आपला काही भेद आम्हास कलो दिल्हा नाही. आम्ही तेथे त्यांचा पिछा सोडिला नाहीं. हे तेथेच बोली करीत असतां संताजी आंगरे यास दोनसें माणसानसी कासी बंदरावर दबियास रवाना केले. त्यासमागमे येसाजी अनंत तीनसे माणसानसी खेडाकडून हरजी ना कदम याजबराबर आले होते त्यास रवाना केले. येसाजीपंती आम्हास विचारिलें कीं यांजबराबर जावें कीं काये? आम्ही आज्ञा दिल्ही कीं तुम्ही आलबत जाणे. हरयेक प्रकारे साहेबकाम करावें. यैसे सांगोन ते रवाना केले, आणि आम्ही लस्करांत होतों. आम्हाकडे उभयेतानी स्वार पाठविला कीं सारी फौज तयार करून देखील हशम तुम्ही येणे. हे प्रात:काली हला करितात म्हणून याचे उतर येतांच आम्ही सारे सरदार फौज व हशम तयार करून मध्यानरात्री जाऊन त्यांच्या गोटाजवल राहिलों. दिवस निघालियावर खाडीचे पाणी उतरलियावर आंगरे याकडील फौज चालिली. आम्हीहि त्याचे * * * चालिलो. हिरबारायाचे बागेकडून खाडी उतरून मेढ्यावर चालोन घेतलें. आम्ही व रा दुर्गोजी भोईटे हे रा हणगोजी बोरगे व रा द्वारकोजीराऊ पाटणकर सारी हुजरात व रा मानाजी पवार व रा मकाजी आटोले व सरलस्कर यांकडील लोक व रा देवजी सोमवंसी याजकडील लोक व हुजरातचे हशम पेडमकर व बसवंतराव पलांडे व सजणाजी कदम आणीकहि सरदार सारे व रा त्रिंबकराव विस्वनाथ याजकडील

5230

जमाव वाघोजी खानवलकर व तान्हाजी दलवी भोंसले व अनंदराव पलांडे व आणीकहि जे त्याचे सरदार होते तितके येकविचारे होऊन आमचे हुजरातीकडील हशम व रा। त्रिंबकराव यांजकडील खानवलकर वाघोजीराव वगैरे हे लोक निशाण-देखील पूर्वेकडील खाडीकडून खंदकाकडून मोपामधोन् कासीदबंदराकडील रोखें चालोन घेतलें. आम्ही फौजेचे लोक यैसे समोर चालोन घेतलें. चहूंकडून येलगार केला. त्यामधे बावाजी म्हसके व हरजी कदम यांहि खाडी उतरून आधीं जाऊन मेळ्यास लागले. दोन च्यार लांकडे मोडली तों आंतून मार बहुत जाहाला. हातघाई जाली. येथें आंगरियाकडील सात मुरदे ठार पडले. तीस च्यालीस माणूस जखमी तीर गोली धोंड्याचे जाले. मारून खाडीमधें घातलें. तेच समई आम्हाकडील लोक पेडमकर बसवंतराव व देवराव् पलांडे वगैरे वाघोजीराव खानवलकर देखील जाऊन मेळ्यास पोंहचले. त्याणीहि हातघाई करून मेळ्याची दोनच्यार लांकडे मोडिलीं. त्याजवरी इटे जंगी भांडियाचा मार जाला आणि बरखंदाजी होऊन मारून माघारे खडकामधे आणिले. बसवंतराव याजकडील दोघे ठार पडले व खानवलकराकडील येक ठार पडिला व लोक जाया फार जाले. त्यामध्ये हणगोजी बोरगे याचे लोक व ते होते त्यांचेहि जायां जाले तों संताजी आंगरे व येसाजी अनंत त्याची कासी बंदरावर बरीसी जाली. तेथे * * * * नंत यांचीहि बहुत खस्त जाले. साहा माणूस ठार पडिले. तीस माणूस जाया जाले. संताजी आंगरे यांचेहि तिघे ठार पडिले व दाहा वीस माणूस जाया जाले. तेहि मारून काढिले. आम्ही समोर होतो तेथें आम्हाकडील करोल ठार पडिला व रा। द्वारकोजीराव यांजकडील येक जखमी जाला. आम्हीहि खंदकामधे काईम राहिलो. येक प्रहर निशाणे आम्हाकडील काईम जेथील तेथे राहिलों. आंगरे यांची निशाणे व लोक अलीकडे येऊन गोटास चालिली. यावर मग आम्ही निशाणे काढून संभाळून निघालो. आंगरेयाकडील भेद होता त्याचे बोले गेले. त्यांचे ते कार्य न जाले यामुलें इतका नास जाला. ते गेले, आम्ही न जावें तरी हेहि गोष्टी उतम नव्हे, म्हणून आम्हास कुलीं लोक सरदार जमा करून दिलासे दिलदारी करून जो पडेल त्यास बालपरेसी चालवावी, जायां होईल त्यास कडीं कामकाज पाहून द्यावीं, गांव मुकासे माहाराजांस अर्जे करून देववावे, यैसी शफतपूर्वक हशमाचे समाधान करून आपलाले लोकांचे समाधान करून कार्यास प्रवर्तलो. परंतु आंगरेयाकडील लोकानी उतावली करून अखेर नामो-हरम होऊन माघोरेहि तेच घडीस उलटले. यामुलें काम कचें जालें. हबसिया-कडीलहि दाहा बारा माणूस मेळ्यांत तिहींकडे पडिले व माणूसहि (अपूर्ण).

¶*This fragmentary letter probably by Santaji Jadhav gives a vivid description of an assault on Gowalkot that failed.*

5231

No. 54] [1-7-1733

छ २९ मोहरम

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री

पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवेसी सेवक केशव लिंगोजी कृतानेक विज्ञाप्ति विशेष. स्वामी आज्ञा घेऊन निघालो ते प्रहर दिवसास आलीबागास पावलो. राजश्री सेखोजी आंगरे सरखेल याची भेट जाली. यावरी लोकाची हाजीर गणती व वरकड सविस्तर वर्तमान लेहून पाठऊन. वरकड वर्तमान तरी आपणाबराबरी आपल्याजवळचे दाहा वीस माणूस आसावे तरी स्वामीने कल्याणकर जमावात सुभानजी नाईक वीरा जमातदार आहे, त्यास दाहा वीस माणसानिसी रवाना करावयाविसी आज्ञा करणार स्वामी समर्थ असेत. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Keshav Lingoji reports to the Peshwa his arrival at Alibag and his interview with Sekhoji Angria and requests that some more men be sent to accompany him.*

No. 55] [10-7-1733

छ १२ सफर

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित

प्रधान दाजी गोसावी यांसी

विनंती उपरी. कोठीस जिनस होता तोपर्यंत लोकास दिल्हा. हालीं जिनस सरला. विकतहि मिलत नाही. लोकांस तो जिनस अगत्यारूप दिल्हाच पाहिजे. यैशास येथून कांही जिनसाची अनकूलता करून पाठवावी म्हणौन आपण लिहिले. त्यावरून कोठीत जिनस होता त्यापैकी गलबतावर भरविला आहे. गलबतें येऊन पावलियावरी जिनस पोंहचेल. आपणास कलावे याकरितां लिहिले आहे. चौबुर्जीच्या कार्यभागानिमित्ये आपणाकडील जमाव रा अनंदराव सिर्के व कृष्णाजीराव येरूंडकर वगैरा सरदार दोनसे माणूस राजश्री केशव लिंगोजी यांजबराबर देऊन पाठविले होतें. श्रीकृपेकडून काम फते जाहालियावरी लोक आपणाकडे पाठविले आहेत. केशव लिंगोजी यांस येक दोन दिवस ठेऊन घेतलें आहे. मागाहून गलबते येतील त्यावरून आपणाकडे रा करून. कलले पाहिजे. जाणिजे रा छ ९ माहे सफर. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Sekhoji is sending supplies to the Peshwa, as requested by him.*

No. 56] [10-7-1733

छ १२ सफर

श्री

पुरवणी राजश्री बाजीराऊ पंडित
प्रधान दाजी गोसावी यासी

विनंती उपरी. उघाडी पडतात. या उपरी गलबतांची रवानगी त्वरेने करावी म्हणौन लिहिले. यैशास चौबुर्जीच्या कार्यभागाकरिता दर्यावर्दी लोकांचे प्रयोजन होते. तो कार्यभाग विलेस लागला. या उपरी बुधवारी गलबतांस तेल घालावयाची दिंनसुधी पाहिली आहे. तेल घालून गलबते लोटून तयारी करितो आणि मानमार्ग पाहून अविलंबेच रवानगी करून. कलले पाहिजे. रा छ ९ माहे सफर बहुत काय लिहिणें? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Sekhoji Angria writes that he is soon sending his fleet to the Peshwa.*

No. 57] [10-7-1733

छ १२ सफर

श्रीपरशराम

पुरवणी राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान दाजी गोसावी
यासी

विनती उपरी. अंजनवेलीकडील वर्तमान लेहून पाठवावे म्हणोन लिहिले. येशास जंजिरे सुवर्णदुर्गाहून काली छ ७ सफरी पत्रे आली. तेथे लेहून आले कीं रा बावाजी म्हसके हवालदार किले जयगड नवसे माणसानिशी विजयगडास मोर्चे देऊन किलावर भांडियाचा मार करीत आहेत. रा बंकाजी नाईक माहाडीक सुवर्णदुर्गाहून जमावानिसी चिपलुणास गेले. जातेसमई श्री येथे शामलाची स्वारी देवलाय भ्रष्ट करावे या उदेशे आली. त्याजवरी जाऊन मारामार केली. गनिमास नतीजा देऊन गलबतावर चढविला. हाली गोवलकोटानजीक भांडीयाच्या माराखाले जाऊन अलंगा[1] घालून बैसले आहेत. किले जयगड येथील भांडी आणायासाठी जमाव रवाना केला आहे. भांडी आलियावरी मोर्चेबंदी करून जागा हस्तगत करितील. दोनी ठिकाणें हस्तगत जाहालियावरी

१ शिपायांना राहण्याकरितां कोठड्या.

दोनी फौजा अंजनवेलीस दाखल जाऊन तेथील कृत्य संपादावे येसा विचार केला आहे म्हणोन पेशजी राजश्री रघुनाथ हरि याणी लेहून पाठविले होते व येथूनहि हाच विचार मारनुलेस लेहून पाठविला होता. सध्या दोनी जागेयांसी जमाव बेसला आहे. श्रीकृपेअविलंबेच कार्यसिधि व्हावी येसे आहे. सविस्तर आपणास कळावे म्हणोन लिहिले असे. जाणिजे रा। छ ९ माहे सफर बहुत काय लिहिणे लोभ असो दिजे हे विनंती.

¶*Bajirao is informed that Bawaji Mhaske and Bakaji Mahadik will march upon Anjanwel after finishing up Vijaydurg and Gowalkot business.*

No. 58] [*10-7-1733*

छ १२ सफर

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव
पंडित प्रधान दाजी गोसावी यासी

विनंती उपरी. थळचे चौबुर्जीचा विचार आपणास लेहून पाठविला होता त्याजवरून राजश्री केशव लिंगोजी व आनंदराव सिर्के वगैरा सरदार लोक दोनसे आपण रवाना केले ते आलियावरी मोर्चेयास सामानाची तरतूद करणे. ते दोहो दिवसांत करून बुधवारी दाहावे तासी सुमुहूर्ते प्रस्थान करून हिराकोटास मोकाम केला आणि रेवसेचा कोट हस्तगत करावयासी सागरगडचा जमाव रा। केला. रामराजातील[1] स्वारी व चौक्याच्या परामर्षास रात्रौ दोन तीनसे जमाव रा। केला. त्यास अगोदर सूचना होऊन बाहेरील जमाव कोटात नेला. मागाहून दोन तास रात्रीस बाबरी भांडी व कणगे साज सामान जमाव सहवर्तमान स्वार होऊन सूर्योदई चौबुर्जीजवळ दाखल जाहाले. ते समई उंदेरी व चौबुर्जीवरील भांडीयाचा व बंदुखाचा मार बहुतच जाहाला. खासा बसायाची मादवान उंदेरीवरील गोळा लागोन ठार जाहाली. ईस्वरी इछेने घोडीचवरी प्रसंग चुकला. जागा मैदान, आश्रा नसता लोकानी जमीन खणोन बसावयास जागा करून कणगे देऊन मोर्चेबंदी केली. दक्षण भागीं तीन व उतर भागीं येक च्यारी मोर्चे तयार करून भांडी लागू केली आणि दर भांडियास पनास पावणासे बार याप्रमाणे चौबुर्जीवरी मार केला. बाहेरील माडांचा मेढा फोडून तट ढासळत चालिला. येक दोन बुरुजावरील भांडियांचा मार मना केला. उंदेरीवरील व चौबुर्जी-

---

१. अलीबागेजवळील एक खेडें.

5234

वरील भांडीयाचा व बंदुखाचा मार फारच करीत असे. लोकांस आश्रा नाही तथापि डोई देऊन बरखंदाजाही मोर्चेयापुढे होऊन रात्रदिवस मारामार केली. दुसरे दिवसी दोन भांडी आणखी नेऊन लागू केली आणि रात्रों उतरेकडे दरवाजेयानजीक बंदरकिनारा वाळूवर माड देऊन माहेगिऱ्या गलबते उचलून नेऊन आड दिली आणि उंदेरी व चौबुर्जीवरील मारास आश्रय करून भांडी जोडिली. प्रथम पांच खंडी दारू खर्च जाहाली. यावरी दुसरी पांच खंडी दारू नेऊन तिसरे दिवसी साहा भांडीयाचा येक रंजक येकसमयाछेदे भडीमार करायाची आज्ञा केली. ते दिवसी चौबुर्जीवरील गोळ्याने चिरंजीव उदाजी आंगरे व गोलंदाज व सिपाई भांडियासमीप होते त्यांस जखम जाहाली. तिवे ठार व्हावे परंतु काही तफावत जाहाला म्हणौन जखमीं जाहाले. प्रात:कालापासून अस्तमानपर्यंत माराची अतिवृष्टि केली आणि आम्ही स्वार होऊन कुलाबा आलों. रात्रौ आठ तास पावेतो त्याचप्रमाणे मार केला. माराखाले आयास आला व सिदी आली व कासीमजी दोघे सरदार व दाहा बारा माणूस ठार जाहाले, जखमी बहुतच जाहाले. टिकाव नव्हे. माराखाले बहुतच माणूस जाया जाहाले. तेव्हा उंदेरीहून दोन माहेगिऱ्या आल्या. त्याजवरी कोटांतील लोक उतरोन गेले आणि बुरुजास आग दिली. तदनंतर मोर्चेयावरील लोकास गनीम निघोन गेला हे कळलियावरी मेढेयावरून लोक चढोन कोटात गेले. येक सिपाई होता त्याणे हतेर धरले तो पुरा जाहाला. धणीयांचे पुण्यप्रतापें जागा फते जाहाला. रेवसचे कोटास जमाव रवाना केला. बुधवारीचे रात्रीस जाऊन सिढ्या लाऊन गडीत उड्या घातल्या. गडीत पचवीस तसि माणूस होते त्याहीं तटावरून उतरोन पलोन गेले. दोघाही हतेर धरिले. ते जखमी जाहाले. चौघे दस्त जाहाले. गढी हस्तगत जाहाली. संतोषाचे वृत आपणास कळावे म्हणौन लिहिले आसे. याउपर उंदेरकराचा परामर्ष करावा यास्तव जंजिरे खांदेरीस गलबत पाठऊन तेथून भांडीयाचा मार व तडचा मार करावयाची यौजणा केली आहे. वरकड जजिरेयात च्यार गलबते, बारा माहेगिऱ्या आगोटीस ओढून ठेविल्या आहेत. दर्यावर्दी शंभर माणूस आहे. याउपरी निवातीं राहून चोरी छपीनें तडीस लागोन रयतीस उपसर्ग करील, त्याच्या बंदोबस्तास चेऊलापासून पेणपावेतो बंदरोबंदरी जमाव ठेविला पाहिजे. जाणिजे रा छ ९ माहे जफर. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*The writer explains to the Peshwa how he planned and carried by assault the fort of Thal. The writer also suggests measures for defending the captured places.*

Bk Ca 8—7 5235

No. 59] [10-7-1733

छ १२ सफर

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान

दाजी गोसांवी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. कितेक अर्थ राजश्री खंडो चिमणाजी समागमें सांगोन पाठविला, त्याचे प्रत्योत्तर पाठविले. तदनंतर आपण लेहून पाठविले कीं, हा धंदा उमदा आहे. लिहिल्या पुशिल्याने होत नाही तरी मातबर माणूस पाठऊन द्यावे त्याजपासी बोलावयाचे तें बोलोन, म्हणून लिा त्याजवरून राजश्री विसो हरि व राजश्री खंडो चिमणाजी याजवळ हद्दत अर्थ निश्चयात्मक शफतपूर्वक सांगोन पाठविले आहेत. मुखता सविस्तर निवेदितील. सारांश आपले विचारावेगळ आम्ही नाही. जसे आपा तसे आम्ही हा अर्थ चितांत आणून आम्हास आपण विचार आचार सागणे तो सागावा. त्याप्रमाणें चलनास अंतर सर्वथा होणार नाही. हा भरवसा असों द्यावा. कळलें पाहिजे. जाणिजे राा छ ९ माहे सफर. बहुत काय लिहिणें ? लोभ असों दीजे हे विनती.

¶*Sekhoji Angria writes to Bajirao about his having despatched his agents to explain matters personally.*

No. 60] [12-7-1733

छ १४ सफर

श्री.

राजश्री बाजीराव पंडित

प्रधान दाजी गोसांवी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला. गणोजी कदम यांचा व याचे भावाचा व लोकांचे कबिले किले रत्नागिरीस आहेत, त्यास निरोप द्यावा म्हणौन आपण लिहिले. त्यावरून राा सिवाजी नाईक जाधव यांस पूर्वींहि पत्र दिल्हे आहे व हालींहि दिल्हे असे. कबिलियांस निरोप देतील. आपणास कळावे याकरितां लिहिले असे. जाणिजे राा छ ११ माहे सफर बहुत काय लिहिणे लोभ असों दीजे हे विनती.

¶*Sekhoji Angria informs Bajirao of his having instructed Shivaji Naik to send away the families of Ganoji Kadam and others from Ratnagiri.*

No. 61] [14-7-1733

छ १५ सफर

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसावी यासी

विनंती उपरी. आपल्या लिहिल्यावरून गलबतांची तयारी तेलदेखील देऊन केली आहे. सुमुतें पाण्यात घालोन प्रतिपदेस गलबतांची रवानगी निश्चयात्मक आपणांकडे करितो व जिनसहि अस्त्या यैवजांत सिलकेस होता तो भरविला आहे. गलबते येतील त्यावरून येईल. आपणास कलावें याकरितां लिहिले आहे. जाणिजे रा छ १३ माहे सफर बहुत काये लिा कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Sekhoji informs the Peshwa of the despatch of ships and ammunition to him as ordered.*

No. 62] [14-7-1733

छ १५ सफर

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान दाजी गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नाो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्रें पाठविलीं ती प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय अवगत जाहाला. लोक व निशाण पाठवावयास सिध केले होते. त्यास राजश्री प्रतिनिधि कूच करून अंजनवेलीस गेले म्हणोन वर्तमान कलले. लोक पाठवावे न पाठवावे हा विचार करीत असता आजी वर्तमान आले कीं रा बकाजी नाा माहाडीक अंजनवलीस जाऊन मोर्चेबंदी करून बैसले आहेत. त्याजवरून त्यास पत्र पाठऊन नकल पाठविली व कितेक विचार लिहिले. येशास पूर्वी आपण अंजनवेलीचा मनसबा करावयाचा विचार लिहिला. राजश्री प्रतिनिधि यांचे जाणे होऊ देत नाही म्हणोन लिहिले. त्यावरून राजश्री रघुनाथ हरि यांस व बकाजी नाा यास जावयाविशी लेहून पाठविले. पुनरुक्त आपले पत्र आले कीं पंडित माारेनुले जाणार, त्यांचा दम पुरो द्यावा; तदुतर कर्तव्यप्रसंग करावा, म्हणोन त्याजवरून सुवर्णदुर्गाचा जमाव घेऊन माहाडीक माार स्वार होऊन गेले व तिकडून रा रघुनाथजी येणार. पहिली आज्ञा केली त्यावरून तरतूद करून जात असतां पत्राअगोदर ठिकाणी दाखल होतील याजकारितां लेहून पाठविले, कीं अंजनवलीस

गेले अशिलेत आणि पंडित माारनुले आले तरी श्रम करून यश त्यास न देणे. पेहलवानीने आपली काबू करणे, त्याजकडील राजकारण अशिले तरी तुम्ही ते जागा असतां राजकारण फसऊन तमाषा पाहणे, ठिकाणी गेले नसिलेत तरी प्रस्तुत विजईगड व गोवलकोटास तंबी देऊन फते करणे म्हणोन लेहून पाठविले. त्यास राजश्री रघुनाथजी याणी विजयगडचा कार्यभाग उरकून अंजनवेलीस यावे, बकाजी नाा यास गोवलकोटास शह देऊन बसवावे यैसा विचार केला होता व येथीलहि पत्रे प्रविष्ट जाहाली. तदुतर विजयगडास राा बावाजी म्हसके हजार माणूस व भांडी साजसामानानिशी राा केले. त्याणीं मोर्चेबंदी करून तोफांचा मार देऊन सातवे दिवसी किला हस्तगत केला म्हणून आजीच सुवर्णदुर्गाहून लेहून आले. बकाजी माहाडीक जातेसमई श्री येथील आधिष्ठानी शामलाकडील स्वारी दुर्बुधि धरून आली होती त्यास नतीजा देऊन क्षिति केली आणि गोवलकोटास भांडियाच्या माराखालें अलंगा घालून बैसले. जयगडीहून भांडी आणावयास जमाव पाठविला होता. विजयगडचा कार्यभाग उरकिल्यानंतर तेथील जमाव भांडी येऊन गोवलकोटास लाऊन आजीकारणे हस्तगत केला असावा. अंजनवेलकरनो पंधरा गलबते तयार करून बंदरात ठेविली होती. गोवलकोटची मदत उपराला करील या वहमाने जागा हस्तगत व्हावया दिसगत लागली, आणि राजश्री प्रतिनिधि त्या जागा गेले तरी कल्हास कारण होणार. परंतु आपण बकाजी नाईक यास अवघाच विचार लेहून पाठविलाच आहे. माारनुले येका दोहो रोजाचे मजलेवरी असतां बकाजी नाा त्यास लेहून पा(ठ)वितील. आपणाकडून सर्वथैव अंतर पडो देणार नाही. येविशी पूर्वी त्यास आज्ञा केली आहे व हाली आपण लिहून पाठविले, त्याजवरून मुजरद जोडीकरी राा केले आहेत. तुम्ही भांडत असता माारनुले येत असिले तरी लेहून पाठवणे आणि अंजनवेलकराचा उपराला व जागेयाचा युध्दप्रसंग व माारनुलेकडील शह सांभाळून जमावाच्या जडावाने जागा फते करणे, त्यांही तुम्हावर आग्रह केला तरी आपल्या कसबास अंतर न करणे, कलेल तेसे समजोन घेणे, म्हणोन लिाा असे, व त्याजपासून कोणेविशी अंतर होणार नाही येविसी वर्तमान लौकरीच कलेल. वरकड माारनुले याचा अंजनवेली प्रांते जावयाचा आग्रह नसता तरी दोनी स्थले हस्तगत करून अंजनवेलकरास गडबड जाहाली आहे, यांचप्रसंगी जाहाल्या जमावानिसी मासपक्षामध्ये कार्यसिधि होती. पुढे नौकामार्ग चालता जाहाल्यानंतर त्याचा उपराला होणार तेव्हा दुतर्फा शह द्यावा लागेल. येसमई खुस्कीने जागा जेर होऊन हस्तगत होता म्हणजे येक पक्ष जंजिरेयास उंदेरीचा राहाता त्याची तरतूद करणे सेहि केली जाती. परंतु गनिमास काही दिवस स्थलाचा रुणानुबंध आहे.

तदनुरूप तरतूदहि होत आहे. अतैव होष्यमाण प्रमाण. सविस्तर कळावे म्हणोन लिहिले असे. जाणीजे. रा छ १३ माहे सफर बहुत काय लिहिणे कृपा असो दीजे हे विनती.

¶*Owing to the long standing antagonism between the Peshwa and the Pratinidhi Shripatrao, the former requested Sekhoji Angria not to support the Pratinidhi in his expedition against Anjanwel. Sekhoji in this letter replies he has instructed his lieutenants Bakaji Naik and others to that effect.*

No. 63] [*15-7-1733*

छ १६ सफर

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान

स्वामी गोसावी यांसी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. सुरतेस हबासियाचा अमल आहे व हबसी आहे तो कैद करवावा म्हणून आपणास सांगितले व लेहून पाठविलें. आपण बंद करावयाचे मान्य करून सुरतेस लेहून पाठऊन अमल बंद केला ऐसे लेहून पाठविलें. ऐशास आजी छ १४ सफरी सुरतेहून ती डोली ज्याहाज व आठ सिबाडी मोठ मोठाल्या जमावाची भरती घेऊन उंदेरीचे बंदरी येऊन नांगरवाडा राहिला आहे. उंदेरीचे चौबुर्जाजवळ मेढा घालून आम्ही मोर्चे दिल्हे आहेत. त्याजवरून व चौबुर्जीवरून तोफाची मारगिरी करीत असो. तोहि उंदेरीवरून व गलबतावरून व ज्याहाजावरून मोर्चेयावरी बेसुमार मार मारीत आहे. आपण शामलाचा अमल बंद केला असतां ही तरांडी कोठून आली? जमाव कोठील? याचा विचार कसा काय आपण पाहिला आहे हें कळत नाही. ऐसी मदत होत चालिली म्हणजे गनीम आयास कैसा येईल? कोण्हीकडून उपराळा न होये ऐसे केले तरीच आजीपावेतो केल्या श्रमाची सार्थकता होईल. याकरितां सुरतचे सुभ्यास व मुंबईवाल्यास व फिरंगीयास बरे गरम नरम च्यार गोष्टी लेहून पाठवाव्या व राजश्री स्वामीस लेहून पाठऊन त्याचीहि पत्रे तिघास लेहून कोण्हीहि शामलास आश्रय न देये तो अर्थ करावा. तरांडी आलीं ही उंदेरीस टिकू देतो ऐसें नाही. येथून निघेल तेव्हा तिकडेस येईल. आपणास

5239

कळावे म्हणून लिा असे. तेथून गलबते रवानगीची तयार केली आहेत. प्रतिपदा द्वितीया या दोही दिवसी आपणाकडे रवाना करितों. कललें पाहिजे. रा छ १४ माहे सफर बहुत काय लिहिणें कृपा असों दीजे हे विनती.

¶*Sekhoji Angria complains to Bajirao that reinforcements from Surat have arrived at Underi despite the latter's measures to the contrary. He says it is difficult to capture the place if outside help is not stopped. He therefore requests the latter to do the needful.*

No. 64] [*16-7-1733*

छ १५ सफर

श्री

पुा श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी. गोवलकोटाजवल राजश्री प्रतिनिधि यांजकडील लोक दोन अडीचशें माणूस आजी दोन महिने येऊन सिदी सात याचे तांदूल खात केवल त्याचे चाकरदाखल होऊन बसले आहेत. त्याचा विचार काय? व पुढें राऊ माारनिले अंजनवेलीकडे येणार म्हणौन वर्तमान आलें आहे. येविशीचा अर्थ आपण चित्तीं आणून याचा बंदोबस्त करावयाचा त्या. रितीने आपण केलाच असेल अगर करितील. विचारें करून पाहातां ते आल्यावरी त्यांचा आमचा बीद बसणार नाही, यास्तव अगोधर हें वर्तमान आपणांस लिहिलें आहे. तरी ये गोष्टीचा कर्तव्य पदार्थ असेल तो सत्वरच करावा. बहुत काये लिहिणे कृपा वर्धमान करावी हे विनंती.

¶*The writer informs the Peshwa of Pratinidhi and his men being fed by Sidi Sad at Gowalkot and also of Pratinidhi's intention of proceeding further to Anjanwel. The writer entreats the Peshwa to stop it, otherwise things would not, says the writer, go on smoothly between the wr.ter and the Pratinidhi*

No. 65] [*16-7-1733*

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान
दार्जा गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. काली छ १४ सफरी उंदेरीसे आरमार सुरतहून

(1) 1,200 yards from the main land and opposite the village of Thal.

आले आहे म्हणौन आपणास पत्र लेहून पाठविले. परतु मनास आणितां मुंबैचे आरमार इंग्रजाने थोर ती डोली जाहाज येक व मोठी पांच गलबते माहांगिऱ्या साहा येकूण बारा तरांडी पाठविली आहत. लोकवार्ता आहे की, शामलाने उंदेरी इंग्रजास देऊ केली आहे. पुढे राजपुरी जंजिरे याचे साह्य करावे म्हणौन बोली केली आहे. विचारें पाहातां इकडून तहानिमित्य राजश्री बाबाजी बलाल व रा गंगाधर कासी यासी मुंबईस पाठविले आहेत. पूर्वी कपितान मकनीन यांणें बोलीचा मजकूर करार करून ठेविला आणि भले माणूस पाठवावयाविशी लिा त्याजवरून उभयेतास रा केले. आठ पंधरा दिवसा बोलींचा मजकूर सिध करून यावे, त्यास इंग्रजानें बोलीचालीस दिसगत लाऊन उभयेतास ठेविले आहेत. याजवरून दिसोन येते जे, उंदेरकराकडील राजकारण कर्तव्य याजनिमित्य अगोदर तहाचा प्रसंग उराकिला नाही. यैशियास शामलाने स्थल त्यास दिल्हे अशिले तरी मनसबियात दुसरा मनसबा प्राप्त होईल. इंग्रजाच्या बंदोबस्ताविशी पूर्वी आपणास लेहून पाठविलेच होते. याउपरी प्राप्त मनसबियाचे निराकरण ज्या विचारे करणे त्या प्रकारे करावयाची विवंचना करून आम्हासहि लेहून पाठवावे. आल्या आरमारावरी तरीच्या मोर्चेयावरून भांडियाचा मार करीत आसो. बंदरात टिकाव होऊ देत नाही. परतु हे गोष्टी तत्वता जाहाली तरी मोठासा शह आहे. श्रीचे सुदर्शन सव्यअपसव्ये फिरत आहे. मुंबैकरास हे बुद्धि जाहाली आसेल तरी त्याचेहि अगाध आहे यैसे नाही. सामेकरून विचार जाहाला तरी उतमच जाहाले. प्रसंगच प्राप्त जाहाला तरी नश्रुडास नतीजा धणियाचे पुण्यप्रतापे देतच आहो. कलले पाहिजे जाणिजे. रा छ १५ माहे सफर बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Sekhoji Angria informs that the ships at Underi which he reported to be coming from the Sidi of Surat, have turned out to be English men-of-war. It is rumoured, he further says, that the island of Underi has been made over to the English in return for their promised help at Rajpuri.*

No. 66] *[16-7-1733*

छ १५ सफर

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

सेवक रघुनाथ हरि कृतानेक साा दंडवत प्रणाम विनंती. येथील कुशल ताा छ १ माहे सफरपावेतों मो किले जयगड येथास्थित असे विशेष. आज्ञे-

5241

प्रमाणें स्वार होऊन यावे, त्यास पर्जन्याचा अतिशय. नद्यास उतार नाहे यास्तव जयगडीं राहिलों. आठा पाचा दिवसी स्वार होऊन येऊन. या प्रांतं तीन जागे शामलाचे होते. त्यास अंजनवेली म्हणजे धाकटा जंजिरा. तारू तरांडे चालते जाहाल्यावरी जंजिरेयाचा अवघा उपराला अंजनवेलीहून होईल यास्तव अंजनवेल हस्तगत करावयाचा विचार स्वामीनी करणें तो केलाच असेल. आम्ही छ २२ मोहरमी किले विजयगडास मोर्चे देऊन भांडीयाचे माराखाले दुशाल किल्याची पाडिली. बरखंदाजीनें मारामार करून भांडियांच्या जंग्या मना केल्या. पाच सा दिवस बरा झुंझला. सावे दिवसी कौलाची बोली करून कौल घेतला. धण्याचे पुण्येकरून जागा फते जाहाला. हे वर्तमान स्वामीस कलावे याकारितां लिहिले असे. अंजनवेल राहिली तेथील आधी तरतूद करावी. अंजनवेल फते जाहालेयास निमे जंजिरा फते जाहाला येसे समजावे. स्वामीनी लोकांची बेगमी करून आज्ञा करावी. येका महिनिया आलाकडेस जागा फते करून. कलले पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपा आसो दीजे हे विनती.

¶*Raghunath Hari describes to the Peshwa the attack on Vijaygad and the subsequent surrender of the place and entreats him to make arrangement for capturing Anjanwel which would assure success to Maratha arms at Janjira.*

No. 67] [*16-7-1733*

श्री

राजश्री फतेशिंग भोंसले गोसांवी यास

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयलेखन केले पाहिजे विशेष. उंदेरीस काली छ १४ सफरीं मुंबैचे आरमार आले. तरांडे येक व गलबतें लहान थोर बारा येकूण तेरा नग तृतीय प्रहरीं आले. लोकवार्ता आहे कीं शामलानें स्थल इंग्रजास द्यावें येसें कबूल केलें आहे. पुढें जंजिरे राजपुरीची मदत करावी येसा विचार जाहाला म्हणोन वर्तमान आलें. परंतु सत्य मानावें येसे नाही. साह्यभूत होऊन मदत करीत असेल येशास पूर्वी मुंबैकराच्या बंदोबस्ताविशीं आपणांस व राजश्री राव यास लेहून पाठविलें होतें. आपलीं पत्रें आलीं की त्यास पत्रें पाठविलीं आहेत म्हणोन लिहिलें व इकडूनहि तहानिमित्य कारभारी मुंबैस पाठविले. त्यास तहाचे बोलीचा मजकूर विलंबावर घालून या कर्मास प्रवर्तला येसें दिसोन येतें. तरी या उपरी इंग्रजाचा बंदोबस्त करायाची विवंचना करून पत्रें व भले माणूस पाठवावे येसें आपले विचारें जाहालें तरी सत्वर करून

टोपीकरास बंदावरी ठेवावा. सविस्तर राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांच्या पत्रावरून अवगत होईल. सामेकरून टोपीकर देहावरी आला तरी उतमच जाहालें. नाहीं तर त्याचा हिसाब काय? धण्याचे पुण्यप्रतापें मारून गर्देस मेळविला जाईल. कळलें पाहिजे. रवाना छ १९ माहे सफर बहुत काय लिहिणें? लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Sekhoji Angria informs Fatesing Bhonsle that the English of Bombay are going to join the Sidi and requests that they should be approached and dissuaded from taking that step.*

No. 68] [*17-7-1733*

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव पंडित
प्रधान दाजी गोसावी यासी

विनती उपरी. उंदेरीस इंग्रज पैवस्ता जाहालियाचे वर्तमान कालीचे पत्री लिा आहे, त्यावरून विदित जाहालेच असेल. इंदुवारी कालीच जंजिरेयावर इंग्रजाने आपले निशाण लाविले. इकडून चौबुर्जीवरील व मोर्चेयावरील भांडीयाच मार गलबतावरी व जंजिरेयावरी प्रातःकालापासून संध्याकालपर्यंत मार केला काही गोले गलबतास लागू जाहाले. तदनंतर गलबतें पलीकडे काढून सात गलबतांवरी जंजिरेयातील कबिले चढऊन मुंबैस रा केली. परजंन्य व तुफान बहुत जाहाले. त्याजमध्ये तीन गलबते गेली. बाकी फिरोन आली. प्रस्तुत टोपीकराने ठिकाणी प्राबल्य केले असतां भांडियांच्या माराने सिध होते यैसे नाही व त्याचाहि मुदा[१] मकसूद मनास आणावा, तदुत्तर कर्तव्य विचार तो करावा म्हणोन आजी भोमवारी इकडून मार मना केला. त्याणेहि आजी मार केल नाही. याउपरी मुंबैस जनराल यास पत्र पाठवावे यैसा विचार केला आहे व आपणहि पत्रे पाठवितील त्याचा जबाब काय येतो, कोणे मतलबावर ठिकाणी दाखल जाहाला आहे ये गोष्टीची तहकीकात करून सामेकरून सिध नव्हे, तेव्ह ज्या विचारे स्थल हस्तगत होऊन येई तो विचार करावाच लागेल. त्या स्थलं टोपीकराची स्थिरता होते यैसे नाही. अल्प कालेंच श्रीकृपे व धण्यांच्या पुण्य प्रतापे नतीजा पावोन जाईल. ते गोष्टीचे अगाध कांहीच नाही. परं आजीपर्यंत मुल्क वाचविला तो दोघे येक हात होऊन वोस करितील येच गोष्टीच चिंता प्राप्त जाहाली आहे. तरी पेण प्रांतीचे रखवालीस लोक कल्याणाहू

---

१ हेतु, मतलब.

अथवा कल्याणचा जमाव आपणाजवल आहे त्याजपैकीं दोन च्यारसें पाठऊन रखवाली करविली पाहिजे. चेऊल प्रांतचा तमाम काटा राखावयास जमाव जागजागा आम्ही ठेविलेच आहेत. तिकडील काठ्याचे रखवालीस आपणाकडील लोक असिले म्हणजे रयत आपापले ठिकाणी राहून कीर्दी करील. जमाव पेण प्रांती लौकर रा करावा. कळलें पाहिजे. रा छ १६ माहे सफर बहुत काय लिहिणें कृपा असों दीजे हे विनती.

¶Sekhoji Angria writes that an English force has landed at Underi and hoisted the English flag. As it could not be readily dislodged from the position negotiat'ons have been opened with the authorities at Bombay that the force on the is!and be withdrawn. Should the negotiations fail the writer is prepared to strike a blow. The Peshwa is asked to guard the shores in order to prevent the enemy's parties plundering coasta! villages.

No. 69] [*17-7-1733*

छ १९ सफर

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान दाजी गोसावी यासी.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. आपण पत्रे पाठविली ती प्रविष्ट होऊन लेंखनाभिप्राय अवगत जाहाला. राजश्री श्रीनिवासपंडित प्रतिनिधि यांचा व रा बकाजी नाईक माहाडीक याचा येक हात होऊन अंजनवेलकराच्या उपमर्दनप्रयोगास लागले म्हणोन सातारिहून लेहून आले व प्रतिनिधि याचे पत्र राजश्री फतेसिंग भोसले यासी चिपळुणचे मुकामीहून आले त्याजवरून कार्यप्रयोजन येकत्र होऊन करितात म्हणोन दिसोन आले. यास्तव चित विक्षेपाते पावले ते काय लिहावे, म्हणोन लिहिले. तरी मारनुले यास वारंवार पत्री आज्ञा केली आहे जे तुम्हीं त्यांस सामील होऊन कोणेक कार्य न करणे. अंजनवेलीस जाऊन पोहचले असाल आणि प्रतिनिधि मागाहून आले आणि राजकारण करून येश घेतील तरी राजकारण फसवणे. त्यासी येश न देणे. मुलकी अमल करिता कटकट करितील तरी पाहून घेणे. परंतु आपला अमल त्यास करू न देणे, म्हणून लिा असता माहाडीक मार त्यांस मिलोन कार्य करितील हे गोष्ट घडणार नाही. परशरामी युध्रप्रसंग इकडील लोकांही करून अंजनवेलकराची क्षिति केली तेसमई प्रतिनिधीकडील

जमाव सामील नव्हता. परंतु आपला मजुरा[१] व्हावा या अर्थें सातारा व राजश्री फतेशिंग यासी लेहून पाठविले असेल येसे दिसोन येते. सत्यमिथ्या कश्यावरून म्हणावे. अविलंबेच तिकडील साद्यंत वर्तमान कलो येईल. गोवलकोटास बकाजी माहाडीक बैसले आहेत म्हणोन सुवर्णदुर्गाहून लेहून आले होते. आंजनवेलीस गेले नाहीत. तेथे राजश्री प्रतिनिधि गेले असतील तरी त्यांस सामील न व्हावे, येश त्याजकडे जाऊ न द्यावे, त्याणी होऊन कटकट केली तरी समजोन घ्यावे, म्हणोन आज्ञा करून पत्रे रवाना केलीच आहेत व हाली आपले पत्र प्रविष्ट जाहाले त्याजवरून राजश्री रघुनाथ हरि व राजश्री बकाजी माहाडीक यासी तुम्ही आपले जमावानिशी कोणेक कार्य करणे ते स्वातंत्रे करणे, त्यांस अथवा त्याजकडील जमावास सामील करून न घेणे. गोवलकोटास प्रथमता तुम्ही जाऊन अंगेज केला असतां प्रतिनिधि आले असतील तरी त्यांस पष्ट सांगणे जे प्रथमता या जांगा आम्ही आंगेज केला असता तुम्ही येऊन कलह करावा हे गोष्ट अनुचित म्हणोन सांगावे. त्याजकडून कलहास प्रारंभ जाहाला तरी समजोन घ्यावे, परंतु आपले आहारी आणून कार्यसिधि करून येश आपण घ्यावे. त्यास मिलोन कार्य न करावे. येश त्यास न द्यावे. येथील प्रसंग उरकिल्यानंतर अंजनवेलीस प्रतिनिधि जाणार त्यास जाऊ द्यावे. तुम्ही व ते येकत्र होऊन न जावे म्हणून तपशिले आज्ञा करून पत्रे लेहून लखोटे आपणाकडे पाठविले आहेत. हे मुजरद-जासूद पाठऊन मारनिलेकडेस पत्रे पोहचती करावी. यद्यपि आपण लिहिले तोंच विचार असिला तरी येथील आज्ञेप्राच बर्तणूक करितील. येविशींचा संशय आपण किमपि चिती नाणावा (न आणावा). आपली आमची येकचित्तवृत असतां अनसारिखी वर्तणूक होईल येसे सर्वार्थी घडणार नाही, हा निशा असो द्यावा. कलले पाहिजे. जाणिजे रा छ १६ माहे सफर बहुत काय लिहिणे कृपा असो दिजे. हे विनंती.

¶*Sekhoji Angria assures Bajirao that he has, as desired by the addressee, instructed his men Bakaji Mahadik, Raghunath Hari and others to hold themselves aloof from the Pratinidhi and thus thwart his plans.*

No. 70] [*18-7-1733*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेशी

पोष्य जिवाजी खंडेराव दंडवत प्रा विनंती. येथील कुशल ताा छ १७ सफरपर्यंत यथास्थित असे विशेष. राजश्री पांडुरंग गोविंद यांस राजश्री स्वामीनीं

१ मान्यता.

जंजिरियांत पाठविले आहेत. स्वामीजवळ येतील. सविस्तर स्वामीस विदित करितील. स्वामीनी यांस जंजिरियांत पाठऊन तेथील राजकारण घेऊन येतील त्याचा अभिमान धरून येश संपादिले पाहिजे. बहुत काय लिहिणे कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Jiwaji Khanderao informs the Peshwa of King Shahu having despatched Pandurang Govind to Janjira and asks the addressee to give him all possible help.*

No. 71] [*19-7-1733*

छ १२ सफर

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान
दाजी गोसावी यासी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. चाकणेस आम्हांकडील लोक भातखलियांत पंचवीस माणूस होते, त्यांजपैकी नव दाहा माणूस किलेयांत जात होते. त्यांजसी दरवाजयांत दरोगा होता त्याणे कटकट करून लोकावर हात केला. परस्पर त्यांची यांची कल वाढत असतां किलेदाराने येऊन दरवोजा[1] दिल्हा आणि मारामार केली. तेसमई किलेदारास हूले[2] चालविली थोडीशी जखम जाहाली. इकडील नव माणूस ठार जाहाले. हे आवाई लाडकोजीस कळतांच समाचारास बराबरी लोक घेऊन गेला. त्याची व जुनूरकराकडील लोक याजवरी धावोन आले, यांची मारामार जाहाली. इकडील दाहा माणूस जखमी जाहाले. जुनूरकराकडील हजारी ठार जाहाला, पांच सात जखमी जाहाले म्हणून वर्तमान आजीच आलें. तहकीक लेहून आलियावरी सविस्तर लेहून पाठऊन. वावेकेल[3] होऊन या प्रकारें प्रसंग होऊन आला. हे वृत आपणास कळावे म्हणौन लिा असे. याउपरी येविशीचा विचार कर्तव्य असेल तो करावया आपण वडील आहेत. जाणिजे रा छ १८ माहे सफर बहुत काय लिहिणे.

¶*Sekhoji Angria reports to Bajirao an encounter of his men with the garrison of fort Chakan and the consequent loss of life therein.*

---

१ दरवाजा बंद केला. २ भोसकणें. ३ वायकळ = गर्दी.

No. 72] [26-7-1733 ?

छ २९ सफर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री

पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. किले गोरखा येथील राजकारण करार वाके आम्हापासी आले आहे. किला घ्यावा. हस्तगत जाल्यावरी रुा ५००० पांच हजार त्यास द्यावयाचा करार केला आहे. स्वामीस ये गोष्टीचे जरूर असेल तरी तो ग्रहस्त प्रस्तुत आम्हापासी आहे. तो उतर लवकर पाठवावें. अगत्य नसेल तर तैसेच उतर पाठवावे. या राजकारणास प्रारंभी दोन अडीचसे रुा किरकोल त्या गृहस्तास अगोधर आम्ही दिल्हे आहेत ते तऱ्ही उगऊन +घेऊन, त्यांजला निरोप देऊन. मनसुबा उतम आजीच संपादून घ्यावा यैसें असेल तरी कार्य करून उपरांतिक भेटीस येऊन. विदित जालें पाहिजे. स्वामीस अगत्यवार नसेल तरी आम्ही आपले रुा उगऊन घेऊन त्यास निरोप देऊन. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

¶*An early disposal of the affair of the Gorkha fort which the Killedar was willing to hand over for Rs. 5,000 is solicited from the Peshwa by Sekhoji.*

No. 73] [6-7-1735 ?

श्री

श्रीमंत राजश्री प्रधान

पंत साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक रघुनाथ नीलकंठ सुभेदार मो माहाड साष्टांग दंडवत विज्ञापना. ताा छ २९ माहे सफरपर्यंत साहेबांचे कृपावलोकनाकडून सेवकाचे व सुभाचे वृत येथास्तित असे विशेष. बाणकोटाहून तीन च्यारसे माणूस स्वारी पलिकडे गेली होती. त्यास गनिमाचा दाखला जाहाला. युध्येप्रसंग बहुत बहुत जाहला. ते सविस्तर वृत बाणकोटाहून राजश्री हरिपंत सुभेदार याहीं सेवेसी विनंतीपत्रें पाठविली आहेत त्याजवरून सेवेसी विदित होऊन येईल. गनीम कपटवेशेकरून हे प्रांती बहुत उत्पात मांडिला आहे. त्यास भारी जमाव सरंजाम होऊन दिघी पावेतो स्वारी करून ठेचगा दिल्हेविना कार्यास येत नाही. तरी हे प्रांते

+ येथून वेगळें अक्षर.

राजश्री खंडोजी माणकर व राजश्री हरिपंत सुभेदार आहेत. ते साहेबांचे पुण्यप्रतापेकडून स्वारी सिकारी करून गनिमास ठेचगा देणे तो देतीलच, परंतु सेवकाने विनंतीपत्र सेवेसी लिा आहे. तरी गनिमास ठेंचगा बरासा प्राप्त होऊन हालखुद राहे ते आज्ञा करणार साहिब धणी आहेत. सेवकहि हे जागाहून जमावानिसी स्वारी सिकारीत दाखल व्हावयास सिध. असो. आज्ञा ते प्रमाण. सेवेसी विदित जाहाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Raghunath Nilkanth reports to the Peshwa an action between the Sidi and the Peshwa's men at Bankot and impresses on him the necessity of sending an expedition towards Dighi.*

No. 74] [July 1733

श्री

पुा श्रीमंत राजश्री सरखल
साहेबांचे सेवेसी

विनंती विशेष. मासूम (?) पलवकर सुरतेहून आला, त्याणें वर्तमान सागितले कीं, तेथे हबसी आहे त्याणे जमाव सुरती लोकांचा तीन च्यार हजार केला आहे, श्रावण नारल पडतांच आरमार काही साउकारी व येक दोन गुराब तेथे त्याणी घेतल्या आहेत, ऐसा सज करून राजपुरीस यावें ऐसा विचार केला आहे. अशास येविसीं राजश्री पंतप्रधान यांस लिहोन श्रीमंत माहाराज राजश्री स्वामीकडे लिहोन तेथून पत्रे मातुश्री उमाबाई यांस व गायेकवाड यास व सुरतेचे हाकिमास बरे ताकिदीची पत्रे की, सुरतेहून संचणी करून हबसी लोक ठेविले ते येऊ देऊ नये. जर लोक सुरतेचे दिल्हे तरी सुरतेचा निशा केला जाईल ऐसी पत्रे सत्वरच गेली तरी येक माणूस हबसीयाकडे चाकर राहो देणार नाहीं ऐसे आहे. हे वर्तमान पलवकरहि हुजूर आला आहे तो विदित करील त्याजवरून विदित होईल. आढलले वर्तमान लिहिलें आहें. सेवेसी श्रुत होयै हे विज्ञेसी.

¶*Sekhoji Angria is informed of the attempts made by the Sidi at Surat to collect forces to reinforce Janjira and is requested to communicate the news to the Peshwa and to king Shahu that they send despatches to Gaikwad and Umabai to checkmate the attempt.*

No. 75] [3-8-1733

छ ३ रबिलोवल

श्री

विनंती उपरी. पूर्वी आपणास पत्रे लिहिली आहेत. पहिले अम्हासी करार केला होता कीं चेऊल आपले घ्यावे, हबशियाचें किल्ले घेतले ते घेतले, उरले राखावे. आपला मातबर माणूस नेऊन सल्ह्य करून वेढे काढावे यास्तव आपली आज्ञा आली. नंतर अखंड पुसतात कीं उत्तरें आली न आली. नंतर विचारे विचारे सांगितले. नवाबास तो सावकाश नाहीं. कलताच हबशियाचा झाडा गडाचा आणितां अंजनवेल, गोवलकोट, राजपुरी, उंदेरी, पद्मदुर्ग वरकड स्थले घेतली. त्यावरून श्रमी होऊन फारसे तीर्थरूपाचे द्रव्याचे हाणी होऊन श्रम पावले त्यावरून सेवेसी लिहिलें. तदनंतर आम्ही निरोपाचा उद्योग केला, निमित्य कीं तुमचे मनी बिगाड करणे तर आम्ही जाऊं. अगोधर राहाणे मुनसिब नाहीं. त्यावरून तुम्ही कां जातां, आम्ही बिगाड कशास करूं, भला माणूस तरी देता कीं एक राइरी ठेऊन वरकड किल्ले देते तरी पाठवितो. हबशियासी काये उरले आहे, त्याणे तुमचा उपकार कशास घ्यावा, आपण कांहीं बिगाड करीत नाहीं, यैसी गोष्ट बोलतात. केवल निग्रह करून निरोप घ्यावा तर तुम्ही काये म्हणाल यास्तव निष्ठुर करितां नये. त्यामध्यें वेथेनेहि पडला आहे. दहा पंधरा दिवस दरबार नाहीं यैसा प्रसंग आहे. पहिले आवरंगाबाजेचे व ब्ऱ्हाणपूरचे लोकास पत्रे गेली होती कीं येणे. मागाहून पत्रे गेले परवा कीं दसरा करून येणे. क्षणभंगुर बुध जाली आहे. कर्नाटकावर फार जाणे वासना आहे. पौश मासामध्यें निर्वाह जोशी यानीं केला आहें. जोशी भर सावध प्रामाणिक, आणिक सांगितले तितके प्रमाण जाहाले, त्यावरून हेहींच प्रमाण माणिले आहे. एकादो रोजा आरोग्य जाले तरी भेटीनंतर सविस्तर लिहू. परंतु तुम्हास अंजनवेल, गोवलकोट हस्तगत होता तरी कोकणातील निशेईल होते. येथें त्याचा वकील मोहनलाल व जमातदार हबशी याचा आला आहे. वकील मातबर आहे. म्हणतात कीं हबशी स्नेह करून वेढा काढितील तरी उत्तम. नवाबास अर्ज करितात वर्चेवरी पन्नास लक्षाचा माल राजापुरींत आहे. किल्ला गेला तरी जाईल. उप्राला करा, माल तुम्ही घ्या, सुर्तेत सात हजार इसम चाकर ठेवले आहे. नारल पाडिल्यानंतरी मदत जाईल. गपाहि मारितात तों उंदेरी गेली बारा हजार

---

१ योग्य. २ निःशल्य. निष्कंटक.

रुपये घेऊन हे वर्तमान राजश्री प्रधान पंताकडील जासुदाहीं सांगितलें. आम्हीं अर्जी करून पाठविली पोटास नाहीं. किल्ले विकिले. इंग्रजांपासून कोण घेणार ————(अपूर्ण)

¶*The writer communicates the intention of the Nizam to help the Sidi who approached him with a request of succour.*

No. 76] [*9-8-1733*

छ १२ रौवल

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान
दाजी गोसावी यांसी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो सेखोजी आंगरे सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लेखन केले पाहिजे विशेष. चाकणेच्या वतनाची बोली आपली व आमची होणे ते राजापुरीच्या मुकामीं जाहाली. कर्जाचा हिसेब मनास आणून वांटे करावी व वतनाचा अमल सुरलीत चालवावा, येविशीं नरसो घाटपांडा यास आपण आज्ञा केली. आम्हीं अवघाच विचार आपले वचनावरी मान्य करून, याउपरी वतन आपले आहे, विचारास येईल ते करावे म्हणोन सांगितले. आपण मान्य करून.कालोसचा जमाव काढून आपणावयाविशी आज्ञा केली. त्यावरून लोक रवाना करावयाविशी लेहून पाठविले. त्याही यावें तो जुनूरकर फौजेसह-वर्तमान येऊन अतिशयास प्रवर्तला. परंतु श्रीकृपे व राजश्री आपाहि तेच समई आले, तन्मुळें परान्मुख होऊन गेला. तदनंतर चाकणेस लोक होते, त्याहीं लबाडी केली. सात पाच जिवानिसी गेले. वरकड निघाले त्यांस दस्त करून आणऊन शासन करावें म्हणोन आज्ञा केली, परतु थांग लागला नाही. लबाडांही हुकुमाविना वर्तणूक केली. परंतु लौकिक प्राप्त जाहला, अतैव होष्यमाण प्रमाण असे. याकरितां ते जागा लोकांचा गुता जाहला होता. सांप्रत झाडियानसी लोक कुलाबा आले. गावचे रखवालीस कुली जमाव ठेविला नाही. जुनुरकर आला तेसमई रयेत परगंदा जाहली होती. त्यास लाडकोजीने राजश्री आपास लेहून पाठविले, त्याणी कौल पाठऊन रयेत गावात आणून कष्ट कामास लाविले. त्यास हली सादुलाखान याणे जाहागिरदार व फौजदारीचा गुदस्ताच्या यैवजाचे रोखे करून वसुलास वरातदार पाठविले आहेत म्हणोन रयेतीनें लेहून पाठविले; व पाटेल कुलकर्णीयाणी येऊन

विदित केले तरी येक वसूल किलेदारानें झाडियानिसी घेतला असता दुबारा कोठून द्यावा, या प्रकारे रयेत श्रमी होऊन गाव उजाड पडो पाहातो. याजकरिता आपणास पत्र लेख केला असे. व गावचे पाटेल रयत आपणाकडे पाठविले आहेत. यांचे बोलीचा अर्थ मनास आणून जुनूरकरास लिहिणे ते लेहून पाठवावे व राजश्री आपास लेहून यांचा तगादा दूर होऊन गावी सुखरूप राहात ते गोष्ट करावी. व गावचे रखवालीस राजश्री आपास लेहून पाठऊन दाहा पाच माणूस नेहमी ठेऊन कोणीकडील उपसर्ग न लागे ते करावे. बाबाजी भोसला पाठविला आहे. येविशीचे वर्तमान जबानी सांगता विदित होईल. जाणिजे. रवाना छ ९ माहे रबिलोवल. बहुत काय लिहिणे. कृपा असो दीजे. हे विनंती.

¶*Sekhoji Angria reports the aggressive action of the officer of Junnar against Chakan and requests the Peshwa to take action in the interest of the ryots of the place.*

No. 77] [*9-8-1733*

श्री

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत
राजमान्य राजश्री बाजीराऊ पंडित
स्वामी गोसावी यांस

पोष्य श्रीनिवास परशराम कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल तागायत छ ९ रबिलावलपावेतों सुखरूप असों विशेष. पत्र पाठविलें तें पावलें लिहिलें वर्तमान कळों आले. राजश्री स्वामीनी पत्र पाठविलें त्याचा जाब आपण काये ल्याहावा, तुम्ही काये लिहिला म्हणोन लिहिलें तरी माहाराज खावंद. त्यांत त्यांचे बुधिहून विशेष बुध कोणाची आहे ? तेथें विचार लिहिल्यानें त्यांचे प्रत्येयास कोठे येणार आहे ? त्यांत तेथील कार्यभागी आहेत, तेहि बुधीमत आहेत. या करितां आम्ही उत्तर लिहिले कीं धणी आहां, जे तुमचे विचारे येईल तें करावें. आम्ही सेवक आहों. जे आज्ञा कराल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. ज्याचें साहित्य असेल आणि तुमचे मतें निर्वाह लागेसा असेल त्यास ते आज्ञा करावी, इतकें उतर लिहिलें असे. वरकड येथील वर्तमान तरी हबसी दुष्ट आहे हा कांही झुंझल्या-भांडल्याविना स्थळें देत नाहीं. आम्हापासी पाईचे लोक जमा केले होते त्याचे वस्तु सेवट होऊन येईनासा पाहून फौज आणावयाबद्दल चिरंजीव दादास सातारियास रवाना केलें आहे. पूर्णिमा आंत बाहिर फौज आलियावरी जो निकर्ष

करणें तो करूं. परंतु प्रसंग बहुत भारी आहे. येत्न आमचा, बल्ते धार्णेयाचे आहेत. चिरंजीव गंगाधरपंत हजार माणसानसी आले आहेत. प्रजन्य बहुत लागला आहे. सारी भूम उदकमय जाहाली आहे. गोवलकोटास नदीचा भवता परिघ आहे. नदीस उतार जाहालियावरी जें होईल तें केलें जाईल. राजश्री फतेसिंग भोसले सेखजीस घेऊन राजदर्शनास गेले म्हणोन लिहिलें. उत्तम जाहाले. राजश्रीच्या मनोदयानरूपच आपण केलें. या उपरी आपणावरच मसलत आहे. कलेल तैसा विचार करिजेल. कृपा असों दिली पाहिजे हे विनंती.

¶*Shrinivas Pratinidhi communicates to the Peshwa the import of the king's letter and his reply to it and writes that the Sidi cannot be humbled unless a strong action is taken.*

No. 78] [*About 10-8-1733*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे शेवेसी

सेवक रघुनाथ हरि साष्टांग दंडवत विनंती उपरी. येथील कुशल स्वामीचे कृपेने जाणून स्वकीय कुशललेखन करावयासी आज्ञा कली पाहिजे विशेष. मंदवारी कुलाबा आलों. राजश्री सरखेल यांचे दर्शन जाहालें. दक्षणप्रांतीचा कितेक अर्थ राजश्री सरखेल यांस विदित करावयाचा होता तो केला. स्वामीच्या दर्शनास यावें हाहि हेत बहुतच आहे. परंतु सध्या मुंबैकडील तहाचा विचार येऊन प्राप्त जाहला आहे. याकरितां येता नये. पुढे ये गोष्टीचा विचार होऊन आल्यावरी स्वामीच्या दर्शनास यावयाचा उद्योग करून. विदित जाहले पाहिजे. बहुत काय लिहिणे. कृपा वर्धमान केली पाहिजे हे विनती.

¶*Raghunath Hari to the Peshwa saying that he is detained at Kolaba on account of the negotiations opened by Sekhoji with the English of Bombay.*

No. 79] [*10-8-1733*

नकल.

श्री

माहाराजाचे आज्ञापत्रें सादर केली. तेथे आज्ञा जे " निजामनमुलुक यानी उपद्रव आरंभिलाच तरी तुम्ही व राजश्री फतेसिंग भोसले व राजश्री प्रतिनिधि त्रिवर्ग मोहरे खाली गुंतलेत तेव्हा यासी आटोपी ऐसा दुसरा कोणी आहे ऐसा नाही; आणि कोकण मनसुबाहि सोडिता येत नाही. याकरितां तुम्ही त्रिवर्गानी

---

१ नशीब.

घाटावरी यावें. तुमचें बंधु राजश्री चिमणाजी बलाळ व प्रतिनिधीचे बंधु राजश्री जगजीवन परशराम व राजश्री फतेसिंग बावा याजकडील रा। व्यासराऊ, राजश्री सेखोजी आंगरे सरखेल यासी खाले ठेवावें आणि तो मनसुबा आटोपावा. तुम्ही त्रिवर्ग वरी आलियावरी निजामाच्याने वहमा धरवत नाहीं. हा येक विचार. दुसरा विचार, तुम्हा त्रिवर्गास आणावे, राजश्री येमाजी सिवदेव व राजश्री अंबाजी त्रिंबक व व्यासराऊ यासी खाले ठेवावे, हा कनिष्ट पक्षीचा विचार आहे. तिसरा विचार अवघेच मोहरे खालून काढिलियाने खाली मनसुब्यास बल पडणार नाहीं. गनीम सेर होईल, याकरितां मोहरे तों काढिता नयेत. न काढीन म्हटले तरी इकडील मनसुबा कोण करणार आहे? त्यास तेथें एक मोहरा राखावा. दोघा-जणास वरते आणावें. त्यास तुम्हांस राजपुरीस ठेवावे. तुम्ही सारा कोकणाच्या मनसुबा सांभाळावा. दोघे वरते येतील त्यानी पडल प्रसंग तो निटावावा अथवा प्रति-निधीनी राजपुरीस राहावे, कोकणचा मनसुबा त्यानी आटोपावा. तुम्ही व राजश्री फतेसिंग भोसले याणी वरते यावें. सारांश दोनी मनसुबे राखणे प्राप्त जाहाले आहेत. तरी येविसीचा विचार कैसा काय करावा (?) दोनी मनसुबे कैसे राहतील तो मनसुबा तपसीलवार लिहोन पाठवणे" म्हणोन आज्ञा. ऐसियासी आम्ही त्रिवर्ग फौजाचे सरदार येथे आहो. तिकडील वरघाटचेहि मनसुबियास फौज असावी त्यास येथे जो राहील त्याणी आपले पदरीचा पैका खाऊन येथे मसलत करावी तरी त्रिवर्गाचेहि पदरी फौज आहे. फौजेस पैका न द्यावा, पदरची तोडावी आणि तिकडील पैका आणून इकडे हशमास वगैरे लोकास देऊन हा मनसुबा करावा तरी तैसाच प्रसंग जाहालियावरी फौजेस तिकडील पैका येणे कठिण. तेथे त्या मुलुकचा पैका आणून इकडील मसलत कैसी होईल हा अर्थ कळतच आहे. या करितां माहारा(जा)नी आपणापासून खर्चास पैका पाठवावा. जो राहील त्याची फौज साहित्यासी असिलीच पाहिजे. हशमाचा खर्च माहाराजानी पुरवावा. फौजेचा खर्च ज्याचा तो पुरवील आणि हा मनसुबा बळावितील. माहाराजांच्या चितास येईल त्यास वरते न्यावे. येथे ठेवणे त्यासी येथे ठेऊन चहूकडे चौघे न फाडितां येका हाती मनसुबा करावा. म्हणजे माहाराजानी लिहिले आहे की दोन्ही मनसुबे सांभाळणे प्राप्त जाहले आहेत तदनरूप येथे राहील त्याणी कोकणचा मनसुबा सांभालावा. वरघाटे दोघे जातील त्याणी निजाम आटोपावा. हाही येक विचार आहे. दुसरे चिरंजीव राजश्री चिमणाजी बलाल अथवा राजश्री आंबाजी त्रिंबक किंवा राजश्री पिलाजी जाधवराऊ या त्रिवर्गांतून येकजण ठेऊन सेवकास वर्ते न्यावे, तेथे आम्ही सेवा करावी, या त्रिवर्गांतून

---

१ संशय, जोर.

येकानीं येथे राहून हा मनसुबा करावा. तरी आम्ही राहिलो तरी येकच. त्रिवर्गातून येकजण राहिला तरी येकच. फौज सामान येक, दुसरे सामान आहेसे नाहीं. आम्ही त्यानी मिलोन हरयेक येके जागा चाकरी करावी, दोहीकडे राखावेसे आमचे सामान काय आहे ? दुसरा विचार येथील शामळाचे हशम सेखजीचे लगामी आहे. वरघाटचे हशम फार करून राजश्री प्रतिनिधीचे जिल्हेत आहे. काही राजश्री सचिवाचे जिल्हेत आहे. त्यास काही नाही. ज्या बराबरी चाकरी करा म्हटले त्याबराबरी करतील. आमचे जिल्हेत हशम आहे ते व सरखेलीचे लोकास कल्याण भिवंडीपासून मालवणपर्यंत जागे राखावे लागले. इंगरेज फिरंगी शामल येकहाते जाहाले. पाणियातील गनीम जबरदस्त, जागाजागाची बंदोबस्ती येव्हाच करून जागे खबर्दार करावे लागले. तिघेहि जबरदस्त. त्यात शामल दगेखोर. कोण्हेसमई कोणे जागा उतरतील, कोणते जागियाचे गला पडतील हे काय कळे ? गनीम हरयेक जागियाचे गला पडेल तेव्हाच कुमक करीन म्हटले तरी कैसी होईल ? धणियाच्या जागियासी अपाय होऊ सके यास्तव बेगमी करून जागे बंदोबस्त करून सामनपूर करणेच लागले तरी सेखजीची उभारणी माहाराजानी करावी. हे कुल हशम त्याचे लगामी आहेच. वरघाटचे हशम त्याचे हवाली करून, घेतली स्थळें काईम राहावी, पुढे जंजिरा घेऊन शामलाचा निपातच करावासा असेल तरी याप्रमाणे करावे. काही फौजहि सेखजी जवळ पाहिजे. ते हजार राऊत व हजार रावताचा सरदार द्यावा. थोरल्ये फौजेचा विस्कट करावासा नाहीं. हाहि येक विचार आहे. तिसरा विचार इंगरेज, फिरंगी व सुरतवाला शामल, जंजिरेकरास साह्य जाहाले. नवाब उपराला करणार तेव्हां जंजिरा व वरकड पाणियातील त्याची स्थळे येणे कठिण आहे. दोनी मनसुबे राखेन म्हटल्या कैसे राखतील ; निजामास पराभवाते पावोन जंजिरा हस्तगत होईल, नव्हे, ये विसीची बलाबल जे आहे ते माहाराजांस विदित आहे ! इंगरेज फिरंगी पाणियातील गनीम त्याचे निराकर्ण राजश्री सरखेल याचे आरमारानी करावे तरी येकटा इंगरेज त्यास आटोपतां मुस्कील ! तेथे त्रिवर्ग येक हाते जालियावरी मारनिलेच्या आरमारानी परिणाम लागेल न लागे ते माहाराजांस अवगतच आहे ! दोहीकडील दोनी मनसुबियाचा विचार जबरदस्त आहे. यास्तव माहाराजास राजश्री आनंदराऊ पंडित सुमंत याणी लिहिलें आहे कीं घेतली स्थलें ते घेतली. राहिले जागे ते येणे कठिण. याकरितां ते जागे शामलाकडे राहूं द्यावे. आपणाबराबरी नवाब भला मनुष्य देताती त्यास बराबरी घेऊन येतो आणि त्याचे विद्यमाने तहरह करून. नवाबावरी येहसाने[1] करून हे

---

१ कृपा.

संतोसी होत आणि आग विझे ते करावे. येसियासी सुमंतासमागमे भला मनुश्य येणे तो येईल. तहरह करणे जाले तरी पदमदुर्ग ऊर्फ कांसा व अंजणवेली हे दोन्हीजागे महाराजाचे आहेत व उंदेरी व जंजिरा कदीम जागे शामळाचे आहेत. त्यास पदमदुर्गाचा मुबदला उंदेरी द्यावी व अंजणवेली घेऊन फक्त जंजिरा पदमदुर्ग येक आहेत ते ठेऊन तह करावा. पुढें जंजिरा राहिला, वेल पाहून घेतला जाईल. नवाबाकडून भला मनुश्य येईल त्याचे उपराळियाने हा तह होईल तरी होईल. आपल्या कार्याचा आहे. येरवीं नवाबाकडील भला मनुश्य दरम्याने न येतां हे गोष्टी शामल कबूल करितील हे होणे नाही. होईल तरी तह करावा. केवल याच मनसुबियाकरितां माहाराजांस खर्चीखाले आणून अखेर काम होणे कलतच आहे! याकरिता हाहि येक विचार आहे. माहाराजांनी तिन्ही विचार चितात आणून मनसुबियाचा जानूफायदा (?) कैसा आहे तो पाहावा. ज्या विचारे आपला विचार सिरा[१] कढेसा (चढेसा?) असेल तोच विचार करावा. हरयेक विचार सेवकांनी ल्याहावा तरी पहिला विचार आमचे दृष्टीस पडला तैसा व खर्चास पाठवावे म्हणून लिहीत गेलो त्यास माहाराजाचे चितात 'आपले स्वहितावरी नदर देतात' ऐसे येऊन, नामर्दी पदरी पडली. हलीहि हरयेक विचार आहे तैसा पुढे मनसुबियाचा आगाव दूरअंदेश विचारे लेख करावा तरी माहाराज म्हणतील की याचे मनांत होतें तैसेच निदर्शनास येत आहे, म्हणून हा विचार लिहिला, याकरितां लिहितांहि येत नाहीं. हरयेक काम करितोंच म्हणून ल्याहावे तरी दोन्ही विचार दोहीकडून. शामलास साह्य जबरदस्त जाहाले. काम होणे न होणे ते धणियाच्या प्राक्तनावरी आहे. काम जाहाले तरी बरे. नाहीं तरी तिकडूनहि दोश पदरी येतो कीं काम न होते. कबूल करू नका. चढी लावीत होते. राज्यास अपाये केला म्हणतील, हांहि दोश पदरी पडेल. याकरितां तोहि विचार लिहिजेसा नाहीं. माहाराज सर्वजाण आहेत. विचार दीर्घ दृष्टीने चितारूढ करून ज्या मनसुबियांत आपले स्वहितसे असेल तेच माहाराज करितील. आम्ही सेवक लोक ज्या गोष्टीत माहाराजांचा नक्ष व कीर्ति असेल तेच आम्ही सेवक लोकीं ल्याहावें. करणें ते माहाराजांनी मनसुबियाचा जानूफैलो[२] (?) चितात आणून कर्तव्य ते करावें. सेवक लोकांस दुसरा विचार काय आहे? ज्या गोष्टीत माहाराजांचा बोलबाला असेल तेच करणे उपयुक्त आहे. सारांश सर्व येख्तयार धणियाचा. धणियाची आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करावी. माहाराज दोन्ही मनसुबे राखोच म्हणतील तरी माहाराजास अशक्य काय आहे? माहाराजाचे पदरीं फौजाचे सरदार आम्ही

---

१ सिरा चढणें. फळास येणें.   २ दोन्ही बाजू.

त्रिवर्ग व सेनापति व सरलस्कर व राजश्री संभुसिंग जाधवराऊ व राजश्री कान्होजी भोसले व राणोजी भोसले व राजश्री उदाजी चव्हाण हिमत बहादूर ममलकतमदार व मुईजकर जाधव व पवार वगैरे सरदार मबलग आहेत. माहाराज चितावरी धरून करितील तरी काय नव्हे ? राज्यातील कुल फौज जमा करून तिकडे फौजानी नवाबास पायबंद द्यावा व हशाम पायेचे ठेऊन इकडीलहि मनसुबा राखावा. हशामास खर्च लागेल तो माहाराजानी पुरवावा. फौजाचे खर्च ज्याचे ते पुरवितील. त्याचे संकट माहाराजास नाहीं. जो फौज घेऊन चाकरीस येईल आणि चाकरी करील त्याचा बहुमान करावा. जो आज्ञे-प्रमाणे वर्तणूक न करी त्याचा परिछिन धंदा काढून दुसऱ्यास सांगोन त्यास नांवाजून काम घ्यावे म्हणजे न व्हेसे काय आहे ? चाकरीस अंतर पडलियावरी धणी इतराजी करितात ऐसे चाकराचे चितात येऊन चाकरी दुरुस्त करितील. सहजेच नवाबाचा परामर्श होऊन इकडीलहि मनसुबा राहातो. येणेकरून दोन्ही मनसुभे आटोपतात. परंतु आटाहास आहे. माहाराजानी जो विचार करणे तो पोख्ता करावा. जेणेकरून सर्व आचार राहून शत्रूचा गर्व हत होय ते करणार माहाराज धणी आहेत. सेवेसी श्रुत होय.

¶When the expedition against Janjira was being pushed on vigorously in Konkan, the Nizam threatened an attack from the east and Shahu found himself in a fix and suggested several methods for conducting the Janjira campaign and at the same time checking the Nizam. This letter is apparently a reply to Shahu by his Peshwa Bajirao discussing the pros and cons of the situation and suggesting several plans for adoption.

No. 80] *[About 11-8-1733*

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव
बलाल प्रधान यासी

विनंती उपरी. आपण राजपुरी मसलत केल्यावरी आपले प(त्र) न आले. तरी आम्ही जमावाची तयारी करून जयगडाजवल माल * * गाव आहे तेथ-पावेतो आलों. त्यास सैतवडे येथील खाडी उतरोन जयेगड घेऊन गोवलकोट व अंजनवेलीचा परामर्श करून साधले तरी कार्य करून राजपुरीपावेतो बलकी कुलाबापावेतो या(वे) आणि आपली भेटी घ्यावी, तीर्थरूप राजश्री सेखोजी बावास भेटावें, उभयतांची आज्ञा होईल त्याप्रा वर्तावें, हा निश्चय करू [पुढील एक ओळ फाटली] दुरदराज लाऊन विकल्प मानून किलास न यावें म्हणन लेह(न) पाठविले.

त्यास आम्ही किल्यास येत नाहीं. सैतवडे येथील खाडी उतरावयासी गलबत येक व होडी पाठऊन देणे म्हणून लेहून पा * * त्यावरी त्याणी जाब पाा की येक फाटे तेहि देणार नाही. खा(डी) थोर ताफे याचा इलाज नाही. तेव्हा माघारे फिरोन विजय(दु)र्गास आलो. एरवी अंतर सहसा न पडते, आपल्यापावेतो ये(तो). आशाढ मासीं पाईच्या जमावानसी पर्जन्य न म्हणता निघालो होतो. राजपत्र नाही, आपले पत्र नाही, व तीर्थरूप राजश्री (से)खोजी बाबाचेहि पत्र नसतां येत होतो तो आर्थ येकीकडे राहि(ला). हाली आरमारानसी यावे म्हणौन आपण लेहून पाठविले तरी (लौ)किकार्थ राजपत्र व आपले पत्र आले म्हणजे येतो. आपणा(स) कलावे म्हणौन लिहिले आहे. बहुत काय लिहिणे कृपा आसो दीजे हे विनंती.

¶*Sambhaji Angria's letter to Bajirao: informs he is being prevented by torrential rains from joining the Peshwa.*

No. 81] [*13-8-1733?*

श्री

राजश्री बालाजी महादेऊ गोसावि यासी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेो संभाजी आंगरे सरसुभेदार अरमार रामराम उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन केले पाहिजे विशेष. तुम्ही पत्र पाठविले प्रविष्ट होऊन लेखनार्थ कलो आला. राजश्री प्रधानपंताचे कागदाचे उतर पाठविले आहे पत्रावरून सविस्तर कलो येईल. वेदमुहूर्ति राजश्री कृष्णंभट टिलक श्रीआचरे येथे सुखरूप आहेत. कलले पाहिजे. बहुत काये लिहिणे. राां छ १३ माहे रबिलौवल हे विनती.

¶*Sambhaji Angria to Balaji Mahadev (Fadnis?) informing him that he has forwarded to him a copy of his letter to the Peshwa.*

No. 82] [*16-8-1733?*

श्री

विनंती उपरी. येथील कुशल ताा श्रावण त्रितीया गुरुवारपरियेंत येथास्थित असे. काल बुधवारी नवाबानी सा घटका दिवस असता बोलाऊन नेले. बोलीचाली फार जाहाली. अबदुलखान होते. होणार जाणार कितेक तपसील जाहाला. म्या पईले पत्रे लिहिले ते सविस्तर सांगितली की निमक त्याचे खातो, बरेवाईट आढळले ते लिहितो, याचा विस्तार फार जाहाला. नवाबाचे खातरेस

फार आले. समाधान पावले. कबूल केले, आपल्या लिहिल्याप्रमाणें चौल किला घ्यावा, हबसियाचा वेढा काढावा, भला माणूस आपला मातबर व मोहनलाल वकील मातबर आहे. हबसियाचा व हबसियाकडील जमातदार आला आहे, तों परस्परे सला करून घ्यावी आणि वेढा काढावा, त्यासी आजीच रुसगत करावे ऐसा करार आहे. बिघाड न करावा, स्नेहात अंतर नाही. परंतु येक आड आली आहे. आम्हास निरोप देत नाही, म्हणतात की तुम्ही न जाणे. भला माणूस तुम्हीं येक देणे, करणार लिहिल्याप्रमाणे मांहाराज आहेत. तुम्ही गेलिया लोकीक फटकाल होतो. गोवलकोट घेतले. हेहि वरवर बोली करू लागले. आमचेहि कूच आहे. तुम्ही गेला म्हणजे दोन तीन महिने लावाल. महिन्याभरा आपले कूच, यासाठी तुम्हास निरोप देता येत नाही. त्यावरून आबदुलखानास साप सांगितले की मज जाणे जरूर. खावंदास भेटणे, दुसरे हेहि काम करून महिनेयात येईन. येकंदर विलंब न लावी, अगर मज निरोप न द्या तर मज जाणे. मज येकंदर खावंदास भेटल्यावेगले राहाता येत नाही. विनाभेट तुम्हा-बराबरी मी राहणार नाही. अबदुलाखानानी आपले पुत्राची शपत केली की मी खायेनखाये रजबदल करितो आणि निरोपाचा प्रसंग करितो. येवढ्यानिमित्य खोलंबलो. असो तरी वडिली टाकोटाक पत्र नवाबास राजश्री स्वामीचे पाठवावे की फलाणीयासी येथवर काम आहे, पाठवणे, सवेच पाठऊन. पत्र न पाठवाल टाकोटाक, तरी मी राहात नाही, येतो. मग रागास याल तरी वडील असा. तुम्हास माझी आण. जलद माणूस पाचा दिसान येते तरी येक कागद नवाबास येक कागद अबदुलखानास टाकोटाक आधी पाठवणे. वरकड नवाबानी आपल्या लिहिल्याप्रमाणे मान्य केले. मातबर मनुष्याचेविसी सांगितले की जैसे नवाबापासी आदब मर्यादा तसी करावी. हे देणे ते देणे न म्हणावे, मर्जीमाफीक राहावे, सांगेन मी ते आईकावे, ऐसा करार करून आणितो. परंतु माझ्या निरोपासाठी तटलो आहे. वरकड आपल्या चिता योग्य प्रसंग जाहाला. पालीसाठी फार आग्रह करीत होते. आम्ही मटले कानोजी आंगरे यानी घेतली. पुत्र आता रुजू जाहाले. त्याणी वचनप्रमाण घेतले आहे. यास गड मागता कैसा येतो? तुम्हासहि अनुभव आहे. जे आहे ते नवाबाचे आहे. कितेक विस्तारे व्रत भेटीनंतर सांगेन. मूल वेढा न काढणे. नवाबावर उपकार हबसियांचे आपले सख्य (करून) * * *. वेढा काढावा. माझ्याच्च निरोपाचा गुंता आहे. बहुत काये लिहिणे.

¶*The writer (probably Anandrao Sumant's son to his father) requests being speedily recalled from the Nizam's Court. He mentions the Nizam's intercession in the Maratha war against the Sidi and forwards Nizam's terms for the approval of Shahu.*

No. 83] [17-8-1733

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वमीचे सेवेसी

विनीत सेवक कृष्णाजी राम सां नमस्कार विज्ञापना यैसी जे, स्वामीचा निरोप घेऊन आलों, ते पर्जन्याकरिता व गलबत न मिले म्हणून कसबे पेण येथे खोलंबा जाहाला. छ ११ माहे रबिलोबल ते दिवसी मुंबैचे बंदरीं उतरलों. छ १७ रोजीं आजम जनाराल याणी बहुत गौरस[1] करून भेटीस नेले आणि आपले पत्र सादर केले. त्याची नकल फिरंगी भाषेनें लिहून, आर्थ ध्यानास आणून, आम्हास येकांती नेऊन, काये आधिकोतर बोलावयाचें आहे म्हणून पुसिल्यानंतर स्वामीचे आज्ञेप्रमाणे कितेकां प्रकारीं आजमाऊन पाहिल्यानंतर सर्व आर्थ ध्यानांत आणून बोलिले कीं, राजश्री पंत प्रधान येकनिष्ठ स्वामीकार्यतत्पर. हें सर्वतोमुखी यैकत होतों. परंतु तुम्ही पुरातन आमचे परवोर्दा[2] यैशाचा शोध करून जे सुकार्य यापासून घडोन येईल म्हणून तुमचा संग्रह केला. यावरून सर्वतोमुखी यैकत होतो हे सत्य इतुके आमचे करारीस[3] आले. त्यास तुम्ही हरयेक गोष्ट बोलतां अंदेशा न धरणें. ज्याचे अंन खाता त्याचे इष्ट योजिल्याने तुमचे ऊर्जित होईल यैसे न होये. जे इंगरेजाचा पर्वर्दा ना काबील म्हणून पसंद न करीत. त्यास आम्ही बोलिलों ये गोष्टीचा उपाये मोहीब काय सांगतील तो बरा असेल. जे गोष्टीने आमच्या खावंदाचे व इंगरेजाचे येक चित होईल तर फार उतम गोष्ट आहे. तेव्हा अजम जनराल बोलिले कीं, माहाराष्ट्र राज्यास मदत करावी, पंडित मारानिलेच्या उतरावरून उचित आहे. परंतु पृथ्वीपतीचे पत्र इंगरेजास आहे की, सर्व प्रकारें सिदीस मदत करावी. जंजिरा वगैरे ठिकाणे याचे निसबतीचे आहेत ते रक्षावयास खर्च होईल तो हुजरून दिला जाईल. यैशास मोगलाकडील रुपये आम्ही उगऊन घेऊ सकतों. आमच्या हातांत आहे. आणि महाराष्ट्र राज्यास मदत करून फाईदा काये? कदाचित आम्हास स्थलाची इछा आसावी तर मुंबैखेरीज आधिक स्थलाची इछा धरीत नाही. याकरितां तूर्त मराष्ट्रास मदत केल्याने फाईदा काये? याचे उतर आम्ही दिले, जे समई हाबशाने मुबैस वेढा घातला,तेव्हा दुसरा कोण्ही कुमक करावयास न आला. जर मराठे होते तर आज मुबै तुम्हास राहिली. नाही तर कैसी गत होती? हे पूर्व स्मरोन येसमई कुमक

---

१ गौरशी, सन्मान, गौरव. २ पर्वदा, पोशिंदा. येथे पदरींचे ? ३ खात्रीस.

केल्याने थोरपण जोडेल आणि उपकार फिटेल. हे[1] गोष्ट लाहान. यैशाम आजम जनराल मारानिले बोलिले जे, इगरेजानी द्रव्य खर्चिले म्हणून लोक मिलाले. कुमक याचे नाव जे आपला पैका खर्च करून हरकोण्हास मदत करावी ती कुमक. आणि आम्ही पैसे वेचले त्याप्रो माहाराज राजश्री स्वामी रुपये वेचितील तर कुमक सहजच होईल. करा म्हणौन सांगावेंच न लागे. कदाचित म्हणतील जे, उभयतास मदत न करावी. तर सार्वभौमाने प्रथम लिहिले, जे रुपये साहित्यमुले वेचोल[2] ते आपण देईन. हे घडोन अल्याने पातशा कृतोपकारी होईल. आणि मराठे लोकांस मदत जाहालेयाने हबशीयाचे निर्मूल होतांच, तूर्त शेजारी सरखेल प्रबल होईल. आणि कुल सावकार लोकांस हैराण करील. यैशास तंबी पोहचवत नाही. आणि इंगरेजास शब्द लाविता कल्याण प्रांत तुम्हाकडे आहे तैसा हा प्रांत निखालस जितुका तूर्त हस्तगत आहे तितुका निरोपद्रवित रयत व साहुकार लोक खुशाल वाणंज[3] व्यापार करीत यैसा करा. म्हणजे अल्पायासे मनोरथ सिद्धीस पावतील. आणि खानजादा यास ठिकाणी बसऊन आपले पुरातन ठिकाणे आसतील ते सोडवावे म्हणून आश्वासन देऊन आपले ठिकाणे सोडऊन घेतले तरी आद्याप इछा त्रृप्त होत नाही. पुरातन ठिकाणे नाहेत तेहि घेऊ पाहातात हे काये?उतम गोष्ट थोरपणाची नीति यैसी आहे जे, हर कोण्हास आश्वासन देऊ नये आणि दिले तर सेवट करावा. याकरितां व री क दा य (?)उपाय योजिल्याने कार्यास येतील यैसे आपल्या खावंदास लिहून पाठवा. ते या पत्राचे उतर काये करितील ते सहजच कलो येईल. आम्ही बोलिलो. हे हितावह माहाराष्ट्रराज्यास दिसेल तर तैसेच उतर येईल, म्हणून फिरंगीने पत्री लिहून आम्हास पत्र लिहू सांगितले. यानंतर बोलिले जे, उभयतांस इंगरेजास व राजश्री स्वामी यास यश जोडे यैसा आर्थ योजिला जाईल. तो आर्थ पंत प्रधान यास कदाचित सुचेल. दुसऱ्याच्या चितांत येणार नाही. यैसे आम्हास भासते म्हणून बोलिले. परंतु लिहविले नाही. सेवेसी श्रुत होये. विलाइती तारवें दोन आलियावरील माल उतरतो आणि आरसे खाली बंदरावर आणले म्हणजे देवितो म्हणून जाब दिला. व दुसरीं विलाती तारवें येणार आहेत. येथे दर्शनानंतर दिवसे दिवस स्तुतिवाद इंगरेजाजवल फार करितात. वैद्य तों उतम येथे दिसत नाही. फिरंगणांत तलास करितों. असला तर सेवसी लिहोन पाठवितो. बहुत काये लिहिणे, कृपा वर्धमान करून सेवा लिहीत आसिले पाहिजे, हे विज्ञापना.

---

१ मदत न देणें ही गोष्ट लाहान म्हणजे कृतज्ञास न शोभण्यासारखी.

२ खर्चोल. ३ वाणिज्य.

5260

विषेश ही पत्रें तयार जाहाली होती. रवाना करावी तों तेच समई पेणचे वाटेनें स्वामींचे पत्र छ २२ रोजी पावले. मुख्यास येथल्या दाखविले. कितेक जबानी आर्थ सागणे तो सांगितला. तेच समई आजम जनराल याणी जबाब लिहून दिला. तो थैलित घाल्हुन घटका न लागतां रवाना करविला. निमिय(त्य) की पत प्रधान म्हणतील इतुके दिवस येका जबाबास कां लागले म्हणून विचार करीत आसतील. याकरितां तेच क्षिणी जाब लिहून देऊन आम्हाकरवी हे पत्र लिहविले. म्हणून तातड पत्रांची जाहाली. परंतु येथील येक दील आहे. सेवेसी श्रुत होये. या पत्राचे उतर सादर जांहालीयावर दस(रे) पत्री सविस्तर लिहितो. हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram reports from Bombay to the Peshwa his interviews with the Governor, explaining the attitude of the English towards the Marathas and the Sidis. The English, the Governor said, would help the Sidi of Janjira and not the Marathas, as he had orders from the Emperor to that effect. The letter is important as it explains the attitude of the English.*

No. 84] [*24-8-1733*

नकल छ २४ रालौवल

श्री

राजमान्य राजश्री चिमणाजी बलाल यासी आज्ञा केली ऐसीजे. चिरंजीव राजश्री फतेसिंग बावा हुजूर आले आहेत. मनसुबे प्राप्त जाले, त्याचा सिधांत कर्तव्य तो तुमचे विचारे करावा लागतो. व रा दादोराव भिमसेन व सेखजीहि आले आहेत त्याचाही विचार करावा लागतो. त्यास तुम्ही यावे लागते. यास्तव हे आज्ञापत्र सादर केलें असे, तरी तुम्ही पत्रदर्शनी स्वार होऊन अविलंबे येणें. हे पत्र लिहिले असे व रामचंद्र मिर्धे याजबराबर सलाहि पाठविला असे. सीघ्रवत येणें, अनमान कराल तरी तुम्हास स्वामीच्या पायांची शफत असे. तुमचे शरीरीं समाधान नाहीं त्यास औशधउपाये करीतच असाल. येथेहि वैद्य प्रमाणिक बहुत आहेत. नवे कर्नाटकी वैद्य आले आहेत. उपायें होणें तरी येथे होईल, परंतु अनमान सहसा न करितां पत्र पाठवतांच स्वार होऊन येणें. अणिखी पत्राचा मार्ग न पाहाणें. सविस्तर चिरंजीव व राजश्री नारो राम मंत्री व राजश्री अमृतराव त्र्यंबक यास आज्ञा केली आहे ते लिहितील त्यावरून कळेल. लक्षपत्राचे जागा हे पत्र जाणोन लौकर लौकर येणे.

(खास दस्तुर) रा बावा आहे आहेत तर कितेक करतवल्याची आज्ञा करणे लागती. याकारने तुम्ही असलें पाहिजे व रा दादोरावहि आले आहेत व

सेखजीहि आले आहे त्यासहि आज्ञा करने लागते. तुम्हीं असलें पाहिजे. कितेक मनसुबा तुमचे विचारें करने लागतो, तर पत्र दरसनी स्वार होऊन येने. विलंबावर न घालने. रा. दादा व नारो राम मंत्री व रा. अबुरुतराव लिहितील त्या वरून कळेल. अविलंबे येने. तुम्ही जानत हा, बहुत काय लिहिन. पत्र दरसनी येने. दुसरेया पत्राचा मारग न पाहाने. जरूर जानोन लिहिले आहे. बहुत काय लिहिन सुज्ञ असा.

¶*Shahu orders Chimaji Appa to repair to his presence without a moment's delay. He should come, adds the letter, even if he is ailing, as there are experienced doctors at Satara to look after the addressee's health.*

No. 85] *About 25-8-1733*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे शेवेसी

सेवक रघुनाथ हरि साष्टांग दंडवत प्रा। विनंती येथील कुशल आपले कृपेकडून असे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन सविस्तर कळो आले. कितेक मनसबियाचा विचार करावा लागतो तरी राजश्री सरखेल यांस घेऊन यावें म्हणोन लिहिले. यैशास सांप्रत राजश्री सरखेल यांचे शरीरी अनारोग्यता जाहली आहे. आरोग्य जाहलियावरी अविलंबेच यावयाचा विचार केला जाईल. नासिकद्वारें रक्तश्राव बहुत (होतो). पांच सा दिवस अन्नोदक (चालत) नाहीं. दैवीमानवी उपाय करीत आहो. श्री आरोग्य करील. बहुत काय लिहिणे. कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Raghunath Hari informs the Peshwa of Sekhoji Angria's illness and his consequent inability to visit the addressee.*

No. 86] [*August 1733*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

सेवक रघुनाथ हरि साष्टांग दंडवत विनंती उपरी. येथील कुशल स्वामीचे कृपेने असो विशेष. स्वामीनी कृपा करून पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन सविस्तर कलों आलें. राजपुरीच्या मार्गें येऊन भेट घेऊन जाले म्हणौन व

येविशी कुलाबाहून पत्र आले ते पाहावयास पाठविलें. येशास राजपुरीच्या मार्गे येऊन स्वामीचे दर्शन घेऊन पुढे स्वार होऊन जावें याहून दुसरें विशेष काय होतें? परंतु त्या मार्गे तरी फार याकरितां वरील मार्गे आलों. आजी सोमवारचा मुकाम माहापरलेस जाहाला आहे. उदैक येथून स्वार होऊन अष्टमीच्या वाटेने मजल दरमजल कुलाबा जातो. तेथे गेल्यावरी दक्षणेकडील कितेक वर्तमान राजश्री सरखेल यांस विदित करावयाचें आहे तें करून तेथून स्वामीच्या दर्शनास येतों. दर्शनांती साद्यंत वर्तमान स्वामीस विदित करून. बहुत काय लिहिणें कृपा वर्तमान केली पाहिजे हे विनंती.

¶*Raghunath Hari starts to visit the Peshwa as desired by him. This letter appears to be of an earlier date than the preceding one.*

No. 87] [*August 1733*

नकल असल बा।

श्री

इंग्रजास पत्र

सदासिवरायानी तुमचे स्नेहाची तारीफ लिहिली ते श्रवण होऊन संतोष जाहाला. या कालीं तुम्हासारिखे प्रमाणिक स्नेहास कायम कोणीच नाही हे खातरजमा आहेच. हबसियास सरंजाम पाऊ न देणे व कुमक न करणे हे गोष्ट सांप्रत तुम्ही केली येणेकरून विशेष संतोष जाहाला. उंदेरीची फते तुम्हास मुबारक असो. पुढहि ज्यांत आमचे काम सिधीस जाय ते तुम्ही करालच. याउपरी सदासिवरायास हुजूर पाठवणें. येणेप्रों पत्र सदासिवरायाचे पत्राचा जाब लिहून रवाना करणे.

¶*This is a draft letter for the English thanking them for all that they had done to help the Peshwa against the Sidi.*

No. 88] [*Recd. on 1-9-1733*

छ ३ रबिलाखर

श्री[1]

पुरवणी तीर्थरूप रा। राऊ स्वामी

वडिलाचे सेवेसी

विनंती. येथील वर्तमान तरी रा। संभाजी आंगरे याकडे पहिले बजाजी कदम यासीं याणी पाठविले आहे ते वर्तमान तो पूर्वीच सेवेसी लेहून पाठविले

१ मंगलदायक, शुभ.

5263

होते त्यावरून कळलेच असेल. प्रस्तुत त्याकडून येसाजी नाईक भडारी कानाडकर म्हणून भला मणूस पनास लोकानसी येथे आले. अंगारकानी आपले मुदे कितेक मारानिलेबराबर सांगोन पाठविले की, दोही स्थलातील येक स्थल द्यावे व येक हती द्यावा, पंधरा हजार रुपये द्यावे व राजापूर दाभोल या दोही माहालची सरदेशमुखी वतनी करून द्यावी. यैसे मतलब सांगोन पाठविले, त्यावरून याणी हती व रुपये द्यावे, सरदेशमुखी दोही माहालची तुरुत आपल्या सनदा करून देतो. पुढे दरबारास गेल्यानंतर तेथीलहि वतनी सनदा करून देऊ. दोही स्थलातील येक स्थलहि द्यावयासी मान्य केले. परंतु त्याकडील मध्यस्त अला होता त्याची निशा होईना. यास्तव रा स्वामीकडे स्थलाविसी व सरदेशमुखीविसी पत्रे पाठविली आहेत. तेथील उतर आणून त्याची निशा करावी अणि येसाजी नाइकास रवाना करून सकारपूर्बकास अणावे हा विचार पूर्ण जाला आहे. येविसी विस्तारे सेवेसी कलावे यास्तव लिा असे. वरकड येथेहि राऊत लोक वरचेवर जमा होतात. रा उदाजी चव्हाणहि कऱ्हाडास अले आहेत, येतील. परंतु सिधांत गोष्ट की उदंड फौजाहि जऱ्ही जमा जाल्या, तथापि स्थल हस्तगत व्हावयाचा विचार दिसत नाही. कदाचित अंगारकाचे आगमन जाले तरी न कले. अद्यापवर शामलाचीच सलाबत आम्हावर आहे. आमची जफ्ती काही त्यावर पोहोचली नाही. कलले पादिजे. याउपरी स्वामीनी जामखेडाविसी तपसिले लिहिले. यैसियासी रा आनंदराऊ दिवाण सुपियासी गेले, यास्तव दोन दिवस ते गोष्ट राहिली. पुढे सारे येकत्र जाल्यावर स्वामीचे आज्ञेप्रमाणेच होईल. स्वामीकडे माहाल गुंतला तो येकायेकी निघतो यैसे नाही. रा बाबूजी नाइकाच्या कर्जाविसी श्रीमंत रा आपास लेहून रा आनंदराऊ दिवाण याकडे पत्रे व माणसे पाठवावी. कलले पाहिजे. रा प्रतिनिधीकडील विचाराविसी जासुदाबराबर सिवाजी माहादेव याजबराबर पत्रे पाठविली ती पावली. स्वामीचे आज्ञेप्रा येथीलहि विचार बोलून पाहिला. परंतु याच्या चितात पूर्वील विकल्प फार आहेत, मुखेहि बहुत स्मरले. साराउंष गोष्ट स्वामीनी जंजिरा जेर केला दुर्घट स्थल उपाये नसता जेर जाले; आणि हे स्थल म्हणजे सुगमित जोरावारीने घ्यावयासी उपाये चालेल यैसे असोनहि हस्तगत नव्हे, अगर त्यावर सलाबतहि न पडे, तेव्हा वेर्थ जीवित्व यास्तव जीवित्वाची अश्या सोडून हे कार्य कारावे हा येक विषमभाव चितीं व गुजराथ स्वामीनी आपणास दिल्ही हेहि वर्तमान येथे यैकोन बहुत श्रमी आहेत. हे कार्य जाल्यानंतर गुजराथेविसी राजश्रीपासी अतिशय करावा हा विचार आहे. तदनुरूप हुजूरपत्रेहि लेख केला आहे. सर्व सिध्दांत याच्या चितात दुर्बुध्दि फार आहे. येविसी तपसील कोठपरीयेंत ल्याहावा; स्वामीचे हस्त गालीब आहेत, कोणाच्याने काये

होणें. परंतु सूचनार्थ लिा असे. शामलाची सलाबत यावर पडली हे वर्तमान यैकोन दरबारीहि अनादरच आहे. हुजूरची पत्रे काही समाधानपूर्वक येत नाहीत. येथील वर्तमानानरूप सेवेसी लिा आहे. मुख्य स्थलचे वर्तमान तो स्वामीपासी असलेच. आम्ही काये लिा. रा गंगाधरपंतविसी लिा तरी काही ह्या विचारायोग्य नाहीत. हे विज्ञापना.

¶*The writer (either Nanasaheb or Purandare) reports to Bajirao news from the court of Shahu and his displeasure with Bajirao for not being able to finish the Konkan campaign with success.*

No. 89] [*2-9-1733 ?*

छ ८ जा लौवल

श्री

श्रीमंत राजश्री पंत

प्रधान साहेबाचे शेवेसी

विनंति सेवक आणाजी नाइक साटम कृतानेक विज्ञापना विनंती येथील क्षेम ता छ ४ माहे जमादिलौवल जाणून साहेबाचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशष. साहेबी पत्र पाठविले पावोन बहुत समाधान जाहाले. तेथे आज्ञा जे, जमावनिसी दर्शनास येणे अगर सडे तरी येऊन भेटी घेणे म्हणून आज्ञा. त्यास आम्ही घरीहून स्वार जाहालो ते साहेबाचे पायापासी यावे या उद्देशे घरीहून जमावानिसी आलो. त्यास चिपुलणावरून मार्ग. त्यास येऊन गोटासंनिध राहिलो. तेथे हबसियाची स्वारी आली. ते समई त्यांचे व आमचे युध जाहालें. ते प्रसंगी साहेबाचे कृपेकरून ईस्वरे येश दिल्हे. त्याकडील वीस पंचवीस माणूस ठार पडिले, व काही जखमी जाहाले. ते समई आमचे बंधु चिरंजीव माणकोजी साटम यास जखमा लागल्या. हे वर्तमान श्रीमंत रा पंतप्रतिनिधि यास विदित जाहाले तेव्हा रा पंत आपण येऊन आमचे समाधान करून लस्करात घेऊन आले. त्यास चिरंजीव माणकोजी साटम यास देवाज्ञा जाहाली. * रे फार श्रम केला. त्यानंतर रा पंतापासी आज्ञा मागोन साहेबाचे पायापासी यावे यैसा हेत होता, त्यास ते आज्ञा नेदीत. त्यास आपला सर्व प्रकारे हेत साहेबाचे पायापासी आहे. यैसियासी हरइलाज करून येक वेळ साहेबाचे पायापासी यावयाचा हेत आहे. यास अंतर होणार नाही. सेवेसी श्रुत होये हे+ विनंती

¶*Anaji Naik Satam regrets he has not been able to join the Peshwa being delayed on the route by the Pratinidhi who desired the writer to take up service under him. He refers to an engagement in which his brother was killed and which brought the writer to the Pratinidhi's notice.*

+ ? विनंती एवढीं अक्षरें बाळबोधींत.

No. 90] [*3-9-1733*

श्री

तीर्थरूप राजश्री आपा

स्वामीजीचे शेवेसीं

अपत्यें अंताजी नारायण साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ ५ रबिलाखरपावेतो स्वामीचे कृपे अवलोकनेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. काजी अबदूल रहिमान इसमलखान दाऊदखान याचे लेक याचा मावळो[१] हे विजयदुर्गाहून पुणेयास आले आणि आपला कितेक मनसुबा महमद हुसेन याजबराबर स्वामीकडे सांगोन पाठविला. त्यास स्वामींनी यास वीस रुपये खर्चास देऊन कागद पारसी लेहून देऊन आज्ञा केली कीं, तुम्ही पुणेयात आठ पंधरा दिवस राहाणे. आपण पुणयास आलेयाउपरी तुमची सरंजामी केली जाईल म्हणून आज्ञा जाली. त्यास इसमालखान सावंताचे रेडीस जाऊन बैसले आहेत. त्याचे पत्र यास आले कीं, सें पनास माणूस सारंग पांचा गुराबाचे कुल उठोन आपणाजवल आले आहेत. त्यास त्याची पोटापाण्याची बेगम आपण आठा पंधरा दिवसाची केले आहे. तुम्ही तिकडे जाऊन काये बोलीचाली केली त्याचे वर्तमान काहीच लिहिले नाही तर लिहिणे. म्हणून यास पत्र आले. तेव्हा त्याजकडील काजी अबदूल रहिमान यास सदाराम हे आपणाकडे घेऊन येऊन आम्हाजवलून हा (का)गद लेईविला आहे व त्यास घेऊन सदाराम आपले सेवेसी आले आहेत. याचे वृत जे असेल ते मनास आणून याचा सरंजाम केला पाहिजे. मुख्य गोष्ट हे आरमारी लोक आपले पदरी असिल्याने उतम आहे. उतम कार्य होईल. हें आपले पदरी पडिल्याउपरी आणखी किते(क) लोक दर्यावरदी आपले पदरी येऊन परी (?) पडतील. गुराबाचा सरंजाम चांगला होईल. आपले वरातेखेरीज यास खर्चास रुपये १० दाहा दिले व सदाराम यास रोजमरा दिला असे. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Antaji Narayan Fadnis requests Chimaji Appa to entertain in service Kazi Abdul Rahman and his sailors who would be of much use in times of a naval fight.*

---

१ मेहुणा.

No. 91] [*3-9-1733*

छ ११ रबिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसीं

पोष्य जिवाजी खंडेराव दंडवत प्रमाण विनंति. येथील कुशल तागायत छ ५ रबिलाकरपर्यंत येथास्थित असे. स्वामीनीं पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कलों आलें. राजश्री सेखोजी आंगरे याचे वर्तमान श्रवण होऊन श्रम जाले ते ईश्वर जाणें. ईश्वर इच्छेस येत्न काये * * * * * अर्थ राजश्री तात्यानी लिहिला आहे त्याजवरून विदित होईल. स्वामी तेथें आहेत. आवघा बंदोबस्त कर्तव्य तैसा केला पाहिजे. आम्हांस येथें आज्ञा होईल त्या प्रमाणें वर्तणूक करून. विदित जालें पाहिजे. बहुत काय लिहिणें ? कृपा असों दिली पाहिजे हे विनंती.

¶ *Jivaji Khanderao expresses his regret at the sad demise of Sekhoji Angria.*

No. 92] [*4-9-1733*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक हरजी नाईक कदम नाा किले बाणकोट कृतानेक विज्ञापना विनंती. सुाा आर्बा सलासीन मयां व अलफ. विनंती ताा छ ६ माहे रबिलाखर-पर्यंत किलाचे वृत येथास्थित आहे विशेष. श्रीमंत राजश्री सरखेल साहेबासी कैलासवास जाहाला. येणेकरून आम्हा सेवक लोकांसी दुखाचें पर्वत जाहाले ते श्री जाणे. याउपरी सर्व पदार्थे आपण समर्थ आहेत. तेथे विस्तारे ल्याहावेसे नाही. यानंतर आपण पत्र पाठविले तेथे आज्ञा केली की, खाडी आलाकड उपसर्ग न लावणे म्हणऊन पत्री आज्ञा सादर जाहाली. यैशासी * * * * किला निसबत कोणे गावी काये उपद्रव लागलो हे आपण मनासी आणवावे आणि मग सेवक लोकासी बोल लावावा. वरकड दालदी लोकासी हा कालपर्यंत महसूल अगर पैका कोण्हेक बाब राजपूरकरांचे अमलात लागला नाही. हे गंगाधर विस्वनाथ यासी ठावकेच आहे. आणि आपणाकडील कमाविसदार याही रोखे करून पैकियाची निकड केली. यैशासी कुरई व दालदी लोक जंजिरा श्रीमंत मातुश्री बाईसाहेबाचे भेटीस गेले की सुदामत बेठबेगार व अरमारी चाकरी

ज्याप्रमाणे पेसजी करीत होते त्याजप्रमाणे चाकर करार करून पागोटी देऊन किलासी जंजिराहून रवाना केले. त्याजप्रमाणें किलासी चाकरी करीत असतां त्याचे घरी आजी तगादा लागलासा जाहाला. तेव्हा वरातदारासी सांगोन पाठविले जे दालदी लोक चाकर यासी तगादा न लावणे. वरकड गौरा जिराइती वसूल मना केला नसतां आपणासी मनमाने तैसे लिहितात तेच आपणासी खरे वाटते. आम्ही तो दुसरेसे लक्षीत नाही. किलाहि आपला व मुलुकहि आपला यैसेच असता लट(की)च (घा)लमेल मध्ये करावी आणि आपल्या चितांत विकल्प घालावा यैसे करितात. किलाची उस्तवारी करणे आपणासच अगत्य आहे. जागा नाजूक खाडीचे नस्तावरी आहे. याची मजबुदी व बेगमी सर्व पदार्थं असावी हेहि आपणासी संकट आहे. वरकड खाडीकिनारा सावकार व दालदी लोक आहेत ते पूर्वापार वेठ विरला किलासी करीत असतात. त्याजप्रमाणे चालविल्याविना उस्तवारी होणार नाहीं, आणि कैदहि राहणार नाही. वरकड येथील जबानींने बाजी गोळे परस्पर सांगतां विदित होईल. सेवक लोकापासून येकंदर अंतर पाडणार नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haraji Naik expresses regret to the Peshwa on the death of Sekhoji Angria and dwells on his monetary difficulties.*

No. 93] [*4-9-1733*

श्री

राजश्री पंत प्रधान गोसावी
यासी

श्रीमंत सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो पिलाजी जाधवराव कृतानेक दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. येथील वर्तमान तरी आज सष्टीसह सप्तमी मंगलवारी प्रातकाली राजश्री संभाजी आंगरे दाखल जाहाले. आपण आज्ञा केली होती की, त्यास बरोबर घेऊन येणे, त्यास येथील लोकाचे व रामराजे[१] येथील मोर्च्याचे लोक याची समाधाने करावयास च्यार रोज लागतील. राजश्री रघुनाथजी व राजश्री बाजी साटम याचे समाधान करवावे लागते; याजकरिता आपण येथे राहिलो आहो. त्यास लौकर पाठवणे. ते आले म्हणजे त्या

---

१ चेऊलजवळच्या एका कोटाचें नांव.

उभयेताचे सामाधान करून, राजश्री रघुनाथजीस घेऊन मोच्योस येऊ. माघाऊन राजश्री संभाजी आंगरेहि, लोकाची गौरसी करून राजश्री मानाजी आंगरे किल्यात ठेऊन, अपल्या दर्शनास आरमारसमेत येतील. आलियावर पुढील मनसबा करणे तो केला जाईल; तरी मारनिलेस लौकर पाठवणे, म्हणजे आपण याची आपल्यादेखत समाधानेकरून चाकरीस बरोबर आणू. वरकड विचार काही दुसरा आहे यैसा नाही. आम्ही * * विचार करून द्रढतर करून, आपला शब्द लागेल हा अर्थ सहसा होणार नाही. विशष काये लिहिणे, हे विनती.

¶*Pilaji Jadhav to the Peshwa, informing him why he was unable to bring Sambhaji Angria to his presence immediately.*

No. 94] [*7-9-1733*

छ ११ राखर

श्री

राजश्री पंतप्रधान
गोसावी यांसी

ऽ सकलगुणालंकर्ण अंखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित अंनदराव सोमवंशी, सरलस्कर, दंडवत विनंती. उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें पावोन समाधान जाहालें. छ २९ रबिलावलीं आपणांकडे पत्रें पाठविलीं आहेत त्यांवरून साकल्यवृत्त विदित होईल. यानंतर परस्तुद (प्रस्तुद) वडिलीं लिहिलं कीं, दोन तीनशें स्वार व तीनशें प्यादें आणून कामकाज उत्तम प्रकारें बाजूनें बाजू करावें. राजश्री पंत प्रतिनिधीवर प्रसंग पडला आहे तर हे गोष्टीस आम्ही कांही चुकलों आहो कीं काय? आम्ही आपली पागा आणिली व वरकड लोक मिळोन लाहान मोठे दोन तीनशें स्वार प्यादें दोन तीनशें ये * * * स्वामीसेवा आपले आज्ञेप्र(माणें) * * * * * * * * च प्रमाणें करितों. वडिलांचा * * * * आमचें शिरिं आहे. युद्धप्रसंग * * * * * * * कदम पुढें होऊं. यासी कधीं चुकणार नाहीं. कर्जवाम जाहालें तर कर्ज कांहीं राहात नाहीं म्हणून लिहिलें तर कर्ज थोडें बहुत असल्यास भरावें बरें. हेत कीं, संकटें सोसून स्वामीसेवा जीव जानानसी करीत आहों. परंतु पुढें (ऊ)र्जिताचा प्रसंग सरदारीचा * * * * * होन कर्जवारें सर्व प्रकारें उ(र्जित होये) हे गोष्ट वडिला * * * *

* * * लागती येविशीं आम्ही कांही चिंता वाहातों यैसें नाहीं. न्यूनपूर्ण आपण सांभाळावें. दुसरें लोकांत लौकिक राहे हे गोष्टीची चिंता वडिलीं करावी. आम्ही त्याहावें यैसें नाहीं. कळलें पाहिजे. रवाना छ ९ रबिलाखर. बहुत काय लिहिणें कृपालोभ असो देणें हें विनति.

¶*Anandrao Somavanshi assures the Peshwa of his full loyalty and humbly promises him to execute his orders.*

No. 95] [*7-9-1733?*

श्रीमंगलमूर्ति

श्रीमंत राजश्री पंत आपा स्वा-
मीचे सेवेसी

विनीत सेवक कृष्णाजी राम सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील कुशल ताा छ ९ रबिलाखर मुा पेण स्वामीचे कृपेकरून यथास्थित आसे विशेष. येथील वर्तमान सरखेलीकडील नारायणदास गुजर सुवर्णदुर्गाहून सल्याविसी कुलाब्यास येऊन राहिला आहे. तो मुंबैस जावयास डचकतो. आधीं कोण्हास पाठवा. मग उतर आल्यासारिखा जाईन म्हणतो. कोण्ही माणूस रवाना करायास योजीत होते तों शामलाने गाव मारून नेले. तपे शिरगावचे सागरगडा-खालील तीन मोजे रांवेत येथील पाटील धरून, कान नाक त्याचे कापून, कागद त्यांजवल लिहून येक कुलाब्यास रवाना त्याबाा केला व येक कुलकर्ण्यास लिाा त्यामधी लिहिलें, तपे माारचा निमे वसूल आपणाकडे जमा करून ठेवणे. सला उंदेरकरांचा कुलाबकराचा जाहालियावर तुला जाब करावा लागेल, म्हणून लिाा व कुलाबकरांस लिहिलें कीं, हबशाचे तुमचे सख्यत्व होईल तेव्हा सुखरूप होऊ, सुदामत चालला हे त्याप्रमाणे आमचा निमे वसूल दिला म्हणजे तुमचा आमचा सला; नाही तर यैसेच गाव खराब होतील. म्हणून लिहिले आहे. १४ बंदे[१] धरून नेलीं. दोघी बायका ठार मारल्या. दोघा पुरुषाच्या पायाच्या टाचा तोडल्या आहेत. वर्तमान हे एथें वर्तले. वांसी तप्याचा गांव मौजे वडंव मारले ४ दिवस जाहाले. वरसवलीनजीक कुलाबा येथील च्यार कोलीं धरून नेले म्हणून आज खबर आली. शनवारी कुलाब्याहून कागद ये वाटेने मुंबैस उरणचे मार्गी रवाना केले. त्याचा जाब आल्यावर सविस्तर कलेल. आऊरवलितातील (?) मचवा येक तुपाच्या घागरी भरून कुलाब्यास जात होता, तो हबशाचे स्वारीस सांपडला. उंदेरीस नेला होता. त्याविसी कर्नाल्याहून लिहिले गेल्यानंतर इंगरेजानी मचवा

---

१ बंदिवानें. २ पत्र.

आणऊन निरोप दिला. कुलाब्यास गेला हेंहि वर्तमान आजच आलें. सविस्तर वर्तमान मुंबैहून जाबकरी आल्यानंतरं ठीक कलेल. येथें दंगा जाहालियावर सरखेलीचे लोकास पंधरवडा द्यावयाचा हुकूम जाहाला. लोक घेत नव्हते. मग राजमाचीकरांचे पदरी घालून रवाना किलां केले, दुसरेहि घेतील, परंतु बेदील लोक आहेत. रा संभाजी आंगरे यांचा सातां रोजी येणार म्हणतात. सेवेसी श्रुत होये. हरणे, चितलें पाठविलीं तर नवा व जुना ग्रामाधिपति यांस पाठवावीं आगर थोक कोण्हाचेहि नामनिर्देश न करितां आम्हास आज्ञा जाहाली म्हणजे प्रसंगोपात विचारे दिली जातील. सेवेसी श्रुत होये. येथें गलबते बंद जाहालीं आहेत. याकरितां उरणचे मार्गी जावें. यैसा हेतु आहे. परंतु आवाठ्याचे खाडीमधीं खंडो गणेश हवालदार आहे. त्याणे मुंबैची गलबतें दोन बंद करून ठेविलीं आहेत. त्यांची खबर घेऊन सोडवायाचा उपाय योजितों. साधला तर बरें जाहालें. नव्हे तर हर कोणे वाटेने जातच आहों. सेवेसी श्रुत होये. शिकारखान्याविषई विज्ञापना केली तिचे स्मरण आसले पाहिजे. हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram sends Peshwa news from Bombay on the subject of the relations of the Angria of Kolaba with the English.*

No. 96] *[8-9-1733*

छ १० रालाखर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री

आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री पंतसाचिव याणी आपले जिल्हेतील किलांचे व मावलचे लोक दोन तीनसें या मसलतीस जमा केले आहेत ते घेऊन आकिवाटास आरंभापासून समाप्तपर्यंत भांडियाचे रक्षणास नेहमीच पलीकडे राहिले होते. ते छ २६ रौविली उतरून अलीकडे आले, दरबारास येऊन राजश्री स्वामीस मजुरा केला, ते समई स्वामी त्यास बोलले, बरे नेहमी राहून येश घेऊन आले (?) उतम काम केले म्हणून भाषण केले. सेवेसी विदित जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*The mobilisation of the forces by the Sachiv who took them to Akiwat is reported to Chimaji Appa. His interview with the King is also mentioned by the writer.*

No. 97] [*11-9-1733*

छ २४ राखर

श्री

श्रीमंत रा राऊ स्वामीचे सेवेसी

पोष्ये अंबाजी त्रिंबक कृा सा ना वि़ा उपरी येथील कुा ता छ १३ रबिलाखर जाणून स्वकीये कुशललेखन करावया आज्ञा केली पाहिजे वि़ा. अजम शेख याकूब सुभेदार याचेविसी तपसिले रा फतेसिंग बावा यानी पत्र पा आहे त्यावरून सविस्तर कळो येईल. तरी रा बावानी लिा आहे त्या प्रो स्वामी (नी) चालविले पा. लोकास पैकियाचा तगादा लाविला आहे तो स्वामीनी मना केला पा. लोकांचेहि स्वामीस आगत्य केले पाहिजे कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Ambaji Trimbak to the Peshwa, interceding for Shaik Yakub Subhedar for whom Fatesing has already written to the addressee.*

No. 98] [*15-9-1733*

पो छ १७ रबिलाखर

श्री

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी-
आलंकृत राजमान्य राजश्री
बाजीराव पंडित प्रधान यांसी

प्रीतिपूर्वक लक्ष्मीबाई कृतानेक विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केलें पाहिजे विशेष. खानज्याद्याजवल जमाव होत आहे. रोजबरोज दोन च्यार नवे चाकर ठेवितो म्हणून वर्तमान कलों आलें. यैशास हे खबर तुम्हांस आहे कीं नाहीं? निशेंडाचा विश्वास धरून मनसबा करूं म्हणाल तरी परिणाम कलतच आहे. येखादेसमई आतीला जावयाचा हात येक होऊन दुतर्फा दुर्बुधीस प्रवर्तले तर मुष्कील करितील कीं न करीत याचा विचार आपणांस न कलेसा नाहीं. याकारितां सुचला अर्थ लिहिला आहे. जे गोष्टीने खानजाद्याजवल गारानें होय तो विचार करावा. पेशजी खानजाद्यास व सेखजीस सातारा रवाना करावा यैसा इत्यर्थ योजिला असतां सेखजीस रवाना केलें आणि खानजाद्यास ठेऊन घेऊन यावरून अपूर्व दिसोन आलें कीं खानजादा राजपुरीस राहिल्यानें मनसबा कोणता होणे आहे? अथवा गेल्यानें कमी काय होणे आहे? सारांश पूर्वविरोधियाचा विश्वास धरिल्यानें काकोलूकी न्याय होईल. कळलें पाहिजे. जाणिजे रवाना छ १५ माहे रबिलाखर. बहुत काय लिहिणें लोभ

असों दीजे हे विनंति. खानजादा ते जागां राहिला त्यामुळें हरयेक निमित्यें-करून राबिता जंजिरिया होऊन तमाम मोर्चेयाची खबर बखर जाते. हैव पालथ गेल्यावरी गनिम सेर होतो याचाहि विचार करावा हे विनंति.

¶*Lakshmibai Angria informs Bajirao of the movements and activities of the Siddi Khanjada, and requests action being taken against news being carried into Janjira from the Maratha Camp.*-

---

No. 99] [*20-9-1733*

श्रीभार्गव

शेवेस विज्ञापना. बालाजी माहादेव नमस्कार. बुधवारीं प्रहर दिवसा राजकोटचे तरीजवली आलों. तर आली नवती. मग होडीवर दोन प्रहरां उतरलों. राजकोटास घोडा न आला. मग तसेंच रात्रीं नागांव येथें राहिलो. प्रात:कालीं ब्रहस्पतवारीं भेट जाली. मुख्य सांगितले कीं तुमची रायाची भेट व्हावी याकरितां पाठविलें. त्यास त्याणी हासत उत्तर दिले कीं रायाचे व सेखोजी आंगरे याचा बनाव होता, आपला बनाव कसा बसतो? आपले लेकुरपण त्याणी चालवावे लागेल. आम्ही समाधान करून सांगितलें. रघुनाथजी कां आले नाहीं म्हणून पुसलें. आम्ही उत्तर दिले कीं तेथें येकटे राऊं, पिलाजी जाधवराऊ येथें, आम्हीहि आलों. जवळी सभ्य माणूस पाहिजे. लोक विनासरदार कसे राहतात? त्यावर प्रत्योतर दिले नाहीं. पुढें सर्व शोधून लिहून पाठवितों. बरकड फिरंगी यानें ३०० सोरदाद तारवावर घालून पाठविले. दुभासी(सोलदांज?) फिरंगिया-बराबर तेथें आला होता तो मार्गी भेटला त्याणी ठीक वर्तमान सांगितले. सर्व हरामजादे आहेत. हबशाकडील लोक चौकीपाहारा दुरूस करीत नाहीं. मुरडावरून नांदगांवीं आलों. रात्रीं तासरात्रीं निघालों. मेटावरून आलों. तो नांदगावचे बंदरावर १२ माणूस होते. त्यास खबर नकले. मग २ मार दिला. २ जणाच्या पिचोडे बांधले. पाठवीत होतों. मग काकूलतीस फार आले. राजश्रीकडून वस्त्रें संभाजीबावांस आली. जामदार आवजी पा(ब?)ला आलां. दुखवटियाची वस्त्रें आलीं. कळले पाहिजे. पुढे नवल विशेष होईल तें लिहितों हे विनंति. माहादजी प्रभूस येथें आणविलें असे हे विज्ञप्ति.

¶*Balaji Mahadev gives news of his visit to Sambhaji Angria at Kolaba.*

---

१ बातमी वगैरे माहिती.

5273

No. 100] [21-9-1733

श्रीभार्गव

विनंति शेवक बालाजी माहादेव नमस्कार. विनंति उपरी. तूर्त राजश्री संभाजी आंगरे यांचे येणे होत नाहीं. राजश्री जाधवराऊ आजी दशमी शुक्रवारीं पक्ष करून उदईक शनवारीं आर(मा)रा घेऊन निघतील. तेथें आलियाउपर भेटीनंतर सर्व सांगोन गलबतें तैथील उपरालियास पाठवावी उचित. त्यास तरतूद करितात. मुख्य आतां ठाणें जाणे तें ईश्वर सता प्रमाण मानावी. सेखोजी सारखा सेखोजी होऊन गेला आंता स्वछंदता असे. आम्हीं येणार त्यास घोडा पाहिजे त्यास बापूजीपंतास सांगोन शनवारीं संध्याकालीं अगर आदितवारीं दोन प्रहरां तरीवर पाठवावा. २ दिवसाचा दाणा देऊन पाठवणें. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना. राजश्री रघुनाथजीविसी आण शफत क्रिया जाधवरायानी घेतली असे. त्याणी बोलाऊ पाठविलें रिकीबदार गेला इतकियांत आले म्हणजे गोडी करितील. मुख्य अर्थ शेवा घेतील. डांभिक पूर्ववत चालणे तो पुढें श्नेहें श्नेह वाढलियाउपर चालेल. काडी इतका कारभार, आस्ता घेऊन करावा मर्जी पाहून वर्तावें यैसे आहे. वरकड सामादिक सर्व रघुनाथजीस अनुकूल आहेत. विसाजीपंतहि त्याखेरीज व पाडुरगजी नाहीं. पुढील भवितव्य म्हणावे तर जन्माचा झाडा कोण देतो? परंतु बरेच आहे. पत्र वाचून फाडून टाकणें हे विनंति. लक्षुमबाईचे मतें कोणेक पक्ष न करितां भेटावे, पक्ष धरिलियास छंदी आहे, मग गोष्टी विलयास जाईल. यात आपण सर्वज्ञ आहेत. हे विनंति.

¶Balaji Mahadev sends news to the Peshwa from Sambhaji Angria, reporting his attitude.

No. 101] [21-9-1733

छ २९ रबिलाखर

श्री

राजश्री पंतप्रधान

गोसावी यासी

ॐ श्रीमंत संकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री पिलाजी जाधवराव कृतानेक दंडवत विनंती उपरी. येथील कुषल जाणून स्वकीये कुषल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. काल गुरुवारी पत्र

आले की, पत्रदर्शनी येणे, त्याजवरून राजश्री संभाजी आंगरियास वस्त्रे देऊन आज प्रातकाली सुक्रवारी निरोप घेऊन आलिबागेत आलो. येथे आज पित्रे घालून प्रातकाली सनवारी स्वार होऊन यावे, तो आपली पत्रे जिलिबदाराबरोबर आली की, येक दिवस लागला तरी लाऊन, राजश्री रघुनाथजीची व बाजी साटम याची व राजश्री सभाजीबावाची भेट करून येणे. त्यावरून आपण उद्याचे दिवस राहातो. परवा रविवारी आम्ही व राजश्री सभाजी आगरे यैसे येतो. उदईक राजश्री रघुनाथजी आले तरी उतम. न आले तरी, तेथे आलियावर त्याची भेट आपल्याच विद्यमाने होईल. वाटेस आले तरी, आम्ही आज्ञेप्रमाणे भेट करवितो. विशाष काये लिहिणे. हे विनती.

¶*According to instructions, Pilaji Jadhav is leaving Alibag to meet the Peshwa. He is taking with him Sambhaji Angria and also Raghunath Hari.*

No. 102] [*21-9-1733*

श्रीमंगलमूर्ति

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनीत सेवक कृष्णाजी राम सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील वर्तमान ताा भाद्रपद वदि दशमी मुा जंजिरे मुंबै स्वामीचे कृपेकरून यथास्थित आसे विशेष. स्वामीनी रा रायाजी शंकर यास आज्ञा करून पाठविले. त्यासमागमे स्वामीचे आज्ञापत्र सादर जाहाले कीं, हे सांगतील त्याप्रा वर्तणूक करणे. याशिवाई तिलतुल्य न वर्तणे. त्यास आम्ही यास पुसिलेयावर आम्हास काही आन्वय सांगितला नाही. रा आंबाईदासचे मार्फतीने आजम जनरालची भेट घेतली मग काय बोलीचाली जाहाली तेहि कलली नाही. आमचे शरिरी सावकास नव्हते, परंतु याणी सांगितल्यावर स्वामिकार्यास आंतर न होतें. मग काये स्वामीनी आज्ञा केली असेल ते सत्य. हे सेवेसी निवेदन करितील तेव्हा सर्व कलेल. आरसे पेटीत घालून आंत रू घातला आहे. हे चौकसीने जतनेने नेतो बोलिले याकरितां यासमागमे पाठविले आसत. सेवेस सादर होतील. विशेषाधिका लिहावा तर स्वामी सर्वजाण आसत. कृपा वर्धमान करून सेवा निरोपिली पाहिजे आम्हींच यासमागमें येत होतो, परंतु हे बोलिले की आम्हीच येतो. फिरोन न आले तर तुम्हास बोलाऊ पाठवितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram sends to the Peshwa some mirrors well packed in case stuffed with cotton.*

No. 103] [22-9-1733

श्री

श्रीमंत राजश्री पंतधान
स्वामीचे सेवेसी

विनीत सेवक कृष्णाजी राम सां नमस्कार विज्ञापना येसीजे. येथील वर्तमान स्वामीचे कृपेकरून ता भाद्रपद वदी येकादसी शनवार मुा मुंबै यथास्थित असे. विशेष :—अजम जनराल यानी आम्हाजवल येक पत्र दिले तें व सेवकाची पत्रें यैसी वदी त्रितीया शनवारी चेउलास गलबत गेले त्या बाा सेवेसी बाा गोदजी जासूद व सुभानजी सादर जाहालीं तीं कृपादृष्टीने पाहातां सर्वार्थ कललाच आसेल. दुसरे दिवसी रविवारी राा रायाजी शंकर याचे पत्र येक जनराल मारनिलेस लिा आले व येक आम्हास कीं, तुम्ही ज्या कार्यास गेले आहा, त्याचा जाबसाल कोठवर कागदी लिहावा, याकरितां आम्हासच कितेक गोष्टी जबानी सांगोन तुम्ही आहा तेथें पाठविलें आहे. मग तुमचे आमचे विचारें खावंदाचे आज्ञेप्राा कार्यभाग करून यावे, याकरितां आम्ही पेणेस आलों आहों. तर तुम्ही अजम जनराल यास विदित करून आमची वोडदी (?) लौकर पाठविली पाहिजे, आम्ही आविलंबे येऊन. त्यास आमचे पांच सात दिवस शरीरीं आरोग्य नव्हतें, यैशास हीं पत्रें आलीं तीं परस्परें जनराल मारनिलेकडे गेलीं. त्यांहीं आपलें पत्र पाहिले व आमचे पत्र आम्हाकडे पाठविलें आणि सांगोन पाठविले कीं, वीस तीस मनुष्यें समागमें घेऊन रायाजी प्रभु आला हे म्हणून पत्रीं लेख नाही. परंतु खबर कलों आली यैशास आम्हास तो ठाऊक आहे. राजश्री शिवरामपंता-समागमे आला होता. तुम्हास आगत्य असेल तर येकाद सेवक समागमे घेऊन येईल तर सुखरूप येऊ. जाजती लोकांचें प्रयोजन नाहीं. त्यास येथे सिपाई आले होते त्यास चौकसीने विचारून पुन्हा सांगोन पाठविले कीं पूर्वी आले होते ते हे नव्हेत. याकरितां येथे लोकानसी येतील. तुमची मुलाकत जाहालियावर मग जो विचार करणे तो केला जाईल. परंतु आतां न आले व लोक तेथे राहिले आणि हेच आले तरी खावंद आम्हास बोल लावितील. यैशास जनरालने फिरून सांगोन पाठविले कीं, कोण्ही तरी आसोत, तुम्ही लिहून पाठवा की जाजती लोक नाणणें तैसे आम्ही लिहीले. हे लोक समागमे घेऊन आले, तेण्हेकरून जनराल मारनिलेस काय चितांत आले ते न कले. सांगोन पाठविले कीं, हे लोक आतांच रवाना करा. त्यास निरोप आम्ही रायाजीबावादेखत सांगोन पाठविला कीं, हे व आम्ही तुमचे दर्शनास येतो मग जो विचार सांगाल तो केला

5276

जाईल व कागद मागायास पाठविले तेहि भेटीस येतेसमई आणू, म्हणून बोलिल्या-नंतर रायाजीबावास आम्ही येकांती बोलाविले काय आज्ञा पुसिली. त्यास ते-समई कांहीच सांगितले नाहीं. स्वामीचे आज्ञापत्र तितुके दिलें. तदनंतर अंबाईदासचे मार्फतीनें दर्शन घेतले येकांत होतसे. त्यास आम्ही समजलों कीं, स्वामीआज्ञा असेल याकरितां हे सांगत नसतील. त्यास तिसरे दिवसीं आम्हास परस्परे कलले कीं रायाजीबावा म्हणतात की, आम्ही जनरालची भेट घेतली, त्यास आम्हास जनरालने लोकाविसीं हटकिले नाहीं. हे सर्व कृष्णाजी राम याणी केले व दिवाणचे सिपाई चौकी बसली हेहि याणीच केली. त्यास उत्तर परस्परे सर्वांहीं सांगितलें हे रा। शिवरामपंत आले होते तेव्हाहि यैसेच आले होते. यासीं तुम्ही नित्य बोलोन चालोन आसिलेस म्हणजे कांहीं फिकीर नाही व कृष्णाजी राम यापासून यैसे कर्म होणारच नाही. हे परिछिन वर्तमान आम्हास कलल्यावर आम्ही जाऊन रायाजीबावास पुसिले कीं, तुम्ही तों सुज्ञ व येथे आम्हास प्राप्त काये होत होते तें तुम्ही काडलेंत? हरयेक प्रकारे खावंदाची आज्ञा करावी त्यास आम्हापासीं तों गोड बोलिले, परंतु काही सांगितलेहि नाही. देखील जाबसाल सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News-letter from Krishnaji Ram to the Peshwa referring to the oral messages brought from the latter by Rayaji Shankar.*

No. 104] [*23-9-1733 ?*

पैवस्ती छ २९ रबिलाखर

श्री

पुरवणी राजश्री पंतप्रधान

गोसावी यांसी

विनंती उपरी. आपण सोमवारी प्रातकाली राजकोटाच्या तरीवर उतरा-वयासी येतो. तरी तेथून घोडी आमची व राजश्री बालाजी माहादेव यास घोडी व जाजती दोन च्यार घोडी, यैसी सत्वर सोमवारी प्रातकाली येत ते केले पाहिजे. कृपा लोभ आसो दीजे. हे विनती.

¶*Pilaji Jadhav asks the Peshwa to keep horses ready at Rajkot where he hopes to arrive on Monday.*

5277

No. 105] [24-9-1733

नकल

श्री

सेवेसी विज्ञापना. तागायत छ २९ रबिलाखर पावेतो महाराजाचे कृपावलोकने-करून सेवकाचे व सेनेचे वृत्त कुशल असे विशेष. छ २४ रबिलाखरी हबसियाचे व चव्हाणाकडील फौजेचे युध्यें जाहाले. हबशी मोडिला. दहा बारा माणूस ठार पडले. पंचवीस जखमी करून खंदकपावेतो मारीत नेला. कर्णा पाडाव केला व तीस हत्यारे घेतली. महारा (जा) चे पुण्य (प्रतापे) फत्ते जाली. याउपरी प्रजन्य बहुत आहे. तो उघडलियावरी याचा निशा करितो. कलले पाहिजे. परंतु बहुत खर्चाची वोढी आहे. या समयांत महाराज जर दया करितील तरी उत्तम आहे. नाहीं तरी सेवकानें तो देहास संकल्प घातला आहे. जे होईल ते करीतच अहो. वरकड वृत्त उदईक सोमवारी राजश्री येमाजीपंत येऊन विनंती करितील. विदित होईल. अनकूल पडले तरी चव्हाणास समाधानपत्रे व वस्त्रे पाठविली पाहिजेत. हुजरे हबसियाकडे पावते केले आहे. माघारे आलियावर सेवेसी पाठवितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

सदरहू पत्र खासा प्रतिनिधीनी आपले स्वदस्तुरे लिहिले होते.

¶*The Pratinidhi writes about a sharp encounter between Chavan and the Sidi.*

No. 106] [Recd. on 26-9-1733

छ २८ रबिलाखर

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान

दाजी गोसावी यांसी

ℰ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित संभाजी आंगरे रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल-लेखन केले पाहिजे विशेष. आपले भेटीस येणार होतो. त्यास दसरा समीप आला याजकरिता आठ दिवस राहिलो. विजयादशमी जालियावरी दर्शनास येतो. राजश्री पिलाजी जाधवराव आपल्या कागदावरून स्वार होऊन गेले. त्याची भेटी जालियावरी सविस्तार सांगितलेच असेल. तीर्थरूप रा॥ सेखोजीबावानी कैलासवास केला, याउपरी आम्हास सर्वाविसी आपण वडील आहेत. उभयेता भाऊ तिसरा मी भाऊ या प्रा॥ आपण चितात आणून सर्वाविसी आमचा सांभाल

करावा. येकादा प्रसंग आम्हापासून गेला तरी वडीलपणे सांभाळून बुधिमंद आज्ञा केली पा. बहुत ल्याहावे तरी आपण वडील आहेत हे विनंती. [संभाजीचा शिका व मोर्तब आहे.]

¶*Sambhaji Angria assures Bajirao of his full support and requests him to look upon him (the writer) as his brother. He promises to visit the Peshwa after Dasara.*

No. 107] [*29-9-1733*
छ २ जमादिलावल

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान
दाजी गोसावी यांस

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री संभाजी आंगरे रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. इंग्रजांस तंबी पोंहचवावी यास प्रतिकूल उपाय योजिल्याविना होत नाही. याकरितां सालगुदस्ता आरब आला होता त्यास हा संदर्भ सांगोन त्याचे आरमार आणऊन त्याचा आपला येक हात करून टोपीकरास नतीजा द्यावा, यैसें करून त्याची रवानगी केली; त्यापैकीं येक तरांडे ये जागा राहिले. त्यास आणखीं तरांडी देऊन त्याणें जाऊन आपले आरमार घेऊन यावें, त्यास तरांडी शामलाची खांदेरीस बोटी आहेत त्या आपल्या प्रयोजनाच्या आहेत यैसें नाहीं. अथवा जाळून लोखंड केलें तरी होईल. याकरितां त्या बोटीपैकीं येक दुसरी बोटी आरबास द्यावी आणि जलदीनं रवाना करावी म्हणजे आरब जाऊन बोलीप्रमाणें तरतुद करून अरमार घेऊन येईल. सारांश आरबांचे अरमार आलें म्हणजे इंग्रजास ठेचगा देऊन आणि हाली जो मनसबा शामलाचा प्राप्त जाहाला आहे यासहि हे गोष्टी उपयोगाची असे. तरी आपले चित्तास येईल तरी त्या बोटीपैकीं आरबास बोट द्यावी आणि रवानगी करावी. या पत्राचें उत्तर आलें म्हणजे त्यासारिखें बोटीच्या तयारीस आरबास तेथें पाठऊन देऊन. कललें पाहिजे बहुत काय लिहिणें. रवाना छ १ माहे जमादिलावल हे विनंति.

¶*Sambhaji Angria proposes to the Peshwa to secure help from an Arab in order to put an end to the activities of the English who are helping the Sidi.*

5279

No. 108] [September 1733

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसी

ॐ श्रीसकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री पिलाजी जाधवराव कृतानेक दंडवत विनंती उपरी. येथील कुषल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. गोसावियानी पत्रे पाठविली पावोन वर्तमान सविस्तर कळो आले. तेथे लिहिले की पत्रदर्शनी येणे. त्यास आपण आज्ञेवरून यावे तो आद्यापि राजश्री संभाजी आंग्रे आले नाही. मातुश्री मात्र येथे आहे. त्याजवर येथील मनसबे सोपोन यावे तो येथील विचार ठाऊक आहे. मातुश्री सिका परवानगी मात्र चालवितात. यामुळे येता न ये. आपण सोमवारपर्येत त्याचा मार्ग पाहातो. सोमवारा अलीकडे आलियावर त्यास आणावयाचेसे जाहाले तरी आणू. त्याचे मस्ते (ते?) त्यास दोन रोज च्यार रोज लागतसे असिले तरी आपण तरी मार-निलेची भेट होताच च्यार गोस्टी सांगावयाच्या त्या सांगोन स्वार होऊन येतो. शामलांनी फार सोकी केली म्हणून लिहिले. आण लाहान थोर गलबते बारा आहेत त्याची तरतूद करावी लागेल्ये. त्यास राजश्री संभाजी आगरे येतील त्याज-बरोबर दाहा पंधरा गलबते येतील आणि येथीलहि गलबते तयार केली आहेत. मारनिले आलियावर त्याहि गोस्टीची तरतूद केली जाईल. तेथून सामानाची गलबते पाठविली ती माहागिरियादेखील खुशाल पोहचली व शामल बाहिर निघेल यामुळे येथून काल सुक्रवारी दोप्रहरा सात गलबते सामान सुद पाठविली आहेत. या लोकांच्या मते खामखा घाट घालावी यैसा विचार करून गलबतें गेली आहेत. राजश्री सरखेलांकडील लोक बेदील जाहाले म्हणऊन लिहिले तरी त्या लोकास मातुश्रीनी समाधान करून पत्रे पाठविली आहेत तो राजश्री संभाजी आगरे येतील. आलियावर त्याच्या रोजमरियाची बेगमी यकमाही करऊ. त्यास दिवसगत लागले तरी मातुश्रीस सांगोन त्यांचा रोजमरा येकमाही पाठऊन देऊं. राजश्री फतेसिंग बावाच्या लोकास खर्चास पाठवीत नाहीं म्हणऊन लिहिले, तरी त्याणी काहीं मागती या मसलतीची पोटार्गे[1] धरिलीसी नाही. ते गेले तेव्हाच या मसलतीची आशा सोडिली. आण आता हा मनसबा आपणावर चौकडून आपणावर पडिला. याचा उपाये काही आमच्याने होतो यैसा नाही. ईस्वरदयेने जो होणे तो होईल. येऊन मनसुभा पडिला म्हणऊन काही आब सोडावसा नाही. * आपण तेथे आणि आम्ही येथे राहावे हा अर्थ काही आम्हास समाधान वाटत यैसा विचार नाही. परंतु विलग विचार येऊन पडला आहे. या उपरी जे घडीस येथे येतील ते समई

---

१ आस्था.

निरोप घेऊन येतो. ईस्वरदयेकरवी सर्व बरेच होईल. विशेष काये लिहिणे लोभ असो दीजे. राजेश्री संभाजी आगरे सुवर्णदुर्गास आले आहे. पाऊसाचे बावडल लागले होते याकरिता दोन दिवस लागले. याउपरी येका दो दिवसा येता तर बरे; नाही तरी आपण खामखा सोमवारपावेतो मार्ग पाहातो. जरी ते सोमवारपरियेंत नाहीत तरी आपण दशमीकारणे येतो येविशई काही अंतर नाही. व उंदेरीस चौबुर्जी होती तेथील येक बुरूज पाऊसाने पडला. मग तेथील बेहबुदी करणे ते करून लोकाचे भरती देऊन तोहि दूरची मजबुदी केली. वरकड केवल मातुश्री येथे टाकूण यावे तरी हेहि गोस्टी उतम नाही. जरी काही राजश्री रघुनाथजी येथे असते तरी बरें होते. आपण तेथे असता आम्ही येथे राहावे हेहि आम्हास उतम नाही. परंतु प्रसग विलग पडला आहे. विदित जाले पाहिजे. गनिमाच्या नस्तावरी सात गलबते रवाना केली आहेत व लोकांच्या खर्चास नाहीं, यैसा विचार आहे. त्यास मनसबा तो विलग पडला आहे. परंतु आपली व आमची भेटी जालियावरी तोहि विचार करणे तो करून. हे विनंती.

¶*Pilaji Jadhav informs the Peshwa that he cannot leave the place in the absence of Sambhaji Angria for whom he will wait for some days and will proceed as soon as the latter arrives at Alibag. He further communicates to him the arrangements made by him to meet the enemy.*

No. 109] [*September 1733*

श्री

राजश्री बालाजीपंत गोसावी

यासी

आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री (पि) लाजी जाधवराव रामराम विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठावल पावोन वर्तमान विदित जाहाले. राजश्री संभाजी आंगरे आज मंगलवारी किल्यास दाखल जाहाले, तरी तुम्ही * * * त्रे व राजश्री रघुनाथजी व राजश्री बाजी साटम यासी घेऊन लौकर येणे. तुम्ही (ये) तोंवर आमचा खोलंबा जाहाला आहे, तरी मारानिले उभयेता घेऊन लौकर येणे. त्यास परिछिन सागणे कीं तुम्ही आपल्या मनांत (कि)मपि संधेह न आणावे, यैसा सागोन (पत्र)दर्शनी अविलंबे आले पाहिजे. आमचा त्यामुळे खोलंबा जाहाला आहे. कळले पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Pilaji Jadhav informs Balaji Mahadeo of the arrival of Sambhaji Angria at Kolaba and insists on the addressee's speedy arrival with Raghunath Hari and Baji Satam.*

No. 110] [September 1733?

श्रीभार्गव

शेवक बालाजी माहादेव नमस्कार विनंती. आम्ही आज्ञेप्रा। सध्याकाली प्रहर दिवसा तरीवर आलो. मानाजी आंगरे पुढे उतरले. आम्ही तरी फिरोन येऊन उतरो तो संध्याकाल जाला. चेउलचे कोटांत उभयता रात्री होतो. शुक्रवारी मातुश्रीचे व जाधवरायाची भेट घेतली, सर्व सांगितले. येथे कोणे गोष्टीच्या वसवसा मानावासा नाहीं. सर्व लोक मायेत आहेत. मुख्य तुम्ही खबरदार असावे इतकेच आहे. सोमवारी प्रहर दिवसा येऊन पोहोचतो. घोडे आदितवारीं तरीपलिकडे येतो तेथे पाठवावे. विदित जाले पाहिजे, संभाजी आंगरे तेथे आले तर च्यार गोष्टी बुधवाद सांगणे तो सांगावा हे विनंती. पेणकरास निरोप आम्ही येऊ तों न देणे. काही साधेल तर पाहू हे विनंती.

¶*Balaji Mahadev reports to the Peshwa of his arrival at Alibag and his visit to Lakshmi Bai and Pilaji Jadhav. He suggests to the Peshwa that should Sambhaji happen to visit him en route Kolaba, the Peshwa should not miss the opportunity to win him over by conciliatory assurances.*

No. 111] [September 1733?

श्रीमंगलमूर्ति

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक कृष्णाजीराम सा। नमस्कार विनंती, विनवावयास कारण आपण छ २१ रबिलाखरी आज्ञापत्र रवाना केले. ते छ २ जमादिलौवल शनवारी सादर जाहाले. सिरी वदून वाचितां ध्यानात आलें. त्यास पुन्हा अजम जनरालचे दर्शन जाहालियावर सहज गोष्टी बोलतां पुसिलें कीं रा। रायाजी शंकर आले होते त्याचें तुमचे दर्श(न) जाहालियावर लवकरच निरोप द्यावयास कारण काय? त्याणी पत्रें दोन स्वामीची व येक खानजाद्याचें आलें होतें. त्याचें उतर रा। रायाजी शंकर बोलतील स्वमुखे व पत्री लिहून पाठवितील त्यास आणि जबानीस उदंड फेर, म्हणून मा।रनिले सर्व जबानी सांगतील त्यावरून सर्व कलो येईल म्हणून बोलिले. त्यास आम्ही बोलिलों की राजश्री पंतप्रधान याचें पत्र येते तें आम्ही समजावितों. मोहिबास याखेरीज तुमचें आमचें खुशालीचे संभाषण होतें, परंतु आमच्या खावंदाच्या पत्राचा अर्थ जो समजावितो, तो खरा न कले वेलेनसार न केले, वेलेनसार अधिकउणें उतर येत असतें, परंतु मोहिबी त्यांवरच करार धरून राहिलेस आणि आम्हास खावंदाचा शब्द लागे येसी गोष्ट न व्हावी. कदाचित बोलतां अंतर पडेल तर राजश्री पंतप्रधान

याच्या मनोदयानुसार मोहिंबास येश प्राप्त होये आणि आ(म्हा)वर खुशवख्त होत येसी गोष्ट सुचवावी योग्य आहे. अवश्य बोलोन उत्तर दिले कीं तुमच्या सांगितल्यावरून आपण कपितान मकनिलास तारवात चढतेसमई आज्ञा केली होती, कीं जंजिऱ्यामधी जाल तदनंतर रा। प्रधान पंडितास आधी सांगोन पाठऊन ते गौरसीने तुम्हास नेतील तर तेथील संभाषण युक्तीने जाहीर कर. त्यास जंजिरकरानी त्यास सांगितलें कीं येक मातबर माणूस तारवांत येथें जेविल्यावाचून जावें योग्य नसे याकरितां तो गेला नाहीं. दर्शनास म्हणून आपणास कलों आलें ते आपणास समाधा(न) वाटलें नाहीं. बरे सिदी सादास आणायास गेले आहेत. आलियावर पाहातच आहों. त्यास आपले आज्ञापत्र पुन्हा जनराल मारनिलेस वाचून दाखविले. त्यास ते बोलिले कीं मंगलवारी पुरसत आपणास जाहाली तर तुम्हास बोलाऊ पाठवितों. मग सविस्तर हे फिरंगीने (?) लिहून पाहू आणि सिदी साद व जंजिऱ्यांतील भला माणूस यावत्काल येथें आला नाही तावत्काल ठीक उत्तर काय द्यावें, इतुकें बोलिले व पुसत होते कीं राजश्री प्रधानपंडिताचे सोइरे कार्यकर्ते अगर त्यांचे जातीचे मातबर माणूस कोण संनिध तूर्त आहेत की नाहीं? इतुके बोलतां इंगरेज ग्रहस्त आल्यावरती बोली राहिली. आम्हासहि निरोप दिला. सेवेसी श्रुत होये. चंबा (?) जंजिऱ्यातून व दोन गलबते उंदेरीस आलीं तेथून येक बंदरी येऊन सुरतेस गेली. दिवस च्यार होतील. संचणी करून आरमार आणावयास गेला हे सेवेसी श्रुत होये. स्वामीनी आज्ञापत्री नशयत केली हे उत्तम जाहालें. स्वामीचे पत्रावरच मदार असे. आमची बोली मनजूर पडणार नाही व त्यास स्मरणहि बहुत करून होणार नाही ऐसे भासते. सारांश उभयेता येस्थला आलियावर बोली होईल ती लिहून पाठविली तर तुम्ही राहा, येविसी तुमच्या खावंदास आपण लि। म्हणून राविले इतुका अर्थ.. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News-letter from Krishnaji Ram to the Peshwa, reporting his interview with the Governor on the subject of the special messages which Rayaji Shankar was confided with by the Peshwa.*

No. 112] [*16-10-1735 ?*

पो छ १० जमादिलाखर.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा

राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. माहाडाहून कालीं पत्र आलें कीं सिदी साद राजपुरीहून खासा व पनास साठ गलबतें घेऊन बाणकोटच्या बाऱ्यावरी आले आहे. तेथें तोफांचे

आवाज जाले. बाणकोटासी जुंझ होतें किंवा उगेंच आवाज जाले हें कळत नाहीं, म्हणून माहाडच्या ठाणेदारानें लिहिलें आहे. स्वामीकडे कांहीं वर्तमान आलें असेल तरी लेहावें. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना. गोवलकोटचें वर्तमान तर बावाजी म्हसके व संताजी जाधव व दुर्गोजी भोइटे याचे कागद येतात कीं फौज पाठवावीं, म्हणजे काम लौकर करितों. त्यावरून राजश्रींनीं पवार व सोमवंसी यासी निकडीनें ताकीद करितात. स्वामीस कळावें याकरितां लिहिलें असें. हें विज्ञापना.

¶Letter from Purandare: informs the Peshwa of the arrival of a large fleet under the command of Sidi Sat at Bankot. Reinforcements being requisitioned from Govalkot, Shahu proposes to despatch Pawar and Somawanshi.

No.113] [*4-11-1733*

श्री

श्रीमंत राजश्री पंत नानास्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक जनार्दन बल्लाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम ताा छ ७ जमादिलाखर पावतो स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी दया करून आज्ञापत्र पाठविले ते उतमसमई पावोन परम समाधान जाले. तेथे आज्ञा कीं नवल विशेष वर्तमान लिहिणे म्हणून ऐसियास राजश्री आनंदराऊ पंडित सुमंत आज स्वार होऊन राजपुरीस गेले. बराबरी नवाबाकडीस भला माणूस नेला आहे, ते लौकरीच जाऊन पोहाचतील. मग तहरहचा विचार जो होणे तो लौकरच होईल. कळले पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

विनंती सेवक विसाजी दादाजी कृतानेक साा नमस्कार विनंती. राजश्री बावानी लिहिले आहे त्यावरून विदित होईल हे विज्ञाप्ति.

¶Janardan Ballal Fadnis writes to Nanasaheb, son of the Peshwa, that Anandrao Sumant accompanied by a representative of the Nizam has gone over to Rajpuri to open negotiations with the Sidi.

No. 114] [24-9-1733 ?

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान
गोसांवी यांसी

℘ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री फतेसिंग भोसले दंडवत विनंति उपरी. येथील कुशल आणून स्वकीये लेखन केले पाहिजे. - कितेक अर्थ तुम्ही राजश्री आबाजीपंतास लिहिला त्यावरून त्याणी सांगितला. त्यावरून कळों अला. यैसियास आमच्या निरोपास आवकाश इतकाच राहिला आहे की, राजश्री आनंदराव पंडित सुमंत आले म्हणिजे निरोप घेतो. वरकड गुता कांही नाहीं. प्रस्तुत राजश्री खंडो गोमाजी मजमदार व राजश्री चिमणाजी माणकेश्वर या उभयतास रवाना केलें आहे. याजबाा पथके दिल्ही आहेत. हे लौकरीच तिकडे येतील. राजश्री तात्याचे पत्रीं श्लेष लिहिला की, पोट भरावयास कोठे गुंतावें यैसें नाहीं. तरी गुंतावयाचा मनसुबाच नाहीं. जैसे आपल्या विचारें होईल त्याप्राा विचार करावा. आपल्या विचाराखेरीज तिलतुल्य विचार आणिक नाहीं. येविशींचा कितेक अर्थ तात्यानी लिहिला आहे त्यावरून कलेल, हे विनती रा छ २६ रबिलाखर बहुत काये लिहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Fatesing Bhonsle informs the Peshwa that he is required to wait till the arrival of Anandrao Sumant and further assures him of his full co-operation.*

No. 115] [5-10-1733

तालिक

श्री

सकलतीर्थरूप राजश्री बाबा साहेब व
तथा राजश्री देवराऊ बाबा वडिलाचे
सेवेसी, चिरंजीव राजश्री नागोबा यासी

बालके आपाने व अंतोबाने व जगन्नाथ शामजी व राघो अनंत कृतानेक सिरसाा नमस्कार आाा आसीर्वाद विनंति उपरी. येथील कुशल आस्विन सुध आष्टमी शुक्रवारी मौ चिपलून वडिलाचे आसीर्वादें समस्त लोक व आम्ही सुखरूप असो. यानंतर येथील वर्तमान काल गुरुवारी राजश्री राऊसाहेब व राजश्री येमाजीपंत आणा व हिमतबाहादर व सरदार सर्व मिलून मसलत केली कीं उदईक गोलकोटावरी हला करून किला घ्यावा. हा इत्यर्थ करून लोकाची

वाटणी केला. येणप्रमाण राजश्री माहादाजी घाटगे व सयाजीपंत व रायार्च पागा ही टोली हिराबाराऊ दलवी याचे बागेवरून शुरू करावे व राजश्री राऊसाहेब व सरलस्कर वगैरे कासीबंदरावर लढाई करावी व हुजरात व राजश्री गंगाधरराऊ व राजश्री दादा याणी मोपामध्ये लढाई बोढून सीदी बाहीर काढावा. त्यावरी राजश्री येमाजीपंत व हिंमतबाहादुर बारासे पयिदल व फौजेनसी कालिकेसराचा डोंगर गोलकोटचे पश्चिमेस उतरून किला हस्तगत करावा. याप्रमाणे ताकीत करून हिमतबाहादुर व आणा त्या रोखे गेले. मग शुक्रवारी प्रात:काली प्रहररात्री राजश्री येसाजी गायेकवाड व धनाजी थोरात व सिंदोजी बरगे व खासबारदार व परदेसी तयार करून खाडी उतरून डाव्या हाते खाडीचे काठे चालून गेलों. तो चरावर सिदी चौकी जबरदस्त होती. ते चौकीस जाऊन चौकी मारून काहाडिली. चर घेऊन चरा पुढे चालून गेलो. राजश्री येसाजी गायेकवाड खासा लोकाचे पाठीवर पायेउतारा होऊन चरावर आले. लकडकोटातून व सुभेकोटावरून भांडी व गुंडगल व चरकी व जेजाला याचा मार बेसुमार जाला व बंदुखाचे गोलियास तो गणति नाही. परंतु माहाराजाचे प्रतापेकडून कोणास क्षत न जाले. सूर्यउदयादारभ्य साहा घटका परियेत युध्य जाले. खासबारदार कदीम व जदीद व परदेसी याही बहुत मेहनत केली. राजश्री येसाजी गायेकवाड याणी रुबरु पाहिली. उजव्या हाते राजश्री दादाकडील लोक व बाबूराव कऱ्हाडकर याणी चरावर येऊन उभे राहिले, तो कासी बंदराकडून पाच गलबते भरून आली * * * मार केला, लोक खरडून काहाडिले, लोक बहुत जाया जाले: बितपसील

आनंदराऊ गोले सरदार ठार पडिला १

त्याजकडील सिपाई ठार आसामी १०

जखमी आसामी ६

बाबूराऊ कराडकर याकडील सिपाई ठार आसामी सात ७

जखमी आसामी ४

खंडोजी जाधव भोईजकर या कडील सिपाई ठार १

घोड्यास जखम १

येसाजी गायेकवाड याजकडील जखमी आसामी सिपाई २

घोडी जखमी २

बाबूरायाकडील घोडी ठार १

याप्रमाणे लोक जाया जाले. आम्हा लोकाची मदत कोणी केली नाही. राजश्री आणाजी व हिमतबाहादुरानी इत्यर्थ केला तो राहिला, ते येऊन पोहचले. केवल हुजरातीवर व दादाचे लोकावर येक तोंडे भाडण पडिले. चरा-

वर सूल रोवले होते ते गडदात आम्हाकडील लोकास रुतले. ते जखमेपेक्षा कारेगार आहेत. नावनिसी

दिपाजी व कन्हाजी	१	आलीखान व माणिकजी मानेखान	२
सिदी प्राणनाथ	१	राजाराम जयेसिग	१
गंगाराम थोडा रुतला आहे	१	रायाजीकडील घोडी	१

येणे प्रमाणे सुलाने माणसे जाया जाली आहेत. या मध्ये प्राणनाथाकडील सिदीस तीन टाई सूल रुतले आहेत. तो बहुत जाया जाला आहे. वरकड लोक समस्त कुशल आहेत. अंजनवेलीस राजश्री गंगाधरराऊ व राजश्री माहादाजी घाटगे फौजिनसी गेले होते ते चरापावतो जाऊन पाच सात माणसे सिदीकडील ठार केलीं व माहाराची घरे जालली. मग उलटून नदीवर येऊन राहिले. तेथील काम मजबूद पाहून स्वारी सिकारी करून गुरुवारी आले. शुक्रवारी लडाई जाली. या लडाईमध्ये खासबारदारानी व परदेशानी बहुत मेहनत केली. संक्षिप्रमाणे चहूकडून मदत होऊन हल्ला होती तर किला फते जाला असता. चहूकडून मदतीचा उठाव न जाला. या उपरातिक पुढे जो मनसुबा होईल तो सेवेसी लिहून पाठवितो. राजश्री येसाजी गायेकवाडानी महाराजास व तुम्हास पत्रे लिहिली आहेत. लोकाची तारीफ लिहिली आहे त्यावरून विदित होईल. राजश्री येमाजीपंत आणा व हिमत बाहादुर गेले आहेत ते गोलकोटचे पश्चमेस राहिले आहेत. सेवेसी विदित जाले पाहिजे. परदेशात कुंज * * * हजारी व प्रताप् हजारी व प्राणनाथ हजारी * * कंठ हजारी (गं)गाराम हजारी याणी बहुत शर्त केली. सिदी कडील दोन च्यार माणूस ठार पडिले व जखमी जाले. विदित जाले पाहिजे. ज्या चरासाठी लोकानी बहुत आड घातले, कडी तोडे व घोडे मागत होते तो चर हुजरातेने घेतला याची गौरसी करणार वडील आहेत. राजश्री मायाजी फडतरे व प्रतापजी जावरे व जनाजी नाइक व रायाजी हडदरे व हणगोजी व कावजी गलंडे याणी बहुत शर्त केली. स्वामीस विदित जाले पाहिजे. आम्ही आपले आसीर्वादे सुखरूप आसो. काही चिता न करणे. तुम्ही निबाजीस रुा ९ नऊ पाठविले होते ते आम्ही त्यास दिल्हे नाही. त्यास काही जखम नाही त्यासाठी आम्ही त्यास दिल्हे नाही. कलले पाहिजे हे विनति.

येसाजी गायकवाडाचा कागद मागून पाठवितो कलले पाहिजे.

¶*A graphic account of an assault on Gowalkot is given by the writer, including casualties. The details are very interesting.*

5287

37092

No. 116] [10-10-1733

श्रीराम

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री बाजीराव या प्रति प्रीतिपूर्वक नारोराम कृतानेक विनंती. येथील कुशल अश्विन सुध त्रयोदसी जाणून स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे, विशेष. बहुत दिवस तुम्हाकडून कागदपत्र येऊन कुशल वृत कळत नाहीं, याकरितां चित सापेक्ष आहे. राजश्री आनंदराव येणार आहेत ते आल्याउपरी जो विचार कर्तव्य तो करून तुम्हास लेहून म्हणून पूर्वी तुम्हास लिहिले होते. त्यास ते दसरियाचे दिवसीं आले. माहाराज राजश्री स्वामीची भेटी मात्र जाहाली. पुढें बोलीचा प्रसंग व्हावा त्यास त्यांची धाकटी मुली होती ते काली मृत्य पावली. त्यास चार दिवस अवरोध झाला. तो उरकिल्यावरी त्याकडील आशय कळो येईल. तुम्हाकडे शामलाचे कांही अनुसंधान बोली लागेल तरी मनास आणावी म्हणून पूर्वी लिहिले होते, त्याचे उतर काही कलले नाहीं. येथील बोलीचा आशय जी स्थले घेतली ती घेतली, बाकी राहिली ती असो द्यावी, असा आहे. अशास जागे घेतले ते तुम्हास विदितच आहेत. तेथील बेहबुदीचा विचार काय ? त्याकडील तहरह कोणे रितीने करावा ? हरएक प्रसंग कर्तव्य तो तुमच्या विचारे व्हावा हे अवश्यक. याकरितां वर्तमान तुम्हास लिहिले. तेथील आशय तुम्हास सापडेल. तरी मनास आणून राज्यभारास उपयुक्त साधकबाधक जो प्रसंग दृष्टीस पडोन येईल तो सविस्तर लेहून पाठविला पाहिजे. पुढें येथे जे होईल ते लेहून पाठऊन. कळले पाहिजे. बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Naro Ram Mantri informs Bajirao of the arrival of Sumant at Satara and says that terms of a treaty with the Sidi are being discussed.*

No. 117] [21-10-1733

छ २७ जमादिलावल

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान
दाजी गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री संभाजी आंगरे राम राम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला. गनिम खाडीमध्यें वगैरा जागां वलवल करितो. त्यास हाल-

खुद ठेवावा लागतो. त्यास पांच सा गलबतें पाठविलीं पाहिजेत म्हणोन लिहिलें. यैशास गलबतें तांदूल भरून विजयदुर्गास रवाना केलीं आहेत. तिकडून आल्यावरी पाठऊन देऊन. तेथें दोन गलबते आहेत त्यांचाच सज करून गनिमाच्या गलबतांस गांठीन म्हणावें तरी तेहि गोष्ट कार्याची नाहीं. निमित्य कीं तो येक दुसरें गलबत पुढें तलाव्यास पाठवितो आणि त्या गलबताकडे आपलीं जाऊं लागलीं म्हणजे मागें अवघीं गलबतें पाठऊन सोड घालील. समई येखादा दगाही येऊं शके याकरितां त्यास हालखुंद[१] ठेवणें तेव्हां पोख्ताच विचार असावा, त्याचीहि तरतूद करणे ते केली जाईल. सध्या येकटें दुकटे गलबत मान्यांत आलें तरी मानमार्ग पाहून आपली दोन्ही गलबतें पाठऊन साधतां साधेल तें करावें म्हणोन तुकोजी सावंत यास लिहिले आहे. वरकड आपण यादी दास्त पाठविली त्याचें उत्तर अलाहिदा पाठविलें आहे त्यावरून कलों येईल. जाणिजे रवाना छ २३ माहे जमादिलावल. बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*Sambhaji Angria writes to the Peshwa saying that he would soon send some ships as desired by the addressee. He also writes how treacherous the Sidi is in his tactics.*

No. 118] *[About October 1733?*

पा। छ १० सफर

श्री

पु॥ राजश्री चिमाजीपंत आपा
गोसावी यांसी

विनंति उपरी. राजश्री संभाजी आंगरे सरखेल भेटीचे उद्येशे जयेगडास आले आणि आम्हास भेटीस जाणे लागले, तेव्हा त्याजला द्यावयासी वस्त्रें नव्हती. पैठणकर आले आहेत म्हणून वर्तमान कललियानंतर तिकडे जयेगडास भेटीस गेलो तो. तेथे पैठणकर आले नाहीत. मग रा। विसाजीपंत याचे विद्यमाने सातसे येकावन रुपयाचे कापड घेऊन तेथील प्रसंग संपादून सदरहू रुाचे खत गोविंदजी सेट रया याचे नावे लेहून रा। विसाजीपंतानी घेतले. आपणास कलावे याजकरिता लि॥ असे. व नख्तहि दोनसे रुापर्यंत खर्चास त्याजकडील लोकास द्यावयासी खर्च जाहाले आहेत. कलले पा।. विशेष काये लि॥ कृपा केली पा। हे विनंति.

¶*Pilaji Jadhav communicates to Chimaji Appa his interview with Sambhaji Angria to whom he presented clothes.*

---

१ जागच्या जागीं.

5289

No. 119] [*1-11-1733?*

पा छ १७ जमादिलाखर

श्री

+पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. राजश्री स्वामीस राजश्री संभाजी आंगरे याचे पत्र आले तेथे लिहिले त्याची नकल करून सेवेसी पाठविली आहे त्यावरून विदित होईल. राजश्री बोलिले की त्याणी राजश्री पंतप्रधान यासी पाठवावे म्हणून लिहिले तरी राजश्री पंत प्रधान तो स्वार होऊन गेले. याउपर हे जाऊन त्याचे येणे कैसे होते ? यास्तव संभाजी आगरे यासी ल्याहावे की आधी गोवलकोटच्या मोर्च्याचा बंदोबस्ती करणे यैसे ल्याहावे. त्यावर मागती बोलिले की येक पत्र राजश्री पंतप्रधान यासी द्यावे की संभाजी अगरे यासी हुजूर आणणे. मग ते कोणी पाठवितील अगर जसे अनकूल पडेल तसे करून, सरखेल यासी आणितील. यैसे बोलिले. आद्याप जाबसाल लेहून दिल्हे नाहीत. विदित जाहाले पाहिजे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ambaji writes to Bajirao Peshwa and Chimaji Appa about what Shahu expressed on a receipt of a letter from Sambhaji Angria, in which the latter offered to visit Shahu at Satara.*

No. 120] [*2-11-1733*

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान
गोसावी यासी

॥ सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री फतेसिंग भोसले दंडवत विनंति उपरी. येथील कुशल जाणऊन स्वकीये लिहीत असिले पा विा. शामलाकडील लोक येसबाराव सुरवे हे हुजूर सनदापत्रानिमित्य आ होते त्यास यास गाव करार केले असेत त्याची यादी अलाहिदा राजश्री चिमणाज पंत आपा यानी तुम्हाकडे पाठविली आहे तेणेप्रा करार केली असे. सनदपत्रा मागाहून तयार होऊन येतील. प्रस्तुत नेमिले गाव असतील त्यास वसुलाचा तगा न होये ते गोष्टी केली पाहिजे. गाव नेमून दिल्हे आहेत त्यापैकी इनाम गा जातीस जे नेमिले असतील तेणेप्रा चालवावे. मुकासे गाव जे असतील

+ पत्र महादजी अंबाजीचें.

याचे वेतनाचे कबज होईल त्यात मजरा येतील. हे लोक कार्याचे आहेत यांचे चालवात्रयास आंतराये केला न पाहिजे. मारनिलेचे लोक तुम्हाकडे मसलतेस रवाना केले असेत याची सेते पेसजी गावगना यानी केली आहेत तेथील सनदा यास देऊन चालविले पाा. त्या प्रांती या लोकाचे कबिले आहेत ते कोण्ही मानगड आगर कुरडू आगर मावलात आणितील त्यास दस्तक देऊन रवाना केले पाा. जाणिजे छ ९ जमादिलाखर. बहुत काये लिहिणें लोभ असो दिल्हा पाहिजे. हे विनंति. फतेसिंगाची मुद्रा व मोर्तब.

¶*Fatesing Bhonsle asks Bajirao to assign some villages to Yesbarao Surve who has been won over from the service of the Sidi.*

No. 121] [*Recd. on 12-11-1733*

पैवस्ति छ १९ जमादिलाखर.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंति. शामल तीस पस्तीस गलबतें सामान व लोक भरून येऊन बाणकोटच्या बाऱ्यावर येऊन खाडींत सिरोन बाणकोटावर मार दिल्हा व किल्यावर येलगार बराच केला. परंतु स्वामीकडील लोकांनीं किमपि जुमस[1] खादला नाहीं. हें वर्तमान राजश्री स्वामींनीं ऐकोन बहुत संतुष्ट जाहाले. बोलिले कीं राजश्री प्रधानपंत यांणीं किल्ल्याच्या बंदोबस्तास लोक उत्तम ठेविले व बंदोबस्त व चाकरीची कैद व जो चाकरी करील त्यास बकसीस व न करी त्यास शासन यैसें सदैव सावधपणें करितात, यामुळें लोकांनीं बरी शर्त केली यैसें बोलिले. स्वामीस विदित व्हावें यास्तव लिहिलें असे. शामल बाणकोटीहून नामोहरम होऊन गेला तो सुवर्णदुर्गास गेला. तेथील पेठ जाळिली. तेथून अंजनवेलीस गेला. याउपरी गोवलकोटास येऊन मोर्चे चोपावे यैसें आहे म्हणून गोवळकोठीहून पत्रें येतात. अवघे मोर्चे उठोन कालुस्तियावर अंगरे व हे येकत्र अवळोन राहिले आहेत. राजश्रीस नित्य पत्रें येतात कीं राऊत पाठवावे. त्यावरून पवारास व सोमवंशी यासी ताकीद केली. त्याचेहि सें दिडसें राऊत उभयेताचे मिलोन जातात व हुजरातचेहि जातात यैसें आहे. स्वामीस कळावें याकरितां लिहिलें असे. सेवेसी श्रुत होये हें विनंति.

¶*Purandhare's letter from Shahu's court to Bajirao and Chimaji Appa informing that the attack led against Bankot by Sidi Sat failed who thereupon sailed away to Suvarnadurg and burnt the Bazar. Sidi Sat is reported to be planning an attack against the besiegers at Gowalkot.*

---

[1] भीति.

No. 122] [12-11-1733

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेशी

विज्ञापना तागायत छ १९ जमादिलाखर राजश्री मानाजी आंगरे याजकडील थलचा कोट उंदेरकार शामलानीं घेतला. कोटातील संदर्भ होता. त्यास उंदेरकर दहा पंधरा मुसलमान मेजवानीस म्हणोन कोटांत गेले आणि मारामार करून बलकाऊन बसले. इतक्यात उंदेरकराची भरती येऊन पावली. प्रस्तुत मानाजी आंगरे मोर्चेबंदी करून तोफाची मारगिरी आज चार दिवस करीत असेत. दुसरे वर्तमान भोरपेखालीं सिरक्याकडील दोनहजार माणूस बसले आहे. किल्ल्यावरील संदर्भ हवालदार व कांहीं लोकाचा होता त्यास सरनाईक व सरनोबत मोहतादी लोक एकत्र मत्त होऊन हवालदार वगैरे सिरक्याकडे तन देत होते त्यास हवालदार आदीकरून दस्त करून बेड्या घालून किल्यावरी ठेविले असेत. वर्तमान आजच आले त्यावरून लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News from Konkan is communicated to the Peshwa regarding the fort of Thal being captured by the Sidi of Underi.*

No. 123] [13-10-1733 ?

श्रीमंगलमूर्ति

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनीत सेवक कृष्णाजी राम सां नमस्कार विनंती येसी जे, येथील कुशल ता छ १९ जमादिलौवल मु॥ मुंबै स्वामीचे कृपेकरून येथास्थित आसे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाहालें तेथें आज्ञा कीं, पत्रार्थ आजम जनराल यास सांगून खोलंबोन(न ?) घेत तें करणे. तुम्ही तेथील वर्तमान मनास आणून हुजूर येणे. यैशास आज्ञेप्रमाणे जनराल मा॥रनिलेस सांगितलें. त्याचे उतर खोलंबा तर होवत नाही. परंतु परस्परें आंजनवेलीस रवाना होये तो इलाज करावयास सहसा अंतर करणार नाही. तूर्त आपलें आरमार रवाना करीत होतों ते सीदी मसूद राहावे तेरखेस सुरतेहून निघणार, येथे आलियावर आमचें त्याचें दर्शनानंतर संभाषण होईल तेव्हा भावगर्भ कलेल; त्यासारखें उत्तर देईन व तुम्हास हुजूर बोलाविलें, त्यास आपण येक वेल तुम्हाविसी पत्र लिहिले होतें त्याचें प्रत्योत्तर न

१ गरजू, अन्नास मोताद झालेले.

आलें. यास्तव आपण लिहीत नाहीं. तुम्हास बरे दिसेल तें करा. राहाल तर आमचेंहि आरमार रवाना होईल त्यामधीं रवाना करून, बोलिले. सेवेसी श्रुत होये. ओषधाविसीं मोदीस ताकीद केली आहे कीं, जी औषधें पाहिजेत ती तलास करून सवंग बरी पाहून विकत मिलतील तितुकी घेऊन देणे. इस्पडतालच्या डाकतरास हुकूम केला कीं, यादी प्रो जी औषधें मोदी मागेल आसतील तीं देणे, आनमान न करणे, म्हणून इंगरेजी वैद्य सरकारचा त्यासहि सांगितले आहे. स्वामीस लिहविले आहे की, औषधें कोणी सांगितलीं आहेत, परंतु अंबर दोन सेर सांगितलें, यावरून कौतुक[१] दिसलें व तेथें अंताजी रघुनाथ सरदेसाई व देशपांडे प्रांत फिरंगाण म्हणून फिरंगी पत्री लेखं आहे त्याचा शोध करितां आपणास कलों आलें कीं, तो गणेश नाईक वैद्य येथें आम्हापासीं होता, येथून गोमांतकास जाऊन किरीस्ताव जाहाला, बाटला तो फिरून तुमचे प्रांतीं नाव बदलून दुसरें नांव सांगतो. तो वैद्य असेल तर तुम्ही बहुतांचे पालणार आहा. सहसा त्याचें औषध न घेणे. येविसी आपण लिहितों व तुम्ही लिहा यैसे बोलिले. सेवेसी श्रुत होये. स्वामीचे आज्ञेप्रो काही औषधे गुा नारो पिलाजी (ने) घेतली ते याद आला-हिदा आहे. माारनिले सेवेस मुखवचनी व औषधाची याद सादर करितील व सेख सैफुदीन याचे प्रत्योतर व जबानी सर्व निवेदन करितील व कितेक इकडील आर्थ सांगितला आहे तोहि सेवेसी श्रुत होईल. कानजी कुंवरजी पारसी हे बोलतात, आपण पुष्टतेचें औषध तयार करून देतों ते हर कोणास देऊन आण-भ (व) येईल म्हणजे आपणास हुकूम करितील तर येईन. तूर्त आठरा दिवस. दिवाली पारशांची आहे याकरितां राहिला आहे. औषधाचा हुकूम येईल तर देईन म्हणतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News-letter from Bombay informing the Peshwa of the attitude of the English towards the Sidis and towards the Marathas and about the medicines to be had from a Christian doctor.*

No. 124] [*24-11-1733*
or
[*20-11-1736*

श्री

श्रीमंत राजश्री बावा स्वामीचे सेवेसी

सेवक आनाजी नाईक साटम राम राम विनंती येथील कुशल ताा कार्तिक वध चतुर्दशी मंदवार मुाा कुरलसी ताा मेढे दिवस प्रहर जाणोन कुशल लेखन करावया आज्ञा केली पाा विाा. कुलाबखान पाठविला तो आज शनवारी प्रहर

---

१ विचित्र.

दिवसास आला. त्याणे सांगितले जे गोवलकोटावरून जाता नये. वाजी (?) बहुत होईल. आशास कुलाबानी दब्याचे दबे पाहोन आला, या करिता गोवलकोट टाकून मोरगिरीवरून जावयाचे योजिले. त्यास दबे येणेप्रा नेमिले आहेत. बितपसील

मोरगिरीहून चांदेलगांव ३ येकून मजल १

चांदेलाहून देवरूख कसबा तीन कोस तेथून उमसी सेवठचा दबा येक गाव येकून दीडगाव जमीन आहे, त्यास रात्रीचा म्हणोन अडीच दोन गांव जमीन आहे.

याप्रा दबे नेमिले आणि कुलाबा व धोंडोपंतास शनवारी टाकोटाक रवाना केले. याणी मोरगिरीस फिरोन चवथे रोजी यावे यैसा नेम करून गेले आहेत. आपण काही चिंतात शंशये आणतील तरी सर्वर्थी नाणावा. बिलाकुसूर स्वामीचा मुहूर्त तो सिधीस नेतो यात संदेह नाही. गोदजी सेटगे पुणेस (?) गेलें म्हणोन आपण विपर्यास न मानावा. त्यास लौकर पाठऊन द्यावे. आम्ही विडा घेऊन आलों. आता सारे माघारा राहिले तरी खामनखाम ठिकानास जातो. निश्चये असो द्यावा. दुसरा विचार जे गोवलकोटावरून जावयास रात्रीचे दबे धरावे लागतात आणि इकडून दिवसास जावे. येकच रात्रीचा दबा होतो. पुढे होईल ते वरचेवरी सेवेसी लिहितों. लक्ष गोस्टीचे गोस्ट जे आपण मनामधे संशये नाणावा म्हणजे कार्यसिधि जाली यैसे आहे. सारांश वारंवार काये लिहावे? बिलाकुसूर मुहूर्तावरी लग्नसिधीस पावितो. संशये न धरावा कृपा केली पाहिजे हे विनंति.

बो धोंडो नारायेण विज्ञापना विनंति बालेगला आहे. बिलाकुसूर मुहूर्ताचे दिवसी कार्यसिध करितो. निसंदेह असावे. कृपा केली पाहिजे हे विज्ञापना

¶*Anaji Naik Satam fixes the several places of halts from Govalkot to Umasi. He further intimates the addressee his determination to win success in the undertaking.*

No. 125] *[24-11-1733?*

पो छ २७ जाखर

श्री

पुरवणी राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

विनंती. बहुत प्रकारे मानाजीचे काम जाले नसिले तरी बरे. जरी जाले आसिले तरी उतम जाले नाही. तो जातीचा कोण आहे हे स्वामीस ठावके आहे.

तरी आता जाल्या कर्मास इलाज नाही. तरी आपला जीव तरी बहुता प्रकारे जतन होये तो पदार्थ केला पाहिजे. त्याचा विस्वास येकंदर धरिला न पाहिजे. फार त्याहावे यात उतम नाही. थोडक्यात फार स्वामीने समजले पाहिजे. घोडे आधी येथे आम्हापासी मिगेनसी पाठविली पाहिजे. ते देखील भाले वस्तभाव पाठविली पाहिजेत. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Balaji Mahadeo complains about the hostile attitude of Manaji Angria towards the Peshwa and warns him to be on his guard.*

No. 126] [26-11-1733

छ ६ रजब

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना तागायत छ २९ जमादिलाकर. थळच्या कोटाचे वर्तमान तरी आरबखान जमातदार रेवदंडियास होता तो पेसजीच रुसकत होऊन उंदेरीस जाऊन चाकर राहिला व हलीं यारखान वगैरे अरब मुंबईहून उंदेरकरानी नेऊन ठेविले. त्यास सारे अरब येकत्र होऊन जोरबजोर मोर्च्यावर चालोन घेऊन राजश्री मानाजी आंगरे यांस मोर्च्यातून धुडाऊन लाऊन येक कोसपर्यंत पिंटोन काढिलें. तेथें मानाजी आंगरे याची व यारखानाची येकांगी जाली. यारखानानें दोन पिस्तोलें चालविलीं. ते चुकलियावर हत्यार धरिलें. इतक्यांत मानाजी आंगरे यानी पट्याचे हाताखालीं यारखानास मारून टाकिला. मोर्च्यांतील तोफा वगैरे सामान उंदेरकरानी कोटांत नेलें. उपरांत मानाजी आंगरे याणी जोर धरून जाऊन पुन्हा मोर्च्याची जागा मात्र काईम केली. परंतु शामल जुमस खात नाहीं. मोर्च्यांतील सामान नेलें ते नेलेंच. खांदेरीस ही संदर्भ केला होता. पांचसातें माणूस गेलें होतें. परंतु सुचें जालें यास्तव लोक माघारे आले. सारांष शामलाची सलाबत अंगारकावर बसलीसी जाली आहे. मागाहून वर्तमान येईल ते सेवेसीं लेहून पाठवितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना

¶*The Peshwa is informed of a skirmish between Manaji Angria and the Arabs in which Yarkhan, the leader of the Arabs, was slain by Manaji.*

---

१ सूचना.

No. 127] [30-11-1733

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसी

ॐ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेो पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती उपरी येथील कुशल ताा छ ३ रजबपावेतो ग्रेथास्थित असे विशेष. गोसावियाणी पत्र पाठविले पावोन वर्तमान कळो आलें. सिदी साद व सिदी मसूद सुरतवाले सतर असी जाहाज जमाव करून जंजरियासी अले. गनीम भारी अहे म्हणून लिहिले. तरी वडिलांच्या पुणेकरून श्री येष देतच अहे. परंतु अपण जो मनसबा करणे तो विचाराचे वाटेन देशकालपरत्वे केला पाहिजे. हरकोणाच्या बोले दुराभिमान करावा यैसे नाहीं. अम्ही मार्गसीर्ष शुध पंचमीच्या मुहूर्ते कूच करून भीमातीरी राहिलो. रा गोविंद हरि व राणोजी भोसले वगैरे पथके सिध होऊन अम्हापाशीं अले. रा तुबाजीपंत याची रवानगी राजश्री चिमाजीपंत अपानी केली आहे, तेहि अजी अगर उदैक येतील. ते आलियाउपरी मजल दरमजल जाऊन. विशेष काये लिहिणे कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनती.

¶*Pilaji Jadhav to the Peshwa advising him to proceed very cautiously in the undertaking as the Sidi was mobilising a good number of forces. He also says that he has already encamped on the Bhima and has been joined by Govind Hari and Ranoji Bhonsle and that he intends to proceed as soon as Tubaji Anant comes and joins him.*

No. 128] [November 1733?

श्री

आशीर्वाद उपरी. तळे घोसाळे बिरवाडी हे तीन किल्ले शामलाचे तोंडात आहेत. याची मजबुदी बरीसी करावी लागते. वरकडही किलियाची बेहबु(दी) केली पाहिजे. अडीच तीन हजार माणूस पाहिजे तेव्हा हे रान राखतें. याची बेगमी जाली पाहिजे. किलियावर एक सिपीभर गला चढला नाही. रयेत तमाम पळाली. गला चढवितो कोण? किलियाची तो बेहबुदी केलीच पाहिजे. थोडी बहुत बेगमी करणे ते करून लोक जथून देऊन आम्ही येतो. लोभ असो दीजे हे आशिरवाद.

¶*This is Bajirao's letter to Chimaji describing the unprepared condition of the forts of Tala, Ghosala and Birwadi.*

+ बाजीरावाचें अक्षर.

No. 129] [2-12-1733

श्री

पुा राजश्री बाजीराव पंडित
प्रधान गोसावी यासी

विनंती उपरी. शामलानें इंग्रजाच्या असरियाने फारसी शोकी करून बाणेकोटा-वर अला. तेथे फजीत होऊन गाव मारून अंजनवेलीस गेला. तेथून गोवल-कोटावर येणार. ते दहशेतीने वेढा निघोन दो कोसावर आले. त्याजवरून राजश्री स्वामीनी रा‍ा येमाजीपंत व जानो शंकर रवाना केले. पवार, सोमवौसी यास रवाना करणार म्हणून लिा त्याजवरून कळले. यैसियास राजश्री स्वामीचा पुन्यप्रताप समर्थ आहे. सर्व होऊन येईल. निजामा-कडील प्रसंग विपर्यास जाला. तर आपण या प्रांतास येतील तेव्हा ते प्रांतीच्या बंदोबस्तास कोणास ठेवणार. तलेगावी कबिले आहेत त्याचा टिकाव तेथें कसा होईल? तेव्हा लोहगडी अथवा राजमाचीस जाणे लागल. तेथे आपण कोण ठेवितील त्यानी सर्वास विचारे संरक्षणे करणे लागल. याचा विचार कर्तव्ये तो करून उतर पाठविले पाहिजे. बहुत काये लिहिणे छ ९ रजब हे विनती.

¶*The writer inquires of the Peshwa as to who is to assume the command of forces in Konkan after his departure therefrom. He refers to the Peshwa's letter informing him how the Sidi on being repulsed at Bankot proceeded to Anjanwel and how his imminent advance on Gowalkot made the besiegers raise the siege and fall back.*

No. 130] [3-12-1733

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान प्रभवर्येशु या प्रति

आश्रित सदाशिव दीक्षित पटवर्धन आसीरवाद उपरी येथील कुशल ता‍ा मार्गसीर सुध आस्टमी जाणोन स्वकीये कुशल लेखन करावया आज्ञा केली पाहिजे. यानंतर आपली आज्ञा घेऊन आलो त्यास सुखरूप पुणियास पावलो. खानदेश-प्रांती रा‍ा त्रिंबकराऊ सहवर्तमान सुध प्रतिपदेस स्वार होऊन जाणार होतो त्यास आम्हास जराची वेथा जाहाली यास्तव आपली पत्रे मलारजी होलकर यास होती ते देऊन रा‍ा बालाजी भिवाजी यास पुढे रवाना केले. आपणासहि आरोग्य जाहाले आहे. वदी पक्षी स्वार होऊन रा‍ा त्रिंबकराऊ सहवर्तमान जाऊ. कलले पा‍ा.

आपणाकडील सांप्रत वर्तमान यथंभूत कलले नाही. रा पंत सुमंत तेथे गेले आहेत. सिदी सादहि आंजणवेलीहून येऊन मुंबईस जाऊन फिरोन आला आहे म्हणून वर्तमान आइकतो. सल्यावर घातले आहे यैसे आइकतो. त्यास सविस्तर वर्तमान ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. वरकड वर्तमान रा त्र्यंबकराऊ याणी लिा आहे त्यावरून श्रुत होईल. आम्हास सालगुदस्ता पंचवीस बैलाचे दस्तक दिल्हे होते त्याप्रा सालमारी रा नानापासी मागत होतो. त्यास आयाब (आद्याप) न देत तर कृपा करून गुदस्ताप्रा पंचवीस बैलाचे दस्तक हरजिनस दर जागा भरून जातील येतील त्यास मुजाइम न होणे यैसे पीरखान पाठविला आहे याजवळी आज्ञा करून दिल्हे पाहिजे. बहुत+ काय लिहिणे कृपा लोभ असो देणे आशीर्वाद

¶*Sadashiv Dikshit Patwardhan expresses his regret for his inability to proceed on account of his illness. He requests the Peshwa to grant him a permit for some 25 bullocks going free as in the previous years.*

No. 131]. [*14-12-1733*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यासी

ऽ श्रीमंत सकलगुणालंकरण आखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंति येथील क्षेम ताा छ १७ माहे रजब मुाा खोकर भोकर पाा नेवासे जाणून स्वकीये कुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. गोसावियाचे पत्र छ १० मिनहूचे घोसालियाचे मुकामीहून आले. सिदी साद व सिदी मसूद सुरतवाले आरमारानिसी आले होते, व इंग्रेज फिरंगी आवघे जमा जाहले होते. राजकारण आगोधरच राखिले होते. या निमित्य आग्रह न होता केला मनसबा सिधी(स) (पा)ऊन छ ४ रोजी अबदुल रहि(मान) खानजादे यासी जंजरियात-मसनदीवर आरूढ केले. उतम गोष्ट जाहाली. लौकिक उतम धण्याचे पुण्यप्रतापे जाहाला. या उपरी शामलाच्या गडकिल्याचा तहरह श्री स्वामीसंनिध करावा (सा) विचार जाहाला अहे तो पर्यंत * * वलवल न करावी. बिरवाडी तला घोसाला येथील बेहबुदी करून मजल दरमजल येऊन सातारा जावेसा विचार आहे. राजश्री स्वामीची मर्जी पाहून जाणे जाऊन. नाही तर पुण्यास जाऊन म्हणून लिहिले ते कळो आले. यैसियासी गोसावियानी जो आभिमान धरून मनसबा योजला तो वडिलाच्या पुण्यप्रादुर्भावे सिधीस पाविला.

+ अक्षरें बालबोधींत.

खानजादियासी जंजरियात स्थापना जाहाली हे महदयेश पदरी पडिले. गड-किल्याचा तहरह राजश्रीचे व आपले मसलतीने होईल तो करावा. आपला उलगडा * * ज राजश्री जवली गेलियासी लौ(किक) होऊन आला तरी यावयाचा (वि)चार केला पाहिजे. दिसगत लागलीच तरी आम्हास जे आज्ञा करणे ते केली पाहिजे. या उपरी * दिवस थोडे राहिले. दोन मास परमुलकात जावयासी मार्गीच लागतात. त्या उपरी पोट भरावयाची जागा लागते. दोन तीन महिने कामकाज करावे तो पर्जन्यकाल डोईवर येतो, ये जातीचा मनसबा आहे. जर करिता सार्वभोमाच्या फौजा माळवेप्रांते न आल्या तरी च्यार मास फौज हिंडऊन कालहरण करून पैका मिळणे तो धण्याच्या पुण्यप्रतापे जो प्राप्त होणे तो होईल, परंतु नक्ष खावंदाचा राखावयासी अंतर होणार नाही. मोगलाच्या फौजा आल्या तऱ्ही डावे उजवे जैसा कळेल मनसबा त्यासारखा विचार करून फौज हिंडऊन आणून. आमचेविशी काही काळर्जा केली न पाहिजे. जे वर्तमान होईल ते सेवेसी वरचेवर लेहून पाठऊन. आम्ही दिवाणच्या डेरियास जाऊन राहिलो. चिरंजीव * * * आपल्या गोटात ठेविले आज्ञेप्रमाणे कामकाज करून क * * विसी अंतर पडणार नाही. विशेष कार्ये लिहिणे कृपा वर्धमान केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhav congratulates the Peshwa on the success that he attained in the Sidi's affair by installing Abdul Rahiman on the Masnad. The writer himself has started to the North on the annual expedition.*

No. 132] *[9-11-1735?*

पौ छ ११ रजब.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा

राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. गोवलकोटाहून राजश्री मानाजी जाधव व दुर्गोजी भोईटे यांचे पत्र राजश्री स्वामीस छ ४ रजबी रात्रीस आले. त्याची नकल लेहून स्वामीकडे पाठविली आहे, त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Nanasaheb sends to the Peshwa and Chimaji Appa copies of letters received from Manaji Jadhao and Durgoji Bhoite from Govalkot.*

No. 133] [23-12-1733 ?

श्रीविठलराज

विज्ञाप्ती त्रिंबक जगंनाथ यैसाजे रा। हनमंतराव निंबालकर यानी रा। सेटियाजी सुपेकर व नारोजी निंबालकर याजबाार गारदी व रोहले व सातसे स्वार देऊन मोर्चियावर पाठविले. छ १६ रजब दोन घडी दिवस राहता रा। शाहाजी सुपेकर यांजबाारी हजार स्वार व पंचेवीस उंट लाकडे व कनगी व पाट्या व गोन्या भरून मोर्चियावरी रवाना केले. राऊ मजकूर आपन कचरीचे डेरियात बसून तमाम लोकास ताकीद करून पाठविले. हे लोक नेहमी रात्री मोर्चियावर राहातील. आज तरतूद मोर्चियाची चांगली दिसोन आली. साडे तीनसे स्वार मोर्चियाच्या मावे (छ) बिनीयाचे तयार करविले. त्यास ताकीद केली आसे की च्यार घडी रात्र जालियावरी तुम्ही जाने (आणि) मोर्चियाची खबरदारी करणे. राऊ माार-नुले आपणहि स्वार होऊन जानार. याहिवर पाहावे हे विज्ञाप्ती.

¶*Arrangements for an attack, the posting of the several contingents, and the strict orders for action are reported in this letter by Trimbak Jagannath.*

No. 134] [31-12-1733

छ ६ साबान

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक बाबूराव मलारी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल पौश सुध ६ इंदुवासरपर्यंत यथास्थित असे विशेष. येथें वर्तमान बाणकोट आंगरियाचे लोकानी घेतला, व रायेगडचा वेढा खंडोजी माणकर याणी उठविला यैसे यैकतो. हे यथार्थ आहे कीं अन्यथा हे सेवकास त्याहावयासी आज्ञा केली पाहिजे. रा। आनंदराऊ पवार याचे व जावजी दाभाडे याचे युधाचे वर्तमानाचे पत्र रा। हरिपंताचे सातारीहून आले ते काली रा। गोपाल माहादेऊ दप्तरदार याजबराबर सेवेसी पाठविले ते पावोन वर्तमान विदित जालेच असेल. यानंतर संक्रमणाचे तिळगूळ पाठविले असेत अंगिकारीले पाहिजेत. वरकड रा। धोंडोपंत विनंती करितील विदित होय हे विनंती.

¶*Baburao Malhar Barve to Peshwa requesting him to supply further information about the capture of Bankot by the Angria. He further informs the Peshwa of a light skirmish between Anandrao Pawar and Iavaii Dabhade.*

5300

No. 135] [About December 1733

* * घेऊन राजश्री कृष्णराऊ माहादेव सेनापतीचे पदरी पडले. त्यानी पायागडचा मनसबा कबूल केला तो राहिला. यास्तव राजश्री मल्हारजी होलकर व राणोजी सिंदे यास पत्रे पाठविली आहेत ती प्रविष्ट करून गड त्यास राखावा लागला म्हणून लिा. ती पत्रे त्याजकडे प्रविष्ट करितो. आम्ही लिहून पाठवितो. धण्याचा किला आहे. त्याची बेगमी करून संरक्षण करतील, राजश्री पंतप्रधान याची पत्रे आली त्यावरून शामलाचे मसलतीचा आर्थ सविस्तर कलों आला. राजश्री स्वामीचें दर्शन होऊन गड ठाणियाचा तह होऊन निरोप सत्वर जाहाला तर यावयाचा विचार घडेल दिसगत लाग * (पुढे सर्व फाटलें आहे. इतकेंच अपुरें मिळालें).

¶*This is a fragmentary letter referring to the affair of Pauagad.*

No. 136] [December 1733

श्री

राजश्री चिमाजीराव आपा गोसावी यासी

श्रीमंत अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्मो जानोजी निंबालकर कृतानेक दंडवत विनंति उपर. येथील क्षेम जाणोन गोसावियानी आपले निजानंद लिहिणी आज्ञा निरोपिली पाहिजे. यानंतर कृपा करून हस्ताक्षरपत्र पाठविलें उतमसमई प्रविष्ट होऊन परमसंतोश जाला. राजश्री राऊप्रधान यानी राजपुरीस आठ महिने राहून महदयेश संपादिलें. सिदी याकूदखान यांचा धाकटा पुत्र हपसियानी बाहेर घालून फिरंगी व इंगरेज साहे करून सुरतेहून हपसी आणिले. जोर धरला होता. परंतु राजश्री राऊप्रधान यानीं त्याचें प्राबल्येता पराभवातें पावऊन सिदी आबदुल रहिमान यांची स्थापना केली. गडकिले व मुलूक हस्तगत जाला तोहि जाला. पांच प्रगणे मात्र हपसियासी घावेसे केले आणि वेढा काहडून कूच करून आलाकडे गडकिलियाच्या बंदोबस्तानिमित्य येऊन तलें घोसाला येथें मुकाम केला. तेथील बंदोबस्त जालियावरी पुणियासी येतील. तदनंतर राजदर्शणास येतील म्हणौन विस्तारें लिहिले. गोसावियांची पत्रें आंबृतवेलेस पावली, याच न्याये राजश्री राऊ प्रधान यांची पत्रें आलीं. सारांश राजश्री राऊ पुण्यश्लोक अणि मनसुब्याचे सागर श्रीकृपेकडून थोर येश संपादिलें. हे कार्ये पूर्वी कोणी केले नाही, आथवा पुढेहि होणे अगाटितच आहे. रा राऊ येशस्वी आहेत. याउपर नवलविशेष वर्तमान ल्याहावयाची आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. बहुत काये लिहिणे. रा तात्याचे नातू तुलजापुरास

5301

जातातीं त्याचे विशई पत्रें व दस्तक पाठवायाविशई आज्ञा लिहिली. आज्ञे-प्रमाणें तुळजापुरची पत्रें व दस्तक पाठविले आहे. बहुत काय लिहिणे कृपा असो दीजे हे विनंति.

¶*Janoji Nimbalkar congratulates Chimaji Appa upon the successful conclusion of the Janjira expedition by his brother the Peshwa.*

No. 137] [*December 1733*

श्री

राजश्री बाजीराऊ गोसावी यांस

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित जानोजी निंबाळकर दंडवत विनंती उपरी येथील क्षेम जाणोन स्वकीयें लेखन केलें पाहिजे. यानंतर बहुत दिवस पत्र येऊन वृत्त कळत नव्हतें. सांप्रत पत्र आलें उत्तम समयीं प्रविष्ट होऊन परमसंतोष जाला तो लिहितां येत नाहीं. राजश्री राऊ येश संपादून राजपुरीहून आले हे थोर गोष्टी होऊन महत्‌-कार्यें संपादिलें. हें वर्तमान कळतांच बहुत बहुत समाधान वांटलें; याउपर तुम्ही समागमें आहांत हैंहि कळलें. अत:पर पत्रीं साकल्यें वृत्त लिहीत जाणें. बहुत काय लिहिणें. तुमच्या ममतेचा व स्नेहाचा अर्थ पूर्वी कितेक प्रकारें राजश्री मल्हारपंत खिजमत-राऊ यांनीं सांगितला, ऐशियासी तुमचा आमचा ऋणानुबंध कांहीं आजचा नाहीं; परस्परें स्नेहवृद्धि वांटावी हेंच उचित आहे. बहुत काय लिहिणें? कृपा असों दीजे हें विनंती.

¶*Janoji Nimbalkar congratulates Baji Bhivrao upon the success of his master the Peshwa.*

No. 138] [*End of 1735 ?*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती गोवळकोटीहून मानाजी जाधव दुर्गोजी भोईटे याचे पत्र राजश्री स्वामीस आले त्याची नकल करून पाठविली आहे त्यावरून कळेल. हुजरे गोवलकोटीहून राजश्री राणोजी भोसले याजवर अतिशये करून हुजूर आले. त्याणी वर्तमान सांगितलें कीं माननाक महार गतवर्षी गोवलकोटाहून आला तो राणोजी बावा यासी चाकर राहिला, तो लस्करचे सर्व वर्तमान किल्यात पावीत होता. ते मुदे खरे करून त्याचे अंगी लाविले आणि सारे सरदार मिळोन मान-

नाफ यासी बांधून हुजूर पाठवीत होते. परंतु राणोजी बावा त्यास हाती न देत. यास्तव आपण त्याचे घरी पांघुरणे जाळली आणि उठोन आलों ऐसें सांगितलें. त्यावरून राजश्री स्वामीस विषाद येऊन राणोजी भोसले यासी हुजूर यावयाविसी पत्रे लेहून हुजरे पाठविले व पत्री आज्ञा केली कीं तो महार व मुद्दई[1] कोण आहेत ते सारे हुजूर घेऊन एक माणूस त्यातील तफरेका[2] जाहले म्हणजे कार्यास येणार नाहीं, ऐसे लिहून हुजरे पाठविले. स्वामीस विदित व्हावे यास्तव लिहिले असे. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadoba Purandare writes to Chimaji Appa from Satara how Ranoji Bhonsle of Nagpur was ordered to be brought into his presence by Shahu for treason in the campaign.*

No. 139] [*1733 ?*

श्रीराम

श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री बाजीराव यांप्रति

प्रीतिपूर्वक नारोराम कृतानेक विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल-लेखन केले पाहिजे. विशेष. बंदुखी लोकांचे प्रयोजन आहे तरी कुडालाकडील लोक आणऊन पाठविले पाहिजेत म्हणून तुम्ही पूर्वी लिहिले होते, त्यावरून राजश्री रघुनाथ सावंत भोसले यास पत्र लिहिले. त्याणी लोक जमाव करून घेऊन आले. राजश्री चिमाजीपंत यांची भेटी केली. लोक याणी पाहून यांची रवानगी तुम्हा-कडे केली आहे. आणिखी भरतीचे लोक जे पाहिजेत तेही जमा करितील. अशास यांची आपली भेटी पूर्वी राजपुरीस जाहलीच होती. हे लोक म्हणजे याजवरी लोभ करून चालऊन यांजपासून स्वामीकार्य घ्यावयाचें ते घ्यावें. असे लोक तुम्ही आम्हास जरूर प्रयोजन म्हणून लिहिले त्यावरून यांस आणऊन पाठ-विले आहे. लोकहि दृष्टीस पडल्यानंतर कळतील, तरी यांचे आगत्य धरून चालविले पाहिजे. गैरवळणी माणूस यांच्या अवकांत[3] चालावा. तुमचेहि थोर-पण ऐकोन हे तुम्हाजवळी आले आहेत. तदनरूप याजवरी लोभ करून सर्व-प्रकारे अगत्य धरून चालविले पाहिजे. याचा बहुमान वस्त्रपात्र सर्व प्रसंगाचे साहित्य यांच्या स्वरूपानरूप घडोन याची स्थित राहे आणि तुमची सेवा यांजला घडे तो अर्थ केला पाहिजे. यांचे चालवितां अनमान न केल्या हेहि एकनिष्ठेने सेवेसी अंतर करणार नाहीत. पुढें आणखी यांची उस्तवारी होऊन सुखरूप राहेत तो विचार केला पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Naro Ram sends some riflemen from Kudal to Bajirao as desired by him and commends them to his service.*

---

१ शत्रु, दावेदार, गुन्हेगार. २ परागंदा. ३ ताब्यांत.

No. 140] [1733?

श्री

पुरवणी राजश्री बाजीराव दार्जी गोसावी
यांसी

विनंती उपरी. राजश्री स्वामीनी राजश्री पंत राजाज्ञा यास लेहून पाठविले कीं बाणकोटच्या तोफा पांच तुम्हाकडून गोवळकोटास रवाना केल्या आहेत त्यां लवकरीच येतील म्हणऊन पत्रें वरचेवर येताती, आण तोफा अद्याप येत नाहीं. याचा विचार कळत नाहीं. तोफाकरितां खोळंबा जाला आहे. अतां काम तोफाचे आहे. तोफा बहुत त्वरेने येती ती गोष्ट केली पाहिजे. विलंबावरी येकंदर न घालणे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Letter to Bajirao from Shahu, asking why he had not sent to Pant Rajadna Hari Moreshwar the five guns for operations at Gowalkot where they were badly needed.*

No. 141] [1733?

श्री

गंगाजान्हवीसमान मातुश्रीबाई साचे सेवेसी

आज्ञाधारक साखराई पा मोकदम व कृस्णाई जगथाप मौजे पिंपळे दंडवत विनंती उपरी. येथील क्षेम जाणोन स्वकीये लेखन अज्ञा केली पाहिजे. यानंतर राजश्री पंतप्रधान कोकणांत गेलियावर ऐलीकडे काही वर्तमान कलले नाहीं. उडाऊ खबर ऐकिली कीं ईध्ये जाहले म्हणौन, यास्तव चिंता लागली आहे तर तेथून वर्तमान तुम्हाकडे आले असेल ते तपसीलवार लिहिले पाहिजे. शामजी मुखदगत निवेदन करिता विदित होईल. बहुत काय लिहिणे? कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Sakhrai and Krishnai Jagthap hear about the warfare in the Konkan and inquire of the Peshwa's mother about the Peshwa's operations.*

No. 142] [1733?

श्री

श्रीमंत राजश्री राऊ स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक येसाजी रघुनाथ सा। ना। विनंती येथील कुशल ता। छ २६ सफर पावेत व स्वामीचे कृपेकरून सुखरूप आसो. या नंतर स्वामींची कीर्ति

5304

दिगांती होऊन दिवसेंदिवस येशाची आभिवृति होत आहे. परंतु स्वामीचे चितात आजताा यैसे न ये जे कोकणात येखादा जागा आपला यैसा करून जैसी वर घाटे कीर्ती तैसी तल कोकणात व सागरात व्हावी हे चिती येत नाही. परंतु वरघाटी येक द्रव्यच मिलेल. कोकण म्हणजे नवनिधि आहे. स्वामीस आजताा कोणीहि विदित न केले जे कोकणांत स्तल आसावे यैसे कोणी सूचना करीत नाही. यैशास स्वामीच्या पुण्ये व तपोबलेकरून भागिर्थीपावेत व स्वामीची काब(?) जात आहे. परंतु कोकण स्वामीचे वतनादखल आहे. स्वामीनी कोकणात नजर मात्र केल्यानंतर इच्छिले सिद्धीस जाईल यैसे आहे. सविस्तर मानाजी कदम याजपासी सांगितले आहे. चितात आणून लिहिल्याचे सार्थक होये यैसे करणार आपण समर्थ आहेत. स्वामीची सेवा करावी यैसे कितेक भले मार्ग लक्षीत आहेत. सूचनार्थ लिहिले असे. बहुत ल्याहावे तरी स्वाम समर्थ आहेत. कृपा करीत असावे हे विज्ञाप्ति.

¶*Yesaji Raghunath congratulates the Peshwa on his splendid achievements in the North and requests him to turn his more serious attention to Konkan which was full of advantages and which moreover is the Peshwa's vatan.*

No. 143] [*1733*

श्री

पुाा श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती यैसीजे. बारेयावरून शाम(ला)चे अरमार बारा रोज गेलेयावर पाठीमागून गलबते पाठविली. त्याणी वर्तमान आणिले त्यावरून लेहून पाठविले. गलबते समुद्रांत राहून पाहिले त्याजवरून लेहून पाठविले. त्यास गनिमाचे खबरदारीस किलाहून स्वारीं पाठविली आहे. तेथून तथ्य वर्तमान आले म्हणजे सेवेसी लेहून पाठवितो व किले मजकूरचे बेगमीस दारूगोला व जेजाला १० व जेजाल बारदार पाठवायासी आज्ञ करणार स्वामी समर्थ आहेत. व गोलंदाज ५ पांच पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे. दाहा सिपाई न्युंन्य जाले तरी कार्यास येईल, परंतु सदरहू लिहिलेप्रो सरंजाम करून पाठवावयासी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Bajirao is requested to send some ships with ammunition to check the aggressive moves of the Sidi's fleet.*

No. 144] [1733

श्री

सेवेसी विनंती उपरी सुरतेच्या किलेदाराचे पत्राची नकल.

यादि तेगबेगखान मुतसदी सुरत याचे पत्र. माहाराजानी मेहरबानी करून पत्र पाठविले ते पावोन परम आनंद जाला. लिहिले होते कीं हांबसियानी बहुत धामधूम मांडिली याकरिता त्यास तंबी करावयाबद्दल राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान व राजश्री फतेसिंग भोसले राजपुरी प्रांती बदोबस्त करावयाबदल पाठविल म्हणोन माहाराजानी लिहिले होते, परंतु याहून विशष दामाजी राम यानीहि आम्हास लिहिले होते, यैसियास ईस्वरदयेने माहाराजाचें लिहिल्याप्रमाणे आमला मध्ये येईल. याचे कितेक सविस्तर वर्तमान दामाजी राम याचे लिहिल्यावरून जाहीर होईल.

¶*The writer Tegbegkhan of Surat expresses his delight at the news of the King having ordered the Peshwa and Fatesing Bhonsle to check the aggressive activities of the Sidi.*

No. 145] [4-1-1734

छ १३ साबान

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

पो वासुदेव जोसी क्रा‍ा ना‍ा वि‍ा. येथील कुशल ता‍ा पौष शुध येकादसी भ्रगुवासर जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पा‍ा वि‍ा. आपण पत्रें पाठविली तेथे आज्ञा केली, की जवार रामनगर पेठ वासदे व पा‍ा कोहज व सातमाहाल येथील मामला रा‍ा कृष्णराव यांस सांगितला, तुम्हाकडे वसूल काय तो लेहून पाठविणे. त्यावरून आम्ही आपले कमाविसदारास हिसेबू घेऊन बोलाविले आहेत. ते आलियावरी वसूल काय जाहाला हें मनास आणून वसूल जो जाहाला असेल तो लेहून पाठवितों. रा‍ा कृष्णराव याचे अमलदार आलियावरी ते अमल करितील कलले पाहिजे. आजीच वर्तमान येथे आले आहे की उमाबाई दाभाडी कुलाबियास जाणार आहे, ती बोरघाटें उतरणार. त्यास गेलीच तरी बहुधा मार्गी जाता उपसर्ग लावितील की काय पाहावे. आपणास कळावे या करिता लिहिले आहे. वरकड रा‍ा होनाजी बलकवडे व खंडोजी माणकर यांजकडे लोक पाठवणे म्हणून लि‍ा होते, त्यावरून होनाजी बलकवडे याजकडे पेशजीच सेंभर माणूस

पाठविले व आजीच माणकर याजकडे लोक २०० दोनसे रवाना केले. विदित जाहाले पाहिजे. स्वामीचे येणे पुणियास कधी होईल हे लिहिले पाहिजे. बहुत काय लिा लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi acknowledges receipt of an order from Chimaji Appa which transfers the mamlat of the five places, namely, Jawhar, Ramnagar, Peth Wasde, Kohaj and Satmahal from him to Krishnarao Chaskar. He further gives news about Umabai Dabhade's intentions to visit Kolaba.*

No. 146] [*24-12-1734*

पाा छ १६ साबान

श्रीमंगलमूर्ति

श्रीमंत राजश्री पंत आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक कृष्णाजी राम साां नमस्कार विज्ञापना येसीजे. येथील कुशल ताा छ ९ माहे शाबान स्वामी कृपेने मुाा जंजिरे मुंबै येथास्थित आसे विशेष. स्वामीचें आज्ञापत्र आले लिहिले छ २६ रजबचे तें छ ९ शाबान ते दिवसीं जासुदजोडी सुखरूप आली. येशास पत्रीं आज्ञा जे. जुने जनराल यांची थैलीचें प्रत्योतर श्रीमंत राजश्री पंतप्रधान याजकडून आली थैली ते त्यास प्रविष्ट करावी, ते स्वामीचे आज्ञेप्रमाणें दिली. फार संतोषी; वाचून आर्थ मनास आणून बोलिले जे, प्रीतिवादलक्षण लिहिलें आहे. येशास बंदर हुरमुजांस† आपलें जाहाज रवाना जाहालें होतें तें आलें. पुढें स्वस्थानास जाऊन येसे बोलिले. या महिन्यात प्रयाण करितील. सेवेसी श्रुत होये. या पत्रापूर्वी जासुदजोडी २ दोन आल्या त्या नवे जनराल याची थैली येक घेऊन छ २९ रजबांत रवाना जाहालें. जाजती विनंतीपत्र लाखोटे दोन घेऊन गेले ते सेवेसी सादर जाहाले आसावें. त्याचा जाबसाल करावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. शिष्टाचार विषय सेवसी पूर्वी सूचना यथाज्ञाने केलीच होती. आता संनिध रवानगीचा प्रसंग बनोन आला. येशा थोरांपासी व्यवहारइष्टत्ववृद्धि आसिल्यावर प्रसंगोपात उदंड हितावह. पंधरा सोला रोजी स्वार होतील. सेवसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram from Bombay to the Peshwa acknowledging the letters addressed to him and to the Governor of Bombay, of whom the Marathi papers always speak as a General.*

---

† Hormuz, South of Persia.

No. 147] **[24-12-1734**

पाा छ १६ साबान

श्रीमंगलमूर्ति

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक कृष्णाजी राम साष्टांग नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील कुशल ताा छ ९ शाबान स्वामीचे कृपेकरून यथास्थित आसे, विशेष. जुने जनरालास थैली व आज्ञापत्र घेऊन भिकाजी जासूद आला. छ २६ रजबी लिहिले यैसे सादर छ ५ शाबानामधी जाहालें. आज्ञेप्रो नवे जनराल त्यास श्रुत केले. ते वचनी तत्पर आहेत. आदरपुरःसर सेवसी श्रुत होये. लक्ष्मीबाई[1] राजमाचीस आहे म्हणून स्वामीचे आज्ञापत्री होते. त्यास येथें जासूद आले, तेच दिवसी समाचार आला जे, गडावरून युक्तीने बाहेर घातली, ते चेउलास आली कीं येईल. मानाजी आंगरे चेउलास जात येत असतात. त्यास स्वामीकडील कुमक कितीक आली. घोडे लशकर पाईदल म्हणून नवे जनराल पुसत होते. त्यास उतर केले कीं, इतुके लिहिले तो नाही. परंतु होनाजी बलकवडे चेउलास आले म्हणून खबर आहे. बहुतेक त्यासच आज्ञा केली आसेल आगर दुसरेहि येतील. हे सहजच कपितान इंचब्रर्ड रेवदंडेयास तुम्ही ठेविलाच आहे तो लिहील. येकाकी जाहीर न करायाकरितां बलकवड्यास आज्ञा केली तर काय कले, यैसे उतर दिलं. सेवसी श्रुत होये. जुने जनराल यास थैली प्रविष्ट केली. त्यांचें तारूंहि हुरमुजाहून[2] आलें. या महिन्यात ते स्वार होतील. हरयेकविसीं विलाईतेस आपण आहे. फिरंगी भाषेने लिहिले पत्र येथें आंतोनदेसील याजकडे आलियावर ते प्रविष्ट करितील. त्याचे उतरहि तेच रीतीने आपण प्रविष्ट होये यैसे करीन बोलिले. यैशास आम्ही त्यास सांगितले जे लिहून पाठवाल म्हणजे त्यांस विश्वास दिसेल. त्यास मार जनराल याणी थैली दिली ती सादर होतां सविस्तर विदित होईल प्रसंगी कार्याची आहे. सेवेसी श्रुत होये. छ २९ रजबी येथून जासुदजोड्या दोन रवाना जाहल्या त्या सेवसी सादर जाहाल्या असतील. अवलोकनी सर्वार्थ सेवसी विदित होईल, विशेष. आजम आंतोनदेसील व फिरंगिनिवीस याणी दुभत्या गायी विकत आणावयास माणसें पाठविलीं होती. पंनास रुपये खर्च जाहाला. आकरा गायी आणीत होते. त्यास कल्याणकराही फिरंगाणातून फिरून नेऊन आटकाविल्या, हे जाणोन मारानिलेनी पत्र येक राजश्री वासुदेव

---

१ आंगरे.

(2) Hormuz.

जोशी यास सुटकेविसी लिहिलें. त्यांच्या नावाचे उतर रा नारायण[1] जोशी याणी लिहिलें जे, ये गोष्टीविसी निरोप देवत नाही. त्यास आम्हास सांगो लागले जे गाई ठेविल्या, उतम केलें. परंतु रुपये पंनास खरेदीस लागले ते आमचे द्यावे हे तों नीत. त्याविसी जाबसाल नाही. यैशास आमचे रुपये द्यावे यैसे तुमच्या ध्यानास येत असेल तर रा वासुदेव जोशी यास पत्र लिहाल तर पाहा. बोलिले. यावरून पत्र आम्ही लिहिलें आहे जे, रुपये पाठवावे, योग्य आहे. सेवेसी श्रुत होय. हाबशावर तुमचे खावंद मोहीम करणार; कधीं फौजा रवाना होतात? रोज या घाटाखालीं येतांच खबर लटकी होते. आम्ही तमासा पाहों म्हणतों परंतु शब्द साहित्य हेहि दिसोन येते. येविषई तुम्हास काय खबर आहे? नाही म्हणून प्रत्योतर केलें. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram from Bombay to the Peshwa communicating his conversations with the Governor.*

No. 148] [*8-1-1734 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक जावजी मराठे मुकाम सुरगड साष्टांग दंडवत सेवेसी विज्ञापना तागायत छ १३ साबानपावेतो किले मजकूरचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशाष. आपण जमावानसी किले बिरवाडीस वेढियाचे प्रसंगात होतो, त्यास स्वामीच्या निमकबलें व पुण्यप्रतापें गनिमास ठेचगा देऊन वाटेस लाविला. त्याउपरी सवेच गनिमाचा रोख किले सुरगडाकडे होणार हे वर्तमान येकोन आपण किले बिरवाडीहून सुरगडास आलों. निवडूक माणूस बिरवाडीस नेले होते. गडी भरती नव्हती. यास्तव उतावलीनें किले मजकूरचे चौकसी करितां उठोन आलों, तो गनिमानी किले मजकूरचा लाग सोडून किले मानगडची पेठ मारून नेली. त्यास रा होनाजी बलकवडे यांणी पुरता शोध न घेतां उतावलीने स्वामीचे सेवेसी लिहिलें, तरी आम्ही सेवक पुरातन येकनिष्ठ आहों वाऊगी वर्तणूक जालियानी आमचे काय बरें होणे आहे? आपले पायासी येकनिष्ठपणाची क्रिया आहे. आजिताा येकनिष्टपणें सेवा केली. पुढेंहि हेच

---

[1] वासुदेव जोश्याचा थोरला भाऊ.

क्रिया आहे. स्वामीनी मुलेंमाणसें गुरेढोरे अटक करावेली आहेत. त्याचीहि आज्ञा करणार स्वामी मायबाप समर्थ आहेत. सेवकाचे उर्जित करणार स्वामी आहेत. सेवेसी एकानिष्ठ आहोत. सर्व संकट आपल्यास आहे. सेवक पदरीचा पुरातन आहे. स्वामी उस्तवारी करणार धणी आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Javji Marathe requests the Peshwa to release his family confined for his alleged negligence.*

No. 149] [*10-1-1734*

श्री

राजश्री पंतप्रधान

गोसावी यासी

श्रीसकलगुणलंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नेहाकित निंबाजी सोमवंशी व प्रतापजी व आपाजी सोमवंसी दंडवत विनंती. येथील कुशेल ताा छ १९ साबान मुाा छेत्री निजामपूर नजीक वाडी किले रायेगड येथास्थित जाणून स्वकीये वैभवलेखनाज्ञा केली पाहिजे. आपली आज्ञा घेऊन आलो. राा बाजी भिवराऊ याची आमची भेटी जाली. कूचदरकूच काली छ १४ माहे मजकुरी दाखल जाहाले. तिकडून माहाराज राजश्री स्वामीनी राा पंत राजाज्ञा व आवघी हुजरात व राा कृष्णाजी पवार विस्वासराव व राा उदाजी पवार फौजसहवर्तमान येथेच आले. अवघे येकत्र होऊन छाा मारी वाडीवर चालोन घेतले. हबसियाने पुढे कोसावर जागांजागां नाके धरून बरें तुंबल युध्ये केले. आपलेहि फौजेत बरे नामी लोक होते. राा बाजीराऊ याणीहि बरी कस्त केली. लोकांनी मनें वाढवून कस्त करून गनीम मारून काहाडिला. खुद शामल मारिला. पालखी पाडाऊ जाली. वाडी पाचवड दोनी आपल्या प्रतापे घेऊन मदारेवरील चौकी उधळून किलाचा दरवाजा मोकला केला. हबसी सापडले ते मारिले. वरकड पलोन माहाडास गेले. लस्करातील लोक जखमी फार जाहाले. आम्हाकडील करोल जख(मी) आहेत. सारांश गोस्टी येश येऊन स्वामिकार्ये जाहाले. सविस्तर वृत राा बाजीरायानी लिाा आहे त्यावरून विदित होईल. बहुत काय लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Nimbaji Somvanshi reports to the Peshwa a stiff fight at Raygad.*

No. 150] [11-1-1734

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचें सेवेसी

सेवक आज्ञाधारक राघो व्यंकटेश कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. स्वामीच्या कृपावलोकनेकरून पौश वद्य त्रितीया भृगुवासरपर्येंत स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकांचे वर्तमान येथास्थित असे विशेष. काली गुरवारी रायेगडी युध जाले. तीन फौजा आल्या. येकीकडून राजश्री बाजी भीवराव आले. दुसरीकडून राजश्री उदाजी पवार होते. मध्यभागी माहाराज राजश्री छत्रपती स्वामीची हुजरात होती. प्रातःकालीच जुज जाले. आधी वाडीवरी चालोन घेतले. शामळाची फौज चालोन आली होती ते फौजेवरी चालोन घेतले. मारामारी केली. वाडी पांचाड घेतले. राजश्री आनंदराऊ जमावानसी राजश्री बाजी भिवराऊ याजब्रा खुशाल आहेती. शामळाचे लोक बहुत मारिले. फते जाली. गडकरी खाले उतरले होते त्याणी दरवाजाचा मुर्चा जालिला. राजगडच्या लाकांची गाठी दुमदारीस शामळाची गाठी पडिली होती. परंतु हिमत धरून सावरोन घाटावरी आले. दोनीच्यार माणूस जखमी जाले. दोगचौग गलबटले. गनीम नामोहरम जाला. या उपरी किलाची बेहबुदी करून पाचाडाहून मा(हा)डास जाणार. खुशालीचे वर्तमान शेवेसी विदित होवे म्हणून लिहिले असे. आम्हीं घाटी जमावानसी आहो. विदित जाले पाहिजे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Ragho Vyankatesh reports to the Peshwa a stiff fight below fort Raygad. The fort was first captured by the Pratinidhi on June 8, 1733, and Maratha garrison was kept on it. The Sidi again tried to take it back and pushed on his forces right up to the gate, when again this severe action was fought in which Sidi Afwani was killed.*

No. 151] [Recd. 11-1-1734 ?

पा छ १६ साबान

श्रीमंगलमूर्ति

पुर्वणी श्रीमंत राजश्री पंत आपा

स्वामीचे सेवेसी

विज्ञापना येसीजे. भिवंडीचे मार्गे दुबत्या गाई सुमार ११ खरेदी करून अजम अंतोन देसील व फिरंगी निवीस हरयेकविसी आम्हास साहित्यकारक याचा

माणूस आणीत होता, त्यास वाटेस चौकीस अडखलों[1] जाहाला जाणून राजश्री वासुदेव जोशीं यास पत्र सुटकेविसी मारानिलेने लिहिलें. त्याचे उतर आलें जे, सुटकेचे होत नाहीं. त्यावर आम्हापासीं कितीक उघडिक त्या प्रांताची बोलिले आणि आपण दुधास गाई आणून अनुचित करितों यैसे होतें. बरें कदाचित लौकिक रक्षायाकरितां धर्मविरुद्ध म्हणून जर ना देवत्रे तर रुपये पाहिजेत तर पाठवितों. यैसेहि उतरी न लिहिलें. आतां आम्ही लिहावें योग्य नाही. तुम्हास कलेल ते रीतीने लिहून आमचे रुपये आम्हास येत यैसे करा बोलिले, त्यास मारानिलेच्या माणसांहाती पत्र पाठविले आहे जे गाई न पाठविल्या हे उचित केले, परंतु रुपये (या)चे यास देवावे नित आहे. यावर योग्य अयोग्य तुम्ही सर्व जाणता म्हणून किती प्रकारे लिहिले आहे. (रुपये) पाठवावे हे सूचना लिहिली परंतु स्पष्ट लिहवले नाही. यैशास येथें वर्षभर यैकत होतों जे तेथील वस्तवादकी (?) मुसलमान यास रुपयाचे लाचेस्तव अंतरीं समत दिले आहे. आपला मार्ग चालवणें म्ह न तें सत्य भासत नव्हतें. या प्रसंगीं याणी मोड्ये दाखविले. त्यावरून प्रत्योत्तर नाही यैसे जाहालें. याचा विचार मनास आणावयास समर्थ स्वामी आहेत. सारांश यांचे रुपये यांस देवायास स्वामी धणी आहित. कदाचित ते रुपये पाठवितील न पाठवितील, यास्तव सेवेसी श्रुत करावें आगत्य जाहालें. सेवेसी श्रुत होय. आमची खर्चायाची चिंता स्वामीस असावी. हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram requests the Peshwa to get the milch-cows of his Christian interpreter released. The cows were purchased by the latter at Kalyan but were not allowed to pass by Vasudeo Joshi.*

No. 152] [*About 12-1-1734*

श्री

राजमान्य राजश्री येमाजी सिवदेऊ यांस आज्ञा केली यैसीजे. तुम्ही विनंती पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. लिहिलें वर्तमान कलों आलें. हुजुरात व पवार व बाजी भिवराऊ फौजेनसी वाडी पांचवडावर फौजेसहवर्तमान चालोन गेले. हबसी मारोन काढिला. दोन्हीं स्थलें फते केलीं. युध्यप्रसंगीं अववियानी कस्त मेहनत बरीच केली हें वर्तमान यैकोन स्वामी बहुत बहुत संतोसी जाहाले. लोकांचे सेवेचा मजुरा जाहाला. जखमी कोण जाले व पडिले कोण हे तपसील-वार लिहिणें. वाडी पाडून साफ करणें. वाडीतील व मदरेजवलील भांडीं वगैरे

---

[1] अडखुळ, अडखुला, अडथळा, व्यत्यय.

सामान रायगडावरी चढवणें. वाडीमध्यें पैरखानाची हवेली वाडीमधें आहे ती पाडून टाकणें. पाचवड कायम करणें. पाचवडची भांडीं पाचवडी राहूं देणें. तेथील मजबुदी करणें. सिदी आंबर आफवानीचें डोचकें कापून आणिलें आहे तें हुजूर पाठवणें. लोकांनी कस्त मेहनत केली आहे त्यांचें व गडकरी यांचें बहुत प्रकारें समाधान करणें. हबसियाकडील लोक जे सापडले असतील त्याचीं डोकचीं मारणे. कृष्णराऊ खटावकर पडिले म्हणून येकिलें तरी त्याचें वर्तमान लिहिणे. बहुत काय लिहिणें.

¶*Yamaji Shivdeo is congratulated by Shahu upon the victory at Raygad. Sidi Ambar Afwani and Krishnarao Khatavkar were reported to have been killed.*

No. 153] *[18-1-1734?*

छ २२ रमजान

श्रीमत राजश्री बावा

साहेबाचे सेवेसी

सेवक आणाजी साटम कृतानेक विनंती. ताा छ १६ शाबान पावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. कान सावंत याजबराबर पत्रें पाठविलीं ती प्राा होऊन लेखनार्थ अवगत जाहाला व मागाहून राजश्री धोंडो नारायण आले. याणीहि सविस्तर सांगितलें त्यावरून कलो आलें. लोकांची खर्चाची येक महिनेयाची बेगमी करून पाठविली त्याप्राा वाटून देऊनू राा नारो व्यंकटेश हाजीरीस व बंदीवान न्यावयास आले. हाजिऱ्या होत आहेत. आजी उद्यां हाजिरी देऊनू बंदीवान समेत रवानगी लिाप्राा करितों. वरकड या मनसुबियाचा दरबारीं जीव किती आहे तदनुरूप आपणहि उदासीनता धरिली आणि तारापूर प्रांते स्वारी केली. येथे शहमात्र राखावयास लोक ठेऊनु वरकड काही लोक न्यावे म्हणौनु राा धोंडोपंत यांणी सांगितलें त्यावरून अपूर्व वाटले. येशास या मनसुबियाविणे आम्हास तऱ्ही गरज काय होती? येक आपणाजवळ वचनास गुंतलो. तन्मुलें या कर्मास प्रवर्तोन आपला कुटुंबघात आंम्ही करून घेतला. पुढें मनसुब्यास बल पडोन प्रतिकाराचा विचार होऊन जाहाल्या खेदाचें परिमार्जन व्हावे ते गोष्टी न होता या थरास आलें. बरें दैवीगत विचित्र आहे. होणारास उपाय नाहीं. माडीवर व बागांत आपण वचनें बोलले होते त्याचा परिणाम असा व्हावा येसे नव्हते, आणि होऊनु आला. येऊ. आंम्ही तों सर्व प्रकारें अर्थेप्राणें बुडालों. येक वेल दरबारास येऊन हाक मारून दाद जाहाली तरीं बरेंच. नाहीं तरी आमचा उपाय आम्हाजवल आहे. आमचे तऱ्हीं

5313

होणे काय आहे? दोन बोटें दाली बांधली आहे. तेव्हां जांतीचा झाडा देऊन मरो. किंबहुना हाबसी फिरंगी याचें घर निघोन सारे वाद होऊनू सूड घेऊनू. आपण तों आम्हास पुढें करून मागून पया(?) केल्या. आसो. हा बोल आमच्या प्रारब्धास. याउपरी तऱ्ही काही हा अर्थ चितांत येईल तरी तिकडील धंदा उकोन (उकोंन?) सत्वर दरबारास यावें आणि दरबारचा प्रसंग नीट करून मनसुबियास जीव भरावा. नाही तरी आम्हास साफ आज्ञा करावी. त्याप्रा देखला देख करावा लागेल. कानोजी नाइकासारिखा भाऊ जिवानसी गेला. बाइको त्याची आग रिघत होती, तीस रिघों देत नाहीं. बाइकास पूर्ण दारू वाटावयास लागल्या. येक दोन जीव आहेत तेहि मरतील त्यांचा भरवसा काय? यैसा अनर्थ घडला आहे. याउपरी उठोन यावयास आंम्ही उतराची वाट प्राहात नाहीं. आपण दरबारास यावें. आमचा अभिमान असेल तरी सर्व धंदे आठ रोज ठेऊन दरबारास यावे. आम्ही बिलाकुसूर उठोन येतो. भेटीनंतर सविस्तर निवेदन करून. पुढे आज्ञेप्रमाणे विचारे विचार करून.

¶*Anaji Satam narrates the pitiable condition to which he is reduced by being involved in the affairs of the Konkan by the Peshwa's order. He lost money ; he lost his brother and other members of his family.*

No. 154] [*17-1-1734*

छ २९ साबान

श्री

विनंती उपरी. स्वामीनी पत्र छ १८ साबानी रवाना केले ते काली छ २१ साबानी आम्हास पावले. सविस्तर वर्तमान कळों आलें. तेथें आज्ञा कीं आजम सेखमिरा व राजाज्ञा यांच्या विचारामध्यें फारसे राहोन आपली व आपले फौजेची सिफारस त्या उभयेतांजवळून राजश्री स्वामीस लिहिवणे, ये गोष्टीस हैगे न करणे म्हणून. त्यास आम्ही जे सेवाचाकरी केली आहे ती कांहीं त्यानीं लिहून न पाठवावी ऐसी स्वामीच्या पुण्येंकरून केली नाहीं. येथें आचाराविचारा योग्य सेखमिरा व लिंगोजी हवालदार ऐसे उभयेता मात्र आहेत. ते कांही आपले मायेखेरीज नाहींत. आम्ही न सांगतां त्यानी लिहिलेच आहे व आणखीहि लिहितील. व येथें हुजरेहि होते त्यांनी आपले नजरेने पाहिले आहे. ते काली गेले तेही सांगतील. ये गोष्टीची कांही चिंता आहे ऐसे नाहीं. हे महाडास जातील तरी तुम्हीहि जाणे आणि बाजूने बाजू कामकाज करणे म्हणून आज्ञा, त्यास येथें विचार करावाया योग्य आणि आंगेजणी[१] करून महाडास जाऊन मोर्चे

---

१ पराक्रम

लावी ऐसा येथे आहे कोण ? महाडचा मजकूर तरी तेथील बातमी तेथें सिदी साद च्यारहजार माणसांनसी आहे. गावाभोवता तळे प्रोटी घेऊन लकडकोट करून तारंगणे बांधून मजबुदीने आहे. कोसावरी लस्कर राहावयासी कार्यास येत नाहीं, ऐसे आहे. आमचा येथील उलगडा होय ते गोष्ट केली पाहिजे. महाडावर जाऊन फौजेचा नकश राहणार नाहीं. याबा आमचाहि आब दवडावा यैसा पदार्थ नाहीं. वाडीमधें लोक न ठेवणे म्हणून आज्ञा, तर येथें कोणास ठेवा ऐसें म्हणावें ? हे सविस्तर वृत्त सेखजी भेटतीलं तेव्हां श्रुत होईल. आजि वाडी पाडली. लोक आमचे उठोन येतील. आम्हास जे आज्ञा करणे ते सत्वर केली पाहिजे. महाराज राजश्रीचे पत्र आले जे, आधी रायाकडील पत्र पावले यैसे वर्तमान यैकिले. हुजरे आले त्यानीं सांगितलें. सेवेसी श्रुत होय.

¶*A report is sent of Sidi Sat being surrounded at Mahad.*

No. 155] [*Recd. 25-1-1734* ?

छ ४ रमजान

श्री

पुरवणी राजश्री राऊ व ताा राजश्री अपा
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. छ ३० साबानी अजम सेखमिरा याचे पत्र संध्याकाली राजश्री स्वामीस आले त्याची नकल पाठविली आहे त्यावरून विदित होईल. रा बकाजी महाडिक जमावानसी लस्करांत आला. याउपरी माहाडास शाहा द्यावा यैसा विचार केला आहे. राजश्री स्वामीनी येथून आज्ञापत्रे पाठविली की माहाडास शाहा देऊन हस्तगत करावे यैसी पत्रे पाठविली आहेत. स्वामीस वर्तमान कलावे याकरिता लिहिले आसे. राजश्री बाजीराऊ स्वामीनी फौजेसहवर्तमान ठेविले आहेत त्याजकडील वरच्यावर खर्चाचा वेचाचा परामृष करून त्याकडील स्वार आगर पायेचा जमाव कोण्ही त्यापासून घाटावरता नये ते गोष्टी केली पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Shahu orders that Mahad should be captured from the Sidi. This is probably Purandare's letter to Bajirao and Chimaji from Satara.*

---

(1) A sort of projecting balcony or look out place.

No. 156] [26-1-1734

छ ७ रमजान

श्रीमंगलमूर्ति

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनीत सेवक कृष्णाजी राम साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील कुशल ताा छ १ माहे रमजान मुाा जंजिरे मुंबै स्वामीचे कृपादृ(ष्टि)करून यथास्थित असे विशेष. जंजिरे मारचे लोक श्री जेजुरेस यात्रादर्शनास जावयास निघालियांस वाटेस जातां निर्भय असावें यास्तव आम्हापासी येऊन बोलले जे, तुम्ही श्रीमंत राजश्री पंत प्रधान यांचे निसबतीचे आहा, यास्तव दाखल्यास येक पत्र असावे. यास्तव सेवेसी हे विनंतीपत्र सादर करणे अगत्य जाहालें. फिरून यात्रेहून येते वेळे विठोजी भगत स्वामीचे सेवेमध्ये सादर होईल. यास साल दरसाल निर्भयेप्रकारें येतां जातां वाटेस कोणी मुजाईम[१] न होये ऐसे दस्तक इछितो; हे प्राप्त करावयास सर्व प्रकारें समर्थ स्वामी आहेत. हालीं याजबाा यात्राकारू माणसें च्यालीस होतील. हे प्रतिवर्षी यात्रेस जावयाची इछा धरितात. काठी येथून प्रतिवर्षी जातसे, ती सा सात वर्षें राहिली. येंदाहि राहात होते, ते आमच्या वचनावरून निघाले असत. सेवट लाववायास स्वामी समर्थ धणी आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram from Bombay requests Peshwa's passport for certain pilgrims going to Jejuri from Bombay.*

No. 157] [27-1-1734

छ ९ रमजान

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री अपा स्वामीचे सेवेसी अपत्ये मल्हार तुकदेव कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. स्वामीच्या असीर्वादे करून ताा छ २ रमजान प्रहररात्रपरियेत कुशल आसो विशेष. स्वामीनी सुभानजी म्हसाजी जासुदा समागमे पत्र तीर्थरूप राजश्री तात्यास पाठविले ते प्रविष्ट जाले. लिहिले वर्तमान कळो आले. केरोजी आटोले याचे कागद प्रतिनिधि यानी तटले आहेत की केाा वोझर, पाा चांदवड, या गावीची सनदेवर सिका करून देतील तर आटोलियाचे कागद देऊन. नाही तर देत नाही. येविसी राजश्री

१. प्रतिबंध, हरकत.

स्वामी त्यास सांगत नाहीत. त्याजकडील राजपत्रे जे समयी होतील ती तटाविते समयी आटोलियाचे कागद येतील. आगोधर येत नाहीत. विदित जाले पाहिजे. दरबारचे वर्तमान तरीं अजी छ मारी रात्रीस रा देवराऊ मेघशाम याचे पत्र आले त्याची नकल पाठविली आहे त्यावरून कळो येईल. किले सातारा, किलें परेली, वसंतगड, वारुगड, पांडवगड व वैराटगड किले चंदनवंदन, वर्धनगड, ताथवडा, महिमानगड, किले सदासिवगड, येथील लोक राजश्री स्वामींनी आणून किले रायेगडास नेहमी राहावयास पाठविलें. आसामी साहासे ऐसीं, त्यां पैकी बंदुखी १२५ सवासे, बरकड अडहतेरी, बरकड लोक यैसे रवाना केले. समागमे विठलपंत गडनिवीस याचा पुत्र दिल्हा. किले रायेगडच्या शाकारास दोन हजार रुपये रवाना केले. राजश्री बिंबाजी पवार हवालदार व शामजी रुद्र यांस उभयेतास पांचसे रुपये पाठविले. नवे हशम मावले लोक दोन आडीचसे चाकर ठेविले. बरकड तरतूद लोकाची करिताती ती पांच हजार माणूस परियेंत मिलाले तर चाकर ठेवावे यैसा विचार राजश्री स्वामीचा आहे. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*When Raygad was captured, Shahu selected picked guards for its defence from among the garrisons of the various forts in the Satara District. The letter is addressed to Bajirao by Malhar Purandare sending the news about the guards having been despatched.*

No. 158] [*29-1-1734*

नकल.

श्री

सेवेसी सेवक देवराऊ मेघशाम चरणांवर मस्तक ठेऊन विज्ञापना. आजि छ ४ माहे रमजान मंगळवार तृतीय प्रहरपर्यंत माहाराजाचे कृपेंकरून सुखरूप असों. आजि माहाराजाचीं आज्ञापत्रें दोन येक बराबरी हुजरे व दुसरें बराबरी जासूद पाऊन मस्तकावरी वंदून सनाथ जालों. आज्ञा कीं पालकी पावली. स्वामी कार्यावरी समस्त येकनिष्ट चितें राहणें तरी सर्वस्व नजर आमची स्वामी कार्यावरी, दुसरा अर्थ या अविलंब आहे. स्वामी जाणतात. आम्ही घेतलीं वस्तेवर दुसऱ्यांनीं आपला मजुरा करून घेणें त्यांतच आपण संतोषी आहों. (एक ओळ फाटली). उर्जित येक माहाराजाची कृपा असावी. स्वामिकार्याचा विचार आमचा जीव स्वामिकार्यावर खर्चे हेंच इछितों, दुसरी इछा तिलतुल्य नाहीं. समस्त आज्ञा करितात त्यांत हजीर आहों. आज छ मजकुरीं दोन प्रहरांखाले स्वारी

गेली होती ती जाऊन आली. स्वारीचें मुळापासून परवां लिहिलें होतें. तेथून स्वारी दऱ्यास गेली. तेथें शिवाजीराव शिर्के दरोबस्त कबिलेसुद्धां हस्तगत जाहाले. प्रस्तुत त्याचा भाऊ माहाडांत कारभारी आहे. दुसरें मतगडचे सबनिसाचा कबिला ग्यावयासी अरमारें आलीं होतीं तींन तों कबिला हस्तगत जाहाला. इतक्यांत दर्यास वोहोट आला, अरमारें खुषकींत पडलीं. तों आम्हांकडील हुजरात पाये उतारें होऊन अरमारावरी मार केली. तेथील अरमारावरील खांसा होता तो मारिला. सदतीस माणूस धरून आणिलें व दाहा माणूस ठार केलें. इतक्यांत त्यांणीं अरमारांचीं शिडें सोडून तरप देऊन पाण्यांत नेली. वरकड कबिले व बंद बहुत आले आहेत. तहकिकांत होतां जें होईल तें उदयिक सेवेसी लिहून पाठऊं. जेव्हां स्वारी गेली तेव्हां समस्त बसोन राजाज्ञा व भिवराऊ व पंवार व शेखजी वगैरें तह केला कीं जें घेणें येईल त्यांत पायीच्यांचा येक विभाग व स्वाराचे दोन विभाग. कुळडाळ व कबिले हे हुजूर पाठवावें व जें येईल त्यांत हुजूरचा वांटा काढावा. तहनामा जाहाला. स्वारी गेली परंतु आम्ही व आमची हुजरात सर्वप्रकारें झुंजोन, जें कुळडाळ गुरूं दाहा हजार माणकरानें नेलें, मजला जेव्हां आम्हाकडील लोक म्हणत कीं काय? तेव्हां उत्तर दे कीं हरि गणेश जमा करून घेऊन येतो. निदानीं सर्व गुरें ढोरें कुळें जे सांपडलीं तें बेमानी करून घेऊन गेले. कांहीं दूर न पावलीं. तें कुरडु मानगडांत आच्छयादिली. माहाराजाची तों ताकीद, त्या भयास्तव जें करावयास जावें हुजरातीनें झुजावें, घेणें प्राप्त होईल तें सर्व प्रकारें खंडोजी माणकराचे नजर करावी ऐसा विचार; येथें तहनाम्याचा विचार राजश्री बाजी भिवराऊ यासी पुसावा तरी दारमदार करितात. आम्ही हुजरात सर्व चाकरी करून येतों. दुसरें भये मिळवावें तें मागितलें तरी स्वामी कार्यास अंतर होईल म्हणतात. स्वारी बरी जाहाली. लष्करांत च्यार हजार गुरूं आलें बाकी दाहा हजार गुरें व बंद येक चौपन्न बैल भरले व येक आठरा ऐसें घेऊन गेले. भिवरायांनीं व आमचे लोकीं त्याचें आंगीं लाऊन आले. समस्त आले, परंतु माणकर आला नाहीं तरी ये गोष्टीचा आमचा वशिला माहाराज आहे. येथें माहाडचा शह राखोन आमचे लोक स्वारीस गेले व बाजी भिवराऊ याची फौज झाडून गेली व पायीचेहि गेले. जे लोक आमचे गेले त्यांसी झुंजाचे तोंडी देऊन घेणें. आपण घेत ऐसें होतें, तरी हजारां माणसांनशी माणकर या जिल्यांत होता, परंतु गोरेगांव पाहिलें नाहीं. आतां मेहनत आम्हास सर्वत्रांची, तहनामाप्रमाणें सरकारचा वाटा घेऊन व कुळें घेऊन बाकी आमची आम्हांस देवणार धणी समर्थ आहेत. जिव्हाळ्याचें कुळ तों उचकिलें, लष्करांत कुळें आलीं. कांहीं अग्नोत्री ब्राम्हण कांहीं रयेत कांहीं

दरबारी, कांहीं चांभार ऐसें आले आहेत. शेलकें कुळें माणकराकडे गेलें; ये गोष्टीस कदाचित लटकी माहाराज मानतील तरी जेथें ठेविलीं आहेत तेथील ठिकाणें लाऊन धरून आणिलीं, परंतु घरांस आलीं परंतु तिकडे आहेत. घेणें व आणवणें बक्षिस करणें हें माहाराजाचे हातीं आहे. आम्ही सेवक लोकीं सेवा मात्र करावी. काल राजाज्ञा आम्ही सडे स्वारीत त्याहाव्या निमित्य लाडोली माहाडाहून अलीकडे कोसभर आहे तेथें गेलों होतों. राऊत आम्ही पुढें मोठ्या आलाकडेस गोळीच्या टप्यावरी गेलों होतों, तेही मेळ्याबाहीर आले होते. त्याचा शिपाई येक धरून आणिला व कही केली; आज बकाजी माहाडीक व चिमणाजी-पंत प्रात:कालीं व आठोले तलाव्यास गेले होते. सयाजी अठोले नीट चर पावेतों गेले होते. आठरा भांडीं जाहाली. अरमाराकडून बकाजी माहाडीक गेले, त्यांणीं तीन माणसें, दोघे ब्राम्हण येक शिपाई माहाडांतील धरिला. राजश्री बकाजी माहाडीक अजुर्दी आहेत, त्याची वासना आपण पुढें होतो, तोफा घेऊन माहाडास मोर्चे लावावे. येथें तोफा नाहींत. पाचाडच्या तोफास परवानगी मागतात. गोष्ट दिरंगावर पडली, यास्तव खटा आहेत. आज उद्यां जाईलसें दिसतें, तरी हे पत्र पावतांच याचें उत्तर उभाउभी याजमाणसाबराबर व बकाजी माहाडिकास दिलाशाचें पत्र पाठविलें पाहिजे. जाली खबर वरचेवरी लिहिणें म्हणोन माहाराजाची आज्ञा, खरें त्याहावें लागतें; यांत कोणी वाईट मानतील तरी माहाराज धणी समर्थ असतां काये चिंता आहे? सेवेसी श्रुत होये विज्ञापना. कितेक बंद माणसें धरिलीं येतात. कोणी आपले हातीं घेत नाहींत. आधीं सरकार पावेतों सरस कूल आणून देत नाहीं; आलें तरी जतन करीत नाहींत. काल कांहीं ब्राम्हण व कांहीं परवारी आले होते ते आमचे स्वाधीन केले आहेत. आम्ही उत्तर दिल्हें कीं, सरकारचीं कुळें आमचे हावालीं करणें. जतन करून कोणीं न करी टांकतां येत नाहीं. काल बाजी भिवराव यांणीं कांहीं अग्निहोत्री कांही श्रोत्री ऐसे पाठविले. आम्ही आपल्या गोटांत मधीं येक वाडा घातला आहे. असपास लाकडाचा मेढा, त्यास आसपास काठ्या; दोन तीन मांडव येक मराठे व येक ब्राम्हण, येक परभुचा घातला आहे. जो कोणी देईल तें ठेऊं. सर्व जमा जालियावर पोलादपुर पावतों आपण येऊं; पुढें पंनास माणूस देऊन साहेबांपाशीं तों पावितों. माहाराजाची आज्ञा कीं बाजी भिवराऊ याचे स्वाधीन करणें. घेत नाहींत. प्रत्येख येरशेर (?) आपल्याकडे पाठवितात. निदानीं त्याचा कारकून ब्राम्हण चवदा, परवारी आकरा, चांभार चवदा, काली डेऱ्यापुढें सोडून गेले. त्यांणीं आम्हांकडे पाठविले, त्यांत परवारी ब्राम्हण आम्ही ठेविले आहेत. पुढें शिर्कीं वगैरें यांचे कबिले आमचे स्वाधीन करणार. आपण शंभर माणूस देऊन

राखों. हरवणार नाहीं. जमा जालियावर खांसा येऊन पोलादपुरास चालवितों. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

¶*A copy of Deorao Meghasham's letter to king Shahu forwarded for the Peshwa's perusal. The writer mentions many items of news, e.g. the capture of Shivaji Shirke and his retinue and also the retinue of the Sabnis of Matgad fort with the latter of whom there ensued a fight and a peace concluded. The writer however charges Mankar with appropriating to himself a major portion of the cattle captured and complains against Baji Bhivrao. Lastly he makes a request to the King to send a letter of consolation to Bakaji Mahadik whom the writer had to refuse help for his intended attack on Mahad.*

No. 159] [*20-1-1735*

छ ९ रमजान.

श्रीमंगलमूर्ति

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनीत सेवक कृष्णाजी राम सां। नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील कुशल ता। छ ६ रमजान मु। जंजिरे मुंबै स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र व थैली जनरालास घेऊन आले ते छ ४ रमजानी पावले. जनरालची थैली त्यास दिली., त्याचे उतर थैली दिली आहे ती सेवसी सादर होतां सर्व मजकूर विदित होईल. जनराल मारानिले बोलिले जे, वेसेस आपण लिहावे तर बालाजी या मानाजी आंगरा याबा। येविसी तुमच्या खावंदाने मनावर धरून कल्याण प्रांतीं कलह माडावा योग्य नाही. जिकडील काजिया तिकडेसच जावा, येविसा त्वरा करावी येसे नाही. वसैच्या जनरालास लिहावें तर ते समजतील जे, सर्व कर्तुत्व आम्हापासून हे जाहाले आहे. याकरितां गोमांतकास विजुरेसे[1] लिहून पाठवितो. तेथून काय प्रत्योतर येते तें पाहातों. त्यासारिखें लिहून पाठवीन व आम्हास विचारीत होते, रा। मानाजी आंगरे याविसी राजश्री पंतप्रधान याणी लिहिले होतें ते कजिया उत्पन जाहाल्यापूर्वीं की, त्या आगोधर की, कुलाबेयास आसतां हे तेरीखवार समजवा. त्यास राजश्री आपा साहेबाहीं पत्र येविसी लिहिलें होतें ते आक्षेरशाहा याणी विचारल्यावर समजाविले होतें. ते स्मरण दिल्यावर प्रत्योतर दुसरे दिवसीं लिहून थैली पाठविली ती बा। गोंदजी जासूद रवाना जाहाली आसे. सेवेसी सादर होईल. यानंतर मानाजी आंगरे रेवंदंडेयास गेले म्हणून खबर येतांच आम्ही जनराल उभयतांस सांगितलेंच होतें. हा कुलाबो[2] तेथून निघायाचा यास आमच्या खावंदावाचून जाहाला नाहीं.

---

(1) Viceroy. २ मसलत.

याकरितां येसमई पुढार घेऊन साहित्य कराल तर प्रसंग आहे म्हणून सूच(ना) देली होती. ते स्मरण तुम्हास आसावें. बोलिल्यावर उतर दिले जे, ते खरें, परंतु तुमच्या खावंदाने पूर्वसूचना केली आसती तर आम्हास बोलावयास जागा होता. येविसीं तुम्हासीं पूर्वीच बोलोन चुकलो ते तुम्ही लिहिलें कीं नाही बोलिले. यास उतर केलें लिहिले. परंतु या जासुदांस रवाना पूर्वीच केले ते आतां पावले आसतील यैसे उतर दिलें. सेवसी श्रुत होये. जुने जनराल उदैक भोमवारी जाहाजांत चढणार. यांचे पत्र थैली पेसजी छ ९ शाबानी बा। भिकाजी जासूद रवाना जाहाली ती सेवेसी सादर जाहाली आसावी. तिचे उतर हे आसतां करावें योग्य होतें. आतां हे जावयास निघाले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram writes from Bombay to the Peshwa his interview with the new Governor on the attitude of Manaji Angria and reports the departure of the previous Governor for Europe.*

No. 160] [*January 1734*

नकल

बाजी भिवराव याचे
पत्राची नकल.

श्री

विनंती उपरी. वाडी घेऊन आजि पनस दिवस जाले. अद्याप तुमची आज्ञा नाहीं. तेव्हा लस्करचा काय विचार, पुढें काय विचार ? तुम्ही तो हच कर्म केले आहे. आम्ही तो लेकरे आहो. देखिले नाही आणि हा मनसबा थोर. याचा विचार त्वत्या केला पाहिजे. दुसरियाचा भरवसा येथे नाहीं. तुम्ही समस्त सदरेस मिळोन एक दिवस मनसबा कराल, तेव्हां आम्हास ल्याहाल. तोवर आम्ही येथें बसोन काय करावें? आम्ही घाबरे होऊन लिहिले म्हणून रागास याल तरी आले न पाहिजे. आम्हास येथे आज्ञा करून सेवा घे ऐसा असता तरी आम्ही इतके ल्याहावयासी गरज नाहीं, आणि स्वामीची आज्ञा येती कीं त्याचे आज्ञेत वर्तणे, त्यासी येथे कोणाचे आज्ञेत वर्तावें? खासा राजाज्ञा व सेखमिरा व लिंगोजी हवलदार व विठ्ठलराव व तोपखानी देवराऊ व हुजरे व कितेक खासे लोक ऐसे कारभारी आहेत. यामध्यें आम्ही कोणाचे आज्ञेप्रमाणे वर्तावें, काय करावे, ऐसे संकटामध्यें पडिलो आहों. यामध्ये वडिलानी या संकटातून काडिले पाहिजे. फौज तो पाठविली आहे. जोराने रेटले ते रेटून कबिले सांपडतील ते घेऊन येतील. बकाजी महाडीकहि आले आहेत. महाडचे वर्तमान तर कोटा-भोवता मेढा घातला आहे. भोवते मैदान केले आहे. तोफखेरीज काही काम

होत नाहीं ऐसे आहे. केवल बलानें कांही महाड येत नाहीं. मोरचे देऊन बैसले पाहिजे, तेव्हा कार्य होईल. यामध्ये खासा सरदार मेढा पाहिजे ऐसे आहे. पचयातीने स्वामी कार्य होत नाही. सुचला अर्थ लिहिला आहे. राजश्री सरलष्कराकडील सरदार आहेत त्याची याद पाठविली आहे, त्यांचे नावे राजपत्रे पाठविली पाहिजेत. स्वामी कार्यावर एकनिष्ट आहेत. हिंदुराऊ सोमवंसी याकडील रा आपाजी सोमवसी फौजेनसी येथे आहेत. त्याचा सर्व अभिमान तुम्हास आहे. उदाजी पवार हे काही बोलत नाहीं आणि अवसानी पुढे काय करील ते पाहावें. त्याची सरदारी फुटकी आहे, ते अर्जवी आहेत. समस्तासी बरे ऐसे मात्र म्हणत आहेत. ऐसा येथील विचार आहे. हा विचार सर्वहि ध्यानास आणून लिहिले पाहिजे. मजला ल्याहावयासहि येत नाहीं. आणि हे तो कार्य ऐसे पडले आहे! वडिलाप्रति विशेस काय लिहिणे. बुधीवाद वचेंवर लिहीत गेले पाहिजे. वेडेवाकडे लिहिले आहे म्हणून रागास आले न पाहिजे. कोरे कागद चार दस्ते पाठविले पा. येथे मिळत नाहीत. तरी आगत्य पा पाहिजेत हे विनंती.

¶*Baji Bhivrao, an officer of the Peshwa, writes to Ambaji Purandare to remove the obstacles which come in his way in the fighting near Mahad. The letter contains news of varied character and the activities of various workers.*

No. 161] [*January 1735*

श्रीभार्गवराम

श्रीमंत परमहंस स्वामी याही

सहश्रायु चिरंजीव विजयीभव श्रीसेवक अपा यासी आज्ञा केली यैसीजे. तुम्हास पत्रे पाठविली त्या पत्री दमाजीवर स्वारी करावी व.कोकणचे वर्तमान लिहिले त्यास गाईकवाडाचा व कोकणचा कांहींच उत्तर पाठविले नाहीं. तर आजच कांहीं आम्ही नादान जाहालो नाहीं. बरे उत्तर पाठविले नाहीं तरी यात कांहीं आमचे जात नाहीं. वरकड पूर्वापासून तुम्हास लेहून पाठवितो व हल्ली पत्र पाठविले आहे तर राधाबाई व मानसिंग थोरात याचे चालविलीयासी पृथ्वीतील सरदार जेवढे आहेत तेवढे सुखी होतील. राधाबाई अन्नास महाग जाहाली. यासमई त्याचा अभिमान धरून चालविलीयासी श्री संतोसी होईल व आम्ही संतोषी होऊ. तर चित्तात कोणेक गोष्ट न आणिता चालविले पाहिजे. चिरंजीव रायानीं येतासमई पुणेरी (?) त्यासी आश्वासन दिल्हेच आहे व आम्ही लिहिले आहें तर चित्तावर धरिले पाहिजे. वरकड उदाजी पवार कर्ता सरदार आहे. पलीकडील वर्सी राजश्रीनी उदाजीस रायगड प्रांतें शामलावर पाठविला.

गाडी पाचाड येथें सिदी अंबर अफवानी ,याणें पांच सातसे माणूस जमावानसी युद्धास उभा राहिला तेसमयीं उदाजीनें त्याचा मोड करोन अफवानीचे सीर कापून आणिले. महाड बाणकोट हस्त केला. सिदी साद यासी धास्त लाविली. रायेगडचे मुर्चे उठविले. मग गोवलकोठावर गेला; तेथेंहि शर्तीच केली. तो राजश्रीकडील बाबूराऊ यासी व उदाजी यासी न पडे येसे जाहाले म्हणून वरते आले. तर उदाजीसारीखा सरदार तुम्हाकडेस आला तर त्याचा सरंजाम करून चालविलियासी तो लाखाचे कामास येईल तर त्याचे चालविले पाहिजे. विशेष काय लिहिणें हे आज्ञा. ईश्वरे तुम्हास येश दिल्हे. आम्ही तुमचे जागलीं. तुम्ह आमचे शब्द मानितां, म्हणून आम्ही तुम्हास लिहिले तर तुम्ही आमचे वचन मान्य करून थोरात याचे चालविले पाहिजे. जर वचन न आईका तर मग आपणास लोकामध्यें श्रीचे कां म्हणवितां व आम्हास महत्व कशास देतो ? तुम्ही जाणते सुज्ञ अहा. विस्तारे काय लिहिणे हे आज्ञा.

¶*Brahmendra Swami recommends Radhabai and Mansing Thorat to the good graces of Chimaji Appa and asks him to grant them some means of maintenance. The Swami also recounts the brave deeds of Udaji Pawar in the expedition at Raygad and recommends him also to his favour.*

No. 162] [*1-2-173*

छ ८ रमजान

श्री

पुरवणी राजश्री राऊ
ता राजश्री अपा स्वामीचे
शेवेसी

विनंती उपरी. राजश्री स्वामीनी आज्ञा केली की, आजम सेख याकूत याच्या कबिलियास राहावयास येक गाव पुण्यानजीक देणे म्हणून पूर्वी सागितले त्याप्रमाणे स्वामीस लेहून पाठविले. त्यास छ ९ रमजानी सेखजीने आपला पुत्र राजश्री स्वामीकडे पाठविला की आपला कबिला घाटावर आला, त्यास राहावयास स्थल मिलत नाही. याउपरी आपल्यास आज्ञा देणे म्हणून बहुत रदबदल केली. त्यावरून मागती मजला आज्ञा केली की राजश्री पंतप्रधान यास पत्र पाठऊन दाहा पंधरा वीस चावर ज्या गावास जमीन आसेल आसा येक गाव पुणेदेशी कबिला ठेवावयास तर्त देणे म्हणन पत्र लेहन गाव देववणे. त्या

वरून स्वामास पत्र पाठविले आहे तरी स्वामींनी सेखजांच्या कोबोलेयास राहावयास गाव नेमून दिल्हा पाहिजे. छ ६ रमजानी . भिकाजी प्रभु काही कार्यास प्राथःकाली राजश्री फतेसिंगबावाच्या घरास पाठविले होते. त्यांनी येऊन सांगितले की, आजम सेख याकुद खासा राजश्री फतेसिंगबावाच्या घरास जाऊन बहुत निरोपाचा आतिशये केला. मग त्यास सागितले की, आजी राजश्री स्वामी सिकारीस गेले आहेत. ते आलियांवर तुमचेविसी विनंती करून. मग तुम्हास सागावयाचे ते सागोन त्यास मौजे खडकी ता। हवेली प्रांत पुणे हा गाव व निमे मुकासा राजश्री फतेसिगबावा यांजकडे आहे, त्यानी आपले तर्फेची सनद करून सेखजीस दिल्ही. येैसे वर्तमान आहे. स्वामीस वर्तमान कलावे याकरिता लिहिले आसे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*The Peshwa is informed of the arrangements made for the lodging of the family of Shaikh Yakud in the village of Khadki near Poona.*

No. 163] [*Recd. 2-2-1734.*

छ ८ रमजान

श्री

पुरवणी राजश्री राऊ व ता। राजश्री

आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री संभाजी आंगरे यानी विनंतीपत्र राजश्री स्वामीस पाठविले होते, त्याची नकल स्वामीकडे पूर्वी लेहून पाठविली होती, त्यावरून वर्तमान विदित जाले असेल. छ ९ रमजानी संध्याकाळी राजश्री स्वामीनी मारनिलेच्या पत्राचे उतर लेहून पाठविले. बहुत समाधानपूर्वक पत्र पाठविले त्यामध्ये मजकूर लिहिला, कीं आंजनवेली गोवलकोट याजवरी फौजा व हशम आठा दिवसानी पाठऊन देतो. तुम्ही जमावानसी येऊन स्थळे हस्तगत केली पाहिजेत. माहाडास मुर्चे लावावे म्हणून सरदारास पत्रे पाठविली आहेत. माहाड हस्तगत होईल येैसा पत्रांत मजकूर लेहून त्याजकडे पत्र पाठविले. विदित जाले पाहिजे. राजश्री कृष्णाजी पवार विश्वासराऊ व उदाजी पवार राजश्री हरिपंत राजज्ञा राजश्री बाजी भिवराऊ व बकाजी महाडीक यांस पत्रें पाठविली कीं तुमच्या विचारे जाले तर माहाडास मुर्चे देऊन तूर्त लकडकोट जाळून टाकणे, ठाणे हस्तगत करणे, म्हणोन पत्रे पाठविली आहेत. त्यास पत्रे पावलियावर ते विचार काय करतील,

तेथून लेहून पाठावेतील, ते वर्तमान स्वामीस लेहून पाठऊन. विदित जाले पाहिजे. छ ९ रमजानी संध्याकाली राजश्री स्वामीनी दोघे चोपदार पत्रे देऊन स्वामीकडे व त्रिवर्गाकडे पाठविले की सत्वर दर्शनास येणे. विदित जाले पाहिजे. राजश्री जानोजी नाईक (निं ?) बालकर जमावानसी महिनाभर येऊन राहिले आहेत, त्यास काली संध्याकाळी राजश्री जानोपंत यास आज्ञा केली कीं दीड हजार रुपये त्यास खर्चास पाठऊन देणे. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Letter from Shahu's Court to Bajirao and his brother, informing them what steps Shahu had taken to continue vigorously the siege of Mahad.

No. 164] [*Recd. 3-2-1734*

छ ९ रमजान.

श्री

पुरवणी राजश्री राऊ व ता राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. किले रायगड वगैरे किले हस्तगत जाले आहेत या किलिया-वर देशाचे माणूस इतबारी व मर्दाने तरवार मारी ऐसे ठेविले पाहिजे. ये गोष्टीचा विचार राजश्री स्वामीनी आपल्या मनांत योजून तजवीज काढली कीं कुल आपले स्वराज्य आहे तेथील वतनदार देशमुख व पाटील मातबर सरदार जाले आहेत. तरवार मारिताती. सरदारी करिताती. त्याचे भाऊबंद गावी आहेत त्यास वाढविलीयानें तेहि * * (या पुढील बंद फाटले आहेत)

राजश्री माहादाजी वाटगे यास सा(गोन पाठ)विले की परगणे मलवडी येथील लोक चाकरीस संभर पाठऊन देणे. मान खटाव किरकोळ तर्फा राहिल्या त्याच्या जमीदारास पत्रे पाठविली याप्रमाणे प्रतिनिधि याजकडील जिल्हेतील लोक आणविले. याचप्रमाणे स्वामीचे जिल्हेतील लोक व राजश्री पंतसाचिव याचे जिल्हेतील लोक आणवितील त्यास स्वामी व राजश्री नारबावा व सुमंत दरबारास आलियावर स्वामीचे जिल्हेतील माणुसें आणवावी ऐसा विचार आहे. त्यामध्यें अगोधर आज्ञा करितील की काय हे कलत नाहीं. स्वामीस वर्तमान तपसिलें कलावे या करि (पुढील पान फाटलें)

¶A mutilated letter from Shahu's Court to Bajirao and Chimaji informing them of Shahu's plan for garrisoning Raygad with picked and faithful soldiers from the various places in the Satara District.

No. 165] [*22-1-1735*

छ १६ रमजान

श्रीमंगलमूर्ति

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनीत सेवक कृष्णाजी राम सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील कुशल ता छ ११ रमजान मुा बंदर मुंबै स्वामीचे कृपा द्रिष्टी करून यथास्थित असे विशेष. स्वामीचें आज्ञापत्र लाखोटे २ लिहिले छ ३ रमजानचे व थैली १ अजम आनर हार्नजान गवर्नर जनराल बंदर मार यास होती. ते घेऊन जासूद छ ९ मिनहूस सुखरूप बंदर मजकुरी पावले. जनराल मारनिलेची थैली प्रविष्ट केली व आज्ञापत्रार्थ दर्शवायाचा तो प्रसंगोपात दर्शविला. यैशास पेशजी जनराल मारनिलेनी स्वामीच्या पत्राचे उतर लिहून रवाना केल्यानंतर वसैच्या जनरालचे पत्र यांस आलें, त्यावरून रा। मानाजी आंगरे यांस व चेऊलच्या कपितानास पत्रें लिहिलीं होती, कीं येकमेकावर नाली न माराव्या, तकूब करावे. दोहों चहू दिवसीं उभयतांच्या सल्यत्वविषई दुसरे पत्र लिहून पाठवितों, त्यासारिखे आपले मनुष्य पाठवावें, यैसे लिहिले गेले होतें. त्यास कपितान मारनिलेचे उतर आलें व रा। मानाजी मारनिलेचे उतर आले नाही. पाईवाटेने रवाना करणार. यैशास स्वामीकडील जासूद येऊन पोहचले; यास्तव सल्यत्वाचा मजकूरविषई जाब लिहिला आहे. थैली हे सेवेसी सादर होतां सर्वार्थ विदित होईल. त्याप्रो प्रत्योतर करावयास स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये. जनराल मारनिलेच्या चितांत आहे जे, स्वामीनी येविषई मन घालून आपले तर्फेचा येक सभ्य मनुष्य पाठवावा आणि हा कथला चुके तो पदार्थ करावा, उतम आहे. येविसी स्वामीचें उतर काय येईल ते पाहावें. त्यासारिखे मन घालून नीट करून द्यावें. प्रत्योतराची वाट लक्षिताहेत. सेवेसी श्रुत होये. या पत्रापूर्वी छ ६ मिनहूस थैली आणि विनंतीपत्र घेऊन जासूद गेले ते सेवेसी सादर जाहाले असतील; त्यावरून सर्वार्थ विदित जाहला असावा. पुढेहि स्वामींची आज्ञा असेल तैसी वर्तणूक होईल. जुने जनराल छ ८ रोज बुधवारी त्रितीय प्रहरी स्वार जाहाले. सेवेस श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News-letter by Krishnaji Ram from Bombay to the Peshwa, communicating the Governor's attitude towards Manaji Angria and the Portuguese Governor of Bassein and asking orders about the terms of an agreement.*

5326

No. 166] [18-2-1734?

पौ छ ८ सवाल

श्री

आसीर्वाद उपरी. लक्ष्मण हरि व कृष्णाजी माहादेव व याकुतखान यांस पत्रे पाठविली आहेत हे तुम्ही तल्यास कृष्णाजी माहादेव याजपासी पावणे. ते पुढे पाऊन देतील. जरी कृष्णाजी माहादेव तल्यास नसिले तरी लक्ष्मण हरीपासी पावणे. वरकड लोकास पत्रे पाठविली असेत, ते ज्यासी त्यास तिलगूलसमेत पाठवणें. जाणिजे छ २४ रमजान हे + आसीर्वाद.

¶*Chimaji Appa sends the Sankrant greetings to several officers in Konkan.*

No. 167] [1-3-1734

तालीक

श्री

सेवेसी विज्ञापना ताा छ ७ माहे जिलकाद चे खाडीवरी माहाराजे प्रतापे खुशाल आहों. काली समस्तानी बसून विचार केला. दो प्रहरा रात्री खाडी उतरावी, चिपडचिपर्डे[१] होतां हला करावी, त्यास खाडी पलाव लोक जाताच चहूकडून धुमाही आल्या तेच जाऊ मेढ्यास लागलो. शामले सावरून मार केली. तेथे आमची माणसे ठार जाली व जखमी जाली बी तपसील.

ठार जाली माणसें

१ निाा मोघम मानाजी कोली.

१ दिाा हशम तानाजी पोवार.

२ राणोजी सालोखी दिाा तोफखाना व कोडजी शेलार

१ रामजी भिषे खासगत बारगीर आमचे घरचा

५

जखमी गोली रेजागिरी

१ आबाजी हुजरे पोटरीस गोळी

२ दिाा हशम

१ कान्होजी तिलिका दिाा दिवे जेजालची गोळी लागली.

१ धोंडजी उतकर आंगठा उडाला.

२

\+ पत्र चिमाजीआपाचें.

१ दिसूं लागतांच.

३ निा जमाव येमाजीपंत
- १ हरजी इंगले निा सिवजी पत्याने
- १ बालेजी पोवार दिा धर्मोजी शेलार
- १ राजजी दलवी दिा गोदजी खांबकर.

३

८

० दिमत तोफखानाजखम गोली.
- १ भानजी सुगडा
- १ सकराजी सेलार
- १ नावजी पारठा
- १ सकराजी महाडीक
- १ संभाजी सुरवा
- १ बहिरजी सावत.
- १ बाबाजी कर्णेकर्रा
- २ पस्वारी

९

१२ दिा मोघम.
- १ सुर्याजी चादेकर जगी पाठीवर आगावरी.
- १ गोदजी पारधी बोटास गोली गवराज (?) आहेत.
- १ * लाजबुरा पोटरीस
- १ गगाजी चारघा
- १ सुभानजी गोलमरे गोली दंडास पार जाली.
- १ येसजी कांभे रेजगरी
- १ संभाजी रेजगीर
- १ सुर्याजीचे मांडीस गोली.
- १ गोदजी पोवार
- १ भिकाजी पोवार
- १ बाळाजी गुरव
- १ संकराजी चोरघे रेजगिरी

१२

येकून सदरहु प्रमाणे ठार व जखमी जाले यासिवाय धोंडे व सूल लागले बेसुमार आहेत. वरकड युद्ध प्रसंगीचे वर्तमान तुबाजी जगनाथ सांगतां कलेल. फौज उठोन चालिली. परवा पठानकोटातून गेले हे खबर येकून खासा सिदीसात आला आहे, म्हणून वार्ता यक जबन आहे. सर्व कोकणे आपले परावे कलत नाहींत. भेद नित्य जातो.

केली परंतु ईश्वरास जे कर्णे ते जाले. पुढें जे होईल ईश्वर यश देईल ते खरे. आम्ही तो चर घेऊन देयास सिध आहोत, परंतु उतावली व समस्तापली जाली. समस्तानी बसून विचार केलीयावरी मोडतां नये. मोडते घ्यावे तर त्यांनीं नामर्द म्हणावें येविसी श्रुत होय हे विज्ञापना

¶*A report of a fight, probably at Gowalkot, communicating detailed casualties of the killed and the wounded.*

5328

No. 168] [4-3-1734

छ ९ मोहरम.

श्री

राजश्रीं बाजीराव पंडित

प्रधान गोसांवी यांसी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंग भोसले दंडवत विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. जावजी लाड सरनोबत किले रायेगड यासी शामलाने मारिले, त्यासी जावजी मजकूर आपले कार्यामुले मारिला. त्यासी त्याच्या मुलाचे चालवावे लागते. यैसियासी राजश्री खंडोजी माणकर याणी गुरे ढोरे नेली आहेत तरी येविसी त्यासी पत्र देऊन त्याची बिसाद गुरू ढोर जे नेले आसेल ते देविले पाहिजे. जाणिजे छ ९ सवाल बहुत काये लिहिणे लोभ आसो दीजे. हे विनंती.

¶*Fatesing Bhonsle requests the Peshwa to grant an allowance to the sons of Javji Lad of Raygad who suffered death in the Peshwa's cause at the hands of the Sidi.*

No. 169] [5-3-1734 ?

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १० सवाल जाणून स्वकीये ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे. यानंतर आपण पत्र पाठविले तेथे लेहून पाठविले, कीं राजश्री रायानी राजश्री गोविंद कृष्ण यासी राजमाचीहून कोथलियासी जावयाची आज्ञा केली आहे. ते कोथलियासी गेलेच असतील. त्याजवळ जमाव असिला पाहिजे. तरी पत्रदर्शनी जमाव त्याजकडे पाठऊन देणे, म्हणून लिा. त्यावरून पत्र पावताच येथून जमाव लोक ७५ पाऊणसे पाठविले असेत. कलल पाहिजे. बहुत काय लिहिणे लोभ+ असो दीजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi informs Chimaji Appa of a force being despatched to Govind Krishna for capturing the fort of Kothala.*

+ 'भ'पासून बाळबोध अक्षरें वासुदेव जोशाचे हातचीं.

No: 170] [15-3-1734

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंतप्रधान
व ता रा आपा स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक कोंडाजीराव सिंदे व समस्त सरदार सां दंडवत प्रार्थना. येथील क्षेम ता छ २० सवालपर्यंत मुा बाणकोट स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. पूर्वी नसरापूरचे मुकामीहून अज्ञा केली आणि स्वारीस पाठविले त्यास ते समई आज्ञा होती की राईगडचा वेढा उठोन माहाड फते जाले म्हणजे तुम्हीं हुजूर येणे म्हणून आज्ञा. त्यास स्वामीचे पुण्यप्रतापे ते कार्य सिध होऊन बाणकोटहि हस्तगत जाला. स्वामीचे पुण्ये समर्थ आहे, तेणेकरून सर्व कार्ये जाली. आमच्यानेहि जे सेवा जाली तें केली. प्रस्तुत अखेरसाल आहे, अम्हास दोन महिने घरास जावयाची अज्ञा केली पा. च्यार वरशे जाली, अद्याप लोक घरास गेले नाही, यास्तव घरास जायास आज्ञा करावी. आज्ञेप्रो दर्शनास येऊन मग निरोप घेऊन घरास जाऊ. लोक येथे आहेत, त्याची कितेकांची लग्ने होणे आहेत व कितेकाचे घरची अनान गत आहे लोक आमचे हाती याउपरी नाही, हे साकल्य वृत्त जिवाजी मोरे सेवेसी निवेदन करितील त्यावरून श्रुत होईल. चितात आणून आपले चरणाचे दर्शन होऊन आपले माणसाची अणी (आ)मची भेट होये ते करणार स्वामी समर्थ अहेत. बहुत ल्याहावे तरी स्वामी सर्वज्ञ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विा.

आज्ञाधारक नारो बलाल सा ना प्रार्थना जे. येथील सारे लोकाचा अर्थ आहे तो श्रीमंत रा बाजी भिवराऊ याणी सेवेसी लिा आहे त्यावरून श्रुत होईल. स्वामीचे पायाचे दर्शन होये ते आज्ञा केली पा सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Kondajirao Sindia and some other sardars communicate to the Peshwa the signal victory which was achieved by the capture of Bankot, Raygad and Mahad. They request him to allow them leave to go home for some time.*

No. 171] [15-3-1734?

पौ छ २० सवाल

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री प्रातिनिधि परिछिन[१] मुदईपणा करून आठसे राऊत गेले म्हणून बोलिले आहेत. तरी राजश्री रामचंद्र हरिबराबर कोण कोण सरदार

१ दावेदार.

किर्ता राऊतांचे हे तपसीलवार लेहून पाठविले पाहिजे. ते राऊत कोणे मुलुकचे कोणेकडे त्यांची घरें आहेत हे सविस्तर लेहून पाठवावें. स्वामी च्यारसे सातसे आठसे जे राऊत पाठविले असतील त्याची यादी आपले स्वहस्तें खरीखुरी लेहून पाठवावी. येविसी अनमान केला न पाहिजे. सेवेसी विज्ञापना.

¶*Chimaji Appa is requested to supply details of the force despatched to work under Ramchandra Hari as the Pratinidhi has represented that the Peshwa has despatched only a small contingent of 800.*

No. 172] [19-3-1734

श्री

राजश्री खंडोजी माणकर गोसावी

यांसी

अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्य श्री बाजाराऊ बलाल प्रधान आसीर्वाद सुहूर सन आर्बा सलासैन मयां आलफ. राजश्री शंकराजी केशव यास पाठविले आहे. यास कितेक आर्थ मुखवचने सागितला आहे व यादी पाठविली आहे. तो आर्थ चितात आणून वर्तणूक करणे. जाणिजे छ २४ सवाल बहुत काये लिहिणे.

¶*The Peshwa sends a communication to Khandoji Mankar and asks him to act according to the instructions contained therein.*

No. 173] [27-3-1734

श्री

विनंती उपरी. ता। छ २ जिलकाद सौम्यवासर मुकाम नजीक बाणकोट वर्तमान येथास्थित असें विशेष. जिवाजी खिजमतगार यासमागमे पत्रे पाठविली ती पात्रोन लेखनार्थ कलोन संतोशाभिवृधि जाली. तेथे कितेक कितेक विशदे आज्ञा की, इतुके दिवस श्रमसाहास करून स्वामिकार्य सिधीते पावविले तैसे आणखी येका मासाकरितां उतावली न करिता राहोन स्वामी नाखूस न होत ते करावे, म्हणून कितेक प्रकारे आज्ञाः त्यास स्वामीची आज्ञा मान्यच करून राहिलो. स्वामीचे पुण्यप्रतापेकरून या मुलकामध्ये हे दिवसपर्येत फौज टिकोन राहिली. परंतु पुढे आपण रा। स्वामीस व रा। तात्यांस पत्रे पाठऊन किलेदार व हासम बाणकोटास पाठऊन बाणकोटचा बंदोबस्ती करून आम्हास भेटीस यावयाची आज्ञा केली पाहिजे. स्वामीनी पत्री आज्ञा केली की हावजी सेडगर किलेदार करून पाठविले

आहेत यैसियासी हावजी (बावाजी) सेडगराने गंतव्य केले. ते वर्तमान सेवेसी लिहून पाठविलेच आहे, त्यावरून निवेदन जालेच असेल. राश्रीकडून रामचंद्र मिर्धे कोट बांधावयास आला त्यास माणूस तों कोणी कामास मिलत नाही. परंतु दाहापाच माणूस गोरगरीब मिळऊन काम चाली लाविले आहे त्यास जे होईल ते पाहावे. त्याच्या मनामध्ये की दोनच्यारसे माणूस लस्करचे देऊन कोट सिधे ते पाववावा. त्यास ते गोष्ट घडोन येत नाही म्हणून श्रमी आहेत. ते काये लिहून पाठवितील ते न कले. चोपदार मजकूर याने पैकाहि इमारतीच्या खर्चाबद्दल आणिला आहे म्हणून ऐकिले आहे. वर्तते ते वर्तमान सेवेसी लिहून पाठविले आहे त्यावरून कलेल. याउपरी कोटाची बंदोबस्ती होऊन सत्वर ये ते केलिया उतम आहे. घोडियास धान्य तो नाही. यानंतर मनुषासहि मिलत नाही. स्वामीनी लस्करचा आब राखावा हे उचित आहे. या स्थली आपलीच फौज म्हणून टिकोन राहिली. सेवकलोकीं वारंवार ल्याहावेसे काये आहे ? वडिलास उतम दिसोन येईल तें केले पाहिजे. वरचेवर राकडे पत्रें पाठवावयास अनमान केला न पाहिजे. स्वामी तो पाठवीतच असतील, परंतु सूचनार्थ लिा आहे. दुसराहि किलेदार राजश्री याचप्रकारें योजून लिहितील; त्याचे वर्तमान फिरून पावेतो दिवसगती लागेल तो येथे दुर्घट विचार येऊन पडिला आहे. यामधे स्वामी समर्थ आहेत. बहुत काये लिहिणे कृपा लोभ आसो दिल्हा पाहिजे हे विनंति.

¶*Baji Bhivrao requests the Peshwa to send another Killedar to take charge of Bankot in the place of Havji Sedgar who has run away. The writer also asks the Peshwa to call him back.*

No. 174] [*27-3-1734*

छ २ जिलकाद

श्री

विनंती उपरी. इश्वरदयेकरून येथून उलगडा आठा पंधरा दिवसानी जालाच तर रा स्वामीची आज्ञा येईल की गोवलकोटास जाणे. त्यास स्वामीच्या फौजेचा उपर आहे त्यास सामान आहे ते सर्व जाया जाले आहे. दुसरे सामान पाठविलीयाने सेवकापासून सेवा होऊन येईल. नाही तर याच सामानानसी जावे लागलेच तर सर्वांची गति त्याप्रकारे आमचीहि होईल यैसे आहे. यामधे वडिलानी विचार करणे तो दूरंदेसी पाहून केला पाहिजे. आधी येथून उलगडा होणे तो नाही. वाच्याने (?) तो बहुत कस्ट केले आहे. येथील सर्व सुख आहे ते पत्री लिहिता पुरवत नाही. हे सर्वजाण वडील आहेत. आम्ही तो येथे खुशाल आहे. जे स्वामीच्या चितास येईल ते केले पाहिजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao asks for full equipment for fighting, in case he has to take charge of the expedition against Gowalkot.*

No. 175] [पा 29-3-1734?

छ ४ जिलकाद

श्री

पुा राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी नरोतम दवे व नथू ठाकूर यास इंगरजा रुा १००० दोन हजार स्वामीनी देविले, त्यास येथे इंगरेजी रुा मिळत नाही. चालीचे रुा दोन हजार देत होतो, त्यांस त्याणी घेतले नाहीं. कलावे याकरितां लिहिले असे. बहुत काय लिहिणे लोभ केला पाहिजे. चालीचे त्याणी घेतले तरी देऊन स्वामीस लेहून पाठऊ. रा खंडोजी माणकर व होनाजी बलकवडे यांजकडील जिल्हा दूर करून राजश्री बाबूराव विश्वनाथ यांस सांगितला येसे वर्तमान येकितों, त्यास काय वर्तमान तें ल्याहावें. खंडोजी माणकर यांजकडे लोक पाठविले त्यास त्याणीं श्रमी केलें. लोकांस कांही पावले नाहीं, येसे आहे. कलले पाहिजे. लोकास काही पावत नाही याकरितां दोघे चौघे उठोन येतात कलले पाहिजे. रायेगड वगैरे किले प्रांत राजपुरी येथे जिनस पाठवणे म्हणून पूर्वी लिहिले, त्यास मीठ येकुणीस खंडी कोठीच्या बैलावरी रवाना केले. याउपरी हलद मिरे सुपारी वगैरे जिनस रवाना करावा की नाही ते आज्ञा करावी. त्याप्रमाणे वर्तणूक करून. बहुत काये लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi intimates the Peshwa that Rs. 2,000 offered by him to Narottam Dave and Nathu Thakore were not accepted by them as they were not in English coin. He further complains against Khandoji Mankar for not giving his men their pay sent to him by the writer.*

No. 176] [March 1734

श्री

विनती उपरी. मानाजी घाटगे व पाटलोजी खुले व रंभाजी घाटगे व कोकरे व रुणोजी बरगे यैसे अहिर्णिसी कापडासाठी विनती करतात. त्याचा तो अन्याये नाहीं. येक चिरकूट घरचे आणले ते फाटून गेले. पुढे उघडे आहेत. वरकड किरकोली पतके व सिलेदार याचीहि वाट येच रीतीची आहे. याचा काये विचार तो करून आज्ञा लिहिली पाहिजे. येथे काही चिरकूट मिलत नाही. यैसे आहे. आणि आम्हीहि दाबून आजीवर राखिले आहे. याउपरी काही विचार करावा उतम आहे. राजश्री तात्यांचें पत्री राजश्री स्वामीचे पत्र आम्हाकडे न कले प्रा (न मले=नेमलेप्रा?) आले होते. त्याचे उतर आम्हीं पाठविले

आहे. पुडे जे आज्ञा होईल त्या प्रा वर्तणुक करू. रामचंद्र चोपदार मेढा होता तेथे कोट बांधत आहे. आम्हासी आहिर्णिसी माणसे देणे म्हणून कटकट करीत आहे. त्याणे मजुरी माणसे मेलऊन कोटाचे काम चाली लाविले आहे. गडगा मात्र रचीत आहे. पहिले रचले होते मोहाडियाने (?) ते आम्हींहि गोल्याने हिदहिदे केले आहे. त्यावर हाहि रचीत आहे, तो हुजूर काये लिहिल हे कलत नाहीं. लोकापासी बोलतो की भलते मिस करून टाकून जाईन यैसे म्हणत आहे. होईल ते पाहावें. आम्हास येथे राहावयाचे सकट जाले आहे आणि हे भलतेच मधे येऊन पडत आहे. हे स्वामीस कलावे म्हणून लिहिले आहे. आम्हास तो राजश्री स्वामीची फिकीर काये आहे ? सेवेसी कलावे म्हणून लिहिले आहे. धोंडे डोईवर आणि यैसा आम्हापासी कोणी नाही हे विनंति.

¶*Baji Bhivrao asks the Peshwa for some clothing and uniforms for his men. He gives details of the construction work that was in progress at Bankot.*

No. 177] [*About March 1734*

श्री

विनंती उपरी. गोवलकोट अंजनवेलीकडील वर्तमान तरी राजश्री आनंदराऊ रघुनाथ व लिंगोजी हवालदार याणी लिहिले आहे. अद्यप राजश्री संभाजी अगरे आले नाहीत. येणार येसी बोली आहे. गोवलकोटास मोर्चे लाविले आहेत. अंजनवेलीस मोर्चे पुढे लाविणार येसी बोली आहे. राजश्री स्वामीचे पुन्यप्रतापे जे होणे ते होईल. कलले पाहिजे. सिवाजी माहादेव दिा राजश्री आंबाजीपंत तात्या यास रुपये द्यावयाची आज्ञा केली, त्यावरून रुपये ५० पंना(स) त्याजकडे गोवलकोटास पाठऊन दिल्हे. हे +विनंती.

¶*Baji Bhivrao to the Peshwa, reporting the siege of Gowalkot and his intention of investing Anjanwel.*

No. 178] [*6-4-1734*

पो

छ १२ जिलकाद

श्री

विनंती उपरी. बाणकोटी राहावे यापेक्षा गोवलकोटास जावे समस्ताबाा जे होईल ते करावे म्हणून लिहिले. त्यास हे तो उतमच आहे. येथे गेले दिवस

\+ येथून अक्षर बाजी भीवराव चें.

जातात, तेथे साहिबकाम तरी आहे. नावेनंग[१] आहे हे गोष्ट खरीच आहे. परंतु आजीवर साहा महिने लोकानी कस्ट केले, कोणास चिरकूट येक नाही आणि घोडियामध्ये बळ नाहीत. त्याहीमध्ये फौजा गेल्या ते समई जाणे होते तर लोक कोणी मागार घेत नवते. समागमामुळे जातच होते. जो न जाये त्यावर राज्याचें मसलतीचे आपेश येते. दो चौ गोष्टीने लोक जाते. याउपरी जे दिवसी येथून कूच होईल तेच दिवसी लोक उठोन स्वामीकडे येतील. येथेच बहुत दिवस लागले तर येथेच कोणी राहात नाहीत. रा माहादाजी घाटगे यांचे पत्र आम्हास आले ते पाठविले आहे. येसवंतराव भोसले यांचे पत्र तो स्वामीस आले आहे त्यावरून श्रुत होईल. त्याहीमधे येथे दिवसगती लागलियावर लोक राहातील त्यामधे गोवलकोटास घेऊन जावेसे पनास राहिले, तेच समागमे घेऊन गेलिया स्वामीचे फौजेचा आव राहील की काये? हें बरे चितात आणून जो विचार करणे तो केला पाहिजे. पूर्वी माहाडामधे असता आम्हापासी फौज व हशम काये होते आणि राजश्री स्वामीपासी काये निवेदन लोकानी येथील समागमी होते यानी केले ते स्वामीस निवेदन परस्परें जालेच असेल. यैसे असोन थोडेसे पनास लोक व हशम सेपनास येवढ्या सामानानसी तेथे जाऊन सामील जालिया समागमीं ज्यांस सामील होवे ते थोरले माणूस आहेत ते विदितच आहेत. हेहि गोष्टीचा विचार करणे तो केला पाहिजे. आम्ही आज्ञाधारक सेवक आहो. जे समई वडिलाची आज्ञा घेऊन कोकणात आलो तेच समई सर्वहि विचार केला आहे. आम्हास आज्ञेविना दुसरे दैवत नाही. पैका पाठविला होता त्यापैकी दोन रोजमेरचा यैवज बाकी राहिला असेल. याउपरी यैवज रोजमरियास पाठविला पाहिजे. पूर्वी लस्करे होती म्हणून उसणे चालिले. येथे नसले म्हणजे इलाज नाही. हे पत्र पावावयास पाच दिवस व यावयास पांच दिवस व तेथेहि पाच दिवस लागतील येकून पंधरा दिवसावर गोष्ट जाईल. तर लौकर यैवज पावे ते केले पाहिजे. हा कालवर राऊत कोणी गेले नाहीत. पूर्णिमेपरियेंत समस्तानी दम धरिला आहे. पुढे काये होईल ते पाहावे. धान्य स्वप्नगत होत आले आहे. वडिलाचे पुण्य समर्थ आहे. कोणे गोष्टीची फिकीर आहे यैसें नाही. जाले वर्तमान सेवेसी ल्याहावे यैसे आहे. याजकारितां वारंवार लिहिणे लागते. लोकास चिरकुटे नाही हे वारंवार लिहिले परंतु त्याचे उतर न आले. बरे जे समई विचारास येईल ते समई ल्याहावे अगर बेगमी करावी. तोफा गोवलकोटास पावणे म्हणून रा स्वामीची आज्ञा होती त्यास जाबसाल पाठविला आहे. पुडेहि कोणी येईल त्याबा सविस्तर लिहून पाठऊ. छ ७ जिलकादी रा स्वामीचे पत्र घेऊन माहाडीहून प्रल्हाद प्रभु तोफा पाच

---

१ प्रतिष्ठा.

देविल्या आहेत त्या घेऊन जावयास आले आहेत, त्याचे स्वाधीन आज्ञेप्रा केल्या जातील. गलबतेहि पाच देविली आहेत, त्यास येथे आहेत ती फुटली आहेत. काही असली तर त्याचे स्वाधीन आज्ञेप्रा करू ही विनंति.

¶Bajirao Retrekar adduces reasons for his unwillingness to proceed against Gowalkot and mentions the orders he received from Satara which he executed.

No. 179] [*About 7-4-1734*

श्री

विनंती उपरी. राजश्री स्वामीची आज्ञा तोफा गोवलकोटास न्यावयाची वरचेवर येती. त्यास आम्ही तों विचारें अबिकरून पर्यायेकरून उतरे लिहून पाठवितो. परतु पुनरोक्त आज्ञा करीतच आहेत. त्यास आम्हासमागमे आपणाचे प्यादे व खासबारदार मिलोन तीनसें माणूस व किरकोली दोनेकसे येसे पाचसे माणूस पाईचे. त्यापैकीं दुखणेयानी कितेक पडिले आहेत. वरकड ठाणेयांत आहेत. ठाणेयास व लस्करास येक कोसाचे अतर आहे. दोनी ठाणेयामध्यें व दोनी बंदरामध्ये रखवाली केली पाहिजे. त्याचे रखवालीस पांच सातसे माणूस पाहिजे. पाईचे माणूस आहे ते तो आपणांस विदितच आहे. पाळी लावली आहे. लस्करचे लोक प्रत्येहिं बाणकोटास जात आहेत, येसे आसोन तोफा न्यावयाची आज्ञा येती. सेवटपर्यंत टालाटालच केली आणि सेवटीं खिजमतगार येऊन जाच करून आज्ञा आली तरी येथील बंदोबस्ती कैसी होती आणि तिकडे जाणे कैसे होते? काल स्वामीचे पत्र आले. तेथे आज्ञा की, मसुदा पाठविला आहे. तदंन्याये उतर लिहून पाठवावे. यैसियासी येथील जे सेवा घडोन आली ते अबिकरून विचारेकरून घडोन आली आणि हाली इतुकी कारभाराची फोड करून लिहिले, या फोजेचा आब कैसा राहील? पत्रे येतात तेथें लिहितां की, खंडोजी माणकर यांस पत्रें पाठऊन त्यास बोलाऊन आणून ते तुम्ही मिलोन तोफा बाणकोटाहून गोवलकोटास पोहचाऊन देऊन तुम्हीहि येथील बदोबस्ती करून जाणे * * * * * * माणकर कोणीकडे, आम्ही कोणीकडे, गोवलकोट कोणीकडे, यैसे असोन आम्हास वरचेवरी लिहितात, राजपत्र येते, तैसे राजश्री तात्याचेहि पत्र येते. त्यास हे वर्तमान रा तात्यास न कलेसे काये? यैसे असोन तेहि लिहितात, तरी पत्राचा अर्थ काये आहे तो कलत नाही. तरी आपण राजश्रीस लिहून उतम विचार दिसेल तो केला पाहिजे. आम्हास जे आज्ञा होईल त्याप्रा वर्तणूक करू. सेवकास आज्ञेविना दुसरे दैवत नाहीं. कोकणामधे आहे तो जिकडे जावयाची आज्ञा

येईल तिकडे सिध आसो. बहुत काये लिहिणे? राजश्री येसवंतराव भोसले याचा आग्रह लग्नास जावयाचा आहे तर काये आज्ञा ते केली पाहिजे. कोनेरपंत यानी पाठविले आहेत. त्यापासी जे आज्ञा करणे ते करावी. येथीलहि विचार सेवेसी निवेदन करितील. कृपा आसो दिल्हा पाहिजे हे विनंती. आज्ञेप्रा राजश्री स्वामीस तपसीलवार पत्र लिहून पाठवितो. आजीवर तात्यासच मात्र पत्रे लिहीत गेलो. याउपरी राजश्रीसहि लिहू. कलले पाहिजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao Retrekar to the Peshwa, expresses unwillingness to proceed to Gowalkot owing to sickness raging in his army.*

No. 180] [*Recd. 7-4-1734*

छ १२ जिलकाद

श्री

विनंती उपरी. येथील वृत तों सेवेसी वरचेवर लिहीत गेलोच आहे त्यावरून श्रुत होतच आहे. वरकड आजी सतरुसीहून पत्र आले तेथे राजपत्री आज्ञा की बाणकोटी पाईचा सरदार मातबर व हासम ठेऊन ठाणेयाची मजबुदी जबरदस्त करून गोवलकोटास जाऊन गोवलकोट फते करून स्वामी संतोषी होत ते करणे. बाणकोटी भांडीं आहेत त्यापैकी पाच्सात भांडीं गोवलकोटास घेऊन जाणे. इदंन्याये वरचेवर पत्रे येतात. जिदंन्याये पत्र रा स्वामीची येतात तदंन्यायेच रा तात्याचीहि पत्रे येतात आणि टालाटाल करून युक्तिप्रयुक्तीने उतरेहि वरचेवर लिहिणे ती लिहितच आहो. परंतु खावंदानी बहुतसी झेहल (येहल?) घतलिया कार्याची नाही. करणे विचार तो आबे विचारें केल्या उतम आहे. याजकरिता येथील वृत सेवेसी लिा आहे. हा सविस्तर अर्थ स्वामीनी ध्यानास आणून सेवकास आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. स्वामी म्हणतील की टालाटाल करिता करिता निदान जाणेच जालेच जावेच लागेल यैसे चिती असिले तरी येथे जे लोक आहेत, त्याणी च्यातुर्मास श्रमसाहास करून मोहीमसीर चाकरी केली ते काही पुढे जाणे जाले तरी येतात यैसे नाही. तरी गोवलकोटाकडे जाणे म्हणून स्वामीचा दुराग्रहच आसिला तरी बाणकोटी राहावयास पाच्सातसे हसम पाठऊन द्यावे. बाणकोटीची बंदोबस्ती करून गोवलकोटास जाऊ. तिकडे जावयास येथील फौजेपैकी आले तरी से दोनसे येतील. येणेकरून फौजेचा आव राहणार नाही आणि इतुके दिवस आबेकरून श्रमसाहास करून फौजेचा नंग[१] राखिला

---

१ प्रतिष्ठा.

तैसा पुढे राहाणार नाही. तरी दोनसे तीनसे राऊत नवे पाठऊन द्यावे. नवे राऊत येतील ते व येथील फौजेपैकी से दोनसे येतील ते यैसे राऊत व दोन च्यारसे हासम आहे, त्या खेरीज दुखणेखेरीज आहेत ते यैसे घेऊन आज्ञाप्रा सेवा करून. परंतु दोहीकडून सेवकास खपीप करून केले श्रम निरार्थ करावे ऐसे. नाही. दृष्टीस पडतो अर्थ हा सेवेसी लिहून पाठविला आहे. याची पैरवी करून जे आज्ञा करणे ते करावी. आज्ञा होईल तदनुरूप वर्तणूक करून. यैवज लवकर पाठविला पाहिजे कृपा लोभ असो दीजे हे विनंति.

¶*Baji Bhivrao to the Peshwa, saying that he has been receiving orders from the King to proceed to Gowalkot but that he has been trying to put it off on some excuse or other. He further requests the addressee to advise him as to what he should do. He says he cannot proceed to Gowalkot equipped deficiently as he is at present and asks more forces being sent.*

No. 181] [*About 7-4-1734*

श्री

विनंती उपरी. आपण पत्री आज्ञा केली कीं चाकरी म्हणजे बहुत नाजूक आहे त्यावरून सेवेसी पत्रे पाठविली आहेत यांची उत्तरें पाठवावयासी आज्ञा करावी. उत्तरे येतील तदनरूप वर्तणूक करून. रा स्वामीची पत्रें आली ती तात्याच्या वार्तिकाबा आली. त्याची "टाळाटाळ केली ते उत्तम जाली!" यैसी पत्रे घेऊन हुजरे आले. तर काये उत्तर द्यावे? तोफा गोवलकोटास घेऊन जाणे म्हणून आग्रहच केला तर पत्र फिरून द्यावे किंवा तोफा न्याव्या तर न्यावयासी आम्हास सामान नाही, तेव्हा त्यास काये उतर द्यावे हे आज्ञा करावी. ठाणियाची बंदोबस्ती करून गोवलकोटास जाणे म्हणून हुजुरे आले तर काये जाब द्यावा हा विचार करून आज्ञा करावी. रा स्वामीचे पत्र येकप्रकारे येते व रा तात्याचे पत्र येकप्रकारे येते. त्यास आम्ही काये विचार करावा यैसे संकटाचे येऊन पडले आहे. येथील विचार तो सर्वश्रुत आहे. फौजेचा येथून उलगडा होईल तर घोडी वाचतात. नाही तर घदयावर (खड्यावर? घोड्या यावर?) सफा होतो हे विनंति.

¶*Baji Bhivrao asks Peshwa's advice as to what he should do and what answers he should give to the King's despatches asking him to proceed to Gowalkot.*

No. 182] [9-4-1734

तालिक

श्री

विनंती सेवक जिवाजी खंडेराव चिटनीस क्रा विज्ञापना ता। छ १५ जिलकाद मंगलवारपर्यंत वर्तमान येथास्तित असे. राजश्री संभाजी आंगरे विजयदुर्गाहून जयगडास आले. आम्हांस भेटीस यावयाविशी लेहून पाठविले, त्यावरून लस्करातून स्वार होऊन गेलो. छ १२ जिलकादी भेटी जाल्या. दुसरे दिवसी हाती वस्त्रे दिल्ही. बहुत संतोश पावले. त्यांची निष्टा सीमेपरती आहे. काही दुसरा विचार चितात नाही. आरमार घेऊन आंजनवेलीच्या नस्तावरी यावे हे मानस बहुत आहे. आरमार गुराबा रत्नागिरीस आल्या आहेत. उतरवा (उतरचा) वारा फार ग्राकरिता वर त्यां येत नाही. दोचौ रोजी दक्षणवारा सुटला म्हणजे गुराबा जयगडास आणून जलमार्गे अंजनवेलीच्या नस्तावर येऊन भांडियाची मारगिरी करितील. पायवाटेनेच यावयाचे विचार करीत होते, परंतु बराबरी लोक जमावानसी; येथे जमाव जे त्याकडील आहे तो मोर्चेयास गुंतला, खासा येथे आल्यावरी मोर्च्यापैकी च्यारपाचसे माणूस खाशापासी गुंतोन राहिले, हा विचार त्याणी चिंतात आणून च्यार दिवस ज्ययगडीच राहावयास विचार केला. आरमार आल्यावरी जलमार्गे येतील. येथे त्याचा जमाव आहे त्यास दोन मोर्चे राखताच पुरे जाले आहे. त्यास भरतीस आणिखी आमचे लोक जातात, परंतु त्याचेहि लोक त्याचे मदतीस पाहिजेत. याबद्दल सुवर्णदुर्गाहून त्याणी जमाव आणिला आहे. च्यार पाचसे माणूस येईल त्यास आठ दाहा दिवस लागतील. संभर माणसानसी मात्र सरखेल जयगडास आले आहेत. जयगडीहून दारूगोला वरकड साहित्य होणे ते होईल. त्याचा जमाव आणिखी कोठून यावयाचा नाही. दीड हजार माणूस आम्हाजवल आहे आणि सुवर्णदुर्गाहून च्यार पाचसे काये होईल ते पाहावे. अंजनवेल घ्यावी हे हिमत बहुत धरितात. परंतु फौज व लोक आणिखी असावे म्हणजे भारीपणे काम होईल यैसे म्हणतात. येविसीची जे आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. आम्ही जयगडीहून आजी प्रात:काली श्वार होऊन संध्याकाली लस्करात आलो. सेवेसी श्रुत होये.

¶*Jivaji Khanderao Chitnis from Anjanwel communicates to the Peshwa the plans of Sambhaji Angria about a naval attack on Anjanwel.*

Bk Ca 8—20 5339

No. 183] [9-4-1734

तालिक

श्री

पुरवणी

सेवेसी विज्ञापना. आजी छ १९ जिलकाद मंगळवारी सिदीसाद हजार बारासे माणसानसी माहातारखाडी उतरोन माथांवड आहे तेथे आला. खाडीचे आसरियास बरखंदाजाचा वट दिल्हा आहे. दोन तीनसे माणूस मोर्चेयावरी चालोन आले. इकडून आंगरियाचे लोक व सोनजी भावकर व हुजरातचे जाधवाकडील पथक वगैरे धावोन गेले. युध प्रसंग जाहाला. गनीम खरडून खाडीत घातला. दाहाबारा माणूस गनिमाचे ठार पडिले. पंधरावीस जखमी जाहाले. सोनजी भावकर याणी बरी शर्त केली. नीटच घोडे चालविले. युधप्रसंगी माणूस घोडे जखमी फार जाहाले बिा

हुजरात

१ निंबाजी लोकरा दिा मोघम भांडियाचा गोला लागोन ठार जाला.

१ दिा विचारे सिपाई गोळीची जखम

१ दिा माहादजी सिंदे सिपाई गोळीची जखम

१ शाहाजी भोसले दिा खंडोराव जाधव गोळीची जखम

१ दिा निंबाजी लोकरा सिपाई जखम धोंड्याची

१ पागेची घोडीस तीराची जखम

६

आंगरे याजकडील

१ आणाजी साटम सरदार ठार जाला.

१ दिा सिपाई ठार जाहाला

१० जखमी लोक

१२

दिा राजश्री फतेसिंग बावा

१८ सोनजी भावकर

१ खासा तीराची जखम मांडीस

८ सिपाई जखमी ८

८ घोडी जखमी

१८

१ माळजी मचाले तीराची जखम उरावर

१ धारराव निंबालकर याजकडील करोल जखमी

१ रसीदखान याचा लेक दाऊदखान यास गोळीची जखम

१ कृष्णाजी जाधव याचा बसता घोडा गोला लागोन ठार जाला. घोडा आंगावर पडिला त्याणे पाये दुखवला

२२

5340

येणे प्रा जखमी व ठार जाहाले गनीम खरडून खाडामध्ये घातला. कोटावरील व मेढ्यावरील व नवे चौबुर्जीवरील मार सीमेपरता जाला. विदित व्हावे म्हणून लिा असे. सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶*This is a list of casualties sustained in an action against Sidi Sat at Matha creek led by Sonji Bhapkar and the Angria's men.*

No. 184] [*10-4-1734*

श्री

श्रीमंत राजश्री......पंत प्रधान स्वामीचे सेवेसी.

पोष्य जिवाजी खंडेराव कृतानेक दंडवत प्रणाम विनंती उपरी. येथील कुशल तागाईत छ १६ जिलकादपर्यंत येथास्थित असे. स्वामींनीं दोन तीन पत्रें पाठविलीं तीं पावोन सविस्तर अर्थ कळों आला. आम्ही फौजेसहवर्तमान अंजनवेलीस आलों. आंगरे यांजकडील दोन हजार माणूस समागमें आहे. दोन मोर्चे चालविले आहेत. च्यार भांडीं जोडून रोजबरोज मारगिरी करीत आहों. वेलदुराकडे अवघें लष्कर उतरलें आहे. वाळकेस्वराकडे दुसरी फौज असिल्याविना गनीम कांहीं आयास येत नाहीं. कोटांत सिदीसाद खासा दोन हजार माणसांनशी आहे. मजबुदी बहुत केली. आणखी फौज सत्वर आलियानें प्रजन्य काला आलाकडे कार्यसिद्धी व्हावी ऐसें दिसतें. फौजेविशी राजश्री स्वामीस लिहिले आहे. आंगरे याचा जमाव आणखी यावा तरी हजार माणूस कुलाबा, चेऊल थळचा मोर्च्या देखील गुंतलें. हजार माणूस सांवताचे शहामुळें सालसी प्रांतांत गुंतलें. खासा राजश्री संभाजी आंगरे सरखेल जयगडास आले आहेत, परंतु त्याजवळ कांहीं जमावाची भरती नाही; याकरितां ते तेथेंच राहिले. सुवर्णदुर्गप्रांतींहून पांचशें माणूस आणविलें आहे तें आल्यावरी खासा येथें येणार आहेत. परंतु भारी फौजेखेरीज कार्यसिद्धि लौकर होत नाहीं; हें वर्तमान आपणांस विदित व्हावें म्हणून लिहिलें असें. आम्ही जयगडास गेलों. राजश्री सरखेलीस हत्ती वस्त्रें दिल्हीं. सौरस्य उत्तम प्रकारें जाला. स्वामीचे ऐवजाविशी सांगितलें. त्यास मामल्याचा ऐवज द्यावा लागतो खरेंच, परंतु या मसलतेमुळें तूर्त अनकूल पडत नाहीं. पुढें देऊं ऐसें बोलले: स्वामीस त्यांणीं उत्तरें लिहिलीं आहेत त्याजवरून कलेल. ऐवज देतील यांत संदेह नाहीं, परंतु च्यार दिवस अधिक उणे लागतील इतकेंच आहे. स्वामीचा त्याचा पूर्वापार स्नेह व ऋणानुबंध आहे, तैसाच प्रसंग होईल. बहुत काय लिहिणें ? कृपा असो दिल्ही पाहिजे हें विनंती.

¶*Jivaji Khanderao reports to the Peshwa the progress of the siege of Anjanwel by the joint forces of Angria and of the King. Head of Angria's remaining force being employed against the Sawant he is not in a position to reinforce his contingents at Anjanwel.*

No. 185] [Recd. 14-4-1734

छ २० जिलकाद

श्री

विनंति उपरी. बाणकोटच्या मेढेयाचे चौबुरजी रामचंद्र मिर्धे बांधावयासी आले आहेत त्यांचें वर्तमान तरी, पूर्वी बकाजी मांहाडिकानी मेढा घातला तो तोफानी हिदहिदा करून कोट हस्तगत केला. त्यावरीच बुरुज रचून तयार होत आहे. शामलाकडील मुलकातील रयेत लस्करच्या दहशतीमुले जमा जाली आहे. त्यासच रोजमुरा देऊन रांडापोराकडून धोंडे मोर्चेयाचे लाविले होते ते काढून बुरुज सिधे केले. दोन बुरुज सिध जाले. येक निमे होत आला आहे. चौथा आमवाश्ये आलीकडे तयार होईल. येक माणूस चयार धोंडे आणून कोट तयार होत आहे. प्रजन्य पडताच कोट केलाच नव्हता यैसा होईल. हाली कोटाविसी रा। अंबाजीपंत तात्या याचे पत्र आलें त्याची नकल स्वामीकडे रवाना केली आहे त्यावरून वृत निवेदन होईल. भेंड्यानें वही केली, वारेयाने उडोन गेली, तद्न्याये कोट सिध केला आहे आणि आम्ही तेथे जाऊन उजरे राहावे, बरे वाईट म्हणावे, ते सारे जन आम्हास हासेल, याजकरिता ते कार्य आमचे नव्हे. आम्ही आद्यापिवरी नजरेने कोट नवा होत आहे तो पाहिला नाहीं. रा। तात्याचे पत्र आले तेथे लिहिले जे दोनसे माणूस घेऊन जाऊन कोट सिध करणे. त्यास कोटाचे धोंडे उचली यैसा माणूस आहे नाही हे स्वामीस विदितच आहे. हे सविस्तर वृत्त सेवेसी वरचेवर लिहिलेच आहे त्यावरून कललेच असेल. हालीहि निवेदन जाले पाहिजे याजकरिता लि॥ आहे. रामचंद्र चोपदरा चौबुर्जी करून सत्वरीच हुजूर जाईल. तीन बुरुज तो जाले चौथाहि भूमिगत धोंडा न घालता येका माणसाने दोन तीन धोंडे आणून तयार करील. मजुरी मिलत आहेत. जे मागेल ते देऊन राजश्री स्वामियासी मजुरा करून व्यावयास लौकरीच जाईल. परंतु तयार जाले म्हणजे जोवर ढासले तोवर आम्हास आत चौकी ठेविली पाहिजे. येवडे मात्र आधिकोत्तर होईल. कलले पाहिजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao reports to the Peshwa how flimsy are the new bastions of Bankot which Ramchandra Mirdha is erecting by the orders of the King.*

No. 186] 14-4-1734

छ २० जिलकाद

श्री

विनंति उपरी बाणकोट राखावयास सातसे माणूस आसिले मणजे स्तलास काही फिकीर नाही. आंजनवेलीस जोवर परीघ आहे तोपरयेत येथे काही फिकीर

नाही. फौजेचे येथे प्रयोजन काये आहे आणि व्यथ लोकाची घरे बुडवावी यैसे नाही. भलते मिसे करून फौज नेलियाने उतम आहे. स्वामी फौज नेत नाही तेव्हा आमावाश्या जालियावर सहजेच येईल. लोकाचा काही अन्याये नाही. घोडे अगदी गलाले. कलले पाहिजे. भलते विचारे फौज काडली तर उतम आहे. लोकाचे केवल अवसान गेले आहे. स्वामीच्या दर्पे मात्र जीव धरला आहे तो कोठवर की जीव गेल्यावर स्वामीनी काये करणे आहे. पैकियाचीहि आशा सोडली मणजे काये करणार आहेत हा विचार करावा. सेवेसी श्रुत होये.

¶*Baji Bhivrao communicates to the Peshwa the hardships which he and his men were suffering and asks for a fresh contingent of some seven hundred strong.*

No. 187] [*15-4-1734*

श्री

श्रीमत रा आपासाहेबाचे सेवेसी

ॐ विनंति अज्ञांधारक सुभानजी बोरगे दंडवत विनंति उपरी. येथील क्षेम ताा छ २१ जिलकादपावेतो साहेबाचे कृपेदृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर रा राऊ सेनापति यानी बहुत अतिशये करून कोकणात फौज समागमे देऊन रवाना केले. आम्ही जावया अनमान केला परंतु राजश्रीनी स्वमुखे सांगितले याजकरिता भिडेने कबूल करावे यैसे जाहाले. नाही तरी आपल्या चिलात जावे यैसे नव्हते. दोन महिने राहू. आषाढमासी साहेबापासी येऊ, यासी अंतर होणार नाही. आम्ही पागेस घोडी तेरा हजारा रुपयाची घेतली आहेत ती यैतीच पागेस घोडी होतील. घोडी ज्यापासी घेतली आहेत त्याचें देणे आहे. त्याचा पैका साहेबी देऊन घोडी पागेस ठेविली पाहिजे आणि गोविंद त्रिंबक व पागा येईल ती पागेची पागा तैसीच राहू देणे. त्यातील येक घोडे कोणाकडे न द्यावे. अम्ही आषाढमासी साहेबापासी येतो. ये गोस्टीस अनमान करू तरी श्री साक्ष असे. रा कान्होजी हरफळे येथे * * * * त्यास राजश्रीनी (३ ओळी फाटल्या) यैसे नाही. सर्व प्रकारे स्थापना वृत्तीवर करणार साहेब समर्थ आहेत. तरी रा तात्यास येक पत्र पाठऊन दिल्हीयावर हरफलियाचे कार्य होऊन येईल यांत संशये आहे यैसे नाही. बहुत काये लिा हे विज्ञापना.

¶*Subhanji Borge reluctantly agreed to join the camp where he promises to stay for two months.*

No. 188] [24-4-1734

छ ७ जिल्हेज

श्री

विनंति उपरी. रा। बाबूराव या प्रांते बंदोबस्त करावयास येणार म्हणून वार्ता होती त्यास बाबूराव च्यार रोज म्हाडास आले आणि चौरोजानी गोवलकोटाकडे गेले म्हणून पत्र आले. या उपरी या प्रांताचा बंदोबस्त हुजरून करावयास कोण येतो. आजीवर यैकत होतो जे जिल्हा अगदी माचे स्वाधीन केला ते तो गोवलकोटचा बंदोबस्त करावयास गेले. यानंतर बाणकोटचा काये विचार केला आहे हा काही कलत नाही. प्रजन्य समीप आला आहे, कोटाचे संरक्षण कैसे होते? आम्ही कोसावर आणि कोटात कोणी राहावे? लस्कर कैसे रक्षण करावे याची काये आज्ञा ते केली पाहिजे. हशमाचा विचार म्हणावा तर निमे दुखणेकरी व निमे शाबूत यैसे आहे. त्यापैकी आजी न पुसतां बाजी भिलारे जमावानसी पलोन गेले. लस्करहि गलबलले आहे. धान्य मिलत नाही. वाणी कोणी धान्य घेऊन येत नाही. पुढे लस्करच्या पोटास व घोड्यास दाणा हा कैसा मिलतो? दाणा विकत मिलत नाहीं. मुलुक तो उद्वस आहे. या उपरी लस्करचा तग कैसा निवतो आणि फौजेचा आब कोणे गोष्टीने राहतो? रोजमरा स्वामी देतील त्याचे धान्य मिलत नाही. हे गोस्टीविसी काये आज्ञा ते करावी हे+ विनंति.

¶*Baji Bhivrao communicates to the Peshwa the departure of Baburao (Vaidya) from Bankot to Gowalkot and narrates the hardships that he and his detachment had to undergo.*

No. 189] [29-4-1734

पो छ १५ जिल्हेज

श्रीमल्हारिर्जयति

श्रीमंत राजश्री पंडितप्रधान स्वामीचे सेवेसी

पोष्य जिवाजी खंडेराव दंडवत प्रमाण विनंती. येथील कुशल तागाइत छ ६ जिल्हेजपर्यंत येथास्थित जाणून आपणाकडील साकल्य लिहीत गेलें पाहिजे. यानंतर आपण पत्र पाठविलें तें पावोन बहुत समाधान जाहालें. सदैव पत्रीं परामर्श करावा. इकडील वर्तमान तरी राजश्री संभाजी आंगरे सरखेल यासी सरखेल पदाचीं वस्त्रें व हत्ती घेऊन जयेगडास गेलों. बहुमान केला; त्याचें आमचे सारश उत्तम प्रकारें जाहालें. उपरांतिक आम्ही स्वार होऊन लष्करास आलों. मागाहून तेहि जलमार्गें अरमार घेऊन अंजनवेलीच्या नस्तावरी आले. येक दिवस अरमारची मारगिरी किलयावर केली, तों दर्यात तुफान जाहालें, त्यामुळे

अरमार घेऊन विजेदुर्गास गेले. गुराबा धडियावर वोढून पायेवाटेनें आपण येणार, त्याजकडील मिरजा यारबेग व बावाजी म्हसके दोन हजार जमावानसी आले आहेत. तोफा च्यार आणून हळदीच्या पाणियावर मारगिरी साधिली आहे. मोर्चे खाडीनजीक गेले; पुढें दिवसेंदिवस मोर्चे चालवितों, परंतु फौज थोडकी. पोख्तीं फौज असती तरी हल्ला करून टिळकेश्वरचा बुरूज व हळदीच्या पाणियावरील बुरूज व मेढा घेऊन पेठेंतच मोर्चेबंदी करितों. यैसियास फौजेचा मार्ग लक्षितों. राजश्री सेनापतीची फौज येणार ऐसें आहे, फौज आलियानंतर सुलतानढवा करून स्वामीच्या पुण्येंकडून कार्यसिद्धि सत्वरींच करूं. पर्जन्य समीप आला. यैशामध्यें फौज सत्वर येती म्हणजे उत्तम गोष्ट होती. हें सविस्तर आपणांस कळावें म्हणून लिहिलें असें. प्रजन्य समीप आला. अंजनवेल-सारिखा जागा, सिदी सादासारिखा साहासी, फौज तों सत्वर न ये, ऐसा प्रसंग प्राप्त जाला आहे. गोवलकोटानीहि दम धरिला आहे. पुढें होईल वर्तमान तें लेहून पाठऊं. बहुत काय लिहिणें कृपा असों दिल्ही पाहिजे हें विनंती.

¶*Jivaji Khanderao describes to the Peshwa an attack on Anjanwel led by the writer from the land side and by Sambhaji Angria from the sea. The attack could not be renewed on the next day as Sambhaji had to retire to Vijaydurg owing to a heavy gale on the sea.*

No. 190] *[29-4-1734 ?*

पो० छ १३ जिल्हेज

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
छत्रपति स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक संताजी जाधव व दुर्गोजी भोईटे सेवेसी विज्ञापना यैसिजे. तागायत छ ६ जिल्हेज माहाराजाचे कृपाद्रष्टिकरून सेवकाचें व लस्करचें वर्तमान येथास्थित असे. यानंतर गोवलकोटचें वर्तमान तरी राजश्री बावाजी म्हसके यानी कालोसीच्या डोंगरावरी अक्षत्रितीयेचे मुहूर्तें भांडीं सुरू करून आजि च्यार रोज तोफांचा मार बहुत केला. यामुळें किला हिदहिदो[१] होऊन

१ डळमळित.

किलियांतील घरें व सदर देखील मोडिलीं. माणसें किलियांतून निघोन बाहेर निघाली. त्यास आणिक दोन मोर्चे बसलिया सारा किल्याचें पाणी बंद होईल आणि किलाहि फते होईल. त्यास राजश्री बावाजी म्हसके यानी आम्हांस सांगोन पाठविलें कीं आपण आणिक तोफा आणावयास माणसें पाठविलीं आहेत. तुम्ही हुजूर विनंतिपत्र पाठऊन मावले लोक व जेजाला व खासबारदार व मोर्चे याचें सामान दारू गोला सत्वर आणवणें. त्यावरून सेवेसी विनंतिपत्रें पाठविलीं आहेत श्रुत होतील. दोन हजार मावले लोक व वरकड साहित्य पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. आपण तों जाहाले वर्तमान सेवेसी निवेदन करितों; परंतु कांहीं साहित्य होऊन येत नाही, यामुळें कामकाजहि दिसगतीवर जातें. तर साह्यास सत्वर आज्ञा जाहाली आणि माहाराजाचे पुण्येंकरून किला फते होईल. आंगरियाकडील लोक मारगिरी करावयास अंतर करीत नाहीं. आपणांस जेथवर चाकरीची कस्त करावयाची तेथवर आपणहि करीतच आहों. धण्याच्या पायाच्या प्रतापेंकरून साहेबकामहि होऊन येईल. परंतु सामान रवाना करावयास आज्ञा सत्वर करविली पाहिजे. हिरबारायाच्या बागांत मोर्च्यांस तीन हजार माणूस पाहिजे तेव्हां तेथील मोर्चा कायेम होतो. मोरचा बहुत नाकियाबर आहे. तैसेच कासी बंदरावरीलहि मोर्चा आहे. सामान पोस्तें पाहिजे. मोर्चे राखिले पाहिजेत. याजकरितां वरचेवरी विनंतिपत्रे लिहितों. बेहबुदी करणार माहाराज धणी आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Santaji Jadhav reports to Shahu the progress of the siege of Gowalkot and asks money for prosecuting it vigorously towards full victory.*

No. 191] *April 1734*

श्री

विनंति उपरी. बाणकोटी हशम ठेऊन फौजेसहवर्तमान गोवलकोटास जावे यैसी राजश्री स्वामीची आज्ञा आली. त्याचें उतर लिहिणे म्हणून मसुदा पाठविला. त्यास सविस्तर वृत राजश्री तात्यास लिहिले आहे. या उपरी आज्ञेप्रमाणे राजश्रीसहि ल्याहावयाचे ते लिहिले जाईल. येथील वर्तमान स्वामीस वरचेवर लिहीत गेलों त्याची उतरेंहि आलीं. परंतु या उतरानी येथे निभाव कैसा होतो? बाणकोटची निमाज कैसी उठते? प्रज्यन्यकाल समीप आला आहे. वडिलानी जो मजकूर राजश्रीस लिहिला आहे त्याप्राा येथे घेडोन आले आहे, काही लटके ल्याहावे यैसे नाहीं. परंतु लिहिल्याने मात्र ज्यास हे दुख ठावके

नाही ते मात्र आसत्य मानतील. हे सर्व दुख ह्या राज्यामधे स्वामीविना दुसरा जाण कोणी नाहीं आणि स्वामीच्या हातीहि या समई ह्या मनसबा नाहीं हे सेवकासहि कलतच आहे. परंतु आम्ही दुसऱ्या कोणास ल्याहावें? आपणाचे समाधान केले आहे. दुखण्यास तो काहीं इलाज नाहीं. कानड्या माणसास कोंकण सोसत नाहीं. खासबारदार आहेत, येकनिष्टेने सेवा करीत आहे, त्याचेहि माणूस फार करून यांच प्रकारें जाले आहे. मातबर पतके दोन त्याची आवस्ता हेच रीतीची जाली आहे. लोहगडकरी मोबदला आले आहेत तेवढे मात्र आजीवर शाबूत आहेत. वरकड किरकोल पतके सिरके व पवार व भिलारे आणखी आहेत त्यांची हेच गत आहे. यैसा विचार घडोन आला आहे. लस्करचे वर्तमान पूर्वीपासून सेवेसी लिहीत गेलो आहे त्याची उतरेहि आली. या उपरी हें लस्करचे घोडे तो आगदी बुडाले. सड्यावर राहिलो आहे. सर्वहि सुख आहे! कोणी पदार्थ नून आहे ऐसे नाहीं! त्यास पुडे हे निमाज गडाची निवती कैसी आणि स्वामीच्या फौजेचा आब कैसा राहातो? लस्कर कोसावर राखावें कोट दोन राखावे. लस्करचेहि लोक साफ जाब देतात की कोट राखावा गडकरी यानी. आम्ही जावे ऐसे नाही. कितेक जात नाहीत. त्याहीमधे स्वामीचे पुण्येकरून आजीवर हे तरेने निभाव जाला पुडे अभ्रहि येऊ लागलें. दोन थेंब घोड्यावर पडले म्हणजे घोडी लोकाची बुडालीं येसे आहे. या उपरी लोक डावाडोल जाले आहेत. यामधे सर्व जाण स्वामी आहेत. राजश्री स्वामीनी लेकरेसारिखी हुजरात वाडवली, ते गोवलकोटी खराब होती आणि फतेसिंगबावाची फौज दोन हजार लोकिकामधे खराब होती आणि राजश्री व स्वामीनी खुद मसलत येवडी केली आहे तेहि तुम्ही करून सेवटी त्यावर घातली. यैसा मनसबा दरबारी असता स्वामीस हे फौज न्यावयास येत नाहीं. राजश्री जे आज्ञा करितील ते आमान्यहि करिता येत नाही हे सत्यच आहे. परंतु ही गरिबें बुडतात. यामधे कोणी नामधारीक नाहीत. गुजराकडून आले आणि येथे पैका मागणे सोडला, मग त्यास आगत्य काये आहे? येक मणावयास भोसले व आटोळे यैसे मात्र सरंजामी आहेत. तर त्यामधे येकानी तो आशा सोडली यैसी दिसत आहे. राजश्रीवर मसलत पडायास आणि स्वामीनी आज्ञेप्रमाणे वर्तणूक करावयास आवघे संकट हेच फौजेवर येऊन पडले आहे. बरे याचाहि संकटाचा पराभव करणार वडिलाविना दुसरा कोण आहे हे विज्ञाप्ति.

¶*Baji Bhivrao complains much about the protracted nature of the campaign and laments the difficulties and hardships and the illness in the camp, which he requests the Peshwa to provide against.*

Bk Ca 8—21 5347

No. 192] [*11-5-1734*

छ २० जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे शेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृा ना विा येथील कुशल ता वैशाख वद्य चतुर्थी मंदवासर जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामींनी दरमाहेची हुजीता पाठविली पावली. तेथें लिहिले की खर्चाची वोढ आहे तरी दरमाहेखेरीज रुपये पाठऊन देणे म्हणून लिहिले. यैसियास स्वामीचे पत्रापूर्वीच आम्ही आपली उंटे पाठविली. त्याजवरी रुपये ८००० आठ हजार पाठविले आहेत, पावलेच असतील कलले पाहिजे. राजश्री दुर्जनसिंग रामनगरी होते तेथून जवारीस आले होते. राजश्री कृष्णरावहि आले होते. त्यास रा पंतप्रधाने खानदेश प्रांते गेले हे वर्तमान कललियावरी जवारीहून स्वार होऊन राजश्री पंतप्रधान याजकडे गेले. आपणास कलावे या करितां लिहिले असे. आम्हास ताजवियाचे प्रयोजन आहे, तरी ताजवा १ येक जामदारखानियातून पाठविला पाहिजे. आपले कोठीस ताजवे होते, त्यातून येक पाठवावा. बहुत काये लिहिणे. लोभ केला पाहिजे हे विनंति.

¶*Vasudeo Joshi informs Chimaji Appa of his having despatched the cash required and of Durjansing and Krishnarao having gone to meet the Peshwa in Khandesh.*

No. 193] [*13-5-1734*

छ २६ जिल्हेज

श्री

विनंति उपरी. ता छ २० जिल्हेज इंदुवासरपावेतो स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. हिरोजी जासूद याजसमागमे व धोंडजी भोसला खिजमतगार या समागमे पत्रे पाठविली ती पावोन सविस्तर वर्तमान कलों आले. त्यास आज्ञाप्रमाणे वर्तणूक करीत आहो. दाभाडेयाकडील फौज गोवलकोटाकडे उतरली आहे. गोवलकोटी युध्य जाले. बाबूराऊ[1] ठार जाले. आइसी माणूस युध्यात पडिले. से दीडसे जखमी जाले. इदंन्याये वर्तमान आहे. कलले पाहिजे. दाभाडे आलेयाउपरी तिसरे रोजी युध्य जाले. त्या प्रांती

---

१ बाबूराव विश्वनाथ वैद्य, पंताजी शिवदेव सोमण राजाज्ञा याचा भाचा. दुसरा याच नांवाचा बाबूराव विश्वनाथ वैद्य पुढें पेशव्यांचा वकील नागपुरास होता.

राजश्री * स्वामी वरचेवर फौजा उतरीत आहेत. त्यास तो भर आहे. शामलाने किलाचा शाकार केला. या उपरी येंदा तो दोनी किले जुंमस[1] खात नाहीत यैसे आहे. राा संभाजी आंगरे विजेदुर्गी खुशाल आहेत. ते काही युध्यास दाखल होत नाहीत. प्रज्यन्यकाली फौजेचा आब शामल घेतो. कलले पाहिजे. गोवलकोट बहुत मर्द जाला. बाबूराव याकडील माणसाचा बहुत नाश जाला. कृपा वर्धमान आसो दीजे हे विनंति. कृष्णाजी पवार यांस ब्रें वाटत नाही याजकरिता त्यास निरोप दिल्हा. होडीतून माहाडास पावते केले. दाहा माणूस त्याजकडील आम्हापासी आहे हे विनंति.

¶*Baji Bhivrao reports to the Peshwa the death of Baburao Vaidya in a fight near Gowalkot and complains about Sambhaji Angria not joining in the campaign.*

No. 194] [*14-5-1734*

छ २६ जिल्हेज

श्री

विनंती उपरी. स्वामीकडे तपसिले पत्र लिहिले होते त्याचप्रा राजश्री स्वामीस व राजश्री तात्यास पत्र पाठविले होते. त्याचे उतर छ २१ मिनहूस आले. त्यावरून वृत कलों आलें. त्यास राजश्री स्वामीनी पत्र पाठविलें त्याची नकल पाठविली आहे, त्यावरून श्रुत होईल. राजश्रीचे पत्र स्वामीसहि आले आहे, त्यावरूनहि कललेच असेल. तुमचेंहि पत्र सतरुषीस गेले होते, त्याचेंहि उतर आले आसेल त्यावरूनहि विदित होईल. याउपरी राजश्री स्वामींच्या आग्रहाकरितां सेवकास येथे गुंतून ठेवितील, तर आमच्यानें कांही पायेच्या माणसामधे राहवतें यैसे नाहीं. जे दिवसी लस्कर उठोन येईल ते दिवसी आपण कांही येथे राहात नाहीं. स्वामी बोल लावितील तर वडील आहेत. येथे कोण मातबर माणूस व हशम लौकर पाठविलें पाहिजे. कोट रक्षण केला मणजे राजश्रीस सर्व पावलें. त्यास कांही आम्हीच पाहिजे यैसे नाहीं. वडीलपणे राजश्रीचा अत्याग्रह देखोन आम्हास राहावयास आज्ञा करितील तर ये समई आपलें राहाणे होत नाहीं. आम्ही सेवा केली आहे, त्याचे सार्थक हेच की, स्वामीची आज्ञा मोडून आम्ही आलों यैसे होईल. यास्तव वारंवार लिहिले आहे. याउपरी वडीलपणास उचित ते केले पाहिजे. स्तल रक्षण्याची फिकीर केली न पाहिजे. पाचसे माणून स्तल रक्षील. आम्ही येथे राहिल्याने च्यार

---

१ जरब, भीति.

लोक भारी ठेवावे लागतील आणि स्वामीस ख़र्च भारी पडेल. सरदारी खर्चाहि वाडतो. आम्ही नाही दुसरा कोणी राहील त्यास रुपया वावगा खर्च होणार नाहीं. च्यारी गोष्टी सोडऊन लिहिल्या आहेत. ह्या ध्यानामधे आणून जे आज्ञा करणे ते केली पाहिजे. राजश्रीच्या आज्ञेवरून लोकास व आम्हांस येथे ठेऊन खर्चाखाले येऊन लोकाचे उपकारी यात. फायेदा कांही नाहीं. याउपरी वडिलास उतम विचार दिसेल तो केला पाहिजे. आम्ही लेकूरपणे लिहितो म्हणून रागास आले न पाहिजे. आंम्ही अज्ञाकित म्हणून आम्हांस मुडदार केले न पाहिजे. वडिलाप्रति विशेष काये लिहिणे. कृपा लोभ आसो दिल्हा पाहिजे हे विनंती.[१]

¶*Baji Bhivrao requests the Peshwa to call him back from the campaign.*

No. 195] [*17-5-1734*

छ २९ जिल्हेज

श्री

विनंती उपरी. स्वामीनी आज्ञा केली कीं, राजश्री स्वामीची आज्ञा घाटावरी यावयाची खामखा पाठऊन देतो. आज्ञा आलियावरी घाटावरी येणें. आज्ञासिवाये न येणे म्हणून आज्ञा. तरी आम्हास राजश्री च्या आज्ञा काये? आम्हास स्वामीची आज्ञा प्रमाण. आपली आज्ञा आल्यानंतर दर्शनास येऊं. आम्ही फौज घेऊन येथें राहिलो तरी पैका खर्चास काये पाहिजे? पैकाहि खर्च करून फौजेचे व आमचे येथे प्रयोजन आहे यैसा प्रसंग दिसोन येत नाहीं. तरी आम्हांस प्रजंन्याअगोधर न भिजता भेटीस बोलाविले पाहिजे. दाणा गला जो कोटामध्यें असेल तो जतन करणे म्हणून लिहिले, तरी ज्यापासून आम्हाकडील कोटामध्यें लोक राहिले त्यापासून येक सेरभर दाणा खर्च होऊ दिल्हा नाहीं. दाणा बहुत जतन करून ठेविला आहे. दारूविसीं आज्ञा केली तरी दारू विशेष आहे यैसे नाही. आणि जी होती ती कुली लिहून राजश्री स्वामीस पाठविली. आमचा दस्तायैवज हुजूर गुतला आहे याजमुले पाठवावयास अनकूल पडणार नाही. आणि विशेषहि पाठवावया योग्य आहे यैसे नाही. आम्हांस राजश्री स्वामीची आज्ञा आलियाविना घाटावर न येणे म्हणून लिहिले तर आंम्ही येथे जितके दिवस राहू तेव्हडा खर्च व्यर्थ होईल. याउपरी स्तल स्वामीचे स्वाधीन केले आहे. त्यास पाचसे माणूस ठेविले म्हणजे रक्षण होईल. विनाकार्य

---

[१] पत्र बाजी भीवराव याचें.

लोक प्रजनामध्ये कस्टी करावें यैसे नाही. घोडी सबर जातात ती घाट चढतां मरतात. प्रजन्य लागला मणजे बहुतच नाश होईल. इतक्याहि गोष्टी काही इरेचे कार्य आसतें तर सोसून फौज येथे ठेवावी. यामधें द्रिस्टीगोचर आहे ते सेवेसी लिहितो. याउपरी आज्ञेप्रा वर्तणूक करू. वडिलास जो विचार उतम दिसेल तो करणार समर्थ आहेत. येथे किल्याचे बेगमीस लोक आले म्हणजे आम्ही सेवेसी येतो. हरि गणेश ठेवणे म्हणून आज्ञा तर गतवरसीपासून त्यानी सेवा केली आहे. त्यासहि घर आहे. दुसरा कोणी योजेल तर पाठविला पाहिजे. कोणी नाही तेव्हां तेहि आज्ञेविना नाहीत. त्याचाहि सर्वा प्रा• साभाल करणार वडील आहेत. त्यास रोजमऱ्यासिवाये काही गतवरसीपासून पावले नाहीं. परंतु कार्याचा माणूस आहे. आम्हापासी आज्ञेप्रा सेवा बहुत केली आहे. सेवेसी विदित होये हे विनती.

¶*Baji Bhivrao expresses his unwillingness to remain in Konkan and requests the Peshwa that he should be recalled.*

No. 196] *[17-5-1734*

छ २९ जिल्हेज

श्री

विनंती उपरी. ताा छ २४ जिल्हेज भृगुवासरपावेतो मुकाम बाणकोट स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. आपण पत्रे छ १८ जिल्हेजी रवाना केली ती काली छ २२ मिनहूस पावोन सविस्तर वर्तमान कलोन संतोष जाहाला. तेथें आज्ञा की होनाजी बलकवडे यांजकडील सेंभर माणूस व धोंडजी बने पुढें पाठविले आहेत. ते सेंभर आहेत व मागाहून पायेचा जमाव जथून तीनसे पाठवितो व आपल्या लोकातील दोनसे माणूस नेमून ठेवणे. यैसे सातसे माणूस जाले म्हणजे बहुत आहेत म्हणून, तरी होनाजी बलकवडे यास तांकीद करून जमाव व आपण जथून तीनसे माणूस पाठविणार ते यैसे सत्वर पाठऊन दिल्हिया उतम आहे. प्रजन्यहि समीप आला. लस्कर न भिजता दर्शनास बोलाविले. यासी जे पैकाहि खर्च करावा आणि विनाकार्य लोकांचा उपकार घ्यावा यैसा काये ? यामध्यें स्वाम सर्वजाण आहेत. आम्हासमागमे लोक आहेत त्यापैकी दोनसें माणूस ठेवावे तरी आपण येथे राहातों यैसे नाही. वरकड जमाव तरी सिर्के याणी स्वामीपासी राजपुरीस सेवा केली आहे. त्यास ते घरास जाणार म्हणून निरोप मागतात. ते कैसे राहातील ? वरकड लोहगडकरी आहेत त्याचे बदले जेव्हा दुसरे येतील तेव्हा ते राहातील. वरकड किरकोली

लोक कोणी राहावयाचे दिसत नाहीत. रा। हरि गणेश राहातील, त्याचे लोक मात्र पंचवीस तीस आहेत. वरकड ठेवावे यैसे दिसत नाहीत. लोक जमाव पावलियाउपरी तेथे फौज आहे त्यापैकी गल सल स ह र(?) जे कोणी येतील त्यास निरोप देऊन खासे दोनसे स्वारानसी राहाणे. मागाहून राजश्री स्वामीची आज्ञा यावयाची पाठऊन देतो, मग तुम्ही येणे म्हणून आज्ञा, तरी येथून किरकोली सहर निहर (?) चोरून जे जाणार ते आम्हांस न कलत जात आहेत. आम्ही सहर निहर(?) जाणे म्हणून निरोप दिल्हा तरी ते गोष्टी कार्याची नाही. किरकोली• जावयाचे ते जातच आहेत. +याउपरी हशम पाठवावयास येक घडीचा विलंब केला न पाहिजे. आजीवर धान्याचेच संकट होते. आतां त्रण व धान्य दोनी येकत्र जाली आहेत. घोडी लस्करची बहुत गलाठली आहेत, प्रजन्य लागला तर घाट बहुत दुर्घट होईल. यामधे स्वामी समर्थ आहेत. बहुत काये लिहिणे. कृपा लोभ आसो दीजे हे बिनती.

¶*Baji Bhivrao requests the Peshwa to send more men as those that were already with him were deserting. He also requests him to arrange for securing more grain and fodder.*

No. 197] *[About 19-4-1734*

श्री

विनंती उपरी. अंजनवेलीकडील वर्तमान आहे की मोर्चे लागू जाले. खबर दाट आहे. दोन च्यार रोजा तोफा होतात त्यास आज रात्रीपासून तोफा फारच होतात. पुढें काये परिणाम होईल तो पाहावा. राजश्री स्वामीची तपश्चर्या विचित्र आहे. फतेच होईल. आम्ही येथे मालावर आहो. प्रजन्य समीप आला. येक दुसरा पावसहि येथे पडला. पुढेंहि पावसास दिवस थोडकेच राहिले आहेत. कोकणचा पावस झडी बसली म्हणजे उघडणार नाही यैसा विचार आहे. तरी रा। स्वामीस व रा। तात्यांस यैसे आपण जे ल्याहावयाचे ते लिहून आमचा निर्गम येथून होये यैसे केले पाहिजे. स्वामी तो सर्वज्ञ आहेत. चितात हा अर्थ आलाच आहे. परंतु आम्ही सेवक लोकही जो प्रसंग असेल त्याप्रमाणें ल्याहावे याजकरिता वारंवार लिहितो.• स्वामीनी रोजमरा नेमून दिल्हा आहे त्याप्रमाणे लोकांस देतो, परंतु दाणा माहाग याजमुले पुरत नाही. याजकरिताहि माणूस अजुर्दे होते ऐसे आहे. यास स्वामी सर्वज्ञ समर्थ आहेत. बाणकोटाजवल रा। बकाजी माहाडिक याणे

+ येथून अक्षर बाजी भीवराव याचें.

मागे मेढा घातला होता तो इजयाईलीच[1] होता. पुढे शामलाने तोच मेढा बलकाऊन तेथून युद्ध केलेन. प्रस्तुत हुजरून रामचंद्र चोपदार कोट बांधावयास आला आहे, चौबुरजी बांधतात. दोन किले (फाटलें; अर्धी ओळ १० अक्षरें सुमार) होतो येथेहि दोन (फाटलें, ८ अक्षरें सुमार) पावस लागला म्हणजे चौबुरजी राहाता मुसकीलच आहे. गडगा कोसलोन पडल, परंतु प्रस्तुत राखणेस अठसे माणूस पाहिजे. पायागडकरी येथून पलोन गेले. त्यास सुभानजी काटकर याचे जमातीपैकी येथे अम्हापासी चौघे राहिले आहेत बिा

१ मलोजी यादव	१ दरेखान
१ नाइकजी यादव	१ खंडोजी जगथाप
—	—
२	२

[पुढील १२ ओळी मजकूर वरील ४ शिपायांच्या हिशेबासंबंधींचा आहे. किरकोळ स्वरूपाचा सबब गाळला.] बहुत काये लिा? कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao reports to the Peshwa that Anjanwel has been invested and requests him to call the writer back.*

No. 198] [*Recd. 19-5-1734*

पौ छ २६ जिल्हेज

श्री

विनंती उपरी, शाकाराचे वर्तमान तरी काही गावगनापैकी शाकार व खुद लोकानी पलीकडून आणून किले बाणकोट व पाणकोट दोन किले शाकारिले. किलेयाचा शाकार कुली विल्हे लाविले. शाकार बाकी राहिला नाही. सेखजी सुभेदार याच्या लेकास आरमारचा सुभा राजश्री स्वामीनी सांगून पाठविला, तो पुणेयास येऊन भेटोन त्याणे सांगितले जे, सेंभर माणूस हाली समागमें आहे व दोनतीनसे माणूस माहाडी आहे म्हणून सांगितले. त्यावरून स्वामीनी आम्हास लिा. ऐसियासी त्याणे सांगितले तों असेलंच. परंतु जमावाच्या गोष्टी तैशाच आहेत. त्याचा कनिष्ट बंधु माहाडीहून दाहा माणसानसी येऊन बाणकोटी राहिला आहे. थोरला लेक माहाडाहून गोपाल रामराऊ व तो यैसे * * परल पर्यंत आले. तेथे आल्याउपरी आंगरेयाकडील लोक भेटले. ते हे मिलोन राजपुरीकडे स्वारीस गेले. स्वारी मदगड आरावीपावेतो

---

१ तकलुपी.

जाऊन पाचसातसे गुरूढोरे घेऊन माघारे आले. गुरे आणिलीं तीं गोपालराऊ व आविंद यैसे मिलोन माघारे माहाडाकडे गेले आहेत. तिकडू(न) गुराची वाटणी करून येतील तेव्हा येतील. येद्यपि आले तरी त्याचा भरवसा आले म्हणून मानावा त्यायोग्य कारभार नाही. चालीस पनास माणूस जरूर येईल ऐसे आहे * बहुत काये लिा? कृपा लोभ असो दीजें हे विनंती.

¶*Baji Bhivrao to the Peshwa, communicating news about the forts of Bankot and Pankot.*

No. 199] [*19-5-1734*

श्रीं

असल रवाना तात्याकडे केली नकल

छ २९ जिल्हेज हा नारो कासीं

विनंती उपरी. ता छ २६ जिल्हेज रविवासरे मुकाम बाणकोटपावेतो स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. काली छ २४ जिल्हेजी भृगुवारी आम्हाकडील लोक रा हरि गणेश व धोंडजी बने व आदणा व बावाजीपंत दिा सेव्याजी भोईटे व हुशनशाकडील करोल सरवरखान ऐसे पलीकडे स्वारीस ब्राम्हणाचे कबिले अणावयाबद्दल रवाना केले होते. ते अरावीतून कबिले घेऊन श्रीवर्धनातून घेऊन आले. त्यास शामलाकडील स्वारी अरावीची व मतगडची याजवर दोनतीनसे माणूस आले त्याचे याचे युध्य जाहाले. आपले स्वारीने त्यास पिटोन घातले. दोन च्यार युध्य जाहाली. मग ते अडवे राणातून द्रुष्टीस न पडता मांडलेखाडीचे जवल खिंडीमधे आले. तो आम्हाकडील लोक बंदरावर थोडेसे होते, त्याजवर गोल्या टाकिल्या. हे देखोन आम्हाकडील आदणा व बावाजीपंत व सरवरखान करोल ऐसे होते त्यानी नीटच चालोन त्याजवर घेऊन त्यास पराभवाते पावविले. त्यातील गुणसावंत कुरवडेकर नामजाद जंजिरा यास मारिला. गोलीने जेर जाहाला. त्याच्चवर त्यांनी दाटी बरसी केली. परंतु मुर्दा नेऊ दिल्हा नाही. त्याचे डोचके कापून आणले. येक निशाण पाडाव केले, अण त्याजकडील तिघे जण ठार पडले. वरकड लोकास मोडोन त्यास पिटून घातले. स्वामीचा नक्ष त्याजवरी इभरत बैसली. लोकाचे कबिले कुली श्रीवधर्नाहून ब्राम्हणाचे व अरावीकराचे ब्राम्हणाचे ऐसे कुली रयेतचे अणिले. माहाजन वर्तक कारभारी श्रीवर्धनकर याणी चुकविले तेवढे राहिले. बाकी सर्व कबिले सुधा देखील रामभट वैद अणिले हे वृत्त स्वामीस निवेदन जाले पाहिजे. अपणाकडील लोकास ईश्वरे खैर केले. हाबसियाकडील लोकास

5354

नतीजा दिल्हा. याचे त्याचे युध्य होऊं लागले. आपण ऐकताच लस्करातून खासा आम्ही बंदरावरी गेलो आणि माहागिरीयातून दोन च्यारसे माणूस पलीकडे उतरिले तो त्याणी पिटून निगडीपावेतो घातले. अपणास कलावे याजकरितां लिहिले असे. बहुत काये लिा? कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंति.

¶*This is probably Baji Bhivrao's letter to the Peshwa reporting a skirmish with the Sidi in which the enemy was repulsed.*

No. 200] [*Date of receipt 19-5-1734*

छ २६ जिल्हेज

श्री

विनंती उपरी धोंडजी भोसला याजपासी स्वामी बोलले की राजश्री स्वामीस पत्र पाठविले आहे त्याजकडील काये आज्ञा येईल त्यासारिखे लोक पाठऊन फौज आणऊ. राजश्रीनी ठाणे आपले स्वाधीन करून घेतले तर उतम जाले. त्यास बाबूराव बंदोबस्त करावयास आले होते. त्यास ते गोवलकोटी स्वामिकार्यास आले. याउपरी राजश्री स्वामीकडून कोणी ठाण्यास येत नाही. येथील बेहबुदी स्वामीखेरीज कोणाचे हातून होत नाही. दुसरियाचा भरवसा या उपरी मानून दिवसगत लावावी यैसी नाही. हशाम व सरदार लौकर पाठवलिया लोक व आम्ही समागमे सेवेसी येऊ. महिन्याचा खर्च हशाम पाचसे ठेविले तर काये खर्च लागतो आणि लस्कर राहिले तर काये लागते हा विचार केला पाहिजे. आम्ही हे बहुत दिवस लिहितो, परंतु स्वामीनी हे गोष्ट ध्यानास आणिली नाही. बरे, याउपरी तरी विचारास उतम दिसोन येईल ते करावे. लोकांचा याउपरी अन्याये नाही. तुम्ही विचार न करिता घालघसरीवर घातले तर लोक विचार करितील. आम्ही येकटे मात्र ठिकाणी आहो. सरदार कोणी राहिले तरी पाये उतारा राहातील यैसे दिसोन येते आणि बोलतात. परंतु भरवसा मानावा यैसे नाही. लस्करचे लोक आलियावर आम्ही पायेच्या लोकामधे राहावे यैसेच स्वामीच्या विचारास येत असिले तरी तैसीच आज्ञा केली पाहिजे. त्यासारिखी वर्तणूक करू. तो केलसी माहालामधे रोखे केले होते, त्यास आंगरेयाकडील रा सिवाजी नाईक जाधव यानी आम्हासी बहुतसी गोष्ट दाटून सांगितली होती, त्यावरून केलिसीमाहालचे खोत कारभारी आणून त्याजकडे हिसेब काढिला तो चौ हजाराचा निघाला. परंतु सरखेलीकडे वसूल झाडियानसी होऊन गेला आहे. परंतु आम्ही नजर म्हणून सिवजी नाइकाकरता साडेतीनसे रुपयेपर्यंत खंडले आहेत. वसूल तो देत नाही. कतबे मात्र घेतले आहेत. वेसवी तो मधे

लस्कराने तमाम गावाचा गाव. लुटला. हली कौल मात्र दिला आहे. ज्या गावची पाहाणी राहिली होती, त्यास सरखेलीकडील व आम्हाकडील पाहाणदार काली गेले आहेत. दोनी माहाल जर लागले तर दुतर्फा वीस हजार रुा आकार आला तर होईल, परंतु या मुलकात टका नाही आणि जागा नामर्द आहे. हे लिगाड वारले तर उतम आहे, फाइदा काही नाही. बाणकोटच्या ठाण्यास खर्च पावणालाख रुपये पाहिजेत. मिलखत दाहा हजाराची नाही आणि अहिर्णिसी आंगारकासी कलह मात्र आहे. याउपरी पत्रदरशनी येक मातब्बर माणूस व पाचसे लोक यैसे रवाना केले पाहिजेत *, कृपा असो दीजे. किलाचा शाकार अगदी जाला. कळले पाहिजे हे विनंति.

¶Baji Bhivrao importunes the Peshwa for relieving him from the defence of Bankot where the writer is in extreme straits.

No. 201] [Received on 19-5-1734

छ २६ जिल्हेज

श्री

विनंती उपरी स्वामीनी आज्ञा केली कीं, लोकास ताकीद करून लोक राहावणे. त्यास लोक अमावाशेपरयेंत आहेत. याउपरी प्रज्यन्य मृगापासून लागो लागेल, तेव्हा म्हराटे घोडे काही ठेवितात यैसे नाही. खासे खासे सेंभरपरयेंत राहिले तर राहातील यैसा विचार आहे. आपण तो मृग निघाल्या-उपर राहात नाहीं. तेव्हा आम्हापासी काये सामान राहिले ते विदितच आहे. त्यास लोक तो येतात व प्यादेहि येतात. आम्ही कोटापासून कोसावर राहिलो आहे. त्यास येथे टिकाव होतो यैसा नाही. सामान पदरचे गेले तेव्हा कोटा-पासी राहिले पाहिजे. दोन रक्षण होतात यैसे नाहीं. राजश्री स्वामीस आजन-वेली घेतल्याविना फौजा घाटावर घेऊन जाणे नाही. दाभाडे यास याउपरी घाटाखाले उतरीत आहेत ते. लौकर कैसे जातील? गोवलकोट घेतलियाविना हुजरात व पवार घाटावर जातात यैसे नाही. हा विचार सर्व स्वामीस विदितच आहे. सेवकासहि कलतच आहे. त्यास आंम्ही काही इरेस गुतलो आहो यैसे नाही. वरकड सर्वहि इरेस गुंतले आहेत. आम्ही मोकले आहो. येक स्थल मात्र भलते प्राा रक्षण केले मणजे काही फिकीर नाही. हा विचार पूर्वीहि लिहीत गेलों. वरचेवर लिहितो. परंतु स्वामीस कोणता भास जाला आहे हे काही कलत नाहीं. त्यास हे स्थल तो हशम पाचसे आसलिया जागा च्यातुर्मास रक्षण

होईल. स्वामीनी हर कोणी मातबर पाठविला मणजे जागा राखेल. यैसे आसोन ये गोष्टीचा आनमान करावा यास कारण काये, हे काही कलत नाही. त्यास स्वामीच्या चितामधे आम्ही जातीनसीच राहिले पाहिजे यैसेच चितामधें आसिले तर त्याचप्रा आज्ञा केली पाहिजे. घोडी प्रज्यन्य लागला नाही तो देशास स्वामीपासी पाठऊन देऊ. आज्ञा होईल तेव्हां सेवेसी येऊ. लोक तो बरचेवर येत आहेत. आम्ही मैदानी राहून इजत खराब करावी यैसे काये आहे? च्यातु-र्मासाची बेगमी करून राहूं. ये गोष्टीचा विचार करून आज्ञा केली पाहिजे. ह्या कोकणामधे जो कोणी आला तो विचारे आबेकरून घाटावर गेला यैसे वडिलानीहि सांगितले नाही आणि हाली घडोनहि आले नाही. पुडेहि यावें यैसे नाहीं. आंम्ही जे दिवसीं येथून कूच करितो तेसमई बहुतेक जातीनसीच कोटा-मधे जाऊ. वरकड कोणी कोटामधे राहावयास येतील यैसे नाही. लोकानी विचार केला आहे की, आमावाशा जालियावर घोडी समस्त लाऊन देऊ. पाये-उतारा दाहावीस जण खासे मात्र राहू यैसे आहे. लस्कर गेले म्हणजे येथे आरण्यामधे काये म्हणून राहावें? स्वामीनीं मसलतीस पाठविले, त्यास जे श्रम करावयाचे ते केले, परंतु सेवट सार्थक हेच मिलो लागले. आम्ही पायेउतारा कोटची सबनिसी करून राहिलों हेच कस्ट करून मेलविलें. बरे रणाणबंध प्रमाण. आमच्या भोगास स्वामीनी काये करावें? मसलत येऊन आम्हाचवर पडली. आम्हाहून कोणी (ला)हाण मोठी राहावयास नाहीं. आणि स्वामीपासी थोर थोर आहेत ते हे क्षुलक कार्य कबूल कोण करितो? यैसे आहे. हा विचार आम्हांस न कलेसा काये आहे? याउपरी जे आज्ञा करणें ते केली पाहिजे. आमच्या तो विचारे यैसे होते जे, लोक व आम्ही समागमे सेवेसी यावे आणि येथे मातबर माणूस तुम्ही तरी पाठवावा आगर आम्ही तरी हरकोणी ठेऊन ठाणे जतन करितो यैसे होते. परंतु ते गोष्ट वडिलाचे चितास येत नाही. यास आमचा इलाज काये आहे? आम्ही आज्ञांकित आहे. जे आज्ञा होईल ते सिरसा आहे. स्वामीनी यैवज धोंडजीबा पाठविला त्यास पावल्यापासून दोन रोजमरे लस्करचे जाले. हजार रुपये खर्च जाले. बाकी हजार राहिले तेहि आठ रोजानी खर्च होतील. पुढे धोंडजीबाने पाठविलें आहेत व आपण आहे तो रोजमरा दिला पाहिजे व किरकोल लोक आहेत त्यासहि पाचसे रुपये पाहिजेत यास चांदराती आठ रोज राहिली. पत्र पावावयास साहा दिवस लागतील. यैवज यावयास आठ दिवस लागतील यैसे आहे. यामधे येथे महर्ग आहे. हशमास येक दिवस टलता कार्यास येत नाही. स्वामी तो बरचेवर यैवज पाठ-वीत गेले. पुडेहि पाठवितीलच. परंतु सूचनार्थ लिहिले आहे. वडिलास लिहिला आर्थ चितात आणून जे आज्ञा करणे ते केली पाहिजे. बहुत काये

5357

लिहिणे ? कृपा लोभ् आसो दीजे हे विनती. आम्ही येथे राहिलिया विनाकार्य टका खर्च होतो आणि लोकाची प्रज्यनामधे घोडी मरतील त्याचा उपकार होतो आणि सेवटीं हे स्तल रक्षण केलियाविना स्वामीस सुटत नाही. याउपरी विचारास येईल ते केले पाहिजे. आम्हीं लेकरपणे लिहिले आहे. स्वामी सर्वज्ञ आहेत हे विनंती.

¶Baji Bhivrao reports his difficulties in Konkan, and says owing to approaching rains his soldiers are fast deserting him and it is therefore not possible for the writer to hold out longer.

No. 202] *[Received on 21-5-1734*

छ २८ जिल्हेज

श्री

विनंती उपरी, गोवलकोटास रा॥ सिवजी जाधव नामजाद जंजिरे सुवर्णदुर्ग यांचे माणूस गेले होते. त्यास तेथील वर्तमान आले जे. रा॥ हरिपंत राजाज्ञा घाट चढोन सातारियास गेले, वरकड लस्करहि फुटोन देशास गेले. लस्कर जुजवी राहिले आहे. शामलाचा शह त्या लस्करावरी पडिला आहे. राजश्री स्वामीची आज्ञा आली कीं मोर्चे काढून दूर छावणी करून राहाणे, त्यावरून दूर राहिले आहेत. आमचे फौजेचे वर्तमान तरी प्रजन्यामुले लस्कर फुटोन चालले. खासे खासे मात्र राहातील. इतुके दिवस लस्कर दबाऊन राखिले होते, परंतु प्रजन्य लागो लागला. याउपरी लस्कर टिकोन राहात नाही. कोटास व लस्करास येका कोसाचें अंतर आहे. लस्करची कुमक किलेयास प्रजन्यात पोहचणार नाही. जवल राहिलेयास घोडे बांधावयास जागा नाही यैसे आहे. आम्ही येथील वर्तमान वरचेवर लिहीतच गेलो आणि स्वामी त्यांची ढालढकलच करीत गेले, परंतु इतुके दिवस जाले ते जाले, परंतु याउपरी तैसीच ढालढकल करावी यैसा अर्थ नाही. येथे घोडी अन्नाविणे व त्रुणाविणे खराब जाली. घोडियामध्यें ताकत राहिली नाही. याजकरिता वरचेवर सेवेसी लिा लागते. आम्ही मोधियास ताकीद करून बैल जिन्नस भरून रवाना केले व मागाहून रवाना करितो म्हणून आज्ञा केली, तरी तो मोधी कोठे आहे ? बैल कोठे आहे ? दाहावीस बैल आले त्याणे दोन रोज चालिले. याउपरी दाणा घोडेयास नाही. घोडी उपासी मरतात. याउपरी लोक पाठऊन येथील बंदोबस्ती करून आम्हास भेटीस यावयाची आज्ञा केली पा॥

+ पत्र बाजी भिवरावाचें.

* याउपरी वडिलानी पत्राची हेलसांड करावी येसे नाहीं. किल्याची बंदोबस्ती करून फौजेचा आव राखावा यातच फायेदा आहे. हा विचार आम्ही ल्याहावा आणि स्वामीस न कलेसा काये आहे? आधी हशम पाचसे रा। करावे. मग पत्र वाचावे येसा विचार आहे. यामधे स्वामी समर्थ सर्वजाण आहेत. बहुत काये लिा। कृपा असो दीजे हे विनंति.

¶Baji Bhivrao's letter to the Peshwa reporting the difficulties of the campaign and details of fight before Gowalkot. Unless funds and provisions are quickly supplied, the writer says it is impossible to hold on.

No. 203] [*Received on 21-5-1734*

छ·२८ जिल्हेज

श्री

विनंति उपरी काली सातारियाहून राजश्री येशवंतराऊ भोसले याचा जासूद आला, त्याणे वर्तमान सांगितले की, रा। कृष्णाजी दाभाडे व सुभानजी बोरगे हजार बारासे फौजेनसी कोकण प्रांते गेले. कालोजी भोसलेहि येक मजल गेले होते, ते उमाबाई याणी माघारे बोलाऊन आणिले. वरकड फौज गोवलकोटावरून आंजनवेलीस गेले हे वर्तमान स्वामीस कलावे याजकरिता लिा। असे. गोवलकोटाकडील वर्तमान तरी रा। बाबूराऊ विस्वनाथ पडिले. याउपरी जासूद पत्रे देऊन रवाना केले होते, त्यास युध्याचे वर्तमान तो आपणास कललेच आहे. उदाजी पवार व समस्त मंडलीचे कागद आले. येसियासी या फौजावरी शामल शेर आहे. आजीपर्यंत तों याजवरी इश्रतच आहे. हाली त्यास फौजेसहवर्तमान छावणी करावयाची आज्ञा जाली आहे. त्यास ते छावणी करून राहिले व त्याणी मोर्चे काढिले येसे वर्तमान आले आहे, तें परस्परे स्वामीस विदित जालेच असेल.
* कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंति.

¶Baji Bhivrao sends the Peshwa news from his camp about changes effected in the command at Gowalkot, death of Baburao Vaidya and about Udaji Pawar having cantoned near Gowalkot during the monsoon. These various famous Sardars having been deputed by Shahu for the campaign, show how enthusiastic the King was about it.

No. 204] [*21-5-1734*

छ·९· मोहरम

श्रीमलारीजयति

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

पोष्य जिवाजी खंडेराऊ कृतानेक दंडवत प्रणाम विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वानंदलेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनीं पत्र पाठविलें

तें छ २८ जिल्हेजीं पावोन समाधान जालें. गोवळकोटीं युद्ध जालें. राजश्री बाबूराव निर्गमले. पुढें तुमचें व गोवळकोटीचें वर्तमान साध्येंत लिहिणें म्हणोन लिहिलें, ऐशास पहिलें राजश्री फत्तेसिंगबावा याकडील पहिले हजार फौज व हुजरात पागा व हशम चवदासें व सरखेलीकडील दोन हजार हशम ऐसें होतें. मोर्चे मातबर खाडीवरी दुराटीचे गोलीचे टपियाचे मानी गेले. परंतु फौज भारी असलियाविना कार्य होत नाहीं. त्यामधें आमचे हशम व राजश्री फत्तेसिंग बावाकडील फौज निंमे जाली. कितेक दुखणीयानें पडले. तैसेच आंगरिया-कडील लोक दुखणीयानें फारच जेर जाले. दाभाडियाची फौज राजश्री स्वामीनी सुभानजी बोरगे पाच साहाशे रवाना केले ते छ २६ जिल्हेजीं येथें दाखल जाले. त्यामध्यें निवड घोडी तीनशें, यारदी तीनशें असे आहेत. ये गोष्टीनें मनसुबा होतो ऐसें नाहीं. वरकड साहास तरतूद करतां अंतर जाहालें ऐसें नाहीं. राजश्री संभाजी आंगरे ही अरमार खुष्कीस ओढावयास विजयदुर्गी गेले आहेत. पुढें पर्जन्य समीप आला. यानिमित्त राजश्री स्वामीनी छावणीची आज्ञा आम्हांस व गोवलकोटकरी यास केली आहे छावणी होईल असें आहे. बाबूराव पडले त्यास गनीम हरामज्यादगा. याचे मोर्च्यामध्यें जमाव नव्हता, ऐसी संधी पाहून गनिमानें येऊन मोर्च्यावरी घातले. दोही खाडियांतून गलबताचा मार व वरील कोटाचा मार केला. त्यामधें प्रथमच बाबूरायास मांडीस गोला लागून ठार जाले. तेथील उपरालियाचा व साहित्याचा प्रसंग राजश्री स्वामीकडील ये रीतीचा. येथील विचार यैसा आहे. पुढें छावणी करणें प्राप्त जाली आहे. हें वृत्त स्वामीस कलावें यानिमित्त लिहिलें असे. पुढें छावणी कोणे ठिकाणी होईल तें वृत्त लेहून पाठविलें जाईल. बहुत काय लिहिणे कृपा असूं दीजे हे विनंति.

¶*Jiwaji Khanderao reports to the Peshwa details of the fight at Gowalkot in which Baburao Vishvanath Vaidya lost his life.*

No. 205] [*22-5-1734*

श्रीभवानीशंकरप्रा

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे

सेवेसी

पोष्य कृष्णाजी नाईक रास्ते कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपर. येथील कुशल तां जेष्ठ शुध १ जाणून स्वामीनी आपले स्वानंदवैभवलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. दरबारचे वर्तमान तर रा जांनो शंकर यासी आंजनवेली व गोवलकोटास रवाना केले. त्यास आज्ञा केली की, तमाम सरदार यासी ताकीद

करावी की, तुम्ही उठोन न येणे. येथे आलियाउपर तुमची स्थित राहाणार नाहीं म्हणून साफ त्यास आज्ञा केली. परंतु लोक किरकोल उठोन येतात. बाबुराव विस्वनाथ याचा धंदा मोकला पडला. त्यास बाबूराव दुसरे रत्नागिरीकर यांच्या स्वाधीन करणार आहेत. परंतु तो आपले स्वाधीन करून घेत नाही. त्यास रा। फतेसिंगबावा याच्याहि चितात नाही. कोकणचा मनसबा त्यांच्या ध्यानास बाबूराव यास सांगावयासी येत नाही. दाभाडीकडील गरागर्षा पडला आहे. कालीहि दोन खून जाहाले. रोज उठोन कटकट होती. त्याची स्थित सातारियांत काही राहिली नाही. कारभार फटकल जाहाला. सविस्तर वर्तमान सेवेसी लिा आहे. कळले पाहिजे. तुलाजी सितोले श्रीमंत राजश्री राव याजबरोबर गेले होते. ते आले आसले तर त्यास ताकीद करून यैवज त्याजपासून घेऊन आम्हास पावे ते गोष्ट केल पाहिजे. अगर सितोलियाचा जाब तरी आम्हास लेहून पाठविला पाहिजे. राजश्री स्वामीनी भांडे घोतीत होते ते फुटले याजकरिता बहुत बेदम आहेत. रुपयाकरिता बहुत खटे आहेत. स्वामीविषई आतां त्याच्या चिताची खातीरनिशा जाहाली की, हाकनाक पेशजी कोकणच्या मनसबियास खटे केले. आता मागती त्यास काय म्हणून म्हणावे? परंतु त्याची वासना आहे कीं मागती स्वामीचे स्वाधीन करावे. वाडियातून हाच मार होतो. सेवेसी श्रुत होवे म्हणून लिहिले आसे. हरघडी पत्रद्वारे दया करून सांभाल करीत आसिले पाहिजे. कृपा लोभ आसो दीजे हे विनंती. आमचे कागद दुसरियाकडे ठेवावयासी न द्यावे कलले पाहिजे हे विनंती.

¶*Krishnaji Naik Raste complains to Chimaji Appa that some Sardars are leaving Anjanwel and Gowalkot though they were strictly ordered to remain there. He also reports the dissensions in the Dabhade family and Shahu's regret about having recalled Bajirao.*

No. 206] *[23-5-1734*

छ ९ मोहरम

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसी

सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित उदाजी पवार कृतानेक दंडवत विनंति उपरी. येथील कुशल जेष्ठ शुध द्वितीया गुरुवार जाणौन स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले. लिहिला अभिप्राय कलो आला. गोवलकोटीचे काय वर्तमान ते लेहून पाठवणे म्हणोन आज्ञा. त्यास चराच्या मोर्च्यापुढे मोर्चे चालऊन लंकड-

कोट हातधोंड्याचे टप्यावरी राहिला होता व शत्रूहि जेर आला होता. घडी प्रजन्य अतिसमीप डोईवरी आला. वृष्टि होऊन चरात व मोर्च्यात पाणी भरल्या उपाये नाही. प्रजन्यकाळी गोवलकोटास मोर्च्याचा मान नाहीं याज- करितां राजश्री स्वामीनीं आज्ञा केली की मोर्चे उठऊन छावणी करणे. त्याजवरून आज्ञेप्रा॰ मोर्चे उठऊन आणून छावणी करीत आहे. छावणी जालियानंतर लोक ठेऊन बंदोबस्त करून सातारियासी जाऊन. प्रसंगी आपण येऊन उर्जित कराव. आपला पूर्वसंकल्प सिधीस न्यावा. येविसी विनंति विस्तारे करून आपणास पत्र पा॰ आहे ते पावेल. अशास सर्वाविसी आश्रये आपला आपण अभिमान धरिल्याचा सेवट करितील हे निशाच आहे. तेथे विशेष ल्याहावे यैसे नाहीं. बहुत काय लिहिणें कृपा असो दिली पाहिजे हे विनंती.

¶*Udaji Pawar reports details of the siege of Gowalkot and says that he is cantoning there for the rains.*

No. 207] [*24-5-1734*

पौ॰ ९ मोहोरम

श्रीमंगलमूर्ति

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसीं

विनीत सेवक कृष्णाजी राम साष्टांग नमस्कार विज्ञापना यैसीजे. कुशल तागायत छ २ मोहरम मुकाम मुंबै स्वामीचे कृपेंकरून. यथास्थित आसे विशेष. येथील वर्त सविस्तर लिहितां पुर्वत नाहीं. आतां दोनप्रहरा सिदी साद चढला. गलबतें समागमें व तारवें सुरतेहून आणिलीं तीं घेऊन जातात. येथें मिस्तर लाधर आले आहेत. दोन लक्ष रुपये देतात. परंतु हे कबूल करीत नाही. पुन्हां तारवें राजपुरीस घेऊन चालिले. इतुका विलंब विनंतीपत्र सादर करावयास लागला. निमित्य जे, आम्हांवर बाजी[१] आली आहे कीं, येथून जाहाली खबर स्वामीस लिहितों. बजिनस पत्रें शामलाचे तर्फेनें येऊन पोंहचलीं आहेत. आतां होतां होईल ते पाहतच आहों. दाहा हजार रुपये आणिले म्हणतात. हें सर्व लटिक म्हणून गैरत जाहलियावर जनरालनें बोलाऊन आम्हांस विच्यारलें कीं, रुपये आणून काय करतां? त्यास आम्हांस पूर्वे सूचना जाहालीच होती. हिशोब दाहा हजार लोकाकडे आहेत म्हणून रुजू करून दाखविलें. यावर शामलानें येथें येऊ नये म्हणून उपदेश जाहाला व मानाजी आंगरे याकडूनहि जाहला आहे

---

१ प्रसंग. संकट.

म्हणून यैकतों. परंतु तथ्य नाहीं. हे युक्तीचे वाटेनें आम्हांस रवाना करीत होते. परंतु वसूल रुपये करणें हे निमित्य योजून हा कालवर राहिलों आहों. पुढें काय होईल तें पहातों विशेष विनंती. आम्हांस पत्र येईल त्यामधीं वरचेवर जाहाली खबर लिहिणें यैसें पत्रीं नसावें. येथें चौकसी फारसी निघाली आहे. इकडून पत्र पाठवितां भारी म्हणून कल्याणमार्गी रवाना जाहलें असे. राजश्री वासुदेव जोशी यांस सत्वर ताकीदपत्र येईल तर उत्तम गोष्ट आहे जे, कदाचित प्रसंगोपात हुंडी रुपये पांच सहस्र पावेतों केली तरी ते मज म्हणत पेसजीं अडीच हजाराची हुंडी तीहि त्याजकडेसच आसे. रुपये आणले नाहींत. सेवेसी श्रुत होये. कोथलायाचें वर्तमान सिदी साद पुसत होते कीं मानाजीनें घेतला हें खरें कीं काये ? अम्ही उत्तर केलें लिहिलें आलें नाहीं. आल्यावर कलेल. येथें गलबतें तांदूल भरून आलीं आहेत ४ च्यार. त्यास सिदी टपतो. आम्हांपासी विकत मागत होते त्यास उत्तर केलें कीं आम्हां आधीन नाहीं. जनराल पुसत होते तांदूल कां पाठवितात ? आम्हीं सांगितलें मानाजीचे उसणें कुलाब्यास घेतले होते ते पाठविले आहेत. त्यास कुलाब्याहून बानकोटास (हा न काढावा ?) म्हणून समाचार आला. त्यावरून आमचा विश्वास उडालासा जाहाला आहे. आम्ही बोलिला बोल खरा करून दाखविला आहे. पुढें पहावें. कदाचित जासूद आले हुजरून तर पेणेसच आधी राहून पुर्ती खबर घेऊन इकडे उतरत तें करावयास स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

¶[*News-letter from Krishnaji Ram, Peshwa's news-agent at Bombay : explains the friendly attitude of the English towards the Sidis of Janjira.*[1]]

No. 208] [*26-5-1734*

छ ६ मोहरम

श्री

विनंति उपरी. ताा छ ३ मोहरम रविवासर संध्याकाल पावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. येथील वृत वरचेवर सेवेसी लिहीतच गेलो आणि स्वामी ऐकतच गेले. परंतु पुढे परिणाम सेवकाचा काये योजिला हे कलत नाही. लोक तो वरचेवर उठोन रात्रौ दिवसा जातात म्हणून लिहीत गेलो, त्याची तरतूद होणे ते होऊन येत नाही. तेव्हा पुढे काये विचार करावा तो लिहिला पाहिजे. आजी आपाणासमेत जमाव उठोन गेला. बहुत प्रकारे सामाधान केले. काल रोजमरा हातास येईतोपर्यंत जावयाची गोष्टी बोलिला नाही. स्वामीच्या (आज्ञे)चा मार्ग लक्षीत आहे यैसे दर्शविले आणि रोजमरा हातास येताच आजी उठोन

[1] Bk Ca 8—23

गेला. समाधानास्तव मानाजी घाटगे संभाजी घाटगे व पटलोजी मुले हुसैनशा यैसे गेले होते, परंतु कोणाची गोष्टी न ऐकता रेटाईच करून गेला. तो गेल्याउपरी आम्हापासी जमाव काये आहे तो स्वामीस कलतच आहे. तीन कोट व चवथे लस्कर यैसी राखिले पाहिजे. प्रजन्यहि पडो लागला. लोक उठोन गेल्याउपरी सेवकाचा अंत सेवटवरी पाहावा ऐसा अर्थ नाहीं. आमची इजत गेलिया वडिलाची कीर्ति होत असेल तर करावी. इतके दिवस ल्याहावयासी * * * * न केला नाही या उपरी लेकराची हेलसांडी केली * * * दिसोन आलियानंतर वारंवार ल्याहावेसे काये आहे? वर्तमान सेवेसी दिनचर्ये * * * वी म्हणून लिहिले आहे. हशमाचे सामान म्हणतील तर धोंडजी बावा पाठविला तो व आम्हापासी पूर्वील सामान सिरके व हरि गणेश व जेजालंदाज व कृष्णाजी पवारकडील सात आसामी यैसे आहे या प्रा सामान आहे. बरे ईश्वरइच्छेस जे आले ते खरे. म्या अहिर्णिसी पत्रें पाठवावी आणि स्वामीनी उभयेता येकत्र असोन तरतूद न करावी यैसा मी अन्याई नव्हतो. परंतु आमचे प्राक्तनयोगेकरून जे होणे ते होत आहे, यात स्वामीचा इलाज काये आहे? धोंडजीबा जमावानसी कोटामधे आहे व हरि गणेश जमावसुधा व सिरके व पवाराचे सात आसामी आहे यैसे ७० सतर माणूस पाणकोटी आहे. चौबुरजीमधे जेजालंदाज जमावसुधा आहेत. आम्ही झाडाखाले जमावसुधा आहे. वेसवीच्या बंदरावर निलोजी मोरे व आबाडकर प्यादे बारा असामी यैसे आहेत. या न्याये आजीवर काल क्रमला. याउपरी स्वामीच्या पुण्ये वडिलाचे आसीर्वादे व श्रीचे दयेकरून रात्रिंदिवस जाईल तो खरा. स्वामीपासोन जमाव आसोन आमचे इजतीवर आणावे आणि दुरंदेशहि नाही यैसे आसोन घडोन आले, यास इलाज काये आहे? या पत्राचे उतर व लोक चितास येईल तर पाठविले पाहिजे ही विनंति. रायगडकरी याचे वीस माणूस पाणकोटी आहे.

¶*Bajirao Retrekar explains the wretched condition of his men and requests relief.*

No. 209] [*Received on 26-5-1734*

छ ४ मोहरम

श्री

विनंती उपरी. रामजी संकपाल दिा सुभानजी काटकर हा नारो वासुदेऊ या समागमे आला होता तो हाली धोंडजी भोसला याजसमागमे पाठविला असे. तरी यास धोंडजी समागमे फिरोन सत्वर पाठविला पाहिजे. बाणकोट व पाण-

कोट दोनी किले कुली शाकारून सिध केले असत. किलेयाचा शाकार बाकी राहिला नाही. कलले पाहिजे. चौबुरजी, पेसजी ढासलली ते सेवेसी कललेच असेल. वरचेवर पडत जाती त्यास तो जागा मुस्तेकीम केल्याविना स्थल रक्षण होणार नाही. सारा जीव ते रक्षण केले पाहिजे आणि ते तो ढासलोन पडिले. शाकार करावयास योग्य जागा नाही. सेखजी सुभेदार यांचा पुत्र आरमारचा उभा करून हुजरून आले होते, ते आरमार तरते करून पाणियात आहे तैसे देऊन दृष्टीगोचर करून आजी हुजूर जावयास गेले * हे विनंति. रामजीस खर्चास रुा ॥ निमे दिल्हा असे. चांदरात जाली. मोहरमचा रोजमरा द्यावयासी आज्ञा केली पाहिजे * हे विनंति.

¶*Baji Bhivrao to the Peshwa : says that the forts of Bankot and Pankot have been prepared to stand the monsoon.*

No. 210] [*Received on 26-5-1734*

छ ४ मोहरम

श्री

विनति उपरी. फौजेची गणती पाठविली आहे, परंतु दर आसामीस दीड रुपया प्राा रोजमरा देत आहे. याखेरीज सरदारीस माणूस पाहून रोजमरा देत आहे. मानाजी घाटगे याचे लोक होते त्यापैकी निमे गेले व निमे राहिले. त्यास निमे रोजमरा देत आसो. त्या खेरीज माणूस पाहून आर्जबाबहि आजीवर देत आलों आणि पुढेहि देत आसो. रोजमरियास यैवज नाही, येईल तेव्हा रोजमरा दरमास देऊ, परंतु लोक धीर धरणार नाहीत. हेहि सेवेसी कलावे म्हणून लिहिले आहे हे विनंति.

¶*Baji Bhivrao informs the Peshwa that his men are fast leaving him and that they are clamouring for their pay.*

No. 211] [*Received on 26-5-1734*

छ ४ मोहरम

श्री

विनंति उपरी. वरचेवर पत्रे सेवेसी पाठविली त्याचें प्रतिउत्तरें आली नाहींत. आम्हीं तों येथील वृत सविस्तर वरचेवर लिहीत गेलों, परंतु ते गोष्टीचा विचार

---

१ तयार, मजबूद.

वडिलानी काही केला नाही. लोकाचे वर्तमान लिहिले त्यास. होणाजी बलकवडे याजकडील शंभर माणूस व हुजरचे तीनसे माणूस यैसे पाठवितो म्हणून लिहिले, तेहि अद्यापवर कोणी आले नाही. येथून लस्कर तो वरचेवर जात आहे. सामान लुटले. पूर्वी आहे तेहि विदित आहे. त्याहीमधे जात आहे यैसे पत्री अहिर्णिसी लिहित गेलो. परंतु स्वामीनी गोष्टीची हेलसांड केली. तर यामधे सेवकाचे आनहित काये पाहिले आहे? जे आहे ते सर्व वडिलाचे आहे. यैसे आसोन लोक पाठवावयास दिरंग केला आहे हे काही कलत नाही. तर सविस्तर लिहिले पाहिजे. राजश्री स्वामीची आज्ञा म्हणावी तर त्यानी गुंता ठेविला नाही. किला च्यातुर्मास तुमचे स्वाधीन केला यैसे आसोन लोक आहेत ते खराब करून खर्चेहि व्यर्थ करावा आणि सामान तो नाही, तर ये गोष्टीचा विचार करून लोक लौकर पाठऊन आम्हास फौजे समागमे घेऊन गेले पाहिजे. आणखीहि दोचौरोजामधे बहुतेक लोक जातील. निवलच राहू यैसे आहे. आपणाहि जात आहे. येक दिवस आहे की दोन दिवस आहे, हा भरवसा नाही. आहे तो आहे. जाईल तो समई कलेल. यैसे आम्ही किती दिवस त्याहावे हे आज्ञा केली पाहिजे. येथे हशमाचे काम त्यास फौजेचे कार्य नाही यैसे आम्ही लिहीत गेलो. त्यास या उपरी खासे मात्र राहणार ते राहातील. त्याचे येथे राहून काय प्रयोजन आहे. हे तरी सेवकास ल्याहावे, त्याप्रमाणे वर्तणूक करू. फौजेत सामान नाही. या उपरी आवाई पडली तर उतम नाही. मनुशाने धीर सोडिल्यावर कार्याचे नाही. स्वामीची आज्ञा होती की नामर्दाचे मर्द करून स्वामिकार्य करावे, त्यास आजीवर वडिलाचे पुण्येकरून जसे कलेल तसे निभावले. परंतु या उपरी सेवटवर दिवस सारिखेच आहेत यैसे नाही. जो विचार करणे तो लौकर करून सेवकास व फौजेस सेवेसी न्यावे यात उतम आहे. होनाजी बलकवडे याकडील माणूस लौकर येत नाही. कल्याणचे दोनसे माणूस आणिविले आहे म्हणून आपणाकडील लोक आले त्यानी सांगि(त) ले त्यावरून कलो आले. परंतु ते लोक कधी यावे आणि आम्हाकडे रा कोणे समई होतील? आम्ही येथे कितिक दिवस राहावे ते आज्ञा केली पाहिजे. फौजेची यादी पाठविली आहे यामधे वरचेवर दिवसे दिवस जात आहेत. या सामानानसी बाणकोटापासून कोसावर राहाता कार्यास येत नाही आणि कोटापासी गेलो तर घोडे बांधावयास जागा नाही यैसा विचार आहे. याउपरी सामान नाही. सेवकाची इजत राही ते करणे. लोक आधी रा करणे, मग पत्र वाचिणे हे वडिलास उचित आहे. किल्याची बेगमी जाली म्हणजे सेवेसी येऊ. राजश्री स्वामीची आज्ञा यावयास पाहिजे म्हणून लिहितील तर दिवसगत लागेल. लोक आले म्हणजे लोक राहतील ते व आम्ही चरणापासी येऊ.

कळले पाहिंजे. बहुत काये लीहणे. धोंडजी भोसला मुखवचनें वर्तमान सांगता सेवेसी कळो येईल. यास सत्वर पाठविले पाहिजे. ही विज्ञाप्ती.

¶*Baji Bhivrao writes to the Peshwa how difficult it is for him to stay in Konkan unless more men are sent for his help.*

No. 212] [*About May 1734*

नकल

श्री

राजमान्य राजश्री भिवेराऊ[१] यांसी आज्ञा केली ऐसीजे. तुम्ही विनंतिपत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाला. बाणकोटावरील भांडी उतरोन गोवलकोटास पावावयाविसी अज्ञापत्र सादर केले आहे त्याप्रमाणें भांडी उतरोन पावावयाचा विचार केलाच असेल. ऐसियासी तुम्ही कार्यकर्ते मर्दाने सेवक आहा. जीवाभ्य श्रमसाहास करून स्वामीचा मनोदये सिधीस पावाल येविसी स्वामीस भरोसा आहे. तुम्हाविना गोवलकोटाचा कार्यभाग सिधीस पावत नाही. बाणकोटी घोडियास जागाहि नाही. याजकरिता तेथे हशम लोक व येक मातबर सरदार ठेऊन तेथील बंदोबस्ती करणें. जागा जुमस न खाये यैसी बेहबुदी करून तुम्ही सिताबीने गोवलकोटावरी येऊन हस्तगत करून संतापाचे वर्तमान हुजूर लिहिणे. आपला खातरजमा राहे यैसी मजबुदी करून गोवलकोटास जाणे. तुम्हाकरिता स्वामी बेफिकिर असेत. कलेल तैसा बाणकोटचा बंदोबस्त करून बहुत सत्वर गोवलकोटावर जाणे. वरकड कितेक आज्ञा राजश्री अमृतराऊ त्र्यंबक यांस केली आहे. सविस्तर लिहितील त्यावरून कलो येईल. (हस्ताक्षर) बहुत काय लिहिणे.

¶*Shahu orders Baji Bhivrao to support the besiegers at Gowalkot*

No. 213] [*13-6-1734*

श्री

ꣳ मा। अनाम देशमुख देशपांडे ता। केलसी व ता। वेसवी यासी बाजीराऊ बलाल प्रधान सु।। खमस सलासैन मया व अलफ. राजश्री सुभानजी सिंदे यास बाणकोटास जमावसहित पाठविले आहेत. ता। मजकूरचा अमल मारनिलेस करावयाची आज्ञा केली आहे. तरी तुम्ही हबशा * * (अ) मल देत होतेस त्याप्रा। मारनिल्हेस अमल देणे. जाणिजे छ २२ मोहरम आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa orders Deshmukhs and Deshpandes of Kelsi to pay to Subhanji Sindia the assessment which they formerly gave to the Sidi.*

---

१ नकलकारानें 'बाजी' हा शब्द भिवरावाच्या आधींचा गाळला असावा.

5367

No. 214] [14-6-1734 ?

छ २३ मोहरम

श्री

सेवेसी विज्ञापना. हिकडील वर्तमान तर हबसियाचे माणूस पाचसे नांदगाऊ खेड खाडीस आहे. तेथे गलबते लाऊन पाचसे माणूस दोन प्रहरी पालदुर्ग येथील घेरा पाली देखील मारून नेले म्हणून सागतात. वाटेने लोक स्वारीस पुसत, तुम्ही कोणाचे लोक, तर ते सांगत की आम्ही सरखेलीचे माणूस त्रिजेदुगाहून आलो. पालदुर्गचा घेरा राखावयासी जातो. यैसे करून जाऊन घेरा मारून से सवासे माणूस व गुरे तीनसे यैसी नेली म्हणून माणसे आली ती सांगत होती. उदाजी पवार व आनंदराऊ सरलस्कर याजकडील राघोराम यैसे दलवटणेयासी चिपोलणास आहेत. राजश्री जिवबा अजून आले नाहीत. येणार आहेत. वरकड कुल अंजणवेली गोवलकोटचे आले. हे इतके चिपोलणाजवल राहिले आहेत. राजश्री सेनापति उमाबाई राजश्री मंत्री याचे घरी आहे. दोन दिवस वाडियात नेली होती. मग छ १९ मोहरमी फिरोन मंत्री याचे घरी आली आहे. राजश्री प्रतिनिधीस बरे वाटत नाही. सेनापतीच्या लस्करास छपरे घालावयासी सांगितली आहेत. राजश्री बसवंतराऊ पुसत होते की सेरीचा कागद व कुणबिणीचा जाब काये म्हणून येत नाही? लिंगूबाई म्हणत होती की कुणबिणीचे माणूस रिकामे न पाठवीत तर उतम आहे यैसे म्हणत होती. वाड्यातील काम तारजखाना साकारला. आतील भुई व कवाडे करून द्यावी. बाहेर मोरीजवल हाऊद येक बांधोन द्यावा. राजश्री तात्यासी वरचेवर सागतो. ते म्हणतात की धनी सांगेल ते करावे लागेल. देवडीचे घर बांधतो. येक मोल मुस्तेद जाहाले, तीन मोले राहिली आहेत. त्यासी वासे लाऊन वोहाण घालून कवले घालावी लागतात. आतच्या घराचे काम तसेच राहिले आहे. सेवेसी श्रुत होणे हे विज्ञापना. दाभाडेयाकडील राऊत पाठवावे म्हणून ताकीद आहे. परंतु गेले नाहीत. हिरोजीराऊ पाटणकर वतनाकरिता गेले आहेत हे विज्ञापना.

¶ *This is a news-letter giving news of Konkan and also of Satara. It mentions among other things the return of most of the besieging forces from Konkan, the illness of the Pratinidhi, the interviews of Umabai and the King and the Mantri.*

5368

No. 215] [17-6-1734

श्री

तैनात जाबता दिा विठल गोविद हशम
सुा खमस सलासनि मया अलफ असामी ४२
येकून दर माहे रुो २७७
येकूण असामी बेताळीस रास. येकूण दोनसे सत्याहतर रुपये रास.

	असामी.	अंडाव.	बरकदाज.[1]	तैनात दरमहा.
विठल गोविद वा सिधोदुर्ग.	१	१	०	३०
त्रिबक नारायण वस्ती रायपाटण.	१	१	०	१२
निा कानसावत खासा वा कस खारपाटण.	१	१	०	१२
येसाजी पिलाजी पालाडे. वस्ती कुसूर ता खारापाट.	१	१	०	७
जेताजी येसाजी घाग सवदल कसबा प्रो राजापूर.	१	१	०	७
बाबाजी धोंडजी बेडके. वस्ती कसबे कलसी.	१	१	०	६
लखमाजी सिवजी कडू वस्ती तांबने ता सवदले.	१	१	०	६।
सताजी दादजी कदम वस्ती धामापूर ता सगमेश्वर.	१	०	१	६
मालजी सोनजी सिंदे वस्ती धामापूर ता सगमेश्वर.	१	०	१	६
रामजी महादजी राक वस्ती मौजे कलसी.	१	०	१	६
कानाजी रासम वस्ती धुदवडे ता केलसी.	१	०	१	५
आबजी रासम.	१	०	१	५
कानोजी जाधव वा कलसी	१	०	१	५
बावाजी धावडा.	१	०	१	६
बाळोजी गावडा.	१	०	१	६
येसोजी कुसूरकर घोरगा दिा कानसावत.	१	१	०	२
	१६	६	१०	१२५॥

१ वाटेल तें हलकें हत्यार घेऊन लढणारा.

दिा पिलाजी माळंजी गुजर खासा वस्ती किरकवाडी कार्यात मावल.	१	१	०	९
बावाजी कमाजी कांबले बस्ती पेठ कसबे घोसाला.	१	१	०	६
राम सावत वा बलसावत वस्ती वेरा सुवर्णदुर्ग.	१	१	०	५
पिलाजी भानजी सकपाल वस्ती हरणई.	१	१	०	५॥
गंगाजी गुणाजी सिंदे वस्ती हरणई.	१	०	१	५॥
धर्मोजी गोदजी चालके वस्ती अलीबाग जिा कुलाबा.	१	०	१	५
	६	३	३	३६
दिा पिलाजी विठोजी यादव वा अल्हर ता मलकापूर.	१	१	०	१०
महादजी मिठजी बुरणकर वस्ती अल्हर ता मलकापूर.	१	१	०	८
सभाजी गणोजी कांबले वा अल्हर ता मलकापूर.	१	०	१	६
लखमोजी भुतोजी चिले वा पनाला.	१	०	१	५
कृष्णाजी सोनजी भेसरे वा अल्हर ता मलकापूर.	१	०	१	५
महाहदजी धर्मोजी चिले वा अल्हर ता मलकापूर.	१	१	०	५
येसाजी रायाजी पवार वा गोडखेड ता वाळवे.	१	१	०	४
रायाजी कृष्णाजी वीर वा अहिरे ता मेढेखोरे.	१	०	१	६
कृष्णाजी बडागला वा कुसाजी दारकर वा कणेचे.	१	१	०	२
अमल दिा पिलाजी यादव.	१	०	१	६
नयकाला भिकनाक वा मानवड ता मलकापूर.	१	०	१	५
गोंडनाक गणनाक वा नलाख उमरे.	१	१	०	६
भोजनाक हरनाक वा.	१	०	१	५

रामनाक नरसनाक वा सुधगाव नजीक मीरज.	१	०	१	५
खडनाक हरनाक वा नवलाख उमरे.	१	०	१	५
लखनाक मीठनाक वा कोतवली ता भोगाव.	१	०	१	५
	१७	७	१०	९३
दि॥ जोत्याजी पवार वा वजोली ता कोले.	१	१	०	१०
नरसोजी मोहिते वा बारसू प्रांत राजापूर	१	१	०	७
निबाजी तलकर वा वाजोली	१	०	१	५॥
	३	२	१	२२॥

तेरीज येकंदर

	आ.	अडाव	बरकंदाज.	दरमाहे-तैनात.
विठल गोविंद व लक्षुमण नारायण.	२	१	०	४२
दि॥ कान सांवत	१४	४	१०	८३॥
दि॥ पिलाजी गुजर.	६	३	३	३६
दि॥ पिलाजी यादव.	१७	७	१०	९३
दि॥ जोत्याजी पवार	३	२	१	२२॥
	४२	१८	२४	२७९

पौ वजा माहे दोन बाकी देणे दसमाही
चाकरी माफक कबज होईल. सदरहू
प्रमाणें दसमाही ऐवज पावेल. छ २६
मोहरम आज्ञाप्रमाण

¶*This is a list of men employed under Vithal Govind with details of pay sanctioned by Peshwa Bajirao probably for work under Baji Bhivrao. The names will help tracing some new historical personages and explain the system of recruiting men into service.*

No. 216] [*Received on 4-7-1734*

पौ छ १३ सफर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंति उपरी. पूर्वी स्वामीस लिहिलें होतें कीं शामलाचा वकील फिरंगियाकडे आला आहे, परंतु अद्यापि बोली नाहीं. दाहावीस माणूस व येक हबशी असे

प्रस्तुत आले आहेत. पुढें होईल वर्तमान तें लिहोन पाठऊं. बहुत काये लिहिणें. लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*A writer reports to the Peshwa that a Vakil of the Sidi has approached the Portuguese but negotiations have not been yet started between them.*

No. 217] [*30-7-1734*

श्री

तैनात जाबता दिा सताजी नाईक
वगैरे * * * मनुवर सुा खमस
सलासीन मया व अलफ.

	असामी.	बरकनदाज.	अडाव.	दरमाहे तैनात.
दिा सताजी नाईक.	५	३	२	५०॥
दिा सताजी सालोखा.	१८	१७	१	११५८
दिा राणोजी सितोला	२३	२२	१	१५७
दिा मलजी नाईक.	१०	९	१	६७
दिा सताजी बोभला.	१२	११	१	८०
दिा मत्याजी बवल.	७	६	१	४२
	७५	६८	७	५११॥

येकूण असामी पच्याहातर पौा बरखदाज अडुसष्ट व आडहत्यारी सात यांसी दरमहा तैनात रुपये पाचसे साडे आक्रा रास

दिा सताजी नाईक खासा.

	असामी	बरखनदाज.	अडाव.	दरमहा तैनात.
सताजी नाईक	१	०	१	३०
नरसोजी मनवर	१	१	०	६॥
डोंगरोजी मनवर	१	१	०	६
सुभानजी मनवर	१	१	०	५
सुभाना मनवर बुा	१	०	१	३
	५	३	२	५०॥

दिा संताजी सालोखा मुनवर छ १ सफर

	असामी	बरकंदाज.	अढाव	तैनात सो.
खासा संताजी सालोखा	१	०	१	१६
कृष्णाजी मुनवर	१	१	०	७
तुळाजी मुनवर	१	१	०	६
चवण नाईक	१	१	०	६
जोम नाईक	१	१	०	६
लख नाईक	१	१	०	६
तुल नाईक	१	१	०	६
मुगुटसिंग	१	१	०	६
रुद्राजी कदम	१	१	०	५
दखणी भाई	१	१	०	६
सेख नथु	१	१	०	५।
सेख हसन काका	१	१	०	५।
सेख हुसन	१	१	०	६
रणसोड	१	१	०	५।
रामचंद	१	१	०	६
मकरंद	१	१	०	५।
सिद नाईक	१	१	०	५
सोम नाईक इा छ १ रबिलोवल	१	१	०	६
	१८	१७	१	११५

दिा राणोजी सितोला मुनवर

	असामी	अडाव	बरकंदाज	तैनात.
खासा राणाजी सितोला	१	१	०	२०
मानाजी सितोला	१	०	१	९
मानाजी सालोखा	१	०	१	६॥
दिपाजी मुनवर	१	०	१	६॥
नरसोजी मुनवर	१	०	१	५
समसेरखान	१	०	१	६

राम नाईक परवारी	१	०	१	५
नीब नाईक	१	०	१	६
चील नाक	१	०	१	६
सूरनाक	१	०	१	५
सेटयाजी मुनवर	१	०	१	६
आपनाक	१	०	१	४
धोंडनाक	१	०	१	५
मानाजी घाटोला	१	०	१	५
राणोजी सितोला खुर्द	१	०	१	८
मऱ्याजी मनवर	१	०	१	४
चांगा परवारी	१	०	१	४
देवजी मनवर	१	०	१	६
सोनाळा परवारी	१	०	१	६
धोंडनाक खुर्द	१	०	१	६
सभाजी कराळे	१	०	१	१६
लिंबाजी भिशा	१	०	१	८
नुरा मनवर	१	०	१	४
	२३	१	२२	१५७

दिा मळजी नाईक मनवर.

	असामी	बरखनदाज.	आडाव	दरमहा तैनात
मळजी नाईक	१०	०	१	१८
अंबाजी मनवर	१	१	०	६
येमाजी मनवर	१	१	०	६
संताजी मुका	१	१	०	५
संत नाईक परवारी	१	१	०	५
खानाजी मनवर	१	१	०	५
सुभानजी मनवर	१	१	०	६
रायाजी मनवर	१	१	०	४
जानाईक परवारी	१	१	०	६
लख नाईक	१	१	०	६
	१०	९	१	६७

5374

दिा संताजी बोधा मनव्र

	असामी.	बरखन-दाज.	आडात्र	दरमहा-तैनात.
सताजी बोधे	१	१	०	१६
साबाजी बोधा	१	१	०	६॥
दुलबाजी मनवर	१	१	०	६॥
सुर्याजी मनव्र	१	१	०	६
सेखोजी मनव्र	१	१	०	६॥
तुकोजी मराठा	१	१	०	५
भागा पोर	१	१	०	३
सटवोजी मनव्र	१	१	०	४
फकीर महंमद	१	१	०	६॥
भानजी मनव्र	१	१	०	७
खानाजी मनव्र जदीद	१	१	०	७
जोत्याजी खीरसागर	१	१	०	६
	१२	११	१	८०

	असामी	बरखन-दाज	आडात्र	दरमहा-तैनात
मल्याजी बवल मनव्र	१	१	०	१०
धनाजी मनव्र	१	१	०	६
महादजी मनव्र	१	१	०	६
अबदुला	१	१	०	५
खंडोजी मनव्र	१	१	०	५
राये नाईक परवारी	१	१	०	५
साबाजी जदीद	१	१	०	५
	७	६	१	४२

येणेप्रमाणे दरमाहे तैनात करार केले असे बारमाही चाकरी दसमाही कब्ज प्रो पावेल छ १० रावल. आज्ञा प्रमाण.

¶*This is a list of names employed under Santaji Naik and others, with details of pay sanctioned by the Peshwa.*

5375

No. 218] [6-8-1734 ?

पा छ २६ रबिलोवल

श्री

श्रीमंत राजश्री . पंत
आपा स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक नारो बलाल मो बाणकोट चरणावर मस्तक ठऊन सिरसास्टाग नमस्कार विनंती उपर. ता छ १७ माहे रबिलावलपावेतो स्वामीचे कृपे अवलोकन करून आज्ञांकिताचे वर्तमान येथास्तित असें विशेष. येथील कारभाराचे वर्तमान पेसजी सेवसी समस्त सरदारानी लिहिले होते त्यावरून विदित जाले असेल व सांप्रत स्वामीचे वर्तमान व माहागिरीचे वर्तमान रा धोंडजी नाईक बने याही लिहिले असे त्यावरून विदित होईल. निर्जीव कागद सजीव करून लिहिले आहे. परतं सजिवास जीव नाही. लोकाचा आला बांधा होऊन सुभानजीबावा याच्याने स्वामिकार्य होत नाही. स्वामी कृपालु होऊन धोंडजी नाईक बने याचे हवाली कारभार जाला तर लोकाचा आला बाधा होऊन दबदबा होईल आण स्वामीकार्य होईल. आज्ञाधारकाने अमर्यादा करून सेवसी ल्याहावे यैसे नाही. परंतु कारभाराची सुधी वाटत नाही याकरितां सेवेसी लिहिले आहे. सेवसी विदित होई हे विनती.

¶*Naro Ballal suggests to the Peshwa to leave everything to Dhondji Naik Bane who is the only competent man to carry it out.*

No. 219] [Received 20-8-1734 ?.

घडणी ९०८ पवार
छ १ रालाखर

श्री

विनंती उपरी. पवाराच्या सरंजामाचा मजकूर पडणार. यैसियास प्रसंगोपात आपण जाबसाल न कर्तव्य तो करितीलच. परं गतवर्षीपासून राजपुरीचा मनसबा प्राप्त जांहाला याजमुळे खर्चाखाले आलों. बाणकोट आदीकरून गड किले आपले जिमेस लागले आहेत. त्याचा खर्चवेच आजीपर्यंत कोणे प्रकारीचा पडला आहे, पुढे नेहमी गडकिले आपले पाठीमागे लागले आहेत आणि पवारासहि सरंजाम द्यावा हा कोठील इनसाफ आहे? पवारास सरंजाम काडून देणे तरी ज्यावरी राजपुरीचे मसलतीचा व गडकोट किल्याचा खर्च पडला नसेल त्याचा सरंजाम काडून द्यावा हे विहित आहे. आम्हास खर्चवेच पडला व ज्यास न

5376

पडला ते सारिखेच मानावे यैसे नाही. हे पर्यें राजश्री स्वामीजवल बोलून आपणाकडील झड उडवावे. न आईकतच तेव्हा बोलावे की, गड किले मागेच आम्ही कोणाचे हवाले करणें त्याचे करावे म्हणत असतां आम्हास खर्चाखालें घातलें आणि आतां सरंजामाचेहि झट लाविता तरी गडकिले आहेत ते हे तरी आपणाकडेस लाऊन घेऊन कोणाचे हवाले करणे असतील त्याचे करावे, आम्हांस खर्चाखाली न आणावें, म्हणून या पर्याये बोलून सरंजामाचे झट न लागे ते करावें. सूचला अर्थ लिहिला आहें. हे+ विनंती.

¶*Chimaji Appa asks the addressee to explain to the King plainly that the writer cannot afford to assign a Jagir to Udaji Pawar.*

No. 220] [*23-8-1734* ?

पौ छ २८ रविलावल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ २३ माहे रबिलावल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामींनी मुजरद जासुदासमागमें पत्रें छ १२ रबिलावलचीं पाठविलीं तीं काली छ २२ रबिलावलीं तिसरे प्रहरीं पावलीं. अकरावे दिवसीं जासूद येथें आले. पर्जन्य काल यास्तव पुणियाहून चौथे दिवसीं फार तरी पांचवे साहावे दिवशीं येथें यावें ते मार्गी अकरा दिवस लाविले. स्वामींनी काम तों नाजुक लिहिलें कीं मोंगलानें कोथलियासी राजकारण केलें आहे तरी तेथील खबरदारी करणें व लोक किले मजकुरीं पाठवणें म्हणून लिहिलें, यैसियासी येविसीं पूर्वी स्वामीचें पत्र किल्यास आलें त्यावरून तेच क्षणीं किले मजकूरची खबरदारी केली व लोकहि पाठविले व स्वामीस पत्र लेहून पाठविलें व किले मजकूरची हाजिरी आपणांकडे पाठविली आहे त्यावरून कलों येईल. हालीं स्वााचें पत्र येतांच आणखी लोक किलियास पाठविले आहेत. कललें पाहिजे. जरूरीचे काम आणि जासुदानी मार्गी फार दिवस

+ पत्र चिमाजी आपाचें.

लाविले, याकरितां त्यास सिक्षा करीत होतों, परंतु स्वामीचा बोल लागेल यास्तव अनमान केला. कोहली येत्न करून पांच पाठऊन देणें म्हणून लिहिलें, त्यास प्रस्तुत कोहलियाचा हंगाम नाहीं. परंतु जागा जागा माणसें पाठऊन तलाश बहुत केला त्यास कोहले सुमारें १ येक मिलाले ते हलीं जासुदासमागमें पाठविले आहे. आणखी मिलालियावरी मागाहून पाठऊन देऊं. वरकड राजश्री रघुनाथजी याचे गावाचेविसीं लिहिलें, त्यास पूर्वी आम्ही तावनाचे रुपये घेतले होते तेव्हां स्वामीनी सांगितले त्यावरून तावनाचे रुपये फिरोन दिल्हे. त्या उपरी आम्हांकडून त्याचे गावांस येकदंर उपसर्ग लागत नाहीं. कलावे याकरितां लिहिलें असे. आम्ही सत्वरच भेटी येऊं. भेटी नंतर कलेल. बहुत काय लिहिणें लोभ करीत गेलें पाहिजे हे विनंति.

¶*Vasudeo Joshi informs the Peshwa that as instructed by him he is sending more troops to the fort of Kothala to defend it against the Mughals.*

No. 221] [*6-9-1734*

पाा छ ९ जमादिलोवल

श्रीमंगलमूर्ति

पुर्वणी राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विज्ञापना येसीजे. येथे येतां समाचार घेतला. त्यास आजम जनराल खेडे परल बाग आहे तेथें गेला होता. त्यास कपितान इंचबर्ड भेटला. त्यासीं संभाषण जाहालें. कागद देऊन कुल हकीकत येकमेक बोलिल्यानंतर आम्ही बोलिलों जे, आमच्या खावंदास तुमच्या व आमच्या संभाषणावरून पुर्ता विश्वास जाहाला. त्यावरून येशाचें मित्रत्व राखावें म्हणून आम्हास येथे सविस्तर कथिला आर्थ योजून पाठविलें. हेतु कीं आलमाचें बरें व्हावें. ते गोष्टीने उभयेपक्षीं फाइदा व कीर्ति हे तुम्ही जाणता आणि शामलासी सामील होऊन आपला नामनिर्देश न कलो द्यावयास्तव परस्परें उंदेरीहून आरमार रा. करून गाव (मार)बिता. येणे प्रकारे विश्वासघातकी येसे सर्व बोलतात. हे तुम्हास कलतें कीं नाही? याकरितां राजश्री पंतप्रधान सक्रोध होऊन आम्हास लिहिलें आहे.

---

१ प्रजा,

5378

कदाचित तुम्ही बोलाल कीं उंदेरी आपली न्हवे; तर लोकसहवर्तमान निशाण कां ठेविलें आहे? हें सर्वास कलत नाही? महमद नाईक रेवसेचा हवालदार हबशाचे तर्फेचा पेसजी होता. तो या हेवी नेतो हें सर्व तिकडील लोकास ठाऊक आहे. परंतु हबशी इंगरेज येक? त्यांचे रायांचें सख्यत्व, या विश्वासाने निर्भय होते. तो विश्वास उडाला. उभयपक्षीं विरोध मांडावा हा शामलाने उपाय योजला तो तुम्हास सुचत नाही? ये गोष्टीने गैरफाइदा कोण्हाचा हे जनरालला लिहून उतर आणवणे. त्यासारिखा राहेन अगर येच वाटेने हेच तरीवर स्वार होईन. त्यास कपितान मारनिलेने तैसेच लिहून पाठविले व आम्ही देखील सिदी मसुदाचे पत्र दिले. ते सर्व आपल्या खावंदास सादर करून उतर आणले कीं, तुम्ही दर्शनास कधी याल? त्यास बोलिलो जे, आम्हास यैसमई हाच सुमुहूर्त. तुमच्या खावंदास दर्शन देणे जे समई होईल तो सुदिन. तैसाच जाब सांगोन हुजूर पाठविलियावर दुसरे दिवसी जनराल मारनिलेचे स्वगृही येऊन आम्हास सांगोन पाठविले जे, काल तुम्ही येऊन श्रमी जाहालेत. यास्तव तो परिहार करायाकरितां स्वताच येथें आलों. यैसेयास त्रितीये प्रहरीं नव तासे वाजतील तेव्हा येणें. तो समये राखोन दर्शन घेतलें व येताच जनराल मारनिलेने सिदी मसुदास चौकी देऊन लोकसहवर्तमान कैदेस ठेविला आणि आज्ञा केली कीं, गलबत तयार करून आपल्या गांवातून बाहेर जा; तुमचें प्रयोजन नाहीं. त्यावर जनराल मारनिलेस पत्र सिदीने लिहिले ते दर्शन संभाषण सविस्तर जाल्यानंतर उतर हजूर काये लिहावें म्हणून विचारल्यानंतर आम्हास बोलिले जे, हें कोण्हाचें पत्र वाचा. तेथें लिहीले जे साहेबानी मेहरवानी करून लांकडें तोडावयास हुकूम दिला तो न मानला आणि हरामजादे लोक याणी गाव मारला, बंद धरून आणले, यैसी बेकैदी केली म्हणून लडकियावर इतराज जाहालेत तर येवढा गुन्हा माफ केला पाहिजे. फेर यैसे होणार नाही. ज्याणी हे लबाडी केली त्यांस आपण नशीयत बरे प्रकारें करून बेवकुबांस बेड्या घालतों म्हणून बहुतसें बजीज होऊन लिा तें वाचून समजाविलें आणि[१] बोलिलों, याणे लिावर मदार नाहीं. जेव्हां बंद धरून आणले आहे ते सोडतील तेव्हां आमच्या खावंदाच्या प्रत्ययास येईल आणि रयतहि निर्भय राहेल व सिदी मसूद यास गावांतून बाहेर घालावे उतम नाही. ज्याणी बेवकुवी केली त्यांस शिकवावें म्हणजे फेर करणार नाहीं. व सरदार आपले कैदींतच आसला म्हणजे लोक सहजच कैदेंत राहतील. याकरितां सिदी मारनिले माजगावीं राहातो तो आणून पांचा सातां माणसानसीं गावांत ठेवावा केला तेथे राहातील. उघडी चौकी त्यास कले यैसी बसऊ नये. कदाचित

१ भेद्ये, प्रांताचे माहितगार.

तो शाहाणा होईल येसे बोलिल्यावर चौकी उठविली. त्यास शाहारांत आणला परंतु कोटाबाहेर येक घर दिले व जेथील तेथे लोक ठेविले आहेत. बंद सोडवणार आहेत. परंतु मोखाई तारवाची व बिलाइती तारवाची रवानगी करायास दिवस दाहा बारा लागतील. ते सरल्यानंतर हें करीन, बोलिले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना * हे भाद्रपद वदी पंचमी शुक्रवारी हे बोली जाहाली ते सेवेसी श्रुत होये हे विनंती.

¶The Peshwa's agent at Bombay writes to Bajirao how he took to task the British Governor for having helped the Sidi against the Marathas. The Governor of Bombay admitted his fault and agreed to set free the Maratha prisoners. Captain Inchbird is also mentioned. The Peshwa's agent gives to the Peshwa an account of his conversation with Captain Inchbird (a subordinate of the Governor) and says that he pointed out to the Captain that the Peshwa had begun to feel that the English were secretly in league with the Sidis in spite of their avowed friendship with the Peshwa and asked him to communicate the gist of it to the General (Governor). The Captain apparently did this, whereupon the Governor called the Agent for an interview and in his presence orders were issued for the arrest of the Sidi Masud (some Sardar of Sidi—the Nabob). The agent then asked the Governor what he should write to his master, whereupon the Governor produced a letter from the Sidi in which the latter had explained how the incident had happened and asked for being pardoned. The agent adds that he then pointed out that the word of the Sidi could not be relied upon unless the persons on the side of the Marathas that had been arrested were released. Eventually the General agreed to see that the prisoners were released.

No. 222] *[10-9-1734*

पा छ ९ जमादिलोवल

श्रीमंगलमूर्ति

पुर्वणी राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे. दुसरे दिवसी जनरालची रजा घेऊन सिदी मसूदाचे भेटीस गेलों. भेट जाहाली. सर्व हकीकत विचारिली. परंतु खुलाशाचें बोलणे नाहीं. आम्ही अर्ज करून सोडविला हें त्यास कळले; त्याचा आभार नाहीं. तो जोन्याच्या गोष्टी सांगत होता. मग परिछीन बोलिलों, तुम्ही या गर्वेच आपलें घर बुडऊन घेतलेत. राजश्री पंतप्रधान सर्व प्रकारें तुमचे बरे इछित असतां त्यांसी बरे चालत नाहीं, यावरून परिणाम तुमचा बरा कसा होतो? राजपुरीस सला करावा म्हणून कोण कोण उपाय योजले ते एकीकडे राहिले. तेव्हा जर कह्या करितेस

तर ये दशेस का पावलेस? अद्याप इंगरेजास हयात मागा कीं पुढें तरी बरें होईल. याची कद्या न करा तेव्हां कोठेहि तुम्हास थारा नाहींसा करून घ्याल. हित असेल तर माना. न माना तर तुमची इछा. जनरालनें मजकरवी तुम्हास सांगविले आहे, बंदे लवकर उंदेरीहून आणवा आणि ज्यापासून अन्याय जाहला त्यास बेड्या घाला. न घाला तर काल केली थोडी गत यापरीस अधिक होईल. तुम्हास बोलणें माजे खरे दिसत नसेल तर तुम्ही पत्र लिहिलें जे जनराल मारनिलेस ते पाहिलें. त्यावरून आम्ही विचार पाहिला जे, आमच्या खावंदाचा हेतु कीं हबशाचें सर्व प्रकारें बरें व्हावें म्हणून अर्ज करून सोडविलें. निमित्य कीं आमचा खावंद म्हणेल, तुम्ही तेथें असोन ऐसें कैसे होऊं दिलेत, हा शब्द लागेल. म्हणून इतुकें करणें लागलें. अद्याप आमचा मुलकांतील बंदे धरून नेली आहेत व आऊरवळीतचे देशमुख देखील येथें आणावे. न आणा तर जनराल सक्रोध होईल. अखेर रा॥ पंतप्रधानसाहेबांची मर्दराज(?) बंदाकरितां हातातून उंदेरी दवडाल हे बोलिलों. त्यावर उंदेरीस लिहून पाठविलें आहे व जनराल मारनिलेस कपितान इंछ-बर्डास सांगोन लिहिविले व गुदरली बोली तीहि लिहोन पाठविली. त्यावर जनरालचें पत्रहि आले ते उंदेरीस गेले. बंदे सुटतील व उंदेरीच्या किलेदारास उपाय योजिला आहे व सिदीसादहि येथं आणावा ऐसें योजिले आहे. आल्यानंतर जे घडेल ते सेवेसी सादर होईल. इंगरेजांचा हेतु, एक वेळ सला व्हावा. जनराल मारनिलेंने स्वामीस लिहविलें आहे जे, तीन लक्ष रुपये तुमच्या वचनावरून आमचे हबशाकडे राहिले आहेत. स्वकार्यतत्पर आहा परंतु राजश्री स्वामी-पासून अर्ज करून हा मनसबा सेवटास लाववेना तेव्हा थोरपण तुमचें राहात नाहीं. कदाचित आम्हास विश्वास दाखवायास रुपये पाठविले तर एक आमच्या गावीचा बेंकाल[1] सेवटीचा तो गाठीस इतुके धरितो. आम्हास काय? तुम्ही लक्ष ठेविलेस वा न ठेविलेस तरी तुमचे तुम्हांस, परंतु हा मनसुबा गलबतांविसी योजिलात जसा श्रीपतराऊ याकरिता मागें योजिला तैसे हे आतीकता दाखऊन स्वकार्य साधावें हे आम्हास काय कळत नाहीं? सर्व समजतें. ऐसेहि असोन उपाय सांगतों. हबशाची गलबतें मराठ्याकडील तुम्ही आणितां आणि ये गोष्टीस आम्ही सामील व्हावें शोभत नाहीं. परस्परें वसैचे खाडीतून कल्याणास जातील. युक्त पाहिजे तर सुचऊन देतों, तुम्हासी फिरंगी कजिया करणार नाहीं. परंतु जागृत करूं नये. इकडून न्यावी कार्याचे नाहीं. उंदेरीस निशाण होते म्हणून तुम्ही वाद सांगतां. खाडींतून गेल्यावर त्याणीं कां न सांगावा? नीतीस सर्व सारिखें, वाडी घर सुखरूप विकत घ्या. सरकारीत असल्यावर देतों.

---

१ दुकानदार

खेरीज किला सर्व जागा कोणकोणाचा आहे हे तुम्ही जाणतां. मी काय सागावें? जनराल मारनिले बोलिले. छ २२ राखर भोमवारी परलास गेलो होतो तेथें बोलिले, बंदाविसी विचारिलें त्याची फिकीर आपणास आहे. तुम्हास तुमच्या खावंदाचा शब्द न लागे ऐसे करितों बोलिले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter to the Peshwa from Bombay regarding British help to the Sidi.*

No. 223] [*20-9-1733*

श्री

राजश्री बाजीराव पंडित
प्रधान गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री संभाजी आंगरे रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें. तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ कलों आला. इंग्रेजाऊकडील मर्कणीण+ जाहाजावरी आहे तो बोलीस येणार त्याचे बोलीचे समई राजश्री रघुनाथजी असावे त्याजकरितां येक दिवस ठेऊन घेतले. उदईक शुक्रवारीं रवाना करितों म्हणोन आपण लिहित आलां. बोली चाली जालियावरी रवाना केलें पाहिजे. बहुत ल्याहावें तों आपण सर्वज्ञ आहेत. कृपा वर्धमान करावी. रवाना छ २३ माहे रबिलाखर हे विनंती.

¶*Sambhaji Angria requests Bajirao to send back Raghunathji who was detained for the purpose of negotiations with the British Naval Officer, Capt. Maclean.*

No. 224] [*21-9-1733*

श्री

राजश्री बाजीराव पंडित
प्रधान गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री संभाजी आंगरे रामराम विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिंजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहला. जंजिरा व पदमदुर्ग याच्या दरम्यान इंग्रज बारा चवदा तरांडे-

---

+ Maclean.

यानसी येऊन राहिला आहे. जमावाची भर्ती पोख्त असावी म्हणोन लिहिलें, येशास तेथील मोर्चेयावरी जमावानसी येक दोन रोजीं राजश्री मानाजी आंगरे यांस रवाना करितों. आपणांस कलावें याजकरितां लिहिलें असे. जाणीजे रवाना छ २४ माहे रबिलाखर. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दीजे हे विनंति.

¶*Sambhaji Angria informs the Peshwa that he was despatching Manaji Angria against the British ships that had arrived to help the Sidi.*

No. 225] [*21-9-1733*

श्री

राजश्री रघुनाथ हरि

गोसावी यांस

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री संभाजी आंगरे रामराम कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करणें विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लिहिलें वर्तमान विदित जाहालें. इंग्रेज बारा तरांडियानसीं जंजिरा व पदमदुर्गाच्या दरम्यान येऊन राहिला आहे व मकणीन कपितान राजश्री राऊ प्रधान यांचे भेटीस येणार आहे. याजकरितां आपणांस राहाविलें म्हणोन लिहिलें तें कलों आलें. राजश्री रायांची व कपितानाची भेटी जाहालियावरी तुम्ही स्वार होऊन दर्शनास येणे. जाणिजे रवाना छ २४ माहे रबिलाखर बहुत काय लिहिणें.

¶*Sambhaji Angria notes down the contents of a letter from Raghunath Hari regarding the arrival of an English fleet between Janjira and Padmadurg and the proposed visit of Captain Maclean with the Peshwa, and asks the addressee to visit him after the interview.*

No. 226] [*13-9-1734*

पा। छ ९ जमादिलोवल

श्रीमंगलमूर्ति

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनीत सेवक कृष्णाजी राम सां। नमस्कार विज्ञापना येसीजे. येथील कुशल ता। भाद्रपद वदी द्वादसी शुक्रवारी मु। जंजिरे मुंबै स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. स्वामीचा निरोप घेऊन आलों ते का। पेणेहून उरणचे मार्गी छ १७ रा।लाखर गुरुवारीं बंदर मा।रीं पावलों. दुसरे दिवसीं भेट अजम जनरालची जाहाली.

5383

स्वामींचे आज्ञेप्रो सविस्तर सांगितलें. त्यावरून सिदी मसुदावर सक्रोध जाहाले, गावांतून बाहेर घालवीत होते जे रयतेस तसदी पोहचली तुम्हामुळें यैशांचा दर्कार नाहीं. व आम्हास बोलिले, याणी आम्हापासीं निरोप फांटी तोडायास मागित * * पण केलें फेर होणार नाहीं. बंदेंहि आणविता * पेण प्रांतीचीं १२ आलीं. आडरवलीतचा मचवा धरून आणिला होता तो सोडिला नव्हता, तीहि माणसें आणलीं. छ २९ रोज शुक्रवारीं शिरगांव तप्याचीं राहिलीं आहेत ती श्री करील तर ही परतीरास पावल्यावर युक्ति सोडवायाची योजिली जाईल सेवेसी श्रुत होये. येविसी कपितान इंचबर्ड याणी शर्तीने कुमक केलियास आम्ही स्वामीचें पत्र सादर करून सांगितलें जे, आम्हास आज्ञा आहे जे हरयेक कार्यकर्तव्य तें कपिताम मशारनिलेचे संमते करणें. त्यांच्या पत्राव्यतिरिक्त तुमचें पत्र आलें तर आपण मंजूर करणार नाहीं, यैसी स्वामीची आज्ञा होती; व कितीक अर्थ आज्ञेप्रो सांगितला त्यावरून कपितान मशारनिलेनी हा पत्रार्थ ध्यानांत आणून साक्षीस आपलें पत्र दिलें. सेवेसी सादर होये. सरखेलीकडून रेवसाहून मचंव्यामधी नारायणसेट इंगरेजास पत्रें घेऊन आले आहेत. बा येक ब्राह्मण येक चाकर आहे. रा मानाजी आंगरे याचें पत्र आम्हास मारनिलेच्या साहित्याविसीं आहे व जबानी बोलिले जे राजश्री आपासाहेबाचे पत्र मानाजीबावास होतें कीं तीर्थरूपानी तुमच्याच कार्यास रा कृष्णाजी राम पाठविले आहेत. त्यांस लिहिल्यावर मन घालून कार्य करितील. यावरून हें पत्र लिहिलें आहे. स्वामींचे आज्ञेप्रमाणें आम्हापासून अंतर होणार नाही म्हणून बोलिलों. अद्याप जनरालची व मारनिलेची भेटी जाहली नाही. दोन ताके उंच आणिले आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News-letter from Bombay to the Peshwa, informing him of the writer having delivered his letter to Captain Inchbird, and of Manaji Angria's request to the Captain for help.*

No. 227] [*14-9-1734*

श्री

पुर्वणी राजश्री पंतप्रधान स्वामीचे
सेवेसी

विज्ञापना यैसीजे. स्वामीचे आंज्ञेप्रमाणे कपितान इंचबर्डास व आजम जनरल यास सविस्तर सांगितलें. त्यास ते म्हणतात पिष्टपेशण कशास पाहिजे? कर्तव्य असिलें तर विलंब का लावावा. आम्हास पूर्ण कळतें, तुम्हापासून हे घडोन येणार नाही. आसिल्यावर विलंब लागताच ना. सर्व कार्यास कोठें आज्ञा पाहिजे? येथें

अडलों, आज्ञेचें दाखवावें. कोण्हास ठाऊक नसेल ? त्यास बोलीचाली पत्र नेमिले[1] ठिकाणी येऊन आण करितां गुणद्वय सामील होतील यदर्थी संदेह नाही. मनोदयानुसार लेख करून घेऊन तामस तूर्त स्वाधीन नाहीं, अशक्त म्हणून त्याचा मनोरथ पुरवणें. गुणद्वयापासीं नाहीं परंतु पर्याये होईल त्याची गोष्ट सहल(ज ?) आहे जे, हलखुंद आहे. जेथे ठेविला, तेथेंच राहूं शके. येविषयीं हेतु असेल अविलंबे नियमस्थानी आसन आलें म्हणजे तिसरेयास आकर्षण प्रयोग करितां पुनरपि येईल, येविषई संदेह नाहीं. मूल ब्रह्मलीला शाश्वतांशाश्वत अनुभवास येतां नकले. निजधाम पावोन किंवा भ्रमांतच राहोन हे तथ्य कांहीं बोलवेना. शब्दब्रह्मविश्वासे त्रितियव्रत होईल. आम्हास तो यैसे भासतें, यैसे मुख्य इंचबर्डापासी बोलिला. त्याणें आम्हापासी सांगितलें. सारांश येविसीं साक्षीस येतों, निर्विश्वासे आहेत ते सविश्वास होत ते करावे म्हणून सेवेसी निवीदन करविले आहे. सेवेसी श्रृत होये. आम्ही येवेलेस त्यासच लालूच दाखविली. जसी सिदीसादची मदत तुम्ही केली तैसी दोस्ती आमच्या खावंदासमागमे आसती तर कलतें. यैसे उदंड चढविलें आहे. येथें उदीमास तैसाच बोलायास वचनास यासारिखे थोडे आहेत, याकरितां हातांत धरावा लागला आहे. यांस बलाची गोष्ट सांगितली म्हणजे आलपाकरितां सर्वस्व बुडवितील. नीतीने जेरदस्त होतात इतुका उतम दंडक आहे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना. आज रेवसेचे वाटेने सर्व बंदे पलीकडे गेली. पेणेहून आजच मचवा आला आहे. आंगारकाकडील आम्हास येक कागद व येक रेवादास आंवाईदासास व येक आंतोन सिलवास ती मुख्याकडे परस्परे पाठविलीं. येतील, तेंव्हां आर्थ कलेल. सेवसी श्रुत होये, भाा वदी त्रयोदशी शनवार हे विज्ञापना.

¶*The Peshwa's agent at Bombay writes to Poona about his talks with Captain Inchbird and the Governor on the question of the British helping the Sidi against the Marathas.*

No. 228] [*19-9-1734*

छ ११ जावल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वा-
मींचे सेवेसी

विनीत सेवक कृष्णाजी राम सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील कुशल ताा छ २ जमादिलोवल गुरुवार मुाा मुंबे स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे

१ ठीक.

विशेष, आजम जनराल याणी आपणास लिहविले आहे जे, रा संभाजी आंग्रे यांचे पत्र आले जे, सरखेलीचा तुमचा हर्षामर्ष चालला यावर आपल्या चितांत आलें आहे जे, शेजारी राहून तुमचा आमचा हर्षामर्ष चालतो, ये गोष्टीनें फायदा काये ? सल्यत्व आसावें हे उतम गोष्ट आहे. यास्तव नारायेणसेट यास पाठविला आहे. तर मोहिबाच्या मुद्यानुरूप सल्यत्व केले जाईल म्हणून पत्र आहे. त्यास तूर्त आम्ही लिहिले आहे जे, तुमच्या चितांत आले हे उतमच आहे. यैशास प्रथम बावाजी बलाल व गंगाधर याबा लिहिले व सांगोन पाठविले आहे त्या मोजीब मान्य कराल तर सल्यत्व केले जाईल, यैसे लिा आहे. यावर तेथून काय उत्तर येईल ते सहजच कलेल. यानंतर स्वामीनी कपितान इंछबर्डाबा सांगोन पाठविले होते त्याचे पैरवीस लागावे लागते म्हणून पूर्वपत्री लिहिले होतो. दुसरें पत्र महिन्याने आले त्यामधीं न खबर न आंतर न सूचना यैशावरून आम्हास दिसोन येतें जे, आपले कार्यी सर्व तत्पर आहेत. मूर्ख समजाविसी कशास करिता ? जर होत आसेल तर तैसेच लिहावे. न होये तर तैसेच कलें द्यावें. दुसरा उपाये पाहावा लागतो. यानंतर शामलाच्या सल्याविसीं लिहिणार आहेत. याकरितां मनास आणविले आहे जे, राजश्री स्वामी यांचा हेतु काये आहे, कोण पदार्थ योजावा, हे सर्व तावार लिहिले पाहिजे. यानंतर इष्टत्वाचे लक्षण हे न न्हवे. स्वकार्यसाधायाकरितां परिकीयास भरीस घालावें हे योग्य की काये ? वरचेवर जाहाली खबर लिहावी म्हणजे त्यासारिखी योजणू(क) करावयास सुचते. यैशास पुढें या दों गोष्टिाचा जाबसाल सितार्बीनें येईल तर उतम गोष्ट आहे. म्हणून आम्हास बोलाऊन मनुष्य पाठऊ सांगितले कीं, वरचेवर विलंब न लावितां मनुष्य ये यैसे योजून रवाना करणे. इकडील जाबसाल आल्यापूर्वी स्वामीकडील आणविला आहे. येथे जबानी बोली जाहाली जे, सल्यत्वास मध्यस्थ कोण तो योजून ठेवा आणि बोलीचाली करा आगर तुमची तरांडी आहेत ती आम्हास नोरी द्या. सालिना तीस हजार रुपये देऊं व खर्चवेच जो होईल तो आमचा. ते किफायत दुसरी तुम्हास होईल. सुखरूप राजश्री पंतप्रधान कल्याण प्रांतची कमाविस करवितात, त्यासारिखे तुम्ही वर्तलेस म्हणजे पाहिजे तितुके रुपये मिळतील यैसे बोलिले. तेथून दोन ताके आले. किमत रुपये शंभर व येथून दिली सकलात वार दाहा किमत रुपये सतर होईल म्हणतात. यास उणीच होईल, आधिक नाही. यावर येथे याजपासी वर्तणूक वर्तावी कैसी ते आज्ञा करावयास स्वामी समर्थ आहेत. आम्हाविसी सेट रेवादास आंबाईदास यास बोलाऊन सांगितले जे, यास हरयेकविसीं फाइदेवार व्यापार सुचवीत जा. घर बरे पाहिजे तर सवंग पाहून द्या. आणिक बोलिले द्रवोत्र्याच्या व्याजाची सवै

5386

लागली आहे, त्यांस अल्प नफा गोड कैसा लागेल? त्यास उतर दिलें ज़े आमचे खावंद बोलिले, इंगरेज म्हणतात की सावकारी बरी ती आजमाऊन येक वर्ष पाहावी. फाईदेवार आसेल तर तीच का न केली? नसेल फाईदा तेव्हा सहजच बोलायास तरी कार्यास येईल. परंतु कोणयेक गोष्टीचा आणभव पाहिल्यावाचून काय कले? याकरितां लक्ष रुपये देत होते परंतु आम्ही इतुकेच आणिले. निमित्य कीं तिकडील हासील बुडवावा यांत जीव काये? म्हणून आम्हीच आणले नाहीं. आतां तुम्ही त्यास लालूच दाखवाल आगर थोरा व्यापारांत सरकती ठेवाल तर फाईदा होईल, मग तुम्हास कां सोडतील? यैसा आर्थ आहे. त्यास थोरा तारवाचा उद्यम करितील तर सुखरूप सरकती ठेऊ बोलिले. परंतु कदाचित धका लागला तो त्यास भारी जाईल. येथे तवकल आहे. कबूल करितील. थीर धरितील तर सुखरूप दोन लक्ष पावेतों वैवाटूं. बोलिले आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram, the Maratha embassy at Bombay, discusses trade possibilities for the Marathas with the English and the relations of Sambhaji Angria with them.*

No. 229] [*22-9-1734*

श्री

श्रीमंत राजश्री पंत आपा
स्वामीचे सेवा

विनंती सेवक कृष्णाजी राम सां। नमस्कार विज्ञापना। यैसीजे. येथील कुशल ता। छ ९ जमादिलोवल मु॥ जंजिरे मुबै स्वामीचे कृपादृष्टीकरून येथास्थित आसे विशेष. येथील वर्तमान काल शनवारी विलाइती तारू आले, यावर आज्ञा आली की, मिस्तर जान होरन जनराल हे येकाकीच आले. त्यास छ मारी सर्व कारभार जाहाला. यथें ठराव होता प्रथम की, पौषमासी नवा बसऊन आपले सतेने जावें. ते राहिले. सेवेसी श्रुत होये. जो मरातीब जुन्याचा तोच नव्याचा. नावमात्र त्याचें लिहावे तें याचें लिहावें. याकरितां सिरपाऊ पाठवावा योग्य आहे. व आजम राबर्ट कोईन यासहि सिरपाऊ पाठवावा आणि लिहावें, तुम्ही आम्हास वसिलें मैत्र जोडले होतेस. ऐकाकीच हें कलों आलें म्हणून उपशमाचें पत्र लिहोन होणार ते जाहालें. परंतु मैत्रीच्या तकाद्यास आंतर न करावे, कदाचित विलाईतेस गेलेस तरी कागदपत्र इंगरेजीनें लिहिला तरी कार्यास येईल, यैसी प्रीतिवृद्धिकर वचने लिहून पाठवावी; उतम

आहे. त्यासारिखा विचक्षण, चतुर, प्रजापालक, गुणग्राहक क्वचित आसतील. या नंतर नव्यासहि लिहावें जे पूर्वणी पत्रीं माजी जनराल याचें तुमचे मित्रत्व आहेच. परंतु आमचे तर्फेने मारनिलेस आनंद होईल यैसा प्रबोध करावा व हरयेकविसी साहित्यास आंतर न करावे. आम्हा योग्य कार्य आसेल तर लिहितां आलस न करावा यैसे उभय पक्षीं प्रीतिवृद्धिकर पत्रें लिहून आलीं तर उतम आहे. यावर स्वामी समर्थ आहेत. नव्यास सिरपाऊ आला तर त्याचा बदल येईल. जुन्याचा येईल न ये कलेना. ते वेलेस आरसे याणे भेट पाठविली होती. तेरासे रुपयाचा माल यैशास सोन्याच्या सांकल्या शेर शेराच्या पाठवाव्या म्हणजे थोरपण आहे व यैवजहि दिसतो. तातडीने आधिकोतर लिहावयास फावले नाही. गलबत हाकारले म्हणून स्वामीस मात्र लिहिले, यास्तव राजश्री पंतप्रधान स्वामीस हा आर्थ जाहीर करणार स्वामी समर्थ आहेत. आद्याप कल्याणाचा यैवज आणला नव्हता याकरितां आतां मनुष्य पाठविले आसे. स्वामी मनुष्य रवाना करणार होतेस तेहि आद्याप आलें नाही. येथें बोलला बोल आचरून दाखविल्यानें थोरपणास वृद्ध होतें. परंतु स्वामीचें येक पत्र आसावें जे, राजश्री पंतप्रधान याणी उदीम व्यवसायाविसीं आज्ञा केली आहे. परंतु चौकसीनें धंदा करणे संदेह उत्पन्न ऐसा जो धंदा आसेल तो हुजूर लिहिलेयावीण न करणें. प्रसंग आहे याकरितां शस्त्र आसिलें पाहिजे. आम्हाविसी उभयतांस पुन्हा लिहावें. हरयेकविसी साहित्य कीजे. व खुदाबाहे (दे?) चा जासूद अद्याप आला नाही. त्याची वाट पाहात आल्यावर सेवेसी निवेदन होईल. कृपा वर्धमान करावयास स्वामी समर्थ आहेत. हे विज्ञापना.

¶*News-letter from Bombay by Krishnaji Ram asks Chimaji Appa to write a congratulatory letter to the new Governor of Bombay, John Horne.*

No. 230] [*9-10-1733*

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान
गोसावी यांस

६७ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री संभाजी आंगरे रामराम विनंती उपरि. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. आपण नारो काशी याजबराबरी पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन पत्रार्थी व जंबानीवरून वृत्तांत अवगत जाहाला. मकनीन

इंग्रज अंजनवेलीहून अरमारामसी येऊन भेटीस आला. शामलाची कुमक करावी लागते म्हणोन कितेक वहमाच्या गोष्टी बोलिला त्याचा जाबसाल करणें तो केला. पुढें त्याचा निशा करावयाचा व आणखी मनसबे याचे विचारआचार कितेक होणे आहेत ते उभय पक्षी भेटी जाहाल्याविना होत नाहीं, तरी विजया दशमी होतांच स्वार होऊन यावें म्हणोन लेहून व सांमोन पाठविलें. यैशास टोपकर शामलाचा उपराला करणार यांत अपूर्व नाहीं. निमित्य कीं हरदु नसरूड येकच. भिन्नता काय आहे? टोपीकराचा बिघाड होता तेव्हां शामलानें अन्तस्तें सामान आदीकरून साहित्य करित होता. आतां टोपीकर शामलाचें साहित्य करणार. तरी बहुत बरें. श्रीकृपेनें व धण्याचे प्रतापें ये गोष्टीचें अगाध काये आहे? भेटीस यावयास दिसगत लागली. यास कारण कीं आरमाराची तयारी जलदीनें करून गनिमास तंबी पोहोचवावी यास्तव अरमार लोटीत आहों. यांतच अवकाश करून येक दोन दिवसांनी स्वार होऊन आपले भेटीस येतो. भेटीनंतर आपले आमचे विचारें जो विचार दृढतर असेल तोच करून. इंग्रजास आपण च्यार गोष्टी दबावाच्या सांगितल्या, बहुत उत्तम केलें. जाणिजे. बहुत काय लिहिणे? रवाना छ ११ माहे जमादिलावल हे विनंती.

पो १८ जमादिलावल.

¶*Sambhaji Angria reports to the Peshwa the interview that he had with Maclean who, he says, seemed inclined to help the Sidi. The writer passes some reflections on both the Sidi and the English. "They have helped and will be helping each other in times of difficulty", says he.*

No. 231] [*5-10-1734*

पो १८ जमादिलावल

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विज्ञापना येसीजे. शामलाचे फौजेचे व आपले स्वारीचे उ(यु?)ध्ये होत होतें तों आपणहि किल्यावरून उतरोन गेलों आणि गनीम पाडिला. व सिद्दी सैद तीनसें माणसानसीं खाडीपलिकडे होता त्यावर बिरवाडीकर दोनसें माणूस आले त्याची गांठ पडली. तेथें बिरवाडीकरानीं सिद्दी सैद पिटितपिटित मलुरापावेतो नेला. इकडील गनीम सेवकानी मोडिला. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News of Sidi Said being repulsed near the creek of Mahad is conveyed to Chimaji Appa in this letter.*

5389

No. 232] [18-10-1734

श्री

तैनात जाबता दिा राणोजी सितोले
वगैरे मनुवर सुा खमस सलासीन
मयाअलफ ईा छ १ माहे जमादिलाखर

	असामी	अडाव	बरखनदाज	तैनात	रोजमुरा रुपये
दिा राणोजी सितोले	३५	५	३०	२२५॥	१५२
दिा मानाजी सालोखा	१४	१	१३	८५॥	५७॥
दिा खानाजी नाईक	१२	०	१२	७२॥	४९॥
दिा मलजी नाईक	१८	१	१७	११८॥	७९
दिा मल्हाजी बवल	१३	२	११	७५॥	५०
दिा संताजी बोधा	१८	३	१५	१२०	७९
	११०	१२	९८	६९७॥	४६७
सिवाजी कृष्ण	१	१	०	१२	८
	१११	१३	९८	७०९॥	४७५

येकूण असामी येकशे अक्रा पौ अडाव तेरा बरखदाज अठ्याणव व यासी दरमहा तैनात रुपये सातसे साडेनव पौ रोजमरा च्यारसे पच्याहातर रास.

दिा राणोजी सितोला मनवर

	असामी	अडाव	बरखनदाज	तैनात रुपये	रोजमुरा
खासा	१	१	०	२०	१३
राणोजी सितोला मुा	१	१	०	९	६

८ पेसजी तेनात
१ जाजती.
———
९

5390

मानाजी घाटोला	१	०	१	६	४
९ पेसजी					
१ जाजती.					
—					
६					
नरसोजी मिणचेकर	१	०	१	६	४
९ पेसजी					
१ जाजती.					
—					
६					
देवजी सालोखा	१	०	१	६	४
दीपाजी सालोखे	१	०	१	६॥	४
सेव्याजी पडीत	१	०	१	६	४
मर्याजी धनवडा	१	०	१	४	३
राम नाईक	१	०	१	६	४
९ पेसजी					
१ जाजती					
निबाजी भिसा	१	०	१	९	६
८ पेसजी					
१ जाजती					
—					
९					
चिल नाईक	१	०	१	६	४
सुरनाईक	१	०	१	५	३॥
धोड नाईक	१	०	१	५	३॥
चाग नाईक	१	०	१	५	३॥
४. पेसजी					
१ जाजती.					
—					
५					
सोन नाईक	१	०	१	६	४
धोडा म्हार	१	०	१	६	४
निबनाक	१	०	१	६	४
	१७	२	१५	११७॥	७८॥

5391

जदीद लोक

नरसोजी भोसला	१	१	०	७	५
सुभा नाईक	१	१	०	७॥	५
येमाजी कोळी	१	१	०	६	४
सिदोजी कदम	१	०	१	६	४
येमाजी धनवडा	१	०	१	७	५
गोदजी माने	१	०	१	६	४
सटवोजी भोसला	१	०	१	६	४
आपाजी पिसाळ	१	०	१	६	४
भीसन चोभा	१	०	१	६	४
म्हेमाजी राऊळ	१	०	१	६	४
सताजी जलका	१	०	१	६	४
विठोजी सालोखा	१	०	१	६	४
येमाजी धनवडा	१	०	१	६	४
लखमोजी सालोखा	१	०	१	६	४
मर नाईक	१	०	१	५॥।	४
लखमोजी राऊत	१	०	१	५॥।	४
राई नाईक	१	०	१	५	३॥
जोत्याजी राऊत	१	०	१	४	३
	१८	३	१५	१०८	७३॥
	असामी	अडाव	बरखनदाज	तैनात	रोजमुरा हो.
	३९	५	३०	२२५॥	१५२

दि॥ मानाजी सालोखा

	असामी	आडाव	बरखनदाज	तैनात	रोजमुरा रुपये
मानाजी सालोखा	१	१	०	९	६

६॥ पेसजी
२॥ जाजती
———
९

5392

सेख मिरा	१	०	१	६॥	४
लखमोजी सकपाल	१	०	१	६॥	४
पिराजी बवल	१	०	१	५।	४
तुकोजी दाबका	१	०	१	६	४
सताजी बावल	१	०	१	५	३॥
लखमोजी ताटा	१	०	१	५॥।	४
लखमोजी रासकर	१	०	१	६	४
आडजी काटकर	१	०	१	६	४
येमाजी सावत	१	०	१	५॥।	४
येमाजी सिंदा	१	०	१	६	४
खादर आगा	१	०	१	५॥।	४
रहिंमान आगा	१	०	१	५॥।	४
नरसनाक	१	०	१	६॥	४
	१४	१	१३	८५॥	५७॥

दिा खानाजी नाईक.

	असामी	आडात्र	बरखनदाज	तैनात	रोजमुरा शा
खानाजी ना।	१	०	१	८	५॥
पिराजी सालोखा	१	०	१	६	४
सताजी तपासी	१	०	१	६	४
नेमाजी सालोखा	१	०	१	६	४
नरसनाक	१	०	१	६	४
लिग नाईक	१	०	१	६	४
सुभा नाईक	१	०	१	६	४
नर नाईक	१	०	१	५॥	४
रवल नाईक	१	०	१	६	४
खड नाईक	१	०	१	६	४
राणनाक	१	०	१	५॥	४
झीमनाक	१	०	१	५॥	४
	१२	०	१२	७२॥	४९॥

दिा मलजी नाईक मनावर

	असामी	अडाव	बरखनदाज	तैनात	रोजमुरा
खासा	१	१	०	१८	१२
आबाजी सालोखा	१	०	१	६	४
रायाजी बोधला	१	०	१	४	३
निबाजी सालोखा	१	०	१	६	४
सताजी सकपाल	१	०	१	५	३॥
	५	१	४	३९	२६॥

जदीद आा

राणोजी सालोखे	१	०	१	५॥	४॥
मथाजी बोधा	१	०	१	६॥	४
सत नाईक	१	०	१	७	४॥
नरस नाईक	१	०	१	६॥	४
म्हस नाईक	१	०	१	६॥	४
मर नाईक	१	०	१	६	४
देव नाईक	१	०	१	६	४
कुम नाईक नापरे	१	०	१	६	४
म्हस नाईक आधलीकर	१	०	१	५॥	४
निब नाक	१	०	१	६	४
लिग नाईक	१	०	१	६॥	४
कुम नाईक खूर्द	१	०	१	६	४
भवानजी भोरडे	१	०	१	५॥	४
	१३	०	१३	७९॥	५२॥

अजअसामी	अडाव	बरखनदाज	तैनात	रोजमुरा रुपये
१८	१	१७	११८॥	७९

दिा मवाजी बावल मनवर

	असामी	अडाव	बरखनदाज	तैनात	रोजमुरा रुपये
खासा	१	१	०	१०	६॥
माहादजी बावल	१	०	१	६	४

5394

धनाजी आडसूळ	१	०	१	६	४
सेख अबदूल	१	०	१	५	३॥
गोदजी बलाल	१	०	१	५	३॥
साबाजी नाईक	१	०	१	५	३॥
कृष्णाजी	१	०	१	५	३॥
	७	१	६	४२	२८॥

जदीद.

विठोजी अडसूळ	१	०	१	६॥	४
सटवोजी बावळ	१	०	१	६	४
नरसोजी बावळ	१	०	१	६	४
राणोजी पोरगा	१	१	०	३॥	२
बाळोजी गाईकवाड	१	०	१	५	३॥
येसाजी माने पा।	१	०	१	६॥	४
	६	१	५	३३॥	२१॥

अजअसामी	अडाव	बरखनदाज	तैनात	रोजमुरा रुपये
१३	२	११	७५॥	५०

दि॥ संताजी बोधा

	असामी	अडाव	बरखनदाज	तैनात रुपये	रोजमुरा रुपये
खासा सताजी	१	१	०	१६	१०॥
साबाजी बोधा	१	०	१	६॥	४
भानजी धनवडा	१	०	१	८	५

७ पेसजी
१ जाजती
८

सकोजी बोधा	१	०	१	६॥	४
फकीर महमद	१	०	१	६॥	४
सूर्याजी सालोखा	१	०	१	६	४
भागोजी भिसा	१	०	१	४	३

३ पेसजी
१ जाजती
४

जोत्याजी खीरसागर	१	०	१	६	४
सटबोजी भिसा	१	०	१	४	४
	९	१	८	६३॥	४१॥
जदीद					
खंडोजी गगजे	१	०	१	६	४
अली महमद	१	०	१	६	४
राणनाक	१	१	०	७	५
चाग नाईक	१	०	१	६॥	४
बाल नाईक	१	१	०	६॥	४
राणनाक लऊलकर	१	०	१	६॥	४
मल्हार नाईक	१	०	१	६	४
लिंग नाईक	१	०	१	६	४
छ १ रजबु मुा					
निबाजी बोधा	१	०	१	६	४
	९	२	७	५६॥	३७॥
	असामी	आडाव	बरखनदाज	तैनात रुाये	रोजमुरा रुाये
	१८	३	१५	१२०	७९

येणेप्रमाणे दरमाह तनातपैकी रोजमरा करार केला असे. ईा पैत्रस्तगिरीपासून बारमाही चाकरी दसमाही मुशारा हजिरी मनास आणून गैरहाजिरी वजा करून उरले वेतन सिरस्तेयाप्रमाणे पावेल छ १ जमादिलावर आज्ञाप्रमाण.

¶*This paper gives fresh levies of fighting men with details of pay and other matters sanctioned by the Peshwa for duty under Ranoji Shitole and others.*

No. 233] [*19-10-1734*

पौ छ ४ रमजान

श्री

राजश्री सुभानजी सिंदे
नामजाद किले बाणकोट
गोसावी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजतान्य श्री बाजीराव बलाल प्रधान आसीर्वाद. सुा खमस सलासीन मया अलफ. राजश्री भास्कर वैद्य

5396

जयेगडाखाली कऱ्हाडेस्वराचे देवालये बांधितात. त्यास सामानाकारिता माहांगिरी पाहिजे. याजकरि(तां) याणी आम्हास हटकिले. त्याजवरून देवलाचे काम होये तोपर्यंत यास माहागिरी सामानसुधां १ येक देविली असे. तरी यांचे हवाली करणे. देवलाचे काम जालियावरी आणून देतील. नवी माहागिरी देणे. जाणिजे छ २ जमादिलाखर बहुत काये लिहिणे.

¶*The Peshwa sanctions one boat to be kept at the disposal of Bhaskar Vaidya who was building a temple at Jaygad*

No. 234] [*5-11-1734*

पो छ ११ (२१) जाा खर

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी सां नमस्कार विनंती. येथील कुशल कार्तिक वद्य शष्टीपर्यंत येथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. दाभाडियांच्या भेटी जालियास तुम्हास निरोप देऊ म्हणून राजश्री रायांहीं राहाविले. त्यास काल पंचमीस भेटीचा निश्चय करून राजश्री स्वामीनी समारंभ करून यांस दाभाडियाचे भेटीस नेले. तेथे भेटी जाल्या वस्त्रे व कडी व घोडी हती यास दिल्हा. तेथून दाभाडे यास घेऊन आपले घरास आले. याणी बहुमान दोघा बंधूस दोन घोडे हती वस्त्रे कडी दिली, मातुश्री उमाबाई यास वस्त्रे दाहा दिली, सोरस्य उतम प्रकारे जाले हे वर्तमान राजश्री रायांही आपणास लिहिले आहे त्यावरून सविस्तर कळो येईल. आम्हांस आज निरोप देणार आहेत. निरोप जालियावर लवकरच सेवेसी येऊन. बहुत काय लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi writes to Chimaji Appa that the differences between the Dabhades and the Peshwa are amicably composed by the King in a personal interview at Satara and adds that he will soon start to come to him.*

No. 235] [*10-11-1734 ?*

श्री

राजश्री हरि गणेश नाा

किले बाणकोट गोसावी यांसी

& अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री हरजी नाईक कदम नाइक प्राा सुवर्णदुर्ग रामराम विनंती उपरि. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन केले पाहिजे विशेष. पत्र पाठविलें पावोन सविस्तर कळों आलें व

खाडींत गलबतें पाठविलीं ते माघारीं आलीं. त्याजवरील सरदार लोकांनी तुमचे बोलीचा अर्थ सांगितला त्याजवरून कळों आला. सारांश केलसी वेसवी माहालचे वसुलाचा बीद आपले म्हणीतले प्रमाणे जाहाल्यावर खाडींत गलबतें जातील येतील; नाहीं तर येकंदर राबता होऊं देणार नाहीं; यामुळें तुमचे विचारास येईल तें केलें पाहिजे म्हणोन लेहून पाठविलें. ऐशास हरदु तर्फाचा वसूलवासूल इकडील करारप्रमाणे रयेतीस ताकीद करून किले मजकूरचा हिसा किले मजकुरीं देविला असे. सरकारी वत येणे तो सरकारी येईल वैसें असतां तुमचे बोलीप्रमाणें दोन्ही तर्फाचा वसूल चालीस लागावा त्याबदल खाडीतील अरमारी राबता मना केला तर जे गोष्ट होणे जाणें ते उभयेतां खावंदाचे आज्ञेप्रमाणें होईल. दरम्यानें तुमचा आमचा लडा कांहीं नसे, हा अर्थ असतां आज गनिमाई काय जाहाली असे ? यामधें लगट करून दाणा गला साजसामान जंजिरावर चढवावा त्यास गलबतें गेलीं ते माघारीं फिरोन लाऊन दिलीं. हा हुकूम तुम्हांस निक्षूण राजश्री पंत प्रधान याचा आहे कीं काये ? जंजिरेयाचें सामान चढावें हे गोष्ट माहाराज राजश्री स्वामी मना करितील कीं काये, हा विचार तुम्हांस न कलेसा काय असे ? परंतु तपसिलें लेहून पाठविला आहे. लिहिले गोष्टीचा मजकूर म्हणावा तर कालचे पत्रीं साफ तुम्ही लेहून पाठविलें कीं राबता मना केला याबद्दल विचारास येईल तें करावें म्हणोन तुम्हीं लिहिलें. तर आमचे विचारें हेच गोष्ट जे खाडींत अरमारी गलबतें खमखा घालावीं. जागे धन्याचे सामानपूर असावें म्हणोन सामान आणितो. तुम्ही मारामार केलीयास आमचे लोकांचे खून जालें तर निमित्य तुमचे पदरीं घालावें हाच विचार आम्ही योजून गलबतें तयार केलीं. या उपर खाडींत दिखादेखत गलबतें रवाना करितों हें वृत्त तुम्हास अगोधर कळावें यास्तव लिहिलें असे. जैसा तुम्हांस तुमचे येजमानाचा हुकूम असेल त्याप्रमाणें वर्तावें. आम्हास आमचे येजमानाचा हुकूम त्याप्रमाणें आम्ही वर्तणूक करितो. बहुत काय लिहिणे छ २४ जमादिलाखर हे विनंति.

¶*Harji Naik Kadam explains to Hari Ganesh, Killedar of Bankot, that it is not right on the part of the addressee to prevent the writer from storing provisions in the fort.*

No. 236] [*14-11-1734*

श्री

राजश्री सुभानजी सिंदे नाईक

किले बाणकोट गोसावी यांसी

६ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री हरजी नाईक कदम नाईक प्रांत जंजिरे सुवर्ण दुर्ग रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन

कल पाहिजे विशेष. आजच गुरुवारी तत्वता वर्तमान आलें कीं सिदी साद गोवलाहून दोन तरांडीं थोर सिबाडी पंधरा यैसे सतरा सिलसिले कृष्णाजी घाटगा व फाजिल महमद दोघे सरदार उदईक सुक्रवार जुमाच्या दिवसीं निघोन कसबे केलसी येथील हवा पालथ नेली आहे. केलसी मारून बंद धरून न्यावे, बाणकोटचाहि दाखला करावा आणि वायावरी ? राजपुरीस परभारेंच जावें. उद्यां परवाच्या दिवसांत सदरहु कार्यभाग उरकावा यैसें केलें असे. याजकरितां हें सदरहु वर्तमान तुम्हांस कलावें म्हणून लेहून पाठविलें असे. तरी तुम्ही किलाची मजबुदी करून कसबे मजकूरच्या रखवालीस कांहीं जमाव पाठवावा. शत्रू दगेखोर आहे व कसबे मजकूरच्या रयेतेस सावध राहाणें म्हणून येथून ताकीद करविली असे व येथूनही कांहीं जमाव रखवालीस मागाहून पाठऊन देऊन. कललें पाहिजे. बहुत काय लिहिणें रवाना छ २८ माहे जमादिलाखर हे विनंति.

¶*Harji Naik Kadam, Killedar of Suwarnadurg, sends intimation to Subhanji Sindia that the Sidi is planning an attack on Bankot.*

No. 237] [*14-11-1734*

पौ छ १० रजेब

श्री

राजश्री सुभानजी सिंदे नामजाद
किले बाणकोट गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य + श्री बाजीराव बलाल प्रधान असीर्वाद. सुा खमस सलासीन मया अलफ. सुवर्णदुर्गकरी दुतर्फा. वसूल केलसी वेसवीचा घेतात आणि तुम्हीं हबसियाकडील वसूल जुजबी घेतां म्हणोन कलो आलें. यैशास त्याणी सेर घेतलिया तुम्हीहि सेर घ्यावा. निमेचे धनी ते व निमेचे तुम्ही ऐसे असतां ते सेर घेतात तेथे तुम्हांस निठवे घ्यावया गरज काये ! हे गोष्ट उतम नाहीं. जे सुवर्णदुर्गकरी घेतील ते तुम्ही घेणे. गई न करणे. तुम्हांस काम रेटत नसेल ते चिरंजीव राजश्री आपा यांस लेहून पाठवणे. ते आणिखी लोक पाठवितील. जयेगड रसालगड रत्नागीर प्रांते लोकांचे कबिले आहेत ते लोक किले मजकुरी आहेत त्यास वसुलास न पाठवणे. त्यांचे वस्तु वसूल होणार नाही. ते आंगरियाचे लोकास भितात त्यास किल्यागतच ठेवणे. ज्याचे कबिले आंगरियांचे कबजेत नाही त्यास वसुलास पाठऊन बेमुरवत ते घेतील त्याप्रो तुम्ही घेणे. गई कराल तरी उतम नाही. तुमची उबर राहाणार

+ येथें बाजीरावाचा शिका.

5399

नाही हे जाणून वर्तणूक करणे. जाणिजे छ॰ २८ जमादिलाखर बहुत काये लिहिणे. तुम्हाजवल बारासे माणोस असोन तुम्ही त्यास बदतां हे, गोष्ट अपूर्व आहे. सिपायेगिरी कैशास करितां? रांडा जाहाले असतेत तरी कामास येते. मंडणगडकरी व सुवर्णदुर्गकरी पैसा घेतील त्याप्रो तुम्ही घेवणे. त्याच्या घेरियाचा देखील वसूल घेणे. ते तुमचे घेरियाचा वसूल घेतील तरी तुम्ही अंतर न करणे. मुल्क वोस जाहाला तरी कामास येईल. तुम्ही त्यास दबाल तरी परिछिन तुमचा मुलाहिजा होणार नाही जाणिजे.

¶*Bajirao administers a severe rebuke to Subhanji Sinde for failing to collect dues from the Taluks of Vesvi and Kelsi as desired.*

No. 238] [*15-11-1734*

तालिक

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
छत्रपति स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक संभाजी आंगरे सरखेल सेवेसी विज्ञापना उपरी. येथील कुशल तागायत मार्गसीर्ष शुध प्रतिपदा भृगुवासरपावेतों स्वामीच्या कृपावलोकनें-करून वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र पाठविलें. प्रविष्ट-कालीं मस्तकीं वंदून संतोषातिषये जाला. आज्ञापत्रीं आज्ञा कीं राजश्री विसाजी राम यांस हुजूर न्यावें ते स्वामीच्या चरणासनिध येऊन त्यांचे आम्हांस पत्र आलें म्हणजे स्वार होऊन येऊं म्हणून वारंवार विनंतिपत्रें पाठविलीं व राघो नारायण व विस्वनाथ वैद्य आले त्याणि तोच आशय सागितला, त्यावरून मशारनिले यास हुजूर आणिलें. याउपरी तुम्ही दर्शनास येणे. स्वामी तुमच्या मनोदयानरूप सरंजाम देतील. न यावें यैसेंच चित्तीं असेल तर तैसेंच उत्तर पाठवणें. परियाये ल्याहाल तरी स्वामी आइकणार नाहींत म्हणून आज्ञा. यैशास सेवकाचा दुसरा विचार आहे यैसें नाहीं. यास्तव निश्चयेपूर्वक दर्शनास यावें हाच सिधांत करून भाद्रपदमासीं स्वामींचे सेवेसीं विनंतिपत्रें पाठविलीं. राजश्री विसाजीराम याचे येणे ते प्रसंगी स्वामीसन्निध जाले असतें म्हणजे सेवकानें तयारी केलीच होती. त्यास अस्विन मासीं राजश्री रघुनाथ हरि यास राजश्री प्रधानपंतीं मुल्यास पाठविलें, त्याणी मुलकांत स्वारी करून उपद्रव केला, तन्मुळें अवघाच विचार विलंबावरी पडिला. सांप्रत स्वामीनी मशारनिलेयास चरणासनिध नेऊन सेवकास दर्शनास यावयासी आज्ञा केली, यैशास सेवकास स्वामीचे चरण येक वेल पाहावे हा चित्ता-

पासून संकल्प आहे. परंतु जंजिरेयाचा मामला सेवकाचे स्वाधीन. जांगियाची पुस्तवानी व बेगमी जाली पाहिजे याजकारितां आरमाराची तयारी करून स्वारीस रवाना केलें आहे. पैदास्तीविना दुसरा उपाये नाहीं. आठ दिवस रवाना केल्यास जाले. अद्यापि आले नाहीं दुसरा अर्थ इंग्रजाचा शह सबल आहे. त्याचा शह रक्षून जागियाची बेगमी करावी लागते. सांप्रत इंग्रजी आरमार जंजिरेचे नस्तावर येऊन येक मास नस्त धरून राहिला आहे, त्यामुळें आरमारास मोठासा शह प्राप्त जाला आहे. तोहि असो. स्वामीचे पुण्येकडून त्याचा हिसाब धरीत नाहीं. आज्ञेप्रमाणे स्वार होऊन यावें त्यास बंदर किनाराचें माणूस फितवेखोर विस्वास धरतां येत नाहीं. सांप्रत आणाजी साटम याणे विजयेदुर्गी फितुरास लोक मेलऊन लबाडी केली होती, ते सेवकास श्रुत जालियावरी फितवेखोरांस शासन करून बंदोबस्त केला या प्रकारचा मामला आहे. हा स्वामीस विदित व्हावें यास्तव मशारनिलेयास स्वामीनी सेवकाकडेस पाठऊन द्यावे. ते आल्यानंतर सेवकाकडील मनोदये सांगून पंतास स्वामीसंनिध रवाना करून सविस्तर श्रुत करितील. स्वामीस श्रवण होऊन स्वामी जी आज्ञा करितील त्याप्रमाणें वर्तणूक करून. परियाये न लिहिणें म्हणून आज्ञा. यैशास स्वामीचे पायांविना सेवकास दुसरा विचार नाहीं. जे वर्तणूक होते तेवढी स्वामीच्या सेवेसी न ल्याहावी तर सेवकाचा अर्थांतर कैसें विदित होतें? याजकारितां स्वामीसंनिध लेहून पाठविलें आहे, विदित होईल. श्रुत जालें पाहिजे हे विज्ञापना.

¶*Sambhaji Angria explains to the King as to why he had to delay his going to Satara and pay his respects to the King. He had to equip his fleet and keep it ready against an attack from the English.*

No. 239] [*18-11-1734*

श्री

राजश्री सुभानजी सिंदे गोसावी यासी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो चिमणाजी बलाल आसीर्वाद सुहूरसन खमस सलासैन मयां अलफ. तुम्ही विनंती पत्र पाठविलें ते पावोन सविस्तर वर्तमान विदित जाहालें. राजश्री संभाजी आगरे सरखेल कुलाबा गेले म्हणून लिहिले ते कळले. तीर्थरूप राजश्री राऊ स्वामीनी तुम्हास सादर केले की मंडणगड व सुवर्णदुर्ग या दोहीं किल्याच्या घेरियाच्या गावचा निवाडा हुजुरून होणे आहे, याकरिता तूर्त केलसी वेसवीचा वसूल तकूब आसो देणे म्हणून लिहिले होतें, त्यावरून तुम्ही वसूल तकूब केलात, त्यास तुम्ही शामलाकडे अमल चालत

होता त्याप्रमाणें वसूल ज्ञाडून घेणें. याउपर वसुलाची सुस्ती येकंदर न करणें. सिवर्धनाकडे तुम्हाकडील स्वारी गेली होती, त्यास शामलाचे स्वारीसी व तुम्हाकडील स्वारीसी गाठ पडली. दोन मुर्दे शामलाकडील केले व येकजण धरून+ आणिला म्हणून लिहिलें तर उतम केले व पधरा गोण्या व दोन बैल पाडाव केले ते कललें. सांप्रत तुम्हाकडील स्वारी व माहाडकर व मंडणगडकरी येकत्र होऊन मतगडाकडे गेले आहेत, त्यास ते स्वारीचे काये वर्तमान ते मागाहून लिहून पाठवितों म्हणून लिा ते कायें वर्तमान ते लेहून पाठवणे. जमादिलाखर महिनियाची वाटणी नांवनिसीवार लेहून हुजूर पाठवणें. बुतान्या नारलीच्या २५ पंचवीस पाठविल्या त्या पावेल्या. जाणिजे छ २ रजब आज्ञा प्रमाण.

¶*Chimaji Appa orders Subhanji Sindia to collect revenue dues from certain villages, which were previously suspended.*

No. 240] *[1-12-1734*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
साहेबांचे सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक सुभानजी सिंदे नामजाद किले बाणकोट. चरणावर मस्तक ठेऊन सा। दंडवत विनंती. तागायेत छ १५ माहे रजेबू सुा खमस सलासीन मिया व अलफ पावेतो साहेबाचे कृपाअवलोकनेकरून सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विसेष. साहेबाचे आज्ञापत्र सादर. तेथे आज्ञा की, तावडा धरून आणिला. त्याजवर रा। संभाजी आंगरे सरखेल याचा कौल असता, तावडा धरावा हे गोष्ट अनुचित, म्हणून आज्ञा, त्यास तावडेयावर तो त्याचा कौल नवता. तावडा तो पारमीणपटण या बंदराचा. तावडा थेट राजापुरास जात होता, तो धरून आणिला. त्याजवरील सावकार व दर्यावर्दी पाो सेवेसी रा। केले. त्याणी सविस्तर वर्तमान सेवेसी निवेदन केलेच असेल. व तावडेयाविसी श्रीमंत राजश्री पंत प्रधान साहेबाची आज्ञा की, राजापूरचा तावडा तहकिक असला तर सोडणे म्हणून आज्ञा. त्याजवरून रा। संभाजी आगरे सरखेल याणी तावड्याविसी बहुत खटपट माडिली आहे व तावडेयाचे वर्तमान सदरहू लिहीलेप्रमाणे आहे. तावडा राजापुरास मात्र जात होता. त्याचवरून दावा करितो. याकरिता काये ते आज्ञा ते करावी

\+ येथें शिक्का बाजीरावाचा.

कदाचित तावडा देखिला तर, कापूस दोन खंडी फुरोख्त जाला आहे, त्याचाहि दावा करितील. येसा विचार असे. जी आज्ञा होईल, ती सिरसा असे. केलसी वेसवी हरदू माहालचा वसूल निमे प्रा बेमुलाहिजा घेणे, म्हणून श्रीमत राजश्री पंत प्रधान साहेबाची आज्ञा आहे. त्यांस रा संभाजी आगरे सरखेल म्हणतात की, चौथाई घेणे. नाही तर तुम्हा आम्हास खलदळ होईल येसे म्हणतां. त्यास आम्ही नेमेप्रा वसूल बेमुलाहिजा चालवितो. सवेसी श्रुत होये हे विज्ञाति विसेष. पेसजी आज्ञा कीं, घेरा हरणैई व घेरा मडणगड व हरदू माहालचा हिसेब रा करणे, म्हणून आज्ञा. त्याजवरून सदरहू हिसेबू हणमत नानाजी सबनीस दिा नागापा याजबरोबर पेसजी रा केला आहे, तो सेवेसी विदित जाहालाच असेल. सेवेसी श्रुत होये. हे विनंती.

¶*Subhanji Sindia writes to Chimaji from Bankot about a ship having been captured near Rajapur, to which Sambhaji Angria lays claim. The writer asks for orders about this ship and about the collection of dues from certain Mahals near Bankot.*

No. 241] [*9-12-1734*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक तुबाजी अनंत मो धामणी वेढा गोवलकोट कृतानेक नमस्कार विज्ञापना. ता छ २३ माहे रजब पावतो स्वामीचे कृपेंकरून मो मजकूरचे वर्तमान येथास्थित असें विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन निघालो ते छ २१ मिनहूस मो मजकुरी पावलोकाची हाजिरी मनास आणिली. आज्ञेप्रमाणें जे लोक तलागर्डी रवाना करविले होते ते केले. त्यास रोजमुराहि नेमणूकप्रमाणे दिल्हा. मो मजकुरी लोक राहिले आहेत त्यांची नावेनिसी व जे रवाना आले त्यांची नावनिसीं रोजमुरा आकारून अलाहिदा जाबता सेवेसीं पाठविला आहे. रवानगीचे मात्र लोकांस रोजमुरा दिल्हा आहे. येथे अहेत लोक त्याचें रोजमुरे याचें नेमनुकप्रा यैवज पुरत नाहीं, याकरितां लोक थोडबहुत द्यावे ते घेत नाहीं. त्यास नेमणुकीचें तोटेयाचा यैवज हिसेब बरहुकूम रवाना करणार स्वामी समर्थ अहेत. लोकाचें दोन महिने भरले. लोकाही गवगवा बहुत केला आहे. माहागाईमुले लोकास खर्चावेचास नाहीसे जाले अहे. त्यास हिसाब बरहुकुम यैवज स्वामी रवाना करतील तर येथे कितेक गोस्टी अहेत. हजार पाचसे रुा ज्याजर्त

रवाना करणार स्वामी समर्थ आहेत. यैवज़ असला म्हणोन काही वावगा खर्च करू यैसे नाहीं. आज्ञेविना येक पैसा खर्च होणार नाही. त्यास स्वामी मणतील कीं नेमणूक प्रा यैवज दिल्हा आणि यैवजांचा तोटा काये म्हणून आला? तर मांहे जादिलवलचे रोजमुरेयाचें नेमणुकीप्रमाणें स्वामीनी यैवज दिल्हा, त्यास जमादिलाखर महिनेयाकारणें ज्याजती यैवज नेमणूक आकारली. रुपये रघुनाथ दलवी व तानदलवी व भवानजी कदम व नाइकजी तावडे व बावाजी कदमराऊ व बावाजी साटम या सदरहु पतकाकडेस सरकारचे फाजील होते, याकरिता त्यास रोजमुरे कम नेमिले होते. हाली त्याचे अखेरसाली हिसाब फाजले वजा जाली, याकरितां त्यांचे रोजमुरे जमादिलाखर महिनेयापासून ज्याजती चढले आणि नवे तैनातजाबते होऊन आले त्याचा यैवज आला नाही, व सिवाजी यादव याचे लोक ज्याजती जदीद असामी ४८ अठेतालीस आले, त्याचा यैवज ज्याजती व हिरोजी कदम याचे लोक बाणकोटपैकी रजेस गेले होते ते आले असामी १९ त्याचा यैवज यैसा सदरहू यैवज पाा. रामाजी माहादेव यासीं भाद्रपद मासी आज्ञा आली होती की काही लोकास रजा देणे. त्याहीं से दीडसे लोकांस रजा जे दिल्ही होती. त्यापैकी पनास पाउणसे माणूस हाजीर जाले. यैसा सदरहू लोकाचा रोजमुरा ज्याजती आकार जाला, आण यैवजाची रवानगी जाावल महिनेयाचे रोजमुरेयावरून जाली. यामुले यैवज तोटा आला असे. यैवज सत्वर रवाना करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काये लिहिणे सेवसी विदित होये हे विनंति.

¶*Tubaji Anant explains why the amount of cash already sent was found insufficient and asks for more.*

No. 242] [*About 23-12-1734*

श्री

सेवेसी विज्ञाप्ति विनंती. स्वामीचे आज्ञेप्रमाणे गोवलकोटास जावया आलो. तेथून पुढे जावे त्यास राा तानाजीराऊ व गोदजी सेटगे व राजश्री हरजी पाटकर यांचे विद्यमाने तिकडून जावया प्रतिकूल याकरितां महिमतगडचे घाटे खाले उतरावे यैसे जाले. त्यावरून रात्रीचे बहुत चवकसीने निघोन येका दिवसाचे मजलीवरी आलो. तो वर्तमान स्थलास श्रुत जाले. मनास आणितां रवानगी जाहाली. त्या तिसरे दिवसी पेढेतून ब्राह्मण गोसावी दीर्घाचलास (?) गेला तोच त्यांणी त्या जागां सुक्रवारी पंचमीस खबर दिली. त्यावरून त्यांचे आरमार रविवारी पोहचले. सेवकांही कसाला करावयास आंतर केले नाही. ज्या मार्गे चोरीने गेलो त्याच

मार्गे रात्रीचे माघारे गोवलकोटाचे मार्गावरी काहीनेचे तिरी राहिलो आहो. गोदजी सेटगे व तानाजीराऊ लोकासमेत स्वारीमध्ये आले आहेत. हरजी पाटकर कबिलेचे समाचारानिमित्य मागे गेले आहेत. किट सावतांकडील पनास माणूस आले आहे. जाहाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. येका दिवसाचे पल्यास जाऊन यैसे जाहाले. बरे पुढे स्वामीचे पुण्य समर्थ आहे. श्रमास अंतर केले नाही, परंतु ईश्वर इछेस उपाये काये. राजश्री रामचंद्र हरि गोवलकोटीच आहेत. त्यांस पत्र पाठविले आहे. गोवलकोटचे लोक व हुजूरचे लोक आहेत यांस आज्ञा कर्तव्य ते करावी. दीर्घाचलाहून ग्रहस्ताचे पत्र आले तेच बजिनस सेवेसी पाठविले आहे त्यावरून विदित होईल. सविस्तर वर्तमान महिमाजी भिताडे सेवेसी निवेदन करितील, त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer narrates the several difficulties that he had to go through while proceeding to Gowalkot as ordered by the Peshwa.*

No. 243] *[23-12-1734*

२

विनंति प्रार्थना. तुम्ही टाकोटाक रातवा खपोन येणे अगर त्या लोकाचा त्या रानीं बोभाट होऊन माघारे गेले असिले तर खबर घेऊन येणे. ते अगर त्या कामाचा त्या रानीं कांहीं मुसमार्ग[१] नसिला तर तसेच खबर घेऊन येणे म्हणोन पाठविले आहेत. शनवारी त्या लोकाचा दिवसा मोकाम संभापुरी होता. रात्री कूच जाहालेवर जे लोक चुकले दहावसि माणूस ते आम्हापाशीं आले. शुक्रवारी दहावीस माणूस चुकले ते आले. ऐसा विचार जाहाला. स्वामीच्या पुण्यप्रतापेकरून सोमवारी कार्य जाहाले असेल, परंतु आम्हीच समयास पोचलो नाहीं. हवियानीं दगा केला असा विचार जाहाला. कालुस्त्याहून राजश्री रामाजीपंत रोज राऊत पाठवीत कीं तुम्ही ज्या कार्यास आला ते कार्य करणे. त्यास आम्ही उत्तर लिहिले कीं आम्ही राजश्री तुबाजीपंताकडे आलो. त्यास धामणीस पाणी नाहीं या करितां येथें राहिलो. तुबाजीपंत चाकरी सांगतील ते करूं ऐसे लिहिले. त्या उपरी त्यानीं आपला इतबारी पाठविला कारकून गणेशपंत. त्यानें आम्हास बहुत भासेनें विचारलें, कीं तुम्ही पुढें आला तुमचे लोक हेलवाक कोईन कांठ येथें राहिले आहेत. काय मनसबियास आला ते सांगणे. त्यावरून मग आम्ही पुसिलें कीं भास्कर वैद्य व तुम्ही काय प्रयोजनास आला होता. त्यास तो बोलिला की आम्हास एक ग्रहस्ताने फसविले बोलिला म्हणोन मग आम्ही त्यास उत्तर दिल्हे, कीं कोईन काठे लोक

---

१ मागमूस

आमचे नव्हत. आमचे लोक आमचे पाठीवर येतील. जे स्वामींनीं दुसरें स्थलचे नांव सांगितले होते ते नांव त्यानीं सांगितले. रामाजपिंताखेरीज दुसरे कोणापासी न बोलणे म्हणोन सांगितले. त्यावर त्याकडील कोण आले नाहीं. आगारकाचे माणूस तीनशेहपर्यंत कालुस्तेस आहे. या मुलकांत स्वारीचा हा काट पाईचे माणसाचा थोर जाहाला परंतु स्वामीचे पुण्यप्रातापे कार्य सिद्ध होईल. बहुत काय लिहिणे? राजश्री तुबाजीपंताजवल लोकाची भरती थोडकी. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*This is the second portion of a letter already printed at No. 110, Selection 3, on Janjira. The letter is by Ramchandra Hari to the Peshwa giving details of an action at Gowalkot.*

No. 244] [*Recd. 29-12-1734 ?*

पौ छ १४ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री

आपा स्वामी वडिलांचे सेवेसी

विनंती. माहाडास स्वामीनी राऊत व लोक पाठविले आहेत त्यांचे पत्र काल आम्हास आलें. राऊत देखील माहाडास पावले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Nana Saheb informs Chimaji Appa that men despatched to Mahad have reached the place.*

No. 245] [*30-12-1734*

श्री

राजश्री वासुदेव हरि गोसवी यांसी

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित धोंडजी आंगरे सुभेदार नामजाद प्रांत जंजिरे कुलाबा राम राम विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत गेलें पाहिजे. यानंतर राजश्री मानाजी आंगरे रेवदंडेयास जाऊन फिरंगी इंग्रेज यांजसी मित्रत्व संपादून राजकोट आपले स्वाधीन करून घेऊन इंग्रेज फिरंगी सर्व प्रकारें मदत करून पुढें कितेक मनसबे करावे ऐसी कितेक प्रकारें ममता लाऊन विश्वास दाखविला. ऐसें असतां हाल्ली सिदी साद हबशी व इंग्रेज अरमारनसी कुलाबा बाहेर येऊन नागरवाडा राहिला आणि जमाव रेवदंडियास उतरला. राजश्री मानाजी आंगरे रेवदंडेयास होते त्यास कैद करावें

आणि राजकोट हस्तगत करावा ऐसा इत्यर्थ करून जमाव राजकोटास असा मशीदीजवळ पाठविला. राजश्री मानाजी आंगरे रेवदांडेयास गुंतोन राहिले तेव्हां तजवीजेचे वाटेनें राजश्री मानाजी आंगरे बाहेर पडोन राजकोटास आले. हबशी असा मशीदीजवळ जमावानशी येऊन भांडी जोडून राजकोटास मार करीत आहे. फिरंगी इंग्रेज हबशी येक हातीं होऊन भांडावें ऐसें जाहालें आहे. याकरितां आपण राजकोटची सर्व प्रकारें मदत करावी, उचित आहे. आम्हीहि त्याचा उपराळा दारुगोला जमावानशी करीतच आहों. पुणेयाहून त्याचा उपराळा होईल; परंतु दिसगत लागेल. याकरितां तुम्ही जमावानशी उपराळा सत्वर होये तें करणें. बहुत काय लिहिणें लोभ असों देणें छ १५ शाबान.

¶Dhondji Angria asks help from Vasudeo Joshi for the defence of Rajkot where, he says, the English and the Sidi have landed a force and have opened fir-

---

No. 246] *[30-12-173-*

पाा छ २२ साबान

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान
गोसांवी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंग भोसले दंडवत विनंति उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन केलें पाहिजे विशेष. माहाराज राजश्री स्वामींनी राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधि यासी आणावयासी आम्हास पाठविले होते. त्यासी आम्ही जाऊन कितेक प्रकारे बोलोन त्यासी घेऊन पोष वद्य द्वितीया सोमवारी राजदर्शन जालें. यावरी आजपाा बोलीचालीचा काही मजकूर जाला नाही. जालियानंतरी जो होईल तो लेहून पाठविला जाईल. आपण जातेसमई आमची आपली कितेक बोलीचाली जाली आहे, त्यासी आपण गेलियापासोन काही वर्तमान लेहून पाठविले नाही. तरी जे बोलीचाली जाली आहे तेहि गोष्टीचा विचार लेहून पाठविला पाा. राा छ १९ साबान. बहुत काये लिाा लोभ असो दीजे हे विनंति+.

¶Fatesing Bhonsle informs Bajirao of his having brought the Pratinidhi to Satara at the instance of the King.

+ पत्रावर फत्तेसिंगाचा शिक्का व मोर्तब.

No. 247] [Received 31-12-1734

पो छ १६ साबान

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे शेवेसी.

विनंति यैसीजे. राजश्री रामाजी दामोदर व भास्कर वैद खाडी बुजीत आहेत. आमचे मेढियाचें सन्मुख खाडीपलेकडें येऊन हजूर माणसें आम्हाकडे पाठवितातीं. तुम्हास राजश्री पंत प्रधान याणीं गोटांत निजावयास पाठविलें आहे कीं खाडी न बुजणें, मोर्चा पुढें न चालवणें, गनिमाचीं गलबतें जाऊं देणे, म्हणोन सांगितलें. यैसें असेल तर तैसेंच लिहिणें. तुमच्या धणियाचा आमचा स्नेह तुम्हास ठाऊक आहे. आम्हाकडील फासुवांतून गलबत जात नाहीं. तुम्हाकडील फासूंतून गलबतें जातातीं हा बोभाट आर्जीपावतों हजूर लिहिला नाहीं. तुम्ही खाडी बंद करीत नाहीं. तुम्हास दुराई आहे, म्हणोन रोज माणसें येतातीं. व आम्ही कृष्णाजीपंत म्हणोन बातमीस ठेविला आहे, त्याणें लिहिलें की आंगारकाचे कागद आले कीं आठ रोजीं आपण येतों. त्याचे लोक व तोफा तेथें होती. त्यांस लिहिले आलें कीं तोफा लागूं करणें मोर्चांत जाणें. इतके दिवस गोटांत होते. आतां त्यांनींही हालचाल केली. सेवेसी कळावी म्हणोन लिहिलें आहे. रोज गलबतें जातातीं तेव्हां सात पांच तोफा व सें पन्नास आवाज त्यावरी मारगिरी करावी लागती. दारूगोळी सरली. बारा मण सिलकेस दारू उरली. गठली येक आहे. सिसें दोन मण आहे. त्यास लोहार सोनार नाहीं. दारूगोळी व सुतार लोहार यैसें अगत्य पाठवावें. हें विज्ञप्ति.

¶*Tubaji Anant to Chimaji Appa : complains against Ramaji Damodar and Bhaskar Vaidya, who are threatening the writer for neglecting to fill up the channel of water to prevent ships passing through.*

No. 248] [About 31-12-1734

श्री

पु॥ श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. येथे भरती जे लोकांची आहे ते सेवेसी विदित असे. त्यास तीन मेढे व यैक तल च्यार जागेयांची बेहबुदी जाली पाहिजे. त्यास दोहो मेढियावर

ीडसे माणूस असे. धामणीचे मेढेयावर तीनसे माणूस येकूण साडेच्यारसे माणूस ाले. बाकी लोक राहिले ते तलावर आहेत. प्रतिनिधिकडील लोक होते तेहि आमचे पूर्वी दोन रोज गेले. अडीचसे माणूस पंतसचिव याजकडील आपले तर्फेस नेमणूक आहे तेहि तिकडून देत नाही. तेव्हा राहिले लोकानसी येथील बंदोबस्त कैसा होतो? शत्रु तो दिवसंदिवस वलवल करावयासी चुकत नाहीं. हाली गलबतें कासीबंदराचे अलीकडेंस येतात. लोक उतरून छावणीसाठीं गवत कापतात ते गवत आपले तर्फेस आहे. त्यावर न जावे, स्वारी न पाठवावी. तो ाा भास्कर वैद्य बोलतात की तुमचे तर्फीस लोक शत्रूचें उतरून गवत कापतात अण तुम्ही पाहाता हे अपूर्व आहे, म्हणून कितेक ताा लिहितात. त्यास त्याजवर जावे आणि त्यांस चालवावे तर त्याचें उतम प्रतीने पारपत्य केले पाहिजे, तेव्हा त्याजवर जावे. त्यास तलावर लोक आहेत या लोकाही जाऊन त्याचे पारपत्य मनास आणावे. त्यास जे लोक तलावर आहेत त्यांत से दीडसे माणूस दुखणेयानी पडले आहे. बाकी लोक काये राहिले ते ठावकेच आहेत. याच लोकानसी जाऊन त्याचें पारपत्य करावे हा विचार नाही. कालुस्ते तर्फीस शामल हेच प्रकारे जातो आणि ते त्यावर उचलून येतात परंतु त्याचें पारपत्य होत नाही. तोच याचे पारपत्य करितो. तेव्हा तेकडस जाता हे हिकडस जातात. यैसा विचार आहे. त्यास येथे राऊत उपरालियासी असलियाखेरीज कामास येत नाही. त्यास काही राऊत व काहीं लोक यैसा सरंजाम रवाना करणार स्वामी समर्थ आहेत. वरकड तो आलियासी त्याचे पारपत्य होतहि असे, अणी पुढेहि होईल. परंतु येथील विचार या प्रकारचा आहे. आम्ही आलियाउपरांतिक त्याजकडून दोन पत्रं आम्हास आली की मेढेयाखालील पाणबुर्ज आहे तो काईम करून खाडी बंद करणे. त्यास पाणबुर्जाचे व मेढेयांचे मधे दोन दोन तवक्क+ आहेत ती काईम करावी. तेव्हां पाणबुर्जावर कणग माडून तो जागा काईम होईल. त्यास आहे या लोकानी बेहबुदी होत नाहीं. तर स्वामीनी काही लोक रवाना करावे. आम्ही तेच जागा जाऊन बैसो. आणि जागा काईम करून तल राखायाकारणे राऊत रवाना केले पाहिजेत. शामलाची गलबते रोज येक दोन मेढेयावरून येतात जातात, त्यावर मारगिरी करावी लागते. से दीडसे बार रोज सुटतात. दारूची सिलिक राहिली असे, ते सेवेसी हिसाबावरून विदित होईल. दारू गोली रवाना करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काये लिहिणे सेवसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant communicates details of the siege of Gowalkot to Chimaji Appa.*

+ तवक्क = टेकडी, खडक.

5409

No. 249] [31-12-1734 ?

पौ छ १६ साबान

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपर. आम्ही चाकर, जे चाकरी पडेल ते चाकरीस स्वामीचे पुनें करून चुकू यैसे नाहीं. परंतु नक्षनामोस स्वामीचा आहे, जेणेकरू नक्षनामोस होये ते करणार स्वामी आहेत. त्यास आम्हाकडील लोक कर्णाजी सिंदे घेऊन स्वामीकडस येणार. त्या लोकास पत्र पाठऊन ते लोक आमचे आमचे कडस रवाना करविले पाहिजेत. आणिखी से दोनसे पायेचे लोकहि येथे देविले पाहिजेत. त्यास ये जागा राउताखेरीज यैब राहात नाही. ये जागा राऊत जरूर असले पाहिजेत. त्यास से दीडसे राउतांची नेमणूक ये जागा ठेवावयाची करून आज्ञापत्र राजश्री रामचंद्रपंतास पाठविले पाहिजे. स्वामी म्हणतील की, ते जागा हशम व फौज गेली आहे. याकरिता कितेक ताा लिा तर तपसिले ल्याहाव्रे यैसे नाही. तमाम माणूस दुखणेयासी पडले आहे. त्यास दुखणे-कराची नावनिसीहि मागाहून सेवत पाठवितो. हाली लोकास पोटे लागली आहेत व हिवताप लागले आहे. जो कामाचा माणूस होता तो येथून उठोन दुसरे जागा बैस म्हटले तर त्यास बैसावयासी ताकत नाही, यैसे जाले आहे. येक मनवर येकूणीस माणूस पैकी पाच माणूस चाकरीस आहे. बाकी चवदा जण अलगत पडले आहेत. तैसेच कानड पंचवीस माणूस चाकरीस आहे. बाकी तमाम माणसा दुखणेयासी पडले आहेत. पोटे लागली आहेत. हेच गत सारे लोकांची जाली आहे. जाले वर्तमान सेवत लिहिले आहे. बहुत काय लिहिणे? कृस्णाजी हरि बराबरी यैवज पाठविला त्यासी रवानगीच्या लोकास येकमाहा दिला. मुकामी लोकास व स्वारास पधरवडा साबानेचा दिला. बाकी राहिली नाही. पुढील बेगमी करणार स्वामी धणी आहेत. पूर्णमा पाच रोजी होईल. लोक गवगवा करितील. माहागाई आहे व कोणी वाणी उदमी आठ पधरा रोज उचापती देणार नाही. साबानचा पंधरवडा व पुढील जे बेगमी करणे ते केली पाहिजे. बहुत काय लिहिणे. सेवेसी श्रुत होय हे विनती.

¶*Tubaji Anant asks to be reinforced as the men posted with him have all become ill.*

5410

No. 250] [1734 ?

श्री

+विनंती उपरी. आपलें पत्र आलें तें पावलें. आम्हास आज्ञा जाली त्यावरी आंम्ही नांदेडियास आलों. मागें राजश्री स्वामीचीं पत्रें आली. त्यांचे जाब लेहून गेले आहेत. त्या जाबाची उतरे येतात. त्यावरून वर्तमान कलले. पुन्हा पत्रें येतील त्याचा जाब इतकाच ल्याहावा कीं, फौजा पुढे पाठविल्या राजश्री पिलाजी जाधवराऊ यांसहि रवाना केलें हेच ल्याहावें. आंम्ही नांदेडियांत राहिलो तरी म्हणतील कीं, घरीच आहेत. याजकरितां येथें राहातां कार्यास् येत नाही. आम्ही आजी इंदुवारीं स्वार होऊन मौजे गोन्हे येथें जाऊन राहातों. इतकियांत कोकणातील काये वर्तमान येतें हेहि कलेल व राजश्री स्वामीकडील पत्रें येतील तिकडीलहि अर्थ कलेल. मग आपली आज्ञा होईल तैसी वर्तणूक करून. कोकणात कदाचित जाणें जालें तरी जरुरीस आम्ही जाऊन. परंतु आपण गेल्यास कार्याचि नाही. गनीम आरमारावरी गेला मणजे तिकडील फौजा आल्यां आहेत त्या व तुम्ही आपल्या फौजा घेऊन गोवलकोटाकडे जाणें म्हणतील तेव्हां कैसें करावे? याजकरितां कोकणातील वर्तमान आलियावरी तिकडील गनीम पाण्यात आरमारावरी गेल्यास कर्नाला, पेण या प्रांताकडे गनीम गेला आहे, तिकडे फौज देऊन रा। पिलाजी जाधवराऊ यांस रवाना केलें, असें ल्याहावयास कार्यास येईल. दाहाचे दाहांकडून जमाव कोकणात आला आहे. त्याबाबंरी येकादीकडे गेल्यास नावरूप काय? हें वर्तमान तों साद्यंत श्रुत केलेंच आहे. आम्ही पुण्यात आसिल्यास जाबसाल ल्याहावयास कुंठित होईल आणि शब्द लागेल की, तातडीनें जाणें, ऐसी आशा असता जाऊन येके जागा पुण्यांत बसलें म्हणतील. याजकरितां आपण गोन्हेयावरी जातों मणजे जाबसाल द्यावयास उतम आहे. कळलें पाहिजे. विशेष. काये लिहिणे लोभ आसों दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Baji Bhivrao explains to the Peshwa why he shifted his camp from Nanded to Gorha. He also suggests that not much purpose will be served by either the Peshwa's going or sending any more troops to Konkan which has already been reinforced from all sides. Pilaji Jadhao should therefore be sent.*

No. 251] [1734 ?

नकल

श्री

राजश्री बाबूराव विश्वनाथ यासी आज्ञा केली ऐसीजे. रा। खंडोजी माणकर व होनाजी बलकवडे याचे स्वाधीन सा सा किले आहेत. तेथे तुम्ही

+ पत्र बाजी भिवरावाचें.

आपणाकडील दर किलियास दाहा दाहा माणस व येक येक कारकून पाठविला आहे म्हणून हुजूर विदित जाले. तरी राा खंडोजी माणकर व होनाजी बलकवडे याचे स्वाधीन किले आहेत तेथे तुम्ही नवे जुने न करणे ऐसी जातेसमई स्वामीनी आज्ञा केली असतां दाहा दाहा लोक व येक येक कारकून कायबदल पाठविलात? जागे सरदेचे आहेत त्याचे संरक्षण जालें पाहिजे याजकरितां उभयेतांकडे जे जागे आहेत ते त्याजकडेच करार केले आहेत. तेथें तुम्हास लोक पाठवावयास प्रयोजन नाही. ते आपली बंदोबस्ती करून पूर्ववतप्रों किले जतन करितील. तुम्हास हे आज्ञापत्र सादर केले आहे तरी आपणाकडील लोक व कारकून पाठविले असतील ते माघारे आणवणें. बहुत काये लिहिणे.

¶*Baburao Vishvanath is asked to order back his men which he had sent to the six forts handed over to Khandoji Mankar and Balkavade.*

No. 252] [*1735*?

श्री

पुाा राजश्री, पंतप्रधान स्वा-
मीचे सेवेसी

विनंती उपरी. मोह(?) पंथास राजश्री मानाजी आंगरे याचे लोक किती आहेत ते लिहिणे म्हणून लिहिलें. तरी दोनसे माणूस आहे. आवघे मिलोन व किलियास शामलाकडील पनास माणूस आहे. शामलाचे लोकाकडून कर्नाल्कर उपसर्ग लागो देतोसे नाही. याउपरी आहेत त्यांसहि किलेदार लौकरीच घालवील. सविस्तर वर्तमान पूर्वी लिहिले आहे त्यावरून कलेल. आंम्ही आजीचा उद्यांचा दिवस राहून किलियास सामान रवाना करावयाची तरतूद करून यावयाचा विचार लौकर करून. कलावे याकरितां लिहिलें असे. हे विनंती

¶*The Peshwa is informed of the strength of the forces of the Sidi and Manaji Angria.*

No. 253] [*1735*

श्री

पुाा श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनती यैसीजे. राो गंगाधर पंतानी विशालगडच्या घेरियात आमच्या लोकावरी प्रलये केला आहे. कबिले धरून नेतातीं. त्याचे कोणी काये केले?

लोकास खंड गुल बेगारी घेऊं लागले. धोंड नारायेण याच्या बापास बेडी घातली, घर लुटले. खणती घातली. व खंडोजी पवार रजेस गेला होता तो धरून बेडी घातली व आजोंजी कदमच्या बापास धरून बेडी घातली. घर लुटले. याखेरीज किरकोळी कितेक लोकास हेच गत जाहाली. तिघाचे घरची माणसे आली त्याही सांगितलें. याखेरीज आंगारकानें याहून अधिक केले. तिकडील माणोस इकडे येत नाही. इकडील खबरीस तिकडे जात नाही. लोक कस्टी होताती. याचा उपाये कलल तो केला पाहिजे. व पावेकरास बेडी घातली. सेवेसी श्रुत व्हाये हे विज्ञाप्ति.+

¶*Tubaji Anant informs Chimaji Appa of the troubles created by Gangadharpant—especially the several imprisonments and confiscations in the province round about Vishalgad. He reports the general depressed condition of his men. (See No. 265 further on.)*

No. 254] [*1734*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती. स्वामी बुधवारी रात्री राजश्री स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाहलियावर राजश्री फत्तेसिंगबावा व कुसाजी एसाजी भोसले व गोविंदराऊ चिटणीस होते ते वेळेस राजश्री स्वामींनी चर्चा काहाडिली, की शामलाने राजश्री प्रधानपंताच्या मामल्यात शोकी फार केली आणि राजश्री प्रधानपंत याचे जिल्हेत हशम नाही. उगेच चहू मुलकातील माणूस मेळविले आहे. त्यास हशमाचा जमाव म्हणजे कबिले सुधा आपल्या वळणात असावा म्हणजे कैद व बंदोबस्त चालतो व तरवार मारावयासींहि माणसाच्या मनांत खावंदाची दहशत येती, कीं कबिले सुधां आम्ही खावंदाचे पदरी आहो. कामाकाजास चुकविले तरी खावंद काय करील कांही कळेना ऐसे असावें. राजश्री प्रतिनिधिच्या व सचिवाचे जिल्हेत हशम आहे. याचे जिल्हेत हशम नाहीं व जुन्नर प्रांतीच्या मावळात हशम पहिले लोहोट व सिंदे वगैरे आणिक होते तेहि राजश्री प्रधानपंती जमा केले नाहीं. वरकड त्याचा बंदोबस्त सर्वा गोष्टी म्हणावा तसा आहे, परंतु हशमाचा बंदोबस्त करावा. ऐसे बोलिल्यावर राजश्री फत्तेसिंग बावा बोलिले कीं आम्ही राजपुरीस त्यांचा कारभार पाहिला. हशमाचाही बंदोबस्त बराच

+ पत्र तुबाजी अनंताचें.

करितात व काम करील त्यास बक्सीस देतात. कामास मागे घेतो त्यास शासनहि यथायोग्य करितात. त्याजकडील बंदोबस्ताविसी माहाराजानी चिंता ध्यानात आणावी ऐसें नाहीं. फौजेची व हशमाची व किल्याचा व आपला स्वकीय संसार व मातबर माणूस चाकर लोक पदरी आहेत त्याचा यथायोग्य गौरवसमई गौरव व अन्याय समई शासन जे करणे ते करून बरेच आहेत व स्वामीच्या राज्यात भलतेविसी निकडीस सर्वाविसी कार्यास तेच येतील ऐसे बोलिले. त्यावर राजश्री बोलिले की तुम्ही बोलिलेस त्या गोष्टी खऱ्याच आहेत, परंतु हशमाचा बंदोबस्त त्याणी करावा. कबिलेसुधा लोक पदरी पडेत ते करावे ऐसे बोलिले. स्वामीस विदित व्हावे यास्तव लिहिले असे. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶*Purandare reports discussions in the Court at Satara wherein Shahu suggested that the Peshwa should recruit only such men who have their families settled in the territory belonging to him (the Peshwa). They would be more amenable to discipline and would not be inclined to shirk work. Thereupon Fatesing Bhonsle replied that the Peshwa was doing all that was proper, rewarding those who work and punishing those who shirk.*

No. 255] *[1734?*

तालीक

श्री

पुरवणी

सेवेसी विज्ञापना. आम्ही फौज भारी पाठवावी म्हणून वरचेवरी सेवेसी लिहितो. परंतु हा विचार तेथे कोण्हाचे ध्यानात येत असेल नसेल. त्याहावयास कारण हेंच जे, आंग्रे याचा जमाव आला आहे यापेक्षा अधिक जमाव काही त्याचा यावयास नाही. सिदीसाद अंजनवेलीत तीन हजार पर्यंत आहे. आम्हाजवळ जे सामान आहे ते माहाराजास विदितच आहे. स्वार गणती आठाशाची आहे. कामाकाजास त्यातून किती निवडतील हेहि माहाराज जाणतात. कोटात असेल त्याचे दशगुणीने बाहेर असल्यानेच गनीम जेर होईल. आम्हाजवळ जे सामान आले इतकियानसी दोन मोर्चे चालवून भांडियाची मारगिरी करून शह राखोन राहिलो आहो. हा प्रताप येक माहाराजाचे पुण्याचा आहे. अन्यथा काही टिकाव होतोसा नाही. गोवलकोटाचे कार्य जाल्यावरी ते फौज येईलच. परंतु गनीम जोरावार आहे. हरामजादगीस अंतर करणार नाही. आब राहिला पाहिजे. हा विचार आम्ही चाकरलोकी काये म्हणून त्याहावा? तथापि आब राहिल्याने स्वामीकार्य आहे यास्तव लिहिणे लागले. सर्व अर्थ माहाराजानी विनंतीपत्र पावेल तेच क्षणी फौजेची रवानगी करावी. चढ्र मजलीने ताबडतोड फौज येऊन पोहचे ऐसे करावे.

फौज आली म्हणजे चाऱ्ही तोंडे बंद होऊन गनीम कोटातच आवलोन राहेल. बाहेर भितर फिरों पावणार नाही. तेव्हां भांडियाचा मार होईल तो कारगार होईल आणि कार्यहि अविलंबेच होईल. जेणकरून आब राहोन कार्यसिधि होये यैसा विचार केला पाहिजे. याउपरी फौज रवाना करावयास विलंब न लागे तरी उतम आहे. सारांश रोजबरोज गनिमावरी सलाबत वाढवावी लागते. गनीम भारी आहे. आब तुटल्याने फिरोन येणार नाही. आहे तो अर्थ सेवेसी ल्याहावा म्हणून लिहिले असे. सेवसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer (Jiwaji Khanderao ?) requests Shahu to send more reinforcements as Sidi Sat with his three thousand men has, he says, occupied a strong position in the fort of Anjanwel.*

No. 256] *[9-3-1734*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक आनंद(राव) रघुनाथ कृतानेक सा। ना। वि। उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन आज्ञा केली पा। वि। बाणकोट काली छ १३ सवाली प्रात:काली हला करून घेतला. हे फतेचे वर्तमान तपसिले राजश्री बाजीराऊ याणी लि। आहे त्यावरून विदित होईल. येथे रा। बाजीराऊ आम्ही येकविचारे आहो. वरकड सर्व अहस्त साहित्याच बर आहेत. त्यास आजीवरी जैसी तैसी लोकाची समाधाने राखोन बाणकोट फते होये तोपरयेंत धीर धरिला. आधीच लोकास पोटास द्यावयास मिलत नाही. त्याहीमध्ये महर्ग जाले आहे. तीन पाइली धान्य आहे. कर्जवाम जेथवर घ्यावयाचे होते ते घेतली. याउपरी कोण्ही देतो यैसे नाही. आणि येथे या रानात उपाये नाही. लोक उठोन जातील. मग आम्ही येकटे राहिल्याने नालिसीस काही उणे आहे यैसा अर्थ नाही. यैसे संकट आहे. याकरितां सेवेसी विनंति लि। आहे. ये गोस्टीचा विचार कर्त(व्य) तो करून आम्हास आज्ञा केली पाहिजे. त्याप्रो। वर्तणूक केली जाईल. स्वामी वडील आणि खावंद यास्तव विनंति लि। आहे. पोटाविसी आम्ही दुसऱ्यास ल्याहावे हाहि पदार्थ उरला नाही. सुपियास ल्याहावे तरी रा। सरलस्करहि घरी बैसले आहेत. तेथून बेगमी होऊन येईल हाहि अर्थ विदितच आहे. बहुत काये लि। कृपावृधी केली पाहिजे हे विनंति

¶*Anandrao Raghunath reports to the Peshwa the capture of Bankot by Baji Bhivrao and requests him to send provisions.*

No. 257] [1734 ?

श्री

सेवेसी विज्ञापना ताा छ २३ जमादिलाखरपर्यंत यथास्तित असे विशेष. सिदी याकुद यास स्वामीनी येथे रवाना केला तो तेथें आला. . आमचे भेटीस आला, भेट घेतली. त्याणे आपले कितेक वृत सांगितले. आम्ही त्यास समाधानपूर्वक जे सांगणे ते सांगितले. कितेक पुढील दिलाशाच्या गोष्टी सांगितल्या. स्वामीनी हजार रुा खर्चास देविले त्यापैकीं पाचसे रुा रोख दिल्हे. पाचरुा सकाली देतो म्हणून सांगितले. राहावयास डेरा मागितला तो दिला. पिपलनार बागलाणात आहे तेथे त्याचे अरब आहेत ते आणावयासी दस्तक त्याणी वाटेचे मागितले तें दिल्हे. याप्रा बहुताप्रकारे त्याचे समाधान केले. ऐसे असता काल संध्याकाली त्याणे आपली तयारी कोणास न कलतां सिधता करून रात्रीस निघोन गेला. कोणीकडे गेला हे कळत नाही. आम्हीं त्यास पत्र लेहून कारकून मुजरद त्याजकडे पाठविलें आहे, परंतु तो येईल न येई हा विचार कलतच आहे. स्वामीस कळावे याज करितां लिा असे. या प्रसंगी या प्रा त्याणे वर्तणूक केलीया पारपत्यच करावें. रा नारायेणराव दावडीस पा तेहि रिकामे होते, परंतु स्वामीस भेटून आला या करतां तो उद्योग न केला. कलावे म्हणून लिा असे. सेवेसी श्रुत होये हे विनंति.

¶*A writer reports to the Peshwa that Sidi Yakud, as previously agreed upon, came to hold deliberations, but ran away suddenly with his men at night without previous intimation after discussions were over.*

No. 258] [1734 ?

पैा छ ११ राखर

श्री

पुरवणी राजश्री पंतप्रधान
गोसावी यांसी

विनंती उपरी. आम्ही येकनिष्ट सेवा केली. दुसरें स्नेहेवाद दिवसेंदिवस संपादिला तरी कांहीं सुखोत्पत्तीनें बोलणें आहे यैसें कांहीं नाहीं. दुसरे दरबारीं रोज नालशीचीं पत्रें लिहितात म्हणोन यैकितों. जिवापलीकडे स्वामिसेवा करावयासी तयार असतां, यांणीं यैसें करावें कीं काय? बरें वडिलांनीं लिहिलें जे, परस्परें धण्यास कळलें. तदनरूपच आम्ही आपल्या मनांत समजोन सेवा करीत आहों; परंतु सोबत कांहीं दुसरेयासी येश द्यावें यैशी नाहीं. बरें ये गोष्टीचा संवशये येकीकडे ठेऊन कस्त करितों, ती ईश्वर जाणें. सारांश गोष्ट

कीं, सर्व संकट वडिलां(स) आहे. श्रमाचें सार्थक करणें तें वडिलींच करावें. इकडील अधिकोत्तर वर्तमान त्यांहावेया योग्य नाहीं, येथास्थित आहे. राजश्री माहादाजीपंत मजमदार सातारां गेले. राजश्री अंबाजीपंत तात्यांनीं बोलाऊं पाठविलें होतें. आपणांस कळावें यास्तव लिहिलें. कळलें पाहिजे. रवाना छ ९ रबिलाखर. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों देणें हे विनंती.

¶*The writer complains to the Peshwa about the indifference shown to him at the King's court, in spite of his loyal services.*

No. 259] [*1734 ?*

छ ९ मोहरम

श्री

पुा तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. गोवलकोटचे वर्तमान तरी राजश्री संभाजी आगरे यांजकडील बालाजीपंत येथे आले आहेत ते राजश्री फतेसिंगबावाचे मारफातीस आहेत त्याचा मतलब हाच की काही पोटाची बेगमी करावी. हा प्रसंग राजश्री स्वामीपासीहि भास्कर वैद्याचे विद्य(माने) केला होता, परंतु राजश्रीनी उतर दिले कीं गोवलकोट घेतल्यावर वीस हजार रुपये आपण बोलिलो आहो त्याप्रमाणे देऊ. मधे काही म्हणतील तरी आपणास अनकूल पडत नाही यैसे साफ सांगितले. गोवलकोटास जयेसिंग सिर्के गेले आहेत त्याजबराबर दोनसे माणूस गेले आहे. आणिकहि तीन च्यारसे माणूस जाईल. राजश्री यसवंतराऊ याजकडील येसाजी अनत लोक सहित रवाना जाले आहेत. दोश्या माणसानसी गेले आहेत. अद्याप गोवलकोटास पोहोचले नाहीत. पुढे आणिक काये लोक यशवंतरायाकडील जातील ते पाहावे. किला तो अद्याप यावयाच्या विचारात नाहीं. संताजी जाधव वगैरे याचे कागद साहित्याविसी येतात त्याचा विचार काही मुख्य येजमानाच्या चितात येत नाही, परंतु राजश्री रामाजी दामोदर व भास्कर वैद्य याचे रदबदलीमुळे काही उतेजन होते. वाई, कऱ्हाड व पेठ सातारा येथील वाणियासी ताकीद केली की रसद पोहोचावणे म्हणोन सांगितले आहे. पुढें जे होईल ते पाहावें. राजश्री आनंदराऊ बहिरव याणी राजश्री स्वामीस विनंती केली कीं आपणास पाच सात महिने जाहले, याउपर काय आज्ञा ते करावी. प्रजन्य काळी येथेच राहावे ऐसी आज्ञा होईल तरी छपरे घालून नेहमी राहू, अगर रायगड पाचाडास जावे यैसे असिले तरी बेगमी करून रवानगी करावी. यैसी विनती

5417

केल्या उपर राजश्री स्वामीनी राजश्री येशवत राऊ यासी आज्ञा केली कीं दही-येकेच्या यैवजी याची बेगमी करून रवानगी करणे. त्यावर येशवंतराऊ यांणी विनंती केली की दहेकेचा यैवज कोणाकडे कैसा आहे व प्रस्तुत प्राप्त यैवज कैसा होतो ? त्यावर राजश्री बोलिले की येवज आहे तोही तुम्हास ठावकाच आहे. ते येवजी बेगमी करणे. त्या खेरीज आणिक यैवज कोठे दिसत नाहीं, इतका मात्र जाबसाल जाहला. स्वामीस कळावे म्हणून लिहिले असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Purandare intimates to the Peshwa and Chimaji Appa the news received from Gowalkot and states that arrangements have been made to send men and provision for those who were serving there.*

No. 260] [*About 11-11-1734 ?*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ

व तथा राजश्री आपा स्वामींचे शेवेसी

विनंती उपरी. राजश्री येमाजीपंतास एका दों दिवसाचे बोले राजश्री पंत प्रतिनिधि यांहीं सातारियास बोलाविले. ते छ २५ जमादिलाखरी येथें आले. छ मजकुरीं तिसरे प्रहरीं राजश्री पंतप्रतिनिधि राजश्री यमाजीपंतास घेऊन दरबारास गेले. राजदर्शन जाले. राजश्री स्वामी बोलिले कीं तुम्हास रायांनीं एका दों दिवसाचे बोलें आणिले आहे तरी काय कार्य असेल तें बोलून चालून सत्वर जाणे. नाही तरी असें न होय कीं पांच सातसें राऊत जमा केले आहेत ते तिकडे वाट पाहत राहतील, आणि तुम्ही येथेंच बसले राहाल. एसे न करणे. रघोजी भोसले याजकडील तीनसें व सरलस्कराकडील व सेनापतीकडील व पन्नाराकडील ऐसे सातसे राऊत परळीखाली जमा जाले आहेत. त्यास राजश्री नारबावा बोलिले कीं राऊत पुढें कोंकणात जाऊं द्यावे. येमाजीपंत मागून गेले तरी कार्यास येईल. राजश्री बोलिले कीं मागून दोकाजानसी जातील हे गोष्टी काय कार्याची ? राऊत घेऊन शेजबरबरचावे ऐसे बोलिले. स्वामीस वर्तमान कळावे याकरितां लिहिले असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Purandare's letter from Satara to Bajirao and his brother at Poona, informing them of Shahu's orders to the Pratinidhi's Mutalik Yamajipant to join the Konkan expedition.*

No. 261] [Recd. 2-11-1734

पौ छ १६ जमादिलाखर.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री
अपा स्वामीचे सेवेसी

विनंती. गोवलकोटास शामल आला यामुळें तेथील मोर्चे उठोन गेले. यास्तव फौजेचे साहित्य पाहिजे येक. दुसरी गोष्ट शामल येकदा माघारा ठेचगा देऊन घातला म्हणजे फिरोन वलवल करणार नाहीं. याकरितां येकवेळ मातबर फौज जमा होऊन सज्या घावा यैसे राजश्री स्वामीचे मानस आहे. राजश्री प्रतिनिधिकडील लोक जमा करवायासी आज्ञा केली आहे व पवार व सरलष्कर यासीहि फौजेविसी ताकीद केली आहे. साराउष राजश्रीची मर्जी की इतक्याहि फौजा आल्या तऱ्ही शामलास सज्या बसे न बसे हे न कले. याकरितां राजश्री पंतप्रधान याजकडील येक सरदार व पाचशे राऊत या समयात येतील तर उतम आहे. येविसी स्वामीस पत्र ल्याहावेसेहि होते, परंतु आपण पाठवावयासी अनमान करितील यास्तव लिहिले नाहीं. व आम्हासहि केवल पत्र लेहून राऊत आणवाच यैसे सांगितले नाहीं. परंतु राऊत व मातबर माणूस आठ पंधरा दिवस शामलाचा शह जाये तोवर ये तर उतम आहे, यैसी मर्जी आहे. त्यावरून हें पत्र स्वामीस लिहिलें असे. तरी स्वामीच्या विचारे जाहाले तरी पाचशे राऊत आठ पंधरा दिवस पाठवावे. येकदा राऊत गेले म्हणजे अडकतील यैसा शवशाय स्वामी चित्तांत आणितील तरी न आणावा. विचारास आले तरी राऊत पाठवावे. जाले वर्तमान सेवेसी लिहिले असे. शामल काही गोवलकोटास आला नाहीं. उगेच अवाईनेंच मोर्चे काहाडिले. विदित जाहाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Mahadoba Purandare communicates Shahu's desire to inflict a severe blow at the Sidi's power that he may not raise his head again. He (the King) is therefore mobilising forces and expects the Peshwa to send a strong contingent.*

No. 262] [About January 1st, 1735

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती यैसीजे. राजश्री रामचंद्र हरि हुजूर गेले व कर्णाजी सिंदेहि गेले. स्वार व लोक आले नाहींत. पनास स्वार व दोनसें लोक व दारूगोली पाठवावयास आज्ञा

केली पाहिजे. येक दोन दिवसीं दोन पल्ले दारूचे खर्चतातीं. सताजी मनबर आलियावरी दुसरे दिवसीं चंद्रोदयापूर्वी तीनसें माणोस घेऊन गेलों. खाडीकिनारे आसरा करून आराब बैसविला. तोफाहि नेऊन ठेविल्या. गलबतें अंजनवेलीकडून आलीं. जूज जाहलें. त्याचे वर्तमान पूर्वी पत्रीं सेवेसीं लिहिलें आहे. गोलंदाज पडला म्हणोन लिहिलें होतें. वरकड काय जाहालें हें कललें नाहीं. तों दुसरे दिवशीं कालुस्ताहून लिहिलें आलें कीं गलबताचा नास बहुत जाहला. च्यार माणोस ठार जाहालें तें कासी बंदरीं दुसरे रोजीं दिवसाच पुरलें. जखमी उचलून नेले म्हणोन चवबुरजीवरून लोकीं पाहिलें. जयेसिंग सिरके यानी सांगून पाठविलें, कृस्णाजीपंतानी लिहिलें, त्याचें बजिनस पत्र सेवेसीं पाठविलें आहे, गनिमास बरा नतिजा दिला. त्यावरी दुसरे रोजीं येच रवेसीनें बंदोबस्त करून बैसलों तों गलबत कोणी आलें नाहीं, मग गोटास आलों. सेवेसी श्रुत होय बहुत काय लिहिणे हे विज्ञप्ति. रा. धोंड प्रभु स्वामीचे आज्ञेप्रमाणें अलग नौबत हजिरी गैरहजिरी रात्रंदिवस सेवा करित आहेत. चाकरी फार पडते. यासी घोडा येक पाठविला पाहिजे हे बिज्ञप्ति.

¶*Tubaji Anant writes details to Chimaji Appa about the siege of Gowalkot in which he was taking part.*

No. 263] *[2-1-1735*

पो छ २४ साबान

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनति. सेवक तुबाजी अनंत सा। नमस्कार विनाति उपर. येथील कुशेल वृत्त ता। छ १८ माहे शाबानपावेतो येथास्थित असे विशेष. मानाजी बनसोड खासबारदार वगैर याजबराबर थैवज रुपये २००० दोंन हजार पाठविला तो पावला. पेसजीचा थैवज व हालीचा थैवज मिलोन साबान महिनेयाची लोकाची रोजमरेयाची वाटणी करून हिसेब सेवेसी पाठवितो. रा। रामाजी दामोधर यांसी पत्र लिहिले होतं ते त्याजकडेस पाठऊन त्याचे प्रतिउतर आणऊन रवाना केल असे. रा। सिवाजी भोसले फलटणकर याचे राऊत पनास ये जागा नेमणूक रवाना केल होते. पैकी तेतीस राऊत जिवाजीपंत याजबराबर छ १६ शाबानीं आले. त्यांस हजिरी घेऊन नेमणूक प्रा। रोजमुरा पैवस्तीपासून देत असो. बाकी राहिले राऊत तेंहि येका दोहो रोजी येतील म्हणून सागत असेत. रा। रामचंद्र हरि व रा। कर्णाजी सिदे वरघाटी गेले ते सेवेसी पावलच असतील. त्याही सविस्तर वृत

सेवेसी निवेदन केले असेल. त्याचे बराबर येथील (आ)ज्ञेप्रमाणें दोनसे माणूस दिल्हे होत. त्यापैकी सवासे माणूस येथे हाजीर जाले. बाकी लोक येथे आले नाही. त्यास अनाजी साटम याचे दिमतीचे लोक व पाटेकराकडील लोक येथे होते ते अनाजी साटम व धोंडो नारायेण हे समागम घेऊन गेल. यासिवाई कितेक पतंकाचे लोक तफरका होऊन गेलं. यैसे पाऊणसे माणूस बगररजा गेले. माहादजी सुरवा वगैर असामी ३ तीन रजब माहाचा रोजमुरा घेऊन बगररजा उठोन कोठे गेला हे काही कलत नाही. हाली मा। मजकुरी सातसे माणसाची नेमणूक असे. पैकी पनास पाऊणसे माणूस गेले रजेस असे. बाकी सासे माणूस आहे. पैकी अजारी राजेखान याचें दिमतीचें कानड असामी ११३ येकसे तेरा पैकी दाहा माणूस उभे नाही. येकीकडून आजारास पडले तैसेचं मनबर येकुणीस माणूस पैकी पाच माणूस उभे आहे. बाकी चवदा जणं दुखणेयासी पडले आहेत. यैसेच कितेक पथकापथकाचे लोक आजारास पडले आहेत. त्यांस बदोबस्तीत जे जात आहेत ते सेवेसी विदित आहेत. आजारीखेरीज माणूस उभे काये आहे म्हणून हजिरी घेतली. त्यास तीनसे माणूस उभे आहे. या लोकानी येथील जागेयाचा बदोबस्त कैसा होतो? स्वामी बोलतील की हेच वारवार लिहितात, त्यास आम्ही चाकर लोक जे करी पडलं त्यास स्वामीचे पुने करून चुकणार नाही. परंतु नक्षनामोस स्वामीचा आहे. शत्रु म्हणावे तर येक होता ते दोन जाले असेत. कानड लोक येथे आहेत हे येथील चाकरीचे कामाचे नाहींत. चाकरीचुकरी सांगितल्यास उगीच उठोन जातील यैसे नाही. त्यास तमाम माणूस दुखणेयासी पडले आहे. त्याचे बदलं दुसरे लोक पाठऊन यांसी नेणार स्वामी आहेत. बहुत काये लिहिणे सेवसी स्रुत हाये हे विनंति.

¶*Tubaji Anant to Chimaji Appa : gives particulars of the services rendered in the siege of Gowalkot by the various Sardars doing duty in that affair, and informing that many men were lying sick.*

No. 264] [*3-1-1735*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
साहेबाचे शेवेसी -

आज्ञाधारक कोंडाजीराव सिंदे व धोंडजी भुजबलराऊ शेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १९ शाबानपावेत मुकाम चेऊल राजकोट येथे साहेबाचे कृपावलोकनेकडून सेवकांचे वर्तमान यथास्थित आसे विशेष. छ १८ रोजी झुंज

आले. त्यास गणोजी, येसवतराऊ व रुद्रापा याजकडील सुलताना व रायापा यासी जखमा गोलियाच्या लागल्या आहेत. तिघे जखमी जाले आहेत. भारी आहेत. व घोड्याचे जखमी आसामी ४ चार जाले. वरकड लोक खबरदार आहेत. साहेबाचे पुण्य करून काही फिकीर नाही. येथे आमच्या जमावाची भरगंत नाही. त्यास बाणकोटी आमच्या पथकाचे लोक आहेत त्यास पाठवावयाची आज्ञा करावी म्हणजे आमची भरती होईल. आमच्या पोटाची बेगमी अद्याप नाही. त्यास पोठाची बेगमी करून पाठवावी. लोकानी कामकाज केले आहे ते राजश्री शंकराजीपंत याणी पाहिले आहे. तरी स्वामीनी उर्जित करणार स्वामी धणी आहेत. शेवेसी श्रुत जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Kondajirao Sindia reports to the Peshwa the casualties he suffered in the action at Rajkot Cheul, and requests him for more reinforcements and rations.*

No. 265] [*4-1-1735?*

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विनंती. प्रार्थना यैसीजे. आमच्या लोकाचे कबिले राजापूर पाऊस फुणगूस माहालात जागा जागा आहेत. त्यासी अंगारकानी धराधरी बहुत मांडली आहे व विशालगडच्या घेरियात लोकाचे कबिले आहेत त्यासी रा गंगाधरपंती धराधर मांडली आहे. यामुले येथील लोक बहुत स्रमी आहेत. याकरितां गंगाधरपंतास स्वामीनी येक पत्र ल्हावे की जे गोस्टीने उपद्रव लोकाच्या कबिलियास न पावे ती गोस्टी करावी. अंगारकाकड तो प्रस्तुत इलाज नाही. कितेकांची घरीहून माणसे आली, कितेक रजा मागताती कीं आमची घरें बुडाली म्हणोन कस्टी आहेत. त्यांचे बहुताभातेन समाधान करीत आहो. रामाजी दामोदर रत्नागिरीस आहेत. विसाजीपंत आंगारकाकडून तेथे आले आहेत. कागद विजयेदुर्गास गेले आहेत. तेथे यासी बोलाविले तर जातील. कालुस्त्याच्या मोर्च्याची इमारत आंगारकाचे साहितेवरी आहे. साहित्य जाहाले तर याची स्थिरता होईल. नाही तर उठोन पागेवरी आवघे जाताती. हणगोजी बरगे पागेवरी होते ते काली छ २० साबानी कूच करून झाड्यानिसी गेले. रामाजीपंत येत तोवरी कोणकोण जातील पहावे. बहुत काये लिा सेवेसी श्रुत होये हे विनंति. राजश्री रामाजी दामोदर आले म्हणजे स्वामीचे पत्र पावऊन उतर सेवेसी पाठवितो. बहुत काय लिा हे विा.

¶*Chimaji Appa is requested to order Gangadharpant to desist from molesting the property and the families of the writer Tubaji Anant at Rajapur and other places.*

No. 266] [About 5-1-1735

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनति. सेवेसी ऐसीजे. कालुस्तियाचा मोर्चा खाडीकांठी नाहीं, तेव्हां आपण बैसवावा यैसें नाहीं. याकरितां बैसविला नाहीं. छ २० साबानी चंद्रदई मेढियांतून वर्तमान आलें कीं अंजनवेलीकडून तीन गलबतें येताती व काशीबंदरांतून तीन गलबतें तरतीं जाहालीं म्हणोन सांगोन पाठविलें. मग लोक घेऊन धाऊन गेलों. पहिले बंदोबस्ताप्रमाणें लोक बैसविले. गलबत येकामागें येक तीन खाळून येत होतीं. तोफा वरच्या तबकांत होतीं, तीं गलबतांवरी लागूं केल्या. इतकियांत दोन मुरडून कालुस्त्याच्या फांसूंतून तिकड निघाली. येक पानबुरजावरून नीट चालिलें. मारगिरी जेजाला व बंदुखाची केली. गलबतास गोले तीन लागूं होऊन फुटलें. आंत पाणी भरलें. पुढें चालावयाचें राहिलें. ग्रामतांत लोक बैसले. त्याचा मार बंद जाहाला. इतकियांत गोवलाकडून तीन गलबतें कुमकेस येऊन पागे लाऊन तें गलबत नेत होते, त्यावरी बहुत मार दिला. ते निघोन गोवलास मेले. किती पडले, जखमी काये जाहले, कळलें नाहीं. तहकीक जाहालियावरी लेहून पाठऊं. बहुत काय लिहिणें हे विज्ञप्ति.

¶*Tubaji Anant reports to Chimaji Appa how he stopped the enemy's ships from Anjanwel carrying succour to Gowalkot.*

No. 267] [6-1-1735

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक तुबाजी आनंत सां। नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। छ २२ साबान मो। वेढा गोवलकोट स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित आसे विषश. कृपा करून सावजी जाधव जासूद याबराबरी छ १७ साबानचे आज्ञापत्र सादर जाहाले ते छ २१ मिा। पावले. तेथे आज्ञा की, मोर्चाचे भरती दोनसे बरकंदाज मनवर पाठविले आहेत. याखेरीज कर्णाजी सिंदे याकडील दोनसे लोक व रा। रामचंद्र हरि याकडून च्यालीस पनास स्वार पाठवावयाची आज्ञा केली आहे तेहि पोह(च)तील. भरती पाहून पाणबुरजाचा मोर्चा आपले बल पाहून करणे व कालुस्तेचा मोर्चा पलेकडून खाडी किनारे आला आसल तर तुम्हीहि मजबदीने बैसवणे व दारुगोली पाठवितो म्हंणौन कितीक

आज्ञा केली. त्यासी मनवर संताजी नाईक वगैरे येथ आले. कणाजी सिद याकडील लोक व स्वार आले नाहीत. सिवाजी भोसलियाचे सात स्वार आजी आले. यो च्यालीस आले. कालुस्तेयांचा मोर्चा खाडी बुजीत होते. आठ रोज काम चालिले होते. गोवलकरानी आडवी गलबत नांगरून मारगिरी करून मोर्चा व खाडचे काम बंद केले. चवबुरजीवर मात्र मोर्चा आहे. बहुत सुस्त जाहाले आहत. मारहि मारीत नाहीत. सेवसी स्रुत होय. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Tubaji Anant gives Chimaji Appa details of a battery raised at Kalusta in the siege of Gowalkot.*

No. 268] *[8-1-1735*

पुौ छ २४ साबान

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती यैसीजे. तानाजी खानविलकर याचा घोडा आंब्याचे घाटाने येत होता तो विशालगडकरी याही नेला. हरजी पाटेकरास बेडी घातली. रत्नागेरीचे अठरा लोकांची डोचकी संभाजी आगरे याण्ही मारली. यैसे वर्तमान एक ग्रहस्त ते प्रांतीहून आगमन जाला त्याण्हे सांगितले ते सेवत लिा असे. परतु सत्य मिथ्ये काही कलत नाहीं. त्यास मागाहून तहकीक वर्तमान असेल ते लेहून पाठऊ. काली रात्री राजेखानाचे लोकी आगी लाविली. प्रतिनिधीचे आलगत जागा दिली. आगटे कुडाजवळ केले होते. आगदी आलग व तिजाई पेठ जलाला. स्वामीचे पुण्य करून सदर व दोहीकडील रस्ते व बाजार वाचला. ई लोक आजारीहि पडले व धड थोडेबहुत आहेत तेहि बहाना करून निजले. ई लोक आलंग नोबत चाकरीचे नाहींत. गडी हुडियावर ठेवावे आगर जिलबत चालगावे. यास हजूर नेऊन मुबदला लोक पाठविले पाहिजेत. बहुत काय लिहिणे कृपा वर्धमान कीजे हे विज्ञाप्ती.

¶*A news-letter from Tubaji Anant communicates to Chimaji Appa the offensive attitude taken by Sambhaji Angria and Vishalgadkar and also of Rajekhan who tried to set fire to the whole camp.*

No. 269] [13-1-1735

छ ९ रमजान

श्रीमंगलमूर्ति

पुर्वणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेर्सी

विज्ञापना यैसीजे. इंग्रज विजुरेस लिहितील तेथून उतर येईल त्याप्रो स्वामीस लिहिणें ते लिहितो. यैशास भानजी रंगरेज येथें आला होता तो बोलत होता कडदीन येईल लवकरच. तो आल्यावर सर्व बरेच होईल. यास बोलवायास मुज़रत गलबत गेले आहे. कदाचित तो आला तर मसीद सुटतां भारी आहे. वरकड इंग्रेजाशी फिरंगी अंतरी नीट नाहीत. यास्तव हात दाखवावा प्रघट तर विलातेहून शब्द लागों सकतो याच्या पातशाचा; त्याकरितां याच्याने सूक्तासूक्त स्पष्ट बोलवत नाहीं. मनांत खुशाल होतील यैसा अर्थ दिसतो. कदाचित फिरंग्यानीं साहित्य मागितल्यावर देणेंच जाहालें जरूर तरी फिकीर नाहीं. यांस इतुके लिहिलें उतर असावें. तुम्हास लिहावे म्हणून लिहिलें, त्यास विजूरेस लिहिलेंत त्याचे उत्तर ये तोंवर लष्कर खर्च खात बसवावें त्याचे उतर पाहिजे तैसे येईल. यैसा करार आस्ता तर वसैस जनराल आहेत याजपासूनच निवडतें ते न घडे यास्तव विजुरेस लिहिले, हा उघडा अर्थ दिसोन आला. यावरी कले ते रीतीने पारपत्य करितों. तुम्हास जाण असावे म्हणून लिहिले असे. यैसे यांजकडील निमित्य टाळून मनसुबा योजावयाचा प्रसंग हा आहे, यावर स्वामी धणी सर्वजण आहेत. सेवकधर्म आहे यथाज्ञाने [1]सुचला मजकूर सेवेंसी निवेदन केला. सेवेसी श्रुत होय. अजम सिदी सात मुंबैस आल्यावर आम्हास सांगोन पाठविले. अंतस्थी राा बालाजी विठल याबाा त्यास उतर केले. येथील मुख्यास कलो न देता दर्शनास आल्यावर न कले यास काय भासेल. कदाचित आम्हीच जावे पुसायास, तरी कार्याचे नाही, हें तुम्ही जाणतच अहां. याकरिता तुम्हीच त्यांस सांगोन पाठविल्यावर ते निरोप देतीलच. यावर काय तुम्हास बरें दिसेल तैसें उतर कलल्यासारिखी वर्तणूक केली जाईल. यावर आज बोलाऊ पाठविती, उद्यां पाठवितो करून छ १ पहिला रमजान बुधवारीं रात्रौं, गलबतांत चढले जंजिऱ्यास जाऊन खानजाद्याची भेट घेऊन सुरतेस जाणार हे बोलिले. खानजाद्याची बलकटी आधी केलीच आहे. येवेलेंस पुर्तीकरून देतो म्हणून करार केला आहे. याकरितां इंग्रजानीं नकद पंचवीस हजार रुपये व दारूगोळे

---

१. रंगारी.

भांडियाखेरीज दिली व सुरतेस मेस्त्र लोदर याच्या साहित्यास पुढे रवाना जाहाला आहे. तेथील रुपये वसूल होतील यैसे लक्षण दिसोन येतें. इंग्रजाचे रुपये पावल्यावर गोडी राहेल ती सहजच कलेल. सेवेसी श्रुत होय. जुने जनराल मगलवारी छ ७ रमजानी (२१-१-१७३५) स्वार होतील. सेवेसी श्रुत होये. माहाराज राजश्री स्वामी यांजकडील हुजरे आा ५ आले आहेत. पत्री भलीभलाईच लिहिली आहे, व जबानी यसवतराव आणि गंगाजी यां दोघांनीं सांगतां कलो येईल म्हणून लिहिले आहे. शनवारीं आले, सोमवारी आज दर्शन होणार. सेवेसी श्रुत होये. सारा मजकूर येथून मातबार माणूस न्यावयास आले आहेत; काय मथितार्थ होईल तो सहजच दृष्टीस पडेल. सेवेसी श्रुत होये पंधरा दिवसाच्या अवकाशे चरणाजवळ यावयाचा हेतु आदर्शनानंतर आज्ञा होईल, प्रमाण असे, येविसी आज्ञा करावयास स्वामी समर्थ आहेत. येविसी जनरालासहि पत्र लिहिले येईल तर उतम होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter to the Peshwa from his agent at Bombay, with reference to Sidi Sat and the English.*

No. 270] [*14-1-1735*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक तुबाजी आनंत सां नमस्कार विनती. येथील क्षेम ता छ ३० साबान मो धामणी वेढा गोवलकोट स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित आसे. कृपा करून आज्ञापत्र पाठविले तेथे आज्ञा की जेजालबारदार ९ व लोहार दोन व सुतार दोन या नऊ आसामी पाठविली ते पावली. आज्ञेप्रमाणे रोजमरा देऊं. विशेष छ २७ साबानी व दुसरे दिवसी कालुस्त्याहून भास्कर वैद्याची दोन पत्र आली की आपण हजूर जातो की मागणे पुसणे आहे. आगत्य पागेसी छ २९ रोजी येणे म्हणौन लिहिले व सांगून पाठविले. भेटीस गेलो त्याही कालुस्त्याची चबबुरजीचा मोर्चा उठविला. आगी दिली. व आंगरियाचा गडगा होता त्यातीलहि मोर्चा उठविला. आपण व राघोराम व नागोजीपंत व जेजालबारदार हजूरची पतके देखील उठोन सोमवारी पागेवरी आले. तेथे भेटी जाहाली. कितेक दुखाच्या गोस्टी सांगितल्या की

आपले हाती राजकार्ण आले होते. म्हणौन आंगेजणी करून आलो होते. तेथील पहिले लोक होते त्यानी फितवा केला कीं भेद येऊन (?) फते करून. तेव्हा दोन तीन वरसे बैसलो हे बदलामी आपणावरी येईल म्हणौन कितेक गोस्टी चितात आणून गोवलात सांगून पाठविले. जे लोक भेदले होत ते आजनवेलीस नेले. तेथील येथे आणिले. यामुले बदनक्ष जाहाला, कोणी मोर्च्यात मन घालीत नाही. हुकूम बारदार चालत नाही. हुजूर वर्तमान कललियावरी आपणास बोलाऊ पाठविले, पत्र आले, आपण जातो म्हणौन बोलिले. सेवसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant informs Chimaji that Bhaskar Vaidya proposes to retire to Satara having miserably failed to make any effect against Gowalkot.*

No. 271] [*About 14-1-1735*

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे
सेवेसी

विनति येसीजे. रामाजी दामोदर व वैद्यास पत्र लिहिल की राजश्रीची पत्रें पावली. आपणास कोणाचा इतबार येत नाही. येकजण येथे येणे. गोवल-कोट व आंजनवेलीचा हिसाब काये आहे? येकजण येणे. तोफा लोक देतो म्हणौन कितेक स्नेहाच्या गोष्टी लिहिल्या. त्याभरवसियावरी हे गेले आहेत. त्यानी तोफा लोक दिले तर स्वार व जयेसिंग येथे राहील. न देत तर रामाजीपंत गोवलकोटास येत नाहीत. परभारे सातारियास येतील व जयेसिंग व स्वार हेहि उठोन येतील. पागेवरी सोमवंसी प्रतापराऊ व गोपालराऊ हुजरातीचे सेंभर माणोस पनास स्वार ठेविले आहेत. आंगारक येत नाही. तेव्हा राजश्रीच्या पायावरी डोई ठेऊन हा जिला व गोवलकोट तुमच्या येजमानाचे गला बांधवितो म्हणौन कितेक गोष्टी बोलोन गेला. आ(णि) बहुत कस्टी जाहाला. डोलियास पाणी आणिले. ईस्वर मृत्य देता तर राजी होतो. लोकात हासे आपले बहुत जाहाले. चवधानी काम नासून आपणास तोंडघसी दिले, म्हणोन कितेक गोस्टी सांगितल्या. आम्ही निरोप घेऊन गोटास आलो. तो जयेसिंग सिरके गोटात जाऊन राहिले. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant informs Chimaji Appa that Ramaji Damodar retired fron the scene of action deploring the unsympathetic attitude of Sambhaji Angria*

No. 272] [16-1-1735 ?

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक तुबाजी अनंत साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागाईत छ १ रमजान मुकाम दलवठणें स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे. भास्कर वैद्य स्वार होऊन गेले. जयेसिंग शिरके व रामाजी-पंताकडील फौजा व आंगऱ्याचे लोक कालुस्तेवरी होते ते उठविले म्हणोन पूर्वपत्रीं सेवेसी सविस्तर लिहिलें आहे, त्यावरून विदित जाहलें असेल. कालीं बुधवारीं जयेसिंग व फौज व आंगऱ्याचे लोकीं कूच केलें. गोटास आगी दिल्या आणि पागेवरी जातां त्यांस आडवीं गलबतें मिरजोलीवरी गनिमाचीं जाऊन मारगिरी केली. रवेचे तारंगण जाहालें. तेथून माघारीं येऊन आमच्या मोर्च्याकडे आले. लोक येथून जाऊन मारगिरी जाहाली ते हटविलीयावरी गलबतें गोवलास गेलीं. मग आम्हीहि कूच केलें. मेढियाचे लोक आणिले. अस्तमान पावेतों तलावरी होतों. तोफ रेहकले देखील घेऊन च्यार घटिका रात्रीं मेढियास आलों. अवघे निघालियावरी आम्हीच तेथें विना येक कजाप (?) करावें, अवघा लगट आम्हावरी होईल, याकरितां स्वार जाहालों. पागेवरी जयेशिंग शिरके व आपाजी पाटील आहेत व सोमवंशी आहेत. हे जोंवरी पागेवरी आहेत तोंवरी आम्ही येथें आहों. हे आपले तलावरी गेले तरी आम्ही जाऊं. हे घांट चढले तरी दुसरे रोजीं आम्हीही घांट चढूं. सरकारचा गल्ला जुना व तांदुळ पंचावन रुपयेचे राहिले. वरकड दारूशिसे इस्तादखेदील घेऊन निघालों. रमजानचा रोजमरियाचा ऐवज पाठविला पाहिजे. बहुत काय लिहिणें सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Tubaji Anant informs Chimaji Appa that the besieging forces of Angria and Fatesing Bhonsle have retired and he himself would follow suit if the remaining forces leave.*

No. 273] [25-1-1735 ?

छ १६ रमजान

श्री

पुर्वणी श्रीमंत राजश्रा पंत

प्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापना येसीजे. हु(ज)रून माहाराज राजश्री स्वाम यांचे पत्र घेऊन हुजरे आले होते त्यांस आज छ ११ रमजानी प्रत्योतर लिहून दिल्हे इंग्रजानी,

रवाना होतील. प्रत्योतर यैसे होणार होते जे, जबानीचा मजकूर कलो आला जे, सभ मनुष्य मातबर येक हुजूर पाठवावा तो आल्यावर सर्व कलो येईल. याकरितां स्पष्टार्थ आवगत जाहाले यासारिखा मनुष्य पाठवायाचा विचार योजिला जाईल. तिकडून जाबसाल करायासारिखा मनुष्य आला असता, तर येच वेलेस पाठविला जाता, याकरिता पाठविला नाही म्हणून जनराल लिहवितो बोलले. मग काय लिहिले आसेल कलेना. सेवेसी श्रुत होये. अंतोन सील व याच्या माणसाने गाई खरिदी केल्या होत्या त्यास आटकाव कल्याणास जाहाला होता, येविसी श्रीमंत राजश्री आपासाहेबास विनंती पत्री केली होती जे, रा वासुदेव जोशी यास पत्र येथून लिहिले आहे व स्वामीकडूनहि पत्री आज्ञा होईल जे, रुपये तरी त्यास पावत यैसे करावे ते लिहिलेच आसेल व स्वामीचेहि सेवेमधील विनंतीपत्र लिहिले होतेच. सेवसी सादर जाहाले आसावे. या प्रहस्तासी हरघडी कामकाज पडतें. मालियत थोडकी याकरितां हटकितात यास काये उतर करावें, यैसा येऊन विचार लटका पडला आहे. सेवेसी श्रीत होये हे विज्ञापना,

¶The Peshwa's agent writes to him the probable contents of a despatch sent to him by the English, and requests that the cows of his friend, Antonio De Silva, detained at Kalyan be released.

No. 274] [*31-1-1735*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंतप्रधान
व तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक रामाजी माहादेव दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणोन तागायत छ १७ रमजान स्वामीचे कृपेंदृष्टिकरून लोकसुद्धां राजकोट चाउलास सुखरूप आहोत. सेवेसी विज्ञप्ति. राजश्री मानाजी अंगरे यासी पटीप्रमाणें कापड व नक्त रुपये येक हजार त्यासी देऊन त्याचा जाब सेवेसी वेऊन अलाहिदा पाठविला आहे, त्याजवरून विदित होईल. छ * * रमजान बुधवारीं संध्याकाळच्या प्रहरां दिवसास श्री रामेश्वरचे पाठीमागें बागेमधें लोक त्याजकडून दोनच्यारशें येऊन कलह मांडिला. त्यासी राजश्री शंकराजीपंत रामेश्वरच्या मोरचियावरी गेले आहेत, त्याजबा आणखी लोक गेले होते त्याचा(ची)याची कटकट लागलीयावरी यासी जेरसा दिसोन आला, म्हणून राजश्री तुबाजीपंत माणूस पाठविलें कीं खासबारदार पाठविले पाहिजेत. त्याजवरून आज्ञा जाहालियावरी आम्ही लोकसुदां गेलों. त्याजवरी श्वामीचें पुणेंकरून त्यासी

5429

पिटून त्याचा(क)मानेच दरवाजियांत नेऊन घतलें. त्यासी त्याजकडील आपले नजरे उरुबुरु च(व)घें जण ठार जाले. कांहीं जखमी जाले. आपणाकडील जखमी ठार शिवजी जाधव दिमत रामजी सुरवे हा ठार जाला. तिमाजी पवार याजकडील त्रिंबकजी वाडकर ठार जाले. यैसें दोन ठार जाले. जखमी पुंजाजी जाधव दिमत शिदोजी गोडा, तुळाजी भोंसला दिमत सेव्याची खिरसागर हे दोघे जण जखमी आहेत. जखमाहि भारी आहेत. पुण(ण्य) स्वामीचें आहे. नारायण-गडकरी याकडील कृष्णाजी हरि याजकडील माहादजी सेटगे याज जखम पायाची आहे. यैसे तिघे जण जखमी आहेत. मनवरकडील चौघे जण आहेत. झुजाची शरत जाहली. सेवेसी तुबाजीपंत लिहिलें ते गोष्टीप्रमाणें आहे. सारांश गनीम पराभवास पोचोन चिंतलें कार्यसिद्धि होती यैसें येक ठिकाण आहे. तलगा डोंगरावरी च्यार तोफा नेऊन आठ दिवस मारगिरी केलियानें जेरदस्त होत. दोनीं ठिकाणें हात बांधोन स्वामीपुणेंकरून येतील. येरवी मशीद तो खामखये येती; परंतु ती ठिकान केलियावरी फार जेरदस्त होत. त्यामध्यें स्वामी धणी समर्थ आहेत. सविस्तर वर्तमान राजश्री तुबाजीपंत स्वामीनी लिहिलें त्याजवरून विदित होईल. सारियासी समाधानपत्र आलियानें माणसास उमेदवारी होती. सेवेसि श्रुत होय हे विज्ञाप्ति. त्याचा प्रबलता होवयासी राजश्री संभाजी अगरे याज कांहीं मंदत (?) आली होती. राजपुरीचे मोकामीहून राजश्री कोंडाजी शिंदे यासी कुलाबियासी गेले होते त्यांची याची मुजरत बोली जाहाली की त्या गोष्टी नाहीं. हे विज्ञप्ति.

¶*Ramaji Mahadeo to the Peshwa, describing an encounter between Manaji Angria and the writer in which the former was repulsed with a great loss.*

No. 275] [*About 3-2-1735*

श्री

पुा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. गणजी खानविलकर यांणी राजश्री मानाजी आगरे यांचा निरोप सांगितला की तुम्ही से दोनसे स्वार व दोन च्यारसे माणूस घेऊन पेणेस बसावे. इकडील अमल अवघा जप्त करावा. आम्ही कुलाबियाचे राजकारणात असो, येसे आम्ही सांगितले की तुम्ही सांगोन पाठविले ते कलले. परंतु जो-पर्यंत तुमचे हाती कुलाबा मुख्य स्थल आले नाही तो हा मनसबा कार्याचा आहे येसे नाही. हे विनंती.

¶*Chimaji Appa is informed of the proposals of Manaji Angria asking the writer to encamp at Pen and to attach the province.*

No. 276] [3-2-1735

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंति. सवक तुबाजी आनंत साष्टांग नमस्कार बिनंति. येथील क्षेम तागायत छ २० रमजान मो धामणी. स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित आसे विशेष. सेवेसी पुरवणी पाठविली त्याचे वर्तमान पूर्वपत्रीं लिहिलें होतें. त्या उपर पुन्हा तो गृहस्तानें पेगाम केला कीं पहिले बोलीच्या लोकांपैकीं सोला माणोस कासी बंदरच्या मोर्च्यांत आहे ते आपले हातीं आहे. हिमत आसल तर कार्यसिधि होईल. अमावास्यचे जोरगतीचा निखर आहे. खाडीस पाणी थोडें राहतें. पाहाटेचे वख्तीं सुकती आहे व धुकट दोन तीन दिवस येत आहे, येशा समयास कार्य साधल. कासीबंदरचे अलंगत आमचा मोर्चा आहे. तुमचे लोक येऊन मेढियास लागले म्हणजे आंतून मेढा ढकलतो. पाणियाचे सरदीने जमीनीत मेढा कुजला आहे. कासी बंदरच्या आंगें सवासें माणोस राबत असत व च्यार तोफा आहेत त्यास हिरबाच्या बागेकडून येक फौज येक मोपांतून यैशा दोन फौजा आगोधर तयार होऊन चराजवल येऊन मारगिरी करितील, तेव्हां तुम्ही तत्पर होऊन साटमाच्या मोर्च्याजवळ तयार होऊन असणें. तेच वख्तीं खाडी उतरणें. बंदरचे लोक तिकडे जातील, तुम्हीं येऊन मेढा तोडणें. जोर बजोर येऊन लागणें. तोफेची एक मूठ सोसणे लागेल. हजार माणोस आसलें पाहिजे. हे आंगेजणी होईल तर बाहिर येऊन तुम्हांस भेटून ते ठिकाणी कडी देतों म्हणोन सांगून पाठविले. त्यावरून पागेस आम्ही गेलों. राजश्री नागोजीपंत व जयेसिंग सिरके यास भेटून हें वर्तमान सांगितलें. तुमचें तीनसें माणोस आमचें पांचसें निवडक माणोस हे काम करतो. वरकड तुमची फौज दोहीं अंगे हला दोन घटिका करणें. जयेसिंग आम्हांस देणे म्हणोन कितेक तजविजा मसलतीनें सांगितल्या. ते बोलिले कीं निवडक माणोस व जयेसिंग तुम्हास दिला म्हणजे आमच्यानें चऱ्हापावेतों जाऊन मारगिरी होणार नाहीं. दोनी तोंड दोघे सबल. तो तुम्ही मेढा मोडलियावरी महताब इशारतीची लावणे. मग आम्ही आंत सिरतों. आम्ही बोलिलों कीं हवे तुमचे हातीं देतों. दोघे आपले सामानानसीं मेढियांत सिरणें. दोनी तोंडें आम्ही आपले सामानानसीं संबाल्ळून मारगिरी करितों. दोनी गोस्टी त्यास कबूल न होत आणि बोलिले कीं दौलतराऊ पाच सात दिवसीं आलियावरी करूं. त्यास हा समय जोर गतीचा व धुकट आहे यैशा समयास साधल तर साधल व जे लोक भेदले

त्यास दगा होईल आगर बदले येऊन जातील म्हणोन नानाप्रकार बलात्रीत होतो परंतु हिंमत न धरीत. सेवटीं म्हणो लागले कीं फते जाहले तर आम्हांस कोण काय देणे आहे ? गनिमानें मारून काडिलें दाहा, लोक ठार जाहाले, तर फजितं फुकाची. कोणी बरें म्हणणार नाहीं. उदंड बल देऊन पाहिले. बल न धरीत मग साइंकालीं गोटास् आलों. स्वामीस लिहावें तर दूर पला. समई सामायेन पोह(च)णार नाहीं. दोन तीन दिवसाचे अवधीचें काम ये समई राहिलेसें जाहलें. यैसियास दोन आडीचसें मुलकीं सामायेन पाहिजे. स्वामीचे पुण्येकरून येखादे-समई काम होऊन येश स्वामीस येईल. दोनसें माणोस पाठविलें पाहिजे व रमजानची वाटणी हिंसेब पूर्वी सेवेसीं पाठविला आहे. पावला असल. सवालचा रोजमरा लौकर रवाना केला पाहिजे. येथील कितेक वृत्त बालाजी (हरि) सेवेसीं निवेदन करील. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञाति.

¶Tubaji Anant reports to Chimaji Appa from Dhamni the substance of a talk that the writer had with a certain man regarding the plans of attack on Kasi bandar and the work to be assigned to several persons in the fight.

No. 277] *[8-2-1735*

पौ छ २ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक तुबाजी आनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायत छ २९ रमजान मो धामणी स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित आसे विशेष. पूर्वी सेवेसीं विनंति पत्र पाठविले आहे त्यावरून सविस्तर वृत विदित जाहालें आसेल. त्याउपरि बालाजी हरि बराबर आज्ञापत्र आलें कीं कालुस्ताचे मोर्च्याविसीं हजुर लिहिलें आहे ते मोर्च्या काईम करतील. तुम्ही आपला मेढा काईम करणें. वरचेवरी जे वर्तमान आसेल ते राजश्री माहादाजीपंतास लिहीत जाणें. ते स्वालजाब करतील. इकडील स्वालजाबास लांब पडतो म्हणोन कितेक आज्ञा केली व राजश्री धोंड प्रभु यास पागेचा घोडा पाठविला तो पावला. कालुस्तेच्या मोर्च्यास राजश्री दौलतराऊ सिरके रवाना केले आहेत म्हणोन यैकितों. परंतु आद्यापि काली आलेकडे कोणी आले नाहीं. पागेस नागोजीपंत व सोमवंसी यांचा जमाव आहे. जयेसिंग सिरके व आपाजी माने व आंगऱ्याचे लोक व तोफ यैसे जाऊन मिरजोलीच्या पाठारीं राहिले आहेत.

मोर्चा दिला नाही. आमचा मेढा पूर्ववतप्रमाणें साबुत आहे. येक बाजू जायां जाहाली आहे व दरवाजे जळाले, त्याचें सामान आणून व दरवाजेही तयार केले आहेत. जे दिवसीं कालुस्तेस कोणी येईल ते दिवसीं मेढा काईम करितों. आणिक दोनसें माणोस मुलकी भरतीस पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे. बहुत काय लिहिणे. सेवेसीं विदित होये. हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant reports to Chimaji Appa the disposals of the various Sardars and promises him to put up the palisade as directed..*

No. 278, *[About 14-2-1735*

छ १६ सवाल

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री

आपा स्वामीचे सेवेसीं

विनंती येसीजे. राजश्री दौलतराऊ सिरके माहाराज स्वामीनी कालुस्तेच्या मोर्च्यास रवाना केले त्यास चवीस रोज जाहाले. पालीहून निघालिया पंधरा दिवस जाहले. पाटणानजीक म्हावसीस तीनसे माणोस व पावणासें स्वार आले. तेथून माघारे खासे गेले आणि काबिला व लोक म्हवसीवर राहिले होता त्यास आठ रोज पालीस लागले. म्हवसीवरी फौज राहिली होती ते पोटाविण उठोन आपले घरास गेली. तेथें डेरा व पनास माणोस बारा स्वार राहिले आहेत. पहावें कधीं येतील कीं हेहि माघारे जातील कळेना. नागोजीपंत व सोमवंसी पागेवरी आहेत. जयेसिंग सिरके व आगांरकाकडील आडीचसें माणोस मिरजोलीस आहेत. छ २९ रमजानीं जयेसिंग सिरके मिरजोलीकडून खाडी उतरून गोवलकोटावरी आले. खाडीचे कडेस पावटा होता तो उपडीत होते. हबसियाचें तिनसें माणोस बाहिर निघालें त्यानी जयेसिंगाची फौज मोडली. खासा खाडीपलेकडे होते. लोक आलेकडे आले होते ते मोडले. च्यार जखमी केले. येसवंतराव घोसालकर ठार पडला. मुरदा काहाडावयास फुरसत जाहली नाहीं. लोक खाडींत उडिया घालून पलकडे निघाले. मुरदा सोडविला. दुसरे रोजीं पाठऊन दिला. सेवेसीं कळावें म्हणून लिहिलें आसे. दवलतराऊ आगर कोणी मिरजोलीस आलिया उपरि आज्ञाप्रमाणें मेढा काईम करूं. सामायेन व दरवाजे तारांगणांचे सामायेन ते करून ठेविलें आहे. सेवेसीं विदित होय हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant complains to Chimaji Appa the delay of Daulatrao Shirke in arriving at Kaloste as instructed by the King. After mentioning the postings of the several Sardars the writer describes an action between the Sidi and Jaysing Shirke.*

No. 2791 *[16-2-1735?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामींचे सेवेसी

आज्ञाधारक सुभानजी माणकर मों तळागड चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत विज्ञप्ति. तागायत छ ३ माहे सौवालपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचे व प्रांत मजकूरचें वर्तमान येथास्थित असे विशेष. शामलाकडील वर्तमान बहुत सुक्षम जाहाले आहेत. तमाम लोक पलोन कबिलेसुधां येतात. जंजिरेयामध्यें कोण्ही कोण्हाचा विश्वास धरित नाहीं. सिदी संबूल आपले घरांतून बाहेर पडत नाहीं. अवघा कारभार विपर्यास जाहाला असे. यैसियासी तिकडील लोक जंजिरकर व सुभेकरी पलोन येतात, त्यामध्यें नामांकित माणूस कामाकाजायोग्य येतात त्यास येथें त्याचे कबिले ठिकाणीं लाऊन त्याच्या तैनाता करून ठेवावे किंवा मुलकावर लाऊन द्यावे येविसी आज्ञा असावी. कार्याकारण कामाकाजाचे माणूस आढळलें तर तेथें त्याची बेगमी करून येथेंच चाकरी घेतल्यानें गोष्ट कामाची आहे. याकरितां सेवेसी विनंति लिहिली आहे. जे लोक येतील व हालीं येसजी राणे जंजिरकर याचा भाऊ सुभानजी राणे कबिलासुधां आले आहेत व आणखी दाहा पांच भले लोक आहेत, यांच्या तैनाता करून येथें चाकरी घ्यावयासी आज्ञापत्र सादर करणार स्वामी समर्थ आहेत. विशेष राजश्री कृष्णाजी माहादेव पुणेयाहून आलियावर तहऱ्हचा मजकूर व पुणेयाचे मुकामी खंड मख्तेयाची बोली राजश्री रामाजी गोपाल याचे गुजारतीनें जाहाली होती. त्याप्रमाणें सावंत जंजिरा लेहून पाठविलें व राजश्री रामाजी गोपाळ याणी साकल्य वर्तमान सांगितले, त्याजवरून चोहीं माहालचा खामखा करार होऊन बाकी साता माहालीं जंजिर तर्फेचे पाहाणीदार माहालीं आलियावर सेवकानें आपले तर्फेनें पाहाणीदार रवाना केले. सेवेसी कळावें. विशेष ब्राम्हण श्रीस गेले होते ते मागती फिरोन तळागडीं आले होते, त्यास येथून जंजिरा लेहून दस्तक आणविले व पाहाणीचें काम सुरलीत चालीस लागलें. शामलाचा कारभार सुरळीत सारिखा देखोन ब्राह्मण श्रीस रवाना केले. सेवेसी विदित जालें पाहिजे. येथें लोकांची भरती नाहीं. मागील हजिरी सदासिव कान्हा याणी सेवेसीं निवेदन केलीच असेल. तर स्वामी कृपाळु होऊन दोनसें माणूस उत्तमसें पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे. जागेसर हेच आहेत. शामलाचा भरंवसा नाही याकरितां सेवेसीं लेहिलें आहे. कृपा वर्धमान केली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*Subhanji Mankar asks Chimaji Appa permission to employ the deserters from the service of the Sidis who seem to have arrived at their last extremity.*

5434

No. 280] [*20-2-1735*

पौ छ १६ सवाल.

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे शेवेसी

विनंति सेवक तुबाजी आनंत साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायत छ ७ सवाल मो। धामणी वेढा गोवलकोट स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. कृपा करून छ २८ रमजान प्रो आलेगावचीं पत्रें पाठविलीं तीं पावोन परम संतोष जाहाला. तेथें आज्ञा कीं गनीम दगेखोर आहे. बहुत सावधपणे राहून आमित्रास खाडी आलेकडे परिस्रम होऊं न देणें. लोकांचे बहुता प्रकारें समाधान करणे म्हणोन आज्ञा केली. त्यास स्वामीचें पुण्य समर्थ आहे. गलबताची लडाई जालियापासून आम्हांकडी फासुवांतून गलबतें आगर होडी येत नाहीं. सोनगिरीचे टेंकडीवरी रात्रंदिवसी पनास लोकाची रात्रदिवस चौकी खबरदारीनें ठेविली आहे. गलबतें होडी आलीं तर कालुस्तेचे खाडींतून जात असते. वरकड गोटची खबरदारी जे रवेसीने करावयाचे ते करीत आहों. रात्रंदिवस खबरदार आहों. लोकही बहुत हौसेन रजावंदीन स्वामीसेवेस आंतर करीत नाहींत. सेवेसी श्रुत होये. बहुत काय लिहिणे हे विज्ञप्ति.

¶*Tubaji Anant to Chimaji Appa saying that he has been taking precautions against any possible attack from the Sidi who is notorious for his treachery.*

No. 281] [*20-2-1735*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंती येसीजे. गलबतावरी लढाई जालेंचें वर्तमान राजश्री माहादोबास लिहिलें होतें. त्यानी माहाराज राजश्री स्वामीस विदित केलें. माहाराजानी कृपालु होऊन वस्त्रें २ सिरपाव १ चांदणी चिरा व आस्टगाली १ पाठविला. समाधान पत्र पाठविलें सेवेसी कळावें याकरितां लिहिलें असे. विदित होय हे विज्ञप्ति. व घोडी जेर जकमीनें होती. तिसरे रोजीं दाणा वैरण खाऊं लागली. उतार पडली कांहीं चिंता नाहीं. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Tubaji Anant informs Chimaji Appa of the receipt of the robes of honour which the King sent him on learning of his success in a naval skirmish.*

No. 282] [25-2-1735?

पौ छ १९ शौवाल

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे शेवेसी

पोष्य जिवाजी खंडेराव कृतानेक साष्टांग दंडवत प्रणाम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल ल्याहावया आज्ञा केली पाहिजे. यानंतर राजश्री स्वामीनी राजश्री संभाजी आंगरे याजकडे चिरंजीव गोविंदराव व रा रामाजी दामोदर पाठविले होते ते छ १२ सवाली आले. त्यासमागमे संभाजी आंगरे याणी सागोन [अपूर्ण]

¶*Jivaji Khanderao informs Chimaji Appa of the arrival of Govindrao and Ramaji Damodar whom the King had deputed to go to Sambhaji Angria.*

No. 283] [About 23-2-1735

पैवस्ती छ १७ सवाल.

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंति उपरी. राजश्री दौलतराऊ सिरके बहिरवगडच्या घांटे उतरून दुर्गवाडीवरी मुकाम केला होता. बारा हजार जमाव तीनसे माणोस लहानथोर घोडें पनास होतें. छ ६ सवालीं गोवलकोटांतून सिदी सैद च्यारसें माणोस घेऊन छपा घालवावयास गेला. कडवईतून जेवायासी गेले हें वर्तमान दौलतरा-यास कलले. हे जीन घालून कमरा बांधून च्यार प्रहर जागत राहिले. पाहाटे छपा आला. गोटानजिक आले तों खबरदार जाणोन दुरून पालिती करून झाडींत गेले. दुसरे रोजीं कूच पागेस यावया निमित्य केलें. सावरडिया खेडेजवल आलें होतें तों मागून गनिमानें पिछा केला. हे सबालून खंड (खिंड) उतरून मैदानांत आले. याची मुराद होती कीं परभारें जाऊन कालुस्तावरी मोर्चे लावावे. पागेस न जावे ते उर्मी आगदीं राहिली. पागेस जाऊन मुकाम केला. दुसरे दिवसीं नागोजीराऊ दरोगे व हजुरात जैजाला देखील गेले. दौलतराऊ पागेवरी आहेत. रात्री हुली पडताती. व पोटाचे मानसिक लोकांस जाहलें आहे. माहाराज्यानी च्यार पैसे दिले त्यापैकीं लोकास पंधरवडा रोजमरा दिला. कांही

कर्जदारास दिल्हें. पाच दिवस येऊन जाहले. पोटाचा गवगवा पडला. पुढें उमेद कलली. कृष्णाजीपंत म्हणोन ब्राम्हण व च्यार माणोसं पहिलेपासून त्याच्या गोटांत आमचे आहेत, ते वर्तमान लिहीत असतात. सेवेसी श्रुत होय हे विनंति.

¶*Tubaji Anant describes a skirmish between Daulatrao Shirke and the Sidi.*

No. 284] [*27-2-1735*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक सुभानजी माणकर मुा नजीक कोरला सां दंडवत विज्ञापना. ताा फाल्गुण वद्य द्वितीया गुरुवारपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेकरून वर्तमान येथास्थित असे विसेष. श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीची आज्ञा होती कीं या कार्यास तुम्ही गेलेस म्हणजे राा मानाजी आंगरे यासी पत्र लिहिले आहे हे रवाना करणे, म्हणजे सामानसुमान दारुगोला तोफा देतील आणि उपरालाहि करितील. ते पत्र बजिनस तेच दिवसीं त्यांकडे रवाना केले. त्यास त्याणी उतर पाठविले कीं ज्या कार्यावरी आलेस (फाटलें आहे * *) आम्हास सूचना ल्याहावी होती. आतां (फाटलें आहे * * *) खरा केलात. बरे कोरला तुम्ही घेणे. रेवदंडेयासी शह आम्ही देतो. परंतु तोफाविसी आम्हांस कांही लिहिलें नाहीं येसे उतर पाठविले. ते पत्र बजिनस सेवेसी पाठविले आहे. येथून जाबकरी गेले होते त्यांजवल बोलत होते कीं रेवदंडे व कोरला म्हणजे कुलाबेयाचा दरवाजा आहे. आम्ही येथें आलों तेणेंकरूनहि त्यास परम चितांत श्रम वाटले. सविस्तर अर्थ सेवेसी कलावा म्हणून लिा असे. जर आम्ही येथून शह दिल्हा आहे तो काढून उठतो तर ही स्थले बलकावतात वाट बंद केली आहे. इकडील तिकडे तिकडील इकडे माणूस फरको देत नाहीं व लाकूड फाटेहि बंद आहे. कुमकेची वाट पाहत असो. तरी भारी जमाव व तोफा व दारूगोला येसे सत्वर स्वामी रवाना करितील तरी फिरंगी याचा आटा बंद होतो. रेवदंडा स्थल दुसरेयाच्या हातास जावे येसे नाही. याजकरितां दोही स्थळापुरते सामान रवाना करावयासी स्वामी खावंद धनी आहेत. सेवेसी विदित होय कृपा वर्धमान केली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Subhanji Mankar to Chimaji Appa: complains against Manaji Angria for not supporting him in the fight against Korlai.*

No. 285] [28-2-1735

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक तुबाजी अनंत साष्टांग नमस्कार विनंती. सेवेसी प्रार्थना तागाईत छ १५ सवाल मौजे गोवलकोट स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें, विशेष. छ १२ सवालीं राजश्री दौलतराव शिरके पागेहून आमच्या गोटास आले, कितेक वर्तमान सांगितलें. हे मोहीम तुमच्या खावंदाच्या भरवशियांवरी कबूल केली आहे. आपलें साहित्य करणें काळुस्तेस मोर्चा बसवितों. तीनशें माणोस साहितेस देणें. आश्रयेंकरून तुमच्या लोकांस तुम्हाकडे पाठऊं. आम्ही उत्तर दिलें कीं जें होईल तें साहित्य करूं, तुमचे कुमके आहों ; पर(तु) दुसरा जागां लोक खावंदाचे आज्ञे वेगळें देणार नाहीं म्हणोन कितेक सांगून वस्त्रें देऊन लोकांस व त्यांस जेऊं घालून रजा दिली. त्याजवळ ऐवज पाहतां पंनास लहान मोठे स्वार तीनशें माणोस आहे. याचे वस्तु मोर्चा काळुस्तेस कायम होतां दिसत नाहीं. जयेसिंग शिरके मिरजोलीस आहेत, त्याकडेहि गेले होते, कुमक मागत होते. त्यांनींहि आम्हांप्रमाणें स्वालजाब केला. कालीं छ १४ सवालीं गनीम पागेवरी चालून गेला. रिकामटेकडीजवळ मेट पागेमजीक होते, ते मारले गेले. मारामार आवाज बहुत सुटत होते. कोण जायां जाहाले काय तें कळलें नाहीं. राऊत खबरीस पाठविले आहेत, वर्तमान आलियावरी लेहून पाठवितों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Tubaji Anant to Chimaji Appa writing about the request for help made to him by Daulatrao Shirke and the answers which the writer gave him. Jaysing and Daulatrao Shirke may possibly be relations of Shahu's Rani Sakwarbai.*

No. 286] [28-2-1735

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक तुंबाजी आनंत साष्टांग नमस्कार विनंती प्रार्थना यैसिजे. तागायत छ १५ सवाल मो धामणी. स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री रामाजी विस्वासराऊ पांच जण भाऊ चवघाचीं लग्नें याची बापानी केली. हे ब्रह्मज्ञानी निघाले लग्न न करीत आजीपावेतों तैसेच होते. येंदा याचे बाप निवर्ततेसमई भाक घेतली कीं ल(ग्न) करावें.

यानी मान्य केलें. हे चाकरीस त्रये पाटणाहून इकडे आले. गोवलकोटानजीक मिरजोलीवरी मार्गी यावरी गनिमाच्या लोकांची मारामार जाहाली. यानी आपले मर्दुमीची शर्त करून निघाले. घोडा पडला, म्हालाजी नलवडा धरून नेला. त्याचा इलाज करावयाचा तो केला परंतु सुटला. राजपुरीस पाठविला. मग आम्ही पंधरा गांवास दबाव दिला की आमच्या कौलानें तुम्ही वस्ती केलीत. आमल गनिमाचा चालत आहे, त्याचे प्यादे व आमल फिरला म्हणजे मुलूक मारूं जाऊन पस्त करूं. तुम्हांस नांदणे आसल तर आमचा मालाजी नलवडा सोडून आणणे. त्यावरून हवालदार व खोत गोवलकोटात जाऊन किलेदाराचें लिहिले जंजिरियास पाठऊन म्हालाजीस आणून आम्हांकडे पाठविला आणि पत्र लिहिले, कीं तुमच्या खावंदाचा आमच्या खावंदाचा स्नेह आहे ये गोष्टीवरी व तुमचे येकलासीवरी द्रिस्ट देऊन म्हालोजीस जंजिरेहून आणून खुलास करून पाठविला आहे. म्हणोन पत्र लेहून पाठविला. हा छ १२ सवाली आम्हांजवल आला. सेवेसीं कलावें म्हणोन लिहिलें असे. यानंतर रामाजी विस्वासराऊ याचे घराहून पत्र आले कीं वधू उपवर जाहाली आहे. पुढे लाभिक नाहीं. लग्न फालगुणमासीं वदीपक्षीं लग्न आहे. बेगमी करून जाणे म्हणोन लिहिलें. आम्ही रजा देत नव्हलों, परंतु याचें वर्तमान ये रीतीचें येव्हां निरोप न देऊं तरी पुढें लग्न करणे नाहीं म्हणोन यानी शपथ वाहिली. जरूर जाणोन स्वामीकडे जावयास निरोप दिला. याचा एक स्वार आम्हाजवल आहे. तीन च्यार आसाम्या स्वामीकडे आले आहेत. याची लग्नाची बेगमी करणार आज्ञा देणार स्वाम खावंद आहेत. बहुत काय लिहिणे सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶*Tubaji Anant writes to Chimaji Appa about the capture of Mhaloji Nalavada and the subsequent efforts of the writer for his release. He also informs that Ramaji Vishvasrao has been allowed to proceed home for his marriage.*

No. 287] [*1-3-1735 ?*

श्री

पुा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजमाचीस राजश्री चिमणाजी भीवराव पाठऊन राजकारण केले तो अर्थ लिहिला तो कलो आला. त्यास किलेकरी याची बोली आहे आणि जबरदस्ती केलियानें खामखा कार्य होईल. आम्हीं गडोगड स्वारिया पाठविल्य होत्या, परंतु राजश्री पंत प्रधान याची आज्ञा आली. आम्ही सेवक लोक; मानि-

लीच पाहिजे. लोक उठऊन आणिले. आपणासहि राजश्री राव लिहितील परंतु आपण त्या स्थलाची उपेक्षा केली न पाहिजे. आम्ही सेपनास राऊत व सेसवासे माणूस माचीखाली मौजे खराडीस पाठविली आहे. जो सरंजाम लागेल तो पावता करून. तरी आपणहि रा। चिमणाजी भीवराऊ यानी कुमक करून सलुखे अथवा जबरदस्तीने (स्थल) हस्तगत केले पाहिजे. आपण धीर धरल्याने कार्य होईल. आम्ही येक दोस्थली बराच प्रेत्न केला होता, परंतु इकडील नालिसी[1] त्याजकडील लोकांहीं कुलाबा लिहिल्या. त्यावरून आम्हांस नेसीयेत[2] करून लिहिले. आज्ञेप्रमाणे वर्तणूक केली. बहुत काय लिहिणे. आम्हास तो आज्ञा मानिली पाहिजे. परंतु स्वामीनी तरी रकारस्थलचे[3] निग्रहेकरून कार्य आगत्य केले पाहिजे. बहुधा स्वामीस पत्रे रा। रायाची आली असतील, परंतु दोन दिवस धीर धरून कार्य केले पाहिजे. लोभ केला पा। हे विनंती.

¶*Vasudeo Joshi requests Chimaji Appa to send more succour to Chimnaji Bhivrao and to help him in capturing Rajmachi—a place on which he had set his heart but which he had to leave in obedience to the Peshwa's order.*

No. 288] *[12-3-1735*

श्री

श्रीमत राजेश्री आपा स्वामीचे शेवेसी

पोष्य रघुनाथ हरि दंडवत प्रा। विनती. येथील कुशल ता। छ २७ शौवालपावेतो स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष स्वामीचे आज्ञेप्रो। राजपुरीकरास पत्र लेहून पा। आहेत व इंग्रजाकडीलही दोन पत्रे पा। आहेत. पाहून सिके करून रवाना करावयाची आज्ञा करावी. आम्ही स्वामीकडेस येत होतो, परतु उंटे लस्करात गेली व राजश्री वासुदेव जोसी शुक्रवारी येणार त्याही बराबर जाऊ म्हणोन सांगितलें त्यावरून राहिलो. सुक्रवारी येऊन उंटे दोन तेथे गेली आहेत ती पाठवावयाची आज्ञा करावी. दक्षणेकडीलहि कितेक वर्तमान सांगावयाचे आहे यास्तव भृगुवारी येतो. बहुत काय लिहिणे कृपा वर्धमान केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Raghunath Hari writes to Chimaji Appa of his intention to explain to him personally certain matters.*

---

१ चाहड्या. २ ताकीद ३ राजमाची.

No. 289] [Recd. 2-4-1735 ?

पौ छ १९ जिलकाद.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ
व ताा राजश्री आपा स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री संभाजी आंगरे सरखेल यांजकडील जमाव गोवलकोटास आला म्हणिजे राजश्री स्वामीस सर्व प्रकारे त्यांचा अभिमान पडेल. कितेक बोलीचालीचा प्रसंग पडेल. कागदीपत्री लिहिल्यानें जाबसाल उगवणार नाहीं. मातबर जाबसाल आम्हास देता नये. याकरितां स्वामी प्रसंगी आसिले पाहिजेत. पुढील विचार सुचला तो स्वामीस लिहिला असे. उत्तर पाठविले पाहिजे सेवेसी विज्ञापना.

¶*Purandare writes to the Peshwa and Chimaji Appa that no settlement can be agreed upon unless Sambhaji Angria actually sends reinforcements to Gowalkot.*

No. 290] [Recd. 3-4-1735

छ २० जिलकाद

श्री

विनती उपरी. गोवलकोटाकडील वर्तमान तरी वरचेवर पत्रे येत आहेत. यैसियासी साप्रत पत्रे आली. त्यास चौघांची पत्रे चौ प्रकारची आहेत. ती पत्रेच बजिनस सेवेसी पाठविली आहेत. त्यावरून वृत निवेदन होईल. पत्रे पाठविली आहेत, ते सविस्तर वाचून पाहिलीं पाहिजेत. कृपा वर्धमान असो दीजे. हे विनती.

¶*The communications received from Gowalkot are sent to the Peshwa for perusal.*

No. 291] [23-4-1735

पौ छ १० जिल्हेज

श्री

विनंती उपरी. दारू गोळी व खोरी कुऱ्हाडी वगैरे सामान व लोक कोणी अद्यापि आले नाहींत. उदैक तेथून कूच करावे लागेल. मागाहून आली काये कार्याची? याजकरितां आवघे सामान उदैक रामाजीपंतासमागमे अविलंबे येऊन

5441

पोहोंचे तो अर्थ केला पाहिजे. दारूगोळी भाडयाचे बैल करून अगत्यरूप पाठविले पाहिजे. लोक बाा वेठी तो पाहिजे. कानडे तो मसलतीस येत नाहींत. त्याचा मुबदला आम्हीं तिकडील वळणातील चांगलें माणुसे पनास निवडक ठेऊन यैशियास त्यास रोजमेरा दिल्हा पाहिजे. तरी सेंभरा माणसाच्या रोजमरियास यैवज आपण पाठवितील, त्याखेरीज पाठविला पाहिजे. आम्ही व आपण राजश्री स्वामीकडील तरतुदेस बोलिल्याप्राा साहित्य होत नाही म्हणोन हसत होतो त्यास इकडील तरतूद तैसीच दिसोन येती. याउपर आम्ही उदैक स्वार होऊन जातो. आपण रागास येतील की यास इतके आगत्य ? तरी आम्हास स्वामीच्या लौकिकाचे आगत्य, याजकरिता विस्तारे लिा असे हे विनंती.

¶*Unless funds and provisions are supplied, Pilaji Jadhav says he cannot continue to conduct the fighting operations.*

No. 292] *[6-5-1735*

पाा छ २३ जिल्हेज

श्री

पुाा राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. प्रस्तुत सिदी सात मुंबईस आला आहे. सुरतेची जाहाजे शामलानी धरिली होती ती जाहाजे मुंबईस घेऊन आला आहे. सिदी मसूद याणी सुरतेच्या बारियावरी जाऊन सुरतवालियाची आणखी जाहाजे दोन धरिली आहेत. त्यास सुरतवालियाने इंगरेजावरी निमित्य ठेविले की आमची जाहाजे शामलाकडून तुम्हीच धरविली म्हणून इंग्रेजाचा इगरेज सुरतेस वखारदार आहे त्याचे घरी चौकी बसविली आहे. त्यास जहाजे धरली आहेत त्याचा खंडकरार करून चुकवावया विचारास सिदीसाद यास इंगरेज याणी मुंबईस राहाऊन घेतले आहे. कळावें याकरिता लिहिले असे. सिदी साद याची जाहाजे दाहा बारा व पाचसे माणूस त्याजवळी आहे. राा कृष्णाजी राम यांजकडे आम्ही माणूस पाठविले आहे. त्याजकडून वर्तमान लेहून येईल ते सेवेसी लेहन पाठऊन. बहुत काय लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*The Peshwa is informed about the strained relations between Sidi Sat and the officers at Surat. The Sidi captured some ships belonging to the Surat Subha who, suspecting the English to have instigated the Sidi, has the head of the factory put under arrest.*

No. 293] [12-5-1735?

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक सुभानजी माणकर मो तळागड साष्टांग दंडवत विनंती येथील वर्तमान तागायत छ २९ माहे जिल्हेज पावेतो स्वामीचे कृपावलोकनेंकरून प्रांत मजकूरचें व सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. कोट माहाड येथें शामलाची स्वारी तीनसें माणूस जाऊन बसगांव प्रा. माहाड येथें बैसली आहे. व आंगरेयांकडील नारायेण सेट गुजर तीनसें लोकांनसीं कसबे तुंडुल येथें बैसले आहेत. शामलाकडील कसबे माहाड येथें निमे मागतात ते देत नाहीं, याजकरितां कजिया आरंभिला आहे. त्याजवरून माहाडचे हवालदार याचे पत्र आम्हांस आलें तें बजिनस सेवेसी पाठविलें आहे व मुखवचनें सांगोन पाठविलें कीं ते कोट घेतील तो गोसावियानीच लोक पाठऊन घेतला पाहिजे तरी येविसीं आज्ञा करणार स्वामी खावंद आहेत. बंदर रेवदंडे व मुंबई येथील सावकार याची गलबतें मीठ भरून उरणाहून बंदर रोहे येथें येत होतीं ते राजश्री मानाजी आंगरे याणी २ दोन गलबतें धरून नेलीं, त्याजपासून रुपये १५० दीडसें घेतले. ते हरयेकविसी बंदर मजकुरी कजिये करितात. सेवेसीं श्रुत जाले पाहिजे हे विज्ञाप्ति. शामलाची व आंगरे याची स्वारी आली आहे तिकडे गोरेगांव गोवेलें इकडे आम्हाकडील स्वारी त्यासी कुमक करावयासी सांगितले आहे. ते कोटावर जातील तेव्हां आम्ही कुमक करावी लागेल. बंदर रोहें येथें मिठाची माहामुरी जाली, याजकरितां वाणियाचे वकोळे+ येतात ते फिरोन जातात. साहुकार म्हणतात आमचे रुपये देवील तरी बंदर मजकुरीं अमदरफ्ती. येविसी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत हे विज्ञाप्ति.

¶*Subhanji Mankar from Talagad reports to Chimaji Appa the arrival of a party of the Sidi against Mahad who have started a quarrel with Manaji Angria's men. He also reports news about the trade in salt.*

No. 294] [Received 18-5-1735

छ ६ मोहरम

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

विनंति. कर्नाळियाचेविसी स्वामीनी लिहिले की विचारें जाहाले तर किल्या वर सामान न जाये यैसे करावे. यैसियासी चहूंकडील शह प्राप्त जाहाले

+ वकळा = a bullock-load of grain (Wilson).

यामुळे तेथील वेढा उठविला व किलेदारासी सख्य केले. शामलाकडील लोक काही दाहावीस किल्यावर होते तेहि किलेदारानें खालते घातले. हे वर्तमान पहिले लिहिलेच आहे. पुढे काही किल्यास वेढा बसविता येत नाहीं. विचारे-करून दग्यानेच कार्य जाहाले तर करावे यैसे अहे. नवाबाची छावणी कोठे होते हाही अर्थ कलेल. दग्याने कार्य होतेसे नजरे पडल्यास नवाब कोठेंहि असला तरी कार्य करीतच आहो. वेढा बसवावयाचा विचार त्याचे छावणीच्या विचारासारिखा केला जाईल. हे विनंति. जर दग्याने पावसालात अगर आगोटीस कार्य जाले तर करू. दग्याने न होई तेव्हा भाद्रपद आस्विनपासून वेढा बसविल्याने आगोटीपावेतो वेढा काईम राहिल्याने आगोटीस वरील दाणा सरून कार्य होईल हे विनंति.

¶*Chimaji Appa writes to Bajirao that another siege will be laid to fort Karnala if the circumstances to undertake it be found favourable.*

No. 295] *[15-6-1735?*

श्री

राजश्री तीर्थस्वरूप बावा सुभेदार मो हिजवडी
स्वामी वडिलाचे सेवेसी

आपत्यासमान कानोजी माणकर मो तलागड चर्णावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टाग दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून ताा छ ४ माहे सफर-पावेतो वडिलाचे कृपादृष्टीकरून वर्तमान आपत्याचे व किले (मज) कुराचे येथास्तित असे विशेष. प्रांत मजकुरी वसुलाचा मीठपटी वगैराबाबचा हगामा जाला आहे. यास्तव शामलाने जजिरेयाहून स्वारी नेऊन मौजे माहाड मामले तले येथील कोट वसऊन मामले मजकूर वगैरा मांहालचा वसूल घ्यावा यैसा निश्चय जाला आहे. करार माहाडचा वसवितो. जंजिरेयाहून गलबते येतात ती बंदरकिनारा बारल वासीई तर्फेस येऊन रानामधे राहोन किले मजकूरचे घेरियापावेतो येईतंवर खबर कलत नाही. गनिमानी तो बहुतसी धामधूम माडली आहे. यास्तव वडिलाचे सेवेसी लिा आहे व सिदीसाद म्हणतो जे खडोजी माणकर लौकर येत म्हणजे आपला व त्याचा येक वेल दाखला हात मिलोन निशां होता यैसी बोली आहे. याजकरितां वडिलांही श्रीमंत पंतप्रधान याचे सेवेसी विदित करून स्वारीचा पोख्ता सरंजाम करून रवाना केला पाहिजे. लोकापुढे आले म्हणजे वडिलाचे पुन्येकरून श्री समर्थ आहे. वडील मागाहून आले तरी कार्यास येईल. येविसी हुजूरहि सेवेसी विनंतीपत्र लिा आहे. विशेष काये

लिहिणे. येथील सरंजाम रोजमुराचा गवगवा लोकांही केले आहे. तरी रोजमुरा लौकर रवाना करणार वडील आहेत. कृपालोभ असो दीजे हे विनंती.

हे विनंती

¶*Kanhoji Mankar reports to Khandoji Mankar the aggressive attitude adopted by the Sidi in collecting the dues from the province and asks him to request the Peshwa to send him troops so that he can check the Sidi.*

No. 296] [*17-6-1735*

पो छ १२ सफर

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे

सेवेसी

पोष्य वासुदेव जोशी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत छ ६ सफर जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष सांप्रत राजश्री मानाजी आंगरे यांणीं किल्ले कर्नालियाचा पैगाम बहुतसा मांडिला आहे. आवटियास दोनच्यारशें माणूस ठेविलें आहे. माला केल्या आहेत. हें वर्तमान कर्नालकरास कळलें, त्यावरून आपलीं खासा माणसें व कांहीं खोटी वस्तभाव होती ती मुंबईस पाठविली आणि जरारा होऊन राहिला आहे. किल्ले मजकूरच्या कितेक लोकाचे कबिले खालीं होते त्यांस ताकीद केली, कबिले किलियावरी घेऊन येणें. जो कबिला किलियावरी जातो त्यास चाकर ठेवितो, नाहीं तरी रुकसत करितो. याप्रकारें खबरदारी करीत आहे. दुसरें वर्तमान जनचर्चा आहे कीं किल्ला शामलास द्यावा. शामलानींही फिरंगियांजवळ उरणचें करंजें बंदर आहे तेथील बोली घातली आहे; तेंही बंदर किल्ले मजकुरास जवळी आहे. ऐशियासी आमचे विचारें किल्ला दुसरियाचे हातास गेला म्हणजे फटकाल गोष्टी; याकरितां किल्ले मजकुराखालीं दोनच्यारशें माणूस ठेवावें आणि दुसरियाचे हातास जाऊं न द्यावा. त्यास स्वामीचे विचारें येविशीची काय ते आज्ञा करणें ते करावी त्याप्रमाणें वर्तणुक करून. किल्लेदार किल्ला शामलास देईल ऐसें दिसोन येत नाहीं. स्वामीस कळावें याकरितां लिहिलें असें. बहुत काय लिहिणें लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi reports to the Peshwa that the Killedar of Karnala is concerting measures to guard against a surprise from Manaji Angria.*

No. 297] [19-6-1735?

श्री

श्रीमंतर राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोशी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत छ २८ मोहरम जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. मुंबईहून इंसेबर्ड[1] इंग्रेज व सिदीसाद यांजकडील बाळाजी शेणवी वसईस फिरंगियांकडे गेले. त्यांणीं फिरंगीयांजवळी बोली घातली कीं उंदेरीस पाणी उदकास बंदर पाहिजे. त्यास उरणास करंज्याचें बंदर उरणचे दक्षणेस पेणेचें आंगास आहे तें बंदर द्या. त्यास अद्याप फिरंगियांनीं मान्य केली अगर नाहीं ऐशी बोली निवडली नाहीं. परंतु ते येऊन यांणीं बोली घातली आहे, हें वर्तमान येथें आलें तें स्वामीस कळावें, याकरितां लिहिलें असें. बहुत काय लिहिणें लोभ करीत गेले पाहिजे हें विनंती.

¶*Vasudeo Joshi communicates to the Peshwa the news received by him about the proposals made by Inchbird and Sidi Sat to the Portuguese at Bassein to make over the port of Karanja to the Sidi to secure water-supply for Underi.*

No. 298] [23-6-1735

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंति. येथील कुशल तागायत छ ७ माहे सफर जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. किले कर्नालियाचें वर्तमान पूर्वी स्वामीस लिहिलें आहे त्यावरून कळलेच असेल. अलाकडे अजीच अबटियाचे कमाविसदाराचें पत्र आलें तेंच सेवेसीं पाठविलें आहे त्यावरून कलों येईल. सारांष गोष्ट कुलाबकर किले मजकूरच्या पेगामांत फारसे लागले आहेत. पेशजी त्याची स्वारी येक आली होती. हालीं रामाजी सबनीस व हैदर भालदार स्वारी घेऊन आले आहेत. किलेदारहि बहुत खबरदार आहे. किलेदारानी मकबुल अलम यास लेहून कांहीं जमावहि आणविला आहे. त्यास आमचे विचारें सें दोनसें माणूस किलाखालीं ठेवावें म्हणून पूर्वी स्वामीस लिहिले आहे. त्यास स्वामीच्या विचारास काय येईल त्याप्रमाणें आज्ञा केली

---

[1] इंचबर्ड.

5446

पाहिजे. त्यासारखी वर्तणूक करून. कळावें याकरितां लिहिलें असे. बहुत काय लिहिणें. लोभ असों दीजे हे विनंति.

¶Vasudeo Joshi reports to the Peshwa news about fort Karnala.

No. 299] *[27-6-1735 ?*

श्री

नकल

विनंति सेवक संताजी जाधव व दुर्गोजी भोईटे कृतानेक विज्ञापना येसीजे. छ १६ सफरी येसाजी अनंत यानी मोर्च्यांतील दुखणेकरी ८ आठजण त्याजबराबर शाबूत आठजण येकूण सोला माणूस आम्हास अगर बावाजी म्हसके यांस कलों न देतां रसालगडाकडे घरास रवाना केले. परंतु नद्या भरल्या आहेत यामुलें गनीम हमेशा पांचसासें माणूस पलीकडे जाहाजावरी उतरोन परसरामचे डोंगराकडून मोकले रानी फिरतां त्याजवरी आमचा काहीं शह पोंहचत नाहीं आणि गनीमानी पालत लाऊन त्याजवर दोनसें माणूस दोन निशाणे जाऊन दुखणेकरी आठजण येकदांच धरिले. जे शाबूत होते ते पलाले. त्यांचे पाठीस लागता स्वारी गेली. येक जण जोरावार होता तो दाजेदाट (?) पलोन तीन नद्या पोहोन हतेरें व पांघरुणें टाकून आला. त्याणे सविस्तर वर्तमान सांगितलें. हा काल पावेतों लस्करची खबर हरयेक दुखणियाची व माहागाईची खबर. लोक उठोन पलोन जातात त्याची खबर फुटों दिल्हीं नाहींशी तजविजेने राहात होतों. परंतु माहाराजानी येसाजी अनंत कार्याचे मनुष्य पाहून हा मनसुबा सांगोन येथें पाठविले त्यानी यैसें केले. यामुलें कितेक वसवास[1] लोकानी खादला आहे. हणगोजी बोरगे आम्हाजवल खातगुणा दुखण्यामुलें जाऊन, जातों म्हणून बोलोन गेला, परंतु त्यानी आपला पाय काढून पुढे गेला आणि मागें त्याचे लोकानी आम्हास पोटास नाहीं म्हणून तष्ट[2] लाविलें आहे. परंतु दिसोन येतें कीं तेहि उठोन जाणार. यैसे वर्तमान लस्करचें आहे. जर हेहि उठोन गेले म्हणजे आंगरिया-च्यानेहि टिकाव धरवत नाही. तेही लस्करचे भरंवासियावर आहेत. काही येक लस्करची फूट पडली म्हणजे आपणहि जे तजवीज करणे ते करावी यैसें दिसोन आलें आहे. माहाराजांस श्रुत व्हावें म्हणून लिहिलें असे. लक्ष विज्ञाप-पतीची विज्ञाप्ति हे आहे. या उपरी सर्व बेहबुंदी[3] करणार स्वामी समर्थ आहेत. आम्ही लेहून उत्तीर्ण[4] जालों आहों। बावाजी म्हसके याणी वाणियाचे पदरीं

---

१ संशय, भीति. २ . निकड, जिकीर. ३ तरतूद. ४ मोकळे.

घाटावरून सामान पोटाचे आणावयास यैवज दिल्हा होता, त्याचा जिन्नस येऊन तिवऱ्याच्या देवलामधें घाटाखालीं येऊन राहिला आहे. परंतु तेथील रखवालीस काहीं माणूस पाइचे पाठवावयासी आम्हाजवल नाहीं, आणि स्वाराचाही इलाज नद्यामुलें नाहीं. गनीमास तों येकथडी आहे. त्यास दगा येखादा जाला तर आमचाहि इलाज नाहीं. स्वार उठोन जातात ते बहिरवगडचे घाटीं जातात. आंगरियाकडील येक माणूस मोर्चियांतील मोर्चा सोडीत नाहीं यैसे वर्तमान आहे. सेवेसीं श्रुत जाले पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Santaji Jadhav and Durgoji Bhoite report their deplorable plight at Gowalkot.*

No. 300] *[11-7-1735?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक कृष्णाजी हरि मुा किले बाणकोट चरणावर मस्तक ठेऊन सिर साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ १ रविलोवलपावेतो स्वामीचे कृपे अवलोकनेकरून आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामी कृपालु होऊन राा सुभानजी सिंदे याजबरोबर मजला पाठविले. कितेक प्रकारे स्वामीनी सांगितले होते, परंतु राा सुभानजी सिंदे येककली आहेत. सारे सरदार हातेसी धरून आला बांध त्याचेने होता दिसत नाहीं. हा जागा तों सरदेचा आहे. समस्त सरदार येकरूप मिलोन असेल तर स्वामिकार्य येकनिस्टेने होईल. मुख्य सरदार जो असेल त्याचा वागजल्पना बहुत असावी ते मारनिले मधें नाही, परंतु येकनिस्ट आहे. स्वामीकार्य तो होईल. परंतु समस्त सरदार मिलोन स्वामीस त्याही विनंतीपत्र लिहिले आहे, त्यावरून सविस्तर सेवेसी निवेदन होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. येथील हकी (क) त आहे ती सेवेसी लिहिली आहे. सेवकाचेहि ऊर्जित करणार स्वामी समर्थ आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Krishnaji Hari complains to Chimaji Appa that Subhanji Sindia, under whom he is placed, is too haughty and headstrong to work harmonious|u with his subordinates.*

No. 301] [21-7-1735 ?

श्री

राजश्री चिमणाजी पंडित स्वामी

गोसांवी यांसि

ꣵ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री मानाजी आंगरे रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहिले पाहिजे विशेष. नारायेण हरकारा आपणाकडून पत्राचे प्रत्योतर घेऊन आलियावरी आपले आरोग्यतेचे वर्तमान कलोन येता सर्व चिंतेचा परिहार होऊन कोट्यावधीचा आनंद जाहाला. गोवलकोटास लोक पाठवावयाविशी राजश्री रायाचे पत्री लिहिले आहे त्याप्रमाणे उतर पाठविले म्हणजे स्वस्छता होऊन विचारणेचे उद्योगात आवकाश प्राो लागोन. कलले पाहिजे. बहुत काय लिहीणे कृपा केली पाहिजे. रवाना छ ११ माहे रावल हे विनंती[१].

¶*Manaji Angria to Chimaji Appa, thanking him for his letter and informing him that men will soon be despatched to Gowalkot as desired by the Peshwa.*

No. 302] [Oct. 1733

तालीक

श्री

विनंती उपरी. पूर्वी आपणास पत्रे लिहिली आहेत. पहिले आम्हासी करार केला होता की, चऊल आपले घ्यावे. हाबसी याचे किले घेतले ते घेतले. उरले राखावे. आपला मातबर माणूस नेऊन सख्य करून वेढे काढावे. यास्तव आपली आज्ञा आल्यानंतर अखंड पुसत की, उतरे आली न आली. उतरे आल्याने विचारेविचारे सांगितले. नवाबास तो सावकास नाही. कलताच हबसियाचा झाडा गडाचा आणितां अंजनवेल, गोवलकाट, राजपुरी, उंदेरी, पदमदुर्ग वरकड स्थले घेतली, त्यावरून श्रमी होऊन फारसे तीर्थरूपाचे द्रव्याची हाणी होऊन श्रम पावले. त्यावरून सेवेसी लिहिले. तदनंतर आम्ही निरोपांचा उद्योग केला. निमित्य की तुमचे मनी बिगाड करणे तरी आम्ही जाऊ. अगोधर राहाणे मनासीब नाही. त्यावरून तुम्ही का जाता. आम्ही बिगाड कशास करू. भला माणूस देतात की येक रायेरी ठेऊन वरकड किले देते तरी

१ येथें कान्होजी आंगऱ्याचा शिक्का आहे.

पाठवितो. हबसीयासी काये उरले आहे? त्याणे तुमचा उपकार कशास घ्यावा? आपण काही बिगाड करीत नाहीं. ऐसी गोस्ट बोलतात. केवल निग्रह करून घ्यावा तर तुम्ही काये म्हणाल यांस्तव विस्टर करिता नये. त्यामध्ये वेथेनेहि पडिला आहे. दाहा पंधरा दिवस दरबार नाही ऐसा प्रसंग आहे. पहिले औरंगाबादचे, बराणपूरचे लोकास पत्रे गेली होती की येणे. मागून पत्रे गेली परवा की, दसरा करून येणे. क्षणभंगूर बुध जाहाली आहे. करनाटकावर फार जाणे वासना आहे. पौशमासामधे निर्वाह जोशानी केला आहे. जोसी फार सावध प्रमाणिक आहेत. आणि सांगितले तितके प्रमाण जाहाले. त्यावरून हेहि प्रमाणच मानिले आहे. येका दो रोजा आरोग्य जाले तरी भेटीनंतर सविस्तर लिहो. परंतु तुम्हास अंजनवेल व गोवलकोट हस्तगत होता तर कोकणांतील निशाईल होते. येथे त्याचा वकील मोहनलाल व जमातदार हबसी याचा आला आहे. वकील मातबर आहे. म्हणतात की, हबसी याचा स्नेह करून वेढा काढील तरी उतम. नवाबास आर्जी करितात, बरचेवर पनास लक्षाचा माहाल राजपुरीत आहे, किला गेला तरी जाईल. उप्राला करा माल तुम्ही घ्या. सुरतेत सात हजार हशम ठेविले आहेत. नारल पडिल्यानंतर मदत जाईल. गपाहि मारितात, तो उंदेरी गेली बारा हजार रुपये घेऊन. हे वर्तमान प्रधान-पंताकडील जासुदाही सांगितले. आम्ही आर्जी करून पाठविली. पोटास नाही. किले विकिले. ईगरजापासून कोंण घेणार? जमातदार वकील आपले तर्फेने ब्राह्मण व जमातदार म्हणतो मजला पाठवाल तरी मी जातो माहाराजापासी आण सिदीसादाचा स्नेह करून देतो. आज्ञेप्रमाणे राहाट करू. ऐसी घाबरीहि आहेत. मोगल काही बिगाडहि करू पाहातोस दिसत नाही. केलियाने याचा तूर्त परिणाम लागतोसा नाही. येक वरिला आहे, फौजा तमाम जथून याचा निर्वाह केलिया निःकंटक होते. उतरेकडीलहि मग चिंता नाही. परंतु याचा उद्योग जालिया फार उतम आहे. च्यार दिवस कसाला पडेल. परंतु पुढे सौख्य होईल. पैरवी केलिया होईल. कोकणात चौकिया ठेऊन वर्ताहि बंदोबस्त केलिया फार उतम आहे. फौजा तो तयारच आहेत. तूर्त यास फार बरे वाटत नाही. आरोग्य जाल्यानंतर भेट होईल, आण सविस्तर लिहोन पाठऊ. कलले पाहिजे. प्रज्यंन्य येकदर नाही. गवत अद्याप नाही. ऐसा विचार आहे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The writer sends news of the unsteady attitude of the Nizam with whom a discussion was opened as regards a permanent settlement being effected between the Peshwa and the Sidi. The letter is addressed from the Nizam's camp, probably to the Peshwa, and reports that envoys from the Sidi have arrived at the Nizam's Court to interest him in the Sidi's cause.*

5450

No. 303] [12-8-1735 ?

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
साहेबाचे शेवसीं

विनंती. आज्ञाधारक सुभानजी सिंदे नामजाद किले बाणकोट सा। दंडवत. विनंती उपर. छ ४ माहे रबिलाखर पावेतो साहेबाचे कृपावलोकनेकरून किले मजकूरचे व सेवकाचे वर्तमान यथास्तित असे. यानंतर पेसजी आज्ञाधारक किले मजकुरी आलो, तेव्हां सेवेसी लोकांचे भरतीविसी व दारुगोले व गोल्याविसी लिहिले होते, त्यावरून कृपालु होऊन आज्ञापत्र सादर जाले, कीं तूर्त पाऊस भारी आहे. यामधे दारू पाठवावयासी अनकूल पडत नाहीं पुढें पाठऊन. येसी आज्ञा. येसीयासी हाली पाऊस तो हलका जाला. दर्यातून तारू तरांडें येऊं जाऊ लागले आणि शामलाची ठिकाणी तो दोहींकडे आहे आणि मधे किला आहे हे तो सेवेसी विदितच आहे. किल्याची मजबुदी तेही विदित आहे. आंगचे जोरावरीने ठिकाण राखावें लागते. याकरितां लोक व दारुगोले व गोल्यांचा सरंजाम पोख्ती असला पाहिजे. वेसवी खाडीचा छबिना माहाडचे सरदेपावेतो करावा लागतो व बंदरकिनारा चौकिया किल्यापासून आंजरलेपावेतो लोक ठेऊन राखाव्या लागतात म्हणून सेवेसी लोकाविसी लिहितो. जे लोकाची गणती आहे ते किले मजकुरीच नेहमी असती तर सेवेस न लिहितो. बाहेर बंदरे व खाडी मिलोन दोन तीनसे लोक ठेवावे लागतात. तर स्वामीने कृपाळु होऊन ठिकाणे-याचा सरंजाम केला पाहिजे. यानंतर दसरा संबंध आला आहे. लोकांस वस्त्रें व बकरी पाहिजेत. हे प्रांती तो बकरेयाचा लाग नाहीं. तर लोका परदेसात आहेत. स्वामीने कृपाळु होऊन किले मजकूरचा सामान पाठवावयाची आज्ञा करणार साहेब धनी आहेत. हाजिरीप्रमाणे बकरी आणि वस्त्रें पाठवावयासी आज्ञा करणार साहेब धणी आहेत हे विज्ञाप्त.

¶*[Subhanji Sindia to the Peshwa from Bankot, asking ammunition for the fort against a possible attack from the Sidi who has established his posts on two sides of Bankot.*

No. 304] [15-8-1735 ?

श्री

श्रीमंत राजश्री पंत आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक कृष्णाजी राम सां। नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील वर्तमान स्वामीचे कृपेकरून ता। छ ७ रबिलाखर मु॥ किले सुधागड यथास्थित असे विशेष.

स्वामीचा निरोप घेऊन आलो ते चतुर्थी बुधवारीं संध्याकाळीं वरास आलों तो शामलाने गाव मारून गेले. फौज उतरली आहे म्हणून यैकिले. ते ठीक मनास आणितां कळों आले, जे सिदी मसूद रेवसापसी- अरमार घेऊन राहिला आहे. याकरितां तीन दिवस राहाणे जाहालें. रविवारीं स्वार होऊन तिसरे प्रहरीं गेलों. सेवेसी श्रुत होये. पेणेस पोहचल्यानंतर जे वर्तमान आढलेल ते सेवेसी सादर होईल. शिकारखाना पाठवायाचे स्मरण असिले पाहिजे. विशेष पालीस येक दोन दिवस राहून कुलाब्याकडील समाचार मनास आणून पुढे स्वार व्हावे यैसे चितांत आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram to Chimaji Appa saying that he was delayed owing to the troubles created by Sidi Masood who has already arrived with his fleet as far as Rewas.*

No. 305] [*21-9-1733 ?*

छ २ जमादिलोवल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

पोष्य जिवाजी खंडेराव दंडवत प्रा विनंती उपरी. येथील कुशल ता छ २३ रबिलाखरपर्यंत यथास्थित असे. स्वामीनी पत्र पाठविलें ते प्रविष्ट जालें. लेखनार्थ कळों आला. सविस्तर राजश्री तात्याचे पत्रावरून कळले. त्याचें उतर त्याणी लिहिले आहे, त्यावरून विदित होईल. राजश्री संभाजी आंगरे अद्यापि आले किंवा न आले, त्याचा विचार काये आहे हें तपसीलवार लिहिलें पाहिजे. बहुत काय लिहिणें कृपा असों दिल्ही पाहिजे हे विनंति.

¶*Jivaji Khanderao to the Peshwa, asking about the whereabouts of Sambhaji Angria.*

No. 306] [*Recd. 21-9-1733 ?*

छ २३ रबिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामींचे सेवेशी

पोष्य जिवाजी खंडेराव दंडवत प्रणाम विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय कुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी आसीर्वाद पत्रं पाठविले ते प्रविष्ट होऊन स * * * * लों पत्री कितेक आज्ञा केली व * * *

सविस्तर लिा त्याजवरून कलो आले. उत्तर त्याणी लिा आहे. पुनरुक्त लिहिणे काये ? राजश्री संभाजी आंगरे इकडून निघून कुलाब्यास आले आहेत. स्वामीचे दर्शन घेतील. स्वामीनी बोध कर्तव्य केला पा. ' स्वामीनी जो विचार लिहिला तदनरूपच येथून प्रसंग केला आहे. दुखोटियाची मात्र वस्त्रें पाठविली असत. बहुत काय लिा कृपा असो दिल्ही पाा हे विनंति.

¶*Jivaji Khanderao to the Peshwa, requesting him to give a piece of advice to Sambhaji Angria who has gone to Kolaba and may perhaps interview him (the Peshwa).*

No. 307] [*About 6-9-1735*

श्री

पुा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी लिहिले कीं जातेसमई कितेक सांगितले व पत्रे पाठविली तरी अद्याप सविस्तर वर्तमान लिहिले नाहीं व किल्हा त्याणी शामलास दिल्हा कीं त्याचेच येल्तयारांत आहे ते लेहून पाठवणे म्हणून लिहिले. यैसी-यासी आम्ही साद्यंत लिहिणे ते लेहून पाठविले आहे. किलेदारानी कांहीं शामलास किला दिल्हा नाहीं. शामलाचे पाऊणसे माणूस आहे व पूर्वी आषाढ मासी मकबूल अलम याचे नवद माणूस आले होते ते इतके लोक भवानीचे देवलाजवली आहेत. या खेरीज नाहींत. कळावे याकरितां लिहिले असे. आम्ही येक प्रहस्त पाठविला होता तो शोध करून आला. कळले पाहिजे. आणखीहि कोणे गोष्टीचा संषय मानावा यैसा नाहीं. उदंड उदंडाप्रकारचे सागतात याजवरी जात्रे येसे नाहीं. बहुत काये लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*The writer assures Chimaji Appa that the news about fort Karnala already sent by him was correct and that the Killedar has no intention of giving over the fort to the Sidi.*

No. 308] [*7-9-1735?*

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विज्ञापना ताा छ ३० रबिलाखर सुभान केसरकर काल येथं दाखल जाले कलावे म्हणोन लिहिले असे. इंग्रजाची रवानगी सुरतेस शामलाकडील यैवज उतरावयासी जाणार म्हणोन खबर आहे. आज उद्या जाईल शेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*The arrival of Subhan Kesarkar and the departure of English ships for Surat with the Sidi's merchandise are reported to Chimaji Appa.*

---

१ ताब्यांत.

No: 309] [*17-9-1735*

पो छ १२ जमादिलावल

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामींचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोशी साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल आश्विन शुद्ध द्वादशीपर्यंत येथास्थित जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आम्ही आजीं खंडाळियाहून स्वार होऊन घांटाखाले मौजे मढ ताा बोरेठी येथें आलों, तों राजश्री माधवराम गोसावी गुळंसुंदेकर व बाळाजी बापट यांस बोलाविले होते ते आले, त्यांची भेट जाली. त्यांणीं वर्तमान सांगितलें कीं आपण किल्यावर गेलों होतों. किल्लेदाराचें आपलें भाषण जालें कीं आपण किला शामलास देत नाहीं. माहोलीस दगा जाला याकरितां आपले मदतीस जमाव आणिला. आपला प्राणहि गेला तथापि देतों ऐसें नाहीं. अथवा लाद्धच धरून कोण्हास किल्ला देईन हे गोष्ट होणें नाहीं. आपली थोडीशी रोटी होती ती घेतली. पुढें आपणाबर वेढा येणार याकरितां रक्षणार्थ जमाव आणिला. लोक खालतेच दोनशेंपर्यंत माणूस आहे. किल्ल्यावर सरदार दोघे तिघे जात येत असतात म्हणोन गोसावी याने सांगितलें. त्यास आम्ही गोसावियास व बाळाजी बापट यांजबाा सांगोन पाठविलें कीं शामलाचा जमाव आहे त्यास आधीं निरोप द्यावा म्हणजे उभयपक्षीं स्नेह चालेल. बंदरचा त्याचा मजकूर आहे तरी हे गोष्ट विना राजश्री पंत प्रधान यांचे आज्ञेखेरीज होत नाहीं. शामलाचे लोक किलियास असतां हीं गोष्ट होत नाहीं. तुमचा आमचा स्नेह चालावा ऐसें असेल तरी लोकांस निरोप देणें. पुढें तुमचा भला माणूस समागमें घेऊन पुणियास जाऊन रदबदल करून तुमचें कार्य करून देऊं. तुमचे कार्यास अंतर होणार नाहीं. ऐसे कितेक स्नेह व भयप्रदर्शहि दर्शऊन कितेक प्रकारें सांगोन गोसावी व बाळाजी बापट कर्णालियास आजी रवाना केले. त्याचा जाबसाल घेऊन उदयिक अथवा परवा येतील आणि सेवेसी लेहून पाठऊन. आजी आम्ही कर्णाला आलीकडे च्यार कोस मौजें बारव म्हणून पणवेलीच्या मार्गावर आहे तेथें जात होतों; परंतु माधवराम याचे मतें येथेंच मुकाम करावासा जाला. त्यावरून मुकाम केला. कळलें पाहिजे. आम्ही सामदाम युक्तीनें कार्य होये यास चुकतों ऐसें नाहीं. बहुत काय लिहिणें लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi sends news to Chimaji Appa that the Killedar of Karnala was not delivering the fort to the Sidi. Karnala at this time was in the possession of the Mughal Subah of the Deccan.*

5454

No. 310] [18-9-1735

छ ११ जालौवल

श्री

पुर्वणी राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विज्ञापना यैसीजे. आंजनवेल व गोवलकोट येथें दिसेंदीस जेरदस्ती दिसोन आली. च्यार आघोली तांदूल यास्तव येथून सावकार गलबतें भरून जाणर जातील. इंगरेज मन घालीत नाहीं. आम्ही सहज बोलिलों. येकाद किला देईल तर न कले कडी बसेल तेंहि सर्व तप कोण्ही वेचील तर घडेल कीं न घडे. याकरितां याच्या मनांत आलें आहे जे सिदी साद येथें आणावा आणि जेरदस्ती खालीं असला म्हणजे सांगितले करील. तो नाइके तर सुरतेचे तीन लक्ष रुपये आपणाकडे करून घेऊन सोडावा अगर अंगारक आपण येक व्हावे आणि हबशीयासी मैत्री करवावी म्हणजे सहजच जेर होतील. हा कुलाबों योजिला आहे. याकरितां स्वामीस लिहविलें आहे. प्रत्योतरासारखी वर्तणूक करावी. येक आंगारख निखलावा, हे म होये तर हा तल्यास गलां पडलाच आहे. सांगो तैसे आईकेल. आम्ही दाटून याबा आपला पैका कां खराब (?) करावा ? परस्परें दोघे येक होतील. आमची बळकटी आम्ही पाहिजे तैसी करून घेतली, मग फिकीर काये हा विचार योजिला. हे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना असे.

¶*Krishnaji Ram writes to the Peshwa about the plans of the English regarding Sidi and the Angria.*

No. 311] [20-9-1735 ?

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी.

विनंती ऐसीजे. शामलांची तरांडी तिरकती ६ व सिबाडी १० ऐसी राजपुरीहून निघोन अंजनवेलीस गेली, ती तेथे खाली करून निघाली, ती छ १३ जोवली मौजे आड ता कळसी येथे लागावयासी किनारा आली, तो आमचे चौकीदार धावोन जाऊन गलबंतावर बरखनदाजी केली. नामोहरम होऊन फिरोन शामल माघारा जाला. परत समुद्रामधे किले मजकूर बारेयावर येऊन राहिला असे. राजपुरीस जाईल किंवा राजपुरीहून दुसरी कुमक घेऊन येऊन खाडीत किले मजकुरी येणार हे कळत नाहीं. चौक्या तो वेळास केळसी सिवणे ह्या बंदरीं ठेविल्या आहेत. आण खबरदारीनसी बईसलो असों. सेवेसी श्रुत होई विशेष. किले मजकुरी

१ मनसबा.

दारूची व सिसे याची मामुरी असे. तर दिवसी प्रसंग पडल तेसमई अनिवार दारू गोळीचा खर्च आहे, तर कृपाळु होऊन दारू व सिसे पाठवणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होई हे विज्ञाती.

¶Chimaji Appa is informed that some shots were fired at Sidi's ships passing by Kelshi.

No. 312] *[20-9-1735*

श्री

श्रीमंत राजश्री राऊ स्वामीचे
सेवेसी

पोष्य अंबाजी त्रिंबक कृतानेक नमस्कार विनंती येथील कुशल ता छ १० जमादिलौवल जाणून स्वकीये कुशल ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीची पत्रें आम्हास व अजम सेखमिरा यांस आली. वडजोजी जाधव याचा मजकूर लिहिला. यैसियास येविसीचा अर्थ विस्तारे अजम सेखजी याणी स्वामीस व राजश्री पिलाजी जाधव राऊ यास लिहिला आहे व याद पाठविली आहे त्यावरून विदित होईल. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶Ambaji Trimbak communicates to Bajirao Peshwa that Shaikhji has written to him and Pilaji Jadhavrao as to what should be done in connection with the affairs of Vadajoji Jadhav.

No. 313] *[20-9-1735*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंति राजश्री संभाजी अंगरे याजकडील पत्रे व हरकारे काली छ १३ जमादिलवली अली. त्यात मजकूर की माहाराजानी हुजूर यावयाची अज्ञा केली तरी अवश्यमेव येऊ. विजयादशमी जाहालियानंतर यावयाचा सिधात लेहून पाठविती. सेवक हुजूर आलियावर कुलाबा प्रांतीचा मामला सेवकाचे स्वाधीन पूर्ववतप्रमाणे होये ते माहाराजास करणे लागेल म्हणून पत्रात मजकूर होता व हरकारे यानी जबानी वर्तमान सांगितले की संभाजी अंगरे खामखा येतात, परंतु कुलाबाप्रांतीच्या मामल्याचा बंदोबस्त माहाराजानी करून द्यावा यैसे बोलिले. त्यावरून राजश्री स्वामी बोलिले की संभाजी अंगरे हुजूर येतात, तरी तुम्ही राजश्री

प्रधानपंतास लेहून मानाजी अंगरे यासी हुजूर अणवणे म्हणून सांगितले. झाले वर्तमान स्वामीस विदित व्हावे यास्तव लिहिले असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ambaji writes to Bajirao and Chimaji Appa that Shahu desires the Peshwa to send Manaji Angria to his presence as Sambhaji Angria has shown his willingness to come to Satara and settle the dispute about the province of Kolaba.*

No. 314 [*22-9-1735*

पौ छ २१ जमादिलोवल.

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक हरि गणेस नामजाद किले बाणकोट साष्टांग नमस्कार विनंती तागायेत छ १९ माहे जमादिलवलपावेतो स्वामीचे कृपे अवलोकनेकरून सेवकांचें व किले मजकूरचें वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामी कृपाळु होऊन आज्ञापत्र पाठविलें तेथें आज्ञा कीं बहुत दिवस किले मजकुरचे वर्तमान कळत नाहीं. शामळाचे अरमार तयार केले असे. एकाधे जागा गला पडणार येसी आवई आहे म्हणऊन तुम्हास लिहिले असे. तर तुम्ही किले मजकूरची चौकी पाहारा अलंगनौबत करून बहुत चौकस राहणे म्हणऊन आज्ञा ते सिरसा असे किले मजकूरची चौकी पहारा अलंगनोबत करून बेफिकीर बईसलो असो स्वामीचे चरण आमचे व लोकांचे मस्तकीं असतां चिंता आहे येसी गोष्ट नाहीं कदाचित शामळ आला तरी स्वामीचे येश पदरी असे. तोंडावर खाऊन नामोहरम होऊन जाईल व स्वामींने पत्री आज्ञा केली की राजश्री बाजी भीवराव कोकणांत उतरले आहेत तर बहुत उत्तम असे. शामल कोठेकोठे आवाडाव करितो त्याचेहि पारपत्य होईल. व अनाजी साटम यांचा जमाव पाठवणे म्हणऊन पेसजी आज्ञा होती त्यास स्वामिकार्याकरितां पाठविलें नाहीं. सांप्रतहि येथून भरती तोडून पाठवावे येसे नाहीं. परंतु सांप्रत आज्ञापत्र आलें याकरितां बाबाजी साटम वगैरा लोक पाठविले असेत, सेवेसी येऊन पावतील. यांचा मुबदला लोक येकसे माणूस उतम बरखंदाज सत्वर येऊन पावत ते करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होई हे विज्ञाप्ति.

¶*Hari Ganesh of the fort of Bankot writes to Chimaji Appa that precautions have been taken to repel a sudden descent of the Sidi and requests him to send reinforcements.*

No. 315] [22-9-1735

पो छ १६ जमादिलोवल.

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोशी साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल अश्विन वद्य प्रतिपदा जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष काल मौजे निगडोली ता। सनदल येथून स्वार होऊन कर्णालियासंनिध ती कोसावर आपले सरदेचा गांव मौजे भाताणें वाजें येथें येऊन मुक्काम केला आहे. येथून पणवेली ती कोसावर आहे. राजश्री माधवराम कर्णालकराकडील भले माणूस आले होते. यांसी बोली चाली होऊन ते किलियास गेले आहेत. त्यांणीं आज येथं यावें ऐसा निश्चय केला त्यावरून येथें मुकाम केला आहे. ते आलियावर वृत्त लेहून पाठऊन. आबटीयाच बंदरचा मजकूर आपण लिहिला कीं वोढून धरलियानें त्यास वहमा निर्माण होऊन आणखी जमाव आणील, मग त्याचे येख्तियारांत तहाची गोष्ट राहाणार नाहीं म्हणोन लिहिलें; तरी जोंपर्यंत तुटे तोंपर्यंत वोढितों ऐसें नाहीं. त्याजकडील बलाबल मनास आणून विचारेंच करून जें करणें तें करून. स्वामीचें अन्न आम्ही भक्षितों. केवळ गोष्ट जाऊं देऊं ऐसें होणार नाहीं. त्याचाहि बहुतप्रकारें निशा केला तेहि देहावर आले आहेत. परंतु लोक आणिले आणि वरिचेवर निरोप द्यावे हें विहित दिसत नाहीं. मासपक्षान निरोप देईन. यांकडून काडी इतका उपद्रव मुलकास लागणार नाहीं, येविशी जैसा पाहिजे तैसा निशा करीन म्हणतो. परंतु आम्ही साफ सांगितलें कीं विना लोक गेल्याखेरीज रयतेचा निशा व आमचे खावंदाचा सलुख होत नाहीं, तरी लोक रवाना करणें ऐसें सांगोन पाठविलें आहे; त्याचा जबासाल आजी येईल. कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें.? कर्नालकर हबशीयाचे लोक आणितो, अगर हबशी येतो असें नाहीं. किल्लें मजकूरमध्यस्थ आज येतील, आणि सविस्तर हरि तुकदेव या बरोबर लिहोन पांठऊं. बहुत काय लिहिणें लोभ करीत गेलें पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi reports to the Peshwa his arrival near Karnala and says that he is proceeding very cautiously in getting the terms settled with the commandant.*

5458

No. 316] [24-9-1735

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी,

विनंती सेवक हरि गणेस नामजाद किले बाणकोट सां। नमस्कार विनंती. ता। छ १७ माहे जमादिलवल पावेतो स्वामीचे कृपे अवलोकनेकरून सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान यथास्तित असे विशेष. किले मजकूरचे हकीकतीची विनंतीपत्रे सेवेसी खंडोजी जासूद यांबराबर पाठविली त्यावरून सेवेसी वि(दि)त होईल. त्याची सरंजामी करून आणावयासी नारो शंकर पाठविले आहेत व यादीदास्त आलाहिदा पाठविली असे. तर कृपाळु होऊन जेजाला वगैरा साहित्य व साटम याचे लोक गेले त्याचे मुबदला उतम लोक बरखंदाज येसे पाठवावे यासी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. व किले मजकूरची जिरी व वाटणी व पोत्याचा हिसेब पाठविला असे त्यावरून विदित होईल, व माहे जावल महिनेयाची नेमणूक रोजमरेयाची पाठविली असे. तर कृपाळु होऊन रोजमरेयाचे नेमणूकपैकीं बाकी राहिली ते रवाना करवणार स्वामी समर्थ आहेत. व शामळांची गलबते थोर च्यार व लाहान ११ येसी बारेयावर येऊन राहिली आहेत. कोणीकडे जाईल येईल हे कळत नाहीं. सेवसी कळावे म्हणऊन लिहिले असे. भात आणावयाकरितां किले मजकूरीहून गलबते २ कुलाबेयासी रवानगी केली असे. सेवेसी श्रुत होणें हे विज्ञापि.

¶*Hari Ganesh of the fort Bankot writes to Chimaji Appa about the activities of the Sidi and then requests him to send reinforcements.*

No. 317] [27-9-1735

पो छ २२ जमादिलोवल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोशी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ १० जमादिलावल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आम्ही राजश्री मानाजी आंगरे यास पत्र पाठविलें होतें त्याचें उत्तर त्याणी पाठविलें. त्याची नकल करून पाठविली आहे त्यावरून कलों येईल. राजश्री मानाजी आंगरे याचे पत्राचा आशये कीं स्वामीनी त्यांस पत्र पाठविलें छ १९ जमादिलावलीचें, त्यांत आपण लिहिलें, कीं किले कर्नालियास वेढा घाळून घ्यावा, त्यावरून त्याणी आमच्या

पत्राचें उत्तरच पाठविलें, किलेदारास समाधानपत्र पाठविलें नाहीं. त्याणी स्वामीस पत्र पाठविलें आहे त्याचें उत्तर आलियावरी पत्र पाठऊन देतों म्हणून लिहिलें आहे. यैसियासी आम्हांस स्वामीनी लिहिलें, कीं किलेदारासीं सलूक करून किलेयास शामलाचे लोक आले आहेत ते जात तें करणें व येतेसमईही सांगितलें होतें त्याप्रमाणें आम्ही किलेदारास च्यार गोष्टी सांगोन शामलाचे लोक त्याणी घालऊन द्यावे. याउपरि आपले जागिरींतून देखील मोहपंथ शामलाचे लोक आलीयास आपण जाब करून म्हणून त्याणी मान्य केलें. येविसीं किलेदाराचें पत्र स्वामीचे नांवें घेऊन व सविस्तर बोलीचालीचा अर्थ आपणांस लेहून पाठविलाच आहे त्यावरून कळों येईल. त्यास कदाचित स्वामीचे विचारास आले असेल कीं खामखा वेढा घालून किला घ्यावा. यैशास ये गोष्टीस स्वामीपासून अशक्यता आहे यैसें नाहीं. परंतु आमचे विचारें तूर्त कर्म केलें आहे त्याचें परिमार्जन करावें. मग विच्यारें जें होईल तें करावें; आणि तूर्तच हे गोष्ट केलियानें ताम्रास जबरदस्ती करून स्थळें घेतात यैसें विषम वाटेल याकरितां सलुखाचा विचार जाहाला आहे हा उत्तम आहे. तरी स्वामीनी राजश्री मानाजी आंगरे यास पत्र पाठऊन त्याचें पत्र किलेदारास येई तें करावें. सविस्तर वर्तमान पूर्वीं लिहिले आहे त्यावरून कळलेच असेल. बहुत काय लिहिणे लोभ करीत गेलें पाहिजे. हे विनंति.

¶*Vasudeo Joshi writes to Chimaji Appa that this was the right moment for investing Karnala.*

No. 318] [*28-9-1735*

श्रीमंगलमूर्ति

पुर्वणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी.

विज्ञापना उपरी. सिदी मसूदचे प्रथम पत्र होतें कीं १० वे तेरखेस निघणार व जे दिवसीं रा। नारोपिलाजी स्वार जाहले येथून, ते दिवशीं जासूद पत्र घेऊन आला कीं १७ तारखेस निघणार, व लोक जमाव पंधरासे केले आहेत. त्यास तैनात दर असामीस वीस तीस रुपये मागतात. तीन माहे आगाव. हा म्हणतो जंजिऱ्यास पोहचतांच देतो. ते कबूल करीत नाहींत. दिलीहून सुरतेच्या हकिमास पत्र आलें कीं तीन लक्ष रुपये यांस द्यावे. त्यास हकीम यास म्हणतो गनिमानें तुमचे ठिकाणे घेतले ते तुमच्याने राखवले नाहींत. आधीं तें सोडवा तेव्हां देईन, तुम्हामधी फितूर दिसतो. आतां संचणीकरितां यास गाठचे रुपये द्या आणि जा. फते केल्यावर देईन. ऐसे वर्तमान नवरोजजीस पत्रीं लि॥ आले.

5460

जंजिऱ्यातील वर्तमान तर पाणी नासलें आहे हें खरें. सबनिसाकडील माणूस आलें त्याणे सांगितलें. लाकडांचे दुरभिक्ष जाहलें आहे. रात्रौ एक गलबत जात असतें. तें फांटी जेव्हां आणतें तेव्हां पाक निष्पत होते. दीडसे माणूस अंजनवेलीस गेलें व पंधरा हबशी व एक गलबत येथें आलें. आरमार न्यावयास तीन दिवस आजम जनेरालने जाऊ दिले नव्हते. निमित्य जे उंदेरकरांही तांडें जाळलें, तेथील सकलाद लुटून नेली. त्यास आम्हीं सांगितले कीं, वणजारे[1] येथें माल खरिदी करून सकाळीं गेले ते उंदेरकरांनी देखलें, आणि सांजचे येथून स्वार होऊन तिकडे जाऊन लुटोन सकलादच आणली. घरें च्यार जाळलीं. ते जर येथें न आले असते, तर सावकार बुडते कां? तुमचा ये गोष्टीनें लौकिक सर्वत्र ऐसा होईल, कीं इंगरेज इतुके दिवस बरे सत्य वर्तत होते, परंतु आतां अंतरी हबशाकडे यांचा हात आहे याचे पारपत्य तुम्ही करीत नाहीं, तर इतुक्या दिवसाचें भलेपण कौडीचा लाभ नसतां जातें व पुढें बदरगी[2] चालणार नाहीं. मेस्त्र बहारन पुढें पदीं बसणार तो संनिध होता, तो बोलिला कीं हे गोष्ट यथार्थ. तेव्हां उंदेरीस पत्र लिा कीं येथून सकलाद घेऊन वणजोर गेले त्याची सकलाद नेलीत तो पाठऊन देणे. न पाठवा तर तैसेच लिहिणे. त्याचा इलाज केला जाईल. त्याचे उत्तर आले कीं सकलाद उंदेरीस आलीच नाहीं, व त्याणीं सकलाद नेली ते फाडून वाटून घेतली कासीमजी सरदार व साहाजण सिपाई पडले. तेरा जण जखमी आहेत. पाऊणशत माणूस मदत अंजनवेलीस गेलें, म्हणून उदेरीच्या इंगरेजांचें लिहिलें आलें. त्याउपरी येथून पुन्हा काय लिा गेले तेव्हां संनिध नव्हतें. अंजनवेलीचें वर्तमान तर अनाज[+] नाहीं. येथून नेणार. जंजिऱ्याचें वर्तमान तैनात पोंहचत नाहीं म्हणून गवगवा जाहला आहे. सिदी मसूदची वाट पाहतात. उंदेरीची तीच गत, इंगरेज आतां उदेरकरांस देत नाहीं, मग कळेना. उरणचे वाटेने तीन पालेती[3] छ १९ जमादिलोवलीं उरणचे तरीने उदेरीचे लोक रवाना जाहले हे ठीक[4], परंतु नांवे कळलीं नाहीं. मराठे २ व एक मुसलमान छ १७ रो भोमवरीं येसवंती गलबत सुरतेस जावयास आलें त्यातून चौघ मराठे उरणचेच तरीने गेले * कू * पंचमीचे दिवसीं आणि छ १९ रो शुक्रवारीं गलबत सुरतेस गेलें. येथें भेद उदेरकरास आणतो * मुलना अली पेडमकर व नागोठण्याचा देशमुख. हें वर्तमान छ २० रौ शनवारीं कळलें. परंतु ठीक आहे. छ मारी इंगरेजांचे आरमार तयार जाले आहे. मेस्त्र लोधर सुरतेहून येणार, यास सामोरें व सिदी

---

१ वणजारे, बैलांचे तांडे बाळगून त्यावरून ह्या मालाची ने आण करणारे फिरते व्यापारी
२ गैरमार्गानें. + धान्य. ३ पाळत ठेवणार. पौलतीं=Ship? ४ ठीक वर्तमान कळलें.

मसूद येणार म्हणून त्यास सिदी मसूद तो आला नाहीं. इंगरेजी आरमार घेऊन लोधर आज छ २१ रो रविवारीं आलें. त्यास जनराल मारानिले याणीं आम्हास राहविले कीं सुरतेची खबर ठीक आज संध्याकाळीं कळेल, त्यासारखी तुमची उदैक रवानगी करून. त्यास आज छ २२ रो सोमवारीं सागोन पाठविले कीं सिदी मसूद दोंतीं दिवशी येईल. तो आलियावर जाल तर उत्तम आहे. आम्ही सांगोन पाठविले कीं आम्हास खावंदाचें आज्ञापत्र सादर जाहालें कीं पत्रदर्शनी येणें. परंतु जनरालची रजा घेऊन येणे. याकरितां जाब द्याल तर उत्तमच आहे. अगर आम्हास निरोप द्याल तर चेऊलची तर जात आहे ईमधी स्वार होऊन. त्यास आम्हास तिसरे प्रहरीं बोलाविलें आहे. काय सांगतील ते ध्यानास आणून सेवेस येतों. तर चेऊलची जायास लागली म्हणून बा विठोजी जासूद सेवेसी विनंती पत्र सादर करणें जाहलें न कळे. पुन्हा तर येऊन जावयास च्यार दिवस लागतील आणि स्वामीस क्रोध येईल. याकरितां सेवेस सादर केले असे. यानंतर खबर ऐकतों कीं स्वामीकडील गलबत सिदीसाद याजकडे सिरपाव घेऊन जात होते त्यांत दोन जासूद व सोरवाद खानजाद्याकडील अगर सिदीसाद-कडील हे नकले. ते कुलाब्यास आणले, हें चेऊलची तर आली तीवर समाचार आला असे; व जंजिऱ्यांतील गलबत रेवदंड्यास हमेशा सामान येते. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. सिदी मसूदचें वर्तमान लिा, ठीक मनास आणले. खर्चाचे नाहीं म्हणून यावयाचा दिरंग लागला. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter from Bombay reporting to the Peshwa the British attitude towards the Sidi and the wretched condition of the besieged at Janjira.*

No. 319] [*29-9-1735*

श्रीमंगलमूर्ति

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनीत. सेवक कृष्णाजी राम सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील कुशल ताा छ २२ माहे जमादिलौवल स्वामीचे कृपेकरून मुाा मुंबै येथास्थित असे विशेषः आपले आज्ञापत्र छ १३ रोजीचे येथें छ १९ रोज शुक्रवारीं सादर जाहालें तेथें आज्ञा कीं, याउपरी तुम्ही जनराल अजम यांची रजा[1] घेऊन पत्रदर्शनी येणे, दिरंग न लावणे. यैशास, जनरालची भेट घेऊन रजा मागत होतों, त्यास तेहि बोलिले कीं, तुम्हाविसी आपणासहि लिहिलें आहे. हरकोणी गलबत जाईल

१ परवानगी.

त्यावर पत्र देऊन तुम्हास रवाना करून. यैशास शनवारी संध्याकाळीं चेऊलचे गलबत आलें. त्यास आम्हास रविवारी प्रत्योतर देऊन रवाना करणार होते. त्यास सुरतेहून इंगरेजी अरमार बान्यांवर[1] आलें म्हणून खबर येताच बोलिले, कीं या अरमाराचा पुरता समाचार कलकेयावर सविस्तर लिहिणे ते लिहून पत्र देऊन तुम्हास रवाना करून म्हणून राहाविले. आण प्रत्योतराविरहित यावें तर स्वामी शब्द लावितील. प्रत्योतर आले म्हणजे हरकोठील गलबत पाहून स्वार होऊन सेवेमधी येऊन पोहचतों. सेवेसी श्रुत होये. बहुत काये लिहिणे, कृपा वर्धमान करून सेवकावर दया सदोदित पूर्ण असो दिली पाहिजे, हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram to the Peshwa, saying that he was delayed by the English General in Bombay and that he would soon be returning with the General's reply.*

No. 320] [*September 1735*

श्री

पुरवणी राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीं

विनंती उपरि. कर्नालकराची बोली जे जाहाली ते वरचेवरी पूर्वी लिहिलीच आहे. त्यास हालीं अलाकडे हरिसिंग आले, त्याणी किलेदाराच्या चित्तांत विपर्यास घातला. तुम्ही शामलाचे लोक उतरावयाचें कबूल केलें, परंतु किलीयावरी भरती नाहीं. त्यास जुन्नरचे लोक मदतीस आलियाखेरीज लोक उतरूं नये. दुसरी गोष्टी यांचा भरंवसा काय ? मोगलाइ तह असतां याणी माहुली घेतली. तुम्ही लोक घालविलायावरी हे भरती किलीयावरी नाहींसी देखोन पुढें किलीयावरी दाणा गला चढों देणार नाहीं, बंद करितील यैसें सांगितलें. त्या उपरि आम्ही राजश्री त्रिंबकराव दिगंबर व रामाजी आत्माजी यास किलेदाराकडे पाठविलें. त्याणी यास किलीयावरी नेऊन यांजवली बोलीकरितां पेशजीं बोली जाहली होती ते टाकून बोलिला, कीं शामलाचे लोक घालवावे त्यास, राजश्री मानाजी आंगरे याचे लोक बंदरोबंदरी आहेत. त्यास देखील मोहपथ उठवावें, पेशजी मोहपंथचे लोक उठवावे यैसी बोली नव्हती. हालीं अड धरून बोलिला व जुन्नरचे लोक आलियाखेरीज लोक घालवितां येत नाहीं यैसी फिरोन गोष्ट सांगितली. वरकड किलीयावरी

---

१ बंदरानजीक.

शामलाचे दोन तीनसें चढले म्हणून पूर्वी लौकिक होता. त्यास पाणी बारकाईन मनास आणितां सत्रा पैखोर व ताजुदी अलीखान याचा पुतण्या समागमें मुसलमान वीस बावीस आहेत येकूण सरासरी तीस च्याळीस माणूस शामलाचें आहे. जाजती आहे यैसें नाहीं. किलायावरी लोकाची भरती मनास आणतां त्रिंबकराव व रामाजी आत्माजी यांस आपले लोक दाखवावे याकारितां तमाम लोक सिध्य करून कोरबंदी करून उभे केलें, ते रामाजी आत्माजी याणी नजर मोजेना[2] मोजिले, ते सवासें दीडसें जाहले. त्याउपरि उभयतां निरोप घेऊन आम्हांजवळी आले. त्या उपरि आम्हीं हरिसिंग यास बोलाविलें. त्यास हरिसिंग व किलेदाराकडील मिरशराजुदीन आले. त्यास आम्ही फाजित केला कीं पेशजीं बोली जाहली होती त्यांत तफावत तुम्हीच पाडला. याउपरि किलेदारास फारसा वहमा असला तरी काय हिसाब आहे? आम्ही तमाम दाणा गला बंद करितों आणि किलीयाखालीं बसतो. शामलाचे लोकानी काय करणे आहे? किती दिवस शामलाचे लोक तुम्हांस राखतात ते पाहूं, यैसे दबाविलं व त्या देखतां राजश्री मानाजी आंगरे यास कागदही लिहिला जे तुम्ही बंदरोबंदरीचे लोक न उठवणें. पत्र रवाना तों केलें नाहीं, परंतु दबावाकरितां लिहिलें. त्यावरून त्याणी विचार करून शराजुद्दीन यास किलीयास पाठविले. तो जाऊन किलेदाराजवळ लोक घालवावयाची बोली करून रात्रीस येथे आले. त्या उपरि आम्ही येथें दोन प्रहरपर्यंत राहून खंडो गणेश यास बोलाऊं पाठविलें आहे. तेही चौं घटकानी येतील. आलियावरी त्यास बंदरोबंदरचे लोक उठवावयाचा विचार सांगोन किलेदार यांजकडील शराजुदीन यास किलीयास पाठऊन शामलाचे लोक जावयाचा विचार आरंभला आहे. होतां होईल तों करीतच आहों. मोंगलाई कारभार म्हणजे चहूं घटकाचे कार्यास च्यार दिवस लागतात यैसें आहे. कळावें याकरितां लिहिलें असे. त्याणी मोहपथ येथील लोक उठवावयाची बोली घातली आहे. परंतु आम्हीं त्यास साफ सांगितले कीं वरकड बंदरीचे लोक उठऊं, परंतु मोहपथचे लोक उठवणार नाहीं. शामलाचे लोक गेलीयावरी इंग्रजाचें विचारें खाडीचा बंदोबस्त करून मग उठऊन, तोंपर्यंत उठवणार नाहीं. तुमच्या भरवसियाने लोक उठवितों यैसें नाहीं. कळावें म्हणून लिहिले असे. बहुत काय लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi informs the Peshwa how he forced the Kiledar of Karnala to dismiss the Sidi's detachment which he had called to his assistance.*

---

१ महार. २ नजर फिरवन.

No. 321] 5-10-1735

छ २८ जमादिलौवल

श्री

पुरवणी तीर्थरूप रा राऊ व तथा
रा अपा स्वामीचे सेवेसी

विनंति. येथे वर्तमान अले आहे की कर्नाला स्वामीस हस्तगत जाहाला. किले-दाराचें अनुसंधान स्वामीकडे आले, पंचवीस हजार रुा व तीन गाव इनाम द्यावे यैसा करार करून किला येख्तयारात आणिला. यैसे वर्तमान अहे. रांसहि श्रुत जाहाले. आम्हास कोणी कोणी पुसतात त्यास अम्ही लटके म्हणून सांगतो. तरी स्वामीनी येविसीचे सत्यमिथ्य लिा पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ambaji inquires whether the reports of the surrender of Karnala to the Peshwa are true.*

No. 322] [7-10-1735

पाा छ ६ जमादिलाखर

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनती सेवक हरि गणेस नामजाद किले बाणकोट सां नमस्कार विनती. ताा छ १ जााखरपावेतों स्वामीचे कृपे आवलोकनेकरून सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले. तेथे आज्ञा की, रामाजी बोरडे राजश्री संभाजी आंगरे सरखेल यांकडे जात असत तर तुंम्ही गलबत देऊन हरणईस पोचावणे व विज्ययेदुर्गाहून येतील ते समई गलबत देऊन माहाडास पोचावणे म्हणऊन आज्ञा. आज्ञेवरून गलबत देऊन रामाजी बोरडे यासी हरणईस पोचाविले असत. वरकड किले मजकूरचे वर्तमान कागदी पेसजी कागद घेऊन सेवेसी आले त्यावरून विदित होईल. तर कृपाळु, होऊन सरंजामानसी नारो शंकर यासी सत्वर रवानगी करावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होई हे विज्ञाप्ती.

¶*Hari Ganesh intimates to the Peshwa that he arranged for the passage of Ramaji Borde to Harnai as instructed by the addressee.*

No. 323] [11-10-1735

गो छ १०. जमादिलाकर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ तथा

राजश्री अपा स्वामीचे सेवेशी

विनंति देवढीचे एक ब्राम्हण हरकारा व एक जासूद मिठाच्या दस्तकाबद्दल पूर्वी राजश्री मानाजी आंगरे याजकडे कुलाबियास गेले होते, ते छ ९ जमादिलाखरी सणवारी. येथें आले. त्यानीं जबानीं देवढीस वर्तमान सांगितले, कीं गोविंदपंत व राघोपंत राजश्री मानाजी आंगरे याजकडे कारभारी होते त्यानीं राजश्री संभाजी अंगरे सरखेल यासी सकटभेद केला होता. त्यावरून सरखेलीनें पांचसे रुपये रोख व आपले पत्र गोविंदपंतास व राघोपंतास पाठविले होते, तेथें लिहिले होते, कीं जो त्या सावजाचे काम करील त्यास गांव व कडेजोडी त्याचे मनोदयानरूप इनाम देऊं यैसे पत्र होते. त्यावरून त्या दोघा जणांनीं कांहीं लोक आपलेकडे फोडिले आणि सदरेचा सरणोबत होता, त्यास सेंभर रुपये देऊन त्यासही आपले मनसबियांत मेळऊन घेतला. परंतु त्याचे चित्तास काये आले ते त्याणें दुसरे दिवशीं तेच रुपये राजश्री मानाजी आंगरे यांचे पुढें नेऊन ठेविले आणि वर्तमान सांगितले कीं यैसा भेद जाला आहे. त्यावरून मशारनिल्हेनी गोविंदपंत व राघोपंत यांस धरून नेऊन सदरेस अगदी भेदाचे वर्तमान सरखेलीचा कागद मनास आणून त्या दोघा जणाची डावी उजवी केली. त्यात गोविंदपंत तेव्हांच निवर्तला. राघोपंत वाचेल कीं मरल हे नकले. पंधरा परवारी मारिले. कांहीं सिपाई मारिले. कांहीं आठ दहा जण धरून बंदी घातले आहेत. दिपवालीचे अमावास्येस मंदवारी हे वर्तमान कुलाब्यास जाले म्हणून दोघा जणापैकीं देवढीस सांगितले. स्वामीस कलले असेल नसेल यास्तव लिहिले असे. कांहीं अधिकोत्तर वर्तमान स्वामीकडे आले असेल तरी लिहिले पाहिजे. स्वामीनीं वर्तमान लिहिले आणि आज्ञा केली कीं कोठें न बोलणे, त्यावरून आम्ही कोठे बोललो नाहीं, परंतु येथें वर्तमान आले ते लिहिले असे. हे विज्ञापना.

¶*Purandare gives Bajirao and Chimaji Appa details of a secret plot concerted by Sambhaji Angria against Manaji, reports of which had reached King Shahu.*

No. 324] [About 17-10-1735 ?

पौ छ २२ साबान

श्री

राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान यासी आज्ञा केली ऐसीजे. गोवलकोटीं आंगरेयाकडील लोक होते ते उठोन गेले. मोर्च्यांचें काम

डांवाडोल जालें आहे. यैसियास मोर्चा उठला. येणेकडून लौकिक येक प्रकार होतो याबद्दल खासा स्वामीसच जावें लागेल. यास्तव राजश्री पिलाजी जाधवराव यास पत्र पावतांच पाठवून देणे. जरी तुम्ही जाधवास पाठवीत नाहीं तेव्हा स्वामीसच जावे लागेल, हें तुम्हांस कलावें म्हणून लिहिलें असे. कितेक अर्थ राजश्री आनंदराव पंडित सुमंत व राजश्री माहादाजी अंबाजी यांजबराबर सांगोन पाठविला आहे ते सांगतील त्यावरून कलेल. राजश्री पिलाजी जाधव यास सत्वर पाठवणें, त्यांस पाठवीत नाहीं तर स्वामीच खालें जातील. या पत्राचें उत्तर लौकर पाठवणें. स्वामी गेल्यावरी तुम्हांसच यावें लागेल. जें[+] क्षनी पत्र पावल ते क्षनी राजश्री जाधव रवाना करन. ज(र) आमची आगत आसल तर पाठवायास अनमान करा तर तुम्हा सपत आस स्वामीची. बहुत काय लिहिन सुज्ञ आसा.

¶*Shahu's letter to Bajirao containing a severe reprimand for his neglect in the capture of Gowalkot. It shews how earnest Shahu was about this campaign.*

No. 325] *[19-10-1735 ?*

पा। छ १३ जमादिलाखर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा ता।

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. राजश्री मानाजी आंगरे यांजकडील राजश्रा साबाजा प्रभु व दुसरे येक ग्रहस्त येसे दोघेजण येथे होते. त्यांस आजीच रात्री राजश्री स्वामीनी निरोपाची वस्त्रे दिल्ही. आसामीस येक तिवट येक अष्टगोली सेला याप्रमाणें दिल्हा. विशेष वर्तमान कांही नाही. उदईक मागती त्यांस कांही राजश्रींनी सांगितलेंच तर होईल वर्तमान ते सेवेसी लेहून पाठऊ. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Purandare writes to Chimaji Appa about a send-off given by King Shahu to Sabaji Prabhu sent by Manaji Angria.*

---

१ बिघडलें. + येथून पुढील अक्षर शाहू महाराजांचें.

No. 326] [24-10-1735

पा छ २६ जमादिलाखर

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री
राऊ व तथा राजश्री आपा
स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री रघाजी भोसले येथें आले, त्यांची भेटी छ १८ जमादिलाखरी सुक्रवारी सिकारीत आली. राजश्रींनी गोवलकोटचे मसलतीस त्यांजवल तीनसे राऊत मागितले त्यानी कबूल केले. राऊतांचे रवानगीचे विचारणेत आहेत. स्वामींस कलावे म्हणून लिहिलें असे. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Purandare informs Bajirao and Chimaji Appa of a visit paid to the King by Raghuji Bhonsle.*

No. 327] [25-10-1735

नकल

श्री

सेवेसी विनंती. सेवक गोविंद खंडेराव व भास्कर वैद्य कृाा विज्ञापना. येथील वर्तमान ताा कार्तिक वदि पंचमी मंधवारपर्यंत येथास्थित असे. यानंतर येथील सविस्तर वर्तमान काल जासुदासमागमे सेवेसी लिहिले आहे त्यावरून विदित जालेच असेल. त्याअलीकडे आम्हा उभयेतास बावाजी म्हसके याणी बोलाऊन नेले. बहुत मिनथ करीत होते; परंतु आम्ही ते गोष्टी नाइकिली. केवल तूट खाऊन माघारे येऊ लागलो. भास्करभटास मागे बैसून सांगितले की तिसरे प्रहरी या, जे बोलणे ते बोलूं. त्या उपरी आम्ही उभयेता गोटांत येऊन सारी फौज तयार करविली. राा नरसिंगराव सोमवंसी याबराबर सेसवासे राऊत निशाण नगारा देऊन रवाना केले. ते जाऊन त्यांच्या गोटात उगेच उभे राहिले. हुजरेयासी कटकट केलीच तरी तुम्ही करा म्हणून सांगितले होते. परंतु त्याणी कटकट केली नाही. आम्हाकडील निक्रश्य देखोन मुजरद आम्हाकडे माणूस पाठविले. आम्ही गेलो. आम्ही झाडपछाड बहुतच जाली.. आम्ही जाऊ न देऊ येैसे देखोन बावाजी म्हसके याणी निकाल काढिला की सरखेलींचे हुकमास उजूर न करावा; केल्यानि आपला नाश होईल, याजकरिता आम्ही जाऊ म्हणत होतो. परंतु तुम्ही निग्रह करिता तर बरे. च्यार दिवस तुमच्या बोले

राहातो. तुम्हीहि निग्रह केला आहे हें सविस्तर वर्तमान लिहितों. तुम्ही रात्रीचा दिवस करून त्याजकडे जा. तेथील काये तो हुकूम पाठवा तोपर्यंत आपण धातुपोषण रोज उठोन जातों जातों म्हणतो. तुम्ही हुजरियास सांगोन आम्हासी कटकट करवीत जा, परंतु आपण च्यार दिवस जात नाहीं. जर सरखेलीची आज्ञा राहाणे म्हणून आली तर उत्तम जाले, राहूं, नाहीं तर उठोन जाऊं. लस्करचे लोकास सांगून ठेऊन मग कटकट न करीत ते करा यैसे बोलोन शपत केली. त्या उपरी आम्ही नरसिंगराव सोमवंसी यास बराबर घेऊन लस्करात आलो. हुजरे त्याजवल ठेविले आहेत. सरखेलीस त्याणी काये डौंष लिहिला असेल तो नकळे. पहिले पत्र आले होते ते बजिन्नस दाखविले होते त्यात काही गुंता नव्हता. इंग्रेज फिरंगी हबशी येक होऊन लाहान थोर सेंभर तरांडियानसी अंजनवेलीजवळ आहेत. सुवर्णदुर्ग ज्यये विजये या तिही स्थलाहून येक जागा येलगार करणार, या करितां तुम्ही किलोकिलांचे जेथील तेथे जाणे म्हणून पष्टच लिहिले होते. दुसरे पत्र कटकट करतात, म्हणून वर्तमान कललियावरी काये होईल ते पाहावे. आम्ही आजी प्रात:कालीच स्वार होऊन माखजनास गेलों. राजश्री संभाजी आंगरे जयगडास यावयाचे उदेशे रत्नागिरीस आले आहेत; इंग्रेज बारियावरी आला म्हणून रत्नागिरीस राहिले आहेत. उदैक रत्नागिरीस जाऊन पोहचतों. त्यास कलतील तैशा च्यार विचाराच्या गोष्टी सांगोन जमावास येथे राहावयाची आज्ञा पाठवीतच आहो. परंतु येथील विचार आहे तो माहाराजास विदितच आहे. आंगरेयाकडील लोकांचा भरवसा धरावा यैशा अर्थ नाही. येद्यपि ते आलेच तरी त्यांस व वरकड सरदारास वर्तवी यैसा मातबर माणूस येथे राहिल्याविना मसलत होत नाहीं. फौज व हशम पाहिजे ते असल्या खेरीज आंगरे राहिले तऱ्ही मोर्चा घालणार नाहीत. तिन्ही मोर्चे येकदाच घालू म्हणतील याचा काये तो विचार करून मातबर माणूस व हशम सिताबीने पाठवणार माहाराज समर्थ आहेत. मोर्चे कोण कोण पाहिजेत हे सविस्तर हुजरेयानी दृष्टीने पाहिले आहे. विदित करितील. आंगरेयाकडील जमावास त्यांचे पत्र उठोन येणे म्हणून आलेच तर ते परिछिन जातील, त्यासी कटकट करावी कीं जाऊ द्यावे येविशीची आज्ञा लस्करचे सरदारास करणार माहाराज धणी आहेत. रा संताजी जाधव याजकडील पागेची घोडी आजपर्येंत च्यालीस मेली. या दोहो दिवसात आम्हा हुजूर तीन घोडे थोर मेले. तीन च्यार आडली आहेत, यांचा तो केवळ कंठी प्राण[1] आला आहे. जित्रब बुडाले आता आपणच राहून काये करावे यैसे म्हणतात. याची काये ती आज्ञा करावी. त्यांस येक समाधानपत्र पाठऊन

---

१ पीक.

5469

राहात तें करावे. रा भास्कर बावाच्या मनुष्याविषीं सरखेलीस पत्र कीं वरघाटे पाठवणे म्हणून आज्ञा करणार माहाराज धणी समर्थ आहेत. दुर्गोजी भोइटे यांसहि समाधानपत्र पाठवावें, सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This appears to be a report of the conditions prevailing in Maratha army at Gowalkot sent by Govind Khanderao Chitnis to King Shahu who probably had sent him to examine the operations. The report contains a complaint against Manaji and Sambhaji Angria. A copy of the letter appears to have been at once sent to the Peshwa by Purandare.*

No. 328] [*27-10-1735*?

श्री

पुर्वणी राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे. राजश्री बाळाजी विठल येथे आले होते. इंगरेजाकडून दोन नाली थोरल्या मागून घेतल्या. याणी दिल्या. रुपये रोख मागत होतें ते नाही म्हणून फिरून घेतल्या. दिल्या नाहींत. सिदीसादास येथें बोलाविले आहेत. ते येथे आल्यानंतर काय बोली होईल ती सहजच कळेल. सल्याच्या मनसुब्या-करितां स्वांमीपावेतो आम्हास रा केले तर काय उत्तर करावे ? अंगारकाचा यांचा सला तों होईल तूर्त ऐसें नाहीं; परंतु कांही, अंतरी येकी होईल ऐसा पदार्थ दिसोन आला आहे जे, राा संभाजी आंगरे यांणीं च्याळीस हजार रुपये पावेतो खर्चावे आणि इंगरेजांसीं सला करावा, म्हणून नारायणसेटीस सांगितलें होते. त्यास आम्ही सांगितले कीं राजश्री पंत प्रधान यांणीं आम्हास आज्ञा केली आहे, प्रसंगोपात बनों न आलें तर सला उभयतांचा होईल, तर उत्तम गोष्ट होईल. ये गोष्टीस आम्ही मध्यस्त होऊन ठीक करून देऊन ऐसी आज्ञा आहे. ऐसास रा मानाजी आंगरे यांचेंही पत्र आम्हास आलें, यावरून इलाज करायास आदर जाहाला. परंतु येथें द्रव्याचा कारभार आहे. जेव्हां मुदसदी आहेत त्यास हातांत धरावें, तेव्हां सर्व कार्य सजोन येतें. यास खर्चाचे आनकूल आसिल्यावर कडी बसेल. तेव्हां त्याणे सर्व सांगितलें, येवेळेस तों जाब घेऊन गेला. पुढें मागुती येणार, रुपये खर्चास लागले दाहा हजार तरी खर्चावे, परंतु गोडी संपादावी ही खबर इंगरेजास पूर्वीच आली होती. याकरितां वोढून धरिलें आहे. स्वामी-सहि लिहिविले त्याचें उत्तर काय येते ते पाहावे. लिहिल्यांत फार [1]जिव्हाळा आसिल्यावर बरेंच जाले. नाही तर इकडून येईल. तूर्त तें न सोडावे हा हेतु

---

१ वाट झाली, अगत्य झालें

तुन्याचा होता. आतां नवा जनराल जाहला आहे. हा काय करील हें पाहावें. यानंतर हबशाचा कारभार दिसेंदिस निर्द्रव्य होत आला. मराठे तो पिछा सोडीत नाहीं. ऐसामधीं हबशी निर्मूल होईल तर बरें. परंतु इंग्रजांनीं रुपये दिले ते बुडतील. मराठ्यास लिहिल्यावर बदनामोशी[1] पदरीं पडेल, याकरितां युक्तीचे वाटेनें एकवेळ सला होई तो बरा म्हणून इंगरेज इलाज करूं म्हणतात. सिदी साद सला करावयास राजावत नाहीं, याकरितां युक्तीनें येथे आणून प्राबोध करून सला करील तर बरें, नाही तर आपल्या रुपयांची वाट करून घ्यावी, मग मनास मानेल तैसे करुत, ऐसे योजिलें आहे. सेवेसी श्रुत होये. फिरंगी हबशी येक होऊन मनसुब केला. हे चेऊलचा कोट घ्यावयाकरितां गोव्यास गलबत गेले आहे, ते येतां हा मनसुबा होणार. मग तिकडे ठाऊक आहे कीं नाहीं हे नकळे. एक वेळ मराठा सरदार कोटांतील भेदून कोट घ्यावा, ऐसें केलें होतें. अडीच हजार रुपये सध्या घेतले व कोटात लोक होते त्यांस सेरा[2] पाजला, मस्त केले, त्यामधी दोगाचौघांनी घेतला नाही. संध्या कालीं पारके रान पाहतांच एकजण नागाव्यास स्वारी होती तीस बोलाऊन घेऊन आला. येतेसमई करणा जाहला, तैसी फिरंग्याची स्वारी येऊन पोहोचली. ते स्वारीस करण्याची खूण सांगितली होती. येथे येतांच पारके रान पाहिल्यावर स्वारी फिरोन गेली. सकाली कुलाब्यास लिा तेथून हुकूम आला. घर खटले अडीज हजार रुपये सांपडले म्हणून खबर आहे. पुढें काय होईल तें सहजच कळेल. सेवेसी श्रुत होय. उदीम व्यवसाय करावयास आलों हे तो जाहीर जाहलें आहे, दहा जण खरीदी प्रोख्त करितात त्याबाा थोडीबहुत आपण न केली तर सर्व ठकवाठकव दिसते. राा रामाजी रंगाजी बाा धंदा तर प्रघट करितां कार्याचा नाहीं. तेहि रुपये अद्याप हातास न येत. दोन तारवें भरून तयार जाहलीं. राजश्री नारायण जोशी यांस पत्र येक राा वासुदेव जोशी यांचे होतें, कीं रुपये पांच हजार पोहाचते मुंबैस द्यावे. ते जुने रुपये देतात. येथें आणल्यावर तोटा फार पडेल, म्हणून इंगरेजी रुपये तेथूनच पाठवावे म्हणून पत्र असोन, सर्व ढिली जाहली आहे. या गृहस्थाचे कार्य भरवशानें फसल्यासारखें जाहलें. आमच्या वचनाचा विश्वास उडाला. फिरोन लिहिलें आहे. काय करतील ते पहावें. येथें मनुष्य ठेवायास राजश्री जोशी यांणीं कबूल केलें म्हणून रुपयेहि घेऊन आलों. त्यास न माणूस न पैका, ऐसे वर्तमान येथील. पुढें काय आज्ञा होईल तैसी वर्तणूक आचरों. प्रथमच विनंती केली होती, दूरदृष्ट देऊन, परंतु न चालर्ल अद्याप सेवटास लावायास स्वामी समर्थ आहेत. राा रामाजी रंगाजीने तीन

१ दुर्लौकिक. २ दारू.

गुराबा माडल्या, त्यास तीहीवर वाटून रुपये द्यावे म्हणजे जोखीम वाटले जाईल. एकीकडे कार्याचें नाहीं, कोण वेळ कैसी आहे म्हणून योजिलें, परंतु श्रीच्या चितास येतें तें खरें. येक अद्याप भरायास राहिली आहे. अश्विन वदी सप्तमीपावेतों नाणे आणतों, बोलिलों आहे. रुपये आले तर देऊं. न आले तर हातचे काम जाईल. येथें हरकोणी राहूं देणार नाहीं. आम्ही भरवसा देऊन फसविलें, इतुकें राहेल. सेवेसी श्रुत होय, याकरितां परस्परें दुसरा धंदा करिता म्हणजे आम्ही निर्भय असतों. स्पष्ट लिहितां क्रोध येऊ सेके. न लिहिलें तर स्वामिकार्य नासेल ऐसें घडलें आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter to the Peshwa from Bombay; reporting British intervention on behalf of Sidi Sat.*

No. 329] [*30-10-1735*

पो छ २८ जमादिलाकर.

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसीं

आज्ञाधारक सुभानजी माणकर मुकाम तलागड चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत विज्ञापना. तागायत छ २४ माहे जमादिलाखरपावेतों स्वामीचे कृपेअवलोकनेंकरून सेवकाचें व राजपूर प्रांतींचें वर्तमान येथास्थित आहे विशेश. राजकोटामधें वलंदेजाने माल कांहीं उतरिला. तूर्त सिदी याकुत याचे हवेलीमधें ठेविला आहे. खोकरीस सेखजीचे हवेलीवर काम चालतें जालें. तेथें हवेली बांधणार वलंदेज येथें यावयासी कारण तिर्कमसेट गुजर याण्हे जंजिरायासी लेहून हबशाचा कौल घेऊन आपण जामीन राहून आपलें पत्र व हबशाचें पत्र यैसीं सुर्तेस पाठऊन वलंदेजास घेऊन आला. यैसें वर्तमान आहे. तिर्कमसेट याण्हे येव्हडे खेल केले आहेत. रंगोबा नाईक साष्टीस राहातो त्याचा भाऊ व वसईस येक उदमी ब्राम्हण आहे तो यैसें दोघेजण सुर्तेहून वलंदेजाबराबर राजपुरीस आले. त्यास येक लाख रुपयेचे तांबे दिल्हे. आद्यापि सावकार तांबे घेऊन गेले नाहींत. गलबतावर भरिले आहे. घेऊन जाण्हार आहेत. फिरंगी चाळीस आसामीनसी जंजिरांत आहे. वलंदेज यासी च्यार मेजवान्या हबशानें केल्या. येकक प्रहर प्रहर फिरंगी आणि वलंदेज जंजिरेयांत बसोन खलबतें करीत बसतात. फिरंगी याचे गलबत हालीं बंदरीं नाहीं. सडा आहे. परंतु बाजारी खबर आहे कीं आपलीं उत्तरेस स्थलें ज्यळांतील आहेत त्याकडे जाणार

येथें आश्रय करून पुढें कामकाज जेथें साधले तेथें करावें हा विचार आहे. वलंदे(जानें) माल राजकोटांत उतरिला आहे, परंतु अद्यापि कोण्ही गिरायेक जाऊन घेऊं लागले नाहीं. माल किरकोल देत नाहीं. हबशाची परिछिन नजर फिरली यैसा प्रकार दिसोन येतो. वलंदेजानें हबशाजवल बोली केली आहे. बंदरीं माझा माल विकेल त्यास सेंकडा पावणे दोन रुपये जकात घ्यावी यैसा करार केला आहे. प्रस्तुत म्हैसल तपेयांत माहाराज जंजिराचे बोलावणे आलें आहे कीं तुम्हीं जंजिरा येणे. चाकर करून उस्तवारी करितों. यैसें वर्तमान आहे. हबशास वलंदेजानें सांगितलें कीं पैका देतों. लोक नवे चाकर ठेवणें. यैसी बोली जाली आहे. याजकरितां से दोनसें पाईचें माणूस घेऊन स्वामींनी लौकर यावें. येथें आलियावर साराच रंग नजरेस लागेल. सेवेसीं कलावें. मुलकी जमाबंदी होणें याजमुलें वसूल बाकी टटली असे. पलीकडील मुलूक मोकला जाला, याजमुलें रयेत किरकोल जात आहे, तर स्वामींनी प्रतिपदेचे मुहुर्ते स्वार होऊन यात्रयाचें करावें. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Subhanji Mankar reports to the Peshwa that the Sidi has effected a alliance with the Dutch, who have brought goods from Surat for sale a Janjira.*

No. 330] [*October 173*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. पूर्वी राजश्री बालोजी डुबल राजश्री संभाजी राजे यांकडे पाठविले होते. त्यांनी तेथे जाऊन त्यांस सांगून राजश्री भगवंतराव यांजकडील फौज सरखेलीचे मुलकांत उतरून धामधूम करितात. ती न करावी इतके करून आले. पुढे जे होईल ते पहावे. विदित जाहले पाहिजे. सेवेसी श्रुत होय विज्ञापना.

¶*Parandare to Bajirao and Chimaji, informing them of Baloji Dubal havin been sent by the King to his cousin Sambhaji for preventing the forces o Bhagwantrao Amatya encroaching upon the territory of the Angria.*

5473

No. 331] [2-11-1735

श्री

तीर्थरूप राजश्री राऊ
व ताा राजश्री अपा स्वामीचे
सेवेसी

अपत्ये मल्हार तुकदेव कृ(ता)नेक साा नमस्कार विनंती (उ)परी. स्वामीच्या आसीर्वादेकरून ताा छ २७ जमादिलाखर रविवार दीढ प्रहरपरियेंत कुषल आसो विशेष. राजश्री स्वामीनी स्वामीकडे राजश्री अनंदराऊ पंडित सुमंत व चिरंजीव राजश्री माहादोबा पाठविले. त्यास उभयेताची भेटी जाली आसेल. त्यावरून स्वामीचे वर्तमान विदित जाले आसेल. सांप्रत राजश्री स्वामीनी पत्र पाठविले आहे (त्या)वरून शामलाचे वर्तमान त(प)सीलवार विदित होईल. रा(जश्री) पिलाजी जाधवराऊ यास सत्वर पाठऊन दिल्हे पाहिजे. शे * * * * * बलावला याची * * * (स्वा)मीनी केली न पाहिजे स्वामीची केली या स्वामी बहुत संतोषी होतील आणि स्वा(मी)चे कार्य येप्रसंगी बहुत (हो)ऊन येईल. राजश्री आपानी * * दरबारास यावे उतम गोष्ट आहे. लक्षाचे काम तिकडील * * कून मानिलेस सातारियास पाठऊन द्यावें. मग त्याच्या विचारे जाले तरी राजश्री आपा दरबारास येतील. प्रसंग साधावयाचा आहे, तरी जाधवराऊ यास आगत्य पाठऊन द्यावे. पत्री परिहार लिहिला न पाहिजे. यामध्ये स्वामी धनी आहेत. स्वामीचे जे गोष्टीमध्ये स्वहित बहुत ते लिहितो. विदित (जा)ले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Malhar Tukdeo intimates to the Peshwa the wish of King Shahu of finishing off the campaign against the Sidi—which can only be done by despatching Pilaji Jadhav to the seat of operations. " The presence of Chimaji Appa at Satara will greatly facilitate work ", says the writer.*

No. 332] [5-11-1735

पैवस्ती छ ३० जमादिलाखर.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

विनंति उपरी. राजश्री रघुनाथजी प्रभु यांच्या बाइकांचे मुक्ततेविषीं राजश्री गोविंदराव व भास्कर वैद्य यांस पत्रें लेहून स्वामीनी येथें पाठविलीं तीं राजश्री

जिउबा चिटणीस यांस दाखऊन राजश्री स्वामीचे सरकारचा जासुदांचा जोडा काहीं परियाये[2] लाऊन मागून घेऊन स्वामींचीं पत्रें व राजश्री जिउबांची पत्र गोविंदरायाकडे रवाना केलीं. विदित जालें पाहिजे. राजश्री जिउबांचे पत्राचीं उत्तरें स्वामीस येक व राजश्री रघुनाथजीस येक यैसीं दोन घेऊन स्वामीकडे पाठविलीं आहेत त्यावरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Raghunath Hari's family was kept in confinement by Sambhaji Angria. Bajirao and Chimaji are being requested to effect their release.*

No. 333] [*8-11-1735*

पो छ १० रजब.

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपासाहेबांचे सेवेसी

विनंति यैसी. छ ३ रजबी राजश्री संभाजी आंगरे सरखेल कुलाबेयाहून आरमार सहवर्तमान जंजिरे सुवर्णदुर्गी यावयासी श्रीवर्धनचे बारेयावर आले. तों सिदीसाद सुभेदार यांहीं अंजनवलीहून किले मडगडी (?) सूत्र केले. आणं श्वारी नेमिली व पालगडीहि फितवा केला. त्यास अंजनवलीहून पालगडास पाये मार्गे आले. गलबते केलसीस लावावी यैसे योजून सिबाडावर भगवी निशाणे लाऊन केलसीस येता बारेयावर हाक मारून सरखेलची * * खाडीत यत होती तो आमचे चौकीदार लखमाजी खडा * * त्याही खबरदारी करून बरखंदाजी केली, तो लोकास सुचे[3] शामलाची गलबते यैसे जाले व बांहेर सरखेलहि आले. उपरांत शामल फिरोन माघारा निघाला. त्याची व सरखेलीची लडाई दोन दिवस जाली. शामलाची गलबते थोर २ व लाहाने २ यैसी च्यार तरांडी धरून सुवर्णदुर्गी नेली. कदाचित मंडणगडची कार्याची सिध होती तर सारे अरमार खाडीत किले * * रियावे यैसे योजिले. तो त्याची कार्याची सिध जाली नाही. श्वामीचे पुणेकरून परस्परेंच फजीत पावोन गेला. सेवेसी श्रुत होई हे विज्ञाप्ति. शामलाचे लोक आजमासे तीनसे सरखेलीकडे सापडले, साडेतीनसे आहेत. सेवेसी श्रुत होई * * *

¶*The news of Sambhaji Angria's victory over Sidi Sat in a skirmish in the creek of Kelsi is reported to Chimaji Appa.*

---

१ मृ. ७-१-१७४३.

२ परियाय-पर्याय-सबब.

३ सुचें = (नाम) सूचना.

No. 334] [8-11-1735?

पौ छ ११ रजब.

नकल

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक मानाजी जाधव व दुर्गोजी भोईटे कृतानेक विज्ञापना यैसीजे. ताा छ ३ रजबपावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी बरची बारदार याजबराबर ताबडतोबीनें आज्ञापत्रें सादर केली व रा संताजी जाधवराऊ यांस. च्यार दिवस राहावयाची आज्ञा केली. ऐसियासी त्यांची अवस्था बहुत कठिण होती. त्याहीमधें त्यानी माहाराजांची आज्ञा यावी म्हणून बहुत दिवस वाट पाहिली. यामुळे शरीर बहुतच जडकावले. तो कृपा करून मुद्रा पाठविली ते सिरीं वंदोन ते छ ३० जााखरी स्वार होऊन गेले. तो छ २ रजबी अस्तमानी ही आज्ञापत्रें आलीं तीं मस्तकी वांदिले. बहुत संतोष. ऐसियासी छ २ रजबी प्रहर दिवसा सिदीसाद बावीस गलबतेनसी येऊन दोन अडीच हजार जमावानसीं दाखल जाला. दोन प्रहरपर्यंत खुशालीच्या तोफा सोडिल्या. आमचे लस्करचा विचार तो वारंवार सेवेसी लिहिलाच आहे. छ मजकुरी येथून उठोन पिपलीवर यावयाचा करार सर्वांचा होता. ऐशास माहाराजांची आज्ञा कीं पागेवरील जागा न सोडणे व सिदीसाद आला आणि आम्ही निघालों म्हणजे आमचाहि आब जातो. गनीम सेर होतो. माहाराजहि म्हणतील कीं गनिमास भेटोन पळोन आले. ऐसे चहूकडून संकट जालें. यामुळें च्यार प्रहर रात्र तयार होऊन गोटाबाहीर निघोन बैसलों. पुढें स्वारांचे छेबिने[1] ठेविले. परंतु गनीम जोरावर, या सामानास जुमानतो ऐसे नाहीं. त्याहीमधें तो दगेखोर. रात्रीचा दगा करणार. गवत रानामध्यें बहुत, जागा अवखोदा[2]. राऊताचा इलाज नाहीं. गवत जाळावें तो वोलें आहे. जो पावेतो आमच्यानें सोसवेल तो पावेतों सोसून. लस्करचे सामानामधें मुतलख जीव नाहीं. त्याही मध्यें बहुतेक लस्कर अजारी आहे. बाजार व आजारी नाहाक मारले जातील. आमचा बदनक्षा होईल, यामुळें माहाराजांचे फौजेचा प्रसंग विर्धे[3] जालिया हाही नंग स्वामीचाच आहे. आम्ही तों सेवक सेवाधर्म करावयाचा तो जिवादारभये करून. त्यास अंतर करितों ऐसे नाहीं. माहाराजानीं तो आज्ञापत्री दोन हजार हशम व दोन हजार फौजेची रवानगी वरचेवर केली आहे, परंतु सातारियापासोन

---

१ टेहळणीची चौकी. २ अवघड. ३ विरुद्ध.

कोइनकाठ पावेतोच मोर्चेबंदी जाली आहे. गोवलकोटची मोर्चेबंदी ईश्वराआधीनच आहे. यास उपाय आहे ऐसे नाहीं. जो इकडे सरदार साहेब रवाना करितात तो मार्गींच बेहिमत होतो. याची पैरवी माहाराज बेमुलाहिजा करवितात आणि उद्यांचे दिवसीं येऊन दाखल होतात तर उत्तम आहे. आम्ही आपली सिरी च्यार दिवसीं आज्ञेप्रमाणें बरें हो अथवा वाईट हो परंतु सोसितों. निदान उठोन घाटावर येतों. मधें राहतों ऐसें नाहीं. या उपरी माहाराज धणी आहेत. तूर्त फौज ये तें अति सत्वर करावें. चौ रोजा राा पिलाजी जाधवराव यांस रवाना करावें व राजश्री संभाजी आंगरे यांचे आगमनाचा विचार करऊन एक वेळ पुर्ता येलगार करऊन गोवलकोठचा शहनिषेह या माहिनियामधें करून घ्यावा किंवा चौकीच ठेवणे असेल तरी माहाराजानीं पिपलीवर आज्ञा करावी ऐसे आहे. येथें आणिक पांच हजार फौज आली तरी उपाय नाहीं. उभयेतां येतात तर हरएक येत्न होऊन दोन्ही स्थळें हस्तगत होतात. उभयेतां येत नाहीं तेव्हां किलेहि येत नाहीं. सेवेसी श्रुत होय. राा गोपाळराव याजकडील हषमाचे खर्चास तीन हजार पैकीं तीनसे रुपये देविले ते आज्ञेप्राो दिल्हे. परंतु हुजुरचे जेजाल बारदार असामी १५ पंधरा आहेत, त्यांचा दरमहा रुाो ९६ मागतात. याखेरीज हशम आहे व त्याचा खर्च आहे त्यास काय द्यावें? तीनसेंमध्यें कांहीं होते ऐसे नाहीं. तूर्त दिविल्याप्राा दिल्हे. पुढें आज्ञेप्रमाणें वर्तणूक करूं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ती.

¶*Manaji Jadhao writes to Shahu news from Gowalkot.*

No. 335] [*12-11-1735*

श्री

तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आपल्ये मल्हार तुकदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ ७ रजबपर्यंत स्वामीच्या आशीर्वादेकरून येथास्थित असे विशेष. राजश्री संभाजी आंगरे सरखेल यांचे पत्र आलें त्याची नकल स्वामीकडे पाठविली आहे त्यावरून विदित होईल. तीर्थरूप राजश्री राऊ कोठवर गेले हें वर्तमान लिहिलें पाहिजे. राजश्री गोविंदराव व भास्कर वैद्य अद्यापि येथे आले नाहीं, आणि त्याचे पत्रहि आले नाहीं. तिकडून तिकडे गोवलकोटास गेले असतील की काय ते नकळे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Malhar Tukdeo sends to Chimaji Appa a copy of a letter received from Sambhaji Angria and requests him to write regarding the whereabouts of Bajirao, Govindrao and Bhaskar Vaidya.*

No. 336] [3-12-1735

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक हरि गणेस नामजाद किले बाणकोट सा। नमस्कार विनंती. ता। छ २८ माहे रजबपावेतो सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान येथास्तित असे विशेश. शामळ हेर्टे गेला होता तो काल छ २७ मिनहूस केलसीचे व ओव्याचे खाडीत येऊन लाग(ला). गावसीव जाळिले. अद्यापि का। मजकुरी राहिला असे. पायेवाटेने किले मंडणगडाखालीं काल रात्रीस दीडसे माणूस गेले. आज छ मारी सकाल येकसे मानूस जाऊन रानामध्ये दबा दिला असे. केलसी आसपासचे तों गाव जाळिले. अद्यापि केलसीचे खाडीतून निघत नाही व बातमी आली आहे कीं राजश्री संभाजी आंगरे सरखेल याची व सिदीसाद याची बोली जाली. बोली करावयासी खुसमहमद आला असे. बोलीमध्यें करारी फतेगड हरणैचा मागत होतां. त्यास फतेगड संभाजी आंगरे देत नाहीं. मंडणगड व विजयगड दोनी किले (नूतन) शामळाजवळील घेतले ते द्यावे, आण सला करावा. त्यास किले येकदांच येकादोन दिवसात किला द्यावा तों राजश्रीं . ची अवकृपा होईल या करितां च्यार दिवस वेढा घालावा, आण लौकिक करून किला घ्या यैसी करारी करून किले मंडणगडाखाली लोक गेले आहेत. किले देऊन सख्यत्व करावें. निमित्य मानाजीस आपण पाठीस घातले आहेत. दाणा गला येत नाही, या निमित्य किले देऊन सला करावा आण आपण व शामळ व इंग्रज फिरंगी येकत्र होऊन कुलाबेयाकडील प्रांत सोडावा, यैसी खबर असे. खबर यावयासी कारण जे आमचा आत्मिक[२] राजपुरीस असे, त्याहीं सागोन पाठविले व हरणईसहि येक आत्मिक होता त्याणे सांगोन पाठविले की ही खबर खरी असे. तुम्ही सावध राहाणें. याची साक्षहि दिसोन आली. खुषमहमद शामलाकडे आला असे. शामल केलसीस राहिला, आण लोक मंडणगडाखाली पाठविले आहेत. थोर व लहान तरांडी वीस आमचे किलेयासनिध राहिली असे. आइकले व देखिले वर्तमान सेवेसी लिहिले असे. कृपालु होऊन काही राऊत व काही लोक व दारूगोली सत्वर येऊन पावली तर किला मंडणगड वाचेल, आण बाणकोटासहि अपाये होणार नाही. तर कृपाळु होऊन राऊत व लोक व दारूगोली सत्वर पाठवावी. आम्ही तों तीनी ठिकाणें धरून बइसलो आहे. मंडणगड गेलियानें बदनक्ष होईल आण आम्हासहिं उभे राहावयासी जागा होणार नाहीं. येकीकडे खाडी, येकीकडे दर्या, व येकीकडे मंडणगड व येकीकडे सुबर्ण-

---

१ दक्षिणेस. २ विश्वासु माणूस.

दुर्ग याा ये प्रसंगी आम्हास येकहि मार्ग नाहीं. या करिता विनती लिहिली असे. तर सरंजाम करून तिसरे रोजी अगर चवथे रोजीं सामान व कुमक येऊन पावे तो करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Hari Ganesh Killedar of Bankot reports to the Peshwa the arrival of the Sidi at Kelsi and his depredations in the adjoining territory. The writer also mentions the negotiations started by Sambhaji Angria with Sidi Saat.*

No. 337] [*Received on 3-12-1735*

पो छ २८ रजब

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
आपा स्वामीचे सेवेसीं

विनंती यैसीजे. सिंदीसाद राजपुरीहून थेट विजयदुर्गपावेतों गांव जाळीत गेला, बाणकोटाजवळील केलसी, वेसवी व नाली पालवण तिनी माहाल वसले आहेत त्याची खबर घ्यावी यैसी बातमी आली; आण किले मजकूरचे लोक व खुद आम्ही देखील आजारी पडलों याकरितां राजश्री खंडोजी माणकर यांजकडील लोक पाऊणसें माणूस आणिले असे. पंचमीपावेतों ठेविले असत. पंचमी जालियावर लोक तलेगडास रवाना करितों. स्वामी म्हणतील कीं किले मजकुरीं भरती असोन लोक काये म्हणऊन नेले? तर लोकांस दुखणी लागली. याकरितां लोक आणिले. सेवेसीं विदित होईल. व पेसजीं गला विकत घ्यावयाची आज्ञा जाली होती त्यावरून सेवेसी विनंती लिहिली कीं पैका आला तर गला घेऊं. त्यास आद्यापि कृपाळु होऊन पैका पाठविला नाहीं. गला तों किले मजकूरचे भरतीस जरूर असिला पाहिजे. त्यास किले मजकुरींहून माहाडास गला करार करावयासी माणसें पाठविली असेत. संभर खडी पावेतों गला माहाडास करार केला असे. कृपाळु होऊन गलेयासी पैका पाठवावयाविसीं आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. अकरा बारा रुपयांचा पाड असे. दिवसेदिवस दाणे माहाग होतात, पुढे दाणे मिळणार नाहीं. कल्याण प्रांताहून आणावा लागले, तर पैका पाठऊन किले मजकूरची बंदोबस्ती करवणार स्वामी समर्थ आहेत. व सिदीसाद यानें रसालगडची पेठहि मारून कांहीं माणसें व गुरें घेऊन गेला. सांप्रत खुशमहमद राजश्री संभाजी आंगरे याकडे बंदी होता, तो सोडून सिदीसादकडे पाठविला असे. सरखेल व शामल सला करणार यैसी खबर आहे व

खुशमहमद तों करार अजनवेलीस आला असे. उभयेतां सला करावा यैसें असे. सेवेसी विदित होईं हे विज्ञप्ति.

¶*Hari Ganesh gives Chimaji Appa news of the trouble created by Sidi Saat on the coast between Rajpuri and Vijaydurg, and asks funds for buying corn.*

No. 338] [*15-12-1734 ?*

छ ६ साबा

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनीत सेवक कृष्णाजी राम सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील कुशल ताा छ २९ रजब मुाा जंजिरे मुंबै स्वामीचे कृपाद्रिष्टीकरून यथास्थि(त) असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र घेऊन रवाना छ १३ रजबी छ १० मिनहू लिहिलें तें, जोडी छ २६ रोजी सुखरूप पावली. सर्व अर्थ ध्यानात आणून कायार्थ बिबविला. यैशास सेवाधर्म आहे; आज्ञा रक्षावीच लागते. मित्रत्वलक्षणे सांगोन पाठवावें हे योग्यच आहे. सर्वाचे मस्तकीं ईश्वर आहे; ज्यास देईल त्याणे घ्यावे. खानजाद्याचा मजकूर तर खावंदगिरी खानजाद्याने करावी व कारभार सिदीसाद याणी करावा तो चालतच आहे, येंविसी तफावत आम्हास तों दिसोन येत नाही. सख्यत्व प्रसंग होता तर आपल्याहि प्रत्ययास येतें. खायास नाही म्हणू(न) ते हैराण होतात हेहि गोष्ट परिणामी कळों येईल. आपण येता म्हणून येखादा किला देऊन सला करितील हेहि गोष्ट तशासारखीच आहे. हरयेक प्रकारें प्रजा सुखी राहावी, दंद+ होतसेल तें तों भल्यानी दूर करावें, मैत्री योजोन द्यावी म्हणून हेतु होता. यैशास ध्यानास न ये तर चितास येईल तें करावें. साहित्य करावे न करावें हे प्रथमच आद्यंत आपणास जाहीर आहे, येविषई प्रत्योतर वारंवार काये करणे? हबशाचा आशय सला करायाचा अजंनवेल गोवलकोट रक्षायास्तव. नाही तर हबशी येक जंजिरा मात्र होता तेव्हा यजीज२ आला नाही, तो आतां येतो यैस दिसत नाही, मग नकले. लांक्ष१ खुशकीच्या किल्यांची; या हंगामांत येश संपादून घ्यावे उचित होतें, यैसे असोन चितास आपल्या न ये त्यास उपाये काये? कपितान इंछबर्दविसीं लिहिलें ते हमेशा लिहितच आहेत. आम्ही भरवसा धरी-

---

१ निश्चितपणें. + भांडण, द्वंद्व. २ अजीज = दीन.

तच आहों. सुखरूप जेव्हा तुमच्या चितास येईल तेव्हा उतर प्रत्योतर केले जाईल. छ २७ रोजी थैली जुने जनराल यास व आम्हास आली ती त्याची त्यास दिली. आमचे थैलीचें उतर सादर होता संक्षितें सर्वार्थ अवगत होईल, यैसे नवे जनराल बोलिले. सेवेसी श्रुत होये. बाणकोटच्या तावडा सोडविला हे उचितच केले. येणेकरून सर्व अभीष्ट इछितील. जगत्रात नाद गेला आहे तोहि दूर होईल. उतम गोष्ट जाहाली म्हणून लिहविलें असे. सेवेसी श्रुत होये. अजम जुने जनराल याणी फार दुवा सांगितली आहे. आम्लवातें पायास (दु:ख) येणें (करून) फार जेरदस्त आहेत. पुसत होते, विलायतेहून अपेक्षित कांहीं लिहिलें, कीं काये? त्यास सविस्तर सांगितलें, उतर केले, येविसी नवे जनराल उतर करितील तेंच आमचे समजावे. मित्रत्वविषई अपेक्षित असेल तर सिद्ध आहें, यैसे लिहविले असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News-letter from Bombay to the Peshwa referring to Maratha plans to conquer the Sidi of Janjira. Captain Inchbird is mentioned in the letter.*

No. 339] [*7-12-1735*.

पो छ ६ साबान.

श्री

तीर्थरूप राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

अपत्यें माहादाजी अंबाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागाईत छ ३ साबान परियेंत येथास्थित असें विशेष. स्वामींनीं रिकिबदारां-बराबर राजश्री स्वामीस पत्र पाठविलें त्याचें उत्तर प्रस्तुत लेहून मागती दुसरे रिकिबदार आपल्याकडे पाठविले आहेत. तरी याउपरी विलंब न करितां राउताची रवानगी केली पाहिजे. कोंकणाच्या किल्ल्याचा खर्च आपणांवरी पडतो म्हणून तपसिलें लिहिलें, त्यावरून राजश्री स्वामी बोलिले कीं संपूर्ण राज्य-भाराची इमारत तुम्हावरच आहे. सर्वाविसी भरवसा तुमचाच आहे. राज्यास संकट पडेल तें तुम्हाविितिरिक्त कोण वारणार? प्रस्तुत गोवलकोट घेऊन शामलाचा उपमर्द करावा हें आम्हास अगत्य आहे. तरी आम्हांस अगत्यवाद तेच गोष्ट तुम्ही सर्व प्रकारें कष्ट मेहनत करून करावी, हें तुम्हास विहित. तदनुरूप तुम्ही मागेंहि करीत आला आहां व पुढेंहि कराल हा भरवसा आहे. तरी या उपरी सर्व गोष्टी येकीकडे ठेऊन राऊत पाठवणें यैसें बोलिले व आम्हांस आज्ञा केली कीं सदरहूप्रमाणें तुम्ही लेहून राऊत येत तें करणें. त्यावरून हें पत्र

लिहिलें असे. तरी याउपरी राऊत पाठवावयासी येक घडी विलंब न करावी, खामखा राऊत पाठवावें. विदित जालें पाहिजे. सेवेसी विदित होय हें विनंती.

¶*Upon Chimaji complaining about his inability to bear the heavy burden of expenses of the war, Shahu flatters him by saying : " The whole edifice of the Maratha Raj stands on your shoulders ; why talk of the expenses of the war only. Whenever any trouble comes to the Raj, the minister alone has to remove it. You must accomplish my great object of conquering the Sidi ". Mahadaji Purandare writes this from Satara.*

No. 340] [*Received on 8-12-1735*

तालिक

पा छ ४ साबान

श्री

श्रीमंत रा मानाजी बावा हवालदार
व कारकून किले प्रतापगड गो यांसी

आज्ञाधारक माहादाजी अनंत कृा रामराम व आा साा नाा विा. सुरु सीत सलासीन मयां अलफ. शामलाने बाणकोट हस्तगत केला हे वर्तमान तहकीकात आहे. आजी पाच तारेयावरी भांडी मध्यनरात्रीस जाहाली आणि शामल पुढे येणार हे वर्तमान कलावे म्हणून लिा आहे. आम्ही आणि आंगरेयाचे सिपाई यैसे रानांत असों. विदित जाहाले पाहिजे. बहुत काये लिा. गोंदजी काढोलकर मुखवचने सांगता साकल्य वर्तमान कलेल. हे विज्ञापना.

¶*Manaji Bava Hawaldar of fort Pratapgad is informed by Mahadaji Anant of the capture of Bankot by the Sidi.*

No. 341] [*About 8-12-1735*

तालिक

श्री

राजश्री पिलाजी जाधवराव यांसी आज्ञा केली ऐसीजे. बाणकोटचे वर्तमान आल्यावरी स्वामीनी तुमची रवानगी केली. जातेसमई तुम्ही बहुतच बोलोन गेला, त्याप्रमाणे रा चिमणाजी बलाल यांस सांगोन त्याचा निघावयाचा विचार केलाच असाल. माहाड कायम आहे. हुजरून कुमक रवाना केली ते दाखल जालीच असेल. आणखी वरचेवर कुमक स्वामी रवाना करीतच आहेत. रा चिमणाजी

बलाल फौजेनसी उतरतात याजकरितां गोवलकोटची फौज माहाडचे रोखे आणविली. रा त्र्यंबकराऊ सोमवंसी सरलस्कर फौजेनसी पारास दाखल जाले. ऐसियास रा चिमणाजी पंडित व तुम्ही कोणे दिवसी पुण्याहून स्वार होता; कोणते घाटे उतरणार, माहाडानजीक कोणे दिवसी येणार, हें वर्तमान हुजूर कलावे. तुम्ही माहाडास दाखल व्हाल तेच दिवसी सरलस्करानी व गोवलकोटचे फौजेनी तुम्हास सामील व्हावे याजकरितां हे आज्ञापत्र सादर केले आहे. तरी तपसीलवार लेहून पाठवणें. इकडील फौजांची व तुमची गाठ येकेच दिवसी माहाडावर पडे ऐसे निश्चयात्मक लेहून पाठवणें. तुमचे पत्र येईल त्याप्रो सरलस्करास गोवलकोटचे फौजेस आज्ञापत्रें रवाना करून तुम्हास सामील केले जातील. बोलोन गेल्या प्रो वर्तणूक करणे. बहुत काये लिहिणे.

¶*Pilaji Jadhav is commanded by King Shahu to proceed to Mahad along with Chimaji Appa and subdue the Sidi.*

No. 342] [*10-12-1735*

पौ छ ६ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामी वडिलांचे सेवेसी

विनंती. राजश्री स्वामीनी पंतप्रतिनिधि व राजश्री येमाजीपंत यास अतिसत्वर येणे म्हणून पत्रे पाठविली आहेत व राज्यांतील फौजा तमाम बोलाविल्या आहेत. जितकी फौज जमा होईल तितकी स्वामीकडे पाठवावयाचा विचार केला आहे. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. *

¶*Nanasaheb to Chimaji informing him that Shahu is mobilising forces for his support.*

No. 343] [*13-12-1735*

पा छ ११ साबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनती. रा संभुसिंग जाधवराव यास आणावयास रा देवराव मेघशाम व बहिरोबास छ ८ साबानी रवाना केले ते केले. त्यांजबराबर राजश्री फतेसिंग-

बावाकडील पंचवीस राऊत दिल्हे आणि ब्यारसे मोहरा त्यास तूर्त खर्चास पाठविल्या आहेत. त्यांस येथें आणावे आ(ण) पंचवीस हजार रुपये राजश्रीनी द्यावे व पंचवीस हजार रुपये राजश्री फतेसिंगबावानी द्यावे. येकूण पनास हजार रुपये देऊन दोन हजार स्वारानसी कोकणचे मसलतीस पाठवावे. चाकरी जालियावरी पुढें उर्जित करावें यैसा विचार केला आहे. पुढे होईल ते लेहून पाठऊं. ते प्रस्तुत पाथरी परबाणीकडे दोन हजार फौजेनसी आहेत म्हणून वर्तमान आहे. येतील न येत हे न कले. विदित जाहाल पाहिजे. से+वेसी श्रुत होये हे विज्ञापी.

¶*News is sent to Chimaji Appa that Sambhusing Jadhaorao was called by King Shahu into his presence in order to work in the campaign against Sidi.*

No. 344] [*About 15-12-1735*

श्रीरामचंद्र

सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मी-
आलंकृत रामाजन्य राजश्री चिमणाजी
पंडित स्वामी गोसावी यासी

पोष्ये आनंदराव रघुनाथ कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये लिहीत आसिले पाहिजे विशेष. आपण पत्रे पाठविली ते तांदली काष्ठीचे मुकामी प्रविष्ट होऊन लेखनार्थ कलो आला. आपण शामलाकडील वर्तमान लिहिले. माहाडास लोक मंगलवारी पाठविले, त्याचे पावलियाचे उतर सौम्यवारी आले. हे गोष्ट उतम केली. यैसियासी आम्हास व राजश्री माहादाजी आमृतराव यासी राजश्री देवजी सोमवंसी हिंदुराव याजकडे पाठविले. त्यास याचे नातवानकीचा प्रसंग लिहावा यैसे नाही. यैसियासी मारनिलेचे बहुत प्रकारे समाधान करून भीमातीरास सांगवीनजीक मोकाम केला. याजउपरी कूच करून आम्ही सातारियासी जातो. मंडणगडास वेढा शामलाने वेढा घातला याचा विचार आपण काये केला? मंडणगड शामलाचे हातास गेला म्हणजे फिरोन हस्तगत व्हावयाचा विचार नाही. तरी राजश्री पिलाजी जाधवराव सातारियाहून गेलियाउपरी कोठे आहेत? पुढे कोण विचार तो सविस्तर लिहावा. वरकड

+ पत्र नानासाहेबांचें साताऱ्याहून.

सविस्तर वृत राजश्री माहादाजी आमृत लिहितील त्यावरून कलों येइल. बहुत कायें लिहिणे लोभ असो दीजे हे विनती.

¶*Anandrao Raghunath informs Chimaji Appa of his own movements and requests him not to allow Mandangad to be captured by the Sidi. He makes enquiries about Pilaji Jadhao's whereabouts.*

No. 345] [*16-12-1735 ?*

पौ छ १२ साबान

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा स्वामींचे सेवेसी

सेवेसी विज्ञापना. सांवजी तुपे याजबराबर नालमेख नालडबे ८० व मेखा ४००० च्यार हजार व नालबंद रवाना केला म्हणून लिहिलें. यैसियास आम्ही निघालियावर राऊत आटोपीत आले. नालबंद तळ्यास गेला. आज उदैक आम्हाजवळ पोहोचेल. रा खंडोजी मानकर फौज घेऊन गोरेगावाकडे गेले. तुम्ही किला राहिला, सडे कीं फौजेनसी राहिला, तें लिहिले. बाणकोट घेतला यैसे वर्तमान ऐकोन खंडोजी मानकर श्वारीचा बाहाना करून पायेचे हशेम वीस राऊत आम्हापासून घेऊन कबिला घेऊन मानगडास जातो म्हणून कूरूस गेले. आपण फौजेनसी किले तलागड तेथेच राहिलों. मग आम्हास पत्र लिहिले कीं पंनास साठ राऊत पाठऊन तुम्ही तेथेच राहणे; परंतु आपण किले तळा येथे शह असावा याकरितां रा जगंनाथपंत पंचवीस स्वार व निशाण ठेऊन आपण गोरेगावाकडे वरकड फाजेनसीं महाडच्या उदेशें आलों. तें वर्तमान खंडोजी मानकर यानीं यैकूण मानगडीहून येऊन आपणास माघारे नेले. तेथे पत्र पावताच स्वार होऊन आलों. त्यानी स्वामीस लिहिले असेल कीं आपण फौज घेऊन फिरतों; आणि विठलपंत किल्यास ठेविले, यैसे लिहिलें असेल तर ते थोर माणूस आहेत! सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer Vithalpant makes a complaint against Khandoji Mankar to Chimaji Appa.*

No. 346] [*19-12-1735 ?*

पौ छ १९ साबान.

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामींचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १९ साबान जाणून स्वकीये लखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आम्ही स्वामीची आज्ञा

5485

घेऊन स्वार जाहलो ते समई आपण बोलिले कीं सविस्तर मागाहून लेहून पाठवितो. त्यास आम्ही मौजे खंडालियास आलो तो तेथे मकबूल अलम याचे व कर्नालकराचे पत्र आले ते स्वामीकडे पाठविली आहेत, त्यावरून सविस्तर कललेच असेल. त्यास तेथें राजश्री नरसो कुकाजी आले आहेत त्यांची आपली बोली काय झाली? मकबूल अलम लोक पाठवितात की नाहीं, हे साकल्य लिहिले पाहिजे. वरकड आम्ही परवा येथें पनवेलीस आलों. त्यास कर्नालकराचे वर्तमान मनास आणितां राजश्री मानाजी आंगरे याचे लोकांनी कानडोळा केला; याकरितां रयेतीने चालीस पनास खंडी गला किलियावरी नेला; व पूर्वीचाहि गला किलियावरी आहे. गलियाकरितां कर्नालकर साच्यार महिने आयास येतो यैसे नाहीं. येसियास आपले विचारे केवल निग्रह करणे येसेच असेल, तरी जे करणे ते आपले बले करावे, दुसरियाचे भरंवसा धरावा येसे नाहीं. तरी ये गोष्टीचा दृढतर विचार चितांत आणून, जे आज्ञा करणे ते करावी. त्याप्रमाणें वर्तणूक करून उतर सत्वर पाठविले पाहिजे. बहुत काये लिहिणे, लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi reports to Chimaji Appa his arrival at Panwel and after detailing the state of affairs at Karnala and the indifference of Manaji Angria requests him not to depend on others to check the efforts of the enemy.*

No. 347] [*20-12-1735?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक विठल सिवदेऊ कृतानेक सा। ना। वि॥. येथील वर्तमान ता। छ १६[१] साबान मु॥ माहाड स्वामीचे कृपेकरून, सेवकाचे व लोकांचे यथास्तित असे. स्वामींचें आज्ञापत्र आलें ते छ १५ रोजीं संध्याकाल पावले. तेथे आज्ञा की खंडोजी मानकराकडील जमाव व तुम्ही राउताचा जमावानसी आलेत. पायेचे लोक तुम्हास पाऊन माघारे गेले. याउपरी तुम्ही माघारें खंडोजी मानकर याजकडे जाणे. त्यावरून आज्ञेप्रा। स्वार होऊन, छ १७ रोजी गेलों. खंडोजी माणकर यांचे लोक केवळ काही आम्हास पोहचावयासच आले होते यैसे नाही. इकडे पायेचा जमाव आला नसेल व आपलेहि आज्ञापत्र याकरितां पत्र पावताच ते व आम्ही स्वार होऊन आलो, की सत्वर

१ पत्राची तारीख लिहिण्यांत लेखकाची कांहीं चूक झाली असावी.

जाऊन उपराला करावा. यैसियास येथे आलियास जमाव पोख्ता जाला होता. सर्वानीच गुंतावे, पुढे हुजरात आलियास जमाव फोडावा, तेव्हा ते नालेश लिहितील आणि आपले राण खाली, शामळ दगेखोर, याकरिता कान्होजी मानकर यास माघारे रवाना केले. त्यांच्या चितात जावयाचे नवते; परंतु विचाराचे वाटेने लाविले. पायेच्या हाशेमाचे जुंज जाले तेच प्रसंगी आवाईस आम्ही येऊन पोहचलो. मार्गासंनिध होतो. हाशेम लोकास त्याचा शेह भारीच होता. लोक फारसे खटे केले होते. फौज जाऊन पोहचलियास उपराला बरासा जाला. रा नारोजी कडू व चिमणाजी बापूजीहि आले. गनीम सरोन[१] माघारा गेला. त्याहीं त्यावर लोकाच्या चितात की जुज रांपऊन घोडे घालावे; यैसियास गनीम ढासनास गेलियास घोडे घालून मारवावे यैसे नाही. गनीम मान्यातून गेला. मग पायेचे जखमी व मुडदे काढून माघारे आलो. आजहि छ १९ रोजी पांचतन्यापावेतो तलावियास गेलो होतो. गनीम संनिध नाही. माघारे आलों. आज्ञापत्र आलियास स्वार होऊन गेलो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति. सविस्तर वृत रा नारोजी देशमुख यानी लिा आहे त्यावरून निवेदन होईल. हे विज्ञाप्ति.

¶*Vithal Shivdeo sends back Kanhoji Mankar with some men to help against the Sidi*

No. 348] [About 21-12-1735

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी यांसी

श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम जाणून स्वकीये कुशललेखनाज्ञा करीत आसिले पाहिजे विशेष. येथील दरबारचे सविस्तर वर्तमान राजश्री माहादाजीपंत याणी सेवेसी लिा आहे त्यावरून विदित होईल. राजश्री स्वामीणी मुजरद जिलिबदारासमागमें राउताबद्दल पत्रें पाठविली आहेत; व राऊत आणवार-याची मर्जी राजश्रींची बहुतच निकडीची आहे. यैसियास राऊत पाठवावे न पाठवावे हा अर्थ पूर्वील पत्री आम्ही लिहून पाठविलाच आहे. प्रस्तुत आमचे विचारे जिलीपदारासमागमे उतर पाठवावे, की महाराजानी जिलीपदारासमागमे राऊताविसी निकडीने लेहून पाठविले. येसियास आम्हास महाराजाविगली जोडी

---

१ चालून किंवा टिकून.

काये आहे? शे दोनसे राऊत पाठऊन; परंतु राजश्री संभाजी आंगरे आलिया-खेरीज अगोधर राजश्री पिलाजी जाधवराऊ व राउतानी जाऊन काये होणे आहे? रा। सरखेली आलियाउपर याणी जाऊन त्याणी व याणी येक होऊन कामकाज करणे ते करावे. इकडेहि ताम्राचा शह आहे. ते येत तोपावतो हाहि शह वारेल. आणि शे दोनसे राऊत पाठऊन देऊन. ते न आलिया राजश्री पिलाजी जाधवराऊ यास व राऊतास पाठविलियान कार्यभागी होऊन येणार नाही; आणि महाराजाचा शब्द लागेल. याप्रमाणे उतर पाठवावे यैसे आमचे मते आहे. यामधे आपल्या विचारे जे लिहिणे ते लिहिले पाहिजे. विशेष काये लिहिणे. कृपा केली पाहिजे हे विनंति.

¶*Pilaji Jadhav asks Chimaji Appa to impress upon the King that it is no use sending him (Pilaji) alone against the Sidi, but that the Angrias should be first compelled to be in the front in this undertaking.*

No. 349] [*Received on 21-12-1735*

पा। छ ६ शाबान

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री आपा
स्वामी वडिलांचे सेवेसी

विनंती राजश्री देवजी सोमवंसी हिंदुराव यांस फौजेसहवर्तमान आणावयास राजश्री सुमंतास व राजश्री माहादाजीपंतास रवाना केले. उदईक जातील. +बहुत काये लिहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे हे विज्ञापना

¶*Chimaji Appa is informed that the King has sent the Sumant to bring Devji Somawanshi Hindurao.*

No. 350] [*23-12-1735*

पा। छ २२ साबान

श्री

श्रीमत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रामाजी माहादेव मो। माहाड चरणावर मस्तक ठेऊन सां। ना। विा। ता। छ १९ माहे शाबान पा। सेवकाचे व लोकाचे वर्तमान येथास्थित असे

+ येथून अक्षर नानासाहेबांचें

विा. बातमी आणावयासी गोपाळ बावाजी व माहादाजी सुर्वे यासी सुवर्णदुर्गास पाा ते छ मारी सेवकाजवळ प्रात:काली आले. त्याणी वर्तमान सांगितले की आम्ही कागद नेऊन राा संभाजी आंगरे यासी दिला; आण तेथील बातमी मनास आणिता शामलाचा व सरखेलीचा सला जाला. काा केलसीस शामलाची व सरखेलीची चौकी बइसली. मुलकात उभयताचे वरातदार हिंडोन वसूल करितात; व कागदाचा जाब सरखेलीचा घेऊन निघाले, तेसमई दोन सिपाई सोबतीस मागितले. त्यास सरखेली बोलिले कीं आमचे नांव सांगोन जाणे; त्याचप्राो गोपाल बावाजी व माहादजी सुर्वे यैसे सरखेलीचे नांव सांगोन पाटेचे आले. मौ निडे ताा पालवण ह्या गावी आले. तों त्या गावी हबशाचे पंचवीस सिपाई होते; येक सरखेलीचा होता. तेथे बहाना करून सरखेलीचे नांव सांगितले. त्यावरून हबशाचे सिपाई व आपणाकडील दाहा सिपाई गावची अडिसेरि घेऊन येका घरी जेऊन येक गावचा वाटकाड्या घेऊन आले. शामळाचा आण सरखेलीचा येक विचार जाला. दुहितार्थ राहिला नाही यैसी खबर सांगितली; व सिपाई आपले नजरेनेहि पाहून आले. सरखेलीची वस्त्रें अजम खानजादे यासी गेली. खानजादे-याकडून सरखेलीस वस्त्रें आली व वेळासचा गुरव माहाडाहून बाणकोटास जाऊन, कौल घेऊन माणसे न्यावयासी आला, त्याणे वर्तमान सांगितले, की शामळाने बाणकोटाहून वस्तभाव दाणागल्ला भांडी किलेयावरील यैसी उतरून गलबते भरून रवानगी केली; आपण रात्रीचा गलबतावर खासा सिदीसाद चडतात. मेडा वेसवीचा व बाणकोट जवळ होता तो मोडून गलबतावर भरून सोटे रवाना केले. या प्रकारचा विचार आईकिला तो सेवेसी लिा असे. सेवेसी श्रुत होईल. गोपाल बावाजीहि सेवेसी पाा असे. मुखवचने सांगता सेवेसी श्रुत होईल. हे विज्ञप्ति.

¶*Ramaji Mahadeo reports to Chimaji Appa the news of Sambhaji Angria having concluded peace with the Sidi.*

No. 351] [*24-12-1735 ?*

तालिक

श्री

श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति
स्वमीचे सेवेसी

विनंती. सेवक संताजी जाधव कृतानेक विज्ञा(पना) यैसीजे. ताा छ २० साबानपावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचे व लस्करचे वर्तमान येथास्थित

5489

असे विशेष. राजश्री दुर्गोजी भोइटे यांनी व आम्ही राजश्री संभाजी आंगरे याजकडील हरजी ना। कदम व बावाजी म्हसके यैसे जमाव सहवर्तमान आले, या उपरी गोवलकोटावरी येलगार करावा हा विचार जाला, हे सविस्तर वर्तमान सेवेसी लिहिले; आणि मागें अस्तमानी तेच दिवसीं रा। दुर्गोजी भोइटे व मलार प्रभु जमेनवीस यैसे त्याजकडे गेले कीं तुम्ही आम्ही एकमतें विचार करून, स्वामिकार्य करावें म्हणून त्यांस भरोन बोलीचा प्रसंग केला. त्यांनीं उत्तर दिल्हे कीं आम्हाकडे त्यांचा भेद जाला आहे. आम्ही दाहा हजार रुपये खर्च केला आहे. तुम्ही फौजेनसी याल तऱ्ही उत्तम. न या तऱ्ही कांहीं आम्हास अगत्ये नाहीं. आम्हास सरखेलीचा हुकूम आहे कीं गोवलकोट फते करणें, किंवा मरोन बरें म्हणवणें. आम्हास कार्येभाग करणे आहे. आम्ही तुमचें * * * * * * येतां आंगऱ्याचे गोटास जाऊन त्याचें समाधान केलें आणि आलों. मागती अस्तमानी मल्हार प्रभु यास त्यांजकडे कित्येक सांगून पाठविलें; परंतु त्यांनी आपले अंतःकरण न सांगितलें. दुसरे दिवसीं रा। त्रिंबकराव प्रातःकाळीं पाठविले. त्यांसहि आपला भावार्थ न सांगितला; परंतु त्यांचा विचार जावें राहावें यैसे आहे. यामधें जे होईल तें मागून लेहून सेवेसी पाठऊन देऊं. लोकांची खस्ती जाली आहे. त्यांचा गौर करणार स्वामी समर्थ आहेत. आणि पोटावीण गल्हांठा बहुत हुजरातीमधें लोकांचा व हशमाचा जाला आहे तो लिहितां पुरवत नाहीं; आणि माहाराज याउपरी यांची बेगमी न करीत तरी यांच्यानेहि राहावतें यैसे नाहीं. संकट जाणून येवेसी लिहिले असे. पडिले माणसांची व जखमीयांची यादी दास्त अलाहिदी लिहिली आहे, त्याजवरून श्रुत होईल हे विज्ञाप्ति.

¶*Santaji Jadhao reports to the Chatrapati operations at Gowalkot and requests more reinforcements.*

No. 352] *[25-12-1735*

पो छ २० रजब

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी यांसी

श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित

पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम जाणून स्वकीय कुशललेखनाज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. आजी बुधवारीं प्रातकाळी राजश्री स्वामीनी राजश्री

5490

ारबावा यासी बोलाऊन विचार केला की, राजश्री पिलाजी जाधवराऊ यासी ोवलकोटास पाठवावे, तरी त्याजपासी जमाव नाही; आणिक जमाव त्याजबराबरी देल्हा तरी तो कांही त्याच्या कार्याचा नाही. यास्तव राजश्री दादोबा यासी ाजश्री चिमाजीपंत आपा याजकडे पाठवावे, आणि पाचसे राऊत आणवावे येैसे ांगितले. त्यावरून राजश्री बावा घरास आलियाउपर आम्हास व राजश्री ाहादाजीपंत यास आपले घरास बोलाऊन नेऊन राजश्रीचे आज्ञेप्रमाणे सांगितले ी राजश्री दादोबा यासी राजश्री आपाकडे पाठऊन पाचशे स्वार आणवावे. यास आम्ही घरोब्रियाने राजश्री मंत्री यास विचार पुसिला. त्याणी सांगितले की ाजश्रीचा मनसबा कांही येक शाश्वत आहे येसे नाही. कदांचित राजश्री सरखेल ालेच तरी तुम्ही त्याची पाठ मात्र राखावी. त्यास त्यांचा काही यावयाचा विचार देसत नाही; आणि उगीच तुम्ही सेदोनसे राऊत आणिले तरी तितक्यानी काही ामकांज होणे नाही; आणि तुम्ही गोवलकोटास आडकाल, खर्चवेच पडेल, याज- रिता प्रस्तुत राऊत आणावयाचा प्रसंग नाही. राऊत सिध मात्र असावे. दांचित खावंदाची मर्जी तुटलीसीच जाली, तरी तुम्हास आम्ही जे सांगणे ते ांगून या प्रकारे राजश्री बावाने सांगितले. दुसरियाने बोलिले कीं प्रस्तुत राजश्री स्वामी दादोबास पाठवितात. त्यास येथेच ते गोष्टीची तोडमोड करिता कार्यास ेत नाही. यास्तव प्रस्तुत राजश्री दादोबानी जावे, आणि तेथे गेलियावर एक पत्र राजश्री आपाचे पाठवावे की, माहाराजानी राऊताविसी आज्ञा केली त्यास आम्हापासी तो राऊत राहिले नाहीत; आणि माहाराजानी तो निकडीने सांगून पाठविलें. त्यावरून तीर्थरूप राजश्री राऊ याजकडे लेहून पाठविले आहे. तेहि सत्वरीच येतील; आणि माहाराजाकडे पाठवितो येसे पत्र राजश्रीस पाठवावे. मग पुढे जैसा प्रसंग पडेल तैसे करणे ते करावे, येैसे बावानी सांगितले. यैसियास आमचेहि विचारे बावानी सांगितली हे गोष्टी खरीच आहे. आपण शेदोनसे राउत पाठविल्याने खर्चवेचहि पडेल, आणि आमचाहि गुंता होईल; तरी राजश्री दादोबा तेथे आपणाजवल आलियानंतर बावानी सांगितल्याप्रमाणे पत्र पाठवावे. मग आम्हीहि येथे आहो. प्रसंगानुरूप जे लिहिणे ते लेहून. सारांश राउताचे सिधतेत आसावे. प्रसंगोचित करणे ते करावे. विशेष काये लिहिणें. कृपा केली पाहिजे.

¶*Pilaji Jadhav communicates to Chimaji Appa Shahu's desire that the latter should march to Gowalkot.*

Bk Ca 8—39. 5491

No. 353] [About 25-12-1735

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान व तथा
राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य जिवाजी खंडेराऊ दंडवत प्रणाम विनंती. उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहिलें पाहिजे. आपण चिरंजीव गोविंदरायास व आम्हांस पत्रें पाठविलीं तीं पावलीं. लिहिला अभिप्राये अवगत जाला. हीं पत्रें व राजश्रीचें पत्र घेऊन गोविंदरायांकडे रवाना करावीं म्हणून लिहिलें. ऐशास आपले आज्ञेपेक्षा आम्हांस अधिकोत्तर काये आहे? परंतु गोवलकोटचे मोर्चे उठले. आंगरेयाकडील लोकांनी भांडी काढून माखजनास नेलीं. उरले तेहि जाणार. यामुलें राजश्रीचें चित्त विशण्ण आहे. याकरितां राजश्रीच्या पत्राचा विचार राहिला. स्वामीचीं पत्रें व आम्हीं आपलीं पत्रें चिरंजिवास रवाना केलीं आहेत. स्वामीचे आज्ञेप्रमाणें समयोचित प्रसंगास चुकतील असें नाहीं. बहुत काय लिहिणें कृपा असों दीजे हे विनंती.

¶Jivaji Khanderao writes to the Peshwa and Chimaji Appa about the distress of the King consequent upon the siege of Gowalkot being given up by the Angria.

No. 354] [26-12-1735

पौ छ २१ रजब

श्री

पुा राजश्री आपा गोसावी यांसी

विनंती उपर. राजश्री रघुनाथजी याची माणसे राजश्री सरखेलीकडून सोडून आणवणे म्हणून दोनचार पत्रे पाठविली. ऐसियास येथे सरखेलीकडील रामजी वोरडे राजश्री स्वामीकडे आले होते. त्यास आम्ही आंतस्ते पुसिले. त्यास त्याणी सांगितले कीं त्याचे विचारे कबिले सोडावे येसे नाही. आम्ही चाकरीस पाठविले, आणि त्याणी तिकडेच जाऊन राहावे, आणि राजश्री पंतप्रधान याचा उपर दाखऊन माणसे वेऊन जावी हे गोष्टी काये आहे? सारांश त्याच्या मतें कबिला सोडावा येसे नाही, म्हणून रामजीने सांगितले. त्यास आम्ही प्रस्तुत येथे गुंतोन राहिलो. त्या प्रांते आम्ही जावे. हा विचार राजश्री स्वामीचा काही शास्वत नाही. कदाचित गेलो तरी आम्हासहि ये गोष्टीचे आगत्य आहे. आम्ही त्याचे हाती दिल्हे आणि त्याणी त्याचे बरे बाईट केले ये गोष्टीचा आम्हास

अभिमान आहे. आज्ञा प्रमाण: राजश्री सरखेलीची गाठ पडिलियाउपर त्यास च्यार गोष्टी सांगून ये गोष्टीस आंतर सर्वथा होणार नाही. विशेष कार्ये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Chimaji Appa : writes on the subject of Raghunathji's family having been confined by Sambhaji Angria and of the attempt to get them set at liberty.*

No. 355] [Received on 26-12-1735

पाा छ २२ साबान

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

विनंती यैसीजे. चिमणाजी गोवलकर ब्राम्हण वस्ती माफरल ताा वेसवी यांची माणसें प्रजन्यकालीं शामलानें धरून नेली. त्याचे रजबदलीस गेले होते ते बाणकोट शामलाने हस्तगत केलियावर राजपुरीहून दिवेयासी आले. दिवेयाहून श्रीवर्धनातून बाणकोटी आले. तेथे येक दोन दिवस बाणकोटी राहिले. त्यांस तेथील वर्तमान कागदी लिहिले त्याप्रमाणे करारच[1] असे. जरीरा[2] शामल असे. वरून लगट जाली तर टाकून जावें. सांप्रत बोली असे कीं अरमार सहवर्तमान कर्णाळेयासी जाऊन दाणागला भरून किलेयाची मजबुदी करून निघोन राजपुरीस यावे यैसी करारी जाली असे. गलबतास पाणी भरीत असत. बातमी बाज़ारी खबर नव्हे; खरी गोस्ट आहे. कर्णालियाकडील मजबुदी करावी. शामल जाईल हा निश्चये असे. निमित्य की शामल सेर जाला असे. जाईल यासी संदेह नाही. आइकली खबर ते सेवेसी लिहिले आसे. जासूद स्वामीकडून आले. त्यासी जिकडील रवानगी तिकडे बाा स्वारी[3] देऊन छ मजकूरचे संध्याकाली प्रहरा दिवसास रवाना केले. श्रीमंत राजश्री नाना स्वामीकडेहि या प्राा नवे वर्तमान लिहिले आसे. सेवेसी श्रुत हाये हे विज्ञाप्ति.

¶*Vasudeo Joshi to Chimaji Appa : communicates the secret intention and preparations of the Sidi for the capture of fort Karnala.*

---

१ बरोबर, यथास्थित म्हणजे खरें, सांगितल्याबरहुकूम. २ सडा. ३ जमाव, परिवार.

No. 356] [26-12-1735

पौ छ २१ रजब

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी यासी

श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम जाणून स्वकीये कुशललेखनाज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. राऊत पांचसे आणवावयाबदल राजश्री स्वामीनी राजश्री दादोबा यांस आपणाकडे पाठविले आहेत. येविशीचा सविस्तर अर्थ पूर्वी जासुदासमागमे पत्री लिा आहे त्यावरून निवेदन जालाच असेल. सारांश शे दोनसे राऊत पाठविलियाने खर्चवेचहि पडेल आणि आमचाहि गुंता होईल याजकरिता स्वार पाठवावयाचा विचार सर्वथा न करावा. राजश्री दादोबा तेथे आपणाजवली आलियाउपर राजश्रीस एक पत्र पाठवावे कीं माहाराजानी राऊता बदल राजश्री दादोबा यास पाठऊन आज्ञा केली कीं राऊत पांचसे पाठवणे म्हणून निकडीने आज्ञा करून सांगोन पाठविले. येसीयासी येथे आम्हापासी तो राऊत नाहीत आणि माहाराजानी निकडीने सांगोन पाठविले त्यावरून तीर्थरूप राजश्री राऊ याजकडे माणसे व पत्रे पाठविली आहेत. त्याजकडून स्वार आलियानंतर अविलंबेच सेवेसी पाठविसो, या प्रकारे पत्र पाठवावे. वरकड सविस्तर वृत राजश्री माहादाजीपंती सेवेसी लिा त्याजवरून निवेदन होईल. विशेष काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao asks Chimaji Appa to offer excuses to the King that sufficient men could not be collected to reinforce the Konkan army.*

No. 357] [1735 ?

श्रीमलारिर्जयति

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

पोष्य जिवाजी खंडेराव दंडवत प्रणाम विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीयकुशललेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. गोवेकर फिरंगी स्वामीसी स्नेह धरितात. हरयक कार्यप्रसंगी साह्यता करावी ऐसा त्याचा करार आहे. त्यास ये प्रसंगी जरी त्याजकडे येक मनुष्य पाठविले तरी अरमार पाठवितील, कार्य करून देतील. याकरितां चितास येईल तरी कृष्णाजी वैशं(पायन ?) याची रवानगी

फिरंगियास पत्रें वस्त्रें देऊन करावी. अरमार घेऊन येईल. सविस्तर कृष्णाजी विनंती करितां विदित होईल. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ असो दीजे हे विनंति.

¶*Jivaji Khanderao requests the Peshwa to depute Vaishampayan to the Portuguese at Goa with a request for naval ships, who, being favourably inclined towards the Peshwa, will send their fleet to join in the undertaking.*

No. 358] [*1735 ?*

श्री

राजमान्य राजश्री संभाजी आंगरे सरखेल यासी आज्ञा केली ऐसीजे. बाणकोटचे बेगमीस ताा केलसी व ताा वेसवी या दोन्ही माहालचे शामलतर्फेचा अमल हुजुरून दिल्हा आहे. त्याचा वसूल बाणकोटकरी घेत असतां तुम्हाकडील राा सिवजी जाधव कजिया करितात म्हणून हुजूर विदित जाले. तरी शामलाकडील अमल बाणकोटकरी करीत असत, सिवजी जाधव यास कजिया करावयास दरकार काये आहे? हुजरून दिल्याप्रमाणे सदरहू दो माहाली हबसीतर्फेचा वसूल बाणकोटकरी घेतील. तुम्ही आपणाकडील लोकास ताकीद करून कजिया न करीत ते करणें. बाणकोट स्थल नाजूक आहे. तेथील बेगमी जाली पाहिजे, याजकरिता हे दोन माहाल दिल्हे आहेत. यांचा वसूल सुरक्षित बाणकोटकडे पावे ते करणे. सिवाजी जाधव यांस लेहून पाठऊन कोणेविसी कजिया न करीत ते करणे. फिरोन भोभाट येऊ न देणे. शामल तर्फेचा अमल सुरलीत पावणे.
सूज्ञ+ आसा

¶*The King Shahu asks Sambhaji Angria to warn Sivaj Jadhav not to exact from Kelsi dues which have been assigned for the maintenance of the establishment at Bankot.*

No. 359] [*1735 ?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

सेवसी विज्ञापना येसीजे. राो संभाजी आगरे याकडील संदर्भ हुजूर आला आहे म्हणौन आज्ञापत्र सादर केले. त्यावरून आम्हाकडील स्वारीसिकारी आपल्या

+ पत्र शाहू महाराजांचें.

आज्ञेप्रा मना जाहाली. थैसियास हाली छ २ रबिलौवली बावाजी सिंदा पंचवीस माणसानिसी येऊन किलानजीक कोलीक किलापासून आर्धा कोस येथे येऊन पिराजी पाटेकर दिा गोंदजी सेटगे यचा कबिला धरून न्यावया बाा घर वेढून राहिले, तों त्यांतील माणसे निघोन गेली. हरि आबाजी किले निसबत होता त्यास पाचच्यार जागा जखमी करून गेले. सेवेसी निवेदन व्हावे यानिमित्य लिा आहे. पारपत्य करणार स्वामीं धणी आहेत. यांचेघले सातसे माणोस किलानजीक येउन तीन कोसावरी बैसले आहे. घाट चडोन वरी येतात. किल्याची हात्र पालत नेतात, तरी याचे पारपत्य करणार समर्थ आहा. विदित जाहाले पाा हे+ वीज्ञापना

¶*The writer reports to Chimaji Appa the atrocities perpetrated by Bawaji Sindia who was in the service of Sambhaji Angria.*

No. 360] [*1735*

श्री

राजश्री बापूजी पंतास नमस्कार. घोडे आदितवारीं त्रितीयप्रहरी तरींपलीकडे सालवास पाठवणे. दाणा ८८१ पाठविणे हे * * *

¶*Horses are despatched to Salav.*

No. 361] [*1735?*

श्री

राजमान्य राजश्री चिमणाजी बलाल यांसी आज्ञा केली ऐसीजे. तुम्हाकडील फौज आणावयाबदल राजश्री जिवाजी खंडेराव चिटनिवीस व राजश्री माहादाजी अंबाजी यांस रवाना केले. तुम्हाजवल पावोन स्वामीची आज्ञावचने सांगितलीच असतील. तुम्ही फौजेची सिधता केलीच असाल. परंतु अद्यापि तुम्हाकडील विनंतीपत्र, येऊन वर्तमान विदित जाले नाही, याजकरिता हाली हे आज्ञापत्र सादर केले आहे. तरी अविलंबे फौजेची रवानगी करणे. ये विशी दिवसगत लागो न देणे. फौजेची निकड बहुत आहे. दिरंगावरी घालावयाची गोष्ट नाही. तुम्ही शाहाणे लोक आहां. तुम्हास न कलेसा अर्थ काय आहे? तरी

+ अक्षरें बालबोधींत.

दुसरे पत्राचा मार्ग न पाहाता फौजची रवानगी करणे. उजूर न करणे .अविलंबे फौज पाठऊन स्वामीचा मनोभिष्ट सिधीस पावणे, कितेक उभयतास लिहिले आहे त्यावरून कलो येईल. +सुज्ञ आसा.

¶*King Shahu orders Chimaji Appa to despatch the forces under him without delay.*

No. 362] [*1735*

नकल

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

कृतानेक विज्ञापना. राजश्री कान्होजी भोसले याचे वर्तमान व राजश्री संभाजी आंगरे याचे वर्तमान व दरबारचें वर्तमान आद्यंत राजश्री जिऊबा चिटनिवीस याजकडून लेहून त्याची पत्रें घेऊन शेवेसी पाठविली आहेत. त्यावरून सविस्तर विदित होईल. राजश्री स्वामी बोलतां बोलिले, कीं राजश्री चिमाजी आपाच्या विचारें राजश्री मानाजी आंगरे यास राजदर्शनास आणावयाचे जाहालें तरी तिकडील बंदोबस्त करून विश्वासू माणूस ठेऊन लक्ष्मीबाईस देखील समागमें घेऊन यावें म्हणोन बोलिले. विदित जाहलें पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Purandare's letter to Chimaji regarding Manaji Angria's visit to Shahu.*

No. 363] [*1735 ?*

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा

गोसावी यासी

श्रीसकलगुणलंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रों पिलाजी जाधवराव दंडवत विनंती येथील कुशल जाणून स्वकीये लेखनआज्ञा केली पाहिजे. यानंतर आपले पत्र आलें ते पावले. राजश्री स्वामीस पत्र लिहिले त्याची नकल पाठविली ते वाचून पाहिली. तो अन्वय चितात आणून आपलेहि पत्राचे उतर लेहून दिल्हे. आम्हास पत्र आलें त्याची नकल आपणाकडे पाा आहे.

+ आज्ञापत्र शाहू महाराजांचें. यापुढील मजकूर खाशाच्या हातचा आहे.

यानंतर राजश्री   पंत सचिव यांचे पाईदल पांचसें आजी घाट उतरोन गेले. आपणास कलावें याजकरितां लिा आहे. विशेष काये लिहिणें? कृपा आसो दिली पाहिजे हे विनंती

¶*Pilaji Jadhao reports to Chimaji Appa that the contingent of the Sachiv has returned and gone up the Ghats.*

No. 364] [*1735?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

पोष्य जिवाजी खंडेराव दंडवत प्राा विनंति येथील कुशल जाणोन स्वकीय ल्याहावया आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते पावोन वर्तमान कळले. राजश्री संभाजी आंगरे सरखेल याजकडील यैवजाविशी लिा त्यास ज्ययगडी त्यांची आमची भेटी जाली. त्यास सांगावयाचे ते सांगितले. ते स्वामीचा यैवज पावता करितील. परंतु या मसलतीमुळे आधिक उणे दिवस लागतील. सविस्तर मशारनिलेच्या पत्रावरून विदित होईल. बहुत काये लिा कृपा असो दिल्हा पाहिजे हे विनंति.

¶*Jivaji Khanderao to the Peshwa, informing him of the writer's efforts to adjust the money transactions with Sambhaji Angria.*

No. 365] [*1735*

श्री

पुाा श्रीमंत राजश्री   पंतप्रधान

स्वामीचे सेवसी

विनंती उपरी. किले कर्णाला येथील बोलीचा अर्थ मनास आणिला असेल म्हणोन लिा तर ज्या ग्रहस्ताच्या हातून बोली मनास आणावी तो ग्रहस्त प्रस्तुत येथे नाही. आलियावरी मनास आणून सविस्तर मागाहून लेहून पाठऊन व राा मानाजी आंगरे याकडील लोकानी माल लाविली होती ती तोडिली. तीन माणूस मेले. तेथील अनखी आम्ही येक राजकारण केले आहे. घडोन येईल ते खरे. बहुत काये लिहीणे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi informs the Peshwa of the absence of the man through whom negotiations were to be opened about fort Karnala.*

No. 366] [1735 ?

श्री

पुरवणी राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना किले बिरवाडी व अवचितगड हे किले भोईकोट दाखल आहेत, बंदिस्त नाहीं. भिंताडे दगडामातीची होती तीं ढासळली. छातीचा कोट करून राखावे लागतात. शत्रु सबल, स्वामीस विदितच आहे. जरी सेवकास आज्ञा होईल तरी दगडधोंडा करून जागे मजबूत केले जातील. काये ते आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa is informed of the dilapidated condition of Birwadi and Avchitgad and is requested for orders about their repairs.*

No. 367] [1735

श्री

विनति उपरी. पूर्वील कर्ज होते ते वडिलांचे आसीर्वादें व स्वामींनी विचारें वारले. गतवरसीपासून मसलतीमुले टका पाण्यासारिखा खर्च होत आहे. हालीहि फौजेस टका पाहिजे. पदरी आहे तोहि कलतच आहे. मुलुकगिरीस फौजा गेल्या आहेत त्यासहि टका मिलेल तोहि विदितच आहे. हवेलीस जो पैका खर्च जाला त्याचा हुजूर बोलतात तेहि विदितच आहे. हली कोट बांधावयास लाविले आहे म्हणून वर्तमान कलो आले. त्यास हाहि विचार विदित होत आहे. तेणेकरून तेथील ग्रहस्त स्वामीचे रणाणबंदी आहेत तेहि विदितच आहे. हाहि लौकिक होईल ये गोष्टीचा विचार केला पाहिजे. पदरचा वेचून दुसरे बरे म्हणे ते केले पाहिजे. थोरले फौजेस राखत नाही. दुसरियाने हस्तगत केलियाने हतास येत नाही यैसे आहे. थोरले माहाराजानी चाकण बांधली ते फिरून राखली नाही, गेली ते फिरून आली नाहीं यैसे आहे. यामधे जो विचार करणे तो दुरंदेशी पाहून केला पाहिजे. आम्ही लेकुरपणे लिहिले आहे. रागास आले न पाहिजे. वडिलांचे विचारास येईल तें करावें. टका वेर्थ खर्च करावा यैसा नाही. विचारे होईल ते करावे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Baji Bhiwrao requests the Peshwa not to spend money over fortifying fort Chakan as want of funds is keenly felt in paying off remuneration to the forces already in employ.*

No. ३०८] [1733

श्री

राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांसी आज्ञा केली ऐसीजे. तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले. लेखनार्थ विदित जाहाला. इंग्रेज-आरमारसहवर्तमान जंजिरियास येऊन दाखल जाहाला म्हणोन लिा व रा अमृत-राऊ त्रिंबक यांस सविस्तर लिा त्याणी विदित केले. ऐशियास तुम्हासारिखे पराक्रमी सेवक तेथे असता शत्रुचे वस्तू काये होणे आहे? तुमचे कर्तुत्वेकडून व स्वामीचे प्रतापेकडून गनीम हतप्रभ होतच आहे. स्वामीपासून वरचेवरी साहित्यास अंतर होणार नाही. राघो राम वगैरे लोक निवोन आले होते ते माघारे पाठविले आहेत, यांचे चालवावयास अंतर न करणें. तिकडील वर्तमान दिनप्रतिदिनी लेहून पाठविणे. रा आनंदराव पंडित सुमंतहि संनिध आले, लौकरीच येथे यतील. ते आल्यानंतर अवघा मनसुबा सिधांतरूप होऊन आज्ञा होईल तेणेप्रो वर्तणूक करणें. तोंपर्यंत दम धरून मनसुबा जुमस न खाये ते करणें. रा गोरखोजी भापकर यांचा मजकूर रा अमृतराऊ याणी विदित केला; ऐशियास ते चिरंजीव रा फत्तेसिंग भोसले याजकडे आले आहेत. त्यांचा तुमचा स्नेह काही सामान्य नाही. तुम्हीच त्यास लिहिणे त्यांचे तुमचे विचारे होईल ते करणे. स्वामीकडे काही त्याचा इतला नाही स्वामीनीहि चिरंजिवास आज्ञा केली आहे. जाणिजे + सुज्ञ असा.

¶Shahu writes to Bajirao Peshwa to make arrangements to ward off the attack of the English who with their navy had taken position at the fort Janjira and says that orders regarding additional measures will be issued after consulting Anandrao Sumant.

No. 369] [1735 ?

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराव महादेव कृा सा ना विा येथील कुशल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पा. यानंतर स्वामीनी पत्र पाठविले ते पावले. " रा खंडोजी माणकर यांचे व हबसियाचे युध्य जाले. यांची जाजती जाली. रामाजीराव रेडीकर त्यांचे पाडाव जाले. आणखीहि अजी उद्या तला घोसाले अगर

+ हस्ताक्षर शाहूचें.

बाणकोट या ठिकाणी शामल थडक घेणार. निमित्य यांचे कुमकेस लोक पाठवणे लागतात. तुम्हापासी पाईचे लोकाचा जमाव आहे त्यापैकी पत्रदर्शनी २०० माणूस पाठवणे. आमचे लोक आले म्हा मोबदला पाठऊन तुमचे लोक तुमचेकडे वरचेवरी पाठऊन देऊन" म्हणून आज्ञा केली. येसियास काही लोक जमाव अंदरभुईस आहेत, काही येथे होते ते दसरियाकारणे रजा घेऊन घरोघर गेले आहे. आसपास लोक आहेत त्याजला स्वामीचे आज्ञेवरून ताबडतोब माणसे पाा आहेत. लौकरच जे जमा होतील ते पुणियास पाा देतो. अंदरभुईसहि च्यारपांचसे माणूस आहे, त्याजकडेहि पत्रे पाा आहेत, ते आणून कोठे पाा हे लिाा पाा. वडगाव नारोडी व सिदोली या येवजी मोघमच तीनशे रुाची चिठी राा सदासिवभट पटवर्धन याजवरी पाठविली. त्यांस चिठी पावोन हुजत पाा नाही किंवा चिठीच पावली नाही याचा शोध करून हुजत पाा पाहिजे. बहुत काये लिाा कृपा लोभ असो दीजे हे विनंति.

¶*Krishnarao Mahadeo learns from Chimaji Appa about a fight between Khandoji Mankar and the Sidi and promises to send more men to succour him as desired by the addressee.*

No. 370] [*1735*

नक्कल

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री संभाजी आंगरे सरखेल याजकडे गला दाणा पावावा येविशी महाराजानीं राजश्री मानाजी आंगरे यांस आज्ञा केली, यैशियास गतवर्षी राजश्री महादाजी अंबाजी यास राजश्री प्रधानपंत कुलाबां असतां गला-दाणा द्यावयाची आज्ञा करून पाठविले त्यावरून महाराजांचे आज्ञेप्रमाणें याणी गला त्यास पावता केला. प्रस्तुत आम्ही आलो. ये समईहि महाराजांचे आज्ञेस उजूर न करितां थोडाबहुत गला द्यावयाचे * * * * देतील यांस संदेह नाहीं. यांचे स्वाधीन स्थले आहेत त्याची बेगमी व्हावी लागते. कर्नालियास हबशी जाऊन बैसला, यामुले कल्याण प्रांती शह जबरदस्तच यास पडला आहे. उंदेरी केवल समीपच आहे. फिर्गी इंग्रज इत्यादिक शत्रु दुर्बुध्दिवरच आहेत. इतकेहि वोढीचा प्रसंग आसोन माहाराजाची आज्ञा उल्लंघन न करावे यास्तव थोडाबहुत गला दाणा वोढीत वोढ करून पाठवावयाचे कबूल केले आहे. यैशियास आरमार म्हणजे या स्थलाचे जीवन. त्याखेरीज यास उपायेच नाहीं. ते कांहीं येथें नाहीं. याकरितां दोन गुराबा व सात

आठ गलबते घ्यावी व कितेक लोकाचे कबिले विजयदुर्गी आहेत ते सोडून घ्यावे, अशी बोलीचाली राजश्री रघुनाथ हरि राजश्री सरखेलीकडून येथें आले होते ते समई राजश्री प्रधानपंताचे विद्यमानें जाहाली असतां गुराबा व गलबते पाठविली नाहीं. कबिले लोकांचे सोडिले नाहीं. फावल्या प्रसंगास घात करावा हेच त्याचे मानस आहे. ऐसेही होस्तात महाराजांचे आज्ञेप्रमाणें गला दाणा पाठवितील, परंतु महाराजानीं त्यास आज्ञा करून गुराबा व गलबते यांस देवावी व लोकांचे कबिले सोडून देवावे म्हणजे पुढें सुरलीत प्रसंग होईल. इकडून गला जाऊन त्या स्थलाची बेगमी होईल. तिकडून आरमार आले म्हणजे या स्थलाची * * * बेहबुधी होऊन महाराजांचे जागे जतन होतील. महराजांनीं सरखेलीस आज्ञा करून गुराबा व गलबते व लोकांचे कबिले पाठवीत ते केले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is a reply to a request of the King for sending provisions to Sambhaji Angria so that it would enable him to equip his fleet to fight against the Sidi who had already landed near Kelsi.*

No. 371] *[1735 ?*

श्रीशंकर.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे
सेवेसी

पोष्य वासुदेव जोशी साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. फटकडीची[१] तोफ नागोठणेंपर्यंत लोकांनी आणिली. तेथून पुढे आणावयास डोंगर चढावयाखेरीज लोक हैराण जाले, कितेकाचे पायहात दुखावले, याकरितां पेणेस येऊन तारूं पाठऊन जलमार्गें आबटीयास आर्जी भृगुवारीं आणिली. आम्ही काल पेणेंतून स्वार होऊन आबटीयास आलों. तोफेकरितां मुकाम केला. आजीं तोफ आलियावर स्वार होऊन कल्याणास गेलों. तोफहि घेऊन जाऊन. कळलें पाहिजे. आपणाकडील वर्तमान लिहिलें पाहिजे. शामल दगेखोर आहे, जमाव भारी याचा आहे. मुरुडच्या बंदरीं उतरला म्हणोन येैकितों, तरी त्यास, तेथें उतरावयाचें नव्हतें. येकीकडे फिरंगी उतरला, येकीकडे शामल उतरला आहे. तरी आपण बहुत सावधपणें राहिले पाहिजे. कर्णालियाचे जहागिरीची सर-

---

१ फटकडीची तोफ म्हणजे फटकडी तोफ. हा एक तोफेचा प्रकार आहे.

पाटिलकी किल्लेदार घेतो म्हणोन वर्तमान आम्हांस होतें. त्यास आबटियास आलीयावर तहकीक[1] करितां राजश्री सरखेलीकडेच दुतर्फा वसूल होत आहे. तरी आपण राजश्री संभाजी आंगरे यास लेहून मागील तिसाला बाकीचा निर्वाह करून घ्यावा, व पुढें सालमजकुरापासून अमल चालवावा, येविशी ताकीदपत्र पाठवावें. बहुत काय लिहिणें. लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi informs the Peshwa that it was with great difficulty that he managed to get the "Phatkadi" gun at Abte. He also requests him to be very cautious, hemmed in as he was between the Sidi on one hand and the Portuguese on the other.*

No. 372] [*1735 ?*

पो छ ९ मोहरम

श्री

पुरवणी राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसीं

विनंती उपरी. दर्यामधें तुफान जाहाले म्हणून सवंत्र म्हणतात. त्यास तांदूल मुंबईस ठेऊन पुढें नारल पडालियावरी पाठवावे किंवा तांदूल विकावे ते आज्ञा करावी. त्याप्रमाणें वर्तणूक करूं. सिदीसाद याणी सुरतेचीं तारवें धरून आणिलीं आहेत. त्यास इंग्रेज दरम्याने पडोन दोनलाख रुपये द्यावेसा करार केला. परंतु सिदीसाद याणी दोन लक्ष रुपये कबूल केले नाहींत आणि मुंबईहून तारवें सुरतेचीं आणिलीं तीं घेऊन जंजिरियास गेला. हें वर्तमान स्वामीस कलावें याकरितां लिहिलें असे. सुरतवालियाचा त्याचा तह जाला नाहीं. बहुत काय लिहिणें हे विनंति.

¶*The news of some ships coming from Surat having been captured by the Sidi who did not return them in spite of the intercession of the English and an offer of 2 lacs of rupees is communicated to the Peshwa by Vasudeo Joshi.*

No. 373] [*1735*

श्री

सेवेसीं विज्ञापना. कृष्णाजी राम यास पत्र लिा आहे याचे मनं(न) करून अजम जनरालास दाखऊन त्यास देणे आणि रुपये घेणे म्हणौन आज्ञा. यैशास

---

[1] खरेंखोटें, चौकशी.

पत्र वाचून पाहोन. पत्राची नकल करून आपणाजवळ ठेविली आणि असल पत्र जनरालास दाखविले व कृष्णाजी राम यास पत्र लिा आहे हे त्यास देऊन व्याजसुधा रुा घेणे म्हणौन सेवकास आज्ञेचे पुरवणीपत्र होते तेहि दाखविले. त्यास दोन्हीं पत्रें जनरालानी आपणाजवळ घेतली आणि त्यांच्या इंग्रजीनें नकला केल्या आणि वाचून पाहिल्या. तेव्हां सर्व अर्थ व पेंच पांच पत्रांत होते तेवढे ध्यानांत आले. रुपये फलाण्यासाठीं फलाण्या कर्मास घेतले होते हें संपूर्ण कळलें पाहोन दंग जाहालें वाजवी रुपया देणे त्यास आंम्ही मना करितों यैसें नाहीं. याचा कागद त्यास देऊन रुपये मागावे, त्याचा कांहीं कजिया सांगावयाचा असला तरी तो सांगेल, तुम्ही आईकाल, च्यार भले लोक तिऱ्हाईत ते व तुम्ही मेळऊन खरें खोटे करावयाचें असेल, तर करा यैसें सांगोन त्यास आम्हांस गांठ घातली. आम्हीं उत्तर केले जे आम्हीं चाकर, आम्हांस खावंदाचा हुकूम रुपये घेणें त्या प्राा आम्ही घेऊं. मनसुफी पंचाईत असेल तरी याणी पुण्यास जाऊन सांगावी. आम्हांस मनाचिठी आली म्हणजे आम्हीं सोडून देऊं. नाही तर आमचा जीव जाई तोंपावेतो धनी काम करावयास आम्ही चुकावे यैसे नाहीं. आमचे तिऱ्हाईत मेळवावयाचे कोण्ही नाहींत. त्यांचे असले तरी सुखे मेळऊत. तिऱ्हाइतानी आमचा न्याय येथे काय करावा? आमचा न्याय सारा पत्रांत आहे. पत्राबाहेर आम्हांस हकीकत पुसाल तर तेहि आम्हांस ठाउकी नाहीं. येक खावंदाचा हुकूम दुसरे आम्ही जाणत नांहीं. आम्हांस तिऱ्हाइतानी काय सागावे आणि आम्ही काये यैकावे. कृष्णाजी राम याजवळ काही कागद पत्र दाखला मोकाबिला असला तरी दाखवावा. खावंदाकडे पाठऊन देऊं. नसला आणि तोडे हिसेब पुरऊन देऊन आपला गला सोडवावयाचे सामर्थ्य असलें तरी खावंदांजवळ जाऊन आम्हांस मना चिठी आणावी. दोन्ही गोष्टी होत नांही तेव्हा त्यांहीं आंम्ही श्रमी व्हावें यात जीव नाही. कलेल तसा विचार करून रुपयाचा भाग वारून द्यावा, दुसरी गोष्ट नाहीं. याप्राा बोली जाहाल्यावर कागद कृष्णाजी राम याकडे जासूद व सिपाई याजबराबर पाठविला. कागद पाहोन कागदाप्राा रुपयांचा भाग वारून देणे, याउपरी निजसुरे न राहाणें, आम्ही रुपये घेऊं, यैसे साफ सागोन पाठविले, आणि पत्र त्यास दिल्हे. याउपरी पुढें मजकूर होईल, तो वरचेवरी सेवेसी विनंती पत्रीं निवेदन होईल. कलावें. अकारण राहिले आहेत यैसें आजपावेतों म्हणत होते, त्यास येक कारण उपस्थित जाहाले. घांगेशा[1] वालीत आहों. निर्गम आज्ञेप्राो होईल. विदित होणे हे विज्ञापना.

¶*Peshwa's Agent at Bombay communicates to him how he tried to recover the loan from Krishnaji Ram, whom the British were protecting.*

---

१ कटकट.

No. 374] [1735

श्री

सेवेसी विज्ञापना कृष्णाजी राम यास आज्ञापत्र सादर होतें ते जनरालास ाखऊन त्यास दिल्हे. त्याणे पाहोन रुा कबूल केले. परंतु यास खर्च आहे. ायाज आईकत नाही. खावंदाचे आज्ञेप्रा रुा घेऊन. त्यावरून कृष्णाजी राम यांणीं ानरालास सांगितलें, रुपयांचा बयाज आईकत नाही. रुा घ्या म्हणतात. तेव्हां ाम्हीं करावें. त्यावरून जनरालानी आम्हांस माणकोजी चांपाजी याजबराबर सागोन ाठविले जे, तो काय बयाज सांगतो तो तुम्ही आईका व खावंदा लेहून पाठविसो ो येक वेळ पाठवा. इतक्यावर खावंदाची निशा होऊन याचा तगादा दूर ाहाला, तुम्हास मनाई आली तर उतम. नाही तर तुम्ही चाकर खावंदाच्या ुकुमाप्रा वर्तावेंच लागेल. त्यावरून कृष्णाजी राम याणी सेवेसी पत्र लेहून लखोटा देल्हा तो पा आहे. मनास आणून त्यास व सेवकास आज्ञा कर्तव्य ते करावी आज्ञेप्रा वर्तणूक करून. विदित होणें हे विज्ञापना.

¶*The demand of some amount due from Krishnaji Ram at Bombay and his refusal to pay it are reported to the Peshwa.*

No. 375] [Prior to 1736

(दुसरा बंद तेवढाच सापडला त्यांतील मजकूर.)

जे ते मोर्चेयावरी रवाना करितो. हजार पांचसे माणूस म्हणाल तरी मिळणार नाही. दोन च्यारसे पाठऊन तेही प्रजन्यकाली राहाणार नाही. जरी चातुर्मासची बेगमी आडिसेरीची येकदाच करून द्याल तरी लोक प्रजन्यकाली राहतील! आपणाकडे गला नाहीं. आपला वस्तू पावसाला अडिसेरी मोर्चेयावरी पावत नाही. जरी तुम्ही मोर्चे करार बैसवाल गोवलकोट घ्यावयाचे सामान आलेसे आम्हास कळेल, तेव्हा याप्रमाणे आपण साहित्य करीन. नाही तरी शामलाचे तुम्हापासून काही होत नाही. आपण त्याचा दावा पदरी बांधोन घेत नाही. पष्ट सांगितले. शामलाचा त्याचा तह जाहाला. बंदवान माणूस संभाजी आंगरे याचे हबसियाकडे होते, त्यापैकी शामलाने सा जण भ्रष्ट केले, ते ठेविले; बाकी सोडले. संभाजी आंगरे याणीं पासष्ट माणूस सोडले. राहिले दोन अडीचशे माणूस तेही सोडणार होते, परंतु सा जण भ्रष्ट केले यामुळे आजीपर्यंत ठेविले आहेत. पुढे सोडणार आहेत. मुलकी तह पूर्ववतप्रमाणें लोक पेस्तर

झालापासून वरातदार मुलकात पाठऊन अमल करावा येसै जाहाले आहे. इंग्रेजी जाहाज सापडले त्यामुले संभाजी आंगरे याची नजर (पुढें गहाळ).

¶*This fragmentary letter mentions an alliance agreed upon between the Sidi and Sambhaji Angria.*

No. 376] [*Prior to 1736*

श्री

सिदीसाद

* * पाठविले ते पावले. संतोश जाहला. हजरत * जिल सुबारानी (?) यास बंदगान छत्रपति माहाराज मदजलहूल आली याणी अर्ज पोहचाविला तो मजकूर बयावार कलमी केला, त्याजवरून मुफसल अया जाहाले. ऐशास बंदगान माहाराजे यांही हजरतीस अर्ज पोहचविला असेल तो किलाफ हरगा न पोहचवितील. वकिलाचे लिहीलायावर बिसालतपन्हानी तहकीक मानावे यैसे नाहीं. सबकी बंदगान माहाराजेयांस हजरत जिलसुबानी याही आर्बिसाल-तखानाचे गड कोटाबाबे कोठे लिहीले होते जे हे हजरत जिल सुबानीस हे लिहितील. आर्बिसालतपन्हा दाना आकील आहेत. जहुरात हर येक बात येणे ते आलीच असेल.

¶*This purports to be a communication addressed to King Shahu about the affair of the Sidi.*

No. 377] [*9-1-1736*

छ १६ रमजान

श्रीमंगलमूर्ति

पुत्रंणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विज्ञापना यैसीजे. स्वामीच्या चितांत फिरंग्यासीं लावायाचे असेल तर छ ६ रमजानी जासूद रवाना जाहाले तेथे सेवेसी सूचना जाहालीच आहे. हाली गोडी करावी कलह न वाढवावा, यैसा हेतु असेल तर प्रत्योतरी मातबर माणसाविसी लिहिलेंच आहे. दोन्ही अनुसंधानें सेवेंत सादर जाहालींच आहेत. उतम विचार आसेल तो करणार स्वामी समर्थ आहेत. मानाजी आंगरे यांणीं इंग्रेजी फिरंग्यास तहनामे लिहून दिले कैसे व यांजकडील घेतले आहेत लिहून कैसे, हा आर्थ ध्यानास आणायाविसीं पूर्वी सेवेसी लिहिलें होतेंच. मचले न मचलें कळले

नाहीं. म्हणून पुन्हा सेवेसी श्रुत होये. मानाजी आंगरे यांपासी माणूस कारकून कोण समंजस आहे, आपला हात गुंतविला तैसा त्यांचाहि कोणे प्रकारे गुंतऊन घेतला आहे, मनास आणतां सेवेसी विदित जाहाले आसेल नसेल, तर सहजच होईल. परंतु पूर्वावलोकने जो प्रारंभ होईल तो परिणामास पावेल. सेवेसी श्रुत होये. जनराल मारनिलेसीं आम्ही बोलिलों, श्रीमंत राजश्री पंतप्रधान तुम्हावर विश्वासून, कदाचित लिहितील, जे तुम्ही कराल तें आपण केलें, तेव्हां तुम्ही किफायत ती कराल तर मध्यस्थ जाहाल्याचा फाईदा तैसाच सर्व जिव्हाला फिरंग्याचा पुरता हातांत घ्या मग लिहा. त्यास कदाचित फौजा उतरतील खालीं, म्हणून स्वामीस सूचना लिहिली आहे. फिरंग्यासहि लिहितील तेथून बलकटी करून, त्याचाहि मातबर अख्त्यारी माणूस येईल अगर काय लिहीतील ते सहजच कलेल. परंतु आपले तर्फेची बळकटी करायाची करून उपयोगी मनुष्य पाठवायास स्वामी समर्थ आहेत. भानजी रंगरेज येथें आला आहे, तो सांगत होता, चेउलास स्वामीकडील लोक आले आहेत. हशाम व पाव लोक, त्यांस जाहालें आहे जे हर प्रकारें गोडी होईल तर उतम. याकरितां आम्हास हाय (?) उपाय सांगोन जिव्हाला मनास आणीत होता. त्यास उतर करणे प्रसंगोपात तें केलेंच आहे, सेवेसी श्रुत होये. थैली बिजुरेची आली ती कल्याणमार्गी स्वामीकडे रवा(ना) जाहाली म्हणून सांगत होता. सेवेसी श्रुत होये. लक्ष्मीबाईचे पत्र जुन्या जनरालास आले होते त्याचे उतर नवे जनराल याणी लिहिले आहे ते या जासुदाबा रवाना जाहाले आसे. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The Peshwa's Vakil in Bombay reports to him his talks with the British Governor on the subject of the Sidi of Janjira being helped by them.*

No. 378] [*14-1-1736*

छ १४ रमजान

मंदवासर

श्री

राजश्री पिलाजी जाधवराव गोसावी यांसी.

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो चिमणाजी बलाल आशीर्वाद सुा सीत सलासेन मया अलफ. कोंडाजी यादव याजबराबर. रुा २५०० अडीच हजार पाठविले आहेत हे घेऊन येणेप्रमाणे देवणे,—

१२०० हशम रोजमरा पंधरवडा.
१३०० लस्करचे रोजमरेयाबद्दल

२५००

येणेप्रमाणे अडीच हजार रुपये देववणे. साटम व खानविलकर यांस दर असामीस येक रुपयाप्रमाणे देवणे. अंतोजी सिंदे याकडील लोकांस रोजमरा महिना पावला आहे. छ १ सवाली रोजमरा देवणे. जाणीजे छ ११ रमजान, बहुत काय लिहिणे.

¶*Chimaji Appa sends Rs. 2,500 to Pilaji Jadhav and asks him to utilise the sum for paying the wages of the troops.*

No. 379] [*2-2-1736 ?*

श्री

श्रीमंत राजश्री राऊसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक कृष्णाजी माहादेव मो किले महिमतगड साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। फाल्गुन सुध द्वितीया जाणोन स्वामीचे कृपेकरून मो मजकुरी सुखरुप असो. यानंतर श्रीमंतानी सेवकास या प्रांती स्वारीस रवाना केले ते येथे येऊन छ २३ रावरी किलेयावरी निशाण चढले. याचे सविस्तर वृत राजश्री खंडोजी माणकर सुभेदार याचे पत्री सविस्तर लिहिले असे त्याजवरून सर्व अवगंत होईल. वरकड सर्व साहित्य करणार स्वामी समर्थ आहेत. मी स्वामीचे पदरीचा असे. क्षणक्षणा परामृशास अविस्मर न असावे. बहुत काये लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनती.

¶*Krishnaji Mahadeo reports to the Peshwa the hoisting of his flag on the Mahimantgad fort.*

No. 380] [*2-2-1736*

श्री

तीर्थरूप राजश्री तात्या स्वामी
वडिलांचे सेवेसी

अपत्यसमान विठोबाने साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता। फाल्गून शुध द्वितीया मुकाम उदयपूर लस्करात समस्त सुखरुप असों विशेष. राजश्री

ाबाचे कागद पुण्याहून पौश सुध त्रितीयेचा आले. चिरंजीव धोंडू व आपा व गोविंद समस्त मनुशे सुखरुप आहेत. पुण्यात धारण पांच पाइल्या जोरी ाजरी व तादूल साडेच्यार पाइली आहेत. कोकणांतील वर्तमान ामलाने बाणकोट घेऊन पाडून टाकिला. जयेगडापासोन विजयदुर्गापावेतो ुल्क जाळिला. वस्ती कुली नाही. पुल्यांचा गणपती विछिन केला. बंदी काही सांपडले नाही. दाहापाच माणसे म्हतारी कोतारी ापडिली ती मारिली. आपणास कलावे याकरितां लिहिले आहे. राजश्री बाबूराव सुखरूप आहेत. स्वामी सेवेसी तत्पर आहेत. आंबेगावी समस्त नुसे सुखरूप आहेत. सेवेसी श्रुत होये हे विनंती. चिरंजीव नारोबा गोविंद लाल याजवल आहे. त्याचा परामर्श केला पाहिजे. त्याविसी रा। गोविंदपंतास काही सांगितले पाहिजे. लोभ असो दीजे हे विनंती. बा। राजश्री नारोपंत व ामाजीपंत उभयेता व संकरू व बालाजी नारायेण स्वामीस सा। नमस्कार. सेवेसी हरि तुकदेव व निलो गोविंद रख्तवान साष्टांग नमस्कार

पोष्य बापूजी नारायेण साठे सां नमस्कार. पो। गणेश केशव कानडे व गणोबा आगासे व बाळू रानडे सां नमस्कार. पत्री परामर्श केला त्यावरून बहुत समाधान जाले. लोभ असों दीजे हे विनंती.

चरणरज अंताजी बलाल सां नमस्कार विनंती उपरी. आपले पत्र राजश्री बाबूराव यांस आले त्यावरून बहुत समाधान जालें. आपण आज्ञा केली त्याप्रमाणें वर्तणूक करूं. विदित जालें पाहिजे. राजश्री कृष्णाजीपंत लस्करांत ठेविले आहेत. राजश्री राऊ सडे स्वारीने राणाजीचे भेटीस आले. लक्ष्मणपंत व मी बाबूराया-बराबर आहो. कृष्णाजीपंतास आयाबाजवल ठेविले. राजश्री बाबूराव याणी पत्र लिहिले आहे त्यावरून सविस्तर वर्तमान श्रुत होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ती. राजश्री रामाजीपंत दाजी व राजश्री रामाजीपंत आगासे व राजश्री सखोपंत व दि। पोतेनीस व राजश्री बाबूराव वागरेकर स्वामीस अंताजी बलाल याचा सां नमस्कार विनती लि। परिसे. सदैव येणारा मनुशासमाग (मे) पत्री परामर्श केला पाहिजे. राजश्री वासुदेवबावास नमस्कार प्रविष्ट कीजे. तुमची मनुशे घरी सुखरूप आहेत. राजश्री रामाजीपंत आगाशे तुमची पावस शामलाने जाळिली. माणसे कोणी सापडली नाहींत. तुमची माणसे पळोन गेली. तेथे सुखरूप आहेत. काही चिंता न कीजे. लोभ कीजे. हे विनंती. राजश्री अंताजी माणकेश्वर यास सां नमस्कार प्रविष्ट कीजे हे विनंती.

¶*The raiding incursions of the Sidi into the west coast are reported in this letter. There are some postscripts written by some persons in the camp to their friends.*

5509

No. 381] [13-2-1736 ?

पा। छ ११ सवाल.

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. जंजिरे दंडाराजपुरी येथून मोहनमाला आल्या त्या कोणाकडे गेल्या त्याचा थांग लागला नाही. हे वर्तमान त्या स्थलाहून तहकीक आहे. त्यावरून राजश्री खंडोजी माणकर व राजश्री होनाजी बलकवडे यास पत्रे पाठविली. किल्याची चौकशी खबरदारीने करणे व पाहारे बदलणे म्हणाने पत्रे पाठविलीं आहेत. जे समई वर्तमान ऐकिले तेच समई उभयतास उगऊन लिहिले आहे कीं किल्याचे पहारे बदलीत जाणे व चौकशी ये गोष्टीची युक्तीने करणे ऐसे लिहिले आहे. विदित होय हे विज्ञाप्ति.

¶*The writer asks Khandoji Mankar and Honaji Balkavade to be watchful as desired by Chimaji Appa.*

No. 382] [Received on 24-2-1736

पो। छ २२ सवाल.

श्री

पुरवणी तीर्थस्वरूप राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

विनंति उपरी. रा। बहिरोबा सेणवी रा। संभुसिंग जाधवराव यास आणावयास पाठविले होते ते आले. जाधवराव तूर्त येत नाही. माहोरपटीकडे गेले म्हणून त्याचे पत्र आलें व याणीहि सांगितले. त्यावरून त्याजकडील जाबकरी आले होते त्यांजबराबर जाधवरायास लेहन पाठविले की, तुम्ही कोणाच्या सांगितल्यावरून दर्शनास यावयाचा अनमान केला असेल तरी कोणे गोष्टीचा संशये न धरिता पत्रदर्शनी सडेच येणे. फौज न आली तरी कार्यास येईल. पहिले दोन च्यार वेल लिहिले, परंतु अद्यापि आलेत नाहीं तरी अविलंबे येणे. खाशानी स्वदस्तुरे लिहिले आहे की या उपरी यावयाविषीं लिहिणार नाही. सेवटील पत्र हे पाठविले आहे. सत्वर येणे म्हणून राजश्री स्वामीनी स्वदस्तुरे दोनच्यार वली लेहून राजश्री संभुसिंग जाधवराव यास पत्र पाठविले. सारांष राजश्री स्वामीच्या चितात आहे की हिंमतबाहादराचा सरंजाम यांस द्यावा ऐसे आहे. आजी आपले पत्रे-

कडूनहि सदरेस बोलिले. विदित जाले पाहिजे सेवेसी श्रुत होये. जासूद आवघे सातारियाचे पाठऊन द्यावे. आम्हाजवळ जासूद नाही हे विज्ञापना.

¶*Chimaji is informed that the King is doing his best to bring Shambhusing Jadhao to his presence with a view to send him to Gowalkot.*

No. 383] [*28-2-1736*

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसांवी यासी

ॐ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंति येथील क्षेम ता॰ छ १६ सवाल मुा किले सातारा जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. पेशजी * * * प्रांते आसता * * * स्वामी यांणी आम्हास खुद दर्शनास यावयाविषीं आज्ञा करून आज्ञापत्र सादर केले हे वृत पूर्वी आपणास लिा होते त्यावरून कललेच असेल. सांप्रत आज्ञेवरून आम्ही मजल दरमजल गोरगांवचे मुकामीहून आजी मंगलवारी येथे आलो. च्यार घटिका रात्रीस राजदर्शन जाले. आद्यापि बोलीचालीचा प्रसंग जाला नाहीं. येथील भावगर्भ कळलियावर मागाहून आपणास लेहून पाठऊन. फौज तो पेणेपलीकडे रवाना केली आहे. सां(प्रत) आम्हास गोवलकोटास पाठवणे जाले तरी फौजेविषीं आपणास लिा तरी आपण उतर प्रत्योतर करावे. सांप्रत फौजहि नाहीं आणि हाशमहि थोडे बहुत होते ते पुनरोक्त जिकडील तिकडे गेले. प्रस्तुत फौज अगर पायेचा जमाव आहे यैसे नाहीं. पुढे राजश्री पंत प्रधान आलियानंतर जे आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे, याप्रकारे उत्तर पाठवावे. सांप्रत पेच तो पडला आहे. ब्रा विचार करून प्रसंगानुरूप वर्तणूक करणे ती केली * * रामचंद्र हरि यास फौजसहवर्तमान इचलकरंजीचे मदतीस पाठविले, यास्तव राजश्री स्वामी बहुत सक्रोध आहेत म्हणून परस्परें वर्तमान येकिले. येसियास माानिलेस बोलावयाचा विचार केला पाहिजे. रा नारोजी कडू व चिमणाजी बापूजी यास पत्रे लेहून पाठविली आहेत ही त्याजकडे रवाना केली पाहिजेत. विशेष काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhav to Chimaji communicates his arrival at Satara at the behest of the King and the news of the Court.*

5511

No. 384] [Received on 13-3-1736?

छ १० जिलकाद

श्री

पुा राजश्री माहादजीपंत गोसांवी यांसी

विनंति उपरी आमचे नारूचे वर्तमान तरी नारू फुटले. पू निघाला. परंतु आद्याप निशैल होऊन उभे राहवत नाही. आपल्यास कलावे याकरितां लिहिले आसे. आपल्याकडील वर्तमान लिहिले पाहिजे हे विनंति.

¶*Pilaji Jadhao informs Mahadajipant Purandare that he is suffering from guinea worms and has not yet fully recovered.*

No. 385] [Recd. 22-3-1736

छ १९ जिलकाद

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ व ताा राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

विनंति उपरी. सोमवारी त्रितीये प्रहरी राजश्री नारबावा मंत्री याच्या घरास पत्राचा जाब मागावयास गेलो. त्यांस ते समई गोपाल भिवानजी आत्रे व त्याचा पुत्र दाभाडियाकडे चाकरीस आहे तो गोवलकोटीहून छ मारी आला. त्याने वर्तमान तेसमई जबानी सांगितले ते आम्ही यैकिले. राजश्री संभाजी आंगरे सरखेल रत्नागिरीस येणार. आले आसतील. बावाजी म्हसके जमावसहवर्तमान भांडी[1] दहाबारा व दोन हजार माणूस घेऊन गोवलकोटास येतात. रवाना जाले आहेत म्हणून वर्तमान सांगितले. पुढे आणिक वर्तमान सांगणार. मग आम्ही तेथे होतो याकरिता उठोन गेले. विदित जाले पाहिजे. राजश्री बावास पत्र प्रविष्ट केले त्याचे उतर घेऊन पाठविले आहे त्यावरून विदित होईल. राजश्री अंताजी मल्हार याचे घरी कमोद पटणियाचे तांदूळ कैली मण ·।।· दाहा पुणियात राजश्री नारबावाचे आहेत, त्यानी आम्हांस आज्ञा केली की स्वामीस पत्र पाठऊन तांदूळ सत्वर अणून पावते करणे. पुढे दिवसगत लागली म्हणजे प्रजिन्याचे येणार नाहीत. याकरिता स्वामीनी त्याचे तांदूळ सत्वर पाविले पाहिजेत. येविसी आनमान सहसा केला न पाहिजे. राजश्री सुमंतानी राजश्री बावास पत्र लिहिले होते त्यामध्ये मजकूर लिहिला, कीं नवाबाचे दरबारी वर्तमान

---

१ तोफा.

आहे की राजश्री पंतप्रधान यानी हपसियासी तह केला तर याचे वर्तमान काये ते लिहिले पाहिजे. स्वामीस वर्तमान कलावे याकारिता लिहिले आसे. याचे उतर पाठविले पाहिजे सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*News-letter to Bajirao and Chimaji Appa from Shahu's Court, mentioning the movements of Sambhaji Angric*

No. 386] [*26-3-1736*

श्री

श्रियासह चिरंजीव राजश्री चिमाजी याप्रति मातुश्री राधाबाई आसाबाद उपरा. येथील कुशल ताा चैत्र वद्य येकादसी जाणून स्वकीय लिहीत जाणे विशेष. तुम्ही स्वारी दक्षण प्रांती आणाजी साटम वगैरे राा केले होते, त्याचे वर्तमान अलाहिदा पुरवणीत अंतोबानी लिहिले आहे व हाली राजश्री तुबाजी अनंत यांणी कितेक नाजूक गोष्टी तुम्हास लेहून पाठविल्या आहेत व राजश्री आनंदराव पंडित सुमंत यांणी तुम्हांस पत्रे लेहून पाठविली आहेत व कितेक मनसबे येऊन पडिले आहेत. परंतु यंदा सारेच गोष्टीचा उदघाट चिरंजीव बाजीराऊ उतर प्रांती गेले असतां करावयाचा नव्हता, परंतु घडोन आलिया गोष्टीस हाली होये नव्हे म्हणावे यैसे काये आहे. याउपरी तरी जे गोष्ट करणे ते पायासुध करून पाये घालावा न घालवा हा पुरता विचार करून जे करणे ते करावे. अनंदरायाची पत्रे व अणाजी साटमाकडील पत्रे व तुबाजी अनंत याजकडील पत्रे आज छ २४ जिल्हेजी अंतोबानी राा केली आहेत. ती येऊन पोचतील. त्यावरून वर्तमान सकल विदित होईल. तुबाजी अनंत याजकडील राजकारण आले. त्यास घडोन येईल तेव्हा खरे. परंतु येंदाच करावे यैसे नाही. यंदा ताणाताण जाली आहे. याकरिता यंदा करावयाचे नव्हे. दसरा जालियाउपरीं जे करावयाचे ते विचारे करून करावे. हे आसीर्वाद.

¶*Radhabai advises Chimaji Appa not to have many irons in the fire especially at a time when Bajirao was occupied away in the north. She also asks him to think well before any undertaking, if he cannot avoid it.*

No. 387] [*About March 1736*

श्री

नकल

साष्टांग नमस्कार विनंती उपरी. स्वामीकडून राजश्री नरसीपंत आले, त्यानी राजपत्रे व आपली पत्रे आणिली होती, ती ज्याची त्यासी दिल्ही. त्यावरून

अवांधेया सरदारांनी तह केला होता, कीं मुहूर्त पाहून पलीकडे जावे. रा संताजी जाधवरात्र व रा दुर्गोजी भोइटे व जयसिंग सिर्के यांनी निच्येय केला तो राजश्री बावाजी म्हसके यांनी मंगळवारी काळुसरीवरून तोफा उतरून मिरजोळीवरी आले. त्यांचे हजार बारासे माणूस दुखणियानें पडिलें. खासा बावाजी म्हसके यासही बरें वाटत नाही. तैसेच सारे लस्कर दुखणियाने घुमूं लागले आणि सिदीसात अजनवलीस आला हे वर्तमान तहकीक पाहून काळूसरीयाहून उतरून आले. वरचील सरदार व आम्ही आपले जमावानिसीं पागेवरी आहों. स्वामीस कळावें म्हणून लिहिले असे. याउरी जे होईल ते पाहावे. तोफा घेऊन जयगडास जातात. पुढें ज्याच्या भरवसियावरी स्वामीचा मनसुबा होता, त्याची गत ये रीतीची जाहली. तळ जाळून निघून गेले. अता पलीकडे जावयाचा होता दिसत नाही. याउपरी आम्हास काय आज्ञा केली पाहिजे. त्याप्रो वर्तणूक केली जाईल. कितेक वर्तमान गोपाळकडू जबानी सांगता विदित होईल. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The writer reports (to Bajirao) how troops were suffering from disease in Konkan. The letter refers to Sidi Sat and his activities at Anjanwel.*

No. 388] *[11-4-1736*

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

सेवक त्र्यंबकराऊ विस्वनाथ सा ना वि. येथील कुशल ता अधिक शुा १३ परियेत सुखरूप असो विशश. स्वामींनी पत्र पाठविले की आम्ही कुलाबियास आलो. युध्यामुले सिदीसाद मारिला हे गोस्ट बहुत उतम जाहाली. (ऐसि)यास आज्ञा की तुम्ही फौजेसह * * * * * येणे म्हणोन लिहिले. परंतु जासुदाची जोडी पुणियास भेटली, समागमे पंचवीस चालीस राऊत होते त्यास निरोपहि दिला. वरकड काही फौज खानदेशात रा बालाजी-पंतापासी ठेविली. आपण खानदेशातून अधिक शुद्ध ४ घरास आलो. त्यास आलीकड ऐकिल की स्वामी अस्टमी प्रांते आले आहेत. त्यास ते प्रांती राहा-वयाचा अवकाश असला अगर लौकरच यावयाचा विचार असेल त्याप्रमाणे ल्याहावयासी आज्ञा केली पा * बहुत काये लिहिणे कृपा लोभ असों दिल्हा पाहिजे हे विनंति.

¶*Trimbakrao Vishvanath writes to Chimaji Appa of his arrival home from Khandesh.*

No. 389]]Recd. 12-4-1736

पो छ ११ जिल्हेज.

श्री

राजश्री पंत प्रधान गोसावी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेो संताजी जाधव दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीये स्वकुशल लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे विशेष. गोसावीयानी पत्र पाठविले ते उत्तमसमई प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहला. ऐसेच निरंतर सांभाळपत्र पाठऊन परामृश करीत जाणे. याजवर गोवलकोटचे वर्तमान सविस्तर लिहिणे म्हणोन लिहिले, त्यास राजश्री संभाजी आंगरे याजकडील राजश्री बावाजी म्हसके जमाव व तोफा घेऊन अक्षतृतीयेस येऊन दाखल जाहाले. त्यास कालुसिच्या डोंगरावर येऊन तोफा-जोडून मोरचा लाविला. रोज तोफाचा मार कोटामधे होत आहे. आणिकही तोफा आणावयास जमाव गेला आहे. दौ चो रोजा तोफा येणार. आलीयावर आणीक दोन मोरचे बसतील. आपण फौजेनसी चिपोळणावर बसलो. आम्हाकडील मोरचा हिरदेरायाच्या बागानजीक खाडीचे काठी बसला आहे. तोफा आलियावर हेही मोरचे पुढे चालतील. किलाहि जेर होईल. किलाही गजबजीला[१] आहे. आपणास कळावें म्हणून लिहिले असे. पुढेंही जे वर्तमान होईल ते लिहिले जाईल. विशेष काय लिहिणे कृपा निरंतर असो दिधली पाहिजे हे विनंती.

¶*Santaji Jadhav sends Bajirao news of the fighting at Gowalkot*

No. 390] [12-4-1736

तालीक

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति

स्वामीचे सेवेसी

* * सी सेवक संताजी जाधव व दुर्गोजी भोइटे सेवेसी विज्ञापना ताा छ ११ जिल्हेज माहाराजाचे कृपादृष्टीकरून सेवकाचे व लस्करचे वर्तमान येस्थास्थित असे. यानंतर सेवेसी विनंतिपत्रे जाहाल्या वर्तमानाची श्रुत केली. त्यास येथील काही बेहबुधीस दिसगत लागली, याकरिता हाली राजश्री नाइकजी

१ गजबजणें = घाबरणें.

भोइटे व मानाजी चव्हाण सेवसी पाठविले आहे हे सर्व येथील वर्तमान निवेदन करतील त्याप्रमाणे माहाराजानी कृपालु होऊन बेहबुदी करावयास आज्ञा करविली पाहिजे. सिदीसाद याजकडील वर्तमान तर रा बावाजी म्हसके यास कागद सुवर्णदुर्गाहून हरजी नाईक कदम यानी पाठविला होता त्याची नकल सेवसी पाठविली आहे त्यावरून सर्व वर्तमान निवेदन होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*The King Shahu is requested by Santaji Jadhao and Durgoji Bhoite to issue orders for the defence of the place against the attacks of Sidi Sat.*

No. 391] *[14-4-1736 ?*

छ १२ जिल्हेज

श्री

विनंती उपरी. आनंदराव रघुनाथ दिा राजश्री सरलस्कर याजकडून गोवलकोटचे वर्तमानाचे पत्र आले आहे. तेंच बजिनस स्वामींकडे पाठविलें आहे त्यावरून सविस्तर वर्तमान कळेल हे+ विनती.

¶*Chimaji to Bajirao forwarding a letter from Anandrao Sumant conveying news of the fight at Gowalkot.*

No. 392] *[15-4-1736*

नकल

पाा छ १३ जिल्हेज

मुाा कुलाबा

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी यासी

९ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ कृतानेक दंडवत विनाति येथील क्षेम ताा छ १९ जिल्हेज जाणून स्वकीये कुशललेखनाज्ञा करीत असिले पाहिजे विशष. आपली आज्ञा घेऊन स्वार झालो. छ १२ मिनहूस खिर्डी ताा चिपळून येथे मुकाम केला आहे. छ १४ रोजी गुरुवारी प्रात:काली स्वार होऊन श्रीभार्गवरामाच्या देवलाजवल जाऊन लागल गाव पाहून धामणीकडे गेलो. जागा पाहून फिरोन आलो. अजी प्रात:काली धामणीचा मोर्चा काइम केला आहे. कालोस्तिग्राचा मोर्चा अद्यापि कोणी तिकडे जाऊन पाहून काईम केला नाही. त्याजपासी सरंजाम

\+ पत्र चिमाजी आपाचें.

5516

म्हणावा तर फौज आहे ती आपणास अवगत आहे. पाईचा जमाव पाहिजे. मोर्चा पाईच्यानी बसवावा; पाठीसी राउतानी असावे, राउताने पाठमात्र राखावी यैसा विचार आहे. पाईचा जमाव असलियां मोर्चा बसेल येविशी महाराज राजश्री स्वामीस विनंति केली. . कालोस्तियाचा मोर्चा काईम होये ते करावे. अंजनवेलीकडील खाडी आली(कडे) आहे ती धामणीपासून येक भाग होऊन येक फाटा धामणीच्या टोंगीखालून गेली आहे. येक पलीकडून गेली ती कोलास्तियाच्या डोंगराखालोन गेली आहे. दोन्ही मोर्चे काइम जालिया खाडी बंद होईल. वरकड राजश्री स्वामीसंनिध कितेक विनंति करितात कीं पस्तिस वावे लोखंडी साखली असलियां खाडी बंद होईल. यैशास जंजिरेचे प्रयोजन आहे यैसे नाहीं. दोन्ही मोंचे मातबर काईम असलियां जेजाला दाहापांच पाहिजे, म्हणजे सहजच खाडी बंद आहे. तर कोलोस्तियाच्या मोर्च्याविषी विनंति करून काइम करून सरंजाम पोहचे तो अर्थ करवावा. • बेलदार वगैरे सरंजाम येते समई पाठवावयाविसी आज्ञा केली होती तदअनुरूप सरंजाम पोचलियाने होणे ते आपले प्रतापे होऊन येईल. सारांश मोर्चा कायम जालिया लस्करच्या पोटापाणियाचेहि चालिले पाहिजे. धामणीच्या मोर्च्यास जावयासी नद्या तीन आहेत. येक दक्षिणेस तिवरेयाच्या घाटे आली ती, येक पूर्वेकडून पंधरा गावची आंबडसेवरून आली आहे ती, येक उतरेकडून जगबुड आली, यैशा तिहीकडून तीन नद्या दरम्यानें धामणीचा मोर्चा आहे. यैशास राजश्री पंतप्रतिनिधि याणी तिगस्ता नदियास दोन टोकरे केले होते तदनुरूप टोकरे याचे सामान करावे लागते. तर टोकरे याचे सामान होऊन दोन टोकरे नदीस पडत आणि लस्करास दाणा गला पोहचे ते करावे लागेल. तिवरियाच्या घाटे चवक्या बसवाव्या लागतील आणि रस्त पोहचवावी लागेल येविसीचा बंदोबस्त करणे ते विनंति राजश्री स्वामीस करून घाट चाले ते करावे. तैसेच कुंभारलेयासी चौकी पाहिजे. प्रस्तुत आम्ही सेंभर माणूस पाठऊन घाटाखाली चौकी बसविली आहे तरी नेहमी चौकी तिकडून बसवावयाविषी विनंति कर्तव्य ते करून कुली बंदोबस्त घाटाचा होये तें करावे. राजश्री पंतप्रतिनिधि यांकडील जमाव येणे त्यापैकी काही जमाव आला आहे, उरले लोकहि येतील. रा। नारोपंडित सचिव याजकडील जमाव अद्यापि आला नाही. येताद्विसी आज्ञा केली होती की तोफा व. जेजाला वर्कड सामान जे पाहिजे ते मागाहून पोचत करून. यैशास तोफा व दाहा वीस जेजाला येत ते करावे. टोकरे याचे सामान येऊन टोकरे होत व दोन चार होडिया तयार होत ते केले पाहिजे. विशष काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंति.

¶*Pilaji Jadhao informs Chimaji Appa of his arrival at Chiplun and of his having inspected the situation of Gowalkot for erecting batteries.*

5517

No. 393] [16-4-1736

श्री

पुा राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी यासी

विनंती उपर. आवंदा पेचावरी पेच पडले. आपलेहि जाणे तिकडेच झाले. आमचा गुंता येथेच जाला. आम्हासमागमे लोकाची नेमणूक राजश्री स्वामीनी केली. त्यांपैकीं राजश्री प्रतिनिधीकडील मात्र लोक येऊन पावले. वरकड राजश्री पंतसचिव यांजकडील हाशम तीनसेपैकी काही आले नाही. राजश्री प्रतिनिधीकडील जमाव व आम्हाकडील थैसे मिलोन आम्ही काली छ १९ जिल्हेजी धामणीचा मोर्चा कायम केला. वरकड राजश्री स्वामी बोलिले त्याप्रमाणे साहित्य होणेजाणे हा भरवसा आपणास विदितच आहे. पुढे पर्जन्य काल आलियानंतर दाणादुणा मिळणे नाही. राजश्रीकडील साहित्य होणे जाणे हा विचार कळतच आहे. सारांश प्रसंग पडलियास दोन मास उष्ण काल येथे राहिले पाहिजे. राजश्रीकडील हुजरातचा मोर्चा कालुस्तियावर आला तरी आम्हाकडी-लहि मोर्चा धामणीवर कायम राहील. तिकडील साहित्य होऊन मोर्चा होणे हेहि मानसिकच आहे. जैसा प्रसंग दिसोन येईल, त्याप्रमाणे वर्तणूक केली जाईल. वरकड येथील सर्व वृतांत संताजी म्हसका खास बारदार याजसमागमे लेहून पाठविला आहे, त्यावरून विदित होईल. राजश्री पंतप्रधान याजकडील कागदपत्रे येईल ते वर्तमान लिा पाहिजे. विशेष काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao writes about his difficulties at Gowalkot to Chimaji Appa.*

No. 394] [18-4-1736?

श्री

श्रीमंत राजश्री आपा

साहेबाचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक सुभानजीराव येरुणकर नामजाद किले राजमाची सेवेसी विज्ञापना. तागायत छ १७ माहे जिल्हेजपावेतो किले मजकुरीचे व आज्ञा-धारकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजेश्री वासुदेव जोसी याही पत्र पाठविले; तेथे लिहिले कीं किले मजकुरीची स्वारी पेणचे मुकामी रवाना करणे; त्यावरून किलपैकीं ५० पंनास माणूस पाठविलें. मा येसजी ना कानदकर याकडील लोक ७५ पाऊणसे रवाना करणे म्हणोन आज्ञा केली. त्यावरून तेही लोक रवाना केले. हली किल्यास भरतीचा विचार आहे तो स्वामीस विदितच

आहे; तर कृपाळु होऊन किला पैकी लोक रवाना करणार स्वामी समर्थ आहेत. राजश्री रघुनाथजी बाबा यांसहि पत्र पाठविलें तें त्याकडे रवाना केलें असें. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

¶*Subhanjirao Yerunkar informs Chimaji Appa of his having dispatched to Pen a party of 50 fighting hands as requested by Vasudeo Joshi.*

No. 395] [*12-5-1734* ?

छ २२ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

सेवेसी विनंती. आज्ञाधारक कृष्णाजी माहादेव व कानोजी माणकर मो तलांगड चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार व साष्टांग दंडवत विज्ञापना. ताा छ १९ माहे जिल्हेज जाणोन स्वामीचे कृपावलोकनेकरून प्रांत मजकूरचे वर्तमान व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर मौजे माहागांव माा तले येथील गुरे भोरपकरांनी नेली आहेत, त्याची याददास्त आलाहिदा पाठविली असे; व कुणबी सेवेसी रवाना केला आहे. स्वामीनी कृपाळु होऊन, भोरपकरास येक पत्र, आणि जासूद कुणब्या बाा देऊन गुरे कुणब्याचे हातास येत ते करणार स्वामी समर्थ आहेत. विशेष राा रामचंद्र जनार्दन दिाा राजश्री बाबूराऊ विस्वनाथ हे माहाडाहून स्वारीस दिवे तपेयांत गेले होते; येसीयासी मतगडाहून स्वारी शामलाची आली. त्याही बारी धरून जूज केले. तीन कोस पिछा केला, दाहावीस माणूस जाया जाहालें. से दोनसें गुरें घेऊन आले. गनीम शेर केला. येकले वर्तमान सेवेसी लिहिले आहे, विदित होये. वरकड गोरेगांवी त्याजकडील नामजाद लोक आहेत, त्यास तेथें बसो द्यावें की काय ते आज्ञा करावी. आज्ञा होईल तर उठून वाटेस लाऊन. विशेष. इरसाल (फाटले * * *) आंबे सुमार १५० दीडसे सेवेसी रवाना केले असत. सेवेसी विदित होय कृपा वर्धमान केली पाहिजे हे विज्ञाप्ती. अलीखान सोड. कबिलेसुधां रवाना केले होते. सेवेसी पोहचले न पोहचले हे नकले; त्याचे उत्तर पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे हे विनंती.

¶*Krishnaji Mahadev writes to the Peshwa about a fight that took place between the Sidi and Ramchandra Janardan belonging to Baburao Vishvanath.*

No. 395A] [21-4-1736

पो छ २० जिल्हेज.

श्री

पुा तीर्थरूप राजश्री राऊ व तथा राजश्री आपा स्वामी सेवेसी

विनंती गोवलकोटीहून पत्रे आली त्याची नकल करून सेवेसी पाठविली आहे त्यावरून विदित होईल. साराऊष. गोवलकोटास काही येथून जमाव जाता दिसत नाही. तेथे तो जमाव गेल्याखेरीज कार्य होत नाही. राजश्री यशवंतराऊ पोतेनीस यासी राजश्री स्वामी म्हणतात कीं तुम्हाकडे हशम आहे त्यास पाठवणे. पांच हजार रुो खर्चास देतो यैसे म्हणतात. त्यास लोक म्हणतात कीं मागील चाकरीमुळे खराब जाहालें. दिवाणात तलब चहडली ते कांही मागत नाही; परंतु पुढे तऱ्ही आमची मोईन काय? पोटास कोणापासी मागावे? कबिल्याची बेगमी काय, यैसे म्हणतात. ते गोष्ट कोणी ध्यानांत आणीत नाहींत, यैसे वर्तमान आहे. पुढे होईल वर्तमान ते लेहून पाठऊ. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Pilaji Jadhavrao writes to Bajirao and Chimaji Appa the difficulty of sending reinforcements to Govalkot as the several commanders refuse to join the campaign with their forces.*

No. 396] [21-4-1736

श्री

पाा छ २९ जिल्हेज

मुाा कुलाबा

राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी यासी

श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील कुशल ताा छ २० जिल्हेज मुाा नजीक आंबडस जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपण सातारेयाहून स्वार होऊन गेलेयादारभ्य वर्तमान कलत नाही; तरी सविस्तर वृतलेखन केले पाहिजे. गनीमाने जागा हस्तगत केला होता. त्यास आपली फौज गेलियाउपरी जागा पुनरोक्त हस्तगत जाला किंवा जागा गनीमाने बलाविला आहे हे सविस्तर वृत लिहिले पाहिजे. कानडे प्यादे येकसे पांच आहेत. यैशास ते प्यादे प्रयोजनाचे आहेत येसे नाहीं, त्याचे मुबदला इकडे ठेवावे, तरी किले कोटाचे बेगमीखेरीज अधिक लोक आहेत, याजकरिता नवे ठेवावे यैसे नव्हते;

परंतु तिकडे पायेबंद लागला. तिकडील कार्यभाग सिधीस गेलियाखेरीज तिकडील लोक इकडे येतात यैसे नाहीं; तरी इकडे नवे लोक कानडे याच्या मुबदला ठेवावे की काये ते लिहिले पाहिजे. माणूस ठेवणे ते उतम पाहोन ठेवावे लागेल. येथेहि शरम राहिली पाहिजे. माणूस येथे आहे ते सर्व आपणास विदित आहे. पाचसे माणूस उतम येऊन येथे राहे ते करावे? उष्णकाल आहे, तों दाणे गल्याची बेगमी करावी लागती, येतद्विषई पेशजी संताजी म्हसका खासबारदार याजसमागमे लेहून पाठविले होते, त्यावरून विदित जाहाले असेल. सारांश उष्णकाल आहे तो दाणे गला याची बेगमी होय ते करावे लागेल; तरी तूर्त दाहा हजार रुपये येऊन येथे पोचत ते करावे. पैका कापड पाठविणे ते कुंभारलेयाचे घाटें पठवावे, म्हणून लिहिले होते; परंतु खिर्डीहून कूच करून, मोर्च्यांचे पाठीमागे आंबडसचे नदीवरी मुकाम आहे. यैशास तिवरेयाचे घाटे पाठवीत जावे. हा घाट आम्हास समीप आहे. इकडे जो यैवज पावयाचा असेल तो सातारा पोहचवावा. तिकडून माणसें पाठऊन घेऊन येऊन. विशेष काये लिहिणे, कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao communicates his own situation at Gowalkot to Chimaji Appa and asks news of the addressee's doings.*

No. 397] [*25-4-1736*

श्री

राजश्री चिमणाजीपंत आपा
गोसावी यासी

सकलगुणालंकर्ण अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री फतेसिंग भोसले दंडवत विनंती उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. आपण रा स्वामीस पत्र लिा कीं रेवतावरी (रेवसावरी?) सिदीसातासी युद्धप्रसंग जाला तेसमई युद्ध तुंबल होऊन, हपसियाचे हजार माणूस कापून काढिले, व सिदीसात खासा ठार जाला, यैसे वर्तमान लिा त्यावरून रा स्वामी बहुतसे खुशाल जाले. तुम्ही महत्कृत्य केले! सिदीसात म्हणजे केवल हपसियांचा मुख्यच होता. तो तुमच्या हाते पराभवाते पावला, थोरसे येश तुम्ही जोडिले. राजश्री बाजीराव प्रधान तिकडे गेले; मागे तुम्ही बरी सिकस्त करून हपसी बुडविला. हपसियाचा मूलकंदच उपटून टाकिला! चहूकडे लौकिक विशेषात्कारे जोडिला. तुमची निष्ठा राजश्रीच्या पायासी येकनिष्ठतेनें

सेवा करावी यैसीच आहे. तदनुसार मोठेसे येश तुमचे पदरी पडिले. सामान्य गोष्टी जाली नाही. आम्हास बहुतसे समाधान जालें. साकल्य वर्तमान कलावे याकरितां मुजरत माणूस पत्रलेख करून आपणाकडे रवाना केला आहे; तरी युध्याचे वर्तमान आद्यंत लिा पाहिजे. आम्हास रा स्वामीनी रा संभाजी राजेसाहिबास आणावयास पनालियास पाठविले आहे. रा प्रतिनिधि व रा नारबावा हेहि समागमे आहेत. आजी छ २३ जिल्हेजी सिरालीयास आलो आहे. पुढे होईल वर्तमान कलेल. रा नानाहि समागमे आहेत. ते व आम्ही यैसे यांस घेऊन, लौकरीच सातारियास जाऊन. रवाना छ २४ जिल्हेज. बहुत काये लिा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Fatesing Bhosle congratulates Chimaji on behalf of the King and himself on the victory he obtained over Sidi Sat.*

No. 398] [*27-4-1736*

श्री

श्रीमंत[+] राजश्री आपा
स्वामीप्रती.

आश्रित सदासिव दीक्षित पटवर्धन आशिर्वाद उपरी. वैशाख वदी १३ पर्यंत मुा पुणे सुखरूप असो विशेष. आपण साताराहून स्वार जालेत ते कुलाबा प्रांते जाऊन, महत्कार्य केले. भारती युध्यासमान युध्य होऊन महत शत्रु मारिला असे. पूर्वी जालें नसेल अशी युक्ती ईस्वरे तुम्हास अनुकूल केली. याउपरी उत्तरोत्तर आपले कल्याण आहे. आपल्या युध्याचे वर्तमान सर्वांनी आइकल्या उपरी जो आनंद उत्साह जाला आहे, तो दिवसेदिवस अधिकोत्तर होतो. आपण दर्शनास यावें हा उत्साह बहुत आहे. वर्तमान आइकतांच येत होतों; परंतु श्रीअग्निहोत्र करून दिवस थोडे जाहले, प्रवास करतां नये, यास्तव राहिलों. यानंतर आपण स्मरण करून पत्र लिहिले कीं, विसाजीपंत कांही मागतील तरी देणे, त्यास पूर्वी बापोजीपंतनानास तळ्याबद्दल चार हजार देविले होते, व आताही दोनचार दिल्हे. आनखी मागतील ते देतच आहों; व आऊजीकडीलहि कांही हवाला हुंड्या येताती, तेहि देतच आहों. आपणहि विसाजीपंतास ल्याहावें कीं, जे रा दीक्षित देतील त्यास जाब देत जाणे; व मोहरा अमदाबाजी व शहर्ची काल (?) घेणें असें विसाजीपंतास लिहिले पाहिजे. आपण विसाजी-

---

+ पत्र बालबोधींत आहे.

पंतास लिहिलें दीक्षीतांची पालखी पाठवणें, त्यावरून पालखी पाठविली आहे; कार्य करून पाठवावी. विशेष आज्ञा कराल तरी उंट भरून कापड पाठऊन देऊं. बाळाजीपंत सोनगडास गेले, व आपाजीपंत खांदेशांत पाठविले. घरी कोणी नाहीत. गुमास्तियाबराबरी पाठऊन देऊन देऊ काय ती आज्ञा करावी. विशेष. अंजिणविली प्रांत आपल्यास प्राप्त होईल, तेव्हां तेथील त्या स्थळी आमचा पुतण्याचा नावे येक उतम रोजगार कल्पून ठेविला पाहिजे. आपल्यास स्मरण बहुत राहतें म्हणून सूचनार्थ स्मरण असावें, म्हणून लिहिले आहे. बहुत काय लिहिणे. कृपा लोभ असो देणे. आशिर्वाद. मिति नळनामसंवत.

¶*Sadashiv Dikshit Patwardhan to Chimaji Appa offering congratulations on his victory over the Sidi and writing about money transactions.*

No. 399] [*April 1736 ?*

श्री

यांसि आज्ञा केली ऐसीजे, या प्रांते उपद्रव बहुत जाला आह; स्थलाच सरक्षण व्हावें लागते; तरी तुम्ही सहवर्तमानी सह येऊन, जाग्याचें संरक्षण करणें; भरोसा तुमचा आहे. धामधूम सनिध आल्यावरी यावयाचा नियेत होता. त्यास धामधूम दाहा बारा गावावरी आली आहे; याउपर लौकर येऊन परामृश करणे. कितेक लोक येऊन+, थळाचा उपद्र वारून. हे पत्र लक्ष पत्राचे जागा मानून पत्रदरसनी साहितास येन. बहुत काय लिहीन. जानतच हा.

¶*This is Shahu's order to send reinforcements to check the depredations of the enemy. The addressee is not mentioned.*

No. 400] [*Sept. 1733*

श्री

राजश्री पंतप्रधान
गोसावी यासी

॥ ᳵ श्रीसकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो पिलाजी जाधवराव कृतानेक दंडवत विनंती उपरी. येथील क्षेम जाणून आपले स्वकुशललेखन करणें. यानंतर राजश्री रघुनाथजी यानीं लिहिले की, गनिमाने नानवलीचा मोर्चा जालिला, याजकारिता गनिमास गाठून तंबी पोहचवावी लागत्ये.

+ पत्र शाहू महाराजांचें. यापढील मजकूर खद त्यांच्या हातचा आहे.

म्हणऊन येथून आरमारी लोक आणविले. त्याजवरून आरमारी लोक पाठविले आहेत. सा(मा)नहि पाठविले आहे. गनिमास तंबी पोहचवावयाचा विचार जाहाला आसिला तरी, तंबी जबरदस्तीने पोह(च)वावी लागत्ये. लोक तारवावरी दर्यावर्दी आहेत. त्याचे समाधान करून सांगवे (?) राजश्री संभाजी आंगरे तो अद्यापि आले नाहीं. त्यासहि पत्रे पाठविली आहेत. विदित जाले पाहिजे. विशष काय लिहिणे. हे विनंती.

¶Pilaji Jadhao sends succours to Rajpuri to hold in check the enemy who had burnt the batteries. He informs the Peshwa that Sambhaji Angria had not yet arrived and that he had written to him.

No. 401] [*April 1736*

नकल

श्री

पुा श्रीमत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राा संभाजी आगरे याजकडील मजकूर रामाजी दामोदर व भास्कर वैद्य याणी करून रघू राजवडा यास पाठविले तो सविस्तर मजकूर आपणास अवगतच आहे. रघू राजवडा गेला होता तो व फतेसिंग भोसले याजकडील कारकून आज आले. तेथील वर्तमान रघूजीने मोर्च्याचे लोकाचे सांगितले. त्यावरी सरखेलीनी उतर दिल्हे कीं, राजश्री स्वामीनी आपले कार्य बरे केले! कुलाबा देतो म्हणोन वर्षभर चालविले[1] फलादेश नाहीं! सांप्रत सिदीसाद याणी आपले बऱ्याची गोष्ट खरीखुरी सांगितली आहे कीं, तुम्ही आमचे साहित्य करावें. गोवलकोटचे मोर्चे मारून काढावे. आपण कुलाबा घेऊन देऊ, ऐसे वचन प्रमाण केले आहे. त्याप्रमाणे आपण करू. कोकणात राजश्रीचे काये आहे? निमे शामल, निमे आपण, तुम्ही काय निमित्य भांडता? त्यावर रघूजीने जाब दिल्हा की तुम्हास कोकण कोणी दिल्हे? त्यावर संभाजी आंगरे बोलिले कीं आपणास देवानी दिल्हे! तुम्ही चाकर नव्हा की काये म्हणून पुसिले. त्यावर उतर दिल्हे कीं आम्ही मवास तुम्ही आमचे करणे काये? ऐसे संभाजी आंगरे बोलले. लोक आपणांस काही मिलत नाहीं. गुराबा गलबते वोढावयाची आहेत ती वोढल्यावर से दोनसें मिलाले तरी देऊन. पनांस हजार रुा महिना द्यावा यैसे बोलला. आणि धातुपोशण कागद लेहून देऊन दोन वस्त्रे देऊन रवानगी करीत होता. याणी कागद व वस्त्रें न

---

१ चाळविलें.

घेतली. ते समई दोघाचे रुक्ष भाशण बहुत जाले. रघुनाथ प्रभूचे मुबादला यास ठेवा म्हणून बोलल्यावरी विसाजापंती न पुसतां तरीची चिठी करून देऊन यास बाहेर लाऊन दिल्हे. सिदीसाद याजकडील रेवासचा कोट घेतल्याचा कागद आला होता तो वाचून दाखविला. मानाजी आंगरे यास गोलीची जखम लागली. तमाम जमाव मारला. पुढे कुलाबापर्यंत मुलुक जालितो म्हणून लिहिले होते ते पत्र येतक्षणी तमाम किल्यावरील सरबती केली. शर्करा वाटली. राजश्री राव याजसी उतरपंथें युध जाले म्हणून राजपुरीहून लिहिले आले होते. त्याची दाहा भांडी मारिली म्हणोन रघू सांगत होता. पाचसे माणूस सिदीसादाचे मदतीस गेले आहे. ऐसी चर्चा विजयदुर्गी आहे. युध्यात कांही तरी अढललेच असेल, सत्य मिथ्य न कले. रघू सांगत होता त्याजप्रमाणेच रघूनी राजश्रीजवल सांगितल्यावर उगेच राहिले. मुलुक मारावा पारपत्य करावे यैसे मात्र बोलले. त्याजवर आपणास लेहून मानाजी आंगरे याचे भेटीचा विचार करावा म्हणोन बोलले; आणि आपणास राजश्री स्वामीनी पत्र लिहिले आहे. बहिरजी माहाडिकाबराबर पावेल. मानाजी आंगरे यांस पुढें करून, पारपत्य करावे ऐसा विचार दिसतो. मानाजी आंगरे याचे येणे आपल्या विचारावर आहे. चितास येईल तरी आणावे म्हणोन राजश्रीनी लिहिले आहे. ऊर्जित करून हाती देऊ म्हणून संकेत बोलले. काये विचार न कले. सिदीसाद बुडाला, येणेकडून निर्मे[1] [2]भांग संभाजी आंगरे यांची उतरेल. सेखीस ते! रघू राजवडा असतां तेथे वर्तमान आले नव्हते. हा आल्यावर गेले असेल. फतेसिंग बावानी घोडी पाठविली याचा मुबादला घोडा देणार आहे म्हणोन याजकडील रिकीबदार ठेऊन घेतला आहे. कलले पाहिजे हे विनंती.

¶*This is a news-letter from Shahu's Court at Satara. Sambhaji Angria's defiant attitude towards the Chatrapati and Shahu's decision to punish him severely are alluded to in the letter.*

No. 402] [*2-5-1736*

श्री

पुरवणी श्रीमत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. आपण युध्याचे वर्तमान साखरोजीबराबर सांगोन व लेहून पाठविलें ते याणी सविस्तर राजश्री स्वामीस निवेदन केलें. संतोशाचे वर्तमान

---

१ सिदीसादाचें निश्चयपूर्वक पारिपत्य झालें म्हणजे संभाजीची मस्ती उतरेल. सिदीनंतर सेखी म्हणजे शेवटीं संभाजीहि बुडवावा हा भावार्थ. २ भांग=कैफ, मस्ती.

परम अल्हादयुध्य (क्त) पुन्हा पुन्हा यांस बोलावून नेऊन राजश्री स्वामी विचारीत. हाहि सविस्तर सांगे, याजमुळे साखरोजीवर राजश्री संतोशी. आपाजी बरा बोलका माणूस निवडून पाठविला. बरा आहे म्हणत. हा येथे पावला ते दिवसी यास पंधरा मोहरांचे कडे सोन्याचें दिल्हे. निरोपसमई पंचवीस रुपये खर्चास दिल्हे. येक मंदील दिल्हे. आपणाकारणें बहिरजी माहाडिक हुजरें व जामदार दिा जामदारखाना व रत्नशाला व तबेलदार दिा खुद याजबराबर

आंगचा पोशाक विजयादशमीचे दिवसी घातला होता तो.		जडाव दिा किता	१
१ मंदील बादली १ झगा		ढाल १ तरवार - कटार	१
महमुदी १ चादर बादली १ पया (?)		परजरूपें १	
गुजराथी १			

येणेप्रमाणें पाठविले आहे. राजश्री स्वामी बहुत बहुत संतोशरूप आहेत. दिवसातून येक दोन वेळा या युध्याचे स्मरण करून भला हबसी बुडविला म्हणत असतात. राजश्री मानाजी आंगरे यास वस्त्रे मंदील दुपटा व झगा व याखेरीज तिवट कलसपाकी बांधावयाचे पदक तरवार कटार येणेप्रमाणे पाठविली आहे. विदित होये हे विनंती.

¶Jiwaji Khanderao Chitnis informs Chimaji how immensely pleased the king was at the news of Sidi Sat having been killed and of the dresses of honour sent to Chimaji and Manaji Angria.

No. 403] *[3-5-1736*

पो छ ६ मोहरम मुा तलागड

श्री

राजश्री चिमणाजीपंत आपा
गोसावी यासी

ॐ आसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंति येथील क्षेम ताा छ २ मोहरम मुा धामणी नजीक गोवलकोट जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. सांप्रत आपणा(कडील पत्र येऊन) कुशलवृत्त कळत नाही याजकरितां हाली मुजरद माणसे पाठविली आहेत तरी सविस्तर वर्तमान लेहून पाठविले पाहिजे. वरकड येथील अर्थ सविस्तर पेसजी वरचेवरी लेहून पाठवीत गेलो आहो त्यावरून श्रवण जालेच आसतील. रोजमरियाचे यैवजाविषई व कापडाविसी येकदोनदा लिा. परंतु

आद्यापि यैवज व कापडाची रवानगी होऊन येथे पोहचले नाही. तरी दुमाहां यैवज रोजमरियास व दोन तीन हजार रुपये * * * * णियाचे खरीदीबदल * * * * बे येथे येऊन पोहचे ते केले पा॥. विशेष काये लिा॥ कृपा केली पा॥ हे विनंति

¶*Pilaji Jadhao asks Chimaji Appa for funds and cloth.*

No. 404 *About 5-5-1736*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. राजश्री कानोजी भोसले पलोन गेले. म्हसवडाजवळ सिंदे याच्या ठाणेयात जाऊन राहिले आहेत. त्याचे पाठीवर आपण गेले होते ते सातारास राजश्री स्वामी फिरोन आले. राजश्री येमाजीपंत पुसेसावळीस ठेविले आहेत. परंतु राजश्री कानोजी भोसले हे निजामाकडे उदाजी चवाण याचे हातून बोली लाऊन जाऊन निजामास भेटावे यैसे आहे. पुढे पाहावे. राजश्री जानो संकर वारले. त्याचा रोजगार देवराऊ यासी सांगितला. जोत्याजी केशरकर याजकडील दिवाणदारी जानोपंत याची होती ती जिवबा चिटनीस यानी घेतली. छ ४ मोहरमी राजश्री संभाजी राजे याची भेट पालीस होणार आहे. पुढे सातारास घेऊन येतील तेव्हा कोणाचे घर देतील हा निछये नाही. आमचे घर रिकामे करविले आहे. लोक बोलतात की संभूपुरीची माडी द्यावी. कोणते करार होईल ते कळेना. राजश्री पिलाजी जाधवराऊ गोवलकोटास धामणीच्या मालावर आहेत यैसे वर्तमान आहे. सेवेसी श्रुत होणे हे विज्ञापना.

¶*The writer informs Chimaji Appa of the flight of Kanhoji Bhonsle from confinement, his pursuit by Shahu and his intention of going over to the Nizam. The letter refers to the proposed visit of Sambhaji of Kolhapur to Shahu at Pali.*

No. 405] *[6-5-1736*

श्रीमंगलमूर्ति

राजश्रीया विराजित राजमान्य राजश्री वासुदेव जोशी

पोष्य कृष्णाजी राम कृतानेक नमस्कार विनंती येथील कुशल जाणून स्वकाय लिहीत असिलें पाहिजे. विशेष तुमचें पत्र येक छ २० जिल्हेजचें लिहिलें व

येक छ २१ मिनहूचे येकून दोनीं पत्रें छ २३ रोजी मंगळवारी पावलीं. लिहिलां अभिप्राय कळों आला. परंतु येथें पांच दिवस खबर आहे जे गला बानकोटास जाणार म्हणून शामलाचीं गलबतें टपतात, यैशास गला पोहचून द्याव्यास इंग्रज आपलीं गलबतें देऊन शामलासी वांकडे पाहून घेतात यैसें होतां दिसत नाहीं. राजश्री मानाजी आंगरे यांस पुत्र जाहाला म्हणून गलबत काल छ २१ रोजीं आलें, व कांहीं इंग्रजास कपितान इंचबर्ड याच्या देण्यामधीं गला खेडींतील देऊं केला आहे. याकरितां गला यावयापूर्वीं इलाज योजावा म्हणून राजश्री राघो केशव कुलाब्यास रवाना करावे आणि दाना येथें देवितील, आणि याचा मुबदला तेथें देऊं म्हणतील तर उत्तम गोष्ट होईल. उभयतांचे जोखीम वारेल यैसें योजिलें आहे. आज रवाना करितों. कळले पाहिजे. बहुत काय लिहिणें लोभ आसों दीजे हे विनंती.

¶*Krishnaji Ram informs Vasudeo Joshi that the Sidi will not allow food supplies to be taken to Bankot, that he has kept a fleet to watch it and that there is no hope of the English offering their ships to take the corn as they would not like to break relations with the Sidi.*

No. 406] [*Received on 7-5-1736*

पा छ ६ मोहरम

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंति राजश्री स्वामी स्वामीवर फारसे कृपालु आहेत. यामागे कोणी कर्म यैसे केले नाही. या पुढे काही कळेना यैसे रोजबरोज स्वामीची स्तुत कारितात. सामादिकहि फारसे चितामधे खुसाल आहेत. भार्गवराम यासी प्रसन्न आहे म्हणून म्हणतात. जे कर्म कारितात ते अघटितच आहे यैसे म्हणून रात्रंदिवस स्तुत फार कारितात. त्यामधे राजश्री प्रतिनिधि व राजश्री नारबा व राजश्री येसवंतराऊ हे त्रिवर्गाचे घरी सिदीसात चांगला माणूस होता, परंतु येकायेकी मेला म्हणून श्रमी होतात. वरकड प्रजा व लोक व मुख्य देखील रात्रंदिवस चर्चा स्वामीच्या, (कीं) यैसे कार्य कोणाच्याने होणार नाही ते केले. वरकड राजश्री संभाजी आगरे सरखेल गोवलकोटास येत नाही. रघू राजवाडिया गेला होता तो फिरोन आला. मागाहून त्याजकडील संभाजी हरकारा व तिघे

मराठे दादजी आबेकर आला होता, त्यासी राजेश्री स्वामी फारसे बोलले. ते मागे फिरोन गेले आहेत. त्याचा मुलूक माराव्रयासीं राजश्री स्वामीनी आज्ञा केली आहे. हे विज्ञापना.

¶*All the happy talk of the King and the people of Satara admiring the wonderful feat of valour by Chimaji Appa is reported in this letter. The King Shahu takes the Peshwa and his brother to be special favourites of the deity Bhargavram as they achieve so many wonders. The Pratinidhi, Narbawa, and Yeshwantrao are rather sorry for the sudden end of Sidi Saat.*

No. 407] *[7-5-1736*

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा
गोसावी यासि

ॐ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्ये श्री पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती येथील क्षेम ताा छ ६ मोहरम मुा धामणी नजीक गोवलकोट जाणौन स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. राा त्रिंबकजी सालवी पंनास पाऊणसे माणसानसी सरकारात सेवेस आहेत. ऐसियास माारनिले सातारियाचे मुकामी आपणापासी निरोप घेऊन लग्नाबद्दल गावास गेले होते. सांप्रत आम्हापासी आले आहेत, त्यास येथे खाडीतून शामलाच्या होड्या चोरी छपीने लाकूड फाटियास येत आहेत, त्यांचा लाग करून हस्तगत करावा म्हणिजे आपल्यास पलीकडे मोर्चिया जावयास कार्यास येतील आणि त्याजवर सलाबत पडोन पुनरोक्त लाहाण माहागिरीदेखील फिरणार नाही. यास्तव त्याचा लाग करावयास विजयदुर्गीहून व येथेहि तलास करून भोपले पेटी मेलऊन काली राजश्री रामाजी माहादेव याजसमागमे लोक पेटीसुधा देऊन लाग करविला. त्यावरून माारनिलेनी लाग करून त्रिंबकजी सालवी वगैरे लोकानसी पेटियावरून जाऊन होडिया दोन खाडीतील बेटाजवल आडऊन घेतल्या. याउपर ह्या होड्या व आणखीहि मेळऊन जावया यावयास कामास येतील. त्रिंबकजी सालवी व प्रतापजी विचारे हे आरमाराचे मारफती आहेत व बरे माणूस आहेत, हे आम्हापासी आसिलियास होड्याचे आरमार सजून. यास्तव उभयताचे लोक जे तेथे आसतील ते आम्हाकडे पाठविले पाहिजेत. माारनिलेस उभयेतास येथे ठेविले आहेत. आम्हाकडे दोनसे माणसाची रवानगी होईल, त्यापैकी हे लोकाचे मुबादला ठेऊन बाकी लोक पाठविले पाहिजेत. हे लोक येथे आसलियास याचे हातन जलमार्गाचा विचार जो कर्तव्य तो केला जाईल.

5529

सुताराविषी पूर्वी लिा होते यैसियास याउपर सुताराचे प्रयोजन नाही. येथेच होडियाचे साहित्य केले जाईल. विशेष काये लिहिणे हे विनती.

¶*Pilaji Jadhao to Chimaji Appa, explaining his preparations to cross the creek in boats.*

No. 408] *[After 12-5-1736*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री स्वामीचे सेवेसी

विनती उपरी. जानो शंकर वारले. त्याचा धंदा देवराऊ मेघशाम यांस सांगितला. काल अमवाशेस परवानगी जाली. वस्त्रे मुहूर्त पाहून होणार. राजश्री स्वामींनी मनुष्य काही उतम योजिले नाही. कोणाचेहि चितात येत नाही. धणी करितो ये गोष्टीस येत्न काये? राजश्री संभाजी राजे यास आणावयास गेले आहेत. त्याजकडील अद्यापि काही वर्तमान नाही. त्रयोदसी मंगलवारी भेटी मात्र जाल्या म्हणून वर्तमान मात्र आलें होतें. बहुत काये. लिहिणे कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनंति.

¶*Jivaji Khanderao reports the death of Jano Shankar and appointing Deorav Meghasham in his place by the King. He also says that the selection is not a happy one. 'The King is reported to have gone to bring Sambhaji of Kolhapur' to Satara.*

No. 409] *[15-5-1736*

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

सेवक रघुनाथ उधव साष्टांग नमस्कार विनंति तागायत आधिक जेष्ठ बहुल द्वितीया मंदवार मुकाम लस्कर नवाब निजामनमुल्क स्वामीचे कृपेकडून येथास्थित असे विशेष. स्वामींनी पत्र पाठविलें, उत्तम समई पावलें. सविस्तर वर्तमान कललें व राजश्री राव सुमंत याचे पत्रीं आपण साकल्य लिहिलें त्यावरूनहि कळलें. स्वामीच्या पदरीं पुण्य मोठें राजश्री राव येशस्वी त्यावर प्रताप थोर यामुलें राजश्री स्वामींनी आजी पांच वर्षे मोहीम केली, परंतु येश येतां स्वामीसच आलें. सिदीसादाचा आलिकडे मोठा लौकिक जाहाला होता त्याचप्रमाणें युध करून कामास आला. मोठा दुष्ट निपातिक, फार समाधान जालें. वरकड

कितेक प्रसंग तपसीलवार श्रीमंत राजश्री राव सुमंत याणी लिहिलें आहे त्यावरून कळेल. निरंतर पत्रद्वारें कुशल लिहून संतोषाभिवृधि केली पाहिजे. बहुत काय लिहिणे कृपा असों देणे हे विनंति.

¶*Raghunath Udhao writing to Chimaji Appa from the Nizam's camp refers to the protracted struggle of five years and its successful termination by the end of Sidi Sat.*

No. 410] [*18-5-1736*

श्री

राजश्री माहादाजीपंत गोसावी
यांसीं

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले, प्रविष्ट होऊन लिा अभिप्राये कळोन संतोष जाला. वरकड येथील सविस्तर वृतांत राजश्री आपा यासी लिा आहे, त्यावरून विदित होईल. सारांश येथील साहित्याचा विचार चितानुरूप जाला. यानंतर मोर्चा याची तरतूद अथवा भलते विचारास अंतर किमपि होणारा नाहीं. वरकड गनिमांवर सलाबत पडोन नक्ष राहून जे स्वामिकार्यें होणे ते खावंदाचे पुण्येकरून होतच आहे, येदर्थी संदेह नाही. आपणाकडील साकल्य वरचेवरी लिहीत असिले पाहिजे. बहुत काये लिहिणे. रा छ १७ मोहरम. लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao assures Mahadajipant Purandare that he (the writer) was doing his utmost in the fight of Gowalkot.*

No. 411] [*18-5-1736*

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसांवी यांसी

ॐ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री पिलाजी जाधवराऊ दंडवत. विनंती येथील क्षेम ताा छ १७ मोहरम मुाा धामणी नजीक गोवलकोट जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष

आपली पत्रे छ ११ मिनहूची आली ती छ मारीं प्रविष्ट जाली. लिा वर्तमान अवगत जाहले. लोक व तोफ बचीयाच्या लहान दोन व जेजाला दारू गोळी यैसे साहित्य रवाना केले ते येऊन पोहचले. धामणीचा मोर्चा उतम प्रकारें मजबुदीने बळावावा. येक वेल फौजेचा शह टललियावर गनीमाचे आरमार गोवलकोटच्या साहित्याकरिता येऊन हालचाल करील त्यास जबरदस्तीने ठासून आवरोध केलियानंतर पुनरोक्त शामलाचे साहित्य पोहचणार नाहीं. तेव्हा कोटकरी यांची हिमत कम होईल. यास्तव मोर्चा बरा बलाऊन लस्कर मजबुदीने राहते करावयाचा अर्थ तपसीले लिा, तो कळों आला. यैसियास मोर्चियाचा बंदोबस्त करणें तो आपले लिा प्रााच केला आहे. व सांप्रत वरकड साहित्याचीहि रवानगी चितानुरूपच आपण केलियानंतर मोर्चियावर कोठे धोंडियाची चौबुर्जी बलकट घालून जलमार्गांतील गलबतावरी तोफे लागू करून चौबुर्जीत लोक घरे बांधून नेहमी ठेवितो आणि मोर्चा बलाऊन बेसऊन लस्कर मजबुदीनेच ठेविले जाईल. याजउपर खाडीतून आलिकडील फटियातून गलबत जाऊ पावेल यैसे नाही. वरकड गोवलकोटच्या साहित्यास्तव गनीम जबरदस्तीने जलमार्ग आथवा खुशकीने आलियास आपले पुण्येकरून नतिजा द्यावयास अंतर किमपि होणार नाहीं. येविशी चिंता केली न पाहिजे. काळुस्तीयाचे मोर्चियाचाहि लोकास हिमत व युक्तीविचार सांगून तेथील बंदोबस्त करून तोहि मोर्चा कायम केलाच आहे. राजश्री संभाजी आंगरे सरखेल याजकडील लोक अविलंबच येणार आहेत, त्याजकडील तोफा त्या मोर्चियास लागू होतील. दोहींकडूनहि मोर्चाबंदी मुस्तकीम जालियानंतर स्वामीकार्य होणे ते होऊन येईल. विशेष काय लिहिणे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Chimaji Appa, informing him of the progress of the siege of Gowalkot and the stopping of Sidi's passage through the creek*

No. 412] [*19-5-1736*

श्री

पौ छ १८ मोहरम

श्रीा राजश्री चिमाजीपंत आपा
गोसावी यासि

विनंती उपर राजश्री मानाजी आंगरे याजकडील लोक तोपाचे मारुफतीकरितां शेपनास आनकूल पडतील तें मागून पाठवावे म्हणोन पूर्वी लिा होते. यैसियास त्याचे पोटाचा विचार आपण लिा यैसियास येथे लोक आहेत ते वरकड सेवा

कर्तव्य ते करितील, परंतु तोपाची मारुपात होणार नाहा याजकारता आपणाकडून लोक येतील त्याजपैकी काम करणे तरी करावे आणि त्याचा मु(ब)दला आंगरियाकडील लोकाची बेगमी करून शेपनास जे आनकूल पडतील ते पाठवावे म्हणिजे तोपा लागू होतील यास्तव लिा आहे. तरी जे आनकूल पडतील ते बेगमी करून आपले लोकासमागमे पाठविले पाहिजेत व तोपाचे आनकूल पडले तरी दोही जागाहून रवाना करविल्या पाहिजेत. लोक व तोपा साहित्य पेशजी लस्कर ज्या मार्गे आले त्या मार्गे रा केले पाहिजे. वरकड येथील मोर्चियाचे तरतूदविशी किमपि चिंता केली न पाहिजे. विशेष काये लिहीणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao asks for more guns from Chimaji Appa.*

No. 413] [*19-5-1736*

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा गोसावी यांसी

ﷺ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो पिलाजी जाधवराऊ दंडवत. विनंति येथील क्षेम ताा. छ १८ मोहरम मुाा. नजीक गोवलकोट जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष आपण रा. राघो नारायेण याजसमागमे पूर्वी पत्र पाठविले व राजश्री संभाजी आगरे सरखेल यास पंत्रे मारनिले समागमे पाठविले आहेत. यास विजयदुर्गास पाठऊन जाब आणऊन पाठवावयाची आज्ञा केली. त्यावरून मारनिलेस राजश्री सरखेलीकडे रा करून जाब आणऊन आपणाकडे रवाना केले आहेत व मारनिलेनी आपणाकडून रा. नारो कासी यास कितेक श्नेहभावाचा अर्थ सांगून आपणासन्निध पाठविले आहेत. हे त्याजकडील कितेक वर्तमान निवेदन करितां श्रवण होईल. आम्हासहि पत्र लिहिले आहे तेथे आपले भेटीचा योग घडोन परस्परें भाऊपणा अकृत्रिम चालोन श्नेहाची अभिवृधि व्हावी. आम्हास श्नेहापेक्षा दुसरी जोड काय आहे येैसे कितेक विस्तारे लिा आहे. भेटियाचा योग जालियानंतर परस्परे चिताची सोज्वलता होऊन मनोभीष्ट सिधीस पावले म्हणोन आर्तपुरस्सर लेख करून आपणास कासी नारो कोळी याची रवानगी केली आहे. गोवलकोटासहि लोकाच्या जमावाची व तोफाची रवानगी अविलंबेच करावयाचा अर्थ लिा आहे. सविस्तर मारानिलेच्या पत्रावरून व रा. कासी नारायण याचे मुखोद्गत विदित

होईल. आपणास कळावें याजकरिता लिा असे. विशेष कार्ये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao writing to Chimaji Appa says that Sambhaji Angria is sending his men and munition to Gowalkot for his help. A dispatch to this effect is, he adds, sent to him as well as to the Peshwa.*

No. 414] [*31-5-1736*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ स्वामीचे सेवेसी

विनंति स्वामीच्या विच्यारे पहिले होते की कोणे येके प्रकारे अम्ही राजश्री मानाजी आंगरे याचे भेटीचा योग घडवावा आणि माहुलीस तनखा म्हणून दाहा पंधरा हजाराचा यैवज नेहमी येक तरफा तोडून घ्यावा व आपल्या यैवजाचा निकाल करून घ्यावा. यैवज त्याकडे येणे त्यासी काही तरफा नेहमी करून घ्यावा यैसे होते. त्यास प्रस्तुत अनयासे शामलाच्या उपद्रवाकरितां कुलाबाप्रांती येणे जाहाले. तदनरूप शामलहि नाश पावला. त्यावर आम्ही सदरहू मजकुराचा उपक्रम मशारनिलेसी केला व कितेक सामभेददंडपूर्वकहि भाशण केलें. परंतु त्याणी तितक्याहि गोष्टीचा अव्हेर केला. माहुलीच्या तनख्याची गोष्ट तो येकंदर मान्य न करीत. तेव्हा अम्ही ते गोष्ट सोडून पैकियाचा मजकूर केला. त्यास ते म्हणतात की आमच्या विचारे तो यैसे होते जे, आपणापासून अगदीच पैका माफ करून घ्यावा. आम्ही सिपाई आम्हापासी पैका कोठील ? त्याहीमधे आपला खर्च फार. ज्याजती वाहाडला. जलमार्गीची उत्पत्ति बुडाली यैसे अहे. आपण पैका मागावा यैसे नव्हते, तथापि मागताच तरी सा चौ महिनियानी हरतरतूद करून पैका देऊं, परंतु तूर्त आपणापासी काही नाही व यैवजाचा मुलूक तोडून मागता तर मुलूक तुमचाच आहे, आम्हापासी मागवा यैसे काये अहे ? यैसे मैंदपणाचे भाषण केले. अम्ही दायेउपाये उदंड करणे ते केले, परंतु त्याचा सेवटवर हेच गोष्ट जाहाली. पैका मागितला म्हणून आपले ठायी बहुतसे श्रमी जाहाले. साराउष त्याच्या चितात केवल आमचे समाधान रक्षावे हा विचार नाही, यैसे द्रिस्टीस पडले. मग केवल रुक्षपणे कूच करून जावे तरी हेहि लौकिकविरुद्ध. यास्तव समाधानपूर्वक मानाजी आंगरेयासी च्यार गोस्टी सांगणे त्या सांगितल्या व काही कार्य न होता रहस्य मात्र राखोन त्यास व वरकड त्याकडील लोक व कारकून व गंगाजलनिर्मल लक्ष्मीबाई व गंगाबाई यांसी वस्त्रें देणे तीं दिल्हीं, व मानाजी अंगरे यासी येक मोत्याची जोडी दिल्ही. त्याणीहि अम्हास वस्त्रे व कारकनास व

काही लोकास वस्त्रे दिल्ही. केवल समाधान तोडावे तरी तोहि फटकाल यास्तव समाधानाचे भाषण करून अजी छ ३० जिल्हेजी कुलाबियाहून कूच केले. जाले वर्तमान स्वामीस विदित व्हावें यास्तव लिहिले असे. रा[1] छ १ मोहरम बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंति. त्यानी पैकियाचे थोतांड आरंभले आहे तर ते गोष्टीची फिकीर नाही. पुढे विचारेच करणे ते करू. हे विनंति.

¶Chimaji Appa informs Bajirao of the outcome of his interview with Manaji Angria. The writer deprecates the obstinacy shown by Manaji over money matters but reconciled him without stretching the affair further. The origin of the Peshwa's differences with Manaji can be traced in this letter.

No. 415] *[About May 1736*

श्री

पुा राजश्री चिमाजीपंत

गोसावी यासी

विनंती उपरी. बेलादारास येऊन चौबुर्जी घालावयास विलंब लागेल याजकरितां आम्ही आंबे फणस मातबर लाकडाचा मेढा मजबूद पेटी भरून तयार करावयास काम लाविले आहे. आविलंबेच सिध होईल. बेलदार आलेच तरी बाहेरून पुस्ती घालणे तरी घालून मजबुदी केली जाईल. परंतु तोफाचे साहित्य आसिलियाने तोफा लागू जाल्या म्हणिजे गनिमास शह पोस्ता बसेल. राजश्री प्रतिनिधीकडील अथवा सरखेलीकडील तोफा येता दिसत नाही. वरकड राजश्री स्वामीकडील तोफ येणे ते कळतच आहे. तिकडील मोर्चियास सरखेलीकडील तोफ येतील. तिकडून त्या तोफ व इकडून ही तोफ खाडीत लागू होती म्हणिजे आंजनवेलीकडील गलबत अथवा सामान किमपि येऊन पावणार नाही. म्हणिजे कोटातच जे सामान आसेल तोंपर्यंत जो धीर धरणे तो धरतील. त्यानंतर धीर पुरतो यैसे नाही. यास्तव हरतरतूद करून तोफा दोन पाठविल्या पाहिजेत. रा मानाजी आंगरे याजकडील तोफाचे आनकूल न पडे तरी पुणियात रिकाम्या तोफा असतील त्यांपैकी तरी दोन पाठविल्या पाहिजेत. वरकड मोर्चा बलावावयाचा विचार काही राहिला आहे यैसे नाही. जे मजबुदी करावयाची ते केलीच आहे. परंतु तोफा आल्या म्हणिजे सर्व मजबुदी होऊन जे कार्य होणे ते दो चौ महिनियात श्री येश आपणास खामखा देईल. येदर्थी संदेह नाही. विशेष काये लिा कृपा केली पाहिजे हे विनंति.

¶Pilaji Jadhao informs Chimaji Appa of his attempts to erect platforms for batteries and requests him to send guns without delay and finally suggests that only an incessant cannonading will check the enemy.

---

[1] येथून अक्षर खुद्द चिमाजी आप्पाचें.

No. 416] [May 1736

श्री

पुा राजश्री चिमाजीपंत आपा

गोसावी यासी

विनंती उपर. माहादजी सुर्वा हाशमात आहे त्याचा बाप गावलकाटात आहे. यैसियास त्यास येथे पाठवावयाविषीं पेसजीं लिा होते. सांप्रत येथून आम्हीहि आतील राजकारणास चालणा करीतच आहो आणि त्यासहि येथे पाठविलियानंतर त्यास आंत पाठवणे तरी पाठऊन. लोकांसी बोलऊन ते कार्य सिधीस गेलियानंतर लोकांचे उर्जित करणे तर आपले आज्ञा प्रोाच केले जाईल. यैसियासी माहादजीस पत्रदर्शनी रवाना केले पाहिजे. विशेष काये लिा? कृपा केली पाा हे विनंति.

¶*Pilaji Jadhao requests Chimaji Appa to send immediately to his camp one Mahadaji Surva, as he has a design to capture the fort by secretly negotiating with the father of the man, who was an employee under the Sidi at Gowalkot.*

No. 417] [May 1736

श्री

पुरवणी राजश्री चिमाजीपंत.

आपा गोसावी यांसी

विनंती उपरी. त्रिंबकजी सालवी यांनीं पेशजी खाडींतील दोन होड्या घेतल्या होत्या व सांप्रतहि कालीं तिसरी होडी समेत दोलंदी[१] पाडाव केली आहे. वरकड दोन्हीकडील मोर्चियास तोफ लागू जाली. यानंतर खाडींतून गलबत बंद होईल. कोटांतील विचार तर गलियाचा संग्रह चातुर्मास्याचाच आहे, कांहीं अधिकोत्तर आहे यैसें नाहीं. छावणीत गलबत मना जालें म्हणजे शामलाचें साहित्य जलमार्गें अथवा खुशकीनें पोहचणार नाहीं, तेव्हां चौमहिनियांत साहित्य सरलीयावर कोटकरी यांचे वस्तु धीर धरवेल यैसें नाहीं. सारांश आपले पुण्येंकरून मोर्चेबंदीनेंच चौ महिन्यांत कार्य होऊन येश आपणांस श्री देते आहे. येविशी विस्तार लिहावा यैसें नाहीं. विशेष काये लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विनंति.

¶*Pilaji Jadhao informs Chimaji Appa that he was doing his utmost to make the undertaking a success.*

---

१. कोळी.

No. 418] [May 1735

श्री

राजश्री पंत प्रधान गोसावी

यांसी

. ⁂ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो संताजी जाधव दंडवत विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे. विशेष. आपण पत्र पाठविले ते पावोन समाधान. ऐसेच निरंतर पत्री सांभाळ केला पाहिजे. गोवळकोटचे वर्तमान तर राजश्री संभाजी आंगरे सरखेल याजकडील रा॥ बावाजी म्हसके जमावानसी आले आहे. तोफहि आणून काळुस्तियाचे डोंगरी मोरचे लाऊन मारगिरी करीत आहेत. तोफाच्या गोलियानें किलियातील माणसें वीस पचवीस मारलीं, व बुरूजहि एक दोन जाया जाहले. त्यास आणीकही तोफा आणविल्या आहेत त्या आलियावर आणिकहि मारगिरी होईल. हबसियाकडील माणसें रोजबरोज दोन च्यार तोफानी जाया होत आहेत. आम्हीही चिपोळणावर बसलो आहो, ऐसे वर्तमान आहे. आपणास कळावें म्हणून लिहिले असे. हुजुरूनहि हुजुरात एकादो रोजी येणार आहे. ते आलियावर आणीकही मोरचे लागतील. बहुत काय लिहिणे, कृपा निरंतर असो दीजे हे विनंती.

¶Santaji Jadhao writes to Bajirao that Sambhaji Angria has sent his forces and some pieces of cannon to join in the attack on Gowalkot.

No. 419] [10-5-1735

श्री

माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी.

सेवेसी विनंति सेवक संताजी जाधव व दुर्गोजी भोइटे सेवेसी विज्ञापना ऐसीजे. ता॥ छ १८ माहे मोहरम माहाराजाचे कृपादृष्टीकरून लस्करचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर गोवलकोटचे कुल वर्तमान राजश्री उदितसिंग सिरके व नाईकजी भोईटे सेवेसी पाठविले आहेत हे श्रुत करितील. व आंगरियाकडील राजश्री बावाजी म्हसके याचे मुदे विदित करितील, त्याप्रमाणे माहाराजानी बेहबुदी केलिया साहेबकाम होऊन येईल. लस्करची गणती विठोबानी घेतली त्याची यादीदास्त आपण घेतली ते बजिनस सेवेसी पाठविली आहे; तर सर्व साहित्य करणार महाराज धनी समर्थ आहेत. व मिरजोलीचा मूर्चा राजश्री जयसिंग सिर्के यानी

5537

घातला त्याचे कुमकेवर आपण दोनसे स्वार दिल्हे. कासी बंदरच्या मोरचेयाचे सरंजाम जाहलीयावर तोही मोरचा घालितील. तेथे स्वार पाहिजेत त्या(स) च्यारसे स्वार पाठवावयासी आज्ञा करविली पाहिजे. तूर्त आंगरीयाच्या लोकाचे कुमकेवर राजश्री येसाजीपंत जमावानसी ठेविले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Santaji Jadhao writes to Shahu how the siege of Govalkot was going on.*

No. 420] [*May-June 1736*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंति उपरी. राजश्री मानाजी आंगरे याजकडील लोक दोन तीनसे माणूस कनिष्ट पक्षी गोवलकोटास आणून राजश्री पिलाजी जाधवराऊ यांस सामील करावा हा राजश्री स्वामीचा दुराग्रह फारसा आहे. येक दोन गोलंदाजहि आणवावे यैसे वारंवार म्हणतात. त्याजकडील माणसाजवळ सांगितले आहे. आपणासहि लेहून पाठविले आहे. ऐशियास लोक आल्याने केवळ कार्य होईल ऐसाहि अर्थ नाही, परंतु राजश्रीची आज्ञा मान्य केली आणि लोक पाठविले त्याजवरून स्वामी बहुत बहुत समाधान पावतील. स्तुतिवाद करीत असतात यैशा प्रसंगांत लोक येऊन यखादा फलादेश जाला तरी येश कीर्ति स्वामीची होईल. संभाजी आगरे दुर्वात्यपणास आले त्याचे पारपत्य करावे हे राजश्रीचे चित्तीं आहे. शामलपटीस कमाविसदार राजापूर प्रांतात रवाना होणार आहेत. मुलूक उद्वस करावा हेहि चित्ती आहे. काय होईल पाहावे. सुज्ञ असा. जुज होईल म्हणून सांगोन पाठविले, याचा अर्थ काये तो स्वामीचे ध्यानास येईलच. मानाजी आंगरे यांचे बरे व्हावे हे स्वामीचे चित्ती आहेच. आम्ही याचा विस्तार स्वामीस ल्याहावा ऐसा अर्थ नाहीं. सारांश लोक आल्याने बहुत कार्याची गोष्ट आहे. तरी सेवेसी मानाजी आंगरे यास आज्ञा करून लोक गोवलकोटास रवाना जाले ऐसे करावें. खर्चाचा मजकूर म्हणतील तरी प्राप्त होईल हे नव्हे हें आपणास कलतच आहे. दोन च्यारसे माणूस आल्याने राजश्रीची आज्ञा मानिली ऐसे होते व राजश्री जाधवरायास राहाणें प्राप्त जालें आहे. त्याजपासीहि भरती चांगलीच पाहिजे. दोन्ही अर्थ आहेत. याकरिता लोक आल्यानें उतम आहे. यामधे विचारास येईल ते केले पाहिजे हे विनति.

¶*Jivaji Khanderao informs Chimaji that the King is very impatient about getting Manaji Angria to take part in the fight against Gowalkot. The paper points out that Shahu hated Sambhaji Angria and favoured Manaji*

No. 421] [4-6-1736

पौ छ २४ सफर

श्री

राजश्री पिलाजी जाधवराऊ गोसावी यांसी

🙞 अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो चिमणाजी बलाल आशीर्वाद सुा सबा सलासेन मया अलफ. राजश्री पर्वतराव कोकरे स्वार १० दाहा खासा सुधां तुम्हाकडे पाठविले आहेत. त्याची हजिरी घेऊन रोजमरा चौ रोजा रुपये २३ तेवीस देत जाणे जाणिजे छ ५ सफर.

¶*Chimaji Appa sends ten sowars to Pilaji Jadhao and asks him to pay them wages for the service which they will give.*

No. 422] [5-6-1736

श्री

राजश्री पिलाजी जाधवराव गोसावी यांसी

🙞 अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो चिमाणाजी बलाल अशीर्वाद सुा सबा सलासेन मया अलफ. तुलाजी सालोखी तुम्हाकडे पाठविले आहेत यास रोजमरा चौ रोजा रुो २ दोन देवीत जाणे. जाणीजे छ ६ सफर बहुत कायं लिहिणे.

¶*Tulaji Salokhi is sent to Pilaji Jadhao by Chimaji Appa for being entertained into service.*

No. 423] [5-6-1736

श्री

राजश्री पिलाजी जाधवराव गोसावीयासी

🙞 अखंडीतलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो चिमणाजी बलाल आशीर्वाद सुा सबा सलासेन मया अलफ. राजश्री सेट्याजी भोईटे याजकडील हुल स्वार ५ पांच पाठविले आहेत. सदरहु पांचा राऊतांची गणती घेऊन रोजमरा चौ रोजा रुो १५ पधरा देत जाणे छ ६ सफर.

¶*Chimaji Appa sends some sowars to Pilaji Jadhav.*

No. 424] [6-6-1736

पौ छ २४ सफर.

श्री

राजश्री पिलाजी जाधवराऊ गोसावी यांसी.

<॰> अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो चिमणाजी बलाल आशीर्वाद सुा सबा सलासेन मया अलफ. तुम्हाकडे गोलंदाज असामी दोन २ पाठविले आहेत, त्यांस येथं दरमाहे रुो १४ चवदा दिल्हे आहेत पुढें छ ७ रबिलोवलपासून रोजमरा दररोज रुो

७ इनास गोलंदाज
७ अंतून गोलंदाज.

१४

येकूण दोन असामीस चवदा रुो रोजमरा देविला असे. माहे दरमाहे देत जाणे. जाणीजे छ ७ सफर.

¶*Chimaji Appa sends two gunners to Pilaji Jadhav and asks him to grant them Rs. 14 for daily wages.*

No. 425] [8-6-1736

पो छ २० रोज.

श्री

राजश्री पिलाजी जाधवराव गोसावी यांसी.

<॰> अखडीतलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो चिमणाजी बलाल आशीर्वाद सुा सबा सलासेन मया अलफ. राजश्री मानाजी कोकरे यांजकडील स्वार

१ पिराजी वागमोडे कुमईत घोडा
१ सेव्याजी सूपनवर जर्दा घोडा
१ लखनाक अंबरी निला घोडा
१ दादनाक बोरपंच कल्याण-घोडा

४

येकूण च्यार असामी भालेकरी पाठविले आहेत यांची गणती घेऊन रोजमरा चौ रोजा रुो ८ आठप्रमाणे देत जाणे. जाणीजे छ ९ सफर.

¶*Chimaji Appa asks Pilaji Jadhao to entertain the four sowars in service and grant them wages.*

No. 426] [About 9-6-1736

श्री

पुरवणी राजश्री चिमाजीपंत
आपा गोसावी यासी

विनंति उपरी. राजश्री मानाजी आंगरे याजकडील तोफा व लोक आणावयास कारकून पाठविला आहे, आलियानंतर पाठऊन देऊन म्हणोन लिहिलें. यैसियास मशारनिल्हेकडील हुके व तोफां आलियानंतर रवानगी केली पाहिजे. तोपर्यंत राजश्री संभाजी आंगरे सरखेल यांजकडील तोफा कालुस्तियावर येतील. त्यांपैकी येक दोन आनकूळ पडलियास आणवीतच आहों. तथापि त्यांजकडील तोफेचें आनकूल न पडलीच तरी तिकडीलहि येऊन पोहचतील. बेलदार व सुतार वगैरे साहित्याविषयीं राजश्री विसाजीपंतास पुणियास आपण लिहिलेंच आहे. त्याप्रमाणें अविलंबेच रवानगी करावी. वरकड येथील साहित्याचा अर्थ आपले चित्तांत आहे त्याप्रमाणें आपण साहित्याची रवानगी करतील. येथील बंदोबस्तास अथवा तरतुदेस आपले लिहिल्याप्रमाणें किमपि अंतर होणार नाहीं. येतद्विषीं निश्चिंत असिलें पाहिजे. राजश्री मानाजी आंगरे याजकडी लोक येतील त्याचें पोटाचे बेगमी आपणासच करावी लागेल. यास्तव मशारनिल्हेकडील लोक व आमचे मिळोन पांचसें लोक व दोनशें स्वार आम्हापाशीं राहेत तें करावें. वरकड येथून निरोप देणें तें देऊन पांचशें लोक व दोनशें स्वार मुबदला आले तरी राहतील. त्यास राजश्री प्रतिनिधीकडील व सचिवाकडीलही लोक आहेत. ते हे मिळोन पांच सातशें माणूस चौबुर्जीत राहील. वरकड लस्कर मागें मजबुदीनें राहील. लोकांपासून सेवा घेणें तें घेऊन जें स्वामीकार्य करणें तें करून. विशेष काय लिहिणें. कृपा केली पाहिजे. हें विनंति.

¶*Pilaji Jadhao informs Chimaji Appa of the help which is being rendered by Sambhaji Angria and says he is waiting for the guns which Manaji Angria has promised.*

No. 427] [11-6-1736

पौ छ १३ सफर

श्री

राजश्री आपासाहेबांचे
सेवेसी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य सेवक संभाजी सिंदे मो मौजे भुईज रामराम. विनंती उपरी येथील क्षेम ताा छ १२ सफरपावेतो समस्त लोक

सूखरूप असो. यानंतर स्वामीची आज्ञा घेऊन तोफाबरोबर रविवारी निघालो ते मंगळवारी ठाण तल्याचे मुकामी आलों. तेथे स्वामीचे आज्ञा पत्र सादर जालें, तेथें आज्ञा कीं तुम्हाबरोबर तोफा देऊन गोवलकोटास रवाना केले आहे. यैसि-यासी राजश्री पिलाजी जाधवराव यास पत्रें पाठविलीं आहेत, त्याचे उतर तिवरे याचे घाटे येईल आणि तोफा आणविल्यातर घेऊन जाणे. नाही तरी हा कागद भुईजेस पावल तर भुईजेस मुकाम करून राहणे, दोहों दिवसीं जाब आला म्हणजे हुजूर लेहोन पाठवणें, आज्ञा व्हावयाची ते होईल, म्हणऊन आज्ञा, त्याप्रमाणें सेवक भुईजेचे मुकामीं तोफा आणून बैसलों असो. गोवलकोटचे कागद आले ते जासूद याबरोबर हुजूर गेले आहेत. आम्हास आज्ञा काय ते केली पाहिजे. आज्ञेप्रमाणे वर्तणूक करून. गोवलकोटास न्यावयाची आज्ञा जाहली तरी गोवल-कोटास घेऊन जाऊन. अथवा जेथें ठेवावयाची आज्ञा होईल तेथें ठेऊन हुजूर सेवसी येतों. स्वामीचे आज्ञेची वाट पाहत असो. येविसी बहुत काय लिहिणें हे विनंती. भुईजेपावेतों तोफा येत तो च्यार सिपाई दुखवले असेत. सेवेसी श्रुत व्हावें म्हणऊन लिहिले असे हे विनंती.

¶*Sambhaji Sindia asks orders from Chimaji Appa whether and where he should send the guns intended for the siege of Gowalkot.*

No. 428] [*12-6-1736*

पौ छ २० सफर

श्री

राजश्री पिलाजी जाधवराऊ

गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री चिमणाजी बलाल आसीर्वाद सुा सबा सलासेन मया व अलफ. तुमची पत्रें छ ८ सफरचीं आलीं ती छ १० सफरी पावलीं. राजश्री संभाजी आंगरे सरखेल जयगडास आले. भेटीचा साक्षेप केला त्यावरून भेटीस गेलो. भेट जाहली. परस्पर आदर सन्मान बुधिवाद सांगणे तो सांगितला आणि पांचसे माणूस व दोन तोफा कालोस्तियाच्या मोर्च्याकरितां आणिल्या. आम्ही आपल्या मोर्च्यास दोन तोफा आणिल्या व कांही गोले घेऊन आलों म्हणून लिा ते अवगत जाहाले. तुम्ही जाऊन भेट घेतली, लोक तोफा आणिल्या, उतम केले. आंगऱ्याचे लोक पहिले आले होते त्याचें साहित्य लस्कराच्या लोकाच्यानें जाहालें नाहीं. नालिसा मात्र लिहिल्या. त्यावरून खटे जाहाले आहेत कालोस्तीया (फाटलें) मागे

5542

पुढें पाहातात परंतु (फाटलें) स्वामीचे हुजूरे व चापेदार याचा (फाटलें) यास आले आहित याउपरी मोर्चे (फाटलें) म्हणून लिा ते कळलें. यैसियासी (फाटलें) याचे लोक पहिला मोर्चा (फाटलें) ले होते त्याणी कांही कस्त करावयासी अंतर न केलें. परंतु त्याचे साहित्यच न जाहालें त्यास ते काय करितील? प्रस्तुत तुम्ही आहां यामुलें दुरोख शह आहे व तुम्ही त्याचा दिलासाहि कराल व तेहि उमेदीनें कस्त मेहनत करतील व त्याच्या खावंदाकडून हि साहित्य होईल. मुख्य गोष्ट अवघे लोक झोंबवणे ते तुम्हविना दुसरियाच्यानें होणे नाहीं. हरजी नाईक यांजकडून सुवर्णदुर्गीहून पांचसात माणूस खटपटे आणिले. उतम केले. वरकड लोक व राऊत पाठवावयाविसी लिहिले. त्यास राऊत पाउणसे पाठविले आहेत. आमवास्येकारणे स्वार येऊं न पावतील. लोकांचेहि साहित्य होईल. राजश्री मानाजी आंगरे याजकडीलहि तीनसे माणूस मासपक्षानंतर येईल. जाणिजे छ १३ सफर बहुत काय लिहिणे.

¶*Chimaji Appa acknowledges Pilaji's letter wherein the latter informed how he visited Sambhaji Angria and persuaded him to reinforce Maratha troops besieging Gowalkot. Chimaji advises Pilaji Jadhao to work in co-operation with Angria's contingents.*

No. 429] [*7-7-1736*

पौ छ २२ रालौवल

श्री

राजश्री पंत प्रधान गोसावी यांसी

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंति येथील क्षेम ताा छ ८ रौवल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आम्ही राजश्री आपा यासी पत्रें पेशजी पाठविली होती त्याचीं उतरें हाली सुभानजी सिंदे याजबराबरील लोकाबराबर पाठविली तेथे लेख जे. मोर्चे कायेम करावयाची तरतूद केली आगर पेस्तर कार्यभाग करावयाची गोष्ट कर्तव्य ते कराल हा भरोसाच आहे म्हणून तपसिलें आज्ञा केली. यैशास, आपला प्रताप आमचे पदरी आहे तो आपले प्रतापेकरून होणे ते होतच आहे. परंतु येथील विचार मनास आणिता ज्याणे जे काम अविलंबिले ते त्याणेच, करावे इतर सोबती जे असतील त्याणी तमासा नजरेने

पाहावा हे तो राज्यांतील प्रवृतिच आहे. गतवर्षी आंगरे याणी कालोस्तियाचा मोर्चा कायेम करून श्रमसाहास केले तो धामणीकडे मोर्च्या नाहीं. गोवलकोटकरी धमणीपासी गलबत लाऊन आलीकडूनच सामान घेऊन कोटात जाऊ लागले. लस्करच्यानी त्याची पुस्तवानी करावी ते न करिता पागेवरी जाऊन राहून त्याच्याच नालिसी करूं लागले. त्याणी श्रम करून अखेर उठोन गेले. तदन्याये येंदा आम्ही श्रमसाहस करावयाचे त्या प्रकारे करून आजी तीन महिने मोर्चे कायेम करून आलीकडील खाडीचा फाटा बंद केला, तैसे ते पलीकडून मोर्चे कायेम करिते तर येथील कार्यभाग होणे तो दो महिन्यां होता. च्यार दिवस अधिक आंगर आगले लागते तरी कार्य तो खामखा होतें. परंतु ते धीर धरून कार्य करीत नाहीत, त्यास इलाज आहे यैसे नाही. आम्ही त्यास मोर्चे कायेम करावयाचे पुष्टिबळ जे द्यावयाचे ते द्यावयासी अनमान करीत नाहीं. परंतु त्याजकडून मोर्चे काइम होत नाहीत. त्यांस तजवीज सांगावी तर ते म्हणतात की राजश्री स्वामींनी कालोस्तियास छावणी करावयाची आज्ञा केली त्याप्रमाणे छावणी करून राहिलो आहो. मोर्चे कायेम करावयाची आज्ञा आलियाउपरी मोर्चेहि प्रजन्य उघडलियानंतर कायेम करून. आशाढ श्रावण दोन महिने तो प्रजन्य विशेष आहे. पुढें आपले विचारें जो कारभार कर्तव्य तो करून म्हणून बोलतात. तदनरूप लेखनहि करितात. यैसा विचार आहे. प्रजन्य उघडलेयानंतर शामल येकवेळ सामान येलगार करून पलीकडून जाऊन सामान कोटास पोहचाऊन जाईल, ह्मणजे गोवलकोट सारेच हस्तगत करितील. ज्याची हिमत त्याची हिमत पुष्टिबल दिल्हियाने नवी हिमत पैदा होईल यैसे नाहीं. आमची हिमत असलियां पुष्टिबल दिल्हेयाचे सार्थक आहे. येथे तो ते गोष्टी नाहीं, यैसा प्रसंग येऊन पडिला आहे. कोणी कोणाची गोष्टी सिरां चढो द्यावी यैसा आर्थ नाहीं. आंगरे याचे लोक तोफा सामानसुधाच आले आहेत. त्यास सांगितले ते म्हणतात की आम्ही मोर्चे कायेम करून खाडी आपणाकडील बंद करून, परंतु आमची पुस्तवानी कोण करितो त्याणे नेहमी आम्हापासी असावे. म्हणजे आपण आम्हास सांगता त्याप्रमाणे मोर्चे कायेम करून, नाही तर गुदस्तासारिखे हे करितील. तेव्हा पुनरोक्त आमचाच बदनक्ष होऊन बोभाटहि हुजूर लिहितील. त्याजकारिता ते बैसले आहेत तैसे आम्ही त्याजपासी बैसलो आहो. त्याणी मोर्चे कायेम केलेयानंतर आम्हीहि तयारच आहो, यैसे आंगरेयाचे लोक बोलतात. त्यास काय म्हणावे? बोलतात त्यास अनुत्य असिल्यास रागास यावे. दुसरे हबसी आपलेले जागा कायेम असोन मिरज़ुलियांसी लस्करची वाट चालो देत नाही आणि हबसी पटीविसी रुद्राजी कासीस दोनसे माणसानसी लस्करासमीप असोन

मुलुक जूज बसला आहे तेथे धामधूम करून तोहि मुलूक उद्वस केला. याजकरिता आंगरेयाचे लोकहि बेदिल आहेत. परंतु ते विना आज्ञा खात्रंदाचे उठोन जातात यैसे नाहीं. येथील प्रसंग चौघे जैसे वर्ततील तैसे आपणहि असिल्यास तरीच परिणाम लागेल. येकाने डोई वरी केली तरी त्यास कोणी बरे देखितील हे प्रवृत सर्व आपणांस विदितच आहे. सोबती जे आहेत त्याणी येथील जागे नवे पहावे यैसे नाहीत. येथे श्रम करून जे गेले आहेत तेच येथे आहेत. त्याचे लोक आहेत त्यास तो पोटासच न मिले. पोटाविणेच उठोन गेले, त्याचा बोभाट जरी लिहावा तरी ते गोष्टी आपणास श्लाघ्य आहे यैसे नाहीं. विशेष लिहावे. तरी येथील सर्व वर्तमान राजश्री नारोजी कडू याणी श्रवण केले असेल त्यावरून विदित जाले असेल. आपणाकडील मोर्च्याविसी अगर कोणेविसी आम्हास कोणी बोल लावील यैसी तो गोष्टी हा कालपर्यंत ठेविली नाहीं. आमच्या मोर्च्याचा जागा अगर छावणीचा जागा उपराळेयाचा मैदान आहे तेथे कोणेविसी चिंता आहे यैसा आर्थ नाहीं. विशेष काये लिहिणें कृपा केली पाहिजे हे विनंति.

¶*Pilaji Jadhav writes to the Peshwa, giving details of the fighting at Gowalkot and explaining his difficulties. The letter is eloquent as regards want of co-ordination in Maratha tactics due mainly to the easy and light-hearted policy of Shahu*

No. 430] [*10-7-1735*

छ २ रावल

श्री

राजश्री पंतप्रधान
गोसावी यासी

ऽ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलकृत राजमान्ये श्रो पिलाजी जाधवराऊ कृतानेक दंडवत विनंती. येथील क्षेम जाणून स्वकीये कुशललेखन करावया आज्ञा केली पाहिजे विशेष. पत्र पाठविले ते पावले. श्रावण शुध द्वितीया गुरुवारी तेवीस घटका दिवसां पुत्र जाहाला म्हणून लिा त्यावरून बहुत संतोष जाहाला तो श्री जाणे. बहुत उतम गोष्ट जाहाली. विशेष काये लिहिणे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao congratulates Bajirao upon the birth of a son (Janardanbaba).*

No. 431] [23-7-1736

श्री

श्रीमंत रा दादा स्वामीचे सेवेसी

पोष्ये चिमणाजी बापूजी कृतानेक नमस्कार विा येथील कुशल ता छ २४ रौवल धामणी नजीक गोवलकोट जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. प्रस्तुत आपणाकडील पत्रे येऊन सांभाल होत नाही यैसे नसावे. सदैव पत्री सांभाल करीत असावे. यानंतर राजश्री पिलाजी जाधवराऊ सुभेदार याचे शरीरी साहासात रोज आरोग्य नाही, अन्नोदक राहिले. वेथेचे नांव येक ठेवावे यैसे नाही, नाना प्रकारची वेथा आहे. वेथेस उतार नाही. उपाये होणे तो आम्ही करीतच आहो परंतु उतार पडत नाही. यैशास आपण त्यास त्याच्या मुलालेकरात रवाना करितात तरी उतम आहे. नाही तरी उतम धडगत यैसी दिसत नाही. तरी आपले पत्रांचा मार्ग लक्षितो. उतर सत्वर पाा पाहिजे. त्यास बरे वाटत नाही हे त्याणी का न लिहिले म्हणून आपण म्हणतील तरी आम्ही त्यास विनंती केली की शरीरी आरोग्य नाही हे वृत आपण रा स्वामीस लिहावे, अथवा रा दादास तरी लिहावे. त्याणी उतर दिल्हे की राजश्री स्वामी याणी आम्हास आठाविसा वर्षानी मसलत सांगितली आणि दुखणे आले तरी कागदी काये लिहावे ? याजकरिता ते लिहीत नाही अथवा लिहूं देत नाहीत यैसा विचार आहे. त्याणी लेहू दिल्हे नाही आणि शरीरास अपाये जाहाला तरी आपण शब्द ठेवितील की त्याणी नं लिहिले तरी समागमे तरी कोणी होते की नव्हते ? याजकरितां तपसीलवार आम्हास लिहिणे लागले. श्रीमंत रा राऊ स्वामीनी आम्हास समागमे लिहिणार दिल्हे आहे. आम्हास न लिहिता गत्यंतर नाही. आपण दुरंदेशावरी नजर देऊन आपणास सविस्तर लिा असे. तरी ये गोष्टीचा विचार करून उतर अतिसत्वर रवाना केले पा. आपल्या पत्राचा मार्ग लक्षितो. राजश्री सुभेदार आपले मुलालेकरामध्ये जातात तरी उतम आहे. हे वृत त्याणी तो राजश्री राऊ स्वामीस न लिहिले. परंतु आम्ही जैसे आपणास लिा आहे तैसे त्यासहि लेहून पाठविले आहे. आपणास कलावे याजकरितां लिा असे. विशेष काये लिा कृपा केली पाा हे विनाति.

¶*Chimnaji Bapuji, a Saraswat sardar of the Peshwa working at Gowalkot, reports that Pilaji Jadhao had been seriously ailing and should be at once removed from the seat of the war to his own family. Pilaji himself, adds the writer, is unwilling to go away, saying that this is the first commission which Shahu had entrusted to him after 28 years and he could not very well decline it. This shows that Pilaji was working with Shahu since 1708. Pilaji's illness practically sealed the fate of the campaign.*

No. 432] [11-8-1736

पौ छ २१ रबिलाखर

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान

दाजी गोसावी यांसी

ꣻ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो मानाजी आंगरे रामराम विनंति उपरि. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित गेलें पाहिजे विशेष. शामलानी सांप्रत जळमार्गें चोरीछापीनें मुलकांत उपद्रव आरंभून गांव मारून बंदे धरून न्यावयास लागला आहे. इंगरेजानीहि अंग काढून बंद सोडून दिल्हा आहे. याजकरितां पेण प्रांतीं हमरापुराजवल खार दादर म्हणोन खारीचा गांव होता तो मारून ४४ चवेतालीस बंदे धरून नेली व चोरीनें मचवा येक खाडींत येऊन शाहाबाजची तरी धरिली. त्याजवरी दाहा माणूस नेलें. पेण प्रांत म्हणजे दुतर्फा मुलुक. शामलाचा व आपला तह जाहला हें वृत्त परस्परें ऐकिजेतें. परंतु आपण कांहीं लिहिलें नाहीं. व दुष्ट तों याप्रकारें दुर्बुधीस प्रवर्तला आहे. आपला व शामलाचा तह जाहला असतां त्याणी पेण प्रांतीं धामधूम करावी ऐसे काय आहे? तहाचा बंद जाला नाहीं म्हणोन किंवा तो गांव आमचा ऐसें जाणून मारिला हेंहि कळों येत नाहीं. तथापि गांव आमचा जाला तरी मुलूक तों दुतर्फा ऐसें जालें. तेव्हां ते प्रांतीची रयेत कैसी राहेल? याजकरितां हें वृत सविस्तर आपणास कलावें म्हणोन लिहिलें आहे. गावखेडे आमचेच दिमतीचें शोधोन काढून उपसर्ग करावा ऐसा आशये सदरहू खार मारून नेली याजवरून दिसोन येत आहे व खाडीमधें दंगाहि याचप्रमाणें करूं पाहात असे. याचा विचार आपण ध्यानांत आणणे तो आणिलाच असेल. पेण प्रांत आपणाकडून लोक येऊन रक्षणाचा बंदोबस्त होये तें केलें पाहिजे. आम्हीहि लोक पाठविले असत. बहुत काय लिहिणे कृपा असों दीजे रवाना छ १४ माहे रबिलाखर हे विनंति.

¶*Manaji Angria to the Peshwa complaining against the Sidi who in violation of the treaty contracted by the Peshwa had been raiding the districts round about Pen.*

No. 433] [19-8-1736

तालीक

छ ६ राखर

श्री

सेवेसी विज्ञापना स्वामीचे कृपावलोकनेकरून ताा श्रावण वद्य नवमी भोमवासरपरयंत सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. माहाराजाचे सेवकास

आज्ञापत्र पाठविले. आज्ञा की भला मनुष्य घेऊन सत्वर येणे. चौल माघारे घ्यावे. वरकड स्थले घेतली ते घेतली, राहिली ते राहू द्यावी. आज्ञाप्रमाणेच बोली केली आहे. ताहारहाची बोली मुलकाची माहाराजा जवल आहे. येथून इतकाच निकाल की, घेतले ते घेतले, राहिल्या गडाचा वेढा काढावा यात्विणा आदिक बोली करणार कोण? यासाठीं मध्ये तट फार पडोन श्रमी होऊन फारसे खटाटोपात होतो. तेहि वृत सेवेमध्यें लिहिले होते. सेवट अबदुलाखान व व हबसी याचा वकील व जकातीदार मातबर येथे आला आहे. त्याचे विद्यमानें करार इतकाच पडला. तहरह माहाराजाचा मुलुक आहे. करितील त्याप्रमाणे विल्हे लाऊन वेढा काढावा. करार चेवलमात्र द्यावे. सासणां+ बांधो नये. समाधाने असावे. त्यास शनवारी निरोप द्यावा. त्यास नवाब अतून बाहीर निघालेच नाहीत. अस्तमानी अबदुलाखानास बोलाऊन नेले. त्यास पुसिले. त्यास आज्ञा केली. उद्या काहीसे बरें वाटले तर बोलावीन. भला माणूस दिल्हा त्यासमागमे स्वार बरकंदाज यासी तयारीची परवानगी जाली. अदितवारी, सोमवारी येकंदर बाहीर न आले. काईल फार जाला आहे. वीस पंचवीस दिवस फारच श्रमी. अजी तों मंगळवार. उद्या परवा रुकसत करितील आणि मजल दरमजल येऊन सेवसी पोहचतो. माहाराजाचे मरजीसिवाये सेवकास उजूर नाही. परंतु येक दोन रोज वेथेमुळे लागले आहेत. शृत होये हे विज्ञापन

¶*The letter mentions the progress of negotiations opened with the Sidi.*

No. 434 [*22-9-1735*?

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोशी कृतानेक नमस्कार विनंती येथील कुशल तागाईत. छ १६ जमादिलौवल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. किल्ले कैनाल[१]-कराची सविस्तर बोली कालीं छ १९ जमादिलौवली डांकचौकी समागमें लेहून पाठविली आहे त्यावरून कलों येईल. त्याचीं उत्तरें लौकर पाठवावीं. वरकड आमचे विचारें राजश्री पंतप्रधानहि आले आहेत. त्यास राजश्री शंकराजी

+ सासवणें येथें तटबंदी करूं नये. १ जिल्हा कुलाबा.

केशव व मोराजी शिंदे यांस समागमें घेऊन यावें, आणि त्यांचा बहुमान करवावा. किल्ले कर्नाळकराकडील बोली आद्यंत हरि तुकदेव सांगतां कळेल. कर्नाळकराविशी दुसरा अर्थ चित्तांत आणावा ऐसें नाहीं. तो सर्व प्रकारें स्वामीचा आश्रय इच्छितो. तरी कालीं लिहिलेंप्रमाणें पत्र पाठवावें कीं ज्याप्रमाणें राजश्री वासुदेव जोशी यांणीं बोली केली आहे त्याप्रमाणें चालविलें जाईल. तरी कोणेविशी बसवास न धरणे. व राजश्री मानाजी आंगरे यांचेंहि पत्र शपथपूर्वक आणून पाठवावें. कर्नाळकरांनीं दुसरे शामलाचे लोक आणावे, उत्पात फारसा करावा ऐसें केलें होतें. परंतु आम्ही आलीयावरी त्याला समाधानें च्यार गोष्टी सांगोन देहावरी आणिला; याउपरी सुरळित जाहाला आहे. स्वामीचे तर्फेनें त्याची निशा जाहाली. कळावें याकरितां लिहिलें असें. आजी आम्हीं येथून स्वार होऊन पनवेलीस गेलों. आम्ही लौकरीच येतों, आम्हांसमागमें लोक आहेत ते बराबर येतीलच. तरी जमाव करून तळ्याघोसालियाकडील रवानगी करावी. प्रस्तुत दाणागल्ला चढवावयाचा हंगाम आहे, आणि शामलानींही तिकडे येक दोन स्वाऱ्या करून शेर जाहला आहे. याकरितां त्या प्रांतें स्वारी गेलियावरी दाणागल्लाहि चढेल व शामलही हलखुद राहील. आणखी कितियेक कर्नाळकरासी बोलिलों तें सर्व वर्तमान हरि तुकदेव सांगतां कळों येईल. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंति.

¶*Vasudeo Joshi to Chimaji Appa, communicating to him the reconciliation the writer effected with the people of the fort of Karnala.*

No. 435] [*16-9-1736*

पौ छ २६ सफर

श्री

राजश्री पिलाजी जाधवराव गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो चिमणाजी बलाल आशीर्वाद सुा सबा सलासेन मया अलफ. बालोजी भोसले तुम्हाकडे पाठविले आहेत यांसी रोजमरा चौरोजा रुो २ दोन प्रमाणे देवीत जाणे. जाणिजे छ १७ सफर बहुत काये लिहिणे.

¶*Chimaji Appa asks Pilaji Jadhao to entertain Baloji Bhonsle in service and to pay him at the rate of Rs. two for four days.*

No. 436] [25-9-1736 ?

पौ छ ३० जमादिलोवल

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा साहेबाचे सेवेसी

विनंती यैसीजे. किले बाणकोटी लोक दिा कृष्णाजीराव येरुणकर वगैरा ठिकाणी आहेत. भले माणूस मर्दाने आहेत त्यास कबिले ठेवावेयासी ठिकाणे असावी याकरितां सेवेसी विनंती लिहिली आहे. नावनिसी.

साबाजी पवार मो किले मार यासी	गोविंदराव दळवी दिा कृष्णाजी राव येरुणकर यासी गाव १
निशाण १ गाव १	सूर्याजीराव पारठे यासी गाव १
कृष्णाजीराव दुदुसकर यासी कबिले ठेवावयासी गाव १	लग ०
रतनोजीराव हडपळे यासी गाव १	

येकूण पाच जमातदार भले लोक आहेत याचे कबिले यासी जागा असावा याकरितां सेवसी विनंती लि(हिली) आहे. तर सदरहूप्रमाणे सरंजाम करून लोकांची दिलबरी होई ते करणार साहेब धनी आहेत. हे विज्ञाप्ती.

हे विज्ञाप्ती.

¶*Chimaji Appa is requested to grant saranjams and lodgings for the families of men mentioned in the letter.*

No. 437] [18-12-1734

पो छ १६ साबान.

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान

दाजी गोसावी यांस

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो संभाजी आंगरे सरखेल रामराम विनति. उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुषललेखन केलें पाहिजे विशेष. आपला आमचा भाऊपणा विशेषात्कारें चालत होता. त्यास मध्यें विक्षेप होऊन संकल्प विकल्प प्राप्त जाले आहेत. त्यास आपली आमची भेटी जालियाखेरीज चित्ताचा संशये वारत नाहीं. याजकरितां हें पत्र आपणांस लेहून हैदरभाई पाठविला आहे. सविस्तर सागतां कलों येईल. भेटीचा योग कोठें होईल हा सविस्तर अर्थ कलला पाहिजे. तरी याउपरी

चितांतील विकल्प दूर करून भेटी होई तो अर्थ केला पाहिजे. वडलाचा भाऊपणा चालिला आहे त्याहिपेक्षां विशेष चालावा हेच आमचे चित्तीं आहे. दुसरा अर्थ नाहीं. आपली आमची भेटी जालियावरी जो मनसबा चितावरी आसल तो होईल. सर्व पदार्थे आपण वडील आहेत. टका पैका देणे आहे त्याचा विशय फारसा नाही. तोहि पावता होईल. टक्यासाठीं आपण कांहीं चित्तांत न आणावें. श्नेहाची जोडी थोर आहे. टका आपण मेलवितील आम्हीहि मेलऊं. ते गोष्टीचे काय आहे? राजश्री मानाजी आंगरे राजकोटीं आहेत त्यास आणावें म्हणोन राजश्री स्वामीचे सेवेसीं विनंती लेहून पाठविली आहे व आपणास लेहून पाठविलें आहे. तरी राजकोटीहून आणवावा आणि घरकलह लागला आहे तो दूर करावा. हे गोष्ट नव्हे तेव्हां राजकोटाचा मनसबा भांडी जोडून करावा लागेल. आपण वडील आहेत. चित्तास येईल तें करावें. जाणिजे रवाना छ ३ माहे साबान. बहुत ल्याहावें तों आपण सर्वज्ञ आहेत कृपा वर्धमान करावी हे विनंती.

¶*Sambhaji Angria requests Bajirao for a personal visit in order to effect a reconciliation with his brother Manaji who was at Rajkot.*

No. 438] *[30-11-1736?*

छ १९ साबान

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे शेवेशी

विज्ञापना तागायत छ ७ शाबान उंदेरकारास ल्याहावयाचा मजकूर हरि विश्वनाथ यासमागमे स्वामीनीं लेहून पाठविला. त्यास स्वामीचे आज्ञेप्रमाणें लिहिणे ते लेहून पाठविले आहे व स्वामीची पत्रे उंदेरकरास होती तेहि पाठविली असेत. उत्तर आले म्हणजे सविस्तर लेहून पाठवितो. वरकड त्याजकडील खुलाशाचा मजकूर हुजूर लिहिलाच आहे. आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक करून. प्रस्तुत त्याजकडील वर्तमान मांद सोफी पलवकर मुंबईहून आले. त्याणी सांगितले कीं राजश्री मानाजी आंगरे याजकडील प्रल्हादजी कासार याणी मुंबईस इंग्रजाकडे आला आहे. उभयेताचे सख्ये करून घ्यावयाकरितां इंग्रेजानीं भले माणूस उंदेरकराकडे व अंगारकाकडे पाठविले आहेत आणि सांगोन पाठविले कीं बोलीस दरम्यान आम्ही आहो. बोलीचा बीद बसे तो दुतर्फा भांडो नये. त्यास उंदेरकराचा मनोदये कीं कोट कोसळून टाकिल्यावर सख्य कशाचे? कदीम ठिकाण

आमचे तेच काईम राहून सख्य होत असेल तरीच करावे नाहीं तरी पहातच अहो. असे वर्तमान मशारनिल्हेनीं सांगितले. त्याजवरून तुमास लिहिले आहे. एका दो दिवशीं इंदेरकराचे पत्र येईल. साध्य ते कलल्यावरी सेवेसी लिहून पाठवितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer informs the Peshwa that Manaji Angria had despatched his agent to the English to seek their aid in establishing friendly relations with the Sidi.*

No. 439 [*1736 ?*

श्री

विनंती उपर. आजी सामान व लोकाची रवानगी करितो ते येऊन पोहचले पाहिजेत. याजकरितां आजीचा दिवस मुहुर्तेकरून जागा पालटून जवल मुकाम करावा म्हणौन लिा. यैसियास सध्या आलीकडे जवल पाणी नाही व येथे मुकाम केलियाने वैरणकाडीहि मिळत नाही. याजकरिता आजी कोयनेचे काठी * कवलीवर जाऊन मुकाम होईल. लोकास * * * * मुकामास आटपून यावयाची आज्ञा * * * * (पा) हिजे. येशवंतराऊ खानविलकर याजक (ल) * * गोजी बोरडे याच्या लोकाची रवानगी ते * * * * * त्यास येशवंतराऊ याचे लोक आा * * * * * ऊन पावले. नागोजी बोरडे याजकडील लोक आले नाहीत त्यास ताकीद करून पाठविले पाहिजेत. विशेष काये लिहिले? कृपा केली पाहिजे हे विनती.

¶*The writer (Pilaji Jadhav) communicates the place of his halt and asks the addressee, the Peshwa, to send more men.*

No. 440] [*1736 ?*

श्री

राजमान्य राजश्री नचमणाजी बलाल यांसा आज्ञा केला एसीजे कालुस्तियांस मोर्चा होता तो उठोन चिपलोणानजीक पागेवर आला म्हणोन तुमचे लोकहि मोर्चा टाकून उठोन पागेवरी आले. ऐशास कालुस्तियाचा मोर्चा ज्याणी काहाडिला त्यांस स्वामीनी नसीहत करणे तैसी केली. या लोकी बेवकूफी केली. मोर्चा काहाडिला याबदल तुमचे लोक उठोन आले हें अनुचित केले. तुमच्या लोकांचा स्वामीस भरोंसा, तुमचा बंदोबस्त जैसा म्हणावा तैसा असतां तुमच्या

आज्ञेवेगळे कैसे उठोन आले? या उपरी ताकीद करून फिरोन जाऊन मोर्चा काईम करीतच यैसें करणें. येविसीं गै न करणे. मुरूड, नांदगाव, दिवे, सीवर्धन, म्हसलें, मांडले हे पाच माहाल पेसजीं तुम्हाकडे होते त्या प्रों करार केले असत. पत्रेंहि देवविली आहेत. रा माहादाजी अंबाजी लिहितां कलेल सुंज्ञ आसा.+

¶The king Shahu is surprised to find the siege laid by Chimaji's men being raised and the people leaving the place in spite of Chimaji's orders. The King confirms the grant of five mahals to him

---

No. 441] [*1735-36*

नकल

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
छत्रपति स्वामीचे सेवेसी

विनंती सेवेसी आज्ञाधारक तानाजीराऊ दरेकर हवलदार व कारकून किल महिपतगड सेवेसी विज्ञापना तागाईत छ' ९ माहे जमादिलाखरपर्यंत किल्ले मजकूरचें व सेवकाचें वर्तमान येथास्थित असे.

किले मजकूरचे घेरियांत वसुलाबद्दल आंगरेयाकडील वरातदार आले होते त्याची व आमची कजावत जाहली ते उठोन गेले. यावरी आंगरेयाकडील दोन हजार माणूस जमाव किल्यानजिक येऊन राहिले आहेत, मुदा काय आहे ते कलत नाहीं. किले मजकूरचा घेरा तो तमाम वोस जाहला. याप्रमाणें आगऱ्यानें मुदा पुरविला आहे. सेवटीं निदान आले. यांत स्वामींनी कृपाळु होऊन खालील लस्कर फौज दारूगोली समेत रवाना करून पारपत्य करणार स्वामी धणी समर्थ आहे, हे प्रसंगीं पारपत्य न जालें तरी स्वामीचे स्थलचें व सेवकाचें स्थित राहणार नाहीं. हुजराचे लोक किले मजकुरी नामजाद आहेत. हे म्हणतात कीं विना महाराज राजश्री छत्रपतीचे हातचिठीखेरीज स्वारी सिकारीस खालीं जाणार नाहीं. ऐशास स्वामीनें कृपाळु होऊन त्यास हातचिठी देणार धणी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Tanaji Rao Darekar, Hawildar of the fort Mahipatgad, communicates to Shahu that the forces of the Angria are encamped at the foot of the fort and requests reinforcements to put them down.

+ खुद शाहूचें हस्ताक्षर.

श्रीभार्गव.

श्रीमंत परमहंस स्वामी यांहीं

चौदाचाल (चौदाताल) कोकणचा धनी तो आहे. देवली त्याचा भक्तराजशिरोमणी सहश्रायु चिरंजीव बाजीराऊ प्रधान तथा आपा व नाना यासी आज्ञा केली यैसीजे. अनंतकोटीचे येश तुम्हास आले. तू मोठासा हिरण्यकश्यपच जालास! माझे भय तुजला कोठे आहे? तुम्हीहि माझे भय कोठे वागवितोस? मीं तुझे भक्तीनें बांधलो आहे. नाही तर माझे वडिलाची येथे काही मिरास नाहीं. कोकणांत दहावीस कार्यें श्रीचे जाहाली, आता आपले कोकण तुम्ही घ्या. तुमचा धाक मोठा दिली आगरे पावेतो त्रास! दिवसास दरवाजे लावितात! चंदीकडेस गेलेस तर येव्हां पयजारेनं चंदी घ्याल, आवघे राज्य पृथ्वीचे तुज वश्य जाले. आता तुज माझा लेखा काय आहे? इतके सता परमेश्वरे दिली असतां राजपुरीचे मुख्याहि कलबुसी गाव देऊ केला होता त्याचे सनदा आणवणे यैसें दोन तीन वेला तुम्हास सांगितलें. इतका तुमचा धाक आणि तो कागद सनदा तुम्ही कोठे आणिल्यात? वरकड आतां तुम्ही स्वारीस उतर दिशेस जात आहा, त्या प्रांतीहून उत्तम सकलाद लाखी रेशमी व पशमी थाने दोन मेलऊन त्याच्या दोन दुलई करून स्वारीहून आलियावरी पाठऊन देणें. गिरमाजी नरसिंह यास आपा धावडसीस आले होते तेव्हां घोडे घेऊन पुण्यास येणे येसे बोलिले होते, याजकरिता पत्र देऊन पाठविला होता. त्यास नये चितास यास्तव माघारा पाठविलात. फेर पाठऊन देणे. प्रस्तुत नालबदी नाही. पुढें त्याचे स्वारीबराबर चालऊ म्हणून लिहिलेत तरी त्याचे चितास आले तर येईल. देव तुम्हास बुधी देईल त्या प्रा त्याचे चालवणे जाणिजे. कृष्णराऊ महादेव तुम्हाकडून रुसवा जाला. याजउपरी श्रीपतराऊ याजकडेस येऊन कितेक तुमच्या मामल्याचे मनसभाचे घालमेली छत्रपतीस सांगोन करवावी यैसे योजिले आहे. तुम्हास परस्परे कळलेच असेल. परंतु आम्हास आढलली गोष्ट ते लिहिली असे. विशेष लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा हे आज्ञा. गिरमाजी नरसिंह यास खर्चास आम्ही आपणापासून पंचवीस रुपये देऊन तुम्हाकडेस पाठविला आहे. याचे तुमचे चितास येईल तैसे चालविले पाहिजे. विशेश काय लिहिणे हे आज्ञा.

¶*The Brahmendra Swami speaks very highly of the brave deeds of the Peshwa and Chimaji Appa and asks how in spite of them, they could not obtain from the Sidi the sanad of the village Kalbusi. The Swami also asks them to get for him some good clothes from the north where they were proceeding on an expedition.*

No. 443] [Sept. 1733

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी

यासी

॥ऽ श्रीमंत सकलगुणालंकर्ण अखंडितल(क्ष)मीं आलंकृत राजमान्य श्रो पिलाजी जाधवराव कृतानेक दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुषल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री आनोजी साटम यास आज्ञापत्रे सादर जाहालीं होतीं कीं भेटीस येणे. त्याजवरून मारनिले शेवेसी येत होते तों ते गोवळकोटास आले हे वर्तमान राजश्री पंतप्रतिनिधि यास कळले. त्याणीं आपल्याजवळ जमावानिसी ठेविले. ते लोक काही कार्याचे आहेत. याजकरिता राजश्री पंतप्रतिनिधि यास पत्र व मारनिलेस पत्र पाठऊन आणवावे. ते कार्याचे माणूस आहेत म्हणऊन आपल्यास कळले. याजकरिता लिहिले आहे. कितेक प्रयोजने त्याचे हातून करवावी लागत. विशष काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhao to Bajirao requesting him to send Anoji Satam to serve under the writer.*

No. 444] [1736 ?

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा

स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी स्वामीनी पत्र पाठविले ते पावले. ते(थे) लिहिले की शहरा होऊन फौज जुनरास येणार * * व अजम आबदूल अजीजखान मिलोन खाली कोकणा * * * उतरणार म्हणून लिा ते कळले. दाणा-गल्याची ताकीद करणे म्हणून लिा तरी ताकीद करीतच आहो व अनखी स्थलाची बंदोबस्ती करणे ती करीत(च) आहो. आम्ही येथून शहरास व जुनरास माणसे पा(ठविली) आहेत, परंतु आपणाकडे वर्तमान येईल ते वरचेवर लेहून पाठविले पाहिजे व आपणहि तेथे सा * * राहिले पाहिजे. विश्वास+ न धरावा बहुत काये लिहिणे. अवरंगाबादेची बातमी ठेवावी * * * करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*The writer informs Chimaji Appa that every precaution was taken regarding provision, etc., as desired by the addressee. He notes the news about Ajij-khan and other forces from Aurangabad coming down to Konkan via Junnar.*

+ येथून अक्षर वासुदेव जोशाचें.

No. 445] [1758

[पहिला बंद गहाळ.]

ही पेशजीच रवाना करीत होते. परंतु सिधवटचा गुता उरकला नवता व लोकीक मते की, इंद्रोजी कदम मातबर सरदार देसास गेला. याजकरिता राहावयावेसे जाले. प्रस्तु दो चौ रोजी निश्चये पाठवीत आहेत. करनालेकर याची खंडणीत घोडे ३९ हाती तीन व कापड व हुडी १९००० ची येसी येथे पाठविली आहे. यातहि घोडे दोन तीन खावंदाचेच मर्जीप्रा आहेत. तेहि घोडे खावंदाकडे पाठवीत आहेत. सेवेसी निवेदन जाले पाहिजे. प्रस्तुत सारावश स्वामींचे पुन्यप्रतापेकडून सर्वहि पादाक्रतच होत आहेत. सेवेसी विदित होय हे विज्ञाप्ति. वरकड इकडील श्रीरंगपटण वगैरे व सिधवटचा मार रा रावजी लिा आहे त्यावरून निवेदन होईल हे विज्ञापना.

¶*The writer congratulates the Peshwa on his recent success and sends him the horses that the writer received as a tribute from the chief of Karnaul. The letter refers to the Karnatak campaign of 1758.*

No. 446] [1736

श्री

वेडा गोसावी साधुसंताची पायधूळ

सहश्रायु चिरंजीव विजईभव बाजीराऊ प्रधान यासी आज्ञा केली यैसीजे. श्रीभार्गवसेवक उभयेता तुम्ही आहा. तुम्हास चिंता कशाची आहे? तुमच्या धावन्यास बागे (मागे) भार्गव आला. तुमचे मनोरथ पूर्ण करील. तुम्ही पत्र पाठविले ते जेष्ट सुध सष्टीस प्रविष्ट जाहाले. बहुत संतोषी जाहाले. वैकुंठवास जाला यैसे सुखी जालो. रघुनाथजीने अवतार घेतला. दशरथाचे पोटास आला. भूमीभार फेडून रावणवध केला. तैसा श्रीने अवतार कैलासवासी नानाचे पोटी उभयेताहि घेतला आहे. यैसे असतां तुम्ही कोणेक चिंता न करणे. मज द्रिष्टांत जाले आहेत. म्हणून दोघास दोन दंड वसिष्ठाचे हाते दिल्हे आहेत. काही चिंता नसे. वैशाख वदि दसमीस राजा राजपत्न्या धावडसी येऊन येक दिवस राहोन दर्शन घेऊन गेली. तुम्हास कळावे म्हणून लिहिले असे. तुम्ही स्वदेशास कोठीचे फते करून याल. तुमचे भेटी होईल तो दिवस आनंदाचा अमृतोपम यैसा. हर्ष पावोन तुमचा मार्ग पाहात असों. सहश्रवाटेने वसिष्ठ भार्गव तुमचे धावन्यास आला यैसे समजणे. विशेश लिा तरी सुज्ञ असा हे आज्ञा.

¶*The Brahmendra Swami extols merits of Bajirao and Chimaji Appa and gives them his blessings in their undertakings.*

श्रीमंगलमूर्ति

पुरवणी राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापना ऐसीजे. स्वामीचे सेवेसी दोन जोड्या जासूद येथून गेले त्यास ती पत्रें सेवेसी सादर जाहलीं न झालीं हे वर्तमान कांहींच कळत नाहीं. यानंतर येथें इंगरेजांचे भेटीस जावें तेव्हां ते म्हणतात तुम्ही येऊन इतुके दिवस जाहले अद्याप तुमच्या खावंदांकडून एक मनुष्य आलें नाहीं. आम्ही आपले मनुष्य रवाना केलें त्यास आज्ञा केली होती, की सिताबीनें येणे. त्यास इतुका दिरंगा लागावयास कारण काय? आम्ही त्याचे मनुष्य येते ते वरचेवर रवाना करितों. विचारानें जाबसाल लिहावयाचा असतो. तेधवा वरिकें[1] (?) दिवस लागेल त्याचें कांही नाहीं, तर हा मजकूर भारी तों नाही आणि यद्यपि असिला तर सावकाशीनें रवाना करायास माणसास त्यांजपासीं वाण काय? स्वकार्य असतें तेव्हां जोडीमागें जोडी येते; आणि आम्ही लिहिलें म्हणून भारी मजकूर करून दाखवावा हा कितीकांचा दंडक असतो. तैसें आहे कीं काय? कपितान इंचबर्डानें तो आपणास सांगितलें होते कीं बोलणार व मनुष्याच्या गुणाची परिक्षा करणार आणि सत्य भाषण मनुष्य पाहून करणार, त्याच्या राज्यांत दुसरा बहुत करून दृष्टीने कितीक पाहिले त्यामधीं कोणएक येसे आढळला नाहीं, मग नकले. तेथें त्याचे भेटीस गेलो तेव्हां वृद्ध सभ्य दोग जण पाहिले. एकाचें नाव बापूजी श्रीपती व एकाचें नाव व्यासराऊ व दोघे जण दुसरे होते. आनंदराऊ जे सला करायास आले, परंतु मनुष्याचे परीक्षक नव्हते. स्वकार्य साधायाकरितां धण्याच्या कार्यास धका देतील एसे भासतें, व हुजरून एक आले त्याचे नांव चिमणाजी धाइगुडे ते कारभारी नव्हत, ऐसें दिसोन आलें. निमित्य कीं बाजीराव आणि आम्ही एकांतास बसलो असतां न बोलावितां तेथें दाटून आले, त्यावरून भासले. एसे इचबर्डानें लिहून आणलें होतें तो कागद काढून वाचीत होते तो आम्ही पाहिला. तो हाती घेऊन आम्हापासीं गोष्टी बोलले त्यावरून दिसोन आलें जे हेया लिहिलेयास आणि आमचे बोलीस तफावत पडते कीं काय ते पाहतात. मग यथाज्ञाने सुचले तैसा जाब दिल्हा. परंतु याणी दिकत घेतली. इतुके सावध आणि चौकस. तेव्हां वाऊगें का लिहावें म्हणून लिहिले नसेल म्हणावे तर नकले, हेंच खरे म्हणावें. तेव्हां याणी सत्वर जाब या पत्राचा आणावा म्हणून कृष्णाजीराम यास सांगितलें. त्यांणी लिहिले असिल्यावर अंतर न करिते. सिताबीनें रवाना जोडी करते यैसी दिकत जनारल हारन यानी

---

१ वरिष ? वर्षे ?

घेतली. आम्ही जाब दिला, आम्ही तों लिा परंतु सल्याचा मजकूर लिहिला तो प्रसंगी पाहून राजश्री स्वामी यांसी युक्तीचे वाटेने समजाऊन कार्य करून घ्यावें, याकरितां कदाचित दिरंग लागेल किंवा प्रजन्यामुळें जातेसमई दिवस येथील मनुष्यास लागले असतील किंवा शरीरपीडेनें अडथळा जाहला असेल. हें सर्व मनुष्यें येथें येऊन पोहचल्यावर सर्व माल्हम होईल, ऐसा जाब दिला आहे. सेवेसी श्रुत होय. बाळाजी विठल येथें आले होते, तेव्हां कळों आलें कीं कोंडनाक परवारी मारला गेला म्हणून खबर आली होती ती लटकी. तो तेथें आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News-letter from Bombay to the Peshwa reporting his interview with the Governor on the subject of Janjira.*

No. 448] [*1736*

छ ११ जौवल

श्री

पुर्वणी राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना यैसी जे. हे इंगरेज यांचा प्रकार यैसा आहे. जाहाली खबर लिहावी परंतु तथ्य लिहावी. ये वेलस आपणास बहुमान जाहाला तो सविस्तर यास कलला. आम्हाबाा अमुके रुपये पाठविले, राजश्री आपासाहेबीं दुसरे मनुष्य पाठवायास योजिले आहे. मी आल्यापूर्वी यास खबर खानदेशांत अमुक ठिकाण पावेतों गेले. तेथून येकाकी उठोन आले. आमुक घोडे घेतले याखेरीज आंतस्थ पडले म्हणतात यैशा सर्व खबरी याचे तोंडी कोण सांगतो न कले. कोंडनाक माहार तिकडे सापडला की मारला हे खबर विचारीत होते. खबर नाही म्हणतांच तिकडील चर्चाच युद्धाची खबर पुसायाची सोडिली. आंगारकानें नारा(य)ण सेटीस पाठविला तेथे खबर कलली की इंगरेजांस वीस पंचवीस हजार रुपये मागतील तर द्यावे, परंतु सला करून घ्यावा. हे कलतांच आमचे हरद्र मनास आणावें. आमच्याने तूर्त न होये हे सावकासीवर आहे, यैसे पाहावें आणि यासी हात बांधावा, आपला शब्द लागेल, म्हणून उतर आणविलें आहे. फिरंग्याबाा सला केला. आंगरकानें त्याचे पाल धरले होते. लाकडे देखील पाऊन[१] चेवलांस दिलीं. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*News-letter from Bombay to the Peshwa. The writer extols the cleverness of the British in obtaining correct news of all places quickly and wonders how they manage to get such news.*

---

१ पाठऊन.

No. 449] [1736

श्री

पुर्वणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

सेवेसी विज्ञापना. हे रामाजी रंगाजीस रुपये काये म्हणून दिले त्याजकडे थारले कसे, व कपितान इंचबर्डाकडे हजार रुपये आसावे ते आठरासें कैसे राहिले, हें वर्तमान आद्यंत ध्यानांत यावे येसा हेतु आसेल तर सविस्तर सेवेमधीं निवेदनहि प्रसंगीं होईल. कदाचित पूर्व पत्राचे उतर करितां मर्यादा धरिली नाही म्हणून स्वामीस क्रोध आला असेल यदर्थी संदेह नाही. परंतु तैसे न लिहितां आम्हास बाधेल म्हणून स्पष्ट लिहिणे पडले. येविसीं मनात नि:संदेह श्री करील आणि स्वामीचे चरण दृष्टीस पडल्यावर आमचे कल्याणच होईल हा मनाचा भरवसा आहे. पूर्वी स्वामीचे पदरीचा होतों ते समईंच्या गोष्टी स्पष्ट पत्री लिहाव्या तर हालीं दुसऱ्याचें आंन भक्षितों तेथें स्वामी सेवकांची उघडीक कारभाराची करून घ्यावी, यांत लाभ काये, निरयत्न म्हणून हे रुपये त्यांजकडे थारले. खावंदाच्या बलानें उडावे तर खावंदाची दृष्ट मनसुब्यावर, या कर्ता रामजी रंगाजी व कपितान इंछबर्डाची भीड व इंग्रजाची दोस्ती संपादणे, याचे हातून उदंड कामकाजें करून घेणें, म्हणून रुपयांवर नजर ठेविली नाहीं. परंतु त्या रुपयाचे दूण रुपये स्वामीचे घरीं येऊन पोहचले आहेत, कैसे तेहि ध्यानांत स्वामीच्या आणून सेवक देईल. दूर पडलों, पत्रीं लिहितां पुर्वत नाही. पालोलें[1] सेवेसी निवेदन होईल तेसई सत्य भासेल. स्वामीचे पदकमल द्रिष्टीस पडतील तो सुदिन आसे. येविसी निर्भये करावयास स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Relations between the English and the Peshwa are to be seen in this news-letter which discusses some money transactions with Inchbird and Rumaji Rangaji.*

No. 450] [14-2-1737 ?

श्री

राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान
दाजी गोसावी यांसी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो मानाजी आंगरे रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली

---

१ पाल्हाळें, सविस्तर.

पाहिजे. आपली स्वारी उतर दिसेस जाहलियापासोन संतोशाचे वृत कलोन येत नाहीं. व पत्रहि न आले. राजश्री आपा दाजीस पत्रे आपणाकडील येतच असतील. परंतु आम्हाकडील स्मरण होत नाहीं. याउपरी पत्र येऊन संतोष होय ते गोष्ट करणार आपण वडील आहेत. वरकड आम्हाविशी आपण चिंता करीत असतील तरी न करावी. राजश्री आपा दाजी मायाममता बहुत करितात. नवल विशेष वर्तमान जे होत जात असते ते व स्वकीये मनसबेयाचे हरद्राचे वृत लिहून पाठवीत असतो त्यावरून आपणासहि लिहित असतील. रा छ २४ माहे सवाल बहुत काये लिहिणे, कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Manaji Angria requests the Peshwa to be writing to him about his health and welfare.*

No. 451] [*21-4-1737*

श्री

श्रीमंत राजश्री आपासाहेब
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक सुभानजी बोरगे दंडवत विनंती. येथील क्षेम ता छ १ माहे मोहरमपावेतो साहेबाचे कृपेद्रिष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर हरफले याचेविशाई अभिमान धरिला आहे. यैसीयासी त्याची स्थापना वृतिवर करणार आपण समर्थ आहे. ती आम्ही सेवेसी विनंतीपत्रे पूर्वीपासून लिहिली त्याप्रमाणें आपण मान्य करून अभिमान धरिला तोच सेवटास नेला पाहिजे. आमचें वर्तमान तरी अंजनवेलीवरी आहो. आशाढ मास क्रमून श्रावण मासी येऊ ते समई भेटी होईल. भेटीनंतर सकल वर्तमान सेवेसी निवेदन करू. सेवे श्रृत होये हे विज्ञाप्ति.

¶*Subhanji Borge to Chimaji Appa requesting him to restore Harphale to his former status.*

No. 452] [*26-4-1737 ?*

श्री

राजश्री पंत प्रधान स्वामी
गोसांवी यासी.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री मानाजी आंगरे कृतानेक रामराम विनंती. उपरी. येथील कुशल जाणून स्वानंद-

लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. गोविंद भास्कर * * बराबर पत्र पाठविलें तें प्रा। होऊन लेखनश्रवणे सामाधान जाहाले. शामलाकडील लो(क) कबिले-सुधा पदरी घेऊन कल्याण भिवंडी सुभा पाली पंचमाहाली गावगना ठेविले आहेत. व गौली येकतर्फा करून ठेविले आहेत. त्याजविशी आपण लिहिले व तीर्थस्वरूप राजश्री सरखेल याचे पत्र पाठविले ते प्रा। जाहाले. त्याप्रमाणे माहालो-माहाली ताकीदपत्रे दिल्ही आहेत. लोकास कोणेविशी तगादा लागणार नाही. कळले पाहिजे. रा। छ ६ माहे मोहरम बहुत काय लिहिणे कृपा वर्धमान केली पाहिजे हे विनंती.

¶*Manaji Angria informs the Peshwa that strict orders have been issued to all the mahals regarding the families and the retinue of the Sidi kept at Kalyan, Bhivandi, etc.*

No. 453] [*5-4-1740*

श्री

सेवेसी विनंती ता। छ १८ मोहरम पावतो वर्तमान येथास्थित आसे विज्ञापना. रा। संभाजी आंगरे कुलाबियासी येऊन हिरा येऊन जेर केला, तेव्हा राजश्री मानाजी आंगरे यांनी उरणास साबाजी तुकाजी यासी पत्र पाठविले की तुम्ही लौवकर निघोन येणे. जमाव सुधा येणे. त्यावरोन मारानिलेनी आम्हास ठाणियासी पत्र पाठविले की श्रीमंत येसमयी पुणेयासी नाहीत. आणि संभाजी आंगरे येऊन कुलाबा जेर केला आहे तरी तुम्ही कुमक करावी हे प्रसंगी चुको नये. यैसे कितेका मार लि। त्यासी स्वामीची आज्ञा पेसजी रा। खंडोजी माणकर व रा। संकराजी-पंतास होती की घारीपुरी उरुण घ्यावे हा सिधांत होता. त्यासी आपसुखे कुमक बोलाविली ही पाठवावी. कुमकेने जाऊन उरुणात राहावे तो रा। संकराजीपंतास व रा। नारायेण जोसी यासी पत्र लिहिली की हा समई या प्रकारचा जाहाला आहे आणि त्यानी कुमक करा म्हणोन लि। आहे. तरी तुम्ही पत्र पावता वसईचा बंदोबस्त करून यावे यैसी पत्रे त्यासी पाठविली. उरुणास कुमकेस सेंभर माणूस बा। कानोजी गजे यासी देऊन त्यांचा सिपाई आला त्याबा। रा। मानाजी आंगरे यासी लि। की इतका विचार जाहाला परंतु तुम्ही काही लि। नाही. त्यासी साबाजी तुकाजीस पत्र लि। त्यानी आम्हास मोघम कुमक करावी यैसे लि।, परंतु लोक कोणे ठिकाणी पाठवावे हे काही लि। नाही. त्यासी आगदी न पाठविले तरी साष्टीस फौज आणविली ती न आली म्हणोन लौकिक होईल. म्हणोन कानोजी गजे याजबा। सेंभर माणूस देऊन रवाना केले, तुमचे लिहिले

येईल त्याप्र।। आणिखी जमाव पा। जाईल, यैसे पत्र त्यासी लि।. मारनिलेस जे सांगणे ते सांगितले. हे उरुणास जाऊन दाखल जाहले. रात्रीस आणिखी लोक पा। त्यासी किलियात घेतले नाही. बाहेर टापूत उतरले आणि संकराजीपंत व नारायेण जोसीबावा आलियावरी सिधांत करून जावे. त्यासी उभयता आलियावरी जे विचार केला ते उतम काये (कार्ये?) करोन घ्यावे, वसईहून आरमार आणविले, त्याची वाट पाहात बंदरावरी येऊन सकराजीपंत देखील आहो. रा। नारायण जोसी बेलापुरास पाठविले. तेथील आरमार तयार करावे त्यासी बंदरावरी बसलो आहो तो रा। तुकोजी दळवी हवालदार पालीचा याचे पत्र आले की रा। संभाजी आंगरे पालीस निशान घेऊन येणार, त्यासी आम्ही तुमचे पदरी पडतो तरी पत्र पावताच स्वार होऊन दोन हजार माणूस घेऊन येणे येसे पत्र पा. त्यासी आईतेसमई दोन हजार माणूस कैसे जमा होते? त्यासी पालीसारिखी जागा! दुसरी दौलताबाज यैसी जागा! आनुसंधान आले टाकावे म्हणजे हे गो। कार्येची नाही ही जागा यावयाची नव्हे म्हणोन बंदरामधे दोनसे माणूस वसईचे होते आणि आम्ही ठाणेयापैकी तयार करून सेंभर माणूस आणिले. पंचवीस खास बारदार आणविले. राऊत पनास घेऊन बुधवारी दोन प्रहरी ठाणेयाहून निघालो ते रातेरात्री व खालापुरास आला. तेथे रा। बाळाजी चांदराव यासी बोलाविले. तेहि जमा करून च्यारसे माणूस घेऊन तेथून निघाला. त्यासी उंबरखेडीने जावे त्यासी पालीस आंताजी चव्हाण जमावसुधा निशान घेऊन आला. त्यासी ज्याने आम्हाजवळ पत्र घेऊन आला त्याणे कबूल केले की ताभरी (तो जरी?) बसले तरी आम्ही तुम्हांस चोरवाटेने नेऊन वरी चाढवितो, खाली मात्र तुम्हास भारी आहे. त्यासी आम्ही सांगितले की धन्याचे पुन्य समर्थ आहे त्याची फिकीर तुम्ही करू नका आणि चालिलो तो भावेपरलीस (?) गेला दिवस अस्तमानास गेला तैसेच रातोरात्र जावे हा सिधांत करून गेला. त्यासी हवालदाराने हुजूर हिशा (?) आणि खंडोजी माणकर यासीहि लि। आणि रा। संकराजीपंतासहि लि। नरसीपंत बलकवडियाच यासीहि लि।. त्यासी ते नजीक होत. त्यांनी सुभानजी माणकर व बलकवडियाकडील जावजी मराठे हे नागोठिनियात होते ते नरसीपंत घेऊन किलीसयासी निशाने घेऊन गेले. रा। खंडोजी माणकरहि येऊन पोहचलो तो रा। वासुदेव जोसीबावाहि फौज सुधा पावोन चौहीकडून फौजा जमा जाहल्या. कार्येसिधी जाहली. त्यासी उरुणास लोक गेले ते तेथेच ठेविले होते. रा। संकराजीपंत कोटांत ठेविले होते म्हणोन राजश्री वासुदेव जोसी व रा। अंताजी नारायेण खंडोजी माणकर यांचे विचार आमचे विचारे सिंधांत जाहला की श्रीमंत आलियावरी संभाजी राहात नाही, घेतले

जागे टाकून निवेल. त्यासी फौजा जमा जाहाल्या म्हणजे नीट जाऊन नागोठणियासी आगर सागरगडास जाऊन मोकाम करावा म्हणजे निघोन जाईल. तो येकाधिया जागियात सिरला रीत तेथे मिठी घालावी आणि (आहरी ?) निघोन जाईल. आरमार धब्यावरी घ्यावयाचे दिवस आले आहे हे चितात गो आली. त्यासी हे गेलियावरी कुलाबियात मानाजी आसता मागती आहे तैसेच आहे. तरी आधी उरुण घारीपुरी ध्यावी मग हा विचार करावा. धन्याच्या पुण्ये कार्येसिधी होईल येसा निच्य करून माघेरी ठाणियासी निघोन छ मा आला तो श्रीमंत रा नाना स्वामीहि घाटाखाली आले. पालीचा मोकाम होता त्याचीहि आज्ञा येणे प्रा जाहली. स्वामीचे पुण्यकर्माने कार्येसिधी होईल तो सुदीन आसे. सेवेंसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The letter mentions the differences between Manaji and Sambhaji Angria and the aggressive attitude of the latter, and also the help sent by the Peshwa's agent to Manaji as requested by hir*

No. 454] [*20-6-1737*

श्री

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी-
अलंकृत राजमान्य राजश्री बाजीराऊ
पंडित प्रधान गोसावी यांसी

प्रीतिपूर्वक लक्ष्मीबाई विनंती उपरी. येथील कुशळ जाणून स्वकीय कुशल लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय साद्यंत कळोन समाधान जाहालें. याच न्याये सर्वदा आपणाकडील संतोषाचे वृत्त लेहून संतोष पावीत गेले पाहिजे. यानंतर किले सरसगडचे तनखेयांचा तपसील व राजकी कितेक विचार शामल निर्बंध जाहल्याचा भावार्थ चिरंजीव राजश्री मानाजी आंगरे यांचे (पत्रीं) आला तो समग्र अवगत जाहला. सारांष शामलाचे प्रा (फाटले आहे) लेच केल्या मनसुबियासं माघारे येऊन (फाटलें) सुटला. होणेरास उपाय नाही. पुढें श्री ईछेने योजिला मनसुबा सिधीस जाणे ते काली जाईल. सरसगडचे तनखियाचा विस्तार आपण लिहिला तरी उभयपक्षी द्वइतार्थ आहे येसें नाहीं. सर्व मामला येकच आहे. याजप्रमाणे पूर्वोत्तर चालत आले आहे त्याची अभिवृधि करावी. दुसरा विचार नाही. वरकड सविस्तर वृत चिरंजीव राजश्री मानाजी आंगरे याचे पत्री लिहिविले आहे त्याजवरून अवगत होईल. नारायण हरकारा याजवल कितेक घरोबियाच्या गोष्टी

आपण बोलिले. त्याणे येऊन निवेदन केल्यावरून कळल्या. तरी यांत अपूर्व काय आहे? उभयपक्षी द्वैता (फाटले आहे) येसे आजिवरी चालिलेच नाही. चिरंजीव बाबा[१] (फाटले आहे) बुधीची प्रागल्भता जाहल्यावरी तेहि आपले भाऊ आहेत चुकतात येसे नाही. आपले ठायी वडीलपण आहे त्यांजपासून अंतर पडिले तथापि आपण सांभाळावे उचित असे. आम्हीहि त्यांस जे लिहिणे ते लेहून पाठविलेच आहे. आपण सातारा जाणार. गेलियावरी तेथील राजकी वृतांत व स्वकु(श)ल वृत लेहून पाठविले पाहिजे. बहुत काय लिहिणे. लोभ असो दीजे. रा छ ३ रबिलोवल. हे विनंती.

¶ *Laxmibai assures the Peshwa of her full co-operation in settling the revenues of Sarasgad.*

No. 455] [*5-10-1737*

छ ३ साबान

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी.

आज्ञाधारक सुभानजी माणकर मो किले तलागड चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत विनंती ताा छ २२ रजबपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेकरून प्रांत मजकूरचें व आज्ञाधारकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. हुजूरून जिवाजी राम अमीन श्रीवर्धनचे आगराची पाहाणी करावयासी आले होते, त्यास श्रीवर्धनास दुखणे लागलें म्हणोन तेथून तल्यास उचलून आणिले. वेथा भारी होती. त्यास आस्विनवद्य अस्टमी बुधवारीं देवआज्ञा जाली. याची वस्तभाव मल्हारजी जाधव दिा नारसांवत खुद मानिले बराबर होता या बराबर पाठविली असे. याची याददास्त आलाहिदी पाठविली असे व त्याजवल हजीरींचे कागद व सन समानचा हिसाब होता तोही मलारजीबराबर पाठविला असे. शेवेसी श्रुत होय विशेष. जिवाजी राम आजारी तल्यास आला, तेव्हां खावया खर्चावयासी नाही म्हणोन खर्चास रुपये च्यार व मृत्य पावला तेव्हां कफनास येक रुपया येकून पांच रुपये दिले असत. शेवेसी श्रुत होये. मलारजी जाधव दिा नारसावंत पाहाणीचे कामावर होता यास येथे रोजमुरा पावला नाहीं, तेथें देविला पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Subhanji Mankar informs Chimaji Appa of the death of Jivaji Ram who had been deputed for the inspection of the gardens at Shrivardhan.*

---

१ संभाजी आंगरे.

No. 456] **[6-12-1737**

छ ९ रमजान

जाबसुद छ ९ रमजान

श्री

सेवेसी विज्ञापना ताा छ २४ साबा(न)पर्यंत स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राा संभाजी आंगरे याजकडील वर्तमान. आणाजी साटम याचा भाऊ कान्होजी साटम हे विजयेदुर्गी कैदेत होते त्यानी किल्यावर फितवा केला. बावाजी लांझेकर खिजमतगार व इटेकरी ४ व आणखी कितेक चालीसपनास माणूस फितावि्ले. या खेरीज खेमोजी राणे यांसहि बोलाऊन आणून त्यास कितेक फितव्याच्या गोष्टी सांगोन फितव्यामध्ये आपल्या मतांत मेलविले. त्यास ते समई त्याणे भिडेस्तव आवघ्या गोष्टी त्याच्याच गोष्टीप्रमाणे सांगोन कबूल केले आणि राा संभाजी आंगरे याजपासी जाऊन सावंत वर्तमान जे जाहाले होते ते त्यांस श्रुत केले. नावनिसीवार सविस्तर सांगितले. त्याजवर कान्होजी साटम यासी बोलाऊन आणून पाहारा तापऊन आंगास लाऊन पुरसीस केलियावर जे जे लोक फितव्यामध्यें होते त्यां त्यांची नांवें सांगितलीं. मुडे गडकरी दाहापाच माणूस कैदेत होते त्यांची व बावाजी लांझेकर व इटेकरी व दाउदखानाचा लेक इसमालखान वगैरे चालीस पनास माणूस यांची नांवें घेतली. त्यापैकी बावाजी लाझेकर याचे व कान्होजी साटम या उभयेतांचा सिरछेद केला व इसमालखान तो आरमारावर गेला. जे किलियावर होते त्यास कैदेत ठेविले. आणखीहि कितेक लोक आरमारावर गेले आहेत ते आलियावरी काये होईल ते नकले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The letter purports to give an account of a secret plot made by Kanhoji Satam imprisoned at Vijayadurga to seduce the garrison. The scheme failed and the persons concerned were visited with severe punishment.*

No. 457] **[1737?**

श्री

पुरवणी राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंति उपरि. राजश्री संभाजी आंगरे यांचीं पत्रें फिरंगी व हबसी यांस पाठविलीं, त्यांत मजकूर कुलाबा पूर्ववतप्रमाणे करावा व वरकडही गड किलियास पत्रें पाठविलीं कीं आपण त्या प्रांतें लौकरीच येतों. तुम्ही विचारें असणें व फिरंगीयास

रेवदंडीयाजवळील मसीद द्यावी यैसा मजकूर लिहिला. तीच पत्रें बजिनस राजश्री मानाजी आंगरे यास सांपडलीं, त्यावरून मानाजी आंगरे याणी तीनसें माणूस चेऊलचे राजकोटास पाठविलें व मसीदीस सेंभर माणूस पाठऊन मसीद वसविली. वरकड किलोकिला खबरदारी करणें ते केली आहे, यैसें वर्तमान पेणेकडून लिहिले आलें. स्वामीस कळावें याकारितां लिहिलें असे. आम्हीहि सत्वरच येऊन. बहुत काय लिहिणे लोभ करित गेलें पाहिजे हे विनंति.

¶*Vasudeo Joshi informs the Peshwa that secret letters from Sambhaji Angria to the Portuguese and the Sidi have been intercepted by Manaji who has consequently strengthened his forts.*

No. 458] *[1737?*

श्री

राजेश्री आपा गोसावी यांसी.

॥ सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री देवजी सोमवंशी हिंदुराऊ कृतानेक दंडवत. विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करावयासी आज्ञा निरोपित असिले पाहिजे विशेष. प्रस्तुत आपणाकडून पत्र आगमन होऊन परामृश होत नाहीं. तेणेकरून चित्त साक्षेपात आहे तर आपणाकडील साकल्य कुशल वृत लेखन करून आमचा परामर्ष करीत असिले पाहिजे. त्याजवरून समाधान होईल. राजश्री आनंदराऊ पंडित सुमंत याजकडून पत्रे लाखोटे २ गोसावीयासी आले ते पाठविले आहेत. प्रविष्ट होतील. प्रतिउत्तरे पाठविली पाहिजेत. सरलस्कराकडील वर्तमान तो वरचेवर गोसावीयासी कलतच आहे. गतवर्षी सरसाल[१] गोलकोटची मसलती जाली. येंदा कर्जवाम करून फौज ठेऊन रवानगी केली तो मागती राजश्रीनी फिराऊन चव्हाणाकडे पाठविले. फौज च्यार पांच हजार पोटास न मिळे यास्तव तीन च्यार हजार फौज फुटोन आली. हजार स्वारानसी राहिले आहेत. पोटाची बेगमी राजश्री स्वामी तो करीत नाहींत. आमचे पदरी आहे नाहीं हे कळलेच आहे. माहाल मुलकी विचार त्या प्रकारचा. राहिले फौजेनसी सरलस्कराचा टिकाव तेथे होता दिसत नाहीं. आपण वडील आहेत, आपणास कळावे यास्तव लिहिले असे. दाटून हुकमाची फौज पेचात घालून फौजेचा कारभार विस्कळीत केला. याउपरी आमचा उपाय नाहीं. तुम्ही वडीलपणें जे पैरवी कर्तव्य ते करून आज्ञा करावी. तेणेप्रमाणें वर्तणूक केली जाईल. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती+

¶*Deoji Somvanshi to Chimaji Appa complaining about shortage of funds and requesting him to send more.*

---

१ वर्षभर +देवजी सोमवंशी सरलष्कर याचें पत्र चिमाजीआपास.

No. 459] [5-6-1738 ?

श्री

राजश्री दिनकरपंत दाजी

स्वामी गोसावी यांसी

६ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य. श्नो मोराजी सिंदे नामजाद जंजिरे रेवदंडा रामराम विनंती येथील कुशल जाणून स्वामीनी आपणाकडील कुशल लिहित असिले पाहिजे विशेष. पूर्वी हुजुरून आज्ञापत्र सादर जाले होते तेथें आज्ञा कीं राजश्री मानाजी आंगरे मसिदीसंन्निध नव बुरूज बांधीत आहेत. त्याचे पारपात्य तुमच्याने होऊन येईल किंवा हुजूरून मदत पाठऊन करावे लागेल. त्याचे उत्तर पाठविले होते की सेवकाचे गवेस आली याजवर कार्य करावयासी चुकत नाहीं. त्यास प्रस्तुत तेथील भेदाचा विचार उत्तम प्रकारे हस्तगत जाला आहे. त्याजमधे लढा किमपि नाहीं म्हणून येविसीचे सविस्तर वर्तमान हुजूर लिहिले असे. त्याजवरून आपणास कलो येईलच. परंतु सूचनार्थ लिहिले असे. तरी आपण हुजूर खामखा अर्ज करून कार्य कर्तव्याची आज्ञा होऊन येई ते केले पाहिजे. इतके ल्याहावयासी कारण की आमचा मनोदय की येकवेल स्वामीसेवा करून दाखवावी याजकरितां येकदोन मनसबे केले होते. परंतु हुजूरून परिणामास गेले नाहीं. त्याचे सविस्तर आपणांस विदितच आहे. याजकरिता हलीं कार्य उपस्थित जाहाले आहे हे सिधीस पावे ते केले पाहिजे. सारांश सर्व भरंवसा आपला आहे. सर्व प्रकारें आमचे साह्य आपण करतीलच हा भरंवसा आहे. परंतु सूचनार्थ लिहिले असे. रा छ २७ माहे सफर बहुत काये लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनंती. या पत्राचे उत्तर सत्वर येई तो अर्थ केला पा। मार्ग लक्षीत असो. रा छ मा।र बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Moraji Sindia asks Dinkarpant to prevent Manaji Angria from erecting a new rampart at Revdanda.*

No. 460] [10-6-1738

श्रीराम

राजश्री पंत प्रधान

स्वामी गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो मानाजी आंगरे कृतानेक रामराम विनंति. उपरि येथील कुशल जाणून स्वानंद लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. नारायण * याजबराबरील पत्रोत्तराचें उत्तर छ १० माहे

सफरचें पाठविलें तें छ १९ मिनहूस प्रविष्ट जाहालें. शामलाने रयतेवरी खंडणीचा दबाव घालून उपद्रव आरंभितो, यास्तव आपणच रयेतेची अनास्था करून प्रांत उद्वस करावयाचा अर्थ व गड किले यांचे बेगमीस घाटावरून सामान पाठऊन रखवालीस जागजागां स्वारीया फिरत्या ठेऊन खांदेरीची गीर्दनवाई करावयाचा विचार व शामलाचे धड जंजिरा, व अंजनवेळी व उंदेरी हे दोन्ही हस्त अस * * ले शामल राहोन त्याची उपजीविका मुलकावरते कुंठित[१] करून जखिरीयावरी ठेऊन नौका मार्गे उदरपूर्तीचा आटोप धरिल्यास इकडील आरमाराचा शह जाहाल्यानें तहाचा मजकूर सहजच करील म्हणोन व अंजनवेली गोवलकोटचा परिवास मातबर कोणी नाहीं यास्तव पर्जन्याचे दिवस म्हणोन गैछ संपादिल्याचा भावार्थ व तुम्ही अथवा आपण शामलाचा डर धरित नाहीं त्याचा मुदा न * * * मित्री (?) बारा पंधरा महिने * * प्राप्त जाहाल्याचा तपशील व किले सरसगडचे बेत्रिस गांव व कसबा व रांया[२] मिरे डोंगर देखील अमलाविशीं राजश्री होनाजी बलकवडे याणी वसघस आरंभिल्यास्तव त्यांस मार्कुलपणे[३] आज्ञा करून गर्गशा परस्पर अमलदारांत न वाढे यैसे करावयाचा पर्याये येथून लिहिल्याचा जाब कांहीं धण्याचे लग धरून व कांहीं शूरत्वाचा अर्थ दर्शऊन हवेली पाली व वीस गांव व आंतोणे तर्फेचे तीन गांव व आसेर तर्फेचे गांव दबाऊन खाता हा विहित विचार करित नाहीं, व सुधागडकरी सरसगडचे तनख्यास्तव खार्बार[४] जाहाल्याचा वृत्तांत व हालीं जमीदारास ताकीद करून व कारकून येक यैसे पुण्यास पाठऊन तहकीकास करून पुन्हां कथला न वाढे यैसें करून व वडिल वडिलांपासून घरोबा अकृत्रिम चालत आला तदनरूप चालावें व उध्धत अर्थ पत्रारूढ न करावयाचा बुधिवाद व प्रथम राजश्री होनाजी बालकवडे * * गड व माहालकरांचा शाकारास्तव गर्गशा * * वरून मशारनिले याणी स्वामी * * वरून छ १ सफरचें पत्र लेहून मशारनिलेकडेस पाठविलें तें त्याणी पाठविलें. छ १ माहे रबिलावलीं प्रविष्ट होऊन लेखनार्थ नागोठणें अष्टमीं तप्यात शाकार व राबते माहार सुदामद नस्तां नवीच कानू व मिरे डोंगरचे राईची पाहाणी चालों न दिल्ह्याचा मजकूर व कुलाबाहून सरसगडाकडे जातां नागोठणे यापासून वेठे धरून झोलणे डोईवरून देऊन नेतात त्यांचे बंदेजाचा अन्वय व दरम्यान अमलदार अविचारें वर्ततात ते न वर्तों द्यावे व प्रस्तुत तुमचे सरदारीचा बंद कसा आहे तो तुमचें चित्त तुम्हांस साक्ष देतच असेल व यास साक्ष तीर्थरूपांचे (वे)ळेचा द्रष्टांत आज्ञापिला व चाकर लोक

---

१ पळून जाणे. २ राई.

३ शहाणपणें, समजुतीनें. ४ खराब, हलके.

व रयेत बिरवाडी मांडले अष्टमी येथील चेऊल प्रांतें व पालीकडेस गली त्यांजकडेस बाकीच्या वसुलास होनाजी बलकवडे यांचे वरातदार गेले ते उठऊन दिल्ह्याचा आरोप व तुमचे चित्तांत व तुमचे लोकांचे चित्तांत जबरदस्तीने जे जे करूं ते होईल याचा परिणाम घरचे घरींच पाहावयाची अनुचित गोष्टी, यैसे कितेक संदर्भ हिताहित कृपोत्तरें गौरऊन बुधिवादास्पद आज्ञापिले, तत्श्रवणें बहुत कांहीं समाधन वाटोन स्वामीनी आज्ञापिल्या अमृतोत्तरांचें उत्तर लेंकुरपणें अज्ञानत्वें संकलितार्थें हांसील कलम पत्रारूढ करितों तें स्वामीनी सदय होऊन श्रवण करावया हेतु ऐसाजे :—

तीर्थरूपांचे बंदेजाचा पाया घातला आहे तो यथार्थच. त्यांणी बंदेजा * * * त्याच मार्गानें राहाटी करीजेत्ये. तो मार्ग संस्थानवृधीचा आहे. शामलाचे उपद्रवास्तव प्रजेचे अनास्थेचा विचार चित्तांत आणिजेला तो वस्तुता पाहातां प्रजेचें दुराद्रष्ट योगांस उचित असोन न घडिला तरी भाव्र अर्थ प्राप्त कसा होईल? शामलाचें निर्मूल न जाहालें हें खरेंच. मुलकांतील उपजीविका प्रजेमुळें दूर होईल यास संशय नाहीं. जखिरा[१] कितिक दिवस खाऊन काल हरण करील? तारू तरांडेयावरून उदरपोषणाचा हेतु धरिल त्यास आमच्या आरमाराचा शह आपण योजिला तो अन्यथा नाहीं. ये गोष्टीस आपण वक्रद्रष्टीनें पाहोन खुशकीनें शह दिल्यास इकडून सर्वयैव अंतर न पडे. कुबेरन्यां धनाढ्य म्हणावा तरी कुबेराचा द्रष्टांत मात्र द्यावा इतकाच. अंजनवेलीचा परिघ पर्जन्यास्तव मातबर सरदार नाहीं याबद्दल येकास येक न धरितां गेले हेंच खरें. परंतु दरबारी जातांच वक्रता होऊन माघारे लाऊन देऊन घांटाखाले येऊन दलवटणेयास राहिले आहेत यैसें आईकजेते. पुढे शामलाचे होशेमाणानरूप काय होईल तें पाहावें! उभयपक्षीं शामलाचा डर धरित नाहीं म्हणोन तरी यास संदेह काय? आपण व तीर्थस्वरूप राजश्री संभाजीबावा यैसे येकचित्तें येकमतें वडिलोपार्जित श्नेहाचा दढाव होऊन अकृत्रिम ममता सिंधु चालत आहे कीं * * तदधिक जाहल्यास शामल प्रमुख * * * शत्रू असतील ते पादाक्रांत होतील * * शामलाचा गुमान काय आहे? सरसगडचा तनख्यास कांहीं धण्याचा लगव, कांहीं शूरत्वाचा अर्थ दर्शऊन खाऊन सुधागडकरी स्वार जा * * करणे तरी सरसगड यैवजाखालें होता. यवन हिंदुधर्माचा द्वेष्टा तो भगीरथप्रेत्न करून * * स्थळ स्वराज्याधीन करून राजश्री स्वामीचा प्रतापध्वज स्थलावरी वर्तऊन हिंदुधर्म चालवावा याअन्वयें तीर्थरूपानीं बहुत काल यत्नांत असोन स्थल हस्तगत केलें. राजश्री स्वामीचे शासनाक्रांत होऊन तनखा नेमून दिल्हा,

१ शिलकी सामान. २ भवितव्य.

5569

त्याप्रमाणें चालऊन यवन मुकलांत दस्तुरी म्हणून बाब घेत होता तोही अमल चालवावा यैसे तीर्थस्वरूप राजश्री सेखोजी बावा याणी चित्तांत आणिलें असतां भोरपेहून राजश्री रावो सदासिव सबनिवीस येऊन बोली करून राया मिरे डोंगर देखील पूर्ववत कसबेयाकडे करार करून तहनामा करून दिल्हा. तेव्हां मशारनिले याणी दस्तुरीची बोली घातल्यावरून प्रजेवरी व भोरप राज्यांतील जागा भले लोक दरम्यांन पडिले त्याजवरी द्रष्टि देऊन दस्तुरी बाब दूर केली. असें असोन भोरपकर सरसगडामुलें ख्वार जाहालों म्हणतात हेंच अपूर्व मानावें. थोरले महाराज कैलावासी स्वामीयांचे वेलेस सरसगड (यव)नाक्रांत असतां तनखा चालत होता तोही आपणांस अविदित असेल यैसें नसेल. सांप्रत माहाराजानी तनखा तेविस चोविस गांव नेमून दिल्हे तेवढेयावरी त्या स्थलाची पुस्तवानी होईल नव्हे हेंही स्वामीस अविदित आहे यैसे नाहीं. या प्रकारें धण्याचा लग आहे. शूरत्वाचा भावार्थ तरी आजिवरी सरसगडचा अमल शूरत्वें * * वा कसा जाहाला याचा तपशिल म्यां काय ल्याहावा? वडिलांचे वेलेचा अमल चालत आला त्या प्रमाणें चालवावा इतकेच जाणतो. शामलाकडील अमलदार इकडून घालविल्यावरी त्याणी अष्टमीचा अमलदार इकडील घालविल्याचा वृत्तांत तरी उदमी याणी जकात सरकारचे अमलदारास दखल न केली. सबब धकाबुकी वाणी बकालास अमलदाराने केली यैसें निमित्य ठेऊन अमलदार उठविला. सारांश शामलाचे वेलेस त्याचा अमल चालिला नाहीं. ह्याणेंही जोरावारी केली नाहीं. जोरावारीच केल्यास अवघाच तहाचा बखेडा पडणार या विचारें त्याणी ढालढकल करून होता. येथून लिहिलें गेलेयास देऊं दिलाऊं करित असतां पुढें घडोन यावें तों दैवगतीनें तोच वारला! भगवदिछेनें त्याचा अवघाच अमल श्वराज्याधित आपले कर्तुत्वानरूप जाहाला. तो अमल जिकडील तिकडेस सुरलित चालावा म्हणून तरी राजपुरीवरी स्वामीची मोहीम होतांच तीर्थस्वरूप राजश्री दाजीनी सेवकास जमावानसीं आपणासंनिध रवाना केले. पश्चात आपणही गेले. त्यांचा आपला मुकाबलाहि उत्तमच होऊन आला. परंतु ईश्वराने राजपुरीस श्रम केल्याचें कोणतें सार्थक गड किले किंवा मुल्लक यथाविभागें प्राप्त जाहाला! राजकोट थलची चौबुर्जी रेवसेची गढी घेऊन निमेचा अमल सुटला म्हणीजेल तरी हा श्रम श्वता त्याणी करून मेलऊन सेवट याच * * यामुलें जिवानसी गेले. म्या स्वामीजवल शंभर माणसांनसी सेवा केली, त्याचें रूप काय होऊन आलें तें स्वामीस विदित आहे. तेथील श्रमाप्रमाणें कांहीतऱ्ही विभाग यावा तो न येतां पालीचे तनख्यापैकीं शामलाचा निमेचा अमल नस्तां होनाजी बालकवडे निमें अमल करूं म्हणतात, अतेव

5570

राजपुरीचा श्रमाचा रुसवा स्वामीजवल आमचा तसाच राहोन मागील मेलविला अमलास भ्रांत पडते हे गोष्टी उचितानुचित आपल्या चित्तांत येऊन गेलीच असेल. हालीं जमीदार व कारकून पाठवावयाची आज्ञा तरी जमीदार आज्ञेप्रमाणें येतील. कारकुनानें जाऊन काय करणें आहे. जसें स्वामी सांगतील तसेंच आइकोन जसें तीर्थस्वरूप राजश्री दाजी वर्डील तसेच आपण वडिल आहेत. कलेल तसे करावें. म्या सेवक जाजती आपण करून दिल्हे तरी घेऊन कमी जाहाले, यास आपणांस विदित करावें. तसें राजश्री दाजी यांस विदित करावें. ते व आपण काय समजणें ते समजतील. उध्दत अर्थ पत्रारूढ न करावयाचा रुणानुबंध पूर्वील आज्ञापिला, तरी पूर्ववत रुणानुबंधाप्रमाणें चालावें ह्याच विहित * * लेकुरपणासही उचित जाणोन लीनपणें * * करितों. राजश्री होनाजी बलकवडे याणी सिपायांवरी टोणपेबाजी करावयास लोक पाठविले. वरातदार वालविल्याचें वृत्त कलल्यावरून आदरास प्र * * * आदर करावा यैसें मशारनिलेचें कर्तुत्व असोन, न केलें यैसे पत्रीं लिहिले असेल. तथापि स्वामी * * बुविवाद आज्ञापिला तो सिरसा आहे * * गडकरी व संभाजी नारायण यांचा व होनाजी बलकवडे यांचा शाकाराबद्दल गर्गशा होऊन मशारनिले याणी लिहिल्यावरूनच शाकाराची व राबते माहाराची नवी कानू करिता म्हणून, तरी नवी कानू काशास करिजेल किलाचा शाकार किला घेतल्यापासून घेत आल्याचा तपसील पेशजी नारायण हरकारा यांजबराबर लेहून गेलाच आहे. राबते माहाराचें प्रयोजन नाहीं. महाल्करानी दरम्यान आणविले असले तरी हलीं ताकीद केली असे. सिवेश्वरास चौकीस विठल माहादेव अमलदार राहणार त्यास तो गांव पेशजी घेन्याखालें होता, तदुत्तर भोपरकरानी मागोन घेतल्यावरी त्याजकडेस दिल्हा. किला मुतर्सील गांवीं चौकी जाहाल्यास परकी माणसाचा राबिता होतो, यास्तव मौजे मजकुरी चौकी न बांधणे म्हणोन विठल माहादेव यास पत्र लेहून संभाजी नारायण याकडे पाठविले. त्याणी किलाचे सिपायाजवल देऊन पाठविले. सिपाई यानी बेवकुफी करून बोली पाडून जोरावरीनें ज म्हटलें असेल. विठल माहादेव याचे कागदाची नकल पाहिली. त्या अगोधर होनाजी बलकवडे याणीही पाठविली त्यावरून संभाजी नारायण यास फजित करून लेहून पाठविलेंच आहे. फिरोन यैसी वावगी बि * * जाहाल्यास त्याचा उबार राहून पावेतो * * * रा अमलदा ठेऊन. मिरे डोंगरचे राईचे पाहाणीचा प्रसंग तरी राया कसबे याकडे चालत होताच, या विचारें पाहाणी करूं न दिल्ही. त्याणी पा * * धरून नेऊन तीस रुपये घेतले, त्याजविशीं पूर्वी लिहिलेंच आहे. देविले पाहिजेत

शा * * * लेस तीन वर्षे राया खराब पडल्या आहेत णि भंडारी धरून नेऊन जिमेचा वसूल घेतला ऐसें आपण लिहिलें तरी भंडारी त्याणी नेला होता खराच; परंतु रुपये घेतले नाहीं. इकडून मोबदला केला, त्यावरून शामलानें भंडारी सोडून दिल्हा. कुलाबाहून सिपाई पालीस जाता नागोठणे यापासून वेठे धरून झोलणें त्याचे डोईवरी देऊन नेतात त्याचा बंदज करावा यांत अपूर्व काय? प्रजेस वावगा उपद्रव जाहाल्यानें कोणाच्या सुखानें राहावें? मुलकांत ताकीद आहे. मुद्रेचा रोखा पाहून वेठ्या घ्यावा, रोखा नसतां कोणी जोरावारीनें वेठ्या घेतला तरी त्याचें नांव ठिकाणी पाहून बोभाट घेऊन यावें, त्याचें पारपत्य करावें. मुद्रेचाही रोखा वावगा होतच नाहीं. असें असोन बोभाट आपणासनिध गेला तरी फिरोन ताकीद करविलीच आहे. मांडलतपा व बिरवाडतपा व अष्टमी येथील रयेत व चाकरमाने लोक बाकी घेऊन चेऊल प्रांतात व पालीकडे गेले आहेत, त्यांजकडील बाकीचा प्रसंग तरी शामलाकडील रयेत अगर चाकर लोक इकडे आले तरी त्याणी बाकी न घ्यावी, इकडून तिकडे गेले तरी बाकीची चर्चा * * * प्रमाणें तह चालत आला असतां नवीनच सिरिस्ता होतो, याबद्दल होनाजी बलकवडे यास लेहून वसूल तकूब करविला. बाकी घेऊन प्रजा या प्रांतास यावयाचें कारण जे मोहिमेचे समई सर्व जाऊन प्राण वाचऊन येक राज्य इच्छित असतां योगाची सामग्री विशेष त्या योगेकरून * * रवी संजीवन होऊन देशत्याग घडोन निरोपद्रव छायेस येऊन राहिले. येकवेल भोजन तरी येक वेल उपोषण, या रीतीनें कंठीं प्राण आणून जीव मात्र वांचऊन आहेत. कांहीं रयेत पेशजींच आपले पत्रावरून त्या प्रांते गेलीच आहे. जे राहिली त्यांस कर्जवाम सरकारांतून देऊन ठेविले आहेत. त्यास बाकीचा तगादा जाहाल्यास त्यांचें प्राणू कसे वांचतात हें येक आणि बाकीसही बेमोईन ऐसे च्यारी अर्थ चित्तांत आणून मशारनिलेस लिहिलें होतें. त्याणी आपणांस लिहिलें त्याचा विचार ये जातीचा आहे. हक्क हिसेब म्हटला तरी त्यास प्राप्त प्रसंगानुरूप बेहत्तर जुलूम होणार तरी स्वामी समर्थ. किरकोळ बाकीचा विशय काये आहे! गरिबावरी द्रष्टी देऊन बाकीपासून मुक्त होऊन जीव धरू द्यावा. आमच्या मनांत व आमच्या लोकांच्या मनांत जबरदस्तीनें करूं तें होईल, याचा परिणाम घरचेघरींच पाहावा. अनुचित म्हणून तरी होती. विचारीचीच वाट स्वामीनी आज्ञापिली, वडिलांचा व स्वामीचा रुणानुबंध भाऊपणा चालत असतां अकल्पनीय * * * कसी घडों पाहाते. लोकांचा विचार तरी येखादा लहान माणसापासून लबाडीची वर्तणूक जाहाली असिली तरी तो आचरणानरूप फळ पावेल. चाकर लोकांचें

राईलें अनेकवचन = groves.

व सेवकाचें येकचित करावें येसें असतां स्वामीनी काशावरून चित्तांत * * ईश्वरोवेत्य बलकुवलीस बिरवाडकरा * * पतक करावा म्हणून तरी ये गोष्टीस सर्वथा न चुकों. सध्या स्वारी खाडी आलीकडे ठेविलीच आहे. येखादी आवाई जाहाली तरी तेच क्षणी लोक जाऊन पावतील. लक्ष्या गोष्टीची येकच गोष्ट कीं नेणतेपणाचा प्रसंग आहे. भलते गोष्टीनें बुधिवाद विचार आचार आज्ञापित जावा. राजश्री दाजी दूर राहिले. आपण संनिध आहेत. सर्व मामला येकच आहे. वडिलपणही आपणांकडेस आहे. न्यून पूर्ण करावें, द्वैतार्थ चित्तांत नाणावा. आपण म्हणतील कीं हे आम्हास लिहिता आणि तुम्ही आपल्या हितास जपता तरी नवे जपत नाहीं. किंबहुना जुन्या अमलास तऱ्हा घ्यावी तरी म्या स्वतसिध खावंद नाही. मजला वडिल आहेत. आपण स्वतसिध खावंद आणि वडिल आहेत. या अर्थें अवघेंच विचार स्वामीस अनकूल आहेत. वरकड राजश्री रामजी मल्हार याचे कुलकर्णपणाविशीं आज्ञा तरी चेऊल प्रांती * * * स निमे मुशारा पावला. निमे * * विशीं विजयदुर्गी लेहून पाठविलें होतें, तेथून आज्ञा जे गुदस्ताचा वसूल करणें. पेस्तर कुलाबा स्वारी जाहाल्यावरी जे आज्ञा करणे ते केली जाईल म्हणून त्यावरून * * सर्वाप्रमाणें सहजेंच घ्यावा * * पुढें स्वारी जाहालीयावरी विनंति करून दुतर्फा मुशारा चालवावयाचा हुकूम घेऊन.+ अंतर पडणार नाहीं. विदित जाहालें पाहिजे. कृपा वर्धमान केली पाहिजे. रवाना छ ३ माहे रबिलावल हे विनंति.

¶*This is a long explanation offered by Manaji Angria to the Peshwa in reply to the various charges and admonitions administered by the latter to the writer. The paper contains an elaborate refutation by Manaji of all the charges brought against him by the Peshwa.*

No. 461] [*9-8-1737 or 1738*

श्रीराम

अजम अकरम बाजीराउ पंडीत प्रधान

दामदौलतहू

॥ ७ * * सी मुर्द सिफारत व मयालत मर्तबत मनजीव ज्याखान वालाशान रफिउल कदर बुलबुलद मकान मेहेरबान ईतबाद आजी दिल येखलास कपीतान ज्यानीस ईचबर्ड किलेदार किले सिदगड तर्फ जंजिरे मुबै सलाम बजद सलाम महवल मारुजउमीं येथील खैरे खुसी जाणोन पंडीत आजम यांही खुद खुसी हमेशा कलमे ईशारा फर्मावित आसिलें पाहिजे. दिगर छद्र

+ कुशल.

पैकी कितांबती महब्बतेनामाची येऊन पोहोचली. हकीकत जाहिर जाली कीं महबतपन्हां हिंदुस्तानातून खुशाहाल घरी आले. ते हकीकतई जानबी दिली. मालूम होऊन खुशवख्तता जगी जाहली. तर खुला येताम हेच वजीने बला करीत दोस्तास ताजगी दिली पाहिजे. तेण्हेकरोन खुशवख्त हासील होईल. आमा मोहबतनामा हरवख्त कलमी करीता कोताई केली न पाहिजे. धरून लिहिणे न लगे. प्यार मोहबत राखोन कारणे की फर्मावणे. रा छ २३ रबिलाखर हे किताबती. (Sd) J. I.

¶*Captain Inchbird sends in his congratulations to Bajirao on his grand success and safe return from the North.*

No. 462] *[1738?*

श्री

सेवेसी विज्ञापना बाबू सावंत मराठा वाणी मुंबईत कबिला सुधां राहतो, त्याचा लेक गोव्यास फिरंगीयाकडेस चाकर आहे, त्यास •सुबेदार म्हणतात शंभर लोक याचे ताबीन आहेत तो छ ४ माहे जिल्हेजी गोव्याहून आपल्या घरास मुंबईस रजा घेऊन दोन महिने राहावयास आला आहे, त्याणें तिकडील वर्तमान सांगितलें जे, फिरंगी याची थोर तरांडी अकरा व लहान पंनास ऐसी सामान सरंजाम देखील पाणी भरून बंदरात तयार जाहली आहेत. या सिवाय फरासीसाची तरांडी च्यार आहेत. रेणोल आठ हजार व मराठे पागडीबाले लोक च्यार हजार यकूण बारा हजार हशम आज गोव्यांत तयार आहेत. या खेरीज बंदरबंदास येथून च्यार तरांडी व तीन हजार जमाव येणार आहे, त्याची वाट पाहत आहेत. ती तरांडी व जमाव येऊन पोहचला म्हणजे खुद विजुरै यांहीच स्वारीस बाहीर निघावें ऐसी बोली आहे. कोण्हीकडे स्वारी होईल आणि काय मनसुब करतील हे कळत नाहीं; परंतु याप्रमाणे वर्तमान आहे ऐसे शहरांत पुसतात त्याजवळ सांगतो. आईकले वर्तमान सेवेसी विदित व्हावें याजकरितां लिा असे. विदित होणे हे विज्ञापना.

¶*Hearsay news from Goa that the Portuguese are making fresh preparations to march northward and that the Viceroy himself is going to take the command, is reported to the Peshwa from Bombay.*

---

१ लेख; पत्र. २ उत्साह.

No. 463] [6-3-1739?

पो छ १२ जिल्हेज.

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक सुभानजा माणकर मुकाम तलागड साष्टांग दंडवत विज्ञापना तागायत फालगुण सुध्ध अष्टमी बुधवारपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान यथास्थित असे विसेष. स्वामीचें आज्ञापत्र आलें तेथें आज्ञा की पांच साहासें माणूस निवडून घेऊन चोरीनें कोरलाचें कार्य करणें, वाजंट[1] न करणें. त्या आज्ञेवरून जाऊन तें कार्य करितों विसेष. आम्ही चोरीचा विच्यार केल होता व लागेभाग्येही हाताखालें घालून युक्तीनें खामखाई करावें हाच निश्चे आहे. त्यास साप्रत सर्वांठाई शह बसले आहेत. यापुढें उरल्या स्थलास ते जाग खबरदार होऊन राहिले आहेत. लाग्ये हाताखालें घालून युक्त मांडिली होती त्यास बलकवडे याणी लाग्यांस मारहाण करून दाहा विस रुपये घेतले, त्यामुळे त्यांचें मन बेदिल झालें हेहि वर्तमान सेवेसी कलावें म्हणून लिहिलें असे. आम्ह लाग्याचेहि समाधान करून स्वामीनी लिहिलें त्याप्रमाणेंच कार्यावरी जाऊन कार करितों. परंतु कदाचित चोरीचें साधेनासें जालें तरी शह देऊन बसतो. स्वाम म्हणतील कीं शह देऊन बेसलेस हें काय, तर इकडील वर्तमान हबसी व राजश्र याजकडे फिरंगी याचा पेगाम आहे व संभाजी आंग्रे कुलाबेयासही शह घावयास येणार. जर ह्या स्थलासी त्यांचा शह बसला म्हणजे या प्रातास मोर्चा बसते याजकरितां आपणाकडील शह बसला म्हणजे दुसरेयाच्याने येकबेक येऊन दग करवणार नाहीं. याजकरितां शह देऊन बसावें लागते. अम्हांजवळ पुंजी आहे त स्वामीस ठावकी आहे. याजकरितां स्वामीनी हजार माणूस व दारूगोळ यैसी पाठवावयास आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. जमाव जाला म्हणजे ह्या स्थलास व कुलाबेयासही कदाचित संभाजी आंगरे यांचा शह आलाच तर तेथेंही शह बसेल. कुमक स्वामीविगल दुसरीकडून होतें यैसे नाहीं. सविस्तर विदित व्हावें म्हणून लिहिलें असे. फौज व सरंजाम अति सत्वर पाठवावयासी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय कृपा वर्धमान केली पाहिजे हे विज्ञप्ति. फाल्गुण सुध नवमी गुरुवारी कार्यास गेलों हे विज्ञप्ति.

¶*Subhanji Mankar to Chimaji: assures him that he was going to capture the fort of Karlai by effecting a secret understanding.*

---

१ गाजावाजा न करतां

No. 464] [25-4-1739

छ २ सफर

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी.

आज्ञाधारक सुभानजी माणकर मो कोरला चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग दंडवंत विज्ञाप्ति. तागायत छ २७ मोहरम चैत्र वद्य चतुर्दसी बुधवारपर्यंत यथास्थित असे. यानंतर येथील वर्तमान व राजश्री मानाजी आंगरे याजकडील वर्तमान व मोर्चेबंदीचें वर्तमान साकल्य बावाजी खिजमतगार सेवेसी पाठविले आहेत. मुखवचनें सांगतां विदित होईल. तपसिले ल्याहावें तर स्वामीचे चित्तांत कार्य येईल हें नकले, याकरितां लिहिलें नाहीं. सारांस गोष्ट राजश्री मशारनिल्हेची बोली तेलगंडगीवर लोक आहेत ते उठवावे व कोरलेस सैचंतर बाजूनें मोर्चा न लावावा व आपले मदतीस राहून जें कार्य सांगोन तें करावें, हुकुमास चुकलेयासी पारिपत्य करीन. कोरला व रेवदंड जागे आपले आपण श्रीमंतास येकंदर देत नाहीं यामुळें कांहीं तरी होऊन सर्वस्वास उदक घातलें आहे येसी बोली साफ बोलतात. मांडलतपेयांत काज फर्मास घेतात व कोरलेचें कुलंबी व कोली येसे पलोन मांडलतपेयात राहिले होते व मोर्चे वेरलेस होते ते काल छ २६ मोहरमी जमा करून चेवलास नेले. या प्रकारचें वर्तमान आहे. सेवेसी निवेदन व्हावें याकरितां विनंति लिहिली आहे व बावाजी सांगता विदित होईल. आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. आज्ञेप्रमाणे वर्तणूक करून लोकास रोजमुरा आज तीन महिने पावला नाही; लोकानी गवगवा केला आहे. पर्जन्य समीप आला. लोकास वाहाण कांबले पाहिजेत; व लोकास सालमजकुरी कापड पावले नाहीं. राजपुरीकडील लोक से सवासे माणूस जदीद ठेविले त्यास काही पावले नाही. ते लोक रोज उठोन कमरा बांधोन जावयासी तयार होतात. निरोप द्यावा तर तेथे लोकाची भरती नाही; तर स्वामीनी कृपाळु होऊन येक भरमाहा द्यावयासी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Subhanji Mankar complains about Manaji Angria obstructing him in his expedition against Koralai.*

---

१ स्वतंत्र.

5576

No. 465] [1739 ?

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत *
प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी. आम्ही चिपुलणाहून निघोन आल्यावरी खेड तर्फेची वगैरा माहालींची रयत त्यांजवल कौल मागावयास गेली होती. त्यांस ते कौल देत नाही. मुलूक वोस घालावा, जो कोणी राहेल तो नागविला जाईल म्हणौन ताकीद करून निरोप दिल्हा. यामुळें मुलकाची स्थित राहातां दिसत नाही व त्यांजकडील स्वारी सिकारी आल्यास इकडून त्याचा प्रतिकार होईल त्यांची आमची कटकट वोढल व तुंडील विन्हेरे येथील सनदा राजश्री स्वामींजवलून त्यांही त्रेतल्या म्हणौन वर्तमान ऐकिजेतें. सारांश त्यांची विकृति जाहाली आहे त्याचीच वृधि होत जाईल. हें सविस्तर आपणास विदित व्हावें याकरितां लिहिलें आहे. बहुत काय लिहीणें. कृपा वर्धमान केली पाहिजे हे विनंती.

¶*Manaji Angria's threats of harassment of the ryots and their consequent terror are communicated to the Peshwa.*

No. 466] [1739

श्री

सेवेसी विनंति. तुमचा कौल आम्हीं मानावा व आमचा कौल तुम्ही मानावा याप्रमाणें राजश्री मानाजी आंगरे याजकडे दस्तायैवज गुंतो न द्यावा म्हणून पुरवणी लिहिली आहे. यास कारण काय तरी हे बंदरकांठचे लोक म्हणजे कैदखोर आहेत (येैसे नाहीं) यास्तव लिहिलें आहे. पूर्वी राजश्री सरखेल यांची व इंगरेज यांची तहाची बोली पडिली तेव्हां इंगरेजानीं बोली घातली कीं ज्या जाहाजावरी आपला कौल निशाण असेल त्यास तुम्हीं न धरावें. त्यास राजश्री सरखेल याणी त्यासी बोली केली, कीं तुमचा कौल ज्या जाहाजावरी असेल तो आम्ही मानावा. बात जाहलीयावरी तुम्ही जेथून सावकार त्याचे जाहाजावर तुम्ही कौल व निशाण द्याल तेव्हां आमचा अमल कौल कोठून चालणार? तुमचीं खुद जाहाजें असतील त्याजवरी तुमचा कौल व निशाण असेल तो पाहून जाऊं देऊं, वरकड जाऊं देणार नाहीं, इतकीच आड पडली. याकरितां हा कालपर्यंत आजी पंचाविस वरसें बिघाड चालतो. कदाचित स्वामी म्हणतील कीं याचा विचार आंजी काय? अमल साधीत साधीत साधावा. देशांत

आधीं अमल थोडका होता, मग साधीत साधीत साधिला तरी तसे हे बंदरकाठचे लोक नव्हेत. यासी यकवेळ बोलीस गुतले म्हणजे तेच धरून बसणार. स्वामीची बोली म्हणजे त्यास केवल सनद जाहालीसी होईल यास्तव लिहिलें असे. विदित जाहालें पाहिजे. प्रस्तुत जागा आपलाशा बहुत नाहीं व आरमार मजबूत नाहीं. यैसे कितेक या समयाचे अर्थ चि(त्तां)त आणावे लागतात आणि सोडावे लागले तरी भिडेस्तव सोडिलेसे करून सोडावे. परंतु बोलीस व दस्तायैवजीं न गुंतावें. सेवेसी श्रुत होये. फिरंगी इंग्रेज शामल व आंगरके यासी दस्तायैवज न गुंतवावा. मोघम बोलून मात्र सोडणे ते सोडावे. म्हणजे पुढे जसे बनेल तसे करून. हे विज्ञापना.

¶Shankaraji Keshav advises the Peshwa not to commit himself in writing in his dealings with Manaji Angria.

No: 467] *[August 1739 ?*

श्री

पुर्वणी राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विज्ञापना ऐसीजे. नब्याने आज आम्हास बोलाऊन नेले होते, छ १९ जमादिलोवली, आणि विचारूं लागले जे हे वर्तमान काय आहे? तुमचा खावंद वारंवार लिहितो आणि कपितान इंचबर्डापासींहि सांगोन तेच पाठविले आणि आळस करितो. तस्मात् अवघी ठकबाठकव आहे. हे सर्व लटिके. येथून गावची व हबशाची हवी न्यावयास्तव तुम्हास येथे ठेविले आहे. वर्चिलें[1] विचार कांही नाहीं. तारवे आणायाच्या विचारास्तव विश्वास दाखविला हे मी सर्व जाणत होतों. त्यास जुना बधला मी काही बधणार नाहीं. थोराने लिहिता विचार करून लिहावें, लिहिले तेव्हा आचरावे, हे सर्व तुम्ही कार्य साधायाकारितां आपले आंगीचे लाऊन बोलतां की खराखुरा त्यांचा हेतु आहे, ऐसे आसिल्यावर हर-प्रयत्ने येऊन, बोलिला बोल आचरणे, आम्हास पुष्टीपत्र देऊन हबशास मदत करविली, विश्वासे आम्ही बधलो, आतां आम्ही लिहितों, तेव्हा जाबसाल वरचेवर केल्यानें स्वकार्य साधणार नाहीं म्हणून दिरंग जबाबास लाविला, हें आपण बरें समजतों. कैसे वर्ततात हें पाहतों. नाहीं तर खाडीच बंद करितों. इकडून जिनस जाऊं देणार नाहीं. आम्ही बोलिलों उतम. राजश्री पंतप्रधान सर्वांचे मित्रत्व जोडावें हे इच्छा धरितात, रयतेवर तुमची बरी नजर आहे, हा उत्तम गुण याकरितां तुमची मैत्री इछितात. न गमे तेव्हां त्याचे कार्य जातें. त्यास या

---

१ दुसरा. बरकड.

कोंकणावर सर्व मदार आहे यैसें नाहीं. रा। कृष्णराऊ मिहुणे असोन रयतेकरितां यास दूर केलें, आणि वासुदेव जोशी यास रयत राजी म्हणून त्यास ये प्रांती ठेविलें. जर रुपयांवर नजर असती तर कृष्णराऊ जे रुपये देत होते तेच घेतले इतुका नफ़ा दवडते कां? तस्मात् धनाची इछा नाहीं. रयत राजी राखिल्यावर कीर्ति जोडिल. सर्व बरा धणी म्हणतील हेच इछिताहेत. प्रसंगोपात सर्व तुम्हास कळेलच. यैसी बोली जाहली. सांप्रत कर्डी तों कमान आहे. पुढें सहजच कळेल. आम्हीहि स्वज्ञानें सावध आहों. मग नकळे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Peshwa's agent gives an account how the new Governor called him up and gave him a bit of his mind and told him that he (the agent) must be careful before he wrote anything on behalf of the Peshwa and having once written he must see that there was no going back on it. The Governor also added—the agent says—that if the Peshwa did not act properly, he would have to close the channel and see that no merchandise passed through.*

In reply to this, the agent says he pointed out, how the Peshwa did not merely seek pecuniary gain but was solicitous of the welfare of the subjects, and added by way of an instance that the Peshwa had removed his own brother-in-law from that Prant when he found that he was not behaving properly towards the ryots and appointed another man.

No. 468] *[1739 ?*

श्रीरामचंद्र

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत
राजमान्य राजश्री बाजीराव पंडित स्वामी गोसावी
यांसी

पोष्य आनंदराव रघुनाथ कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहिले पाहिजे विशेष. शामलाकडील महंमद हुसेन वगैरे नफर १० दाहा व बरोबर घोडे २ व पडथल तीन येणप्रमाणे औरंगाबादेहून पुणियास आले आहेत. पुढे राजपुरीस जाणार, याकरितां आपण यास राहादारीचे दस्तक करून देऊन राजपुरीस सुखरूप पावत ते केले पाहिजे. नवाब माहाबास जिनस नजर आणिली हाती ते घेतली. हे फिरोन जाताती तर यांस सुखरूप पावते करवणे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Anandrao Sumant requests the Peshwa to grant permit for the camels and horses belonging to the Sidi to proceed to Rajapuri.*

No. 469] [1740 ?

श्री

विनंती उपरी राजश्री पंतप्रधान स्वामीस पत्रें सादर करून तौवार आज्ञा लिहावयास घेऊन सत्वर पत्रें येथें प्रविष्ट होत तें कीजे. खुदाबादेची पत्रें सत्वर येऊन पोहोचतील तर कार्याची. अद्याप कल्याणीहून रुपये आले नाहीं. राजश्री पंत आपाहीं तेव्हांच रा। वासुदेव जोशी याजकरवी पांच हजार रुपये इंगरेजी देविले. परंतु येथून कारसाजी राजश्री नारायण जोशी याणी ढिली पाडली. येथें तर काम विलंबावर पडलें आहे. स्पष्ट लिहावें तर, न कले ते त्यास काय दिसोन येईल? न लिहिलें तर साहेबकाम नासतें. यैसे आसोन आपल्यावर कुल बदलामकी आली तरी कबूल करून येथून काढून हरकोण्हाचे रुपये घ्यावे तर येविषई खावंदास बरा विश्वास पाहिजे. आतां पांच हजार रुपये देत होतो त्यास दोन तारवे भरली. येक राहिलें आहे. इतुकायामधी रुपये येऊन पोहोचले तरी थोडेबहुत काम साधितच आहें. परंतु तीन तारवावर सारखे वांटून पहिले दिले असते म्हणजे आपली सता राहाती आणि जोखीम वांटले जातें यैसे आहे. जैसे सुचेल तैसे यैकवेल तवकल[१] करून पाहातों. मग स्वामीचे प्राक्तन, सेवकाचा प्रयत्न, फल दाता श्री समर्थ आहे. रा। रामाजी रंगाजीची पत्रे आहेत व आहामद आजम यांची पत्रें. याची पत्रे जेथील तेथे पोहोचऊन जाबसाल पुन्हा प्रविष्ट होये यैसे कीजे. पेसजी आमच्या दोन जोड्या हुजूर जाहाल्या त्यास आज पंचवीस दिवस व वीस दिवस जाहाले तर काय निमित्य राहिल्या हे न कले. इंगरज क्षणक्षणा त्याची पुरसीस करितात याचा अर्थ, राहावयास कारण काये म्हणतात, त्यासी किती लटके बोलावे? येथें नवे जुने जनराल जाहाले यास पत्रें विचारून लि॥ पाहिजेत. सोन्याच्या साकळ्या पाठविल्या तर येवज दिसतो, याचा काय तो विचार करणार खावंद आहेत. परंतु जाण करावें योग्य आहे. आमचे येथें बहुत दिवस राहाणें होसारिखें असेल तर [२]रेजें पाठवावीं व चारखानी साडी जर विकली नसेल तर पाठविणे. ज्याची त्यास अद्याप दिली तरी घ्यावयास कबूल आहे. त्यास देऊं. बहुत काय लिहिणें. जाबसाल सत्वर येकवेळ होयसारिखा करणें. लोभास दुणावीत असीजे हे विनंति. सुसी पातळे येथें माहाग जाहालीं. बरीं मिळत नाहीं. रा। अमृतराऊ यांस जाण कीजे हे विनंति.

¶*This appears to be a letter from Bombay to Poona or Satara. The writer is arranging purchases of certain goods for the Peshwa or his brother Chimaji and requests a quick reply. Certain pieces of cloth are requested back, if they had not been already sold.*

---

१ भरंवसा, आशा.

२ कापडाचे तुकडे.

5580

No. 470] [13-12-1747 ?

श्री

श्रीमत् राजेश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनीत सेवक कृष्णाजी राम सां नमस्कार विज्ञापना येथील कुशल तागाईत मागसीर्ष वद्य सप्तमी रविवार मो मुंबई स्वामीचे कृपादृष्टीकरून येथास्थित असे. विशेष:—स्वामीचें आज्ञापत्र छ २९ जिलकादीचे लिहिलें ते छ १८ जिल्हेजी सादर जाहाले. सिरसा वंदून वांचितां सर्वार्थ ध्यानास आला. पूर्वी पत्रीं कर्जें घेतले रुपये म्हणून लिहिले होते ते दफ्तराची चिठी चिटनिसांत आली तेथे लिहितां दफ्तरदार चुकले असतील हें खरें. त्यावांचून चिटनिसी पत्रांत चूक घडेल हे सहसा न घडे हा मनाचा निशा आहे. यदर्थी विनंती. उदिमाबाबद पूर्वी कैलासवासी श्रीमत् पंतप्रधान स्वामीचे कारकिर्दीस उदिमाकरितां रुपये पाच हजार आमचे निसबतीस रामाजी रंगाजी प्रभु चेऊलकर यांजकडे थारले व कपितान इचबट याजकडे येकून पाच हजार रुपये लिहिले आलें हे खरें. येविसी विनंती. च्यार हजार रुपये रामाजी रंगाजीस दिल्हे होते आवगते (?) व कपितान इचबर्टाकडे रुपये अठरासे येकूण पाच हजार आठसें कपितान मजकुरांचे जिमेस लाऊन त्याचें पत्र निशाणीचे घेऊन हुजूर सेवेमधी सादर केले. आम्हास मुंबईस यावयाचे मना यां रुपयांमुळेंच अवालीपन्हा (?) जनराल मेस्त्र हार्न साहेबीं केले. येविसी श्रीमंताची पत्रे यासी आली, परंतु आमचे येणें ये बंदरीं होऊ दिल्हे नाही. कैलासवासी श्रीमंत आपासाहेबीं हिसेब मागितला तो सेवेमधें लिहून सादर केला व ते प्रसंगी रामाजी रंगाजीहि हुजूर आले होते त्यांजपासून वाईदे रोखा लिहून घेऊन दफ्तरीं दिल्हा आणि कपितान इचबर्टास तकूब रोखा रामाजी मजकुराने मागितला तोहि हुजूरून दिल्हा. कपितान इचबर्टाकडून घडियालें सोन्याचे रुपये च्यारसे किमतीचे हुजूर घेतले, ज्यांत घटिका वाजतात ते येक ठाउके आहे. त्यावर दोन च्यार वेल कपितान हुजूर गेले होते ते समई संनिध नव्हतो. हे सर्व रुपये कपितान इचबर्डाकडे व रामाजी रंगाजीकडे लागू होतात. आम्हाकडे रुपयांचा इलाखा राहिला नाही. हे कैलासवासी श्रीमंत पंतप्रधान व श्रीमत आपासाहेबांचे वेलेसच निवडले असतां दफ्तरी कागदी उगवले नसेल तरी माझा अन्याय काय? ही सर्व हकीकत रा रामाजी मल्हार यांसी विचारलियावर सविस्तर सेवेसी निवेदन करतील. स्मरण नसेल म्हणतील तर कपितानचे हातचा दस्तयैवजहिं मिलेल. सारांश सेवक स्वामीचे पदरीचा. याप्रसंगे जाहीर जाहालो हे थोर गोष्ट घडली!

पुढें हे सर्व हकिकत ध्यानात आणून उतरोतर निभेये करावयासि स्वामी समर्थ आहेत. रा। आपाजी शामजी आमची इजत आबरू द्वडायासि बेनाहाक लागले आहेत, येविसी यासी मना करावयासी आज्ञापत्र पाठऊन आमची इजत रक्षावयासी स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

हे वि॥

¶*Krishnaji Ram agent at Bombay to the Peshwa, explaining certain items of money-dealings of the days of Bajirao and Chimaji Appa. Captain Inchbird is mentioned from whom a gold clock was purchased for Rs. 400. It seems the Peshwas had trade in Bombay.*

No. 471] [*1747 ?*

श्री

सेवेसी विज्ञापना उदरीचे राजकारण राणीकडे लागलें. किला सिर्के यांचे हवाला करितात ऐसे इग्रजास वर्तमान कलले त्यावरून त्याणी दोनसें माणूस गलबतात घालून उंदेरीस पाठविलें. तें त्याणी किल्या घेतलें नाहीं. तथाप आरमार तेथून काढिलें नाहीं. तेथें राखिलें आहे जंजिरेयास हे वर्तमान लेहून गलबत मुजरद पाठविलें आहे. मानाजी आंगरे यासहि येथून सावध केले आ(हे). उंदेरकर आपले लोक किल्यांत घेत नाहीं. तेव्हा जबरदस्तीहि करावी ऐसे मनसुबे आमचे आत घाटिताहेत. पुढे कार्य होईल तें पाहावें. राणीकडून पांच हजारांची हुडी मुंबईस आली होती ते इग्रजानी आटकाऊन ठेविली आहे. पैका उंदेरीस जाऊं दिल्हा नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram reports from Bombay that the British have become agitated over the affair of Underi being handed over to the Queen Sakwarbai of Shahu.*

No. 472] [*2-11-1749 ?*

श्री

सेवेसी विज्ञापना. आलिकडेस सुर्तेच्या हाकीमांत[+] व मामालियांत नौदिगर जाहाले आहे. इंग्रजाकडेस वकिलाची लिहिलीं आलीं त्याचे वर्तमान तेगबेगखान सुर्तेची हाकिमी करीत होता तो गतवर्षी वारला. त्याचा भाऊ गदाबेगखान किलेदार होता तो हाकिमी करावयास लागला. तोहि च्यातुर्मासात वारला. हालीं तिसरा भाऊ छोटेखान हाकिमी करीत होता. छोटेखान त्याचा लेक किल्यांत

+ Hakim, an officer.

5582

किलेदारी करीत होता. खजाना सर्व किल्यांत होता येशास हाली मार्गशीर्ष शुध चतुर्थीस मियां अछन म्हणौन छोटेखान याचा साडू त्यांचाच कबिलदार होता. त्याणें नबाब नासरजंग यांसी बात करून किल्यांतील कांही लोक फिताऊन किल्यांत जाऊन किलेदार छोटेखान याचा लेक होता त्यास दस्त करून किला बलकाविला आणि नवाब नासरजंग यांची द्वाही तमाम शहरांत फिरविली. छोटेखान हाकीम किल्याबाहेर दरबारखाना आहे तेथें तो होता त्याजवरी किल्यावरून गोले मारीत आहेत. जुने हाकीम बाहेर व अछनमियां किल्यांत किला बलकाऊन दोघेहि सिबंदी ठेवीत आहेत. पुढे कोण्हाचा जय कोण्हाचा अपजय होईल कोणाची गोष्ट पार पडल पाहावे. सध्या याप्रा वर्तमान आले आहे. याउपरी येईल तेहि सेवेसी विनती पत्रीं विदित होईल. श्रुत होणे हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram reports from Bombay some changes in the administrative arrangements and officials of Surat and the consequent disputes that had started.*

Index to Selection No. 33

[Figures indicate nos. of letters]

B—contd.

B—contd.

B—concld.

C

D

D—contd.

E

F

F—contd.

G

H

H—contd.

I

J

K

K—contd.

L

M

M—contd.

N

P

R

R—contd.

S

S—contd.

S—contd.

S—contd.

S—contd.

S—concld.

T

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

३४

वसईची मोहीम

(पुरवणी)

(१७००—१७४०)

[किंमत—२ रुपये ८ आणे किंवा ४ शिलिंग ६ पेन

संपादक—गो. स. सरदेसाई, बी. ए.

गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३३

या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि
जबाबदारी सरकारावर नाहीं.)

Selection No. 34

BASSEIN—SUPPLEMENTARY PAPERS.

Since the publication of Selection No. 16 dealing with the Bassein campaign a number of important papers containing additional details have been discovered. These are now presented to the reader by way of a supplement but are by no means less worthy of attention on that account. On the contrary they bring to light totally new phases of the campaign, and the parts played by the Angria brothers, the British, the Portuguese and others are elucidated. The papers do not need any further introduction beyond warning to the reader that these should be studied in conjunction with those printed in the earlier selection. The papers are in some cases undated, and the provisional dates assigned to them may possibly require revision in the light of further study

No. 1] [20-1-1735 ?

छ ८ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती उपरि. येथील कुशल तागा-
ात माघ सुध सप्तमी जाणोन स्वकीये लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वा-
ीनी जासुदाबराबर पत्र पाठविलें तें सप्तमी र(वि)वारीं संध्याकाळीं पावलें. लेख-
ार्थ अवगत जाहाला. त्यास पत्राचा जाब तों पूर्वी स्वामीस लिहिला आहे
यावरून सविस्तर विदित होईल. स्वामीनी जी गोष्ट लिहिली ती यथार्थच
माहे. खामखा तर्तूत करावी. ठाणियाची हवा ठीक जाहालीच आहे.
ोक जमा करावे व दोन हजार स्वारहि सिध करावे. त्यांपैकीं येक हजार स्वार
रवण वसई प्रांतीं पायेबंद द्यावा व हजार स्वार व अडीच तीनपर्यंत हशम
ठाणेयाच्या कार्यास पाहिजे. याचे जागे व स्थले पूर्वी नेमून पाठविलीच आहेत
यावरून कळलेच असेल. त्यास स्वार दोन हजार सिध करावे. त्याची आवई
स्वामींनी नवाबाकडे जावयाची घालावी अथवा अंजिणवेलीकडील घालावी आणि
स्वारानी व हशमानी तेथून उठावें तें पावलेच्या व अवसरीच्या रोखे यावें.
त्यास आम्ही येथें निश्चये करून जो दिवस नेमून पाठऊं ते दिवसीं तेथून त्याणी
दोन अडीच दिवसामध्यें सडे स्वारीने येथें यावें. ऐसी तयारी केली पाहिजे.
त्यास स्वामीनी आठच्यार दिवस डेरा बाहेर देऊन फौज तयार करावी. त्यास
रोजमुरियास पाचसात हजार रुपये लागले तरी लावावे; व स्वामीनी लिहिलें कीं
हजारबारासें माणूस तर्तूत केल्यानें आठापंधरा दिवसीं होईल तर अलाहिदा यादी
लिहिली आहे, त्याप्रमाणे लोक सिध करावे. त्यास ठाणेयांचे कार्य त्रयोदसी-
पासून प्रतिपदापर्यंत करावे ऐसें आजच हवेलागे आणून ठीक केलें आहे. त्यास
माघ सुद पोर्णिमेच्या उभाणास लोक जमा होत नाहीं, याकरितां माघ वद्य त्रयोदसी-
पासून फाल्गून सुध प्रतिपदापर्यंत हें कार्य खामखा करावें. तरी स्वामीकडील फौज
सिध करावी. माघ वद्य दशमीस अथवा येकादसीस मुहूर्त पाहून तेथून स्वार
व्हावे. पहिलाहि येक दोन दिवस मुहूर्त निघाला तरी काढावा. तरी पंधर
दिवसांचा अवकाश आहे तो जेथील तेथें बंदोबस्त करून तयारी करावी

तरतूद=बेगमी.

स्वामीचे प्रतापें कार्य सिध होतच आहे. यामध्यें संदेह नाहीं. राजश्री बाजी भिवराव वरीं गेले असिले तर आणवावे. बहुत काये लिहिणे? लोभ करीत गेले पाहिजे. हे विनंती.

¶Vasudev Joshi discusses the plan of a surprise attack on the Portuguese stronghold of Thana, and proposes to the Peshwa to keep ready a party of two thousand men.

No. 2] *[26-2-1735*

पौ छ १६ सवाल.

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती येथील कुशल ता. छ १३ सवाल जाणून स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री पंतप्रधान याणीं आम्हांस पत्र पाठविले कीं पत्रदर्शनी स्वार होऊन येणे त्यावरून आम्हीं कल्याणाहून स्वार जाहालों. छ ११ सवालीं येथे अलीबागास आलों, भेटी जाहली. येथील अर्थ मनास आणितां स्वामीनी राजश्री राव यास लेहून पाठविले कीं फिरंगाणचा विचार राजश्री वासुदेव जोशी यास बोलाऊन आणून पुसावें. त्यावरून आम्हांस बोलाविलें. आम्ही आलियावरी जो विचार सुचला तो यास सांगितला कीं जो विचार करणे तो पोख्ता करावा. जेणेकरून कार्य साध्य होय आणि खर्चाखाली न या आणि दोनही जागे हातास येतील तरी बरें येसे सांगितलें. त्यास विचारे करून पाहतां मुख्य स्थल तों साध्य होते येसे दिसत नाहीं. तेव्हां त्याचें निर्मूल होत नाहीं आणि खर्चाचा प्रसंग आहे. यात विचारे होईल ते करावें म्हणून सांगितलें. स्वामीस कलावें याकरितां लिहिलें असे. राजश्री राव याणीं खर्चास मागितलें त्यावरून रुपये ४००० च्यार हजार दिल्हे. आणखी मागतील तरी थोडेबहुत देऊन. हजार होन पावेतो देऊं. बहुत काय लिहिणें? लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶Vasudev Joshi informs Chimaji Appa that Bajirao invited him (writer) for a meeting at Alibag and discussed with him the Portuguese situation and the chances of success of a campaign against them.

No. 3] [15-3-1733?

श्रीं

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता। चैत्र शुध येकादसी जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. सिवाजी प्रभु, कासी प्रभु याचे भाऊ हे कितेक उमेद धरून फिरंगाणांतून कल्याणास आम्हाजवली आले. हे येथें आले तों स्वामी निजामनमुलुक यांचे भेटीस गेले होते, यास्तव हे येथेंच आजी महिना राहिले. पुढें आम्ही समागमे यांस आणावें, तो तूर्त आमचे येणे जालें नाहीं, याकरितां यांस स्वामीचे सेवेसी पाठविले आहेत. यांचें हातून त्या प्रांतीचे कितेक कामकाज घ्यावे येसे आहेत आणि हेहि तेच उमेद धरून आपले सेवेसी आले आहेत. तरी सारांष गोष्टी यांचा योगक्षेम चाले आणिं आपले कार्य होये ते करावें. यांचाहि मनोदय हाच कीं स्वामीची सेवा करून दाखऊन आपलें बरे करून घ्यावे येसा आहे. तरी स्वामीनी याचे हरद्र मनास आणून यास आज्ञा करणे तें करावी. बहुत काय लिहिणे ? लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudev Joshi recommends to the notice of the Peshwa one Shivaji Prabhu who was desirous of taking service under the Peshwa and seek his fortune.*

No. 4] [1-5-1729?
[24-4-1735?

२

ची आशास्वन द्याल, तर येतो. येरवी लटकें येजा करावें यामधें जीव नाही यैसे उत्तर पाठविलें आणि भिकाजी प्रभूस ठेऊन घेतलें. तेच दिवसीं वैशाख सुध चतुर्दसी गुरुवारीं ती प्रहरा रात्री किल्याखालीं गनीम येऊन सिड्या लाविल्या मेटकरीयाने खडका[1] घेऊन गोंगाट केला त्यावरून सर्व किला खबरदार होऊन बरकंदाजी व दगडीचा मार केला. किल्यावर बहुतच गलबल आईकतांच खालोन वरचेवर दुसरे लोक पाठविले. गनीम मारून चालविला परंतु मुदा हात न लागला. सिड्या व भाकरी सर्व गवसले. दोनतनिसे माणसाची दाटी होती. त्यातील यक दुसरा सापडला असता तरी उत्तम जाले असते. किला जात बाकी राहिली नव्हती. पेरयंत[2] स्वामीचे पुण्यप्रतापे लज्या राहिली. याउपर या स्थलाचा विचार स्त्रामीने काय करावयाचा तो केला पाहिजे. प्रजन्यकाल

---

१ चाहूल घेऊन; कानोसा घेऊन. २ परंतु.

आला. प्रस्तुत पारपत्य राहिले. परंतु आपले स्थलाचा जतन जाली पाहिजे. सारांश पैका असावा. येथील प्रसंग या प्रकारचा स्वामी धणी आहेत. आम्ही चाकर. आमचा उपाये काये ! लेहोन उतीर्ण व्हावे. किल्याचे लोकांस पैका पावला नाही याची काये वाट ? साठमाचा जमाव चतुरमास याच प्रांते ठेवाल कीं दिवा घाटावर न्याल ? याचप्राा सेखमहमद याचा जमाव व वैजनाईक याचा, दिघे देवजी नाईक याचा जमाव चतुरमास याच प्रातें ठेवीत असाल तर याचे अनकूलतेची काये वाट ? किल्यास सवासें माणूस स्वामीने नेमिले आहे तेव्हड्याने किला वाचतो यैसे नाही. लटकें अपेशास कारण. चाकरलोकाचे जीव जातील. खावंदास बोल लागेल. याचा विचार सर्व करून जे आज्ञा करणे ते निर्वाहाची करावी. तेणेंप्राा वर्तणूक करून. रामनगरचा भाईजी दळवी फतेपुरी येऊन पत्र पाठविलें आहे की आपण बालापुरी येतो, तुम्ही बालापुरी येणे. आला तर जाऊन विचारे करून आपणास अर्थसाध्य होयेसे करून. परंतु त्याचे कपाल काय निवडेल तें न कले. सविस्तर राजश्री गोपालपंत सांगतां निवेदन होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The letter describes a severe attack on a fort having been repulsed. The name of the fort is not known. The letter is fragmentary.*

No. 5] [*24-12-1733*

पौ छ २ साबान

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

पो वासुदेव जोशी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ताा मार्गसीर वद्य आमावाशा इंदुवासर जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले तेथे आज्ञा केली की, राजपुरी प्रांती गड किले आहेत, तिकडे शामलानी धामधूम मांडली आहे. तरी तुम्ही पत्र दर्शनी पांचसे माणूस धारकरी जिवाळियाचे राा खंडोजी माणकर यांजकडे रवाना करणे म्हणून लिाा. ऐसियासी स्वामीकडून राजपुरीहून लोक आले ते तों दुखणा पडिले आहेत. पांच सातसे माणूस आम्हाजवळी आहे. त्यास पाठवावे त्यास प्रस्तुत फिरंगी आपले तयारीमधे आहे. कोणीकडे जाईल विश्वास कळत नाही. तरी करितां येथील जमाव फोडिता येत नाहीं. राजश्री खंडोजी माणकर याजकडे लोक [illegible]

येथे नवे लोक सेदोनसे माणूस चखोट ठेऊन पाठऊन देतो. कळले पाहिजे. येविसी राजश्री खंडोजी माणकर व होनाजी बलकवडे यांची पत्रे आली आहेत, त्यास थोडेबहुत लोक होनाजी बलकवडे यांजकडे रवाना करितों. कळावे याकरिता लिहिले असे. बहुत काय लिहिणे? लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudev Hari Joshi of Murud, a trusted officer of the Peshwas in Konkan, writes to Bajirao that he cannot afford to weaken his position by sending a detachment to Khandoji Mankar as ordered.*

No. 6] [*1735*?

श्री

पुरवणी राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरि. आम्ही येथून गंगाजी नाइकाचा जावई गणोजी नाईक व खलोजी जासूद व खंडोजी घुडे यास पाठविले. त्यास हे तेथें गेले. कपितानाची भेटी जाहाली. त्यास तो बोलिला कीं हेंच काम करून पोट भरावें यैसें मजला फास्सें अगत्य नाहीं. परंतु सोइरे धाइऱ्याचे बोलावरून समर्थास वचन दिले त्याप्रमाणें आपण सिध्धच असों. त्यास हे बोलिले कीं आपल्या(स) बुरूज दाखवणें. त्यास तो बोलिला कीं बुरुजावरी तुम्हांस न्यावयास कार्यास न ये, काय निमित्य तुमची जात येक व आपली जात येक. यास्तव बुरूज दाखवितां येत नाहीं. वरकड सिडिया वीस पंचवीस हात पाहिजे. जो दिवस नेमला त्यास अंतर न करितां ते दिवसीं यावें. ते दिवसीं आपल्या बुरूजास खिडक्या आहेत त्या उघड्या ठेवितों. तुम्ही येणे; परंतु आपले अठरा येकुणीस माणूस आहेत त्यांस पैका द्यावयास पाहिजे तो पाठवणें म्हणजे त्यास देऊ. म्हणजे मायेत असतील त्यास सांगणें तें सांगितलें आहे, परंतु पैका पाहिजे. याप्रमाणें बोली जाहाली आणि हे आले. कळावें याकरितां लिहिलें असे. वरकड पैका दिलियास कदाचित कार्य न जाहालें तरी पैका फिरोन द्यावयाची बोली तरी पूर्वी लिहिली आहे त्याप्रमाणें आहे. त्याखेरीज विशेष नाहीं. बहुत काय लिहिणें? लोभ करीत गेलें पाहिजे हे विनंती.

¶*Vasudev Joshi writes to the Peshwa that the commandant of a ceartain Portuguese post has been secretly won over and that he promises to surrender the post on some payment.*

---

१ चांगले.

5589

No. 7] [30-12-1736?

पौ छ ८ रमजान

श्री

चिरंजीव वासुदेव जोशी याप्रति नारायण जोशी आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जाणे. यानंतर काली भोमवारीं पत्रें पाठविलीं ती पावली असतील. त्यावरून कळलेंच असेल. त्यास त्याजकडील भानजी क्षत्री फिरोन गेला म्हणोन लिहिलें होतें. त्यास काली तो फिरोन तिसरा प्रहरीं आला. तों संध्याकाळपर्यंत तळांतच होता. बोलीचा अर्थ मनास आणितां गेर. वसईच्या जरारापासून कराली आहे त्याकडे आपण जाऊन च्यार गोष्टी सांगोन जेणें करून तह होये तें करितों, ऐसी बोली करून गेला आहे.. येथूनहि रामाजीपंत दिमत तुबाजीपंत याजबराबर पांच माणसें देऊन रेवदंडियांत पाठविले आहे. त्यास तेथून फिरोन बुधवारीं आला; त्यास त्याची व आमची बीद बसेनाशी जाहाली. यास्तव आज दोन रोज बोलीचाली राहिली आहे. त्याचे बोलीचा शेवट कसा काये होतो, यास्तव आपणांकडून माणूस आलें त्यास ठेऊन घेतले होतें; हाल्ली रवाना केले आहे. बोलीचाली होऊन तहनामा ठरविला. अवघे मुद्दे त्याचे आमचे विचार कबूल जाहले; परंतु मशीद सोडून जावें ऐसा तह वसईहून करून येतों ऐसें कबूल न करी. मजला कलेल तैसें करून, रदबदल करून, सला वसईकराकडून करवितों ऐसा करार करीत होतों. मशीद सोडावयाचें नांव लेहून नेदी याजकरितां बेबनाव होऊन गेला. काल आला नाहीं. आज आला तर मागाहून सविस्तर लेहून पाठऊन. तुम्हीं तिकडे वसईकरांस भयेप्रदर्शन करून विचारें वाटेवर येसें करणें. बहुत काय लिहिणें, हें आशीर्वाद.

¶*Narayan Joshi writes to his younger brother Vasudev Joshi the peace-overtures made by the Portuguese through one Bhanji Kshatri.*

No. 8] [26-12-1737?

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

रामचंद्रपत स्वामी गोसावी यासी

पो शंकराजी केशव सा नमस्कार विनंती येथील वर्तमान ता छ १४ रमजान जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. फिरंगी माहिमास सुढावलासा जाहाला आहे. या उपरी जंजिरे अरनाला अगर येथे येक वेल येईल त्यास जंजिरे मजकुरी व येथे भरती असावी याकरिता येक दोन वेला रा वासुदेव

जोसी व रा रघुनाथजी यास लिहिले आहे. परंतु त्यांचे विचारास येईल कीं नाही यास्तव आपणास लिा आहे. तरी त्यास च्यार गोष्टी सांगोन आमचे लोक तीर्थस्वरूप राजश्री माहादाजीपंत व राजश्री खंडोबा व कर्णाजी सिंदे यांजबरोबरील लोक व स्वार तीनसे लौकर पाठवावे. जंजिरे मजकुरी अठरासे माणूस होते त्यांपैकी सेंभर सवासे माणूस आरब तेथे होते ते आणिले. कां की आरब बेइमान. माहिमास बेइमानी केली यास्तव यांस दूर करावे आणि जे हाली सत्रासे माणूस राहिले तेथे अडीच हजार पाहिजेत. याकरिता लोक लौकर पाठविले पाहिजेत व येथे मोर्च्यांचे पाठी राखावयासी हजार दीड माणूस पाहिजे व च्यारसे राऊत पाहिजेत. अरनाळियास गेला ठिकाने राहिला तरी कुमक पोहचली पाहिजे. त्यास लोक असतील तरी दोहीकडे कार्यास येईल. तरी लोक बारासे पंधरासे लोक व तीनसे राऊत पाठवणे. अनमान करावयाचा नाही. तीन पत्रे रा जोसीबावास पाठविली. तीन रोज जाले परंतु लोक येऊन पावत नाही. माहिमचे लोक झाडून पाठवावे व राऊत तीनसे सेवट दोनसे पाठवावे. सुभ्रणे साहित्यावाचून काये करील? जर लोक न पाठवीत तरी येक जाले तसे होईल. मोकल्या रानात (?) सारा जमाव ठेवावासे नाहीं. जे सिरगावची फौज असे ती तिकडे असो द्यावी येसा विचार आहे. बहुत काय लिा हे विनंती.

¶*Shankraji Keshav asks from Ramchandrapant more reinforcements to be sent to Arnala and Mahim where the Portuguese were getting stronger.*

No. 9] *[13-1-1737*

पो छ १ सवाल

श्री

पुरवणी राजश्री चिमणाजी पंडित
दाजी गोसावी यांसी

विनंती उपरी तीर्थस्वरूप संभाजी आंगरे सरखेल यांचे अरमार गुराबा सात व गलबते चौदा स्वारीस नालीतंव्यावर (?) येऊन तरांडे हस्तगत सावकारी करून सुवर्णदुर्गी घेऊन गेले. अरमार जंजिरे मजकुरीचे बंदरी तयार केले आहे. आपणहि विजयदुर्गीहून सत्वरींच सुवर्णदुर्गास येणार आहेत. सुवर्णदुर्गी तयार होत आहे. आपणास कलावे यास्तव लिहिले असे. जाणिजे रवाना छ २२ माहे रमजान बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंति.

¶*Manaji Angria informs Chimaji Appa of the hostile attitude of Sambhaji Angria who had captured and carried away to Suwarnadurg several trading vessels.*

No. 10] [18-1-1737

श्री

चिरंजीव राजश्री नाना यास चिमणाजी बलाल आसीर्वाद उपर. येथील कुशल ताा छ २७ रमजान मंगलवार यथास्थित असे विशेष. आज कोरेगावीहून कूच करून रांजणगांव गणेशाचे ताा पाबल येथे जातो. राा वासुदेव जोसी यास सांगून पदमोजी जाचक याचा गुंता उरकून त्याचे येणे होये ते करणे. पदमोजी जाचक गावाविसी रदबदल करतील त्यास समाधान करून सांगणे. आम्हापासी पावल्यावर गाव नेमून दिल्हा जाईल. राणोजी भोसले याबाबत सिंगीचे तोंडी घालावयास लगाम कार्यास येईल ऐसा पाठवणे. भालेकाठ्या पंचवीस व चोव्याचे जोड दोन पाठवणे. दारूगोलीसाठी उंट काल तेथे पाठविलेच आहेत. अंतोबास सांगून दारूगोळी पांचा उंटावर घालून रवाना करणे. उटास पलाणे झुली नसतील त्या करून देवऊन रवानगी करवणे हे असीर्वाद.+

¶*Chimaji Appa proceeding into Konkan gives certain instructions to Nana about Padmoji Jachak, Ranoji Bhonsle, etc.*

No. 11] [19-1-1738?

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक सिवाजी बाबाजी दोन्ही कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ९ सवालपर्यंत मुकाम ठाणे साष्टी येथे स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. पुरंधरकर सरणोबत व लोक इमारतीच्या कामावर मन घालून जे काम सांगावे ते करितात. हली सरणोबतानी दादोशा अडिसेरीविसीं विनंती करावयासी पाठविले आहेत, तरी यासी आज्ञा करणार स्वामी (समर्थ) आहेत. हली संताजी नाईक याजकडील (फाटलें) यातील * * * पुरंधरकर करीत आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Shivaji Babaji reports to Chimaji Appa the honest and hard services of the men of Purandhar at the fort of Thana and recommends them for promotion.*

+ संबंध पत्र आपाच्या हातचें.

No. 12] [22-1-1738 ?

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक नारोजी कडू कृतानेक दंडवत विनंती. येथील क्षेम ता छ १२ सवालपावेतो स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे. येथील वर्तमान तरी जागा जागा राऊत ठेवावे म्हणोन स्वामीची आज्ञा आहे. त्याजवरून घोडबंदरी मानसिंग घाटगे व माणकोजी आटोले ठेविले आहेत. मालाडास राऊत आम्हाकडील ठेविले होते. त्यास प्रस्तुत रा दादजी माणकर याजकडील आगदीं राऊत तेथ गेले. अम्हाकडील आले. घांटकोपरे येथे रा संताजी दाभाडे राहातात. वरकड खबरदारी जे करणे ते करीतच आसो. रोजमरियाचे येवजाविसी येक दोनी वेला विनंती सेवेसी लिहिली होती. त्याजवरून स्वामीनी रा बालाजी नारायेण याजकडे रुा २००० दोनी हजार देविले. त्यांत येक हजार आले. त्यापैकी रुपये ४०० च्यारसे राहिले ते आजी छ मजकुरी निमे रोजमरा दिल्हा. हजार रुपये रा बालाजीपंताकड आहेत. त्याजबदल माणसे पाठविली आहेत. ते देतील तेव्हा आणितील. येथे काही कर्जहि मिलत नाही. नेमिले दिवसाप्रमाण रोजमरा तो दिल्हा पाहिजे. माहागाई आहे. याजकरिता रोजमरेस यैवज सत्वर येऊन पावे यैसी आज्ञा करावी. रा आनंदराऊ लांडेगे यानी आपणाकडून रा शंकरराव सेवसी पाठविले आहेत. हे सेवेसी विनंती करितील. त्याची आज्ञा कर्तव्य ते करावी. सेवेसी विदित जाहाले पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Naroji Kadu reports to Chimaji Appa that all positions—Ghodbandar, Ghatkopar, Malad—are strongly guarded. The men have not been yet paid their full wages which has to be done immediately.*

No. 13] [Recd. 12-2-1737 ?

पौ छ २२ मोहरम.

श्री

पुा राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री कृष्णरांव[१] काली भिवंडीस आले. गंगाजी नाईक आणजोर यास कर्जाची निकड लाविली आहे. आणजोरकर याचे हाल कठिण आहे. आपणास कलावे याकरितां लिहिले असे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa is informed that Krishnarao Chaskar was oppressing Gangaji Naik for debts.*

---

१ कृष्णराव चासकर कल्याणचा सुभा.

No. 14] [6-2-1735?

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

सेवक वासुदेव जोसी नमस्कार विनंती. येथील कुशल ताा माघ वद्य दशमी मुकाम कल्याण जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे, विशेष. राजश्री पंतप्रधान याणी राजश्री विठल विस्वनाथ यांस कांहीं कार्य सांगोन कल्याणास पाठविले. ते येथे येऊन त्याणी त्या राजकारणाची चालणा माणसे पाठऊन केली आणि राजकारणाचें सूत्र ठीक करून हलीं त्या कार्यास ते जाणार. त्यास मारनिले पूर्वी येथे आले ते समई त्याणी राजश्री पंतप्रधान यांचे पत्र आणिले होते की हे त्या प्रांते राजकारणास जातील, तेव्हां यांची साह्यता करणें. त्यावरून हलीं ते आम्हांस साह्यतेविसीं हटकितात. त्यास आम्हाजवळी पाईचे माणूस सेंदोनसें जे पाहिजे ते सिध आहे. पाईचे लोक देऊन, परंतु स्वार आम्हाजवली नाहींत. याकरितां स्वाराविसी राजश्री पंतप्रधान यांस पत्र पाठविले आहे व स्वामीस हें पत्र पाठविले आहे; तरी स्वामीजवली दोनसे स्वार पाठवावयासी असिले तरी पाठविले पाहिजे. स्वार आलियावरी आम्ही येथून लोक देऊन त्याची रवानगी करून. जरी आपल्याजवल स्वार नासिले तरी राजश्री पंतप्रधान यांस पत्र लिहिले आहे हें त्यांजकडे रवाना करावें, म्हणजे ते साहित्य करणे ते करतील. अथवा जे आज्ञा करणे ती करितील. त्याप्रमाणे वर्तणूक करून. कळलें पाहिजे. स्वामीस स्वार पाठवावयास अनकूल पडिले तरी स्वामींनी स्वार पाठवावे. त्यांचा रोजमरा राजश्री विठल विस्वनाथ देतील. येविसी राजश्री पंतप्रधान यांचीहि आज्ञा आहे कीं विठल विस्वनाथ रोजमरा देतील म्हणून आहे. आपणास कळावे याकरितां लिहिले आहे. बहुत काये लिहिणे? कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Vasudev Joshi asks Nana to send him some troops for the help of Vithal Vishvanath who has been asked to proceed on a political mission.*

No. 15] [17-2-1737?

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी सां नमस्कार विनंती येथील कुशल तागायेत छ २७ सवाल जाणोन स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. रा विठल विस्वनाथ

लस्करामध्यें आले होते त्यास आपण आज्ञा केली कीं पुणियास (फाटलें * .*) निरोप देऊ म्हणोन (यापुढील मजकूर फाटला आहे.)

¶*Vasudev Joshi sends a communication to Chimaji with reference to Vithal Vishvanath. The letter is fragmentary.*

No. 16] [*May 1737?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक हरबाजी ताकपीर रामराम विनंती. येथील कुशल गुरुवार संध्याकालपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी पत्र पाठविलें तें आज संध्याकाळीं पावले. सर्व अभि(प्राय) कळों आला. मोर्चे बहादरपुरापलीकडे आहेत. मोर्च्यापासून * * रे चा कोट गोलीच्या टप्यावर आहे. तीनी मोर्चे समान नाकें पाहून राखिले आहेत. त्यास लुटीचा अर्थ तरी आवाईमुलें कुल वस्त भाव कोटाखाली नेली. कोणाचे हाती कांहीं लागले नाहीं. त्यामधें ताकीद वरचेवर करीत असों. वरकड तमाम रयतेस कौल दिल्हा त्यामुलें कोटाखालीं रयत गेली. त्यातूनहि कांहीं येऊं लागले आहेत. चोहूं रोजांत कुल येतील. पाण्यामुळें कोटाखालील रयेत बहुत हैराण जाली त्यामुलें येऊं लागली आहे. आमच्या मोर्च्यावर तोफाचा मार बहुत होतो. येक सेख दाऊद जमातदार आजच ठार जाला. वरकड सर्व सुखरूप आहेत. वरकड लोकाचा दरकार बहुत आहे, यास्तव नवे लोक ठेवीत असों. आज आम्ही जिवधन किल्याकडे स्वारीस गेलों. मोर्च्यावर राजश्री चिमणाजी नारायण ठेविले असेत. मांडवीकर खबरदारी करून आहे. वरकड आज्ञेप्रमाणें वर्तणूक करून. वरकड पांचसातसे स्वार व पाचसेंपर्यंत माणूस केलवे माहिमाकडे गेलीं. या चहूकडे लगट जालासा दिसोन कार्य सिधीतें पावतात. तरी याचाही विचार केला पाहिजे. लोकाचे सामान पांच सात हजार पाहिजे याची तरतूद करणार खावंद आहेत. सर्व कार्य स्वामीचे पुण्यप्रतापेंकरून होऊन येईल. धारावीवर मोर्चा हजार माणसाचा ठेऊन वसईवर इब्रत पाडिली. परगणे वेसावे * वानरे * परासिक यांचें घेतल्याचें वर्तमान लिहून पाठविले * * दाणा बहुतसा नाहीं, यास्तव तारवें पाठऊन वसईकर भात घोडबंदरांतून भात आणितो तरी त्याची बंदोबस्ती केली पाहिजे. मुंबईहून तारवें येतात त्याजवर धारावीचा गोला येईसा आहे. तरी तेथें तोफा ठेऊन तारवें बंद केलीं पाहिजेत. बहुत काय लिहिणें हे विनंति.

¶*Harbaji Takpir reports to Chimaji Appa the condition of the writer's battery and advises firing from Dharavi.*

No. 17] [21-2-1738?

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवसी

आज्ञाधारक नारोजी कडू दंडवत कृतानेक विज्ञाप्ति विनंती. येथील क्षेम ताा छ १२ जिल्काद पावेतो मोकाम मढ स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्तित आसे. राा आनंदराव लांडगे यांचे निशान, मोर्चे किलेसनिध गेले, तेसमई मारनिलेनी निशान मोर्चेयात नेल्हे होत. त्यास किलेवरून गोला लागून निशान उडून गेले; तरी स्वामीनी आनंदराव लांडगे यांचे निशानबदल ताफता येक कद निमे लाल व निम हिरवा रुजू पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे. सेवसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶Naroji Kadu requests Chimaji Appa to send a piece of red and green silk to restore to Landge his flag that was destroyed in an assault upon Mhar fort.

No. 18] [11-3-1737?

पाा छ २१ जिलकाद

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक म्हालोजी मुठे कृतानेक साष्टांग दंडवत सेवेसी विज्ञापना. ताा छ १९ जिलकाद पावेतों मुाा चांबली वर्तमान येथास्थित असे. साहेबाचें आज्ञापत्र सादर जाहलें तेथें आज्ञा कीं साष्टी वसई प्रांती फिरंगियाची दाट आवई आहे तरी पत्रदर्शनी आपले जमाव सुधां स्वार होऊन राजश्री सुभेदार याकडे जाणे म्हणून आज्ञा. त्यास संभर स्वार समजाविले, दीडसें समजावयाचे आहेत. तेहि लोकरीच समजावीस करून आज्ञेप्रमाणें तयार होऊन जातों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. मौजे सोमोडी येथील कुरण चांबलीकर सरनाईक यांणी गुदस्तां राखिलें आहे, ते यंदा गवत कापून नेतील त्यास कापून नेऊ देणे, आणि मग तुम्हीं राखणें म्हणून आज्ञा. त्यास कुरण सरनाइकांनीं कापून नेले; आणि हली गुरे घाळून चारितात. त्यास आम्ही कुरण राखावयास कुरण्या पाठविला होता, त्यास ते म्हणतात कीं आम्ही रदबदल करून कुरण आपलेयाकडे करार करून तुम्हांस पत्र आणून देऊ म्हणतात; आणि आमचा कुरण्यास राखो देत नाहीं; तरी सरनाइकास पत्र द्यावे कीं, म्हालोजी मुठे याकडे सरकारपागेस

कुरण देऊन राखावयास सांगितले आहे तरी त्याकडील कुरण्या राखेल त्यास राखो देणे. हरकत न करणे, येसे पत्र देविले म्हणजे आमचा कुरण्यास राखावयास ठेवितों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mhaloji Muthe of Chambli informs the Peshwa of his readiness to join the forces at Bassein as ordered.*

No. 19] [*1727?*

• छ २९ जिलकाद.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

पोष्य रामचंद्र माहादेव साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीने पत्र पाठविले तेथें आज्ञा कीं, जुनर प्रांतपैकीं गुदस्ताची बाकी राहिली आहे तो येवज व साल-मजकूरचा बारमाहे पांच हजार रुो पाठवणें म्हणून. येशास गुदस्ताची च्यार हजार रुो रसदेचे नेमणूकपैकीं बाकी देणे निघाले आहे; परंतु मुलकास साडेपांच हजार रुो सूट दिलियामुलें येवज निघत नाहीं. याखेरीज गुदस्तां कमावीस आकारली होती त्यास सालमजकुरी या दंग्यामुलें तोहि आकार जाला नाहीं. येशास आपण श्रावण शुध प्रतिपदेस स्वार होऊन आपले दर्शनास येतो. दर्शनांती हिसेब मनास आणिल्यावर अवघाच हिसेब कळेल; व सालमजकूरचे बारमाहाची विल्हे तेथेंच करून देऊन. तैसीच खांदेशचे रसदेची विल्हे साताराच करून देऊन, मार्गेच यावें; परंतु प्रजन्य बहुत यास्तव राहिलो. याउपर दुसरे नक्षत्रहि निवाले, प्रजन्यहि हलका होईल आणि स्वार होऊन येतों. विदित जाले पाहिजे. बहुत काय लिहिणें. आपले राहणे सातारा कितीक दिवस होईल, दरबारची बोलीचाली निवडली कीं नाहीं तें लिहिले पाहिजे. जुनर प्रांतीचा बंदोबस्त लौकर होंत नाहीं तर मुलक जातो. मन माने तैसे पैका जावजी घेतो यामुलें जमीदाराचीं पोटें भरो लागलीं. जावजीने आजी ता कनिष्ठतरी पंनास साठ रुो घेतले. सर्व गोष्ट फार पसंतीने जाली ते पत्री काय ल्याहावें? दर्शनांती कळेल. फिरंगियाने लबाडी आरंभून ४ गांव मारिले. सेंभर बंदे[1] रांडापोरे नेली. मोबादला जो पाहिजे तो कराल; परंतु थोरला विचार करणे असेल तर येकानेच करावा. जुनरी इतके फंद आबाजी गोपालाने केले. बाइको सेर त्याणे केली.

---

१ कैदी.

जावजीहि त्याणे केला. येसियास काजी दाऊदखान गटीत असतो; त्याने भेटीस म्हणून बोलाविले, कैद केले. यैसे वर्तमान आले आहे. लौकरीच येतो. तेथेच निर्वाह करूं हे विनंती.

¶Ramchandra Mahadev brings to the notice of the Peshwa the highhanded activities of Javji and the Portuguese in the district of Junnar.

No. 20] *[27-3-1737*

श्री

श्रीमत राजश्री आपा
स्वामींचे शेवेसी

विनंती शेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ ६ जिल्हेज मुकाम बहादूरपुरापावेतो स्वामीचे कृपाद्रिष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन निघालो ते शनिवारी रात्रीस आवसीचे प्रहर रात्रीस राजावलीच्या उतारावरी आलो. त्यास टोपीकरास सुचे जाहाले. त्याणे तमाम चौक्या ठेविल्या. त्यास राजावलीच्या उतारावरी मेट ठेविले होते, ते मारावयासी चोरीने दीडशे माणूस बा। मोराजी सिंदे व बाजीराऊ बेलोसे पाठविले. मेटावरी पंचवीस माणूस होते ते कापून काढिले, तव भरती येऊन पाणी भरले. प्रात:काली निघोन उतार जाल्यावर माणिकपुरियास येऊन मुकाम केला आहे. पुढे आज्ञेप्रमाणे वर्तणूक करून रयेतीस कुल कौल द्यावा म्हणजे सरकार किफाईत आहे. शाहारात सिरतेसमई आम्ही लोकांस ताकीद केली कीं, रयेतीचे काडीस येकंदर हात न लावणे. प्रथम दिवसी कोणी किरकोळ वस्तवानी घेतली ते रयेतीचे रयेते फिरोन देविती. सेवेसी विदित जाहाले पाहिजे.

¶Shankraji Keshav reports to Chimaji Appa his arrival at Bahadurpura and of his having disposed of the Portuguese outpost at Rajavali.

No. 21] *[27-3-1737*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव साष्टांग नमस्कार विनंती. तागायत छ ६ जिल्हेजपावेतों मुकाम बहादरपूर सुखरूप असों विशेष. राजावळीचे उतारावरी

आले. लागे येऊन भेटले. त्यास टोपीकरास लस्कर येतें हे आवाई होती, त्यामुळें तमाम खाडी किनाराचा बंदोबस्त केला. दोनसें माणूस बंदरावर, तीस माणूस राजावळीचे उतारावर होतें; व बाजे उताराचाहि बंदोबस्त केलाच होता जागृत फार दिसोन आली; व लागियाचे विचारें जालें कीं चौकी मारून यावें; आणि मुख्य स्थलास जावें. त्यास शनवारीं आवसीचे प्रहर रात्रीस, राजावळीचे उतारावर आलो. सवासें माणूस लागियाचे विचारें गलबतावरी घालून, तीस माणूस राजावळीचे उतारावर होतें तें मारून टाकिलें, तेसमई बोभाट जाहाला. समीप चौकिया होत्या, त्याणी यैकतांच खबरदारी केली. आत उतरोन जावें तों खाडीस पाणी भरलें. मग इलाज नाहीं यैसें दिसोन आलें. मग लोकांवर बलात्कारं करून, दोनसें माणूस हत्यारे समेत खाडींत घातलें. ते पार जाहालें, परंतु लोकांचीं हत्यारें कितेक बुडालीं व पांधुरणेंहि बुडालीं; परंतु आगरांत पाये घातला इतकाच अर्थ जाहाला. थोरलें कार्य यामुळें न (च?) जाहालें नाहीं. हेच गोष्टी श्रमे करून साध्य जाहाली. मेहनत केली ते परस्परें विदित होईल ते प्रमाण. पुढेंही गगाजी नाईक याचे व लागियाचे विचारें जालें तरी मुख्य स्थलचा विचार मनास आणून. वरकड हे जागे स्वामीनी पाहिल्याबर पुढें कितेक जागे सोडवावयाचे त्याची विचारणा करावी लागेल हे विज्ञप्ति.

¶*Shankraji Keshav reports to Chimaji his failure in taking the enemy unawares at Bassein.*

No. 22] [*Recd. 19-3-1738*

छ ९ जिल्हेज

श्री

पुा. श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विज्ञापना यैसीजे. आज्ञा की धारावीस मातबर मनुश खटपट्या तरतुद्या यैसा हजार माणसानसी तेथे ठेवावा तरीच तो जागा खबरदार राहून त्याची सलाबत गनिमावर पडेल. तरी रामाजी माहादेऊ तेथे ठेवावा म्हणून आज्ञा. त्यास रामाजीपंत बराच माणूस आहे. खटपट्ये आहेत; परंतु येथील ठेवावयाचा विचार होईल यैसे जाणून कागद न पोहचता ठाणेयासी उठोन निरोप घेऊन गेले. त्यास पत्र पाठविले आहे. आले तर त्यास येथे ठेवितो; नाही तर दुसरेयांसीं तरी ठेवावा लागल. त्यास जो ठेवावासा करार होईल तो लेहून पाठवीन. * [१]सेवेसी श्रुत होये [२]हे विज्ञाप्ति.

¶*Letter to Chimaji Appa. Chimaji intended to post Ramaji Mahadeo at Dharavi, but hesitating to accept the responsibility he went back to Thana even before orders reached him.*

---

१ या खुणापुढील अक्षेर निरनिराळ्या वळणांचीं. २ यापुढील अक्षर मात्र खंडोजी माणकराचें असें दिसतें.

No. 23] [31-5-1737?

छ १४ सफर

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

च्यरणरज कृष्णाजी नाईक आणजूरकर व रामाजी माहादेव वगैरे सरदार मो। ठाणे मालाड सा। नमस्कार अनुक्रमे दंडवत विनंती उपरी. येथील वर्तमान जाणून ता। छ १२ सफर पावेतो या प्रांतीचे वर्तमान येथास्तित असे विशेष. आज पाहाटीस च्यार घटका रात्रीस गलबते तीन घेऊन गनिमाची स्वारी येरगलचे तारियावर येऊन लागले. त्यास येथून आम्ही अगोधरच पालथी पाठविले होते. त्यास गनीम अलीकडे उतरला, हे वर्तमान आईकोन वरचेवर स्वारी झाडेयानसी निघोन गेले. त्यास गनीम गोलीचे टप्यावर आला होता. त्यास आम्ही चालोन मुकाबला करावयासी गनिमावर जातांच गनीमाने माघार घेतली आणि पलोन खुसकीचे मार्गी मढास गेला. गलबतें बंदरांत धरून जाळिली. तेथं गलबतें जलत तवर च्यार घटका बसलों होतों. गलबतें चांगली जळलेयावर निघोन ठाणे मजकूरी स्वारी सुधां पावलों. युध्य हावे हा हेत सर्वांचा होता. परंत मुकाबला होऊन आला नाहीं. मौजे येरगल गाव तमाम जाळून आलो. सेवेसी श्रुत होय. विसेष आम्ही चोकड पालथी ठेविले आहेत. चौकशीने असो हे विज्ञापना. विसेष. पोस ठाकूर बरखंदाज सिपाई जदीद चाकरीस राहवयासी आला असे. कल्याणास याची वस्ती आहे. सिपाई खबरदार असे. तैनात करार करावयाचा हुकूम करणार वडील समर्थ आहेत. सिपाई चांगला आहे. तैनात रुो आठ ८ करावयासी आज्ञा केली पाहिजे. तैनात करार जालेयावर चाकरी मुरारजी नाईक यांचे जमावात करील. सेवेसी विदित होय हे विज्ञापना. येथे तूर्त पावणे तीनसें माणसांचा सरंजाम आहे; परंतु कर्णा नाही. ठाणे मजकूरी कर्णा आगत्य १ येक स्वारीस असावा. तर कर्णा येक पाठवावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. कर्ण्याविसी मार्ग लक्षीत असो हे विज्ञापना.

सेवेसी लखमाजीराव खानावलकर सा। दडवत विनती उपरी. आपली बोली-चाली बहुत कितेक प्रकारे होती; परंतु तूर्त स्वामिकार्यास आलो, सर्व प्रकारे

उर्जित होय येसे करणार स्वामी समर्थ आहेत. आज्ञा होईल तर दर्शनास च्यरणाजवल येऊन. हे विज्ञापना.

¶[*Krishnaji Naik Anjurkar reports to Chimaji Appa that the enemy concerted an attack on Malad but had to return discomfited owing to the vigil of the Marathas.*

No. 24] [*31-3-1737?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक मुरारजी नाा अणजूरकर मो देऊल मोताईचे क्रुा सा दंा ताा छ १० माहे जिल्हेज पावेतो स्वामीचे कृपाअवलोकनेकरून सुखरूप असो विसेश. सामान पाा ते पावले बिा

रा कानोजी माणकर यांबरोबर दारू [1]केले २

व नारायेण गडकरी यांबरोबर सामान बिा

९ पाहारा
४ कुऱ्हाडा
२ कुदली
४ दारू केले
१००० गोल्या

१०१९

येणे प्रो सामान पोचले. त्यापैकी रा होनाजी बलकौडे यासी दारू केले २ दोन व गोल्या ५०० पाचसे देऊन, वेसावेयाचा कोटास रा केले असे; व वेसावेयाचे पत्र आले नाही. परंतु कोट फत्य जाला येसा दिसोन येतो. विसेश दारू गोलीची बेगमी केली पाहिजे; व तोफा पाठविल्या नाही; तर तोफाची मारग लक्षीत असो. उदईक रातकाली मुरचे लावितो. सेवेसी लिाा असे. तोफ सतवर पाठवावयाची आज्ञा केली पाा. वेसावेयाचे फत्यचे पत्र आले म्हणजे सेवेसी पाा. सेवेसी श्रुत होये. विसेश लोकास अडसेरी देणे म्हणऊन आज्ञापत्र सादर जालें; परंतु संनिधचे गांव वोस पडले आहेत. तेथून दाणा आणून लोक

---

1 Pouch for Gunpowder.

खातात. तो सरकारची अडसेरी घेतात यैसा विचार नाही. दाणा मिलेना तेव्हा सरकारचे कोठीचा गला आणून अडसेरीस देऊन; व काही भरतीस लोक पाठवावयाची आज्ञा केली पा. सेवेसी विज्ञापना.

¶Murarji Anjurkar acknowledges receipt of ammunition sent to him and reports to Chimaji Appa that the fort of Vesawa is not still seized.

No. 25] *[31-3-1737*

पौ छ ११ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक चिमणाजी भिवराऊ व शंकराजी केशव साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत चैत्र श्रुध्य येकादसी गुरुवार सकालचा प्रहरपर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष. आजी तर्फ साष्टीकडील वर्तमान काये जालें तें कलत नाहीं, व इकडील तिकडे कलत नाही; हे गोष्ट कैसी कार्यास येईल? तिकडे जागे हस्तगत कोणते जाले, पुढें होणे कोणते, त्यास टोपीकराचा जोर केसा आहे तो अर्थ सविस्तर लिहिला पाहिजे. वसई तों बलावली आहे. नित्य मोर्च्यांत पांच सात माणूस जाया होतें. सर्व जनाचे विचारें धारावी बंद होऊन, तेथें ठाणें बसोन, खाडी बंद जालीयावर, याचा आटा व गलबतें बंद होतील, तेव्हां कार्यास येईल. तसेंच घोडबंदरीं धान्य आहे तें टोपीकर वसईस आणितात. तें धान्य जाळून टाकावें; व तसें वसईचे ल्त्याकडील खाडी किनाराचे साष्टीचे गांव आहेत त्याचा दाणा जाळून टाकावा म्हणजे आतां दाणा येणार नाहीं. विना धारावीहून खाडी बंद जालियाबगर बंद होणार नाहीं. जर ते बंद होत नाहीं तर त्यांस चहूकडून कुमक होईल. बारा हजार रुपये काली मुंबईस पाठविले, जर्दीद लोक ठेवावयासी पाठविले असेत; व दोन पतेमारी गोवीयासी रवाना परवाचे दिवशीं पाठविल्या. तेथून जमाव आणविला असे, त्याची भरती होत जाईल आणि आपलेकडील सरंजाम होत नाहीं. येथें बावीससें माणूस आहेत. मोर्च्यावर मात्र बसले आहे. या मोर्च्यांनी बंद आगर मात्र होईल; परंतु कोट येतो यैसा अर्थ नाहीं. सुरंग चालवावा तरी पुलेणीची[१] भुई, कोटाभोंवते मैदान फार दूरवर आहे यास्तव सुरंगाचा इलाज नाहीं; व मागें जिवधन व मांडवी आहे ते ठरावोन बलाविला आहेत. तेथें फौज पाठावावी तर आम्हांजवल

---

१ पुलिन=वाळवंट, रेताड.

रती नाहीं. आगर थोर, अरण्य आगराचें नवकोस लांबी, यास्तव भरती
ाडितां येत नाहीं. पांच हजार मांणूस दुसरे पाहिजे. त्यास लोक ठेवावे
ाउपरी दुसरा आर्थ कोणता? त्याचें सर्वस्व गेलें तरी तो शरण येऊन तहावर
णार नाहीं. यास्तव सरंजाम करवावा. अद्याप मागील ठाणी आलीं नाहींत.
व्हां त्याचें बल कमी कैसे होतें? पांचसें माणूस मानाजी आंगरे याचें आणवावें,
पुणियासी लोक ठेवावे; व राजश्री हरबाजी पाटील यांजकडून ठेवावे; व
ाकोलकर आणवावे. बारा हजार माणूस पावतें करावें, तेव्हां जफ्ती होईल.
क फौज मनोर प्रांतें गेली पाहिजे. स्वामीचेच चित्तांत सरंजाम करावयाचा
ेचार येतो कीं नाहीं हा विचार लिहिला पाहिजे. आम्ही जागा जागा येथें
सलों. पुढें तरतूद जाली पाहिजे; तरी करबेलीयास माणसें पाठवावी. दोन
जार बरकंदाज तिकडून आणवावे; व राजश्री मल्हारपंतास सांगोन सहस्र माणूस
ाणवावें; व कोली चाकरीस आणवावा. चहूंकडून लगट होईसें करावें. याचा
ेचार स्वामीचे चित्तांत काय येतो तो ध्यानांत आणून ल्याहावा. तरतूद करावी,
ानरे वेसावे येतें कीं नाहीं, तसेच परसीक बेलापूर हे जागे फौज ठेवू(न) घ्यावे
सा लगट करावा. सातारा राजश्री माहादाजीपंतास लेहून दोन हजार माणूस
ंकडील ठेवावें. यैसा येलगार चहूंकडून जाला पाहिजे. आगरांत जागा
दिस्ती योग्य पाहातो; असिला तरी स्वामीस लेहोन पाठवितो; आणि त्याचे
दिस्तीचा सरंजाम केला पाहिजे. आधीं सर्व गोष्टी चित्तांत आणून सरंजाम
ावा. बेलदार व पाथरवट सारे आणवावे. दिसगत लाऊं नये. दारू-
ोलीचा सरंजाम पोख्ता करावा. याउपरी रयेतीची आशा धरूं नये. चहूंकडे
ास्त पाडून टाकावी. जमाव जदीद पांच हजार आगत्य ठेवावा. याचा अर्थ
चेत्तांत आणून आज्ञापत्रें सादर केलीं पाहिजेत. सेवेसीं विदित होये हे विज्ञप्ति.

¶Shankraji Keshav informs Chimaji Appa, of Bassein being strongly einforced by the enemy and suggests a line of procedure to be followed to xpedite the capture of the place. He also narrates the difficulties in his way nd suggests a course to be adopted to overcome them.

---

lo. 26] *[21-3-1738*

; १७ जिल्हेज.

श्री

श्रीमंत राजश्री आपा साहेबांचे सेवेसी

चरणरज कृष्णाजी गवंडे दिा नथोजी नाईक गौडे मुकाम जंजिरे अर्नाला,
रणावरी मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत सेवेसी विज्ञापना. ताा छ ११ माहे

5603

जिल्हेज पावेतो जंजिरे मजकूरचे व सेवकाचे वर्तमान यथास्थित असे. विशेष. येथील इमारतीचे काम येणेप्रमाणे आजपर्यंत सिध्र जालें. किंलियाचे काम ईा छ १० रजबपासून बुरुज तीन, बहिरव बुरुज १ भवानी बुरुज १ व बावा बुरुज १, यैसे तीन बुरुज जमिनीपासून उंच. बावा बुरुज काम दोन गज आले. दोन्ही बुरुज पायापासून नवहात जमिनीबराबर काम आले. त्याजउपर छ २२ रमजानी तिही कामावरील लोक अगदी बाहेरील दक्षिणेकडील किल्यापासून नवशा हातावर खब्यामध्यें फिरंगी याचे वेळेचा जीर्ण हणवंत बुरुज होता त्यास काम लाविलें. तो बुरुज घेरा येकसें पंधरा हात पायापासून जमिनीबाा च्यार हात पाया भरिला. तेथून अगदी काम जमिनीपासून आठरा हात उंच सिध जाला. , जमिनीपासून नवा हातावर जंग्याची जमीन भरीव काम जालें. जंग्या[1] आठ धरिल्या असत. तेथून नवा हातावर दुसरा आठ कोठड्या पाडून, लादण्या करून तख्तपोसी सिध जाली. सदरहू सोला तोफाचा निमोणा काम तयार जालें. सफेली[2] टाकून, सिनेपान दोन गज केली. सा हात रुंदीस फली आहे. वरील जमीन लोकास राहावयास, लांबी हात सतावीस व रुंदी हात सतावीस येणे प्रमाणे आहे. गोडे काम अगदी जाले. सुताराचे हातचे काम तख्तपोसीचे काम, होणे असे. याउपर छ ९ माहे जिल्हेजी मागती तिही बुरुजाचे लोक जिकडील तिकडे कामावर लाविले आसेत. दुसरे जदीद लोक पापडीहून राजश्री बालाजी चंदरराव तीनसे लोकानसी इमारतीच्या कामावर, राजश्री नानासाहेबाची आज्ञा घेऊन, जंजिरे मजकुरास आले. त्याही पश्चिमेकडील किल्याचा बुरुज बहिरव बुरुजापासून दक्षिणेकडील भुज दोनसे सतर हातावर गर्भ टाकून येताल बुरुजास काम लाविले असे. पाया खाणोन छ मजकूरी पाया भरावयास आरंभ केला असे. वर्कड काम जिकडील तिकडे लोक निकडीने करितात. इमारत सदरहू किल्याचे बुरुजास, चौरस सात हात घेरा चुन्याचे काम चालते; मधे पुरणीस गिलकारी (?) व धोंडे घालून, पुरणी भरितों. सेवेसी श्रुत होय, इमारतीच्या कामास पाणी घागरीनी पुरत नाहीं. पखाला असाव्या व इस्ताद. संबला व पावडी व कुदल्या व करल फोडावयास हातवडे वगैरे सामान पाहिजे. सदरहू सामानाची पोख्ती बेगमी जालीयानें पुढले साली काम तयार होईल. श्रुत होय हे विज्ञाती.

¶*Krishnaji Gavande, mason, communicates progress of the repairs of the fortress of Arnala.*

---

(1) Loophole; तोफा मारण्याकरितां तटाला ठेवलेलीं मोकळीं भोकें. २ तटाची गच्ची.

No. 27] [2-4-1737?

श्री

श्रीमंत राजश्री आपा साहेब
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक आनंदराऊ येरुणकर व उदाजी पाटेल उतेकर मो वानरे कृतानेक रामराम विनंती. ताा छ १२ जिलेजपावेतो स्वामीचे कृपेकरून सुखरूप असो विसेश. पहिले दिवसी वानरेयास गेलो, तेव्हां लोक जखमी जाले; त्यांपैकीं मोराजी नाईक खांबकर मृत्य पावला व आजारी भारी आहेत ते सेवेसी रा केले दिा

१ दिा येरुणकर
१ दिा उतेकर
१ दिा गोंदजी नाईक धामणसे खुर्द
—
३

येकूण तीन आजारी सेवेसी पाठविले असेत. सेवेसी श्रुत होई हे विज्ञापना.

¶*This is a list of the sick and wounded who are sent back to Chimaji Appa's camp from Bandra.*

No. 28] [3-4-1737
पौ छ १४ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक खंडोजी माणकर सां दंडवत विज्ञापना. ताा छ १३ जिल्हेज रविवार साईकालपावेतों स्वामीचे कृपावलोकनेकरून येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. आज दोन प्रहरी रा होनाजी बलकवडे लोकसहवर्तमान येथे आले, त्याजबरोबर च्यालीस पंनास माणूस जखमी आहे. त्यासमागमे लोक देऊन उदईक जखमी ते रवाना करीन. जखम्याबरोबर माणूस बेमुबलगा जाईल, त्यास ताकीद करोन फिरोन पाठवावे. फिरंगी इंग्रेज तीन हजार खाडीपलीकड जमा जाला. वोहोट होतो ते समई जमा होऊन किनारा खाडीच्या उभे राहातात. गलबते सवासे दीडसेपावेतो खाडीत आहेत. इंग्रज तीनसाडेतीनसे माड्या व कोटांत कंबरदस्ता होऊन तयार असे. मोर्चा सांप्रत करार करितो त्याजवर मारानें कस्त

करितो. इंग्रेज बेमुबलगा आहे. रा बळकवडे यांसी खाडीच्या नस्तावर माडी आहे तेथें राहावयासी सांगितले आहे. तो जागा राखल्याने माहीमदेखील जेर आहे यास्तव त्यांस तेथें ठेविले असेत. साऱ्या साष्टीचें नाकं हेंच असे. तरी येथील मजबुदी स्वामीनी पोख्ती करावी. आम्हाकडील हर सावंत बाबाजीराव राणे यांचे बरकंदाज तेथील बुरुजात आहेत ते स्वामीनी जरूर जरूर रवाना करावे. पंनास बरकंदाज याजकडील आहेत ते रा करावे. साऱ्या साष्टीचे जुज येथे आहे. निमित्य कीं, खाडीचा वोहोट जाला म्हणजे पाये उतारा होतो यास्तव जीव लाऊन खबरदार आहित. आज उद्या आम्हांवर घालावे हाहि इरादा दिसोन येतो. त्याची चिंता स्वामीचे कृपाकरोन आहे यैसे नाही. वरचील लोक तों आम्हांस गालीप्रदाने तो लितात. त्याचा तपसील लिहिता गाठ पडत नाही. सारांश स्वामीचा पुण्यप्रताप आहे तेथें येशास न्यून काये आहे. स्वामीनीहि तेथें बहुत खबरदार असिले पाहिजे. कुराडी दाहा व कुदल्या टिकाव खोरी दाहा जरूर पत्र पावतांच रवाना केली पाहिजे. लोक जर्दाद आणावे याची तरतूद आधी आधी करावी. ही स्थले हस्तगत जाल्याने लोकांची बेहबुदी तूर्त जैसा जो म्हणत तैसे यैकोन माणूस वोढोन ठेवावे. निमित्य की स्वामी कार्यवादी आहेत. याकरितां माणूस वोढावे. कदाचित स्वामी म्हणतील की पैसा द्यावा लागतो. जो जैसे म्हणल तैसे काये निमित्य द्यावे तर हा विचार सांप्रत चितात आणावा यैसे नाही. कार्य जाले पाहिजे. स्वामी सर्व जाण तेथे विस्तारे शेवक लोकीं ल्याहावें यैसे नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ती.

¶*Khandoji Mankar requests Chimaji Appa to send men and arms to help him to dislodge a joint force of the English and the Portuguese near Bandra.*

No. 29] [*Recd. 3-4-1737* ?

पौ छ १३ जिल्हज प्रहर रात्र

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

विनंती यैसीजे. काल वसईस गलबते गेली, त्यासी शोध मनास आणितां मुंबईहून गलबते गेली. मग इंग्रजाची कीं फिरंग्याची हे कलत नाही. परंतु लक्ष प्रकारें मुंबईची यैसे दिसते व स्वामीची आज्ञा कीं वानरेपासी जावें व आमचे सर्वांचे विचारे वानरेपासी जाऊन बसावे. शहाचा शह आण बोलीचाली करून सनधानें (समाधानें)

आपणादखत वानर साफ करावे. समाधानें निकाल न निघे तर मोर्चे खामखा घ्यावे हा निच्य(य) केला, आण निघोन जावे, त्यासी गुणाजी सेणवी याही लिहिले कीं वानरे पा(या) कंडन जाणे याकरितां जावे न जावे यैसे ज़ाले. गेला आण खटखट पाडली तर स्वामी म्हणतील कीं आम्हीं समाधानें निकाल करीत होतों. आपण जाऊन बैसले आण साहेबकाम धकाविलें. यैसे सर्व जन म्हणले. वरकड होणे जाणें ते स्वामीचे पुण्यप्रतापेकरून होईल. याकरितां सेवेसी विनंती लिहिली असे. याचे उत्तर उदईक छ १९ तेरखेस येऊन पावते करणार स्वामी समर्थ आहेत. उत्तर आले म्हणजे छ १६ तारखे उठोन जाऊन, सेवेसी श्रुत होर्+य हे विज्ञाप्ति.

¶*Khandoji Mankar inquires of Chimaji Appa what he should do, since Gunaji Shenavi has prevented the writer from proceeding against Bandra in obedience to the addressee's instructions.*

No. 30] [*5-4-1737?*

छ १९ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक कृष्णाजी नाईक अणजूरकर व रामाजी माहादेव मो मालाड च्यणांवरी मस्तक ठेऊन सिरसां नमस्कार अनुक्रमे दंडवत विनंती विज्ञापना. ताा छ १४ जिल्हेजपावेतो येथील वर्तमान येथास्थित असे विसेष. हुजुरून पेदरेल १ रतन पुरो याबरोबर पाठविला तो पावला. उद्यांपासून भटी रचावयाचें काम चालीस लावितों. आज मजूरदार ५०० पाचसे जमा जाहले. काम निकडीने चालवीत असो विसेष. काबाडी भिवंडीपैकी १९ येकूणीस हुजुरून पूर्वी पाठविले आहेत त्यास हजीर ईाा छ २७ जिलकाद पासून आज ताा लाकडे तोडावयाची तीं तोडिली. याउपरी यांस येथें ठेवावयाचें काम नाहीं. लांकडे चौहो भटीची तोडिली आहेत. आणखी पाहिजेत तर सिपाई लोक तोडितील. इतके असोन काबाडियासी नख्त दर महा रुो ४ व दररोज तांदूळ ०८१॥ प्रमाणे द्यावे लागतात. येकूण सरासरी दरमहा दर नंबरी रुो ७। सवासात पडतात. येकूण सदर आसामीस दरमहा रुो १३७॥ द्यावे लागतात. इतके असोन याउपरी त्यांच्याने दुसरे काजकाम होत नाहीं.

¶*Krishnaji Naik Anjurkar informs Chimaji Appa of the preparations he is making for the works of construction.*

+ येथून अक्षर खंडोजी माणकराचें.

No. 31] [9-4-1737?

श्रीशंकर

श्रीमंत माहाराज राजश्री

आपा स्वामीचे सेवेसी

विनंतीपत्र सेवक आज्ञाधारक नारो रघुनाथ मुकाम ठाणे पणवेल तो वाजे चर्णावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १९ माहे जिल्हेज पावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचे व तपे मजकूरचे वर्तमान येथास्थित असे. सेवेसी विज्ञापना येसिजे. कुलाबियाकडील वर्तमान फिरंगाणातील कबिले पलोन वस्तभाव घेऊन जलमार्गे गोवियासी जात होत ते राजश्री मानाजी आंगरे यांही धरून नेल. गलबते सुमार १२ बारा. मोठी गलबते ५ पांच व लहान ७ सात येसी पाडाव करून घेऊन गेले. हे वर्तमान कुलाबियाहून सिपाई आला तो सांगत होता. बेलापुरास कसबे पणवेल येथील होड्या २ दोन पाठविल्या होत्या त्यांतील येक होडी कांही सरंजाम न्यावयास कसबे मजकूरी येत होती ते बेलापूरच्या फिरंगियाणी देखिली. तेथून वाघेरीच्या खाडींत येऊन दबा धरून होडी घेऊन गेले. कोळी व इटेकरी वर होते त्यांही उड्या टाकून पलोन आले येसे वर्तमान जालें. स्वामींनी आज्ञापत्र सादर केले त्याजप्रमाणें मुलकांत सिपाई पाठऊन गावोगावचे पाटेल जमा केले. ते म्हणो लागले कीं जे चाकरी करावयासी उमेदवार होते ते तो पहिलेच चाकरी करावयासी गेले, आतां आम्ही निवळ कुळंबी राहिलों आहूं, येसे म्हणतात. याजउपरी जी आज्ञा होईल त्याजप्रमाणें वर्तणूक करून. आपण आज्ञा केली होती कीं हत्यारबंद लोक पाठवणें म्हणऊन सेवेसी विनंती लिहिण लागली. त्याची काय आज्ञा ते केली पाहिजे. त्यासारखी वर्तणूक करून. राजश्री सुबराव जेठी पुणियाहून आपल्याकडे येत होते ते कसबे मजकुरी आले आहेत त्यास बरे वाटत नाहीं. त्यास ठेविले आहे. बरे वाटलियावर सेवेसी येतील. लोहाराविसी कल्याणची आज्ञा आली होती त्याजवरून लोहार २ दोन हत्यार सुधां पाठविले आहेत. तपे मजकुरी वेठविरळा[१] व जेवा[२] येसा बहुत आले गेले. उपसर्ग बहुत होतो. त्यास तपा मार्गावरील आहे. जितका येतो तितका वेठविरळा व जेवा मागतात. तरी स्वामीने आपले आज्ञापत्र सादर केले पाहिजे. वाहणाची जुती सुमार ५६ छेपन पाठविली आहेत. पावलियाचे उत्तर सादर केले पाहिजे. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

¶*Naro Raghunath of Panvel communicates to Chimaji Appa that some families of the Portuguese proceeding to Goa were captured by the Angria.*

१ वेठविरळा = वेठबिगार. २ जेवा = जेवण.

No. 32] [9-4-1737

श्री

श्रीमंत राजश्री अपा स्वामीचे
सेवेसी

पो +शामराऊ आंबाजी कृतानेक नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ १९ जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामींनी तीर्थरूप राजश्री नानास पत्र पाठविले ते प्रविष्ट जालें. या प्रांतें आलियावरी साष्टीचें ठाणें हस्तगत केलेवर कसबी फिरंग्याच्या ठाणियास हशमाचा व स्वाराचा जमाव रवाना केला आहे. तीहि हस्तगत होतील म्हणून लिहिलें, त्यावरून वर्तमान कळोन समाधान वाटलें. त्या प्रांती गेलियावर स्वामीचे पदरी येश पडिले हे गोष्ट उतम जाली. पुढेहि फिरंग्याकडील ठाणी हस्तगत होतील तें वर्तमान ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तरी तीर्थरूप राजश्री नानास स्वामींनी कोल्हापुरचे यात्रेस जावयास आज्ञा दिल्ही होती, त्यावरून ते स्वार होऊन श्रीचे यात्रेस गेले. स्वामीस वर्तमान विदित व्हावे याकरितां लिहिले असे. यानंतर लोकांचे जरूर प्रयोजन आहे तरी पुरंधर वज्रगडपैकी शंभर माणूस पाठऊन देणे म्हणून आज्ञा. यैसियास दोही गडचे लोक पूर्वी शंभर माणूस स्वामींनी समागमें नेले. याखेरीज सातारा सिकारीच्या कामावर व पागेस व वरकड जागा जागा चौक्यावर पुणियांत विहिरीच्या कामावर लोक आहेत व तीर्थरूप राजश्री नाना समागमे स्वामींनी कोल्हापूरास जावयास बरकंदाज व स्वार देविले होते त्याप्राा गेले नाहींत. याकरितां त्यास चालीस पनास माणूस गडचे समागमे न्यावे लागले. यैसे वर्तमान लोकाचें आहे. स्वामींनी सांप्रत निकडीची आज्ञा केली त्यावरून दोही गडचे लोक येणे प्राा

४३ किले पुरंधर बाा संताजी बांदल
७ किले वज्रगड बाा रामजी नाा सिंदा
———
५०

येणे प्राा पनास असामी पाठविले आहेत. याजपासून चाकरी घ्यावयास आज्ञा केली पाहिजे. लोकाचा रोजमरा व नावनिसीची याद आलाहिदा लेहून पाठविली आहे त्यावरून विदित होईल. लोकास रोजमरा येथून येक महिनियाचा

+ श्यमाराव अंबाजी किरकोळे, दिवाण, रा. कोरेगांव (सातारा), हा बापूजी श्रीपतचा भाचा. श्यामरावाचा मुलगा बापूजी श्रीपतास दत्तक दिला. तोच पढे श्रीपत बापजी नांवाचा अहमदाबादचा सुभा होय.

देऊन पाा आहेत. गोलंदाजाविसी स्वामीनी आज्ञा केली होती, त्यावरून दोघे गोलंदाज पेशजी राा केले आहेत. रोजमरा दर माहे रुाा

७ कुसाजी गोलंदाज पुरंधर

९ लिंगोजी कानडा वज्रगड

१२

दोन असामीस दरमाहे बारा रुाा रोजमरा आहे. येका मिनीयाचा यैवज त्यास घेऊन पाा आहेत. सेवेसी श्रृत जाले पाहिजे हे विनंती.

¶*Shamrao Ambaji congratulates Chimaji on his successes and reports having dispatched fifty men as ordered.*

No. 33] [*12-4-1737?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ २२ माहे जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. चिरंजीव राजश्री धोंडोपंत बारव्या पलाकडे सोलसेब म्हणून फिरंगियाचा गांव डाहाणूचे पलाकडले सरदेस आहे, तेथें माडी आहे, गांव बरा अडचण जागा आहे, तेथें जवारकराचा गजाडकर त्रिंबकजी प्रभु आहे त्याचे हवीवर गेले. त्यास त्रिंबकजीनें शकटभेद करून फौजेस दगा द्यावासा विचार केला होता. खिंड धरली होती. परंतु स्वामीचें पुण्ये समर्थ, फौज निघोन आली. परंतु दोन भले माणूस पडले व दोन तीन घोडीं पडली व पांच जण जखमी जाहाले. या प्रकारें जवारकराकडील कमाविसदार लबाडी करितात. दुसरी गोष्ट गजाडकराचा व आसेरीकराचा येक बेत त्यामुळें गजाडकर गाडे भरून दाणे पावितात व वरकडहि सामान किलियास पावितात. दिवसेंदिवस किला मजबद होतो. त्यास विना जवारकराचें पारपत्य केलियाखेरीज ते हालखुद राहत नाहीं व किलियाचा सामान मना होत नाहीं. येविसीं चिरंजीव राजश्री धोंडोपंत याचें पत्र आम्हांस आहे तेंच स्वामीकडे पाठविलें आहे त्यावरून सविस्तर कलेल. आमचे विचारें त्रिंबकजीस परिछिन्न हाताखालीं घालून शिक्षा करावी म्हणजे बंद होईल व आपल्या हिताची गोष्ट आहे. तरी स्वामीनी येविसीं आम्हांस आज्ञा करावी म्हणजे त्याचें पारपत्य करून. जरी आमचे स्वार सावरोन निघाले नसते तरी

त्याणी दगा केलाच होता. येक वेळ त्यास गोष्ट जिरली म्हणजे फिरोन येसी वर्तणूक करावयास चुकणार नाहीं. यास्तव पारपत्य अगत्यरूप करावें. येणें करून मोठी गोष्टी कोण गोष्टी ती कीं किलियास सामान पावणार नाहीं. फिरंगाण प्रांतीची कुले गंजाडामधें व जवार प्रांतामधें जाऊन राहिली आहेत तेहि मनोर प्रांतीं आणावे म्हणजे त्याचें पारपत्य सहजेच होईल. स्वामीस कलावें याकरितां लिहिले असे. सारांश आमची स्वारी जाऊन त्रिंबकजी प्रभूस आणावें तरी सांपडेल न सापडे यास्तव स्वामीनी जवारकरास सांगोन कांहीं बाहाणा करून तजविजेने त्यास बोलाऊन आणावा. मग हे गोष्टी काढून पारपत्य करावें. सारांष जवारकर लबाड आहेत. परगणे पारडी व पाहुणबारे सरकारांत घ्यावे. ही निमित्यें ठेवावी. गजाडकर लबाडी करितात त्यास जर आजीपासून जवारकरानें येसें केलें तरी परगणे गजाड मारून जाळून टाकितों. आतांच आज्ञा करावी. गजाड जाळून टाकून जवारकर येसें करितील तरी तो प्रांतच तो जाळून. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav reports to Chimaji Appa the treacherous conduct of the Chief of Jawhar and advises his chastisement.*

No. 34] [*12-4-1737*

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक खंडोजी माणकर मो वानरें सां दंडवत विज्ञापना ता छ २२ जिल्हेजपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान येथास्थित विशेष. आम्हाकडील सिपाई लोकांचे भाऊबंद समाचारास येतात. येथून खर्चास घेऊन जातात. त्यास अटकाव होतो. तरी भाऊबंद अगर गावचे कुणबी अगर मोहार येतील त्यास रजा[1] दिली पाहिजे. चाकरमाने यासी मात्र अटकाव करावा. गुणसावंत यांचा भाऊ व मेहुणा व माहार व दुसरे माणूस येसे समाचारास आले ते जातात. शेवेसी शृत होये * हे विज्ञाप्ति.

¶*Khandoji Mankar requests Chimaji Appa that some arrangement should be made by means of which relatives of the soldiers coming to visit them should perform their journey unobstructed.*

---

१ परवानगी;

5611

No. 35] [12-4-1737

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक खंडोजी माणकर मो वानरें सां दंडवत विा ता छ २२ जिल्हेज-पावेतों स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. येथून तांडेल व सफरी च्यार आसामी रावतानी धरोन आणिले होते. त्यांपैकी तांडेल मुंबईस रवाना केला. त्यासबरोबर इंचबेटनी कागद पाठविला तेथें आपण फिरंगियाचे मदत करीत नाही, जे करतव्य ते तोच करितो. वानरेहि त्याणी बलकाविले म्हणोन तपसिले लिहून पा. तो कागद बजिनस पाठविला आहे त्याजवरोन विदित होईल. स्वामीच्या पत्राचे उतर पाठविले म्हणोन लिो. यैशास पत्र आजून येथे आले नाही. परभारेंच आपणाकडे गेले की काये हे नकले. हली तांडेलासमागमे दुसरें पत्र त्याचे आंगी शाहा लाऊन लिहून पाठवितो. माहीमच्या कोटाचा मार येथे काय निमित्य करिता, आपकरोन पाणी व खाणे देखील पोंव्होचविता, आण कुरत्रिमें कुमक करीत नाही म्हणोन लिहिता, यैशा च्यार शाहाच्या गोष्टी लिा आहेत. इंचबेटास द्यावे म्हणोन लेख केला तेथून जाब आल्यावर वरचेवर रवाना करितो. इंचबेटाचा यावयाचा पैगाम असे, याकरिता जे त्यास लिा ते शेवकासहि लेहून पाठवावे. तो आल्यावर मग करतव्य बोलणे असेल ते स्वामींने बोलावे. परंतु जोपर्यंत तो येई तो दुसरेकडून पत्रे न पाठवावे. येविशी आज्ञा ते प्रमाण. तेथून जाबसाल येईल तो शेवेसी पाठवितो. गोवंजी (?) ना व जीब * * ईक हे कोणाचा कागद घेऊन सीवचे खाडीत पहोन जात होते ते त्यास सापडले. त्यांत लिा होते कीं मुंबईचा फे * * काये कैसा आहे तो लिा म्हणून लिा होते ते कागद सापडले. यास्तव त्यांस वसवसा प्राप्त जाला. शेवेसी कळावे. याबद्दल ते वसवसा खातात, यासाठी विचार करोन त्यास येथवर आणावे म्हणजे इंग्रजाचे सख्य होईल यास्तव लिा असे. सेवेसी श्रुत होय * हे विज्ञाप्ति.

¶*Khandoji Mankar reports to Chimaji Appa the disavowal of the English of having helped the Portuguese.*

No. 36] [1-4-1738

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ २१ जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेंकरून येथास्थित असे विशेष.

स्वामीनी छ १८ जिल्हेजचीं पत्रें पाठविलीं तीं काली छ २१ मिनहूस पावली. फिरंगियाचे आरमाराचें वर्तमान लिहिणे म्हणून लिहिलें. काली छ मजकुरीं सुरतेहून फिरंगियाच्या पढग्या वगैरे गलबतें पंचवीस वसईस आलीं. दुसरीं लाहान थोर जाहाजें तीसपर्यंत दर्यामधें असतात व तुम्हाहून जाहाजें * * * हून देखिली. स्वामीनी लिहिलें कीं फिरंगीयाचे बातमीचें वर्तमान राजश्री बाबूजी नाईक याचे पत्रावरून कलेल. फिरंगियानी लकडकोट व तोफा सर्व सामान सिध्ध केला आहे, व अरनालियावरी येलगार करणार. कालोखाचें गोटावरी चालोन जावें आणि चांद उगवलियावरी गांठ घालावी यैसा विचार केला आहे. गनिम तुम्हावर खामखा येतो तरी तुम्ही बहुत खबरदार असणे म्हणून लिहिलें त्यावरून कळलें. यैसियासी आम्ही येथें व जंजिरेमजकुरीं जे खबरदारी करणे ते केली आहे. गनिम आला तरी (मार) देतो. स्वामीचे पुण्य समर्थ आहे तो काय चिंता आहे? राजश्री संभाजी सिंदे व खासा राजश्री व्यंकटराव व आम्ही खबरदार असों. विदित जालें पाहिजे. शामलाची जाफराबाद गायकवाड याणी घेतली होती त्यास त्याणी घेऊन वोस टाकिली. मग शामलाकडील लोक जाऊन फिरोन वसविली. कलावें यास्तव लिहिलें असे. जिलकादचा रोजमरा सत्वर पावलियासी उत्तम. आमची हैरान गत होते ती होऊ. काली फिरंगीयाचे अरमार आले तपसील गलबतें

२ पाल
५ गुराब दवणी
२० पडग्या
―――
२७

येकूण सत्तावीस सुमारें आलीं असेत. त्यास वाळवंटावरी राजश्री खंडोबा पाटील होते त्यास अरमारी मात्र पांचसासें लोक आहेत. वरकड दिसोन अधिकोत्तर आले नाहींत. तथापि आला तरी त्याचा हिसाब धरीत नाहीं. सेवेसीं विदित होये हे विज्ञापना.

¶Shankaraji Keshav communicates to Chimaji Appa the news of the arrival of 25 Portuguese ships at Bassein and assures him that the writer with Vyankatrao Ghorpade and Sambhaji Sindia is doing his best to ward off the attack.

No. 37] [13-4-1737?

छ २४ जिल्हेज.

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक खंडोजी माणकर मो वानेरें साष्टांग दंडवत विज्ञापना. ता छ २३ जिल्हेज पावेतों स्वामीचे कृपावलोकनेकरून येथील वर्तमान येथास्तित असे विशेष. मुंबईहून थैली कागद आपणास आली ते रवाना केली असे. येथून कागद मुंबईचा जनराल यासी पाठवावा लागला तर त्यास दोन च्यार थैल्या बारीक पांढऱ्या पाठविल्या पाहिजे. कागद कोरे नाहीं व शाही नाहीं. कागद लिहिणे लागतात याकरितां शेवेसी लिहिले असे. सरंजाम करणार स्वाम आहेत. शेवेसी श्रुत हो हे विज्ञापना.

¶*Khandoji Mankar forwards to Chimaji Appa a communication from the Governor of Bombay and asks for writing paper to send a reply to him.*

No. 38] [Recd. 6-5-1735 ?

पौ छ २३ जिल्हेज.

श्री

पुरवणी राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. गंगाजी नाईक आणजोरकर यास जाऊन आजी पंधरा सोला दिवस जाहले, अद्यापि कांहीं वर्तमान कलत नाहीं. जरी कार्य करणे असेल तरी अशा प्रसंगात करावें. फिरंगी प्रस्तुत काले फार सेर जाहला आहे आणि त्याजवळी बहुतसा जमावहि नाहीं याकरितां या समई काम करावें. प्रस्तुत जनराल ठाणियाहून वसईस जाणार आहेत, अशामधें कार्य करावें. आरमारहि त्याचे गेले. जमावही बहुतसा जमावही नाहीं. मसीद आमच्या लोकाचे वस्तू घेवली नाहीं याकरितां सेर जाहला आहे. अशामधें उभयता लाग्याचे विचारे कार्य साध्य होतसे असेल तरी करावें. तांदुलाचा हासील त्याणी घेतला तरी तांदूल बाणकोटास जरूर पाठवणे याकरितां हासील देऊन रवाना करून. परंतु हासीलाचे येवजी त्याचे हरयेक गांवीचा पाटील आणून पैका घेऊन आणि कार्य करणे असेल तरी हासीलाचा मुबादला तूर्त करणार नाहीं. मासपक्ष गला खाऊन. कलावे याकरिता लिहिले असे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Vasudev Joshi suggests to the Peshwa that it is the most opportune moment to strike as the Portuguese general is away with the fleet.*

No. 39] [*13-4-1737*

छ २३ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक खंडोजी माणकर मो॥ वानरे सां दंडवत विज्ञापना. ता॥ छ २३ जिल्हेज बुधवार जाणोन स्वामीचे कृपावलोकनेकरोन येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. आज दुसरा मोर्च्या तयार केला. या मोर्च्यापासोन माडी व कोट तीराचे खास्तविर संनिध आहे. त्याजवर त्याकडील मार अतिशय बहुतसा होतो. माहीम व गलबते व माडीचा अरमार यैसे येक जागा मोर्च्यावर गोळे पडतात. रा॥ होनाजी बलकवडे यांजकडील गडी गोल्याने ठार जाहाला. येक वेळ पायउताराहि होणार म्हणोन यैकितो, तरी राऊत दुसरे पाठविले पाहिजे. दारू गोला तोफाचे जेलाल व बंदुखीच्या गोल्या त्वरेने येऊन पावत ते करणार स्वाम समर्थ आहेत. स्वामीचे कृपेकरोन येशच प्राप्त होईल. थोरली तोफ व दारू वजन पके अडीच सेर लागते, याकरितां दारू व गोली पोख्ती येऊन पावे तें केले म्हणजे इकडीन तोफाने बराच मार करितों. हा मोर्चा अजून मुस्तेद जाला नाहीं. आज रात्रौ तयार होईल. शेवसी श्रुत होये कृपा वर्धमान केली पाहिजे. इंग्रजाकडील थैल्या कागद स्वामीस रा॥ केले म्हणोन त्याणी लि॥, यैशास ते कागद परभारे आपणाकड पावले कीं काये हे न कले. परभारे वर्तमान यैकितो की ते कागद थेल्या फिरंगियासी सापडल्या, त्याणे पाण्यात बुडविले म्हणोन यैकिले. सत्य मिथ्य कलत नाहीं. शेवेसी कलावे म्हणोन लि॥ असे. सेवसी श्रुत होये. आज मोर्चा मुस्तेद केला. कांही होणेच आहे. त्यास तोफांचे गोलियाने मोर्चा तोडोन टाकिले. सांजमर्याद मोर्चा तगला तरी रातीतोन मोर्चा पका करितो. सेवसी श्रुत होय हे विज्ञाप्ती.

¶*Khandoji Mankar informs Chimaji Appa of the progress of the siege of Bandra and asks for a fresh supply of shot to enable him to return the enemy's fire. Incidentally he refers to a rumour that the letters from the English at Bombay to the Peshwa have been intercepted by the enemy.*

No. 40] [*13-4-1737*

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक शंकराजी केशव साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २३ जिल्हेज पावेतों समस्त सुखरूप असों विशेष. काली अरनालियाहून आलों.

अरनाळें बहुत युक्तीनें जाऊन घेतलें. पाल हस्तगत केला तो रंग सेर्णवी याचा आहे तो आणून आगासीचे खाडींत ठेविला. त्याजवर चौकी ठेविली आहे. आपणच जाऊन हें केलें. विदित व्हावें म्हणून लिहिलें आहे व दुसरीं पंचवीस गलबतें माहांगिरिया येवढीं मौजे भोलीजेचे मुसलमानाचीं होतीं तीं तजविजेनें हाताखाली घालून चाळीस दर्यावर्दी चाकर केले व गलबतें बांधावयाचे सुतार चाकर करितों. जितका दर्यावर्दी मिळेल तितका ठेवितों. तसाच तिकडे कोली असेल तो ठेवावा, या प्रांतींचें माणूस जितकें लगामी लावावयाचें तितकें लावावें, म्हणजे फिरंगी व त्याचें शत्रुत्व पडेल, म्हणजे फिरंगी कितेकाचें इतबार धरणार नाहीं यैसेंच करावें यास्तव करितों. वसईचे आगरची व बहादरपुरियाची रयेत तों येत नाहीं. ते लांबली. ते आपल्याहि कार्याची नाहीं. कोटाभोवते वोसच पाडिले पाहिजे व मौजे जु या गावास स्वामींनी कौल दिल्हा, परंतु तो गांव उद्वासच घालवावा लागतो. तो गांव टोपीकरास खबर व सामान पोहोचावितो तें कार्याचें नाहीं. आधीं बेलापुरास मोर्चे द्यावयाचे नव्हते. आधीं धारावीची रवानगी करावयाचा विचार होता तो न जाला. या उपरी जों गोंव्याची कुमक न आली तों धारावीस मोर्चा बसला तरी उतम आहे. विदित होये हे विज्ञप्ति.

¶*Shankaraji Keshav informs Chimaji Appa of having captured Arnala and advises batteries being at once opened upon Dharavi.*

No. 41] [*15-4-1737?*
[*1738?*

छ २७ जिल्हेज.

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायत छ २९ माहे जिल्हेजपर्यंत स्वामींचे कृपेंकरून यथास्थित असे विशेष. "दवण प्रांतीं फौज पाठऊन मुलुक ताराज करावा हा विचार होताच. सांप्रत तुम्हीहि लेहून पाठविलें कीं पांचसे माणूसपावेतों तिकडून पाठवावें. पांचसे माणूस आम्ही येथून पाठवितों. फौज रवाना करावी" म्हणून लिहिलें. यैसियासी सात आठसें स्वार व हजार माणूस पोंहचे येवढें सामान असिलें पाहिजे. त्यास "च्यारसें साडेच्यारसें राऊत वगैरा पथकें मिलोन नेमून पाठऊं व तीनसें राऊतानसीं राजश्री चिमणाजी बापूजी यास रवाना करावे, पांचसे माणूस तुम्ही द्यावे व च्यारसें माणूस जवारकर याजकडून देववावे, त्यास तेवढे सामानानसी दलवटून विल्हेस लागेल. त्यास राजश्री चिमणाजी बापूजी यास व पाइचा जमाव पाठवावयास

अनकूल पडेल कीं नाहीं.? कदाचित फौजेची मातबरी तुम्हांजवळी याकरितां पाठवाल. पुढें फौज गेलियावरी पाईचे लोक आहेत ते थोडकसे वाटेल यास्तव हा अर्थ चित्तांत आणून पाईचे माणूस नेमून रवाना करावयाची तयारी करणे व राजश्री चिमणाजी बापूजी याची रवानगी करणें", म्हणून स्वामींनी लिहिलें. यैसियासी त्या प्रांते तीन हजार माणूस पाठऊन ढासण करावें हा विचार पर्जन्यकालींच लिहिला होता. वरकड पांचसें माणूस व राजश्री चिमणाजी बापूजी यास पाठवावयाचा विचार तरी आजी या दिवसांत राजश्री चिमणाजी बापूजी यास अगर पांचसें माणूस पाठवावयास अनकूल पडत नाहीं. काय निमित्य तरी प्रस्तुत कालें फिरंगियांचा जमाव येथें भारीच आहे आणि आरमारहि येथें जमा जाहालें आहे. कोणे समई येईल हा भरवसा नाहीं. याकरितां येथील स्वारांचा व पाईचा जमाव फोडितां येत नाहीं. प्रस्तुत येथें मेढियाचें काम लाविलें आहे. त्याकरितां माणूस रिकामे नाहीं. रात्रदिवस काम करितात व जागा मुस्तैद जाला पाहिजे. जागा मुस्तैद +जाहाला पाहिजे दगेखोर आहे यास्तव अनकूल पडत नाहीं. त्या प्रांतें पाईचे माणूस पाठवावयास कारण हेंच कीं त्या प्रांतें नूतन स्थल वसवावें. तुम्हांजवळी लोक आहेत ते पुढें फौज गेलियावरी थोडके वाटतील आणि जागा येव्हां न वसविला तरी कार्यास येईल; परंतु सध्या मुलूक मारून ताराज करावा. शत्रूचें नुकसान ज्या तऱ्हेनें होईल त्या तऱ्हेने करावें म्हणून लिहिले, तरी हे गोष्ट येथार्थच आहे. मुलूक मारून ताराज करावा त्यास हजार स्वार पाठऊन केलियास कार्यास येईल आणि होईलहि. वरकड पाईचे लोक स्थल वसवावयास पाहिजे, त्यास स्थलाचा विचार पर्जन्यकालीं करून, त्यास दवण प्रांतीं फौज पाठवावयाचा विचार आमचे विचारें वैशाख पूर्णिमा जालियावरी दुसरे दिवसीं प्रतिपदेस करावा. यांत स्वामीचे विचारें करणे तें करावें. [२]फिरंगियाचे जमावाचा व आरमाराचा विचार व येथें यावयाचा विचार त्याचा असिला तरी आम्हीं ढासण सिध करितों. हेच संधींत यावयाचा तरी येईल. हें सिध्ध जालें म्हणजे या ढासणास मग त्याणें काये करणे. यास्तव प्रस्तुत येथून फौज पाठऊं नये. पौर्णिमा वैशाखी अलीकडे पलीकडे पंधरा रोजाचे बोले फौज जाऊन जाळून येईल. अडीच हजार माणूस ते प्रांती येक वेल पो, ढासण करून मुलूक पायेनामियाखालीं घालितील, हा विचार आमचे चित्तीं आहे. स्वामीच्या येईल तसें करावें हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav makes several suggestions for approval in reply to the plan already communicated to him by Chimaji Appa for subduing the province of Daman.*

+ मुळांत द्विरुक्ति आहे.

२ येथून अक्षर भिन्न.

No. 42] [17-4-1737

छ २७ जिल्हेज.

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामींचे सेवेसी

पो नारायण जोशी सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ २७ जिल्हेज जाणून स्वकीये कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे. विशेष. वानरें इंग्रजाने पाडिले आणि मुजरद दोघे माणसें पाहावयासी पाठविलीं आहेत, ती आपले नजरेने पाहून आलेनंतर जसे असेल तसे लेहून. पाठऊं. वरकड बातमीचे वर्तमान तरी मुंबैस खबर आहे की राजश्री मानाजी आंगरे याणी रेवदांडेचा पडकोट घेतला. येके दिवसी फिरंगी बाहीर निघोन यांचे मोर्च्यांवरी घातले. तेथें यांची क्षीत जाहली. फिरंगी याची फतेमारी गोव्यास गेली होती ते आली. याणी लिहिले होते कीं गनीम भारी, आपला टिकाव होत नाहीं. काय करावें? त्याचे उतर यासी आलें कीं तुमचे विचारे जैसे होईल तैसे करणे. निघोन येणे, अथवा जुजणे. ते पतेमारी पहिली रेवदांडयास येऊन वसईस आली असे, असे वर्तमान आहे. कळावे म्हणून लिहिले असे. वरकड वासुदेव जोसी यास लिहिले आहे. त्यावरून कळेल. बहुत काय लिहिणे कृपा करीत गेले पाहिजे. हे विनंती.

¶*The dismantling of Bandra by the English and the capture of the fort of Rewdanda by Manaji Angria are communicated to Chimaji Appa by Narayan Joshi.*

No. 43] [17-4-1737

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराऊ माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल चइत्र वद्य चतुर्दसी भानुवासर मुा नासिक जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. उमाबाई येणार म्हणून चासेहोन जेजाला रेहकले बरकंदाज आणविले म्हणून प्रल्हादजीने लिहिलें. त्याजवरून त्यास ताकीद केली असे. जो सामान जेजाला रेहकले तोफा असतील त्या नेल्या पाहिजेत. बरकंदाज देखील जे असतील ते येतील. येथून चिरंजीव राजश्री चिमणाजीपंत याजसमागमे राऊत व बरकंदाज देऊन रवाना केले असेत. लवकरीच येऊन पावतील. आम्ही आमावाशा झाल्याबर गंगाश्नान करून लवकरीच येतों. स्वामीचे आज्ञापत्र आले

5618

असतां प्रल्हाद शामजी याने नादानपणे जेजाला वगैरे सामान पाठवावयास दिरंग केला ; बहुत मूर्खत्व केले. स्वामीने आम्हावर दृष्ट देऊन क्षमा केली पाहिजे. जें आहे तें स्वामीचे आहे. तेथें उजूर अथवा विचार कोण्हीहि करावा येसे नाहीं. आपली फौज राजश्री दुर्जनसिंग याजबराबर आहे. असते पदार्थामध्यें जे होतें ते रवाना केले असे. व अबदुल अजीजखान याची ही फौज रवाना केली आहे. लवकरीच येऊन पावेल. आम्हीहि अविलंबेच येऊन. वर्तमान वरचेवर ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. आम्ही आजीच स्वार होऊन येत होतों, परंतु ग्रहणाकारितां गंगास्नानास राहिलों. क्षमा केली पाहिजे. बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे, हे विज्ञापना. स्वामीनेहि विचार करून जे करणे ते करावें. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Krishnarao Mahadev apologises to the Peshwa for the delay committed by Pralhad Shamji in sending the muskets, carriages and matchlock-men from Chas.*

No. 44] [*17-4-1737?*

श्रीराम

श्रीमंत राजश्री नानां

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक लक्षुमण बलाल सा नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ता छ २१ जिल्हेज मुकाम कल्याण सुखरूप असो विज्ञापना. जासुदासमागमे आज्ञापत्र आले तेथे आज्ञा जे, राजश्री रामचंद्र हरि व तुम्ही येका जागा राहाणे म्हणून आज्ञा, त्यावरून येथून कूच करून त्यांजकडे गेलो. मारानिलेकडे जागा पाहावयास राऊत पाठविले होते. त्यांणी सांगून पाठविलें कीं, कोसाच्या अंतऱ्यानें तुम्ही राहावें म्हणजे तुम्हांस व आम्हांस वैरण काडी मिळेल. परंतु आज त्याजकडे जातो. उपरांतिक मारनिले सांगितील त्याप्रो राहूं. राजणखारीकडील बातमीचे पत्र आलें तेच सेवेसी ब्रजिनेस पाठविले असे. त्यावरून सर्व वर्तमान विदित होईल. परंतु ज्या ग्रहस्तानें पत्र लिहिले त्या ग्रहस्ताचें नांव दृश्य जालिया त्याच्या जिवासी समंध पडेल म्हणून त्याणेच लिहिले असे. यास्तव पत्र पाहून फाडून टाकावें. दृश्य सहसा होऊं न द्यावे. वसईकडे फिरंगियाची दाटी नसली तरी राज(ण)खारीचे कृत्य करवावें. सेवेसी श्रुत होय. रांजणखारीकडे जावयाचें जाहले तरी च्यारपांचसे हशम कोणाकडीलतरी रांजणखारीस पोहचेसे करवावें. हे विज्ञापना.

¶*Lakshman Ballal reports that he has joined Ramchandra Hari and is working in co-operation with him.*

No. 45] [17-4-1737

पौ छ २८ जिल्हेज

श्रीगजानन

राजश्री चिमणाजीपंत
आपा गोसावी यांसी

॥ श्रीमंत उतमगुणपरिपूर्ण निराश्रिया महादाश्रये सदा राजमुद्राविराजित राजमान्ये स्नोपूर्वक विक्रम पतंगराऊ राजे प्रांत जवार दंडवत विनंति उपरी, येथील संतोश वर्तमान आपले कृपेकरून आनंदरूप परिसोन गोसावी यानीं आपले स्वानंद वैभव निरंतर पत्री लेखन आज्ञा करीत गेले पा॥ यानंतर गोसावी यानीं कृपा करून पत्र पा॥ ते उतम समई प्रा॥ होऊन लि॥ अर्थ कलो आला व कितेक विचाराचे वाटेने राजश्री शंकराजीपंत येहीही लि॥ त्याजवरून कलो आले. गोसावी यानी वडिलपणे कितेक विचाराचे वाटेने आमचे स्वहित जाणाने सौरशाविषई आज्ञा केली, की जें सांगणे ते राजश्री शंकराजीपंतास सांगून वसईस रा॥ केले आसे. तरी सामन्याचा परिनाम शेवटास लाऊन उतम होऊन ये ते करणे म्हणोन लि॥ तरी आपणासी गोसावीयाची आज्ञा प्रमाण आसे. दुसरा विचार जाणत नाहीं. हा कालवरी आज्ञेप्रो॥ वर्तनूक होऊन आली, आणि पुढेहि श्रीकृपेनें अंतर पडते येसे नाहीं. त्यासी आपणाकडील राजश्री मल्हार गणेश व तिकडील भगवंतराऊ गोसावियासानिध आस्तां सामन्याची बोली होऊन राजश्री शंकराजीपंतास उभयेपक्षीं सामन्याचा विचार होऊन परिनाम उतम होऊन ये येसी आज्ञा करून रवानगी केली. त्यास राजश्री पंत याचे आगमन वसईस होऊन आम्हास पत्र लिहून पा॥ कीं सामन्याचा परिनाम सेवटास लावावा लागतो. कितेक प्रकारें श्रीमंत राजश्री आज्ञा केली आहे. तर आपणाकडून येक ग्रहस्त पा॥ त्याजवरून येथून बालाजी मोरेश्वर पंताकडस रा॥ केले. त्याची कितेक विचाराचे वाटेने जे सांगणे ते सांगून आपलें पत्र होते ते व तेही आपले पत्री कितेक आशा दर्शऊन आम्हाकडे रा॥ केले. सारे हेच की तुम्ही श्रीवृज्रयोगिणीस यावयाचा निश्चये करून उतर पा॥ म्हणजे राणीकडीलही निचेये करून उभयताचे आगमन श्रीचरणी जालियावरी श्री सर्वा उतमच करील हा विचार सांगून पा॥ त्यासी आपण मान्ये केले. उतर पाठऊन निचये करावा तो राणीकडील सेवक दुर्बुद्धि येही भास्करगडीहून फौज पाठऊन मौजे झारवाड तालुका किले कावनई हा गांव मारिला व हिरोजी दळवी येहि राजगडीहून येऊन मौजे कामारे प्रा॥ वाड हा गांव राजश्री शंकराजीपंतास आम्ही दिला होता तो मारून नेला. वस्तभाव बंद गुरे नेली व बावाखान कुरंगकर येहि

5620

पिपरीकडे आवाडाव केली. याजकरितां सामन्याचा विचार होऊन न आला. येसी वर्तनूक करणे प्रयोजन काय होते ? आपणासनिध विचार होऊन आज्ञा केली आस्तां उतम की काय ? त्याची दुर्बधि वर्तनूक ; बोलतात येक आणि कर्म करितात येक ; सर्व आपणासी विदितच आम्ही लिहावेसें नाहीं श्रुत होय.

¶*Vikram Patangrao Raje of Jawhar to Chimaji Appa, communicating his readiness to join Shankarajipant in the campaign against Bassein: but complains against the latter not accepting his (the writer's) plan.*

No. 46] [*21-4-1737* ?

छ २ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवेसी सेवक त्र्यंबक अनंत देसाई कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. बंदरचे वर्तमान ताा छ १ मोहरमपावेतो येथास्थित असे विशेष. घोडबंदरास आम्हास तेरा लोकानसी स्वामीनी निम रोजमरा देऊन रवाना केलें. त्यास जिलकादचा रोजमरा पुणेत पावला. हाली जिल्हेजचा रोजमरा येणे. त्यास स्वामीनी ठाणे येथें रोजमरा निम्मा दिला. बाकी रोजमरा राहिला तो रा भिवाजीपंत यांबराबर पाठविला नाहीं. वरकड लोकांचा आला. आमचा येथील लोकांचा आला नाहीं म्हणऊन लोक श्रमी. याकरितां सेवेसी रोजमरेची यादी हिसेब पाठविला आहे. मनास आणून रोजमरा पाठविणार स्वामी समर्थ. यानंतर पुणेतील लोक आमचे निाचे आजारी आा ५ पांच होते. त्यास राजश्री खंडोजी माणकर यांही सांगितले कीं अजारी अैचगूल[1] लोक असले तर तुम्ही जिथीचे किलेचे भरतीस ठेवणे, तेथील लोक स्वारीस घेणे. त्यावरून पांच आसामी किले घोसाळेचे तिथीस आम्ही ठेऊन आलो. तेथें ते अलंग पाहरे चाकरी करितात परंतु त्यास तेथें किलेस सनद नाहीं. तर त्याचे रोजमरेची व अडीशेरीची किलेस सनद आा पांचची देणार स्वामी समर्थ आहेत. विशेष. पुणेहून आम्ही स्वारीस निघोन येतासमई स्वामीचे भेटीस रात्री गेलों, त्यासमई स्वामीनी वचन दिले कीं तुम्ही बराबर प्रस्तुत कबिला खाली तलेस नेऊ नको, त्वरेचे काम आहे. स्वारी जालेनंतर तुम्हास जागेचे व बेगमीची सर्वहि अनकूलता करून देऊं. तुमचे सर्व प्रकारें चालवायाचें आम्हांस आगत्य आहे.

---

१ अचकूल=अशक्त, जखमी झालेले.

तुम्ही कांही चिंता न कीजे. म्हणऊन वरद वचन केवल दिले आहे. येसियासी पर्जन्यकालास पावणो महिना आहे. माणसे पुनेत आहेत. कांहीं लोक घोसाळेस व कांहीं बेलापूरी व कांही लोक निशाण कर्णा वानरेस, आम्ही घोडबंदरी येसे पांचाठायीं जाहालों. येसियासी सेवकाचा अर्ज चालवावा कीं स्वामीचे पायापासीं यावयाची आज्ञा पाठविली पाहिजे. भेटीनंतर सेवकासी जी आज्ञा स्वामी करितील ती सिरसा. परंतु सेवकाची कांही विनंती पायापासी स्वामीच्या आहे. याकरितां सेवेसी विनंतीपत्र पाठविली असे. आज्ञापत्र पाठवणार स्वाम समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये विज्ञप्ति.

¶*Trimbak Anant Desai requests Chimaji Appa to send money for making payment to the men serving under him.*

No. 47] [18-4-1738?

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ ९ माहे मोहरमपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. राघोजी कचरा वस्ती मौजे खंडाले ता। नाणेमावल हा राजश्री कर्णाजी सिंदे याचे जमावामधे चाकर होता तो पलोन गेला. याकरिता तुम्ही त्याला मसाला पंचवीस रुा केला तो वरातदारानी घेतला. नफर मजकूर भेटला नाही. मौजे मजकूर सरकारात खाजगीकडे आहे. तेथील सेते जाहाली पाहिजे. तरी राघोजी कचरा व बालनाक परिवार दिा जनार्दन हरि यास बाद घाल्हून निरोप देणे म्हणून आज्ञा केली, यैसियासी राघोजी कचरा मजकूर पलोन गेलियावर त्याला दोन वेला माणसे पाठविली, परंतु आला नाही. याकरिता हाली मसालदार कारकून व सिपाई जे जे पलोन गेले त्यास मसाले करून आणावयास पाठविले. त्यास त्याणी राघोजी मजकूर याजवल्हून मसाला घेतला की नाही अगर तो भेटला कीं नाही कळत नाही. वरकड त्यास बाद घाल्हून निरोप देणे तरी स्वामीचे आज्ञेप्रमाणे देऊं. परतु येणेकरून स्वामीचा कैदेचा बंद राहात नाही. पलोन गेले म्हणावे तरी राघोजीच गेला यैसे नाही. सेसवासे माणूस तो होईल. कानोजी राणे मौजे खाडसी ता। नाणेमावल येथील पाटील आजी दोन पिढ्या रा। कर्णाजी सिंदे याच्या जमावात चाकर, माहुलीस गेलो तेव्हां कानोजी राण्या धारिकरीयात आसामी त्यास स्वामीनी मोहनमाल दिल्ही आहे, तो दाहा पाच माणसाचा जमातदार आहे तो पलोन जाऊन घरी आजी तीन महिने बसला. त्यास येक दोन वेला सांगोन पाठविले परंतु येईना. याकरिता रा। सुभानजीराव येरूणकर यास पत्र पाठऊन त्यास किले

5622

राजमाचीस कबिले आणि त्यास मौजे खांडसी येथील मोकासी राजश्री विसाजीपंत त्याणी स्वामीचे पत्र घेऊन पाठविले त्यावरून कबिले सोडणे लागले. परंतु जेथून चाकरमाने त्याचे पदरी वतन आणि कुलंबावा नाहीसा नाही. त्यास तो पलोन गेलियावरी त्यास न आणावे, तेव्हा मग दुसरे जावयास राहातील यैसे नाही. यैसे रा कर्णाजी सिंदे याजकडील पंचतीस माणूस गेले. त्यास ज्यास आणावयास माणूस पाठवावे त्यास पत्रे येतात, याकरिता गेला तो येत नाही. यास्तव रा कर्णाजी सिंदे श्रमी. आपले कदीम लोक पत्रे आणून जाऊ लागलियावरी जमाव कशाचा राहिला ? येखादे जागा काजकाम मोडला (?) (योजल) तेव्हा काम कैसे होईल ? येक वेल माणूस पलोन गेले आणि त्यास सिक्षा जाहालियावरी माणसास धास्त पडोन माणूस गेले ते फिरोन येते, बंद व कैद चालते. येक गेले त्यास सिक्ष न जाहाली म्हणजे दुसरा म्हणतो की येकाचे काय केले ते माझे काय करणार कल्याणकर चाळीस पनास माणूस गेले त्याचे पारपत्य जाहाले नाही. याकरित दुसरा भेईनासा जाहाला. येथील लोक घाटावरी पलोन गेले. मावलेयातील कितेक मावलात पलोन गेले. व येथून साष्टीस गेले व बेलापुरास गेले त्यार स्वामी आलियावरी सांगोन पारपत्य करावे यैसा विचार आम्ही केला आहे. का की येणेकरून बंद चालेल. घोडबंदरातून दाहापंधरा माणूस पलोन येथे आले होते, त्यास तेहि चाकरी खावंदाची व हेहि खावंदाची. तेथील माणूस ये ठेविल्यावरी कैद, यास्तव आम्ही त्यास साष्टीस पाठविले आणि तेथून पलोन साष्टीर गेले. त्याविसी त्यास पत्रे लिहिली तरीं ते पाठवीत नाही. त्यास आम्ही स्वामी पासून बंदेज करवणार, त्यास हाली जो पलोन जातो तो हिमायेत करून पत्रे घेऊन येतात. त्यास साराष गोष्ट बंद राहे ते गोष्ट करावी. रा कर्णाजी सिंदे याचे लोक पलोन गेले त्याची याद पाठविली आहे त्यावरून कळेल. मोकासी लोका तील लोक पनास साठ माणूस पालीकडील गेले ते येत नाहीत. तसेच गुंजण मावलाकडील व तसेच मावलचे व तसेच कल्याणचे पनास माणूस पावत गेले पारपत्य नाही म्हणोन दुसरेहि पलोन जातात. पारपत्य करावयास जावे तो चहू कडील पत्रे येतात. हरयेक कामास कदीम लोक तिडकेने कामास येतात त्याच बंद तुटला. येथे माणूस गोल्याची धास्त टोपीकर समीप म्हणून जातें. आज पासून पळाला तरी त्यास बोलावेसे नाही. सेवेसी विदित होये. मसालदारानं मसाला घेतला असेल तरी देविला आहे. हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav protests against pardoning deserters. He urge severe measures to keep up discipline in the army.*

5623

No. 48] [April 1737?

श्री.

विनंती उपरी. रात्रीचे वर्तमान तरी तोफेच्या मोर्च्यास आग लागली ते बहुत चेतली. डावे बाजूचा मोर्च्या थोडकासा जळला तेव्हा गनिमाने बंदुखेची येक रंजकी व पाच सात दाहा तोफा मारिल्या. तो मार प्रहर सीमेपलीकडे जाहाला तो लिहावासा नाही. परंतु कोणी माणूस थिगले नाही. परंतु मोर्चे खबरदार राहिले. येथे चर खणावयासी काम लाविले आहे. त्यास आम्हाजवल कुदल्या नाहीं. तरी दाहा कुदल्या थोर पाहून पाठविणे. थोर नीट नसिली तरी पाजऊन लोहाराकडून पाठविणे व अनखी येथून लोखंड * * सा सेर पा आहे, याच्या कुदल्या दोन थोर उतम बेलदारी करून पाठवणे. गोलंदाजाविसी काल रात्री लिा आहे, तरी गोलंदाज सत्वर पाठऊन द्यावे. तारापुराकडे शंभर राऊत स्वारीस पाठवावे लागतात, तरी तुम्ही आपणाजवळून राऊत पंचवीस पाठऊन देणे. बाकी आम्ही येथून देऊ. तरी सदरहू राऊत पंचवीस पाठऊन देणे. कुदल्या दाहा लिहिल्या आहेत त्यामध्यें अनकूल पडेल त्या कुदल्या पाठवणे. कल्याणाहोन दारू आणविली ती दाहामण आली आहे. तुम्हास जरूर असिली तरी लेहून पाठवावे, थोडी बहुत पाठऊन देऊ. कोरे कागद दस्ते २ व खासीथाने सुमार ४ यैसे पा आहेत. घेणे. +सविस्तर वर्तमान लिा बहुत काये लिा लोभ असो दीजे विनंती.

¶*Vasudev Joshi sends last night's report. Availing themselves of confusion caused by fire in Maratha batteries the Portuguese opened their guns but could effect nothing. He asks for sappers and miners and gun-men to be sent to him.*

No. 49] [April 1738?

श्री

राजश्री रामचंद्रपंत स्वामी गोसावी यासी

विनंती उपरी. तुम्ही चिठी पाठविली ती पावली. मोर्च्यावर गनीम प्रहरा-दिवसा चालोन आला म्हणोन लिा ते कळले. गनीम चालोन किती आला होता, गनीम फिरंगी किती होते व राहिला जमाव घोगवरी व भंडारी किरीस्ताव होता त्याजकडील किती ठार जाहाले, आपणाकडील जखमी व पडिले किती, राऊत जुंजास पावले की नाही, गनीम कोटाबाहेर कोठपर्यंत आला होता, हे सविस्तर कळावे म्हणोन बाजी गणेश पा आहेत तर सविस्तर लिा पाहिजे. नस्तावर आरमार

+ अक्षर वासुदेव जोशाचें.

किती आहे, कोटातून गनीम बाहेर पडोन् आरमारचे मार्गे इकडे येणार आहे की काय, हा अर्थ तुम्हास कळलाच असेल, तरी सविस्तर लिा. रा शामजीपंतास दोन प्रहरा पत्र पा आहे. तुमची चिठी आलियावर मुजरद माणसे पा आहेत. उदईक येतील. लोकाविसी व राऊताविसी लिा तरी प्रात:काली राऊत पनास पाठवितो. तुम्ही सविस्तर लिहिणे. बहुत * * * * * *

¶*Ramchandra Hari is asked to communicate full details of the attack of the Portuguese on the Maratha batteries.*

No. 50] [*April 1737*?

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसीं

आज्ञाधारक हरबाजी पाटील ताकपीर रामराम विनंती येथील कुशल तागायत सोमवार संध्याकाळपर्यंत येथास्तित असे विशेष. काल पत्र लिहिलें त्याजवरून वर्तमान कललेच असेल. आजच वर्तमान प्रात:कालीं भोजनें करून राजश्री मोराजी सिंदे व संकराजी केशव व राजश्री चिमणाजी भिवराव येसी येक फौज व आमची येक फौज येशा दोन फौजा करून सोपारियावर गेलो. त्यास तीन बुर्ज होते. त्यास प्रथम आलिकडील बुर्जावर चिमणाजी भिवराव् वगैरे फौज गेली. बंदरावर आम्हीं गेलो. तो आवाईमुलें फिरंगी पलोन बुर्ज टाकून गेला. त्यास येका बुर्जावर च्यार तोफा आहेत व दादरावरील बुर्जावर पांच तोफा आहेत. पलीकडील बुर्जावर च्यार तोफा त्याप्रो तोफा वेगळ्या मात्र आहेत. सोपार तमाम वोस; दादराचा अर्थ तरी वोहटाचे समई विथभर पाणी असत नाहीं व चिखलहि नाहीं. भ्रमेंच करून फिरंगियानें राखिलें होतें. वरकड तेथून निघोन पुढें अर्नालियावर गेलो. तों तेथें उपाय नाहीं. केवल असल जंजिरिया दाखल आहे. येक माडी आहे. परंतु तारवाचे माचाखालीं आहे व च्यार पांच तरांडी फिरत होतीं. आम्हांस देखोन पांच सात गोले टाकिले. मग तेथें लाग नाहींसा देखोन आगासीचे देवलावर गेलो. त्यास माणसांस पाईच्या बारा कोसाची दौड पडली. तमाम चौफेर आ(ग?)र प्रांत बहुत उत्तम मग तेथें स्वार मात्र पुढें धांवोन गेलो. त्यास तेथून आगासींत फिरंगी निघोन तारवांत गेला. बंदरीं वीस बावीस तरांडीं बरींच आहेत. फौज देखोन कांहीं गोले टाकिले. सनिधच माडीच्या नजीक तारवें दोन सावकारी साकर व किरकोल जिनस भरला होता त्यावर लगट करून स्वामीचे प्रतापेंकरून हस्तगत केली. तेथें स्वाराची

चौकी ठेऊन सोपारेंयावरून तळावर आलों. बहादरपुरियाआलीकडे मोर्चा बसविला होता त्यास तेथून उठऊन बाहादरपुरा पाठीसी घालून पुढें माडी आहे तिच्या आश्रानें मोर्चा बसविला आहे. माणूस सातसें आठसें आहे. आमचे व मावळे व मोकासी यैसे मिलोन आहेत. त्यास मोर्चा धरावयास जाता वसईचे कोटावरून तोफांचा मार केला. त्यामुळें आपणांकडील मोकासी यांपैकीं सिपाई गोल्यानें दोन ठार जाले. येकाचा हात उडाला व येक अगदींच उडोन गेला याप्रमाणे आज इंदुवारीं वर्तमान आलें. कललें पाहिजे. वरकड स्वामीचे कृपेकरून हा प्रांत सर जाला परंतु मुलुक लांबरुंद फार, जागा जागा माड्या बुर्ज यांचे रक्षणार्थ आंतील पटीसच जागा जागा ठेवावयास दोन हजार माणूस पाठवावें. बाहिरील म्हटले तर पांच हजार माणूस पाहिजे. यैवज तो माणसाचा विदितच आहे. कळलें पाहिजे. च्यार हजार आणखी माणूस असिलियावर तमाम बंदोबस्त होईल. कललें पाहिजे हे विज्ञापन

¶*Harbaji Takpir reports to Chimaji Appa about his expedition towards Sopara.*

No. 51] *[1735?*

* * नाचण्या वरया हरी * * * * घेऊन ते लोक पोसिले. ह्या पदार्थी चतुर्मास काढिला. रंक तर पादांबुजी जावोन राहिला असतां समर्थ, आज कार्य होते उद्या होते ह्या आस्तेने च्यार मास तेथे क्रमिले. पुढ स्वामी येतात म्हणोन निश्चये होऊन रंक पुढे आला. तंव मागोन राजश्री वासुदेव जोसी आले. तेथील कितीक लिहावे तरी अदृष्ट म्हणोन उगेच राहिलो. येथे दोन पक्ष सेवकास द्वेशटे. येक फिरंग्याचा पक्ष आणि दुसरा तोहि स्वामीस विदितच आहेत. त्यास जो येथे आला तो सत्रुस मोही(?) तदनरूपच होतो का जर श्रवण मनन निजध्यास मग होतो. श्वयंप्रकाश हा अर्थ येथे आहे. जरी कार्य होईल यैसे आसले तरी आम्ही व हव्यालाग्याहीं व जे आमचे सोबती आहेत स्वामिकार्याचे क्षुधित त्याही राहावे. नाही तर राहिल्याने उतर नाही. या उपर काल माघ वद्य सप्तमीचे दिवसी मुंबये वसेहून यात्रेकरू भीमाशंकरास जावयासी आले * * * * * * आमची येक बहीण नूतन क्षोरास जावयासी * * * * * * जावे लागले तेथे काही * * * * * कोन्हाचे काही न घेता येक आमचा द्वेष्टा उभा करोन यात्रा लुटिली म्हणोन आम्हावर तुफान केले. त्यास आम्ही मोहोरीपासून कपर्दिकापावेतों कोन्हाकडोन काही घेतले आसले तर कोटिशाहा ब्रम्हहत्या पंचमाहापातके

त्याच क्षेत्री आचरलीशी होतील आणि कदाचित कोन्ही मुदई उभा राहिला येक देव भट आणि त्याचा बंधु हे टाकोन दुसरा लक्षयात्रेतून कोन्ही सांगितले तरी सर्व अस्मादिकाचा अपहार करोन छीरछेद करावा. हाच मुचलका तेथे कमावीसदार गुरव व तेथील जोसी व जमीदार व कुल यात्रा आणि हे न सांगता राजश्री देवभ(ट) फिरंगाणकर यासच विदित जाले आणि राजश्री जोसी याही आम्हास दरबारास नेऊन इजत घेतली, तेव्हा आम्ही येकटे यात्रेस गेलो होतो आणि हा पराक्रम की येकटा असता लक्षावधी यात्रा लुटावी हा पदार्थ अपूर्व जोश्याचे दृष्टीस पडिला असे. असो. सर्व सत्ये करावयासी स्वामीच समर्थ असत.

स्वामीही कृपापत्री लिहिले की त्या प्रांती स्वारी आहे तरी * * * ठेवावी त्यास साष्टीचे * * * * आहेत. मार्ग जावयाचा अद्यापि शुद्ध आहे, कुंठित जाल नाही, जे पूर्णिमेस स्वामी चिती धरितील ते दिवसीं अनेथा होणार नाही. आजपरयेंत हे राजकारण राखोन ठेविले आसे. का जर नित्ये पंधरा पंधरा दिवसी राजकारण पाहावे लागते. स्वामी हा खबर (?) कधी चिती धरितील हे कलत नाही म्हणोन चातकन्याये अपेक्षा करावी लागते. या उपरी बेलापुराविसी जो स्वामीजवल नेला होता तो आदिपी त्याच राजकारणामधे वाट पाहीत आहे. त्यास त्यांचे स्वजातीचे लोक मनुश पनास आहे आणि आपले भेदाचे दीडसे आहेत, त्यास त्या स्थलाचे पूर्वकडे येक उजाड किला आहे त्याचे नाव पांडवगड. तेथे आपले दोनसे माणूस पावताच तो म्हणतो की मी येथील धंदा उरकोन तुमचे पदरी स्थल घालितो. या उपरी * * सग्राम द्यावा आणि कितीक उर्जित करावे म्हणून * * * * लिच आसे. त्यास तो नित्य म्हणतो[१]

¶*Antaji Raghunath Kavle writes to the Peshwa about a false charge brought against him by Vasudev Joshi. He also gives news about his plans for capturing Belapur.*

No. 52] [*1-5-1737?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल तागायत छ ११ माहे मोहरमपर्यंत स्वामीचे कृपेंकरून येथास्थित असे विशेष.

---

१ या महत्त्वाच्या पत्राचे सुरवातीचे व शेवटचे बंद मिळाले नाहींत. बाजीरावास किंवा चिमाजी आपास अंताजी रघुनाथ कावळे याचें.

सिदी जोहार अरब याजकडील सिपाई काली थोरला मोर्चा डावा टाकून वसईचे बुरजाखालीं जाऊन बुरजावरी फिरंगी यांचे लोक होते त्यासी काय बोलिला न कले. मागती फिरोन मोर्च्यास आला. याउपरि आजि प्रात:कालीं फिरोन बुरजाखालीं बुरजकरी यासी येक दीड घटकापर्यंत काय बोली न कले. मग फिरोन मोर्च्याचे तोफेची खिडकी होती ते वाटेने आंत आला. तेव्हां मोर्चेकरीयानी धरून आम्हांजवली आणिला, त्यास वाजपूस करितां तो कबूल होईना. तेव्हां त्यास मार दिल्हा तेव्हां त्याणी आमचें नांव घेतलें कीं शंकराजीपंती पाठविलें. फिरोन राजश्री खंडोबाचे नांव घेतलें कीं खंडोबानी पाठविलें. शेवटीं त्याची बोली काय जाहाली तें सांगणे म्हणून पुसिलें. त्यास त्याणी सांगितले कीं आपली त्याची बोली इतकीच जाहाली कीं, आपण त्यास बोलिलों कीं दिनचा पाय येथे आला आहे, तुम्ही भेटीस येणें. त्यास ते बोलिले कीं तुम्हीच येणें. याप्रमाणे बोली जाहाली म्हणून सांगितले. त्यावरून त्याची गर्दन मारली. याकरितां आरब व महमदखान जमातदार साठी माणसाचा व गोपीनाथ जमातदार व सिदी जोहार यैसे येक होऊन साऱ्या मुसलमानांस बोलिले कीं जो मुसलमान असेल तो आमच्या कटांत * * * ते रुसोन गेले आहेत. त्यास आमचे विचारे आरब यास न ठेवावा. काय निमित्य तरी त्याची दोन वेला लबाडी दिसोन आली. कैसी स्वामी म्हणतील तरी कालची येक व पहिलें बाजी बेग त्याचा जेजाल बारदार पलोन गेला. त्याणी अनबाचे बिराडीं ताडी खाऊन त्याचा याचा सलांत होऊन कोटांत गेला यैसें दिसतें. परंतु त्याणी स्वामीजवली लटकें सांगितलें कीं वालवंटींवरून धरून नेलें, यास्तव दोन गोष्टीचा संदेह चित्तांत आला. त्याकरितां त्यास दूर करावेसें चित्तांत आलें. त्यास महमदखान याणी व गोपीनाथ याणी फंद करून रुकसती मागतात. कलावें याकरितां लिहिलें असे. या गोष्टीहून+ आधीं सराईस अरबासी राजकारण कडदीनने लाविलें होतें. तेसमई अरबाकडील सिदी बसीर याणें सांगितलें. फिरोन हा कालपावेत नव्हतें. सांप्रत येक बाजी बेगाकडील अरबाचे सोबतीस ताडी खाऊन गेलाच. स्वामीनी ठाणीयाहून पाठविला त्यास येथें येतांच त्यास रजा देऊन लिगाड तर्फेस चालविला. त्यास आजि दोन दिवस दोन वेळ छ १० मोहरमी संध्याकालीं बुरजाखालीं जाऊन बोली काये केली तें नकले. तेथून निघोन, समोरची वसईकडील जंगी तोफेची त्यात फिरंगियादेखता सिरोन मोर्च्यांत आला. येक वेळ मोर्च्याचा लोकांनी गैगुदर केली, सांगितलें नाहीं. फिरोन प्रातकालीं बुरजाखालीं जाऊन दीड घड्या बोली करून मागती तेच जंगीस येऊन आत फिरंगिया-

---

+ येथून अक्षर वेगळें.

देखता आला. मग मोर्च्यांतून पांडुरंगपंतीं धरून आणिला. आरब बाहेर आम्हांजवळ असतां त्यास फिरंगियासी बोली करावयास प्रयोजन काय व मोर्च्यांत यांस ठेविलां नसतां फिरंगियादेखता जंगीने यावया * * *. येसे जवळ ठेविले तरी आम्हास दगा देतील हें समजोन त्यास जिवेंच मारिलें. त्यावरून महमदखान व आरब व गोपीनाथ येकत्र होऊन कूच केले. त्यास वरकड कोण्ही त्या कुटास ज़ुडले नाहीं. त्यास अरबाचा व महमदखानाचा सेरा बिन-सिरस्ता रुबाव आहे त्यास या दों पथकास तों दक्षणेच्या सदेंत राही तों तेथें ठेवावेसे नाहीं. खास्ती आहेत. येथें ठेवावे तरी याचा खेल न कले. रोज उठोन अस्तनीत आग बालगावीसी नाहीं. विदित जालें पाहिजे हे विज्ञापना.

¶Shankaraji Keshav Phadke reports tq Chimaji Appa of his having put to death an Arab who was detected of keeping treacherous relations with the Portuguese.

No. 53] *[Recd. 3-5-1737 ;*

छ १३ मोहरम.

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. रा. अंताजी रघुनाथ येथे आल्यावर स्वामीची पत्रे वरात दिली त्याप्रमाणे आम्ही कबूल केलें. त्यावर बोलिला कीं तुम्ही पत्र वरात न माना तरी राजश्री रायानीं पदक व तुरा मोत्याचा दिल्हा आहे त्याचा विनयोग करून कबिला घेऊन पुण्यास येणे येसी यजमानाची आज्ञा आहे. तुरा व पदक द्यावयास कारण कीं राजश्री आपास श्रुत होईल यास्तव सनगे दिली. त्यावरूनच चितात गोष्ट आली, कीं आपणास श्रीने काय न्यून्य केले आहे आपण हर कोण्हास शब्द घालतील कोण अमान्य करीसा आहे? राजश्री आपासी काय पडदा आहे? येसे असोन कल्पना करून भाषण केले. त्यावरून शोधास लागलों. तो याणी अनुसंधान केले हे सत्य कळो आले. आम्हावर स्वामीनी वरात दिली ती अमान्य करू यास्तव सनगे दिली हे अपूर्वच गोष्ट. आम्ही सेवक लोक, खावंदाने देविले असतां आम्ही न देऊ हे कोण गोष्ट, हे अवघे अर्थ चितात आणून तुरा मोत्याचा गहाण म्हणोन हाताखाली घालून मुद्दा ठेविला आहे. विदित जाले पाहिजे. पैरंतु

---

१ अक्षर वासुदेव जोशी.

स्वामी वडील आहेत. याचा विश्वास धरावा असे नाहीं. बहुत काये लिहिणे लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudev Joshi communicates to the Peshwa his suspicions about Antaji Raghunath.*

No. 54] [*7-5-1737?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक समस्त सरदार मोकाम मोर्चा बाहादरपुरा सेवेसी विज्ञापना. ताा छ १७ माहे मोहरमपावेतो स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. माहे मजकूरचा रोजमरा लोकास पावला नाहीं. खर्चामुळें लोकांची बहुत हैरानगी जाली आहे. राजश्री शंकराजीपंत याजवळ रोजमरा मागतो, त्यास ते म्हणतात की चा(द) जालियावर हुजुरून येवज येणार. येवज आलियावर रोजमरा देऊन येसे म्हणतात. येसियासी येथे माहागाई थर रुपयास सा सात आठ नव सेर दाणे जाले आहेत, तेहि मिलत नाही. यामुळें या दोहोतीही दिवसामधे राा लाडको हरि वगैरे पथकातील चालीस पनास माणूस पलोन गेले. येथें गल्याची आमेदानी होत नाहीं व रोजमरा लोकास लौकर पावत नाहीं. तेव्हा लोक उपवासी काय म्हणून टिकाव होईल? आम्ही काय म्हणून लोकाचा आटोप करावा? तर साहेबी कृपाळु होऊन लोकांस रोजमरा लौकर पावे आणि येथे गल्याची मामुरी होय ते गोष्ट करावयास साहेब धणी आहेत. सेवेसी विदित होय हे विज्ञापना. तीन पायलींचे निरखाचे दाणे तांदूळ विकत घेतो त्याची वानगी सेवेसी पाठविली आहे त्यावरून विदित होईल. याप्रमाणे पके नवसेर तांदूळ मिळतात. समई येसेहि मिलत नाहीं. विदित जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*The Sardars in Bahadurpura request Chimaji Appa to make some arrangement to pay off the arrears of the soldiers which are long overdue.*

No. 55] [*7-5-1737?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक तुबाजी अनंत सास्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ १७ मोहरम स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वृत येथास्थित असे विशाष. स्वामीचे

---

१ आगमन.

आज्ञेप्रमाण सास्टीहून कूच करून काली छ १६ रोजीं तिटोलियास आलो. आजी कूच करून शाहापुरावरी जातो. स्वामीनी कृपा करून पत्र पाठविले तेथे आज्ञा की मुरादखान गेला म्हणोन वर्तमान आले, जे जातील त्यासी रोजमरा न देणे म्हणोन अज्ञा केली. त्यासी मुरादखा, कृष्णाजी चांदगुडा व इसखान वगैरे छ १४ रोजीं आम्ही कल्याणीस आले पूर्वी येक दिवस गेले. प्रतापसिंग स्वार पंधरानिसी आम्हापासी आले. त्यास पूर्वीप्रमाणे रोजमरा देऊं. वरकड सकोजी निकम व सयाजी वायेल व मानाजी पवार व रा श्रीनिवासराऊ येणे प्रा पथके आली. कोणाची सबरनिबर काही कल्याणीहून गेली, काही आजी बहुधा जातील. उद-ईक आगर परवा घाट तोडू. गणती घेऊन पथकवार सेवेसी लिहून पाठऊ. बहुत काय लिहिणे सेवसी विदित होये हे विज्ञाति.

¶*Tubaji Anant informs Chimaji Appa that as instructed by him he is proceeding from Salsette and Titoli to Shahapur and that he is not advancing money to Muradkhan.*

No. 56] [*Recd. 21-6-1733 ?*

पौ छ १९ मोरहम

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराव माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. उपर, येथील कुषल जाणून स्वकीय लिहिलें पाहिजे विसेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जालियावर फिरंगियाचा सल्ल्क जाहला ते सविस्तर वर्तमान राजश्री दादो नरहर यासमागमें सांगून पाठविले आहे त्यावरून विदित होईल. वरकड आपले स्वकीये व मामलियाचें वर्तमान सांगितले आहे तेंहि विदित करितील. स्वामीनी याजवल कोणेविसीं पडदा धरिला न पाहिजे. बहुत काय लिहिणे? कृपालोभ असो दिला पाहिजे हे विज्ञापना.

¶*Krishnarao Mahadev informs the Peshwa that peace has been concluded with the Portuguese.*

No. 57] [*31-3-1738 ?*

छ २२ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ २१ जिल्हेज पावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून सुखरूप असो विशेष. छ २०

563

रोजीं आरनालियासीं गेलो होतो. त्यास इमारतीचे काम चालत आहे. आज तागाइत काम जाले त्याची यादी आलाहिदा पाठविली आहे त्यावरून विदित होईल व छ मजकुरी गलबतें दोन पाडाव केली. त्यास येक कंची[1] त्याजवर खारक व खजूर व पापडखार व तूप थोडेसे आहे. माल जोखून मागाहून लेहोन पाठवितों. व दुसरे घोडबंदकर दर्यावर्दी याची सिबाड हली मुंबईस राहतात. त्याणी डाहाणूस कळक भरून जात होते त्यास धरून आणिले. परंतु ते इंग्रजाचे भिडेस्तव सोडावे लागले. व येक दिवस अगोधर येक धरिलें त्याजवरी सोळा खंडी तांदूळ सापडले व तीन नाला त्यापैकीं दोन पंचरसी हातभर लांब व येक आडीच हात लांब येशा तीन सापडल्या. तांदूळ तो कोठीस लाविले. सेवेसी विदित होय हे विज्ञापना. मोरो केशव याजबा कापड पाठविले त्याचा जाब पावलियाचा आलाहिदा आहे त्यावरून विदित होईल. हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav reports to Chimaji Appa the capture of two vessels laden with cargo.*

No. 58] *[11-5-1737?*

छ २१ मोरहम

श्रीगजानन.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराव महादेऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुषल जाणून स्वकीये लिहिले पाहिजे विशेष. चासेस आलियाउपर भेटीस येणार तो आपले शरिरीं सावकाश नाहीं. याजकरितां दोन च्यार दिवस गुंता पडला. वडिलांस कळावें म्हणून लिहिलें असे. रामनगरकरास कागद कीं बाकी राहिली आहे ते झाडियानसी वसूल देणे व दोन हुजरे येसे लवकर पाठविले पाहिजेत. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे हे विज्ञापना.

¶*Krishnarao Mahadev to the Peshwa : says that he is delayed owing to illness.*

---

१ कच्छी जहाज.

No. 59] [20-5-1737

छ २ सफर

श्री

श्रीमंत राजश्री आपा
साहेबाचे सेवेसीं

सेवक आज्ञाधारक होनाजी सिंदे रामराम विनंती. येथील वर्तमान जेष्ठ सुध द्वितीया शुक्रवार दोन प्रहरपावेतों मुकाम मणोहर साहेबाचे कृपेंकरून सुखरूप असों विशेष. साहेब आम्हांस मणोहरास रवाना केलें त्यास आम्हीं छ २८ मोहरमी येऊन मणोहरास पावलों व साहेबाचीं पत्रें राजश्री आवजी कवडे व राजश्री हरबाजी ताकपीर यासी होतीं तीं त्यांस प्रविष्ट केलीं. त्या उपरी यांहीं आम्हांस मोरचा नेमून दिला. त्यास सेवक मोरच्यावर जाऊन बंदोबस्तीनें जेजाला व लोक घेऊन बसलों. त्यास सेवकाचा मोरच्या व राजश्री आवजी कवडे याचे मोरचे व राजश्री बरवाजी ताकपीर याचे मोरचे व राजश्री विठलपंत याचा मोरचा व राजश्री गोपाल माहादेव याचा मोरचा यैसे पांच सात मोरचे बरे निकट जाऊन गडासी लागू जाहलों. त्यास फिरंगी दोन तीन रोज बराच भांडला. त्यास चहूं-कडून मोरचे बहुत नजिक जाऊन भिडले. मग फिरंगी बहुत जेर जाहला. मग तिसरे रोज कौलास येऊन कौल घेऊन आजच शुक्रवारें प्रातःकालीं स्वार होऊन गेला. त्यास धन्याचे पुनेकरून स्थल हस्तगत जाहलें. स्थलावर धन्याचें निशाण लागलें. थोर गोष्टी. धन्याचें पुने थोर आहे. वरकड लोकानी धन्याचे कामावर जे कस्त खावयाची ते खाऊन धन्याचे पुनेंकरून फत्ते जाहली. साहेबाचे सेवेसीं विदित होये व येथून राजश्री बरवाजी ताकपीर कल्याणास जान्हार आहेत त्यास आम्हांस साहेबीं मणोहरास रवाना केलें. त्यास साहेबाचे पुनेकरून कार्य फते जाहली. त्यास सेवकानें राजश्री बरवाजी ताकपीर कल्याणास येतील त्याजबराबर कल्या(णा)स यावें किंवा साहेबाजवल यावें याची काय आज्ञा ते करावी. बहुत काय लिहूं? कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति.

सेवेसीं चरणरज नीलकंठ शामजी साष्टांग दंडवत प्रविष्ट होय. धन्याचे पुने-करून कार्यसिधि जाहली विदित होये. बहुत काय लिहूं कृपा केली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*Honaji Sindia sends to Chimaji Appa a graphic account of the capture of Manor and asks for further orders.*

No. 60] [23-5-1737?
छ ४ सफर. जाबसुद

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामी
चे सेवेसी

सेवेसी आज्ञाधारक कृष्णाजी माहादेव मुा वानरें सां नमस्कार विज्ञापना. ताा, छ २ माहे सफर पावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचे व मोर्चे मजकूरचें वर्तमान येथास्थित असे विशेष. लखमाजीराव खानविलकर हे जमावसुधां मोर्चे मजकुरीं आहेत व विठोजी कदम आहेत ते हे बहुत येकनिष्ठेनें स्वामिकार्यास तयार आहेत. घरीं मुलें माणसें चिंता करितात, याजनिमित्य समाचारास मनुश्य पाठवितात. तरी स्वामींनें कृपाळु होऊन उभयेतांचा महिना व सिपाई पाठवतात त्यांचा महिना द्यावयाची आज्ञा केली पाहिजे व आणखी दाहा सिपायांचे महिनेयांची यादी लेहून मल्हार चिंतामणि सबनीस सेवेसी पाठविला असे. त्यांचीहि बेगमी करणार स्वामी समर्थ आहेत. सेवसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Krishnaji Mahadev requests Chimaji to pay the wages of Khanvilkar and his men for their services in the recent fighting with the Portuguese.*

No. 61] [24-5-1737?
छ ८ सफर

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायत छ २ सफर पावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचें व या प्रांतींचें वर्तमान यथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाहालें तेथें आज्ञा गोव्यास हुजुरून कारकून गेला होता. त्यास टोपीकरानें तेथें त्यास राहूं दिल्हे नाहीं. वरचेवर रवानगी केली. कारकून आले. त्याणी बातमी टोपीकराची सांगितली कीं पंचवीस तीस तरांडी टोपीकरानी दवणेकडेस रवाना केलीं. दुसरीं तयारी करून रवाना करणार. येक वेळ टोपीकर येईल याजकरितां बहुत कोट किल्याची खबरदारी करून सावध राहाणें म्हणून आज्ञापत्रीं लिहिलें. त्यावरून पत्र येऊन पावतांच जागाजागाचीहि खबरदारी करावयास कारकून पाठविले. आज्ञेप्रमाणें दर्यांत उधणाचीं उधणास गलबतें बातमीस ठेऊन खबरदार असों. लडाईचें

सामान तर अगोधरच किलेकिलांस तयार करून ठेविलें आहे व पूर्वी ट्रोपीकर भेद करितो म्हणून सेवेसी लिहिले होतें. त्यास राजश्री खंडो चिमणाजी व राजश्री शंकराजी मोरेस्वर यांसी भेदाचा संदर्भ लाविला होता. त्याणी सेवकाजवळ तेव्हांच सांगितलें. त्यावरून त्याचेच विचाराच्या गोष्टी सांगणे म्हणून या उभयतांस सांगितलें. त्यावरून तीन वेळ माणूस मुंबईस फिरंगी आहे त्याजकडेस गेला व आला. तो किरिस्तांव त्याचें नांव गलबांव व दुमा कोली अगर वसई व अगर अगासी हे दोघे जण त्याचे मतलबांत होते. तेव्हां त्यास सांगितले कीं मुंबईस फिरंगी आहे याजपासून तुम्ही येतां हें वर्तमान गोव्यांचे विजुरले याजपासून आहे कीं दरम्यान मुंबईच्या फिरंग्यापासून येतां? त्यास गलबाव बोलिला कीं गोव्यापासून ही गोष्ट आहे. त्यास या उभयेतांस त्याणी सांगितलें कीं आपण गोव्यास जाऊन येतो. त्यावरून गलबांव किरिस्तांव येथून मुंबईस गेला. त्या फिरंग्याचें पत्र घेऊन गोव्यांत दोघे विजुरले जुना व नवा याजपासीं जाऊन येथील भेद सांगितला आणि तेथून दिडा महिना येथें आला आणि खंडो चिमणाजी व शंकराजी मोरेस्वर याजपासीं सांगितले कीं तूर्त हा मनसबा करीत नाहीं, पुढें करूं, ऐसे गोव्याचे विजुरालानी सांगितलें आहे. ही गोष्ट तथ्य. गोव्यापासून भेद करितात हें पुरते कळल्यावर मग गलबाव किरिस्तांव आगर वसई व दुमा कोली आगर अगासी दोघे आणून पुरसीस केली. त्यावरून त्याचे मुखें खरें जाहालें. आपल्यास मुंबईस फिरंगी आहे याणे साल्गुदस्तापासून सांगितलें कीं भेद करा. त्यावरून आपण शंकराजी मोरेस्त्ररापासीं बोलों लागलों व त्यास पुरसीस बहुत प्रकारें केली, कीं आगरचे किरिस्तांव कोली भंडारी हे या मतलबांत असतील ते सांगणें. मारहि त्यास बहुत दिल्हा. ज्या रीतीनें पुसावयाचें तसें कसोन पुसिले. परंतु तो न सांगे. पहिल्यानें शंकराजी मोरेस्वर याजपासीं बोलला कीं साष्टींकर कोली भेदांत आहेत आणि हालीं आलीकडेस सांगे नाहीसा जाहाला, व यांचे विचारांतील येक पादरी होता त्यास येथून मुंबईस घालविला, व गलबाव किरिस्तांव व दुमा कोली हे दोघे भेदांतील खरें जाणून यांचे सिरछेद केले. हें सविस्तर वर्तमान सेवेसी कळावें म्हणून लिहिलें आहे. फिरंगी भेद करावयाबद्दल मुंबईस येकजण ठेविला आहे. पहिला येक फिरंगी जुना होता तो काढून हालीं गुदस्तांपासून नवा फिरंगी मुंबईस ठेविला आहे. तो भेद मनास आणितां हे खरेंच जाहाले आहे व येक मास जाहाला जंजिरे अरनाला येथील हणवंत बुरूज नस्तावर आहे, त्याचे बाहेर गोल्याचे टप्यामध्यें येक माहागिरी येऊन दिवसाची पाणी जोखोन मुंबईकडेस गेली. तेच दिवशीं जंजिरे मजकूरचें पत्र येथें आलें कीं पाणी जोखोन माहागिरी गेली. मनास आणितां ते माहागिरी मुंबईहून वरते साहा दोणे

वाढून पाणी जोखावयास पाठविली. तेहि गोष्टच खरी जाहाली व सांप्रत आणि च्यार रोज जाहाले दोन तिरकती तरांडी, थोर सिरगांवचे बाहेर तीहीं कोसांवर येऊन नांगरवाडा केला आणि तेथून येक माहागिरी सिरगांवच्या कोटापासून पावकोसावर येऊन पाणी जोखोन तिरकतीजवल गेलीं. तेथून मुंबईकडेस गेली व मागें मार्गसिरस मासीं दोन फरगतें व दाहा पढग्या त्यांजवर द्वणेस नवा कपितान पाठविला, त्याजबराबर पांचसें ढोणे आहेत; तो येतांच दिवास गेला. तेथून द्वणास आला. येक रोज जुना कपितान व नवा खलबतांत होते, तेथून रात्रीचा निघोन दिवास म्हणून गेला आहे. टोपीकराची बातमी वरचेवर राखत असों. परंतु पाण्यांतील विचार, येखादे समई बातमी कलेल येखादे समई बातमी न कले. याजकरितां सदैव सेवक खबरदारी करीतच आहे. आज्ञापत्रीं बातमी लिहिली त्यावरून अधिकोत्तर खबरदारी केली आहे, व खबरदारींतच असों. सेवेसीं श्रुत होये. आज्ञेप्रमोण सदैव खबरदार आहे हे विज्ञापना.

¶*In reply to a communication from the Peshwa Shankaraji Keshav writes that all possible measures to strengthen Maratha posts have been taken and that the movements of the enemy's fleet are being closely watched. Two informants of the Portuguese were beheaded when they refused to part with the information they possessed.*

No. 62] *[28-5-1737?*

ऌ ९ सफर

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा साहेबाचे शेवेसी

विनंती. फिरंगियाची गलबताची तहकीकात करितां गलबते अकरा आली होती. त्यास साहा गलबते खाडी अरुंद सभु (?) जवल आहे तेथे लागली व पाच गलबते बंदर मजकूरचे हवेली जवल आली. त्याजवरी बंदुखा मारिल्यावरी आपला लाग चालेना याकरितां माघारे गेला, आणि घोडमाल्याच्या बंदरी घरे किरीस्तावांची आहेत त्यास त्याणी माणोस पाठविले, जे हवेलीमध्ये व लोकावरी छेपा घालावयास आलो आहो. त्यास बंदर मजकूरच्या किरिस्तावानी त्यास सांगितले जे आज तुम्ही यावरी आलेत तरी आमची रांडापोरे नेऊन कापती. याकरितां उदईक आम्ही आपले कबिले काढितो, मग काय सांगाल ते ऐको म्हणून त्याची त्याची बोली जाहली. हे वर्तमान आम्ही बारकाईन युक्तीने ठिकाणी पाडिले. आणि वोवल्याचा पाटील किरिस्तास तुम्ही राहू नका म्हणून आम्ही जातो म्हणून आम्ही पुसिले तरी सांगतात. हे शेवेसी श्रुत व्हावे म्हणन लिहिले

असे. पत्रा(चा) अर्थ चितात आणून आज्ञा करणार स्वामी आहेत. जरी आजि साईकाली से दीडसे बरखंदाज आले तरी आमचा टिकाव होईल. नाही तरी आमचा निभाव येथे होत नाही. साहेब म्हणतील जे घोडबंदर खबरदार असतां तुम्हास फिकीर काय? यैसा अर्थ चितात येईल, तरी ते चौकी असतां हे चौकीवरी घालून मारून काढावे म्हणजे ते चौकी आपआप उठल. आणि खाले चौकी असतां येऊन पुढील चौकी मारिली हा नक्षे आपला होईल. याकरितां स्वामीनी भरती आजि पाठवावी. नाही तरी हा गांव आजी वोस जाहला. खामखा गनीम येऊन आम्हावरी पडितो. हे सविस्तर वर्तमान राजश्री सखाजी नारायेण व बावाजी मोहिते शेवेसी श्रुत करितां विदित होईल. हे विज्ञापना.

¶*The news of an impending attack on Ghodbandar by the Portuguese ships and the evacuation by the Christian residents there is communicated to Chimaji Appa.*

No. 63] *[May 1737*

श्री

चिरंजीव राजश्री वासुदेव जोशी यासी नारायेण जोशी आशीर्वाद उपरी. कालचें वर्तमान मौजें कन्हावें येथोन लिहिलें हातें त्यावरून कळों आलें असेल. गोपाळराव याजकडील भला माणूस येक ठार जाला. कोरीकर व लोहगडकर यांचे परवारी वगैरे पांच सा आसामी जखमी * * * चा दिवस तो संपादिला. वरकड आज उद्यां आणिक येकदां येऊन झुंज देईल ऐसें दिसतें. राजश्री मानाजी आंगरे याजकडील लोक आले आहेत त्यांचा मुद्दा आमचे कार्याचा आहे ऐसा नाहीं. हरइलाज करून शंभर माणूस दुसरें उत्तमसें आज संध्याकाळपर्यंत पाठवणें. गनीम आज आला तरी आला, नाहीं तों उद्यां येईलच. कृष्णरायाच्या जेजाला आहेत त्या केवळ आमचे कह्यामध्यें आहेत, जेथें सांगितलें तेथें चाकरी करितात ऐसें नाहीं. ते येक जागाच राहिले आहेत; याकरितां पांच जेजाला व पांच जेजालबारदार सरकारचे पाठविणें. जेजाला व दारूगोळी व शंभर पावेतों अगत्य पाठवणें. आंगरे याचे लोक येतील त्यांस तिकडे न्यावयाचे असतील तर सुखरूप न्यावे; परंतु आज शंभर माणूस उत्तम असेल ते पाठवणें. काल आमच्या लोकांनीं भारी शर्थ केली. शेवटीं हावेभरी[1] होऊन बुरुजाखाली गेले. तेथें येक ठार जाहाला, जखमी पांच सात जण जाले. याउपरी येक वेळ भारी पडेल तें संभाळलियावर मग काय होणे आहे? कोरे कागद निपट नाहीं. वरकड आमचे भोई व पोरगे वगैरे खायास हैराण आहेत; आम्हाजवळ तों रुपया आणिक

---

१. आवेशयुक्त.

नाहीं. तर शंभर रुपये पाठवणें म्हणजे भोई चाकर समजतील. आमचा खर्च तों तूर्त चांध्रणाहून चालतच आहे; परंतु भोयांनींच फार रडारड मांडली आहे, तर बेगमी करून पाठवणें. बहुत काय लिहिणें हें आशीर्वाद.

¶*Narayan Joshi asks for more men, money and ammunition from Vasudev Joshi. "The men of Manaji Angria and the guns of Krishnarao will be of no use in the actual fight,"—he writes.*

No. 64] [*8-2-1748?*

श्रीव्यंकटेश

सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मी-
आलंकृत राजमान्य राजश्री
पंत प्रधान गोसावी यांस

पोष्य नारायण व्यंकटराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल छ १९ सफर मुकाम भरतगड जाणोन स्वकीय लेखन करित असिलें पाहिजे. यानंतर स्वामीची आज्ञा घेऊन निघालों ते मजल दरमजल कुडाला आलों. राजश्री जयराम सांवत व राजश्री रामचंद्र सांवत यांच्या भेटी होऊन छ १७ सफरीं आंगऱ्याचा वेढा उठविला. याउपरी पुढें होईल तें वृत्त मागून लेहून पाठऊं. सविस्तर मजकूर निराल्या पुरवण्यांत लिहिला आहे त्यावरून कळों येईल. बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति.

¶*Narayan Vyankatesh Ghorpade informs the Peshwa that he arrived at Bharatgad and saw Jayram Savant and Ramchandra Savant and raised the siege which Angria (Tulaji) had laid.*

No. 65] [*15-6-1737*

श्री

राजश्री चिमणाजी पंडित दाजी
गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो मानाजी आंगरे रामराम विनंती उपरि. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहिलें पाहिजे विशेष. पत्र पाठविलें पावोन लेखनार्थ श्रवणेकडून परम समाधान जाहालें. बंदराची आमदरफ्ती चालों. द्यावयाचे[1] रदबदलीस इंग्रेज बजिद जाहाला आहे. परंतु खाडीमध्यें फिरंगियाचा परिश्रम न व्हावा येविसीं इंग्रेजास जाबस्वाल लेहून

---

१. प्रवेश.

गेले आहेत. उत्तर आलिया बंदरें चालों द्यावयाची आज्ञा करणें ते केली जाईल म्हणून लिहिलें. ऐशास योजिला विचार बहुत उत्तम आहे. फिरंगियानें खाडीमधें येऊं नये, यैसा बंद इंग्रेजापासून करून घ्यावा, हे गोष्ट कार्याची आहे व या प्रसंगीं आपण आग्रह धरिला आहे याजवरून व शाहाराचे संरक्षणाचे साहित्य जालें पाहिजे म्हणून, मान्य करीलच करील. सारांश इकडील प्रांताचें संरक्षण होऊन खाडीची आमदरफ्ती मुंबैकर साहुकाराची चाले ते करणार आपण आहेत. घोडबंदरास गनीम येऊन मोर्चे देऊन राहिला होता. त्याजवरी फौज पाठऊन मारून दोनसें अडीचसे माणूस नस्तनाबूद केलें. माडी हस्तगत केली व सात गलबतें घेतलीं. गनीमास तंबी बरीसी पोहचविली म्हणोन लिहिलें, त्यावरून संतोष जाहाला. आपले सामार्थ्यापुढें गनिमाचा पराक्रम आहे तो कायै कलतच आहे. परंतु गनीम दगेखोर आहे. दगाबाजीचा शेह रक्षणें त्या प्रकारें रक्षिला पाहिजे. रवाना छ २७ माहे सफर बहुत काय लिहिणें? कृपा असों दीजे हे विनंती.

¶*Manaji Angria approves of Chimaji Appa's efforts to effect an understanding with the English at Bombay on condition that they would not give shelter to the enemy (the Portuguese).*

No. 66] *[25-6-1737?*

श्री

श्रीमंत राजश्री राऊ
स्वामीचे सेवेसीं

सेवक बापोजी भीमशेन साष्टांग नमस्कार विनंती. येथे प्रविष्ट जाहालियावरी अष्टमी मंदवासरचें पत्र पाठविलें कीं नारोपंत व बलवंतराऊ सादुलाखानाकडून आले ते किनीस राजश्री श्रीपति राऊजीकडे गेले. तेहि लौकरीच येतील. त्याचें वर्तमान मनास आणून सेवेसीं जे ल्याहावयाचें तें लिहून पाठऊन देतो. स्वामीचे आज्ञेप्रमाणें राजश्री सुंदर नाईक व राजश्री लाला यांचें वर्तमान सांगितलें हें सकलहि वर्तमान सेवेसीं लिहिलें आहे, विदित जाहलें असेल. लालाकडे फिरंगियांकडील बोली आली आहे कीं आम्ही लोक साहुकार, आम्हांवरी राजश्री रायानी कृपा करावी. आम्हांपासून अंतर पडले आथवा न पडले हे त्याचे ते जाणताती. आम्हांवरी अवकृपा करणें त्यांस उचित नव्हे. याउपर आम्हांवरी दयावंत होतील तरी थोडिया बहुतानें सेवा करूं, म्हणून त्यांची बोली आहे. लालानें आम्हांस सांगितलें कीं हें वर्तमान राजश्री रायास लिहून पाठऊन उत्तर

5639

आणवणें. त्याचे मनोगत जाणून तदनुसार जें लिहून पाठवावें अथवा बोली करावी ते केली जाईल. अगत्यरूप उत्तर आणवणें म्हणून सांगितलें आहे. याकरितां सेवेसीं लिहिले आहे. ये विशई जे आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. हे विनंती.+

¶*Bapuji Bhimsen Parasnis informs Bajirao that the Portuguese are making overtures of peace.*

No. 67] [*Prior to 1737*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोसी कृतानेक नमस्कार विनंती येथील कुशल ता। छ १२ माहे रबिलोवल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री कृष्णराव यांजकडून किल्ले कोहोज येथून फिरंगाण प्रांतीं उपद्रव लागतो. पेशाजी भिवंडी जवली नादरुखीचे बंदर आहे. फिरंगी याचे तेथें कोहजेतून राजश्री विठल विस्वनाथ यांणी स्वारी पाठविली, ती भिवंडीजवली आसपास येऊन थांगा[1] धरून नांदरुखीवरी घालून तेथून पाच सात कोली व पांच सात बाइका धरून नेल्या. त्या उपरी आलाकडे फिरोन त्याची स्वारी अमरभुईहून आमचे दुर्गाड व सोनाल तपीयांतून येऊन नांदरुखीजवलील येक गांव मारिला हे वर्तमान फिरंगियास कलले. तो म्हणतो कीं जेव्हां याच्या मुलुकातून कोहजेतून येऊन आपला मुलुक मारितात, तेव्हां कल्याणचे सलुल्याने हे काम करितात. कोहजकराचे तो कर्म या जातीचे आहे. त्याणी कर्म करणे तरी कोहजेकडून मनोर प्रांते स्वारी पाठऊन जे करणे ते करावें. आमच्या मुलुकांतून स्वारी पाठऊन कुलें धरून नेतात, येणेकरून फिरंगी याचा आमचा बदसलूख होऊन आमच्या मुलकास उपसर्ग लागो शके. याकरितां स्वामीस लिहिले असे. तरी राजश्री कृष्णराव तेथें आले आहेत त्यांस सांगोन त्यांची स्वारी आमच्या मुलुकांतून जाऊन कल्याण भिवंडीचे सरदेचे फिरंगाणचा मुलुक आहेत त्यास उपसर्ग न लावीत ते गोष्टी करावी. त्याणी उपसर्ग लावणे तरी कोहजेहून स्वारी मनोर प्रांती पाठऊन त्या प्रांते जे करणें ते करावें. या प्रांतातून सरदेचे मुलकास तसदीया न लागे तें केले पाहिजे. कलावे याकरितां लिहिले असे. त्याणी अमरभुई जवली आवंढा डोगर म्हणोन वसविला आहे, त्या डोंगरावरून स्वारिया व लोक येऊन ता। कुदे व

+ सबंध पत्र बापूजी भीमसेन पारसनीस याच्या हातचें.   १ जागा.

खांब्ले व तुगाड वगैरे महाल यास वेट बेगार जावत फर्मास जेवा खाना याचा उपद्रव मनासी येईसा लावितात व कुंभार यास मडकीयाचा व चांभारास जुत्याचा उपसर्ग करितात. वेठे अमरभुईस व त्या डोंगरास नेऊन गवत काढवितात. येविसी पूर्वी आम्ही राजश्री आपा यास सांगितले. त्याणी राजश्री कृष्णराव यास सांगितले. परंतु उपद्रव चुकत नाहीं. याकरितां स्वामीस लिहिले आहे. तरी आपण त्यास सांगणे ते सांगून उपसर्ग न लागे ते करावे. नाही तरी आम्हासहि त्याचे मुलकास उपसर्ग लावणे लागेल. कळले पाहिजे. त्याणी राजश्री आपा यांजवली कबूल केलें होतें कीं याउपरी उपद्रव यकंदर लावणार नाही. परंतु बोली सेवटास गेली नाहीं. यास्तव लिहिले असे. बहुत काये लिहिणे? लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudev Joshi complains to the Peshwa about Krishnarao Chaskar creating trouble for him by sending raiding parties in the Portuguese territories when truce exists between them.*

No. 68] *[Prior to 1737*

श्री

पुा राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. आमचे कर्मांविस[१] प्रांत वासदे येथून कल्याणास येत होते, त्या समागमे रसद रुपये २००० दोन हजार होते व याजखेरीज प्रांत रामनगर येथून कमाविसदारानी पाठविले रुा ४०० च्यारसे येसे चोविससे रुपये होते. त्यास कोळवणची सरहद टाकून तानेसई[२] नदी उतरून अलाकडे दिघासी ताा दुर्गाड प्रात भिवंडी येथपर्यंत माणसे पैका घेऊन आली. हे वर्तमान राजश्री विठल विस्वनाथ यास कलताच त्याणी किले कोहजेतून स्वार व लोक पाठविले. त्याणी येऊन जबरदस्तीने रुा घेऊन गेले, ये जातीचे वर्तमान आहे. आपणास कलावे याकरितां लिहिले असे. त्याणी स्वारी पाठऊन परभारे रुा न्यावेसे काय होते? आम्हाकडे पैका आला आणि स्वामी त्यास देविते तरी त्यास आम्ही देतो की नाही? बहुत काय लिहिणे? लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudev Joshi reports to the Peshwa the misconduct of Vithal Vishvanath, Killedar of Kohaj.*

---

१. कमाविसदार. २. तानसा नदी.

No. 69] [Prior to 1737

पो छ २१ रबिलोवल.

श्री

पु।। राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. किले कोहजेहून राजश्री विठल विस्वनाथ स्वाऱ्या पाठऊन फिरंगाणची कुलें धरून आमचे सरदेतून घेऊन जातात हे वर्तमान पूर्वी लिहिले होते त्यावरून कलले असेल. हली मौजे टेमघर प्रांत फिरंगाण कल्याण भिवडी मध्यें सरदेजवळी आहे तो गाव त्याणी स्वारी पाठऊन मारिला. दोघी पोरी व येक पाटील व तिघे पुरुष येसी साहा माणसे धरून नेलीं. आमचे प्रांतातून लोक त्यांचे येऊन घेऊन जातात. तरी स्वामीनी येविसीं राजश्री कृष्णराव यांस सांगणे तें सांगोन फिरोन येस नव्हे ते गोष्टी केली पाहिजे. त्याही कजिया करणे तर तिकडे करावा. हिकडे करावयास प्रयोजन काय आहे? बहुत काये लिहिणे लोभ करीत गेले पाहिजे. हे विनंती.

¶*Vasudev Joshi reports to the Peshwa the insubordination of Vithal Vishvanath, Killedar of Kohaj.*

No. 70 [14-7-1737?

श्री(शंकर)

श्रीमंत राजश्री बावा[+] स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामाजी माहादेव चरणावरी मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायेत छ २७ रबिलौवलपर्यंत स्वामीचे कृपेकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. पूर्वी स्वामीचे सेवेसी दोन च्यार पत्रें पाठविलीं, त्या पत्राचें स्मरणोक्त उत्तर न आलें. हालीं आपण लष्करांत आहेत तेथें दोन च्यार विनंतीपत्रें पाठविलीं ते पावलीं कीं न पावलीं तें कळत नाहीं. परंतु येक तरी सेवेसी पत्र पावलेंच असेल. त्यास आपण सेवक पूर्वापार स्वामी सर्व प्रकारें अंगीकार करीत असतां हालीं पत्र येऊन पत्रीं दर्शन देऊन सांभाळ करीत नाहीं तेव्हणेंकरून चित्तास स्वस्थता वाटोन येत नाहीं, तर यैसें न करावें. सदैव पत्र पाठऊन पत्रद्वारें सांभाळ करावा विहित मार्ग आहे. सर्व प्रकारें स्वामीचे कुटुंबांकित म्हणवीत आसों. सांभाळास अंतराये न करावा. वरकड या प्रांतीचे सविस्तर अर्थ श्रीमंत स्वामीचे सेवेसी लिहिले आहे, त्यावरून

[+] Janardan Baba Fadnis?

विदित होईल. मागें शिरगाव आसरीचे मोर्चे उठलियावरी राजश्री वासुदे(व) जोशी कुळगावास येऊन कागद पाठविला कीं गनिमानें सोखी फार केली आहे. आणि खुष्कींतील गांवें, गनीम आला आहे. हरप्रसंग गनिमास शह द्यावाजोगा आहे, म्हणोन कितेक प्रकारें लिहिलें, त्यासी आम्ही येथू(न) कागद पावतां त्यार (तयार) होऊन भिवंडीस आलो. तेथें आलियावरी राजश्री जोशीबावासहि पत्रें पाठविलीं. सारियानें जमा होऊन गनिमास ठेचगा द्या(वा) हें चितांत विचार करून ताबडतोब दूर निमनारास जाऊन गनिमास द्यावा म्हणोन विचार करून गेलो. त्यासी भिवंडीस दाखल होतांच खबर आली, कीं गनीम न येतां आपल्या लोकांनीं मनवर पाडिलें. तेव्हां तेथेंच राहोन बातमी माणसें पाठविलीं. त्यांसी बातमीहि आली कीं पाडिले तहकीक. यांउपरी गनीमास जाऊन गांठावा आणि (तं)बी पोहचवावी हा विचार केला. त्यासी बातमी कैसी कळली कीं फौजा जमा होऊन आपणांवरी येता. यैसें वर्तमान कळलियावरी ते निघोन गलबतांत जाऊन भरला आणि वसईस आला. ठाणेयासी शह दिला म्हणोन फिरोन ठाणेंयासी आला. येथें येक वेळ ठाणेयावरी लगट करून पाहावा यैसें याचें मानस आहे. बरे आम्ही इच्छितों कीं ज्या दिवशीं गनीम येईल ते सुदिन असे. खामखाचे धणि-याचे प्रतापेंकरून नाबूद करितो, यासी आंतर नाहीं. खांसा स्वामीची * *

¶*Ramaji Mahadev to Janardanbaba Phadnis assuring him that he is doing his utmost to follow the instructions conveyed by Vasudev Joshi and to humble the enemy.*

No. 71] [*24-7-1737*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वांमीचे सेवेसी

आज्ञाधारक कर्णाजी सिंदे नामजाद व कारकून किले माहुली सेवसी दंडवत व साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ ७ माहे रबिलाखरपावेतो स्वामीचे कृपेकरून आज्ञाधारकाचे व किले मजकूरचे वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाहले तेथे आज्ञा की, अंगारकाकडील वगैरे किल्याची राजकारणे करून स्वारी कराल तर येकंदर हुजूरचे आज्ञेसिवाये न करणे म्हणून. त्यास येकदोन स्थलाची सूत्रे आहेत ती राखून ठेविली आहेंत. स्वामीचे आज्ञेप्रा वर्तणूक करू. आज्ञेखेरीज कोठे स्वारी करणार नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Karnaji Sindia assures the Peshwa that he will not take any offensive against the Angria unless ordered by the addressee.*

No. 72] [23-4-1738

श्री

श्रीमंत[1] राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १४ माहे मोहरमपर्यंत स्वामींचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. बाजी बागराव देसाई बासोरकर हा मर्द माणूस होता त्याचा लेक खंडोजी[2] बागराव हाहि बरा मर्द होता. तो वसईचे सुलतान ढवियास गेलो तेव्हा त्याणी सर्वादेखता खरे केले की आपण सुलतानढव्यास जातो. वाचलो तरी बरेच जाहाले. नाही तरी आपले वतन खरेखुरे आहे ते करार करून देववावे म्हणून त्याणी बोली केली. सेवटी तो ठार जाहाला. त्याचे मागे त्याचे वतनाची स्थापना करून द्यावी, आम्ही त्यास मान्य केले आहे. येविसी स्वामीस पूर्वी पत्र पाठविले होते त्याचे स्वामीचे उतर आले आहे. हली याचे वतनाची मनसुबी स्वामीपासी पडिली आहे. त्यास हे सर्वाचें विचारे खरे आहेत वैं याजवली कागदपत्रहि आहे(त) व स्वामीचे चाकरीवरी ठार पडला आहे, तरी यांची वतनावरी स्थापना करणार स्वामी खावंद आहेत. विदित जाहाले पाहिजे * खंडोजी बागराव याणी सुलतानढव्याचे पूर्वदिवसी बोली केली कीं आपले वतन खरें असतां वडीलपण वारीस घेऊ पाहतात. त्यास जर साहिबकामावरी पडिलो तरी वतनाचे मागे सुरलीत करून द्यावें येसे बोलोन मग जिवाजीराव विचारे याचे सिडीस नेमिले होते, सिडी लाविली ते समई ठार जाहाले. येसेच बाजी भिलारे याणीहि आपले पाटिलकीची बोली येसीच केली आणि तोहि ठार जाला. या दोघानी बोली आगोधर करून सेवट ठार जाले येसे आहे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav requests Chimaji Appa to place Khandoji Bagrao in possession of his former holdings for his services at Bassein.*

---

१ सदर पत्र १७३८ चें एप्रिलांतील आहे. परंतु त्यांत वर्णिलेला प्रसंग आषाढ शके १६५९ मध्यें घडला.

२ पहा साष्टीची बखर, पान नं. १४.

5644

No. 73] [5-9-1737 ?

पो छ २४ जमादिलावल.

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे
सेवेसी

पोष्य वासुदेव जोशी कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत छ २० माहे जमादिलौवल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामींनीं पत्रें छ १७ जमादिलौवलची पाठविलीं तीं आजीं पावलीं. अबदुल अजीजखान यांणीं जुन्नरास जमाव केला आहे. येखादे जागा दगा द्यावयाच्या विचारांत आहे, तरी आपले किल्लियास मजबुदी करणें म्हणून लिहिलें. त्यास त्याचे सरदेस येक आमचा सिदगड, तेथें पेशजीं ६० साठ माणूस होतें. हालीं स्वामीचें पत्र आलियावरी आणखी तीस माणूस पाठविलें आणि तेथील मजबुदी केली. किल्ले माहुलीचा किल्लेदार पळोन जात होता त्याला हस्तगत केला. त्यास त्याची वस्तभाव होती त्यास तेथें कल्याणकर लोक होते तरी तहकिकात[१] करणें म्हणून लिहिलें. यैशियासी आम्ही नसतां तीर्थस्वरूप राजश्री नारायण जोशी यांणीं तहकिकात केली. याउपरी आम्हीहि तहकिकात करितो. जें सांपडेल तें भेटीनंतर विदित होईल. किल्ले माहुलीकर लोक राजश्री शंकराजी केशव यांणीं कल्याणास पाठविले ते हुजूर पाठवणें. त्यास पाहून त्यांला करार करून जेथें ठेवणें तेथें ठेऊन म्हणून लिहिलें, तरी ते लोक कल्याणास आले. त्यांस सरदारांस दरमाहे रुपये ३ तीन व शिपायास दरमाहे रुपये २॥ आडचि प्रमाणें रोजमरा करून तूर्त ठेविले आहेत. मग मास पक्षानें स्वामीकडे येतील, मग काय तैनात करणें ते करून ठेवावे. परंतु यास येथें महिना केला तर मवाफिक जालें. स्वामीजवळी आलियावरी भरी भरतील. धान्याचें संग्रहाविशी लिहिलें तरी दिवाणाचा खरीदीचा गल्ला येणें तो गल्लाच घेतों, पैका घेत नाहीं. याखेरीज आणखीहि गल्ला खरीदी करितो आणि किल्लेकिल्लां दास्तानें[२] करितो, आणि बाकी राहील तो कल्याणास घेतो. गलियाचे तरतुदेस अंतर करीत नाहीं. दारूचा संग्रह पाहिजे तरी दारूचा कारखाना घालणें म्हणून लिहिलें. तरी थोडा बहुत सोरा आहे त्याचे काम चालीस लाविलें आहे. आणखीहि सोरा घेऊन काम लावितों. कळलें पाहिजे. दारूचे कारखानियाचें काम कालींपासून चालीस लाविलें आहे. बहुत काय लिहिणें? लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudev Joshi assures the Peshwa of his vigilance against the aggression of Abdul Aziz Khan and of his having taken measures to fortify the frontier forts of Sidgad and Mahuli.*

---

१ चौकशी. २ कोठारें, सांठा.

5645.

No. 74] *[29-9-1737 ?*

श्रीमंगलमूर्ति

श्रीमंत राजश्री पंत
आपा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक कृष्णाजी राम सां नमस्कार विज्ञापना येसीजे. येथील कुशल ताा छ १९ माहे जमादिलाखर मुकाम पेण स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञापत्रें व थैली घेऊन काल संध्याकाळीं जासूद आले. येशास आज हवालदारांनीं मनुष्यें पाठविलीं आहेत. होडीस उरणचे मार्गे स्वार होईन. सेवेसी श्रुत होय. राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी पत्र सादर जाहले आहे. सेवकाचे तेथे प्रविष्ट करावयास स्वामी समर्थ आहेत. यानंतर येथें येक पत्र राजश्री नारो गोविंद आचवल आहेत यास आम्हाविसी पत्र असावें कीं हरयेकविसीं सांगतील ते सरकारचे कार्य समजोन पुढार घेऊन साहित्य करणें, येसे पत्र असेल तर स्वकार्याचे आहे. आतां ते कुलाबियास आहेत याकरितां आमचा खोलंबा इतुके दिवस जाहला. परंतु पत्र असलें म्हणजे पुढें कार्याचें आहे व येक डौल दस्तक गलबत जिनस आणावयास न्यावयास अमुक गलबत याचा तांडेल हे गलबत सरकारचें आहे म्हणून येक दस्तक पाठवावयास स्वामी समर्थ आहेत. सारांश ठिकाणास पोहचल्यानंतर सविस्तर सेवेसी निवेदन होईल. सेवेसी श्रुत हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram from Pen requests Chimaji Appa to write to Naro Govind to render him help in every possible way for his journey to Poona.*

No. 75] *[27-11-1737 ?*

श्री

पुाा श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. ताा छ १९ साबान. सेख दाऊद याचे हातून लोखंड आरनाल्यास रवाना केले हे गोष्ट बहुत गुप्त राखिली पाहिजे. निमित्य कीं शावकार येकदां नाव बदलाम जाले म्हणजे जागा नाहींसा होईल. यासाठीं शेवेसी लिहिले असे हे विज्ञाप्ती.

¶*Khandoji Mankar suggests Chimaji Appa to observe complete secrecy about the iron that was despatched to Arnala through Sheik Daud.*

No. 76] [About 27-11-1737

श्री

विनंती उपरी. राजश्री आपाकडून सखोजी निकम आले त्याजवल राउताचे नेमणुकेचे मात्र पत्र आहे. छ ११ साबानचे आहे. अनखी कागद नाही. जबानी सांगतात की रा पंतप्रधान मजल दरमजल पुढे तापीहोऊन गेले. रा उदाजी पवार समागमे गेले. तेथून रा आपा फिरले ते चिंचाणे तापीअलीकडे पाच कोस आहे तेथें रहिमखान मवास होता तो गांव मोर्चे लाऊन घेतला. रहीमखान जिवेच मारिला. तेथे रा आपा होते. त्यास रा राऊ नर्मदा पार गेलियावर रा आपा नासिक प्रांती येतील यैसे सांगत होते. रा नाना रायाबराबर गेले नाही. राहिले यैसे सांगत होते. तुम्हास कलावे म्हणोन लिा आहे. सिरगांवचे बाऱ्यावर बारा पंधरा गलबते दिसतात, परंतु तर्ककरून रा मानाजी आंगरे यांची म्हणतो. आम्ही खबरदार आहो. बंदरची मजबुदी बरीसी केली आहे. तुम्ही आपणाकडील लिहिणे. + हे विनंति.

¶*Letter from Vasudev Joshi :—Bajirao marches northwards from the Tapti. Udaji Pawar accompanies him. Chimaji Appa returning from thence, marches against Chinchane, surrounds the place. An engagement follows. Rahimkhan, the chief of that place, is killed in action.*

No. 77] [30-11-1737

श्री

पुा राजश्री रामचंद्र हरि गोा यांसी

सुा समान सालासीन मया अलफ. रा दताजीपंत याचा दरमाहा रुा ३७०० सततीससे रुपयेपैकीं बारासे पावले, बाकी चौविससे रुपये राहिले ते पाठवावे म्हणोन लिहिले ते कलले. ऐशियास अशेरीस यैवज रवाना करविला आहे :

१००० हरि सदाशिव
२००० जवारकरास
२५०० पताजीपंत

५५००

येकूण साडे पांच हजार रुपये शाहराहून रा राघो सिवराम यांस राऊताबाा रवाना करावयाविसी लिहिले आहे ते त्याजकडे येऊन पावतील. जाणिजे छ १८ साबान. बहुत काये लिहिणे.

¶*Ramchandra Hari is informed that arrangements have been made to send Rs. 5,500 to Asheri.*

+ अक्षरें वासुदेव जोशाचीं.

No. 78] [4-12-1737?

श्री

श्रीमंत राजश्री आपा
साहेबाचे सेवेसी

विनंती. आज्ञाधारक नथूजी गौडे चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत विज्ञापना. ताा छ १२ शाबानपावेतो ठाणेयास सुखरूप आसो विशेष. साहेबाची आज्ञा पत्रीं आली जे गगनबुरूज व हणमंत बुरुजाचे काम तेवीस हात काम करणे. वीस हात भर बुरूज सफेली तीन हात यैसे काम करणे म्हणून आज्ञा. त्यास राजश्री खंडोजी माणकर याच्या चितास येते जे बुरूज उंची केल्याने षहराचा व खाडीचा मारा चुकोन उची मारा जातो यास्तव येकूणीस हात सारे काम. सोलाहात भर बुरूज व तीन हात सफेली करावी, यैसे समस्ताचे विचारे येते. येविशी सेवेसी पत्रे लिहिली आहेत; त्याचे प्रत्योतर आले म्हणजे त्यासारिखे काम उंची करून. आजपावेतो काम साहेबाचे हस्ते हात गगनबुरूज दिसेत, जमिनीपासून उची चवदा हात व हणमंत बुरूज बारा हात काम आले आहेत. गगन बुरुजाचे काम वीस हात केले त्याजबरोबरी उची माथा बरोबरी केला, तरी हणमंत बुरूज पंचवीस हात करावा, तेव्हा समान होईल. समान माथा केला पाहिजे.

हणमंत बुरुजाचे काम उची होते. मारा उची जातो, यास्तव खाली कमाना केल्या आहेत. त्याजवरी वोझे चार हात माथा जाहाले. त्याजवरी कमाना तीन ठेऊन तोफा तीन ठेवावयासी जागा करितो. दुसरी कमान साहा हात ठेऊन वरते वोझे जमीन पांच हात येते. त्याजवरी भुई होईल. कमानेस मार्ग वरून करू. कमाना ठेविल्या पाहिजेत दुहिरा मार होईल.

येदा काम हणमंत बुरुजाचे नवे थर पाच येकूण उची पावणेदोन

गगन बुरूज मात्र काम उभारले परतु दोहीकडील बाजुवा बुरुजाबरोबरी जाहाल्या नाहीत कलम

संताजी नाा मनवर याचे सफेलीचे काम लाबी पनास गज व उची सवा दोन २। गज जाहाली. पुढे काम चालते आहे. येदा गगन बुरुजाचे काम उची पावणे तीन गज आले आहे.

उतरेकडील सफेली.

९३ किता बाजू घर लोहारखाना नजीकचा

४७ किता तयार जाहाली गज उची गज २ लाबी

गज आले. दरवाज्याचे मधील टोपीची लादणी होणे आहे. उद्या प्रतिपदेस दरवाजा उभा करितो. झडपा तयार जाहाल्या आहेत. जुन्याच होत्या त्याच जोड लाऊन तयार केला आहे.

४६ तयार होणे लांबी उंची गज १॥ पुढे काम चालते

९३

० तारागण गज लांबी कामाप्रमाणे धरिली * * काम तयार जा.

(अपूर्ण)

¶*Nathuji, mason, asks Chimaji Appa instructions about constructing brickworks for batteries at Thana and sends details of the work already done.*

No. 79] *17-12-1737*

छ २३ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे
शेवेसी

पो वासुदेव जोसी सां ना वि॥ येथील कुशल ता॥ छ ९ रमजान जाणून स्वकीये लेखनआज्ञा केली पा॥ वि॥. आ(म्ही) सिरगावास चौगीर्द मोर्चे दिल्हे आहेत. बंदर देखील जेर केले आहे. बरीसी मेहनत करितो. परंतु लोक नवे नावाचे मात्र आहेत. मोर्चाचे कामाचे नाही. बेकइद. बेमुरवत होऊन येकाधाचे पारपत्य करावे तर काजाकामाचे दिवस. याजकरिता तैसेच चालवितो. राजश्री स्वामीचे पुण्येकरून हे स्थल लौकरच हस्तगत जाहालियावर हे व माहीमची फौज येकत्र करून माहीम फत्ते जाहालियावर आवघी फौज घेऊन तारापुरास जावे यैसा विचार केला. प्रस्तुत हे स्थल हस्तगत जाहालियावर दोनसे माणूस शंभर राऊत तारापुरास शह द्यावयानिमित्य तारापुराअलिकडे कोसा दोन कोसावर ठेऊन अशेरीकरास उपरालियाची अनास्था होऊन अशेरी लौकर फते होये ऐसे करितो. आम्ही दोन वेळा माहिमास गेलो होतो. तेथील लोकानी मोर्च्याची बरीसी मेहनत केली आहे. लिह्यावीसारिखी नाही. रा॥ माहादाजी केशव जातीनसी मोर्च्याची मेहनत, बरीसी करितात व मोर्च्यावर गनिमाने चालोन घेतले ते दिवसी गनीम बरासा सापडला होता. 'कापून काढावयाचा मान होता. परंतु समयास लोकानी घालविले. ते दिवसी रा॥ माहादाजी केशव याणी जातीनसी मर्दोमी करून गनिमाकडील दोवे ठार केले

आणि गनीम माघारा लाविला. सिपाईगिरीची शर्थ केली ते लिहिता पुरवत नाही. गोमांतकाहोऊन गनीम वसईस आला म्हणून रा शंकराजी केशव याणी आम्हास लि॥. तीच पत्रें व अलाहिदे पत्री सविस्तर लि॥ आहे. त्याजवरून कलेल. धारावीस रा रामाजी माहादेव जाऊन जागा काईम केला व शंकराजी पंतानी डोंगरीचे काम लाविले व कोलवाडीचा मोर्चा घातला हे सविस्तर अलाहिदे पत्री लि॥ आहे. * रा विठल विश्वनाथ यांचा पुतण्या बालाजी केशव येथे लोकाबरोबर आहेत. बरीसी मेहनत करून चाकरी करितो. कोण्येहि चाकरीस चुकत नाही. मर्द आहे. व गोविंद अनंत बरीसी मेहनत करितो. स्वामीस कलावे म्हणून लिहिले असे. बहुत काये लि॥ लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंति

¶Vasudev Joshi reports to Chimaji Appa the progress of the siege of Shirgaon. He proposes to advance on Tarapur after occupying Shirgaon and Mahim. He refers to a severe action between Mahadaji Keshav Phadke and the Portuguese in which the latter were repulsed.

No. 80] [*19-12-1737*

श्री

सेवेसी बाजीराव बेलोसे नामजाद जंजिरे अर्नाळा विज्ञापना. ता॥ छ ७ रमजान पावेतो जंजिरे मजकूरचे व सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. आज मुंबईकडून व वसईकडून गलबते ४४ चवेतालीस आली. माहिमाकडे जात होती. अकस्मात ढाळेणी[1] घेऊन फिरोन जंजिरे मजकूरचे बारियावर होरीबेरी घेत राहिली. थोर गुराब ४ च्यार व बतीस सिबाडी व कोली मचवे ८ आठ येसी आहेत. बहुतयेक कोणेक मनसब्यावर आहेत. याकरितां साहेबास लिहिले आहे. आम्ही आपले जागा खबरदार आहों. न कले माहिमास जाईल किंवा जंजिरेयास येईल, याकरितां लिहिले आहे. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶Bajirao Belose, commandant at Arnala, informs Chimaji Appa that a large fleet of the enemy consisting of about 44 vessels is cruizing near Arnala.

---

१ फिरून, तोंडे फिरवून.

No. 81 [26-12-1737

श्री

श्रीमंत राजश्री वासुदेव जोशी
व राजश्री रघुनाथजी बावा
गोसावी यांस

पोष्य शंकराजी केशव साष्टांग नमस्कार व आशीर्वाद विनंती. येथील वर्तमान तागायत छ १४ माहे रमजान स्वकीय लेखन केलें पाहिजे विशेष. लोकाविसी काली पत्र पाठविलें आहे त्यावरून कळलें असेल. जंजिरे अरनाळियास बावीससें माणूस होतें; त्यास औरंगाबादकर लोक तेथें होते ते तेथें न राहात, याकरितां त्यास आणिलें व काही लोक माहीमास पाठविले, त्यांचे यैवजीं दोन तीनसें माणूस जंजिरे मजकुरी पाठविले आहेत. येकूण जंजिरेयास सारे माणूस अठरासें आहेत. त्यापैकीं अरब सें सवासें (अदमासे) माणूस जंजिरियास होते, आजि येथें आणिलें. आणावयास कारण काय तरी माहिमास आरब होते त्याणी शकटभेद केला. फिरंगी मोर्च्यावरी चालोन आला. ते समई आरब त्यास जाऊन सामील जाहाले. त्याचा यांचा सलामासलाम होऊन येक सरोन आमच्याच लोकांवरी फिरले. यास्तव इतका नाश जाहाला. यास्तव आरबचा संदेह चित्तांत येऊन आणिले आणि यास निरोप देतो. जंजिरेयास सवासें राहिले, त्याजमधें कितेक दुखणारू व बिराडराखे अहित, याकरितां तेथील बेहबुदी असिली पाहिजे व येथीलहि नडीचे माणूस जिकडे तिकडे फाकले तरी राजश्री कर्णाजी सिंदे व तीर्थस्वरूप दादाजवळी व राजश्री खंडोबा समागमें लोक माहिमास पाठविले ते व फिरंगी माहिमास गेलियाचें वर्तमान कलतांच येथून तीनसें माणूस पाठविले आहेत यैसे लोक व तीनसें स्वार येथें पाठऊन दिल्हे पाहिजे. येविसींचा सविस्तर अर्थ राजश्री आपाजी मुरार पाठविले आहेत हें सांगतां कळेल. तरी अनमान न करावा. सारांष याचे जागियाचा बंदोबस्त जालिया उत्तम आहे. तरी राजश्री कर्णाजी सिंदे व खानविलकर व खंडोबा समागमे लोक गेले ते व बाबाजी पंतासमागमें गेले होते ते सारे लोक हरिराम देखील आमचे नेमणुकेचे लोक सारे पाठवावे व राऊत तीनसे तरी पाठवावे म्हणजे बंदोबस्त करून अडीच हजार माणूस कनिष्ट अरनालियास पाहिजे. त्यास सातसे माणूस पाठविले पाहिजे व येथेहि मजबूदी असावी, तरी हजार बारासें माणूस येथील आहे तें व तीनसें राऊत सत्वर पाठवावे. तेथें लोक येथील न ठेवावे. माहिमास फिरोन मोर्चे बसतील न बसतील याच लोकानी तें कळलेंच आहे. याजकरिता लोक येऊन न पावलेच

असावे. परंतु ते ठाने मारिले उत्तम न केले. अरनालियावर येईल व बहादरपुरा व धारावी या जागियास येईल. अगोधर बंदोबस्त जालियास उत्तम. हे विनती.

¶Shankaraji Keshao to Vasudeo Joshi and Raghunathji Bawa, informing them how he distributed the forces at several centres and asking them to send back the forces that were with them, to reinforce Arnala.

No. 82] [*Dec. 1737* (*or March 1739*)

श्री

श्रीसकलतीर्थस्वरूप
श्रीबुवाजी नाईक मो ठाणे
वडिलांचे सेवेसी

अपत्यासमाने कृष्णाजी नाईक मो मालाड चर्णावर मस्तक ठेऊन साष्टाग दडवत विनंति उपरी. येथील क्षेम जाणून आपले क्षेम लिहीत गेले पाहिजे विशेष. धारावीकडे बातमी आणावयासी माणूस रा केले होते त्याणे येऊन सांगितले, कीं धारावींस फिरंगेयाचे माणूस पांचसे आहे. च्यारसे माणूस मुसलमान व मराठे व सेंभर सोलदाद आठसे घातले असेत. येकूण पाचसे गनीम असे. परंत दोन बदरामध्ये दोन मचवा तरत्या असेत, येतात जातात, यैसे वर्तमान इकडील सांगितलें आणि माहिमास माणूस पाठविले होते तेथें च्यार रोज होते ते आज येथ आले. त्याणे येऊन सांगितले कीं आरमार तों आलें नाहीं आणि जुना जेरार होता तो कोरलेचे किलेयावर बंदी घातला. त्याचा मामा विजुरल गोंवेयांसी आहे, त्याणे बोली विरोरदारजवळ घातली आहे कीं माझ्या भाच्या सोडल्याविना आपण अरमार घेऊन जात नाही. त्यास येथे घेऊन येणे. मग ते आम्ही येसे मिलोन जाऊन. यैसी बोली गोंवेयासी घातली असे; आणि तेथ अरमारही सिध जाले असे. तेथ त्यांची दोघांची समजावीस जाली असली, तर अरमार येका दोव्हां दिवसीं रिघणार असेत. बाहेर अरमार फिरते ते संभाजी अगरे याचे व हबशाचें हिंडते येसे सांगितले. तेथ गोष्ट सांगितली आणि त्याचा मुदा यैसा असे कीं अरमार आलेयावर येक वेल दाखला घ्यावा यैसा मुकदमा सांगितला. ते वडिलांस लिहिलें असे. बहुत काये लिहिणे कृपा असो दीजे हे विनंती.

¶Krishnaji Naik to Buvaji Naik Anjurkar of Thana writes about Portuguese activities in the Bassein region. Buvaji and Narayanji are brothers of Gangaji Naik who helped Chimaji in capturing Bassein.

5652

[December 1737

श्री

पुरवणापत्र चिरंजीव नारायणजी नाईक चिरंजीव कृष्णाजी नाईक याचा कागद बातमीचा जात असे तो मनास आणणें. संभाजी आगरे यांचा आरमार दर्यात फिरत असे. त्याची च्यार तारवे धरून नेली. गल्या+ भरली, दोन सिदीची व दोन फिरंग्याची सदरहु ४ गल्या भरली धरुन नेली आणि सूलहुन फिरंग्याची जाहाज गल्या भरुन येणार आहेत ती किल्यात न पोहच(त) तों सरजाम करून घेणे, व संभाजी आगरे याचे सखत्व (सख्यत्व) असत तर मोठासा मनसुबा होऊन येता. परंतु खावंद आपले कोठून आईकणार आणि मारनिले यास हाती धरून आंपले कार्य करून घ्यावे, त्यास तुम्हास तेथे बोलीचाली करिता गोस्ट दरसऊन घेणे की मारनिले याचे समाधान करून पुढे अरमार घेऊन ह्या प्रांती मदत करी तो विचार योजोन गोस्ट जाणवणे; व आक्षेकर इकडोन गेला आहे त्यास त्याणी आपले स्वयातीस कितीक प्रकारे सब्द लाविला असे. त्यास आम्ही पूर्वीच येत्न केला होता परंतु हाती गवसत नाही. अंताजीपंत पळशी[१] यानी पोटीसी घातला आहे आणि हाली हुजूर पाठविला असे. त्यास तुमच्याने जितेके त्याचे पारिपत्य करवेल त्यास कधी चुको नका. श्रीमत राजश्री आपा यास पत्रें लिहिले आहेत, वाचोन लाखटा करून त्यास देणें. श्रीमत राजश्री जोसी[२] यासहि लिहिले असे. तेही मनास आणून लाखोन(?) देणे आणि त्यासी बहुत युक्तीने भाषण करणे व मुंबईसी तारवे येतात जातात त्याचा हक्क आम्हास येत नाही आणि दिवाणातहि घेत नाही, त्यास मधेच जातो हा कोण विचार? न आम्हास न पुर्ता दिवाणात, हे बोली करणे व येकसे बत्तीस रुपयाचे उंची नग व सेले त्यास तुम्हास मागाच लिहिले आहे की त्यास गोस्ट जाणवावी. त्यास नसेल जाणवली तर जाणवणे. निमित्ते कीं कोण प्रसंग कसा येतो तो कळत नाही. याज-करता कानावर गोस्ट घालावी. बहुत लिहीत नाही. हे आसीरवाद.

¶*Krishnaji Naik writes to Narayanji Naik Anjurkar of Thana regarding Sambhaji Angria's apathy in the war.*

No. 83] [1737?

श्री.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

पोष्य वासुदेव जोशी कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते

\+ Galleys.   १ कावळे.   २ वासुदेव जोशी?

पावले. गणेशपंतास पाठऊन देणे अथवा तुम्हींच येणे म्हणोन लिहिले. त्यास गणेशपंत आपले घरी कल्याण प्रांती गेला आहे. आम्ही यावें त्यास चिरंजीव गंगाधर जोसी याचे लग्नास कुलगावास गेलो होतो. तेथे पूर्वी पोटामध्यें व्यथा होती ती अधिकोतर जाहाली, याकरितां पोटावर डाग घेतले ते अद्यापि बरे जाहाले नाही. पीडा करीतच आहेत. स्वामीस कलावे म्हणौन लिहिले आहे, बहुत काय लिहिणे? कृपा लोभ करीत असिले पाहिजे हे विनंती.

¶*Vasudev Joshi writes to the Peshwa, regretting his inability to meet him on account of some ailment.*

No. 84] [*1737?*

श्री

पुा श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामींनी लिहिले की अंताजी रघुनाथ यांस पाठऊन देणे आणि राजकारण केले असे आपणास कलले, असे किमपि त्यास कलो न देणे, त्यास आपण तो कांही दर्शविले नाही, परंतु गावभर त्याणेच केले. नाव तो स्वामींचेच वस्तुहि स्वामींनीच दिल्ही असे सर्वांस दर्शविले आहे. जात्येसमई आमची आणक्रिया घेतली. आम्ही मृदुभाषणेच करून रवाणा केले, परंतु मागाहोन सेलव्याचे राऊत ८ व वेंकाजीपंत पाठविले, की अकारपूर्वक सावल्याचे घाटे तलेगावास जाईल तेथे बसेल, याकरिता बोरघाटे नेऊन पुण्यास आपणाकडे नेणे असे सांगोन पाठविले असत. कदाचित तो आपणाजवल सांगेल याकरिता आपणास कलावे मणून लिहिले असे. विचार पाहोन वर्तणूक करावी लागली, याकरिता दिल्हे असेत. पूर्वी लिहिले आहे त्यावरून सविस्तर कलेल. त्याची बुद्धि क्षणिक आहे. तकारग्रामास जाईल या करिता स्वार दिल्हे असत. बहुत काये लिहिणे लोभ करीत गेले पाहिजे हे विनंति.

¶*Letter from Vasudev Joshi to Bajirao informing that Antaji Raghunath Kawle is sent to Poona with an escort to explain his conduct. Vasudeo Joshi maintains grave doubts about his honesty.*

: तळेगांवास.

No. 85] [26-3-1737?

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक बारवाजी ताकपीर रामराम विनंती. चैत्र शुध शष्टीपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री माहादाजी केशव यासमागमे पत्रें पाठविली तेथें आज्ञा कीं फौजेनसी जाऊन कार्य करणें. आज्ञेप्रमाणें आजी दीप दर्शनी जमावसह वर्तमान दारू गोळी जेजाला देखील स्वार होऊन गेलों. स्वामीचे पुण्यप्रतापें कार्यसिधी होईल. आपले पाय द्रष्टीनें पाहावे हा हेत होता त्यास स्वामीनी कार्यावर नेमिले. आज्ञा ते सिरसा. पश्चम दिशेकडील वर्तमान तर आवाई कांहीं राहिली नाहीं. परंतु टोपीकराजवळ जमाव नाहीं. ठाणियास सें सवासें माणूस मात्र आहे. वसईकडे जमाव नाही. मांडवीचे कोटांत सें दानसें माणूस दरसाल मेळविले आहेत. मुंबैकडील जमावाचा विचार तरी राजश्री संभाजी आंगरे सरखेल याणी इंग्रजाचें जाहाज * * त्याजवर आवघीं तारवें पाठविलीं आहेत. स्वामीचा प्रताप समर्थ त्या सारखें सर्व अनकूल दिसोन येत आहे. बहुत काय लिहिणें कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Barwaji Takpir reports to Chimaji Appa that he is ready to execute the instructions given him and that Sambhaji Angria has proceeded to attack the English ships coming from Bombay.*

No. 86] [1737?

श्री

श्रीमंत राजश्री आपा

साहेबाचे सेवेसीं

आज्ञाधारक सुभानजी भोपतराव विज्ञापना ऐसीजे. राजश्री बाळाजीपंत डोंगरीस जाऊन तमाम गावास आग लावली व रयेत व तमाम बंदरकिनाराचे गांव तेथें गेले होते व सावकार लोक होते त्यांस बालाजीपंत तेथे जाऊन फिरंगीयास सेर केले आणि साहेबकामहि जाहालें नाहीं. आम्ही म्हणत होतों व राजश्री भिवाजीपंत व राजश्री त्रिंबकजी देसाई ऐसे म्हणत होता कीं तुम्ही तिकडे नका जाऊं. आपणांस खावंदाची आज्ञा नाहीं व राजश्री भिवाजीपंतास पत्रें येतात आणि आपण जाऊन बेखायेदी करावी तरी गोष्ट कार्याची नाहीं. त्यास तो बलच

गेला, परंतु आतां त्या स्थलाची गनिमानी बंदोबस्ती केली म्हणून येकतों. या प्रकारचें वर्तमान केले आणि गांवोंगावचे भेटीचे रुपये वेतले आहेत. भिवाजीपंतास रुजू रुपये आठा गावाचे केले, बाकी दिल्हे नाहींत. त्याची यादी भिवाजीपंतापासीं दिल्ही आहे ती स्वामीस विदित केली असेल व गांवांत कारभार व कासी व मिरे येथें काय मनश्वी करितो हें कांहीं कलत नाहीं. त्यास भिवाजीपंत येथें येऊन कारभार व लोक बहुत शाहाणपण करून आहेत. तरी आतां बालाजीपंत साहेबाकडे आले आहेत यानी कारभार मनस्वी केला तो साहेबासहि कलेल. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

¶*Subhonji Bhopatrao sends Chimaji Appa a bitter complaint against Balajipant who has set fire to several villages and caused trouble to ryots and banker*.

No. 87] [*1737 ?*

श्री

सेवेसी आज्ञाधारक नारायण भास्कर कृतानेक विज्ञापना. प्रस्तुत वाडीकर सांवतानी जिनसाना सकलाद मखमल वगैरे हुजूर सेवेसी रवाना केले आहे. येऊन पोहचेल. वरकड फिरंग्यानें बहुतसी शोखी आरंभिली आहे, त्यास टोपीकरास नतीजा पोहचावा हे यास आवश्यक आहेच. तदनुसार या समयांत सरकारच्या फौजा येऊन गोव्याचे सरहदेस भारी शह पोहचल्याने इकडेच गुंतोन राहून बंदर-कीच्या ठाण्यास किंवा गाडदी कोस्ताबाबत बदला करावा येविसी आरमारचे गळा पडावे असा इरादा त्याचा आहे तो राहिला जाईल, तेव्हा सहजात आपला मुजरा सरकारात होऊन स्वकार्यहि साधोन येईल. असा विचार याणी चितात आणून हली हुजूर पत्रे पाठऊन फौज जलदीनें पाठवावी. आपण आपले जमावसुधां हमराह होऊन फिरंग्यास नतीजा दिल्हा जाईल, म्हणोन विस्तारे लिहिले आहे, त्याप्रमाणे यांचा मनोदय होऊन येथेंहि बोलतात. पाहता मनसबा नेला, परंतु फिरंगी बाहेर पडोन त्याची मसलत असेल ती सुरू न जाली तों अगोधर पायबंद बसिल्यास उतम होते. अद्यापवरहि त्याचा मुकाम असोन तरतुदेस गुंतोन आहे तों जलदीनें फौजा पोहचोन सावंत बोलतात व हुजूर सेवेसी लिहिले आहे याप्रमाणे मुतवजे होऊन टोपीकरासी बिघाड राखोन सरकारचा स्नेह जोडावा असे होऊन जरब या प्रसंगी पोहचल्यास उत्तम आहे. या गोष्टीस हुजूर बोला-वयास शहाणा माणूस अख्तियारी तुम्ही आपला कोणीहि पाठवावा म्हणून सांगत होतों, परंतु तूर्त यांस अनकूल पडोन आलें नाहीं. हुजूर विनंती करणे तो

मदार राजश्री भगवंतराव चिंचोरे याजवरच ठेऊन, त्यांजला विस्तारे लिहिणे ते लिहून हुजूर पत्रीं लिहिले आहे, मारनिले विनंती करणे ते करितील. त्याप्रमाणे व सावंताच्या लिहिण्याचा अर्थ ध्यानी आणून कर्तव्य तें धणी करितील. फौजेची नेमणूक होऊन इकडे रवाना होतेसी जाहल्यास पूर्वी सेवकास आज्ञा व्हावी कीं फौजांची रवानगी सावंताच्या लिहिल्यावरून केली आहे, तरी सावंतासी बोलून त्यांचे हशम व स्वार जमाव होऊन त्यांतील खासा सलाबतीचा कर्ता कूच होऊन दोन मजली पुढे येऊन मुकाम करून राहात ते करणें व याप्रमाणें यासही पत्रें सादर जाली पाहिजेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ती.

¶*Narayan Bhaskar informs Chimaji from Savantwadi of the willingness of the Savants to join the Peshwa in an attempt to put down the Portuguese.*

No. 88] [*1737* ?

श्री

सेवेसी विनंती गोवरीस सुरतेचा जिनस आला आहे, त्यापैकीं वरकड जिनस आला तरी बरेंच जाहालें. नाहीं तरी लोखंड तों आधी आणवावें व कारकून तों पाठविलाच असेल म्हणून लिहिलें. यैसियासी जिनस अणावयासी स्वामीनीं रामनगर व जवारकरास पत्रें पाठविलीं तीं पत्रें देऊन राजश्री आपाजी बलाल यासमागमे स्वार व माणसें देऊन पाठविलें त्यास पांच सात दिवस जाहाले. बहुधा जिनस घेऊन येतील. बोरू लौकर अणवणे म्हणून स्वामीनी लिहिलें परंतु जिनसामधें बोरू नाहीं. विदित जाहालें पाहिजे. कडदिन गेला म्हणून तुम्हीं लिहिलें व मुंबईहून खबर आली आहे, परंतु गनीम दगेखोर आहे. गोलियाची आवई घालून फिरोन यावयास उसीर नाहीं. तुम्हीं खबरदार आहांच. परंतु बहुत खबरदार असणें म्हणून लिहिलें, तरी स्वामीचे आज्ञेप्रमाणें खबरदार असों. विदित जालें पाहिजे. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshav agrees to bring iron and other articles from Surat and assures the Peshwa that he is, as warned by the Peshwa, very vigilant about the return of the enemy.*

No. 89] [*Prior to 1737*

नकल

श्री

आसीर्वाद उपरि. रविवारीं रात्रीस फिरंगाण तर्फेचा गांव उसरघर म्हणून तलोजे तर्फेचा [illegible] तेथें चोर जाऊन च्यार घरें मारिलीं. माणसें च्यार धरून

नेली. वस्तवानी लुटून नेली. येक कुळंबी जखमी जाहाला होता तो मेला. त्यावरून फिरंगियाच्या स्वारिया सरदेस आल्या आहेत व काबियात दीडसें माणूस आले आहे व पारसिकावरी दोनसें माणूस आले आहे. ठाणे येथेंहि दोन च्यारसें माणूस मेळविलें आहे. लौकिक वार्ता आहे कीं गोवियाहून हुकूम आला आहे, शामलास जागा करंज्यास देणे व तुम्ही शामल येके विचारें राहाणे यैसी आहे. वरकड चोराचा थाक आजी दोन दिवस लावीत आहों, परंतु लागत नाहीं. तहकीकात करून मागाहून लेहून पाठवितों. आमच्या स्वारिया सरदेस पणवेली-पावेतों ठेविल्या आहेत. बहुत काय लिहिणें हा आसीर्वाद.

¶*The writer sends news that Portuguese parties have arrived at Parsik, Thana and Kamba and that the Government of Goa have issued order to their subordinates to show a friendly attitude to the Sidi.*

No. 90] [*1737?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. मुलकी लोक जमाव आमचे निसबतीस आहेत. स्वामीनी रवाना केलें त्यास स्वामिकार्यावर नीट होऊन आपलें उर्जित करून घ्यावें. जर लोक जीव धरतील तर जिवट आहेत, परंतु कोताई व्हावी यैसें नाहीं. तरी स्वामींनीं कृपाळु होऊन सारे सरदारांस दिलासियाचीं पत्रें ल्याहावीं कीं भले लोक सरदार नामांकित कर्ते, शर्त केलीत. पुढेंहि स्वामिकार्यास न चुका, उर्जित करावयास विलंब नाहीं. यैसीं पत्रें पृथक सरदारांस ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. विषम गोष्ट न ल्याहावी. विशेष काये लिहिणें. हें विज्ञापना.

¶*Chimaji Appa is advised to write encouraging letters to all the Sardars who are exerting themselves.*

No. 91] [*1737?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

लक्षुमण हरीची विज्ञाप्ति. जंजिरतर्फेची बोली मुख्याची ऐशीजे. फिरंगाण प्रांतें आपली तयारी जाहालियाचा संतोषच आहे. ये तर्फेची आणि टोपीकरांची चित्तशुद्धि नव्हती. जें ईश्वराचे चित्तांत होतें तेच गोष्ट उतम जाहाली. ऐशास

---

१ थांग.

ये तर्फेकडून 'गला भात खरीदी करावयासी साष्टी व वसईचे सावकारांकडे ऐवज दीड हजार खंडीचा रवाना केला होता. तो गला तिकडे गुंतला आणि सावकारहि कांहीं स्वारीचे रजा तलबेंत गेले. कांहीं वसईस व मुंबईस आडकले आहेत. ये गोष्टीचे ते तर्फेस जरूर आहे. लिखापढा केला तरी काम * * * होऊन येईल व या गल्याखेरीज ये तर्फेस दोन हजार खंडीपर्यंत गल्याचे जरूर असे. हे जरूर दोस्तीवर नजर देऊन गला जेथलग दोन हजार खंडीपरयंत ये-तर्फेस पोहोंचलेयास गल्याचा ऐवज नक्षाते तर्फेस पाहोचता हो येईल ये गोष्टीचे जरूर धरू नये. हातेची कैरोज दुतर्फा यादगिरी राहील हे गोष्ट ते तर्फेचे दिलांत येऊन जरूर धरिले. नाहीं तर अखेर येतर्फेस चालणें तें तो चालतच आहे. अमा इतका सकुन बहुत रोज दुतर्फा दोस्तीचे जागा दिलांत राहील. येविसी इकडून लिखापढा जाहाला तर गला येऊन पाहोंचेल; अथवा नगद तरी सावकारां-जवळून पाहोंचेलच आणि ते तर्फेकडून गला दोनहजार खंडी पावेतों गला रवाना होईल, हा तों निशा गुदरतो. जे वख्तीं निशा होत नव्हता ते वख्तीं इकडील जरूर धरून दोस्ती ज्यादा केली. हाली तों दुतर्फा दोस्तीचे जरूर जाहालें. जे तर्फेस जरूर पडेल ते तर्फेचे जरूर धरून दोस्ती ज्यादा चालवावी हें लायक असे. ते तर्फेस खर्च तों बांधावा हें बहुत आहे. स्वारीमुळें कैलोका उस्तवारी होऊन यादगिरीस दूर होतील आणि ये तर्फेचे जरूर धरिल्यानें ठिकाणीं आहे. कैमुपत दुतर्फास यादगिरी जरूर राहील. बरकड त्येतर्फेस मालुम होईल जे इकडील कुमक इंगरजास गेलिया बातेने सकुन नसे. इंगरजाकडून ये तर्फेस कैवजा लिखेपढे जाहाले म्हणोन जरूर जाहालें. अमा स्वारीचे लोकांस हुकुम तैसाच आहे. बरकड फिरंगणावर स्वारी जाहालियामुळें उंदेरीस इंग्रजाचे लोक होते तेहि उतरून लाविले. हे ही गोष्ट बहुत दुरुस जाहाली, या बातेचा सकुन दिलांत न आणावा, ऐसें कितेक प्रकारें दोस्तीपणाची बोली बोलोन सेवेसी चरणरजांकितासी रवानगी करावी ऐसा निश्चय योजिला होता. परंतु स्वामीचे आज्ञेविना कैसें यावें? याजकरितां स्वामीनीं कृपावंत होऊन उत्तर पाठवायासी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. जंजिरेतर्फेकडूनच लिहिलें सेवेसी येणार होतें, परंतु मान्य जालें तरी उत्तम. नाहीं तरी दुतर्फास योग्य नाहीं, म्हणऊन लिहिलें जाहलें नाही. याजकरितां हे विज्ञापना ल्याहावयासी आज्ञा केली म्हणोन अमर्यादा करून सेवेसी विज्ञप्तिपत्र लिहिलें. आज्ञेप्रमाणें वर्तणूक करावयासी तातपर्य आहे. सेवेसी निवेदन होय. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Lakshman Hari writes to the Peshwa how the Sidi of Janjira felt overjoyed on account of the preparations which the Peshwa had undertaken against the Portuguese in the region of Bassein. The writer appears to be the Peshwa's agent residing at Janjira and mentions the friendly attitude of the Sidi.*

5659

श्रीशंकर

पुरवणी श्रीमंत स्वामींचे शेवेसी

विनंती. दोनदां पत्रें आलीं तेथे आज्ञा कीं येथील अधिकारी यांचे कामकाज कारभार मनास आणून मखलासी करून अधिक उणे असेल तें ठीक करून नेमणूक करून त्याचा बंदोबस्त करावा. त्यास इतके दिवस औषधच पुरवले. औषध कठिण, पथ्य परम कठीण, शरीर प्रकृत येक प्रकार. तेणेकरून शरीरीं अशक्तता फार जाली आहे. अजून पथ्य पंधरावीस दिवस आहेच. देश उष्ण फार. या दिवसी इकडील रहिवासी यास परम कठिण पडतें. आम्हास तर उष्णकालचा वास कठिण, तथापि स्वस्थता जाल्यास कांही यथाशक्ती मनास आणून होईल तितका बंदोबस्त करूं. वरकड फिरंगीयाचे निशाण त्यास देऊन दुसरें करून ठेविले याचा शोध करितां बदलें नाहीं, तेंच खरे; तन्मुले कांहीं भक्षिलेंहि नाहीं. खासा फिरंगी मारला त्याचे आंगावरील हिरे खरे असतां खोटे पा। याचा शोध पुर्ता मागाहून करून लिहून पाठवीन. . त्याचे हातची काठी वेताची ज्यास सापडली त्यानें चोरून ठेविली तो ठिकाणी लागला आहे. आणीकहि पुर्ता शोध करून लिहून पाठवीन. कारभार अमलसा बेबंद आहे. त्याचा थोडा बहुत बंदोबस्त सोय करून देऊन मग स्वार होऊन जाईन. या देशाची स्थीत विलक्षण, ज्यन फार करून अनाचारी आपलदारी (?) अनधिकारी असोन, कर्माच्यारी संकरकारी, धर्मस्थापक स्वामी सर्वहि केल्यानें होईल. फिरंगी यांचा प्रकार तर काल देश पाहून वर्तावें ही गोष्ट त्यांस अविदित. प्राय अशक्त असोन दुर्ज्यन छिद्रान्वेषी अविस्वासी थोरांचा सिष्टाच्यार राखोन मनसब्याचे सूत्र रक्षून कालानरूप वर्तावें ते त्यास कळतच नाहीं. कागदाचा जाब आठा पंधरा दिवसा खेरीज होत नाहीं. त्रिकूट परस्परें येकचित नाहीं. यामुलें स्वल्प कालाचे उद्योगें स्थलसहित वश होतील. अवसर पुढेंच आहे. धान्यादि संग्रह रक्षीत नाहीत. आरमार नाहींत. ज्यातीय समुदाय फार नाहीं. आसमंत भागी सर्वहि स्वामीस वश केल्यास होऊन अल्प श्रमे च्यार पांच लक्षांचा देश आधी पद्री पडेल. मग मुख्य स्थल अवकासें आले तरी चिंता नाहीं. आज्ञा आली म्हणून विस्तरें लि॥ असे हे विज्ञापना.

¶*The writer estimates the Portuguese power to be very weak and thinks it will soon be subverted as there is dissension among its higher authorities.*

No. 93] [1737?

श्री

श्रीमंत राजश्री रामचंद्रपंत स्वामी गोसावी यांसी

सेवक रामाजी महादेव कृतानेक सां नमस्कार प्रणाम्ये विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लखन केले पाहिजे विशेष. श्रीमंत पंतप्रधान स्वामीची आज्ञा ऐसीजे. सुरतेहून राजश्री गोविंद गोपाळ यानीं प्यादे व अरब रवाना केले, त्यांपैकी एकसे पंचावन अरब कल्याणास राहिले आहेत. त्यांच्या तैनातजाबिता बाजी चिपलाख याजबराबर तुम्हाकडे पाठविला आहे. तो तैनातजाबिता राजश्री रामचंद्र हरि यांकडे रवाना करणे म्हणून आज्ञा. त्यास बाजी चिपलाख हुजुरून रवाना केला तो येथे येऊन पावला. लोक ठेऊन आपण हुजूर गेला असे. तेथें बाजी चिपलाख याचे सबनिसाजवळ मनास आणितां तैनातजाबिता येथें नाहीं. तो तर हुजूर गेला असे. वरकड वर्तमान तर राजश्री सुभेदारहि हुजूर गेले आहेत. आपणहि ते प्रांती आले आहेत. हरएक नवल विशेष वर्तमान येईल ते लेखन केले पाहिजे. इकडोनहि जे नवलाव अधिकोत्तर वर्तमान होईल ते लेहून पाठवीत जाऊं. आपण क्षणक्षणा पत्री परामृश घेत असिले पाहिजे. फरंगी यांचे आरमार रेवदंड्यास आलें म्हणोन बातमी खरी आहे. आपणांस कळावें म्हणून लिहिलें असे. कळले पाहिजे. +आम्हाजवळ लोक आले आहेत त्याचा मात्र तैनात जाबता आहे. नवे लोक आहेत त्याचा तैनात जाबिता येथें आला नाहीं. फिरंगीयाचे आरमार रेवदंडियासी आले आहे. पुढें ठाणियासी येणार आहे म्हणोन खबर आहे. जे वर्तमान होईल ते सेवेसी लेहून पाठऊन देऊं. छ मारी प्रहरा दिवसा वसईहून गलबतें पंधरा आलीं त्या सी चे ने त्यापरियंत आली. त्यासी आम्हाकडील लोकांनी मारगिरी केली. फिरोन माघारी गेली. त्यासी पलीकडे जाऊन ससून व पार येथे भात भरून कांही बंद धरून नेले म्हणोन वर्तमान आहे. आपणास कळावें म्हणोन लिा असे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Ramchandra Mahadeo to Ramchandrapant informing him that the enemy's fleet has arrived at Rewdanda and is reported to be proceeding to Thana.*

\+ येथून अक्षर के खकाचें.

5661

No. 94] [1737?

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

विनंती येसीजे. पेसजी आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा की, गलबतांचे मेरामतीस[1] सुतार पाठवितों, तख्तेयाची तरतूद करून ठेवणे. त्यास सुतार तो येऊन पावले नाहीं. गलबताची तो मरामत करावी लागते. त्यास साल गुा-पैकीं चाकर सुतार तीन व नवे चाकर रोजमरी च्यार ठेऊन गलबताची मरामत करून सा गलबतें अलाथ आवदाण अवजार सहवर्तमान तयार केली असत. सातवे गलबत थोर असे. त्यासी काम लाविले असे. लवकरच तयार होईल. त्यासी दर्यावर्दी असावे. येसियासी बंदर मजकूरी दालदी आसामी ३७ आहेत त्यांपैकी वजा पाटेल कुरये तीन; बाकी आसामी दालदी ३४ राहिले. त्याचा सिरस्ता कारकीर्द शामल चवतीसपैकी निमे सतरा वेठे द्यावे. त्याचे पोटास सेर व धडवती द्यावी आणि वेठीची चाकरी घ्यावी. घरी सतरा आसामी निमेपैकीं घरी रातील त्यांणीं डोली लाऊन उदीम करावा, त्यावर महसूल नाहीं. सदरहू वेठे यांणीं येक गलबताची बेगमी आहे. दुसरे गलबतास दर्यावर्दी असावे. त्यास बंदर मजकूरपैकी व तर्फ मजकूरपैकीं सावकारी दर्यावर्दी राजश्री मानाजी आंगरे याकडे जात होते, त्यासी तूर्त राहविले आहेत. त्याची बोली तांडेलास रुा ९ व दर्यावर्दी यासी ३॥ साडेतीन रुा प्रमाणे व अडसरी यैसे दरमाहा देऊन चाकरी घ्यावी यैसे करार करून सेवेसी लिहिले असे. दर्यावर्दी जरूर असले पाहिजेत. करार करावयाची आज्ञा जाली तर करार करून चाकरी घेऊन. सेवेसी विदित होय. दर्यावर्दी यांची यादी आलाहिदा पाठविली असे त्यावरून श्रुत होईल. हे विज्ञाप्ति.

हे विज्ञाप्ति

¶*Chimaji Appa is informed about the ships which have been repaired and his orders are sought for the enlistment of some more recruits in the navy.*

No. 95] [16-1-1738

श्री

राजश्री * * * * * * *
गोसावी * * * * * * *

श्री चिमणाजी बलाल आसीर्वाद * * * * * समान सलासीन

[1] दुरुस्ती; repairs.

ा अलफ. हाती पाठ(व)णे म्हणोन तुम्हास लिहिलेच आहे व कृष्णाजी गोविंद व
ादपत पाठविले आहेत, तरी हती निशाणाचा पाठऊन देणे. बांडे आले,
जगर उद्या सामील होतील. आटोले आजीच सामील होतील. कृष्णाजी
वेंद व मकुंदपंत तेथे पावले नसिले तरी तुम्ही हाती पाठवणे. कबाडी व बैल
ाचे पाठऊन देणे. जाणिजे. छ ६ सवाल. सात राऊत येथून पाठविले
हेत यासमागमेच पाठवणे. आज आमचा मुकाम येथेच आहे. साईकाली
वटका रात्री येथे पावला तरी चिंता नाहीं. हे आसीर्वाद.

[Chimaji Appa asks that the elephant carrying the flag should be sent him nediately.

. 96] [9-4-1739

छ १२ मोहरम.

श्री

श्रीमंत राजश्री आपासाहेब

साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक केशव सजणाजी चरणावरी मस्तक ठेऊन सां दंडवत. विज्ञापना
ाष. ता। छ ११ मोहरम दोन प्रहर रात्रीस महिमाजी लोंढे मांडवीहून आले
ा बरवाजी ताकपीर याची चिठी आम्हास आली कीं तुमचे प्रयोजन आहे तर
ावीस येणे, कांही मांडवीकरासी बोली करणे आहे. याजकरितां आपण मध्य
ास मांडवीस गेलो. उदयेक सायंकालीं परतोन ठाणे मजकूरी येतो. सेवेसी
ेत होय हे विज्ञाप्ति.

[Keshav Sajnaji reports to Chimaji Appa that he is proceeding to meet rwaji Takpir at Mandvi and would return the next day.

. 97] [27-1-1738?

पो छ १९ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक शंकराजी केशव सा। ना। वि। येथील वर्तमान ता। छ १७
ाळपावेतो स्वामीचे कृपादृष्टीकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे
सोमवारी होते म्हणून रा। मोराजी सिंदे येथे होते. त्यास आजीच यैकिले

की प्रस्तुत होत नाही याकरितां पाठविले आहेत. यासीं आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. किले माहुली याचे स्वाधीन करावी. कल्याणकरांचा दाखला नाही यैसा अर्थ केला पाहिजे. दरमाहे हजिरी पाहिजे तरी हुजरून आणून, परंतु याचे व त्यांचे बनत नाही, याकरितां याप्रमाणें करावयास स्वामी समर्थ आहेत. सा * * बहुमान बकसिसांचा करावा त्याची यादी आलाहिदा पाठविली आहे. विदित जाले पाहिजे. किले माहुलीचे भरतीस लोक येणेप्रो पाठविले

१२० किता
१४० किता
———
२६०

येकूण दोनसे साठ पाठविले. दुसरे आज्ञेप्रा रवाना करितो. रा मोराजी सिंदे यासी येक दिवस ठेऊन दुसरे दिवसी आज्ञा दिल्ही पाहिजे. याची गौरसी करावी हे विज्ञाप्ति. रा कर्णाजी सिंदे येथे आले आहेत. वरकडहि येतील. हे विज्ञाप्ति.

¶*Shankaraji Keshav informs Chimaji Appa that he is sending Moraji Sindia with some men to reinforce the fort of Mahul.*

No. 98] [*Previous to 1737*

छ १७ जिलकाद

श्री

पुा राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. किले कोहजकराचा व फिरंगियाचा कजिया जाहाला. याकरितां फिरंगियानी मौजे आवढे पा कोहज हा गांव मारिला व किले मजकुरचा कारखानिस धरून नेला, यैसे वर्तमान आले. आपणास कळावे याकरिता लिा असे. बहुत काय लिहिणे लोभ केला पाहिजे. [१] हे विनंती.

¶*Letter to the Peshwa informing him about the quarrel between the Portuguese and the Killedar of Kohaj. The Portuguese sent a raiding party to Avadha and took away the Karkhanis of the fort a prisoner.*

---

१ हीं अक्षरें खंडोजी माणकराचीं वाटतात.

No. 99] [13-3-1738?

छ ७ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक सां नमस्कार विनंति येथील कुशल ताा छ ३ माहे जिल्हेजपर्यंत स्वामीचें कृपेकरून येथास्थित असे विशेष. काली वसईस तोफा जाहाल्या त्या काय निमित्य म्हणून स्वामी म्हणतील, तर फिरंगियांनी परवाचे दिवसी अरमार बाहेर काढून बाहादरपुरियाचे पश्चमेस बारियावरी नांगरले आहे. काली येकु वेल तेरा तोफा व येक वेल चौदा येकूण सत्तावीस तोफा कोटावरून मारल्या, त्याचे गोले मर्तिन सिरवेलचे हवेलीस गोले दोन तीन लागले. माडीचे काम पातल याकरिता दोन भिंती फोडून गोले येतात. माडीचे दक्षणचे आंगे माणूस बसोपावेनासे केले आहे व माडीचे दक्षणेस मेढियास काम लाविले आहे, तेथे मेढियास दोन तीन गोले लागले. याखेरीज नित्य गोले मारितों तेव्हा येक दुसरा गोळा मेढियास लागतच आहेत. परंतु जेथपावेतो माती भरली आहे तेथे गोलियाच्याने फोडवत नाही. दोन च्यार गोले आत राहिले आहेत. जो जो पेटीचे काम उंच भरत जाईल तो तो मग बचाव होईल. काम बरेसे मजबूद होत आहे. कालीच गोळे आमच्या तलावरी गेले त्याणी दोन माणसे जखमी जाहाले. कोटावरून सत्तावीस आवाज जाहाले. याखेरीज धारावीस सात आवाज केले व जाहाजे धारावीचे खाडीमध्ये आहेत त्याजवरूनहि दाहा अकरा अवाज केले. येणेप्रमाणे काली तोफा जाहाल्या. कितेक लोकाचा तर्क आहे की कडदीन निघाला, आजी नवा ज(न)राल आला आहे. त्यास कडदीन गोवियास जावयास निघाला, मातबर माणूस आला अगर गेला म्हणजे ज्याचे आंगावरून जाईल, त्या जाहाजवालियाने तोफा माराव्या व ज्या कोटावरून गेला त्या कोटकरियाने तोफा माराव्या, यैसा फिरंगियाचा दस्तुर आहे. यास्तव जरी कडदीन गेला असिला तरी तोफा मारल्या असतील यैसे लोक कयास करितात. विदित जाहाले पाहिजे * आरमार सावकारी पढग्या व दोन फरगते गोव्यास जातें. बाहेर बारियावर गेले आहे. आरमार जाते म्हणून आम्ही फारच खबरदार आहो. नवा मेढा घालितो. त्यास येथे (?) रावा डो लांब सत्रा हात पैकी तीन हात भुईमध्ये चवदा हात भुईवर येणेप्रमाणे बाहेरचा थर घातला. आतून बारा हात रुंदी, काम लाहान दगडी, बाहेरच आंग गडगा कोरा आडीच दोन हात रुंद, आतून दोन हात, मध्ये सात हात वाळू या

प्रा रुंदी काम धरून मेढियातून पांच हात काम उंच आले. त्याचाच लाबी (त्याचा चकही ?) काढून पाठविला असे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*On being asked the reason of cannons being fired at Bassein Shankaraji Keshav explained to Chimaji Appa that it was according to the Portuguese custom of firing guns in honour of the departure of their Governor-General.*

No. 100] [*18-3-1738*

पौ छ ९ जिलकाद

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री आपा
साहेब स्वामीचे सेवेसी

सेवक चरणरज आज्ञाधारक कानोजी पाटील मुा कल्याण कृतानेक रामराम विनंती येथील कुशल वर्तमान ताा चैत्र सूद नवमीपर्यंत साहेबाचे मेहरवानीकरून सुखरूप असो विशेष. साहेबी आंताजीपंतास व आपणास पत्र पाठविलें कीं हुजूर येणे. त्यास आपण च्यार माणसे साहेबकामावरी पाठविली आहेत, त्यांचा मार्ग लक्षीत राहिलों आहों. तीं आज उदईक येणार आहेत. तीं आली म्हणजे त्यांस समागमें घेऊन स्वामीचे पायाजवळ येतो. स्वामीची आज्ञा घेऊन या प्रांतांत आलो ते स्वामिकार्यास तत्पर आहों, परंतु स्वामीही ज्याप्रमाणें आमची बेगमी करावयासी सांगितली होती त्या न्यायें घडून न आली. परंतु आपण कांहीं साहेब-कामास कोताई केली नाहीं. हजार रुो कर्ज काढून खर्च केला आहे. आपलीं मुलेंमाणसें उपवासी मरतात. तरी साहेबी आमची बेगमी केली पाहिजेत. आपणासमागमे चौदा आसामी आहेत, त्यांचे मुलामाणसांची खर्चवेचाची बेगमी साहेब करणार धनी आहेत. आपण साहेबकामावरी अंतराय कधी करणार नाहीं. स्वामीने कागद कोंडाजी नंदकर याजबराबर पाठविले, त्यास कोंडाजीस आपण समागमे घेऊन त्या थळा नेऊन च्यारी ठिकाणें दाखवावी येसा आपला हेत होता. परंतु याणी जाब दिधला, कीं आपणास खावंदाची आज्ञा नाहीं. यैसियासी दो चौ दिवसीं आपली माणसे आली म्हणजे आपण येऊन पोहचतों. सविस्तर लिहावें तों पुरवत नाहीं. कोंडाजी नंदकर मुखवचनें सांगतां कळों येईल. आपली निष्ठा स्वामीचे पाया वेगळ नाहीं. बहुत काय लिहिणे कृपा निरंतर असो दिल्ही पाहिजे हे विनंती.

¶*Kanoji Patil of Kalyan acknowledges the call from Chimaji to present himself before the latter and suggests that his services and those of his subordinates have not been adequately rewarded.*

No. 101] [18-3-1738?
छ ८ जिल्हेज

श्री
श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक शंकराजी केशव कृतानेक साा नाा विाा ताा छ ८ जिल्हेज आवसीची प्रहर रात्र जाणून स्वामीचे कृपादिष्टीकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विाा. कामणदुर्गावर आगव्या दिसत होत्या व कांब्याहून चौकीदार आला त्याणे रबाब वाजत होती म्हणून सांगितले, त्यावरून सेवेसी लिहून पाठविले. आण त्याच्या शोधास स्वारीहि येथून पाठविली होती ते आजीच प्रहरा आवशीचे रात्रीस आली. त्याणी वर्तमान सांगितले की ते गोष्ट मिथ्या, याकरितां सेवेसी लिाा आहे. यानंतर कामणदुर्ग हा जागा मोकला ठेवावा, त्यामुळे मागेपुढे टोपीकर वसवील हा संशय चितांत आणावा आणि तो लबाडी करावयास चुकणार नाही. भिंवंडी जवल आहे याकरितां विचार मनास आणून कामणदुर्गी आजीच राा बालकाजी नाा पडवल संभर माणसानिसी सामान बाा देऊन पाठविले आहेत. कामणदुर्गावरी पाणी नाही, त्यास पुढे प्रजन्यकाली पाणीहि करून. परंतु तो जागा मोकळा कार्याचा नाही, याकरिता बालकाजी पडवल लोक देऊन पाठविले आहेत. सेवेसी विदित जाले पाा. भिवंडीस लिहून संभर घागरी व रांजण पंचवीस कामणदुर्गी रवाना करावयाची आज्ञा केली पाा. वरकड इकडील वर्तमान यथास्थित असे. होईल तें वरचेवरी सेवेसी लिहून पाठवीतच आहों. येथून स्वारी पाठविली ते लोक कामणदुर्गाच्या पाण्यावरूनच पाहोन आले. वरते माथ्यावर न गेले. याकरितां बालकाजी पडवल रविवारी रवाना केले. सेवेसी श्रुत होये. तेथे ठेवावयास लाहानसी तोफ येक पलेदार लांब आवाज जाई यैसी गोले चालीस देऊन भिवंडीस रवाना करावी. दारू येथून पाठविली आहे. भिवंडीहून तोफ भाई व गुलाम याजपासून कामणदुर्गी सत्वर पाठवावी. विदित होये * हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshao occupies the forts of Kamandurga and establishes an outpost there so that the Portuguese would not find it unoccupied.*

No. 102] [22-3-1738?
छ १२ जिल्हेज

श्री
श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृाा सां नाा विाा येथील कुशल ताा छ ११ माहे जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. किले कामण-

दुर्ग येथील वर्तमान पूर्वी लिा आहे त्यावरून कलले असेल. त्यास तेथील विचार पाहाता कामणचे दक्षणेस मुल्लक तीन कोस रुंदी आणि लांबी आठ नव कोस अगदी वोस, तिकडून वाट चालत नाही, माणूस जात येत नाही, त्या रानातील खबर कळत नाही, आणि किले मजकुरावरी फिरंगियाची स्वारी गेलियाचे वर्तमान आले, बोभाट जाहाला आणि तो जागा वसविला नाही, आणि कदाचित फिरंगियानी वसविला तरी मांडवीची वाट कल्याण भिवंडीस जावयाची आहे तेहि मना होईल. आणि कामणगडाहून भिवंडी व सोनाल तपा तीन च्यार पांच कोस त्यास त्याणी त्या प्रांतात स्वारी पाठविलियावरी तो मुल्लक वसणार नाही आणि कामण वसलियावरी तो त्या प्रांते स्वारी करावयास चुकणार नाही. याकरिता किले मजकूर वसवावयाचा विचार करून तेथे रविवारीं रा सिवाजी नाईक अणजोरकर यासमागमे संभर माणूस देऊन किलेमजकुरास पाठविले. किलियावरी काही तांदूल दाली तूप तेल मीठ कुंभारकाम व बुरुडकाम व तंबाकू वगैरे सामान पाठविला. किले मजकुरामुले दक्षणेस किलियाचे गाव आहेत ते आपले आहारी पडिले. विदित जाहाले पाहिजे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshav explains why he found it necessary to occupy Kamandurga: it was, he says, to prevent the enemy getting a footing there.*

No. 103] [*23-3-1738*

छ १९ जिल्हेज.

श्री

श्रीमंत राजश्री आपा साहेबांचे सेवेसीं

सेवक आज्ञाधारक कृष्णाजी नाईक अणजूरकर व रामाजी माहादेव मो मालाड चरणावरी मस्तक ठेऊन सिरसां नमस्कार अनुक्रमे दंडवत विज्ञापना. ताा छ १४ जिल्हेजपावेतो येथील वर्तमान येथास्थित असे विसेष. मंजूरदार आटगांव ताा पैकीं पंचावन आले त्याबरोबर लोखंड वजन पक्के ८२॥ अडीच मण व पेंड वजन ८२ तीनमण येणे प्रो पाठविली त्यास येथें वजनी वजन कचे भरले असे

।२ लोखंड दागिने सुमार २९ येकुन वजन कचे.
।२ पेंड वजन कचे.

।॥१

5668

येणे प्रा सोलामण जिनस पावला. बारसणीचे वजन करून घेतले असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना विसेष. पेदरेल लौकर पाठवावयासी आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. प्रस्तुत येक पेदरेल आला म्हणजे येथे दोन आहे व तो येक येसे तिवे मिलोन भटीचे काम चालवितील. माकण करविली आहे ती आगत्य पाठवावयासी आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय. रा गोपालराव कानडा याचे जमावास रोजमुरा पावला नाहीं म्हणोन लोक गवगवा करितात. तर कृपालु होऊन यांचे लोकांस रोजमुरा द्यावयासी आज्ञा केली पाहिजे. विसेष. काल ब्रहसपतवारी २४८ खेपा जाल्या, दर खेपेस धोंडे पका ८॥. प्रमाणें आणविला, त्यास दर खेपेस फद्या १। प्रो येकूण फदे सुमार ३१० दर रुपये यासी फदे ४० प्रो येकूण रुपये ७॥ पावणे आठ काल खर्च मजुरा जाले ते माहालचे ऐवजपैकी दिल्हे आहेत. आनखी आज पाचसे माणूस यावे तो जमा होईल. हुजुरून तीस चाळीस रुो देवावे हे विज्ञापना.

¶Krishnaji Naik Anjurkar and Ramaji Mahadeo acknowledge receipt of pig iron and other materials that were despatched for setting up a foundry at Malad.

No. 104] *[23-3-1737?*

छ १३ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंती पोष्य चिमणाजी भिवराव व संकराजी केशव (फाटलें) सां नमस्कार विनंती येथील वर्तमान (फाटलें * *) जिलकाद मंदवार मुकाम पापडी प्रां वसई स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे. स्वामीची पत्रें आली ती पावोन सविस्तर वृत्त कळों आलें. त्याचें प्रत्योत्तर आलाहिदा पत्री लिहिलें आहे त्यावरून विदित होईल. यानंतर आम्ही या प्रांते स्वारीस आलों ते समई लस्करचे बुनगे भिवंडीस राहिले. त्याची पंधरादि (फाटलें) * बेगमी केली होती. त्यास पंधरा दिवस होत आ (फाटलें) पुढें बेगमी पोटाची जाली पाहिजे. येविसी येथे (फाटलें) विनंती केली आहे. तरी बुनगे राहिले आहे त्याची याददास्त आलाहिदा पत्री लिहिले आहे त्याप्रमाणें बेगमी कर्तव्य ते केली पाहिजे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶Chimnaji Bhivrao and Shankraji Keshav request Chimaji Appa to supply them with provisions.

No. 105] [*24-3-1738?*

छ १९ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामींचे

सेवेसी

विनंती. सेवक शंकराजी केशव कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ १४ माहे जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी छ १२ जिल्हेजची पत्रें पाठविलीं तीं पावलीं. किले कामणदुर्ग येथील विचार लिहिला की जागा बसवलियावरी काईम होईल तरी उतम. नाही तरी धारावीचा विचार जालियास उतम नाही. जोपर्यंत धारावी मोकली होती तोवरी फिरंगियाने काही केले नाही. धारावीस आम्हाकडून उत्पात जाहला याकरितां त्याणीहि ती जागा धरली, तैसे न व्हावें हा अर्थ चितात आणून लिहिले. येसियास स्वामीनी लिहिले हे खरेच. कामणचा विचार धारावी सारखा नाही. धारावी खाडीमुळे व बंदरामुळे केवल जंजिरा वसई न जाली, गलबतातून वरचेवरी पाणी दाणा किंबहुना सिजले अन्न नेऊ लागले, तरी अन्न निवाले नाहीं तो थोडिकिया अवकाशात पोहचेल येसी जागा जवळी आहे, तेसा कामण जवळी नाही. आधी जाहाजातून वाट किलियास नाही. खुशकीस किला, किल्यास चढाव दीड दोन कोस आहे. फिरंगी डोंगरास गांडू आणि आमचे लोकाचे तो बिरीदच किलियास, कडेहि असत्या पदार्थामधे बरेच आहेत. पाणीहि किलियावरी आहे. फारसा श्रम न लागता पाणी पुरेसे होईल. दुसरी गोष्टी किला सायेवान परगणियाचे मध्यावरी आहे. भिवंडी व सोनाल तपा किलियातून तीन च्यार कोस आहे. फिरंगियानी वसविला तरी कल्याणभिवंडीचा मार्ग पडला व सायेवान परगणा वसणार नाही. भिवंडी सोनाले येथपावेतो उपसर्ग देईल यास्तव वस्ती केली. वस्ती केलिया निसंदेह निवृति जाहाली आणि किलियाचे दक्षणचे गाव अगदी वोस पडले होते ते वसविल्यास कार्यास येईल आणि कामणचे दक्षणेकडील कामणावरील वाट पडली होती ती चालती होईल व गाव वसलियावरी से दोनसे खंडी गलाहि येईल. किलियास माणूस म्हणावे तरी सेंभर दिडसे ठेविले तर बेगमी होईल. किलेयाची वस्ती जाहालियावरी मार्ग चालवावयास फिकीर नाही व पा। मजकूरची वसाहती होईल. बंदरकाठचे पाच सात दाहा गावची वसाहती न केली तरी कार्यास येईल. विदित जाले पाहिजे. सारांष वज्रगड व अरनाला यांची पाठी मोकली असिलियास उतम म्हणोन वसविला आहे. त्याची फिकीर न करावी. सेवेसी विज्ञापना.

¶*Shankraji Keshav Phadke explains the importance of occupying the fort of Kaman.*

5670

No. 106] [25-3-1738

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी.

विनंती. सेवक शंकराजी केशव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १९ माहे जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असें विशेष. स्वामीनी लिहिले कीं खारेपटणचे गलबत धरिले आहे. त्यास कौल राजश्री मानाजी आंगरे याचा आहे व माारनिलेकडील सांप्रत राजश्री रामाजी अनंत साडेतीनसे लोक घेऊन आले आहेत. त्यासमागमे गलबत सोडून द्यावयाचे पत्र लिहिले आहे व माारनिलेहि विनंती करितात. आम्ही कौल दिल्हा तो आपण दिल्हा, दुसरा विचार नाही येसा कितेक प्रकारे विनंती करीतात. येसा विचार पाहतां त्याणी कौल दिल्हा तो आम्ही दिल्हा, दुसरा विचार नाही. माारनिले-कडील साडेतीनसे माणूस आले व पेशजी तीनसे साडेतीनसे आहेत. पर्जन्यका-लात पाचसे तो राहतील. वरकड दारूगोली व तोफा व फिरकोली फर्मास लागतो ते आणवीत आहो आणि तेहि पाठवीतच आहे. आम्ही देशास गेलो तरी ये प्रांते प्रसंग पडला तरी साहित्य करितील. त्यास तुमचे विचारे गलबत सोडून द्यावे कीं न द्यावे ? गलबतावरी मालियत काय आहे ते लेहून पाठवणे. फिरंगियासी कलह लागला म्हणून वरकडासी कजिया करावा येसे नाही. समाधाने असलिया उतमच आहे. यास्तव काय ते लिहिणे म्हणून लिहिले. येसियासी राजश्री मानाजी आंगरे सर्व प्रकारे आपले पदरचे आहेत व त्याजकडील पाचसासे माणूस चाकरी करीत आहे व दारूगोली सर्व साहित्य पुढे करितलि व हाली लिहिलेप्रमाणे पाठवीत आहेत, त्याणी कौल दिल्हा तो आपण दिल्हा, दुसरा विचार नाही याकरितां तारू सोडावे हे यथार्थच आहे. परंतु त्याणी आमचा कौल दिल्हा तो मानावा व आम्ही त्याचा मानावा हे उचित आहे. परंतु सालगुदस्ता आम्ही मौजे बोलिज ताा आगासी येथील नाथासा वाणी आमचा, त्याचे सुबेदारी गलबत त्यास कौल देऊन त्याणी जाहाजावरी गूल भरून मुंबईस पाठविले. त्यास तें जाहाज राजश्री मानाजी आंगरे याणी धरून नेले. त्याविसी आम्ही लिहिले कीं आमचे कौली जाहाज धरावेसे नाही, सोडून द्यावे, त्याउपरी सालमजकुरीहि त्यास सोडून द्यावे म्हणून लिहिले. परंतु त्याणी उडवाउडव करून लिहिले. तारू सोडिले नाही. त्याचे कौलाचे जाहाज स्वामीनी सोडावे तेव्हा त्याणीहि आमचे कौलाचे सोडावे हे रास्ती आहे. तरी नाथासा याचे गलबत सोडवावे, मग त्याचे कौलाचे सोडावे. आधी तो न सोडावे. काय निमित्य तरी त्याची आज ताा चाल पडली आहे की त्याचा कौल घ्यावा आणि उदमियानें जाहाज नेऊन

5671

आणून उदीम करांवा ; आणि आमचा नवा अमल आपला कौलाचा जफ्त पडे तोवरी कोणाचे कौलाचे जाहाज सोडलियावरी मग जो तो त्याचा कौल घेऊन येईल. त्यास येकवेल सोडावयाची प्रवृति पडली म्हणजे तैसीच चाल पडेल. यास्तव सोडू नये. तथापि त्याचे चाकरीवरी व निष्ठेवरी दृष्टि देऊन सोडावे तरी नाथासाचे जाहाज सोडवून हे सोडावे. वरकड जाहाजातील मालियत लेहून पाठवणे म्हणून लिा तरी नवी बंदरचे कोठीया जाहाज म्हणून यादी मालियेतीची लेहून पूर्वी पाठविली आहे त्यावरून कलेल. विदित जाले पाहिजे. त्याचे कौलाचे जाहाज खारपटणचे ते सोडावे आणि त्याणी आमचे जंजिरियाचें गावचे जाहाज न सोडावे हे उतम आहे येसे नाही तरी नाथासाचे जाहाज व त्याजवरी गूल होता तो सोडिलियासी हेहि सोडावे. जर त्याणी काठमाराच नाथाचा सोडिला तरी आम्ही तसाच देऊन. दुसरी गोष्टी अलाहिदा मजकूर लिहिला असे त्याजवरून विदित होईल व बावाजी जाधव याचे कबिल्याविसी मारनिलेस कितेक वेला लिहिले त्यास येक कबिला तो ते न सोडीत. त्यास अगत्य तसेच आम्हासहि अगत्य. तरी त्याणीहि गोष्टी करावी. सेवेसी विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav writes to Chimaji Appa in reply that he has no objection to release the trading vessel captured by him carrying Manaji Angria's permit provided Manaji also agrees to give a free passage to merchant vessels carrying the Peshwa's passport.*

No. 107] [*Recd. 30-3-1738*

पौ छ २० जिल्हेज.

श्री

सेवेसी विज्ञापना विशेष राजश्री बरवाजी पाटील यासी पाा. सायेवनची कुले दक्षिणेत सालमजकुरी गेली होती त्याजविसी लिहून पाठविले होते. त्यासी मशारनिल्हेचे पत्र आजीच आले कीं तुम्ही कारकून पाठविणे. जी कुले सालमजकूरी दक्षिणेत आली असतील ती घेऊन जाणे. त्यावरून आम्ही कारकून एक व माहीत माणसे पाठवून पाा मजकूरची रयेत आणवितो व बाहादरपुरा मरतिन सिरवेलची माडीभोवते कोरे काम बाहेरच्या आंगे भिताड रुंदी हात दोन व आतून दीड हात मध्यें आठ हात माती भरावी. बाहेरून चौदा हात माड भुईवर घ्यावा. आतून आकरा हात घ्यावा आणि तूर्त गढीच करावी. पुढें सराईस मग त्यास लपेट तीन हात दुगडी चुनेगची घ्यावा, माडी आंत सापडोन करावे, हा विचार करून काम वगैरे चालीस सहा रोज लाविले. तीन चार पांच हात बाहेरचे

भिताड आले. काम करीत असो. फिरंगी धारावी बांधितो. चुन्याच्या भट्या लावून उदानचा करल नेऊन काम तडक करीतो ते नजरेने पाहतो. बरे तो ते करितो अम्ही त्याचे उरावर हे काम करितो. तो पाहतो त्यास म्हणतो कीं बाहेर नीघ. आम्ही पुढिले मोर्च्यांचे तीन अंगी दाहा बुधले दारवेचे पुरून त्याची रंजक मेढियात आणून त्याजवर माणसे नेमून ठेऊन व हुके करून व तीन तोफा आंतील सामान सुद्धा व चालते गाडे दोन सिद्ध करून बाहेर दोन तोफा लांब पल्याच्या सिद्ध करून व बरकंदाजी व जेजाला हे सामान करून उपराला टोली दीड हजार माणूस व राव्रताच्या तीन टोल्या दोन बाजूंस दोन व एक आमचे पासी सिध करून त्याचा मार्ग लक्षितो. पुढें स्वामीचे पुण्य समर्थ आहे. हे विज्ञापना.

¶Shankaraji Keshav commences the work of repairs of the ramparts of Bahadarpura and thus tries to add to its strength.

No. 108] *[30-3-1738 ?*

छ २० जिल्हेज.

श्रीव्यंकटेश

श्रीसकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मी-
अलंकृत राजमान्य राजश्री आपा स्वामी
गोसावी यांसी

पोष्य व्यंकटराव नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन आज्ञा कली पाहिजे विशेष. आपण रोजमरेस ऐवज पाठविला तो पावला. परंतु लोकास रोजमरा पुरत नाहीं. त्यामध्यें येथें महर्गताहि अशास येविसी राजश्री गोविंदराम आपल्यास विनंती करितील. तरी चितास आणून रोजमऱ्याची बेगमी होऊन येथें लोकांचा गवगवा न पडे ते गोष्ट केली पाहिजे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶Vyankatrao Narayan asks funds from Chimaji Appa for the payment of his men.

No. 109] *]29-3-1738*

छ २१ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजेश्री आपा स्वामी
साहेबाचे सेवेसी

श्री तुकोजी सितोले व अपाजी सितोले मुा वसई विनंति उपर विनवावया प्रार्थना यैसीजे. साहेबांचे कृपेकरून ताा छ १९ माहे जिल्हेजपावेतो समस्त

सुखरूप असो. स्वामीकडील बहुत दिवस आज्ञापत्र येऊन सेवकाचा परामृश होत नाही विशश. पूर्वी साहेबासी विनंति केली आहे कीं आम्हास येक दोन गाव राहावयास पोटाची बेगमी व घोडियाची संवस्ता होये ऐसे दिल्हे पाहिजेत. अनी स्वामीनी कबूल केले आहेत. यास्तव सेवसी विनंतिपत्र व रा। राघोपंत व हरिपंत पाठविले आहेत. तर साहेबीं आमच्या मुलामाणसांची सवस्ता होये ऐसे केले पाहिजे. स्वामी कल्पवृक्ष आहेत. आपण स्वामीच्या चरनासी येकनिस्ट हेत धरला आहे. विशश आम्हास घोडे बसावयास नाही. घोडियाविण बहुत आबाळ आहे. तर साहेबी घोडियाची सवस्ता केली पाहिजे. कामाकाजाचे दिवस आहेत. या नंतर माहिमचे वतमान तर साहेबास विदित जाले आहे. आमचा माऊस भाऊ रा। राजबा गाजरे[१] कामास आले व आम्हाकडील दोघा तिघा भावास व घोडियास जखमा लागल्या होत्या. साहेबाच्या पुनेकडून बऱ्या जाल्या. विशश त्याहावे तर स्वामी सुज्ञ आहेत. कृपा निरंतर असो देणे हे विनंति.

¶*Tukoji Shitole requests Chimaji Appa to favour him with some Inam for the services which his family had rendered in the memorable engagement at Mahim in which his two brothers were killed.*

No. 110] [*4-4-1738?*

छ २८ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे

सेवेसी

विनंति सेवक शंकराजी केशव कृा सा। ना। वि।. येथील कुशल ता। छ २९ माहे जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. केलवे माहिमाकडून फिरंगियाच्या गुराबा दोन त्रिकती आजी तिसरे प्रहरी आल्या, त्याजवरी लोक किती आहेत ते पाहावयास वालबंटीवरी लोक पाठविले, व आम्ही मतिन सिरवेलचे हवेलीवरून दुर्बीन नलीने पाहिले. त्यास च्यारसे माणूस आहे. वसईच्या बंदरामधे आल्या हे वर्तमान स्वामीस कलावे या करता लि। असे. मौजे मोलिजकर सुतार दामुलजी ठाणियास गेला तो तेथेच ठेविला आहे. आणखी सुतार दाहा पंधरा तेथे आहेत ते काय काम करितात? गुदस्तापासून सुतार आहेत त्याणी जंजिरे अरनालियास गलबते जाहाली आहेत, त्याचे तोडीचे येक तऱ्ही गलबत केले की काय? दामुलजी सुतार गलबताचा कारीगार चखोट

---

१ बुरुडकर.

तो तेथे गेला या करिता येथील काम कितेक तटले आहे. तरी स्वामीनी दामुलजी सुतार यास लौकर पाठऊन द्यावयासी स्वामी समर्थ आहेत. विदित जाले पा. दामुलजी समागमे आणखी पाच सुतार ठाणियास गेले आहेत त्यासहि पाठवावे म्हणजे येथील काम चालेल * पर्जन्यकाली गोळे घडवावे लागतील. त्यास लोखंड मोठा दागिना पाहिजे, त्यास दोन तीन खंडी पके व इंग्रजी जत्रेत सापडले ते घेवावयासी आज्ञा केली पाहिजे. हे विज्ञापना.

¶Shankaraji Keshav reports to Chimaji Appa the arrival of some Portuguese ships carrying about four hundred men on board. He requests him to send the carpenter Damulji so that the work of building ships will be expedited.

No. 111] [*4-4-1738*

पो छ २७ जिल्हेज

श्री

चिरंजीव राजश्री नाना यास चिमणाजी बलाल आसीर्वाद उपर. येथील कुशल ताा छ २९ जिल्हेज यथास्थित असे विशेष. "राजश्री स्वामी उंबरेजहून कूच करून कोस दोन कोस पुढे गेले. तेथून जासूद पत्रे घेऊन आपल्याकडे येत आहेत. आम्ही तोंडजबानी वर्तमान विचारले. लखोटे फोडून वाचून पाहिले नाहीत. रोज उठोन फर्माविसीचे कागद येतात. आजपावेतो ढालढकल करावयास कार्यास येई यैसे होते. कूच जालियावर केवल ढालढकल केल्याने बरे दिसणार नाही. तैसेच उत्तमपक्ष खावंद बाहेर गेलियावर तुम्हीच तेथे गेले पाहिजे, परंतु तुम्हास येका कार्यावर गुंता पडला आहे. याकरिता आपल्यास तरी काही राऊत देऊन पाठवावे. राऊत अनकूल न पडेतच तर तुबाजीपंत तेथे आहेतच, तेच फौज आपल्याजवल राहील. हा अर्थ चिरंजीव माहादोबास लिहिला होता त्यानी विदित केला त्याजवरून कळला. यैसियास राजश्रीकडील पत्रे आली आहेत, ती उद्या परवा येथे येतील त्यातील अर्थ कळेल. फौज पाठविणे म्हणून त्यानी आज्ञा केली असेलसे दिसते. दुसरे उंबरजेहून कोस दोन कोस पुढे गेले आहेत, परंतु तेथेच छावणी करून राहातात किंवा मजल दरमजल तासगावास जातात हाहि अर्थ मागून दुसरे वर्तमान येईल तेव्हा कळेल. त्या सारखे तुम्हास पाठवावे अगर माहादोबास पाठवावे हा अर्थ चितात निश्चयपूर्वक विचार करून मागून तुम्हास लेहून पाठऊ. त्या प्राा विचार करणे. विचारे पाहाता तों ते तासगावास गेलियावर तुम्ही अगर आम्ही दोघातून येकाने खावंदाजवल जावे हाच दुरंदेसी विचार आहे. फर्मासीविसी पत्रे येतात त्यास खर्चास देऊन

5675

माणसाचे समाधान करून ठेवीत जाणे. त्याच्या जाण्याच्या तातडीसारखे लेहून पाठवणे ते पाठऊ. . रा। कंठाजी कदमराऊ याचे लाहान थोर हजार घोडे होते त्यापैकी पंधरासे घोडे निरोप देऊन वाटेस लावले. गोजाजी बांडे निरोप घेऊन नासिकचे घाटे गेले. गनिमाच्या अत्राया रोज येतच आहे, परंतु आम्ही येथे असता येतील यैसे दिसत नाही. अम्ही येथून स्वार व्हात्रयाचा विचार करू ते समई कनिस्टपक्षे वसईस च्यारसे येथे च्यारसे यैसे आठसे राऊत ठेवले पाहिजेत. राऊत राहावयाचे मान्य करतां कंठास प्राण आणतील? उदंड आकांत करून ठेवले तर फार तर च्यारसे पावेतो जथतील. येथे दोनसे वसईस दोनसे राहातील. फौज येथून निघेल तेव्हा पायच्या लोकास फार भारी वाटेल. आधीच गनीमाची सलाबत धारावीमुळे खादली आहे. गनीम च्यार हजार पावेतो आहे तो आहेच. उणा होईलसे दिसत नाही. तहकीक वर्तमान तो कलत नाही. परंतु आहे तितका आहे हे खरे. फौज येथून गेल्यावर घोडबंदरास अगर पापडीस येक वेल बाहेर निघेल. जर ठासून माघारा लावला तर आपले लोक सेर होतीलच. जर त्याचीच सलाबत बसली तर वरकड कोणाच्याने धर धरवणार नाही. विचारे तो ऐसे आहे. परंतु रायाचे पदरी पुण्य थोर आहे तेणेकरून ईस्वर स्थले राखणे तैसी राखेल. येक धारावीमुले हलहल लागली ते ईस्वरास ठावकी! परंतु काये करावे? तूर्त इलाज तो चालेल यैसे नाही. खंडेस्वरी घोडी दुरुस्त राखणे. आम्हास बसावयास कार्यास येई यैसी फेरीत जाणे. नालबंद उद्या रवाना करतो तेथे येईल. हे आसीर्वाद. चिरंजीव रघुनाथास कंठी दिल्ही, उतम केले. हे आसीर्वाद.+

¶*Chimaji Appa writes his plans and engagements to Nana who was on tour with the King and communicates details of the campaign of Bassein expressing his keen disappointment at the loss of Dharavi.*

No. 112] *[8-4-1738?*

छ २ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील ता। छ २९ माहे जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी

+ पत्र सबंध आपांच्या हातचें.

छ २८ माहे जिल्हेजची पत्रें पाठविलीं ती पावलीं. वसईकडे तोफा होतात त्या कशाच्या? नवें आरमार आलें की उगाच मारितो, हे लेहून पाठवणे म्हणून लिहिले. येसियासी आम्ही नवा मेढा बांधीत आहो, लोक काम करितात, दगड वाहातात, नारलीचे मेढे वाहातात ते पाहातो, आणि नित्य पाचसात आवाज मारितो. आजी पाच सात दिवस मारितो. त्याच्या तोफानी कल्याणकराकडील दोन सिपाई पडिले व * * ज रे त्यापुढील येक जण मेला (एक ओळ फाटले) पाच सात माणूस जखमी जाहाले. मेढा तो तीन हात भुईमधे व चौदा हात वर याप्रमाणे चौफेर मेढा दिल्हा. आतून दगडाचे काम केले ते पूर्वी लिहिलेच आहे. वरकड स्वामीनी दामुलजी सुतार यास पाठवितो म्हणून लिहिले. उतम गोष्टी पाठवावा. खारेपटणचे जाहाजाविसी राजश्री मानाजी आंगरे याचे कारकून रदबदली करितात. त्यास त्याचे कारकुनाजवळी तुम्हास पत्र लेहून दिल्हे की काटफेरा मात्र देणे. तरी काटफेराच देणे म्हणून लिहिले. त्यासी स्वामीचे आज्ञेप्रमाणे सोडितो. परंतु मारनिलेची गलबते जंजिरे मजकुरचे बंदरात आली होती. याच्या गलबताची व फिरगी याचे गुराबासी गाठ पडली. सेवटी ते गुराबेस दुसरी गुराब उपरालियास आली. तेणेकरून याचे कमबल जाहाले. हे जंजिरेयाचे बंदरी आले. फिरंगी याच्या गुराबा निघोन गेल्या. याचे लोक जखमी जाहाले होते, त्याच्या जखमा बांधावयास तूप दिल्हे व दाली तांदूल दिल्हे. गलबते त्याची दोन तीन फुटली होती त्यास कपी करून देविली. तीन दिवस बंदरी होती. सेवटी जातेसमः आमचा बोलिंजचा सोनार मुंबईस होता तो सावकारी उदीम व सावकारीत होता त्यास कौल देऊन कबिला देखील बोलिजास बोलाविला. तो येऊन जंजिरे मजकुरच्या बुरुजाखाली गलबत नांगरून होता. त्या गलबतावरी त्याचा कबिला होता. त्यास याणी जाताना ते गलबत धरून नेऊन त्याचे बाइकाबरील वस्तभाव वगैरे जिनस चौदासे रुा लूट घेऊन केलवेयाचे बारेयावरी गलबत नेऊन तेथून सोडिले ते जंजिरे मजकुरी आले. तेथून आगासीचे बंदरी आले. आम्ही उदमियास कौल देऊन बंदर मजकूरची आमदानी करितो. त्यास हे येसे करू लागलियास बंदरची आमदानी कैसी होईल? आणि आमच्या कौलास कोण बभणार आहे? यैसेंच सालगुदस्ता * * * * * * * * आम्ही कौल देऊन पाठविला. त्यास राजश्री मानाजी आंगरे यास लिहिले परंतु त्याणी उडवाउडव केली. सोडिले नाही. आणि स्वामीनी लिहिले की खारेपाटणचे जाहाज सोडणे. त्यास बोलिजकर सोनार याच्या गलबताचे रुा व वस्तभाव सोडून देतील आणि नाथा गुजर याचे गलबत सोडतील, गूल देखील, तरी खारेपटणचे जाहाज सोडावे. स्वामीस कलावे याकरिता लिहिले असे.

5677

सेवेसी विदित होये. कुलाबकराचा कारकून आला तरी गलबत देत नाही. दोन्ही गलबतावरचा माल व येक गलबत नाथाचे येईल तेव्हाच देऊन. ते म्हणतील ते आम्ही येकावे आणि आमचे न आइकावे हे उतम नाही. ते देतील तेव्हा हे नेतील. सेवेसी विज्ञापना.

¶Shankraji Keshav writes to Chimaji Appa giving the reason for the firing from Bassein and explains why he has been forced to make reprisals on Manaji Angria.

No. 113] *[8-4-1738*

छ ३ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसीं

विनंति सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागायत छ २९ माहे जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेंकरून यथास्थित असे विशेष. राजश्री मानाजी आंगरे याचें आरमार दर्यांत आले होतें त्याची व फिरंगी याची गुराबेची गांठ पडली. त्याचें याचें युध्ध जाहालें. राजश्री मानाजी आंगरे याचे लोकांनी गुराब जेर केली. घ्यावी तों दुसरी फिरंगियाची गुराब उपरालियास आली दोन्ही गुराब येकत्र जाहालियावरी फिरंगियाचा जोरा अधिक जाहाला. मग राजश्री मानाजी आंगरे याचीं गलबतें निघालीं तीं जंजिरे अरनालियास आलीं फिरंगियाचा गुराबा वसईस आल्या. राजश्री मानाजी आंगरे याचे लोक जखमी जाहाले होते, त्यांस जखमियास तूप पाहिजे, तांदूळ व दाल पाहिजे, याकरिता त्यास जंजिरे मजकूरपैकीं तूप दाली व तांदूल व फांटे लांकूड देविले. दोन तीन गलबतें कपीस आलीं होतीं त्यास सुतार देऊन कपिया पुरवून करून देविल्या दोन तीन दिवस बदरीं होतीं आणि जाऊ लागले. छ २८ जिल्हेजीं ते दिवशीं आगाशीकर सोनार वतनदार हरसेट मुंबईस असतो तो सावकारी कर्म करितो त्याचे हातून काही जिनस आगासी बंदरी आणवीत असतो, त्यास कौल देऊन आगासीस आणविला. त्याचा कबिला व जिनस घेऊन गलबत आले ते वोहटाने बंदरामधें न ये, याकरिता जंजिरे मजकूरचा हणमंत बुरुजाजवळी नांगरिले होते त्यास याणी त्या गलबताजवली जाऊन गलबत धरून सोनारास धरून त्याचे मानेवर तरवार ठेविली की तूं बोलिलास तर जिवेंच मारिला जासील. यैसें

5678

दबाऊन गलबतावरी बाईका होत्या त्याची वस्तभाव व तारवावरील जिनस लुटिला. त्याची याददास्त आलाहिदा लेहून पाठविली आहे त्यावरून कळो येईल. वस्तभाव रुपये लूटून गलबत केलवियाचे बारेयावरी घेऊन जाऊन मग गलबत सोडिले ते जंजिरे मजकुरी गलबत आलें. तेथून बोलिजास आले. अशास आमचे कौली सावकारी जाहाजि त्यास त्याणी यैसीगत केलियावरी मग आमच्या-कौलावरी सावकार कोण येतो ? बंदर कैसे चालते ? फिरोन बधतो कोण ? याकरितां स्वामीनी त्यास लेहून गलाबतावरी रुपये वस्तभाव जिनस नेला आहे तो आणविला पाहिजे. नाही तरी आम्ही कुलाबकर कोली याची दोन गलबतें आगासीस आली होती ती अटकाऊन ठेविली आहेत. स्वामीनी पूर्वी लिा होते की खारेपटणचे जाहाज राजश्री मानाजी आंगरे याचे कौलाचें सोडणे, ते यैसी वर्तणूक करितात आणि त्याचे कौलाचें जाहाज आम्ही कैसे सोडावे? यैसेच सालगुदस्ता नाथासा गुजर आमचा बोलिजकर त्याचें जाहाज आमचे कौली ते त्याणी धरून नेले ते सोडीत नाही. हली हे जाहाज लुटिले. तरी या जाहाजावरील लूट व रुपये व नाथासा याचे जाहाज त्याणी सोडलियाखेरीज आम्ही त्याचे कौलियाचे गलबते व खारेपटणचे जाहाज सोडणार नाही यैसे वर्तमान आहे. कळावे याकरिता लिहिले असे. सोनार मजकूर कबिलासुधा आगासीस कौल सरकारचा घेऊन येत होता. ते जंजिरे मजकुराजवलून घेऊन गेले. तो जिनस आणविला पाहिजे सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav explains that the Portuguese batteries have kept up firing to prevent the progress and completion of the stockade that was being constructed under the supervision of the writer. As regards the trading vessel carrying Angria's permit and captured by the writer, he, in emphatic terms, refuses to release the ship unless Manaji Angria restores to their owners ships carrying the Peshwa's passport and seized by the latter. This to some extent accounts for the displeasure of the Angrias against the Peshwas.*

No. 114] [*14-4-1738*

छ ७ मोहरम

श्री

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत
राजमान्य राजश्री आपास्वामी गोसावी यांसी

पोष्य व्यंकटराव नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ताा वैशाख शुध शष्टी भृगुवार जाणोन स्वकीय कुषल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष.

पूर्वी आपण धान्याविसी मामलेदारास ताकीद केली त्यावरून अमदरती जाली होती. प्रस्तुत धान्य न येसे जाले. येविसीं राजश्री संकराजीपंतास सांगितले कीं धान्य येसे करणे. त्यास ते म्हणो लागले कीं आपणास राजश्री बरवाजी पाटील यांणीं लिहिले की प्रांतात खरीदी पडली याउपरी दाणा येत नाहीं. त्यांस आम्ही सांगितले कीं तुम्ही हे गोष्टी खावंदास लिहिणे. त्यास ते म्हणो लागले कीं यक वळ खावंदास दाण्याविसीं लिहिलें, त्यामुळे लोकांस कितेकांस विषम वाटले. याउपरी लिहीत नाहीं. जे मिळेल ते मिळो. न मिळे तरी उपास पडेल तरी पडो. ऐसियास येथें धान्य सातसेर जाले तेहि न मिळे. एखाद्यास मिळालें एखाद्यास न मिळे ऐसे जाले. ऐशा असोन धान्य न मिळे तरी लोकांनी काय करावें ? ऐतद्विसीचा विचार आपल्यास कळावा याजकरितां लिहिला आहे. अद्याप उनाला दोन महिने आहे, येव्हापासून धान्य यावयाचें बंद जालेवरी पुढें पर्जन्यकालीं लोकांची गति येथे कैसी होईल? हा अर्थ चितांत आणून जे धान्याची तरतूद करावयाची ते केली पाहिजे. नाहीं तर येथें स्थीत लोकांची वाचत नाहीं. याविसीची जे आज्ञा कर्तव्य ते करावी. रा। गोविंदराम यास पाठवणे म्हणोन आज्ञा केली त्यास पाठऊन देतो. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶Vyankatrao Narayan informs Chimaji Appa that the arrangements of Shankarajipant for sending provisions had broken down and that his forces suffer from a dearth of food and fodder.

No. 115] *[16-4-1738?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक सा। नमस्कार विनंती येथील कुशल ता। छ ७ माहे मोहरमपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले की खारेपटणचे जाहाज राजश्री मानाजी आंगरे याचे भिडेकरितां द्यावे लागते तरी सोडून देणे म्हणून. येसियासी स्वामीचे

आज्ञेप्रमाणे खारेपटणचें जाहाज जेठा गुजर जाहाजाचा सावकार याचे हवाली केले येणेप्रमाणे.

१ गलबत रुपारेल तंडेल भोजा
१ सुकाणू
१ सीड
१ दोरखंडे
२ तांब्याचीं भांडीं
१ वली देविली
१ नांगर
२ तांबे
२ थाले
२ वाट्या
२ कोली याची भांडी लहानसी.

१६

येकूण सोला दागिने देखील गलबत जेठाचे हवाली केले. विदित जाहाले पाहिजे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav hands over to Manaji Angria the ships and its accompaniments captured by him.*

No. 116] [*2-5-1737*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

चरणरजांकित लक्ष्मण हरि मुकाम कसबे मुरूड त्रिकाल चरणावर मस्तक ठेऊन सां ना विज्ञाप्ति. स्वामीचे कृपावलोकनेकरून तागाईत छ १२ मोहरम-पावेतो चरणरजांकिताचे वर्तमान येथास्तित असे सेवेसी विज्ञाप्ति. फिरंगी कडदिन सामान लोकानसी वसईस कुमक येणार. यैशियास सारे आरमार रवाना जाले व कडदीनहि निघाला असे. काल छ ११ मोहरमी आरमार लाहान मोठे छपन काशाच्या ब्रान्यावर साइंकाली दाखल जाली. जंजिरतर्फेचे लोक जाऊन मुलाखत घेऊन खुशाली दुतर्फानी आवाज केले. त्याचा शोध करिता कडदिन मुख्य मागेच आसे. हली ये ठिकाणी आरमार आले आहे याचा शोध घेतला.

त्यास सदरहू आरमारपैकी बहुतेक सावकारी गलबते वसई व मुंबई व दवण प्रांतीची सावकारी गेली होती तीस अंगारकाचे द्रोहामुले लगटाने कुमकेचे आरमार म्हणून चालिली आहेत. कुमकेचे आरमार लाहानमोठे दाहाबारा आहेत. त्याजवरील लोक तेरासे चौदासे लोकाखाली आहेत. कडदीण अंजनवेलीच्या बाऱ्यावर छ मजकुरी दाखल जाला असेल यैसी त्याची सांगी आहे. कडदीन उमेदीने येत आहे. सामान तो आप्लुच[१] आहे यैसी येथील मुख्य स्थलाची बोली आहे. कुमक दाखल जाल्यावर येक वेल लगट मारगिरीचा विशेषात्कारे करितील. या प्रकारचे वर्तमान सेवेसी निवेदन व्हावे याजकरिता अमर्यादा करून विज्ञाति केली. सेवेसी श्रुत होये. व मुंबईकडील ये स्थली पत्रे दोती रोजी येतात त्याचा अर्थ चितात युक्तीने आणिता, स्वारीचे लोकानी मोर्चे बलजोरीने चालऊन आकर्षण मांडिले आहे. टोपीकराचा जय होणे ही गोष्ट प्रत्ययास येत नाही व स्वारी चातुर्मास छावणीस राहिलियास भारीच आहे. स्वारीमुले सामान महर्ग जाले. छावणी निश्चयेसी होणार यैसे वर्तमान तिकडून येते ते सेवेसी कलावे म्हणून लिहितो. ये स्थली विवंचना करितात की कडदीन येक वेल दोन वेल लगट सामर्थ्यानरुप करील तो स्वारीचे लोकानी जिंकिले म्हणजे फते आहे. केवल निवाडा लौकरच होत नाही. छावणी मुख्यसहवर्तमान बंदोबस्तेकरून कस्तगिरी केली तरी फिरंगाण फते होईल. तन्मुले इंग्रजासहि विवंचना करून रिघावा करावा लागेल व इतरासहि श्रेह करून धान्यास महर्ग केलेसे होईल यैसी बोली. विदित होये. येथील मुख्याही धान्याविसी लिहिले आहे व चरणरजांकिताकडूनहि विज्ञाति लिहिविली आसे, त्याप्रमाणे धान्य आले म्हणजे हे कृतोपकारी होतील. नाही तरी जलप्राशन करून आयुष्यमर्यादा राहावे यैसे होईल. अमर्यादा करून विज्ञाति केली, क्षमा करणार स्वामी समर्थ आहेत. फिरंगी दुराग्रहेकरून आला आसे, परंतु नावासारिखे सामान लोकाचे फारसे नाही. निदान लोक दोन आडीच हजार आहेत त्यामध्यें काही पंचरूढ आहेत, काही टोपीकर आहेत. जलाबाहेर न निघत तरी प्राण वाचवितील. नाही तरी आंतकाल पावतील यैसी येथील विवंचना आहे. स्वामीचे सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

¶*Lakshman Hari of Murud communicates to Chimaji Appa that Antonio Cardim De Froes, a Portuguese officer, has been sent with reinforcements to defend the fort of Bassein, and that his fleet carrying a force, two thousand strong, was seen off the island of Kansa.*

---

[१] अल्प.

No. 117] [*24-4-1738?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक शंकराजी केशव कृा सा ना विा. येथील कुशल ता छ १९ माहे मोरहमपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विा. स्वामींनी तेरा हजार रुा आम्हाकडे रोजमरियास व श्रीमंत रा व्यंकटराव यांजकडे सातहजार व रा संभाजी सिंदे यास साहा हजार येकूण सवीस हजार रुा रा बरवाजी पाटील यास सांगोन रवाना करविले, ते त्याणी पाठविले पावले. त्याचा आम्ही तेरा हजाराचा जाब कालीच पाठविला व श्रीमंत राजश्री व्यंकटराव, राजश्री संभाजी सिंदे याचा जाब स्वामीचे नावे रा बरवाजी पाटील याजकडे पाठविले आहेत ते स्वामीकडे पाठवितील. विदित जाले पाहिजे विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav acknowledges receipt of Rs. 13,000 sent to him for paying his soldiers.*

No. 118] [*26-4-1738?*
छ १८ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी.

विनंती. सेवक शंकराजी केशव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ १६ माहे जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामींनी राजश्री मानाजी आंगरे याचे कौलाचे जाहाज सोडावे की नाही ते लेहून पाठवणे म्हणून पत्र पाठविले. त्याचे उत्तर स्वामीस आम्ही मुजरद माणसासमागमे पाठविले आहे. स्वामीकडून माणसे आली यासहि स्वामीकडे पाठविले आहे. विदित जाहाले पाहिजे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshav writes to Chimaji Appa, informing him that he had recorded his views in a separate letter, regarding the ship of Manaji Angria to be let off.*

No. 119] [*16-5-1738*

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक शंकराजी केशव कृा सा ना विा. येथील क्षेम ता छ २ सफर मुा पापडी जाणून वर्तमान येथास्थित असे विशेष. भिवंडीस दारू

केळे[१] ४० चालीस पाठविले ते भिवंडीहून येथे आम्हाकडे आले. सदर चालीस केळे पावले. सेवेसी श्रुत होये व गोळी आठ हजार पावल्या. मागाहून भिवंडीहून सात हजार गोळी आल्या. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

हे विज्ञापना

¶*Shankaraji Keshav acknowledges receipt of 40 pouches of powder and eight thousand shots sent to him from Bhivandi. Shankraji was encamped at Papdi.*

No. 120] [18-5-1738

छ ९ मोरहम

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सवेसी

विनंति सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागायत छ ४ माहे मोरहमपर्यंत स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. स्वामींनी लिहिलें कीं वसईस नवा जराल[२] कोण आला तो लेहून पाठवणें. त्यास नवा जराल पेद्रु[३] दमेल ज्याणी माहिमास जाऊन मोर्चा उठविला व सिरगांवचा व आसेरीचा वेढा उठविला व मनोर पाडिलें तो जराल होऊन आला. त्याणी दोन च्यार कामे केली यैसें विजुरे[+]च्या चित्तांत कर्तेपण येऊन जराली सांगितली व कडदीन यास गोवियास बोलावीला, यैसी खबर दो चहूंकडून आली व जन बोलतें. त्यास परवाचे दिवसीं छ २ मोहरमी संध्याकाळीचे च्यार घटका दिवस असतां कोटावरून दोन सरबत्या तोफाच्या जाहाला. येक तेरा तोफा जाहाल्या व येक वेल चौदा जाहाल्या व धारावीस साहा सात जाहाल्या व धारावीचे खाडीमध्यें पढग्या व येक पाल उभा होता त्याजवरून आवाज जाहाले. त्यास सर्व लोक म्हणतात की कडदीन गोवियास गेला. त्यास थोर माणूस गेलियावरी ज्या जाहाजांचे आंगावरून जाईल व ज्या कोटाचे आंगावरून जाईल त्या ठिकाणी आवाज करावेसे दंडक त्याचा आहे याकरितां केलें यैसें म्हणतात. वरकड चिरंजीव राजश्री धोंडोपंत व राजश्री होनाजी बलकवडे याणी माहीम तारापूर या प्रांतें हमेश स्वारिया करितात. आलाकडे दोन च्यार दिवस जाहाले, उभयता डाहाणूस गेले. तेथें पांच सातसें माणूस दमनच्या फिरंगियाचें आहे तेथें त्याचें याचें युध्द बरेसें जाहालें. फिरंगियाचे पांच माणसांची नाकें कापून सोडून

---

१ दारू भरून ठेवण्याचें शिंग. २ जनरल.

(3) Pedro De Mello. + Viceroy.

5684

दिल्हे मग आले. हें वर्तमान फिरंगियास कळलियावरी केलवियाचे रयेतीस दाणा घेऊन बाहेर घातली. त्यास केलवियाची रयेती दाहा बारा गाडे भरून आले. स्वामीचे पुण्य समर्थ आहे तो याच प्रमाणें फिरंगियास तंबी पोंहचाऊन जागा जागा शह पोहचाऊन फिरंगियास दवणपर्यंत परदेसी करितों. चिंता नाहीं. स्वामीनी दोन हजार माणूस मात्र आम्हास द्यावें म्हणजे फिरंगियाचा हिसाब धरित नाहीं. विदित जालें. + डाहाणूचे रयेतीस फिरंगी बाहेर जा म्हणतो. सांप्रत तारापुरास सातसें माणूस जमावलें आहे व तीनसे आसेरीस म्हणून आजिच तांदुळवाडीहून पत्र आलें. त्याणी लिहिले आहे त्याचा जावहि त्यास गेला आहे. तेही टोपीकराचा हिसाब धरीत नाहीत. विदित व्हावें म्हणून लिहिले असे. हे विज्ञापना. नथोजी येथें आले. त्यास सर्व जागे दाखविले. त्यास सर्व वर्तमान निवेदन करितील. काली छ ३ मोहरमी टोपीकराचें आरमार फरगते दोन व पढग्या सत्रा व पाल दोन व गुराब तीन येणेप्रमाणें अरमार गेले. हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshav reports the appointment of Pedro De Mello as the new Governor of Bassein. A raid on Dahanu led by Honaji Balkawde prove successful beyond expectation and as a result of these constant raids villagers ar deserting the enemy's country and arriving in Maratha camp, with thei belongings.*

No. 121] [*26-5-173*

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री नाना यांसी चिमणाजी बलाल आसीर्वाद. उपरि येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. बाा देणे किले अवचितगड वगैरे दिाा राजश्री होनाजी बलकवडे रोजमरे यास रुाा ४००० च्यार हजार देविले असेत. अंबाजी दादाजी याचे पदरीं घाल्हून समागमें माणसे देऊन रवाना करणे व अंबाजी दादाजी यांसी रुाा १९ देविले असेत, देणे. राा छ १७ सफर सुा तिसा सलासेन मया व अलफ. हे आसीर्वाद.

¶*Chimaji Appa instructs his nephew Nana to send Rs. 4,000 for th expenditure of the forts under the charge of Honaji Balkavde.*

No. 122] [*17-7-1738*

श्री

श्रीमंत राजश्री आपा साहेब
साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक मदनाजी नाईक अणजूरकर हवालदार किले श्रीवर्धनगड सेवेसी दंडवत विज्ञापना ताा छ १० माहे रबिलाखरपावेतो किले मजकूरचे व आज्ञा

\+ येथून अक्षर वेगळें.

धारकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. किले मंजकूरचे भरतीविसी पूर्वी सेवेसी येक दोन विनंतीपत्रें पाठविली, प्रंतु किलेयाची भरती होऊन आली नाहीं. तर हली किले मजकुरी लोक भरतीस माणूस ५० पंनास आहे. पाहारेयास च्यार पांच आसामी असावे; त्यास हलीं पाहारेयास दोन दोन असामी आहेत. भरतीचे येसे जें वर्तमान आहे सेवेसी कलावे म्हणोन लिहिले असे. भरती करावयाची आज्ञा करणार साहेब समर्थ आहेत. किले मजकूरी तेल व तूप व भात तंबाखू किले मजकुरी कोठीस सामान असावें, त्यास किले मजकूरी सामान येकसेर नाहीं. किलेयाचे सदरेस व दिवटीस तेल लागतें ते महिनेयाचे महिनेयांत माचीहून आणून गुजराण करितो व भाताखेरीज किले मजकुरी दुसरा सामान कोठीस येक सेर जमा नाहीं. व परसोजी सरनोबत किले मजकूर यास दिवट्या देऊन सां पाठविली त्यास तेलाची रु १॥(?) दिली नाही. तर साहेबी कृपालु होऊन सरनोबत याचे दिवटीस तेल द्यावयाची रु १॥(?) पाठवावयाची आज्ञा करणार साहेब समर्थ आहेत. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

¶*Madanaji Anjurkar of Shriwardhan fort makes a requisition for men and provisions on Chimaji Appa.*

No. 123] [*30-8-1738*

पौ छ २९ जमादिलावल.

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना येसीजे. सुरतकराची वसईस कुमक जातो की काय त्याचाहि तलास केला. त्यास तेगबेरखांची+ तो कुमक जात नाहीं. चिलिबी सावकार आहे त्याणे कांही माणसे आठ रुपये महिना करून चाकर ठेऊन व कांही सामान येसे पाठविली. त्याउपर मोगलाने मना केले. माणसे च्यार पाचसे गेली होती त्यापैकी दोनसे माणूस माघारे आले. मुंबईस माणसे कांही चाकर ठेऊन नेली होती त्यापैकी काही दूर केली ते आली. तेथून लोक आले त्यापैकी दोन च्यार जण मज़ला भेटले. त्यांस वर्तमान पुसिलें. त्यास मुंबईस तो कुमक याणे दोन हजार आली म्हणून आम्हास निरोप दिला. वसईवर माणूस बहुत मेले, यामुळें ते लोक आले, वसई जेर बहुत आहे म्हणून सांगतात. कलावे म्हणून लिहिले आहे. सांप्रत जाहाजे आली आहेत परंतु उतरली नाहींत. दो चौ रोजा

+ Tegbaktakhan.

उतरालेयाबर कांही आरब असतील त्याचा तलास करितो. अमदाबाजेस आरबा- विसी पत्रे पाठविली आहेतच. मी जावे तर सुरतेचे कामकाज व पैका वसूल जाला पाहिजे याजनिमित्य गेलो नाहीं. तरी तिकडून उत्तर येईल आणि जावयाचा विचार करितो. परंतु दिवसगत बहुत लागेल याजकरितां आपली आज्ञा होईल तेणेप्रमाणे वर्तणूक करीन. तो लक्षप्रकारे जो मिलतील आणि येतील तो विचार राजश्री रेणकोपंत करितील. मोमीनखानास व भडोचकर मोगल यास पत्रे आपली होती ती त्यास पाठविली आहेत. तेहि काही कार्यास चुकणार नाहींत. मजला त्या प्रांतांस जावयाची आज्ञा जाहली तरी मोमीनखानास व भडोचाचे मोगलास येसी माझे नाव घालून पत्रे पाठविली पाहिजेत. राजश्री रेणकापंतास येक पत्र पाठवावे ते माझ्या लाखोटियात घालावे. सेवेसी श्रुत जाले पाहिजे. हे विज्ञापना. माल घेतला तर रवाना करावयास विलंब लागणार नाहीं गोवरीपर्यंत पाऊन पुढें न्यावयासी आज्ञा कसी ते केली पाहिजे. पुढे गा चालणार नाहीत याजकरितां राजश्री पंताजीपंतास लिहून पाठवावे ते पुढें घेऊन जातील हे विज्ञापना.

¶*Information is being sent to the Peshwa from Surat that the Mugha Subhedars of Surat and Broach are not rendering any help to the Portugues of Bassein.*

No. 124 **[27-9-173**

श्रीशंकर

श्रीमंत माहाराज राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

विनंती पोष्यांकित लक्षुमण सोनदेऊ कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशळ ता अश्विक वद्य दशमीपरियेंत माहाराजांचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. बहुत दिवस जाले कृपा करून पत्र पाठऊन सेवकाचा सांभाळ केल नाहीं. येणेकरून चितास संतोष होत नाहीं तरी येसे न करावें. सदैव सांभाळीत असिले पाहिजे. यानंतर माहाराजांची आज्ञा घेऊन स्वार जालियाता सेवेसं विनंतीपत्र पाठविलेच नव्हतें. वैशाखमासीं राजश्री बाबूराऊ मल्हार सेवेसं पाठविले. त्यासी माहाराजांची स्वारी कोकणांत गेली. ईश्वर सतेन माहाराजां येश आले हे येकोन परम संतोष जाला, तो आल्हाद पत्री लिहितां विस्तार होतो ये प्रांती आबालवृध जन संतोषी जाले की याच प्रकारें सदैव येशाची वृधि हो वरकड आमचे वर्तमान बाबूराऊ मुखवचने विनंती करितील आणि सेवेसी प्रस्तु

5687

विनंतीपत्रहि लिहिले आहे. बाबूराऊ विनंती करितील, ते मान्य करून साहित्य पत्रें व कितीक पारपत्य केले पाहिजे. विशेष काये लिहिणे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापती.

¶*Lakshman Sondeo congratulates Chimaji Appa upon the success that he won against the Portuguese.*

No. 125] [*Recd. 13-9-1738*

छ ९ जाखर

श्री

श्रीमंत स्वामीचे सेवेसी

विज्ञापणा ऐसीजे. स्वामीणी आसेर किल्याविसी आज्ञा केली होती त्यावरून याच विचारात होतो. त्यास किलेदार राजी जाला. दिवसाच किला देतो आणि आपण आपले लोक घेऊन खाले उतरतो. पेशजी स्वामीणी रो माहादाजी नाईक देवल याजकडून ऐवज देविला होता तो मागतो, त्यास स्वामी ज्याचे स्वाधीन किला करवितील त्याचे ठाणे करारवाकई[1] बसले म्हणजे नाईक मारानिलेनी चालीस हजार रुाये द्यावे. यास आज्ञा कर्तव्य ते केली पाहिजे. विदित होये. किलेदार म्हणतो कीं मजला हस्तनापुरास पोहचतें करावे. हे विज्ञाप्ति.

¶*The Peshwa is informed that the commandant of fort Asheri has expressed his willingness to surrender the place on receiving the amount promised to him.*

No. 126] [*Recd. 13-9-1738*

छ ९ जाखर

श्री

श्रीमंत राजश्री बावा स्वामीचे
सेवेसी

विज्ञापणा ऐसीजे. स्वामीणी येकांती आसेर किल्याची आज्ञा केली त्यावरून सेवक विचारांत होता. त्यास किलेदार म्हणतो कीं पेशजीं स्वामीणी रो माहादाजी नाईक देवल याजकडून चालीस हजार रुपये देविले होते. बशर्त रो मानाजी निकम आगर रो रामचंद्र माहादेव या उभयेतातून येकाचे हवाला किला करून किलेदाराणे आपले लोक घेऊन खाले उतरावें, ऐसे परिछिन होईल तरी किल्याचा बंदोबस्त जाला म्हणजे पैसे द्यावे, नाही तर न द्यावे ऐसी आज्ञा होती.

---

१ कराराप्रमाणें.

त्यास स्वामी किला कोणाचे स्वाधीन करितात त्याचे हवाले दिवसाच दोन प्रहरा करून देतो आणि पैसे मागतो. स्वामींचे आज्ञेप्रमाणे काम केले. रा माहादाजी देवल यास बशर्ती आज्ञापत्र व किला कोणाचे स्वामीन (स्वाधीन) करात्र हे आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. मोठा बांका किला व तोफा भारी भारी व दारू सिसें फार. स्वामी जाणतात. विचारास येईल ते आज्ञा करावी. विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*The writer reports secret overtures to occupy the fort of Asheri.*

No. 127] [*19-10-1738?*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

॥ श्रीमंत सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो त्र्यंबकराऊ ...ढेरे दंडवत विनंती. येथील क्षेम स्वामीकृपेकरून अस्विन वद्य ३ त्रितीया. येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र पा त्यावरून राजश्री पिलाजी जाधवराऊ यांजसमागमे जातो. ते वसईस जातील. आपण आज्ञेप्रमाणें साष्टीस जाऊन राजश्री पिलाजी जाधवराऊ याचे आज्ञेत राहेल्यास त्याच विचारे वर्तावयाचें असिले तरी तेहि कलो येतां सेवेसी लेहोन गणती हुजूरच्या कारकूनापासी देऊन. सेवेसी रा सिवरामपंत पाठविले त्यांजपासी रोजमरियांची नेमणूक द्यावयासी स्वामी आज्ञा समर्थ असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Trimbakrao Dhamdhere informs the Peshwa that as instructed he was proceeding to Salsette.*

No. 128] [*17-11-1737*

छ १६ साबान

श्री

श्रीमंत महाराज राजश्री

आपा स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक विठल विश्वनाथ चरणावर मस्तक ठेऊन सा ना वि ता छ ९ साबान पावेतो सेवकाचे व प्रांत मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री शंकराजीपंती माहिमास फौज रवाना केली ते समई त्याही लि की तुम्ही आपले जमावसुधा माहिमास येणे. त्यावरून माहिमास रा माहादाजीपंतास जाऊन सामील जालो. तेथेहि पाच रोज केलवियाचे मुकामी त्याजपासी राहिलो. इतकियात आज्ञा आली की रा लाडकोबा तारापुरास रवाना केले आहेत त्याज-

पासी फौजसुधा जाऊन सामील होणे. ते पत्र आलियावर रा लाडकोबा यासी फौजसुधा सामील जालो. सिरगात्रीची माडी फिरंगियानी बलकाऊन तेथे जमात्र व तोफा ठेऊन जबरदस्तीने होता. त्यासी रा लाडकोबाचे व आमचे विचारे सिरंगांत्र घेतालियावाचून तारापुरास न जावे यैसे जाले. मग वेढा सिरगात्रास बैसविला. हे वर्तमान सविस्तर रा रामचंद्रपंती व रा लाडकोबा यानी सेवेसी लिा आहे त्यावरून विदित होईल. आम्हाकडील लोक जखमी जाले तेहि त्यांचे पत्रावरून कळेल. स्वामिसेवेसी सेवकापासून अंतर होणार नाही. सांप्रत स्वारीत ज्वराने बहुत हैरान केले म्हणोन मनोरास आलो. फौज तमाम व चिरंजीव बालाजीपंत यैसे तेथे ठेऊन लाडकोबाची रजा घेऊन मनोरास आलो. येथून तोफ येक रवाना केली व तांदुलवाडीची तोफ रवाना केली. काही उतार जालियावर स्वारीत जाऊन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Vithal Vishvanath informs Chimaji that he has, in concert with Ladkoba, invested Shirgaon which has been strengthened by the Portuguese by throwing in men and munition and which consequently made the march upon Tarapur past this strong out-post unsafe.*

No. 129] [*Recd. 15-11-1738?*

छ १३ साबान

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा

स्वामिचे शेवेसी

विनंति उपरी. आम्हास स्वामीनी रवाना केले ते तारापुरास जाऊन तेथील बंदोबस्त करावयाचा तैसा करू. परंतु स्वामीनी रा रघुनाथजीस पत्र पाठवावे की तेथील बंदोबस्त करून रा वासुदेव जोसी यास आम्हाकडे पाठवणे.[१] यैसे पत्र पाठविले म्हणजे आम्ही तेथील बंदोबस्त करावयाचा तैसा करून स्वामीकडे येऊं. तीर्थस्वरूप रा नारायेण जोसी यास स्वामीनी पहिली पासोडी दिल्ही होती ती पांगारावयाची नाही, याजकरिता त्याणी आम्हाकडे पाठविली ती आम्ही ठेवली आहे. तरी दुसरी पासोडी उतम पांगारावयासारिखी १ पाठविली पाहिजे. * अगत्य पाठविली पाहिजे. बहुत काये लिा लोभ असो दीजे हे विा.

¶*Letter from Vasudeo Joshi to Chimaji Appa: He says he would leave for Tarapur according to instructions. He further requests Chimaji Appa to write a letter to Raghunathji asking him to relieve him (Vasudeo) after the needful was done at Tarapur. The writer intends to join Chimaji thereafter.*

---

१ अक्षर वासुदेव जोशाचें.

No. 130] [Recd. on 9-12-1737?

प्रो छ २७ साबान

श्री

राजश्री रामचंद्रपंत दादा गोसावी यास

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री खंडोजी माणकर रामराम विनंति. उपरी येथील कुशल जाणून स्वकीये स्वकुशल लेखन केले पा॥ वि॥. आमचे विश्वासू माणूस मुंबैस बातमीबद्दल पा॥ होते ते जाऊन आठ दिवस मुंबैस राहून तेथील बातमी आणिली (की), येक ज्याहाज थोर बांधिले आहे त्यास * * दुकांबीनें मढून मजबूद केले आहे, जैसा बज्यां येक किलेयाचे प्रतीने केले आहे. ते आणून ठाणेयाचे कोटाजवल नां(ग)र टाकून तोफांचा मार देऊन कोट उडऊन टाकावा व गोव्याहून पाच सा हजार पावेतो फौज येणार व हबसी व इंग्रज यैसे येकत्र होऊन खुजकीने ठाणेयावर येऊन ठाणे उडवावे, याविसी सर्व तप येकवेल खर्च करून ठाणे उठवावे यैसा सिद्धांत केला आहे. उधाण पाहून येणार. आनि यानी तर जोरा बहुतसा धरिला असे. परंतु स्वामीचे पुण्य समर्थ आहे व तुमची कृपा आहे तों हिसाब धरीत नाही. जोपावेतो धडावर सीर आहे, तोवर मरून खस्त होऊन. मग स्वामीच्या जागियास काही तरी होऊ. परंतु जे माणूस बातमीस पाठविले होते ते इतबारी आमचे आहे हे वर्तमान कधी मित्या यैसे न म्हणावे. परंतु आली बातमी गोसावियास लि॥ असे. आंगरेयाकडील अरमार येत होते त्याचे वर्तमान इंग्रजाने आइकोन दोन फरगात मोठे रा॥ केले असेत. परंतु त्यांची त्यांची गांठ पडली की नाही हे न कलें. यैसे वर्तमान येऊन सांगितले ते लि॥ असे व आंगरेहि फिरंगियास मदत आहेत. कडदीनाने इंग्रेजास सांगोन पाठवि * * * याचे मदतीस येत असेत त्याचे (वाटेस न जाणे?) [कंसांतील अक्षरें फाटलीं] वरकड आरमारहि मढचे बारियावरी नांगरवाडा आहे. नगारे व कर्णे वाजतात. टोपीवाल्यांचे नसे. आंगरेयांकडील असेल कीं हबसियाचे असेल यैसे वर्तमान तुम्हास कलावे म्हा॥ लि॥ असे.

पत्रावर खंडोजीचा शिक्का व मोर्तब.

¶*Khandoji Mankar reports to Ramchandrapant Dada that the English, the Portuguese and the Sidi have made a common cause against the Marathas, and are reported to be fitting out an expedition against Thana.*

5691

No. 131] **[12-12-1737?**

श्री

राजश्री रामचंद्रपंत दादा
गोसावी यासी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नेहांकित खंडोजी माणकर राम राम विनंति उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल वृत्त लेखन केले पा विा. गोसावियानी पत्र छ २६ साबानचे पाठविले, लिहिले वर्तमान सावेत कलों आले. शाहाजी भाबकर यास नगारियाविसी लिा. त्यास ते धारावीस गेले आहेत. त्याकड तुमचे पत्र पा आहे. कलले पा. यानंतर इकडील वर्तमान आम्ही बातमीकरिता माणूस पाठविले होते ते छ २९ साबानी संध्याकाली येऊन पोहचले. त्याण्ही वर्तमान सांगितले की जुना जराल ठाण्यास होता तो गोव्याहून अरमार फरगात मोठे यैसी तरांडी सुमार ६० घेऊन रेवदंडेयास दाखल जाला असे. वरती माणूस कांहीं बिदनूरकरांचे आहे व जाती रेणोल दोन तीनसे आहेत यैसा आठहजार माणूस घेऊन आला असे. तो येऊन ठाण्यावर कपाल फोडून मरावे की ठाणे उठऊन लावावे यैसा निस्चयेतार्थ केला आहे. * तिही तोंडाने पायेउतारा होऊन येणार हे वर्तमान अवचितगडाकडोनहि येसजी बलकवडे यांही लिा आहे त्यावरून खरेखुरेसे दिसते. यैसियासी हे घर हस्तगत जालेले रक्षावे व दुसरी घ्यावी हे गोष्टीस प्रेत्न अंतर बहुत आहे. त्यास श्रीमंत स्वामी-कडेहि लेहून वर्तमान पाठविले आहे. तेथून कुमक होणे तर दूरस्त (दूरस्थ) विचार आहे. तुम्ही संनिध आहा. घेतले स्थलास राखावे हा आभिमान तुमचा आहे. जर अनकूल पडिले तर इकडील उपराला करावा, हे गोसावियास उचित आहे या-करितां लिा असे. येखादे समई तुम्ही बोल लावाल की यैसे होते तर ताबडतोब आम्हास काही तरी कलो द्यावे होते, याकरितां लिा आहे. बहुत काये लिा कृपा लोभ असो दीजे. रा छ ३० माहे साबान हे विनंति. वाईच (वसईच?) बातमी राजश्री बाबूजी नाइक अणजूरकर यांकडील यैसीच आली आहे. कलावे म्हा लिा आहे. बहुत काये लिा कृपा लोभ असो दीजे हे विनंति

¶*Khandoji Mankar from Thana communicates to Ramchandra Hari the arrival of Louis Dom Botello as far as Rewdanda with a formidable fleet. According to intelligence received from various quarters Thana is the objective of the enemy. The writer asks the addressee his co-operation on the fateful day.*

\+ येथें खंडोजीचा शिक्का अस्पष्ट पण खंडोजी मानकर येवढे शब्द स्पष्ट दिसतात.

No. 132] [16-12-1737

२३ रमजान

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री

आपा स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विठल विस्वनाथ साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ ४ माहे रमजान मुकाम सिरगांव सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. या प्रांती राजश्री वासुदेव जोसी यांसी रवाना केले, या गोष्टीने कितेक स्वामिकार्य यांचे सलाबतीने सिधीतें पावतील आणि सर्व सेवक लोक उमेदीने जीव ठेवून बेउजूर चाकरी करीत आहेत. स्वामीच्या पुण्याप्रतापे सिरगांव लवकरीच येईल. मोर्चेहि कोटासंनिध नेले आहेत. सुरंगाचा उपाय राजश्री मानिले यांणी योजिला आहे. टोपीकरास मदत बाहेरून तारवांवरील येऊं देत नाहीं. फिरंगी जेर केला आहे. अल्पकालेंच स्थल हस्तगत होईल. या प्रांताचे वर्तमान त[ा] हुजुरून फौजा इकडेस आल्या. येणेकरून रयतीस बहुत तगादा लावला सरकारकामाची जहाज फरमास वगैरेहि कितेक कसाला रयेतीस पडों लागला मुलुक आमचे निसबतीस स्वामीने केला आहे. यास्तव आम्ही रयेतीस ज्यांच उपद्रव लागे त्यांसी रदबदली करीत असो. परंतु कोणी आमची रदबदली मान्य केली नाहीं. कांही रयेतीचे पदरी पुन्य होते तर राजश्री जोसी यांचे येणे जाले. याणी सर्वांस बेमुरवतखोर प्रकारें सांगोन कितेक वेठ बेगार व सिवे पाणी मना केले आणि रयेतेची दिलबैरी बहुतसी केली. तणेकरून रयत स्तालब्य जाली. सेवकानी सिबदी लोक ठेविले आहेत ते मुलकी कोली वर आहेत. कोणी भले लोक केले कामाचे नाही, म्हणोन कितेकांनी स्वामीचे सेवसी लिहिले असे. त्यासी कोली अथवा भले लोक जे आहेत ते सर्व राजश्री जोसी यांही दृष्टीने पाहिले आहेत. चाकरी कोणे प्रकारें केली आहे, मोर्चे कैसे चालविले आहेत, हे चाकरी सर्व यांची व स्वामीची भेट होईल तेव्हां परस्परेंच निवेदन करितील. आम्ही सेवेसी लेहावेंसे नाहीं. सेवकानें चाकरीस अजताा अंतर केले नाहीं, पुढेंहि होणार नाहीं. सेवक निराश्रित असे. एक आश्रय स्वामीच्या चरणाचा आहे. सेवकावर सिबंदीचे देणे आस्विनापासून चढले आहे. त्याज पैकी च्यार हजार रुा राा बाबूराव यांजबाा आले त्याणी ते वाटून दिल्हे. हली राजश्री जोसी यांनीं हजार रुपये लोकांस पावविले. त्यास सेवकाकडील लोकांचा खर्चाच सरंजाम करून देणार स्वामी समर्थ आहेत. राजश्री शंकराजीपंताकडे गला व लाकूड वोंडें व पतिंगे ऐसे आज्ञेप्रमाणें रवाना करितो. त्याजकडील फर्मास उ

१ समाधान.

5693

येते त्यास कांहीं हिला हरकत करीत नाहीं. त्याचे पत्रावरून चालवितों. साहेब-कामास कोताई करून नादानी आम्ही आपणावर घेणार नाहीं व तारापूरचे गांव दोन च्यार फिरंग्यानें मारिले त्याजमुळे दाहापांच गांव तारापूरचे वैरान जाहले. विदित होय. सिरगांव फते जालियावर तारापूरचे तोंडावर सेंभर स्वार व दोनसे माणूस राजश्री जोसी ठेऊन माहिमास जावें ऐसें आहे. सेवसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Vithal Vishvanath writes to Chimaji that the presence of Vasudeo Joshi has heartened men to press Shirgaon with vigor which consequently will soon yield. He complains that there is widespread distress in the district owing to the marches of troops.*

No. 133] [*20-12-1737*

श्री

राजश्री बाजीराऊ बेलोसे नामजाद
जंजिरे अर्नाळा गोसावी यांसी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री वासुदेव जोसी व रघुनाथ हरि आसीर्वाद व राम राम. उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. फिरंगियाचे अरमार गुराबा ४ व गलबते ३२ व मचवे ८ यो चवेतालीस दागिने वसईकडून येऊन जंजिरे मजकूरचे नस्तावर राहिली आहेत. ती माहिमाकडे जातील अथवा जंजिरियास येतील म्हणून तुम्ही राजश्री रामचंद्रपतास लि।. तेच पत्र माारनिलेनी आम्हास पाहावयासी पाठविले त्याजवरून विदित जाहाले. सदरहू अरमार छ ८ रमजानी केलवियास आले म्हणोन रा। रामचंद्रपंतानी लि।. आम्ही सिरगावास मोर्चे दिल्हे आहेत हे वर्तमान तुम्हास कललेच आहे. कोट जेर जाहाला आहे, लौकरच फते होईल. माहिमास रा। रामचंद्रपंत खबरदार आहेत. सिरगाव फते जाहालियावर आम्ही फौज सुधा माहिमास येऊ. तुम्ही जंजिरे मजकुरी बहुत खबरदार राहून गनिमाची बातमी राखोन वरचेवर लिहीत जाणे. जंजिरे मजकूरची बेगमी व इमारतीचे काम किती जाहाले हे सविस्तर लि।. जाणिजे छ ८ रमजान बहुत काये लि।. तुम्ही बहुत खबरदार राहाणे. अरमारचे गनीम दगेखोर, कोणे समई येईल न ये हा कलत नाही. बातमी राखोन जंजिरे मजकूरची खबरदारी करणे * हे आसीर्वाद.

¶*Vasudeo Joshi and Raghunath Hari ask Bajirao Belose, commandant of Arnala, to be vigilant as the enemy's fleet is cruizing near the fort. They say they are pressing the attack on Shirgaon.*

No. 134] [24-12-1737

श्री

श्रीमंत राजश्री वासुदेव जोसी
स्वामीचे सेवेसी

पोष्य शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागायत छ १२ रमजान संध्याकालपर्यंत सुखरूप असो विशेष. तीर्थरूप राजश्री दादाचा मुरदा मोर्च्यांत माहिमच्या असेल तरी शोध केला पाहिजे व वरकडहि ब्राम्हणाचे मुरदे असिले तरी शोध करून लिहून पाठविजे. आण अग्न दिल्ही पाहिजे. हस्ती (अस्थि?) हातीं लागतील तरी बरेच आहे, बहुत काय लिहिणें? माहिमास आमचे लोक व राजश्री कर्णाजी सिंदे व राजश्री खंडोबा देखील जे लोक आहेत ते आम्हांजवल पाठविले पाहिजेत. येथील भरतीचा विचार तुम्हांस ठावकाच असे. जर गनिम येथें आला तरी त्यास बरासा नतिजा द्यावा लागतो, नाही तरी माहिमास गत जाली ते ठावकीच आहे. बहादरपुरियाचा मोर्चा व अर्नाला मजबूत अधिक करावा. हे दोन जागे मजबूद असिल्यावर गनिमाचा हिसाब नाहीं. वाघोजीराव खानविलकर व धोंडोबा देखील जे लोक आहेत ते येथें आधीं पाठवावे. अनमान करावयाचे नाहीं. माहिमचा मोर्चा उखललियावर तुम्ही सिरगांवास राहोन उगलेच बसावें ऐसें आमच्या मतें नाहीं. आधी हे दोन जागे सदरहूप्रमाणें मजबूद करावे, हेच गोष्ट आमच्या चित्तांत येत आहे. तरी माहिमचे लोक आधीं पाठवावे व राऊत च्यारसें आम्हांजवल पाठविले पाहिजे. आम्ही कोणे गोष्टीचा गनिमाचा हिसाब धरीत नाहीं. आजीच हें पत्र लिहितां तव वर्तमान आलें, कीं दर्यांत पाल च्यार दिसतात आहे. तुम्ही खबरदार राहावें. आम्ही येथें खबरदार असों. लोक व राऊत सत्वर पाठवावे हे विनंती.

¶*Shankraji Keshav requests Vasudeo Joshi to make enquiries regarding the dead bodies of his brother Mahadaji Keshav and other Brahmins who were slain at Mahim and to cremate them. He further asks him to send back Karnaji Sindia and Khandoji, Vaghojirao Khanvilkar and some other men of his as he has to reinforce both Arnala and Bahadurpura against an attack of the Portuguese.*

No. 135] [25-12-1737
छ २७ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे शेवेसी

पो वासुदेव जोसी सां ना विनंति. येथील वर्तमान ता छ १३ रमजान जाणून स्वकीये लेखन आज्ञा केली पा वि. येथील सविस्तर वर्तमान उभयेताचे पत्री

लिा आहे त्यावरून विदित होईल. येथील फौजेचा आला बांधा जाहला पाहिजे. राऊतामध्यें कोणी मातबर सरदार नाही, याजकरिता रा चिमणाजी भिवराव यास खामखा अगत्य पाठविले पा. आम्हास कळेल तसा येथील बंदोबस्त करितो. परंतु माहिमचे लोकानी आवच सोडिला आहे. त्याचे समाधान दिलदिलासा करणे तैसा करीतच आहो. येथील. * * * वस्त करून येकवेल गनीम मारून गर्देस मेलवावा * * * * आहे * * * करून होणे ते * * लग्नाचे * * * पक्षी योजले आहे याजकरिता माघ सुध प्रतिपदेस आम्हास जावे लागेल. तरी स्वामीनी येथील बंदोबस्ती केली पाहिजे. रा विठल सिवदेव व चिमणाजीपंत यास सत्वर पाठविले पाहिजे. लोकाचा आव गेला. सर्वत्र गनिमाची सलाबत बसली. कलावे म्हणून लिा असे. बहुत काये लिा लोभ करीत गेले पा हे विनंति.

¶*Vasudeo Joshi requests Chimaji Appa to send Vithal Shivdeo and Chimanaji Bhivrao to revive the spirit of the army.*

No. 136] *[18-12-1738 ?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक सिवाजी बाबाजी चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार. विनंती विज्ञापना. ता छ १७ रमजान पावेतो स्वामीचे कृपादृष्टी करून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाहले, तेथे आज्ञा कीं उतरेकडील सैफेलीची फाज अरुंद आहे, माणसास फिरता नये. याजकरितां दगडमातीचे काम सात हात रुंद करणे म्हणून आज्ञा. आज्ञेवरून फाजेचे काम चालते केले. विठोजी आतागिरे याच्या हाताखाली जुन्या चुन्यावर राजेखानाकडील व कल्याणसिंगाकडील व किरकोल लोक दिले होते, त्यापैकी निमे लोक व विठोजी छ १० रोजीं गगनबुरुजाचे कामास लाविले. बुरुजाचे काम साडेसतरा हात उंची

(अपूर्ण)

¶*An incomplete letter from Shivaji Babaji to Chimaji Appa, reporting the progress of the work of broadening the walls.*

---

१ गच्ची.

5696

No. 137] [21-12-1738?

पो छ १३ रमजान.

श्री

पुा राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. कडदीन रेवदंडियाहून काली छ ९ रमजानी ठाणियास आला आहे. वसई जवली त्याचे येक स्थल आहे तेथे दारुगोली भांडी व गाडिया येसे जुजते सामान तयार करीत आहे येसे वर्तमान आहे काय मतलब आहे कलत नाही. कलावे याकरितां लिहिले असे. उंदेरकर शामलानी आबटीयाचे खाडीत सिरोन कोली दोन तीन मारले व दोन तीन धरून नेले, म्हणून पूर्वी आपणास लिहिले आहे. सांप्रत ते कोली इंगरेजानी शामलास सांगोन सोडविले येसे वर्तमान आले. कलले पाहिजे. लोभ करीत गेले पाहिजे हे विनंती.

¶*News is sent to the Peshwa that the Portuguese General Cardim de Froes has effected a landing near Bassein and seems to be preparing for a decisive struggle.*

No. 138] [12-12-1738

श्री

श्रियासह (सह)आयु चिरंजीव राजश्री वासुदेव जोसी यांसी प्रीतिपूर्वक रामचंद्र जोसी मुरूडकर आशीर्वाद उपरी येथील कुशल ता। मार्गसीर्ष सुद त्रयोदसी मुकाम कुलाबा सुखरूप जाणून स्वकीये लिहीत असिले पाहिजे विशेष. आजीच मंगलवारीं त्रयोदसीस रात्रौ येथून वधू समागमे घेऊन निघावयाचा मुहूर्त आहे. त्यासी येथून समुदाये सहवर्तमान सुमुहूर्ते स्वार होऊन हे वृत्त अगोधर तुम्हास कलावे यास्तव लिहिले आहे. येशास येथून उचले तेथे येऊन त्यासी ते स्थली साहित्य व राहावयासी जागा याची अगोधरीच योजणूक पाहिजे. त्याची विचारणा तुम्ही केलीच असेल. परंतु तुम्ही साहित्य करणे

तांदूल बारीक	गहू कणीक खंडी	तूप वजन पके	तांदूल मोठे
।•	१	।•	१

गहू पके घालणे

याप्रमाणे सिध करणे याचा पैका होईल तो आम्ही आलीयावरी देऊन. वरकड शाक भाजी व पानपत्रावल लांकूड फांटे याची अनकूलता जाहली पाहिजे. तरी ये गोष्टीविसीं मुख्यांस विचारून त्यांची आज्ञा घेऊन राजश्री गोविंद कृष्ण सुभेदार प्रांत जुनर यांसी इकडलि साहित्यास मागोन घेऊन मंडप देखील सर्व

साहित्य जें तुम्हास सुचेल तें त्याजकडून करवण. तुम्ही तेथे असतां आम्ही साहित्याविसी चिन्ता करावी ऐसे नाहीं. परंतु सूचनार्थ अगोधर लिहिले आहे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे आसिर्वाद.

सेवक राघो कृष्ण साष्टांग नमस्कार विनंती लिा परिसीजे हे विनंत

¶Ramchandra Joshi Murudkar asks his brother Vasudeo Joshi to arrange for the reception of the marriage party and to purchase provisions for the occasion.

No. 139] *[24-12-1738*

पौ छ ८ सवाल

श्री

आशीर्वाद उपरी. राजश्री चिंतो कृष्ण यांजकडील जेजालबारदार पंधरा होते ते धारावीस रा केले. तुकोजी बेरडाकडील साहा आसामी कारखान्यावर ठेविले. नीलकंठाकडील चवदा आसामी व फकीर महंमद याजकडील तेरा यकूण सतावीस आसामी रा संकराजी केशव याजकडे पाठवितो. रा कृष्णाजीराव यरूणकर याचे लोक पावणे तिनिसे माणूस आहे. त्याचा तैनात जाबता आलाहिदा पाठविला आहे. तेहि लोक संकराजी केशव याजकडे पाठऊन देतो. बाबूराव[1] रामचंद्र यास विठोजी बुल्याकडे पाठविले होते. त्याणी सोला जेजाला आणिल्या, त्या नीट करून जेजाल बारदाराबराबरी धारावीस पाठविल्या म्हणोन सविस्तर लिहिले ते कलले. पेण पनवेली अष्टमी नागोठणे येथील व आबटे याचे बदरींहून भात मुंबईस जाते ते मना करावयास बाबूराव रामचंद्र यास पाठविले आहेत म्हणोन लिा ते कळलें. उत्तम गोष्ट केली. येविसी राजश्री मानाजी आंगरे यांस व कर्नालेकरास पत्रे लेहून पाठविलीं आहेत. रवाना करणे आणि मुंबईकडे गला न जाई ते गोष्ट करणे. रा छ २३ रमजान [+]हे आशीर्वाद.

¶Chimaji Appa expresses satisfaction at the mobilization of forces at Bassein. The addressee is possibly Mahadaji Purandare.

No. 140 *[24-12-1738?*

पौ छ ८ सवाल.

श्री

आसीर्वाद उपरी. राा संकराजी केशव यांजकड जिनस रवाना केला त्याची याददास्त पाठविली ती पावली. आणखी जिनस मारनिले लिहितील त्याप्रमाणें

१ फडणीस ? + चिमाजीचें अक्षर.

रवाना करीत जाणे. पंधरा बेलदार वसईस पाठविले म्हणून लिहिलें ते कळलें. उतम गोष्ट केली. पाथरवटही मेलऊन पाठऊन देणे व गवंडे रवाना करणे. गंगाजी घाटगा व सिदोजी मान्या यास रोजमरा रुा ८ आठ दिल्हे म्हणून लिहिलें तें कळलें. यादोपंताकडलि चवेतालीसशांच्या हुंडिया आल्या आहेत. बाकी ऐवज राहिला त्यास कारकून व कबज पाठविले आहे म्हणून लिहिले ते कळले. उत्तम गोष्ट केली. रा छ २३ रमजान. बेलदार पाथरवट राजश्री खंडोजी माणकर याजकडे जे मिलतील ते मेलऊन पाठऊन देणे व गवंडेहि मेलऊन खामखा पाठऊन देणे. +हे आसीर्वाद.

¶*Chimaji approves the addressee's arrangements in providing masons, sappers and miners and funds.*

No. 141] [*9-1-1738*:

छ २८ रमजान

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव क्रुा सा ना विा. ता छ २८ रमजान मुा आगासी सुखरूप असो विशेष. स्वामीनी छ २१ रमजानचे पत्र मुा मौजे सायेगाव घाटाखाली तेथील पत्र पाठविले ते आजीच छ मजकुरी पावले. कोहजेचे मुकामची तेरीख लिहिली ती कलली. त्या प्रा आम्हासहि निघोन यावे लागले. आजी आगासीचा मुकाम केला. छ २९ रमजानी भवानीगडास येऊन मोर्चा बाहादरपुरा येथे रा कर्णाजी सिंदे व गंगाजी ना अणजूरकर सत्रासे लोकानसी ठेविले. पाठीमागे रा खंडो चिमणाजी ठेविले. त्यास बराबर सत्रासे लोक राणोजीराव खानविलकर व आपाजीराव खानविलकर व दिा त्रिंबक विस्वनाथ लोक व दिा हरि राम वगैर सत्रासे ठेविले. येकून * (पा)इचा जमाव तीन हजार च्यारसे ठेविले व स्वार रा (सुजन)सिंग व रा बुधसिंग राऊल व रा विठलराव निा दाभाडे व जिवाजी ढमढेरे तुकाजी आपाजी सितोले व आत्याजी (आत्माजी) सुरवे व निा रा व्यंकटराव विनाजी (कृ)ष्ण व सिव खंडेराव विभुतराव सतकर हे साडेसातसे स्वार ठेऊन हा (ते?) करून सर्वाच येक हात करून ठेविले. सर्वानी आंगेजणी केली असे. हे ठेऊन आम्ही निघालो. किले वज्रगड साडेतीनसे लोक ठेविले बंदर गोखरवे मिलोन पावणेसे

+ चिमाजीचें अक्षर.

माणूस ठेऊन निघालो. जंजिरे अरनाळा येथे सतावीससे माणूस आहे त्यापैकी साहासे मागाहून येईल. येकत्रीससे चाकरमाने राहातील व बाजे लोक येक हजार ठेवलेच आहेत. या खेरीज अम्हासमागमे येणे प्रा। लोक येतील.

६००	जंजिरे आरनालापैकी
२००	बराबर स्वारी मोराजी सिदे देखील
४००	भवानीगडपैकी
१०००	बराबर मल्हारी आसाम्या आलीकडे आहेत
२२००	

बावीससे माणूस येईल. सेवेसी विदित आसावे. व तोफा तीन व सामानसुधा येतो. सामान तो भवानीगडास पोचविले असे. दारूगोलीहि किले मजकुरी पावली. येणे प्रा सिधता केली असे. स्वामीनी लिहिले की द्वादसी त्रयोदसीस माहिमास जाऊन लिा, त्यावरून येकादसी भोमवारी भवानीगडास येऊन स्वामी माहिमास येताच सेवेसी हजीर होतो. रा होनाजी बलकवडे याचे लोक तो आसेरी सनिध गेले असेत. डाहाणू प्रांते लोक पाठविले, परंतु त्यास तटून धरिले. स्वामीची भेट जालियावर रा होईल हे विज्ञापना.

¶Shankraji Keshav informs Chimaji Appa in detail about the distribution of forces at different places such as Bahadarpura, Vajragad, Gokharve and Bhavanigad. He hopes to join Chimaji Appa at Mahim as desired.

No. 142] *[1738?*

श्री

तीर्थरूप श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. आगरची रयेत तमाम उठोन गेली. वस्तवानीहि रयेतेने नेली. किरकोल दाणादुणा आहे तो लोक आणितात व गुरेहि आहेत ती लोक आणितात. स्वामी शब्द लावितील म्हणून लिा आहे. रयेत दुतर्फा, तिचा विश्वास नाही. आपले बले जे करणे ते करावें. धारावीची बंदिस्त कोट पाथरवट आणून चउबुर्जी आधी सत्वर बांधवावी. मग पुढे मोठा कोट बांधवावा तेव्हाच कार्यास येईल. कळले पाहिजे. बावीससे माणसास रोजमरा सरासरी पांच रुा प्रा आकरा हजार रुपये पाठवावे. जखमियासहि खर्चास द्यावे लागते, व जर धारावीची बंदिस्त होत असेल तरी तेथे गडी बांधावयाची नगद मग

करावी. हे सर्व आर्थ चितात आणावे. यासी दिवसगत लागो न द्यावी. या उपरी स्वामी धणी आहेत. येक हजार तिवट व जोट पांचसे सत्वर आणवावे. लोकांची पांघुरणे काडीत (खाडीत) बुडाली व हत्यारे बुडाली. पंचवीस तरवारा लोकास द्यावयासी आणवाव्या. या पत्राचें उतर सविस्तर पाठविले पाहिजे. विदित होये हे विज्ञाप्ति.

¶Shankraji Keshav advises Chimaji to strengthen Dharavi without loss of time, as it is exposed to an attack from the enemy. He asks for blankets and arms for his men. The ryots in the Bassein tract, he writes, have fled away, which therefore falsifies the charge against his troops of harassing them.

No. 143] [*1738?*

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री रामचंद्रपंत व राजश्री लक्ष्मण बलाल व रा म्हालोजी मुठे आले म्हणजे वज्रयोगिणीवर मुकाम करितील. समीप असिले म्हणजे समई पावतील. याजकरितां त्यास येणेप्रों लेहोन पाठविले आहे. जा कुडालाकडी(ल) अगर मर्दनगडाहून पत्र बातमीचे आले असिले तरी वज्रयोगिणी-नजीक मौजे आकलोली आहे तेथे राहाविसे त्यास आज्ञा पत्रें पाठवावीं. समई जेथे म्हटलें तेथें पावतील. कुडालाकडील वर्तमान तेथें आले तरी येथें सेवकास ल्याहावें. येथील कारकून कुडालास होता तो येकजण आला. येकजन तेथे आहे हे विज्ञापना.

¶This is a communication sent to Chimaji Appa regarding the movements of the forces at Vajrayogini, Mardangad etc.

No. 144] [*1737*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
दिनकरपंत दाजीसाहेब स्वामीचे सेवेसी

पो माहादाजी केशव सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून (स्वकीय) लेखन केले पाहिजे विशेष. रा सटवोजी सालोंखे याजविसी राजश्री सुभेदाराही लिा आहे ते चितात आणून सरंजाम करून चाकरीचे चाकरीवर येत ते कीजे. मानिलेचा पूर्व वृतांत स्वामीस विदितच आहे. पाटीलकीच्य

\+ सबंध पत्र शंकराजी केशवाच्या हातचें.

गावावर मुलेमाणसे बाप देखील आणिले आहेत. बहुत थोर माणूस मर्द आहे, याकरितां लिा आहे. बहुत काय लिहिणे कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Mahadaji Keshav requests Dinkarpant Dajee to confer upon Satwaji Salonkhe his former office.*

No. 145] [*1738?*

श्री

पुा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. माधवराम गोसावी व राजश्री बालाजी बापट व किलेदाराकडील उभयता आले. ते म्हणत होते कीं तुम्ही पनवेलीस मुकाम करणे; तेथेच आम्ही जाबसाल घेऊन येऊ. त्यास आम्ही सांगितले, कीं पनवेलीस खावंदाचे आज्ञे-खेरीज येत नाहीं. तेथे गेलियावरी किला दूर पडतो. याकरितां मौजे भादाणे ताा वाजे हा गांव किलायापासून तीन च्यार कोष आहे, तेथे उद्या जाऊन मुकाम करितो. कलले पाहिजे. वरकड राजश्री बाजी भीवराव याची रवानगी केली म्हणून लिहिले. उतम केले. फौज जमा करवावी. इकडे प्रयोजन लागले तरी आम्ही लेहून पाठऊन. रवानगी करावी. नाही तरी आणखीकडे जातील. कळले पाहिजे; परंतु बाहेर निघोन फौज तयार करावी यात उतम आहे. बहुत काय लिहिणे हे विनंती. स्वार सिलेदार पंचवीस पाठविले पाहिजेत. पागेचे न पाठवणे. हे विनंती.

¶*Vasudeo Joshi advises Chimaji Appa an early mobilization of forces.*

No. 146] [*1738?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

सेवेसी विज्ञापना.

लोकांचे तैनातजाबते व रोजमरे-याची नेमणूक पाठवावयाची आज्ञा. कोण्हांस कौल पत्र द्यावा लागेल त्यास मुद्रा असावी याची आज्ञा.

आतागीर पाा आज्ञा, आलें नाहीं. आतागिर पाठवावें.

तारापुरास मोर्च्यास लोक गुंततील त्याचे पोटाचें साहित्य जाले पाहिजे.

दारूगोली अद्यापि आली नाहीं. याजकरितां काजकाम अगदीं लटले आहे. दारूगोली सत्वर आली पाहिजे.

घोडियास नालमेख पाहिजे. या रानात मेळवावयाचा उपाय नाहीं. स्वारी सिकारीचे दिवस. राऊत रोजम-ऱ्याचे ऐवजी मागतात. त्यास नाल दबे मेखांसुधां शंभर पाठवावयाची आज्ञा.

मुलुखहि उद्वस; याजकरितां कल्याणचे वाणियाची पांच दुकान लस्करांत यावयाची आज्ञा करावी. स्वामीनी गणेशखिंडीचे मुकामी आलागर मुसलमान सिपाई च्यार आसामी चाकर ठेऊन बरोबर दिले, त्यांपैकीं तीन आसामी आलेच नाहीं. येथे हजीर आसामी १

वारघोडी

३८ दिा मलोजी थोरात
२६ राणाजी जाधव
१२ खंडनाक

३८

१८ दिा सुरराव यादव
२ मिर्जा यारबेग

५८

सिरगावांवर जाया जाले याची यादी आलाहिदा पाठविली आहे त्यावरून निवेदन होईल.

स्वामीनी लोकांचे हाजिरीविसी आज्ञा केली, त्यावरून बेठेगांवचे मुकामी हजीर येणेप्रमाणे आसामी:—

८९ दिा अंताजी रंगनाथ
६० दिा रघुनाथ सांवत
७२ दिा रंगो विठल
२९ दिा उमाजी साटम
७ दिा क्रान सांवत
१६४ दिा आपाजीराव खानविलकर
२५६ दिा रंगापा
२९ दिा सुरराव यादव
६५ दिा हणमाजी नाईक
६३ दिा कालेकर
२३ दिा मुकुंद श्रीपत
४४ दिा हबाजी यशवंतराव
२५ दिा बयाजी आगलावे
१५ दिा रामजी मालवणकर
७ दिा कुलाबकरी
५ फुटलोक
५ मिर्जा यारबेग

९४७
१

९४८ याखेरीज पोरगे.

सेवेसी निवेदन होय हे विज्ञापना.

¶*Chimaji Appa is requested to despatch immediately, among other things, gunpowder and cannon-balls. A muster-roll of the army is also submitted for his inspection.*

5703

No. 147] 1734?

पो छ १ सवाल

श्री

पुरवणा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. फिरंगी आपले जागां जमाव करीत आहे. काय मतलब आहे कळत नाहीं. कल्याणावरी यावयाची बोली आहे. स्वामीकडून राजश्री बनाजी भिकने वसईस गेले होते, त्यांणींहि तेथील वर्तमान पाहिलें आहे, तेहि स्वामीकडे येका दों दिवसांनी येणार आहेत, येतील, ते वर्तमान स्वामीस सांगतील त्यावरून कळेल. सारांश गोष्टी गनीम आहे त्याचा विश्वास मानावा ऐसें नाहीं. ऐथें आम्हाजवली पायेचे लोक आहेत, परंतु स्वारांचा भरणा नाहीं. स्वाराची सलाबत आहे याकरितां हें पत्र पाठविलें आहे. तरी स्वामीनीं शंभर स्वार निदानीं पंनास अगत्य पाठवावें. कडदिन सांप्रत काले ठाणेंयास आहे तोंपर्यंत स्वार ठेऊन मग पाठऊन. कळलें पाहिजे. प्रस्तुत कालें फिरंगियांचें अरमारहि वसईस आलें आहे, याकरितां स्वार पाठवावे ते स्वामींनीं आपले नजरेनें पाहून पाठवावे, खोगिरभरती न पाठवावी. त्यांस रोजमरा नेमून पाठवावा त्याप्रमाणें देत जाऊन. स्वारांस ताकीद करावी, येतेसमयीं कल्याण भिवंडी प्रांतीं मार्गी घांसदाणा वगैरे याचा उपसर्ग न लावीत तें करावें. कळलें पाहिजे, बहुत काय लिहिणें लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Vasudeo Joshi reports to Chimaji Appa that the Portuguese are mustering their forces strong and are contemplating an attack on Kalyan. To meet this impending danger the help of at least 50 horsemen is urgently requested.*

No. 148] [2-1-1739?

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक सां नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ २ माहे सवालपर्यंत यथास्थित असे. धर्मदेव सिरके हे येथें पापडीस आम्हाजवली होते. यानी चाकरी बरीच केली आहे. फिरोन यांस घोडे बसावयास देऊन पाठविले तरी यावयास उमेदवार आहेत. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav recommends to Chimaji Appa one Dharmadeo Shirke to be entertained into service as a horseman.*

+ पत्राच्या पाठीवर वरास गेलीं होतीं असा शेरा.

No. 149] [10-1-1739 ?

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील कुशल तागायत छ ११ माहे मोहरमपर्यंत स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. राजश्री आपाजीराव खानविलकर हे लोक देखील येथें आहेत. हे चाकरी बरी करितात. सिरगावावरी मोर्च्यांवरी फिरंगी पडला, ते समई राजश्री भिकाजीराव खानविलकर व प्रतापराव व जिवाजीराव अंतोजीराव खानविलकर याणी बरीसी करून गनिम उधळून काढिला. प्रतापराव पडिले हें वर्तमान सेवेसीं सविस्तर निवेदन करून सरंजामी करून घ्यावयाकरितां राजश्री भिकाजीराव आले आहेत हे विनंति करितील. ते आईकोन यांची सरंजामी करणार स्वामी धणी आहेत. सिरगांवी जे सेवा केली ते राजश्री वासुदेव जोसी यासी दखल असेल. येथें आलियापासून आमचे तबियेतीप्रमाणे सेवा करितात. हे विज्ञापना.

¶Shankaraji Keshav recommends to the notice of Chimaji Appa the heroic services rendered by Appajirao Khanvilkar and his brothers. Appaji's brother Prataprao was killed at Shirgaon.

No. 150] [21-1-1739 or 31-1-1738 ?

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसीं

विनति सेवक सिवाजी बाबाजी चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना तागायत छ २१ सवालपर्यंत स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री खंडोजी माणकर व राजश्री खंडो गोमाजी व राजश्री रामाजी माहादेव व राजश्री नारोजी कडू हे येथून च्यार तोफा घेऊन वेसाव्यास मोर्चे लावावयास गेले आहेत. इमारतीचें वर्तमान तरी छ १९ सवालीं मेढ्याचें काम चालीस लाविलें. नवा चुना राजश्री नारायेण जोसी यांजकडून तीस च्याळीस खंडी तयार जाहाला आहे तो आणूं. या मागें तीस पस्तीस खंडी चुना आणिला. दिंडी जवल नवी भटी केली. चुना सात आठसें खंडी होईल. तर्फांच्या हवालदार याजकडून लडी ३०० तीनसें

खंडी जमा करविली तेहि आणूं. वरचेवरी चुना तयार होत आहे. हणमंता बुरजाचें काम भुईपासून उंची १४ चवदा हात जाहाले आहे. गगन बुरूज भुईपासून १९ येकुणीस हात उंची जाहाला आहे. येथें बेलदार १० दाहा होते त्यास राजश्री खंडोजी माणकर याणी बोलावयास माणूस पाठविले आहे. मेढ्याकडील काम चिकटीचें आहे, तरी तेथें पाया खणावयास व दगड काढावयास पाहिजेत. ऐसियासी बेलदार १५ पंधरा असामी पाठवावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. गगन बुरूज आकारात आला. आतां पूर्वेकडे लगट करून ताबडतोबीनें काम करितों. गगन बुरजाची सपेली मात्र होणे आहे, तीहि करूं. विठोजी कामावर फारसी मेहनत करितो. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Siwaji Babaji informs Chimaji Appa of the progress of the work of fortifications at Arnala. He also writes that the siege of Vesawa is being prosecuted with vigour by Ramaji Mahadeo and Khandoji Mankar.*

No. 151] [*31-1-1739 or 10-2-1738*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसीं

विनंति सेवक सिवाजी बाबाजी चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. तागायत छ १ जिलकादपर्यंत स्वामीचे कृपाद्रिष्टीकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. छ २९ सवालीं आम्ही वेसावेयास गेलों होतों. तिहीकडून मोर्चे बसले आहेत. दोन तोफा लागू जाहल्या आहेत. वेसाव्याची वरील माडी आम्हाकडील तोफानी ढासलली आहे. मोर्चे जेजालच्या गोळीवर गेले आहेत. पूर्वेकडे विहीर आहे, तेथें हर सांवत व आम्हांकडील करोल व आरब यांचा मोर्चा तेथें आहे. उत्तरेकडे मोर्चा राजश्री रामाजी माहादेव याणी घातला आहे. राजश्री खंडोजी माणकर याणी मोर्चे उत्तरेचे व पच्यमेचे मध्यभागीं याचा मोर्चा बसला आहे. वरकड उत्तर इमारतीचें वर्तमान गगन बुरजाची सफेली दोन हात उंची तयार जाहाली. हणमंत बुरूज भुईपासून उंची हात १५ पंधरा आला आहे. पूर्वेकडील काम लाविलें आहे. लोक तों थोडके आहेत. परंतु काम तों बरेंच चालतें. तुर्बायासीं+ हजार बारासें खंडी लडी जगा जाहली आहे, परंतु गलबतें वरचेवरी रवाना करून आणावी लागत्ये. त्यास आंताजीपंत कमाविसदार मोर्चीत आज आठ दिवस गेले आहेत ते आले नाही. दिंडी जवलील भटी आठ दिवसा तयार होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Siwaji Babaji reports to Chimaji Appa about batteries being erected against Vesawa.*

+ तुर्बे. (Trombay.)

No. 152] [Jan. 1739

श्री

विनंति उपरी. चिठी पाठविली ते पावली. गुरे वेठे घेऊन जात होते ती गुरे सोडविली. वेठे पळाले. गुरांची वाट काये ते करावी म्हणून लिहिले, तर गुरे आणिली आहेत ते गाव तारापुराजवल आहेत, ते गावचा पाटील व रयेत आवघी नेऊन मनोराजवळ ठेवावी. त्यास मनूरचा पाटील जामीन द्यावा मग गुरे द्यावी यैसी बोली केली आहे. हे माणसे नेऊन मनोरास ठेवितील आण तेथील पाटील जामीन देतील मग गुरे सोडावावी. यास च्यार दिवस लागतील. च्यार दिवस गुरे माणसाकडून जतन करणे. पाटील व कुणबी येथे आले आहेत, बोली होत्ये आहे. बोली ठीक जालियावर लिहून पाठऊ. सध्या दोघे शिपाई मुजरत राखावयास पाठवितो. इतके दिवस जाले.. तसे दोन दिवस आणखी रयेतहि राखिली पाहिजे. यास्तव धीर धरावा, उतम आहे. आज पाल माहिमाचा तारापुराकडे चालिला आहे असे दिसते. बहुत काये लिहिणे हे विनंति+

¶*Instructions from Vasudeo Joshi about the cattle captured from the enemy's villages near Tarapur, are sent in this letter*

No. 153] [Jan. 1739

श्री

पुरवणी राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. माहीम व शिरगांवकर फिरंगी राजश्री संकराजीपंत याणी आम्हाकडे पाठविले. त्यास भक्षावयास देऊन निगेनसी ठेवणें म्हणून लिहिलें आहे. त्यास तीनशें सवातीनशें माणूस, हे ठेविल्यानें काये उपयोग आहे? धान्य चहूं रोजां सवा खंडी तांदुळ लागतात. त्याखेरीज त्यास रक्षावयास व राहावयास स्थल पाहिजे. आपले लोक वसईत सांपडले आहेत. कदाचित् तहरहमुळें सोडावयास मुबदला कार्यास येईल म्हणून ठेवावे, तरी ढोणे व कपितान व पाद्री आटकेंत ठेवावे. वरकडास मुलकांत पोट भरावयास आज्ञा द्यावी, यैसें आमचे विचारें आहे. यांत माहाराज आज्ञा करितील त्याप्रमाणें वर्तणूक करून. सेवेसी श्रुत होये. उंटास जिनस व तूप पाठवणें म्हणून आज्ञा. यास पहिले वेठ्या * * * * बराबर पावणेपांच मण तूप पाठविलें. हाली पांचमण तूप बैलावर पाठविलें आहे,

---

+ पत्र वासुदेव जोशाचें.

येऊन पावेल. स्वामीनी उंटें पुण्यास रवाना केली. तांदूळ देऊन रवाना करणें, म्हणोन आज्ञा त्यावरून तांदूळ बारीक भरून आजी रवाना केले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. उंटाचा जिनस पाठविला आहे. बैलाबराबर यादी पाठविली आहे. हें विज्ञाप्ति.

¶A suggestion is made by Vasudeo Joshi to Chimaji to release prisoners of war excepting the Captain, the priests and the white soldiery, captured in the engagements of Mahim and Shirgaon as they were felt to be a useless burden.

No. 154] *[13-2-1739?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक सदाशिव हरि मो ठाणे मांडवी कृतानेक सां नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ १४ माहे जिलकाद पावेतों ठाणे मजकूरचें वर्तमान यथास्थित असे विशेष. तारापुराहून लोखंड वट ११३ येकसे तेरा, जंजिरे आरनाला येथें आले होते ते आज छ मजकूरीं तिसरे प्रहरी गलबतावर ठाणे मजकुरी आले. त्यास काल छ १३ जिलकादीं स्वामीकडील कारकून ते लोखंड न्यावयासी आला होता तेव्हां लोखंड आले नव्हतें. हली आले आहे. तरी हे लोखंड वसईस पाठवावें किंवा साष्टीस पाठवावयाचें आहे, यांविसीं काय आज्ञा ती केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Sadashiv Hari desires to know from Chimaji Appa where he should direct the stock of iron received by him at Mandvi from Tarapur.

No. 155] *[22-2-1739?*

छ २४ जिलकाद

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विज्ञापना ताा छ २३ जिलकाद. फिरंगी बाहेर आला तो पाणकोटाकडे उतरून आपले कोटकरी यांचे मोर्च्यांवर चालोन घेतले. तेव्हा राजश्री गोविंदपंताकडील दोन शिपाई बरसे धाऊन जाऊन हातपराजी जाली. दोघांपैकीं एक मांग होता त्यास गोळी लागली. त्याजवर फिरंग्याने हात टाकतांच आरब धाऊन व गनीम पिटून मुरदा काढला. त्याणी आपले मुर्दे काढले. आज आरबानी बरी केली.

इतक्यांत मानसिंग घाटगे याणी वाट राखली. रामाजीपंतहि तेथे होतेच. मग सारेच राऊत लस्कर पावले होते. फिरंग्याचा ऐवज थोडकाच, परंतु शिपाईगिरीचे विचारास चुकत नाहीं. कळलें पाहिजे. शेवेसी श्रुत होय. गोविंदपंताकडील मांग जखमी जाला, परंतु जखमा च्यार आहेत. अजून जिवंत असे. हे[+] विज्ञाप्ति

¶*A skirmish between the Portuguese and the Arabs just near Pankot is described to Chimaji Appa.*

No. 156] [*28-1-1739?*

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनती. सेवक रामाजी माहादेव चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार विनती विज्ञापना. ता छ २८ माहे जिलकादपावेतो स्वामीचे कृपेकरून लोकांसहवर्तमान मोर्चा धारावीस येथास्तित असो विशेष. काल छ २७ जिलकादी आज्ञापत्र सादर जाले. तेथे आज्ञा की, गाईमुखावर मोर्चा लागू करून अरमारावर मारगिरी करीत जाणे. राजश्री खंडोजी माणकर सांगतील त्याप्रो मोर्चा घालणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रो राजश्री खंडबानीहि सांगितले की, सामान करून गाईमुखापुढे खडपाजवल मोर्चा न्यावा. त्यावरून काल आज सामान होत आहे. आज मोर्चा पुढे जाईल. वरकड पहिला मोर्चा रा तुबाजीपंत व आंगरे यांजकडील लोकाचा खाडीकाठे होता, तो काल तेथून काढून आलीकडे आमचे मोर्च्याजवल आणिला. आम्ही पूर्वी गाईमुखाचे सुमारे खाडीकाठे मोर्चा नीटच वाळूवर मैदानात घातला. त्या रात्री मोर्चा उभा करावयासी कणगे नेले. त्याबराबरच भारे लोकानी घेतले होते. कणगे उभे करिताच भारे नेऊन टाकिता इतक्यात फिरंगियाची मारगिरी किल्यावरून बंदुखाची व तोफाची जाली आहे ते ईस्वर जाणे. त्या वेलेस येक खासबारदार दिा रामजी सुर्वे याजकडील पटाईत मर्द माणूस होता तो गोला मस्तकी बसोन ठार जाला व पायागडकरी याजकडील येक परवारी तैसाच जंबुऱ्याचा गोला पोटातून पार होऊन गेला. तोहि ठार जाला. पाच सात जखमी जाले. परंतु स्वामीचे पुण्यप्रतापे लोकानी मर्दानगिरी करून रात्रीमध्ये पाच कणगे भरून मेढादेखील तयार करून मोर्चा बलकट केला. त्याउपर दुसरे दिवसी दोन प्रहरा फिरंगी चालोन मोर्च्यावर येत होता, त्यास आरब व खासबारदार व सिलेदार वगैरे लोकानी नितिजा देऊन वाटे लाविला. परंतु

[+] अक्षर निराळें, बहुधा पत्र खंडोजी माणकराचें असावें.

त्याची निशा जाली नाही. यास्तव फिरोन दुसरे दिवसी जमाव करून आला. मग त्याची आमची जाली, ते स्वामीस विदित जाले असेल, तेच खरे. परंतु वसईहून दर्यावर्दी पलोन भाईदरास दोन आले, त्यानी वर्तमान सांगितले की, दाहा जण ठार जाले व दाहा वीस जखमी जाले. त्याचा रेच पुर्ता मोडला. चाकरीस लोक कमी करीत नाही. खासबारदारा(नी) दुसरिया जुझास मेहनत चांगली केली. भेटीनंतर सेवसी विदित करीन. यासी येक समाधानपत्र पाा म्हणजे याचे समाधान होईल. स्वामी सेवसी आंतर कोणी करीत नाही. येथील सविस्तर वर्तमान सेवेसी भगवंत ठाकूर विदित करील. सेवसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadeo writes to Chimaji Appa about a severe engagement with the Portuguese at Dharavi.*

No. 157] [*4-3-1739 ?*

पाौ छ ४ जिल्हेज

श्री

सेवेसी विनंति. काली इंग्रेजाचे अरमार वसईचे व बहादरपुरा व किल्ले वज्रगडचे बारियाबरी आले होते ते वर्तमान काली सेवेसी लेहून पाठविले आहे. त्या उपरी काली संध्याकालचे चार घटका दिवसास जंजिरे अरनालियाचे बारियावरी जाऊन रात्रौ मध्य रात्रीस सुरतेकडेस गेले. आजी बारियावरी आरमार नाहीं. कलावे याकरितां लिहिले असे. बहादरपूरचे मोर्च्याचे पूर्वेकडे पश्चमेकडे दोन तबके खणोन सिद्ध केली. तेथें बाहेरचे लोक समई नेऊन व त्या तबकाचे पुढें व वसईकडील अंगास आजी बुधली मेढियापासून सा हतावर पुरून सिद्ध करितो. व हुकेहि भरून आजी उद्याच्या दिवसात सिद्ध करितो. फिरंगियासी जुजावे त्याणें असेच आधीचा मारूफात करून जुजावे. तो करितो आपण कां न करावे हाच विचार तिकडे सांगोन ठेवावा. घोडबंदरी मेढा असेल तेथें हुके कुंभारापासून करवून भरून सिद्ध करावे व बुधली पुरवावी. गनीम आला तरी आंत सरबती नेऊन प्रसंगोपात उडवावी हा विचार आसावा. हे विज्ञापना.[१]

¶*Shankaraji Keshav reports to Chimaji Appa the progress of the siege of Bassein.*

---

१ पत्र शंकराजी केशवाचें.

No. 158] [6-3-1739

ले.

श्री

सेवेसी विज्ञापना. पेशजी गोव्याहून फिरंगियाचीं दोन फरगतें मुंबईस येऊन दवण दिवास गेली होती, तीं आज छ ६ जिल्हेजी फिरोन मुंबईस आली. येथून येक दोन रोजीं निघोन गोव्यास जाणार आहेत. गोव्यास फिरंगियाचीं अकरा फरगतें थोर होतीं, त्यांपैकी तीन फरगते कलिकोट मलबारास गेली, यैसे वर्तमान आले आहे. सदरहू दोन फरगतें तीन दिवस बंदरात राहोन पाणी भरून फिरोन गोव्यास जावयाबदल छ ९ मिनहूस हकारून गेली. गोव्यांत फिरंगियाचें अरमार तयार जाहालें होते, त्यापैकी कांही अरमार मलबारास झुंझावयाबदल गेले. अली-राजा मलबारी याणें फिरंगियाचे पादरी मलबारांत होते त्यांस मारिले, आणि त्याच्या वखारा मालमता लुटून फना केली, ते वर्तमान येथे यास कलतांच मलबारावर चढाई करावयास अरमार रवाना केले यैसे वर्तमान आले आहे. सेवेसी विदित जाहाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*The letter gives news about the movements of the Portuguese frigates from Bombay to Daman, Div and again back to Goa. They are dispatched against the Malabar King who assassinated some Portuguese priests and looted their factories.*

No. 159] [18-3-1738 :

छ ९ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक शंकराजी केशव कृा साा नाा विा. येथील कुशल ताा छ ७ माहे जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे. स्वामीनी राा नारोपंत यासमागमे सांगोन पाठविले की, 'मर्तिन सिरवेलचे हवेलीचा मेढा बलावणे.' त्यास हा वेढा बलावला म्हणजे मग पावसकाला निघताच तो मेढा मोडून टाकून हाच मेढा धरून मजबुदीने राहावे, हा विचार चितात आला असिला तरी हा मेढा उंच मजबूत करावा. नाही तरी हाहि करावा आणि तो राखावा यैसे चितात येईल तरी मग आता तसेच आहे. परंतु पुढील मेढा आहे तेथे मार बहुत. केवल समीप पोटाखाली मार तेथे बहुत, हा विचार चितात येऊन सांगोन पाठविले असेल तरी हाच मागील मेढा दोन मास लागून मजबूद करून. मग तो मेढ

टाकून हाच येकच तीन हजार माणूस पावसकाळा ठेऊन व दोन तीनसे स्वार ठेऊन असावे. दोन ढासणे रक्षावयास खर्च भारी पडेल यास्तव लिा असे. याचा विचार सिद्धांत सांगोन पाठवावा. पुढील मेढा जेजालेची गोली आत येत त्याचे पाठीमागे जेजालेचे टपियावरी हा दुसरा मेढा आहे. परंतु मागील मेढियास थोड (थोड?) भोई आहे. मारा पुढिल्या परीस दुपटीने लांब आहे, हा तो अर्थ आहेच. पुढील मेढियास आत पावसालाचे पाणी होते माच घालून राहावे लागते हे तो खरेच आहे. त्यास याचा विचार मागील मेढा बलावावा यैसे पत्र आलियास बलाऊन मजबूद करून. परंतु पुढील मग पाऊस पडलेवर (?) विल्हेस लागेल. मागील मेढियात बलाऊन येकेच जागा राहावे. पाणी तो आत आहेच. वेळ प्रसंगास पुढे मारहि मागील मेढियावरी पुढिल्यापरीस थोडेका होईल, याचा विचार ल्याहावा, मग कामास आरंभ करून. दिवस थोडके राहिले. विचार सत्वर लेहून पाठवावा. दगडी काम करावे तरी दगड जवली नाही. तथापि पर्जन्यास दिवस थोडके दिवस राहिले. साहित्य गाडियाचे व बरकड नाही. यास्तव पुढे उघाडीचे दिवस आलियावरी दोनसे गाडे सजावे आणि धोंडे जेथे मिलेल तेथून. आणि दगडी काम करावे. प्रस्तुत मेढियाचे काम करून बलावावे. स्वामीस कलावे याकरिता लिहिले, असे. याचे उत्तर येईल त्याप्रमाणे वर्तणूक करून. विदित जाले पाहिजे सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav writes to Chimaji Appa the necessity of strengthening stockades near Bassein.*

No. 160] [*17-3-1738*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसीं

विनंति. सेवक शंकराजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति. येथील कुशल तागायत छ ७ माहे जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. काल छ ६ माहे जिल्हेजीं संध्याकालीचे दोन घटका रात्रीस आम्ही येथून कामणदुर्गावरी अग्न पाहिली. त्याउपरी सर्वेच किले वज्रगडीहून राजश्री कर्णाजी सिंदे याची चिटी आली, कीं कामणदुर्गावरी आग दिसत आहे. त्या उपरी आजी प्रात:कालीं कांबियाचा चौकीदार कांबियाहून निघोन येथें आला. त्यास मार्गी दोन सिपाई मौजे तिल्हेर येथं भेटले. त्यास येकाचे आंगावरी

हिरवी सकलाद होती तीस सुसीचे कांठ लाविले होते. दुसरियाजवळी घोंगडी होती आणि गारभांडीं होतीं. त्यास याणी पुसिलें. त्यास त्याणी सांगितलें कीं आम्हीं भिवंडीहून आलों आहों पारधीस. यैसें बोलिले. दुसरी गोष्ट आजी पांहाटेस कामणदुर्गावर रवाव वाजत होत्या त्या आम्ही व कांबियाच्या लोकानी यैकिल्यां यैसें त्याणी सांगितलें. त्यास आम्ही काली येथून आग रात्रीस पाहिली. यावरी आजी प्रात:कालीं कामणास पनास माणूस पाठविलें आहे तें आजी रात्रीस अगर सकालीं आलियावरी फिरंगियानी कामणावरी थारा धरिला असेल तरी खामखा गनिमावरी स्वारी पाठऊन त्याचें पारपत्य करितों, व तिकडूनहि स्वामींनी लोक पाठवावे लागतील. इकडून लोक व तिकडून लोक येऊन गनीम बुडवा-वयाचा लाग आहे. कामणदुर्गाहून खाडी तीन कोस आहे. कामणदुर्गावरी किलावरी पाणी नाही. खाली कोसावरी आहे. पूर्वी राजश्री कृष्णराव याचे कारकीर्दीस किला वसविला होता, तेव्हां खालीं कोसावरी होता हें वर्तमान सेवेसीं कलावें याकरितां लिहिले असे. हें वर्तमान आम्ही आतांच यैकतांच राजश्री चिमणाजी बापूजी यांस दोनसें स्वारानसीं मांडवीस पाठविले असेत. वर्तमाम तहकीक आलियावरी फौज पाठऊन उडवितों. कललें पाहिजे व हंसाजीराव मराठे या समागमें सेंभर माणूस देऊन मांडवीस पाठविलें. रातोरात पाठविले विदित जालें पाहिजे. दोमसे राऊत व संभर माणूस मांडवीस रवाना केलें. ढमढरे सितोले पाठविले असेत. तथापि मांडवीवर आला तरी येथून भारीच फौज जाऊन तंबी करितों. जर कामणावरी थारा धरिला तरी दोन हजार माणूस स्वामीस पाठवावें लागेल. येक हजार हिकडून यैसे तीन हजार माणूस व बरवाजी पाटील यैसे लगटानेच उठावा मारून दस्त करावा लागेल. शामला--कडील हजार माणूस फिरंगीयाजवल जमा जालें आहे, ते यैशा लबाडी करितील जंजिरियाचे पंचमाहालचे लोक आले असत. शामलासहि बरे दाटियाचे पत्र पाठवावें कीं सिदी मुबारक याजबरोबर लोक देऊन कुमक करितां पाठविलें हे गोष्टी पेश जाईल कीं काये हे लिहिलें पाहिजे. सिदी मुबारख तों धारावीस पडिला. परंतु लोक हजार आहेत, म्हणून काली किरिस्ताव आला त्याणे सांगितले असे. हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav reports to Chimaji Appa that the Portuguese are launching an attack against Kamandurg and asks him to send men to prevent the attack. He also reports that the Sidi has sent succour to the Portuguese.*

5713

No. 161] [10-3-1739?

छ १२ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक शंकराजी केशव कृा सा ना वि. येथील कुशल ता छ १० माहे जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी मर्तनसिरवेलचे हवेलीस रा रायाबाचा मेढा आहे तेथें ठासण करणें, त्यावरून काली छ ९ जिल्हेजी पुष्यार्क होते ते दिवसी काम चालीस लाविले आहे. त्यास काम येणेप्रमाणे लाविले आहे. कामाची लांबी रुंदी येणे प्रो धरिले.

	लांबी हात सुमार		रुंदी
२४०	बाजू पूर्वदक्षिणेपासून उतरपर्यंत	१७५	बाजू दक्षणपूर्वपासून पश्चमपर्यंत
२४०	बाजू पाश्चिमदक्षिणे पासून उतरपर्यंत	१७५	बाजू उतर दक्षणेपासून उतरपर्यंत
४८०		३५०	

यकूण लांबी च्यारसेअसी हात, रुंदी दोन्ही बाजू मिलोन साडेतीनसे हात याखेरीज च्यार बुरुज चहू कोनास. यास दगड लाहानसाहान मिलेल, त्यास दगडी काम पाच पाच सात काम करून त्यात माती भरून मग त्याजवरी माडाचे वोंडे देऊन सात सात हात उंच करून. येकूण चौदा हात पावेतो उंच काम करितो, म्हणजे गनिमाचा इलाज चालणार नाही. या कामास गवंडे पाहिजेत. त्यास ठाणेपैकी व कल्याण पैकी पाच सात गवंडे पाठऊन देववावे. महिना दीड महिनियाचे काम आहे. काम तूर्त दगडमातीचा चौत्रा सा सात घालून त्याजवरी माडाचे वोंडे द्यावे यैसे करितो. मग पुढे दसरियापासून या मेढियाचे बाहेरून चुनेगची काम करावे यैसा विचार केला आहे. विदित जाले पाहिजे * सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

¶*The progress of the repairs of Martino De Silvera's residence which afforded a good vantage ground for erecting batteries is submitted to Chimaji Appa by Shankaraji Keshav.*

5714

No. 162] *[10-3-1739 ?*

छ १० जिल्हेजं.

श्री

सेवेसी विनंती. स्वामीनी अरमारकरी सिपायाची व दर्यावर्दी याची नेमणूक पाठविली ती पावली. स्वामीनी रोजमरियाची व अडिसेरीयाची नेमणूक पाठविली त्याप्रमाणें देऊं. परंतु सिवाजी यादव यास स्वामीनी पाठविलें परंतु ते आद्याप आले नाहींत. काय गुंता पडला आहे कलत नाहीं. विदित जालें पाहिजे. राजश्री मानाजी आंगरे यास तोफा अटावीस कालच्या तावडियावरी सांपडल्या आहेत, तरी अगत्यरूप दाहा तोफा मागून घ्याव्या. कलावें याकरितां लिहिलें असे. तीन तावडे येक खेपेस त्याणी नेले. दोन पांच पाचसे खंडीचे कची व येक खबर्बात दीडसें खंडीचा. येकूण तिन्ही मिलोन अठावीस तोफा सांपडल्या आहेत. त्यास जंजिरे अरनालियास दाहा तोफा जरूर थोरथोरच पाहिजेत व गल्बतासहि पाहिजेत. तरी तोफा आगत्य मागाव्या. पुढें आरमार आपलें आलियावरी श्री आम्हांसहि तोफा देईल. परंतु तूर्त जागियासी तोफा असलियास येखादे समई गनीम आलाच तरी तोफाचे खालीं आरमारावर मार द्यावयास कार्यास येईल. यास्तव जरूर पाठवाव्या. बुरूज होतील त्यास तोफा असिल्याच पाहिजेत म्हणून सेवेसी लिहिलें आहे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav requests Chimaji Appa some guns which Manaji seized in one of his expeditions.*

No. 163] *[4-4-1737*

श्री

राजश्री चिमणाजीपंत
आपा गोसावी यांसी

७ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ दंडवत विनंती. येथील क्षेम छ १४ जिल्हेज मुा बुढा डोंगर जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. आपली (एक ओळ फाटली आहे) धान जाले. फिरंगिया (फाटलें * *) खी केली आहे याचे पारपत्य करावे. जागियाचे बंदोबस्ती करणे लागते यास्तव फिरंगण प्रांते आलो आहो. देशास फौज आलियानंतर तुमचे विचारे जे कर्तव्य ते केले जाईल. नवाबाचे वर्तमान दिलीस गेलियाचे लिहिणे म्हणून आज्ञापिलें, त्यावरून सविस्तर कलों

आलें. फिरंगण प्रांती आपण खासा गेले आहेत तेथील बंदोबस्ती करणे ते करून फिरंगियास नतिजा देऊन आपण वरघाटे यावयाचा विचार केला पाहिजे. येते समई आपणांस विनंती केली होती कीं, कोकणांत पाणी जेंबून आहे, शरीर आपले अशक्त आहे, त्या प्रांतीचे दुखणें आंगचे जाणार नाहीं, आपण सर्वथा न राहावें. आपले पदरी मातबर लोक फौजा बहुत आहेत, ज्यास आज्ञा होईल ते राहून आज्ञेप्रमाणें कामकाज करितील. सरदार बहुताचे अन्न आपले पदरी आहे. आपण लक्ष प्रकारे वरघाटे आ(सुमारे एक ओळ फाटली आहे) स्तर वर्तमान राजश्री पंतप्रधान याणी पत्री लिहिले आहे त्यावरून विदित होईल. चिरंजीव सुभानवाचे लग्न जाहलें. गोसावी यांनीं खर्चाची बेगमी करून दिल्हे म्हणून चिरंजीव राजश्री संभाजी जाधव यांनी लिहिले होते. आपणा वेगळे साहित्य करणार कोण आहे? विशेष काय लिहिणे, कृपा असो दीजे, हे विनंती.

¶*Pilaji Jadhavrao writes to Chimaji Appa, who had recently marched into the Konkan to check the hostile activities of the Portuguese. The writer advises the addressee to guard himself against the unhealthy climate of that part of the country.*

No. 164] [*5-4-1737*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
साहेबांचे सेवेसी

आज्ञाधारक केशव सजणाजी साष्टांग दंडवत विज्ञापना विशेष. ताा छ १५ जिल्हेज पावेतो ठाणे मारीचे वर्तमान येथास्तित असे. मांडवीकडील वर्तमान तर दोन रोज जाले, मोर्चे लागले आहेत. फकीर महंमद याज बराबरी वाईंगी[1] सुमार ३०० तीनसे व मिरच्या हिरव्या थोडकियाच सापडल्या. भाजी मिलाली नाहीं. गोलंदाज पाहिजे म्हणून आज्ञा केली त्यास येथें फकीर गोलंदाज मात्र होता तो नासिकास गेला आहे. आणीक उत्तम गोलंदाज नाहीं. विदित होय. रात्रीं वसईहून पत्रे आली ते प्रातःकालीं बराबर सिपाई देऊन रवाना केले आहेत. विशेष काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

विज्ञाप्ती.

¶*Keshav Sajanaji informs Chimaji Appa of the progress of the siege.*

---

१ वाईन.

No. 165] [5-4-1737 ?

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा
स्वामींचे शेवेसी

विज्ञापना. ता। छ १९ जिल्हेज पावेतों वर्तमान येथास्थित असे विशेष. मरोलच्या मुकामीहून येतेसमई इंचबेट क(पि)तान मुंबई यासी कागद लिहिला होता. त्याचा जबाब आला तो व येथून कागद लिहिला त्याची तालीक सेवेसी पाठविली आहे व त्यांच्या थैल्या लाखोंटे आले तेहि पाठविले आहेत. त्याचा जाब त्यास स्वामी पाठवितील त्याचा मजकूर शेवकास लिहिला पाहिजे. निमित्य कीं आम्हाकडे त्याजकडील कोणी येईल जाईल त्यास जाबसाल लिहिला पाहिजे. यास्तव लेहून पाठविले पो. येथून कागद कुणब्यासमागमे रा। केला होता. सेवेसी श्रुत होय * हे विज्ञाप्ति.

¶*Khandoji Mankar sends to Chimaji Appa the letters despatched from Bombay by Captain Inchbird.*

No. 166] [15-3-1739 ?

छ १७ जिल्हेज.

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक शंकराजी केशव कृतानेक सां। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ १९ माह जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. वसईच्या बदरामधे फिरंगियाची जाहाजें व गलबतें आजी मनास आणितां च्यार पांच आहेत. वरकड कोठे गेलीं कलत नाहीं. फिरंगी दगेखोर आहे. बहुधा लोक गलबतावरी भरून बांहेर नेऊन भोले (भूल) पाडून अकस्मात आम्हावरी यावें अगर जंजिरे आरनालियास जावें येसा विचार असिला तरी असेल. त्यास आम्ही जंजिरे मजकुरी आतांच पत्र पाठविले कीं खबरदार असणे व आम्हीहि येथें खबरदार असो. फिरंगी आलाच तरी स्वामीचे पुण्ये समर्थ आहे. हिसाब धरीत नाहीं. फिरंगाणचे मसलतीचे लोकांचा डोला डोलाचा हिसेब तमाम करऊन ज्या लोकांकडे फाजील निघेल त्याची विल्हे करून घ्यावी, व सबलसिंग जुनरकर याचे लोक राजश्री खंडोजी माणकर याजवली आहेत, त्याजकडे फाजील आहे, त्याची विल्हे त्यास सांगोन करवावी म्हणून लिहिले, त्याचे उतर पाठविले

नाहीं. याकरितां हली तपसीलवार पुरवणी लिहिली आहे. ते मनास आणून फाजिलाची विल्हे करून ध्यावी आणि उत्तर पाठवावें. येथील लोकाकडे फाजील होते, त्याची विल्हे करून घेतली, त्याची यादी सेवेसी पाठविली आहे त्यावरून कळो येईल. सेवेसी विदित होये. येथें आम्ही खबरदार आहो व आरनाला तांदुळवाडी मांडवी जिवधन खबरदारी सारे जागां करविली असे. हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshav writes to Chimaji Appa that some four ships of the Portuguese are still to be seen in the harbour, while the others have disappeared. What the enemy intends doing with the ships is a mystery but in no case can he take the Marathas by surprise, as all outposts have been warned to be ready for immediate action.*

No. 167] *[15-3-1739?*

पौ छ १९ जिल्हेज.

श्री

सेवेसी विनंती. सिवजी यादव यास गलबतेसमेत जंजिरे अरनालियास रवांना केलें होतें. त्यास तुफान जाहली याकरितां कुलाबियास राहिले. आमच्या गलबतांनीं खांदेरीच्या बारियावरून तीन तावडें फिरंगियाचें धरून आणिलें, त्यांस मार्ग न फुटे याकरितां कुलाबियास ठेविले आहेत. शिवजी यादव जंजिरेयास येतील म्हणून लिहिलें, व सिवजी यादव याचें पत्राची नकल पाठविली ती पावली. येसियास तावडे खटारे राजश्री मानाजी आंगरे याचें हवालीं करून ठेवावे. त्याजवरील सामान आलात अवदान दालदागिना नांगर लोइलियो[1] या व तोफा वगैरे सामान जो असेल तो जंजिरे अरनालियास आणवावा. विदित जालें पाहिजे.

¶*The capture of the Portuguese boats near Khanderi and the detention of Shivaji Yadav on account of a storm are reported by Shankaraji Keshav.*

No. 168] *[7-4-1737*

छ १९ जिल्हेजे[2].

श्री

श्रीमंत राजश्री आपा
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक केशव सजणाजी साष्टांग दंडवत विज्ञापना (* * फाटले). छ १७ जिल्हेजपावेतो ठाणे भिवंडी येथील वर्तमान यथास्थित असे. यानंतर

१ लोइली = नांगर. २ पै. तारीख चूक आहे.

5718

ठाणे मजकुरीहून शाकभाजी वाईंगी व भाजी वोझी २ दोन पाठविली असत व फुले बकुलीची व दवणा व मोगरी तुरे ऐसे सेवेसी पाठविले असत. विशेष. माड(वी)हून रात्री ठाणे मारी सिपाई आले. वर्तमान सांगतात कीं राजश्री बरवाजी ताकपीर याणी कोट जेर केला आहे. तोफ नेऊन जोडिली आहे, तेण्हेकरून सदर व दरवाजा रोखिला आहे. काली खणिक तोफा २ दोन गोखरवियाचे दादरावरून आणिल्या आहेत त्याही जोडून मार करितील. ईस्वर इच्छेने व खावंदाचे प्रतापे कोट घेतील. वसंईकडील वर्तमान कांही आले नाहीं. जे वर्तमान येईल ते वरचेवरी सेवेसी विदित करून. सिनराहून जासूद राजश्री मल्हार दादाजी याजकडून आले आहेत ते सेवेसी पाठविले (असत.) विदित होय हे विज्ञापना.

¶*The attack conducted by Barvaji Takpir on the fort of Mandvi is communicated to Chimaji Appa.*

No. 169] [*7-4-1737*

श्री

श्रीमंतु राजेश्री आपा साहेब
स्वामीच्ये सेवेसी

आज्ञाधारक होनाजी बलकवडे मो वानरे कृतानेक विज्ञापना. ता। छ १७ जिल्हेज पावेतो आज्ञाधारकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. बावाजी बलकवडे आजारी जाले व बाव * * * याच्ये पायास गोली लागोन जखमी जाले. हे दोघजण साहेबांचे सेवेसी रा। केले आहेत. त्यास घरा जाव(यास) दस्तक देणार साहेब धनी आहेत. विशेष बावाजी बलकवडे याजबराबर येथून भोई आठ व सिपाई दोन दिल्हे आहेत. कृपालु होऊन दस्तक देणार साहेब धनी आहेत. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Honaji Balkavde requests Chimaji Appa to arrange for the departure home of Babaji Balkavde and two other men who have been wounded in an action at Bandra.*

No. 170] [*Recd. 20-3-1739*

पौ छ २० जिल्हेज

॥

सेवेसी विनंति. येथें बहाद्दरपुरियावर फिरंगी आला तरी त्यास नतिजा बरासा प्राप्त होईल, अगर आरनालियासी गेला तरी तेथंही बरासाच देवितो, याचा हिसाब धरितो (ऐसे) नाहीं. आम्हाकडेसहि खबर दोहोच्हूकडून आलीच आहे की येतो.

त्यास हे काम करितो, माडीचे भासते. याजवरूनहि त्यास बहुतसे संकटच प्राप्त होईल. काय निमित्य कीं जर बलावले तरी वसईस पेटेस मागे पुढें जागाच नाहीं. कोटात वसेल तितकाच. किंवा धारावीकडेस घरें बांधेल तरी न कले. अठो प्रहर खबरदार असो. कोरे काम होते त्याचे दोही बाजूंस दोन टोल्यानीं बसतच असतो. सेवेसी विदित होय हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav reports his plan of attack on the Portuguese at Bahadarpura.*

No. 171] [*11-4-1737*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
साहेबांचे सेवेसी

आज्ञाधारक केशव चरणावरी मस्तक ठेऊन सा। दंडवत विज्ञापना विा. ता। छ २१ जिल्हेज पा। ठाणे मा।रीचे वर्तमान येथास्थित असे विशेष. मोगरियांचे तुरे ६ व बकुलीच्या माल्या पाठविल्या असेत. विदित होये. वरकड इकडील वर्तमान तरी मांडवीहून रात्रीं पत्रें आली ते रात्रीच कल्याणास पाठविली तिकडून हजूर रवाना केली असतील. येथून गोलंदाज नवा मांडवीस पाठविला असे. कोट जेर आहे लवकरीच येईल म्हणून सांगतात. विदित होये विशेष. काये लिा। हे विज्ञाति.

¶*Keshav Sajnaji writes to Chimaji Appa, reporting operations against Mandvi.*

No. 172] [*11-4-1737*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक मोरोराम मु॥ बिरवाडी कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना. ता। छ २१ जिल्हेजपर्यंत स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी फिरंगियावरी मसलत केली त्यास फिरंगी पराभव पावविला. स्वामी विजई जाहले म्हणून आइकिले, येणेकरून आम्हा सेवक लोकांस उछाह जाहला तो श्री जाणे. यानंतर सेवक चाकरीस उमेदवार आहे, त्यास स्वामीनी पोख्ता सरजाम करून आज्ञापत्र सादर केले, तरी से पंनास लोक घेऊन सेवेसी येतो.

बहुत काय लिहू कृपा केली पाहिजे हे विज्ञापना. स्वामींनी आज्ञापत्र सादर केले तरी बरे उतम येक दोन सरदार नावाचे माणूस सेवेसी घेऊन येतो. हे विज्ञापना.

¶Moro Ram of Birwadi congratulates Chimaji Appa on his victory over the Portuguese and offers to serve under his command with a contingent of his own.

No. 173] [*23-3-1739?*

वज्रयोगिणी.

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक म्हाळोजी मुठे सां विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २३ जिल्हेजपावेतो येथास्थित असे विशेष. चालडेचे मुकामी आज्ञापत्र सादर जाले कीं वसई प्रांते फौजसुधां जावें. आज्ञेप्रमाणें कूच करून घाटाखाले येऊन राजश्री शंकराजी केशव यांचे विचारे श्री चे नजीक मुकाम करून राहिलो होतो, तों छ १९ जिल्हेजचे आज्ञापत्र छ २३ जिल्हेजी जासुदाबाा सादर जाले तेथें आज्ञा, कीं राा रामचंद्र हरि याजपासीं फौजसुधां जाणे, ते कामकाज सांगतील ते करीत जाणे, येसी आज्ञा केली. तर आज्ञेप्रमाणें माारनिलेकडे जाऊन पोहचतो. सेवेसी श्रुत व्हावे हे विज्ञापना.

¶Mhaloji Muthe reports to the Peshwa that he will soon join Ramchandra Hari with his forces as ordered.

No. 174] [*23-3-1739?*

पौ छ २३ जिल्हेज.

श्री

पुा राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. इसबर्ड यांणी रेवदंडियास जावयास म्हणून राजश्री मानाजी आंगरे यांचा निरोप घेऊन गेला. तो रेवदंडियास नव जातां परभारा उंदेरीस गेला. मानाजी आंगरे याणी समजाऊन आणावयास दोन गलबतें माघारी पाठविलीं परंतु आला नाहीं. उंदेरीहून मुंबईस सांगोन पाठऊन तेथून आरमार आणून मुंबईस गेला. जनचर्चा, कोणी म्हणतो रुसवा करून गेला. कोणी म्हणतात बिघाड करून गेला, यैसे म्हणतात. तहकीक वर्तमान आलियावरी

लेहून पाठऊन. कलावे याकरितां लिहिले असे. स्वामी कुलाबियास असतां राजश्री संभाजी आगरे याजकडे दोनसे खंडी तांदूळ पाठवावेसा तह केला. त्यास मानाजी आंगरे याणी पाचसे खंडी तांदूळ पाठविले. यास्तव बहुत सामान पाठवितात म्हणोन रुसोन गेला येसेहि लोक बोलतात. कळले पाहिजे हे विनंती.

¶Vasudev Joshi informs the Peshwa that Captain Inchbird, having told Manaji Angria that he was leaving for Revdanda, went to Bombay. It is not yet known what made him change his plan all of a sudden.

No. 175] *[15-4-1737*

श्री

श्रीमंत राजश्री आपा
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक केशव सजणाजी चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत विज्ञापना विशेष. ताा छ २९ जिल्हेज ठाणे मारीचे वर्तमान यथास्तित असे. यानंतर कल्याणाहून ठाणे मारी सिसे गोळ्या घडावयासी पाठविले त्यांजपैकीं वसईस गोळी • १०००० दाहा हजार पाठविली व आजी साइंकालीं पत्र पाठविले कीं जे गोळी तयार असेल ते ठाणियासी हजूर पाठऊन देणे. त्यास जाहाजामध्यें गोळिया येणेप्रमाणें पाठविल्या असेत.

गोल्या बंदुखेच्या कले ८ यकूण	गोल्या जेजाल कले येकूण.	सुाा
सुमार	८३००	१५००

येकूण ९८०० नव हजार आठसे पाठविल्या असेत. सदरी यासी ताकीद करून हजूर मोजदाद देऊन जाब सादर केला पाहिजे. यानंतर राजश्री त्रिंबकपंत मांडवीस सुखरूप असेत. माडवीचा कोट जेर आहे, आणिक तोफ आणून दर्वाजा रोखिला आहे. कालपासोन फिरंगी मार करीत नाहीं. निच्येंत आहे. ताड तोडून दंमदंमा केला आहे. त्याजवर तोफ चढऊन कोटामध्यें गोले टाकितील. सेवेसी विदित होय. मुंबईहून भिवंडीकर सावकार आला तो वर्तमान सांगतो, कीं गोंवियासी जासुदी जाहाज फिरंगियांनी व इंग्रेजानी पाठविले होते ते आले. त्यास विजरेल याण्हें लिहिले आहे, कीं बेलापूर वानरे वेसावे व मढ व जंजिरा मात्र राखणे. जासुदामागें अंतोन कडदीन व हजार माणूस रेनोल रवाना केले आहेत. आजि उद्यां येतील. त्याजमागें इजरेल म्हणतो, आपण येतों. तमाम त्यांची ठाणी व मुलुक तेथ तेथें जासुदी जाहाजें रवाना केली व इंगरेजास

लिहिले आहे, कीं या समई जेथवर तुझ्याने मदत होईल तेथपावेतो करणे. द्रव्ये लोक व आणिक जे साहित्ये वसईस लागेल ते देणे म्हणून लिहिले असे. म्हणोन सांगतात. सेवेसी विदित होये. रात्री मध्ये रात्रीं मांडवीस साहित्ये तोफेस गाडीची चाके वगैरे सामाएन सुतार बुरूड काबाडी ऐसे ताड तोडावयासी दमदमा रचावयासी रातोरात रवाना केले विदित होय. शाकभाजी उत्तमसी मिळत नाही. वाईंगी वोझे १ सुमार २०० दोनसे पाठविली असत. पेशजी तो सोनाले येथील गावगंना सिपाई २०० दोनसे साहेबी करार करून लिहिले, कीं सत्वर पाठवणे. त्याजरून राजश्री त्रिंबकपंती आम्हास आज्ञा केली, कीं लवकर जमा करून पाठवणे, त्याजवरून तो मजकुरी सिस्त करून १० माणूस सिपाई तो मारी पाठविले. जे जलदी करावयाची ते केलीच आहे. २० वीस माणूस पावेतो ठाणे मारी जमा केले असे. तितकेच पुढें रवाना करावें कीं अवघे जमा जालियावर पाठवावे ते आज्ञा केली पाहिजे. विशेष काये लिहिणे. साहेबाचे हस्ताक्षरे पत्राची च्यातकन्याये मार्ग लक्षितो. तेण्हेकरून परम समाधान वाटतें. हे विज्ञाप्ती.

¶*Keshav Sajnaji reports to Chimaji Appa that he has despatched shot and other material as ordered.*

No. 176] [*26-3-1739*

पौ छ २६ जिल्हेज.

श्री

सेवेसी विनंती. इंग्रेजानें तहाचा विचार सांगोन पाठवावा म्हणून लिहिलें, त्यावरून पत्री लिा नये म्हणून त्याचा भला माणूस बोलाविला हा अर्थ लिहिला, त्यास फिरंगी तह इंग्रजाचें हाथें करणार हें तथ्य वर्तमान असिलें तरी त्याचा भला माणूस येईल तो अर्थ स्वामीस विदित होईल आणि मजला ल्याहावें. मग आमचे घराचा विचार करावा लागेल. त्यास बोली सांगावी लागेल. हा विचार दोहो चहूं प्रकारचा आपले जागा करणें लागेल, ते समर्थी सेवकास बोला(ल)वावें माझा विचार चहूंप्रकारचा चित्तांत आणावा. त्यामध्यें परिणामीं येक विचार घडोन येईल. स्वामीचे पदरीं बहुत आहेत. सर्वांचा विचार यैकावा. स्वामीचे चित्तांत करणें असेल तसें करावें. येक दो जागां तहाचा प्रसंग जाला तो स्वामीचे चित्तांत येऊन गेलाच आहे. यास्तव घरचा विचार करून मग त्यासी बोलावें ते ठाव घेऊन पाहतील. त्याचा शब्द रहस्य कळेल. त्यामध्यें इचबर्डे व फिरंगी कर्डेदिन[१] येक विचारें असेत, हा अर्थ चित्तांत असो द्यावा व वसईस इंग्रेज

१ एका पोर्तुगीज नांवाचा मराठी अपभ्रंश. Cardim

येक कारभारी मुंबईकराचा आला होता, त्यास कडदिन याणें जोमाची ? गोष्टी सांगितली की गनिम काये आहे, यैसें लौकिक आहे. मग अंतस्तें काये सांगितले हें न कळे. जनवार्ता मुंबईचीच आहे. हें विज्ञापना.

¶*The letter recommends caution to be observed regarding the negotiations that the Portuguese had opened with the Peshwa through the English.*

No. 177] [*29-3-1739*

पौ छ १ मोहरम.

श्री

श्रीमंत राजेश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक खंडो योगीराज साष्टांग नमस्कार विज्ञात. येथील कुशल चैत्र शुध्र प्रतिपदा मुा मांडवी येथास्तित असो. राजश्री रायाजी शंकर यांबा आज्ञापत्र सादर कीं मुलकास कोल दिल्हा आहे. रयेतीस उपद्रव न देणे. रायाबा जेथे चौकी सांगतील तेथें खबरदार राहणे. त्यास रायाबांनी जेथें सांगेतलें तेथेच खबरदार आहो. येक खाडीच्या नाक्यावर व येक गोपालपंताच्या मोर्च्यावरी यैशा दोन चौक्या चालीसा राउताच्या आहेत व आमचे जेथ मुकाम आहे तो मोठा मार्ग येणेजाणे आवाई करून दगा द्यावयाचा नाका आहे. लस्करापुढें तीस पसतीस लोक घेऊन खबरदार जागत बसतो. सेवेसी विदित असिले पाहिजे. रो बयाजी साखरे याचे वर्तमान बालाजी कृष्ण सेवेसी निवेदन करितील तो अर्थ चितात आणावा. बहुत लिहिणे शक्त नव्हे. कृपा करावी हे विज्ञप्त. रयेतीस काडीचा उपद्रव नाही. पूर्वी भात मात्र आणून भक्षिलें तेवढेच. आतां भक्षावयाची बेगमी करणार स्वामी समर्थ हे विज्ञात.

¶*Khando Yogiraj writes how he has disposed his men to guard the passes of the creek and the road.*

No. 178] [*March 1739?*

श्री

विनंति उपरी. राजश्री आपाकडील पत्रे आली. तुमचे नावाचे लाखोटे २ व कागद रा बाबाचा १ यैसे तीन पा आहेत, देवणे व तुमची पहिली पत्रे २ यैसे घेणे. आज प्रात:कालापासून तुम्हाकडील वर्तमान कलत नाही तरी सविस्तर लिहिणे. गनिमाने दम धरिला आहे. त्याचा मुदा मनास आणून लिहिणे.

आरमार बंदरामध्ये आहे की गेले हे कळत नाही तरी लिा. रा लाडोबा राऊत घेऊन भोजण न करून तुम्हाकडे आले आहेत त्यासी सध्याकाली पाठऊन देणे. आमच्या पत्रामध्ये विशेष नाही. तुमच्या पत्रामध्ये विशेष असिले तरी आम्हास लेहून पाठवणे. रा भगवंतराव आशेरीहोऊन काल येथे आले. आज तुम्हाकडे आले आहेत. त्याणी राऊत आणिले आहेत त्याजविसी राजश्री येजमानाचे पत्र तुम्हास आहे. तरी राऊत घोडे पाहून करार करावयाचे ते करणे. आपले सविस्तर लिहिणे. +गनिमाने दम धरिला आहे. अवेल पाहोन येईल. खबरदार राहणे. बहुत काये लिा लोभ असो दीजे हे विनंति.

¶*The writer asks the addressee to be on his guard as the enemy is holding out doggedly. Bhagwantrao joins Vasudeo Joshi.*

No. 179] *[March 1739*

श्री

आसीर्वाद उपरी. राजश्री मानाजी आंगरे उरणास लागले आहेत. त्याचे पत्र आपणास आले होते त्याची नकल पाठविली ते पावली. सारांश त्यास स्थळ हस्तगत जाहाले नाहीं. येत्नात आहेत. कदाचित त्याणी हस्तगत केल्यास स्थलाचा पर्याये आपणांस पहिला लिहिलाच आहे. मानाजी आंगरे कुलाबा बोलावीत नाहीत. तेव्हां फौज इकडे पाठऊन देऊ म्हणून लिा तरी उतम आहे. तिकडे प्रयोजन न लागल्यास इकडे पाठविली पाहिजे. वरकड त्याजपासून स्थळ आपले हवाला करून घ्यावयाचा विचार पहिला आपणास लिहिला आहे, तदनुरूप विचार करून स्थळ आपले हवाला होये ते केले पाहिजे. लोभ[१] आसो दीजे हा आसीर्वाद.

¶*Bajirao instructs Chimaji Appa to demand Uran from Manaji Angria who, in the hope of being able to capture the same, had laid siege to it.*

No. 180] *[March 1739*

श्रीगणपति

सेवेसी विज्ञापना. स्वामीनी चिठी पाठविली ती पावली. तों इतकियांत ओहट वळला; त्यास आज्ञेप्रमाणें मोरोजी शिंदे व शंभर माणूस दरवाजियाचे वाटेनें कोटांत पाठविलें. फिरंगीयांचीं गलबतें धारावी नजीक आलीं तर स्वामीनी आज्ञा करून फिरंगी लौकर पाठविला पाहिजे. बनाजी कदम याजकडील जासूद आला,

---

\+ अक्षर येथून वासुदेव हरीचें. १ येथून अक्षर खुद्द बाजीरावाच.

फिरंगी आज्ञा करून सत्वर पाठविला पाहिजे. वरकड आज्ञेप्रमाणें बुरजावरील व बाहेरील बंदोबस्त केला आहे. राजश्री संकरीपंतहि आज्ञेप्रमाणें बंदोबस्तास मेढियाकडे गेले. दुसरे शंभर माणूस कोटांत मांडवीजवळ संकराजीपंत गेलेवर पाठवितील. शेवेसी श्रुत होये. हे विज्ञापना. प्रात:काळी निशाणें गोटांत आणावयाची लगट राजश्री मलारबा करितात, यास आज्ञा केली पाहिजे. हें विनंती.

¶*Chimaji Appa is informed that his instructions have been executed as regards posting men at vulnerable points.*

No. 181] *[1-4-1739]*

छ ३ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री आपासाहेब
साहेबाचे सेवेसी

जाबसूद.

आज्ञाधारक केशव सजणाजी चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत विज्ञापान विशेष ताा छ ३ माहे मोहरमपावेतो ठाणे मजकूरचे वर्तमान यथास्थित असे. उमर नाखवा याजबराबर जहाजे घोडबंदरास रवाना करावयाची आज्ञा जाली होती, त्यास रात्री जहाजे ५ पांच पचतीस सफरी+ देऊन रवाना केली. विदित जाले पाहिजे. पेशजी गौली यांच्या म्हैसी काा मारी आल्या आहेत. गौली काा मारी घरे बांधितात. म्हैसीस वाडे ताा सोनाले मौजे अलखवलीस निमे म्हसी व मौजे वलसणे येथे निमे ठेवितात. हेविसी जमीदारास ताकीद केली आहे, की हरदुगावांस जागा देणे आणि कोण्हे गोष्टीची तोसीस गौली माारास न देणे म्हणून सांगितले आहे. सेवेसी विदित होये. बुरडीव तीन पाठविले असत हे विज्ञाप्ति[१].

¶*Keshav Sajnaji writes to Chimaji Appa that he has acted according to instructions and dispatched ships to Ghodbandar.*

No. 182] *[2-4-1739 ?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना ताा छ ४ मोहरम राजश्री पिलाजी जाधवराव सुभेदार यशवंतगड पाहावयासी आले होते. यक दिवस किले मारी राहून आजच छ मजकुरी वसईस

+ सफरी = सफर करणारा = A sailor. १ पत्राच्या पाठीमागें मोती देवळाचा नकाशा आहे.

गेले. समागमे राजश्री शंकराजीपंतहि आले होते. स्वामीस कलावे यास्तव लिा आहे. किला इमारत सारी पाहिली. साष्टीस पुढे येणार असत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The Peshwa is informed that Pilaji Jadhav inspected the fort of Yashwantgad.*

No. 183] [*3-4-1739?*

छ ७ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक शंकराजी केशव कृाा साा नाा विा. येथील कुशल ताा छ ९ माहे मोहरमपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विा. स्वामींनी पत्र पाठविले की रामजी सुर्वे यास जखम लागली ते बांधावयास तबीब पाहिजे. त्यास रा पदाजी कारके याजकडे भोरपकर, सिपाई आहे त्यास पाठवणे म्हणून लिा. त्यास त्याचा समाचार घेतला. त्यास रा पदाजी कारके यांणी सागितले की तो काही तबीबी जाणत नाही. याकरिता त्यास पाठविला नाही. त्यास काही बरेहि वाटत नाही. यास्तव राहिला. आणि तैसाच पाठवावयाची आज्ञा होईल तरी त्यास पाठऊन देऊन. विदित जाले पाहिजे * शाजी जासूद याज बाा निरोप पोा रवाना केला आहे, त्याचा निरोप पाठविला तो पावला त्या प्राा असो. हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav informs Chimaji Appa that he regrets that he has no surgeon in his camp whom he can send to dress the wounds of Ramaji Surve.*

No. 184]

छ १९ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंति. सेवक शंकराजी केशव कृाा साा नाा विा. येथील कुशल ताा छ १४ मोहरमपर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामी दो चौ दिवसी येथे येणार म्हणून वर्तमान यैकिले. याकरिता हे पत्र पाठविले आहे. तरी

5727

स्वामीनी येथे फारसे स्वार समागमे न आणावे. तीन च्यारसे स्वार आणावे, फार न आणावे. मग स्वामीसमागमे स्वार पाहिजेत त्यास येथून पाचसे सातसे स्वार मांडवीपुढे पाठऊन देऊन व स्वामी भिवंडीस स्वामी आलियावरी पा. साये-वान येथे गावोगावी स्वार रखवालीस पाठवावे. नाही तरी फौज आलियावरी रयेतीस उपसर्ग लागलियास सदीस येक येक दोन दोन गावगना कुले आली आहे ती ती उठोन जातील, वस्ती नाहीसी होईल, याकरिता लिा असे. स्वामी येणार तो अगोधर येक दोन दिवस लेहून पाठवावे. विदित जाले पा * सारांश दोनसे स्वार समागमे असिले तरी कार्यास येईल. येथून मांडवीस पाचसे पुढे पाठऊन देऊन. दाणा मिलत नाही. येथीलच लोक उपासी मरतात. दाणा विकावयास येत नाही. हा येथील प्रसंग आहे. येकवीस हजार देविले तेहि येत * * * ज्यास पैका पावला नाही, ते येऊन म्हणतात की पोटास दाणा नाही, पैका नाही, पोट दाखवितात. देखला विचार लिा असे. विका-वयासी दाणा यो येत नाही. दोन तीन दिवस सा सेर मिलाले, आता तो नाहीच. फार ल्याहावे तरी नित्य लिहितोसे होते. कोठीपैकी दाणा देऊन आठ दिवस लोक अन्नास मिळविले. आता येथे कोठीस पनास खंडी भात आहे तेहि वेचले म्हणजे पुढे श्री आहे! येकंदर कल्याण भिवंडीचे बैल येत नाहीत. चालिसा रुा मुडा भात विकू लागले कल्याणास, मग येथे कशास येईल? सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Shankraji Keshav advises Chimaji Appa he should bring with him only a small number of cavalry as the ryots are already too much distressed to bear any further molestation. The writer fears a shortage of food in his camp and asks the addressee to take steps to send a large quantity immediately.*

No. 185] [*4-4-1737*

श्री

राजश्री आपा साहेबाचे
सेवेसी

॥ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सिदोजी राऊत सां दडवत विनंती. उपरी, येथील क्षेम ताा चैत्र वद्य प्रतिपदापर्यंत मुाा प्रांत नवीसराये+ येथे आपले कृपेकरून समस्त सुखरूप असो. यानंतर कृपा करून पत्र पाठविले तेथें कितेक वर्तमान लिहिलें ते कलो आले. येसियासी

+ खोडाखोड असल्यामुळें अक्षरें नीट लागत नाहींत.

इकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री रायांनी लिहिलें त्यावरून विदित होईल विशेष. आपली कोकण प्रांतांत स्वारी आली आहे. त्यास तेथील विचार हरकोणास सांगोन फौज ठेवणें. आपण खासा न राहाणे. आपले शरीर अशक्त आहे. कोकण आपले शरीरास मानणार नाहीं. आपले शरीर शाबूत असिले तरी अवघा प्रसंग उतम आहे. याकरितां खासा आपण कोकणांत सहसा न राहणे. बहुत लेहावे तर स्वामी सर्वज्ञ आहे. कृपावृधिते पावविली पाहिजे. हे विनंती.

हा श्री नागोजी राऊत सां दंडवत.

¶*The climate of Konkan being notoriously unhealthy, Sidoji Raut entreats Chimaji Appa not to make a long stay for the Bassein campaign in person but to appoint somebody else to conduct it.*

No. 186] *[27-4-1738?*

पो छ २१ मोहरम

श्री

सेवेसी आजी छ १८ मोहरमी वसईचे जुवातून[१] किरीस्ताव चौघे कबिलासुद्धा आले त्यास वर्तमान पुसले. त्यांणी सांगितले कीं कडदीन गेला व धान्य रुपयाचे दोन पायल्या चौसेरी आहे. लोकहि मरतात. कडदीन समागमे दोन तीनसे माणूस गेले व बोलीजकर फिरंगी मरतिन सिरवेलचा नातेलग भाऊच होता. त्यास बोलींजगांव व जहारी होता ते मयत जाला व मुंबईहून उदमी आले त्याणी सांगितले, कीं मरतीन सिरवेल कबिला सुद्धा गोव्यास गेला. फिरंगियासी खर्चावयास यैवज गोव्यातून आला म्हणून वर्तमान सांगितले. त्यास फिरंगियाकडील लोक अजारी फार पडले आहेत म्हणून सांगतो, व रयेत खलक जुवांत आहे ते यावयासी रजावंद आहेत. परंतु खाडीचा गुंता पडला आहे. येता येत नाहीं म्हणून सांगतो. चौघे किरीस्ताव कबिलासुद्धा आले ते कैवर्तकाचे हाथे उतरले. विदित जाहाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*News received from Bassein, that Antonio Cardim and Martino De Silveira have departed for Goa and that there is widespread distress in the garrison, is communicated to Chimaji Appa.*

---

१ लहानशी खाडी; an inlet.

No. 187] [23-4-1739?
[15-5-1737?

श्री

राजश्री रामाजी माहादेव
गोसावी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो कान्होजी माणकर रामराम विनंती उपरी. विशेष पील ठाकूर भाईदरकर मुंबईस जात होता तो सीवचे तरीपावेतो गेला होता. पागडीवाला इकडील कोन्ही तरींवर न्यावयासी इंग्रजाने मना केले असे, सा तो तेथे खोटी होता. त्याचा सोइरा किरीस्ताव माहिमास आहे त्यास वर्तमान कलल्यावर तरीपावेतो निघोन आला. त्याणे सांगितले की इंग्रजाने आरमार सिध केले असे. इंग्रेज व पगडीवाले तेरा हजार माणसांची बोली असे. आरमार सिध करून कोन्हीकडे जाईल हे नकले. परंतु ठाणेयाचे किल्याचा इरादा क्यासावरून दिसोन येते. आरमार जाणार यास्तव इकडील लोक मना केले असत. हे वर्तमान पील ठाकूर येऊन येथें जाहीर केले. त्यावरून हे वर्तमान तीर्थस्वरूप बावास लेहून पाठविले असे. तुम्ही किलेयाची बंदोबस्ती करून जागा खबरदार राखणे. बहुत काय लिहिणे रा छ २९ माहे मोहरम हे विनंती.

¶*Kanhoji Mankar writes to Ramaji Mahadev communicating the news of the hostile preparations of the English of Bombay and cautions him to be vigilant at Thana.*

No. 188] [17-5-1737?

श्री

नकल पत्र

राजश्री कमावीसदार भिवडी गोसावी यांसी

सेवक चिमणाजी भीवराव व संकराजी केशव नमस्कार व आशीर्वाद उपरी. छ २६ मोहरमी मध्यानरात्रीस वसईहून फिरंगीयाचे लोक दिवट्या लाऊन गलबतांत चढोन काळोखाचे कोण्हीकडे गेले हे नं कळे. तरी तुम्ही बहुत खबरदार राहणें. गोंवियाहून कडदीन आला आहे हे वर्तमान तथ्यच. आमच्या लोकानी पाहिला आहे. कदाचित तिकडे येऊन लबाडी करील. तुम्ही खाडी किनारियावर दिवा, दिवेयाचे डोंगरीवर व कारवलीवर दोन चार चौक्या ठेऊन खबरदार राहणें. तो इकडून अगदीच टाकून लवकीक संपादावयासी हा विचार करील तरी बहुत खबरदार राहणे. जाणीजे. छ २७ मोहरम. हे विनंति.

¶*Chimnaji Bhivrao and Shankaraji Keshav warn the Kamavisdar of Bhiwandi to be on his guard against a sudden attack from the Portuguese Commander Antonio Cardim Froes who is reported to have arrived from Goa with succour.*

No. 189] [20-5-1737

श्री

छ १ सफर

श्रीमंत राजश्री आपासाहेब
साहेबाचे सेवेसी

जावसूद

आज्ञाधारक केशव सजणाजी चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत विज्ञापना विशेष. ताा छ ३० मोहरमपावेतो ठाणे मारीचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर छ मार दोन घटिका दिवस असतां मणोराहून राा बरवाजी पाटील यांजकडील शेखजी बारगीर आला. त्याणी वर्तमान सांगितलें की काली छ २९ रोजी दोन प्रहरा मणोरचे कोटातून पोबरू कपितान व कारकून बाहेर येऊन लाऊन घेतला. त्यास पोबरू मार यासी आपले लस्करांत ठेऊन कोटांतील कबिले व लोक काढावयासी त्यांचे सिपाई पाठविले व राजश्री आवजी कवडे व बरवाजी पाटील कोटाचे दरवाजियासी लोक काढावयासी गेले. इतके वर्तमान जालियावरी सेखजी इकडे निघोन आला. याजमागें निशाण कोटास चढले असेल. सेवेसी विदित व्हावे म्हणून लिहिले असे हे विज्ञाप्ती.

¶*Keshav Sajanaji communicates to Chimaji Appa that the flag of the Marathas is hoisted on the fortress of Manor.*

No. 190] [April 1739?

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री पिलाजी जाधवराऊ याच्या घाटा २ दोन जंजिरे आरनालियास होत्या. त्या गलबतावरून वसईच्या चौकीवर आणून ठेविल्या आहेत. त्या पुढें पाविल्या पाहिजेत. याकरितां गलबत कोण्हाचे जात असेल त्यावर चढऊन राजश्री बरवाजी पाटील याकडे पावीत होत येशा करविल्या पाहिजेत. हे विज्ञापना.

¶*The writer sends two bells obtained from Arnala, and requests that they may be forwarded to Barwaji Patil.*

No. 191] [July 1737

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री
आपा स्वामीचे सेवेसी

विनंति बाहादुरपुन्यास मोर्चे बसवावया * * * माहादाजीपंत व खंडो चिमणाजी * * * * गमे लोक रा केले. आण आम्हा * डे * * * स गेलो मागे फौजनसी हरदूजण जा * * * * * फिरंगियानी से सवासे माणूस बा(हादर ?) पुन्यावरी नाके पाहून बसविले तो पु * * मुटे गेले त्यावरी त्याणी चालोन घेतले. मग * * उभयतानी चालोन घेतले. पुढे गणोजीराव बुरूडकर व येसवंतराव येरूडकर व को * * * ट करी दाहा पाच माणूस कृष्णाजी * याकडील दोन च्यार माणूस व खंडो चिमणाजी व माहादाजीपंत यैसे पुढे चालोन जाऊन अरखंदाजीचा मार खाऊ * * * दा मार करीत वसईच्या कोटापर्यंत गो(लीच्या) मान्यावरी किल्यावरील मार खाऊन पां * * * केले आण माघारे बाहादुरपुरिया * * * उभयतानी मोर्चेबंदी केली जे जा * * * यावरी मोर्चे बसविले आहेत *. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶[*This is an ant-eaten but important letter which describes an engagement between the Portuguese at Bassein and the detachment of the Marathas posted at Bahadarpura.*

No. 192] [April 1739

श्री

सेवेसी विज्ञापना. गुणाजीराऊ माहूलकर पुढे आम्हासमागमे पुढें आले. याचा मोर्चा आमचे सेजारीच आहे. याजसमागमें लालखानहि आहेत. त्यांतील लालखानाकडील भला माणूस गोळी लागोन मयेत जाला व गुणाजीरायाकडील दोघे भले माणूस जखमी जाले. तरी जखमी यांस खर्चास व मयेतास वस्त्र देवावयासी आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. दारू गोली पाहिजे. देवायासी आज्ञा केली पाहिजे. हे विज्ञापी.

[*Chimaji Appa is informed how the siege was progressing.*

No. 193] [After 4-5-1739

श्रीशंकर

राजश्री चिमणाजी पंडित
प्रधान गोसावी यांस

सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री सुलतानजीराव निंबालकर दंडवत विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. गोसावियानी पत्र पाठविलें तें उत्तम समई प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाला. तेथें लिहिलें कीं वसई जागा बाका, त्यास मोर्चेबंदी केली. सलाबत कुचे खाणून मोर्चे कोटाजवळ नेले. धमधमे बांधले. सुरंग लाऊन बुरूज उडविले. फिरंगियाचें व आपल्या लोकाचें युध जालियाचें वर्तमान कितेक विशदें लिहिलें. किला फते करून ठाणें बसविलें म्हणून संतोषाचें वर्तमान लिहिलें तें आक्षरशाह श्रवण होऊन बहुत संतोष जाला. बहुत उत्तम गोष्ट जाली. आजि तागायत श्रम केल्याचें सार्थक श्रीनें केलें. इकडील वर्तमान तरी नवाब नासरजंग व आम्ही भागानगरीहून कूच करून मजल दरमजल सिंदखेड परगणियांत जाफराबादेसमीप येऊन राहिलों आहों. गोसावी यांस कलावें म्हणून लिहिलें असे. बहुत काय लिहिणें कृपा असों दीजे हे विनंति

¶Sultanjirao Nimbalkar sends his congratulations to Chimaji Appa on his brilliant victory at Bassein. He also writes of his arrival at Jafarabad along with Nasirjang.

No. 194] [13-5-1739

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्रा नाना यांसी चिमणाजी बलाल आसीर्वाद उपरी बा। देणे कारकून कापड.

८७	दि॥ सटवोजी सावंतराव
३०	दि॥ सिदोजी सावंतराव
११७	

येकून येकसें सतरांचे देविले असे. सनगावरील आखांची चौपटी प्रो देणे. रा॥ छ १५ सफर सु॥ तिसा सलासेन मया व अलफ हे आसीर्वाद.

¶Chimaji Appa writes to Balaji Bajirao to distribute clothes valued at Rs. 117 to Satwaji and Sidoji Sawant.

5733

No. 195] [25-6-1739?

श्री

चिरंजीव राजमान्य राजश्री बालाजी बाजीराऊ यासी बाजीराऊ बलाल प्रधान आशीर्वाद यथील कुशल ता। छ २९ रावल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. प्रा। कल्याण भिवंडी हा जिल्हा राजश्री कृष्णराऊ महादेऊ याजकडे होता तो दूर करून हली तुम्हास सांगोन पाठविले असे. सुभे व महाल बी तपसील :—

सुभे

१ सुभा कल्याण

१ सुभे भिवंडी

१ प्रांत जुन्नर देखील सात महाल मावळे

३

महाल

१ ता। पौडखोरे

१ ता। नाणेमावल

१ ता। पौन मावल गाव २८

३

सवंस्थान

१ रामनगर

१ जवार

१ वासंदे

१ पेठ

४

महालानिहाये जकात नावनिसी आलाहिदी असे दो। वरघाट तलघाट

बंदरे

१ कल्याण

१ भिवंडी

१ पेण

१ पनवेली.

४

येणेप्रमाणे मामला तुमचे स्वाधीन करून पाठविले असे. मामला करून दिवाणचा ऐवज पावता करणे. जाणिजे छ २९ रावल. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे आशिर्वाद.

¶*The Peshwa Bajirao appoints his son to the management of Kalyan and Bhiwandi divisions.*

5734

No. 196] [25-6-1739 ?

श्री

राजश्री पंत प्रधान गोसांवी यासी

ᘚ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजी जाधवराऊ कृतानेक विनंती येथील क्षेम २९ रबिलौवल जाणून स्वकीये कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. प्रस्तुत आपला मुकाम कोणे स्थळीं आहे, कोणते घाटे उतरणार, कोणता सुमार तो लिहिला पाहिजे, त्यासुमारे आमची फौज येईल. चिरंजीव आपा अजी घाट चढोन येतील. सोमवारी प्रतिपदेस येथे येतील, ते व आम्हीं बराबरीच आपले भेटीस येतो. भेटी जाहाल्या उपरी निरोप दुसरे दिवसी दिल्हा पाहिजे. येथून येताना मुलेचे काठे भिवरेस येऊन भिवरेचे पाण्यानें नरसिहपुराजवळ येतो. दुसरे पाणी नाही. चाऱ्याची अडचण तो फारच आहे. कोंकणचे घोडे फारच जबून जाहाले आहे. उंटहि चालो सकत नाहीसे जाहाले आहेत. तैसेच ढकलीत आणितों. आपले उत्तर येईल ते स्थली येऊन पोहाचतो. विशेष काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Pilaji Jadhav makes inquiries about the Peshwa's whereabouts and wishes to know where he should join the latter's army.*

No. 197] [14-7-1939

श्री

श्रीमंत स्वामीचे सेवेसी

अर्जी

सेवेसी आज्ञाधारक कोली मौजे नागावी जबानी जीव पाटील व वालो पाटील सुाा आर्बैन मया व अलफ छ १८ राखर.

पहिला टोपीकराचे वेलेस मौजे मजकुरास गलबत थोर तेरा चालत होती. दर गलबतास दिवाणचे देणे सरकारात रुा ७० देत होतो. दरगलबतास गोहो[1] सुमार ९ दरगलबतास डोली[2] ४ येकूण देणे देत असो कलम १

हली गावांत गोहो दाहा गलबताचे आहेत. दरगलबतास गोहो ९ येकूण

आम्हास भात खावयासी खंडी ३ तीन द्याव्या. त्याची निरख आज खंडून दिला पाहिजे. रुा देऊन. कलम १

(1) A tax on corn (?) (2) A tax on fishing.

गोहो ५० पनास गलबत आम्हाजवळ
आहेत सुमार ९ आहेत. बाकी आमची
गलबते येणेप्रो.

२ जंजिरे आरनालियाची आहेत

३ मुंबईस

२ म्होटी

२ लहान

―――

४

―――

६

येणे प्रो सरकारात गलबत आहेत, कृपाळु होऊन देविली पाहिजेत—

कलम १

डोलीचे मेढे लावयासी लाकड हेदीची व कलबाची पाहिजेत १२० येकसे वीस देवावी कलम १

येकूण ४ कलम लिहिली आहेत, ती साहेबी आम्हावर नजर देऊन कौल दिला पाहिजे. हे विज्ञाप्ति.

¶*The Kolis of Nagoan present their claims to Chimaji Appa after the territory was conquered by the Marathas. This paper mentions those claims.*

―――

No. 198] [*14-7-1739*

श्री

श्रीमंत स्वामीचे सेवेसी

अर्जी

सेवक आज्ञाधारक कोली मौजे बहादरपूर जबानी मुगपाटेल व पोबरू पाटेल सुा आर्बैन मया व अलफ. छ १८ रबिलाखर

पहिला टोपीकराचे वेलेस मौजे मजकुरास गलबत अठावीस चालत होती. दरगलबतास दिवाणचे देणे सरकारांत रुो ७५ देत होती. दरगलबतास गोहो ९ प्रो सतरा गलबताचे हली असत.

कलम १

डोलीस लाकड हेदीची व कलंबाची लाकड सुमार २०० पाहिजेत. देवावी.

कलम १

आम्हास भात खावयासी खंडी १२ बारा खंडी देवाव. कलम १

हलीं गावांत गलबत आहेत सुमार
१२ बाकी सरकारात गलबत.

२ जंजिरे आरनालियासी
१ वाघवलीचे बंदरी
२ मुंबईस
१ वसईचे बंदरी

६

येणे प्रा॥ सरकारात आहेत. देवावी
कलम १

येकूण ४ कलम लिहिली आहेत. येणेप्रमाणे कृपाळु होऊन देवावी.

साठे बहादूरपूरचे येणेप्रा॥ पाहिजे.

काल्याजवळील मासली घेऊ नये. त्याचा दरमाहा यासी बेसन सरकारात रुा॥ द्यावे.

१॥ बत्यावे
१॥ मेणू
१॥ धर्मा
१ पका
१ धर्मा
१ जुज्या
१ आके
॥ डिमा.

९

येकूण दहा रुा॥ असत कलम १

॥ त्राके
॥ मणू

१

आम्हास भात खावयास खंडी १॥ पाहिजे देवावे. कलम १

¶*The Kolis apply to the Peshwa for their rights and claims in Bahadarpura.*

No. 199] [*1739?*

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री नारो तुकदेव खुषकीनें जे दिवसीं वसईस आले तेच दिवसीं सोलचिल्हीचे (?) जाहाज वसईस आणिलें. वकील व तनाखियाचा

यैवज येकच दिवसी दाखल जाला. स्वामीचे पुण्याचा प्रताप आगाधी आहे. विदित होय. हे विज्ञापना.

¶*A writer communicates to the Peshwa that Naro Tukadeo and the paper of assignment on the revenues reached here at Bassein on the same day.*

No. 200] [*1739 ?*

श्रीशंकर

चिरंजीव विजई भव राजमान्य राजश्री आपास

कृतानेक आसीर्वाद. येथील क्षेम जाणून स्वकीय कुशल लखन केले पाहिजे विशेष. चिरंजीव राजश्री गणबा तुम्हापासून आले ते शनवारी त्रितीये प्रहरीं आले. भेटी जाहली. सविस्तर वर्तमान कळलें. येसियास तुम्ही तांतडीने कूच दरकूच जातां. आमचे चिती तुमची भेटीचा हेत बहुत होता. परंतु तुमचाच तातडीकरितां जाहली नाहीं हेत राहिला बरे. श्रीदयेनें स्वारी फते करून याल, तेव्हां आगत्य भेटी घेऊन याच मार्गे जावयाचा विचार करणें. वरकड ईश्वरदयेने स्वारी फते करून पैकाहि बहुत आणाल त्यास आमचे स्मरण उचित असेल ते केले पाहिजे. वरकड जे होणे ते होईल, परंतु भेटी होय ते येतात्रलेस करणें. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे आसिर्वाद.

¶*Naro Ram expresses regret at having missed a visit from Chimaji and wishes him success in his undertaking.*

No. 201] [*1739 ?*

श्री

पुा श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. स्वामीकडील चाकर लोक पलोन आले आहेत त्यास न्यावयास व त्याची माणसें किल्यावर घालावयास स्वामीकडील कारकून आला आहे. येशास फिरंगाणचे मसलतीपासून जे चाकर आहेत त्याचे जामीन घ्यावे. कबिले किल्यावर घातल्यास गाव जातो. गावांत तो येक दोन घरे आहेत ती गेली म्हणजे गांवची कीर्द अगदीच जाते. याकरितां त्यास जामीन साखली घेऊन चाकरीस न्यावे, व कबिल्यास गावावरीच राहावयास आज्ञा केली पाहिजे; व पेशजीपासून कोणी गरीबगुरीब चाकर होते त्यासहि उपसर्ग लाविला आहे, तर त्यास उपसर्ग न लागे ते केले पाहिजे. येविसी जे आज्ञा होईल त्याप्रो

5738

वर्तणूक करून. लोकांची रांडा पोरे किल्यावर घातलियानें त्याचे बाईदादरे (?) कीर्द बुडोन उपवासी मरतील. गाव उव्दस होतील. याजकारणे चाकरीस नेऊन जामीन साखली करावयाची आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. •फिरंगाणचे मसलतीस जे चाकर होते त्यास मात्र न्यावें. यापूर्वी चाकरी टाकोन बैसले आहेत, त्यास तगादा करावा येसे नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer represents to Chimaji Appa to discharge the deserters, who had been arrested and imprisoned on forts, as their confinement would ruin the cultivation of land.*

No. 202] [*1734-35?*

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराव माहादेव कृा सा ना विनंति येथील कुशल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पा विसेष. आम्ही आजी गुरुवारी कल्याणास आलों. इकडील वर्तमान पश्चमेकडील पाहाता सर्व ठीक आहे. * * आधिकारियाचे नावे सर्व रुदंती करितात की * * * कबिलासुधा मातबर माणूस गोमांतकास गेले, हा परम दुष्ट आहे, हिंदूचे दर्शन कार्यास न ये. सर्व बंदोबस्त मुख्याचा मात्र आहे. परंतु दिवसास अंधकार आहे व आजीचा प्रसंगहि उतम आहे. लागभागहि ठीक आहे. आणखीहि दुसरे ते प्रांतीचे कितीक मातबर माणूस व कोळी व भंडारी आम्ही ठीक करून आपले करून ठेविले आहेत. स्वामी आज्ञा करितील तर मुख्य स्थलाचा कारभार आम्ही आमरावतीहून उरकून येविसीचा * * * आर्थ सांगोन आपणाकड बुबाजी नाईक रवाना केले आहेत, हे विदित करितील. त्या प्रो कार्य करणे असेल तर सिधता करून पाठविली पा. नाही तर आम्ही घाटावर येऊन. प्रस्तुत आम्हाजवळ जमाव पाईचा पाचसेपर्यंत आहे. स्वामीचा जाबसाल येई तोपर्यंत आम्ही साष्टीकडील चालून पाहातों. जर कार्याची गरज असेल तर सर्व साहित्यें करून पाठविली पाहिजे. वरकड इकडील वर्तमान सविस्तर मशारनिले मुखवचनेंकरून सांगता कळो येईल. बहुत काये लिा कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विज्ञापना. पत्र वाचून फाडून टाकणे. कोणास दाखवाल तर माझी आण से. हे विज्ञापना.

¶*Krishnaji Mahadeo reports to the Peshwa that the ryots of salsette districts are harassed by the Portuguese and ready for revolt.*

5739

No. 203] [1739 ?

श्री

सेवेसी विनंती. काा मालाडामधे केसवजी म्हणऊन पांचकलशा होता. तो मोठा शाहाणा म्हणून त्याचे हवाले गाऊस (?) करणाराहीं केले होतें. तो फिरंगियास भेदून तांदुल मुडे ११ व सरा यैसे वसईचे कोटास पाठविले. ते गोष्टी कोठे फुटली म्हणून पलोन गेला. याचा भाऊ * * * तोहि पलोन गेला. त्या केसवजीने दिवानचे भात घरोघर घातले होते ते बितपसील.

मौजे पाहाड	मौजे पाहाड
फरसी दलंगभार (?) याचे घरी मुड	अनतोन आस याचे घरी मुड
६॥=	५॥
	मौजे गोरेगाव येथे भात मुड
	१२

¶*This letter informs that one Keshavji of Malad, who was secretly providing the enemy with rice, disappeared when his crime was brought to light.*

No. 204] [June 1738 ?

श्री

सेवेसी विनंती. स्वामीनी रा गोविंदपंतासमागमे सांगोन कितेक विचार पाा. त्यास दवणेकडील विच्यार दोन च्यार सांगितले. त्यास सारांश दवणेकडील विचार पाहाता राउताचीच फौज लुटावयास पाठविली तरी त्यास त्यांचा हाथ (हात) पावेल तितकाच मुल्लुक जालितील, गुरे नेतील हा येक विचार. दुसरा विचार राऊत येक हजार व माणूस येक हजार पाठविले, तरी येक मास राऊत राहातील. मग येका हजारा माणसानी ते प्रांती राहावे. त्याणीच तो मुल्लुक सारा दडपणार नाही आणि रयेत मात्र लुटितील हा दुसरा विचार. तिसरा विचार आम्हाकडील लोक प्रस्तुत पाठविता येत नाही, काम चालते त्यासहि खोलंबा होईल. केवल तो प्रांत लुटलियानेच जेर होतो यैसे नाही. आमचे विचारें त्या प्रांतास जावे तेव्हा जसा वसईचा आगर आपले वलणात आणून त्याचा इलाज चालेनासे केले, तसे त्या प्रांती करावें, तरीच फिरंगी परदेसी होऊन जसी आगरची रयेत पाठीसी घातली तसीच घालावी. रयेत लबाडी करील तरी तीस धास्त घालून ठिकाणी लाऊन आपलीसी करावी. परंतु हा विचार आजी होत नाही. अडीच हजार माणूस असावे. येका मासाची अडसेरी व इस्ताद श्रावणमासी अथवा भाद्रपदमासी घेऊन जावे आणि येक दोन ठाणी घालून बसोन मजबूद करावी. त्यास सरदार तरतुद्या

5740

व धाडसी पाहून ठेवावा की घडीघडी त्याची धास्त वाहावी. नलगेसाच माणूस ठेवावा म्हणजे ते प्रांती नक्ष होऊन मुलूक आपला करावा. आजी लुटिला मुलूक तरी उद्या आपणच खोरी (?) व्हावे. पिकाचे पूर्वी जाऊन बसले तरी दाणा गला खंडणी घ्यावयासी कार्यास येईल. येणेकरून किफायेत होऊन रयेत धान्याचे मायेस गुंतोन सहजेच आपली होईल. त्यास दुसरियासी सांगितल्यास होईल तरी उतमच आहे. नाही तरी मीच श्रावणमासी जातो आणि दवण प्रांत सुरळीत करितो. दवणेच्या उरावर ढासण करून मुलूक घेऊ. परंतु आषाढ सरतां श्रावणमासी करावे म्हणजे आजीपासून सिबंदी खर्च लागणार नाही. लोकहि पुढे मिलतील. कदाचित स्वामी म्हणतील की आम्हास जावयासी कसे फावेल? तरी बहादरपुरचे ढासण चौदा हात उंच केले, बारा हात रुंदी केले, तोफा वरत्या बसल्या, सर्व सामान व तीन साडेतीन हजार माणूस ठेविले. येक मातबर सरदार रा। मोराजी सिंदे ठेविल्यास मग चिंता काये आहे? येक वेल सेवक दवण प्रांती गेला म्हणजे कोण्ही कोलीनाली व दवणी रयेत कैदेत आणून जफ्ती होईल यैसे दिसते. विनाश्रम केलियावाचून जफ्ती होत नाही, हा विचार आमचे मनी आहे. त्यास स्वामीचे चितास येईल तो करावा, सेवेसी विदित होये हे विज्ञापना.[१]

¶Shankaraji Keshav suggests a plan of attack on Daman—similar to one that was adopted at Bassein. He also proposes to increase the strength of the fortifications of Bahadarpura and appoint Moraji Sindia there.

No. 205] *[1739?*

श्रीराम

राजश्री चिमणाजी पंडित गोसावी यासी

७ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य प्रीतिपूर्वक उमाबाई दाभाडे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांची पत्रे तुम्हास आली आहेत. त्याजवरून सविस्तर कळो येईल. आपण वसईच्या प्रसंगास गुंतोन इकडील मनसबियाचा विचार सोडावा ऐसे नाहीं. याजकरितां तेथील जो बंदोबस्त करावयाचा तो करून फौजेनसी या प्रांतास यावयाचा विचार सत्वर केला पाहिजे. येविसीचा तपशीलवार अर्थ वरचेवर तुम्हास लिहीतच असतील. याजकरितां

---

१ संबंध पत्र शंकराजी केशवाच्या हातचें.

अतःपर तिकडील प्रसंगास न गुंतता सत्वर आले पाहिजे. विलंब न लावावा. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे छ १ माहे मोहरम हे विनंती.

¶*Umabai Dabhade writes to Chimaji lest his engrossment in the Bassein campaign make him forget her difficulties and his promise to help her.*

No. 206 [*12-1-1738*

श्री

राजेश्री चिमणाजी आपा स्वामी गोसांवी

यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्रो राऊल सुजनसिंग कमलानी रामराम विनंती. विशेष. येथील क्षेम जाणून श्वकीये स्वानंद लेखकासी आज्ञा करीत गेले पाहिजे. स्वामीचे आगमन या प्रांतीस जाले हे आयेकून बहुत हर्शाइमान जालो. स्वामीसी व तांब्रासी हर्शामर्श वाहाडला होता व तिकडे राजेश्री पंतप्रधान स्वामी यासहि निजामनमुलकाचा हर्शामर्श जाला होता म्हणोन परस्परे वर्तमान आइकिले. तर काये वर्तमान तो सविस्तर इत्थंभूत लिहिला पाहिजे. आपन सर्व प्रकारे ठेवनाईत स्वामीचे असो. सदैव पत्री आनेकाचा सांभाल करीत गेले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

रवाणा छ १ माहे शवाल.

श्रो कुवर महकुमसिंग व कुवर कीरतसिंग व कुवर फतेसिंग व फकिरा चव्हाण रामराम विनंती पो.

¶*Sujansing Kamalani congratulates Chimaji Appa and Bajirao on their victory over the Nizam.*

No. 207] [*1739 ?*

श्री

सेवेसी विनंति. जनचर्चा यैकितो की स्वामीचे येणे येथे होत नाही. यैसं यैकतो. त्यास दोन वरषें स्वामी या प्रांती येऊन साष्टीतील जागे पाहिले येथील जागे पाहिले नाहीत. येक वेल जागे पाहावे, लोक नजरेने पाहावे बंदोबस्त करावा. लोक कामकाज करिता श्रमी आहेत त्यांचा दिलासा कराव म्हणजे माणूस टिकेल. स्वामीस दाहाबारा दिवस येथे राहावे लागेल. अधिको त्तर दिसगत लागणार नाही. आम्ही काये करितो हे स्वामीस ठावके नाही हे गोष्टी आम्हास उतम नाही. येक वेल यावे, जागे पाहावे, लोक पाहावे, पुढे

आज्ञा होईल त्याप्रो वर्तणूक होईल, हा विचार उतम आहे. हा विचार उतम. स्वामिगौरवेकरून माणसाचा दिलखुलासा होऊन चाकरी करितें यास्तव यावे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shankaraji Keshav requests Chimaji Appa to pay a visit to the Konkan and to see for himself the state of things there.*

No. 208] [*1739?*

श्री

पुरवणी राजश्री अंताजी
पंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. देवालयांत बांधावयास घांटा थोर २ दोन दरघांट वजन पक्का ८२ दोन मण यैशाचे आम्हांस येथें प्रयोजन लागलें आहे. त्यास फिरंगाण प्रांतीहून कोणी पुणियास आणून ठेविल्या असतील, कोणाचे संग्रही असतील तर तेथें स्वामीनी शोध करून पाहावा. कोणाकडे असिल्या तर किंमत नेमस्त करून आम्हांस लेहून पाठवावे; तथापि पुणियांत कोणाकडे न मिलेतच तर वसई साष्टीस स्वामीनी लेहून पाठऊन विकत्या मिलतात कीं नाहीं त्याचा शोध आणवावा. मिलल्याच तर किंमत लेहून आणवावी. महिन्याअलीकडे स्वामीनी घाटांचे ठिकाण लाऊन द्यावें. स्वामीनी आगत्य कार्य केले पाहिजे. बहुत कार्ये लिहिणे. कृपालोभ असो दीजे हे विनंती.

¶*A request is made to Antajipant Phadnis to secure two big Portuguese bells for a temple.*

No. 209] [*1739?*

श्री

विनंती उपरी. आम्हाकडील वर्तमान तर काल तुम्हाकडोन निघोन समुद्रतटाके येत होतो तव पांच गलबतें खडकाजवल पाहिलीं. त्यावर गोटांत येऊन मोरचे खबरदार केले व बंदरावर दोहीकडे राऊत व लोक ठेऊन अवघी रात्र बैसलो. दोहीकडे राऊत व माणसाची कोटी(?) व मधे समुद्रतटाकासहि पाईची माणसे ठेऊन खबरदार राहिलो. गलबतावरून उतरावयास विचार करीत होते. परंतु

---

१ सबंध पत्र शंकराजी केशवाच्या हातचें.

चौखी खबरदारी पाहून उतरले नाहीं. गडीतून गलबताकडें जावयास पांच जण बाहेर निघाले होते त्यानी गीर्दनवाई चौक्या पाहून माघारे गेले गलबतेप्रा–

(यापुढील मजकूर नाहीं)

¶*An incomplete letter informing how the enemy's ships carrying succour to the besieged changed their direction and sailed away when they saw their movements watched.*

No. 210] [*1739 ?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. रा। गंगाजी नाईक बहुत कामाचे माणूस आहेत, परंतु सांप्रत याचा कारभार कर्जामुलें व खर्चवेचामुलें बहुत अपत्त जाला आहे. जेणेकरून या गृहस्ताची उठवण मोडे आणि धंदा याचा सज होऊन येई तो अर्थ करणार स्वामी समर्थ आहेत. कल्याणास आमचे सेते व बांधणे होती. आज तीन वरसे यांणी बलेच घेतलीं. आम्ही मागें येक दोन वेलां कटकट (फाटले * *) आलों तेव्हां स्वामीनी आम्हांस आज्ञा केली कीं तुमचा धंदा तुम्हास होतो. थोडक्या दिवसासाठीं कजिया कशास करितां ? म्हणून आजीपावेतों गैगुदर केली. सांप्रत या ग्रहस्तांनी आमचे निसबतीचे माणसासी नाही ती कटकट करून दावा मांडिला आहे. आमची पागा मोडून नेली. आम्ही वारंवार स्वामीस सांगतो परंतु स्वामी त्यास दडाऊन सांगत नाहीं. हे तो आपले ग्रहस्तपणास उचित नाहीं. याउपर याचा मोबदला आम्हास कलेल तैसा करावा लागेल. मग स्वामी आम्हास बोल लावितील. मामलियाचा तो कापाल (?) केलेले. याउपर स्वामी यांसी परिछिन सांगोन आमची सेते व मले देवितात तर बरें. नाही तर आम्ही यांसी कटकट करून. यामुळे स्वामी जे आमचे करणे ते सुखरूप करोत. स्वामीचे वरांत असती तर उतमच होते तेहि नाहीं. आम्ही मेहनत करून चोर खातील, तर आम्ही कांहीं खाऊं देणार नाहीं. स्वामी ताकीद पाठऊन आमचे सेते व मले आम्हास देविले पाहिजेत. नाही तर आम्हांस कायते उतर पा। लिहिले पाहिजे. हे विज्ञापना.

¶*The Peshwa is requested to advance a loan to Gangaji Naik to absolve him from his debts and other difficulties. The writer of the letter adds that though Gangaji Naik be indispensable to the Peshwa, he will not tolerate any vexatious encroachments from him.*

No. 211] [1739 ?

श्री

—दरास आलो. भोजन होय तो प्रहर रात्र जाली. तो मधरात्रीस वसईहून येक भला माणूस मचवा घेऊन आला तो आम्हाजवळ आला आणि पुसिले कीं, सनदा काय आहेत त्या दाखवणे. तेव्हां सनदा दाखविल्या. उपरांत तो म्हणाला की, वसईस चला. आम्ही सांगितले कीं, दिवसाचा हा प्रकार, रात्रीस काय होईल कोण जाणे. याजकरितां उदईक दिवसाचे समयाने येऊं. याप्रो उतर केले. उपरांत तो निघोन गेला. या प्रो प्रथम दिवसीं जाहले तें सेवर्स लिहिले असे. जली हे वर्तमान जालें, पुढें स्थल काष्ट पाषाण तीन राहिले त्यांत काय होईल ते पाहावें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This fragmentary letter, the first part of which is missing, seems to refe to some incident in the Bassein campaign.*

No. 212] [1739

श्री

राजश्री चिमाजीपंत आपा
गोसांवी यासी

ꣳ श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित पिलाजं जाधवराऊ दंडवत विनंति. येथील कुशेल जाणौन स्वकीये लेखनाज्ञा केलं पाहिजे विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जालो ते मजल दरमजल भिवंडी वरून बदलापुरावर येऊन राहिलो. येथेचा विचार उताराखाले पडत नाही गरनालाच्या व तोफाचे धुराने नेत्रास व घश्यास अपाये जाला आहे. त्यार औषध उपाये जाणते सांगतात त्या प्रा घरास जाऊन करावितो. आपले आसीर्वादेकरून अरोग्य होईल. यानंतर आमच्या माहालातून माहालकर याची पत्रे आजी अली त्यातील खुलासा मजकूर हाच, की श्रीमंत राजश्री पंतप्रधा याजकडून मा। रामराऊ नरसीं मोगलाईच्या आमल्हाबदल आले आहेत. त्यार आखरसालचा मामला मोगलानी वसूलवासूल घेऊन गेले. सांप्रत गीर्दनवाईच ठाणी आहे ते बलाऊन बैसले आहेत. फुलंबरीस खोजजीसीं येसाजी गायकवा व हे मिलोन आठच्यार दिवस खट केली. परंतु निकाल न पडे. मग सेवट दोन हजार रुपये करार केले आणि सांप्रत कनड वगैरे परगणियांत रयेती घासदाणे व आठाअठी करितांत. फुलंबरीचा यैवज करार जाला तो घासदाण

जाला. पुढे या माहालातील लाख रुपये तुम्ही देणे म्हणौन कितेक प्रकारे श्रीमंतास नालिसी लेहून पाठवितात, की तुम्ही मोगलासी अगत्यवाद धरून खावंदाचे कामास तन देत नाहीं. त्याजवरून श्रीमंताचे आज्ञापत्र व राजश्री बाबूजी नाो याणी पत्र लिा आहे ते येसोजी गायकवाड याणी पाठविले आहे ती बजिन्नस पाठविली आहेत त्यावरून श्रुत होईल. सारांश अखेरसालचा प्रसंग त्यात लावणीचे दिवस. या प्रसंगी रयेतीस उपसर्ग दिलियाने पुढे रयेत कैसी जगेल? आम्हास मोगलाचा अगत्यवाद काये? त्यांसी स्नेह राखून खावंदाचे कार्यास अंतर करून त्याणी कोणते परलोकसाधन करणे आहे? सांप्रत येसाजी गायकवाड यास आम्ही लेहून पाठविलेच आहे. रयेत गोला करून श्रीमंताकडे पाठऊन देणे अथवा माहाल पाहून रामराऊ निकाल करून घेतील. मोगलाकडील बाकी-साकीहि नसेल तरी दासदाणा म्हणौन दरमाहाली जीव पाहून दोन च्यार हजार पावेतो पटी करून निकाल काहाडणे. येद्यपि हे गोष्टी त्याच्या चितास येत नसेल तरी काये उपाये? तुम्ही माहाल त्याचे स्वाधीन करून उठोन येणे. गिर्दनवाईचे परगणियात कचेरीस बसोन पैका घ्यावा लागतो. येद्यपि ठाणियासी कटकट करावी तरी ठाणी बलकाऊन बैसले आहेत. रा येमाजी धुमाल आपल्या घरास गेले. सिलेदार आपलाल्या घरास गेले. सेपनास पागेचे स्वार असतील तितक्यानी भिताडासी खटपट केलियानें कार्यसिधीहि होणे नाही. यैसे आसोन रामराऊ आमच्या कमाविसदारासच पैका मागतील तरी याणी कोठून द्यावा? येक सेवणे व टाकली येथील बढाईमुले माल बंद होता. त्यास सिवणेकर जागिर-दाराने हुजूर जाऊन साडेबारा हजारास बोली करार करून घेतली. टाकलीचाहि निकाल करणे तो करितील. विशेष काये लिहिणे कृपा केली पाहिजे हें विनंति.

¶Pilaji Jadhav writes from Badlapur to Chimaji that his eyes and throat suffered terribly owing to smoke from cannons and have not yet been completely cured. He further says that the province under him is not being fairly treated by the Peshwa's revenue officers.

No. 213] [*1739?*

श्री

विनंती उपरी. पत्र पाठविले ते पावोन लिहिले वर्तमान कलो आलें. आम्हा-कडील वर्तमान तर मनोराहून थोरली तोफ आणिली आहे ते काल सनवारी मोर्चामधे लागू करून दोन गोळे चालविले. त्या गोळेने माडीचे भिताड फोडिले तव फिरंग्याने गोळे टाकिले. तेणेकरून मोरच्चेची लांकडे ढासळलीं. यास रात्रौ मागती मोरचा नीट करून तोफ लागू केली व पहिल्या दोन तोफा

होत्या त्याहि लागू करून गोले चालविले. त्याचेहि मोरचेवर गोले येत आहेत. वेठविसी लिहिलेत तर शामजीपंत तारापुराकडे गेले आहेत त्यास वेठे आणवयासी सांगितले आहे. उद्यां येतील. ते वेठे तुम्हाचकड पाठऊन देऊं. वेठे आणविले आहेत. आले म्हणजे त्येक्षणीं तुम्हाकडे रवाना करितों. काल छ १४ तारापूरकराने नांदगाव मारून नेले. बारा माणसे धरून नेलीं. कललें पाहिजे. त्यावरून रा। शामजीपंतास पत्र लिहिले कीं तारापूरपावेतो जाऊन येक दोन दिवस ओसराने राहून पारपत्य होय ते करणें. बहुत काये लिहिणें, लोभ असो दीजे, हे विनंती. आज संध्याकाली फिरोन गोले मारूं. हे विनंती.

¶*The writer (Malhar Hari ?) reports that the big gun brought from Manor has been set to work against the Portuguese.*

No. 214] [*1739 ?*

श्री

श्रीमंतर राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

पोष्य नारायेण जोसी साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील. (एक ओळ फाटली) लिहिलें होतें (फाटले) गोपाळराव याजकडील भला माणूस ठार जाला याखेरीज * * लोहगडकर परवारी वगैरे पांच सा माणूस जखमी जालें, मोर्चा तो कायम राहिला. ऐसियास गलबतें काली फिरोन गेलीं आहेत तीं तीं तयारच असतील. आणखीहि त्यास मदत आणून येक वेळ गनीम भारीच हिरीरी करील. आम्हांजवळ तों सर्व निश्चिती आहे. दारू तों एकंदर नाहीं. लोकांचा विचार तो आपणांस विदितच आहे. येथें तो येक वेळ निकडीचा प्रसंग आहे. लोक पाहिजेत. आंगरियाकडील लोक येथें दीडेकशें माणूस आले आहे, त्यांची भेट काल सायंकाळीं जाहाली, त्याचा विचार बोलीमध्यें पाहतां अघटितच आहे. पहिलें त्यास दो पिळ्याचे बेगमीचें साहित्य पाहिजे; मग तरवारेशीं गांठ घालतील तर न कळें. वलगना मात्र करितात. परंतु जेथें आम्ही सांगोन तेथें चाकरी करितील ऐसें दिसत नाहीं. अद्यापि आले नाहींत. ऐसा विचार आहे तर दारूगोळी सत्वर पाठविली पाहिजे. रोजमरियाची बाकीसाठीं लोक कजिया करितात. शिलेदार तों एकंदर चाकरीस वठत नाहींत. माणकोजी कोकरे मात्र येक उणा येक अधिक परंतु चाकरी करितात, वरकड कोणी येकंदर सांगितलें ऐकत नाहीं. काल आम्ही दिवसभर तिकडे गेलो. येथें तोफेच्या मोर्च्यावर शिलेदार नेमिले होते ते गेले नाहींत. जे गेले ते हवेलींत निजोन राहिले. मोर्च्यास आग लागली, अगदीं जळाला. बरें जाहलें कीं कोकरे होते

त्यांणीं तोफ मात्र दाहाबाराजणांनी काहाडली ऐसें वर्तमान आहे. बरें, स्वामीचें पुण्य समर्थ आहे तर कांहीं चिंता नाहीं; परंतु दारूगोळीची व लोकांची मदत होय ऐसें केलें पाहिजे. सुरुंगाचें काम राहिलें. निबंध (?) खडक लागला, लोकांनीं तों आव टाकिला आहे. गनीम तों येक वेळ येलगार भारीच करील, तेवढा संभाळला आणि माघारा गेला म्हणजे फिरोन कोणी येणार नाहीं, ऐसें आहे. याउपरी कळेल तैशी बेगमी केली पाहिजे. बहुत काय लिहिणें? कोरे कागद पाठविले पाहिजेत हे विनंती. रविवार प्रात:काळ.

¶*Narayan Joshi reports the fighting and the condition of the batteries and requests Chimaji Appa to send him ammunition without delay.*

No. 215] [*1739?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा
स्वामीचे सेवसी

विनंति उपरी. येथोन आमचे मुलना हसनचें गलबत पणवेळीस जात होते तें त्याणें फिरऊन ने(ले), त्याचे नाल व वरे दुसरे घालोन मचु करून काल येथें खाडीत आणिलें होते, ते आमचे लोकांनी वळखिले. त्याचा ताडल व सफरी दिवालकर कोळी आसाम्या फिरंग्याकडे आहेत. त्याचे कबिले वुवलतात (?) होते. त्याचा समाचार आणून काल सायेकालीं पलीकडे पंचवीस मांणूस स्वारी पाठविली. आज कबिले करून आणिले. बाईका आठजणी व कोळी आठ आहेत, त्यामधें कोटांतून पलोन पांच सात माणसें आलीं. त्यांतील येकजण बोलाऊन आणून कोटांतील वर्तमान त्यास सविस्तर पुसिलें. तो सांगतो कीं परवाचे दिवसीं नव गलबतें आलीं, यामधें हबशाकडील सेंभर माणूस याणे चाकरीस ठेऊन आणिलें होतें ते खालीं उतरले व कोटांतीलहि चालीस पन्नास माणून आले. जूज जाले, त्यामधें जो नवा जमातदार होऊन आला होता तो व दुसरा त्याकडील सिपाई यैसे दोघे ठार जाले. पांच माणूस जखमी जालें. कोटकरी निघाले होते, त्यांतीलहि येक ठार जाला. दोघे जखमी जाले, मग नवे लोक आले होते ते कोटांत कोण्ही चढले नाही. कोटातील कांहीं नसरुटाचे कबिले रांडा पोर येसीं घेऊन गलबतात चढले. खुद कपित मोरबुर्जावर उभा राहोन तमासा पाहात होता, त्यास बाहेरील गोळी मानेवरून काकरती गेली तेण्हेकरून जखमी जाला आहे. अमलसी अधिक लागती तर ठार जालाच होता. काल गलबत आलें होतें, त्याजवरहि जेजालाचे गोलीनें येक जखमी जाला म्हणोन

मावारे गेले. येसें वर्तमान तो सांगतो. सत्ये मिथ्या न कळे. जाहलें वर्तमान लिहिलें असे. राजश्री मानाजी आंगरे याजकडील लोक आपणाकडे यांत्रयास च्यारिकसें माणूस,आज आपव्यास आलें आहे. उद्यां अगर परवां येऊन पोहोंचेल. फिरंगियाची फतेमार गोव्यास गेली होती ते आली. तेथेंहि फारसा समुदायाचा जोर आहे येैसें नाहीं. परंतु खासा त्रिजुरेनें आपण•आठा दिवसा येतों येैसें यास आस्वासन लिहिलें आहे म्हणोन वर्तमान आहे. कळावें म्हणोन लिहिलें असे. बहुत काये लिहिणें लोभ करीत गेलें पाहिजे हे विनंति.

¶*News of the fighting at Bassein and the condition of the Portuguese is reported in this letter by Narayan Joshi to Chimaji Appa.*

No. 216] [*1739?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंति उपरी. या प्रांतीचा उत्तम प्रकारें दवणेपर्यंत जागांजाग बंदोबस्त[१] केली तरी दाहा हजार माणूस लागेल येैसें आहे. त्यास स्वामींनीं तों बेहबुंद केलीच असेल. परंतु अजमासें स्थलाची अटकल ध्यानास आणितां सदरहू-प्रमाणें माणूस पायीचें आसिलें पाहिजे. सेवेसी श्रुत जालें पाहिजे. आपणांकडील सविस्तर वर्तमान लिहिलें पाहिजे. बहुत काय लिहिणें हें विज्ञापना.[२]

¶*Chimaji Appa is informed by Narayan Joshi of the number of men that will be required for the defence of the province up to Daman.*

No. 217] [*1739?*

श्री

पुरवणी राजश्री महादजी अंबाजी
स्वामी गोसावी यांस

विनंति उपरी. तुम्हास मुख्य पत्रीं लिहिले आहे कीं राजश्री लाडोबाकडे जाणे म्हणून लिहिले आहे. त्यास वर्तमान आले त्याचे तहकीकातीस मनोहरास माणसें पाठविली आहेत ती येत तोंपर्यंत तुम्ही उद्याचा दिवस तेथें मुक्काम करणें. परवाहि करणे. आम्ही तुम्हास लेहून त्याप्रमाणे वतणूक करणे. कदाचित तुम्हास राजश्री लाडोबा व राजश्री विठल सिवदेव याचे पत्र आले तर आमचे पत्राची उजूर न करणे आणि त्याजकडे फौजसुद्धा जाऊन पोहोचणे. तुमची

---

१ व्यवस्था. २ पत्र नारायण जोशाचें.

तेथें मुकाम करविला आहे हे वर्तमान त्यास लिहिले आहे. त्याचे पत्र आम्हाकडे यावयासी विलंब लागेल याजकरिता परभारेच मशारनिल्हे लिहितील. पत्र येताच तयार होऊन जाणे. तुमचा तेथें मुक्काम आहे याजकरितां तुम्हाजवळ श्रीमंत राजश्री अपास लाखोटे दिल्हे आहेत, तीं पत्रे आम्हाकडे पाठवून देणे, आम्ही हे वर्तमान त्याजकडे लेहून पाठवूं. आणि पत्रे रवाना करूं. रवाना छ ३ माहे सवाल बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*Mahadoba Purandare is asked to join Ladoba and Vithal Shivdeo.*

No. 218] [*1739 ?*

श्रीत्र्यंबकेश.

पुा राजश्री गोविंदपंत स्वामी गोसावी यांसी

विनंती उपरी. श्रीमंत राजश्री आपाचे पत्र रा संकराजीपंतास आले कीं, 'फिरंगी तयार जाला आहे, त्यास रात्रींदिवस खबरदार रहावे' म्हणोन लिहिलें. त्याचे अगोदर आम्ही निमे राऊत पाचसे जुहासे (?) पावेतो दिवसा छविन्यास जातो. रात्रीचे पांच साहासें राऊत छविन्यास जातात. दिवसाचे आम्ही खासाच जातो. रात्रीचे राऊत पाठवितों. याप्रमाणे नित्य सावध आहो. यांत त्याणे बाहीर निघालाच तरी धण्याचे पुण्येकरून जितका श्रम होईल तितका करीतच आहे. यश अपेश धण्याचे. आम्हाकडून या समई कमी करणार नाहीं, हे एविसी तुम्ही बेफिकीर राहणे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*This is a letter to Govindpant (Patwardhan ?) in the campaign against Bassein, communicating vigilant care with which operations were being conducted*

No. 219] [*1739 ?*

श्री

श्रीमंत राजश्री आपासाहेब

साहेबाचे सेवेसी

विनंती. सेवक रामाजीराव घोसाळकर नामजाद व कारकून किले नारायणगड साहेबाचे सेवेसी विज्ञापना. ताा छ २३ रोावलपावेतो सेवकाचे व किले मजकूरचें वर्तमान यथास्थित असे विशेष. गोमाजी अहीर साष्टीहून किले मजकुरी आला त्यापासोन दुखण्या पडला होता. हल्लीं बरा होऊन साहेबांचे सेवेसी आला आहे. याचे पदरीं दोन च्यार माणसें कुटुंबी आहेत तरी याची उस्तवारी करणार साहेब धनी समर्थ आहेत.. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramajirao Ghosalkar recommends Gomaji Ahir to the notice of Chimaji Appa.*

No. 220] [1739?

श्रीशंकर

पुरवणी श्रीमंत स्वामीचे शेवेसी

विनंतीपत्री आज्ञा कीं, तोफेचे गोळे हरप्रेत्ने दोन हजारपर्यंत रवाा करणे. तैशा चापांचे बंदुखेच्या गारा पांच हजार व आरबी घोडे चांगले मेळवणे, निदान काढेवावयाचे उपयोगी तरी मेळवणे. त्यास इतक्याहि गोष्टीचा शोध अगोधरच केला, परंतु गोला दारू वगैरे जंगी सामान विकीतच नाहींत. मागितल्यास देत नाहीं. चौकशी फार. दाणे खाा करून मणभर आणिले तर परवानगीवाचून येत नाहींत. हा जिनस त्याचेहि घरीं फार मबलग नाहीं. खर्चा माफक मुंबईहून खाा करून आणितात. तो सरकारचे कोठीस मात्र असतो. सावकारी माल यात्रा, उदमी व्यापारी यानी खाा करून विकावा, हा दंडकच नाहीं. अमदरफ्तीच नाहीं, मातबरानी मागितल्यास देऊन स्नेहे रक्षावा हे ज्ञानच त्यांस नाहीं. सावकारांत कोणी मातबर हरप्रकारे आणून देई असा कोणी नाहीं. आरबी घोडे उगेच दृष्टीनें अवलोकनासहि योग्य नाहींत. घोडी सारी चालीस पनांस, त्यांत दाहा वीस आरबी आहेत. परंतु ती मृतप्राय कृश फार भरभर चाले म्हणजे सिरा सोडऊन अशक्त करितात. परंतु स्वामीचे पत्र आले म्हणून त्यांजकडील मातबर शाहाणा पाठऊन देणे म्हणून पत्र पाा. त्यास आठ दिवस जाहले, आणिक पांच सात दिवसीं उत्तर येईल. येक जोडी सरकारची ठेऊन घेतली आहे. साधकबाधक गरमनरम बोलून पाहूं. काय तो मजकूर (मागा)हून लिहून पाठऊं. फिरंग्याबाा पाडाव तोफ स्वामीनी आणविल्या, त्यास च्यार तोफ केवळ लाहान त्या स्वारीत उपयोगी नव्हेत येसे जाणोन मी मना केल्या. येक तोफ फार थोर नाहीं, परंतु तोफेतील येकरत्न हजार पाचसे तोफांत तसी तोफ दृष्टीसहि पडणार नाहीं ती स्वामीकडे रवाना केली. गर्नालाच्या तोफा च्यार पाडाव त्या स्वारीत उपयोगी आहेत, लहानच आहेत. त्याप्राा गर्नाला तोफखान्यातहि आहेत. मी खोलीत होतों, परंतु त्याणी पुसलेंहि नाहीं. आतां शोध कर्ता नेल्या नाहींत. हलक्या आहेत. प्रसंगोचित इकडेहि त्याचा उपयोग घडेल. नेतां चुकोन राहिल्या. हे विज्ञापना.

¶*The writer reports to the Peshwa the difficulties that he had in securing the guns, Arab horses and other articles ordered by the addressee from Bombay.*

---

१ वह्र.

No. 221] [1739?

श्री

श्रीमंत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

पो वासुदेव जोसी सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. आम्हीं भृगुवारी प्रात:कालीं कल्याणाहून स्वार जाहलों ते मंदवारी त्रितीये प्रहरीं पेणेस आलों. उदईक दर्शनास येतों. व गोवऱ्या नाहावी भिवडीकर यास आणिला होता, त्यास समागमें आणिला आहे. उदईक येईल व आनखी येक दोन तबीब आणविले आहेत, तेहि उदईक येतील. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶[*Vasudeo Joshi writes to Chimaji Appa that barber bonesetter and other two surgeons will be despatched soon.*

No. 222] [7-4-1740

पो छ १३ मोहरम. जाबसूद.

श्री

श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामाजी माहादेव मो ठाणे साष्टी चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार विनंती विज्ञापना. ताा छ २० मोहरमपावेतो ठाणे मजकूरचे वर्तमान यथास्तित असे. विज्ञापना खालापूरचे मोकामीहून नावजीभाई याजबाा विनंती पत्र पाठविले त्यासी तेहि सेवेसी पावली असतील. त्यासी आम्ही जैमावसिर्धा बेलापुरास जाणार होतों. त्यासी अगोधर उरुणास जाणार म्हणोन कानोजी गजे तीनसे माणुसानिसी उरुणास पायबंद दिला होता. राजश्री संकराजीपंत आले म्हणजे त्याचे आरमार आणून जावे, तो पालीच्या अनुसंधानामुले तिकडे गेलो. सकराजीपंत ठाणेयासी राहिले होते, त्यासी आरनाली ठाणेयाहून राा बाजीराव बलुसे यानी पत्र पाा सकराजीपतास पाा की, जैस असाल तैसे निघोन येथ या, आरनालियाच्या बारियावरी आरमार आले आहे. त्यावरून मारनिलेनी आम्हास तावडतोबीने लिाा कीं, तुम्ही जैसे आसाल तैसे निघोन ठाणेयासी येणे. आम्हास आरनालियासी वसईकडे जाणे लागते. त्याजवरून पत्र पावताच तैसेच सडे स्वारीने ठाणेयासी दाखल जालों. त्यासी पालीचे मोकामी भेज्याकडून कांही अनुसंधान उरुणाचे आले ते बजिनस राा सकराजीपंताकडे राजश्री वासुदेव

बाबाजी रवाना करविले. आम्हासहि माघारे पा॥. त्यासी हे येऊन पावताच तैसेच निवोन हे उरुणास गलबत लहानथोर चोवीस घेऊन निघोन गले. आरनालियाचे आरमार आणविले आसे. तेहि आले म्हणजे ठाणेयाचे बदोबस्त करून जातो. आजि रात्री येईल. रा॥ बरवाजी पा॥ यासी काही पेबचे अनुसंधान आले होते म्हणोन आम्हाबा॥ कांही कल्यानकर होते ते त्याच हवाला खालापुराचे मु॥ केले. याचे मोकामी रा॥ भावजी ताकपीर याचे पत्र आले कीं कुरगेहून राऊत व पाईचे लोक आले आहेत हे आम्हाकडे द्यावे. त्यावरून त्यासी तिकडे राहावयासी सागितले, तेहि पेब वगैरे ठिकानास शह देतील. सारांश आधी उरुण घ्यावे. मग मानाजीचा शह उडवावा येसा सिधात करून पालीहून आम्ही आलो. त्यासी श्रीमंत नानांची भेट जाहली. तेथीलहि आज्ञा हीच जाहली. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramaji Mahadev reports to Chimaji Appa his efforts to capture Uran.*

+ बालाजी बाजीराव.

Index to Selection 34.

The Bassein Campaign.

[Figures refer to the numbers of letters]

C—*contd.*

D

E

F

G

H

I

J

N—*contd.*

P

R

R—*contd.*

S

MO-II Bk Ca 9—24

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

३५

इंग्रजांचा साष्टीवर हल्ला

[किंमत—२ रुपये ११ आणे किंवा ४ शिलिंग ९ पेन्स]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी.ए.

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३४

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि
जबाबदारी सरकारावर नाहीं.)

Selection No. 35.

THE CAPTURE OF SALSETTE BY THE ENGLISH.

29th December 1774.

One of the immediate consequences of the murder of Na Peshwa in 1773 was, the sudden outbreak of hostilities betw the Marathas and the English whose relations had hitherto been amica The murder led to the formation of what is known as the League of Barbhais, who ousted Raghunathrao from the Peshwaship, forcing h to flee for his life and ultimately to seek the shelter of the English at Su Fleeing from the pursuing armies of Haripant Phadke, Raghunath crossed the Nerbudda in the hope of securing the support of Maha Sindia and Tukoji Holkar, but doubtful of their adherence to his cau he simultaneously sent urgent appeals for help to the English, throu Mr. Mostyn, their representative at the Court of Poona. Under th circumstances Mostyn suddenly left for Bombay in the autumn of 1 in an endeavour to profit by the Maratha dissensions and thereby sec for the English the fertile lands in the vicinity of Bombay so much cove by them, as through them passed the only convenient trade-rou leading to the port of Bombay (61). Knowing that the attention of rulers of Poona was distracted by a domestic feud, Mostyn planned a na expedition against the fort of Thana which commanded Salsette. T sudden move on the part of the English, without previous warning any plausible excuse for hostilities, annoyed the Barbhais so intensely, t they at once took measures to avert the danger and meet the threaten attack. But the English did not take long to accomplish their obj and tried to restore friendly relations with the Court of Poona as so as the fort was captured. They justified their conduct by urging t the Portuguese had already planned an assault on Thana and instead letting the fort fall into their hands, they (the English) had mer anticipated them. Hence the whole affair did not last for more than couple of months.

The papers here presented, over 200 in number, graphically descri the whole episode and the minute details in which they abound cann fail to be of absorbing interest to the student, particularly when studi along with the English papers published by Forrest. Anandrao Ra Bivalkar, who figures most prominently in them, was the Marat commandant at Thana and conducted the operations with great coura and judgment, till at last, finding further resistance hopeless and havi already lost a large number of his men, he was forced to surrender the fo to the English who conveyed him to Bombay with all the honours of wa Bhawanrao Kadam, the Killedar, had however to suffer a more disgracef fate. While operations were in progress Bhawanrao was bribed by t English to hand over the fort to them on certain conditions. H treachery was detected and he was threatened with dire consequen

fell into the hands of the English after the surrender, and was blown them from the mouth of a cannon, thus paying the just penalty for crime (128).

otwithstanding a few repetitions the letters clearly describe the rganised condition of the Maratha forces and their want of discipline, main causes to which, in spite of great individual heroism, most of the tha failures are rightly attributable. One item of the Barbhais' however seems to have affected the English more adversely than the ighting. The Barbhais organised a strict blockade of English le and cut the supplies reaching Bombay from the west coast, as far th as Surat. This measure was so well organised and proved so ective that, dependent as they were upon their trade, the English inquished further hostilities against the Marathas and tried to re-establish endly relations with Poona, with all speed. Many well-known figures later Maratha history such as Raghoji Angria, Anandrao Dhulap, ivaji Vithal Vinchurkar, Visaji Keshav Lele and Visaji Krishna niwale are seen taking part in the defence of the fort of Thana and creditable service so far as land fighting was concerned: in naval rfare however they shewed a woeful lack of skill.

Although for convenience of study this and the next selection no. 36 separately presented, they both treat of one and the same subject, . the war with the English, the first important episode of which is alt with in this selection. Letters nos. 34, 72, 74, 75, 80, 82, 83, 89, , 124, 137, 139, and several others will give a graphic idea of the rapid cline of the traditional Maratha spirit,—troops refusing to face danger d eminent commanders shirking duty under one pretext or another. It however a relief to find a few bright spirits like Anandrao Ram, the mmander of Thana, Naro Appaji, Governor of Poona, and Naro andrao Keskar, Maratha officer at Surat doing their utmost to save the aratha cause.

पैवस्ति छ १० जिल्काद
सन आर्बा

श्री

पुरवणी राजश्री नाना फडणीस
स्वामीचे सेवेसी

विनंती विशेष. राजश्री राघोजी आंगरे यासी घसघस मांडली आहे विरुध्द वाढवणार, याचा खुलासा काय तो लिहिणें म्हणोन लिहिलें. त्यास मशारनिले याचे बुधीस भ्रंश गुदस्तापासून पाडिला. याजमुळें त्याजपासून अंतरें पडलीं. बितपसील.

१ निजामअली पुणियास आला तेसमई सरकारचे शत्रु कोकणपटींत हबसी इंग्रेज आहेत. त्यांस मोंगलाचीं वस्त्रें व मुलूक जाहागिरीच्या सनदा सादर जाहाल्या, त्याप्रमाणें यांसहि आल्या. इंग्रेज हबसी याणी वस्त्रें व पत्रें घेतलीं. त्याअन्वयें मशारनिलेनीहि घेतलीं, तेव्हां येकनिष्टता त्याकालीं येक प्रकार दिसली. कलम १

१ सरकारची देशमुखी चेऊल सुभांची तेथील कमाविस सरकारतर्फेनें नारो राम यास सांगोन गुदस्ता रवाना केलें. अमल बसूं दिल्हा नाहीं. दरम्यान हबसी आणून अंमलास खलेल केली. कलम

१ सरकार कौली [1]डंगी बसराईस गुदस्तां घोड्यासाठी रवाना जाली, ती साल मजकुरी घोडे आरबी घेऊन समागमें सरकारचा बारगीर व कौल असतां वसईचे बाऱ्यावरून धरून नेली; बारगीर सरकारचें नांव सांगत असतां व कौल सरकारचा व घोडे बजिनस असतां, डंगी खालीं करून घेतली; आणि बयाज मात्र लिहिला. तो माल मुंबईस पाठऊन फरोक्त केला. डंगीचे लोक व बारगीर कैद करून ठेविले. कलम

१ किरकोल सरकारकामांत येकनिष्टता दिसोन न आली. कलम

१ सावकारी [2]तरांडी कौली त्यास उपद्रव होऊन खालिसा करून घेऊं लागले. कौलाचे कौल अमान्य होऊं लागले. कलम

१ हैदर नाईकाचे वकील मुंबईत आले आहेत त्याजवळ याचे वकील याचें बोलणें चालणें होतें. कलम

६

१ जहाजाचा एक प्रकार. २ जहाजविशेष.

दरहू सा कलमाची वर्तणूक दृष्टोत्पत्तींत आली. अंतरंगी आणखी काय असतील हे त्याचे चित्त साक्ष देत असेल. त्याजवरून चित्तांत आलें कीं ारचे पदरचे लोक येकनिष्ठ त्याच्या बुधी याकालीं विपरित जाल्या. शत्रु ाप त्यास कलत चालला. तेव्हां त्यास हाल विशेष होत चालले. याजकडील ील जंजिऱ्यास व मुंबईस नेहमी राहूं लागले. यास्तव विना निष्ठुरता दाखन जरबेंत आणिल्याखेरीज स्थितीवर न येत. याजकरितां जरब थोडीसी खविली, तेव्हां नरम होऊन मध्यस्त पाठऊन साऱ्या गोष्टी दुर्बुधिच्या होत्या ा दूर करून भेटीस आले. डंगीचे मालाचा पैका व घोडे सरकारांत आणून देल्हे. निखालस जाहाले. हालीं समागमें आहेत. बहुमान विशेषात्कारें रून बरोबर ठेविले. आणीकसारिखे याजउपरी दाखवीत नाहीं. जरी ीतीवर न येते, तरी पारपत्याची योज्यना बरेवजेने केली होती. कलावें हे संकलित वृत्त पाल्हाळ पत्रीं कोठवर ल्याहावे? भेटी अंतीं सविस्तर निवेदन करूं. सारांष इतका विचार कारभारी यानी त्याचे बुधीस संचार लाऊन जाबसालाखालीं आणिलें. जातीने कांहीं भेटीनंतर निशा पडिली. आतां आपण खुलासा मजकूर लिा यावरून कचें वर्तमान या रीतीचें हा मजकूर परिछिन दुसरियासी न कलावा. कदाचित लस्करांत लिहिलें तरी सर्वज्ञ: लेहून तेथेंहि दुसरे याचे हातीं पत्र न लागे या बंदोबस्तीनें ल्याहावें; आणि हें पत्र आपल्या खास रुमालात असावें, कार्यवर नजर आहे. विरुधांत किमपि दाखवीत नाहीं. बहुत काय लिहिणे लोभ वृधि कीजे हे विनंती.

¶*Nana Fadnis is informed by Ramaji Mahadeo why he was required to resort to harsh measures to bring round Raghoji Angria.*

No. 2] *[10-2-1774*

पौ छ ९ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री बापू
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आनंदराव राम मुा साष्टी सा नमस्कार विनंती. येथील वर्तमान ा छ २८ जिलकादपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. आपले पत्र छ २१ जिलकादचे आले तेथे आज्ञा. छ १९ जिलकादी श्रीमंत सौ पार्वतीबाई व मातुश्री गंगाबाई यासी आम्ही व राजश्री नाना फडणीस मिळोन किले पुरंधरास घेऊन

आलो. सर्वांची येकवाक्यता आहे. हाली तमाम सरदारास पत्रे पाठविली आहेत. फौजसुधा लौकरच जमा होतील. तुम्हाकडील तालुकेयाचा बंदोबस्त राखून हुशार राहून वर्तमान वरचेवर लिहीत जाणे म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणे किले कोटाचा बंदोबस्त केला आहे. इंगरजाकडील बातमी राखली आहे. अधिक उणे वर्तमान आढलेल ते वरचेवर सेवेसी लिहून पाठवीन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Anandrao Ram assures Sakharam Bapu of his readiness to obey all the orders that were sent to him by the addressee and of his being fully on his guard in the critical situation. He also promises to send in full news of whatever will happen.

No. 3] *[12-2-1774*

पौ छ ३० जिल्काद
आर्बा फाल्गुन

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती. मोष्टीन इंग्रेज मुंबईकराचा वकील येथें आहे. त्यास ठेऊं नये. तो येथून मुंबईस बातमी लिहितो, याजकरितां त्यास लाऊन द्यावा म्हणून आपलें पत्र आलें होतें व त्याचे पूर्वीच मोष्टीन जावयाचा निरोप मागत आहे. निरोपाची फारच निकड नित्य करितो. तत्रापि हा येथून गेल्यानंतर कांही बखेडा करील असे वाटतें. त्याजमुळें तुमचे गुराबीविशीं लेहून पाठविलें आहे, त्याचा जाबसाल लेहून येईल तेव्हा निरोप देऊं म्हणून निरोप न दिल्हा. त्याचा तो आग्रह निरोपाविशी बहुत आहे. त्यास हालीं मोष्टिनास निरोप देऊं नये, तो मुंबई आला म्हणजे बखेडा होईल, या अर्थे रामाजी बलाल भाटे यांचे पत्र राजश्री त्रिंबक विनायेक यांस आले आहे; व राजश्री खंडो गणेश यांस त्यांजकडील कारकून बेलापुरास आहे, त्याचे पत्र आले आहे. ती बजिनस दोन्हीं पत्रें पाठविलीं आहेत. त्याजवरून सर्व ध्यानास येईल. सारांष माष्टिनास तूर्त निरोप देऊं नयें असें सर्वांच्या विचारें आहे; तरी येविसीचे उत्तर पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे. आज्ञेप्रो केले जाईल. बहुत काये लिहिणे. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶Nana Fadnis is requested not to allow Mostyn to proceed to Bombay as he would create trouble there.

5757

No. 4] [17-2-1774

पौ छ १३ जिल्हेज
फाल्गुन सन आर्बा

श्री

श्रीमंत राजश्री बापू
साहेबांचे सेवेसी

विनंती सेवक आनंदराव धुळप, मुक्काम जंजिरे विजयदुर्ग, कृतानेक दंडवत विज्ञापना. तागायत छ ५ जिल्हेज पावेतों आपले कृपेंकरून वर्तमान येथास्थित आहे. विशेष आपलें पत्र सादर जाहालें, तेथें आज्ञा'की अरमारची तयारी राखोन हुशार राहाणें म्हणोन. ऐशास आज्ञेप्रमाणें आरमारचा बंदोबस्त राखोन, स्वारी शिकारीची पैरवी करून साहेबकामावर तत्पर आहों. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Anandrao Dhulap informs Sakharam Bapu that he has kept the navy in a state of preparedness.*

No. 5] [3-4-1774

पौ छ २२ मोहरम आर्बा
सबैन चैत्र मास
सूर्याजी रघोजी जासूद जथे
बनाजी नाइक

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी

विनंती उपर. विसाजीपंत लेले याचे मुलामाणसांची चौकी उठवावयाविसी पूर्वी पत्र तुम्हास गेले होते. त्यावरून तुम्ही मोकली केली असेल असें वाट(ते). परंतु ते ठीक नव्हे. अद्याप कार्य पुर्ते खातरजमेचे जाले नाहीं. त्यापक्षी चौ(की) ठेवावी. मग रामचंद्र नाइकासारखे जामीन घेऊन, मग सोडावे. येसाजीपंताची माणसे येथून पत्रे गेल्याखेरीज मोकली करू नये. रा छ २१ मोहरम हे विनंती.

¶*Nana Fadnis asks Naro Appaji to keep under strict watch the family and the retenue of Visajipant Lele. The letter is wholly in Nana's hand.*

No. 6] [5-6-1774?

पौ छ २६ रावल

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक लखमोजीराव खानविलकर व कारकून जंजिरे सुवर्णदुर्ग चरणावरी मस्तक ठेऊन सां दंडवत व नमस्कार विज्ञापना. ता छ २४ रावलपावेतों स्वामीचें कृपावलोकनेकरून सेवकाचे व जंजिराचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र छ २२ रावली सादर जालें. तेथे आज्ञा कीं फरासीचे आवाईकरिता इंग्रेज मुंबईस सरंजाम करीत आहे. फरासिसाची आवाईची मंदी असता सामान फारच करितो; तर तुम्ही आपले जागा बहुत सावधपणे राहून बच्यावाचे सामान व सफेलीवर का र तू (?) यैसे आज्ञापत्री आज्ञापिले ते सिरसा. यैसियासी जंजिरे मजकुरी चौकी पाहारा अलंग नोबत बहुत सावधतेने करीत आहो. लढाईचे बच्यावाचे तरतूदहि आज्ञेप्रमाणे व दर्यात गलबताचे छबिने येसे करितो. स्वामीचे पुण्य समर्थ आहे. कोणे गोष्टीची नून्यता आहे यैसे नाहीं. जंजिराचे पश्चमेकडील इमारतीचे काम तडक चालिले आहे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Lakhmojirao Khanvilkar in reply to the Peshwa's orders to be prepared for hostilites with the English reports he is quite watchful.*

No. 7] 7-6-1774

पौ छ २६ रावल
सुा खमस सबैन
वैशाख मास.

श्री

राजश्री आपाजीपंत दाजी
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. आपण पत्र पाठविलें तें पावलें. भगवंतसिंगाचे स्वार पाऊणसें गंगापुरीं आहेत, ते ल्याहावयास राहिले, ते ल्याहावे म्हणोन लिहिलें त्यास येथील झाड्यांत साठ स्वार गंगापुरीं आहेत आसे लिहिलेंच आहे. हालीं आपण लिहिल्यावरून पाऊणसें करितों. कळलें पाहिजे. शामल व इंग्रज

5759

मुंबईकर यांस येथून पत्रें लिहिलीं नाहीं, कळलें पाहिजे. बहुत काय लिहिणें, कृपा लोभ असों दीजे हे विनंती.

¶*The le'ter addressed to Appajipant mentions the number of sowars posted at Gangapur, to be 75 and not 60. It adds that no communications have been addressed (from Poona) to the English at Bombay and the Sidi.*

No. 8] *[7-6-1774*

पौ छ ९ राखर सन

खमस

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रणसोड कृष्ण संजगिरी मो मुंबई कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ २६ माहे रबिलोवलपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. इंग्रेजास सांप्रत सुरतेहून बातमी आली ऐसी जे, श्रीमंत इंदुरास दाखल जाहाले. होलकर यांचे सुनेने ठेऊन घेतले. होलकर व सिंदे व श्रीमंत येकत्र जाहाले. सरकारच्या फौजा माघारे घालविल्या. सुजादउवला, रोहिला वगैरे कुमकेस येणार. बादवरसाद पुण्यावर मोहीम आहे हे वर्तमान इंग्रेजाचे पथ्यावर पडले. निमित्य कीं, पहिले व मनापासून श्रीमंताची चढती च्याहातात. कोणे वेलेस कांहीं त्याचे हातीं मुंबईस प्राप्त होईल हे समजोन जे जे बोलीचाली इंग्रेजानी आम्हाकडेस केली व स्वामीस प्रविष्ट कारविली त्यास अंतर केले नाहीं. येणेकरून घडों न घडों. निकाल होईल तंव बांधोन ठेविले. दोंकडेस आंग, सबब ऐसे असोन दुसऱ्याकडील बातम्या स्वामीचे मर्जीस पसंद पडतात, व सेवकाकडील लटक्या दिसतात. असो; जे जे द्रिष्टीस पडेल व कानी येईल त्याची चौकसी करून सेवेसी विदित करीनच. वसई व साष्टी येथील वर्तमान मनउदयानरूपप्रमाणे स्वामीस कलवीत असतील; परंतु येथें जे जे तिकडून येतात व इंग्रेजास सांगतात ते सर्व मज ठाऊक आहे. इंग्रेजास बातमी ऐसी कीं श्रीमंत भर पाऊसात वसईस व साष्टीस दाखल होतील. सत्यमिथ्या ईश्वरास ठाऊक. इंग्रेज कावित्रबाज. मोष्टीन पुण्यास आहेत म्हणोन कोणे गोष्ट कावित्र्याची करीत नाहीं. हर कोणास मन मिलाल्यास कबूल केल्यास व आपली किफायेत पाहिल्यास मग कृत्रिमाची गोष्ट होणार नाहीं. आम्ही उदईक साष्टीस निघोन जातों. तेथें पत्राची वाट पाहातो. जनराल आम्हावर

नाखूश आहेत. दील पसंद नाहीं. निमित्य कीं, वटसन व टेलर व शाहा व मोस्टीन व रामसी याजकडेस स्नेह चालवितो, व रात्रंदिवस त्याजपासी असतो, हे अदावत. सरकारचे पत्र वकिलीची व इजत आब्रूचे सेवकाविसी जनरालास कृपाळु होऊन पाठविले पाहिजे. मागील पत्रे होती ती मानीत नाहीं. सेवसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Ranchhod Krishna reports to Nana Fadnis from Bombay the news received by the English that Dadasaheb has been joined by Sindia and Holkar and has also received assurances of help from Sujauddaula and the Rohillas. They are planning an attack on Poona after the rains. The writer further requests the addressee to write to the governor removing his misunderstanding about him (the writer).

No. 91 *[14-6-1774*

श्री

पौ छ २१ राखर सुा
खमस सबैन जेष्ट

श्रीमंत राजश्री . पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आनंदराव राम मो साष्टी चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ४ माहे राखरपावेतो सेवकाचे व प्रांत मजकुरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. छ २२ रावलचे आज्ञापत्र सादर जाले, तेथे आज्ञा कीं तालुके साष्टी येथे सालमजकुरी गडबडेमुले बेहड्याचे नेमणुकेपेक्षा जाजती लोक ठेवणे म्हणोन हुजूरची आज्ञा नाहीं; व तुम्हीहि ठेविले नसतील. कदाचित ठेविले असल्यास त्याचा पैका परिछिन मजुरा पडणार नाही. आनंदवलीच्या तोफा दिल्या आहेत. त्यास दाहा गोलंदाज जदीद ठेवावयाविसी पेसजी सनद सादर जाहाली आहे. त्याचे अत:पर प्रयोज्यन नाहीं; तरी सदरहु दाहा गोलंदाज पत्र पावतांच दूर करणे म्हणोन आज्ञा. ऐशास गडबडीचा प्रसंग पडिला; परंतु सेवकानी जदीद माणूस ठेविले नाही. कोटांत रा भवानजी कदम हावालदार याणी कांहीं माणूस जदीद ठेविले आहें ते आमचे विद्यमाने ठेविले नाहीं. त्या लोकांची रदबदल त्यांही सरसुभां केली असल्यास ते निवेदन करितील, दाहा गोलंदाज ठेविले, त्यापैकी पांच पुरंधरी पाठविले आहेत. पांच राहिले ते भरणा गोलंदाजाचा कमी याकरितां ठेविले आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Anandrao Ram reports to the Peshwa that as instructed he has reduced the force under him and also some of the artillery men.

No. 10] [26-7-1774

पौ २२ जमादिलावल खमस

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसीं

पोष्य हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ १६ जमादिलावल वर्तमान यथास्थित असे विशेष. आपणांकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाहीं तर असें नसावें. सदैव पत्रीं कुशल वृत्त लिहून संतोषवीत जावें. इकडील वर्तमान श्रीमंतास लिहितां त्याजवरून कलत असेल. श्रीमंत नर्मदा उतरून अलीकडे आले. सिंदे उतरतात. अलीकडे आले म्हणजे सेंदव्याकडून चांदवडास येणार, तेथें राजश्री बापूनी यावें. श्रीमंतास जागीर व येक दोन किले राहावयास लाऊन द्यावे असें सरदाराचें मानस आहे. हें वर्तमान श्रीमंतास लिहिलें आहे. काय विचार ठरेल तो पाहावा. तोरखेड्यास माधवराव बांडे आहेत. त्याजकडे पहिली फौज पाठविली होती त्याजवर बालोजी पलांडे यास पाठविलें. मोर्चे लाविले. श्रीकृपेनें लौकरच हस्तगत होईल. साष्टीची गलबल ऐकिली होती. त्याचें काय जालें तें लिहिलें पाहिजे. नवल विशेष वर्तमान जरूर जरूर लिहीत जावें. अनमान करूं नये. आम्ही खबरदारीनें आहों. चिंता न करावी. बहुत काय लिहिणें कृपा कीजे हे विनंती.

सेवेसीं त्र्यंबक हरि वर्तक कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. बहुत दिवस पत्र येऊन सांभाल न जाला. घरचेही पत्र येत नाहीं. सविस्तर ल्याहावयास आज्ञा व्हावी हे विनंति.

¶*Haripant informs Naro Appaji of Raghoba's movements in Gujarat and the terms offered to him. He also makes inquiries about the Salsette affair.*

No. 11] [29-7-1774 (?)

श्री

विज्ञापना विशेष. वसईकडील बातमी तर पांच हजार फौज व पांच हजार पाईचे लोक जर अशांत असते तर, इतके दिवसांत वसई तालुका तारापूरपावेतों मारून, वसईसहि गलबल केली असती. उगेच बसोन राहिलों. भाऊकडील फौज निघोन गेली. वसईंत तर सरंजाम किमपि नाहीं. पांच तोफा, पुलावर

दोन व किल्यांत तीन, व अडीचतीनशें माणूस इतका सरंजाम आहे. दररोज हुली पडतात. दररोज याप्रमाणें बातमी येथे; परंतु इलाज कसा करावा ? जर जमियत असती तर यत्न करून पाहातों. किल्याचा सरंजाम करावयास दिवाणजी गंगाधरपंत केतकर लागले आहेत. करतील. येथें लोक गाडदी वगैरे आहेत, यांस पीठ देखील मिलत नाहीं. तेव्हां तोडातोडीसी प्रसंग येऊन बनला आहे. माघारे बोलाऊन घेतले तर अबरू राहील; नाहीं तर रस्त तरी फौज बाा देऊन येऊन पावली तर राहिलो तरी वाघ तोहि खात नाहीं. इंग्रजाचें भय नाहीं, असें पोटाचे प्राप्त जाहालें आहे. नाहक आतां फाशांत घालून ठेविलें आहे. यांतून वांचविलें पाहिजे. रिकामपणी उपासी न मरावें. वांचलों तर पुढें उपयोगी पडूं; नाहींतर फल काय ? येविसींचा मनसबा जसा करणें तो जलदीनें होऊन आज्ञा जाली पाहिजे. तदनुसार करीन. रवाना छ १९ रबिलाकर हे विज्ञापना.

¶*The writer complains of the shortage of forces for the defence of Bassein and also shortage of provisions which is dangerously staring in the face.*

No. 12] [*13-9-1774*

पाो छ १३ रजब सुाा खमस

भाद्रपद

श्री

रा नारो आपाजी स्वामी गोसावी यासी

विनंती उपरी. जनरालाकडील माष्टीन पुणियांत आहे, त्यासी कितेक मजकूर तुम्ही व राजश्री त्रिंबक विनायक मिळून बोलणें. येविसी * * नी लिाा आहे त्याप्रोा त्यासी बोल * * * ये. बोलला असिल्यास त्याणी जाबसाल कसे केले, खुलासे कोणे तऱ्हेचे निघाले, ते सविस्तर लेहून पाठविणे. बोलणें जाले नसिल्यास पेशजी लिहिल्याअन्वये बोलणें. जाणिजे. छ ६ रजब मुरू खमस सबैन मया व अलफ * बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Naro Apaji is asked by Sakharam Bapu to report the outcome of a conversation between Mostyn and Trimbak Vinayak.*

No. 13] [*16-9-1774* (?)

श्री

राजश्री भिकाजीपंत सुभेदार

गोसावी यासी

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित आनंदराव शिंदे, मुक्काम रेवदंडा, रामराम विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिलें

पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. भंडारीयाचा व मुंबईकडील बातमी राखावी येविसींचा मजकूर लिहिला तो सविस्तर कळला. प्रस्तुत श्रीमंत राजश्री दादासाहेब साष्टीस जाणार ऐसी मुंबईत बातमी आहे. ढाला माहिमाजवळ दिल्या आहेत. दोन तोफा नव्या वोतिल्या, आणिकही तोफा वोतावयाचें काम लाविलें आहे. याप्रमाणें वर्तमान आहे. पुढें बातमीकरितां मुजरद माणसें मुंबईस ठेविलीं आहेत. पक्कें वर्तमान आधिक आगळें आढळल्यास वरचेवर हुजूर लेहून पाठवितो. श्रीमंत राजश्री नानास्वामींकारणें मोह्यांचीं शाहाळीं व चुना खब्याचा पाठवावा म्हणान लिहिलें. त्याजवरून दाहा शाहाळीं मोह्यांचीं साला-सुद्धां व दोन घागरी चुना खब्याचा पाठविला आहे, व पत्र लिहिलें आहे, तें रुजूं करून उत्तर घेऊन पाठवावें. आपण श्रीत्रिंबकेश्वरी यात्रेस जाणार. तेथून आल्यावर कामेंकाजें करून घेऊं म्हणोन लिहिलें. त्यास आपले निघावयाचे कधीं तें कळवावें, व आल्यानंतर कामाकाजाची सोई करून घ्यावी. वहिवाटीचे कागदपत्र लौकरच रवाना करितों. कळावें रवाना छ २१ रमजान, बहुत काय लिहिणें लोभ करावा हें विनंती.

येशवंतराव शिंदे याचे रामराम. विनंती लिहिलें परसोन लोभ करीत जावा. दादा, आपण श्री चे यात्रेस कदीं जाणार तें ल्याहावें हें विनंती.

¶*Anandrao Sindia, Killedar of Rewdanda, writes to Subhedar Bhikajipant about Dadasaheb going to Salsette, and casting some guns. The writer sends some articles for Nana Fadnis.*

No. 14] [28-9-1774

छ २७ रज्जब.

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती आज्ञाधारक चिमाजी माणकर नामजाद तालुके अंजणवेल विज्ञापना तागायत छ २१ माहे रजबपावेतो सेवकाचें व किले हायेचें व प्रांत मजकूरचें वर्तमान येथास्थित असें विशेष. छ ६ रजबेचे आज्ञापत्र सादर, तेथें आज्ञा कीं "इंग्रजानी तहाप्रमाणें चालावें, तें न करितां लबाडी करितात; सरकारचे आरमार पो च्यार मंज्या धरून नेल्या. सरकार तालुक्यांतील आरमाराची व इंग्रजाचे आरमाराची गांठ पडिल्यास मारागिरी करितो, येविसीं पारपत्य इंग्रजाचें जालें पाहिजे; व मुबादला जाला पाहिजे. तरी तुम्ही सावध राहून इंग्रेजी कौली

तरांडी व कोपीनीचे तरांडे जेथें सांपडेल तेथें दस्त करून आणावे. गांठ पडिल्यास मारामार करावी. आपलें वजन राखोन, काव्यादाव्यानें जेर करावा. इंग्रजाचे आरमारासी गाठ पडतां वायावरी राहून खबरदारीनें हमेशा असावें. तालुके मजकुरचें आरमार साष्टीचे आरमारांत सामील करणें म्हणोन आज्ञा." त्यास हालीं इंग्रेज दुर्बुधीस आहे. अंजनवेलीचे बारेयावरून हमेश आमदरफ्ती त्याचे आरमाराची लागलीच आहे. यास्तव तालुके मजकुरचीं आरमारी गलबतें चौकसीस ठेविलीच आहेत. त्यास पेसजी हुजरून आज्ञापत्र सादर, तेथें इंग्रेज लबाडी करितो. याजकरितां चौकस बातमी राखोन खबरदार राहणें म्हणून आज्ञा. त्यावरून आज्ञेप्रमाणें तालुके मजकुरची आरमारी गलबतें सामानसुधां तयार राखोन, बारेयाची वगैरा रहदारीचे खबरदारीस ठेऊन, हमेश चौकसी करून बातमीत आहोच. त्यास हालीं आज्ञा कीं इंग्रेजी कौली तराडे व कोंपीनीचे तरांडे सांपडेल तेथें दस्त करून आणावे, आथवा गांठ पडिल्यास त्याजवरी मारागिरी करावी म्हणून आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणें आरमारी गलबने पाठऊन वायावरी राहावयास सांगोन, गांठ पडेल त्याप्रमाणें तरांडी खस्त करऊन; आथवा त्याजवरी मारगिरी करवितों. माना पडेल त्याप्रमाणें स्वामी सेवेसीं चुकणार नाहीं. तालुके मजकुरचे आरमार साष्टीचे आरमारांत सामील करणें म्हणून आज्ञा. त्यास साष्टीचा पला फार दूर आहे. येथील आरमारी गलबते तिकडे गेलियावरी इकडील दर्यातील चौकसी येथास्थित होणार नाहीं. येथील आरमार येथें असिल्यानी चौकसी चांगली राहून शत्रूस दबाव पडेल. तालुके मजकूरचे सनिध जंजिरे सुवर्णदुर्ग आहे. प्रसंगोचित इकडील आरमार तिकडेस सामील होईल; व तिकडील आरमार इकडेस सामील होईल. येणेकरून प्रसंगी स्वामीकार्ये होऊन, दबदबाहि पडेल. शेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶In reply to the Peshwa's letter that the English have assumed a hostile attitude and have acted in contravention of terms previously agreed upon, Chimnaji Mankar writes that he has kept a strict vigil on English ships sailing near Anjanwel

---

No. 15] *Date (?)*

श्री

राजश्री नारोपंत स्वामीस

विनंती उपरी आज अणाकडून पाठीमागें तोंड लागलें, यामुळें इंग्रजाची स्वारी पुढें आली म्हणून तुम्ही सांगितलें; तेथून माघारी फिरली. आम्ही गोल्याचा मार चुकवून आहों. तुम्हास बुनगे उमरखिंड पार करावयास सांगितलें होते.

त्यास सडे स्वारीचे बुनगे तुम्ही खोपवलीजवळ असणें. त्ररकड बुनगे उमरखिडीनें लाऊन देणें. इंग्रजाचा मुकाम कोणें जागां होतो हें कळेल तसें लिहून पाठऊ त्याप्रमाणें करणें, हें विनंती.

¶*This is a note (from Haripant Phadke) to Naropant Nana mentioning the movements and plans adopted by the writer for fighting against the English.*

No. 16] *[26-11-1774*

श्री

पौ छ १८ रमजान

कार्तिक मास

शेवेसी बच्याजी विश्वनाथ विज्ञापना. छ २२ साबानचें आज्ञापत्र सादर ते छ १४ रमजानी पावलें. फिरंगी खाली आला आहे. सरकारचे येखादे स्थळाचे गळी पडणार. तुम्ही हुशार राहाणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रा येथेहि टोपकराची बातमी राखोन हुशार आहो. ताले श्रीमंताचे थोर आहेत. आम्ही सेवक लोक मेहनतीस अंतर होणार नाही. श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Bachaji Vishvanath writes that he is quite prepared to meet the English.*

No. 17] *[10-12-1774*

श्री

पौ छ ११ सवाल सुा खमस

मार्गसीर्ष गुरुवार दीड प्रहर

दिवस

आपत्ये बापूने दोनी कर जोडून सिर साा नमस्कार विज्ञापना. ताा छ ६ माहे सवालपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. अजम मोष्टीन पुणेयाहून निघाला तो छ ९ सवाली मुबईस येऊन दाखल जाला. तेच समई सारे कोशलकर मिळोन मजकूर ठराविला; आणि लाहान गलबते याजवर दारूगोळा गरनाळा च्यार हजार माणूस चढऊन तयार जाहाला आहे. कोणीकडे जाणार हे न कळे. लौकिकात गोव्याकडे जाणार म्हणौन आवाई घातली आहे. आतील बातमी साष्टीवर जाणार ही तहकिकात आहे. याचे शोधास नेहेमी माणसे ठेविली आहे. आज्ञा होईल त्या अन्वयाची पैरवी करून. आपणास यावयास हिम्मत लागोसारिखे

असल्यास, लोक काही रवाना करावे, अगर वडिली सत्वर यावे. भोमवारी हाकारणी करून जाणार. बहुत काय लिहिणे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer Bapu reports that Mostyn reached Bombay and the council immediately decided on hostilites and have fitted out the fleet.*

No. 18] [*11-12-1774*

पौ छ १८ सवाल सन
खमस मार्गसीर्ष

श्री

श्रीमंत राजश्री नाना
साहेबांचे सेवेसी

विनंती सेवक जानराव धुळप मुा जंजिरे विजयदुर्ग कृतानेक दंडवत विज्ञापना. ताा छ ७ सवालपावेतो आपल्या कृपेकरून येथास्थित आहे विशेष. रा लक्ष्मण वासुदेव यासी बालापुरच्या हिसेबाविसी आज्ञापत्र घेऊन जासूद आले. ऐशास आज्ञापत्र आल्यापूर्वीच त्यास रवाना करणार होतों; परंतु त्याचे शरीरीं अनारोग्य बहुत आहे. आरोग्य जाल्यावर सेवेसी पाठऊन देऊं. फिरंगी गोवेकर काफला घेऊन समागमे लडती फरगतें साहा व गलबते दाहा याप्रो उपरप्रांते दिवस जावयाकरिता निघोन गेला. त्याच्या पिछावर पाल दोन व गुराबा तीन व गलबतें सात देऊन तीर्थस्वरूप राजश्री कृष्णाजी धुळप यासीं रवाना केले आहेत. सेवेसी कळावे म्हणोन लिहिलें आहे. मागें गोव्यास फिरंगी याच्या सरई च्यार व पाल व गलबते तयार आहेत. दुर्बुध्धीवर आहे म्हणोन बातमी आहे; परंतु कोणीकडे जाणार ही बातमी नाही. याजकरितां आम्ही पाल तीन व सात गलबतें तयार करून बंदरात आहों. जिकडेस त्याचा रोख द्रिष्टीस पडोन येईल त्याअन्वये त्याच्या पिछावर आहों. सुवर्णदुर्गचे अरमार व वसईचे अरमार आम्हांबरोबर चाकरीस नेमिले आहे, परंतु अद्याप आलें नाही. याजकरितां तेथून त्यांजकडेस आज्ञापत्र व हुजुरे पाठऊन सत्वर दोन्ही अरमारें येत ते करावी. समई आल्यावर उपयोगी पडतील. यास्तव निक्षूण ताकीद होऊन अविलंबे येऊन पोहचत ते करावे. श्रीमंताच्या पुण्यप्रतापेकरून शत्रू हतवीर्य आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Janrao Dhulap informs Nana Fadnis that Lakshman Vasudeo would soon be sent to the addressee with the accounts of Balapur, and that the writer has been closely watching the movements of the Portuguese fleet.*

5767

No. 19] [12-12-1774

पौ छ ११ सवाल गुरू-
वार प्रहर दिवस

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विनती सेवक आनंदराव राम चरणावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना. ता छ ८ सवाल मध्यानरात्रपावेतो येथास्थित असे विशेष. मुंबईकर इंग्रज तयारी करून साष्टीचे खाडीत आला आहे. साता कोसावर आहे. पुढे येणार याप्रो वर्तमान आहे. येथील भरतीचा विचार स्वामीस विदितच आहे. उदईक साष्टीस दाखल होणार. स्वामीनी कुमक केल्यास थल राहाते. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶The Peshwa is informed by Anandrao Ram of the advance of the English forces from Bombay through the Salsette creek, and is requested to send more men to save the place (the fort of Thana).

No. 20] [13-12-1774

पौ छ ११ सवाल सुा खमस
सबैन मार्गसीरष मास गुरुवा
सायंकाळ

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे
शेवेसी

विनंती सेवक बाजी गंगाधर मो किले बेलापूर चरणावर मस्तक ठेऊन सीर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ ९ माह सवालपावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे व प्रा मारचे वर्तमान यथास्थित असे विशेष. छ मारी प्रात:काली इंग्र(जा)ची थेत फरगते ७ व गलबते लहान लढवई व दारू गोला भरून अजमासे पाऊणसे आसीपावेतो साष्टीवर गेली. याखेरीज सिवचे तरीने माणूस आजमासे हजार पंधरासे आले म्हणौन बातमी आहे. हुजुरून राऊत आले ते कलवियाचे तलेयावर आहेत. पलीकडे गेले नाहीत. मागाहून गलबताची तयारी होऊन दुसरी गलबते बालापूर उरण येथे येणा(र) म्हणौन बातमी आहे. बालापुरास लोकाची भरती आहे ती स्वामीस विदितच आहे. वरकड स्वामीचे

पुन्यप्रतापेकरून साहित्य याजसमधे खबरदारीस अंतर नाही. भरतीयास लाक- घात्रयाची आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Baji Gangadhar informs the Peshwa of the English fleet landing at Salsette (Thana) some 1,000-1,500 men.*

No. 21] [*13-12-1774*

पौ छ १२ सवाल भृगू-
वार दोन प्रहर दिवस
नकल

श्री

सेवेसी माधवराव गगाधर व गणेश बाबाजी साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। मार्गसीर्ष शुा ११ येकादसी मंगलवार च्यार घटिका रात्रपावेतो यथास्थित असे विशेष. साष्टी येथील वर्तमान तरी इंग्रजाचे माणूस आज दोन प्रहरी बांद्राचे बंदरीपासून चेंदणीपर्यंत बंदरोबदरी पाच सात हजारपर्यंत उतरले. बारा हजार पायाचे माणुसांची आवाई आहे. तेहि उतरलेच असेल. आरमार शे दीडसे तरांडी लाहान मोठी तुरब्याचे बंदरी आज (नांग)रली होती. रात्रीचे पाण्यास चेंदणीचे बा(न्या)वर येणार. पायाचे माणूस उतरले त्याचे तोंडावर गोविंदपंत हशमनीस पाचशे माणूस व अडीचशे राऊत घेऊन चेंदणीचे बंदरी गेले आहेत. गोळा-गोळी होऊ लागली आहे. येशवंतगडचे बान्यावर दोन पाल नेहमी ठेविले आहेत. तेथेहि गोळागोळी सुरू जाहालीच असेल. साष्टी शहर झाडून उदवस्त जाहाले. आनंदराव याचे व किलेकरी याचे सख्यत्व होऊन, आनंदराव यास किल्यात नेले. किल्यात भरणा म्हणावा तर सात आठशे माणूस आहे. सुभा भरणा कमी यावरून समय कठिण आहे. फिरंगीहि वसईवरी हाकरणी करून वसईचे बान्यावर आरमार गेले आहे, तेव्हा तिकडीलहि प्रकार कठिण दिसोन येतो. इंग्रजास हबसी सामील आहे; तरी यासमई कुमक जाहाली पाहिजे. यास्तव आपण हजार दोन हजार राऊत व हजार दोन हजार पायाचे माणूस ऐसे घेऊन रात्रीचा दिवस करून पोहचावे. चेंदणीचे बंदरी तरांडी इंग्रजाची येऊन पाऊणसे नांगरवांडा जाहाला. लढाईचे काम सुरू. आज सायंकालापासून प्रारंभ जाहाला. सेवेसी कलावे म्हणौन लिहिले असें. कुमक येसमई सत्वर जाहाली पाहिजे; तर घेऊन लवकर यावें. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापि. येकादसी मध्यरात्र.

¶*Madhavrao Gangadhar and Ganesh Babaji ask for reinforcements in view of the increasing strength of the English Army and the assistance that is promised to them by the Sidi.*

5769

No. 22] [14-12-1774

पौ छ १२ सवाल सुा
खमस सबैन मार्गसीर्ष
भृगुवार दोन घटका रात्र अवसीची

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक आनंदराव राम चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञा(पना.) ताा छ १० माहे सवालपावेतों स्वामीचे कृपावलोकनेंकरून येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. काल छ ९ मंगलवारी इंग्रज प्रात:काली खुसकीनी व जलमार्गे निघोन आला; व नित्य येतच आहे. सामान लढाईचा बेहद घेऊन आला. काल प्रहरा दिवसास उतरला. ते समई चेंदणीस राजश्री गोविंद हरि लोकसुधा गेले. समागमे माणूस दोन सवा दोनसे. त्याचें माणूस फार; तथाप लढाई दिल्ही. दाहा पांच जखमी ठार जाले. उपरांत निघोन आले. काल संध्याकाली राजश्री जोत्याजी जाधवराव खुद स्वार निवडक घेऊन आले. दुसरे पथक व राजश्री सिवराव हरि इतके सामान आल्यावर गोविंद हरि हशमी लोक आहेत, ते घेऊन जाधवराव यांस घेऊन उपराल्यास आहेत. रणगाडे व तोफा व गरनाला सामान बेसुमार आले. आम्हांकडील मजकूर तरी, वसईस व कल्याणास परवा लिो तथाप येथ माणूस पाठविले नाही. बेलापूरकरानी कलवे व परसिक बलवावें तेहि नाही. कोठवरी ल्याहावें? आम्ही कोटांत आलों. सर्व येकदील जाहालों. कांही लढा नाही. इंग्रेजानीं हवालदाराचे नावें पत्र पाठविलें, त्याची नकल पाठविली. मोष्टीन इंग्रज मात्रागमनी, आल्यावर हा विचार सिध्ध केला. फौज लौकर यावी ते येत नाही. कोणता प्रकार म्हणावा. येथील लोक व आम्ही सर्व हिमत सोडीत नाही. स्वामींचे पुण्ये प्रतापें जागा काबीज राखून लढतो; परंतु आगीचे सामान मातबर; आत कपनी (?) फार नाहीं. मारून मरावे हा तर निश्चय आहे; परंतु स्वामीचे राज्य समर्थ, आण या नसरुडाचे पारपरत्य न जालें तर ठीक नाही. हाली येकवेल नजाती (नतिजा?) दिल्यावर हालखुद राहील. पुन्हा लबाडीचे ढंग करणार नाही. मुंबईहून सामान व लोक झाडून आले. अशा समयांत अरमार अंगर माहागिन्यात वसईकडून अगर सरकारचे आरमार येऊन जालपोल करावी, शह बसवावा, यैसाहि समय आहे; परंतु फिरंगी येणार यास्तव बनल न बने, न कले; परंतु सुचला विचार लिहिला आहे. यासमई फौज व हशाम चहूंकडील रवाना करावे: पच-

त्रीस हजार रुा रोख कल्याणाहून अगर हुजरोन देवावे पाठवावे. कल्याणाहून सामान सरंजाम आम्ही लेहू ते द्यावे. रा राघोजी आंगरे सरखेल यांस ताकीद होऊन, त्याणी अरमारसुधा वसईचे खाडीतून यावे. ताकीद व्हावी. दाहा हजार रुा कापड देवावे. येथील रसद वेतली. भात विकोन पैका करावा तर समये असा जाला. येक रोजमरा लोकास पावला. तीन रोजमरे पावणे. यास्तव पैका व कापड द्यावयाचीं आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. राजश्री गोविंद गंगाधर दिवाण व बालाजी माहादेव फडणीस कल्याणास ठेविले. हे तेथून पत्रे लिहितील त्याप्रो देवणार धणी आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Anandrao Ram complains to the Peshwa of the scarcity of provisions and requests him to send reinforcements and a squadron of fleet to attack the English to distract their attention.*

No. 23] [*14-12-1774*

पौ छ १४ सवाल
सन खमस

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामींचे शेवेसी

पो विसाजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १० सवालपावेतो येथास्थित असे विशेष. रा तुलाजी आंगरे याचे मूल पलाले. त्याजविसी लिहिले. त्यावरून तमाम बंदरकिनाऱ्याचा बंदोबस्त केला आहे. व श्रीमंत मातुश्री बाई याजकडील जलालपुरी जिनस पाठवावयाविसी आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणे जि(नस) पाठवितो. विसापूर पाहाडी किला, तेथून (तुला)जीचे पुत्र पलाले आर्चिय (आश्चर्य) वाटले. किलेकरी व चौकीदाराचें पारपत्य जाहाल्याविन्हा सलाबत राहाणार नाही. तमाम घाटोघाट व बंदरकिनारा व चोरवाटा व हरामखोराचे गाव जागा जागा आहेत तेथे चोरबातम्या याची पैरवी करून खबरदारी करविली व पुढे करितो. श्रीमंताचे तेज्यापुढे काही चिंता नाही; परंतु गाफीलपणा शत्रूस दिसोन आला. स्नेहाचे रितीने लिहिले. स्वामीस इतके त्याहावे इतकी योग्यता नाही; परंतु घरो(ब्या)ने लिा आसे. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Visaji Keshav informs Nana that all possible precautions have been taken for the defence of the coast and adds that he was surprised to learn that Tulaji's son had escaped.*

No. 24] [15-12-1774

पौ छ १९ सवाल

मार्गसीर्ष मास

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता छ ११ सवाल पावेतो येथास्थित असे विशेष. इंग्रेज मुंबईकर तयार होऊन साष्टीवर येणार येविसी बातमी आली, तेच पत्र बजिनस प्रातःकाली स्वामीकडे रवाना केले ते पावले असेल. त्याजवर प्रातःकालापासून उरण बेलापुर येथून पत्रे आली, तीच बजिनस स्वामीकडे रवाना केली आहेत, त्याजवरून निवेदन होईल. साष्टी(वर) * * * आला येविसीचे बातमीत आहे. तेव्हा मातबर कुमक जलद पोहचली पाहिजे; याजकरिता राजश्री विसाजीपंत बिनी यास पथकसुधा येक हजार पावतो अजमासे फौज आहे, त्यास निकडीचे लिहून पाठऊन चहु दिवसात साष्टीस जाऊन पोहचावे याप्रो केले आहे; व त्याजबरोबर दीडसे पावेतो गाडदी व पाचसे माणूस याप्रो येथे तयार केले आहे. देतो. मारनिले पथक सुधा येथे येताच रवानगी करितो. स्वामीनी पूर्वी वाघोलीकर जाधव याचे पथक व सिवराव हरीकडील पाऊणसे राऊत पाठविले आहेत. ते साष्टीनजीक पोहचलेच आहेत. येथून अस्त्या सामानात कुमक पाठवावयास कमी करीत नाहीं. येथील रावतापैकी [येक ओळ फाटली] पावतो राऊत विसाजीपंताबरोबर देतो; आणि त्याची रवानगी करितो. राजश्री रामराव त्रिंबक याणीहि कल्याण तालुक्यापैकी व सरसुभापैा मिळोन अडिचसे माणूस पाईचे व खंडेराव बर्गे याचे पथक ऐसी साष्टीस रवाना केले. वरघाटचे किल्याचे माणूस जमा करून रवानगी करावी तर, वरघाटी कोल्याचा दंगा यास्तव वरघाटचे माणूस आणीत नाही. सेवेसी श्रुत होये. विसाजी कृष्ण यासी तेथूनहि पत्र पाठवावयासी आज्ञा जाली पाहिजे हे विज्ञापना.

¶[*Naro Appaji writes (to Nana Fadnis and Sakharam Bapu) that arrangements are being made for sending fresh contingents under Visaji Krishna to drive away the English who have invaded Salsette.*

5772

No. 25] [*15-12-1774*

पौ छ १४ सवाल सन
खमस सबैन रविवार
तीन घटका रात्र सायंकाल

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेशी

विनंती सेवक येसाजी सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ११ सवालपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. वेदमूर्ति राजश्री धोंडभटजी पुराणिक याची रवानगी केली ते छ ९ मिनहूस लोकसुधां येऊन पावले. बहुत आनंद जाला. मुंबईकर इंग्रेज अडीच तीन हजार सरंजामसुध्धा साष्टीस उतरला. मारगिरी होत आहे. * * (बात)मी छ १० रोजी कळली, व राजश्री आनंदराव याचेहि पत्र ठाण्याहून आलें. त्याच वेळेस पांचसे साडे पांचसे माणूस निवडक चांगले व सरदार मातबर मर्द माणूस केले कामाचे ऐसे वेदमूर्ति राजश्री पुराणिकबावाबराबर देऊन रवाना केले. ते आजच ठाण्यानजीक टापूत उतरले. इंग्रेजहि पोख्ते सरंजामानी आला आहे; व सुरतेहूनहि काही कुमक दुसरी आणविली आहे. आठ फरगते थोर, च्यालीस पनास लाहान पतेमाऱ्या बराबर आणिल्या आहेत. तथापि स्वामीचे पुण्यप्रतापेकरून पराभव पाऊन जाईल, व फिरंगी याची बातमी दाट आहे कीं, वसईवर यावे, व वाऱ्यावर तीन च्यार तरांडे * * * * रे करितात. समई उतरावयास चुकणार नाहीं. बेहडयाचे भरण्याचा प्रकार तर समजलाच आहे. त्यात सालमजकुरी काहीं लोकाचा भरणा कमज्याजती जाला आहे, याअन्वये येथील बंदोबस्त राखून तूर्त साष्टीवर नेट भारी या अर्थे साऱ्यानी तेथे सामील व्हावे या विचारें तिकेडे लोक पाठविले. वेदमूर्ति माारनिले याचे व साष्टीकराचे विचारे मोर्च्यावर घालणे, अथवा कोणीकडोन तोंड लावावयाचें युक्तीस येईल तसें लावितील. चिंता आहे ऐसें नाहीं. शत्रु हतगर्व होईल; परंतु राऊत व हशमी लोक साष्टीस सत्वर येऊन पावावयाची आज्ञा जाली पाहिजे. साष्टीहून सामानाची याद आली, त्याप्राा वर्चेवर रवानगी केली. पुढें सामान जें लागेल तें रवाना करीन. सारांश आधी साष्टीचा पुस्तपन्हा फार जलदीनें जाला पाहिजे. कदाचित इकडे नेट जाला तरी आहेत लोक तितक्यानी बंदोबस्त चांगलाच केला आहे; व साष्टी व वसई लागतीच आहे.

जिकडे नेट जसा पडेल तसे तिकडे पावतील; व जदीदहि माणूस चांगले मिळाले तरी दुसरे ठेऊन रवाना करीन. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

हे विज्ञापना.

¶*Yesaji Sivdeo requests the Peshwa to supply men and provisions to resist the English who had received reinforcements from Surat. The writer further states that the Portuguese, it is understood, intend to attack Bassein.*

No. 26] [*15-12-1774*

पौ छ १३ सवाल सुा
खमस तिसरा प्रहर.

नकल.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक बाजी गंगाधर मुाा बेलापूर चरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ११ सवाल पावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून किले माचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. इंग्रजाचे आरमार जंजिरे साष्टी येथे आले. पानवटे सरकारचे बातमीचें गलबते मुंबईस पोहोचत नाही; परंतु सावकारी गलबतावर शाहाणा माणूस ठेऊन, बातमी वरच्यावर आणितो. छ १० सवाली प्रहर रात्रीस मुंबईचे व साष्टीचे दोन पत्रे बातमीची आली. मुंबईचे पत्र रणसोड कृष्ण याचे आले तेच शेवेसी पाठविले आहे व साष्टीचे पत्रहि पाा आहे. साष्टीचे बुरजास पाण्याचा तोटा आहे. त्यास पाणी व सरंजाम जो लागेल तो पोहोचाऊन देतो. छ १० सवाल मध्यरात्रपावेतो टोपीकराचे लोक दरीवर उतरले नाहीत. खुसकीने लोक आले होते ते शहरात दाखल होऊन सरकारचा वाडा काईम केला होता, त्याजवर किलेकरानी मारगिरी करून तेथू(न) लोक उठऊन लाविले. किलेकरी याची बलकटी चांगली आहे. स्वामीचे पुण्य समर्थ आहे; तरी नसरुडाचे पारिपत्य लौकरच होईल. कोकणांत या प्रसंगी जलदीने नवे सिपाई लोक चाकर मिलत नाहीत. प्रेत्नात आहो. हुजुरून हजार पंधरासे माणूस जलदीने येऊन पोहोचते तरी गोष्ट उतम. राउताची सलाबत फार आहे. रात्रीचा दिवस करून चालावे; आणि जलदीने पोहोचावे याप्राो आज्ञा करून राऊत व हशमी लोक जलदीने पोहोचत ते कर्णार धन समर्थ आहेत. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Baji Gangadhar supplies to the Pehswa news about Salsette. He also mentions the efforts made by him in collecting men.*

No. 27] [15-12-1774

पौ छ ११ सवाल सुा
खमस सबैन गरुवार

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण सां नमस्कार विनंती ताा छ ११ सवाल वर्तमान येथास्थित असे विशेष. जासुदाबाा पत्र पाठविले ते आस्तमानी च्यार घटका दिवसास पावले. पत्रातील मजकूर पाहता आजच निघोन रातोरात यावे ; परंतु केवळ आस्तमान जाहला. रात्रींचे यावे तरी पुणियात तोफेचा पेच, यास्तव आज न आलो. आज्ञेप्रमाणे प्रात:कालीच निघोन येतो. मग जो विचार ठरावणे तो ठरावावा ; त्या प्राा वर्त(णू)क होईल. रा गुरुवार त्रयादसी आस्तमानचा दोन आडीच घटका दिवस संध्याकालचा शृत होये हे विनंती.

¶*Visaji Krishna regrets that he could not proceed direct to Poona by night on account of the difficulty of getting an entrance after the gun had been fired and says that he would start in the morning.*

No. 28] [Recd. 15-12-1774

पौ छ ११ सवाल गुरुवार
तीन प्रहर दिवस सन
खमस.

नकल.

श्री

आर्शीर्वाद उपरी. पुणेयाहून इंग्रज निघाला तों फार जलद दोहो दिवशीं खाली येऊन रातोरात मुंबईस गेला. तेथें जातांच सारे कोशलदार जमा करून मनसुबा करोन लढवई सामानाची तरतूद करूं लागला आहे. मोर्चेबंदीचें सामान वाळूचें ठेले वगैरें फारच सामान तयार केलें आहे. गलबतें लाहान सजलीं आहेत. माहीम डोंगरीचे किल्ल्यावर सिपाई सरकारचे होते ते नेऊन सदरील ठिकाणीं वतनदार भंडारी व किरस्ताव ठेविलें आहेत. याप्रमाणें वर्तमान आहे. बाजारीं वर्तमान आहे, कीं गोवेंयाहून फिरंगी याजकडील संकेताचीं पत्रें येणें त्याची मार्गप्रतीक्षा करीत आहेत. सामान पोख्त केलें आहे. शामलही राजापूरकर सरंजामासुद्धां तयारींत आहेत. कोठें जाण्याचें हें तथ्य कळत नाहीं. सविस्तर बजिनस पत्र श्रीमंत नारोपंत नानास दाखवावें. लोभ करावा हें विनंती.

¶*The writer reports that the English envoy (Mostyn) hurried to Bombay and had a discussion at the meeting of the Council. Thereupon preparations were made for starting hostilities. The Sidi of Rajpuri was also fitting out an expedition, but his destination was not yet known.*

+ थैले.

No. 29] *[15-12-1774*

पौ छ १९ सवाल

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ११ सवालपावेतो येथास्थित असे विशेष. इंग्रेज मुंबईकर याजकडील माष्टीन पुण्यात होता तो निघोन गेला येविसीचे वर्तमान पूर्वी लिा आहे. त्यास लेन येक मजल पोहोचवावयास म्हणोन गेला तोहि बरोबरच मुबईस गेला. मुबईस गेल्यावर * * * करून साष्टीपासून साता कोसावर येऊन राहिला आहे. पुढे येणार म्हणौन येविसीची बातमीची पत्रे साष्टीहून व उरणाहून पत्रे आली तीच बजिनस स्वामीकडे पाहावयास पाठविली आहेत, त्याजवरून निवेदन होईल. येथून साष्टीस कुमक पाठवावयाची तजवीज केली आहे. गाडदी व हशम व राऊत शे पनास रवाना करितो, व राजश्री विसाजी कृष्ण फौजसुधा सासवडाजवल आहेत, त्यासहि पत्र पाठविले आहे. त्याजकडून सरदार पथकसुधा येतील. तेहि साष्टीकडे रवाना करितो. बाण तोफखाना पौ से दोनसें पाठऊन देतो. वरकड जागा विजेदुर्गास व रत्नागिरी, अंजणवेल, सुवर्णदुर्ग येथेहि खबरदारीविसी पत्रे पाठविली आहेत; व धुलपास आरमार तयार करून तुम्ही विजेदुर्गचेच नस्तावर राहून फिरंगियाची तयारी कसकसी आहे ते बारकाईने * * * * णून खबरदार राहाणे. फिरंगियाची तयारी नाही असे तें कलल्यास कांही आरमार तुमचे विचारे जाहाल्यास साष्टीकडे रवाना करणे हणौन त्यासहि लिा आहे. वसईस खबरदारीविसी व कुमक साष्टीस काम पडल्यास पोहचवावयाविसी लिा आहे. राजश्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल ासहि आरमारसुधा आपण खाशानिसी जलदीने साष्टीजवल जाऊन पोहचावे हणौन लिा आहे. मागाहून बातमी येईल ते वरिचीवर स्वामीकडे पोहचवित ाऊ. सारांश दुसरी बातमी पकी येईल त्यासारखे राऊत विसाजीपंताकडील गैरे पाठवावेसे जाल्यास, सुमार पाहून रवाना करू. वरकड हशमी माणूस व ापूजीपंत व गाडदीहि तयार केले आहेत. बातमीसारखे रवानगी करितो. वसी श्रृत होये हे विज्ञापना

¶Naro Appaji reports how immediately after the departure of Mostyn and is assistant Lane hostilities were started by the English and what measures e had taken to stop their advance.

5776

No. 30] [16-12-1774

पौ छ १२ सवाल च्यार
घटका दिवस सायंका-
ल सन खमस.

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण सां नमस्कार विनंती ता छ १२ सवाल वर्तमान यथा-स्थित असे विशेष. इंग्रजाने दुष्ट बुध्य धरून साष्टीनजीक सरंजामसुधा आला आहे. साष्टीत सरंजाम पोख्त नाही, यास्तव तेथील कुमक करावी लागते. यास्तव जी फौज जमा जाहाली असेल त्यासुध्धा कूच करून, पुणियास येणे म्हणून सरकारचे आज्ञापत्र आले, व आपणहि सूचनार्थ लिा ते कळले. ऐसि-यास निकडीचे चाकरीविसींची आज्ञा आलियावरी आलस करिता नये, व आपणहि बुध्धिवाद लिा त्याजवरून सारे लस्करचे कूच करऊन आज संगम यावर मुकाम करविला आहे. आम्ही आपले भेटीस येतो; उपरांत गोटात जाऊ. मग आपली आज्ञा होईल त्याप्रा वर्तणूक करूं. श्रुत जाले पा. रा सुक्रवार दीड प्रहर दिवस, आपले पत्र आल्यापूर्वीच कूच्याचा नगारा करून कूच केले तों आपली पत्रे आली. आम्ही आणखी च्यार घटकानी चालू. तिसऱ्या प्रहरास आपल्यापासी येतों हे विनंती.

¶*Visaji Krishna, as instructed, arrives at Poona with a view to proceed to Salsette against the English.*

No. 31] [16-12-1774

पौ छ १२ सवाल सन
खमस सबैन मार्गसीरष मास.

श्रीगणपति.

राजश्री नारो आपाजी स्वामी गौ

विनंती उपरी. साष्टीवर इंग्रज तयार होऊन येणार, येविसींच्या दोन च्यार बातम्या आल्या. तिकडे कुमक केली पाहिजे. तेथील पत्रे कुमकेविशी निकडीची आली आहेत. याजकरिता राजश्री विसाजी कृष्ण यांस पथकसुधां यावयाविसी पत्र पाठविले आले. त्यांची खानगी केल्यानें दबाव पडोन पारपत्य होईल. त्यास त्यांची फौज सारी जमा जाली नाही. यास्तव दोनशे राऊतपावेतो पुरंधरचे फौजेपैकी पाठवावे म्हणौन तुम्ही लिहिले ते कळले. ऐसियासी राऊत पाठवाव-याविसी रात्रौ तुमचे पत्र आले. त्याजवरून आज प्राथःकाली पनास राऊताचे

पथक पुरुषोतम सदासिव यांची रवानगी केली. ते निघोन गेले. हालीच पत्रावरून आणखी शंभर राऊताचे पथक, गंगाधर अनंत यांचे, येथील नेमणुकीचें, मारनिले कालच येथे आले, त्यांस निकडीने पुणियास जावयाची ताकीद जाहाली. तेहि आजच निघोन येतील. येकूण दोन पथके दीढशे राऊतांची तुमचे लिहिल्यावरून रा केली असेत. जाणिजे छ १२ सवाल सुा खमस सबैन मया व अलफ हे[+] विनंती.

¶Naro Appaji is informed that Purushottam Sadashiv and Gangadhai Anant have been despatched to join Visaji Krishna proceeding to Salsette.

No. 32] *[16-12-1774*

श्री

जबानी बापू जोशी वेलासकर. आपण साष्टीहून काल गुरुवारी प्रात:काली निघालो ते सुक्रवारी सा घटका रात्रीस पुणियास आलो. तेथील साष्टीस इंग्रजाकडील वर्तमान तरी, सोमवारी मुंबईहून सात गलबते थोर व लहान यैसी गलबते सामानसुधा निघाले ते मंगलवारी येकादसीस दोन प्रहरी तुर्बा याचे आलीकडे ठाण्यानजीक सांवरीचे बंदर आहे तेथे खासा व गारदी दोन हजार व दारूगोळा रणगाडेसुधा व गरनाला सामान भरपूर याप्रो उतरले. सीवचे बंदर आपले खुसकी कुरले याचे नजीक दोन हजार गारदी उतरले. येकूण च्यार हजार गारदी उतरोन आले. त्याचे उपरालेस आपले तीनसे माणूस व शंभर राऊत जाधवाकडील तोंडावरी गेले. तेव्हा त्यांची यांची भेट होऊन मारामार जाहली. दाहावीस माणूस त्याजकडील पडले. त्याजवरी, त्याणे जोरा करून शाहारची घरे आसरा धरून नजीक भिडला. सरकारवाडा व इतर भोवारची घरे आसरा करून किल्यावरी मारगिरी करीत आहे. किल्याचे उतरेचे आंगी गोविंद हरि तीनसे माणूस व राऊत शंभर येकूण च्यारसे माणूस आहे. वरकड आंग सर्व मोकले आहे. किल्यातील दोन वेला दोन तीनसे माणूस बाहीर पडोन त्याचे मोरच्यावरी घातले. घरास अ[१]घी द्याव्या म्हणौन निघाले. त्याजवरून त्याणी घराचे आसरेयाने मारगिरी करून दोन खासबारदार व दोन आरब ठार जाहाले; व दाहाबारा माणूस जखमी जाहाले. उपरांत किल्यातील माणूस किल्यात गेले. किल्यातील मारगिरी म्हणावी तरी दिवसात च्यारपाचसे तोफा सुटतात. घराचा आसरा बहूतेक मोडला; परंतु भिंताडचे आसरेयाने दबाव धरून आहेत. मारगिरी बहूत

\+ पत्र पुरुषोत्तम दाजी यांचे पुरंदराहून. १ आग लावावी.

बरकंदाजींची बुधवारपर्यंत करीत आहेत. तोफा अद्याप त्यांच्या लागू जाहाल्या नवत्या. याप्रो वर्तमान आहे.

¶[One Bapu Joshi arriving from Salsette to Poona narrates all that he had seen the English ships landing at Thana and the fighting going on there.

No. 33] *[16-12-1774*

श्री

नकल १०

जबानी बालाजी गणेश जोसी सिलेदार निा जयरामपंत बापट यैसीजे. आपण घोडा खरीदी करावयासी मुंबईस गेलो होतो, तेथील वर्तमान: मोष्टिन इंगरेज पुणियास होता तो मार्गसीर्ष सुध ७ शुक्रवारी प्रात:काली दाखल जाहाला. शनवार व आदितवारी तेथील इंगरेज लोकांच्या भेटी व बोलणे होणे ते जाहाले. सोमवारी प्रात:काली शहरातील चाकरमाने लोक व रयेत तमाम बोलाऊन किल्यात नेले. किल्यात न्यावयांसी कारण, जिनरालाची सनद विलाइताहून आली आहे ते वाचावयाचे निमित्य केले आणि विलाइताहून हुकूम जिनरालीचा आला होता तो वाचून दाखविला. त्या हुकुमावरून जिनराल सर्व टोपीकरास मान्य जाहाला त्याच समई किल्याचे दरवाजे बंद करून लोक जमा जाहाले ते कोंडून ठेविले व बाहेरील गलबतें व लहानथोर होडकीसुधां बंदरातून बाहेरी जातील तरी त्यासहि ताकीद करून बंद केली; व रिकामी गलबते होती ती तरती केली. हा कारभार (सोम)वारी दोन प्रहरपर्यंत जाहाला. संध्याकालचे प्रहरादिवसास मुंबई गुराब आहे ती हाकारून मुंबई उजवी घालून बाहेर गेली. त्याजवर दुडोली गलबते आठ हाकारून तुरंब्याच्या बंदरास गेली. सिपाई टोपीवाले गारदी नऊशे तांबडे सकलादीचे आंगरखेवाले बोटी गलबत आहे त्यात भरून रवाना केले तेहि तुरंब्यास गेले. पायमार्ग दोन प्रहरी पाचशे लोक, पैकी काल्या पागोट्याचे तीनसे व तांबड्या पागोट्याचे दोनसे, यैसे सीवच्या तरीस जमा जाहाले होते. ते दिवस मावलता साष्टीच्या टापूस उतरोन तुरंब्यास गेले. पाठीमागून साहाशे लोक दिवस मावलतां पागोटेवाले पिवळे पलटणीचे गलबतात बसोन तुरंब्यास गेले. मागाहून गोलंदाज व फिरकोल फुट लोक इंगरेज अजमासे तीनशें गलबतावर चढले तेहि तुरंब्यासच गेले. सोमवारी दोन घटिका रात्रपर्यंत याप्रमाणे रवानगी जाहली. मागाहून सरदार व डाकतर ऊर्फ वैद्य आसामी १० दाहा जखमाचे सामान गलबत येक भरून सरदाराच्या समागमे गेले. सरदार रवाना जाहाले त्यांची नावे बितपसील:

१ मुख्य सरदार मसलतीस ग्यारडी

१ ग्यारडीचे मागे कालकला लढाईत जाहला तर दुसरा सरदार वरसन.

२ वरसनचे मागे दोन सरदार आहेत त्यांची नात्रे ठाऊक नाही.

४

येणेप्रमाणे च्यार सरदार चहू गलबतावर प्रहररात्रीस बसोन तुरंब्यास गेले. त्याचे मागे जिनरालाचा कामगारीचा हुकूम मुंबईहून रवाना जाहाला तो सदरहू चहु सरदारांनी मुकामास तुरंब्यास गेल्यावरी वाचून पाहिला. तेथें हुकूम निघाला की साष्टीस जावे आणि काबीज करावी. हे वर्तमान आपण मुंबईत मंगलवारी सकाला ऐकिले. साष्टीचे रवानगीचे वर्तमान ऐकिले तेव्हा घोडा न घेता निघोन जावे ऐसा विचार करून निघावयाची सवड पाहून युक्तीने दोन प्रहरी मुंबईस भाड्याचे गलबत करून निघालो ते मंगलवारी सायंकाली दिवस मावळता शेवेंनावे म्हणून बंदर साष्टीचे दक्षणेस आहे तेथे गलबतावरून उतरलो. तेथून साष्टीचा किला व खाडी दिसत्ये. त्यासमई साष्टीचे जवळ तुरंब्याहून इंगरेज निघोन तीन कोशावरून आला तेव्हा साष्टीचे पाणबुरुजावरील तोफ जाहाली. नंतर मागाहून तोफा अजमासे शंभर दीढशेंपर्यंत जाहाल्या व रात्रीच्या तोफा राहून राहून होतच होत्या. आपण मंगलवारचे रात्रीस मौजे चिपले येथे आपले घरास आलो. बुधवारी प्रातःकाली घराहून निघालो तें कुसूरचे वाटपर्यंत येऊतो पावेतों राहून राहून तोफाचे आवाज आइकतच होतों. तेथे रात्रीस राहिलो तों सारी रात्र उज्याडेतोपर्यंत तोफा ऐकतच होतो. गुरुवारी प्रातःकाली कुसूरचे घाटाखालून निघालो तें घाट चढोन सतावीस कोश जमीन पुण्यासच आलो. याप्रो वर्तमान आहे. सोमवारी मुंबईतील लोक चाकरमाने व रयत वगैरे किलियात जमा केले होते. त्याजपासून जंगी सामान आरमारावरी चढविले तेव्हा लोक सोडून दिल्हे. याप्रो हकीकत आपणादेखत जाली. मिति मार्गसीर्ष शु १४ शुक्रवार दोन प्रहरी दिवस मुा पुणे. बुधवारी साष्टीची पेठ इंगरेजाने जालिली. मिति मजकूर.

¶*Balaji Ganesh describes all that he in his visit saw in Bombay—the preparations of the English, the landing of the forces at Trombay, the actual fighting of the two forces, etc. The writer also gives a detailed description of the dresses of the soldiers, their red coats and their black and yellow helmets, etc.*

5780

No. 34] [16-12-1774

पौ छ १७ सवाल

खमस

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १२ सवालपावतो येथास्थित असे विशेष. मुंबईकर इंग्रेज तयार होऊन साष्टीवर आला तो पाणबुर्जाजवल येऊन उतरला व मुंबईहूनच खुसकीने पाये-उतारा हजार बारासे माणूस आले येविसीची बातमी दोन तीन पत्रे काल प्रात:कालापासून आली ते सेवेसी रवाना केली ते पावलीच असतील. हा(ली बे)ला-पूर व कल्याण येथून पत्रे आली तेच बजिनस पाठविली आहेत, त्याजवरून कलो येईल. लढाईचे काम सुरु जाहाले. राजश्री विसाजी कृष्ण पथकसुधा आज आताच येथे आले; त्यासी बोलून त्याची रवानगी करितो. मुंबईहून बालाजी गणेश आला, त्याणे बातमी जबानी सांगितली. तिची यादी लिहून घेऊन आलाहिदा पाठविली आहे त्याजवरून सविस्तर निवेदन होईल. तेथून दोन हजार फौज रवाना जाल्यास उतम. येथे राऊत अद्याप जमा झाले नाहीत. येथून तूर्त सातसे राऊत तूर्त जातील याप्राा आहे. मागाहून जमा होतील ते रवाना करू; परंतु लौकर जलद जाऊन पोहचत असी पथके दोन रवाना जाल्यास उतम आहे. आनंदराऊ राम यांचे येक पत्र आले, पुढे ते लढाईच्या कामास गुंतले. पत्र येत नाही, त्यास लिा आहे, व डांकहि बसविली आहे. पत्रे याउपरी वरचेवर येतील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Appaji communicates to Nana and Sakharam Bapu the doings of the English at Salsette.*

No. 35] [16-12-1774

पौ छ २३ सवाल सुा

खमस सबैन

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १२ सवालपावतो येथास्थित असे विशेष. मुंबईकर इंग्रेज साष्टीस येऊन दाखल जाहला. कोटाजवल येऊन पेठेत मोर्चेबंदी केली येविसी राा आनंदराव राम याणी ठाण्यातून कागद लिहून पाठविला तोच बजिनस स्वामीकडे पाठविला आहे; व इंग्रेजाने भवानजी कदम हावालदार यांस पत्र लिहून किल्यात पाठविले * * * ची बजिनस नकल करून पाठविली आहे त्याजवरून त्यातील

मजकूर कळो येईल. साष्टीकडे इंग्रज येतो असे साष्टीस कळताच छ ८ सवालीचे कुमकेविसी पत्र पूर्वी आले ते स्वामीकडे पाठविले. त्याजवर साष्टीहून पत्रच आले नवते. यामुळे दिकत घाटली होती; परंतु हाली हे पत्र आले याजवरून साष्टीकराचा संशय राहिलासा दिसत नाही. साष्टीहूनहि पत्रे कारकून दोघे घेऊन आले आहेत. खर्चास पंचवीस हजार रुपये पाठऊन द्यावे म्हणोन लिा आहे. त्यास ऐवज पाठवावयाची काये आज्ञा ते केली पाहिजे. राजश्री विसाजीपंत बिनी फौजसुधा येथे आले. फौज अजमासे पाच सातसे आहेत. हे मजल दरमजल निकडीने साष्टीस जाऊन पोहचतील. येथील अस्त्यौ पदार्थानं कुमक करावयास चुकत नाही; परंतु फौज भारी गेल्याखेरीज इंग्रज उठोन जात नाही. फिरंगी वसईचे नस्तावर आला आहे. याजकरितां वसईस व साष्टीस तिकडून फौजेचा भरणा भारी पाठविला पाहिजे व राजश्री विसाजीपंत लेले याचीहि रवानगी वसईस करावी. यैवजाविसी आनंदराऊ राम यानी लिा. त्यास काही यैवज दिल्हाच पाहिजे. आनंदराव राम यानी बापू जोसी पाठविला. त्याने कचे वर्तमान सांगितले ते आलाहिदा लिा आहे त्याजवरून कळेल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. साष्टीस इंगरेज आला. लाडाई सुरु जाली. आपण दूरदेशी चालले. इंग्रेजाचा मार तोफा येका दो रोजी लागू जाल्यावर भारी पडेल. इकडे फौज थोडी, याउपरी तिकडील फौजपैकी पांच हजार फौज सास्टीकडे आल्यास ठीक पडेल. जरुर रवाना करावी हे विज्ञापना.

¶*Naro Appaji reports to the ministers at Purandar from Poona the landing of the English at Salsette and makes urgent appeals to them to send more men and money for the defence of the place.*

No. 36] [*17-12-1774*

पौ छ १९ सवाल चंद्रवार

पांच घटका दिवस प्रातःकालचा

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक अनंदराव राम मो साष्टी चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १३ माहे सवाल संध्याकाल येथील वर्तमान तर

मंगलवारी दोन प्रहरी जाला ते वर्तमान काल गुरुवारी सेवेसी लिहिले आहे. आज भृगुवारचे वर्तमान.

वसईकर लोक भगवंतराव खानविलकर वगैरे च्यारसे माणूस आले. त्यास रा. गोविंद हरि जाऊन भेटले. इतक्यात टोपीकर गाडदी येऊन अकस्मात बरकंदाजी केली. कांही लोकानी झुंजास तोंड दिल्हे; परंतु गाडदीच्या पुढे उपाये नाही. जाधवराव याचे श्वार व सिवराव हरि याजकडील स्वार पाऊणसे होते ते निघाले. मारगिरीपुढे टिकाव निघाला नाही. कलम १

विजेदुर्ग व सुवणदुर्ग व राघोजी आंगरे याजकडील आरमार वसईच्या मार्गें अथवा हर येक जागा लागोन लोक उतरोन येते तर फार उतम होते कलम १

झुंज जाल्यावर वसईकर लोक मागे सरले ते गलवतावरी चढले आहेत. आज प्रातःकाली शनवारी बलाविले आहे. त्याणी वसईस लिा आहे. त्याचे उतराची प्रतीक्षा करितात. रा येसाजी सिवदेव वसईकर याणी सामान सुमान व लोक रवाना करावयाविशीं ढिली करीत नाहीं. सामान पाठविले. पुढे पाठवितील; परंतु लोकाचा भरणा फार पाहिजे. येथे बरकंदाजाविना शत्रूचा पराभव होत नाही. कलम १

दक्षणेकडील मुंबईच्या वाटेवरी खाडीत नस्तावर तीन बुरूज होते ते काल रात्रीस त्याणी घेतले. कलम

आज उतरेकडे मोर्चेबंदीचे काम लाविले. कुणबी गावगना जमा करून मोर्चे बांधो लागला. चौफेर मोर्चे तयार करतो. गरनाला व तोफाचे सामान मुबलग आणिले आहे. उद्या पूर्णिमेस मारगिरी करणार. श्रन्याचे पुण्येकरून जे होणे ते होईल. मारता मारता मरावे, परंतु जागा राखावी हा सर्वांचा हेत आहे. कलम १

जाधवराव व सिवराव हरि याचे राऊतपैकी खाडी आलीकड जाधवरावपैकी ४० च्यालीस आले होते व सिवराव हरीचे बतीस आले. वसईकर व गोविंद हरी येकत्र जाले. भेटी जाल्या इतक्यात गाडदी चालोन येऊन घातले. तेव्हां जाधवराऊ याजकडील दोन राऊत ठरले. वरकड झुंझातून पलोन गेले. वसईकर काही टिकत सेवटी तेहि सरले. गोविंद हरिनी पायेउतारा केला तरी कोणी राहिले नाही. संध्याकाली आलीकड राऊत आले. ते बजीद होऊन रजा मागोन गेले. काय करावे? कलव्यास गेले. जाधवराऊ आलीकड येक वेल येऊन गेले. लढाई सुरू होताच कलव्यातून बुनगे काढिले. कलम १

5783

स्वामीचे आज्ञापत्र छ ११ मिनहूचे आज तरात्रे तारखस प्रहर दिवसास पावलें. डाक बसविली हें उतम जालें. फौज व हशामी लोक पाठवितों, धर न साडणे, जो जसे काम करील तसे बक्षीस देऊ करणे, तुम्ही व किलेकरी येक होणे म्हणोन लिा; त्यास स्वामीचे पुण्यप्रतापे जागा तरी खबरदार राखूच राखू; परंतु इंग्रेजाजवल गाडदी व तोफा व गरनाला सामान बेहद आहे. फौज व हशामी लोक देखल्यावर चालोन घेतो. यास्तव गाडदी व बरकंदाज फार पाहिजेत. कलम १

राऊत स्वाम रा करितात. त्यास घोडी पलीकड ठेवावी असाहि प्रकार पडिला तर ठेऊन पायेउतारा करून यावे. नाका पाहून ठेऊ, म्हणजे तो चालोन येताच भराभव (पराभव?) करू येईल. येविशी निक्षूण ताकीद स्वामीची आसावी. कलम.

येणे प्रा आज प्रहर दिवस शनवारपर्यंत आहे. सेवेसी श्रुत. ०.न हे विज्ञाप्ति.

¶*Anandrao Ram communicates to the ministers news about the preparations of the English and requests them to send reinforcements without which the defence of the place is impossible.*

No. 37] [*17-12-1774*

पो छ १४ ल्वाल सन
खमस सबैन मार्गसीर्ष मास
रविवार प्रहर रात्र साइंकाल.

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक माधवराव गंगाधर व गणेश बाबाजी मुकाम कल्याण साष्टांग नमस्कार विज्ञापना. तगाईत छ १३ माहे सवाल पावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री आनंदराव सुभेदार यांस जासुदाबराबर पत्र सादर जाले ते छ १२ मिनहूस तिसरे प्रहरी येथे पावले, ते आपणाकडील जासुदासमागमे साष्टीस

रवाना करावें, परंतु इंग्रेज च्यारपांच हजार माणूस व गलबतें लहानमोठी पाऊणशे बमै सरंजाम तोफा व गुंडगली वगैरा लढाईचा सरंजाम घेऊन मार्गसीर्ष शुद्ध येकादसीस येशवंतगडापासून चेंदणी नजीक ठाणे येथील बंदरीं येऊन नांगरवाडा करून राहिला होता. हे वर्तमान साष्टीकरास कलतांच रात्रौ गलबते भरून मुलेमनुश्ये मात्र कल्याणास रवाना केलीं. बस्तभाव काही निघाली नाही. इतकियांत इंग्रेजाचे दोनहजार पावेतो लोक एकादसीस संध्याकाली चेंदणीचे बंदरी व वानरे व सीव येथील तरीने उतरून साष्टीचे बेटात आले. हे वर्तमान राजश्री आनंदराव सुभेदार यांस कलतांच किला खबरदार करून राजश्री गोविंदपंत हशमनीस पांचसातशे माणसानसी पुढे रवाना केले. यांचे त्यांचे युध्व होऊन त्यांचे व यांचे जखमी व ठार दाहावीस माणूस जाले. त्याचे लोकाचा भरणा बहुत, यामुले त्याणी रेटून सरकारवाडियापावेतो यांस आणोन वाडियात साठ धरून राहिले होते. त्यावर सुभाचे व किलाचे लोक व राऊत द्वादसीस पाहाटेचे प्रहर रात्रीस जाऊन छयापा घातला. टोपीकराचे लोक धुडाऊन लाविले. तथाप ते लोक व आणखी गलबतावरील सामील होऊन पुन्हा किल्याचे असमंतात भागी घरें होती तो आश्रा धरून राहून दमदमे रचावयाची पैरवी करीत होते. त्यास किल्यावरून तोफाची मारागिरी बहुत होऊं लागली, यामुले मोर्चे ठरो दिल्हे नाही व तोफाहि चढो न दिल्हा. प्रस्तुत पौर्णिमेचे उधाण. या संधीस थोरली गलबते खाडति आणोन येलगार करावयाची तरतूद करीत आहे. त्यास श्रीमंताचे पुण्यप्रतापे शत्रूचा पराजये होईल. गनिमानी येऊन दाटी फार केली, याकरितां कलव्याची तर इकडून बंद केली आहे. माणूस तरीनें जाऊं पावत नाही. राजश्री बलवंतराव महादेव फडनीस, साष्टी, हे सामानसरंजाम न्यावयाकरितां कल्याणास आले होते, त्यासमागमे आपले पत्र आनंदराव यांजकडे रवाना केले. कल्याण सुभांपैकीं तांदूल वगैरे जिनस मशारनिलेनी आणविला होता तो रवाना केला. त्याचे पत्र येते त्याप्रमाणे सरंजाम वरचेवर रवाना करीत आहों. किल्याचे लोकानी खर्चाविसी गवगवा फार केला. यास्तव त्याणी पांच हजार रुपये आणविले तेहि पाठविले. शंभर राऊत कल्याणचे नेमणुकेचे होते ते रात्रीच रवाना केले व लोकाचीहि रवानगी केली. माहुली, कोहज, राजमाची व सिवनेर वगैरा घाटसरीचे किल्यास लोकाविसी येथून पत्रे रवाना केली आहेत. लोक आले म्हणजे रवाना करू. येविसीं हुजरूनहि ताकीद निक्षूण जाली पाहिजे. वसईहून पांचशें माणूस कुमक आले. टोपीकराच्या सरंजाम पोल्ता व आणखीं त्याचें सुरती पांच हजार माणूस येणार. येलगार करून स्थलास आपाये करावा हे इछा धरून आला आहे. राऊत व

लोक हुजरून रवाना जाल्यास हतगव होऊन जाईल. त्वरेनें रवानगी जालियास उपयोगी पडेल. सारांश कुमक मुबलक जाली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Madhavrao Gangadhar and Ganesh Babaji report to Nana Fadnis the landing of the British forces at Chendni and the attempts made by them to mount their batteries for an attack on the fort. These efforts of the English were counteracted with some success by the men under Anandrao Ram.*

No. 38] [*17-12-1774*

नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारायेणराव कृष्ण स्वामी गोसावी यासी

पो माधवराव नारायेण प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. मुंबईकर इंग्रज सामान लडवई आरमारसुधा घेऊन साष्टीस आला आहे. त्याजवर साष्टीचे किल्यातून मारगिरी करीतच आहेत व हुजुरून राजश्री विसाजी कृष्ण मातबर फौजेनसी रवाना जाहाले; व पुढे बापूजी हरि गाडदी व राऊत व मराठे माणूस दोन हजारसुधा पाठविलेच आहेत; तरी तुम्ही किले चाकणपैकी आसामी १० चांगले बरकंदाज जलदी हुजूर पुणियास पाठऊन देणे. किले मजकूरचा बंदोबस्त चांगला करणे. जाणिजे छ १३ माहे सवाल सुा खमस सबैन मया व अलफ बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Narayanrao Krishna of Chakan is ordered to send to Poona ten of his best riflemen as the whole force at Poona had been despatched to Salsette.*

No. 39] [*17-12-1774*

पौ छ १४ सवाल दोनप्रहर रात्र
सुा खमस

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक आनंदराव राम, मुक्काम साष्टी, चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १३ सवाल, दोन प्रहरपावेतों येथील वर्तमान

येथास्थित असें विशेष. स्वामींचें आज्ञापत्र छ ११ मिनहूचें आतांच आलें, तेथें आज्ञा कीं, राजश्री विसाजी कृष्ण यांसमागमें गाडदी व दोन हजार फौज देऊन रवाना केलें आहेत, जलदीनें येऊन पोंचतील. इंग्रजांनीं दुष्ट बुद्ध धरिली असिल्यास पारपत्य करणें. बातमी वरचेवर लिहिणें म्हणोन आज्ञा; यैशास इंग्रेज छ ९ रोजीं मंगळवारीं दोन प्रहरीं आला. येथील भरण्याप्रमाणें झुंज जाहलें. काल वसईकर तीन चारशें माणूस आलें, तें बेफाम होतें, जेवण करीत होते. अशांत गाडदी आले. राजश्री गोविंद हरि व येथील सुभाचें माणूस होतें. गाडदी आल्यावर झुंज जालें. आगीमुळें त्याचें पारपत्य न जालें. लोक मागें सरले. राऊतहि निघाले. हें सविस्तर प्रातःकाळीं प्रहर दिवसास लिहिलें त्यावरून विदित होईल. आज हा काळवरी कांहीं नाहीं. मोर्चे चौफेर घालतो. गरनाळा व तोफा मारगिरी करील. करो. त्याचा हिसाब धरीत नाहीं. स्वामीचे पुण्यप्रतापें स्थळास चिंता नाहीं. येथील लोकांची उमेद चांगली आहे. इंग्रेज झाडून शिपाई हत्यारबंद होता तितका लहान थोर झाडून सामान सरंजाम घेऊन आला. मुंबई रिकामी आहे. सरकारचें व आंगरियाचें आरमार येऊन पावतें तर मुंबई जाळून टाकितें. येथें गाडदी व करवल बरकंदाज फार करून असावें. वसई-कडील लोक आले, आणखी येतील. फौज येईतों लढाई घेतच आसों. इंग्रेज स्नेही असतां, येक हें येथें कापट्य करून आला. याचें पारपत्य पुर्त जालें पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶[*Anandrao Ram reports to the ministers the first encounter which the Maratha forces had with the English and communicates his hopes for a final triumph over them.*

No. 40] [*18-12-1774*

पो छ १७ सवाल
बुधवार प्रातःकाल
साहा घटिका दिवस।.

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेशी

विनंती सेवक आनंदराव राम मुा साष्टी साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १४ सवाल प्रथम रात्र घटका ४ च्यार स्वामीचें आज्ञापत्र छ १२ मिनहुचें आतांच पावलें. येथील कचे वर्तमान ल्याहावयाविशीं आज्ञा जाली. त्यास इंग्रेज

छ ९ रोजी दोन प्रहरी अकस्मात आला. आज सा दिवस जाहाले. त्यास मागील पाचा रोजाचे वर्तमान प्रातःकाली लेहून पाठविलें. सारांष इतका प्रसंग पडिला तरी कोणीकडून लोक आले नाही. वसईहून राजश्री येसाजी सिवदेव याणी पांचसें माणूस पाठविले व सामान सरंजाम पाठविला. दुसरेकडून किरकोल लोक येतात परंतु टापूत आजचा दिवस आले नाही. येईल तेव्हा खर. इंग्रजाचे मोर्चे हा कालवरी ठरो दिल्हे नाही. पाणबुरूज खालील मुंबईकडील घेतले. तेथील लोकांनी इंग्रजाचे लोक सें पनास मारले; व रा। गोविंद हरि याणी मेहनत केली ती सकालचे पत्री लिहिली असे. कोटकरी हवालदार देखील येक विचारे येक रंग कोटात सारे आव्हों. गनिमाचा हिसाब नाही. मोर्चे लागू होऊन त्याची मारगिरी होत नाही, की किल्याचा मार जबरदस्त होतो. जाधवराव व सिवराव हरी याचे राऊत खाडीआलिकडे येत नाही. सामदामें सांगितला ते बेलापुर पटीची रयेत मात्र लुटतात त्याचें पारपत्य जालें पाहिजे. इंग्रेज कलवियांस जाऊन मार्ग बंद करणार तेथें राऊत जाधव व सिवराव हरीचे आहेत. ते काय करतील पाहावें. पलतीलसे दिसते. आंगरे यांजकडील वगैरे लोक उद्या परवां येतील. साष्टींतील रयेत फिरांवद (?) जाली. सरकारचे सिपाई मारतात. स्वामीचे पुण्यप्रतापें नसरूड फजित पावल. चिंता नाहीं. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Anandrao Ram writes to the Peshwa that he has successfully impeded the progress of English batteries to the time of writing. The writer complains that no succour from any quarter has yet-been received.*

No. 41] [*18-12-1774*

पौ छ १७ सवाल प्रातःकाल
साहाघटिका दिवस बुधवार

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोविंद हरि चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना. ता। छ १४ सवाल पाच घटका रात्रपावेतो स्वामीचे कृपेकरून विनती. सेवकाचे व कोट मजकुरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ १२ सवालचे सादर जाले. तेथे आज्ञा कीं इंग्रजानी दुष्टबुध धरून साष्टीचे पानबुरुजा-जवल उतरला म्हणौन बेलापुराहून लेहून आले. त्यास तुम्ही काहीच लिहिले

नाही म्हणौन आज्ञा. यैसियासी सविस्तर वर्तमान राजश्री आनंदराव याचे पत्री लिहिले आहे त्यावरून सेवेसी विदित होईल. रा भवानजी कदमराव हवालदार व सर्व सरदार व सेवक येकदील होऊन, सरकारकामावर येकनिष्टपणे सर्वाचे लक्ष लागले आहे. रा विसाजीपंताची रवानगी फौज व गाडदी व हशम रवाना जाले आहे. ते येताच इंग्रेजाचा रेच मोडून नस्तनाबूद करून, मुंबईस शह देऊन, संतोषाचे वर्तमान विनंती पत्री लेहून पाठवितो. शेवेसी श्रुत व्हावे हे विज्ञाप्ति.

¶*Govind Hari informs the Peshwa that Bhavanji Kadamrao and other Sardars were all united in defending the place, and he hopes that the enemy will be driven back when Visaji Krishna arrives with succour.*

No. 42] [*18-12-1774*

पाौ छ १६ सवाल सुा खमस
सवैन मार्गसीर्ष प्रात:काल
साहा घटका दिवस

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक बाजी गंगाधर मुकाम किले बेलापूर चरणावर मस्तक ठेऊन सिर सां नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १४ माहे शवालपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान येथास्तित असे विशेष. आज्ञापत्र छ १२ सवालचे आले ते छ मजकुरी रविवारी संध्याकाळचे प्रहर दिवसास पावली. मुंबईची व सास्टीची बातमी राखून वरच्यावर हजूर लेहून पाठवीत जाणे म्हणौन आज्ञा. त्यास आज्ञेपुरवीच हरदू जागचे बातमीचा बंदोबस्त करून, बातमी वरच्यावर आणून सेवेसी लिहितो. तालुके मजकूरचा शाहाणा माणूस मुंबईस पाठविला आहेच; व रा रणछोड कृष्ण वसईकर मुंबईस आहेत, त्याजकडील पूर्वी पत्रे आली ती सेवेसी पाठविलीच होती; व हाली पत्रे आली ती असल पत्रे साष्टीस पाठविली. त्याच्या नकला सेवेसी पाठविल्या आहेत. सास्टीहून बातमीची पत्रे आली तीच सेवेसी पाठविली आहेत, त्यावरून सविस्तर विदित होईल. येथून साहित्य खाद्या व चिवटे वगैरे साष्टीहून आणवितात. ते वरच्यावर पावते करीत जातो. सास्टीचे बातमीवर नेहमी माणसे लाविली आहेत. जसी बातमी ज्या समई येत जाईल. ती सेवेसी लिहीत जातो.

सास्टीचा किला हा वेल पावेतो खबरदार आहे. किलेकरी याची लढावयाची उमेद चांगली आहे. मदतीचा पुरावा जालियास स्वामीचे पुण्यप्रतापेकरून शत्रूचा पराजये होईल. या प्रसंगीं रा। धुलप याचे आरमार येते तर, बरोबर सुवर्णदुर्गचे आरमार तयार आहे तेहि येते. रा। राघोजी आंगर याचे आर(मार) तयार आहे. त्याचे पत्र आम्हास आले. सरकारचे आरमार आले तरी आपले आरमार पाठवितो. सदरहू आरमार येते तर खाडीत इगरज याचे आरमार आहे. आंतच कोंडते व मुंबईवर सलाबत भारी पडती. सहजच इंग्रज धुडावता. सर्व तरतूद जालीच असेल. नंसरुडाचे पारपत्य होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Baji Gangadhar informs the ministers of the arrangements that he hac nade for communications despatched to and from Bombay and Bassein and suggests that the fleets of Dhulap and Angria should bear down on the enemy's fleet in the narrow creek of Salsette and thus relieve the place.

No. 43] *[18-12-1774*

पौ छ १८ सवाल खमस

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ १४ सवालपावतो येथास्थित असे विसेष. साष्टीचे बातमीची पत्रं छ १३ सवालची कल्याणाहून आली तेच बजिनस पाठविली आहेत, त्याजवरून तेथील वर्तमान कलो येईल. साष्टीचे पेठेची घरे इंग्रजास मोर्चे आइते जाहाले. किला फार वेढिला याप्रकारचे वर्तमान पत्रात आहे, ते सविस्तर विदित होईल. * * * * चेंदणीचे पाणबुरूज दोन तीन बुरूज इंग्रजाने घेतले. येविसीचे वर्तमान आणखी पत्रात आहे या प्रकारचे वर्तमान. शत्रूचे प्राबल्य आहे. राजश्री विसाजी कृष्ण येथून उदईक निघोन जाणार पाईदल पाच सातसे पावेतो बापूजी हरि निा। गाडदी याज बा। पुढे रवाना केले. मागाहूनहि येथे लोक जमा होतील, ते रवाना करितो. लस्करातून मातबर करोली सामान चांगले आल्यास इंग्रजाचे पारपत्य होईल. गाडदी लोक दोन हज़ार पावेतो नवाबाकडील घेऊन पाठविल्यास ते फ़ारच उपयोगी पडतील. वसईहून पाचसे माणूस साष्टीस कुमक पाठविली येविसीचे वर्तमान व फिरंगी दर्यात आल्याचे वर्तमानाचे वसईहून पत्र आले तेहि पाठविले आहे. सारांश कोणत्या युक्तीने शत्रूचे पारपत्य होईल हा अर्थ सर्व स्वामीच्या ध्यानात आहेच. त्याप्रा। तरतूद जाल्यास व जलद येऊन सामान पोहचल्यास सर्व गोष्टी घडतील. आवकाशावर

पडल्याने दगा होईल. या समई गाड्याचा उपयोग फार पडता. . गाड्याखेरीज आग सोसणे कठिण. पाहाडी किल्यावरील देशातील किल्याचे लो(क) * * वर आणऊन रवाना करीत आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Appaji writes about the English making gradual progress at Salsette and says that delay in sending reinforcements will be ruinous.*

No. 44] [*18-12-1774*

पौ छ १६ सवाल सन खमस
सबैन मार्गसीरष
मंगलवार सायंकाल

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आनंदराव राम चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १४ सवाल अवसीची च्यार घटका रात्र पावेतो स्वामीचे कृपे-करून किले मजकूरचे व सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. छ ११ सवाली आज्ञापत्र सादर जाहाले, ते छ मजकुरी आताच सादर जाहाले. तेथे लिहिले की, इंग्रजाची स्वारी तयार जाहाली आहे मणौन तुम्ही विनंतीपत्री लिहिले. त्यास पुण्याहून साष्टीपर्यंत जासुदाची डाक बसविली आहे; तरी दोन जासूद सरकारचे तुम्हाजवल नेहेमी राहातील. याजवल बारीक मोठे वर्तमान वरचेवर लेहून देत जाणे, म्हणजे ते डाकेबरोबर हुजूर पाठवितील. दिनचर्येचे वर्तमान रोजचे रोज लिहीत जाणे म्हणौन आज्ञा. त्यास छ मारचे वर्तमान किल्याचे दक्षणेस सरकारचे आरमारची कोठी व कारखाना होता, तेथे मोरचा लागू करून तोफ अकरा सेरी ठेऊन किल्यात गोले टाकू लागला. किल्याचे उतरेस फतेबुरूज पायमार्गे आहे, तेथेहि गोले मारिती. बुरुजास लागू जाहाले, तेव्हा कुमक जलदीने येऊन पावली नाही तरी पायमार्ग बंद होईल. याजकरिता दोन हजार राऊत व दोन हजार गाडदी जलद आले पाहिजेत. येथे राजश्री जोत्याजी जाधवराव व हरि दामोदर याजकडील पतकाचे राऊत व बरगे तीन पथके मिलोन तीनसेपर्यंत राऊत आहेत. त्यास ते कलव्यासच आहेत. हजार दोन हजार राऊत जमल्यासिवाय पलीकडे उतरावयासी अनमान करितात. उदईक इंग्रज सोमवारी मारगिरी लगटाने करणार यैसी बातमी आहे.

किरिस्ताव रयत झाडून त्यास मिळाली. त्यांत हजार पाचसे बरकंदाज आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Anandrao Ram reports to the Peshwa the progress of events in one day at Salsette particularly the preparations made by the English, the erecting of batteries, and adds that the Christian population have gone over to the English.*

No. 45] [*18-12-1774*

पौ छ १६ सवाल सुा खमस
सबैन मार्गसीर्ष मास
साइंकाल उरणचा कागद.

श्री

अपत्येसमान वासुदेवानें चरणावरी मस्तक ठेऊन सिरसाां नमस्कार विनंती. ताा छ १४ सवाल रात्र पहिला प्रहरपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. मल्जीबराबरची पत्रें पावलीं. सविस्तर कललें. साष्टीस मारगिरी फारच होत आहे. इंग्रेजाचे लोक राजश्री रामाजीपंत सुभेदार यांचे वाड्यापासून दिवाणजीचे घर रि बे री पर्यंत आश्रा धरून आहेत. मोर्चे तयार जाले. सामान मुंबईहून मंबलग जात आहे. दररोज दाहावीस माहागेऱ्या सामान वाळू वगैरे जातच आहे. मुंबईपासून शाष्टीचे भेडीचे बंदरपर्यंत दरम्यान मुजाईम कोणी नाहीं. प्रथम सर्ज्या बुरुजकरी याणी मार अरमारावर केला. त्याणे इंग्रेजांची दोन गलबतें फुटोन बुडाली. बुरुजातील सामान वेचले, तेव्हा काही कामास आले कांही पलाले, याप्राा वर्तमान आहे. अद्याप हुजूरची कुमक न पोहचे व विजयदुर्गचे अरमार सुवर्णदुर्गास होते, त्यास विजयदुर्गची बातमी आली कीं फिरंगी तयार जाला, येणे; त्यावरून फिरून मागे गेले. सुवर्णदुर्गचे मात्र बंदरी तयार केले. राजश्री राघोजी आंगरे याणी पाचसाशे माणूस पायमार्गें साष्टीस राा केले. याप्राा जाले; तेव्हां पुढील विचार काये? येथेहि माणूस अद्याप नये. साष्टीचा किला खबरदार म्हणौनच आजपर्यंत ठासून आहे. या ठिकाणास प्रसंगोचित कार्य करावें तर वडिली * * * पत्र पावेल ते क्षणी पुणेयास धनी असतील, त्यास हटकून चारपांचशे, माणूस जलद पाा. साष्टीसारिखे ठिकाणास अपाय जाल्यास विचार कलतच आहे. येथे माणूस राा कराल ते रात्रीचा दिवस करून येऊन पावे ते करावे. येथील बंदोबस्त किल्यावर सामानसरंजाम चढऊन खबरदारीने आहो. धन्याचे पुण्यप्रतापेकरून फिकीर नाही; परंतु कुमक मात्र जलद पाठवावी, अरमार येऊन पोहचते आणि खुशकीने फौज, तर नसरुडाचे पारिपत्य येथास्थितच होतें. इंग्रजानेहि सुर्तेस नवे माणूस ठेऊन आणावे म्हणौन फरगत गेले आहे. आणि फिरंगियाची तरांडी

संवकारी काफला घेऊन तीन च्यार आली आहेत, त्यांस च्यार दिवस राहून घेतली आहेत. शामलाचेहि माहागिरिया च्यार कांही लोक मुंबईस कालच आले आहेत, ऐसे वर्तमान तथ्य आहे; परंतु मतलब काये आहे हे कलले नाहीं. माणूस शोधास पाठविले आहे. येथे यावयाचे वर्तमान आवाईत आहे. येथे कांही सेपनास बाण सरकारातून हाती आल्यास घ्यावे आणि बाणाचे कसबी पाच-च्यार गडी चांगले पुणेयास मेलऊन पाठवावे. हे येथे फार कामावर पडेल. वरकड होईल वृत्त ते मागाहून लेहून पाठऊ. इंग्रेजाचें तरांडी साष्टीखेरीज वेसावयाचे बारियावर तोंडावर दोन आहेत व वसईस दोन थोर फरगतें व लाहान दाहापांच येसी खबरदारीस छबिन्यास ठेविली आहे. कलावे. वेसावे सलामत आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*One Vasudeo reports the general strength of the garrison of the fort at Salsette and asks for immediate despatch of reinforcements to withstand attack from the English who were concentrating on it.*

No. 46] *[18-12-1774*

पौ छ १४ सवाल साई-
काल मार्गसीर्श वद्य प्र-
तिपदा रविवार

नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री रामराव नारायेण स्वामी
गोसावी यासी

पो माधवराव नारायेण प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. प्रांत साष्टी येथे इंग्रज येऊन उतरला. याकरिता त्याजवर रा। विसाजी कृष्ण मातबर फौजसुधा रवाना केले आहेत. त्यासमागमे पायेदल माणसाचा भरणा पाहिजे. यास्तव तालुके राजमाचीपौ पत्र पावताच हशमी माणूस प्रा। २०० दोनसे आसामी साष्टीस मारनिलेकडे रवाना करणे. तुमचे तिकडे कोल्याचा दंगा आहे म्हणौन ऐकण्यात आले. त्यास दंग्याचा प्रकार असल्यास संभर माणूस किलेयाचे भरतीस ज्याजती हे लोक जातात यास्तव ठेवणें. जाणिजे छ १३ सवाल सुा। खमस सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे. बरकंदाज फार करून पाठवणे हे विनंती.

बार

¶*The Peshwa asks Ramrao Narayan to send 200 men to Visaji Krishna who is proceeding to Salsette.*

5793

No. 47] [Recd. 18-12-1774

पौ छ १४ सवाल खमस

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे
शेवेसी

विनंती विशेष. इंग्रजानें मालवण घेतले त्याजविसी लिहिले होते. त्यास आपण लिहिले कीं दोन लक्षापेक्षां जाजती थोडे बहुत द्यावयास पडल्यास कबूल करून ते स्थल हस्तगत सरकारांत होय ते गोष्ट करणे. वकिलानी लिहिलें तेव्हा हा भे*ईक नव्हे ऐसे दिसते. जर ही गोष्ट होत असल्यास अधीकहि पडल्यास देऊन जरूर करावे म्हणोन लिहिले. ऐसीयास दोन लक्षापेक्षा अधिक आगले घेऊन द्यावे ऐसे नादी लागोन बोलत होता. या गोष्टी मालवण घेतले तेव्हां नाद होता. आलीकडे इंग्रजाने सावताची रेडी घेतली व मसुरा घेतला. तेव्हा इंग्रज राज्यच सोडवीत चालिला आहे. तेव्हा मालवणच्या गोष्टी कोठे राहिल्या. सहजेच गेल्या. तूर्त टोपीकर सारे येकदील होऊन बंदरकिनारा घेणार, व मुंबईत वलगना करितात. बरे चिंता काय? श्रीमंताचे प्रतापें शत्रूचा गर्व परिहार होईल. दीड लक्ष रुो पेदास्ती तराड्यापैकी पुण्यास श्रीमत रा दादा आणून पुढे लस्करात रवाना करणे म्हणौन आपणास पत्र आले. त्यावरून आपण लिा. यैशास श्रीमतानी त्रिबकास यैवज दीड लक्ष पाा म्हणौन पेसजी आज्ञापत्र सादर केले. त्यावरून ला(ख) रुो त्रिबकास पाा पावले. जाब आद्यापि आला नाही. आल्यानतर स्वामीस लिहून पाठवीन. बाकी पनास हजार पाा, त्यास पैदास्तीचा झाडा घेऊन येतो. रुबरू पाहावा. मग जी आज्ञा ते सिरसा. कोकणपटीत दंगा कोण्हे प्रकारचा, नवी सिबदी काय ठेवणे लागली, गला दारूगोला बेगमी बदरकिनारा करणे लागली, तालुकदारास यैवज कमी होता त्यास द्यावा लागला. सारेच वर्तमान भेटीनतर कलेल. श्रीमताचे प्रतापें पैदास्त जाली म्हणौन हे साल गुजरले. नाही तर वोढ फार होती. हे जागे नाजूक, याचे जीवन राखिले पाा. बहुत काये लिा लोभ करावा हे विज्ञापना.

¶*Nana Fadnis is informed how the negotiations, opened with the English regarding Malwan to be taken back on a payment of a sum of two lacs, had fallen through owing to the aggressive attitude of the English who seem bent upon the conquest of the whole west coast.*

5794

No. 48] [18-12-1774

छ १७ सवाल बुधवार

प्रात:काळ साहा घटिका

दिवस

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विज्ञापना तागायत छ १४ सवाल जानराव धुलप आरमार घेऊन रेवदंडियाचे बाऱ्यावर आले, व सुवर्णदुर्गचें आरमार व आंगरे याचें आरमार यास आज्ञा करून मुंबईवर हला करावी. निमित्य कीं मुंबईत सिपाई राहिला नाही यास्तव मुंबई प्रस्तुत * * * हा विचार आहे. येसाजी सिवदेव याचे लोक पांचसें पाठविले. दुसरे येतील. साहित्य पुस्कल पाठवितात. कल्याणकरांस लेहून मागलो. कल्याण मात्र फोडितात, पलावें, इतकाच मजकूर, रुपया जवल नाहीं. माणूस पैका मागते. कोणता प्रकार करावा? खत दिल्याने शा देत नाहीं. राजश्री माधवराव गंगाधर यांजकडील पंधरासें रुपये कर्जखत बालाजी माहादेव फड़णीस घेऊन गेले तेव्हां आले. माव्हली वगैरे लोक खाडी पलीकडे येऊन राहिले. माहागिरी बंदरांत नाहीं. गैरसरंजाम कोठवरी ल्याहावा? याउपर रुपये पंचवीस हजार पाठऊन द्यावे. सरसुभेदार यांहीं खालीं यावे. जाग्याची चिंता सर्वथा नाहीं. कितीक दिवस बसतो आण मार किती देतो त्यास भीत नाहीं. कोठवरी याचा संशय नाहीं. हवालदार व त्याचे पुत्र फार मेहनत करितात. गोलंदाज पांच सात आहेत. वसईपैकी पाच गोल * * स्वामीनी फौज व गाडदी रवाना केली. आतां तर इंग्रेज नेस्तनाबूद करितो. चिंता तिलप्राय नाहीं. आज रात्रौ याच समई गरनाला कोटांत टाकूं लागल्या. आम्हीहि गरनाला व तोफांचा मार देतों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer asks the Peshwa that Janrao Dhulap who has arrived at Rewdanda with his fleet should be ordered to attack Bombay in conjunction with Angria's forces. He further asks for money and says he now hopes to overcome the English.*

No. 49] [*18-12-1774*

पौ छ १७ सवाल बुधवार नकल

प्रातःकाल साहा घटका दिवस

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक भवानजी कदमराव चरणावर मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना. ताा छ १४ सवाल प्रहर रात्र प्रथम पावेतो स्वामीचे पुन्यप्रतापे येथास्थित आसे विशेष. स्वामीनी छ १२ मिाचे पत्र पाठविले तेथे आज्ञा कीं, तुम्ही पुरातन चाकर राज्यातील; इंग्रज चालोन येऊन तुमच्या गली पडला त्याचे पारिपत्य खामखा करावे म्हणोन विस्तारे आज्ञा जाहाली. ऐशास कैलासवासी आपासाहेबीं मजला येथे समजोन ठेविले. च्यालीस वर्षे या जागा जाहाली. पुत्र कलत्र संपदा धण्याचे पुण्य जाली. उमर ऐसी वर्षे जाहाली. हा कालवरी हरामखोरी जाहाली नाहीं. कांही दिवस संवशय घालणारानी घातला असेल; तरी मी येकनिष्ट शेवक आहे. रामाजीपंतानी सरकार कामे केली त्याचा मूल सेवका (जवल) आहे. राजश्री गोविंद हरि सर्व मंडली शेवकाजवल आहे. किल्याचे मारगिरीने त्याची मारगिरी होऊ दिल्ही नाहीं; आज गरनाला मारतो तर किती मारील? जागा तर जतन करूं. परंतु याचे पारपत्य व्हावे ते करणार स्वाम समर्थ आहे. चहूकडे स्वामीची स्थले. आज साहा दिवस आम्हीं झुंजतो; परंतु मदत कोणी न केली. राा येसाजी सिवदेव याणी साहित्य केलें व पुढे करितील हा भरवसा आहे. सविस्तर राजश्री आनंदराव याणी लिहिले आसे त्याजवरून कलेल. स्वामींच्या चरणाखेरीज दुसरा मजकूर नाहीं. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Bhavanji Kadamrao who had been in the command of the fort of Salsette for forty years assures the Peshwa of his firm loyalty in defending the fort.*

No. 50] [*19-12-1774*

पौ छ ६ जिलकाद

सन खमस सबैन

पौष

श्री

श्रीमंत राजश्री पंत

प्रधान साहेबांचे सेवेसी

आज्ञाधारक आनंदराव धुलप मुाा जंजिरे विजयदुर्ग चरणावरी मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना. ताा छ १९ माहे शवाल पावेतो सेवकाचें व आरमारचें

वर्तमान येथास्थित आहे विशेष. तालुके विजयदुर्गपैकीं गलबत येक वै रत्नागिरीपैकीं दोन गलबतें व अंजणवेलपैकीं गलबतें दोन व रेवदंडापैकी सडक येक येकूण साहा गलबतें अरमाराकडे देविली, तीं आणावयाकरिता हुजुरून सनदा व हुजुरे रवाना केले. त्यांजबरोबर येथील सिपाई देऊन तालुक्याकडेस रवाना केले. त्यास गलबत येकहि आलें नाहीं. तालुके हायचे मामलेदार सांगतात कीं सिलकी गलबतें नाकारी धक्यावर आहेत, त्यांची मरामत करून गलबतें घेऊन जावी; चालती गलबतें आहेत तीं देत नाही यांप्रमाणें सांगतात. सेवेसी विदित व्हावे यास्तव विनंती लिहिली आहे. सविस्तर मजकुर कृष्णाजी काबली हुजुरें सेवेसी निवेदन करितील. तालुके विजयदुर्गाकडून दाहा हजार रुो आरमाराकडे कार्तिक शुध पोर्णिमेस देविले, त्याची सनद तालुकदारांस दिल्ही. हाफ्ताप्रमाणें रुो मागत होतों, त्यास याणी सांगितले कीं अखेरसाली यैवज द्यावयाचा करार केला आहे त्याप्रो देऊ. तूर्त यैवज नाही. त्याजवरून अरमार स्वारीस पाठवावयाचें राहिले आहे. तालुके विजयदुर्गाकडून पंधरा खंडी दारू कच्या वजनें अरमाराकडे देविली. त्यापैकीं त्याणी पांच खंडी दिल्हीं. बाकी दाहा खंडी राहिलीं ती देत नाही. यांप्रमाणें अरमाराकडील वर्तमान आहे. सेवेसी विदित व्हावें. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Anandra Dhulap complains to the Peshwa about several Mamlatdars not readily delivering to him the ships and money that they were ordered to do.*

No. 51] [*19-12-1774*

पौ छ २ जिलकाद खमस
सबैन मार्गेश्वर मास

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो आनंदराव गोसावी यांसी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सबैन मया व अलफ. तुमची फौजसुधा रवानगी गुजराथेत केली. त्यास तुम्ही कोठपर्यंत जाऊन पोहचला? तिकडील बंदोबस्त कामेकाजे करावयाची आज्ञा केली होती त्याचें कसकसे केलें, हे काहीच लेहून पाठविले नाही. तरी प्रस्तुत कोठें आहा, काय करितां व पुढे काये करणार हे सविस्तर लेहून पाठवणे. पुणियात तामस माष्टीन होता, तो मुंबईस गेला. त्याजला तेथील जनरल सुरतेची जनराली

सांगोन पाठविणार म्हणौन वर्तमान आले. त्यास तामस माष्टीन सरकारच्या लक्षात निखालसपणे आहे. तेथील सरकारच्या अमलास नरोतम किशोरदास याणी तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब याजकडील पत्रे आणून अडथला केला आहे, तो अंमल सरकारचे कमाविसदार बहिरो रघुनाथ याजकडे चालवावयास तामस माष्टीन कोताई करणार नाही असे आहे. याजकरिता तो सुरतेस आल्याची बातमी राखून आल्यावरी त्याजला श्नेहाचे रितीने लेहून पाठऊन, चालत आल्याप्रमाणे शहर मजकूरचा अंमल सरकारचे कादाराकडे सुरलीत चाले ते करणे. इकडील वर्तमान तर सरकारची स्वारी तापीतिरास येऊन दाखल जाली. तीर्थस्वरूप नर्मदापार गेले. त्याचे पिछावर उभयेता सरदार व राजश्री हरि बलाल फौजसुधा पाठोपाठ जातच आहेत. तीर्थरूपाबरोबर थोडी फौज राहिली. फार करोन लोक सरदार फुटोन आले. तुम्ही तिकडील वर्तमान वरचेवरी लिहीत जाणे. जाणिजे छ १९ सवाल आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa informs Naro Anandrao that Mostyn left Poona and is proceeding to Surat as the chief of that place, and continues that he is a trusted friend of the Peshwa and as such will not hesitate to help the Peshwa's officers in collecting the dues and therefore he should be treated cordially.*

No. 52] [*19-12-1774*

पौ छ १७ सवाल

मध्यरात्र

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आनंदराव राम साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १९ सवाल संध्या(का)ल पावेतों. येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. आजचे दिवसांत इंग्रजाकडून आधिक कांही जाले नाहीं. येथील मारगिरीनी मोर्चे ठीक राहात नाही. सारांष स्वामीचे पुण्य समर्थ आहे. वसईहून रा। येसाजी सिवदेव यांचे वडील बंधू अंताजी सिवदेव दोनसें माणूस वेऊन प्रात:काली आले. सामान साहित्य गोलंदाज मारगीर पाठविले. वरकडां जागाचे लोक आले व येतच आहे. फौज व गाडदीची प्रतीक्षा करितात. कोटच्या मारगिरनी टोपकर थंड जाला. सेवेसी कलावे. श्रुत होय हे विज्ञापना. रा। प्रात:काल.

¶*Anandrao Ram reports to the Peshwa that the fire from the fort has impeded the progress of English batteries.*

No. 53] [19-12-1774

पौ छ १७ सवाल
प्रहर दिवस

श्री

राजश्री राऊ पंडित
प्रधान गोसावी यांसीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल रामराम विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयास आज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले तें प्रविष्ट जांहालें. मुंबैकर इंग्रेज दोन च्यार हजारानसीं जंगी सामान तरांडियावर चढऊन साष्टीचे रोखे आला म्हणोन काल छ ११ शौवाली आपणास पत्र पाठविले आहे. त्यास हाली इंग्रेज साष्टीच्या पाणबुरजाखालीं येऊन उतरला म्हणोन बेलापुराहून बातमी लेहून आली. त्याजवरून राजश्री विसाजी कृष्ण यांचीहि भारी फौजेनसीं साष्टीस रवानगी केली. आपले जाग्याची खबरदारी बरे तऱ्हेने करून अरमारसुधां साष्टीस पोहचोन इंग्रेजाचे पारिपत्य बरे वजेने करावें म्हणोन कितेक विस्तारे आज्ञा. ऐशास इंग्रेज छ ९ रोजी साष्टीस मोर्चेबंदीस गेल्याचे वृत कलतांच हेट प्रांतीची सारीं अरमारें आणावयाबद्दल तमाम तालुके तालुकेयास धुलप आदीकरून पत्रें मुजरद माहामेरीवरून रा। केली आहेत. आम्हीहि आपले अरमार सिद्ध केले आहे. सारीं अरमारे येतांच हेहि अरमार त्यास सामील होऊन शत्रूचे पारिपत्यास जाईल. थोडके आरमारानें टोपकराचे पारिपत्यास निभाव होणार नाहीं, यास्तव रा। केले नाही. खुशकीने लोक रवाना केले ते साष्टीस जाऊन पावलेच असतील. आज्ञे प्रा। आम्ही आज प्रस्तान ठेविलें. राजश्री विसाजीपंत व राजश्री त्रिंबकपंत सरसुभेदार येतांच आमचीहि स्वारी त्यांस सामील होईल. सारांश स्वामीचा पुण्यप्रताप थोर आहे, तेण्हेकरून शत्रूचा पराभव अल्पयासें होऊन येईल. हशाम व स्वार मिलोन बारा पंधरा हजार व दारूगोला मवलग व तोफखान्यापैकी बाण जेजाला होके हातगरनालाचें सामान पोख्तें रवाना करावयाची आज्ञा असावी. टोपकरासी गांठ. सदरहु प्रा। सरंजाम असावा. रा। छ १९ माहे शौवाल बहुत काये लिहिणे. कृपा करावी हे विनंती.

¶*Raghoji Angria as desired by the Peshwa sends some force to Salsette by land and promises to send his fleet as soon as all the others had joined.*

5799

No. 54] [19-12-1774

पौ॥ छ १८ सवाल सन
खमस सबैन मार्गसीर्ष

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्राधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक मोरो बापूजी मो सुवर्णदुर्ग चरणावर मस्तक ठेऊन सा नमस्कार विनापना. ता छ १९ माहे सवालपर्यंत वर्तमान येथास्तित असे विशेष. साष्टीस इंग्रेज उतरला आहे. याचे बातमीस माहागिऱ्या नित्य जाऊन वरचेवर बातमी आणवीत आसों. साष्टीकरानी मर्दुमी करून, गनिमास मार देऊन मोर्चा लागू होऊ दिल्हा नाहीं. आशामध्यें चहूकडील कुमक पोहचोन शत्रूचे पारपत्य सांग व्हावयाचा समय आहे. विजयदुर्गचे आरमारानी पावावे या आर्थे येथान पत्रे वरचेवर पाठविली आहेत. आज फिरोन मुजरद माहागिरी रा केली असे. तेथून आरमार वैयाघर[१] चढे तों येथील गुराबा दोन व पांच गलबते रवाना केली आहेत. कुलाबावर राहून विजयदुर्गाहून आरमार येणार त्याचा मार्ग लक्षीत असेत. राऊताचाहि भरणा येऊन पावल्यानी या समई सरकारकाम उतमरितीने होईल. उंदेरीपुढें होडी वल्हे कांही जाऊं पावत नाही. इंग्रजाच्या फतेमाऱ्या फिरतात. उरणचे नस्तावर फिरंगी नांगरवाडा करून आहे तेथे शह मातबर दिल्हा पा. याजकरितां धुळपासहि लिहिले आहे. येथील आरमार कुलाब्यास रा केले. तेथून पायमार्गें साष्टीस जाऊन पावतील. याप्रो इतर तालुक्याची कुमक गेल्यास शत्रूचे पारपत्य स्वामीचे प्रतापें होईल. येथे शामल व बाणकोटकर इंग्रज याच्या मिलोन पांच सात हजार माणूस चालीस पंनास खटारा सजोन लबाडी मांडली आहे. टोपकरानी बाहेरून व हा खुषकीने याप्रो नेट करणार. याजकरितां जंजिरे मारची खबरदारी उतम करून सरंजामसुधा तयार आहो. खुषकीचे लबाडीचे पारपत्यास लोक खुषकीस आसावे. तालुके मारी लोकांचा भरणा आगदी कोता. यास्तव हजार माणूस व काही राऊत याप्रो सरंजाम जलद आला पाहिजे. शेवसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Moro Bapuji of Suvarnadurg to the Peshwa suggesting the right moment to attack the English at Salsette. When the fleets of Angria and Dhulap arrive, he hopes—he says—to defeat the English completely since they had not till then got any footing. Can the writer of the letter be a nephew of Haripant Phadke?*

---

१ बाऱ्यावर,

No. 55] [19-12-1774

पौा छ २० सवाल सन
खमस सबैन

श्री

सेवेसी नारो आपाजी कृा सां ना विा येथील वर्तमान ताा छ १९ सवाल पाा येथास्थित असे विा. साष्टीहून छ १३ सवालचे पत्र आले तेच बजिनस पाठविलें आहे, त्याजवरून तिकडील वर्तमान कलों येईल. आद्याप तोफाची मारगिरी सुरू जाली नाही. तयारी करीत आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Appaji informs that English batteries had not yet opened fire against Salsette.*

[No. 56] [20-12-1774

पौ छ १८ सवाल
मध्यरात्र

श्री

ग्राा श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

विज्ञापना ताा छ १६ माहे सवाल. कैलासवासी आपासाहेबी इंग्रेजाचा तहरह केला, त्यास पस्तीस वर्षें जाली, त्यापासून निखालसता होती. प्रस्तुत संध पाहून लबाडी केली. मोष्टीन दोन वर्षें पुण्यात सालसवाणे दाखऊन होता. वस्तुता पाहातां संरकारांत कांही विलग पडिल्यास साष्टी घ्यावी हेंच लक्ष त्याचे विलाइतीपासून होते, ते निदेर्शनास आलें. या जाग्यामुलें तोंड फुटावयाची बाकी राहिली नाही, व स्वामीचे पुण्यप्रतापें राहात नाही. येऊन फसला. किल्याचे त्याणी काय करणे? लक्षावधी गोले व गरनाला टाकून काय होते? कोटांतील हवालदार व लोक कदीम सर्व येकदील आव्हो. स्वारीत राजश्री गोविंद हरि कमी करीत नाही. सर्व प्रकारे ठीक आहे; परंतु येथील सर्वांचे मतें हिंमतगडास मोर्चे द्यावयाची आज्ञा करून घ्यावा. दासगांवचे ठाणे उठवावें. धुलपास व आंगरियास आज्ञा करून मुंबईवर धुंद करावी. बंदर किनारियाचे जागे सुवर्णदुर्ग विजेदुर्ग वगैर यांतील कविले काढून जागे हुन्नर लढाई करीत सारखी आज्ञा करावी. फिरंगी यास सामील होत नाहीं. दवणेस गोव्याहून काफला आला, त्यावर फिरंगी होता. त्याचे याचें बोलणे जालें. येक वेल सर्वांनी

खबरदार होऊन पुन्हा याची खोड मोडे तो अर्थ केला पाहिजे. ' सुचला विचार सेवेसी लिो आहे. स्वाम तर सर्वज्ञ आहेत; मी काय ल्य'हावें? याउपर हार-जिनस मुंबईस जाऊ न पावे येैशा तालुक्यास सनद सर्वास पाठवणार स्वाम समर्थ. सावकारी व सरकारी इंग्रेजाची गलबतें धरावी यैसी आज्ञा जाली पाहिजे हे विज्ञापना.

¶*The writer refers to the peaceful relations prevailing between the Marathas and the English since the treaty concluded with them by the late Chimaji Appa some 35 years back. " The present action of the English " adds the writer " is unprovoked and therefore unjustified."*

No. 57] *[20-12-1774*

पौ छ १७ सवाल मध्यरात्र

श्रीशंकर

श्रीमत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक गोविंद गंगाधर व बालाजी माहादेव मुा पारशीक चरणावर मस्तक ठेऊन साा नमस्कार विनंती विज्ञापना. ताा छ १६ शौवालपावेतों स्वामीच्या कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. येथे गणिमाची जूट गाडदी जुमल्याने येते. त्याजवर बाणाशिवाय फूट होणार नाही, यास्तव च्यार पाचसे बाण व दाहा बाणदार चांगले जलद रवानगी होऊन येथे पावत यैशी आज्ञा जाहाली पाहिजे. छ मािरी राा राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल याजकडील दीडशे माणूस आले. राजमाचकर सवासें आले व माहुलीकर चालीस याजप्रमाणे आले. काल छ १५ सवालापासून इंग्रजाची मारागिरी दोहो मोर्च्यावरून दक्षण पश्चमेच्या मोर्च्यावरून मारागिरी सुरवात जाहाली आहे. दिवसेदिवस मोर्च्याची बलकटी करीत चालिला आहे. किल्याचे मारगिरीने दोन तीन मोर्चे येथलि ठिकाणे काईम केली होती ती धुडाऊन लाविली. दोन मात्र लागू जाहाली आहेत. कुमक लौकर येऊन पोहोचली पाहिजे. स्वामीच्या पुन्यप्रतापेकरून शत्रूचा पराजय लौकरच होईल. रुपये व कापड लोकास दिल्हे पाहिजे. त्याची रवानगी लौकर होऊन येई ते करणार स्वाम समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writers—Govind Gangadhar and Balaji Mahadeo—ask for rockets and urge the Peshwa to lose no time in reaching succour as the enemy is daily gaining ground.*

No. 58] [20-12-1774

पौ छ १९ सवाल सन
खमस सबैन मार्गसिरष
तीन प्रहर दिवस
शुक्रवार

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आनंदराव राम चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १६ सवाल दोन प्रहर. प्रस्तुत आज तोफा व गरनाला कोटात बेसुमार टाकितो. किल्याच्या सफेल्या मारून नस्तनाबूद केल्या. दर्या-बुरूज खाडी किनाऱ्याचा, त्याच्या तोफा लटक्या केल्या. गरनाल सिंमेपलीकडील पडते. आठ दिवस मारगिरी जाहाली तरी फौज येऊन पावत नाहीं. कोणता प्रकार करावा ? याउपर फौज येत नाहीं तरी उतम नाही. सेवेसी कळावे. शेवेसी श्रुत व्हाव हे विज्ञाप्ति.

¶*Anandrao Ram in a tone of despondency reports the deadly effect of the enemy's fire. A part of the walls has been demolished and Maratha guns have been silenced.*

No. 59] [20-12-1774

पैवस्ती छ २९ सवाल
सन खमस सबैन.

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ १६ सवाल पावेतो येथास्थित असें विशेष. साष्टीहून पत्र छ १४ सवालचें आजच आलें तें पाठविलें आहे त्याजवरून विदित होईल; व उरणाहूनहि पत्र आलें तेहि पाठविलें त्याजवरून कळेल. राजश्री राघोजी आंगरे वजारत-माब सरखेल याणीं पांच साहाशें माणूस उरणचे खाडींतून साष्टीस कुमकेस पाठविले. राघोजी आंगरे खासा रेवसेस उरणानजीक आहेत. त्याचा पैका सालमजकुरीं झाडून पावला नाहीं, याजमुळें त्याची तयारी उणी आहे; परंतु साष्टीवर इंग्रेज गेला तेव्हां सर्वथैव त्याचे मनांत अरमार सुद्धां जाऊन पोहचावें. सरकाराचें अरमार लवकर येतांच इंग्रजाचें पारपत्य करावें हाच विचार त्याचा आहे. धुळ-पासहि आम्ही येथून दोन तीन पत्रें व खिजमतगार जलद आरमार घेऊन साष्टीकडे

जाण्याविशी लिहिलें आहे व आंगरे यांसहि पंचवीस हजार रुपये तूर्त येथें त्यांचे कारभारी माहादाजी विश्वनाथ व रघुनाथ तानाजी आहेत त्यांचे पदरीं घातले आणि रघुनाथ तानाजी यास मशारनिलेकडे रवाना केलें. बरोबर सरकारचे कारकून व खिजमतगार दिल्हे आहेत, हे जाऊन पोहचतांच आंगरे अरमारसुद्धां वसईचे खाडींतून साष्टिस येऊन पोहचतात यांत गुंता नाहीं. याप्रमाणें माहादाजी विश्वनाथ यांणीं पक्के बोलिलें. त्याजवरून त्यास सदर्हूप्रमाणें ऐवज देऊन, लवकर जाण्याविशी लिहून पाठविलें. येथून कुमक करावी तर येथील अस्त्या पदार्थांत हजार दीडहजार माणूस रवाना केलें, व राजश्री विसाजी कृष्ण याजकडील फौज व आणखीं पथकें मिळोन सात आठशें राऊत पुढें रवाना केले आहेत; व विसाजीपंतहि मागाहून कूच करून दर मजल चालले आहेत. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Naro Appaji forwards letters to the ministers, received from Salsette mentioning the concentration of armies at Salsette and his instructions asking Dhulap and Angria to send their fleets, paying Rs. 25,000 to the latter for his expenses.*

No. 60] *[20-12-1774*

पौ छ १८ सवाल सन
खमस सबैन मार्गसिरष
मास सायंकाळ घटका रात्र

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक आनंदराव सिंदे मोकाम जंजिरे रेवेदंडा चेरणावर मस्तक ठेऊन विज्ञापना. ताा छ १६ माहे सवालपावेतो स्वामीचे कृपाअवलोकनेकरून सेवकाचे व जंजिरे मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. छ १२ माहे सवालची सनद सादर जाली, ते. छ मजकुरी दाखल जाली. तेथे आज्ञा कीं मुंबईकर इंग्रेज लढाई सामान घेऊन अरमारसुधा साष्टीस येऊन बसला आहे. त्यास साष्टीचें किल्यातून मारागिरी करून लढतच आहेत; परंतु इंग्रेजाचे पारपत्य चांगले जाहाले पाहिजे. याजकरितां हुजरून राजश्री विसाजी कृष्ण मातबर फौजेनसी रवाना जाहाले आहेत. व पुढेहि राा बापूजी हरि याजबराबर गाडदी व राऊत व मराठे माणूस मिलोन दोन आडीच हजार फौजेनसी गेले आहेत. त्यास तुम्ही तालुके मजकूर येथील तीनसे भंडारी निवडक व सरदार ठेऊन

अडसेरी व खर्चास सिरिस्तेप्रमाणे बेगमी करून रवाना करणे. राजश्री आनंदराव धुलप वगैरा तालुकदार यांस पत्रें रवाना केली आहेत. ती विज्येदुर्गपावेतो माहागेरी पाठऊन, पोहचऊन जाब घेऊन यावे व चौकडील बातमी वरचेवर घेऊन हुजूर लिहीत जाणे म्हणौन आज्ञा. त्यास पूर्वी शेवेसी विनंतीपत्र लिहिले त्याजवरून विदीत होईल. त्याजवर येथून मुजरद माहागिरे बेलापुरास पाठविली. तेथून काग(द)हि पुढे साष्टीस पायेमार्गे कलव्याचे वाटेने किल्यात जाऊन आले. इंग्रेज ठाण्याचे शहरात मोर्चेबंदी करीत आहे. मारगिरी इंग्रेज करीत नाही. किल्यावरूनच मारगिरी होत आहे. प्रस्तुत साष्टीचे बंदरचा खाडीचे तोंडाचा बुरूज इंग्रेजानी घेऊन त्याजवरील तोफा मात्र किल्यातील रहदारीवर मारतो. अरमारची मारगिरी करावयाचा पला पोहचत नाही. तरांडी दूर दूर ठेविली आहेत. सामानसरंजाम सरंजामाची गलबते सावकारी व पतमाऱ्यावरून सामान चेंदणीच्या बंदरात उतरून मोर्चेयावर नेतो. मोर्चे च्यार घातले आहेत. यैसी बातमी मुजरद किल्यात कागदी जाऊन आणिली. मुंबईकडील बातमी तर इंग्रजाने बहुतेक सिबंदी साष्टीस नेली, त्यामुले मुंबईत लोकाची कमती आहे. त्यांणी बारेयाजवर तरांडी मुंबईच्या व वेसावे याच्या व वसईच्या येथे रखवालीस ठेविली आहेत. आलीकडे सुरतेहून हजार पांचसे माणूस कुमकेस आले म्हणौन वर्तमान आहे. फिरग्याचें अरमार तीन सरया व च्यार गुराबी व च्यार गलबते व कांही सावकारी तरांडी यैसी मुंबईच्या बारेयावर येऊन राहिली आहेत. इंग्रज साष्टीवर गेल्यानंतर येका दोहो दिवसी फिरंगी याचे अरमार मुंबईच्या बारेयाजवर आले. सालाबाद अरमार येऊन मुंबईस तीन दिवस राहून निघोन दवणेस जात असते. हाली आले ते सात आठ दिवस तेथेच आहे, व कागदी कागदी पतेमारी आरमारातून गोव्यास पाठविली आहे. म्हणौन मुंबईची बातमी आहे. फिरंगीयाचे अरमार दुसरे गोव्यास तयार आहे. म्हणौन बातमी आहे. धुलपाकडील अरमार फिरंग्याचे पिछाडीस आले होते ते कुंभारूचा बारा पार जाल्यावर सरकारचे अरमार कुंभारूच्या बंदरांत लाकूडफाटे भरावयास राहिले, यैसी बातमी जंजिरे मजकुरी कलताच इंग्रेज साष्टीवर गेल्याचे वृत लेहून मुजरद माहागेरी अरमारात पाठविली, तो आरमार निघोन हेटेप्रांती विज्येदुर्गाकडे गेले. माहागेरी फिरोन आली. शामलाकडील वृत तर इंग्रेज साष्टीवर गेला ते वख्ती शामलाची तयारी आगोधरची होतीच. ते समई कांही गलबते मुंबईच्या बारेयापावेतो जाऊन, मागती फिरोन जंजिरा आला. आरमाराची सरंजामसुधा माहागेऱ्या व भांडा व तरांडी याची सिधता आहेच. बाहेर जातो, मागती बंदरांत येतो, दोन तीनसे माणूस पाईउतारा माडल तपा व मुरूड तपेयात फिरत आहे. हाली शामल

अरमार सामानसुधा बाहेर गेला म्हणौन तळे व बिरवाडीहून आजच बातमी लेहून आली. याचा इतबार धरवेत नाही. आपले जागा चौकी पाहारे याचा बंदोबस्त करून सावध असो. माहागिरी मुजरद विजयेदुर्गपावेतो रवाना केली आहे. रा। कृष्णाजी धुळप यास हाली सरकारची सनद आली, ती त्यांकडे रवाना केली. वरकड तालुकदारास पत्रे पोहचऊन जावस्वाल घेऊन माहागेरी सत्वरच येईल. तिकडीलहि बातमी येताच बातमीपत्राचे जाबस्वाल सेवेसी रवाना करितो. तीनसे भंडारी कलव्यास जलद रवाना करावा म्हणौन आज्ञा. त्यास शामलाची गडबड फारच आहे. हे जागे सरदीचे, हा सर भरण्याचा (?) आर्थ सेवेसी विदितच आहे. त्याचे अरमार हिरबोर करीत आहे. समई दोनी किल्याचा बंदोबस्त राखोन त्याचे उपराल्यास भडारी लोकासिवाई दुसरा भरणासे नाही. तुर्ताच शामलाचे अरमार व सरंजामी गलबते बंदरातून बाहेर गेली आहेत. इंग्रजाचा त्याचा संदर्भ आहेच. दुसरे ठिकाणीहून साष्टीचे कुमकेस लोक जातील याअन्वये त्याची गडबड आहे कीं काय ? याचा रोख दोनच्यार दिवस पाहून आज्ञेप्रमाणे काही भंडारी बंदोबस्तास ठेऊन, सेपनास भंडारी याची रवानगी साष्टीस करितो. दोनी किले व छबिनाची दोनी गलबते मिलोन, गोलंदाज सतरा अठरा असामीची नेमणूक आहे. त्याणी बंदोबस्तास ठीक पडत नाही. याजकरिता जदीद गोलंदाज आसामी दाहा ठेवावयाची आज्ञा जाली पाहिजे. जरूर ठेविलेच पाहिजे ते ठेवितों. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Anandrao Sindia, Killedar of Rewdanda, as desired by the Peshwa supplies news of the attack of the English on Salsette and also of the movements of their fleet as well as those of the fleets of Dhulap and the Sidi, their relative strength, their equipment and movements. He also sends some Bhandaris as reinforcement for the army under Visaji Krishna.*

No. 61] [*20-12-1774*

पो छ १८ सवाल मध्यरात्र

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामींचे शेवेशी

विनंती सेवक आनंदराव राम, मु॥ कोट ठाणें, चरणावर मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १६ सवाल आवशीची दहा घटका रात्रपर्यंत किल्हे मजकूरचे व सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. छ १४ सवालचें आज्ञापत्र छ मजकुरीं तीन घटका रात्रीस अवशीच्या सादर जालें. तेथें आज्ञा की, पुणेंयाहून साष्टीपर्यंत डाक बसविली असतां, दिनचर्येचें वर्तमान लिहीत नाहीं. तर सविस्तर वर्तमान डाकेबरोबर लिहीत जाणे व मागील दिनचर्येचें

वर्तमान सविस्तर लिहिणें व पुढें दिनचर्या दिवसामध्यें दोनवेळा लिहीत जाणें म्हणोन आज्ञा. त्यास मागील वर्तमान मार्गशीर्ष शुद्ध ७ शुक्रवारीं[1] पांच घटका दिवसा प्रांत:काळच्या मोष्टीन इंग्रज पुणेयाहून निघोन मुंबईस दाखल जाला. तेच दिवशीं तृतीये प्रहरीं कोशेल (कौन्सिल) जाले आणि गलबतावर दारू गोळा लढवई सरंजाम चढवावयासी लागला. शनवारीं मुंबईहून एका दोवा ग्रहस्तांनीं ब्रातमी लिहिली व अंतस्ते सांगोन पाठविलें कीं; मोष्टीन पुणेयाहून पळोन दोहो दिवसांत मुंबईस दाखल जाला. येतांच कोशेल होऊन लढवई सरंजाम तरांडे याजवर चढवूं लागला व लोकांचा भरणा करूं लागला. दुष्ट बुद्ध दिसतें. सावध असावें. दुसरे दिवशीं आदितवारीं फिरोन मुंबईची बातमी आली कीं, साष्टी अगर वसई दोहींतून एके स्थळीं येतो म्हणोन निरोप आला. सोमवारीं[2] एकाएकीच सहा घटका रात्रीस कुरलेयाचा चौकीदार, व पीरपाव माहूलचा चौकीदार आले आणि सांगो लागले कीं, अस्तमानीं हजार माणूस शीवच्या बंदरीं आले आणि मुंबईच्या बंदरांतून साठ सत्तर गलबतें थोर, पांच मध्यम, दहा कनिष्ट गलबतें व महागिऱ्या पंचावन्न याप्रमाणें हाकारून साष्टीस गनीम येतो म्हणोन सांगितलें. तेव्हांच किल्लेयांत राजश्री भवानजी कदम यासी सांगोन पाठविलें कीं, गनीम आला, खबरदार राहावे, आणि तेव्हांच शहरांतील कबिले कलवेयासी तरीवरून पार करून दिल्हे, आणि सुभापैकीं लोक तीन चारशें माणूस बराबर घेऊन चेदणीस पुढें माळावर बंदरकिनारा जाऊन बसलों. दुसरें दिवशीं मंगळवारीं चार घटका दिवसास तुर्बे याचे नस्तावर गलबतें दिसो लागली. पुढें वीस माहागिऱ्या, हरेलीच्या खाडींत सिरल्या. संध्याकाळचें दहा घटका दिवसास चेदणीच्या खालीं चौकांत दाखल जाला व पायेमार्ग हरेलीचें बंदरीं उतरून पांचसे माणूस आले. कुरलेयाकडून पायेमार्ग उतरून सीवेहून कुरलेयासीं हजार लोक आले. जलमार्ग पायमार्ग मिळोन तीन टोळ्या करून दहा घटका दिवसा संध्याकाळीं गनीम खुसकीच्या मार्गें दोहोंकडून व जलमार्गें येकीकडून, येकूण तिहीकडून मिळोन आडीचहजारपर्यंत उतरला. जमाव थोडा, तेव्हां गनीम अंगावर घेऊन मार्गिरी करीत करीत किल्ल्याखालीं आलो. गनिमानें शहर धरलें. इतक्यांत खाडीचे पाणी वोहोटलें. राऊत राजश्री जोत्याजी जाधवराव व सिवराव हरि कलवेयांस सवादोनसें होते, त्यासी आणावयासी राजश्री गोविंद गंगाधर व बाळाजी माहादेव पाठविले. त्यास दोन्ही पतकें मिळोन ऐशी नव्वद राव्रतानिसीं आले. जाधवराव किल्ला डावा टाकून माजिवडेयावर आले. किल्ल्याची मारगिरी चालली होती. कांहीं गोळा वरावरून जाई, कांहीं जेथें थवा

---

१. ९ डिसेंबर १७७४. २. १२ डिसेंबर १७७४.

5807

दृष्टीस पडे तेथें मार्गीरीमुळें मरे. अस्तमान होता होता घराचा अश्रा सोडून हजार गाडदी किल्लेयाखालीं आले. तेव्हां सुभेकरी लोक व किल्लेकरी मिळोन चालून घेतले. तेव्हां मारगिरी त्याची याची जाहाली. तें समई तिकडील दहावीस ठार जखमी जाहाले. आपलेकडील खासबारदार दोन व मनवर एक व आरब एक याप्रमाणें ठार जाले व माहादजी नाईक चौधुले यासी गोळीची जखम मानेवर पाठीमागें लागली. फारच आहे. याप्रमाणें झटापटी हाऊन गनिमानें शहर धरिलें. आपलेकडील सुभेकरी लोक घेऊन किल्ल्याच्या उत्तरेस तळ्यावर राहिलों. इंग्रेज मोर्चेबंदीच्या कामास लागला. जेथें मोर्चा दृष्टीस पडे, तेथें मारगिरी किल्ल्याची नेहेमीं चालऊन मोर्चा घालूं दिल्हा नाहीं. याप्रमाणें दोन दिवस गेले. तिसरें दिवशीं ब्रस्पतवारी+ इंग्रजाच्या गुराबा, गलबतें चौकांत होतीं. ती संवरावर मध्यरात्रीस किल्ल्याचे दक्षणेस मुंबईच्या अंगास खाडींत तीन बुरूज होते. त्याजवर गर्नालाची व तोफाची मारगिरी केली. त्यास तिहीं बुरुजांत मुख्य बुरूज सर्ज्या त्यांत सरदार सिदोजी पवार गर्नाळा मारगिरीनें बुर्जीत माणूस पंधरा होते. त्यापैकीं नऊ ठार जाले. बुरजास आग लागली. बाकी सहा माणूस पाण्यांत उड्या टाकून सरदार सुद्धां किल्ल्यांत आले. दोन प्रहर चांगला लढला. तीनीं बुरूज इंग्रजानें काइम केले. त्यावरून मारगिरी किल्ल्यावर व फत्ते बुरजावर व पायमार्गाच्या तान्यावर चांगली साफ करितों. याप्रमाणें ब्रपतवारीं जाले. शुक्रवारीं प्रातःकाळीं वसईचे माणूस चार पांचशेंपर्यंत व अरमारी गलबतें, माहागिऱ्यावरून आले. ते प्रातःकाळीं काल्हेरचे बंदरीं तरीवर उतरले आणि माजिवडेयावर आले. त्यांच्या आमच्या भेटी जाल्या. उपरांत लोकांनीं जागे धरून जेवावयाच्या उद्योगास लागले. तो त्यांणीं बातमी राखोन तीन टोळ्या करून छापा घालावयासीं आला. तेव्हां आपलेकडील लोक व राऊत यांची व त्यांची झटपट जाहली. तेव्हां जाधवराव यांजकडील घोडीस गोळी लागली व शिवराव हरि यांजकडील राऊतास दोन गोळ्या लागल्या व साष्टीकर तीन जखमी जाहले. याप्रमाणे होऊन इंग्रजाचे गाडदी फिरोन गेले. आपले लोक सावरोन राहिले. राऊत उतरोन कलवेयासी आले. याप्रमाणें शुक्रवारीं जाहलें. शनवार, आदितवारीं विशेष प्रकार ल्याहावासा नाहीं. साष्टी प्रांतांतील रयेत झाडून इंग्रजांकडे मिळाली. दहा बाराशें हत्यारबंद शिपाई मुलकी रयेत सजलीन, याप्रमाणें दोहों दिवसांत जाले. इंग्रज सहा दिवस पर्यंत मोर्चेच काईम करीत होता. जेथें जेथें मोर्चा घालूं लागे, तेथें तेथें मारगिरी करून मोर्चा उधळीत गेलों. त्यास आदितवारी मोर्चे रात्रीस दोन तयार जाहलें.

+ बृहस्पतवार, १५-१२-१७७४.

किल्ल्यांच्या दक्षणेस तरीं माडवीचे घराचा व कृष्णाशेट गुजर याच्या घराचा आश्रा धरून मोर्चा काइम जाहला व वायव्येस किल्ले याचे लल्ते तळें आहे त्याचे पैलतीरी झाडाच्या आश्रयेंकरून, मोर्चा काइम जाहाला व रिबेरी अरमारचे कारखान्याचा झेंडा खाडीचे किनारा आहे, तेथें तोफ मातबर ठेवून फत्ते बुरुजास व पायेमार्गास मार लागूं जाहला. यामुळें वोडी व माणूस उतरणें ते संभाळून उतरले पाहिजे. सोमवारीं वीस पंचवीस गोळे व दहा पंधरा गर्नाळा किल्ल्यांत पडल्या. परंतु सोमवारीं कोणी दुखावलें नाहीं. दोघांस मात्र गर्नाळेच्या कपरा लागून जखमा हलक्याच जाहाल्या. आज मंगळवारीं प्रातःकाळापासून दहा घटका रात्रींपर्यंत गर्नाळा शंभर व गोळे तोफांचे आडीचशेंपर्यंत किल्ल्यांत पडले. एक गोलंदाज गोळ्यानें ठार जाला. तीस पस्तीस माणूस गर्नाळेच्या कपरीनें जखमी जाले. त्यांत दहापांच भारीच आहेत. आपलेकडील मारगिरीनें आठ दिवसांत इंग्रजाचे ऐशीं नव्वदपर्यंत ठार व जखमी जाहाले. याप्रमाणें आठ दिवसांचें वर्तमान दिनचर्येचें जाहालें. तें सेवेसी लिहिलें आहे. कुमकेविसी वारंवार लिहीत गेलो. त्यास कुमकेस पाईचे माणूस बत्तिसशें व राऊत हजार रवाना जाले आहेत म्हणोन दोनचार आज्ञापत्रें सादर जाहालीं. परंतु हा वेळ पर्यंत राऊत आलेच नाहीं. बत्तिसशें लोकांपैकीं आले

वसईकर,	राजमाचकर,	सरसुभा व कल्याण,	माहुली,	राजश्री आंगरे कुलाबकर
५००	१२५	१००	३५	१००

येणेंप्रमाणें साडेआठशें माणूस आले आहे. लोक भरणेवाईक आहेत. इंग्रजाशीं गांठ, हजार पंधराशें बरकंदाज, दोन हजार राऊत याप्रमाणे असल्याविना गनीम हयास येतां दिसत नाहीं. राजश्री जोत्याजी जाधवराव शुक्रवारीं आलीकडे कलवेयासीं आले. त्यास नित्य साष्टीस फौजसुद्धां या म्हणोन म्हणतों, परंतु त्याणीं साफ सांगितलें कीं, थोडक्या सामानानिशीं येत नाहीं. दुसरी फौज आली म्हणजे पइलीकडे पोख्ता सामानानिशीं येऊं. शत्रु दिवसेदिवस बळावत जातो, याजकरितां फौज गाडदी वगैरे लोक लौकर येऊन पावत तें करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Anandrao Ram gives to the Peshwa a detailed report of the attack on Salsette made by the English and the measures taken by the Maratha garrison to meet them. He pleads his inability to hold on long, unless reinforcements are sent in speedily.*

- Son of Pilaji Jadhav.

5809

No. 62] [21-12-1774

छ १८ सवाल मध्यरात्र

श्रीशंकर

राजश्रिया विराजित राजमान्ये
राजश्री बालाजीपंत दाजी स्वामीचे शेवशी

पो गोविंद गंगाधर व बालाजी माहादेव भिडे मो ठाणे साष्टी सा नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता छ १७ शौवाल पा वर्तमान यथास्थित असे विशेष. ता मारचे वर्तमान इंग्रज येऊन किल्यास मोर्चेबंदी केली आहे, कलावे. वरकड मजकूर गंगाजी जासूद यासी तुम्ही सागितले होते की, डाक पाचा कोसावर परशिकपावेतो बसवावी. त्यावरून गगाजी छ मारी येथे आला. त्याणे सागितले की येणेप्रो डाका बसविल्या ठिकाणे बी तपसील

१ वाकडास जोडी
१ चादखेडास जोडी
१ कढदे जोडी
१ आंबेगावास जोडी
१ कुसगाव जोडी
१ खडालेयासी जोडी
१ खोपवली घाटाखाली जोडी
१ चौकास जोडी
१ चिखले यासी जोडी
१ तलाजे यासी जोडी
१ परसिकास जोडी.

११

येणेप्रो बसविल्या आहेत. परसिकास नेहेमी मानाजी जासूद बैसविला आहे. याप्रो बसविल्या आहेत. कलावे छ १४ सवाली डाक येथे येऊन पावली. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Gangadhar Govind and Balaji Mahadeo report to Balajipant the various stations upto Parsik at which relays are posted to carry news expeditiously.*

5810

No. 63] [21-12-1774

पौ छ १८ सवाल

मध्यरात्र

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक आनंदराव राम व भवानजी कदमराव चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना. ता। छ १७ सवाल प्रात:कालपावेतो किले साष्टी येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचीं आज्ञापत्रे छ १४ मिनहुचीं दोन सादर जाली तेथें आज्ञा, कीं दिनचर्येचें वर्तमान दिवसांत दोन वेल लिहिणे. हशमी व गाडदीची रागी केली त्याची याद पाठविली ते पावली. आतांच पत्रें पावली. येथें काल लोक दाखल जाले.

७५ कल्याणकर
१५० राजमाचकर
७०० वसईकर
४०० प्रथम
३०० हाली अंताजी सिवदेव समागमं

९२५

७५ माहूलकर
१५० आंगरियाकडील

२२५

येकूण साडे अकरासे कालच आलिकड उतरले. आज काये येतील ते पाहावे. मागाहून लेहून पाठऊ. हुजूरचे रागी पैकी कोणी आले नाहीं. फौजहि अद्याप नाही. आज गनीम आल्यास नव रोज जाहाले. लोक येतात ते भीतभीत येतात. कालपासून इंग्रेजानी मारगिरीची शर्त केली. गरनाला व तोफा मातबार मातबार मारतो. जंग्या जाया केल्या, याजमुलें आपल्या तोफा काही विलग पडल्या. आलें माणूस हें व आमचे सुभेकरी कोटकरी दीड दोन हजार माणूस जालें. इतक्यांनी रात्रौ त्यावर घातलें तरी काम होईल; परंतु कालगतीचा प्रकार कोणी लौकर येत नाही. आले तरी गाडदी व फौजेची वाट पाहतात. कोठवरी हिमत द्यावी? यासमई रा। येसाजी सिवदेव याणी शर्त केली. पैका सामान सरंजाम लोक पाठविलें. आपला भाऊ अंताजीपंत पाठविलें. गोलंदाज व सुतार व लोहार व गवंडे सिपी जे जे सामान पाहिजे त्याणी पुरावा

फार केला नाही तर येथे सर्व सरंजाम होता. अकस्मांत गनीम आला असा; स्वामींचे पुण्यप्रतापे जाग्याची फिकीर नाही. फौज येईल सर्व होणे ते होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Anandrao Ram reports to the Peshwa the arrival of about 1,100 men at Salsette. He speaks very highly of the attempts made by Yesaji Shivdeo to relieve the beleagured place from Bassein.*

No. 64] *[21-12-1774*

पौ छ १८ सवाल
मध्यरात्र सन खमस
सबैन

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आनंदराव राम चरणावरी मस्तक ठेऊन नमस्कार विज्ञापना. ता। छ १७ सवाल त्रितीय प्रहर कालचें व प्रात:कालचें वर्तमान लिीं. आज प्रात:कालापासून हा समय इंग्रेजानी दर्याबुरूज तोफांनी मारून लेश केला. हा बुरूज तीभद्री आहे. त्यावरील निशाणाची काठी पाडली. भांडी जायां केलीं. बुरजांत कांही बाकी राहिली नाही. माणसाचा तेथें ठराव होत नाहीं. दर्या बुरजापासून दक्षण भागचा गंगा बुरूज लादणीचा आहे तोहि (त्या)णी मारून लेश केला. दोहींकडील फांजा दक्षण पश्चमच्या मारला. माणसाच ठराव नाही. राहतां हणमंत बुरूज राहिला. त्यांत आम्हीं सर्व आन्हो. यावर प्रात:काली मार करील. इंग्रेजानी मारगिरीखाली किला मार केला. गरनाला थोर थोर घागरी इतक्या वाडतात त्याणी असमानच्या मारानी माणूस घाबरे केले. बाहेर माणूस वसईचे वगैरे आले त्याची संख्या प्रात:कालच्या पत्रांत लिहिली, परंतु त्याच्या वस्तु मोर्चे मारवत नाही. त्यांत गोविंद हरि गेले होते, ते म्हणतात की इतक्या सामानानी काम होत नाही. फौज व गाडदी आल्याखेरी त्यावर हला होत नाही. फौज तर हा कालवरी आली नाही. हिमतीचा विचार राहिला नाही. गोविंद हरि दोनसे बरकंदाज घेऊन येणार ते अस्तमानी किल्यात येतील. फौज आज दाहा दिवस येते. अर्थ तरी राहिला नाही. आम्ही व कोटकरी मारामार करावी इतकाच प्रकार. स्वामीनी किले हायचे लोक रा। केले, कागदी संख्या लिहिली, त्यास हा कालवरी आले नाहीं. स्वामीस कलावे हे विज्ञापना.

¶*Anandrao Ram reports to the Peshwa the breaches in the ramparts of the Salsette fort effected by the heavy fire of the English artillery.*

No. 65] [21-12-1774

पौ छ २५ सवाल

सन खमस सबैन

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १७ सवालपावेतो यथास्थित असे विशेष. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब पलोन जात आहेत. दरमजल जातात. आपल्या फौजा सब्या होऊन मागाहून जात आहेत. त्याजकडील मंडली झाडून त्याजबाा गेली. त्यास सदासिव रामचंद्र व भिडे व काणे व आबाजी माहादेव व नातू वगैरे मंडलीची मुलेमाणसे पत्र पावताच किलोकिल्यांस बंदोबस्ताने रवाना करणे. आधी काम हे करणे. कोणाची भीड न धरिता रवानगी करून कोणास कोठे पाठविली याचा जाबता लेहून पाठवणे म्हणौन आज्ञा. त्यास आज्ञेप्राो रवानगी करून जाबता नावानसीवार पाठविला आहे त्याजवरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Appaji was ordered to put into confinement the relatives and retinue of all the accomplices of Raghunathrao. He reports having executed the orders.*

No. 66] [21-12-1774

पौ छ २४ सवाल खमस सबैन.

श्रीगणपति

राजश्री नारो आपाजी
स्वामी गोसावीं यांस

विनंति उपरी तुम्हीं छ १६ सवालचे मध्यरात्रीचें पत्र साष्टीचें मजकुराचें पाठविलें ते पावलें. आरमार व राऊत व हशम लोक व गाडदी यांचे रवानगीचा मजकूर व साष्टीतील मोर्चेबंदीची बातमी आली त्याचा मजकूर लिहिला तो सविस्तर कलला. उपराला करून शत्रूचे पारपत्य करावें येतदविषईं तुमची तरतूद चांगलीच आहे. तिकडील बातमी राखोन वर्तमान येईल तें वरचेवर लिहून पाठवीत जाणें. जाणिजे छ १७ सवाल सुाा खमस सबैन मया व अलफ हे विनंति.

¶*Naro Appaji's promptness in sending reinforcements for the defence of Salsette is commended.*

5813

No. 67] [22-12-1774

श्री

राजमान्य राजश्री जनार्दन रायाजी

दिा राजश्री गोपाल नाईक तांबवेकर गो यासीं

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुा खमस सबैन मया व अलफ. मुंबईकर इंग्रेज साष्टीस येऊन मोर्चेबंदी करीत आहे, त्यास मदत सुरतेहून येणार; सबब सुरतेचे बंदीविसी राजश्री नारो आनंदराव यास पत्र सादर केले आहे; तर तुम्हीं फौजसुधा व ते सरकारचे फौजेसुधा जाऊन सुरतेजवल उतरोन बाहेरील रस्त वगैरे शहरांत जात असेल ते मना करणें. कदांचित तुम्हीं तापी उतरोन गेला असेला तऱ्हीं मागे फिरोन येऊन पत्र पावतांच सुरतेची बंदी करणे. जाणिजे छ १८ सवाल आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa orders Janardan Rayaji to help Naro Anandrao in effecting a blockade of the English at Surat.*

No. 68] [22-12-1774

पौ छ २० सवाल सन
खमस सबैन दीड प्रहर
दिवस सायंकाल

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक आनंदराव राम चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १८ माहे सवालपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. इंग्रेजानी काल मारागिरी केली त्याप्रो आज फारच केली. लादणीचे बुरूज व फांजा लेश केल्या, तथाप कोटकरी व सुभेकरी लोक किल्यांत आहेत ते काही हिमत सोडीत नाही. वसईकर वगैरे लोक कालच्या पत्रीं बारा तेरासे माणून लिा होते. चौकस करितां दिडीबाद माणूस आहे, त्याच्या वस्तु मोर्च्यावर आजपावेतों घालविलें नाहीं. आज लस्कर व गाडदी कलवियास प्रात:कालच्या दीढा प्रहरा दिवसास कलवियांस आले. राजश्री आपाजीपंत फौज घेऊन कलवियास आले, त्यांस जाधवराव येथील मोड खाऊन गेले ते भेटले. यास्तव ते म्हणतात की आलीकड शाहाणा माणूस पाठऊ व चौकस करून मग

येऊं; येथे तर कांही बाकी राहिली नाही. फांजा साफ पडल्या. आम्ही रात्रौ पेश्वा भरणार, नालिसी लेहवत नाहीं. वसईकर वगैर हजार आहा ते त्याणी गनीम वोढून घ्यावा तेहि घेत नाही. असो, पुण्य धण्याचें आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. गुरुवार दिवस घटका संध्याकाल ४

¶*Anandrao Ram describes a severe artillery fire by, the English which resulted in razing to the ground all the fort-walls.*

No. 69] [*22-12-1774*]

पौ छ २६ सवाल सुा खमस
सबैन मार्गसिर्ष मास हा महमद
रफी साडणीस्वार

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी गोसावी यास

विनंति उपरी तुम्ही छ १२ सवालचे पत्र पाठविले ते छ १८ मिनहूस थालनेरचे मुक्कामी पावले. इंग्रज साष्टीस येऊन लडाई सुरू जाली म्हणोन लिहिले ते कळले. राजश्री विसाजी कृष्ण याची रवानगी कोकणांत केली म्हणोन लिहिले ते कळले. उत्तम केले. महादेवाजवळ शाहाजी भोसले वगैरे फौज जाली असेल तेथून आणून कोकणांत रवाना करणे. सदरहू फौज आणून विसाजी कृष्ण याजकडे पाठविणें. सास्टी वसई येथें निकडीचे काम पडेल त्या ठिकाणीं विसाजीपंतीं मदत करावी याप्रमाणे त्यास वरचेवर लिहीत जाणे. काही येथें तापीपार मुक्काम जाहाला. येथून बांब्याचे लोरखेडे बारा कोस आहे ते घ्यावयास सरकारची फौज व नवाबाकडील फौज गाडदी तोफखाना रवाना केली आहे. ते काम होई तो तेथें दोन तीन मुक्काम आहेत. ते काम जाहालियावरी पुढें दरमजल जाऊन. दादा नर्मदापार गेले त्याचे पाठीमागें सरदार गेले. मागाहून हरिपंत थवसा मिळून गेले. रेवातीरास पावले. पुढें जातील. दादा सुज्यादौलाकडे फार करून जातीलसे दिसते. तिकडे गेलियानें कामच जाहाले. राजश्री विसाजी केशव याची रवानगी केली. परभारे त्रिंबकाकडून वसईस जातील. दादा लांब जातील अथवा कांहीं एक ठराव होईल तो पंधरा दिवसांत निदान एक महिन्यांत इकडील जाबसाल उरकोन फडशात येईल. रवाना छ १८ सवाल बहुत काय लिहिणें हे विनंति.[+]

¶*Sakharam Bapu recognises the work done by Naro Appaji in sending reinforcements to Salsette under Visaji Krishna. He communicates to the addressee the movements of Raghoba.*

+ पत्र सखाराम बापूचें, स्वारींतून पुण्यास नारो आपाजी तुळसीबागवाले यांस.

No. 70] [22-12-1774.

नक्कल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक आनंदराव राम, चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १८ माहे सवालपावेतों स्वामींचे कृपावलोकने करून यथास्थित असें विशेष. इंग्रजांनीं काल मारगिरी केली, त्याप्रमाणें आज फारच केली. लादणीचे बुरूज व फाजा[१] लेश केल्या. तथापि कोटकरी व सुभेकरी लोक किल्ल्यांत आहेत ते कांहीं हिंमत सोडीत नाहीं(त). वसईकर वगैरे लोक कालच्या पत्रीं बारातेरासें माणूस लिहिलें होतें, चौकसीकरितां दिढीबंद माणूस आहे. त्याच्या वस्तू मोर्च्यावर आजपावेतों घालवलें नाहीं. आज लष्कर व गाडदी केळवियास प्रातःकाळच्या दिढा प्रहरा दिवसास केळवियास आले. राजश्री आपाजीपंत फौज घेऊन केळवीयास आले. त्यास जाधवराव येथील मोड खाऊन गेले ते भेटले, यास्तव ते म्हणतात कीं, आलीकडे शाहाणा माणूस पाठऊन चौकस करून मग येऊं. येथें तर कांहीं बाकी राहिली नाहीं. फाजा साफ पडल्या. * * * रात्रौ घेव्या भरणार. नालीसी लेहवत नाहीं. वसईकर वगैरे हजर आहेत. त्यांणीं गनीम चोढून घ्यावा, तेहि घेत नाहीं. असो. पुण्य धन्याचें आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. गुरुवार दिवस घटका संध्याकाळ.

¶*Anandrao Ram reports the miserable plight of the defences and complains against the relief party not acting vigorously.*

No. 71] [22-12-1774

पौ छ २३ सवाल सुा
खमस मार्गसीर्ष मास

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामींचे यासी

विनंती उपरी. तुम्ही पत्रे छ ११ सवालची पाठविली ती छ १९ मिा पावली इंग्रज मुबईकर साष्टीस आला, येविसीचा मजकूर सविस्तर लिहिला तो * * * व कोकणचे बातमीची पत्रे पाठविली ती पावली. त्यातील मजकूर विदित जाहाला. राजश्री विसाजी कृष्ण यास फौजसुधा कोकणात रवाना करितो व

---

[१] तट.

हशम लोक व गाडदी पाठवितो म्हणोन लिा ते कळले. त्यास येविसीचे मजकुराची दुसरी पत्रे छ १२ सवालची आली, त्यात मजकूर लडाई सुरू जाहाली म्हणौन लिहिलेत, त्याचा जाब आज छ १८ सवाली साडणीस्वाराबाा लेहून जलद तुम्हाकडे पाठविला आहे, त्याप्रमाणे फोज व लोक रवाना सत्वर करणें. जाणिजे छ १८ सवाल सुाा खमस सबैन मया व आलफ हे+ विनती.

¶*Naro Appaji is asked to send men immediately to Salsette.*

No. 72] [*23-12-1774*

नकल

पो छ २० सवाल सुाा खमस
सबैन तीन प्रहर दिवस

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक आनंदराव राम, चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १९ सवाल, भृगुवार, दिवस तीन प्रहर. काल रात्रीं गाडदी खाडीअलीकडे उतरले. वसईकर वगैरे लोक देखील आंगरे हशमी माणूस येकत्र होऊन आले. प्रात:काळच्या प्रहर सा घटका दिवसास इंग्रजावर चलोन घेतले. गाडदी दोनशें होते, ते मात्र झुंजले. मराठे लोक तमाम पळाले. गाड्यानें झुंझावयाची कमी न केली; वरकड हरिभक्त पळोन गेले, ते कोसभर गेले. तमासा द्रिष्टीनें पाहिला. कांहीं कोटकरी बाहेर घालवावें. चिलखतांत (?) गेले, तों आमचे लोक छीटपीट होऊन गेले, या प्रकारचें वर्तमान. राजश्री विसाजीपंत येतात म्हणोन सरकारच्या पत्रांत आज्ञा जाहाली. येतां राजश्री आपाजीपंत आले, ते कांहीं खाडीअलीकडे उतरत नाहीं. कोटांतील तर बिचार कोटांतील मजकूर तरी बुरूज व सफेली पाडली. भुईबराबर केली. याउपर हल्ला करावयास गुंता नाही. कोटांतील लोक मनस्वी कमी न करितात. येक मुठीचे माणूस नाहीं. कोणता प्रकार करावा? साष्टीसारखी जागा. आज अकरा दिवस स्वामी पृथ्वीपति, राऊतास जरूर असते तर घोडी उपलाणी बसून येते तरी कामास येते. व हटावर यावें तें येत नाहीं. गोविंद गंगाधर व गोविंद हरि व बाळाजी माहादेव त्यांजवळ बसून प्रार्थना करितात, तथाप येत नाहीं. जागा

+ पत्र सखाराम बापूचें,

राखूं म्हणोन हिंमत होती व आहे; परंतु भितांडें पडली यास उपाय काय ! गनीम थोडा असतां, त्यास मारवत नाहीं. हें पत्र शतपत्रांचें जागां लिहिलें असें. आमरणपर्यंत धीर आहे. सेवेसी कलावें सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Anandrao Ram describes an action between the two forces—the English and a relief party that crossed over. He regrets the lack of spirit shown by the Maratha troops.*

No. 73] *[23-12-1774*

पौ छ २३ सवाल च्यार
घटका दिवस सकालचा
सा। खमस मार्गसीर्ष.

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. राजश्री राघोजी आंगरे यास साष्टीकडे इंग्रेजाचे पारपत्यास यावेयाविसी व धुलपास वसईच्या बारियावरी येऊन इंग्रेजाचे पारपत्य करणें म्हणून व वसई साष्टी वगैरे बंदरकिनारीयाच्या किल्याचे हवालदारास खबरदारीनें राहावयाविसी येकून लखोटे ११ आकरा येथून डाकेच्या जासुदाबरोबर रवाना केले आहेत. हे तेथे पावतेक्षणी ज्याचे त्याजकडे जासूदजोड्यासमागमे जलदीनें रवाना करणे. करोलाची पथके पांच सासे राऊत व आठसे दुसरे असे दीड हजार येका दोहो दिवसी रवाना करतो. रा छ १९ सवाल हे विनंती.

¶*Naropant Nana is asked to forward the letters and communications addressed to Raghoji Angria, Dhulap and Havaldars of coastal forts asking them to mobilise forces and to send them against the English.*

No. 74] *[23-12-1774*

पौ छ १९ सवाल
सुा खमस सबैन मार्गसीरष
तीन प्रहर दिवस

श्रीगणपति

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी

पो पुरुषोतम कृष्ण साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ १९ सवाल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले. गंगाधर अनंत पथकसुधा साष्टीस जावयास रवाना केले. त्यास

तिकडे जावयाविसी ताकीद केली; परंतु त्यांचे लोक आवघे जमा जाले नाहीत, याजकरितां यांचे जाणे तिकडे होत नाही. यास्तव मारनिलेस पुरंधरास पाठविले आहेत; तरी यासी पुरंधरी ठेऊन घेऊन पागा दि।। मानसिंग खलाटे यासी निसबतीचे सिलेदार सुधा पाठऊन द्यावे. साष्टीस जाऊन इंग्रज उधलून दिल्यावर लवकरच येतील. खलाट्याविसी तीन पत्रे लिहिली. याउपरी मर्जीस येईल ते करावे म्हणौन तुम्ही लिहिले ते सविस्तर कलले. ऐशास गंगाधर अनंत यांचे लोक सारे जमा जाले नाही म्हणून माघारे पाठविले म्हणून लिहिले. त्यास पुणियांतील राऊत झाडून खाली रवाना जाले असतील. तेव्हा यांस तेथे पुण्यांत ठेवावयाचे होते, म्हणजे यांचे लोकहि जमा व्हावयाची सोय होती. यास्तव त्यांस पुण्यातच ठेवावयाचे क(रावे). मानसिंग खलाटे यासी पाठवावयाविसी तीन पत्रे पाठविली म्हणौन लिहिले. त्यास येथे राउताचा भरणा आहे तो तुम्हास ठाऊकच आहे. तशांत दोन पथके दीडशाची तुमचे लिहिल्यावरून रा। केली. इकडे या तोंडावर राजश्री विसाजीपंत यांस फौजसुधां श्रीमंतानी नेमले होते. त्यास साष्टीचे निकडीमुले तिकडे गेले. इकडील लत्यास नावाचा माणूस अथवा फौज अगदीच नाही. येथ पुरंधरास कोणी खलाटे यासिवाय आणखी येक दोन माणूस चांगले असते तर यांची रवानगी केली असती. ज्यापक्षीं विसाजीपंत दादाच फौजसुधा ति(कडे) जातात तेव्हां त्यांपेक्षां मानसिंग खलाटे अधिक नाही. त्याजकडील फौजेत दोन तीन पथके नामीच आहेत. आम्ही लिहीत असतां खलाटेयांस पाठवीत नाहीं, इतकेच आपले चितांत येत असेल तर इकडील संधान आम्हास रक्षून राहावे लागते हेहि आपले चितांत असावे. बहुत काये लिहिणे, लोभ करावा हे विनंती.

¶Purushottam Krishna explains to Naro Appaji as to why he could not spare Mansing Khalate and send him to Salsette. He was required—he says—for the protection of Purandar as Visaji Krishna had already left for Salsette.

No. 75] *[23-12-1774*

पौ छ २३ सवाल सन
खमस सबैन

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता।। छ १९ सवालपावेतो येथास्थित असे विशेष. साष्टीहून छ १७ सवालचे पत्र आले ते पाठविले आहे. केवल निकडीचे पत्र येताच कुमक पोहचवावयाविसी

धुळपास व राजश्री राघोजी आंगरे यास येण्याविसी तीन च्यार पत्रे या वेलाखालती खिजमतगार बा। देऊन येण्याविसी गेलीच आहेत. आजहि आणखी पत्रे निकडीने येण्याविसी गेली आहेत. हुजूरची कुमक काल छ १८ सवालापावेतो बापूजी हरि व दादोपंत गडबोले याजबा। पाईचे लोक रवाना केले ते पावलेच असतील; व फौज राजश्री विसाजी कृष्ण याजकडील आपाजी गोविंद मा।रनिलेचे घेऊन सातसे पावेतो राऊत पुढे गेले. तेहि कालच दाखल जाहाले असतील. मागाहून विसाजीपंत आजच घाटमाथा खंडाल्यास गेले. बा। पाच साहासे राऊत आहेत. दर मजल जात आहेत. राजश्री शाहजी भोसले यांजकडील पथक पंढरपुराकडे होते त्यास आणावयास दोन सांडणीस्वार पाठविले आहेत. त्याचे पत्र आले. तेथून निघाले. येत आहेत. येथे येताच रवाना पुढे करितो. पूर्वीच्या लिहिल्यावरून स्वामीनी फौज व गाडदी साष्टीकडे रवाना केलेच असतील. राजश्री विसाजीपंत लेले यास पत्रे वसईहून आली ती दोन लखोटे पाठविले आहेत. त्यास पावते करावयास आज्ञा करावी. वसईहून लोक व सामान सरंजाम वरचेवर बहुतच पाठवितात. येविसी आनंदराव याणी लिहिले आहे. पत्रे दिनचर्येचे वर्तमान रोजचे रोज लिहितो; परंतु आद्यापि उतर येत नाही. दाहा दिवस पत्रे जातात; परंतु या मजकुराचे उतर आद्यापि येत नाही. डाके बा। पत्रे साहा सात पाठविली व मुजरद तारखेच्या जोड्याकरून च्यार पत्रे पाठविली. दिवसांत दोन दोन पत्रे असीहि तीन वेळा पाठविली. उतर वरचेवर द्यावयासी आज्ञा जाली पाहिजे; व पुढे करावयाचे कसे, तेहि आज्ञा वरचेवर आलियाने पुढे समजून करतां येईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Appaji reports what arrangements he had made to send reinforcements to Salsette from several quarters.*

No. 76] [*23-12-1774*

पौ छ २७ सवाल
प्रात:काल खमस

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक जानोजी धुळप मुकाम जंजिरे विजयदुर्ग चरणावरी मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना. ता। छ १९ सवालपावेतो सेवकाचे व अरमारचे वर्तमान येथास्थित असे विशेष. छ ११ सवालचे आज्ञापत्र सादर जाहाले, तेथे आज्ञा

कीं गोव्याकडील शह राखोन काही अरमार साष्टीचे कुमकेस रवाना करणें म्हणोन. त्यास साष्टीची बातमी येतां दोन पाल व तीन गुराब व पांच गलबते देऊन तीर्थस्वरूप राजश्री कृष्णाजी धुलप याची रवानगी केली आहे. सेवक गोव्याची बातमी राखून तीन पाल व पाच गलबतानसी जंजिरे मजकुरी आहों. जिकडे फिरंगी जाईल त्याचे पिछावर जाऊन, शत्रूस तंबी पोंहचवावी हे मानस सेवकाचे आहे. धण्याचे पुण्येकरून सेवकाचे मनोरथ सिधीस जातील ते खरें. सेवेसी श्रुत होये हे+ विज्ञापना.

¶Janoji Dhulap, as instructed by the Peshwa, sends a portion of his fleet to Salsette under Krishnaji Dhulap and himself watches the movements of the Portuguese fleet coming from Goa.

No. 77] [*23-12-1774*

नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री वासुदेवपंत स्वामी गोसावी
यासी

पो॥ माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथाल कुशल जाणौन स्वकीये लिहीत जावे विशेष. साष्टीस इंग्रज येऊ लागला आहे. तेथें कुमक मातबर पोहचली पाहिजे, याजकरिता हुजुरून फौज व गाडदी व लोक रवाना केलेच आहेत; परंतु याहूनहि भरणा लोकांचा असावा. त्यास आपल्याजवळ माणूस जमा आहे म्हणौन हुजूर विदित जाहाले. त्याजवरून राजश्री सदासिव रघुनाथ खांडीलकर यास बोलाऊन आणून सांगितले, की तुम्हीं पंतास लिहून पाठऊन, माणूस जमा असेल ते सरकारकाम उत्पन्न जाहाले आहे तेथे पोहचावणे म्हणौन सांगितल्यावर, मारनिलेनी विनंती केली की, या समयात आपले यजमान सरकारचे पेचात, व मीहि राजश्री सखारामपंत व नाना फडणीस याजवळ करार केला आहे की, याचे कारभारात आपण सरकारआज्ञेसिवाय सिरणार नाही, असी शपत केली आहे, तेव्हा कसे करावे? त्यावरून सर्व अर्थ येकीकडे ठेऊन, सरकारातून मारनिलेस आज्ञा केली, की सरकारातूनहि पत्रे लिहितो व तुम्ही त्याचे खातरजमेविसी आपले पत्र लिहून त्याची निशा करून जलदीने लोक साष्टीस जाऊन पोहचत ते करणे. त्यावरून लोकाचे खर्चाविसी

\+ हे विज्ञापना हीं अक्षरें बाळबोध वळणाचीं असून तीं जानोजी धुलपाचे हातचीं असावीत.

मारनिलेनी विनंती केली. त्यावरून पाच हजार रुो तूर्त मारनिलेकडे देऊन, हे पत्र आपणास लिहिले असे. तरी पत्र पावताच लोक साष्टीस जलदीने रवाना करावे. बरोबर च्यार सरदार व कारकून देऊन रवानगी करावी. वरकड आपण कोणेविसी संशय चितात न आणिता तरी हे गोष्ट सर्वथैव नसावी. आपलेहि लक्ष पूर्वीपासून असे नाही. येथूनहि आपणाविसी आणीकसारिखा विचार होणार नाही, येविशी निशा असावी. सविस्तर मारनिले आपणास लिहितील त्याजवरून खातरजमा होईल. लोक तेथे लवकर जाऊन पोहचत ते करावे. तेथे लोकाचे खर्चाविसी चिंता न करावी. सदरहू लिहिल्याअन्वयें येक हजार माणूस, त्यात येक माणूस कमी न करिता रवाना करावे. त्यात फार करून बरकंदाज असावे. व सारांष लोकानी रात्रीचा दिवस करून जाऊन पोहचावे. तरच निकडच्या कामावर पडतील. रा छ १९ सवाल सुा खमस सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa asks Vasudeopant to send one thousand men to Salsette without any delay and assures him that arrangements for their remuneration have been already made.*

No. 78] [*23-12-1774*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी

विज्ञापना भवानजी घारे दिमत सटवाजी नाईक खासबारदार हा आज भृगुवारीं संध्याकाली च्यार घटिका रात्रीस साष्टीहून कल्याणास आला. त्याणे वर्तमान सांगितले कीं मौजे माजिवडे किल्याचे उतरेस आहे, तेथे राजश्री गोविंदपंत हशमनीस व लोक (वस)ईकर लोक होते. त्यांजवर इंग्रेजाकडील लोकानी येऊन घातलें. प्रात:कालचे सा घटिका दिवसास मातबर लढाई जाली. आपले लोकानी काढा काढिला.[१] राऊत देखील पलाले. गनिमानी किला चहूकडून वेढिला आहे. लढाई द्यावयास नांवाचा माणूस मातबर कोणी नाहीं. या समई मदत त्वरेने जालियास उतम आहे; तरी दोन तीन हजार लोक व राऊत दोन हजार, त्यांत दोन तीन सरदार मातबर नांवाचे जलदीने रवाना केल्यास किला राहील. दिरंग लागल्यास किला जातो. गनिमानी चहूकडून वेढिलें. तरी देखील बंद जाल्या. किरकोल मदत जावयाची राहिली. भारी भरणा व खासा धणी आल्यास नेट देऊन जातील. अथ:पर उपेक्षा जाल्यास किल्यास अपाये होईल. जासुदानी

---

१. निघून गेले.

रविवारी पाहाटेस तोफेचे वेलेस आपणाजवल पावावे याप्रमाणे येथे करार केला आहे. मुदतीस पावल्यास बक्षीस द्यावयाची आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*The letter forwards the report of an eye-witness Bhavanji Ghare who declared that Salsette stood in the danger of being lost if not immediately relieved. It also refers to the action near Majiwde.*

No. 79] [*23-12-1774*

श्री

राजश्री आनंदराव धुलप
गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद. सुा खमस सबैन मया व आलफ. आजपर्यंत इंग्रजाचा सलूख होता. हाली त्याणे दगाबाजी करून साष्टीस मोर्चे लाविले; सबब बिघाड कर्णे प्राप्त जाहाला. सबब इंग्रजाचे कौलाची तरांडी असतील त्यास उपद्रव लाऊ नये याजप्राा तह आहे, त्यास तो कौल आता मानू नये. त्याचे कौलाची तरांडी जी सापडतील ती जफ्त करून मालमालियेत सरकारात घ्यावी, येविसी स्वारी सिकारी करून तरांडी धरून आणावी. साष्टीस लागला आहे. त्याजवर उपराला करून पारपत्य करणे. जाणीजे छ १९ सवाल बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa orders Anandrao Dhulap to capture English vessels as hostilities have been declared with them.*

No. 80] [*23-12-1774*

पौ छ १९ सवाल सन
खमस सबैन तीन प्रहर
दिवस.

श्री

सेवेसी विसाजी कृष्णाजी साां नमस्कार विनंती. आपण चिठी पाो ते पावली. आज तुम्ही खडकाले येथे राहाणार म्हणौन ऐकिले. यैशास साष्टीहून राजश्री आनंदराव राम याचे पत्र जलदीचे आले. यैशास आपण लौकर घाटमाथा जावे, उदईक पुढे जावे, म्हणौन चिठी आज प्रहर दिवसास आली. यैशास आपण आज्ञा केली होती जे, दोन मुाा घाटमाथा करोन जरीपटका

आल्याउपरी घाट उतरणें म्हणौन आज्ञा होती. यैशास घाटमाथा मुकाम करावे तरी तेथे दाणावैरण सामान दोन मुकामास पुरणार नाही. याअर्थी आज मधी राहावे, उद्या घाटमाथा जावे, परवा रविवारी घाट उतरून जावे यैसी योजना होती; परंतु चिठी येताच पुढे बिनीस लोक गेले आहेत, त्यास सांडणीस्वार याजबा। चिठी पा। आहे. लस्कर उतरले असले तरी फिरोन लादून घाटमाथा जाणे म्हणौन जलद चिठी पा। आहे. सारांश आज घाटमाथां खंडाले येथे जातो. उदईक शनवारी घाट उतरून खोपवलीस जातो. आपले आज्ञे-सिवाये आम्हास दुसरा अर्थ नाही. दोन च्यार रोजामध्ये जाऊन पोहो(च)तो. श्रीमंताच्या प्रतापे चिंता न करावी. आपण राऊत प्यादे गारदी वगैरे सरंजाम पाठऊन द्यावयाची तरतूद असावी. रविवारी बारवईस राहू. इंदुवारी तलोज्यास जाऊ. रा। रामरावजी येथे आले. भेट जाहाली. त्यास पुढे कल्या(णा)स रवाना केले. नेरलकर मामलेदार यासी लौकर पाठवावे. आणखी कोणी मामले-दार कोकणपटीचे असतील त्यास पाठऊन द्यावे. तलोज्याहून साष्टी सातआठ कोस आहे, कल्याण साहा कोस आहे. तलोज्यास गेल्याउपरी रा। आनंदराव राम यास लिहून पाठऊ. जसजसा विचार होये करणे तो करून ज्या जागा फौज नेणे तेथे नेऊ. आगोधर फौज पुढे पा। दिली आहे. त्याचा बोभाट आला जे, दाणावैरण वगैरे देसचा जिनस आगदी मिलत नाहीं. यैशास वैरण तो बरी वाईट गरज होईल; परंतु दाण्याखा। ठीक नाहीं. याजकरिता चारण वगैरे वाणी यास ताकीद होऊन दाणा वगैरे जिनस याची बेगमी व्हावी. दाण्याखा। फौज घाबरी होईल. याजकरिता तरतूद करावी. घोड्याचा दाणा मिलत नाही, याजकरिता चारण वाणी यास ताकीद करून, बैल भरून दोन च्यार हजार बैल हरभर बाजरी भरून येकदोन खेप आल्यान गरज होईल. या कामास कारकून माणसे दस्तके ढालाईत देऊन बैल भरून बोरघाट उतरून द्यावे. तोफखानिया-कडील माहादाजीपंत रानडे याजबराबर सरंजाम देऊन पाठवाल, त्यास गोलंदाज, दरयावरदी, खलासी व जंबुवरे व कोतवाल गाडे पाच साहा पाठवावे. तोफखा-नियात गाडे तयार आहेत ते भाडियाचे बैल लाऊन पाठऊन द्यावे. तोफा वसईहून येतील त्यास हे गाडे कामास येतील. गाडा नवा लौकर होणार नाही याजकरितां जलद पाठवावे. आम्ही जलद जाऊन पोहोचतो. रा। सुक्रवार दाहा घटका दिवस तलेगाव तलावरून रवाना. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Visaji Krishna proceeding to the relief of Salsette reports his marches to Nana Fadnis.*

5824

No. 81] [24-12-1774

श्री

राजश्री माधो नाना सेठ कादार पो आमोद गो यांसी. श्री माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद. सुा खमस सबैन मया व अलफ. इंगरेजी व सुरतकर मोगल याणी सरकारचे तहांत अंतर करून गैरराहा वर्तणूक करूं लागले. सबब शहर सुरत येथील बंदी वगैरे बंदोबस्त करावयास राजश्री नारो अनंदराव व बहिरो रघुनाथ यांसी आज्ञा केली असे. तरी पो मजकुरीहून खाड्यांतून जळमार्गे वगैरे हरयक जिनस शहरांत जातो तो, बंदी आहे तोपर्यंत जाऊं न देणें. प्रो मारी ताकीद करणें. जाणिजे छ २० सवाल आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa puts a ban on articles going to and from Surat on account of the relations with the English having been broken.*

No. 82] [24-12-1774

पौ छ २२ सवाल इंदूवार
सायंकाळ अस्तमान

श्री

सेवेसी गोविंद गंगाधर व बाळाजी माहादेव मुा परसीक चरणावरी मस्तक ठेऊन सा नमस्कार विज्ञापना. ता छ २० सवाल अवसीची च्यार घटका रात्रपर्यंत वर्तमान यथास्थित असे. विशेष. किलेयाचे दक्षणेस दर्याबुर्जाचे पश्चमेस कोनास इंग्रजाचे मारगिरीमुळे तट कोसळून चरात पडिला. तटाची दुशालेस मातीची भरणी होती ते चरात पडोन चर भरोन गेला. धसास वाटेसारिखे जाले. कालचे रात्रीस हला करावयास तीन वेळा लगट केला; परंतु बरकंदाजांचा भरणा चांगला होता यामुळे हला ठरोन दिल्हा नाही. तटावर इंग्रजाचे मारगिरीमुळे आपले माणूस फिरक होऊ देत नाही, यामुळे गनीम तटाखाली बेशक हिंडतो. आजच चरावर मांडव कामसाच्या बोधी व वाळूचे थैले भरून चरानजीक आणले आहेत. आज रात्री हला करणार म्हणौन राजश्री आपाजीपंत व जाधवराव यास फार निकडीने सांगितलें व खाडीच्या खोच्या येक दोन चिखलाच्या होत्या त्या पेंढा घालून मार्ग केला; तत्राप उतरले नाहीत. कोटातील लोक मारगिरीने व जागरानें जेर जाले. रात्रीचा प्रसंग, भरणा लोकाचा बरखंदाजाचा असला पाहिजे. याजकरिता रा राम सावंत जुनरकर खासा व पनास माणूस व रघ सावंत हुजूरचे च्यालीस व बदनसिंग नव आसामी व गणेश भास्कर वगैरा वसईकर पनास पाऊणसे माणूस चांगले मर्दानें निवडून कोटचा उभारणा केला

5825

आहे. स्वामींचे पुण्यप्रतापेंकरून हला जाहल्यास मारून काढतील. हुजूरचीं ताकीदपत्रे आपाजीपंतास व जाधवराव यांस अस्तमानी आली·ती घेऊन त्याजकडे गेलो. हल्याचे वर्तमानहि सांगितले. रात्रीची थोडी निभऊन नेतो ऐसे सांगितले असता उतरले नाही. प्रातःकाली उतरो म्हणोन म्हणतात. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govind Gangadhar and Balaji Mahadev report from Parsik the demolition of the wall of Salsette and the extremity to which the inmates have been reduced.*

No. 83] [*24-12-1774*

पो छ २४ सवाल सन
खमस

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ २० सवालपावेतों येथास्थित असें विशेष. साष्टीहून छ १८ सवालचीं पत्रें सायंकालचीं आलीं तीं पाठविलीं आहेत, त्यांजवरून तेथील मजकूर कळों येईल. कुमक येथून राऊत व लोक रवानगी दररोज होत आहे. येथून आज दाहा दिवस जाहाले दररोज पत्रें पाठवितों, अद्याप उत्तर येत नाहीं. याउपरी पत्र येतांच उत्तर पाठवावयाची

[अर्धा बंद तुटून नाहींसा झाला.]

तरून गेले त्यांस लिहिलें आहे. याउपरी जातील. आंगरे धुळपाची वाट पाहात राह(तात), तेव्हां धुळपाचें येणें दिवसगतीवर पडेल. याजकरितां त्यास दुसरियानें खिजमतगार बाा कागद पाठविले. पहिलींहि तीन पत्रें गेलीं, याउपरी तेहि जातील व हशमी माणूसहि जमा जालें व आणखींहि जातील. गडोगडचेंहि रवाना करविलें. त्यांपैकीं कांहीं गेलें. राहिलें तेंहि जाईल. विसाजी कृष्ण आजपासून तिसरें दिवशीं जातील. मागील पुढील फौज जमावत जातात, त्यांस फारच निकडीचें लिहिणें लिहिलें आहे, याउपरी राहाणार नाहींत. गाडदी माणूस या समयीं नाहींत. आग्नीवर जावयास ते बरे. असो. स्वामीच्या प्रतापें पारपत्य होईल हें विज्ञापना.

¶*Naro Appaji makes arrangements to send forces to Salsette. He asks Dhulap, Angria and Visaji Krishna to proceed thither.*

No. 84] [24-12-1774

पौ छ २२ सवाल सन
खमस सबैन सायंकाल

श्री

सेवेसी गोविंद गंगाधर व बालाजी महादेव चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना. ताा छ २० सवाल दोन प्रहरपर्यंत वर्तमान यथास्थित असे विशेष. वसईहून पत्र राजश्री अंताजी सिवदेव यास आले की, वसईस अरमार लोक गनिमांचे आले. खुसकीस अद्याप उतरला नाही. आज उतरेलसा दिसतो. तीन तरांडी बाऱ्यावर आहेत. लाहान गलबते व मााहगिऱ्या पासेपिरानजीक आल्या. उतरावयाचे विचारांत आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govind Gangadhar and Balaji Mahadev report the arrival of English ships against Bassein.*

No. 85] [24-12-1774

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी गोसावी

विनंती उपरी. शामल जंजिरेकर यास पुत्र जाला; सबब मुलास कंठी मोत्याची पांच सातशें रुपयांत एक देणे, व त्याजकडील गणेशराम व आणखी भले लोकास निरोपसमई सालाबाद वस्त्रे पावतात त्याप्रमाणे सालमजकुरी रुजू पाहून आख देणे. जाणिजे छ २० सवाल सुहूर सन खमस सबैन मया व अलफ हे विनंती.

¶*Sakharam Bapu asks Naro Appaji to present a pearl necklace to the newly born son of the Sidi of Janjira.*

No. 86] [24-12-1774

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य
राजेश्री विठल नारायण कादार
पो देहजबारे गो यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुा खमस सबैन मया व अलफ. इंग्रेज व मोगल सुरतकर हे सरकारचे तहात अंतर करून गैरराहा वर्तणूक करू लागले, यास्तव शहर सुरत येथील बंदी वगैरे बंदोबस्त करावयास राजश्री नारो

आनंतराव व बहिरो रघुनाथ यास आज्ञा केली असे; तरी पो माराहून खाड्यातून जलमार्गे वगैरे हरयेक जिनस शहरात जातो तो बंदी आहे तोपर्यंत जाऊ न देणे. ताकीद करून खाड्या वगैरे बंद करणे. जाणिजे छ २० सवाल आज्ञा प्रमाण.

¶*Vithal Narayan, Kamavisdar of Dehejbare, is ordered by the Peshwa to render help in effecting blockade of Surat during the period of hostilities.*

No. 87] [*24-12-1774*

पौ छ २५ सवाल सन
खमस सबैन प्रहर रात्र
सायंकाल.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक राणोजी बलकवडे तालुके जयदुर्ग चरणावर मस्तक ठेऊन विज्ञापना. तागायत छ २० माहे सवाल पर्यंत सेवकाचें व तालुके मजकूरचें वर्तमान यथास्थित असे विशेष. छ १४ सवालचें आज्ञा पत्र सादर जाहालें तें छ १९ सवालीं पावलें. तेथें आज्ञा कीं इंग्रेज साष्टीस जाऊन लढाई करीत आहे. त्यास तालुके उंदेरी येथोन गावगना गला व लाकूड फांटे वगैरा जिनस साहुकार मुंबईस विकावयासी नेतील त्यास नेऊं न देणें, व तरी मुंबईस जावयाच्या आसतील त्या मना करणें, म्हणोन आज्ञा. त्यास आज्ञेप्रमाणे मना करवितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ranoji Balkavade agrees to give effect to the Peshwa's order that no fuel or provision should be sold to the English with whom hostilities were declared.*

No. 88] [*24-12-1774*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
आपाजी गणेश स्वामी गोसावी यासी

पो माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिा जाणे विशेष. इंग्रेज व मोगल सुरतकर हे सरकारचे तहात अंतर करून गैरराहा वर्तणूक करू लागले, यास्तव शहर सुरत येथील बंदी वगैरे बंदोबस्तास राा नारो आनंदराव व बहिरो रघुनाथ यास आज्ञा केली

असे, तरी पौ घोगे येथील खाड्यातून जलमार्गे वगैर हरयेक जिनस शहरात जातो तो बदी आहे तोपर्यंत जाऊ न देणे. ताकीद करून खाड्या वगैर बंद करणें.
* जाणिजे छ २० सवाल सुरु खमस सबैन मयां व अलफ बहुत काय लिा हे विनंति.

¶*The Peshwa orders a blockade of Surat against English trade, a noteworthy procedure accepted by the Marathas during war times.*

No. 89] [24-12-1774

पौ छ २४ सवाल सुा खमस सबैन
मार्गसीर्ष प्रात:काल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे
सेवेसी

विनंती सेवक आनंदराव राम, साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २० माहे सवाल कालचें दिनचर्येचें वर्तमान लिहिलेंच आहे. काल भृगुवारीं रात्रौ दक्षणेकडे फौजेस तोफांचे मारगिरीनें दरवाजा सात आठ हात लांब पाडिला. चर भरला. त्यांत रात्रीं इंग्रेजांचे लोकांनीं पेंढा व थैले मातीचे टाकून चर भरावयासी लागला. ते समयीं किल्यांत गरनाला मनस्वी टाकिल्या, व तोफा बेसुमार मारल्या. आंतील लोकांची गडबड वाडिली ती कोठवर ल्याहावी? विठ्ठल भास्कर व मानाजी खानविलकर ते जागां होते. त्यांस कळल्यावर बरकंदाजी करून गनीम उडविला. तीन च्यार हिरिन्या केल्या. आवशीची आंधार रात्र होती. ते समयीं फारच लगट केला, त्यास मारून काढिला. कालची रात्र ऐसी याप्रमाणें गेली. आज प्रात:कालापासून किलुयावर मार बेसुमार मारला. गगनबुरुजाजवळ फांज पाडिली. तेथें दुसरा दरवाजा केला. आजची रात्र फार कठिण. श्रीकृपेनें होणें तें होईल. हिंमत धरिली आहे; परंतु राऊतांत सरदार आपाजीपंत पाठविले ते स्वामींनीं दुसरे जाधवरावांचे बंधु पाठविले. त्याचें बोलणें म्हणतात कीं, आम्ही पलीकडे उतरत नाहीं. आमचें धणी काय करील? याचप्रमाणें हशमी लोकांची गत. कोट पडता ना तर आम्ही साच्यार महिने त्याचा हिसाब धरीत नव्हतो. कोट पडतो, कालगत कळत नाहीं. याउपर आंतील माणूस घाबरें जालें. कोठवरी धीर द्यावा? ऐशा गोष्टी लिहिणें प्राप्त जालें. असो. याउपर जो क्षीण (क्षण) जातो तो वर्षायेवढा जातो. राजश्री विसाजीपंत

आज संध्याकालच्या सा घटका दिवसपर्यंत आलें नाहीं. सेवेसी कळावें. कोट व खालचे तोफांची मारगिरी अगदीं बंद जाली. मोर्चे हातधोंड्यावर घातले आहेत. शेवेसी श्रुत व्हावें हे विज्ञापना.

¶*Anandrao Ram reports a night attack against the fort of Salsette by the English and the desperate condition of the defence.*

No. 90] [*25-12-1774*

पौ छ २६ सवाल

प्रात:काल

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी गोसवी यांसी

विनंती उपरी. तुम्ही छ १४ सवालचें पत्र पाठविलें तें छ १८ सवालीं पावलें. साष्टीचे बातमीचें पत्र छ १३ सवालचें कल्याणाहून आलें तें पाठविलें तें पावलें. साष्टीचीं घरें इंग्रजांस मोर्चे जाहाले. किल्याभोंवताले इंग्रजाचे लोक बसल्याचा मजकूर लिहिला तो सर्व कळला. साष्टीस जावयास उद्यां विसाजी कृष्ण निघणार. बापूजी हरि याजबराबर गाडदी वगैरें साहाशें माणूस रवाना केलें. त्या सरंजामानें इंग्रजाचें पारपत्य होत नाहीं, यांस्तव पांच हजार फौज व दोन हजार गाडदी नवाबाकडील घेऊन रवाना करावे. फिरंगी वसईचें नस्तावर आल्याचें वर्तमान वसईहून आलें आहे म्हणोन लिहिलें ते सविस्तर कळलें. ऐसियास लष्करांतून आपाजी हरि याजबराबर गाडदी वगैरें पाईचें माणूस चांगलें येक हजार व राजश्री शिवाजी विठल हजार राऊतानशी व मोल्हेरीस पांचशें राऊत त्रिंबक लक्षुमण वगैरे होते ते साष्टीस रवाना केले आहेत हे लौकरच जाऊन पोहचतील. हे व विसाजी कृष्ण वगैरे जथलयावर इंग्रजास उधळून देतील. तुम्ही किल्याचे वगैरे माणूस वरचेवर रवाना करणें. नवाबाकडील गाडदी मागोन घ्यावयाची सोय नाहीं व आणखी फौज पाठवावयाची नाहीं. फार करून फौज हरि बल्लाळ याजबराबर पुढें गेली आहे. येथें भरणा थोडाच आहे यास्तव दीड हजारच पाठविले आहेत. आरमारावरील लोक सोय पडल्यास खाली उतरून मोर्चे उधळावयास घ्यावे; नाहीं तर बाहेरून मारगिरी त्याचे आरमारावर करून ताण द्यावा. याअन्वयें सोईस पडेल तसें करवावें. विसाजी कृष्ण व इकडील फौज व माहादेवाकडे भोसले वगैरे जमा होतील ते आणऊन रवाना करावे, म्हणजे पांच हजाराचा भरणा होईल. जाणिजे छ २१ सवाल सा। खमस सबैन मया व आलफ हें विनंती.

¶*Naro Appaji is informed by the ministers of fresh contingents being despatched to Salsette to fight against the English.*

No. 91] [25-12-1774

श्री.

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री
नारो आनंदराव गोसावी यांसी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुा खमस सबैन मया व अलफ. इंग्रज मुंबईकर व मोगल सुरतकर याणी सरकारचे तहांत अंतर करून गैरराहा वर्तोन् साष्टीस मोर्चेबंदी केली आहे. त्याविसी शहर सुरत वगैरे येथील बंदोबस्ताची कलमें :

इंग्रज व मोगल यास तिकडे पायबंद जरूर पोचला पाहिजे. यास्तव गायकवाड याची फौज तुम्हाजवल आहे त्यासुधां सुरतेजवल राहाणें. कदाचित गायकवाड याची फौज नसली तरी सरकारची फौज तुम्हाजवल आहे व पावप्यादे नवे ठेवाल याणेच बंदोबस्त होईल. गुंता नाही. आधी हा बंदोबस्त करणें. कलम १.

सुरतेबाहेर माहालात मोगलाचा अमल आहे त्याची जफ्ती करून ऐवज वसूल घेणें. येविसी कमावीसदारांस व राजश्री फतेसिंग गायकवाड यांस आलाहिदा पत्रें सादर केली आहेत. तरी तुम्ही सदरहूप्रों करणें. कलम १.

शहरात जंबूसर व आमोद व घोगें वगैरे खाड्यांतून ज्यलमार्गे जिनस येतो; त्यास, बंदरांस कारकून व प्यादे पाठऊन खाड्या बंद करणें. कलम १.

शहरांत सरकार चौथाईचा अमल आहे, तो इंग्रज व मोगल याणी

शहर मजकूर येथील बंदी करणें म्हणोन पेशजी तुम्हास निकडीची पत्रें सादर जाहालीं आहेत. त्याप्रमाणें बंदी केलीच असेल. हालीं रा बहिरो रघुनाथ यांस तुम्हांकडे रवाना केले आहेत. तरी यांचे माहितगिरीनें बंदी चांगली करणें. तिकडे पका पायबंद बसल्यानें तिकडील कुमक मुंबईकरास येणार नाहीं. यास्तव फारच निकडीचा बंदोबस्त करून सुरतकराचे पारिपत्य करणें. कदाचित तुम्ही तापीपार गेलेत असाल अथवा राजश्री फतेसिंगराव गायकवाड याजकडील मदतीविसीं जलदीची बोलावणी येत गेली तिकडे गेलेत असाल, तरी तिकडून जलदीनें येऊन हा बदोबस्त आधी करणें. कलम १.

तुम्हांजवल फौजेचें सामान फार आहे. पांवप्यादे बंदीस वगैरे लागतील ते तिकडील खबरदार माणूस इतबारी माहितगारीने ठेवावयाविसीं बहिरो रघुनाथ यास आज्ञा केली असे. तरी यांचे विद्यमाने ठेऊन त्यास

5831

खर्चास ऐवज लागेल ती मोगलाई जफ्तीचे ऐवजी देत जाणें. कलम १.

शहरची बंदी सख्त करून तंबी पोहोचऊन रस्ता वगैरे लुटून पस्त करणें. कलम १.

उठविला आहे, त्याचा बंदोबस्त करून आमल बसवणें. कलम १.

येकूण सात कलमें लिहिली आहेत. याप्रमाणें निकडीनें बंदोबस्त करून हुजूर जलद लेहून पाठवणें. जाणिजे. छ २१ सवाल. आज्ञा प्रमाण.

¶The Peshwa issues orders to Naro Anandrao to effect a strict blockade at Surat so that the English should receive no provisions or succour from that part.

No. 92] *[25-12-1774*

पौ छ २४ सवाल सुा
खमस तीन प्रहर रात्र

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक आनंदराव राम चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २१ सवालपावेतों स्वामीचे कृपावलोकनेकरून येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. काल संध्याकालपर्यंत दिनचर्येचे वर्तमान सेवेसी लिा. सा घटका आलीकडील वर्त(मा)न राा राम सावंत व रघ सावंत व राजश्री अंताजी सिवदेव वसईकर यांस सांगोन पाठविलें कीं आज इंग्रेज खामखा हला करणार; तरी तुम्ही निवडक बरकंदाज घेऊन येणे. लोक आणावयासी मातबर राजश्री आबाजी यादव व गोविंद गंगाधर व माहादाजी कृष्ण या लोकांजवल होते. त्याणी लिहिल्याअन्वये सदरहु सरदार व लोक रवाना केलें. हरदु सावंत वगैरे सरदार पुढें आले. मागाहून अंताजी सिवदेव लोक घेऊन आले तों रात्र प्रहर जाली. इतक्यांत इंग्रेजानी चरांत थेले टाकून सिड्या घेऊन सर्व येक जागां होऊन हला केली. अगोधर आमची पथकें विठल भास्कर व मानाजीराव खानविलकर व रामाजीराव घाटगे वगैरे कोटकरी व खासबारदार हवा(ल)दारानी व आरब जेजालदाज तटावर होते त्याणी गनीम पाहिला, मारामार करूं लागले,

इतक्यांत रघ सावंत व राम सावंत वगैरे तटावर गेले. राजश्री गोविंद हरि व अंताजी सिवदेव हे तेथें गेले. कोटकरी हवालदार व मातबर मातबर सर्व होते. सा घटका बरकंदाजी आमची त्यांची फार जाली. इंग्रेजाचे मर्दीची व आपले लोकांचे मर्दीची सीमा फार जाली. येक हला मारली, दुसरी केली; ते मारली तिसरी केली; ते मारली तथाप गनीम हटेना तेव्हां तोफात रेजगिरी भरून मार दिल्हा. बाण वीसपर्यंत मारले, तेव्हां हटला. गनिमाचे माणुसें सवासें जखमी ठार जाले. येका मातबराचें डोकें कापून आणिले. दुसरा मातबर पडिला, त्याचा मुर्दा त्याणी आणो दिल्हा नाही. आमचे लोकानी बंदुखा आणिल्या, गनीम साहासें करून मारून काढिला. आज फिरोन मोर्चेबंदी करितो. त्रिरेस पेटला आहे. किला लेश केला याजमुले त्यास बल पडिलें. राऊत हा कालवरी आलीकड आले नाही. खिजमतगार आले ते राहुट्या उपडतात; येतील तेव्हां खरं. मातबर मारगिरी जाली तेव्हां वसईकर वगैरे लोक झाडून मार संपल्यावर आले. आज ईस्वरइच्छा प्रमाण आहे. आपलेकडील जखमी फारच जाले व ठारहि जाले. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Anandrao Ram gives an account of a furious assault by the enemy which was repulsed with great bravery. He remarks that the English have become very aggressive as the defences have been shattered.*

No. 93] *[25-12-1774*

पौ छ २७ सवाल सुा
खमस मार्गसीर्ष मास
प्रात:काल च्यार घटका दिवस

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान साहेबांचे शेवेसी

आज्ञाधारक जानराव धुलप मुा जंजिरे विजयदुर्ग चरणावर मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना. ताा छ २१ सवालपावेतो सेवकाचे व अरमारचे वर्तमान येथास्थित असे विशेष. छ १६ सवालचे आज्ञापत्र सादर जाहालें तेथे आज्ञा कीं इंग्रज साष्टीस मोर्चेबंदी करून मारगिरी करीत असतां अरमारसुधां कुमकेस न गेला म्हणोन सेवकास शब्द लाऊन लिहिलें. यैसियास साष्टीस इंग्रज उतरला ही बातमी येतांच तीन गुराब व दोन पाल व पांच गलबते देऊन तीर्थस्वरूप राजश्री कृष्णाजी धुलप याची रवानगी केली. तीन पाल व पांच गलबते तयार

करून गोव्यांत फिरंगी तयार आहे, हा कोणीकडें जातों ही बातमी राखून होतों. इतकेंयांत छ ११ सवालचे आज्ञापत्र सादर जाहालें तेथें आज्ञा कीं गोंवेकर फिरंगी तयारी आहे. टोपीकर दुरबुधीत आहे; तरी तुम्हीं आरमारचा बंदोबस्त राखोंन गोव्याची बातमीवर सावध राहून फिरंग्याचे पिछावर विजेदुर्गानजीक राहाणे व कांहीं गुराब व पाल मुंबईकडे रवाना करणें म्हणोन आलें, व गोव्यातील बातमीस माणसे ठेविली आहेत तेथीलहि बातमी तयारीचीच येते; यास्तव सेवक राहून कांही अरमार पुढे रवाना केलेंच होतें. हाली आज्ञापत्र आलें त्याजवरून तीन पाल व पांच गलबतें घेऊन छ २२ सवाली निघोन जातो. मागील व हालीचे मिलोन पांच पाल व तीन गुराब व दाहा गलबतानसी इंग्रजाचे तरांडियाची गांठ घालून; सेवाचाकरी करून दाखवावयाचे दिवस प्राप्त जाहाले. सेवेचा मजुरा होणे भण्यचें पुण्य समर्थ आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Janrao Dhulap in answer to the Peshwa's letter writes that he has already despatched Krishnarao Dhulap with a part of the fleet to resist the English attack and assures that precautions have also been taken to watch the movements of the Portuguese.*

No. 94] [*25-12-1774*

पौ छ २४ सवाल सुा खमस

मध्यरात्र रुजू तीन प्रहर रात्र

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक बाजी गंगाधर मुकाम तळोजे चरणावर मस्तक ठेऊन सिर सां नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २१ माहे शवाल रविवार मध्यरात्रपावेतो सेवकाचे व किले बेलापूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री त्रिसाजीपंत पुणेयाहून स्वार जाले ते आजच संध्याकाली तळोजियास आले. चंदरोदये जालियानंतर येथून कूच करून सास्टीस गेले. सोमवारी सूर्योदई तेथे दाखल होतील. सास्टीचे बातमीचे वर्तमान शनवारी रात्रीस गनिमाने मारगिरी फारच केली. नंतर किल्यासी जाऊन ठेपला. सिड्या लावाव्या इतक्यात किलेकरी यानी व बाहेर किलेहायेचे लोक व हुजूरचे गाडदी होते त्यानी साफी करून गनिमाचे लोकावर चालोन घेतले. त्यांचे ह्याचे युध्य चांगलेच जाले. दाहा वीस माणूस सरकारचे कामास आले व इंग्रजाचे दीढशेपावेतो ठार जाले. मुरदे किलेकरी याणी नेऊ दिल्हे नाहीत. याप्रमाणे सिपाई आला त्याणे तोंडची

बातमी सांगितली. पत्र आले त्यांत मोघम लिहिले होते त्यावरून तोंडची बातमी प्रमाणात आली नाही. परंतु आईकले वर्तमान लिहिले असे. मागाहून येथास्थित बातमी आणविली आहे. आली म्हणजे सविस्तर लेहून पाठऊ. शनवारी संध्याकाली गनिमाचे लोक पलीकडेस आहेत. त्यापैकी दोनसे माणूस आलीकडेस बेलापूर तालुक्यात कसबे कळवे येथे आले. इतक्यात सास्टीचे बातमीचे तथ्य वर्तमानाचे पत्र राजश्री गोविंदपंत दिवाणजी याचे आले तेच बजिनस सेवेसी पाठविले आहे. त्यावरून विदित होईल. रविवारचे रात्रीस फिरोन इंग्रजाचा हला होऊन जिवादारम्य करणार आहे. त्याचे बातमीस दोन सिपाई राजश्री विसाजीपंताबरोबर पाठविले आहेत. रविवारचे रात्रीची बातमी येथास्थित आली म्हणजे लेहून पाठवितो व दोनसे माणूस कळव्यास उतरले आहे त्याची बातमी लेहून पाठवितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. राजश्री विसाजीपंतानी राजश्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल यास व राजश्री गंगाधरपंत तालुके विज्यदुर्ग व राजश्री मोरो बापूजी तालुके सुवर्णदुर्ग व रा जानोजी धुलप व बाबूराव सालेकर व आनंदराव सिंदे यास पत्रे लेहून दिल्ही. आरमार जलदीने येऊन पोचावे येविसीची पत्रे सेवकाजवल दिल्ही ती सुवर्णदुर्ग विजयदुर्ग येथील बातमीच्या माहागिऱ्या आल्या होत्या (त्या)जबरोबर रवाना केलीं. राजश्री विसाजीपंत दादानी आज्ञा केली आहे, आपले जाग्याचा बंदोबस्त करून दोहा दिवसी सास्टीस येणे. त्याप्रमाणे किल्याचा बंदोबस्त करून मारनिल्हे दादा याजकडेस जातों. श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Baji Gangadhar from Taloje to the Peshwa reports how the English were foiled in their attempt to scale the walls. He further says that Visaji Krishna has arrived at Taloje and is proceeding to Salsette. He has asked Dhulap and Angria to send their fleets to Salsette without any delay.*

No. 95] [*25-12-1774*

पौ छ २ जिलकाद खमस
सबैन मार्गेश्वर.

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राज-
मान्य राजश्री नारो आनंदराव
गो

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सबैन मया व अलफ. इंग्रेजाचा व सरकारचा सलूख आजपावेतो चालत होता. हाली इंग्रेजाने

बदमस्ती करून जंजिरे साष्टीस येऊन मोर्चे किल्यास दिल्हे आहेत. तेव्हा बिघाड जाला. त्यास नतिजा देणे जरूर जाहालें. याजकरिता तुम्हास पत्र सादर केले असे ; तरी तुम्ही फौजसुधा जाऊन सुरतेची बंदी करून इंग्रेजाच्या व मोगलाच्या नेमणुका सुरत प्रांती आहेत, त्यांचा ऐवज घेऊन सरकारचे माहालचा ऐवज चिंतामण हरि सरसुभेदार याजकडील कारकून याजकडे देणे. गायेकवाड याजकडील माहालचा ऐवज फौजेचे खर्चास घेणे. कदाचित सुरतेचा मोगल इंग्रेजाचे लक्ष सोडून सरकारात रुजू राहून सरकारचा अमल सुरलीत चालऊन बाकीचा व सालमजकूरचा ऐवज सुरलीतपणे देऊन सरकारचे लक्षात राहावे याप्रों त्याजकडील अन्वये ध्यानास आला, तर बहिरो रघुनाथ कादार बंदर मारचें याजकडील गोविंद रघुनाथ फडनीस व दताजी नारायेण दिवाण तेथे आहेत, त्याचे विद्यमाने करारात आणने. मोगलाशी रहश राखून इंग्रेजाचे नेमणुकेचा ऐवज वसूल करून घेणे. सुरतेत रस्त मोगलाकडील रहश न जाले तर जाईल. मुंबईस मोगलाने जिनस जाऊ न द्यावा याप्रों बंदोबस्त करणें. पहिली सुरतेची बंदी येक दोन वेला थोडे सरंजामाने जाली होती. तुम्हाबरोबर तर पोख्त सरजाम आहे. तेव्हां बदोबस्त चांगला करून वरचेवर वर्तमान लिहीत जाणें. जाणिजे छ २१ सवाल आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa suggests to Naro Anandrao to settle amicably the management of the Surat Mahals with the Mughal if the latter promises to dissociate himself from the English.*

No. 96] *[25-12-1774*

पौ छ २८ सवाल ख-
मस दोन प्रहर दिवस

श्री

सेवेसी गोविंद गंगाधर व बालाजी माहादेव मुा परसीक चेरणावर मस्तक ठेऊन सा नमस्कार विज्ञापना. ता छ २१ सवाल प्रात:काल दोन घटका दिवसपर्येंत वर्तमान येथास्थित असे विशेष. रात्रीस पंधरा घटका रात्रीस चंद्रोदई इंग्रजानी हला करून कोटास फांज पडिली आहे तेथे सिड्या लाऊन केली. लोकानी फारच मर्दुमी करून येक प्रहर लडाई घेतली. इंग्रजानी गर्नाला व हात गरना(ला) व होके याची मारगिरी अग्नीचे प्रजन्यप्रमाणे केली. याप्रा सूर्योदय होये तो (तीन) वेला हला मारून काढली. स्वामीचे पुण्येप्रतापे करून येश आलें. तटाखाली इंगरजाचे माणूस दीढसेपर्येंत ठार जाले. किलेयातील

लोकानी बाहेर जाऊन, बंदुखा व हातेरे आणिली. आपले कडील पंचवीस तीस माणूस कामास आले. काही जखमीहि जाले. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

¶*The writers describe a night attack led by the English against Salsette.*

No. 97] [*26-12-1775*

पैवस्ति छ २४ सवाल तीन प्रहर रात्र.

श्रीशंकर

सेवेसी गोविंद गंगाधर व बालाजी माहादेव चेरणावरी मस्तक ठेऊन सांष्टाग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २२ सवाल संध्याकाल सा घटका दिवसपर्यंत वर्तमान येथास्थित असें विशेष. श्रीमंत राजश्री अंनदरावजीनी पत्र सेवेसी लिहिलें आहे तें पाठविलें असें, त्यावरून विदित होईल. आजचें वर्तमान परवा रात्रीस इंग्रजानीं हला केली त्याचें वर्तमान सेवेसी लिहिलेंच आहे. काल मारगिरी कालचे दिवसांत व रात्रीस कमीच होती. आज पाहाटेचे सा घटका रात्रीं-पासोन मारगिरी फारच निकडीची करून, गगनबुर्जाचे पूर्वेस दारूखानेयाजवळ तोफांचे गोलेयानें दुसरे खिंडारे पाडिले. जमीनदोश केले. दारूखाना उघडा पाडिला. यास्तव पाणी घालून भिजविली. आज इंग्रजानें सांगोन पाठविलें कीं आज हला करितों; त्यावरून कोटांत लोकांचा भरणा करून. बाहेरून राजश्री विसाजी कृष्ण आले. याची फौज आज दोन प्रहरीं पलीकडे उतरली. खासा जागां आंतील सारे लोक येक जागां केले आहेत. त्याणें हला केलियास इकडून पाईचे माणूस व राऊताचा लगट करून. स्वामीचे पुण्येप्रतापेंकरून शत्रूचा पराजये होईल. प्रात:काळीं सविस्तर लिहू. सेवेसी श्रुत होये. हें विज्ञापना.

¶*Visaji Krishna is reported to have arrived at the fort with succour. Several breaches are reported to have been effected in the fort-walls by the enemy's guns.*

No. 98. [*26-12-1774*

पौ छ २४ सवाल
खमस सबैन बुधवार
संध्याकाल

श्री

राजश्री राऊ पंडित
प्रधान गोसावी यासी

(seal) सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल रामराम विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल

लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. छ २० शौवालचे पत्र पाठविलें तें छ २२ मिनहू संध्याकाली येऊन पावलें. साष्टीचे कुमकेस अतिसत्वर जाऊन टोपकराचे पारिपत्य करावें, मोर्चे उधलोन टाकावे, म्हणोन आज्ञा. ऐशास शत्रूचे पारिपत्यास स्वामीचे पत्रापूर्वीच दरमजल कूच करून जात असो. यापूर्वीच जाऊन पोहचावें, परंतु वारंवार आज्ञा होत गेली, त्यांत मुख्यार्थ धुलपाकडील अरमार व तुम्ही आपले अरमार घेऊन साष्टीचे कुमकेस जावें; व साष्टीचे किल्यातोनहि हाच संकेत होता, यास्तव प्रतीक्षा करावी लागली; व दोन तीन माहागेऱ्या गेल्या, परंतु अद्याप नाही तेव्हा कोठपर्यंत मार्ग लक्षावा; व पुन्हां पत्र आले त्यांत अविलंबें जाऊन साष्टीस पोहचावेच पोहचावें. यास्तव त्वरेने दरकूच जात असों. राजश्री बालाजीपंत व पिलाजी भिलारे समागमे आहेत. आज छ मारी मौजे कादले नजीक पेण येथे मुकाम जाहाला. परवां संध्याकाळीं अनमान साष्टीस दाखल होऊं. नसरुडाचे पारिपत्याचा विचार तरी स्वामीचा पुण्यप्रताप थोर आहे. अल्पयासेच पारिपत्य होऊन, स्वामीसेवा घडोन येईल तें खरें. विस्तरें विनंती काय ल्याहावी. सर्व जाण स्वाम आहेत. रा। छ २२ माहे शौवाल बहुत काये लिहिणें कृपा करावी हे विनंती.

¶*Raghoji Angria as desired by the Peshwa reports that he is proceeding to Salsette with his fleet. He was delayed as he had to wait for the arrival of the fleet of Dhulap.*

No. 99] [*26-12-1774*

पौ छ २९ सवाल सन
खमस सबैन प्रहर
रात्र सायंकाल

श्री

राजश्री राऊ पंडित
प्रधान गोसावी यासी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल रामराम विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशललेखन करावयासी आज्ञा करीत असिले पाहिजें विशेष. मुंबैकर इंग्रेज याणी साष्टीवर जाऊन मोर्चेबंदी केली आहे, त्याचे पारिपत्याबद्दल धुलपाकडील अरमार सिद्ध होऊन कोरलेचे बाऱ्यावर गेले आहे व आपणाकडीलहि आरमार सिद्ध आहेच; तरी अरमाराचे जडावानसी जाऊन खुशकीचे लोकास

संकेत करून त्याप्रों मोर्च्यावर जाऊन घालावें म्हणोन कितेक विस्तारे आज्ञा. ऐशास आज्ञेचे अन्वयें धुळपाकडील आरमाराची प्रतीक्षा करून, जासूद व हुजरे यांस ठेऊन घेतले. हेट प्रांतीचे आरमार येतांच येथील अरमार सामील होऊन जासूद व हुजरे याची रा करावी, त्यास तें आरमार आले नाही, यास्तव हालीचे पत्रान्वयाप्रा खुशकीचे मार्गे स्वार होऊन दरकूच जात असो. जासूद व हुजरे याची रवानगी मौजे कादलें तर्फ पेण येथील मुकामीहून केली आहे. सविस्तर मुखोतरें निवेदन करितां विदित होईल. रा छ २२ माहे शौवाल बहुत काय लिहिणे, कृपा करावी हे विनंती.

¶*Raghoji Angria reports to the Peshwa that Dhulap's fleet has not yet made its appearance and that he has therefore sent his men by land to Salsette against the English.*

No. 100] [*26-12-1774*

पौ छ२९ सवाल सन
खमस सबैन मार्गसिरष
मास

श्री

राजश्री बाळाजीपंत
गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री रावाजा आंग्र वजारतमाब सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीयें कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. अलीकडस आपणाकडून पत्र येऊन संतोषवृत कळत नाही तरी असे नसावे. सदैव पत्र पाठऊन सानंदवीत जावे. यानंतर मुंबैकर इंग्रेज याणी शोखी करून साष्टीस जाऊन मोर्चेबंदी केली आहे, त्याचे पारिपत्यास आरमार सिध्द करून आम्ही रेवसाकडून खुशकीने स्वार होऊन गेलो. धुळपाकडील आरमार आले म्हणजे हेहि आरमार सामील होऊन जाईल. टोपकरासी गाठप्रसंग दुर्घट; आणि हे समयात मागे सरता नये, येविसीचे व अवंतर कितेक बोलणेयाची आज्ञा राजश्री महादाजी प्रभु यास केलेअन्वये आपणांपासी बोलतील. चितारूढ करून मनोदयानुरूप होऊन येई तें करावें. येथील मनसबियास आपण पूर्ण वाकीफ आहेत. विस्तारे ल्याहावे ऐसे नाही. रा छ २२ माहे शौवाल बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Raghoji Angria informs Nana Fadnis that he himself was going by the land-route while his fleet which he had kept in readiness would proceed to Salsette as soon as joined by that of Dhulap.*

5839

No. 101] [26-12-1774

पो छ २४ सवाल सन
खंमस बुधवार संध्या-
कालचा प्रहर दिवस

श्री

राजश्री राऊ पंडित
प्रधान गोसावी यासीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल रामराम विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशललेखन करावयासी आज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. पत्र पाठविले तें पावलें. साष्टीचे कुमकेस सत्वर जाऊन पोहचावें म्हणोन आज्ञा. ऐशास आमची स्वारी पेसजीचे पत्रान्वयाप्रा धुलपाकडील अरमाराची प्रतीक्षा न करितां दरकूच जाहाली. अविलंबेच जाऊन साष्टीस दाखल होऊ. निवेदन व्हावें. येथील अरमार तयार करून खांदेरीचे बाऱ्यावर ठेविले आहे. धुलपाकडील अरमार. येऊन सामील होतांच तुम्ही सामील होऊन शत्रूचे पारिपत्यास जाणे म्हणोन निक्षूण ताकीद आहे. विदित होये. रा छ २२ माहे शौवाल बहुत काये लिहिणें; कृपा करावी हे विनंती.

¶*Raghoji Angria writes to the Peshwa that he himself is proceeding to Salsette as ordered and that he has left instructions to his fleet to join Dhulap's when it comes and to proceed jointly to Salsette.*

No. 102] [26-12-1774

पो छ २९ सवाल सन
खमस सबैन प्रहर
रात्र सायंकाल

श्री

राजश्री राऊ पंडित
प्रधान गोसावी यासीं

८ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये स्नो राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल रामराम विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशललेखन करावयासी आज्ञा करीत असिले पाहिजे विशेष. मुंबईकर इंग्रेज साष्टीस जाऊन लढाई करीत आहे, त्यास आपण आपले तालुकियांत गावगना

गला व लाकुडफाटें वगैरे जिनस साहुकार मुंबईस विकावयास नेतील व मुंबईत जावयाच्या तरी असतील त्यादेखील बंद करावे म्हणोन आज्ञा. त्याजवरून बंदरोबंदरी ताकीद करऊन मुंबईस जावयाचें सारे बंद केले आहे. निवेदन व्हावें. राा छ २२ माहे शौवाल बहुत काये लिहिणे कृपा करावी हे विनंती.

¶*Raghoji Angria complies with orders to effect a blockade of trade against the English and stops any supplies being taken to Bombay from the neighbouring coast.*

No. 103] [*26-12-1774*

पो छ २७ सवाल

प्रातःकाल खमस

श्री

मंत राजश्री . पंत

ान साहेबांचे सेवेसी

आज्ञाधारक आनंदराव धुलप मुकाम जंजिरे विजयदुग चरणावरा मस्तक ठऊन दंडवत विज्ञापना. ताा छ २२ सवालपर्यंत सेवकाचें व अरमारचें वर्तमान येथास्थित आहे विशेष. लोकांच्या वाटणीस दाहा हजार रुपयाची हुंडी राा बाल माहाजनी गोखले धांलवलीकर यांजवर वीस माहाजनी गोखले यांची पाठविली. ते मारनिले याणी सकारून हुंडीप्रमाणे ऐवज दिल्हा. सेवेसी विदित व्हावें. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Anandrao Dhulap receives a cheque sent by the Peshwa cashed at Mahajani's and pays his troops.*

No. 104] [*Date of receipt 26-12-1774*

पो छ २२ सवाल सन ख-

मस सबैन मार्गसिरष प्रहर

दिवस प्रातःकाल.

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गंगाधर गोविंद मुकाम जंजिरे विजयदुर्ग साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ माहे सवाल पर्यंत तालुके मजकूरचे वर्तमान यथास्थित असे

विशेष. फिरंगियाचा काफला च्यार थोर तरांडी सरया व लहान पंचवीसतीस असी गोव्याहून निघोन आला. जंजिरे मजकुरच्या बाऱ्यावर दोन तीन रोज होता; आणि उपरास[1] जावयासी गेला. रत्नागिरी जयगडच्या बाऱ्यावर नांट[2] गेला. उपर मुंबई, दवण वगैरा बंदरी जाणार म्हणौन बातमी आहे. आम्ही नेहेमी माहागिऱ्या व गलबते बातमीस ठेविली आहेत; व जंजिरे मजकुरीं सर्व सामान सरंजाम लडाईचा करून खबरदार आहो, चिंता नाहीं. धण्याच्या पुण्येंकरून गनिमास नतिजा पोहोचोन जाईल. विदित होय. येथील अरमार तीन पाल व तीन गुराबा व दाहा गलबतें काफल्याच्या पिछावर गेले आहे. गांठ पडल्यास घालावयासी चुकणार नाहींत. येथील किल्याकोटाचा बंदोबस्त करून सावध आहे. कोण्हे गोष्टीची चिंता स्वामीच्या कृपेकरून नाही. येथील ब्राम्हण रयत यामुले कोण्ही तेथे येऊन गैरवाका समजाऊन ताकीदपत्रे मागितल्यास न देविजे. विनंती करितील त्यास आज्ञा करावी कीं तेथील मामलेदाराची बखर आल्याविना देत नाही. हे विनंती माझी आहे. दोघे वादी ताकीदपत्रे आणितात. कोण्ही पुरधराहून आणितात. उभयता वादी पंधरा दिवसा आड आणतात. तेव्हां कोणत्या वाद्याचे पत्र मानावे? न मानावे तर सरकारची पत्रे. असा शेवकास पेच पडतो म्हणौन विज्ञापि लिा आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Gangadhar Govind (Bhanu) sends his fleet in pursuit of Portuguese ships coming from Goa.*

No. 105] *[26-12-1774*

पौा छ २४ सवाल
मध्यरात्र

श्री

सेवेसी गोविंद गंगाधर बालाजी माहादेव मुा परसीक चेरणावरी मस्तक ठेऊन साा नमस्कार विज्ञापना. ताा छ २२ सवाल दोन प्रहरपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री विसाजी कृष्ण फौजेसुधा आज प्रात:काली येथे येऊन आताच खाडी उतरून पलीकडे जाऊ लागले आहेत. उरणाहून बातमीचे पत्र आले ते सेवेसी पाठविले आहे त्यावरून विदित होईल. राजश्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल आबटेयासी आले म्हणोन वर्तमान आहे. आज प्रात:काली येतील. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Govind Gangadhar reports that Visaji Krishna arrived at Salsette and was crossing the creek.*

---

१ उत्तर दिशेस.

२ Out to Sea दर्यांत.

No. 106] [*27-12-1774*

पौ छ २९ सवाल
सन खमस प्रहर रात्र
सायंकाल

श्री

सेवेसी गोविंद गंगाधर व बाळाजी माहादेव मुा पारसीक चरणावरी मस्तक ठेऊन साा नमस्कार विज्ञापना ताा छ २३ सवाल दोन प्रहरपर्येंत वर्तमान येथास्थित असे विशेष. सेवेसी काल त्रितीये प्रहरीं विनंती पत्री लिा होते की इंगरज हला करणार; परंतु कालचे रात्रीस हला केली नाही. नित्यापेक्षा दोन तोफा आणखी लागू करून मारगिरी करितो. राऊत काल उतरलेच आहेत. काल डाकेबरोबर ताकीदपत्रें * * * * * * त्यास दिली. अद्याप राजश्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल आले नाही. राजश्री धुळपाचे व सुवर्णदुर्गचे अरमार जंजिरे याचे बारेयावर आले आहे म्हणोन बातमी आहे. सर्वांही येकदील होऊन मोर्चेयावर घातल्याविना पारपत्ये होत नाही. फौजा व लोक येतच आहेत. आणि तोहि दिवसेदिवस ऊब जिंकतो. लोकाचा नेट होऊन त्याजवर शह बसत नाही. श्रीमंत रामरावजी कल्याणाहून आज येतील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writers Govind Gangadhar and Balaji Mahadev suggest a combined naval attack on the English, with the fleets of Dhulap and Angria when they arrive.*

No. 107] [*27-12-1774*

[पहिल्या तीन चार ओळी फाटल्या.]

सवालचे व राजश्री आनंदराव राम या(चे) छ २३ सवालचे पत्र आले ते पाठविलेत ते पावले. राजश्री विसाजी कृष्ण यास येथून लेहून पाठविले की तुम्ही व राजश्री राघोजी आंगरे याणी बेजरब मोर्चे याजवर घालून मारून काढावे म्हणोन लिा आहे. साष्टीचे मसलतीस पैका मुबलग लागत चालला व साहुकारास ऐवज येथून देविला तो द्यावयास ऐवज नाही. न दिल्यास त्याची स्थित राहात नाही. तेव्हा मुबदल्या (स) सिलकेच्या नाण्यापैकी लाख रुा नाणे * * * * * बले रामचंद्र नारायण व लक्षुमण हरि
दीड लक्ष रुपये नाण्याचा ऐवज अद्याप आला नाही. कारकून पाठविला आहे व कल्याणचे जकातीबाा पौष मासचे पनास हजार व वसईचे दरकदाराबाा ऐवज

दग्यामुळे ते देत नाहीत व रास्ते याजकडील ऐवज करार होऊन येत नाही. किल्याचे देणे तूर्त लाख रुो आहेत ते मागतात; व राजश्री विसाजी कृष्ण याजबा फौजेस वगैरे पंचवीस हजार रुपये दिल्हे; अनखी पंचवीस हजार रुपये पाठविले पाहिजेत. कर्ज तो मिळत नाही. खर्च तो चालला पाहिजे. येविसीची तर्तूद कसी करावी ते लिहिले * * * लिहिले ते * * * कळले. ऐसिया (स) मसलतीस खर्च कार्यकारण पाहून केला पाहिजे खराच. त्यास ऐवज पाहिजे. त्यास हतेबंदीचा ऐवज येणे. त्याच्या मुदती भरत आल्याच आहेत. तो ऐवज व जफ्तीबाा ऐवज कादाराकडे येणे तो वसूल करणे; व पाा बेलगीबाा कापड किंवा ककणवाडी व रुलीबाा ऐवज रसदेचा घेणे व मुकासा नदुरबारेबाा सत्रा हजार रुो येणे तो ऐवज व्याज हुडणावळ देऊन आगोधर घेणे, व दि * * * रामचंद्र नारायण व लक्ष्मण हरि याजबाा (अपूर्ण)

¶*The writer of this fragmentary paper complains of the difficulties of raising money to meet the heavy expenditure for the defence of Salsette.*

No. 108] *[27-12-1774*

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण साा नमस्कार विनंती. ताा छ २३ सवाल मागसीर्ष वाा १० दशमी भोमवार तिसरा प्रहरपावेतो मुाा नजीक साष्टी वर्तमान येथास्थित असे विशेष. आम्ही खालापूरच्या मुकामीहून सेवेसी विनंतीपत्रे पाठविली आहेत. यैशास रविवारी तळोजियासी जातो, इंदुवारी प्रातःकाळी साष्टीस दाखल होतो म्हणोन लिाा होते, त्याप्रोा काल सोमवारी प्रातःकाळी च्यार घटका दिवसास साष्टीस दाखल जाहालो. येताच साा * * * * * कडे टापूमध्ये उतरून दिल्हे. आगोधर मावळे लोक पलीकडे गेलेच होते. काल राऊत पलीकडे उतरल्या उपरी टापूमध्ये जमेत चांगलीच जाहाली. तिसरा प्रहरपावेतो राऊत उतरावयासी लागला. उपरांतिक कलव्याकडे जाऊन चंहूकडील लाग-भाग पाहिला. दोन आंगे साष्टीस इंग्रजाचे मोर्चे काईम जाहाले. पूर्वेकडे तरी खाडीच आहे. उतरेकडील आंग मोकळे होते त्या मार्गे किल्यात जावयासी मार्ग होता. यैशास काल सोमवारी दिवसास इंग्रजानी मोर्चा बांधावयासी प्रारंभ केला. तोफ आणून ठेवावी आणि आतील जाण्यायेण्याची बंदी करावी यैसे होते; परंतु काल रात्रीस तो मोर्चा पायदळ व राऊत मिळोन उधळून टाकिला. वाट बंद करू दिल्ही नाही; परंतु दोन आंगे त्याचे मोर्चे काईम होऊन तोफा गरनाळाचा मार जबरदस्त बसविला आहे. कलव्याकडून मोर्चा बांधोन तोफा लाऊन मोर्चा उधळून द्यावयाची सोये आहे; परंतु तोफा नाहीत. मोर्चे

बांधावयासी खाणावयासी बेलदार कामाठी तबलदार नाहीत. गावगनाचे बेगारी आणावे तरी साष्टीची रयेत झाडून इंग्रजास मिळाली. आलीकडील रयेत झाडून पळून कल्याणास गेली. गांव झाडून वोस जाहाले आहेत. याजकरितां बेगारी मिलत नाही ऐसे आहे. या बेलदार, कामाठी, तबलदार मिळोन से दोनसे माणूस चाकर ठेऊन पाठवावे. राऊत वगैरे लोक पाठऊन द्यावयाची तरतूद करावी. प्रेत्न मोठा केला पा.

[पुढील बंद गहाळ.]

¶*Visaji Krishna writes how a vantage ground was selected by the English to fix their batteries on, and also how artizans have become scarce as the ryots have gone over to the enemy.*

No. 109] [*27-12-1774*

पौ छ २९ सवाल सन
खमस सबैन प्रहर रात्र
सध्याकाल गुरुवार

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक बाजी गंगाधर मुकाम किले बेलापूर चरणावर मस्तक ठेऊन सिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २३ माहे शवाल भोमवार पावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे व किले मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री विसाजीपंत बाबा इंग्रजाचे पारिपत्यास हुजुरून आले ते कालच छ २२ सवाली सोमवारी तिसरे प्रहरी सडी स्वारी करून, फौजसुधा पलीकडेस साष्टीस उतरोन गेले. रणछोड कृष्ण याची पत्रे मुंबईहून आली. त्याच्या नकला राजश्री विसाजीपंत बाबाकडेस पाठविल्या. असल पत्रे सेवेसी पाठविली आसेत, त्यावरून सविस्तर विदित होईल. राजश्री राघोजी आंगरे वजारत-माब सरखेल व राजश्री दुर्गाजी सिंदे अद्यापि आले नाहीत. येण्याचे तयारीत आहेत. अरमारहि अद्यापि आले नाही. अरमार लौकर येऊन पोचते तरी फार उपयोगी पडते. अरमारची सलाबत टोपीकरांस विशेष आहे. मुबईत इंग्रजांजवळ सिपाई कार्याकारण आहेत. या समई अरमार असते तरी मोठे कार्य होते. सेवेसी श्रुत व्हावे हे विज्ञापना.

¶*Baji Gangadhar informs the Peshwa of the arrival of Visaji Krishna at Salsette and regrets the dilatoriness of Angria in not attacking Bombay with his fleet.*

No. 110] [27-12-1774

पौं छ २३ सवाल सन
खमस

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. साष्टीचे कुमकेस लोक जिकडून तिकडून रवाना जाहाले; परंतु किरकोल येऊन जमा होतात. विना भारी भरणा आल्यासिवाय जमाव होऊन दबाव पडत नाही. त्यास राजश्री वासुदेवबावा यांजवल दोन हजार ा त लोक कांगोरीस जमा आहेत. तें तूर्त बेदील, येके जागा गुंज असल्याने ठीक नाही, हे जाणोन राजश्री सदासिव रघुनाथ खाडीलकर यास बोलाऊन आणून सांगितले की, तुम्ही या कामात पडोन, पंतास लिहून, हजार माणूस साष्टीस लवकर जाऊन पोंहचे ते करावे. त्याजवरून ते बोलिले की, आपण या कारभारांत सिरणार नाही येविसी शपत केली आहे. असे म्हटल्याउपर युक्ती प्रयुक्तीने बहुत प्रकारे त्याची खातरजमा करून पाच हजार रुपये तूर्त खर्चास देऊन, त्यास येक पत्र लिहून देऊन लोकाची रवानगी केली. आजपासून साहा दिवसात लोक साष्टीस जाऊन पोहचावे याप्रो करार करून, माारनिलेकडील कारकुनाबाा सरकारचे खिजमतगार देऊन रवाना केले. येविसी तेथे कोण्ही मनस्वी आपल्यास समजाऊन संशय चितात आणील तरी माारनिलेविसी दुसरा अर्थ चितात आणू नये. आमच्या सांगण्यावरून माारनिले सिरले. त्यांजकडे दोष नाही. पंतास पत्र लिहून पाठविले, त्याची नकल करून पाहावयास पाठविली आहे त्याजवरून कलेल. येसमई त्यास खातरजमेचे पत्र न पाठवावे तर त्वरेमुले येका जुटाचे हजार माणूस मिलावयास दिसगत लागेल. काम जलदीचे याजमुले करणे प्राप्त जाणौन, पत्र लिहून त्यांजकडे पाठविले. * सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

¶*Finding that petty reinforcements were not of much use Naro Appaji persuaded Vasudeo Baba to send a force of 1,000 strong maintained by him at Kangori and remits him money for his expenses. Who is this Vasudeo Baba?* (*See letter No. 77.*)

No. 111] [28-12-1774

पौं छ २९ सवाल
सन खमस सबैन

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ २४ सवालपावेतों येथास्थित असें विशेष. इंग्रजांचा आजपावेतों

5846

सल्लख होता. हाल्ली दगाबाजी करून साष्टीस मोर्चे लाविले, तेव्हां बिघाड करणें प्राप्त जाहाला; सबब बाणकोटचे गांव माहाड तालुक्यांत वगैरे आहेत ते जफ्त करून वसूल घ्यावा; व मुंबईस लोक चाकरीस जाऊन जे राहिले असतील त्यांचे ठिकाण लाऊन त्यांचीं घरें जफ्त करवणें. मुंबईस लांकुडफांटें (वगैरे) हर-जिन्नस सरकार तालुक्यांतून जातो तो त्यास देऊं नये. त्यांसीं ताकीद करवावी, व बाणकोटचें ठाणें मसलत * * सता हस्तगत जाहाल्यास घ्यावें. इंग्रजाचे लोकांचे तरांड्यांस वाटेस जाऊ नये याप्रमाणें करार होता. त्यास तो करार राहिला. हाल्लीं कोळी तरांडीं सांपडतील तीं धरून आणावीं येविशी धुलपास लिहावें. साष्टीस कुमक गाडदी तीन साडेतीनशें व त्रिंबकराव शिवदेव व पवार यांजकडील स्वार हजार बाराशें पावेतों रवाना करावयाची तरतूद केली आहे. लौकर रवानगी होईल म्हणोन स्वामीचें पत्रीं आज्ञा. त्यास बाणकोटचे गांव जफ्त करावयाविशी व मुंबईस लोक चाकरीस गेले असतील त्यांचा शोध लाऊन त्यांचीं घरें जफ्त करावीं येविशी, मुंबईस सरकार तालुक्यांतून भात वगैरे जिनस जातो तो जाऊं देऊ नयें व सरखेल याजकडील तालुक्यांतूनहि कांहीं जाईल तर जाऊं देऊ नयें येविशी तालुकदारांस पत्रें व राघोजी आंगरे यांस पत्रें स्वामीचें पत्रांपूर्वीच गेलीं आहेत. मुंबईची बंदी जाली. याजमुळें मुंबईत पंधरा रुपयांनीं भात होतें तें पंचावन रुपयांनीं खंडी याप्रमाणें जालें, अशी बातमी आजच आली. दिवसेंदिवस तेथील निरख बंदीमुळें वाढतच आहे. बाणकोटचे ठाणें मसलत न वाढतां हस्तगत करावें. * * * कीं इंग्रजाचा सरकारचा तह असतां त्यांणें बदमामली करून साष्टीस येऊं लागला आहे; त्यास तुम्ही सरकारचे दोस्त तुम्हास कळावें म्हणून लिहिलें आहे. याप्रमाणें येक पत्र गेलें. त्याजवर त्याचे मुलकांतील येक शिबाडावर दाहा गुरें व लांकूडफांटे वगैरे सामान भरून जात होते तें रेवदंडकरांनीं धरून आणून गुरें व सामान उतरून घेऊन, त्याचा आपला बिघाड नाहीं सबब त्याची शिबाड माघारी लाऊन दिल्ही, म्हणोन रेवदंडकराचे येथें लिहिलें आल्यावर, येथून आणखी शामलास पत्र लिहून पाठविलें, कीं इंग्रजाशीं बिघाड जाहाला, याजमुळें मुंबईची बंदी सरकारांतून केली आहे. तुमची सरकारची दोस्ती, याजकरितां तुमच्या तालुक्यांतून सामान वगैरें कांहीं जाऊ नये; गेल्यास सरकारचे अरमारकरी धरून आणितील, याजकरितां आपल्या तालुक्यांत बंदी तिकडे जावयाविशीची करावी म्हणोन लिहिलें असे; व धुळप अरमारसुद्धा लवकर येऊन मुंबईची जाळपोळ करून साष्टीकडे पावे येविशी लिहिलें आहे. ते अद्यापि आले नाहींत. याजकरितां मुंबईची जाळपोळ करावयाची पैरवी सरकार तालुक्यांतील कोळियाची पाठ थोपटल्यास कांहीं द्यावयाचें करून माहागिऱ्य

* * * येविशीची पैरवी करविली आहे. स्वामींनीं गाडदी व राऊत रवानगी करितों म्हणोन लिहिलें त्यास ते लवकर जाऊन पोहचतें केलें पाहिजे. सांडणी स्वार छ १८ सवालीं रवाना केला, त्याबराबर तपशीलवार पत्रें लिहून पाठविलीं आहेत म्हणोन स्वामींचे लिहून काल आलें, परंतु तो सांडणीस्वार अद्याप आला नाहीं. साष्टीचें पत्र छ २१ सवालचें आलें तें काल रवाना केलें तें पावलेंच असेल. आज बातमी आल्यावर मागाहून लिहून पाठऊं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Naro Appaji to Nana Fadnis, recapitulates the various measures taken by the writer to repulse the English attack on the fort of Thana and to starve the English at Bombay by a complete blockade of the coastal trade.

No. 112] *[28-12-1774*

पौ छ २६ सवाल
च्यार घटका दिवस

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक आनंदराव राम चरणावरी मस्तक ठेऊन नमस्कार विज्ञापना. ताा छ २४ सवाल दोनप्रहरपावेतों येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. आजच्या दिनचर्येचे वर्तमान तरी इंग्रेज कोट पाडितो. आम्ही सर्व तमासा पाहतो. राजश्री विसाजीपंताजवल किल्याची हकीकत क्षणक्षणा जे होते ते आपले मुतसदी पाठऊन सांगतो. ते आज्ञा करितात कीं च्यार दिवस दम धरावी. मागाहून दुसरे फौज येते व सरखेल येतात; आले म्हणजे पलीकड उतरतो. दर्याबुरजापासून गंगाबुरजापर्यंत त्रेतालीस तोफा आहेत, त्या लटक्या पडिल्या. अडिचसे हात तट पाडिला. पाईरी जाली. चर भरला. आम्ही दोन हला मारून काढिल्या, याजकरितां त्यांचे वस्तु हा कालवर हला जाली नाही. आज उद्या हला करील. कोटांत माणूस पनास पाऊणसे नित्य जखमी होते. नवं जुने करावे, बाहेरील घ्यावें तरी ते श्रम लिहिता येत नाही. स्वामी आमचा तर अयेत्न, मातबर फौज येऊन तमासगीर, पांचंसासे राऊत आंत उरले त्यास विसाजीपंती कांही गडबड करावयासी सांगितली आहे. कोट पडला याजमुलें तो

हावभर जाला. आतां घटका किला घेतो म्हणोन मार करितो. विसाजीपंत तरी च्यार दिवस दम धरावयासी सांगतात. सविस्तर बयाजी नाईक सांगता श्रवण होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Anandrao Ram writes to the Peshwa describing the distressing plight of the garrison of Salsette after the English had destroyed all the ramparts. He laments the dilatoriness of Visaji Krishna who has been all along advising them to wait till the arrival of Angria. " We have been reduced to a mere condition of helpless onlookers of our own ruin," says the gallant defender of Salsette.*

No. 113] [*28-12-1774*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो आनंदराव गो यासीं

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुा खमस सबैन मया व अलफ. इंग्रेजाचा तह सरकारात चालत आला असतां त्याणें लबाडी करून साष्टीस मोर्चे लाविलें तेव्हा त्यासी सहजच बिघाड करणे लागला. याजकरिता सुरतेची बंदी करून सुरत आठाविसीचे माहाली इंग्रेजाचा व मोगलाचा नेमणुकेचा यैवज आहे तो बंद करून वसूल घेणे, येविसी पेशजी पत्र तुम्हांस सादर जालेच आहे; तरी सुरतेची बंदी पकी करून येकंदर सामान सरंजाम माणूस बाहेरून आंत व आतून बाहेर जाऊं येऊं न पावे ऐसे करणे. दोघांचा नेमणुकेचा ऐवज माहाली असेल तोहि बेजरब वसूल घेणें. तुम्हांबरोबर फौज शहर मारची बंदी करावया व वसूल घ्यावयापुर्ती आहे. जर मोगल सरकारात रहस्य राखून असिल्यास त्यासी विरूध दाखऊ नये. त्याचे नेमणुकेच्या ऐवजास अडथला न करणें. इंग्रेजासी मिलून असिल्यास वसूल घेणे. इंग्रेजाचा तर परिछिन्न यैवज घेणेच. जाणिजे छ २४ सवाल.

¶*The Peshwa orders Naro Anandrao to confiscate the shares of the English and the Mughal of the revenue of Surat. He asks the addressee to be friendly with the Mughal Subhedar if he does not side with the English.*

No. 114] [*28-12-1774*

पौ छ २६ सवाल चार
घटका दिवस

श्री

सेवेसी बालाजी विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ २४ सवाल मुा नजीक साष्टी वर्तमान यथास्थित असे विशेष. आज्ञा घेऊन आलो

की, फौजेची कुमक साष्टीस होऊन इंग्रजाचे पारिपत्य व्हावे. त्यास फौज म्हणावी तर निमे विसाजीपंत व निमे हुजूरचे. त्यांत पंचवीस पथके येकमुठीचे करोली सामान नाही. खाडीचा वेढा बहुत कठिण. यामुळे बुनगे सडी स्वारी व मोर्चे मिळोन जी फौज आहे त्याचे तीन विभाग जाहाले. टापूमध्ये पाचशें स्वार सारे फौजे मिळोन गेले आहेत. त्यात सरदार आपाजी गोविंद, ते सारे सिपाई आणि बहुतच युक्तिवंत, यामुळे विचारांतच असतात. हशम लोक म्हणावे तर कुमकी लोक आधीच हुजूरचे लोक होते त्यांचाहि नाश जाहाला. तेव्हा त्यांत सरदार राजश्री दादोपंत त्याचाहि आला बसत नाही. किला तो पाडून बिछाऊन दिल्हा आहे. लोक आत छातीचा कोट करून आहेत. फौजेचे बलावर येकादा मनसबा करावा तर येक जिवाचे करोली सामान पाच सातशे जाहल्यास हरयेक मनसबा कर्ता येईल असे आहे. श्रीमंताचे पुण्यप्रतापेकडून यश येईल तर न कळे. व्रकड येथील मनसबा सटक पावलीत (?) आम्ही असतो. येविसीचा मजकूर सविस्तर राजश्री बापूजीपंतानी लिहिल्यावरून कळेल. विस्तार लिहिता नये. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balaji Vishvanath writes how difficult it is to prevent Salsette falling into the hands of the English.*

No. 115] [*28-12-1774*

श्रीगणपति

रा नारो आपाजी गोसांवी यांसी

विनंती उपरी. इंग्रज साष्टीस मोर्चे देऊन बसला आहे. त्याचे पारपत्याचा उपराला चांगला जाला पाहिजे. ऐशास :

फराशिसाचे अनुसंधान घेऊन आपाशास्त्री पुणियात रा विनायक भट थते यांचे घरी आले आहेत, त्यास त्याजकडील अनुसंधान कसे आहे ते चांगले मनास आणून लेहून पाठवणे. तुम्ही मनास आणिल्यांवर उपयोगी गैरउपयोगी सहजच दृष्टीस पडेल तसे लिहिणे.

सावंत यासी पत्रे लेहून कुमकेस आणावे.

येशवंतराव सिंदे यासी लेहून त्यांचे तर्फेने गोवे प्रांती धामधूम करून फिर्गी इंग्रजांचे संमतात असल्यास त्यास पायबंद बसे असें त्याच्याने जाल्यास त्यानी करावे म्हणून पत्र ल्याहावे.

सोंधे व फोंडे व गोवे प्रांती फौज जमा जाली तरी, फिरंगीयासी पायबंद बसेल.

सदरहू लिहिल्याअन्वये मनास आणून उतर पाठवणे. जाणिजे. छ २४ सवाल खमस सबैन मया व अलफ. हे विनंती.

¶*The writer Purushottam Krishna communicates to Naro Appaji plans of checking the English in other quarters so as to force them to raise the siege.*

No. 116] [*29-12-1774*

पैवस्ति छ १ जिल्काद

सन खमस

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ २९ सवालपावेतों मुकाम पुणे येथास्थित असें विशेष. साष्टीहून छ २२ सवाल सायंकालचे साहा घटिका दिवसाचें पत्र आलें तें पाठविलें आहे, त्याजवरून तिकडील मजकूर कळों येईल. राजश्री राघोजी आंगरे खुष्कीनें आपट्यास आले. छ २३ सवालीं साष्टीस जाऊन पोहचतील. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Naro Appaji reports that Raghoji Angria has arrived at Apta.*

No. 117] [*29-12-1774*

पैवस्ति

छ २९ सवाल सन खमस सबैन

श्री २

पुरवणी सेवेसी विज्ञापना. साष्टीस इंग्रेज मोर्चेबंदी करीत आहे, येत्रिशीचीं पत्रें दररोज आज साहा दिवस स्वामीकडे रवानगी करितों, परंतु अद्याप पत्र पावोन उत्तर येत नाहीं. लष्करांतून साष्टीस फौज रवाना जालीच असेल. किती फौज, कोणाची रवानगी जाली, तें लिहिलें पाहिजे. धुळपास अरमारचे नेमणुकेचा ऐवज कल्याणचे दरकदारांवर माघमासीं सत्तावीस हजार देविला आहे, व वरकडहि ऐवज अरमारास लाविला तो साष्टीचे वगैरे दरकदाराचा फार करून लागला आहे. त्यास ऐवज खर्चास जरूर लागेल हें जाणोन मुबदला तूर्त येथून दाहा हजार रुपयाची हुंडी करून त्यांजकडे पाठविली; आणि त्यास लवकर

साष्टीकडे येण्याविशी लिहिलें आहे. साष्टीकडे आल्यावर आणखीहि खर्चास लागल्यास ऐवज पावता केला जाईल. तुम्ही लवकर येणें म्हणोन त्यास विस्तारें करून लिहून पाठविलें आहे. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶Money is remitted to Dhulap to accelerate his departure for the relief of Salsette.

No. 118] *[29-12-1774*

पौ छ २६ सवाल
सन खमस सबैन

श्रीगणपति

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी

पोष्य पुरुषोतम कृष्ण साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील वर्तमान ता। छ २५ सवालपरियेत येथे असो विशेष. आपण श्रीमंतास पत्र लिहिले ते प्रविष्ट जाहाले. राजश्री विसाजीपंत दादा गेले. सोमवारचे झुंज जाहालेचे वर्तमान कलले. आता बल चांगले जाहाले. वरचेवर आपण कुमक रवाना करीत आहेत. फार चांगली बंदोबस्ती आहे. काल रात्रौ श्रीमंत सौ मातोश्री बाईनी आपणास ल्याहावे म्हणून मजला आज्ञा. त्यावरून लिहिले आहे. आणि आताहि लिहिले आहे. साष्टीपासून पुणेपरियेत डाक ठेवावी म्हणजे वर्तमान लवकर ये(ई)ल. आपण ठेविलीच असेल. तट साष्टीचा पडला, सबब आतील गलबलले होते. परंतु वरचेवर सामान जाऊन पोहोचले यामुले आतल्यास अवसान भारी आले म्हणून लिहिले. येथार्थच आहे. राजश्री गोपालपंत बिवलकर काल पुणेस आले. यामुले सरकारचे पत्राचे उतर न आले. उदईक आले म्हणजे उतरहि येईल. बहुत काय लिहिणे. कृपा लोभ करीत जावा हे विनंती.

¶Purushottam Krishna asks Naro Appaji to send to Purandar constant communications about Salsette.

No. 119] *[29-12-1774*

पौ छ १ जिल्काद सन खमस.

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. आजच छ २९ सवालीं साष्टिहून छ २३ सवालचीं पत्रें आलीं तींच पाठविलीं आहेत, त्यांजवरून

कळों येईल. राजश्री विसाजी कृष्ण यांस पत्र लिहून पाठविलें कीं तुम्ही लवकर टापूंत उतरून बेजरब शत्रूचे मोर्चे यांजवर चालोन जाऊन घालावें. दिवसगतीवर घातलें असतां शत्रु ऊब जिकतो. [यापुढें अर्धा बंद फाटला आहे.] तेहि येत नाहीं. त्याविशीं येक दोन पत्रें मिरजेस गेलींच आहेत. हाल्लीं कारकून तिकडे गेला त्यास हेहि काम सांगितलें आहे. वसुलास येतील तेव्हां खरें. कल्याणचे जमीनीचा हता पौष अखेरचा पंनास हजारांचा येणें, त्यास त्याचीं पत्रें एव्हापासून येऊं लागलीं कीं मुबईची बंदी जाली यामुळें आम्हास ऐवज परिछिन्न मिळणार नाहीं असें म्हणतात. याप्रमाणें ऐवजाचा मजकूर आहे. वसईचे दरकदाराचा ऐवज तूर्त तिकडे दंगा, यामुळें कोण्ही देत नाहीं. व रास्ते यांजकडील ऐवज करार होऊन येणें तोहि येत नाहीं. येथें तों खर्चाशीं गांठ; किल्ले हायचा ऐवज [अपूर्ण]

¶*Naro Appoji informs the Peshwa that he has written to Visaji Krishna to attack the enemy's batteries immediately. Otherwise the moral effect which is so far holding the enemy in check would be lost.*

No. 120] [*31-12-1774*

पो छ २८ सवाल
सुा खमस सबैन
पौष मास.

श्रीगणपति

राजश्री नारो आपाजी स्वामी गोसावी

विनंती उपरी. साष्टीचा किला इंग्रजानें हल्ला करून गुरुवारीं घेतला म्हणून तुम्ही लिहिलें तें कळलें. जाणिजे छ २७ सवाल सुा खमस सबैन मया व अलफ हें विनंती.

¶*Receipt of the news of the fall of Salsette on Thursday 29th December sent by Naro Appaji is acknowledged.*

No. 121] [*31-12-1774*

पौ छ २९ सवाल सुा खमस.

श्री

श्रीमंत राजश्री बालाजीपंत दादा लेले
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक संक्राजी सिवराम निसबत चंदन व मोरो लक्षुमण निसबत वंदन कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत मार्गसीर्श वद्य १४ शनवारपर्यंत मुकाम साष्टी आलीकडे तीन कोसावर सुखरूप आसों विशेष. इकडील वर्तमान

जें जाहालें तें स्वामीस सरकारच्या पत्रावरून कळतच असेल, याजकरितां लिहिलें नाहीं. आजचें वर्तमान तरी राजश्री बाजीपंत मेंदले याणी लेहून पाठविलें कीं वरुण किला इंग्रजानें घेतला येसें वर्तमान त्याणीं लेहून (पाठविलें आहे हें) तहकीक वर्तमान आहे. वरकड जें वर्तमान होईल तें सेवेसीं वरचेवर लेहून पाठवीत जाईन. वरकड येथून श्रीमंत राजश्री विसाजीपंत दादा याणी आज प्रातःकालीं चंदनकर वंदनगडकरी या दो पतकास बोलाऊन नेऊन सांगितलें कीं, तुम्ही उभयेतां लोक सुधा कोकण बाधाटीच्या किल्यास नेमतो. त्यास आपण शब्द लावितील याजकरितां कबूल केलें आहे. लोक किलेयांत आकरा आसामी दोन किल्याच्या मिलोन होत्या. त्याचे हत्यारे व चिरगुट पांगरूण होतें. जे समई किल्यावर हला इंग्रजाने केला, तेव्हां गर्दी जाहाली. त्या समई प्राणानसी बाहेर आले. हत्यारें व चिरगूट पांघरुणें गेलीं येसे वर्तमान जाहालें. त्यास येथे विसाजीपंत दादाहीं हत्यारे व चिरगूट पांघरूण जें गेले असेल तें देतों म्हणून कबूल केलें आहे. दिल्यास उत्तम आहे. न दिल्यास आपणांकडे तपसीलवार लेहून पा॥ बहुत काय लिहिणें. कृपा लोभ करीत जावा हे विज्ञापना. आपल्या लाखोट्यांत पत्रें आहेत ती ज्याचीं त्यास द्यावीं. कळावें हे विज्ञापना.

¶Shankaraji Shivram and Moro Lakshman communicate to Balajipant Lele the news about the fort Uran being captured by the English. They further write that they have consented to send their men to the Konkan forts as desired by Visajipant but complain about the shortage of provision and clothes from which the men in the camp suffered.

No. 122] *[31-12-1774*

नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री
विसाजीपंत दादा स्वामीचे सेवेसीं

पो विसाजी केशव कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ २७ सवालपावेतों यथास्थित असें विशेष. काल आपणास दोन पत्रें पाठविली ते पावली असतील. हाली आपले पत्र रा॥ येसाजीपंताचें पत्र पोहोंचोन उतर आलें. त्यात बंदोबस्ताचा मजकूर आपण लिों तो कलला, व फौजेचा आर्थ व आपल्या येण्याचा विचार समजला. येशास लस्करातून पाच राऊत समागमे दिल्हे नाहीत. सर्व भरवसा आपले फौजेचा, हा मजकूर स्वामीस ठावका नाही; तर उरण व बेलापूर व परसिक हे जागे वसई सारिखें नाहीत. काम पडिल्यास

उरणास फौजेचा उपराला होणार नाही. पाईचे लोकाचा भरणा असावा. बेलापुरास काही राऊत ठेऊन बंदोबस्त करवावा. इंग्रज रयतेच्या वाटेस जात नाही. थोरले काम करितों. थोरल्या कामात लघु कामे येतात. फिरंगी व इंग्रज याचा मनसबा येक. त्यास इंग्रज हावभरी जाहाला आहे; तर त्वरा करून आपण यावे. कोंकणचे लोक बहुत मनसबे तुम्हास सांगतील ते न ऐकावे, जरूर यावें. दादा, भेटीनंतर कोंकण लोकांची रीत मी सांगेन; ध्यानांत येईल. तुम्ही फौजसुधा येथे न या तर मी येथून निघोन तुम्हाकडे येईन. भेऊन येतो यैसे न समजावे. सरकारच्या कामाचा दरकार, यास्तव विस्तारे लिहिो आहे. साष्टी वसईमध्ये दर्म्यान खाडी हे पुर्ते समजावें. पाहिल्यानें ध्यानांत येईल. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Visaji Keshao asks Visaji Krishna to come and confer with him for taking measures to save coastal places like Belapur, Uran, Parsik.*

No. 123] [*31-12-1774*

पौ छ २८ सवाल
सुा खमस

श्रीगणपति

राजश्री नारो आपाजी स्वामी
गोसावी यांसी

विनंती उपरी. बाणकोट इंग्रजाने हबशास दिल्हा. तेथून हबसी आंजणवेलीस येणार म्हणून आंजणवेलीस बातमी राजश्री चिमाजी माणकर याणी लिहून पाठविली. त्यास ही जागा नाजूक, येथील बंदोबस्त चांगला राखिला पाहिजे, यास्तव पंनास राऊत रवाना करावयाविसी राजश्री कृष्णाजी विस्वनाथ याणी लिहिले आहे, त्याजवरून तुम्हास लिहिले असे; तरी तालुके आंजणवेल येथे मारनिले याजकडे राऊत आसामी पंनास पुरुषोतम सदासिव यांचे पथक पुणियांत आहे ते रवाना करणे. ते नसिल्यास आणखी दुसरे पथकाचे पाहून जरूर रवाना करणे. जाणिजे छ २७ सवाल सुा खमस सबैन मया व अलफ हे विनंती.

¶*Naro Appaji is asked to send reinforcements to Anjanwel which is threatened by the Sidi.*

No. 124] [Dec. 1774

श्री

पुा सेवसी सा नमस्कार विनंती. साष्टी घेतल्या उपरी हावभारी इंग्रज जाहाला, त्यामध्ये उरण, साष्टी, येशवंतगड ही तीन स्थले मुंबई लगती आहेत ही घ्यावी म्हणौन त्याच्या बोलण्यात मनसब्यात होते. यैशास साष्टी, येशवंतगड घेतल्याउपरी दाहा गलबते भरून, उरणच्या बाऱ्यावर गेला; तेव्हा त्याणी अवसान सोडून, आम्हास व जवलच्या ठाण्याठुण्यास न लिहितां कौल घेऊन, छ २६ सवाली भृगुवारी बाहेर निघोन आले. उरण इंग्रजाने घेतले म्हणौन बेलापुराहून राजश्री बाजी गंगाधर याचे पत्र आले त्याजवरून सेवेसी लिहिले आहे. यैप्रकारे लोकानी हिमत सोडिली. कालगती म्हणावी. पुढे आपणास काये मनसबा करणे? मसलत भारी. जागे फार. कोठे लोकाची भरती नाही व सामानसुमान नाही. पुसावे तरी बेहडे दाखवितात. आता तो या प्रकारचा प्रसंग येऊन घडला आहे. श्रीमंतांच्या तालीयाने ठाणी राहिली तरी राहूत. परंतु पोख्त सामान सरंजामाने व कोणी हिंमतीने राखतील यैसे दिवस नाही. जाले वर्तमान लिहिले आहे. पुढे होईल ते लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶*Visaji Krishna reports to the Peshwa that Uran capitulated to the English. The people have taken a fright since their success at Salsette.*

No. 125] [22 Dec. 1774

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो आनंदराव गोा यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सबैन मया आलफ. मुंबईकर इंग्रेज साष्टीस येऊन मोर्चेबंदी करीत आहे. त्यास सुरतेहून कुमक जाणार सबब सुरतचे बंदीविसी पेसजी तुम्हास पत्र सादर केले आहे. त्याप्रो तुम्ही आपले व गाईकवाडाचे फौजेसुधा पत्र पावताच सुरतेवर जाऊन शह चांगला देऊन, बाहेरील रस्त वगैरा जिनस शहर मजकुरी जात असेल ते मना करून शहरास उपद्रव बेलाशक देऊन, बाहेरील बंदीचा बंदोबस्त चांगला करणे. तुमचा शह शहरावर चांगला पडला म्हणजे तेथील कुमक साष्टीस येणार नाही; तर तुम्ही

---

१ पत्र विसाजी कृष्णाचें.

बहुत जलदीने गाईकवाड याच्या व सरकारच्या फौजेसुधा जाऊन सुरतेची बंदी करणे. कदाचित तापी उतरोन गेला असला तऱ्ही मागें फिरोन सुरतेस येणे. जवल उतरोन बंदी आगोभर करणे. येविशी फार जलदी करणें; आणि सदरहू प्रों करून हुजूर लेहून पाठवणे. जाणिजे छ १८ सवाल. आज्ञा प्रमाणे शहरची बंदी करून बाहेर जे सापडल ते लुटून पस्त करणे. मुख्य गोष्ट सुरतचा बोभाट मुंबईस येई. तुमचे उपद्रवामुले तेथील मदत साष्टीस न ये ते करणे. जाणिजे छ मजकूर.

¶*The Peshwa asks Naro Anandrao to effect an immediate and complete blockade of the English at Surat with the help of Gaikwad's forces.*

No. 126] [*December 1774*

श्री

विनंती विशेष. मेस्त्र माष्टिन इंग्रज वकील पुणियास होता. त्यास श्रीमंतानी पुणियास लुटोन घेऊन घालविला, याप्रमाणे यथे वर्तमान मोगलाकडेस व इंग्रजाकडेस आले; व मुंबईहून पाच हजार माणुसे जाहाजातोन येथे येणार यैसे पत्र इंग्रजाकडेस मुंबईहून आले. कितेक म्हणतात की नरोतमाचे मदतीस येतात. कितेक म्हणतात की, श्रीमंत राजश्री दादासाहेब याचे मदतीस जाण्यास मुंबईस जाहाजात लोक चढत आहेत. यास्तव जलदीने, नरोतमाचे सामान थोडके आहे तो पारपत्य होऊन येईल तर उतम आहे. कलले वर्तमान ते आपणास लिहिले आहे; मग आपली मर्जी. वर्तमान दोहीतीहीकडून आलें, त्यावरून लिहिले आहे. नरोतमाचे पारपत्यास पाचसे राऊत पो आहेत म्हणून आपण लिहिले. त्यास, हसोटाहून माणसे येथे येतात; परंतु पारपत्याचे फौजेचे वर्तमान कोणी सांगत नाही. मग फौज कोठे आहे ते न कले. तथाप नरोतमाने भिताडाचा आश्रे धरून बसला असल्यास्तव, राऊताचा उपाये चालत नसेल, तर हतीची रवानगी करून; ठाण्याचे भिताड कचे आहे. हती लाऊन भिताड पाडऊन, येथास्तित पारपत्य करावे. हसोटास फौज गेली आहे. तिकडून काही आपणास वर्तमान येत असेल ते कृपा करून लेहून पाठवावे. बहुत काय लिा लोभ असो दीजे, हे विनंती. हसोटचे ठाण्यास विटाची भित चुणेगची आहे. पहिलीहि दारूगोली त्याने समागमे नेली आहे; व हालीहि इंग्रज दारूगोली पाठवीत आहे. इंग्रजाने व बक्षीने नरोतमास लिहिले की हसोट जागा लडाई नाही; तुम्ही शहरात येणे. त्याचे उतर आले की, आम्ही ठाणे दोन मास लडऊ, चिंता नाही. इतकियात मदतहि येईल. हे त्याची हिमत

5857

आहे. ज्याप्रो वर्तमान येतें त्याप्रो लेहून पाठवितो. हे विनंती. आताच वर्तमान आले. इंग्रजाचे लोक येथे येणार होते; त्याणी साष्टीस उतरून साष्टी घेतली, आणि वसईवर आले. वसईस लडाई होत आहे, याप्रो वर्तमान आले ते लिहिले आहे. आपण जलदी करून इतकियात नरोतम यास धरावे हे उतम आहे. आम्हीं नरोतमाचे लिहितो म्हणोन रागास न यावे. वसई साष्टीचे वर्तमान तथ्य आहे म्हणून दोहीकडून वर्तमान रात्रीसच आले होते; परंतु सत्यमिथ्य न कले यास्तव लिा नाही. हाली फिरून आले ते लिहिले आहे. कलावे आपण आलियासारिखे इतके तऱ्ही कार्य करावे हे विनंती.

¶*The writer reports to the Peshwa the news circulated in Surat about Mostyn being plundered in Poona and driven out and about the embarkation of English troops for Surat. The writer further requests that Narottam of Hasot should not be spared and that every step should be taken to punish him.*

No. 127] [*December 1774*

[पहिला बंद गहाळ.]

२

आज्ञा जाहाली. ते धोडपेस आलेसे यैकिले; परंतु आद्याप न आले, येतील. आरमारे आसावी. पाणियातून शह इंग्रजास असावा. पायेदल असावे. फौजानी कुमक करावी. चहूकडून येलगार करावा, तेव्हा काम होईल. त्यास राजश्री उभयेता विसाजीपंत करितीलच; परंतु सुचले आर्थ लिहिले. सरकार आज्ञेस उजूर नाही. तिकडील वर्तमान राजश्री नाना व बापूकडील नवल विशेष ल्याहावयास आज्ञा करीत जावी. आम्ही येथे येऊन पावलो हे आज्ञापत्र नानास व बापूस लेहून पाठवावे. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*The writer suggests ways to meet the English successfully at Salsette.*

No. 128] [*Dec. 1774*

श्री

पुा सेवेसी साा नमस्कार विनंती. राजश्री आनंदराव राम याचे कोठे ठिकाण नाही म्हणौन पेशजीं विनंती पत्र पाठविले होते. यैशास राजश्री आनंदराव यासी, गलबल जाहाली त्या समई माारनिलेच्या जवल माणसे होती त्याणी, किल्यात सोडून आली. तदनंतर आनंदराव यासी बाहेर पडावयासी अवसान जाले नाही.

दिंडीपावेतो आले होते; परंतु लाहाने मूल सेवटी त्याच्या हातास लागले. दोन रोज साष्टीमध्ये होते. प्रस्तुत मुंबईस रवाना केले. भवानजी कदम हवालदार याणी आगोधर फितूर केला. सेवटी फितूर कचा जाहला. याजकरितां भवानजी किल्यामध्ये होता त्यास गोल्या मारून ठार मारिला. त्याचा पुत्र किल्यामध्ये होता त्यास मुंबईस रवाना केले. सिपाई लोक जखमी व आणखी दोन आडीचशे होते, ते प्रस्तुत साष्टीसच ठेविले आहेत. केशवराव कोतवाल गलबल जाहाली त्या समई बाहेर पडोन गलबतावर चढोन वसईस गेले म्हणौन बातमी आली. किल्यात आगोधर फितूर होता; परंतु बाहेरील लोक आत घातले त्याजउपरी च्यार रोज किला झुंजला. उपरांतिक कौल आल्याउपरी स्वस्थ जाल्यावर भवानजीस रुबरू इंग्रजाने नेऊन लबाड म्हणोन गोल्या देऊन, मारून टाकिला. याप्रमाणे[१] तहकीक बातमी आली. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna reports the casualties at Salsette and adds that Anandrao Ram, the head of the garrison, was taken captive by the English and sent to Bombay; that the Killedar Bhawanji Kadam was shot by them for his treachery in not fulfilling the promise he had made to the English.*

No. 129] [*December 1774*

श्री २

[पहिला बंद गहाळ.]

पुा सेवसी विज्ञापना. तूर्त लाख रुा पावेतो देणे तो मागतात. त्यास कोठून ऐवज द्यावा. नित्यकृत्य खर्च असता तरी च्यार दिवस हरकसे चालवावयास येते. साष्टीकडे लोक व फौज रवाना होते त्यास पैका द्यावा लागतो. राजश्री राघोजी आंगरे सरखेल यांस पंचवीस हजार रुा रोख साल मजकूरचे नेमणुकेसिवाय जाजती देऊन, त्यास उमेद चढऊन, तयारी करून आणविले. हे पंचवीस हजार व साष्टीकरानी बहुतच निकडीचे लिहिले, त्यास पंचवीस हजार रुा पाठविले व * * * * दाहा हजार व कागोरीस पाच हजार रुा राजश्री वासुदेवबावाकडून लोक साष्टीस रवाना केले त्यास दिल्हे. याप्रो पासष्ट हजार रुा थोकच दिल्हे. यावितरिक्त फौजेस व लोकास पाईच्या देतो तो निराला. याप्रो येथील सविस्तर अर्थ स्वामीस कलावा म्हणौन लिा आहे. ऐवजाची तरतूद कसी करावयाची ते लिहिले पाहिजे. विसाजी कृष्ण याजबा

---

१ पत्र विसाजी कृष्णाचें.

पंचवीस हजार रुा दिल्हे. त्याखेरीज आणखी पंचवीस हजार लश्कर पाठवावे म्हणौन मारनिलेनी लिा आहे. त्याजकडे ऐवज पाठविलाच पाहिजे. ऐवज तो कर्जाखेरीज नाही. कर्ज तेहि कसे मिळते हा प्रकार स्वामीस विदितच आहे. ऐवजाचा थोक थोक तपसील लिहिला आहे. मागाहून जमाखर्चाचा ताळेबंद आकारून पाठऊन देऊ. ऐवजाची तरतूद जाहल्याविना काम चालेल कसे? याचा प्रकार स्वामींनी ध्यानात आणून लिहून पाठवावयास आज्ञा करावी. सेवेसी[१] श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Appaji mentions the various sums that he had remitted to several persons for the forces sent to Salsette.*

No. 130] [*Dec. 1774*

[आरंभीचें दोन बंद गाहाळ.]

रवाना केली. वरकड जागा जागा पांच सातशे राऊत रवाना केले. आम्हाजवळ से दोनसे राऊत मात्र राहिले आहेत. इतक्या सामानाने साष्टीचा शह कसा होतो? येशवंतगड उरण काईम आहे. त्यास दोन हजार माणूस वसईच्या खाडीतून टापू मध्यें उतरणे म्हणोन आज्ञा. त्यास येशवंतगडकरी याणी साष्टीच्या अगोधर एक रोज कौल घेऊन ठाणे त्याचे स्वाधीन केले. उरणकर याणी गोळी वाजविलीच नाहीं. दहा गलबते उरणास इंग्रेजाची येताच पळून गेले. ठाणे इंग्रजाच्या स्वाधीन केले. याप्रमाणे स्थलाची अवस्था आहे. तेव्हां वसईच्या खाडींतून माणसे टापूमध्यें कसी उतरतात? घोडबंदर पावेतो खाडी इंग्रेजाचे स्वाधीन जाली, तत्रापि दोन हजार माणूस कोठून आणावे? वसईची अवस्था त्या रीतीची. किल्यामध्ये माणसाचा भरणा नाहीं. ऐन प्रसंग येऊन बनला आहे. राजश्री विसाजी केशव परभारे वसईस गेले, येथें आले नाहीं. राजश्री राघोजी आंगरे साष्टी घेतल्या उपरी दुसरे दिवशी से दोनसे माणसानी आम्हास येऊन भेटले. एक रोज होते. दुसरे दिवशीं निरोप मागो लागले. म्हणाले जे आमच्या स्थलाचा बंदोबस्त करावयाचा व सरकारची स्थले रेवदंडा उरण उंदेरी वगैरे आहित, ऐशास आम्हास निरोप द्यावा. आम्ही जाऊन आपल्या स्थलाचा बंदोबस्त करून, सरकारच्या स्थलास कुमक पाठवून देतो; परंतु जरूर निरोप द्यावा यैसे त्यानी आग्रह केला. तेव्हां त्यास निरोप देणे जाले;

---

१ पत्र नारो आपाजीचें.

ते निरोप घेऊन गेले. विसाजी केशव येथे आले नाहीं. त्याचे त्यास भारी जाले आहे. चहूंकडे येकोनेक गलवले आहे.

(अपूर्ण.)

¶*The writer of this fragmentary letter expresses his anxiety as to how succour should be obtained in face of the English who had occupied the whole of the province round about Salsette and Bassein.*

No. 131] [*14 December 1774*

श्री

पुा सां नाा विज्ञापना. आपण कूच करून पुणियास गेल्याचे वर्तमान राा पुरोषातमराव दाजी यासी सांगितले. त्यास त्याणी सांगितले की आम्हास हा मजकूर राा नारोपंत नानानी काल दोन प्रहरा लेहून पाठविला. त्याजवरून दोनसे राऊत येथून आजी रवाना केले; व जाब लेहून दिल्हा कीं, विसाजीपंत यास साष्टीकडे पाठविणार. त्यास त्याचा शह दक्षणेकडे आहे. निशाण माहादेवावर आहे; आणि त्याजपासी सामानहि पुरते नाही; व त्या योग्यहि तिकडे जाणे नाही, याजकरिता राऊत पाठविणे जाले तरी दोन ऱ्यारसे पाठवावे. विसाजीपंतास पाठविल्याने इकडील शेह सुटलासा जाला. हैदर नाईक इकडे येण्याविसी आलस करणार नाही. दुसरे उभयेता कारभारीहि तापीतीरास गेले, तेव्हा इकडे आवघे मोकले पडते यास्तव न पाठवावे या प्रोा लिा आहे. त्यास याचा विचार न करिता दादा कूच करून कसे गेले ? त्यावरून आम्ही सांगितले की पहिले पत्र आले ते समई विचार केला होता की श्रीमंत बलवंतरावजीस फौजेत मुकामी ठेऊन आपणच सडे सेपनास राऊत घेऊन पुणियास जावे, याप्रोा विचार होऊन सकाळी (प्र) स्थाने केली, तो रातोरात दुसरे पत्र आले की फौज घेऊन यावे, यैसे नानाचे व सरकारचे पत्र आले. ते निकडीचे यैसे पाहून त्यावरून कूच करून जावे लागले. त्यास त्याणी सांगितलें की गेले तरी चिंता नाहीं; परंतु या उपरी तरी राा बलवंतरायानी गोट घेऊन माघारे यावे. दादानी येक दोन रोज राहून, तिकडील रवानगी करून माघारे गोटात यावे हे उतम आहे. दादानी कोकणात जाऊन कार्य करावे यैसे सामानहि नाही; व साष्टीत आतील फितूर व केशवराव तेथे आहेत. उगेच शाहास गुंतोन माघारे फिरावेसे होईल यैसे न करावे. येक

+ पत्र बहुधा विसाजी कृष्ण याचें असें.

शाहाणा आपाजी गोविंद याजसारखा माणूस व दोनसे राऊत देऊन रवाना करावे. आपण जाऊ नये. माहादेवाकडे लौकर यावें. आपल्या ढाला माघाऱ्या पुणियास गेल्या यैसी बातमी दक्षणेकडे हैदरनाइकास कलल्यावर तो इकडे चाल देईल, यास्तव जावयाचे करू नये यैसे सांगितले. कलावे; व काल लस्करची बातमी सुध द्वादसी बुधवारीची पत्रें आली ती साईकाली पावली. त्यांत मजकूर की श्रीमंत दादासाहेब सरदारास सोडून पुढे मजल दरमजल थालनेरावरून तापी उतरून, तडका चालिले आहेत. आज कारणे नर्मदातीरास गेले असतील; व सिंद्या होलकरास व श्रीमंतास आठरा कोसाचे आंतर आहे; व हरिपंतास व सरदारांस वीस कोस अंतर आहे. उभयेता कारभारी बापू व नाना कासारबारी उतरून खाली गेले. बामनराव व रास्ते वगैरे पथके मागून दाहा हजाराची रवाना जाली आहेत. पाठीमागे बापू नाना आहेत त्याचे पाठीमागे नवाब तीन कोसांवर आहेत. आद्याप भेटी जाल्या नाहींत. दिन सुध पाहून भेटी होतील म्हणोन लिा होते. सारांश सरदारानी बलाऊन सेवटी परिणाम हा केला, हे सर्वांचे प्रतियास आलें यैसे तिकडील पत्रावरून भासते. पत्र श्रीमंत बापूचे त्याचे चिरंजीवास आले, व त्रिंबकराव फरासखान्याचे याचे पत्र बाजीपंतास आले, ती दोनी पत्रे मी पाहिली, त्यातील आर्थ समजला तो लिहिला आहे. बापूनी लिहिले आहे कीं आम्ही तापीतिरास जाऊन मग मुकाम करू, पुढे जात नाही. मग पाठीवर फौजा गेल्या आहेत, त्या जेथेपर्यंत दादा जातील तेथेपावेतो जातील. सिंदे होलकरहि सडे जाले आहेत त्या प्रो लिहिले आले. विदित जाले पाहिजे. सारांश येथील रा दाजीचे व जनोबादादाचे विचार आपण साष्टीकडे जाऊ नये. माघारे यावे. सदरहू लिा आहे हे आर्थ नानास समजाऊन सांगोन रावताची रवानगी करावी. सेवेसी श्रुा होय हे विा. रा बाबानी पत्र दाजीस पाहावयास माचीस पाठविले होते, तेच पत्र मी पाहिले. दाजीनी आपणास पत्र लिा ते पाठविले आहे, त्यावरून विदित होईल. हे विा. पुरुषोतमराव पत्र देत नवते. तुम्हीच लिहिणे म्हणोन सांगितले होते. त्यास आम्ही सांगितले कीं वरकड मी लिहीन. उगीच सूचनेची चिठी इकडे येण्याची लिहून द्यावी, त्यावरून चिठी दिल्ही ती पा आहे कलावे.

¶*The letter gives news about Dadasaheb being pursued by the two Sardars and also by Nana and Bapu. The writer discusses the possibility of hostilities being declared by Haider in the south as Visaji Krishna who was to proceed to the south was asked to proceed to Salsette.*

5862

No. 132] [December 1774

[आरंभीचा मजकूर फाटला.]

लयास करविली आहे. त्याचे उत्तर आलें तें * * पाठवीत आहेत; व त्याजकडें लोकांचा भरणा करून दिल्हा आहे. धुळपास आरमार लवकर घेऊन * * * मुंबईची जाळपोळ करावी; व त्याची कोली तरांडी धरावी येविशी लिहिलें आहे; व वाडीकर सावंत यासहि पत्र पाठविलें आहे कीं इंग्रजाकडे तुम्हाकडून वेंगुर्लें गांव तहत तुम्ही त्यास दिल्हें आहे तें सरकारांत त्याणें बदमामली केली सबब जप्त करणें म्हणोन लिहून पाठविलें असें. व सुरतेस तंबी पोंहचली असतां इंग्रज जाळयांत येईल. याजकरितां नारो आनंदराव सरकारची फौज राजश्री फत्तेसिंग गाईकवाड यांजकडे कुमकेस जात आहेत. ते सुरतेचे सुमारें आहेत म्हणोन ऐकल्यावर त्यांस सुरतेचे बंदीविशीं लिहून पाठविलें आहे; व मागाहून सुरतेचे कमाविसदार राजश्री बहिरो रघुनाथ येथें होते त्याचींहि रवानगी तिकडे केली. त्यास जाऊन आज तीन दिवस जाहाले. सुरतकर मोगलांकडे व इंग्रजाकडे सुरत अठाविशीचे माहालांत ऐवजाची वगैरें नेमणूक आहे. त्याजवर जप्ती करण्याविशी नारो आंनदराव यास व गाईकवाडाकडील मामलेदारास पत्रें लिहिलीं आहेत. * * *

¶*This fragmentary letter mentions the efforts made to hold the English in check at Surat.*

No. 133] [December 1774

[आरंभीचा मजकूर फाटला.]

...... ? करितां सरखेल जाऊन पोचले असतील. ते व तुम्ही जलदी करून मोर्चे मारावे, येविसीं त्यास बहुत प्रकारें लिहिलें आहे. स्वामीस कळावें म्हणोन लिहिलें असें. साष्टीचे मसलतीस पैका मुबलक लागत चालला. येथील ऐवजाची बेगमी आहे ती स्वामीस विदितच आहे. आला दिवस तो ढकलीतच आहों. साहुकारांपासोन आपण ऐवज लस्करात घेऊन वराता येथें करितात. ऐवज तों द्यावयास नाहीं. साहुकारास न दिल्यानें त्यांची स्थित राहात नाहीं, तेव्हा सिलकेच्या नाण्यापैकीं मुबदल्यास लाख रुपये पावेतों अजमासें नाणें खर्च जाहालें. येविसींचे ऐवजाचे मजकुराचें पत्र आलाहिदा लिहिलें आहे, त्याजवरून सविस्तर कळों येईल. रामचंद्र नारायण याणी लाख रुपये याचें नाणें पाठवावयाचे

केलें तें आद्याप आलें नाहीं. त्यांजकडे कारकून पाठविला आहे, वसुलांत येईल तेव्हां खरें. याप्रमाणेंच लक्ष्मण हरि लागु यांजकडीलहि पनास हजार रुपयाचें नाणें येणें * [पुढील मजकूर फाटला आहे.]

¶*The writer asks for money to meet the expenses at Salsette.*

No. 134] [*December 1774*

[आरंभींचा मजकूर फाटला.]

पत्रें लिहितां भागलों * * * * * * दिवाण त्यास जाऊन दाहा अकरा दिवस जाले. घरींच होते. वरकडहि कारकून याप्रमाणेंच तरतूद आणि कशासाठीं करावी सर्व भिडेवर चालतें. रदबदल्या करणार फार, आरमारची तयारीच नाहीं. निमित्य दरखदारांचा यैवज पावला नाहीं आसे बाहाणे; परंतु कोणी तर मुद्या माणूस नाहीं. मेहनत करावयाची नाहीं, या प्रकारचें त्या आरमाराची अवस्था. इंगरेजाचा कारभार, किलेकरी यानी फार दम धरला, व पुढेहि धरतील. जेथवर त्यांच्यानें होईल तेथवर करतील; फौज हजारपावेतों काल्व्यास जाऊन पोंहचली आहे, टापूंत कोणी जात नाहींत. नानाप्रकारच्या दिकती सांगतात. दाणा व वैरण आंत आहे. रावतास बेट थोर; जावयास चिंता नाहीं असें असतां न गेले. त्याजबरोबरच बापूजी हरि व हशमी लोक रवाना केले ते त्यांजदेखता टापूंत गेले. आम्ही विचार करून उदईक येऊं म्हणाले. येविसींचा मजकूर साष्टीहून लेहून आला त्याजवरून येथे सरदार गेले त्यांस [फाटलें.]

¶*The writer discusses the relative strength of the Maratha and the English positions at Salsette.*

No. 135] [*1775*

श्री

रतन वाणी अगरवाला याजकडून पांचशे रुपयांचे गोले साष्टीचे मुकामी सरकारांत घ्यावे लागतात. त्यास कारखान्यांत कोणते फर्म्याचे गोल्याचे प्रयोजन असेल त्याप्रो किती सेरी गोले पाहिजेत, त्याचे दोन फर्मे लेहून पाठवावे.

¶*Ammunition is requisitioned for Salsette from Ratan Bania Agarvala and an inquiry is made as regards the particular kind required.*

No. 136] [*1-1-1775*

आा बा नकल

पौ छ १९+ सवाल सन
खमस पौष मास

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष. रा सयाजी गा व राणाजी गायकवाड व मुकुदजी गायेकवाड व सायाजी गा मिलोन च्यार पथके सिलेदार याचे स्वाराची पुण्याचे मुकामी गणती घेऊन, छ १६ सवालीचा रोजमुरा देऊन, सास्टीचे स्वारीस रवाना जाहाले. ते येथे छ २६ सवाली येऊन पोहचाले. कलावे रा छ २८ सवाल सुा खमस सबैन मया आलफ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna reports that the contingents under Sayaji and Ranaji Gaikwad arrived at Salsette.*

No. 137] [*1-1-1775*

पौा छ १ जिलकाद सुा
खमस पौष मास

श्री

सेवेसी बालाजी विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. ताा छ २८ सवाल सुा नजीक साष्टी तीन कोस देसाई दावले ताा बेलापूर वर्तमान यथास्तित असे विशेष. छ २६ सवालचे आज्ञापत्र सादर जाहालें ते छ मजकुरी मुा मुजकुरी येऊन पावलें. साष्टीचे कामकाजाविसी फौजेचा व हशम लोकांचा वगैरे कोणे तऱ्हेने हरयेक हिकमतीने येकदीलता होय ते करणें म्हणौन आज्ञा. त्यास येथील मजकूर साष्टीचा वगैरे कलोन आलाच असेल. आतां विस्तारें काय लेहू? तात्पर्य स्वामीकडून साष्टीचे कुमकेविसी कोणत्याहि पदार्थेकडून न्यून पडोन विलग जाहालें ऐसें केलें नाहीं; परंतु ईस्वरी इछेस उपाय नाही. माणूस फारच नासले. त्याचीहि क्षिंत फारच जाहाली, असे आईकल्यांत आहे. परंतु येश टोपीकराने नेले असे जाहालें. पुढेंहि कठिण दिसतें. उरणचाहि मजकूर तसाच आईकतों. पकी बातमी आली नाहीं. आजच कलवियास आलीकडे दोन तीनसे माणूस साईकालीं उतरले आहे म्हणौन आवाई आली. जासूद

+ पैवस्तीच्या ताऱखेंत कांहींतरी चूक दिसते. ह्या साली सव्वालांत पौष फक्त २९ सव्वालच तेवढा आहे. तेव्हां १९ च्या ऐवजीं २९ असावी.

निवेदन [पुढील बंद गहाळ.] फौज म्हणावी तर अद्यापि मागाहून येतच आहे. प्रथम आपली फौज सोमवारी येथे आली. मंगलवार येक दिवस जाऊन बुधवारीं दोन प्रहरीं हला जाली. तीच काईम होऊन जागा गेली. अत:पर वसईचीहि कुमक जाहाली पाहिजे व बेलापूर, उरण, पनवेल, आपटे, पेण, उंदेरी, रेवदंडा, बिरवाडी तहद विजयदुर्गपावेतों येकच गत आहे. त्यांत हशम लोकांचे काम बंदरकिनारेयाचे जाग्यास बहुत दरकार लागती. त्यामध्ये गाडदी कडवें माणूस असावें ते किमपि राहिलेच नाही. मावले लोक येथे नामजादी आले ते फारच हलाखीत जरबेमुलें आले. त्यामध्यें येक सरदार राम सावंत व रघ सावंत हेहि नासले. येक जखमी आला. येक राम सावंत आलाच नाही. लोक तमाम आले त्यापौ चौथाई राहिले. बाकीची वाट काय जाली न कले. असे कर्ता तिनकशें जागां जागां पाठविले. फौजेचा मजकूर तर काही वसईस गेली व जागां जागा ठेविली. त्याची याद आलाहिदा आहे त्यावरून ध्यानास येईल. आंगरे सरखेल हे काम होऊन गेले मग आले. धुलप आलेच नाही. तात्पर्य ठिकाण जाणार तशासारिख्या हिकडे येणार त्याच्या बुधी गेल्या. वसईस राजश्री विसाजीपंत आले आहेत. ते ठिकाण यापेक्षा नाजूक आहे. तेहि याच फौजेची वाट पाहातात. येथे तों अवसान कशाचे यैवजी राहावे येविसीं स्वामीनीच बंदोबस्त केला पाहिजे. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Balaji Vishvanath describes the heavy losses suffered by the Maratha garrison at Salsette and asks for further efforts to defend the remaining places on the coast, e.g. Bassein, Belapur, Uran, etc.*

No. 138] *[1-1-1775*

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ २८ सवालपावेतो सुखरूप असो विशेष. राजश्री शाहाजी भोसले याजकडील पथक पाठविले ते छ २७ सवाली मुकाम नजीक साष्टी येथे येऊन पोहचले. त्याची रवानगी आजच वसईकडे केली असे. त्याचे पथकातील स्वार कांही मागाहून येयाचे आहेत. ते आलियावर त्याचे पथकाची हजरी घेऊन लेहून पाठऊ. साडे तीनसे च्यारसे राऊताचा नजर माजना आहे. गणती घेऊन मागाहून लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna communicates to the Peshwa the arrival of the contingent of Shahaji Bhonsle at Salsette numbering about 350*

No. 139] [1-1-1775

पौा छ २९ सवाल
सायंकालचा घटका दिवस

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण साा नमस्कार विनंती. ताा छ २८ सवालपावेतो मुाा नजीक परसीक वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी दोन च्यार आज्ञापत्रे पाठविली ते वरचेवर पावत आली. उतरे वरचेवर पाठऊन द्यावी म्हणौन आज्ञा. यैश्यास साष्टी गेल्याचें वर्तमान सेवेसी लिहून पाठविलेच होते. त्याजउपरी पत्र लिहून पाठवावे तरी काये ल्याहावे ? ज्या गोष्टी न व्हावयाच्या त्या होऊन त्याचे नाकारे-पण आम्हावर आले. त्यापक्षी पत्र ल्याहावे यैसे चितास येत नाही. असो. (गो)ष्टी कालगतीवर आहेत. साष्टी गेल्याउपरी इंग्रज हावभारी जाहला. याजउपरी तोंड कोणीकडे टाकील हे न कले. याजकरिता चहूंकडे गलबल जाली. तले, घोसाले हिकडे काही राजपुरीकर शामल याणे जमाव केला, यैसी बातमी आली. त्याजवरून तले, घोसाले, रेवदंडा, उरण, पेण, पनवेल, बेलापूर, आपटे; कल्याण चहूकडे से से पनपनास राऊत पाठऊन खबरदारी करावी यैसी योजना. त्यास काल मंदवारी राजश्री विसाजी केशव याचें पत्र वसईहून आले जे, वसईच्या नस्तावर इंग्रजांची गलबते आली. यैशास किल्यामध्ये माणसांचा भरणा नाही; तरी आपण फौजसुध्धा जलदीने येणे म्हणोन पत्र आले. यैशास आम्ही झाडून फौजसुध्धा वसईस जावे तरी कल्याणपासून तले, घोसाले पावेतो गलबल होईल. याअर्थी फौज पुढें पाठवावी, आम्ही येक दोन रोज येथे राहून चहूकडील राउताची रवानगी करून विशेष निकड असल्यास वसई जावे, यैसे राा रामराव त्र्यबक व राा बाबाजीपंत वगैरे सर्वत्राच्या विचारे जाहाले. त्याजवरून आम्ही आपल पथक व शाहाजी भोसले, जोत्याजी जाधव मिळोन दीढ हजारपावेतो फौज आज प्राथःकाली राजश्री आनंदराव गणेश व आबा देवधर याजबाा रवानगी केली. आज मधी राहावे, उद्या वसईस दाखल व्हावे यैसे सांगितले आहे. जाऊन दाखल होतील. राजश्री विसाजीपंत याजबाा लस्करातून फौज रवानगी जाहाली होती; परंतु फौज आद्याप येऊन पावली नाही. विसाजीपंत सडे मोठ्या मोठ्या मजली करून आले. फौज मागाहून येत आहे. आज उद्यां येईल. असो. याजउपरी येक दोन रोजामध्ये इकडील राउताची रवानगी करून विशेष बातमी आलियास आम्ही वसईस जातो. राजश्री राघोजी आंगरे सरखेल येकादसीच्या दिवसी येऊन भेटले. येक रोज येथे होते. उपरांतिक त्याणी म्हटले जे, तूर्त चहूकडे गलबल जाली.

च्यार स्थले आम्हांस रक्षावी लागतात. याजकरिता निरोप द्यावा. पुढे ज्या समई जसी मसलत श्रीमंतास करणे असेल त्याप्रो आम्ही सिधच आहो; परंतु आज निरोप द्यावा यैसे म्हणो लागले. त्याजवरून दोन तीनसे माणसानी आले होते. साष्टी गेली याजउपरी ठेऊन व्यर्थ. रेवदंडा वगैरे तिकडील सरकारचे जागे आहेत त्याच्या उपराळा करावा म्हणोन त्यास सांगोन त्यास निरोप दिल्हा. ते कुलाबियास गेले. वरकड कुमकी मावले होते ते झाडून आपले आपले स्थलास न पुसता गेले. से दोनसे राहिले आहेत ते बेलापूर वगैरे जागा पाहून पाहून रवाना केले. गारदी तो येक राहिला नाही. आम्हास व बापूजीपंतास न पुसत उठोन गेले. या प्रकारचे वर्तमान आहे. जाले वर्तमान कळावे म्हणोन लिहिले आहे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना. राजश्री विसाजी केशव याची पत्रे वसईहून बातमी व जलदीने येण्याविसीची आली. त्याच्या नकला करून सेवेसी पाठविल्या आहेत. त्याजवरून विदित होईल; व राजश्री बाजी गंगाधर याणी उरण गेल्याविसीची बातमीचे पत्र आले त्याची नकल करून पा। आहे, त्याजवरून विदित होईल. हे विज्ञापना.

¶Visaji Krishna reports to Poona the situation subsequent to the capture of Salsette by the English—especially the necessity of defending the other coastal places against the English and the Sidi. The writer further informs that he has sent some of his forces to Bassein as desired by Visaji Keshav and that he has also allowed Raghoji Angria to return and defend his places.

No. 140] *[1-1-1775*

पौ छ ३० सवाल सुा
खमस सबैन प्रहर
दिवस प्रात:काल
पौष मास

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. ता। छ २८ सवाल पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री विसाजीपंत लस्कराहून फौजेसह- वर्तमान रवाना जाहाले ते वसईस आले. लांब मजला करीत आले, जलदीने यामुले बा। थोडी फौज आली म्हणौन मा।रानिलेचे पत्र आले की फिरंगी व इंग्रेज दोघे येक विचारे जमोन वसईचे बारेयावर आरमार आले आहे. इंग्रेज हावभरी जाहाला आहे, याजकरितां कोणे समई काय होईल न कले. आपले फौज थोडी याजकरितां आपण फौजेसुधां यावे म्हणोन लिहिले त्यास आम्हाजवल फौज होती

ती फार करून वाटणीप्रमाणें जागांजागां पाठविली व काही फौज वसईस रवाना केली. इंग्रेजानें चोहोकडे गडबड मांडली आहे, यामुळें पथकें जागांजागां रवाना केली आहेत त्याची याद आलाहिदा पाठविली आहे त्यावरून कळेल. हशम लोक हुजूरचे व किले हायचे साष्टीचे कुमकेस आले होते; त्यापौ काही मेले, काही जखमी जाहाले, काही परभारे निघोन गेले; कांही थोडेबहुत येथे बलात्कारे जमा केले, त्यापैा बेलापुर परसिक वसईस तीन ठिकाणी थोडे थोडे पाठऊन दिल्हे, व आपटे यांस कांही पाठविले त्याचा तपसीलवार झाडा मागाहून लिहून पाठवितो, त्याजवरून विदित होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. राजश्री विसाजी केशव याची पत्रे वसईहून आली त्याच्या नकला करून पाठविल्या आहेत, त्याजवरून विदित होईल. हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna reports having posted several of his contingents at various places to check the English.*

No. 141] [*2-1-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री विसाजी केशव स्वामी
गोसावी यासी

पो माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जाणे विशेष. राजश्री खेम सावंत भोसले सरदेसाई प्रांत कुडाल याजकडील लोक ठाणे साष्टी येथे कुमकेस रवाना केले आहेत. त्यास पोटास दरमाहा द्यावयाची कलमे.

लोक आसामी २००० दोन हजार यास दरमाहा दर आसामीस (से)रा अडीच, व लोकातील सरदार येतील त्यास दर आसामीस दरमाहा रुा ३॥ साडे तीन प्रमाणे देत जाणे. कलम १

मातबर सरदार खाशापैकी कोणी येतील त्यास दरमाहा रुपये ३०० तीनसे देत जाणें. कलम १

खाशाबरोबर स्वार चालीस पनास येतील त्यास पंधरवडा दर स्वारास रुा ४ च्यार रुपये प्रमाणे दरमाहा दोन आठवडे देत जाणे. कलम १

येकूण तीन कलमे करार करून दिल्ही असेत; तरी लोकाची हजरी घेऊन हजिरीप्रमाणें दरमाहाचा दरमाहा सदरहू लिहिल्याप्रमाणे प्रांत वसईपैकी देत

जाणे. जाणिजे छ २९ संवाल सुा खमस सबैन मया व आलफ बहुत काय लिहिणे हे+ विनंती.

बार.

¶*The Peshwa orders payment to the men sent to Salsette by Khem Savant and informs Visaji Keshav accordingly.*

No. 142] [*2-1-1775*

पैवस्ती छ ३० सवाल

पौष सन खमस

प्रहर दिवस प्रात:काल

श्रीगणपति

राजश्री नारो आपाजी स्वामी गोसावी

विनंती उपरी. साष्टी इंग्रजानें हला करून घेतली त्याचें वर्तमान सविस्तर मागाहून लिहून पाठवितो म्हणून तुम्ही लिहिलं असतां अद्याप लेहून पाठविलेत नाहीं; तरी हला किल्यावर जाला ते समयीं किल्यांत कोण कोण होते व बाहेर कोण होते? किल्यांतील हवलदार व आनंदराव राम मामलेदार हे कोठं आहेत व राजश्री विसाजी कृष्ण व राजश्री रावोजी आंगरे व हुजूरची फौज व हशम गाडदी वगैरे व किलेहायचे लोक आणविले होते ते कोण कोठे आहेत व पुढें मनसबा काय केला आहे हें साद्यंत वर्तमान लिहून आलेंच असेल; तरी पत्र पावतांच लिहिल्याअन्वयें लेहून पाठवणें; व आरमार आणविले होते तें कोणे ठिकाणीं आहे तेंहि लिहिणे. जाणिजे छ २९ सवाल सुा खमस सबैन मया व अलफ हे विनंती.

¶*Naro Appaji is asked to supply details of the capture of Salsette by the English.*

No. 143] [*2-1-1775*

पौ छ १ जिल्काद सुा सन खमस

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण साष्टांग नमस्कार विज्ञापना, ऐसीजे. येथील वर्तमान तागाईत छ २९ सवाल पावेतों येथास्थित असें विशेष. बहीरजी यादव प्यादा याजबराबर छ २४ सवालचें पत्र पाठविले तें छ २६ मिनहूस येऊन पावले.

+ यापुढील मजकूर सखाराम बापूंच्या हातचा,

स्वामींनी साष्टीचे तरतुदेविशी विस्तारे लिहिलेंस. त्यास इंग्रजानें किल्यास तोफा लाऊन तट जमीनदोज बराबर करून छ २४ सवाली किला घेतला, हें पेशजीच डाकेबराबर पत्र लेहून पाठविलें आहे. आम्ही बेविसावें तेरिखेस परसिकास आलो तेच दिवशीं सात आठशें राऊत पलीकडे उतरले. राऊत गावाजवळ गेले तो निवडुंगाच्या बाड्यो[1] येका घोडियाची वाट, त्याजवर वाटेवर त्याणें मेढे[2] पुरलें होते. ते दिवशीं चौकीच च्यार प्रहर केली. दुसरे दिवशीं किलेकरी यानीहि पलीकडे जावे, चेंदनीच्या तळ्याकडे गेलियानें त्यास दहशत बसेल, म्हणोन सांगितलें. ते दिवशीं रात्रीं च्यार प्रहर चौकी करविली. चोविसावें तेरखेस डोंगराशेजारून चेंदनीच्या तळ्याकडे गेले. मावले लोकहि पुढें घाळून नेले होते. त्याची याची गोलागोळी जाली. च्यार घटकां किल्यावरी मारगिरी कमी जाली होती. दोन गोळे त्याचे येऊन पडले; येका मावळियास तुकडा लागला तेव्हा मावळे याणी पळ काढून निघोन किल्याच्या पूर्वेस आले. फौज च्यार साहा घटिका उभा होती. मग रात्रीचा ताटकला जेवावयास पूर्वेकडे आली, तों संधी पाहून त्याच वेळेस हला केली. चाळून जायाजोगी वाट जाली होती, वरतेंच चढोन गेले; याप्रमाणें जाले. राउताचा जाण्याचा येत्न नाहीं. वाट नाहीं. मैदान असतें तरी खामखां घोडे घालिते. याप्रमाणें मजकूर जाला. सेवेसी श्रृत होये हें विज्ञापना.

¶*Visaji Krishna describes the final attack of the English on the fort of Salsette and explains why the Maratha cavalry could not act.*

No. 144] [*2-1-1775*

पैवस्ति छ ६ जिल्काद
सन खमस सबैन.

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक सा. नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ २९ सवालपावेतों येथास्थित असें विशेष. कोंकणांतील वर्तमान तरी साष्टी इंग्रजानें घेतल्यावर बहुत सेर जाला आहे. या समईं त्याचें पारपत्यच व्हावें असा समय होता; परंतु त्याणें साफी करून सरकारची कुमक गेली असतां हल्याचे लगट करून जो होईल बंदोबस्त तितका करितो आहों म्हणोन याणी लिहिलें आहे. अरमारसुद्धां घेऊन सुवर्णदुर्गापुढें आले आहेत. जंजिरे जाग्याचे उपयोगी कांहीं पडतील तर नकळे. धुलपास पत्रें लिहितां भागलों. आतासें येतात आहेत राजश्री राघोजी आंगरे खुसकीनें विसाजी कृष्ण यांजवळ आले.

---

१ कुंपण. (2) Stockades.

तो साष्टी गेली तेव्हां विसाजीपंताचा निरोप घेऊन आपलें स्थलास खबरदारीस गेले. फिरंगी गोंवेकर याचा चलचलाव आजपावतों दिसत नाहीं; परंतु टोपीकराचा भरवसा येत नाहीं. साष्टी घेतली व येशवंतगड साष्टी तालुक्यांतील तो बंदरकिला त्याचा तो तेव्हांच घेतलान. साष्टीवर हल्ला जाली. भवानजी हवालदार किल्यांत कामास आले. राजश्री आनंदराव राम किल्यांत शत्रूचे हातीं लागले व भवानजी कदम याचा लेकहि त्यास सांपडला. त्या उभयतांस मुंबईस रवाना केलें. केशवराव केतकर गलबलीमध्यें बाहेर निघोन गेला म्हणतात. या प्रकारें तेथील [पुढे किती मजकूर गहाळ आहे ते कळत नाहीं. नंतर पत्राचे पाठीवरील मजकूर.]

परिणाम नाहीं. पैक्याची हाव (या)च पत्राच्या उतराची वाट पाहून करीन म्हटल्यास दिवसगत फार लागते, याजकरितां सेवेसी विदित व्हावें याजकरितां विनंती लिहिली आहे. फलदाता ईश्वर आहे; पुढे आज्ञा येईल त्याप्रमाणें करूं. तूर्त साष्टी गेल्यावर लोक जिकडील तिकडे गेलें. त्यांसहि ताकीदपत्रें पाठऊन जमा करविले आहेत; व आणखीहि जमा होतील, तें करितों. विसाजीपंतहि आले तें माहीत आहेत. त्यांचे विचारें जसें होईल तसें समजून करतो. त्यांचें उत्तर यावयाचें आहे; परंतु शह सोडतां येत नाहीं. यांत जशी मर्जी असेल तसें करीन. पैक्याची तजवीज एखादी तऱ्हा काढून ल्याहावें, अथवा मातबर कोणी असतील त्यांनीं कर्ज दिल्हे नसेल त्यांजवळ घ्यावयाचा करार करावा. अथवा पेस्तर सालच्या रसदा ज्यांनीं दिल्या नसतील त्यांजपासून कांहीं घ्यावें, अथवा आणखी तजवीज करावयाची ते करावी. जैसें करावयाचें असेल तैसी आज्ञा करावी. पूर्वीं बंदी केली त्यामुळें मुंबईत माहागाई जाली आहे. सुरतेकडे नारो आनंदराव यांस बंदीविशी लिहिलें. उतर आलें नाहीं. सेवेसीं श्रुत होये हें विज्ञापना.

¶*News is sent to Naro Appaji from Salsette after it was captured and taken possession of by the English. The writer complains that succour did not come in time from Dhulap and Angria.*

No. 145] [*2-1-1775*

पौ छ १ जिलकाद.

सु॥ खमस.

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण सां॥ नमस्कार विज्ञापना ऐसिजे. येथील वर्तमान ता॥ छ २९ सवालपावेतो सुखरूप असो विशेष. सरकारचे जासुदजोडीबराबर पत्र

छ २६ सवालचे पाठविले ते छ २८ मिनहूस येऊन पोहचले. स्वामींनी साष्टीचे तर्तुदेविसी विस्तारे लिहिले. त्यास इंग्रजानें किल्यास तोफा लागू करून किल्याचा तट जमीदोज करून छ २४ सवाली दोन प्रहरी हला करून किला घेतला, हे पशाजी सविस्तर डाकेचे जासुदाबराबर लेहून पाठविलेच आहे. पुढे जसी आज्ञा येईल त्याप्रा॥ वर्तणूक करू. वसईचे कुमकेस दीड हजार फौज रवाना केली. पाचसासे बेलापूर वगैरे किले येथे पाठविली. दोनतीनसे मात्र आम्ही आपलेजवल ठेविले आहेत. येका दो रोजी कल्याणास जाऊ. वसईची बातमी आली म्हणजे तिकडेच निघोन जाऊ. येविसीचे सविस्तर वर्तमान कालच लिहिले आहे. वसईची व बेलापुरची पत्रे आली त्याच्या नकला करून पाठविल्या आहेत, त्याजवरून विदित होईल. चहूकडे गलबल फारच आहे ते वर्तमान लिहिले आहे. पुढे येईल वर्तमान ते लिहून. पुढे जसी आज्ञा येईल त्याप्रा॥ वर्तणूक होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna asks for more reinforcements as Bassein and other places are threatened by the English.*

No. 146] *[2-1-1775*

पौ॥ छ ९ जिलकाद
सन खमस सबैस

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विशेष. पुण्याचे मुकामीहून छ २० सवालीं सिंदे पोर्गे आ॥ १२ पाठविले ते छ २७ सवालीं देसाई दामडे येथील मुकामी येऊन पावले रवानगी बारा पौ॥ तिघे पुण्यासच राहिले. बाकी नव येऊन पावले. यांस बसावयास घोडी पाहिजेत. ज्या कार्याकरितां पाठविले तो प्रकार राहिला. तेव्हा दुसरे ठिकाणी बेलापूर, वसई उंदेरी रेवदंडा येथें जागां जागां दोनदोन तीन तीन पाठवावे तर तेहि कबूल न करीत. स्वारी बा॥ ठेवावे तर घोड्याविना निभाव नाही. वरकड यांस सिधा पावतो त्याप्रा॥ यांस येथे पावेल. वरकड घोडे मिलणे कठिण. तेव्हां येथें ठेऊन उपयोग नाही. याजकरितां माघारे सेवेसी पाठविले असेत. येथे कोणत्याहि उपयोगावर पडावे ते काहीच नाही. रिप रिप मात्र वोझे. भाडेकरी टाकून गेल्यावर रोज वोझे चालावयाचे कठिण. याजकरिता पा॥ आहेत. रा॥ छ २९ सवाल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna sends the Shinde boys back to Poona as they were of no use to him. The boys (porgas) appear to be illegitimate progeny of the Peshwas or the Sardars.*

No. 147] **[3-1-1775**

नकल

श्री

राजश्री राघोजी आंगरे वजारत-
माब सरखेल गोसांवी यासी

६ संकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री विसाजी कृष्ण आसीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकाये कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. ते प्रांती शामलानी व इंग्रजानी गडबड मांडली आहे; सबब तिकडील बंदोबस्ताकरिता मौजे देसाई[1] डोमडे[1] येथील मुकामीहून आपली रवानगी केली आहे. त्यास जंजिरे रेवदंडा व जंजिरे उंदेरी वगैरे आणखी किले असतील त्या त्या स्थली कुमक चांगली पाठऊन स्थलाचे सौरक्षण होये तो अर्थ करावा. आपलेकडीलहि तालुकियातील किल्याकोटाचा बंदोबस्त येथास्थित उतम रीतीने असो द्यावा. यानंतर मुंबईचे बाऱ्यावर धुलपाचे अरमार वायावर आले आहे; तरी आपले अरमार तयारीनसी तेथें रवाना करावे. दोन्ही अरमार येक होऊन माऱ्यावर उतरून त्याची पाले व तरांडी लाहान सिलसिला जेथे आढलतील ती पाडाव करावी. मुंबईत चहूकडील जिनस येत असेल तो मना करून बंदी पड, ते गोष्ट करवावी. सरकारचे पत्र पुण्याहून छ २७ सवालचे तुम्हास आले ते पाठविले असे; त्यावरून सविस्तर कलेल. धुलपास सरकारची पत्रे पाठविली आहेत ती माहागेरियावरून जलदीने त्याजकडे पाठवावी. रा छ ३० सवाल. सुवर्णदुर्गचे आरमार धुलप याजबरोबर जावयास पेसजी लिहिले आहे, तेहि आरमार आले असेल. तिन्ही अरमारे येक जाहाल्यावर शत्रूचे पारपत्य होईल, यात संशय नाही. तर लिहिले अन्वये करावे. छ मजकूर बहुत काये लिहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Visaji Krishna gives Raghoji Angria directions for the defence of Rewdanda, etc., and asks him to join with Dhulap and to stop supplies reaching Bombay.*

---

१ हीं गांवें कल्याण तालुक्यांत आहेत.

No. 148] [Date of Receipt 3-1-1775

पौ छ ३० सवाल
संध्याकाल सुा खमस

श्री

सेवेसी आनंदराव धुलप मुकाम बोऱ्या नजीक जैगड चरणावरी मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना. जंजिरे विजयदुर्गाहून स्वार होऊन किले मजकुरी आलो. उदैक निघोन साष्टीस जातो. सेवकाचे जाण्यापूर्वी तीर्थस्वरूप राजश्री कृष्णाजी धुलप व जानराऊ धुलप अरमार घेऊन साष्टीस गेलेच आहेत. सेवकहि येका दोहों दिवसी दाखल होईल. समागमें सारे सामान पांच पाल व तीन गुराब पंधरा गलबतें आहेत. इंग्रजाचे तरांडियासी गांठ पडल्यास धण्यांचे पुण्येंकरून जे होणे ते होईल. वसईचे बाऱ्यावर जाऊन थोर पाल व गुराब तेथें ठेऊन लाहान माहागिऱ्यावरून साष्टीचे टापूत उतरोन जावें येैसे मानस आहे. दिवसगत गोव्याकडील बातमी येत असें म्हणोन लागली. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Anandrao Dhulap reports that he is proceeding to Salsette and tha Krishnaji and Janrao Dhulap have already gone there before him. He is toc late to avert the disaster.*

No. 149] [3-1-1775

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री
नारो आनंदराव गोसावी यांसीं

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुा खमस सबैन मया व अलफ. शहर सुरत येथील बंदी करावयास पेसजी तुम्हास पत्रें सादर केलीच आहेत. त्यास हाली इंग्रेजानी साष्टी घेतली म्हणौन तुम्ही सुरतेची मोकलीक कराल तर न करणें; शहरची बंदी चांगली करणे; जेव्हां येथोन मोकलीकचे पत्र सादर होईल तेव्हा मोकलीक करणे, तोपर्येंत शहर मारची बंदोबस्ती, आंत काहीं जाऊ देऊ नये; शहरावर शह चांगला द्यावा, याप्रो पेसजी लिहिले आहे त्याप्रोच करून बंदी करणे. साष्टीस फिरोन सरकारातून मोर्चेबंदी करावी लागते; तर तुम्ही सुरतेची बंदी करणे. जाणिजे. छ ३० सवाल. आज्ञा प्रमाण. बंदीविशीं येकदोन पत्रें तुम्हास सादर जाहाली आहेत, त्याप्रों तुम्ही बंदी केलीच असेल; व नरोत्तम किसोरदास यास तुम्ही धरून बेडी घालून ठेविला आहे म्हणून कललें, परंतु तुम्ही काहीच लिहिलें नाहीं;तरी सविस्तर तपशीलवार लिहिणें. जाणिजे. छ मजकूर

¶*Naro Anandrao is asked by the Peshwa not to relax the blockade of Surat even though Salsette has been lost to the English as it is contemplate to renew attacks for the recapture of the place.*

No. 150] *[29-12-1774*

पौ छ ३० सवाल खमस
प्रात:काल सा घटका दिवस

श्री

राजश्री नारो अपाजी स्वामी गोसावी यांस

विनंती उपरी. साष्टीस तुम्ही लोक बरोबरी जमाव करून पाठवितां, त्या लोकांनीं रात्रौ जपून जाऊन बेजरब इंग्रजाचे मोर्च्यावरी घालून मारून काढावे. दिवसा जाऊन गांठ घालीन म्हटल्यास त्याचे आगीचे बल भारी, याजकरितां रात्रीची गांठ घातल्यास फार उपयोगी पडेल असे आहे; तरी लेहून पाठवून याप्रमाणें करवणे. जाणिजे छ २९ सवाल. मोर्च्यावरीं दोहीकडून हगामा रात्रीचा करीत जावा म्हणजे त्याची सलाबत आपणावरी पडणार नाहीं. आपले लोक शाबूत राहातील हे जरूर जरूर करवावे. रावोजी आंगरे याजकडील लोकहि पायेउतारा करवावे. बरकंदाज माणूस फार करून ठेवावे. रवाना गुरुवार प्राथ:काल प्रहर दिवस हे विनंती.

¶[Naro Appaji is asked to give precise directions to the men he is sending to Salsette that an attack by night is more effective and that therefore the English batteries should be attacked rather by night than by day.

No. 151] *[3-1-1775*

श्रीगणपति

शेवेसीं पुरुषोत्तम कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ २० सवालपर्यंत यथास्थित असे विशेष. साष्टीचा किला इंग्रजाकडे गेल्याचा मजकूर पूर्वी लिहिलाच आहे, व पुण्याहून सविस्तर लिहिलें गेलेंच असेल. मोष्टीन इंग्रजांकडील पुणियांत होता, त्यास पत्र राजश्री आनंदराव जिवाजी याणी मुंबईस पाठविलें, त्याचे उत्तर मशारनिलेस आलें. त्यांत मजकूर कीं साष्टीवर फिर्गीयाचीं जाहाजें विलातेहून आलीं. त्यास सरकारची व आपली दोस्ती असतां फिर्ग्यास साष्टी कसी घेऊन द्यावी, याकरितां जनरालांस साष्टी घ्यावयासी कारण जाहलें म्हणोन पत्रीं लिहिलें आहे व जनरालाचीं पत्रें याच अन्वयें मुत्सदियांस पाठविलीं म्हणोन लिहिलें आहे. तेव्हां त्याणी पत्रें लस्करांत रवाना केलीं असलीं तरी स्वामीकडे येतील; परंतु दुष्ट जातीचें, करणे येक आणि लिहिणे येक! याजवरून अपूर्व वाटलें, यास्तव विनंती लिहिली आहे, व राजश्री आनंदराव जिवाजी

+ यापुढील मजकूर बापूंच्या हातचा.

यांचे पत्राची नकलहि पाठविली आहे, त्याजवरून पत्रान्वये ध्यानास येईल. सेवेसी कळावें म्हणून विनंती लिहिली आहे. आतील माणूस ठार किती जाहालें, जखमी किती, पळाले किती, त्याचे हातीं सापडले किती, याचा तपसील राजश्री नारोपंत नानानी लिहिलें असेल. बसालतजंग याजकडील थैली आली आहे. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Purushottam Krishna writes how deep laid were the plans of the English regarding the capture of Salsette. Inquiries about casualties in the fort are made.*

No. 152] [*3-1-1775*

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण साा नमस्कार विनंती. ताा छ ३० सवालपावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ २७ सवालचे आज्ञापत्र पाठविले ते छ २९ रोजीं पावले. तेथे आज्ञा कीं, याजउपरी तुम्ही सारी फौज व लोक जमा करून कळवे, पारिसीक येथे जाऊन राहाणे. बेलापूर, उरण वगैरे जागा माणसाची भरती जाहाली पाहिजे; याजकरितां तुम्हाजवळ रेवदंडेकर भंडारी आले आहेत. ऐशास दोनसे बेलापुरास व दोनसे उरणास पाठऊन द्यावे. येसवंतगड व उरण काईम आहे. त्यापक्षी साष्टीची * * * * याची नाही. वसईच्या खाडीतून दोन हजार माणूस साष्टीच्या टापूमध्ये उतरणे, आणि मुंबईची बंदी करणे. राजश्री विसाजी केशव लस्करांतून रवाना जाहाले. तुम्हाजवळ आले असतील. ते तुम्ही मिलोन पोख्त विचार करणें. राा धुळप यास पत्रे रवाना जाहाली आहेत. त्याजकडून मुंबईस ताण देवणे. राजश्री राघोजी आंगरे यासी तुम्ही आपणाजवळ आणून ठेवणे. साष्टीचे माहीत गोविंद हरि आहेत. त्यांस हुजूर पाठऊन देणे. सारांश साष्टीचा शह न सोडितां कळवे परिसीक येथे जाऊन राहाणे म्हणोन विस्तारे आज्ञा. ऐशास याचा अर्थ पेसजी डाकेबराबर तपसीलवार सेवेसी लिहून पाठविला आहे त्याजवरून विदित जाहालेच असेल. कळवे पारिसिक येथे राहाण्याविसीं आज्ञा. ऐशास तेथे राहणे तेव्हां पाच हजार हशम, पाच हजार फौज असावी. आगोधर मोर्चेबंदी करून पेव्या बांधोन वर तोफा ठेऊन, किल्यावरील गोले बंद करावे तेव्हां कळवेयासी राहावें. उगेच थोडे जमावानसी राहीन म्हटलेयासी ठीक नाहीं. कळवेयासी गोले येतात. पारसिका-जवळ फतेबुरुजाचे गोले येतात. ऐशास फौजेचा व हशम लोकाचा प्रकार तरी बुधवारी साष्टी इंग्रजानी घेतली त्या दिवसी वसईकडील वगैरे जागा मिलोन हजार

बाराशे माणूस जमा जाहाले होते ते पळून आम्हांस न पुसतां उठोन आपले आपले जागा गेले. रेवदंडेकर भंडारी आलेच नाहीं. आम्हाजवळ पांच माणसे म्हटली तर राहिली नाहीं. से दोनसे किरकोळ राहिल होते. ऐशास बेलापूर, आपटे वगैरे जागां थोडे थोडे रवाना केले. येक माणूस तूर्त आम्हाजवळ राहिले नाहीं. फौजेचा प्रकार तरी साष्टी घेतल्या उपरी चहूकडे गलबल जाहाली. तळे, घोसालेपासून कल्याणपावेतो गडबड जाली, तेव्हां जागां जागां राऊत पाठऊन द्यावें म्हणोन पत्रें आली; तेव्हा राऊत न पाठवावें तरी ठीक नाहीं हे समजोन तूर्त नाजूक जागे होते तेथे जागां पाठऊन पेण, पनवेली, बलापूर, आपटे, कल्याण येथें राऊत रवाना केले. आंम्ही पारसी(क) (अपूर्ण.)

¶*Visaji Krishna narrates the difficulties as to why he could not execute the Peshwa's orders regarding the defence of Kalve, Parsik and other places. "Everything is disorganised since the capture of Salsette by the English," says he.*

No. 153] *[4-1-1775*

पौ छ ९ जिलकाद सन
खमस सबैन पौष मास
सायकाळ प्रहर रात्र.

श्री

शेवेसी बालाजी मल्हार कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १ जिल्कादपावेतो यथास्थित असे विशेष. स्वामीनीं भोमवारी रवाना केले ते सोळा सोळा कोशाच्या मजली करून, गुरुवारीं राजश्री विसाजीपंतबावाजवळ दाखल जालो. तेच दिवसी राजश्री रावोजी आंगरे वजारतमाब सरखेल सैन्यात पंत मााारनिलेसनिध दाखल जाले. सरखेल याचे दर्शन जाले ते समई हुजूरचे आज्ञेचा अर्थ सांगितला. त्यावरून विजयदुर्ग, रत्नागिरी, साष्टी येथील पत्रे दाखविली. त्यात अर्थ की आरमारची स्वारीतून मुंबैस उपद्रव करावा, सरकारचे अरमार सामील होऊन दोनी आरमार येकदील होऊन हात पावेल तिकडून शत्रूचे पारपत्य करावे ऐसी तालुकदाराची पत्रे दाखविली. यास्तव आमचे येणे साष्टीस न जाले. साष्टीस जावे येविसी हुजूरची निकडीची पत्रे आली त्याजवरून साष्टीस जलद येऊन दाखल जालो. तो येथील वीध काल बुधवारीच उरकला. याप्रमाणे जाबसाल जाला. शेवकाने आज्ञेप्राा फौजेसमागमे पलीकडे जावे तोहि स्थल शत्रूचे हस्तगत जाले. जलदीने आज्ञेप्रमाणे आलो परंतु स्थल विपरीत जाले. फिरोन मोर्चेबंदी करावी येविसी पंतबाबा मााारनिलेस विनंती केली.

5878

त्यावरून सांगितलें जे हुजूर लेहून पाठऊ; तेथून आज्ञापत्र येईल तेव्हा जो अर्थ करावयाचा तो होईल. रा सरखेल यास शनवारी निरोप दिल्हा. तेहि जंजिरे कुलाबियास गेले. त्यास मी विनंती केली कीं, पुढे विचार कोणता करिता? त्यानी उतर केले कीं मोर्चेबंदी जे समई करणे ते प्रसंगी आम्ही सिध असो. शत्रु सांप्रत सेर जाला आहे. तो कोठे तोंड टाकील न कले. जंजिरे, कुलाबा व खांदेरी दोन स्थले समुद्रातच आमची आहेत. तेथील बंदोबस्त राखावा लागतो; व सरकार तालुका उंदेर जयेदुर्ग येथीलहि उपराला करू ऐसे ते बोलिले, तेव्हा पंतबावानी निरोप त्यास दिल्हा. मी विनंती केली की, मोर्चे देणे तरी जलदीने दिल्हास शत्रूस जरब प्राप्त होईल. त्यास सवड फावली म्हणजे बंदोबस्त करील. सेणा-मेणा-लोखंडाचे स्थल होईल. वारंवार विनंती केली; परंतु त्याचे लक्ष जे हुजूरने पोख्त सरंजाम होईल तेव्हा जे करणे करू. वरकड सविस्तर राजश्री बापूजी सांगता विदित होईल. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. हुजूरने तरतूद फारच चांगली होत आहे. तसेच येथे झटावे फिरोन बसावे येविसी विनंती करितो; परंतु पंतबावाचा विचार फिरोन सरंजाम पत्रे येतील तेव्हा करावीसी (इछा) हे विज्ञापना.

¶Balaji Malhar communicates to the Peshwa that Salsette has been lost to the English and that Visaji Krishna does not think himself equal to its recapture.

No. 154] [*4-1-1775*

पौ छ ८ जिलकाद
सन खमस पौष

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान साहेबांचे सेवेसी

आज्ञाधारक आनंदराव धुलप चरणावरी मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना. ताा छ १ माहे जिलकाद पावेतो सेवकाचे व अरमाराचे वर्तमान येथास्थित आहे विशेष. छ २२ सवालचे आज्ञापत्र छ २९ सवाली सादर जाहाले, तेथे आज्ञा कीं येकंदर अरमारसुधा साष्टीस इंग्रजाच्या पारपत्यास निघोन जाणें म्हणोन. त्यास पेशजी इंग्रज साष्टीस लागला, हे बातमी येताच तीर्थस्वरूप राजश्री कृष्णाजी धुलप दोन पाल व तीन गुराब व सात गलबते घेऊन निघोन गेले. बाकी

अरमार बंदरात होते, ते निकडीने तयार करून तीर्थस्वरूप राजश्री जानराव धुलप व हरबाजीराव व सेवक यैसे छ २३ सवालीं निघोन गेलो. सेवेसी विदित व्हावे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Anandrao Dhulap informs the Peshwa that Krishnaji and Janrao Dhulap have already left for Salsette with their fleets*

No. 155] [*5-1-1775*

पौ छ ९ जिलकाद सन ख-
मस सबैन पौष मास बारा,
घटका दिवस प्रात:काल.

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
साहेबाचे शेवेसी

विनंती शेवक जानराव धुलप मो बारा रेवदंडा कृतानेक दंडवत विज्ञापना. ताा छ २ जिलकाद जाणून सेवकाचे व अरमारचें वर्तमान यथास्थित असे विशेष. पेसजी आज्ञापत्र सादर जाहाले तेथे आज्ञा जे, साष्टीचे कुमकेस कांही आरमार रवाना करावें. त्याजवरून तीर्थस्वरूप राजश्री कृष्णाजी धुलप दोन पाल व तीन गुराबा व साहा गलबते रवाना केली. मागील शह राखोन तीन पाल च्यार गलबतानसी होतो. त्यावर साहेबांचे आज्ञापत्र सादर जाहाले. तेथे आज्ञा जे, मागील शाहास न राहता साष्टीस निघोन जावें. त्याजवरून तेच क्षणी निघोन गेलो. ते रेवदंडेच्या बारेवर साष्टीचे वर्तमान कळलें, त्यामुळें परम क्लेष जाहाला तो कोठवर ल्याहावा. तीर्थस्वरूप अरमारसुधा इंग्रजाची गांठ पडोन जुंज होत होत झोंबी मालवणांत बाहीर गेले. आम्हावर साहा तरांडीं तिर्कती पाल येक ऐसी आलीं होती. त्यास नसयेत[1] व्हावी हा मानस सेवकाचा होता; परंतु आम्ही दमानाखाली होतो, यास्तव गाठ पडोन आली नाही. तूर्त गांठ घाल्लन नसयेत पोहचवावी हा लक्ष सेवकाचा आहे. सेवा होईल तो सुदिन. सर्व वर्तमान पिराजी हुजुरे सांगतां विदित होईल. सेवेसी श्रुत होय हे + विज्ञापना.

¶*Janrao Dhulap expresses his sorrow at the disaster of Salsette.*

---

१ नसयेत = शिक्षा. + यापुढील मजकूर निराळ्या वळणाचा असून बाळबोधींत आहे.

5880

No. 156] [5-1-1775

नकल

पौ छ ३ जिल्काद शुध शुक्रवार
अडिच प्रहर रात्र

श्री

सेवेसीं विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. तागायत छ २ जिलकादपावेतों वर्तमान येथास्थित असे विशेष. छ २९ सवालचें आज्ञापत्र सादर जाहालें तेथें आज्ञा कीं, साष्टीचे कुमकेस राजश्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल यास सालमजकूरचे नेमणुकेसिवाय पंचवीस हजार रुपये खर्चास देऊन बोलाविले. त्यास दोनतीनसें लोकांनसीं साष्टीस गेल्यावर तुम्हांस भेटून लागलाच निरोप घेऊन गेले. पूर्वीपासून सांप्रदाय सरकारकाम जेथें पडेल तेथें चाकरीस यावें ते यासमई न केले. यास्तव त्यांचे मनांतील भावगर्भ काय असेल तो बारकाईनें शोध करून, हुजूर लेहून पाठवणे म्हणोन आज्ञा. त्यास मशारनिलेची भेट जाहाली ते समई आम्हांजवळ निखालसपणें बोलिले कीं यासमई आम्हीं चाकरी बजाऊन दाखवावी तो प्रकार घडला नाहीं. अत:पर मागती साष्टीवर शह देऊन मसलत करावयाचा विचार घडला तर पत्रदर्शनी आपणाजवल येऊन दाखल होतों. येक साष्टीचा किला इंग्रजानें घेतला, तेणेंकडून आणिखी सरकारचीं स्थलें रेवदंडा व उंदेरी उरण याखेरीज आमची आहेत तीहि त्यास नजीक; आणि तोहि हांवभरी जाहाला आहे, यामुलें दुसरे ठिकाणास अपाय करूं पाहील. याजकरितां पुढील मनसबा कर्तव्य असेल त्याप्रमाणें सिध होय तोपावेतों, आम्हांस निरोप देऊन रवानगी करावी. आपले ठिकाणी गेल्यानें सरकारचीं ठिकाणे सनिध आहेत. तेथें लबाडी केल्यानंतर शेवा घडेलच. आरमार आपले सिध होऊन खांदेरीचे बाऱ्यावर ठेविलेच आहेत. सरकारचे आरमार आल्यावर त्याजबराबर होईल जाईल त्याप्रमाणें बोलणें जाहालें. त्याचाहि दूम खामखा टोपकर यास येक वेले तंबी पोंहोंचवावी असी उमेद बोलण्यावरून दिसते. मनांतील प्रकार कशानें समजेल? वरकड बोलणें किलाफी किमपि दिसत नाहीं. माणसाच्या मनांत काय आहे हें कलत नाही; परंतु आम्हांजवल निखालस आण-शफत वाहून बोलिले कीं श्रीमंतांनी आम्हांस आजपावेतों राखून वाढविलें, त्या घरासी दुसरा विचार चित्तांत आणिली तरी आम्हास ईश्वर आन देणार नाही. याप्रमाणें निखालस बोलून गेले; व त्याचें आरमार सरकारच्या आरमाराजवल येऊन पावले म्हणोन राजश्री विसाजी केशव याणी लिहिलें आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna reports there was nothing treacherous about the attitude of Raghoji Angria. He has avowed his intention of sending succour when efforts for the capture of Salsette will be renewed.*

5881

No. 157] *[Recd. 5-1-1775*

पौ छ १ जिल्काद सन
खमस

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक साष्टांग नस्कार विज्ञापना. साष्टीचा किल्ला इंग्रेजानें घेतल्याचें वर्तमान राजश्री विसाजी कृष्ण याणी लिहून पाठविलें तेंच पत्र पाठविलें आहे, त्याजवरून कळेल. जाहालें वर्तमान हें जाहालेंच. पुढें वरकड जागांचा वगैरे बंदोबस्त कसा काय करावयाचा ते आज्ञा जाहाली पाहिजे. साष्टीस राऊत व पायीचे लोक बहुत गेले असतां शत्रूनें दोन प्रहरा दिवसास किल्ला घेतला. याप्रकारें वर्तमान जाहालें. सेवेसी कळावें म्हणून लिहिलें असें. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶Naro Appaji writes the news received from Visaji Krishna about the capture of Salsette and solicits further orders regarding the defence of other places.

No. 158] *[6-1-1775*

पौं छ १८ जिल्काद

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक आनंदराव धुलप मुा जंजिरे विजयदुर्ग चरणावरी मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना. ताा छ ३ माहे जिल्काद पावेतों साहेबाचें कृपादिृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. हुजूरचे आज्ञापत्र छ २१ शौवालचे सादर जाहालें तेथे आज्ञा कीं अरमारसुधा साष्टी प्रांती जाऊन इंग्रजास तंबी पोंहाचवणें. त्यास आज्ञेप्रमाणे अरमार जंजिराहून साष्टीस छ २३ शौवाली तीर्थस्वरूप राजश्री जानराव काका निघोन गेले व सेवकहि निघोन गेलो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Anandrao Dhulap reports having started for Salsette with his fleet as instructed by the Peshwa.

No. 159] [*7-1-1775*

पौ १९ जिल्काद सूा खमस सबैन.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक चिमाजी माणकर कृतानेक विज्ञापना. तागाईत छ ४ जिलकाद-पर्यंत स्वामीचे कृपाअवलोकनेकरून शेवकाचें व राजपूर प्रांताचें वर्तमान येथास्थित असें विशेष. आज्ञापत्र छ १ जिलकादीचें रवाना तें छ २ मिनहूस भृगुवारीं अस्तमानीं पावलें. तेथें आज्ञा कीं प्रांत मजकूरपैकी दोनशें माणूस साष्टीस पाठवणें म्हणून पेशजी तुम्हांस सनद सादर जाहाली असतां कांहीं लोक गेले होते ते माघारें आले म्हणून विदित जालें. ऐशास साष्टी इंग्रजानें घेतली; परंतु शह सोडितां न ये, सबब राजश्री विसाजी कृष्ण व राजश्री विसाजी केशव यांसी आज्ञा केली आहे; तरी प्रांत मजकूरपैकी पेशजीचे सनदेप्रमाणें दोनशें माणूस सत्वर मशारनिलेकडे रवाना करणें; हैगय केल्यास परिछिन्न कार्यास येणार नाहीं म्हणून आज्ञा. ऐसियासी पेशजीचे आज्ञेप्रमाणें दोनशें माणूस पनवेलीस दाखल जालें. तेंच दिवशीं साष्टीकडील गुंता उरकला; यामुळें लोक सरसुभाहून माघारें तळोज्यापासून फिरविले. लोक येथें दाखल जाले तेंच दिवशीं आज्ञापत्र सादर जालें कीं शंभर माणूस सुवर्णदुर्गास रवाना करणें. यैसी आज्ञा येतांच शंभर माणूस सुवर्णदुर्गास रवाना केलें. हाली आज्ञा दोनशें माणूस साष्टीस पहिलें नेमिलें तें पाठिवणें. त्यासी शंभर माणूस सुवर्णदुर्गास गेले. शंभर नेमणुकेपैकी राहिले ते आज साष्टीस रवाना केलें. येथील भरणा आहे तो विदितच आहे. शत्रूचा शेजार हा मजकूर स्वामीचे ध्यानांत असवा. सांप्रत शामलाचे तर्फेनें आपाभट दामले म्हसेल्यास जदीद लोक ठेवितात, हा मजकूर सेवेसी मुजरत लेहून गेला आहे. जंजिरकर गलबतें भरून तयारींत आहे. मग काय मतलब हा समजत नाहीं. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Chimaji Mankar reports to the Peshwa that he has sent men to Panvel and Suvarnadurg as ordered.*

No. 160] **[7-1-1775**

पौ छ ७ जिलकाद. मुा
सन खमस सबैन
पौष मास.

श्रीभवानीप्रसन्न

सेवेसी विज्ञापना. तागायत छ ४ माहे जिलकाद वर्तमान येथास्थित असे विशेष. श्वामींचे पत्र आले तेथें आज्ञा जे साष्टीस पेशजी लोक रवाना केले होते ते किल्ला इंग्रजानी घेतला म्हणोन माघारे आले आसिले तर त्यास राजश्री विसाजीपंत याकडे पाठविणे म्हणोन; तर आमचे लोक फिरून आले नाहींत. आम्हास येथें साष्टीचे वर्तमान कलले. त्यावरून स्वामींच्या पत्रापूर्वींच माणूस लोकाकडे पाठविले आहे कीं तुम्ही फिरोन याल तर न येणे. राजश्री विसाजीपंत याकडे जाणे. ते सांगतील त्याप्रमाणें वतर्णूक करणे. आमचे लोक उगेच येणार नाहींत. हजार लोकापैकीं बाकीचे लोक आणाखी रवाना करावयासी आज्ञा केली. त्यास सुवर्णदुर्गास आमचे लोक गेले आहेत. वरचेवर लोक रवाना केलेयानें निभाव पडणार नाहीं. त्यास लोकांची समजाविसी पाहून रवानगी करून देतो. खर्चाचा जाबसाल पेशजी स्वामीस लिहिला होता त्याची विनंती राजश्री सदाशिबपंत याणी केलीच असेल. बंदोबस्त करून देणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer reports having sent back his men to Visaji Krishna as ordered.*

No. 161] **[8-1-1775**

श्रीराम

श्रीमंत राजश्री तात्या
सेवेसी

सेवक बापूजी सिंदे मुा जंजिरे वसइ विज्ञापना. ताा छ ९ माहे जिलकाद पावेतो सेवकाचे व जंजिरे मजकूरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. इंग्रेजाची तरांडी मोठी व वोतिले माहागिऱ्या मिलोन सेसवासे बाऱ्यावरी आली आहेत. सुरतेहून पायेमार्गे पांच हजार गाडदी व च्यालीस तोफा व हजार स्वार निघोन किले पारनेरा येथे आले, दरमजल येतच आहेत. याजकरिता त्याचे शहास हुजरून फौज वख्तसीर व कोली जवार वगैरा संस्थाने मिलोन इंग्रेजाचे फौजे-भोवती जालपोल केलियासी इकडे येणार नाही; आणि इकडे तूर्त आठदाहा

तोफा व बाण लडवई सरंजाम व तीन हजार गाडदी वगैरा पाईचे माणूस व दोन हजार राऊत चांगले तूर्त त्वरेने बेगासनीप येऊन पोहचलेयासी उपराला हिंमत अधिक होईल. येथील लोकास सालमजकुरी हाली येक रोजमरा पावला आहे; बाकीचे ऐवजाविसी लोक हैराण आहेत. याजकरिता बाकीचा लोकाचा ऐवज रुपये हुजुरून रवाना करावयासी आज्ञा केली पा. टोपीकर शत्रू दगलबाज. युध्यप्रसंगसमये लोकास रोजमरे दिल्हे पाहिजेत. ऐवज येऊन पोहचे तो अर्थ करणार स्वामी समर्थ आहेत. तालुके तालुकेयाचे अरमार झाडून सरंजाम सामानसुधा तयारी जलदी करून वसईचे बाऱ्यावरी यावयासी निक्षूण आज्ञा केली पा. अरमारासिवाये टोपीकरास तंबी पोहचणार नाही. जंजिरे मजकुरी किल्यावरी तोफा सरंजाम आहे; परंतु गोलंदाज कमी आहेत. टोपीकरासी लडाईची गाठ प्रथम तोफाची पडेल. याजकरिता गोलंदाज आा शंभर व बाणदार दाहा लौकर रवाना करावयासी आज्ञा केली पा. व कामाठी पा आज्ञा केली पा. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Bapuji Sindia reports the news of fresh English contingents being sent from Surat and proposes measures to resist them. Request is made by the writer for money to pay off the arrears due to the army.*

No. 162] [*9-1-1775*

पौ छ १० जिलकाद
सन खमस सबैन

श्री

राजश्री बालाजी पंत
गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपणांकडोन कागदपत्र येऊन संतोष वृत्त कलत नाहीं, तरी ऐसें न करावें. निरंतर पत्र पाठऊन सानंदवीत जावे. यानंतर खासा स्वारी साष्टीचे कुमकेस होऊन पुन्हां स्वस्थलीं येणे जाहालें, याचें परस्परें कललेच असेल. इकडील बंदोबस्ताकरितां राजश्री विसाजीपंत बिनीवाले यांहीं रवाना केल्यावरून येऊन बंदोबस्त करविल्याचें सविस्तर राजश्री माहादाजी प्रभु आपणांपासीं बोलतील. सांप्रत प्राप्त प्रसंगानरूप स्वामी सेवा होऊन यावी हाच दढोत्तर विचार आहे. राजश्री विसाजीपंत बावाचें मानस आधी रेवदंडा उंदेरी येथील बंदोबस्त करावा;

5885

व शामलानी गडबड मांडली आहे तेव्हां कोणता अर्थ करावा? श्रीमंतापासीं कोण काये समजावीत आसतील तें न कले. आपणांस कलावें म्हणोन लिहिले आहे. रवाना छ ६ माहे जिलकाद. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Raghoji Angria informs Nana Fadnis of his desire to execute faithfully whatever duties were entrusted to him.*

No. 163] [*9-1-1775*

पौ छ १० जिलकाद नकल

सन खमस पौष मास

सायंकाल

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण व विसाजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ ६ जिलकादपावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. आज्ञापत्रे राजश्री बालाजीपंताबराबर सादर जाहाली ते पावली. इकडील मजकूर साष्टी गेल्याचा मजकूर विदित जाहलाच आहे. शत्रूस नतीजा पोहचोन गेले स्थल फिरोन घ्यावे हाच * * * * * * * टोपीकरासी समध * * * * * * तरच टोपीकराची खातरजमा होऊन काम होईल. मईदानची लडाई आसती तर जी फौज स्वामीनी रवाना केली तेच काम करते. पाण्यामुले रावतास पेच, पाईचे लोकाचे काम फार, पुढे मोर्चेबंदीस वगैरे साहित्य असावे, त्याची याद यथाज्ञाने लिहून सेवेसी पाा आहे; व इकडील माहितगारी राजश्री बालाजीपंतास केली; व गोविंदपंत हशमनीस माहीत मर्द माणूस पाा आहेत; सर्व निवेदन करतील. स्वामीनी शत्रूचे पारपत्य सेवकाचे हातून करवावे. या कामास जिवापारते श्रम करू, ही उमेद फार आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*"Salsette was lost because the cavalry could not act with effect in a country surrounded by watery marshes. Had it been a land-fight, these very men would have been quite enough to defeat the enemy," say the writers—Visaji Krishna and Visaji Keshav.*

No. 164] [*9-1-1775*

पैवस्ति छ १० जिल्काद.

सन खमस सबैन पौष नकल

मास सायंकाल

श्री

सेवेसी साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल तागायत छ ६ जिलकाद-पावेतों यथास्थित असे विशेष. राजश्री बालाजीपंताबरोबर पत्र पाठविलें तें पावलें

व मशारनिलेनी मुखजबानी स्वामीनी सांगितल्याप्रमाणें सविस्तर सांगितलें. ऐशास साष्टीचा शह सोडीत नाहीं. वसईचा उपराला चांगला करितों. पुढील कर्तव्यता पकी येत निचय करून धनीपणा करून जे येतील त्याचे आज्ञेंत रात्र-दिवस जपोन सेवा करून दाखऊं; नाना विचारें करून विनंती लिहिली आहे. लस्करचा जाबसालहि साष्टीस गेल्याचा कलोन आला असेल, अगर येईल. सविस्तर मजकूर राजश्री बालाजीपंत सागतां विदित होईल. लस्करचे विचारे पका विचार करावा. कचेपके सविस्तर मशारनिले सांगतील तें अर्थ वेगले बसून समजावे. दुरंदेसी करावी. मोठेपण कोणास नको असें नाहीं; परंतु सरकारचें काम होय आणि आपलें मोठेपण जतन होय, असी गोष्ट समजल्यास नकोसी नाहीं; परंतु आतां धंन्यावांचून दुसऱ्याचा येथें परिणाम नाहीं. राजश्री विसाजीपंत इकडील माहित. त्यास त्याच्या गला येक वसई बांधिली आहे. मीं तो इकडील गैर-माहित, याजकरितां धण्यावाचून सेवट व्हावयांचा नाहीं; हें आज आपल्या प्रत्ययास यावयाचें नाहीं; परंतु परिणामी प्रत्ययास येईल. बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*The writer probably Visaji Krishna depicts the disorganised condition of Maratha forces at Salsette and asks for some important personage to come and control the situation.*

No. 165] [*10-1-1775*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक बाजी गंगाधर मौ किले बेलापूर चरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ७ माहे जिलकादपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून किले मजकुरचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. हाली साष्टीचे बातमीस शिपाई कारकून पाठऊन बातमी आणावी तरी त्यांचा प्रवेश होत नाहीं. याजकरिता शुकुरवारी गुजराथी वाणी येथून मुजरद बातमीचे कामास पाठविला. कळव्याचे मार्गे गेला. तेथे कोलियाचे होडींत बसोन पलीकडेस संपालचे बंदरी जाऊन लागला. तेथे गेलियावर त्याची चौकसी करावी, कोठून आला कोठे जातो, ही कोणी केली नाही. शनवार, रविवार, सोमवार, तीन दिवस तेथे होता. आवघे शेहरांत फिरोन तेथील मजकूर सविस्तर पाहिलान. इंग्रजाने मोरचेबंदीस सरंजाम आणिला होतान तो झाडून गलबते भरून तोफा वगैरा दारूगोळे होते ते नेलेन; व हाली राहिले साहिले नेतच आहे. सरकारचे भात किल्यांतील कोठ्या भरल्या होत्या ते रविवारापासून भरून नेत आहे. ढोरे म्हसरे

शहरामध्ये विप्रमंडलीची वगैरा रयेतीची बहुत होती त्यांचा फार करून तो नाशच केलान. काही राहिली आहेत ती सापडतात, त्याप्रमाणे गलबतांत घालून मुंबईस रवाना करितो. किला मारगिरीने जायां जाला आणि गवाक्ष पडोन मोठा मार्ग जाला आहे. तेथे साहीली सोव्यांचा मेढा तूर्त घातलान आहे. किल्याचा मारगिरीने थोडा चुना पडला आहे तेथे मजूर लाऊन चुना धोंडा निवडून वेगळाल्या रासी करीत आहे. अद्यापि बांधावयाचे काम लाविलेन नाही. दोन मातबर माणूस सास्टीचे बंदोबस्तास आले आहेत. येक किल्याचे व येक मुलकाचे, दोन मुख्य मुंबईहून आले. किल्यांत माणूस तीनशे साडेतीनशेपावेतो आहे. बाहेर शहरांत दीडशे माणूस आहे. जागे येणेप्रमाणे लोक असामी सुमार :

थोबानची पेढी रस्त्यांत रोज्याजवल किल्याचे दक्षण भागी आहे तेथे चवकीस लोक आहेत. आा
७५

श्रीकोपनेस्वराचे देवालयाजवळ दारूगोळी वगैरा सरंजाम होता तो नेलान; परंतु तेथे चवकीस लोक होते ते आहेत. आसामी सुमार
१५

चेंदणीत चवकीस सिपाई आसामी दोन
२

फते बुरुजावर लोक आहेत आसामी
१५

सरकारचे वाड्यांत जखमी लोक आहेत तेथे चवकीस लोक आहेत आसामी सुमार
२०

संपालचे कोठीजवल चवकीस आहेत. लोक आसामी सुमार
४

बंदरावर रिबेरीत चवकी आहे, सिपाई आसामी च्यार
४

बंदरावर मांडवी आहे तेथे चवकीस आहेत. सिपाई पांच
५

सदरहूप्रमाणे दीडशे माणूस किल्याबाहेर आहे. याखेरीज घोडबंदरास दीडशे माणूस गलबते भरून शनवारी मुंबईहून गेले. राऊत उतरून पलीकडेस जावयाचा मार्ग आहे. तेथे दमदमा रचून तोफा ठेवावयाचा मजकूर केला होतान; परंतु तेथे दमदमा रचला नाही व तोफा होत्या त्याहि नेल्या. सरकारचे भात शहरांत फडावर होते ते माहागिऱ्या भरून नेत आहे. गावांत रयतीची वस्तभाव आहे ती भलत्याची भलत्याने न्यावी. दाद फिर्याद नाही. कोणी फिर्याद गेला तरी मालधन्याचेच पारपत्य करतो. मरोळचा बाजार शुकुरवारी भरला होता तो पारशानी व सिपाई लोकानी लुटून टाकिला. यांप्रमाणे तेथे बंदोबस्त आहे. चकाकडील

तिन्ही बुरूज थोस आहेत; तेथे वस्ती नाही. किला घेतलान; परंतु भरवसा नाही. घाटावरून फौजा व गाडदी सास्टीचे वेव्यास येतात, या धास्तीने रयेत वाणी वगैरा शहरांत आहेत ते, थांगा पाहून जात आहेत- इंग्रजाचा भरोसा रयेतीस काडीइतका नाही. याप्रमाणे बातमी वाणी आला त्याणे सांगितली. धुलपांचे अरमार मुंबईचे नस्तावर आले या सलाबतीनें मुंबई शहरांतील लोक कोटाबाहेर आहेत. त्याणी तमाम वस्तभाव कोटांत नेली आणि फार गडबडले आहेत. कोटांत मोठे मोठे गुजराती वगैरा वाणी उदमी आहेत ते वस्तभाव गलबते भरून, ज्याची जसी सोई आहे त्याप्रमाणे सुरतेस दिवास वगैरा जागा न्यावयाचे तरतुदीत आहेत. गलबते बंदरात भरून सिध होत आहेत; परंतु वलाव्याखेरीज ती गलबते जाणार नाही. पूरवी येक दुसरे गलबत वलाव्यास दिल्याने कार्यास येई. आता धुलपांचे सलाबतीनें वलावा चांगला पाहिजे तो द्यावयासी इंग्रजास प्रस्तुत सोई पडत नाही. तेव्हा तेथील साहुकार लोक पेचातच आहेत. तेथे सर्वांचे मते मुंबईत राहाणे होत नाही; आणि इंग्रजहि आपले जागा फारच हलकलला आहे. धुलपांचे अरमार आले व फौजा गाडदी येतच आहेत, याची सलाबत फारच पडली आहे. हाली मुंबईस बातमीकरिता शाहाणा माणूस पाठविला आहे. तेथून येथास्थित बातमी आलियावर सेवेसीं लेहून पाठवीन. राजश्री विसाजी कृष्ण व राजश्री विसाजी केशव कल्याणनजीक तीन कोस मुकाम करून आहेत, त्यांचे भेटीस गेलो होतो. तेथे राजश्री बाळाजीपंत ठोसर हुजुरून आले त्यांचीहि भेट जाली. मारनिल्हे बाळाजीपंत व राजश्री गोविंद हरि गोखले सेवेसी आले आहेत, ते येथील सविस्तर वृत निवेदन करितील; व मोहिमीवर सरदार आले आहेत त्याचेहि पुढील तरतुदीचा मजकूर सविस्तर श्रुत करितील. राजश्री विसाजी केशव इंदुवारी निघोन कल्याणास गेले. तेथून वसईस जातील. किले येसवंतगडास इंग्रजाचे शंभर माणूस व येक इंग्रज कपितान आहे. सरकारचे लोक किल्याचे हल्यासमई कोटांत राहिले होते. त्यांची आणभास करून घेतलीन कीं तीन वरशे इंग्रजावर तरवार धरू नये. याप्रमाणे आण करून, दर आसामीस नख्त दोन आणे व येक सेर तांदूल देऊन, लोकास निरोप दिल्हान. किले बेलापूर येथील कुमकेविसी राजश्री विसाजी कृष्ण यास लिहिले. त्याणी सुधागडकरी लोक आसामी १०० शंभर पाठविले होते ते किल्यापासून अर्ध कोश पलीकडेस होते. त्यास किल्यात बलाविले; परंतु त्याची सोई यावयाची पडली नाही. दोन रोज होते; तिसरे दिवसी येथून पळोन परभारे विसाजीपंताकडेस न जाता भोरपेस गेले. नंतर विसाजीपंतानी दोनशे राऊत पाठविले ते किल्यापासून दीढ कोश पलीकडेस राहिले. तेहि किल्यात येत नाही; आणि रयेतीस उपद्रव बहुत करू लागले.

समई कुमकेस उपयोगी पडतील याअर्थ राऊत आणावे तरी त्याचा प्रकार दीढ कोश पलीकडेस. तेव्हा विचार कलतच आहे. आणि रयेतीस दंगा; याजकरिता आजच त्यांस लस्करांत जावयासी निरोप दिल्हा. आम्ही गेलो तेव्हा लोकाविसी विनंती केली आहे. दोनशे दीढशे माणूस पाठवितो म्हणोन रा। विसाजी कृष्ण याणी मान्ये केले आहे. येईल तेव्हा खरे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Baji Gangadhar sent a special man to Salsette to obtain correct news and furnish it to the Peshwa. The news is that the English have posted guards at the chief centres of the place and are sending back to Bombay the remaining men and ammunition and also the spoils from the fort. Both Visaji Keshav and Visaji Krishna have encamped some six miles away from Kalyan. Bombay is in a state of panic since the arrival of the fleet of Dhulap. Maratha soldiers taken prisoners in the last attack were let off by the English on condition that they would not take up arms against them at least for three years to come.

No. 166] [*10-1-1775*

पौ छ ९ जिलकाद सन
खमस सबैन दाहा घटका
दिवस प्रातःकाल

बंद दोन

श्री

श्रीमंत राजश्री नाना साहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक पिराजी भिलारे खिजमतगार मो किले उंदेरी चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना. ता। छ ७ जिलकादपावेतो साहेबाचे कृपेकरून येथास्थित असे. गनीम जंजीरकर शामल येऊन, च्याली(स) गलबतानसी येऊन बाऱ्यावरी किल्याचे दाखल जाहाला. अरमार इतके दिवस खांदेरी उंदेरी कुलाब्याचे बाऱ्यावरी होते, ते नाट गेले. कोणीकडे गेले त्याचा शोध नाही. गनिमास सुसाट सांपडले. येथील भरती याचा विचार धन्यास सर्व ठाऊक आहे. बंदीबस्त तरी चागला. दारू गोला जकिरा सामान लोकाचा दिलदिलासा रोजमरेयाची वांटणी सर्व येथास्थित जाहाली आहे. 'सावकारी ऐवज उभयेंतानी या समई काढून वाटणी केली. भात विकत नाही. लोकाचा भरणा नाही. जंजिरे जागा अश्या जागा भरणा सासे सातसे माणसाचा निदान असावा. मजला राजश्री दादोपंत सुभेदार याजबा रवाना साष्टीस केले. त्यास तेथील प्रकार तसा जाला. तिकडून निघोन रेवदंडा व उंदेरीचे देखरखीस आलो.

उदेरीहून गलबत घेऊन धुलपाचे अरमारावरी गेलो होतो. राजश्री जानराव भेटले. त्याही कागद दिल्हा तो पा। आहे. आज धुलपाचे अरमार तीन दिवस नाट जाले. कोणीकडे गेले न कले. इतर तालुक्याहून लोक आणवावे तरी सारे तपसील ज्याचे तेच लावितात. राजश्री दादोपंत सुभेदार याही साठ माणूस सारे पा। आहे. काही आत (आज?) आले, काही उद्या येणार. गनीम तर येऊन टेकला. जंजिरे जागा आत भरतिया असावा. यास्तव रातचा दिवस करून, चिरंजीव देवजी भिलारे यास * * * ज तीनसे माणूस देऊन आत किल्यात येऊ * * चा दिवस करून लोक येऊन पोचत ते करणार धनी आपण आहेत. दोनसे राऊत बाहेर तडीस उपराळ्यास असावे. पाचसे माणूस चांगले बरखंदाज मर्द माणूस खातरजमेचे असे आधी आधी रवानगी करावी. गनीम भारी, जाग्यात लोक कमी, बरचिला जाग्याहून कुमक येऊन पोचणे कठिणच गोष्ट आहे; व पाच हजार रु॥ रोख धन्याने पाठवावे. येथे सावकारी ऐवज उभयेतानी काढून वाटणी केली आहे. कोणी सावकार पैसा देई(सा) नाही. वरातील सर्व भरीस घातले. यास्त [पुढील बंद गहाळ.]

¶*Piraji Bhilare to Nana Fadnis, writes about the condition of Underi and asks money and reinforcements for its defence.*

No. 167] [*10-1-1775*

पौ छ ११ जिलकाद सु॥

खमस तैय

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विसाजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ ७ जिलकादपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाहालें तेथें आज्ञा. राजश्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल यांस सरकारातून साल मजकूरचे नेमणुकेसिवाय पंचवीस हजार रु॥ खर्चास देऊन, साष्टीचे कुमकेस जाण्याची आज्ञा केली. त्यास साष्टी गेल्यावर दोनतीनसें लोकानिसी येऊन लागलेच माघारे गेले. सरकारांत कामकाज पडेल तेथे त्याणी चाकरीस यावे ऐसा त्यांचा करार असतां साष्टीस चाकरी केली नाही. यास्तव त्यांचे मनातील विचार काय त्याचा बारकाईने शोध करून लेहून पाठवणे म्हणौन

आज्ञा. त्यास मारनिलेकडील कारकून आला होता त्याजवर रागे भरोन बोलाविले आहेत. मनातील विचार चाकरीचे अंती कलेल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

हे विज्ञापना.

¶*In reply to Peshwa's order asking him to enquire as to why Raghoji Angria did not render any material help at Salsette though ordered to do so, Visaji Keshav says that his clerk had been sent for and that he would report what he says.*

No. 168] [*10-1-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री विसाजीपंत दादा

स्वामीचे सेवेसी

पो विसाजी केशव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान छ ८ जिलकाद येथास्थित आसे विशेष. आज्ञा घेऊन निघालो ते दुसरे दिवसी वसईस पावलो. आज मंगलवारी संध्याकाली च्यार घटका दिवस आसता इंग्रजी तरांडी थोर सात व मध्यम प्रत व लाहान प्रत साठपर्यंत येऊन वसईचे बाऱ्यावर नांगरवाडा केला. संध्याकाली इशारती तोफ येक मारावी ते न मारिता तीन तोफा मारिल्या त्या इशारतीवर बेसाव्याच्या दोन जाहल्या त्या होताच साष्टीच्या दोन जाहाल्या. त्याजवरून वसईच्या पाच केल्या, तेव्हा काही दगाबाजी आहे यैसे दिसते. त्यास हशमी माणूस जे जमा जाहालें आसेल ते, व कांगोरीकर व गाडदी यैसे झाडून पत्रदर्शनी पाठऊन द्यावे; व राऊत मानासिंग खलाटे वगैरे पागा आसतील त्या झाडून पाठवाव्या. दोनसें राऊत आपणाजवल ठेवावे. जागा जागा राऊत पा। आहेत ते जमा करावे. राघो नारायेण दोनसे माणूस घेऊन पणवेलीस आले आहेत. त्यास लोकसुधा इकडे पा।. हे जागा मजबूत जाली पा।. घडीचा भरवसा नाही. रावतास दोन दिवसानी पोहचावे यैसी ताकीद करावी. पाईचे माणसाबो नारोपंत राजू, भास्करपंत, त्रिबकपंत मराठे यास पा। द्यावे. येक माणूस पाईचे आपणाजवल ठेऊ नये. जागा जागा गेले ते आणवावे रा। मंगलवार दीढ प्रहर रात्र हे विनंती.

¶*Visaji Keshav hears some unaccountable gunshots and suspects treachery from the English round about Bassein, and requests Visaji Krishna to despatch fresh contingents.*

श्रीशंकर

सेवेसी सिवाजी विठल साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा छ ७ माहे जिलकादपावेतो मुकाम वज्रजोगणी प्रांत वसई सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपा करून छ २ जिलकादचे पत्र पाठविले ते छ ७ जिलकादी संध्याकाली मुाा मजकुरी पावले. लिहिला मजकूर सविस्तर कलला. यैसियासी राजश्री विसाजीपंताची व तुमची लस्करातून कोकणात रवानगी जाहाली. त्यास मारनिले वसईस येऊन पोहचले. तुम्ही अद्याप येत नाहीं म्हणऊन लिहिले. त्यास आमच्या अगोदर पांच दिवस राजश्री विसाजीपंत पुढे आले. आमची रवानगी तुवरखेड्याकडे माधवराव बांडे याणी मवासगिरी करून गडीत राहिले होते करिता पाठविले; त्याचे पारपत्य करून गडी सर करून त्याच्या मागाहून पाचवे दिवसी मार्गषीर्ष वद्य अष्टमीस सोमवारी राजश्री बापूचा व राजश्री नानाचा निरोप घेऊन निघालो, ते दरकूच लांबलांब मजला करून, धोडप उजवी टाकून भोगुरावरून तलघाटाने मुकाम मजकुरी आलो. येका दो दिवसी राा उभयेतां विसाजीपंताची भेट जाहाल्यावर त्याच्या विचारे होईल त्याप्रमाणे सेवेसी लिहोन पाठऊ. आपण लिहिले की वसईस जावे व राजश्री उभयेता तो कल्यां(णा)सच आहेत. येथेच आज मुकाम करून उभयेतास पत्रे पाठविली. ते लिहितील तिकडे जाऊ. दोनी शहाजवलच आहोत. हा मध्य आहे. बारा कोस वसई, बाराच कोस कल्याण आहे. संध्याकालपावेतो पत्र येईल तिकडे जाऊ. इकडील मनसबियाचे माहितगिरीने राजश्री विसाजीपंत उभयेता लिहीतच आसतील त्यावरून सर्व कलत आसल. आम्हास काये ? सरकारआज्ञा मात्र प्रमाण. आम्ही तापीतिराहून नानाची व बापूचे आज्ञेवरून निघालो तो तेथे साष्टी आगोधरच घेतली. आसो ; स्वामीचे पुणेकरून फिरून घेऊ ; चिंता नाही. सर्वांची येकवाक्यता व सरंजाम पायेदलाचा आसला म्हणजे सर्व होईल. फौज काम करील चिंता नाही. सरकारची पत्रे मात्र वरचेवर येत आसावी. मनसबा करणे तो माहित व येखत्वी आसतील ते सांगतील ते सर्वानी करावे. आमचे बराबर रायाजी पवाराचे पथक व राघोजी पठारे पागा व लक्षुमण त्रिंबक पागा आहेत. राजश्री आपाजी हारीस आमचेच बराबर (अपूर्ण)

¶*Shivaji Vithal writes to the Peshwa, explaining why he was aeiayea in going to Konkan along with Visaji Krishna. He was sent against Madhavrao Bande, he says and arrived as soon as possible,*

No. 170] [14-1-1775

पौ छ २९ जिल्काद
सन खमस सबैन
पौष मास.

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना साहेबांचे सेवेसी

विनंती सेवक येशवंतराव म्हसके नामजाद जंजिरे विजयदुर्ग कृतानेक दंडवत विज्ञापना. तागाईत छ ११ जिलकादपर्यंत साहेबाचे कृपेंकरून सेवकाचें व जंजिरे मजकुरचें वर्तमान यथास्थित असे विशेष. हुजुरून छ २० सवालचें आज्ञापत्र सादर जाहालें तेथें आज्ञा जे. राजश्री गंगाधर गोविंद मामलेदार हे व तुम्ही येकविचारें राहून लोकांस दिलदिलासा देऊन खबरदार राहाणें. गनीम आल्यास त्याचें पारिपत्य होय तें करणें; मारून कापून काढणें म्हणोन आज्ञा. त्यास जंजिरे मजकुरीं लढाईचें सामान चांगलें करून खबरदार आहो. मशारनिले व आम्ही सर्व लोक येकविचारें आहों. गनीम टोपीकर हावभरी जाहला आहे. लबाडी करावयासी चुकणार नाहीं, हें खरेंच; परंतु येथें आम्ही सर्व लोक येकदिल आहों. गनिमास नतिजा द्यावयासी चुकत नाहीं. आजपर्यंत साहेबांचें अन्न भक्षून निष्टेनें सेवा करीत आलों. त्याचें सार्थक करून दाखवावें. धण्याची कृपा होऊन उर्जित करून घ्यावें हेंच मानस आहे. कोणे गोष्टीचा वसवसा धरीत नाहीं. सरकारकाम करावें यापेक्षां दुसरी जोड किमपि नाहीं. राजश्री गंगाधरपंत सुभेदार यांणीं सविस्तर लिहिलें असेल त्यावरून श्रुत होईल हें विज्ञापना.

¶*Yashvantrao Mhaske assures Naropant Nana of his readiness to execute the Peshwa's orders and defend the place against the English.*

No. 171] [7-1-1775

पौ छ २१ जिल्काद
सन खमस सबैन.

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी गोसावी यांस

विनंती उपरी तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. साष्टी इंग्रजानें दोन प्रहरीं हला करून घेतली येविसी विसाजी कृष्ण याणें * * * ले ते पाठविले ते पावले. त्याजवरून सविस्तर मजकूर कळों आला. फौज व लोकभरणा

भारी असतां हे गोष्ट जाहाली अपूर्व आहे. जाहाल्यास उपाये काये ? याजउपर विसाजी कृष्ण वगैरे पथके याणी साष्टी भोवताली जालपोल करून, सामान आंत जाऊं देऊं नये. शह त्याजवर असों द्यावा. याजउपर वसई व विजेदुर्ग याजवर तोंड टाकील यास्तव तेथील बंदोबस्त असला पाहिजे; तर तेथील बंदोबस्तास फौज व आपाजी हरि यांजबरोबरचें माणूस आहे त्यास जेथें ठेवावयाचें असेल तेथें ठेवणें. अरमारी याजकडून मुंबईस शह द्यावी. जालपोल करवावी. त्याचा पिछा साष्टी घेतली म्हणोन सोडूं नये. दुसरे लोक व फौज़ रवानगी करावयाची आहे तीहि करितो. साष्टी गेल्यामुलें (सर्व) सोडावयाचें नाहीं. साष्टीभोंवताली फौज वगैरे ठेऊन बंदोबस्त करणें. विजेदुर्गास पांचसें माणूस आपाजी हरि याजबराबर देऊन, तिकडे रवानगी करणें व बेलापुरास हुजूरचे लोक बापूजी हरि याजबराबर गेले आहेत ते तेथें ठेवणे. वसईस विसाजी केशव आहेत त्याजवल सिवाजी विठल फौजसुधां व अनखीं पाईचे माणूस भरतीस द्यावे. विसाजी कृष्ण यानी परासिकाजवल लोक वगैरे ठेऊन, बंदोबस्त करावा. व कलव्यापासून बेलापूरपर्यंत फिरती स्वारी राखावी; व कल्याणची भिवंडीची बंदोबस्ती लोक पाठऊन करावी. रेवदंडा व उदेरीची भरती करणे. जाणिजे. छ ४ जिल्काद सुा सन खमस सबैन मया व अलफ. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब भडोचेकडे इंग्रजाचे विद्यमाने करून येणार असी बातमी आली आहे कळावें. साष्टीसिवाय दुसरे येकाधे जागा इंग्रज अथवा फिरंगी गला पडूं लागल्यास तेथेंच सारी कुमक नेणे पडेल, याअन्वयें तर्तूद असावी हे विनंती.

¶*The Peshwa expresses his regret at the capture of Salsette by the English and issues orders to Visaji Krishna to be on the alert to defend the surrounding country and harass the enemy.*

No. 172] [*14-1-1775*

पौ छ ११ जिलकाद सुा खमस
सबैन पौष

श्री

सेवेसी गोपाल गंगाधार चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ६ जिल्कादपर्यंत मुाा कुलाबा येथें स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान येथास्थित आहे विशेष. सेवक कुलाब्यास पावल्या आगोधर दोन दिवस राजश्री जानराव रेवदंड्याचे बाऱ्यावर तिही पालानसी होते. ते इंग्रेजाची सात तरांडी मातबर अंरमारावर आली. त्याजवरी मारामार होत होत बाहीर नाटे[१] गेले.

१ समुद्रावर निघून गेलें.

त्याचे कुमकेस राजश्री कृष्णाजी धुलप वरकड आपले व राजश्री सरखेलींचे यैसे अरमार घेऊन वसईचे बान्यावर इंग्रेजाचे बातमीकरितां गेले होते. तेहि येऊन नाट गेले. च्यार पांच दिवस त्याची वाट पाहोन समाच्यार माहागिऱ्या पाठऊन रोजचे रोज बातमीस आणितां कोठे थांग न लागे. तेव्हां आज बाहीर निस्तावर भांडी जाहाली म्हणौन त्या सुमारानें माहागिरी घेऊन गेलों आहे. राजपुरीचे हबशाने पंनास पचावन गलबतें सामान सरंजाम पोख्ती सिपाई यांची भरती करून मुंबैस निघोन गेला. न कले मनसबा काय आहे तो. जाहालें वर्तमान सेवेसी कळावें म्हणौन लिहिले आहे. श्रुत व्हावी हे विज्ञापना.

¶*Gopal Gangadhar reports a naval skirmish between the English and Janrao Dhulap. "The Sidi of Rajpuri has made every preparation and left for Bombay," adds the writer.*

No. 173] [*14-1-1775*

पो छ १२ जिलकाद

खमस.

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. ताा छ ११ जिलकाद. पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. आज्ञापत्रें छ ९ जिलकादचीं खास जिलीबीच्या माणसांबाा सादर जाहालीं व छ १० जिलकादचें डांकेबाचे ऐसी तीन पत्रे सादर जाहालीं, ती छ मजकुरी दोन प्रहरां च्यार घटिकांचे अंतराने येऊन पावली. तेथे आज्ञा कितेक प्रकारचे बंदोबस्ताचा मजकूर व श्रीमंत राजश्री दादासाहेब गुजराथ प्रांते आले, पाठीवर मातबर फौजा सिंदे होलकर व राजश्री हरिपंत फडके जात आहेत. सिंदे होलकर यांच्या व हरिपंत यांच्या भेटी जाहाल्या कलावे म्हणून आज्ञा व उंदेरीस शामल तयार होऊन आला म्हणून पत्रे आली त्यावरून तेथील बंदोबस्त करण्याविसी आज्ञा. त्यास, आज्ञेप्रमाणे उंदेरीस पाईचे माणूस शंभर व स्वार शंभर दीडसे पाठवितो. कोलवणचे बंदोबस्ताचा मजकूर राजश्री विसाजी केशव यांसी पत्रें लिहिली होतीं की इंग्रेजाची तरांडी लाहान मोठी साठ वसईचे नस्तावर आली होती, तीं सुरत भडोज येथें जात असेल, हा उलेख पत्रीं लिहिला हेच खरे असेलसे दिसते. कोलवणचा बंदोबस्त चार च्यार किले वसई तालुक्याचे आहेत. तेव्हां तिकडील बंदोबस्त विसाजीपंत यानी केलाच आहे आणि नित्यानित्य खबरदारीत आहेतच. येक साष्टी तालुक्याचा भीरगड आहे तो आलीकडेच आहे. इंग्रेजाचे आरमार ज्यापक्षी दुसरीकडे गेले

तेव्हां वसईस कोणे गोष्टीचे भय दिसत नाही. फौजहि भरणा व पाईचे लोकांचाहि भरणा मातबर जाहाला आहे. येथून पांचशे माणूस कांगोरीकर पाठविले आहेत. याजकरितां कोलवणचा बंदोबस्त विसाजीपंतच करितील. आज्ञापत्रेंहि येविसी मारनिलेस सादर जाहाली आहेत; आणि आम्हीहि पत्रे लिा आहे. पुण्यास पांचशें स्वार मानसिंग खलाटे व हैबतराव शंकर वगैरे मिलो(न) पाठवावे म्हणौन आज्ञा. आज्ञेप्रो पांचशे स्वारांची रवानगी करितो. येऊन पावतील. आम्हा-जवल पाईचे लोकांचा भरणा नाही. फौजेपौ दीड हजार फौज आम्ही वसईस पाठविली. बाकी हजार बाराशे पौ पाचशे पुण्यास पाठवितो. कलावे खर्चास यैवज दाहा हजारांची हुंडी व व (दा)हा हजारांचे होन रवाना जाहाले म्हणौन पत्री आज्ञा; परंतु अद्यापि यैवज व हुंडी येऊन पावली नाही. मागाहून आल्यानंतर पावल्याचा जाब विनंतीपत्री लिहू. मुंबईकडील बातमीची पत्रें राजश्री बाजी गंगाधर यांजकडे आली तीच बजिनस सेवेसी पाठविली म्हणोन मारनिलेनी लिहिले, त्यास तेथील बातमी त्या पत्रांवरून निवेदन होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Visaji Krishna writes to Nana Fadnis about his own preparations for the defence of Bassein and adds that Bassein does not appear to be the objective of the enemy as their fleet cruising there sailed away towards Broach.

No. 174] [*15-1-1775*

नकल

श्री

तीर्थरूप राजश्री आबा वडिलांचे सेवेसीं

बालक गोविंदरायानें चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। पौष शु॥ १४ चतुर्दसीपर्यंत मुकाम सांवताची वाडी वडिलांचे आसीर्वादेंकरून क्षेमरूप असो विशेष. इकडील वर्तमान तरी पेशजीं फिरंगियाचे मोहिमेचा लेखन केला होता कीं विजयदुर्ग वसई येथें करावी तो प्रकार त्याची मागाहून जाहाजे थोर येणार त्यास्तव तूर्त अटकलला असे. दुसरें इंग्रजानें श्रीमंत राजश्री दादासाहेबांच्या सनदा साष्टीच्या आणून साष्टी घेतली; परंतु साष्टी इंग्रजासी लढत होती तो दो चौ रोजांत सांवताचे वकील याजला फिरंगी म्हणू लागला, आमची साष्टी वसई ऐसा प्रकार असतां त्याणे तेथें मन घालावें, येणेकरून आमचे त्याचे सख्य राहणार नाही. तेव्हां वकील बोलला जे आपण श्रीमंतांचे ये-समई कुमकच करावे. इंग्रजाचे पारिपत्य आपले मनांत करावें असे असेल तर

होऊन येईल, ऐसे जाबसाल जाले; परंतु त्यानें हामी भरली नाहीं. येथें वर्तमान लेहून पाठविलें कीं ऐसें इंग्रजाचें याचे आले असें. त्याजवरून येथून कारकून त्यांजकडे पाठविला असे. श्रीमंताचे साहित्यावर पडेसे असोन कार्यास येत असल्या त्यांचे मतलब घेऊन मागाहून लेहून पाठवितों. दुसरे वर्तमान फिरंगी व त्याचा सेनापति अडरेकर या उभयतांत पेच पडला असे. याचे कारण असे आहे की जिवबा सबनीस व अडरेकर याचें सख्य बहुत असे. याजला सबनीस यानीं आज दोन महिने राजकारण घालून सदासिव रामचंद्र यांची पत्रे फिरंगियास व अडरेकर याजला आणून दिधली आहेत कीं तुम्हीं वसई घ्यावी ऐशा सनदा श्रीमंत दादासाहेबाच्या देतो. कोणी भला माणूस मातबर येथें पाठऊन देणें. त्याजवरून अडरेकर याने राजियास सांगितलें कीं हे काम करावें, तेव्हां राजियाच्यानें काहीं नाहीं म्हणवेना. यांजसीं अन्युतर करावें तरी पुरतकाळी लेहून पाठविल कीं ऐसें करीत होतों याजला याने न केले. त्यास अडरेकर याणे नारायेण सेणवी माज्या तयार करून खर्चायास व पालखी सरंजाम देऊन रवाना केला असे. तो राजियाचा बहुत आप्त असे. त्याने सांगितले असे की अडरेकराने हें उपस्थित केलें आहे; तर हा वकील पेचांत पडेसें करावे. त्याजवरून वडिलांस हे पत्रलेखन केले असे; तरी त्या वकिलाचा शोध लस्करात आला तर उतम; नाहीं तर जेथें नाके तेथे चौकियांस ताकीद करून हस्तगत होय असें करावें. राजियाचे मनांत आहे कीं जो जाबसाल श्रीमंताकडील करणे ते तुमचे मारफातीने करावी. हे ग्रहस्त सिदियांचे, तेथे सिदियांची मातबरी भारी; तेव्हां याचे हातें आपले काम करीत जावें. दुसरे अडरेकर लटके मसलतींत पडतो हे उतम नाहीं. हा फजीत पाडला म्हणजे दुसरे कामांत मन घालणार नाहीं ऐसे प्रकार आहेत. हा वकील तेथे पेचांत या जाबसालाकरितां आणावा. लस्करांत वकील आला तर; नाही तर नाकेबंदी करऊन धरावा लागेल यास चुकूं नये. सनद वसईची श्रीमंत दादासाहेबीं दिधली तरी मग या राजियासुधां सर्वांस लढावयास जावें लागेल. या पेचांत आला म्हणजे सहजच सर्व राहिले. लस्करांत वकील नाहीं, तथापि आला तरी त्याजला जाबसाल दोन तीन आहेत. मर्दनगड तालुका आमचा घ्यावयासी कारण काय? सोडून द्यावा. आजपर्यंतचा वसूल द्यावा; दुसरा दांडी राजपुरी घेऊन देतों म्हणोन फिरंगियाने लाख रुपये घेतले असेत. राजपुरी काही घेऊन दिल्ही नाही. मधूनच फिरला. इंग्रजाने निशाण लाविलें म्हणाव त्यास ते स्थल माघारें मागावें हे जाबसाल आहेत. वडिलांस कलावें. गडींहि पत्र राजश्री नारोपंत नाना याजला लेहून पाठऊन वकील पुंढे न जाये तो प्रकार करिता येथून चुकला तरी पुढे तेथें चौकसी वडिलीं करावी.

5898

इंग्रजानें तर श्रीमंताची साष्टी घेतली. फिरंगी अनकूल जाला तर पाहात आहांत. मागाहून सत्वर लेहून पाठवितों. कळलें पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

येथील कितेक वर्तमान राजश्री नारायेणराव भास्कर याचा पत्रार्थावरून ध्यानास येतील. पत्र श्रीमंताची नावांची आहेत. कळले पाहिजे हे विनंती.

¶*The writer, one Govindrao, writes about certain developments in connection with some documents about Salsette issued by Dadasaheb in the name of the English which the Portuguese resented and complained about it to the Vakeel of the Raja of Savantwadi. The Vakeel promised that he would persuade Dadasaheb to transfer the documents to the Portuguese. The writer therefore requests the addressee to stop the Vakeel doing this.*

No. 175] [*15-1-1775*.

पौ छ १४ माहे
जिलकाद

श्री

राजश्री राऊ पंडित प्रधान
गोसांवी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नेहांकित राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल राम राम विनंती. येथिल कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेले पाहिजे. विशेष. स्वामींनीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. आपण राजश्री विसाजी कृष्ण यांचा निरोप घेऊन स्वस्थळास गेलां. आपण साष्टीस गेल्यापूर्वी इंग्रेजांनीं स्थळ हस्थगत केलें. त्यास साष्टीचा पिच्छा सोडावयाचा नाहीं म्हणोन कितेक विस्तारें आज्ञा. ऐशास स्वामींनीं लिहिलें तें प्रमाण आहे; परंतु साष्टीची मसलत होण्यास मास पक्ष लागेल, व शामल व इंग्रेज तयार होऊन उरण उंदेरी येथें जातो. निकडीची बातमी चहुकडून आली. आमचे जागे जंजिरे संनिध, बंदोबस्त येथास्थित जाहाला पाहिजे. यास्तव सर्व मतें विचार होऊन, आमचे स्वारीचें कूच होऊन, आमचें कूच होऊन अडीच तीन कोश लष्करा अलीकडे आली, तों इंग्रेजांस उरण दिल्याचें वर्तमान आलें. उरण घेऊन उंदेरीवर गेला हे बातमी कळतांच, रात्रीचा दिवस करून सारे लोक माघारें टाकून सडे स्वारीनें स्वस्थलास दाखल होऊन, उंदेरींत लोक पाठऊन बंदोबस्त करविला. आमचें अरमार धुळप अरमार सुद्धां आले. त्यांस सामील जाहालें. धुळपास आज्ञा असेल त्याप्रमाणें वर्तणूक करितील. आमची स्वारी

स्वामीचे आज्ञेप्रमाणें साष्टीचे मसलतीस निघाली. येकादो रोजीं जाऊन दाखल होईल. कळावें रवाना छ १२ माहे जिलकाद बहुत काय लिहिणें कृपा करावी हें विनंती.

¶*Raghoji Angria writes to the Peshwa, describing the efforts he made to hold the English in check at Underi after their capture of Uran.*

No. 176] [*16-1-1775*

पौ छ १२ (?) जिलकाद सन
खमस सबैन पौष मास

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
बाळाजीपंत लेले दादा स्वामीचे सेवेसी

पौष्य बाळाजी विश्वनाथ फाटक कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ १३ जिलकाद पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. आपणाकडून पत्र येऊन सांभाळ होत नाही यावरून अपूर्व वाटतें. वरकड सरकारकाम पुढील व्हावयाचा प्रकार साष्टीची मसलत थोर. यांतच सरसुभ्याचा व विसाजीपंत वसईकर यांचा पेंच. किलोकिलीयाचे बंदोबस्ताचा अधिकार सरसुभे येकीकडे ठेऊन तिकडे लाविला आणि खर्चास पैका सरसुभ्याकडून देविला, येणे कडून सरसुभाहून पैका कोणास कोणच्या भिस्तीवर पावेल? लस्क(रा)तूनहि फौज लोक रवाना जाहाले. त्यांच्या वराता सरसुभ्यावर होतात. आणि ता। हाय याजवर सत्ता दुसरियाची असा प्रकार. येणेकडून काम कसे होईल? याचा अर्थ सर्व आपले ध्यानांत येत असेल. फौजेचा प्रकार तर आमचे सरदार आहेत याचा मनसबा येक प्रकारचा. विसाजी केशव याचा मनसबा एक प्रकारचा. उभयतां एकत्र होऊन मनसबा जाहला तें बालणे राजश्री बाळाजीपंत ठोसर यांनीं आईकोन यादी ठराऊन दिल्या आहेत. त्या व राजश्री बालाजीपंत पुण्यास जाऊन पावले त्यावरून सर्व समजलें असेलच. आम्हांस मनसबा एक दिसतो. सेवटी असे होईल कीं, साष्टी जाऊन बाकीचा बंदोबस्त जाहला तर उत्तम आहे, हेच होईल. परंतु ठिकाण गेले मागती घेणे हे गोष्ट घडणें कठिण. एकदिल कोणी नाहीं. कोणी कोणाचा विश्वास धरीत नाहीं. श्रीमंत तेहि गुजराथेकडे सरले. ते लोटत लोटत इकडेच आले तर वसईचा भरवसा काय? श्रीमंत राजश्री रावसाहेबांचे पुण्यप्रतापेंच काय होणे ते होईल, इतर भरवंसा कोणे गोष्टीचा नाहीं असें भासते. वरकड हूडपणानें लोकाचे बळकटीनें साष्टीचे काम व्हावे असे आहे. येरवीच आयुर्भात्र केल्याने कांही होत नाहीं.

शरीरद्वारें मेहनत करून, टापूत उतरोन, लोक जमाऊन दररोज मुंबईवर हूल पाडली तर हाय खाऊन ठिकाण येरव्हीच टाकील असे वाटतें. येविसीची जलदी अशात केली तर होईल तर होईल. नाही तर मग मजबुदी त्याणे केलियावर होणे कठिण आहे. चौहूकडून एकच घोळ करून घाबरा होईल असे केले तर कार्याचे होईल. कळावें. एक वेळ आपले पत्राची इच्छा आहे. कृपा जाली तर उत्तम आहे. बहुत काय लिहिणे. कृपा लोभ कीजे हे विनंती.

¶*The writer expresses doubts about the success of the project for the recapture of Salsette as the various commanders are divided among themselves. He however thinks that a threatened invasion of Bombay may possibly relieve Salsette.*

No. 177] [*16-1-1775*

पौ छ १७ जिलकाद

संध्याकाल खमस

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक राणोजी बलकवडे ताा उंदेरी चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना. तागायत छ १३ जिलकादपावेतों सेवकाचें व तालुके मजकूरचें वर्तमान येथास्थित असे विशेष. जंजिरकर शामल पस्तिस गलबते लाहान मोठीं, लोक दोन अडिच हजार माणूस भरून दुरबुधीनें आला होता, येविसींचें वृत्त पेशजींच विनंती पत्रीं लिहिलें होतें. त्यास जंजिरकर पस्तीस गलबतानसी आला. तो उदरीचे बाऱ्यावरी येऊन गोळ्याचे मारणीबाहेर नांगरला. तेथून मुंबईस गेला. इंग्रजाचे कुमक करावी हा करार; त्यास तूर्त कुमक करीत नाहीं. साष्टी घेतली ती फिरोन मोर्चे लाऊन मागती घेणार. त्याचे कसकसे होते ते पाहातों. उपरांत करणें ते करूं, याजप्रमाणे च्यार दिवस बोलोन तकूब जालें आहे. त्याजवरून फिरोन हाकारून दोन तीन दिवस राहून जंजिरेयास लोक सुधा गेला. सामान सरंजाम करीत आहे. लोक नवे राहावयास येतात ते ठेवीतच आहे. टोपीकरास येक वेळ नतिज्या बसतो तरी बरी गोष्ट आहे. साष्टीसारिखी जागा घेतलेन त्याचाहि नाश बराच जाहाला. दोन तीन चांगलेच माणूस पडिले. साष्टींतील सामान तोफा चांगल्या व वस्तु चांगली तितकी मुंबईस नेत आहे. सावकाराही अड घातली आहे कीं श्रीमंतासी लावल्यानें सावकारी पडली. सिबाडा गलबतें बंदरांत राहिलीं, पुढें काये करावें? याजप्रमाणें जाऊन इंग्रजाजवळ बजीद होतात. जंजिरकर या जाग्यावरी फार दुरबुधीनें आहे यांत संशये नाहीं. निजध्यास

उंदेरीचा जंजिरकरास लागला आहे. इंग्रेजाचे कुमकेविना येऊन परिणाम लागणे कलतच आहे. हे जागा जंजिरे लोकांची भरती पांचसें सासें निदान असावी म्हणजे चिंता नाहीं. संभर माणूस जदीद ठेवावयाची हुजूरची आज्ञा. त्यांत पंचवीस येक माणूस सारे ठेविले आहे. रोजमरा रोख हातावरी देतो परंतु या जाग्यांत राहावयास येत नाहीं. इतर तालुक्यांत पाहिजे तितके मिळतात. येथें नामजादी लोक आले आहेत. अवचितगडपैकीं आसामी पनास व राजश्री दादोपंत सुभेदार यांही पाठविले आहेत पनास, व राजश्री राघोजी आंगरे वजारत-माब सरखेल याजकडील पनास येकूण दीडसें माणूस आले आहे. वरचिल येथील नेमणुकेचा बेहेडा सर्व धन्यास विदितच आहे. भातास निरख दर खंडीस सोला रुपये प्रमाणे बेहेड्यास लाविला आहे. त्यास भातास कोणी पुसत नाहीं. सावकार घेऊन नेतील कोठें? दाहा रुपयानी खंडी रयेत घावयास राजी, परंतु सावकारच कोणी ध्यावयास मिलत नाहीं. येथील लोकांस वाटणी शाईसिंग त्यास तीन रोजमरे रोख व सेत सनद येकमांही दिल्ही, व दर्यावर्दी कोली यास सासा रोजमरे रोख दिल्हे. जेजालंदाज गोलंदाज खासदार वगैरे लोक यास च्यार च्यार रोजमरे दिल्हे. याजप्रमाणे वाटणी रोख दिल्ही. लोक येक दील चांगले आहेत. जाग्याचा बंदोबस्त उत्तम प्रकारें आहे. कांहीं चिंता न करावी. लोकांची भरती या जाग्यांत पांचसें सासें माणूस निदान असावें. याची तरतुद धन्यानें करावी. दोन हजार रुपये सोलापूरकर लोक पनास हुजूरून रवाना केले ते येऊन अद्याप पावले नाहींत, त्या लोकांस येथें राहावयाची आज्ञा असावी. हे जंजिरे जागा गनिम कोणे वेळेस येईल याचा भरवसा नाहीं. मुंबई जवल, जंजिरकर जवल, सर्व हरद्र पिलाजी भिलारे हुजरे व जारबोजी हुजरे सेवेसीं आले आहेत. सविस्तर निवेदन करितील. इंग्रेजास येक वेळ चांगला नतिज्या बसल्याविना बरी गोष्ट नाहीं. फिरंगी याची सराई येक व तिरकती येक न गलबतें तीन येकूण पांच मुंबईस आज आली म्हणोन वर्तमान आहे. काल बन्यावरून हाकारोन जात होते तेव्हां पांढरी निशाणे लाविली होती, त्याजवरून फिरंगी असा ओलखिला. बातमी पकी आणावयास मुंबईस माणूस पाठविला आहे. उद्यां पर्वी येईल. आला म्हणजे काय बातमी ते सेवेसीं लेहून पाठवितों. तल्याहून संभर माणूस भरतीस देविले आहे, ते यावयाची आज्ञा असावी. सेवेसी श्रत होये हे विज्ञापना.

¶*Ranoji Balkavde writes to Nana Fadnis about the Sidi of Janjira planning secretly to capture Underi with his own fleet and with help from the English if possible.*

5902

No. 178] [17-1-1775

पौ छ १६ जिलकाद
सुा खमस सबैन

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बाळाजीपंत लेले स्वामीचे सेवेसी

. पो बाळाजी विश्वनाथ व केसो कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १४ जिलकाद जाणून स्वकीये कुशल लिहीत आसिले पाहिजे विशेष. साष्टी इंग्रजाने घेतली. त्याचे वृत साविस्तर आपणास राा बापूजीपंत व राा बाळाजीपंत याणी सांगितलेच आसेल. त्यावरून * * * * * कळले. त्या आलीकडे फिरोन साष्टी ध्यावयास प्रकार तरी लस्करातून राा विसाजी केशव व फौज व पायेदळ घेऊन आले ते जाऊन वसईस बसले आहेत. इंग्रजाचा काफला मुंबईहून जातो येतो. त्याची गलबते देखोन किल्याची बलकटी करीत असतात. त्यांस दुसरे कामाची तरतूद सुचत नाही. राा विसाजीपंत दादानी काही मसलत करावी तरी याजवळ पाईचे माणूस नाही व राऊतहि नाहीत. दोनसे माणूस पाईचे व राऊत पाच साहासे आहेत. याच जमावानसी हे जातील न जात हे आपणास समजलेच आहे. आरमारकरी याणी आरमार घेऊन दर्यात उंदेरीच्या बारियावर येऊन इंग्रजाचा काफला बंद करून त्यास तंबी पोचवावी ते त्याच्याने होऊन येत नाही. साष्टी वसईचे खाडीतून इंग्रजाची तरांडी फिरतात. त्यांची बंदी आरमारकरी याणी करावी. गलबत दर्यात फिर्को देऊ नये. आसे होईल तरी काही जस बसेल. साष्टीचे टापूत उतरोन रयेत लुटून दाणा जाळून टाकावा; व मुंबईस दाणा जाऊ देऊ नये यैसे जाले पाहिजे. यास विना हेटकरी आगर गारदी माणूस चांगले च्यार हजार आल्याखेरीज हे होत नाही. कांगोरीकर पांचसे माणूस आले. त्यात झाडून सेतकरी कुणबी आहेत. तरवार धरावी कसी हे देखील ठाऊक नाही. मग मारावयाचे तरी गत कळतच आहे. येथे गाडदी आले आहेत. हे भटारी कुजडे यांच्याने काम होत नाही. उगीच सिबंदी मात्र वाढवावी. लस्करचे लोकास खर्चास सरसुभेदाराकडून देविले आहे. त्यास सरसुभेदाराचे व वसईकर ग्रहस्ताचे सूत नाही, हे आपणास ठाऊकच आहे. आपण तरी मसलतीचा कारभार त्याजकडे लाविला असे वाटते. याचे कारण तरी सरसुभेयाचे तालुकियातील कोट किले यांचा बंदरोबंदरीं कागदपत्रे पाठऊन बदोबस्त करवितात

त्याजवरून सहजच दिसोन येते. याजवरून यैवज द्यावयास सरसुभेदार मागे-पुढे पाहातात. तिरस्तली दिसते. कोणात कोणी मिळत नाही. तेव्हा ठिकाण हस्तगत होणे कठिण दिसते. अशेले काम येक संतेविना होणे कठिण; आणि जिवाच्या उदार सरदार असिल्याविना कोणेक काम शेवटास जात नाही. या कामास जातीचा हूडपणा व माणूस कडवे असल्याविना, अशा जमयतीस खर्च करणें व्यर्थ. यात पाहिला पदार्थ लिहिला असे. आपण बंदोबस्त करणे तो पाहून करीतच आहेत. येथे विस्तार लिणे कशास? मुंबईची बातमी बेलापुराहून आली. त्यातील मजकूर फिरोन इंग्रजाने अरमार व सरंजाम लढाईचा भरून तयारी करून सिध्ध जाहाला आहे म्हणौन बाजीपंतानी सरदारास लिहिले आहे. येथे तंधिस्त लिहिले आहे कीं, येक तर अरमारावर जाऊन पडावे, येक तर बंदर केनारियाचे किल्यास दगा करावा याप्रो आहे. साष्टीचे काम तर आलीकडून * * * * ची मारगिरी आणि * * * * * गाडदी हशम चांगले त्यांत फूट कार्यास नये. असे जाहाल्यास आपण ज्यास आज्ञा करितील तो काम करील, चिंता नाही. कनिष्ट पक्ष येकादा कारकून श्रीमंताचे घरचा हे काम बज्यावील. मोठे मोठे सरदार तर मोठी मोठी कामे कर्तात, तसेच हे समजतात, परंतु तसे नव्हे. हें पाईचें लोकांचे काम, याची तऱ्हे येक प्रकारची आहे. तेथे मोठेपणाचे काम नाही. जातीचे मर्दुमीचे काम आहे. कलावे बहुत काय लिहिणे. कृपा लोभ कीजे हे विनती.

¶*Balaji Vishvanath and Keso Krishna narrate the difficulties they experience in the way of recapturing Salsette from the English. "It is the pluck of an individual leader and not so much the strength of the force that will be useful", say the writers.*

No. 179] *[19-1-1775 ?*

पो छ १८ जिलकाद

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १६ जिलकादपावेतो सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ *

5904

रोजचे आज्ञापत्र सादर केले ते छ मजकुरी पावले. राजश्री आनंदराव[१] जिवाजी याचे पत्र इंग्रेज माष्टीन यास जात होते, ते तुम्हाजवळ आहे ते पत्र हुजूर पाठवावे म्हणून आज्ञा. ऐशास ते पत्र जेव्हा राजश्री बळवंतराव जिवाजी याजवळ आले तेव्हा त्याणी आणून आम्हास दाखविले, ते पत्र मुंबईस पोहोचवावयाविसी पुरंदराहून पत्र आले होते तेहि दाखविलें. दोन्ही पत्रे राजश्री बिसाजी केशव व बाळाजी कृष्ण ठोसर यांज देखत वाचून पाहिले. तूर्त पाठवावयाचे नाही, ऐसे सांगोन त्या पत्राची नक्कल करून घेऊन बळवंतराव याजवळ दिल्हे. माघारे पाठवावे म्हणोन सांगितले. ते बोलले जे, माघारे पाठवावयाचे प्रयोजन काय? फाडून टाकितो. त्याजवर हली आज्ञा आली, तेव्हा त्यास बोलाऊन आणून विचारिले. त्यांणी जाबसाल केला जे तेव्हाच फाडून (टा)किले. म्हणोन आम्हाजवळ नकल होती तेच सेवेसी पाठविली असे. बेलापुरास एक तोफ सातशेरी चांगली मोर्चाचे उपयोगाची आहे. याजकरितां सुतार लोहार तेथे पाठऊन गाडा करऊन, तोफ गाड्यावर चढवावी, म्हणोन आज्ञा. त्यास दर्यावर्दी खलाशी व गोलंदाज व सुतार लोहार पेशजी वसईस पाठविले होते, त्यास ते हुजूर पाठवावयाविसी आज्ञा आली होती. तेव्हा ते येथे पाठवावया(वि)सी विसाजी केशव यांस आम्ही लेहून पाठविलें. त्याणी गोलंदाज व दर्यावर्दी खलासी ठेऊन घेऊन सुतार व लोहार मात्र दोन दोन असामी सदरहूपैकीं येथे पाठविले, ते राजश्री आनंदराव माधव तोफाचा मार्ग नीट करावयास घाटास गेले त्याज बा़ो दिल्हे. खलाशीहि वसईहून कालच आले. तेहि आज मारनिलेकडे रवाना केले. सुतार लोहार येथें नाहीत. असते तरी बेलापुरास पाठऊन तोफेचा गाडा करावयास येता. कोळवणचे बंदोबस्ताविसी आज्ञा, त्यास येविसी पेशजी सेवकास व विसाजी केशव यास आज्ञा आली होते, ते त्यास येथून लेहून पाठविले. त्याचे उत्तर कालच आले जे, कोळवणचा बंदोबस्त आम्ही पका केला, आपण स्वार प्यादे कांही न पाठवावे, म्हणोन, व हली आज्ञा आली त्याजवरून आज आणखीहि लेहून पाठविले असे. सुतार तेथून पाठविल्यास येथे गाडा करऊं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna writes to Nana Fadnis, saying that he could not send the required letter written by Anandrao Jiwaji to Mostyn as it was destroyed. He requests the addressee to give instructions to despatch the big gun lying at Belapur.*

---

१ लिमये खासगीवाले, दादाचे पक्षांतील आनंदराव व बळवंतराय हे भाऊ.

No. 180] [22-1-1775

पैवस्ति छ २३ जिल्काद
सुा खमस पौष-
बारा घटका रात्र
आवसीची.

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी गोसावी

विनंती उपरी. तुम्ही छ ११ जिलकादचें पत्र पाठविलें तें पावलें. साष्टी गेल्यापूर्वी फौज गेली असतां कामावर न पडलें, उपेक्षा केल्यामुळें साष्टी गेली, याजउपरहि उपेक्षा करतां नये, केल्यानें शत्रु बळावोन दुसरे स्थलास अपाय करील, यास्तव विसाजी कृष्ण व विसाजी केशव यांस पत्रें पाठविलीं होतीं त्यांचीं उत्तरें आलीं तीं व पुढें मसलतीस पोख्त सरंजाम पाहिजे त्याची याद उभयतांनीं लेहून पाठविली आहे; त्याजप्रमाणें सरंजामाची पैरवी जाहल्यास विसाजी केशव याजवर काम सोंपल्यास करितील, त्यास येविशी लिहिलें पाहिजे म्हणोन लिहिलें तें सविस्तर कळलें. ऐशियास विसाजी कृष्ण व विसाजी केशव यांणीं याद पाठविली ती पावली. त्यांतील प्रकार पाहतां दाहा हजार गाडदी व पाईचे माणूस व दाहा तोफाच्या सरंजामास खर्च भारी लागेल; व सदर्हू सरंजामा * * * मोर्चेबंदी वगैरे हल्ले होऊन जरब पोंहचणार नाहीं. त्यास तूर्त चहूंकडे मसलत पडली आहे, पैका भारी लागतो याची तर्तुदी जाहाली पाहिजे. यास्तव तूर्त साष्टीचे टापूंत वगैरे दोन हजार पायीचें माणूस व दोन हजार फौज उतरोन साष्टींत जिनस वगैरें लोक आंत जाऊं न पावत व सभोंवतीं जाळपोळ करून राहावें ऐसें रीतीची बंदोबस्ती करावी. गाडदी वगैरे भारी खर्च तूर्त करावयाचा प्रकार करूं नये. इकडील बंदोबस्त जाहल्यावर शत्रूस नतीजा पोहचावयाची पैरवी करणें लागेल. वसई वगैरे जाग्याची बंदोबस्ती राखावी. सदर्हू अन्वयें विसाजी कृष्ण व विसाजी केशव वगैरे यांस लेहून पाठऊन करवावें. आपाजी हरि यास तूर्त विजेदुर्गास पाठवीत नाहीं म्हणोन लिहिलें. त्यास विसाजी कृष्ण व विसाजी केशव यांचे विचारें जेथें ठेवावयाचा विचार घडेल तेथें ठेवणें. दोन हजार फौज व दोन हजार पायीचें माणूस साष्टीचे टापूंत उतरोन बंदोबस्त होत असल्यास उत्तम. इतक्यानशी उतरल्यानें टिकाव न होये येसें असल्यास बाहेरून स्वारी करून जाळपोल करून बाहेर राहावें; सामान वगैरे येऊं देऊं नये. याजप्रमाणें तूर्त करावें, त्याचें पारपत्याची योजणूक केली आहे, लौकरच घडोन बंदोबस्त होईल. गणेश राम याची रवानगी केली व सदाशिव रामचंद्र याचीं

माणसें रायगडास पाठविलीं. उत्तम केलें. साष्टीस लोक रवाना केल्याची याद व सनदा सुभ्यास दिल्याची याद पाठविली ती पावली. नारो आनंदराव यास बंदीविशी पत्रें पाठविलीं आहेत ते बंदी करितील. जाणिजे छ १९ जिलकाद, मोर्चेबंदी करितों याची आवई जी घातली ती तशीच असों द्यावी. लौकिकांत मातब्बर पारपत्य होतें याचाच प्रकार असों द्यावा, आंतून मात्र सदर्हूप्रमाणें करावें- हें विनंती.

¶*The Ministers ask Naro Appaji to maintain a defensive position with the army and money that have so far been supplied to the commanders No more men or money could be spared for a great drive against the English.*

No. 181] [*23-1-1775*

पौ छ २९ जिलकाद

सुा खमस.

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २० जिलकादपावेतों वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वारीसमागमे गाडदी आहेत त्यांच्या चापाच्या बंदुखा आहेत. तेव्हां गारांविना काम चालणे कठिण. याज-करितां पांच हजार गारा स्वारी बाा सिलकेस असाव्या. त्यापौ पांच गारा नाही. रो बापूजी हरि याजबाा पेशजी साष्टींचे मुकामी पुण्याहून गारा दिल्हा होत्या त्या सरल्या. हालीं माारनिलेकडील गाडदी बेलापुरास रवाना केले असेत. त्यास गारा जरूर पाहिजेत. त्यास तोफखानापौ तूर्त दोन हजार गारा पाठवावयाची आज्ञा जाहाली पाहिजे. तेथे सिलकेस गारा नसतील तर अवरंगाबादेहून अगर ज्या ठिकाणी मिलत असतील तेथून आणावयाची तरतूद जाली पाहिजे. तूर्त ज्या असतील त्या पाठवावयाची आज्ञा जाली पाहिजे. आणिखी गाडदी यांची रवानगी तिकडूनच होणार. तेव्हां गारा व तोटे यांची बेगमीची पैरवी पुण्याहूनच जाली पाहिजे. या प्रांती काही येक मिलतच नाही. तेव्हां अगोधर तर्तूद जाली असावी. सेवेंसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna asks flint-pieces for muskets.*

No. 182] [23-1-1775

पौ छ २९ जिलकाद

सन खमस सबैन

माघ

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना
स्वामींचे सेवेसी

पोष्य गंगाधर गोविंद मुा जंजिरे विजयदुर्ग साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तागायेत छ २० माहे जिलकादपर्यंत तालुके मारचे वर्तमान यथास्थित जाणौन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. टोपीकर याचा काफला साहा तरांडी थोर व लहान पंचवीस तीस पर्यंत असा हेटहून आला. तो जंजिरे मारच्या बाऱ्यावर दोन तीन दिवस होता. त्याची बातमी आणितां इंग्रजी काफला कालिकोटाहून मुंबईस जातो असी बातमी आली. त्याजवरून पिछाबर येथून गलबतें रवाना केलीं आहेत; व सुवर्णदुर्गास व राजश्री जानराव धुलप यांसी उपर लिहून पाठविले आहे. गांठ पडल्यास गनिमास नतिजा पोहचेल. येथील बंदोबस्तास जदीद लोक ठेविले; व राऊत व लोक हशाम सातारकरी, सिंहींगडकरी हुजुरून आले, त्यासी रोजमरेयाचा ऐवजाचा झाडा आकारून पेशजी पाठविला होता, त्याप्रमाणे बेगमी जाहालीच असेल. जरूर ऐवज येईल तें केले पाहिजे. सविस्तर वर्तमान सरकारच्या पत्रीं लिहिले आहे त्याजवरून कलेल. आम्ही जंजिरा जागा जागा खबरदारी करून हुशार आहों. राजश्री येसवंतराव म्हसके नामजाद जंजिरे मार व राजश्री गिरजोजी बर्गे व राजश्री गोविंदराव माणकर व आम्ही जो बंदोबस्त करावयाचा तो येकविचारें करून स्वामी सेवेस सादर आहों. गनिमासी गांठ पडल्यास ठेचगा बसोन जाईल. येथील बंदोबस्तास अंतर किमपि नाही. चांगलाच केला आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति

¶*Gangadhar Govind informs Naro Appaji of some ships having been despatched to pursue the English fleet which he learnt was proceeding to Bombay from Calicut.*

5908

No. 183] [24-1-1775

पौ छ २२ जिल्काद सूर खमस
पौष सा घटिका रात्र आवसीची

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २१ जिल्कादपावेतों सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ १८ जिलकादचें आज्ञापत्र सादर केलें तें छ १९ मिनहूस पावले. बेलापूरचे तोफेचा गाडा करवावयाविसीं आज्ञा. त्यास राजश्री अनंदराव माधव यांजवळ सरकार कारखान्याचे दोन सुतार व दोन लोहार आहेत ते आणविले असेत, आलियावर बेलापुरास पाठऊन गाडा तयार करवितों. राजश्री राघोजी आगरे वजारतमाब सरखेल यांचे नेमणुकेची सनद अलाहिदा पाठविली आहे म्हणून आज्ञा. त्यास सनद येऊन पोहोंचली नाहीं. रवाना जाहाली असल्यास उत्तम. नसली तरी सत्वर रवाना करावयाची आज्ञा जाहली पाहिजे. इंग्रेजास रस्त (रसद?) चोरून जाते, त्याचे बंदोबस्तास तालुके यांचे अमलदारांस पत्रें लेहून खिजमतगार पाठविले आहेत. याउपरी बंदोबस्त उत्तम होईल. तुम्हीहि बारकाईनें बातमी राखोन बंदोबस्त करीत जाणें. त्यास पेशजी बंदी करावयास व रखवालीस स्वार व माणसे पाईची पाठविली होतीं. त्यास सरकारची आज्ञा स्वार आपणांजवळ आणावे म्हणून आली. त्याजवरून स्वार आणविले. प्यादे व गाडदी जागां-जागां ठेविले आहेत, ते तसेच आहेत. बंदीची चौकसी येथून करावयाची त्या रीतीनें करीतच आहों. राजश्री विसाजी केशव याजकडील कारकूनहि चौकसीस नेहमी फिरत आहेत. अमलदारास वरचेवर ताकीद करीत आहों. हालीं हुजुरची पत्रे व खिजमतगार आले. फार उत्तम आहे. चौकसी करितील; आम्हीहि आज्ञेप्रमाणें बारीक रीतीनें चौकसी करून, बंदोबस्त होईल तो करितो. टापूंत जलद उतरावयाविसी आज्ञा. त्यास राजश्री विसाजी केशव व सिवाजी विठल व आपाजी हरि यास येथें यावयाविसी पत्रें लेहून पाठविली आहेत. ते आलियावर सर्व येके जागा होऊन जो विचार कर्तव्य तो आज्ञेच्या लक्षानें करून, सेवेसी लेहून पाठवितों. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶ *Visaji Krishna makes arrangements for the repairs of a gun-carriage at Belapur. He also makes a request to the Peshwa to issue orders to Raghuji Angria and asks him to prohibit supplies reaching the English.*

5909

No. 184] [25-1-1775

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २२ जिलकादपावेतो यथास्थित असें विशेष. स्वामीनी छ २० जिलकादचे आज्ञापत्र सादर केले ते छ मारी पावलें. विजेदुर्गाकडे फिरंगियाची गडबड जाहाली आहे, याजकरितां धुलप परभारें आरमारसुधां तिकडे गेले. त्यास ते सडेच गेले किंवा सारें आरमार घेऊन गेले ते बातमी आणऊन लेहून पाठवावें म्हणोन आज्ञा. त्यास कालच राजश्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल यांजकडून बातमी आली जे, धुलपाचे आरमार काही सुवर्णदुर्गास जाऊन लोकाची अडसेरी भरीत आहे; व काहीं तरांडी कुंभारूचे बंदरी येऊन फाटी व पाणी भरीत आहे म्हणोन. त्याजवरून सारे आरमार घेऊ(न), वसईचे व मुंबईचे बाऱ्यावर येऊन राहावयाविसी राजश्री जानराव धुलप यांस पत्र लेहून वजारतमाब यांचे माहागिरी बो पाठविली आहे, व आणिखीहि आज्ञेप्रमाणे मुजरद सरकारचे जासुदा बो लेहून पाठऊन बातमी आणऊन सेवेसी लेहून पाठवितो. राजश्री कृष्णाजी धुलप काही आरमार घेऊन सुवर्णदुर्गास आहेत, व जानराव धुलप कुंभारू नजीक जंजिरा राजपुरी येथे आहेत. त्यास सुवर्णदुर्ग व कुंभारू दोन्ही जागाचे आरमार घेऊन येऊन वसईचे बारेयापासून मुंबईचे बाऱ्यापर्यंत हेरेबोर[१] करून राहावे म्हणोन निकडीने पत्र लेहून पाठविलें आहे. आणखीहि लेहून पाठवितों. कोलवणांत काल राऊत तीनसे, परकाले व चासकर व पनास माणूस हशमी कोहिजेस भिकाजी गोविंद याजकडे पा। आहे; त्या तालुकियांतील काहीं पाईचे माणूस भिकाजी गोविंद व हे राऊत यैसे माहितगिरीनें नेऊन कोल्याचे पारपत्य करितील. वर्तमान येईल ते वरचेवर लिहीत जाऊ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶[*Visaji Krishna, as desired by the Peshwa, supplies news about Dhulap and his fleet proceeding to Vijaydurg to quell the disturbance created there by the Portuguese.*

No. 185] [27-1-1775

पै। छ २९ जिलकाद सन
खमस सबैन माघ मास

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना. ता। छ २४ जिलकाद पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. वसईहून राजश्री विसाजी

---

१ टेहेळणी.

केशव याचे पत्र आले. त्यात लिहिले होतें की, श्रीमंत राजश्री दादासाहेब याजकडून मुजरद जोडीबराबर पत्र आले होतें. त्यास तें जोडी व येथून पत्र लिहिले आहे हे तुम्ही पुणियास पावते करावे. त्यास राजश्री सिवाजी विठल यास पत्र होते ते काही पाठविले नाही. जोडी आणि रा विसाजी केशव यांचे पत्र आहे ते येथून जासूद जोडीबरोबर देऊन पाठविले आहे. त्यास श्रीमंतांकडील जासूद जोडी व विसाजी केशव याचे पत्र सेवेसी येऊन पोहचले. उतर द्यावयास आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna sends to Poona the letter which he had received from Visaji Keshav.*

No. 186] [*28-1-1775*

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक बहिरो रघुनाथ मुकाम कामरेज कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना. ता छ २९ माहे जिलकादपावेतो आपले कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. आपली आज्ञा पुणियाहून घेऊन स्वार जाहालो. तो छ १२ मिनहूस मुकाम मजकुरी पावलो. श्रीमाहालक्ष्मीचे मार्गे आलो, आणि दाखल होताच शेवेसी पत्रे लेहून कासीद रवाना केला. त्यास माहालक्ष्मी रानात मार्गी कोल्याचे आवडावीमुळें कासीद लुटला. कागदपत्र सर्व गेले. याजकरिता कासीद फिरोन मागा आला. त्याजवरून हे पत्र हाली शेवेसी लिहिले आहे. यैसियासी आपले आज्ञेप्रा सुरत शहरची बंदी करावी येविसी राजश्री नारोपंत केसकर यासी आज्ञापत्रे होती. त्यास मारनिले आमचे येण्यापूर्वीच फौजसुधा येथोन श्रीमंत राजश्री दादासाहेब बडोदियासी आले हे वर्तमान ऐकोन मारनिले गेले. भेट जाली नाही. याजकरितां सरकारचीं आज्ञापत्रे कारकुनासमागमें बडोदियासी रवाना केली आहेत; व राजश्री हरिपंत तात्या यासीहि विनंतीपत्र लिा आहे कीं शहरची बंदी विना फौज असल्याखेरीज होत नाही. यास्तव मारानिलेची रवानगी पत्रें पावताच केली पाहिजे. फौज आली म्हणजे बंदी आज्ञेप्रा करितो. त्यास फौज बडोदियाहून महिकाव्यापावेतो गेली आहे. त्याचा मजकूर सविस्तर पुरवणी पत्रीं लिा आहे त्यावरून सेवेसी अवगत होईल. वरकड इकडील वर्तमान तरी मुंबईस व साष्टीस कुमक वगैरे सरंजाम पोख्ता असावा यानिमित्ये शहरांत रवानगी करावयाचे साहित्यें इंग्रज करीत आहे. छ २८

जिलकादी जलेमार्गें गलबतात गाडदी लोक सातशे व तांदूळ व डाल व तूप वगैरे सरंजाम होणार. हे बातमी शहरातून तहकीक आणून राजश्री विसाजीपंत दादा सुभेदार यांसी पत्रें लिहिली आहेत की, मुंबईस आंकरी(?) आणि महर्गता बहुत जाली आहे. व लोकाचा भरणा असावा याअर्थी इंग्रेज बंदर सुरत येथोन रवानगी करणार, यास्तव आपले अरमारास सूचना असावी म्हणजे त्याचे ज्याहाजासी गाठ घालावी आणि जाऊ न द्यावें. पारपत्य येक वेल जाले म्हणजे जेलमार्गें सरंजाम पोहचणे हे कलतच आहे. हेसका पडेल म्हणौन वसईस लिहिले आहें. त्याचे व आपले अरमारासी गाठ पडल्यास जे होणे ते होईल. वरचील * * ती त्याची ठिकाणें दोन सुरत व भडोच. त्यांत सुरत जागा मातबर, याजकरिता हरदू ठिकाणाची बंदी येथास्थित जाल्यास पायेबंद पुरता त्याजला लागेल. येविशीचा मजकूर राजश्री हरिपंत तात्यास लिहिला आहे व राजश्री नारोपंत केसकर यासी पत्रें लिहिली आहेत. यैसियासी आपणहि हुजुरून पत्रे ल्याहावी आणि कासिदाबराबर पाठवावी म्हणजे उभयेताकडे रवाना करितो. व दुसरे वर्तमान इंग्रजाकडील मदराज व बंगाला येथोन पाच हजार गाडदी व दोन हजार गोरे कातडीचे ढोणे वगैरे कितेक लढाईचा सरंजाम आणविला आहे. त्याच्या पत्येमान्या गेल्या आहेत. त्यास आज पाऊण मास होत आला; परंतु मदराज व बंगाला येथोन लोक गाडद वगैरे सरजाम जावयासी बहुत अवकाश आहे. याजकरितां लवकर इंग्रेजास तंबी पोहचल्यास उतम आहे, मुंबईची तों कोकण प्रांताकडोन बंदी जालीच आहे. तिकडील पेच नाही. सारांश इकडील बंदी जाली पाजे तेंहि स्वामीचे आज्ञेप्रों होईल. इकडील बंदी जाल्याने मुंबैस फारच दाणादुण्याविशी अवघड पडेल. सांप्रत मुंबईस महर्गता बहुतच जाली आहे. हाली सुरतेहू(न) जिनस भरून काफला जात आहे. हा सरंजाम पोंहचल्यानंतर तूर्त त्यास बेगमी होईल. पाचसातसे गाडदी चांगली रवाना करीत आहे. कदाचित नारोपंत केसकर यावयासी न बने ऐसे जाल्यास हजार फौज आल्यास बंदी निक्षूण होईल. आणि साष्टीचे सद्या उपयोगी पडल म्हणौन विस्तारें हरिपंत तात्यास व नारोपत यासी लिा असे आणि आपणहि पत्रे लिहिल्यास फौज लवकर येईल. आज्ञेप्रमाणे येथील बंदी हजार फौज नारोपंत केसकराकडील आली तरी करून तेथील सरंजाम पोहचणार नाही. पत्राची उत्तरें लौकर पा। आज्ञा करणार स्वाम समर्थ आसेत. सेवेसी श्रुत होय (हे विज्ञापना.)

¶*Bahiro Raghunath informs Naropant Nana from Kamrej that he could not effectively institute a blockade of Surat as he had not sufficient force with him. He further writes that Naropant Keskar marched with his forces as far as Baroda to meet Raghoba. Finally he refers to the expected arrival of English forces from Madras and Bengal.*

5912

No. 187] [31-1-1775

सेवेसी सां नमस्कार विज्ञापना ऐसी जे. दादोपंत वसेख हसन च्यार लाखोटें घेऊन येथून रवाना जाहाल्यापासून बंदीमुळे काहीच तिकडील वर्तमान कळत नाहीं; व इकडील नवीन बातमी लिहून पाठवत नाही. याजकरिता आज दिवसपावेतो मकूब जाले. हाली युक्तीनें हे विनंतीपत्र सेवेसी पाठविले आहे, की बंदी केल्याने इंग्रजाचा सूड उगवतो, हे किमपि होणेच नाही. निमित्य काय म्हणाल तर बाहेरून काफल्याचे काफले जिंनस * * * * येतात लाकूडफाटे जंजीरकर हबसी * * * * * * काल बंगाली व चिनाई साहुकारी जाहाजे * * * * * मार्गी मुंबईस दाखल जाली. येथून दोन तरांडी अरमारी सारे इंग्रजाचे वैभव व बनाम रेवजे[1] व बांबे गुराब नगदी घेऊन तालचरीस जात होती. त्यास उंबऱ्याहून धुळपाचे अरमार बाहेर निघोन खूब लढाई जाली. इंग्रेज वाऱ्यावर पडोन पुढे चाल केली. त्याचे पाठीमागे माघारे सदरहू अरमार आटोपीत गेले आहे. कोण जबरदस्त व जेरदस्त जाहाला असे तपसिले कळले नाही. वसईहून स्वारी येऊन साष्टीचे गाव लुटतात व जाळतात भाजितात त्यानी काय होते. इग्रे * * * * * * * * कर्म मर्दीचे काम नव्हे * * * * * होतात. येकवेळ साष्टीस फौज सिरल्याखेरीज व तेथे बंदोबस्त करून माहीम व मुंबईपावेतो पाय लाविल्यासिवाय काही घडणार नाही; तरी असे केल्याने आज यामधे सामर्थ नाही की फौजेवर तुटून पडावे, व दवडून घालावी. येविसी वारवार विनंती केलीच आहे. पुढे सर्व बोलतात जे मदरास्ताहून दोन मनवर व काही कुमक आणविली आहे, ते येईल तेव्हा याची पुर्ती जबरदस्ती होईल. साष्टीत व मुंबईत दिवसाचा निर्भय कारभार करितात व रा(त्री) * *. * * जे भयाभीत होऊन हुली पडतात * * * * * चार असता अजपरयत कोणे अर्थे दिरंग लाविली आहे हे न कळे. कारनेल कीटिण तीन तोफा मोठ्या व तीस चालीस माणूस व साहा सुतार व दुसरा सरंजाम समागमे घेऊन काल येशवंतगडास गेला. तेथून धारावीस जाईल. त्याचप्रो येक तरांडे बनाम प्रम व तीन फतेमाऱ्या साष्टीस पाठविल्या. इटावे अथवा दोव्कारावर येथे रखवालीस ठेवणार. जंजिरकर हबसी याचे व इंग्रजाचे सूत्र जाले आहे की पेशजी मुलाकत दंगा व चोरधाड करीत होता आणि *. * * * * * * होता त्याप्रो आरंभ करावा व परभारे जंजिऱ्यास न्यावा. हे आतील वर्तमान आमचा मैत्र नौकर खुद इंग्रेज त्याणी गुह्यांत सांगितलें. ऐशास

१. रेवस व मुंबई जहाजांचीं नावें.

जंजिरकर खासा सांप्रत कबिल्यासुधा खोकरीस राहावयास आला आहे. स्वामींनी राजश्री दादोपंत गोडबोले यासी आज्ञा करून पुर्ती पालथ लाऊन छपा घालून धरून न्यावा म्हणजे सर्व गोष्टी उपयोगी पडतील. सूचनार्थ विदित केलें असे. इंग्रेज लढाईचे सामान दुहेरी तरेतरेचे पोख्त करितो. दो गोष्टीवर, श्रीमंत गोविंदराव (गाईकवा)ड याचे समागमे खुषकीचे मार्गा * * * * * आले तर इंग्रज आपले साहित्याने साष्टीहून वसईस जाऊन श्रीमंताचे चाकरीत रुजू असावे. असे न घडेल तर मनवर दोन व चार तरांडी बाहेर गेली आहेत ती आली म्हणजे विजयदुर्गावर हला करावा व आरमार बुडऊन घालावे आणि ते ठिकाणी तुलाजी आंगरे याचे पुत्रास बसवावे. अशा दोन मसलती कोसलात ठरविल्या आहेत. सुर्तेस व भडोचास कागदाची रेजगिरी इंग्रजाने लाविली आहे. हरयेक प्रेत्ने श्रीमंतास आप्त करून घ्यावे. सेवक * * * * * मुंबईस आहे. सरकारतर्फे * * * * * * * जाण्याचा निरोप देविला. वरकड राजश्री पांडू लकड्याहि सर्व मुखजबानी हुजूरकडील व वसईकडील सेवकास सांगितलें त्याजवरून फार समाधान जाले, व खूष जाले; तरी स्वामीच्या पायासिवाय दुसऱ्या कोणा येलमाचा धीर नाहीं. स्वामीची छाया समजोन येथे सांप्रतकाली विंचवाचे पेव जाणून कोणाचा डर बालगित नाही. रा। छ २८ जिलकाद सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This is a news-letter from Bombay reporting fighting between Dhulap and the English. It further says that succour is being received by the English from Madras and friendly relations have also been formed by them with the Sidi of Janjira and Raghunathrao.*

No. 188] [*January 1775*

[आरंभीचा मजकूर फाटला आहे.]

लिहिलें आहे. लस्करची फौज व गाडदी अद्यापि आले नाहींत. रवाना जाले असतील. येतीलच. साष्टीचा शह सोडूं नये, याअन्वयें राजश्री विसाजी कृष्ण व राजश्री विसाजी केशव यांस लिहिलें आहे. साष्टीचें बेट थोर आहे. आंत हशमी माणूस व गाडदी स्वामींनी पाठविले आहेत, ते व औरंगाबादेस हजार पांचसें मिळाले तरी तेहि धोंडो माहादेव यासी लेहून आणविले आहेत. फौज पहिली आहे; व स्वामींनी रवाना केली ते यैसें माणूस व राऊत टापूत उतरोन अरमारानें सामान येऊं देऊं नयें, याप्रमाणें तजवीज करावयाविशी विसाजी केशव यास लिहिलें आहे, त्यांचें उत्तर येईलच. लिहिल्याअन्वयें जाल्यास करून शत्रूचें पारपत्य होई ऐसें करावयाची तजवीज केली आहे.

मसलतीस पैका लागेल; परतु या समई सोडून दिल्यानें तहहि होणार नाहीं, व स्थळेंही राहाणें कठीण; याजकरितां विसाजी कृष्ण व विसाजी केशव यास बल देऊन लिहितच आहो. कौल पावतांच [यापुढील मजकूर किती फाटला कळत नाहीं.]

¶*This fragmentary letter, much of which is lost, shows the keenness of desire for the recovery of Salsette.*

No. 189] [*About 2nd January 1775*

क राजश्री विसाजी कृष्ण फौज व * * * * चे सुद्धां परसिखा नजीक राहिलें आहेत. राजश्री विसाजी केशव लस्करांतून रवाना जाहाले ते वसईस छ २७ सवालीं पोंहोंचले. वसईचे नस्तावर टोपीकराचें अरमार आलें म्हणोन विसाजी केशव याणी लिहिलें आहे. उरणकरांनीं कौल घेतला म्हणोन बेलापुराहून बाजी गंगाधर याणी लिहिलें आहे. या प्रकारें ठिकाणें शत्रू हस्तगत करितो. वसईस राजश्री शाहाजी भोंसले याचें पथक व जोत्याजी जाधव व विसाजी कृष्ण याणी आपले कांहीं राऊत मिळोन दीड हजार फौज वसईस छ. २८ सवालीं परसिखाहून रवाना केली ते छ २९ सवालीं वसईस दाखल होईल म्हणोन विसाजीपंतीं लिहिलें आहे. उरणकरानी च्यार दिवस तरी लढावयाचें होते, तो कांहींच प्रकार न केला. कौल घेऊन निघाले. याप्रमाणें मर्दुमी त्याची कोठवर ल्याहावी? पुढें बेलापुरावर येणार म्हणोन बातमी आहे. शामलहि जम करून तळें घोसाळें याचें रोखें आहे म्हणोन बातमींत आहे. विसाजी कृष्ण याणी जागां जागां [पुढील मजकूर गहाळ]

¶*This fragmentary letter gives news about the gradual advance of the English and the attempts made by some Maratha leaders to check it.*

No. 190] [*January 1775*

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सौा

विज्ञापना. शहरची हकीकत मदराजेहून मुंबईस नवसे गारदी आले. मुंबईत फेरोई[१] फार जाली त्यामुळे अरधे शहर उज्याड जाले. वसईवर दमदमा तोफेचा बांधला होता तो वसईकरानी रद केला. कळव्याचे ठाणे दरबस्त जाळले आसे वर्तमान आहे. श्रीमंत दादासाहेबाचे भडोचचे बागात डेरे जाले. येथून चिलीब्याचे घोडे अरबी दोन विकत घेऊन, भडोचकर नजर करणार व येहि

---

१ जप्या ?

मेजवानीचा सरंजाम काकोबासुधा करितात. तस्मात थोड्याच दिवसांत सुरतेस येणार. परवा इंगरेजाने नवाबाच्या पुत्रासी करार केला होता कीं, ज्याप्रा तुमच्या मर्जीस येईल तैसे करू; परंतु त्याचे बोलणे प्रमाण न पडले. हेहि अविंध टोपीवाल्यावर बहुत श्रमी आहेत. आम्हीहि याजला कान उडोन गोष्टी सागितल्या की, पुढे तुमचा परिणाम काये ? परंतु त्यांचा उपाये नाही. उपाये जालियास अंतर करतील असे दिसत नाही. दुसरे आपण सोवळ्याविषई आज्ञा केली होती, त्यास येथे कोणी उधारे लशकरापावेतो धीरत नाही. यास्तव येखाद्या साहुकारास पत्र लिहावे अथवा रुा पाठवावे. जितिकी अगत्य असेल तितके लेहावे. त्याप्रा घेऊन येऊ. पुन्हा बकसीने बोलण्याचा आक्षेप केला आहे. घडल्यास उतम. नाहीतर आज आथवा उद्या सेवेसी येतो. कृपा निरंतर आसो दीजे हे विनंती.

हेच राजश्री केशोपंत दाजीस साा नमस्कार विनंती. सोवळ्याविषई लिा; परंतु ऐवजावेगळा जिनस येत नाही. यास्तव ऐवज पाठवावा हे विनंती.

¶*Nana Fadnis is informed of the arrival at Bombay of a contingent of 900 from Madras and the consequent disorder created there. The writer further refers to Raghoba encamping near Broach and also to some differences that had arisen between the English and the Mughal officer of Surat.*

No. 191] [*January 1775*

श्री

पुाा सेवेसी सां नमस्कार विनंती. आपण तो मोठ्या मसलतीचा डौल लिहून पाठविला. ऐशास ही मसलत म्हणजे सामाने[१] नाही.. लाखो रुो खर्च जाहाले पाहिजेत. पाच हजारपावेतों गारदी माणूस चांगले चांगले ठेविले पाहिजे. याखेरीज सावतांचे वाडीपासून चागले चागले नामी माणसे आणिली पाहिजेत. येकूण पाण्याप्रो पैका खर्च करून या कामास दाहा पांच चांगले कर्ते केलेले माणूस ऐसे पाहिजेत. आरमार सर्व झाडून मुंबईच्या बाऱ्यावर आले पाहिजे, तेव्हा मसलत सिधीस जाईल. आपण पंधरा हजाराची चिठी राजश्री रामराव त्रिंबक याजवर खर्चाबदल पाठविली. आम्हास ते येवज देत नाहीं. आम्हाजवल ऐवज मिलत नाही ऐसे म्हणतात. याप्रमाणे खर्चाची अवस्था, तेव्हा मोठी मसलत कसी होत्ये ऐसा विचार आहे. फौज रोजमरेयाखेरीज राहणार नाही. अता पुण्याहून पैका येईल तोंपर्यंत लोकास रोजमरा कोठील द्यावा ? रोजमरा आठ दिवस नाही तरी लोक उठोन जातील, आम्हावर नाकारेपण येईल. आपण तरी

१ सामान=सामान्य.

कागदी तरतूद लिहितात. येथे तो त्या तरतुदेचा सरंजाम अगदी काही नाही. पैका नाही, लोक पाईचे नाहीत. सर सुभेदार याच्याने च्यार वाण्याची पाले देखील आणवली नाहीत. पाच माणूस नाही. पाईचे लोक व राऊत कल्याण राखावयास येथून द्यावे लागले. त्यास याचा पुर्ता विचार करून येथून लिहावे त्याप्रो करू. येथे काही येत्न नाही. सावकार वाणी उदमी कोणी नाही. फौजेस दाणा नाही. याप्रो आपण कमाविसदारा दाणा देणे म्हणौन चिठ्या पो, त्या कमाविसदारास दाखविल्या. त्याणे सांगितले की, गडबडीमुळे रयत गाव पळून डोंगरात गेले. बैल दाणा मिळत नाही. कोणी डोईवोझी देखील विकावयास आणीत नाही. घाटावरून दाणा येत नाहीं. फौजेचा मात्र भोग आहे. विना उभयता श्रीमंत बापू व नाना येऊन बसावे, दाहा वीस लाख रुा खर्च करावे; तेव्हा साष्टी येईल व शत्रूचे पारपत्य होऊन सरकारच्या जागांचा बंदोबस्त होईल. किरकोल तजविजीनें काही होत नाही. तूर्त वसई मातबर जागा सर्वांनी रक्षावी. फौजस वगैरे खर्चास अति सत्वर प[१] (अपूर्ण)

¶*The exact situation at Salsette has been properly gauged by the writer and concrete proposals put forth for retrieving the lost credit, stating the men and money that would be required for recapturing Salsette. The writer also suggests that both Nana and Bapu should be present on the spot with ample funds, in which case only there are chances of defeating the enemy. This letter seems to have evoked the orders in No. 181.*

No. 192] [*January 1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत केसकर स्वामीचे सेवेसी

पो नारो आपाजी सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत गेले पाहिजे विशेष. साष्टीस इंग्रेज बसला आहे याजकरितां शहर सुरत येथील बंदी करणें व मोगल व इंग्रज यांस तिकडे पायबंद जरूर पोहचला पाहिजे वगैर कितेक मजकुराचे पत्र सरकारचे तुम्हांस सादर जाहाले आहे. त्यास येथून राजश्री बहिरोपंत मेहंदळे यास सरकारातून पाठविले आहेत; तरी तुम्ही फौजसुधा यांस कुमक चांगली करून सनदेप्रमाणे सरकारकाम करावें. सारांश हे माहीत आहेत. समयोचित सांगतील त्याप्रा पूर्ती बंदी करणे.

---

१ पत्र विसाजी कृष्णाचें.

गोविंदरायांकडील कामापेक्षा हे काम अधिक आहे. सर्व गोस्टी सोडून लिहिल्या-प्रो आधी करावे. हे केले असतां श्रीमंत संतोशी होतील. कळावे, बहुत काये लिहिणे कृपा असो दीजे हे विनंती.

¶*Naro Appaji asks Naropant Keskar to hold the English and the Moghul in check at Surat so that they might find it difficult to conduct operations at Salsette.*

No. 193] [*January 1775*

श्री

सेवेसी विज्ञापना विशेष. सविस्तर मजकूर रा गंगाधरपंत निवेदन करितीलच. सारांश साष्टीस टोपीवाले याचे मातबर सामान लोक बंगाला वगैरे जागाहून लोक आणविले आहे, ते येऊन पोहचल्यानंतर मग भारी पडेल. जागा साष्टीसारखी बळकट आणि टोपीवाल्याचा बंदोबस्त हा सविस्तर अर्थ ध्यानांत आणोन सरकारची मर्जी साष्टीवर मोर्चेबंदी लौकर करोन ठिकाण हस्तगत करावे. फौजा गाडदी रा होतच आहेत. सांप्रत टोपीवाले यांचा सरंजाम सर्व पोहचणे तर या प्रांती त्याची ठिकाणे सुरत व भडोच. त्यांत सुरत मातबर शहर, जे समई जो सरजाम लागेल तो पोहचेल, याअर्थी येथील बंदी करोन पायबंद द्यावा. येणे-करोन येथोन लोक सरंजाम मदत इकडील वेधामुळे मुंबई साष्टीस जाणार नाहीं. याजविसीचा विस्तार पत्री कोठवर ल्याहावा. सर्व मारनिले गंगाधरपंत सांगता कळेल. या कामाची फारच निकड, याजपेक्षां तिकडील कामकाज आधिक पडल्यास आपण खासा झाडोन फौजनिसी यावयाचे न बने तर हजार स्वार चांगले देवावे. आम्हास आज्ञा करावी. इकडील बंदोबस्त होईल. आपण यावे हे तर आधिकच; परंतु सोई कामकाजामुळे न पडे तर हा विचार. सारांश मातबर फौजा त्या कामास आहेतच. इकडील काम निदानपक्ष पायबंदाचे हजार फौजेने होईसे, आणि जरूरीचे खामखा आपण यावे. तिकडेस हजार पांचशाकरितां भरणा कमी होत नाहीं; आणि येथील तर शह देऊन तूर्त साष्टीचे मसलतीस उपयोग पडतो. साष्टीचेहि मसलतीचे आगत्य. फौजा रा होत आहेत, त्यांतील हेहि काम, बडोद्याचा वेध चुकला. आत:पर आपण लौकर कूच करोन या प्रांती यावयास अनमान न करावा. विस्तारे किती लेहू; परंतु यांत सरकार-काम फार आहे. सविस्तर सरकारची पत्रे आहेतच. विदित होईल. जसी

आज्ञा कराल त्याजप्रो वर्तेन. लक्ष प्रकारे आपण यावे. नाही तेव्हा हजार राऊत तरी सत्वर रा करावयास आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer requests the Peshwa to arrange without any delay an attack on Salsette before the English receive reinforcements from Calcutta. He further advises a strict blockade of Surat and Broach so as to prevent the enemy firmly establishing himself at Salsette.*

No. 194] [*1775?*

[पहिले दोन बंद गहाळ.]

कापासून कोस दीड कोस मागे सरोन राहिलो होतो. तेथेच राहावे. जमयेत तेथेच पाडावी. शह सोडू नये येसा विचार होता. ऐशास राजश्री बिसाजी केशव यांची पत्रे येका दिवसी तीन आली. त्याच्या नकला करून पेसजी सेवेसी पाठविले आहेत. त्याजवरून विदित होईल. तेव्हा साष्टी व वसई दोन जागे नामी. येक जागा गेली. दुसरी गेल्याने ठीक नाहीं. सर्व प्रकारे वसईची कुमक करावी आणि येथीलहि शह सोडू नये ऐसा विचार करून विसाजीपंत याच्या जलदीवरून दीढ हजार फौज [अपूर्ण]

¶*This is a fragment of a long letter describing the movements of Visaji Keshav for defending Bassein.*

No. 195] *3-2-1775*

पो छ ११ जिल्हेज खमस

श्री

श्रीमंत रा पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विसाजी केशव क्रा सा ना वि ता छ २ जिल्हेजपावेतों स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. छ २७ जिलकादचे आज्ञापत्र साष्टीचे टापूंत उतरावयाविसी सादर जाहालें त्यास येविसीची सविस्तर विनंती रा नारोपंत नाना याचे पत्री लेहून सरकारचे खिजमतगारासमागमे रवाना केले आहे त्यावरून विदित * होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Keshav acknowledges the Peshwa's order to proceed to Salsette.*

5919

[पहिले तीन बंद गहाळ.]

मागे दोन चार वेळ श्रीमंतांस पुण्यास लेहून पाठविले होते कीं पाच इंग्रेज कोसलदार सरकार ममतेचे आर्जवले आहेत, त्याजपासून सर्व हरद्र कल्ते. पौ द्रोम इंग्रेज बाहेर आहेत, तीन मुंबईस असतात. त्यास बहुमानाची पत्रे व भेट पाठविली पाहिजे. उपयोगास पडेल. ते मर्जीस न आले. हाली सेवकाचे शत्रू जाले. असो. सर्व प्रेत्न करून जजीरकर खोकरीस आहे त्याजवर छापा घाहून धरून न आणिल्यास मुल्की दंगा पुरवतप्रो होईल व गावची जाल भाज करील, असे सूत्र इंगरजाचे जाले आहे. हे बातमी आतील येक मुनसी * * कर खुद इंग्रेज आमचा पहिलेपासोन मैत्र व सरकारममतेचा याणी मजपासी गुह्यात सागितले आहे. यास्तव जलदी करावी. मारनिले मुनसीस मुगसे व सेला किंमत रुो पंचविसाच आम्ही काल दिल्हे. पांडू लकडे यास ठाऊक आहे. मुनसी याणी गली पडोन सागितले आहे की, जुने भात गेले सालचे काला वरगल अथवा राजावल याचे तांदूल करून मण दाहापावेतो जरूर दोहो चौहो रोजात आणविले पाहिजेत. ऐशास कृपालु होऊन येविसीची आज्ञा केली पाहिजे. सेवकाकारणे से दोनशे घोडे व पाच सा मण चिच. साष्टीचे घाट खापरे पलीकडची रयत गरीब कुणार त्यास तसदी नसावी. पुडे सरकारची नुकसानी होईल. सुरतेचा काफला आला, त्यामध्ये वर्तमान चौलास आले आहे की, श्रीमंत काठेवाडात पलोन गेले. पाठीस सरकारची फौज लागली आहे. तेणेकरून इंग्रज श्रमी बहुत जाला असे. व लोक समजीवीस बोलतात की, श्रीमत फौजबंदी करावयास गेले. फिरोन येतील. राजश्री आनदराव सुभेदार व दौलतराव याजकडेस वेसावेकर कोली याचे सूत्र लागले आहे ऐसीजे. आपली मुले माणसे व वित विषय माहागिऱ्यामध्ये घालून वसईस जावे. * गोष्टीचा पुर्ता भरवसा जाल्यास मागाहून सेवेसी विदित केले जाईल. सेवक अडचणीत आहे. कसा निभाव मुलामाणसाचा होईल हे न कले. येविसी पेशजी विनंती केलीच आहे. महमद सफी इंग्रजाचे समागमे साष्टीस गेला आहे. देखरेख व मुलकी चौकसी करून दाखवितो. इंग्रज उघडे बोलतात की, समर्थास प्रथम चालवावयाचे नव्हते हे घडून आले. आता जसी फूट फावेल व मर्दी होईल तसी दोही तिही ठिकाणावर हला करू. येशवंतगड व धारावी व साष्टी येथे चुन्याच्या माहागिऱ्या दररोज पाठवीत आहेत. किल्याची व बातेऱ्याचे कामाचे मरामतीस आरंभ केला असे. पांडू लकड्यास अश्वासन दिल्यानंतर काल त्याचे येक गलबत भरीत जाले होते; परंतु जाऊ दिल्हे नाही.

मना केले व कांही माल जिनस सावकारी डब्यात भरिला होता, तो मांडवीत अटकाऊन ठेविला. इंग्रजाजवल मारनिले पांडू लकडे पुसावयास गेले, हे काय? त्यांनी जाबसाल केला की, मुंबईचे बंदरीची पनवेलीस व नागोठणे यास पंचवीस गलबतें अटकाविली आहेत, त्यास दोन महिने जाले येत नाहीत. ती गलबते आणून दिल्ह्यास तुमच्या गलबता(स) जावयाची आज्ञा होईल. पुणेकराचे वित विषय पूर्वी गडबडीमुले मुंबईस आले आहेत. कोठे कोठे आहे त्याचा शोध करितात. दिवसानदिवस असा विचार घडतो. आज धारावीस दुसऱ्या तीन तोफा त्याच प्रतीच्या रवाना जाल्या; व उरणास सेख अली येऊन दुसरे पंनास माणूस मजबुदीस घेऊन गेला. छ २ जिल्हेज सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*In this mutilated letter the writer who appears to be a Maratha spy in Bombay reports news he gathered there. He refers to Dada's flight towards Kathiawar and the enemy's preparations for an attack on Dharavi and Yeshwantgad.*

No. 197] [*5-2-1775*

पौ छ ११ जिल्हेज खमस.

श्री

शेवेसी विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ४ जिल्हेज वर्तमान यथास्तित असे विशेष. चापांचे बंदुकांच्या गारा पुण्याहून तोफखानापैा सुमार २००० दोन हजार गारा वोझ्यास कामाठी देऊन परसोजी पदाजी जासूद जथे बाबाजी नाईक याजबराबर रवाना केल्या, त्या छ ३ जिल्हेजी स्वारीं मजकुरीं येऊन सदरहू दोन हजार गारा पावल्या असेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna acknowledges the receipt of flint for firing guns.*

No. 198] [*8-1-1775*

पौ छ ८ जिलकाद

सुाा खमस पौष.

श्री

सेवेसी विसाजी कृष्ण साां नमस्कार विनंती. ताा छ ९ जिलकादपावेतो येथास्तित असे विशेष. स्वामीनी छ १ जिलकादचे आज्ञापत्र सादर केले ते

छ ३ मिनहूस पावले. पत्री आज्ञा जे, सार्ष्टाचें ठाणे इंग्रेजानें घेतलें, त्याचे पारपत्य करून ठाणे सरकारात घ्यावें लागतें. यास्तव येथून मार्तंड तोफ व माहाकाली तोफ वगैरे तोफा पाठवाव्या लागतात. त्यास तुम्हाबराबर कारखान्याचे लोक दर्यावर्दी व खलासी वगैरे आहेत, त्यांपैकी खलासी व दर्यावर्दी व बेलदार व तबेलदार मिलोन तीस असामी पत्र पावताच पुण्यास रवाना करणे; व गाडदी नवे ठेवावयाचे, त्यास बापूजी हरि गाड्याचे माहितगार. याजकरिता मारनिलेस जलद पाठवावे म्हणून आज्ञा. त्यास, मारनिलेची रवानगी गुरुवारी छ २ जिलकादी येथून केली आहे ते सेवेसी येऊन पोहचलेच असतील. वसईकडे गडबड जाली होती याजकरिता येथून दर्यावर्दी व खलासी व गोलंदाज व सुतार, लोहार वसईस पाठविले होते, ते हाली आपले आज्ञेवरून वसईस पत्र पाठऊन, गोलंदाज मात्र तेथे ठेऊन, वरकड माणसे येथे आणविली आहेत. येथे आली म्हणजे सेवेसी रवाना करितों. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna sends according to Nana's instructions some men to Poona to take over the big guns Martand and Mahakali for recapturing the fort from the English.*

No. 199] *[10-2-1774*

पौ छ ९ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

पो आनंदराव राम मुा सास्टी सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ २८ जिलकादपर्यंत येथास्थित असे विशेष. आपले पत्र आले ते छ २७ जिलकादी पावले. पत्री लिहिले की श्रीमंत सौा पार्वतीबाई व मातुश्री गंगाबाई पुण्याहून निघोन राजश्री सखारामपंत मिलोन किले पुरंधरास आलो. तुमचे तालुकेयाचा बंदोबस्त केलाच आहा, त्याप्रमाणे पका करणे. बंदर किनारे याचे नापडीक जागे आहेत. जागाजागाची सावधता करून हुशार राहावे. तुमचे वडिलानी येकनिस्टपणें सेवा करून आमरणापर्यंत येकनिस्टताच संपादिली; त्यांचे तुम्ही पुत्र असे जाणोन कैलासवासी श्रीमंतानी तुम्हाकडे सास्टी ठेविली. कारभारी लोक जुनेच आहेत. कोणेविसी चिंता न करितां स्थलाचा बंदोबस्त राखोन वर्तमान लिहीत जाणे म्हणोन लिा त्याप्रमाणे तीर्थरूपानी येकनिस्टता संपादिली तेच लक्ष धरून, किले कोटाचा बंदोबस्त केला आहे. इंगरजाकडील बातमी राखली आहे. अधिकउणे वर्तमान कलल्यास वरचेवर लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Anandrao Ram to Nana Fadnis, assuring him of his readiness to defend Salsette and the territory surrounding it to the last*

No. 200] [15-2-1775

पौ छ १९ जिल्हेज
सुा सन खमस माघ.

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी गो

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. राजश्री विसाजी कृष्ण याणी आपले पथक मात्र घेऊन यावे, किंवा आणखी काही पथके घेऊन, कर्नाटकात जावयासी यावे हे लिहून अद्याप मारनिलेस गेले नाही; व बालाजी विश्वनाथ कारकून फडणिसीकडील विसाजी कृष्ण याजसमागमे गेले आहेत, त्याणी यावे किंवा तेथे फौजेत सिवाजी विठल याजवल राहावे, येविसीची आज्ञा होईल त्याप्रमाणे करून म्हणोन लिहिले ते कलले. त्यास विसाजी कृष्ण याणी निघोन यावें असे पत्र गेले नाही. क(र्नाटका)त जावे लागेल याचा विचार करून लेहून पाा (पाहिजे) म्हणौन पत्र गेले आहे. त्याचा जाब आला नाही. आल्यावर तुम्हास काय ते लेहून पाठऊ. याप्रमाणे करणे. तूर्त फौज कोकणात आहे तसी असो देणे. जाणिजे छ १४ जिल्हेज सुा खमस सबैन मया व अलफ. +याचे उतर सकालच लिहिले आहे. हे विनंती.

¶*Naro Appaji is informed that no communication has been sent to Visaji Krishna asking him to proceed to Karnatak. He should therefore stay where he is, adds the letter.*

No. 201] [22-2-1775

पौ छ २९ जिल्हेज
फाल्गुन खमस सबैन

श्री

पुा राजश्री नारोपंत नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. काल छ २० जिल्हेजी मुंबईहून बातमी आली जे, श्रीमंताचे सूत्र पेशजी इंग्रेजाकडे येऊन कारमदार जाहाला जे, इंग्रेजानी श्रीमंताची मदत करून पुण्यास नेऊन सर्व बंदोबस्त राज्याचा करून द्यावा; आणि श्रीमंतानी इंग्रेजास साष्टी बसई कोपीनीस जागा राहावयास द्यावी. त्यास प्र तुत साष्टी त्याणी घेतलीच आहे. श्रीमंतांस त्याची कुमक पोहचून पुण्यास आलियावर वसईहि त्यास द्यावी असा तह ठरोन, इंग्रेजानी पांचसातसे गोरे, व आणिखी

+ या पुढील मजकूर सखाराम बापूंच्या हातचा.

माणूस, व लाहान तोफा माणसानी उचलावयाच्या पंधरा वीस, व लाहान गरनाला दाहा पाच वगैरे सरंजाम गलबतात भरोन भडोचेकडे गेले म्हणोन लिहिले आले. त्यास प्रस्तुत वारा उतराण आहे. इकडून तिकडे गलबते लौकर चढत नाहीत. दाहा पंधरा दिवस भडोचेस पोहचावयास लागतील. तेथून खंबाईतवाले यांचे त्याचे येकसूत्र जाहे. खंबाईताकडून श्रीमंताकडे जाणार. तिकडे हे जाऊन पोहचल्यावर कांही जड पडेल त्याचा जमाव जथेल याजकरितां लिहिले असे; तरी इंग्रेज भडोचेस पोहचला नाही तो तुम्हांस जो बंदोबस्त होईल तो तुम्हीं करणें, व हरिपंत तात्यांस लेहून पाठवणे म्हणजे तेहि बंदोबस्त करितील. आम्ही येविसी त्यांस लिहिले आहे. कलावें; इंग्रेज श्रीमंतास मिलाल्यावर आपले मसलतीस जड पडेल याजकरितां लिहिले असे; तरी इंग्रेज कोठे उतरतो, कोण्हीकडून श्रीमंताकडे जावयाचे करितो येविसींची बातमी तुम्ही राखून, हरिपंत तात्या यांस लेहून पाठवावे. मुंबईकरानी फार लबाडीच्या गोष्टी आरंभिल्या आहेत. त्यास याची बातमी राजश्री हरिपंत तात्यास कलऊन त्याणी बातमी राखोन पायेउतारा जेथे इंग्रेज होतील तेथे खंबाईतापासी घालून लुटून मारून टाकावे. दीड हजार आहेत. इंग्रज पाठीवर घेऊन मागोन दोन टोल्या घालून मारावा. काम साधेल समोर जाल्याने त्याची कवाईद आगीपुढे आमचे माणूस टिकत नाही. तुम्ही तो जाणतच आहा याप्रो लिा पत्र उतर आणऊन पाा द्यावे. जासूद तुम्हाजवल कोणे ठिकाणी कितवे दिवसी पोहचतो, रवाना कोणे दिवसी कराल ते लिहावे. राा छ २२ जिल्हेज बहुत काये लिहिणे. लोभ कीजे हे विनंती.

¶*The writer reports news regarding secret negotiations between Dadasaheb and the English who offered to help the former to the Peshwaship in return for Salsette and Bassein. The writer therefore asks Naropant Nana to lose no time in stopping the English from proceeding to Broach and join hands with Dadasaheb.*

No. 202] [*23-2-1775*

पौ छ २८ जिल्हेज खमज सबैन.

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नारोपंत-
नाना स्वामीचे सेवेसी

पो विसाजी कृष्ण कृतानेक सां नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लिहीत जावे विशेष. आपण पत्राचे उतर छ ९ जिल्हेजचे बडोद्यानजीकचे मुकामचे पाठविले ते छ २० मिनहूस पावोन संतोष जाहाला. लिहिला माार सविस्तर कलों आला. आम्ही फौज सुधां गुजराथेत आलों.

5924

नरोतम किशोरदास यांस धरिलें. सोनगड व्याहारं दोन ठाणी राजश्री गोविंदराव गाईकवाड याजकडे होतीं ती घेतली. पुढे सुरतेची बंदी करावी तो श्रमिंत बडोद्यास येऊन, गोविंदराव गाईकवाड यांस भेटले. उभयतां मिलोन दाहाबारा हजार फौज आहे. पाठीवर राजश्री हरिपंत व होलकर सिंदे पंनास हजार फौज-सुधां येतांच महीपार जाऊन खल्या धरून बसले. सुरतेची बंदी करावयास राजश्री बालाजी खंडेराव पुरंदरे व पागा व बलवंतराव धोंडदेव व पांचसे स्वार गाईकवाड यांचे निसबतीचे ठेविले आहेत. आम्ही हरिपंतास भेटलों. दोनच्यार दिवस राहून माघारे फिरोन सुरतेस येऊन बंदीचा बंदोबस्त करून लेहून पाठवितों म्हणोन लिहिलें. त्यास, तुम्ही सुरतेस येऊन बंदीचा बंदोबस्त केलाच असेल. ऐशास कसकसा बंदोबस्त केला ते सविस्तर लेहून पाठवावे. राजश्री हरिपंत तात्या याचे पत्र घेऊन पाठविले ते पावले; व त्याजकडील तपसिलवार वर्तमान उभयता सरदाराचे स्थितिरीतीचे वगैरे तपसिलवार लिहिले ते कलले. ऐशास तात्या होलकरसिंदेसुधा महीआलीकडे होते व श्रीमंत पलीकडे होते. इकडून सुलतानजी लांबहाते मध्यस्त गेले होते व तिकडून सदासिव रामचंद्र व आबाजी माहादेव आले. सेवट तह न बनला. कृत्रिम पाहून त्यास लाऊन दिल्हे. तात्या सडी फौज करून दुसरे उताराने महीपार जाणार म्हणोन लिहिले. त्यास, फौजा महीपार उतरल्या न उतरल्या पुढे काय वर्तमान जाहाले असले ते लेहून पाठवावे. तुम्ही प्रस्तुत कोठे आहा, सुरतेनजीक येऊन बंदीचा प्रकार केला न केला, कसकसा बंदोबस्त केला, ते सविस्तर ल्याहावें व राजश्री हरिपंत तात्याकडील बातमी आण-ऊन आम्हास लेहून पाठवीत जावें. इकडे साष्टी घ्यावी हे मसलत होत आहे. पुढे होईल ते वर्तमान लिहीत जाऊ. रा छ २२ जिल्हेज. बहुत काये लिहिणे, लोभ आसो दीजे, हे विनंती

¶*Visaji Krishna enquires of Naropant Keskar whether Sindia, Holkar and Haripant have crossed the Mahi, pursuing Raghunathrao, and whether the negotiations with Raghunathrao have been carried on with any success.*

No. 203] [*5-3-1775*

पौ छ ९ मोहरम फालगून
मास खमस सबैन.

श्री

अखंडितलक्ष्मीआलकृत राज-
मान्य राजश्री नारो **आनंदराव**
गोसावी यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सबैन मया व अलफ. तुम्ही राजश्री हरि बलाल याजपासून निरोप घेऊन सुरतेस आला. उतम केलें.

सुरतेची बंदी केलीच आहे, ते पकी बंदी करून बंदोबस्त राखणें. भडोजची बंदी जाली पाहिजे. त्यास तुम्ही केली आसालियास उतमच आहे. केली नसली तर पत्र पावतांच भडोचची बंदी आधी करणे. दोन्ही ठिकाणची बंदी चांगली करून बंदोबस्त करणे. चोरून शहरातून माल बाहेर येईल जाईल याकरिता वरचेवर खबरदारी करीत जाणे. दोही ठिकाणास पायेबंद चागले तऱ्हेने बसे ते करणे. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब जलमार्गे सुरतेस आले. बारा रोज जाहाले. त्यास कोठे आहेत, काय करितात, समागमे कोण कोण आले, पुढे कर्तव्यता काय, हे वर्तमान मनास आणून वरचेवर लिहीत जाणे. जाणिजे छ २ मोहरम

¶*The Peshwa orders Naro Anandrao to effect a blockade at Surat, and enquires about the movements of Dadasaheb.*

No. 204] [*6-3-1775*

पौ छ ११ मोहरम
सन खमस सबैन.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसीं

विनंती सेवक मोरो बापूजी मुकाम जंजिरे सुवर्णदुर्ग कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ३ माहे मोहरमपावेतों प्रांत मजकूरचें वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचें आज्ञापत्र छ २९ जिल्हेजचें छ २ मोहरमी सादर जालें. तेथें आज्ञा कीं तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांची व सरकारची फौज राजश्री हरि बलाल याची छ १९ जिल्हेजीं महीपार बडोद्यालगती लढाई फार भारीं जाहाली. तीर्थस्वरूपांचा मोड होऊन तीनसें स्वारानसीं निघोन भावनगरास गेले. तेथे घोडी व काहीं हती समागमे होते ते सोडून गलबतांत बसून सुरतेच्या बाऱ्यावरी येऊन पोंहोचले. सुरतकर इंग्रेजानी मुंबईस लेहून पाठविलें आहे. मुंबैहून जाब गेल्यानंतर सुरतेस आणितील किंवा मुंबईस आणितील. बहुताअर्थे मुंबईसच आणितील, याप्रमाणे लेहून आलें आहे; तरी तुम्हीं आपणाकडील जागे जंजिरे याची खबरदारी करून हुशार राहाणे. राजश्री जानराव धुलप यास पत्र पाठविलें आहे. हे तुम्हांजवळ पावते क्षणी माहागिरी देऊन मशारनिले धुलप जेथें असतील तेथें पोहचाऊन जाब आणून हुजूर पाठवणें. धुलप आरमारसुधां तुम्हांजवळ आल्यानंतर तुम्ही दाहाखंडी दारू आरमारास देणे. आरमारावर

दारूचें सामान माफक आहे सबब लिहिल्याप्रमाणें दारू देणे. वरकड आरमारचे बेगमीस दारू हुजरून तुम्हाकडे रवाना जाहाली आहे. जलदच तुम्हां-जवळ येऊन पोहोंचेल. त्यापैकीं तुम्ही अरमाराकडे दारू घ्याल तितकी मुबदला घेणे; परंतु आरमार पोंहचते क्षणी दारू देणे म्हणोन आज्ञा. ऐशास आज्ञेप्रमाणे जंजिरा आदिकरून प्रांत मजकूरच्या जागेयाचा बंदोबस्त उत्तम प्रकारें करून हुशार असों. राजश्री जानराव धुलप यांस आज्ञापत्र होतें ते येथें येतांच माहागिरी देऊन त्यांजकडे रवाना केलें आहे. जाब आला म्हणजे शेवेसीं पाठवितों. मशारनिले धुलप आरमारसुधां तुम्हांजवळ आले म्हणजे दारू देणे. हुजरूनहि आरमारास दारू तुम्हांकडे रवाना केली आहे ते जलद पाा येईल म्हणोन आज्ञा. तर येथील दारूचे सामानाचा मजकूर पेशजींच शेवेसीं लिहिला आहे. तथापि मशारनिले आरमारसुधां येथें आलियावर आज्ञेच्या अन्वये दारू देऊन रवानगी करितों. पत्रदरशनीं निकडीनें त्याणीं येथें यावें. नसेल सामान तें सर्व येथून घ्यावें म्हणून लिहिलें आहे. हरयेकविसीं येथें आहे त्यांतील त्यास लागला तो सरंजाम मागेंहि दिल्हा, हालीं आज्ञेप्रमाणे देतों. येथील आरमार धुलपांसमा-गमें आहे, त्याप्रमाणेच त्याजपासीं विजेदुर्गास आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Moro Bapuji Phadke informs the Peshwa of a skirmish between Haripant and Raghoba in which the latter was defeated. The writer further requests that Dhulap should be supplied ammunition when he joins with his fleet.*

No. 205] [*19-3-1775*

पौ छ २१ मोहरम

फाल्गूण मास

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री
नारो आनंदराव गोसांवी यांसी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुाा खमस सबैन मया व अलफ. तुम्ही छ ९ मोहरमचे पत्र पाठविले ते छ १९ मोहरमी पावल. लिहिले वर्तमान सविस्तर विदित जाहाले. सुरतकरानीं रात्रौ बाहेर येऊन छापा घातला; परंतु आपण बातमी राखोन खबरदार होतो. बातमी कलतांच सावध होऊन त्याचे बाजूस उभे राहिलों. मागे नदी, यामुले इलाज चालिला नाहीं. सारे सुखरूप आहो. बंदीमुले जागां जागां स्वार ठेविले होते ते सारे जमा करून येके जागा

होऊन, गनिमी करितां म्हणून लिहिले ते कळले. उतम आहे. जे करणे ते बातमी चांगली राखोन बहुत सावधतेने करीत जाणे. तुम्ही शहराजवळ होता, त्याचा छापा आला आसतां सावधगिरीने सारे संभाळून निघाला, फार चांगले केले. तुमचे सावधगिरीविसीं निशाच आहे. फार खबरदार राहाणे. बातमी चांगली राखणें. शहरची बंदी करणे आणि वर्तमान वरचेवर लिहीत जाणे. तुम्हांकडे फौज पाठवावयाविसी हरिपंतास लिा आहे. तुम्ही पत्र लेहून फौज आणवणे. खर्चास नाहीं, आज्ञेसिवाय उठोन येता न ये म्हणौन लिा. त्यास; उठोन यावयाचे नाहीं, तेथेच राहाणे. खर्चास पाहिजे त्यास, सुरतेभोवता इंग्रजाचे माहाल व मोगलाचा यैवज माहाली आहे व भडोचचा यैवज माहाली आहे तो तुम्ही घेऊन खर्च करणे. मोगलाचा यैवज माहालचा घेणे. कोणेविसी दिकत नाहीं. जाणीजे. छ १६ मोहरम

¶The Peshwa congratulates Naro Anandrao on his success in the counter-attack on Surat which he led and asks him not to leave the place on any account and to raise money from the English and Mughal districts for his expenses.

No. 206] *[30-3-1775*

पौ छ ११ सफर चैत्र
मास सन मजकूर मुा
नजीक उरपाड सायंकाल
रवाना कासीद.

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री
नारो आनंदराव गोसांवी यांसी,

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुा खमस सबैन मया व अलफ. तुम्ही छ १७ मोहरमचे पत्र पाठविले ते पावले. लिहिले वर्तमान विदित जाहाले. सुरतेचे बंदीचे वगैरे कितेक तपसिले लिहिले ते सर्व कळले. फौजेस खर्चास नाहीं, शहरची बंदी केलियास कमाविसदार चोरून माल शहरांत पोहचाऊन देतात, बंद केल्यास रसदा पुण्यांत भरल्या, सर्वस्वे बुडालो असे हाका मारितात, आइकत नाहीं, शहरांत जिनस मागेच त्याणी बेगमीचा नेला, जलमार्ग त्यास मोकला, आतां बंदी करून फलहि नाहीं म्हणौन तपसिले लिहिले ते कळले. यैशास, येथील शह सोडतां येत नाहीं. गायेकवाडाकडे सरकारचा यैवज येणे, त्याबदल त्याचे माहालची जप्ती तुम्हांस सांगोन जप्तीच्या सनदा पेसजी पाठविल्या आहेत.

त्याप्रमाणे गायिकवाडाचे माहालचा कुल आमल जप्त करून, यैवज जमा करणे. सरकारचे व सरंजामी याचे माहाली मोगल व इंग्रजाचा हिसा आहे तो जप्त करून तुम्ही घेणे असे पूर्वी तुम्हांस आज्ञा केलीच आहे. हाली माहालचे कमावीसदारास मोगलचा व इंग्रजाचा हिसा तुम्हांकडे द्यावयाविसीं पत्रे सादर केली आहेत. यैवजाची याद पाठविली आहे त्याप्रमाणे यैवज वसूल करून घेणे. तुम्ही यावयाची उतावली न करणे. न येणे. तेथे राहून पैका घेऊन बंदोबस्त करणे. राजश्री हरि बलाल याणी तुम्हांकडे चांगोजी कदम यास पाठविले आहेत ते आलेच आसतील. पहिली तुम्हांजवलची फौज व चांगोजी कदम मिलोन फौज फार जाहाली. तीर्थस्वरूप दादासाहेब सुरतेहून गेले. आतां इंग्रजाची जबरदस्ती विशेष नाही. तरी लिहिल्याप्रमाणे बंदोबस्त करून यैवज वसूल करणें. जाणिजे. छ २७ मोहरम

¶*The Peshwa orders Naro Anandrao to continue the blockade at Surat and to confiscate the Mahals of the Gaikwad.*

No. 207] [*March 1775*

नकल

श्री

अजम अनंदराव जिवाजी

सलाम हु

ॐ गुल हरते बेबन तव्र हमाजी गुलगुचे द द मे काम रानी बुलद आणिज खमस मोस्टीन इसकोइर सलाम महवल मकसूद अंकी येथील खैर अफीयेत कलमे कारत जावें. दिगर मोहिबी किताबत पाठविली ती खुशबख्ती पोहचून दिल हसल जाहला. मोहब्री आपली खातरजमा असों देणे कीं इजानेबाचें वचनास अंतर केले नाही. इजानेबाचे खात्रदाही * * म पाहती * * * * * * * * च जलदीनें निघोन येणे. त्यास मोहिबचाकरीचा मजकूर मोहीबास ठाऊकाच आहे. कदाचित हुकमाप्रमाणे हरयेक कलम याणें न जाहलें तरी धंध्यातून दूर करितात; त्याजकारतां मोहिबाची मिलाखत घ्यावया अनुकूल जाहलें नाहीं व लेवावयासी फुरसत जाहली नाहीं. साष्टीवर गेले याचा मजकूर सरकार कोपनीस अनुचित मार्ग धरावयासी अगत्य जाहलें. श्रीमंत पेशवे यास लूट करावी यैसें नाहीं. कसें म्हणाल तर फिरंगी येऊन घेणार त्यास दूर करावयास सदरहु जागा घेतों. मोहिबास सरकारात फिरंगी याचा मजकूर मालूम आहे; त्याजकारतां विलाथाहून फौजबंदी घेऊन या सालामधें पाठविले आहे.

आमची स्वारी स्वार जाहलियावर येक दिवस उपरांत फिरंगी याचीं जाहजें येथें पोहचलीं. सदरहु जाहाजाचे सरदार आहेत त्यानी फार हरकत लावली होती, येसी जे ती जागा आम्ही घ्यावी नाहीं; याजकरितां हाच थोर दाखला असें. फिरंगी याचा मनसबा साष्टीवर होतो. इजानेबास मालूम आहे. मोहिबाचे चितामधें सारा वारा समजतील; परंतु असत्य नाहीं. जे मोहिबास लिहिलें तें खरेंच आहे. याकरितां मातुश्री गंगाबाई व पार्वतीबाईस सांगणे कीं हाणराबल कोपनीच्या हातात कीं श्रीमंत पेशवे याच्या राज्यासी दुस्ती चालावी, परंतु साष्टी घ्यावी. काये निमित्य फिरंगी याचा मनसुबा दूर करावा याकरितां अगत्य जाहलें आहे. अजम मुछदी यास किताबत * * * * * * * त्यास सदरहु साष्टीचा मजकूर विदित केला आहे. मोहबा मेहेरबानी करून कांहीं कामकाज असेल तरी फरमावीत जाणें, अंतर होणार नाहीं. इजानब मोहिबाचे जिवलग दोस्त आहेत. ज्यादा काय लिहिणें हे किताबत.

¶Mostyn explains to Anandrao Jivaji Khasgivale that it was to prevent occupation of Salsette by the Portuguese that the English were forced to capture it and thus act against the interests of the Peshwa. They have no motive of aggression beyond this.

No. 208] *[7-4-1775*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री
नारो आनंदराव गोसांवी यांसी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुाा खंमस सबैन मया व अलफ. तुम्ही छ २६ मोहरमचे पत्र पाठविले ते पावले. लिहिले वर्तमान विदित जाहाले. सुरतकर मोगल व इंग्रज व भडोचकर याचा यैवज नेमणुकेचा फौजेचे खर्चास घ्यावयाविसीं आज्ञा जाली. त्यावरून सरकारचे व सरंजामी याचे माहालचे कमावीसदार आणविले आहेत. आज्ञेप्रमाणे यैवज बेजरब वसूल घेतो. येविसीं बोभाट सरकारांत आल्यास स्वामीनी मनास न आणावा. मुरवत केल्यास वसूल होणार नाहीं. येविसी पहिलीच विनंती लिहिली आहे. हाली निक्षूण आज्ञा जाहाली त्यावरून यैवज कोणाची मुरवत न धरितां घेणे प्राप्त आहे म्हणौन तपसिले लिहिले ते कलले. ऐशास, मोगल व इंग्रज याचा सालाबाद नेमणुकेचा यैवज सरकारचे व सरंजामी याचे माहाली आहे, त्यांत सालमजकुरी त्यांजकडे वसूल पावला असेल त्याची चौकशी करून बाकी राहिला ऐवज वसूल घेणे. मोगलाचे इंग्रजाचे दरोबस्त गांव माहाल आहेत, त्यांचा यैवज देखील भडोचचा

मुल्ूक ऐवज वसूल घेणे. वर्तमान वरचेवर लिहीत जाणे. नेमणुकेच्यां यैवज चौकसी करून घेणे. त्याचा बोभाट आलियास येथे आइकणार नाहीं. जाणिजे. छ ६ सफर. बहुत काये लिहिणे.

¶*Naro Anandrao is authorized by the Peshwa to collect revenue from villages under the jurisdiction of the English and that of the Mughal subha in the districts of Surat and Broach.*

No. 209] [*15-5-1775*

पौ छ २६ रावल खमस

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक येसाजी सिवदेव कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना. ता। छ १४ रावलपावेतो स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आपण पत्र पा। ते पावले. तेथे लिहिलें कीं, तुमचे येकनिष्ठतेचा सविस्तर मजकूर राजश्री त्रिंबकपंत याणी लिहिल्यावरून सविस्तर कळला. खातरजमा जाली. तुम्ही श्रीमंत मातुश्री बाईसाहेबाजवळ करार केल्याप्रो। निष्ठेने वर्तणूक करावी. इकडून दुसरी गोष्ट होणार नाही. खातरजमा आसो द्यावी म्हणौन लिहिले. त्यास श्रीमंत बाईसाहेबापासी जे प्रमाण केले आहे ते प्रमाणच आहे. त्यात आन्यथा वर्तणूक केल्यास इहलोक परलोक उतम होणार नाही. विस्तारे काये लिहू ? स्वामीचीं खातरजमा सेवकाचे वर्तणुकेविसी जाली असतां चौकी उठत नाही, हे अपूर्व आहे. आसो रुणानबंध प्रमाण. सुखदुख ज्या समई जसे प्राप्त होईल तसे भोगिल्यावाचून सुटकाच नाही. सर्वज्ञास आज्ञान काये लिहिणे ? ऐवजाविसी त्रिंबकपंत लिहितील. निकड आहे म्हणौन लेख. त्यास ऐवजाच्या भरण्याचा प्रकार सर्व रा। त्रिंबकपंत बाबास लिहिला आहे. हे आपणास लिहितील त्यावरून विदित होईल. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Yesaji Shivdeo expresses regret as to why the guard posted on him had not been removed in spite of his good conduct.*

No. 210] [*About 1795*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामचंद्र माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २ रमजानपावेतों सेवकांचे व प्रांत मजकुरचें वर्तमान येथास्थित असें विशेष. प्रांत

वसई इंग्रेजाकडून सरकारांत आली ते समयीं आनंदराव राम याजबरोबर चिंतो बापूजी याचे निसबतीचे अबुदोला जमातदार वगैरे गाडदी असामी दोनशें हुजुरून चाकरीस नेमिले, त्या दिवसापासून जंजिरे मजकुरीं किल्ल्यांत पंधरा वर्षेपर्यंत इमानें इतबारें चाकरी करीत आहेत. व राजश्री सदाशिव रघुनाथ गद्रे कैद जालियाजवर त्याजकडून माहादाजी गणेश कुंठे सुभे याचे कारभारावर होते; त्यांणीं आपलीं मुलें माणसें व चीजवस्त न्यावयाचे बेतांत असतां सेवकास समजतांच त्याचा बंदोबस्त राखिला. त्या समयीं याचे लोकांस चौकी पाहारा ज्याप्रमाणें करावयासी सांगितला तसा करून सरकार लक्ष धरून रातविरात कामास आले असतां, हल्ली राजश्री वामनाजी हरि याजकडून येथें सुभाचे कारभारावर परशरामपंत मराठे आले तें कार्य समजोन मशारनिलेचे गाडदी किल्ल्यांतून बाहेर काढूं लागले. ते समई याविसी त्यास सांगितलें कीं हे लोक पेशजीं किले मलंगड प्रांत कल्याण येथें इंग्रेजाचा वेढा बसला होता तेव्हां किल्ल्यावर होते. तेवेळेस शर्थमर्दी करून सरकारचें ठिकाण स्वामीचें पुण्यप्रतापेंकरून रक्षिलें. मर्द माणूस इतबारी जाणोन येथें नेमणूक केली आहे; व लोकांचेंहि बोलणें कीं आमचे रिसालदार पुण्यास आहेत त्यांस लेहून श्रीमंत साहेबाचे कानावर घालोन आज्ञा होऊन येईल त्याप्रमाणें वर्तणूक करूं. यास पंधरा दिवसाचा अवकाश द्यावा; याप्रमाणें मशारनिलेचें बोलणें पडलें व सेवकानें बहुतप्रकारें समजाविलें. परंतु न ऐकतां त्याचा बाहेर काढण्याविशी बहुत नेट पाहिला व लोकांचाहि स्वामीची आज्ञा आल्याखेरीज न निघावयाचा विचार दिसोन आला. हें समजोन जमादार व कारकून व परशरामपंत यांस च्यार गोष्टी सांगोन विनंतीपत्र लिहिलें आहे, त्यास लोकांनीं चाकरी जेथील तेथें करावी, येविशी ताकीद राजश्री वामनाजी हरि मराठे यास होऊन सेवकास पत्राचें उत्तर द्यावयाची आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ramchandra Mahadeo complains to the Peshwa against the action of one Parashram Marathe, an agent of Vamanaji Hari, in removing the guards from the fort of Bassein and requests him to recognise their past services and reinstate them*

No. 211] [*19-11-1776*

पौ छ २९ सवाल सबा
सबैन कार्तिक

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक मोरो बापूजी मुकाम जंजिरे सुवर्णदुर्ग कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ ७ माहे शौवालपावेतों येथास्थित असे

विशेष. स्वामीचें आज्ञापत्र सादर जाहालें तेथें आज्ञा, कीं तालुके मजकूरचे अरमार जलदीनें तयार करून राजश्री विसाजी केशव यांजकडे वसई प्रांती रवाना करणें म्हणोन आज्ञा. ते सिरसा; ऐशास तालुके मजकूरच्या बंदोबस्तास सेवक येथे येऊन बंदोबस्त यथास्थित केला आणि बंदर किनारे जागे, गडबडीचे दिवस, या समई आरमारची तयारी सत्वर असावी हें समजोन अरमार सरंजामसुधां सिध करून राजश्री बाजी गोविंद रत्नागिरि प्रांताचे बंदोबस्तास खुसकीनें गेले आहेत, त्यांजकडे जलमार्गें अरमारी गलबतें रवाना केलीं असेत. त्यास स्वामीचे प्रतापें करून रत्नागिरीकडीलहि कार्य जालें. गलबतें तिकडेस आहेत तीं आणविलीं असेत. बंदरांत येतांच आज्ञेच्या अन्वयें अरमार वसई प्रातें रवाना करितों. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Moro Bapuji of Suvarnadurg agrees to execute the orders communicated by the Peshwa to send his ships duly equipped to Bassein.*

Index to Selection No. 35

The Capture of Salsette by the English

[N.B.—Figures denote Numbers of letters]

A

A—contd.

B

B—contd.

B—contd.

C

D

E

F

G

H

K

K—contd.

L

M

M—contd.

N

N—contd.

P

R

R—contd.

S

S—contd.

T

V

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

३८

इंग्रज-मराठ्यांचें पहिलें युद्ध

[किंमत—१ रुपये ९ आणे किंवा ८ शिलिंग ९ पेन्स]

संपादक—गो. स. सरदेसाई, बी.ए.

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३४

(या प्रकाशनांतील संपादकीय टीका व मतें यांजबद्दल कोणतीहि जबाबदारी सरकारावर नाहीं.)

Selection No. 36

THE FIRST MARATHA WAR (1773-1783).

The course of Maratha History subsequent to the murder of the Peshwa Narayanrao is so fresh in the mind of the average Maratha that any papers dealing with it are naturally most welcome to him. A previous selection has already dealt with the subject of the League of the Barbhais ; but it could not, owing to limitations of space, do full justice to the terrible war which continued for seven long years and in which nearly all the important powers in India were more or less involved. The war is full of stirring incidents not only so far as the Marathas are concerned, but able men like Hastings, Hornby, Goddard and Anderson are seen during its course doing their utmost to extricate the British power out of a tangle which was not altogether of their own creation, but which was a natural consequence of the haphazard growth of that power in India, a factor the very existence of which had only recently been officially recognised by the Regulating Act of Parliament in 1773.

The war spread from one end of India to the other : from the Deccan, Gujarat, Malwa, the Karnatak, and the Central Provinces right across to Cuttack. It has already been fairly described in the Selections from the Records of the Bombay Secretariat published by Forrest, but there are many incidents and details which are for the first time given at length in the four hundred and odd papers which compose the present selection. These supply an almost a day-to-day description of these stirring events and will be scanned with avidity by those students of history who desire to make a special study of the period. They need no lengthy introduction. As not only many historical persons but also a variety of episodes hitherto unchronicled are introduced in these papers they possess a very special interest. Selections 5 and 19 and that dealing with Salsette read in conjunction with this selection form one connected whole containing vivid descriptions of the life of Raghunathrao and the troubles he brought upon the Marathas.

The reader will do well to note that there are three different persons alluded to in these papers under the title Nana : one is the famous Nana Fadnis, the real author of the war ; another is Naro Anand Keskar, a general who along with Haripant Phadke was engaged in vanquishing Raghunathrao, and the third is Naro Appaji, of the Tulsibag fame, who was for long the official guardian of the city of Poona. There are also two Krishnaraos, one Krishnarao Narayan Joshi, Nana Fadnis' agent sent from Poona to the court of Haidar, and another Krishnarao Kale, the Peshwa's agent at the court of Hyderabad. Another important character occasionally referred to is Narottam Kishoderdas, who was the Peshwa's Kamavisdar for the Parganas of Surat and who was arrested and imprisoned for his supposed inclinations to the side of Raghunathrao. The great influence he wielded in Gujerat is mentioned in these papers for the first time.

No. 1] [3-11-1773

पो छ २९ शाबान

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवसी

विनंती सेवक शंकराजी केशव सां नमस्कार विज्ञापना. ता छ १७ साबान-पावेतो मुा पुणे येथे स्वामीचे कृपादृष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. जंजीरकर शामल सालमजकूरचे जमाबंदीची तक्षीम[1] गल्याची व नगदी सालच्या साला आकरा महाल मुत्सील[2] (?) दुतर्फा, याची तक्षीम मागतो. सरकारतर्फेचे माहाल आहेत त्याची जमाबंदी आहे, तो जाजतीचा हिसा नगदी व गल्ला मागतो व गुदस्ताचा अठावीससे खंडी गल्ला बाकी आहे, तो सालमजकुरी द्यावा त्यास तो मागतो, व सालमजकूरचा जाजती आजमास गला अडीच हजार खंडी व नगदी दाहा हजार रुपये त्याचे वाजबी निघतात, याप्रमाणे द्यावे ऐसा गुदस्ता करार जाहाला आहे. याजकरितां तूर्त त्याणें कल्याणतर्फेचे माहालास व ता नानेमावळ व ता पौडखोरे व ता पोनमावळ व ता मुठेखोरे येथें येकदोन माणसे पाठऊन घरे व सेताची उडवी दर गावा एकदोन जाळतात, व गांव पाहोन चाळीस पनास रुा खंडणी घेतात, ते सरकारतर्फेस रयेत लोक देत नाही व मतगड किला व दोहो माहालची त्याची तक्षीम हे कलम त्याणें सरकारात अमानत दिल्हे ते व मागील तेविसा वर्षाची रुजुवाती बाकी मागतो, त्याबद्दल कल्याणतर्फेचे माहाल वगैरा सदरहू माहाल व दाभोळ व राजापूर सुभा येथें खंडणी घेतली. जंजीरकराच्या निरोपानें रयेत रुा देतात. न दिल्हे तरी माणसे मारील व घरे जाळील म्हणोन त्यास पैका दिल्हा. याचा बंदोबस्त सेवकानें करावा आणि जंजीरकर शामल याचे पारिपत्य करावे तरी साहित्य पोख्ते जाले पाहिजे. व सर्व तालुकदार येकचिते जाल्याने व सरंजाम भरपूर असलियाने पारिपत्य सहजच होऊन सरकारकाम ईश्वरी कृपेनें घडोन येईल. तूर्त चार हजार माणूस व तीस पसतीस गलबते ऐसी जंजिऱ्याभोवती ठाणी बसवावी आणि बंदोबस्त करावा व ठाणी बांधोन व नाकेबंदी करून त्याचा परास्त्रम[3] न होय आणि त्यांचे मुत्सील माहाल आहेत ते जप्तीखाली आणावे म्हणजे बंदोबस्त होईल. कैलासवासी रावसाहेबांनी तह केला त्याप्रमाणे तो मागतो व आलीकडे मतगड अमानत सरकारांत दिल्हा तो व दिवे व श्रीवर्धन हे दोन्ही परगणेयाची निमे

---

१ वांटा, हिस्सा. २ ताब्यांतील किंवा जोडलेला. ३ प्रसार, प्रवेश.

तक्षीम तो मागतो. सारांश किले मतगड किला जब्रैन आहे व त्याचे तक्षिमेचे दोन माहाल निमे व गुदस्ताचा अठावीससे खंडी गला व सालमजकूरची अकरा माहाल मुत्सील दुतर्फा त्याची निमे तक्षीम तेहि तो मागतो. यांत तो काही वावगे बोलत नाहीं. याप्रमाणें त्याची विल्हे जालियास तो समजेल व तेविसा वर्षाच्ये रुजुवातीची बाकी त्याची तोडमोड लाखपनास हजारपावत जाली तरी त्याचा चरसा (?) करावा. याप्रमाणे सरकारांतून जाले तरी मग त्यासी बोलणे तरी बोलावे. जंजिरा येणे नाही. मसलत करावी तरी खाऱ्या पाण्यामुळें व मुंबईची खाडी व म्हसाळयाची खाडी व जंजिरे याच्या पाठीमागील दर्या याचा बंदोबस्त होणे नाही, हे समजोन पूर्वी कैलासवासी रावसाहेबी तह केला होता तेसमई मला सांगोन तह करविला. सर्व वर्तमान सविस्तर पहिल्यापासून विदित व्हावे म्हणोन लिहिले आहे. यासी आज्ञा होईल ते प्रमाण. सेवकास खावंदाकडील करार कळला नाहीं, तो त्यासी कोणे रीतीने बोलावे याची आज्ञा जाली पाहिजे. सिबंदी जदीद[२] ठेवावी तरी सरकारात पैसा नाही व कामणचे किल्याचे लोक जमा करावे तरी भरती नेमस्त आहे व लोकांस पांचा रोजमरेतही येथाकाली पावत नाही. लोक श्रमी. जबाब तो पावतच नाही ऐसा किले हायचा विचार आहे. सेवक येथार्थ विचार पाहोन लिहितो. विदित जालें पाहिजे हे विज्ञापना.

¶Shankraji Keshav informs Raghunathrao of the Sidi's demand for a portion of the revenue of the eleven districts and urges that the claim be decided in consonance with the treaty negotiated with him by the Peshwa Madhavrao.

No. 2] [*7-12-1773*

पो छ २२ रमजान

श्रीगजानन

सेवेसी सदासिव अनंत करमरकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. बुनग्यांत पथके नेमली आहेत त्यापैकी येथे आली नाहीत, पथके बितपसील आा :—

७५ मानाजी व फिरंगोजी काले
४६ मलोजी बढे
३३ निंबाजी भोपते
३६ बलवंतराव व म्हालोजी सितोळे
२९ संताजी व जिवनाजी घाटगे.

२१९

---

१ नाजूक, अवघड, खराब. २ नवी.

येकून दोनसे पंधरा स्वार सडेस्वारीत गेले आहेत. त्यास ताकीद होऊन येथे येत ते केले पाहिजे. रवाना छ २२ रमजान. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Anant reports that some 215 Sowars have not returned from the camp and begs that orders should be issued for their immediate return.*

No. 3] [*13-12-1773*

पौ छ २८ रमजान

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य

राजश्री सदासिवपंत दाजी स्वामीचे सेवेसी

सेवक धोंडो माहादेव साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाो विशेष. राजश्री त्रिंबकरावमामा यांचा मुकाम गोलगाव गदाण्यास आजचा जाहाला. आपणहि उदईक बुणगे घेऊन जाणार म्हणोन आइकतो. कदाचित आपला मुकाम येथे जाहाला. तरी कही वाटावरी पाठवावी. इकडे उपद्रव बहुत लागला आहे. बहुत काये लिा लोभ कीजे हे विनंती.

¶*Dhondo Mahadev informs Sadashivpant that Trimbakrao Mama has* ***halted*** *that day at Golgaon in his campaign against Raghunathrao.*

No. 4] [*14-12-1773*

पौ छं ७ सवाल पौषमास

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

सदासिवपंत करमरकर स्वामीचे शेवेसी

पोष्य बाळाजी जनार्दन सां नमस्कार विनंती. उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिो विशेष. राजश्री त्रिंबकरावमामा यांचे स्वारीबराबर तुम्ही आहा. इतके दिवसात येकादे तरी पत्र पाठवावे होतें ते काहीच पाठविले नाहीं. हाली पत्र लिहिले असे. तरी सविस्तर बारीक मोठे वर्तमान लिहीत जावे. तुमची पत्रें आजताा च्यार पांच यावी तें येकहि न आले, हे अपूर्व

5937

वाटलें. याउपर तरी वर(च)वर लिहीत जावें. मामांची मर्जी राखीत जावी. बहुत काय लिहिणे. लोभ असों दीजे हे विनंती. रा छ २९ रमजान मुा मेणवली हे विनंती.

जनार्दन राम यास नमस्कार सांगावे

¶*Nana Fadnis takes Sadashivpant Karmarker to task for not sending frequent communications from the camp of Trimbakrao whom he is accompanying.*

No. 5] [*22-12-1773*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. स्वामीचें आज्ञापत्र आल्याअगोधर नवाबाचेथें बातनी आली, कीं भोंसल्याकडील भेटीचा संदर्भ लागला. येक दो दिवसांत भेटी होणार. त्याजवरून नवाब व रुकनुदौला व सर्वांस संशय आला, कीं श्रीमंताची आमची ऐक्यता काय जाली? आम्ही मोठ्या मोठ्या मजली करीत श्रीमंताचे म्हटल्याप्रमाणें आलों असें असतां, आम्हीं पावल्यापूर्वीच श्रीमंतानी भोंसल्याचा तह केला हे काय? या संशयांत पडले होते तों इतक्यांत कासदासमागमें नवाबास सर्वांस पत्रें आलीं व मजला आज्ञापत्र आलें त्याजवरून याची खातरजमा केली व जाली. नवाबाच्या येण्यांत गुंता नाहीं. नवाबहि मोठ्यामोठ्या मजली करितात. छे[१] ७ रोजीं बारा कोस आले व आजहि बारा कोसांची मजल करावी असें ठरलें होतें; परंतु मार्गी पाणी नाहीं याजकरितां आज हलकी मजल करितील. उद्यां मोठी मजल करितील. स्वामीनी आज्ञा लिहिली कीं नवाबास त्वरेनें घेऊन येणें. त्यास नवाब दरमजल कोठें मुकाम न करितां येतात. नवाबाचे व सर्वांचे चित्तांत स्वामीचे तर्फेनें कोणे गोष्टीचा संशय नाहीं. स्वामीचे वचनाकरितां व मर्जीकरितां सरदाराच्या प्रतीक्षा न करितां, जितकी फौज जमा जाली तितक्यानसीच येतात. वरकडचा कोणे गोष्टीनें गुंता नाहीं. नवाब येतच आहेत. भेटीहि सत्वरीच होतील. हे विज्ञापना.

¶*Dadasaheb is informed of Nizam Ali proceeding to his assistance with rapid marches.*

---

१ सवाल.

No. 6] [27-12-1772

पौ छ १३ सवाल सुा सलास

सबैन

श्री

श्रीमंत राजश्री नाना

फडनीवीस स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक जानराव धुलप मुाा जंजिरे विजयदुर्ग कृतानेक दंडवत् विज्ञापना. ताा छ २ माहे सवालपर्यंत वर्तमान यथास्थित आहे विशेष. अरमार तयार करून वसईच्या बारियावर रवाना करावें म्हणोन आज्ञा होती. त्याजवरून अरमार वसईस राा केले आहे. वसईहून दोनसे खंडी भात अडिसेरीस व सालाबादप्रों तीनसे सोटे देविले आहेत. ते सहजामध्यें नोर पडल्यावाचून अरमारावरून येते. परंतु वसईचे मामल्याचे वालमेलीमुलें दिकत पडेल यास्तव सेवेसी लिहिले आहे. तरी दोनसे खंडी भात व तीनसें सोटे देणे म्हणोन वसईस सनद द्यावयाची आज्ञा करावी व यंदा हेट स्वारीस अरमार जाऊं नये. विजयदुर्गापासून सुर्तेपर्यंत छबिना करावा म्हणौन आज्ञा होती. परंतु सतावीस हजार रुपये बेहेडयास पैदास्त नेमून दिल्ही आहे. ऐशास पैदास्तीच्या यत्नास हेट स्वारीस भारी अरमारचा भरणा गेल्यावाचून पैदास्त होणार नाही. तशामध्यें फिरंगी टोपीकर सख्त गनीम, दर्यात गुदस्तापासून दाव्याखाली पडला आहे. तेव्हां भारी सरंजामावाचून जाता न ये, व येविसीं पेशजी आज्ञा जाहाली होती. पैदास्ती यैवज लाऊन दिल्यामुलें लोकाचा गवगवा होईल. पैदास्त सत्तावीस हजार रुपयाचा मामलतीस तोटा यास्तव लिहिले आहे. तरी मर्जीस येईल त्याप्रों स्वारीची आज्ञा करावी, किंवा सतावीस हजार रुपये दुसरीकडून नेमून द्यावयाची आज्ञा करावी. अरमारचे कामकाजाविसीं राजश्री वासुदेव गोविंद मराठे तेथे आहेत ते विनंती करितील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Janrao Dhulap sends his fleet to Bassein as instructed by Nana Fadnis whom he requests to make provision for the supply of the necessaries for the fleet.*

No. 7] [End of 1773 ?

श्री

पुा श्रीमंताचे शेवेसी

विज्ञापना. नवाब व सर्व लाहाण मोठें नित्यशा विचार घाटीत होते कीं, श्रीमंतासी बिघाड करावा किंवा सख्यच राखावें, हा मार यापूर्वी सेवेसी लिहिला

होता, त्याजवरून विदित जाहाले असेल. समसामुदौला व माा कबीरखां, पातशाही बक्षी व गुलाम सैदखां व रुकनुदौला व माा गौसखां इतक्यांस नवाबानी येकांती बोलाऊन पुसिलें व देवराज हरकाऱ्याचे दरोगे यांसीहि बोलाऊन सर्वांस पुसिलें कीं, श्रीमंतासी बिवाड करावा कीं सख्य राखावें ये गोष्टीचा पुर्ता मनसबा आपले जागा करून सांगा, त्याप्रो कर्तव्य ते करूं, याप्रो नवाबानी सर्वांस पुसिले. त्यास रुकनुदौला प्रामाणिक माणूस व दुरंदेस. त्याचे मनात हाच भाव कीं स्वामीसी सहसा बिघाड न करावा. स्वामीचे नवाबाचे समाधान आंतःकरणपूर्वक व्हावें, आपल्या कारभारास शोभा यावी; नवाबाचे स्वामीचें समाधान उतम प्रकारें जाले म्हणजे दोन्ही सरदाऱ्या आराम पावतील, व मुल्क आबाद होईल. आपलाली कामे समयाचे समयासी करावयासी सुचतील. याप्रो रुकनुदौलाचें मानस. याअन्वये पूर्वी विनंती लिहिली होती व रुकनुदोलाची पत्रे शेवेसी पाठविली होतीं त्याजवरून विदित जाहाले असेल. सारांश रुकनुदौला निर्मल आंतःकरणे आहेत. परंतु नवाबाजवळ व सर्वाजवळ रुकनुदौलास साफ बोलता येत नाही की आमकेच करावे. पाच सात जण मिलतात, तेव्हा नवाबाचे व सर्वांचे भावाप्रो बोलले पा. आंतस्ते नवाबास उचित तेच सांगतात व स्वामीसी बिघाड करून नये, सख्य करावें असेच बोलतात. ज्यापक्षी स्वामीकडील सख्य येथास्थित न होयेच, तेव्हा पुढे उचित जाणावे ते करावें, असे प्रकारे नवाबास समजावितात. समसामुदौला व माा कबीरखां या उभैतानी नवाबास व रुकनुदौलास सांगितले कीं, आपण व श्रीमंतानी आपलाले जागा समजोन ज्यात आकृत्रिम श्नेह होये ते करावे. आपण श्रीमंतासी बिघाड करून हैदरनायेकाची कुमक करितील, तरी ही गोष्ट उचित नाहीं. हैदरनायेकाकडून आपणास नफा काये? तेव्हा गुलाम सैदखान (अपूर्ण).

¶It is doubtful, in the absence of the date, to determine to which campaign this letter refers. The writer informs Dadasaheb from the Nizam's Camp of the vacillating mind of the Nizam as to which side he should support.

---

*No. 8**] [*1766*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे शेवेसी

विज्ञापना. भोंसल्यांकडून भवानीपंत आले आहेत ते जाबसाल काहीं ठीक करीत नाहींत. नवाबानी भोंसल्याचे मुलुकांत जावें अथवा बिघाड करावा तरी स्वामीची मर्जी राहात नाहीं; याजकरितां सर्व गोष्टी स्वामीचें वचनावर ठेविल्या.

* For determining date of letter No. 8 see Nos. 160-165 of Selection 38.

भोंसल्यांकडून नवाबास कांहीं प्राप्त जालें नाहीं. कितेक बाबती भोंसल्याकडे नवाबाच्या वाजबी होत्या त्याहि स्वामीचे मर्जीकरितां येकीकडे ठेविल्या. भोंसले स्वामीकडून फिरून आले; त्यास भोंसल्यांचा मनोदय कीं नवाबास भेटावें, सफाई करावी, असें इसमाइलखानाचे मारफातीनें घाटीत आहेत. त्यास मी रुकनुदौलास व राजश्री जगंनाथपंतास सांगितलें कीं तुम्ही इसमाईलखानाचे म्हटल्यावर भोंसल्यांशीं सफाई कराल तरी अथवा भेट घ्याल तरी श्रीमंताची मर्जी राहणार नाहीं. जर भोंसल्यांसी भेटणेंच आहे तरी अगोदर श्रीमंतास इतिल्ला द्यावी, मग भेटावें. त्याजवरून म्हणों लागलें कीं भोंसल्याची भेट घेत नाहीं. इतक्यावर कोणता प्रकार घडतो तो वरचेवर सेवेसी लिहिण्यांत येईल. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Dadasaheb is informed of negotiations going on between the Bhonsles and the Nizam. "Ruknudaula has promised not to carry on the negotiations if he thereby incurs Raghoba's displeasure," says the writer.*

---

*No. 9**] [*1766*

श्री

विज्ञापना. भोसल्याकडील गृहस्थांनीं यांजला सांगतां हेंहि सांगितलें आहे कीं श्रीमत काबूवर नजर ठेवीत आहेत, तुम्हास जलदीनें बोलाविलें आहे. तुम्ही लवकर न जाल, महिना पंधरा दिवस अधिक आगळे लागले, श्रीमंत व भोंसले युध्ये करोन अथवा सख्ये करोन समजतील; मग तुम्ही याल तर श्रीमंत तुम्हास उत्तर देतील कीं तुम्ही जलदी न आलेत, आम्ही कोठवर वाट पाहावी? जरूर जाणून कोणीही प्रकार केला तेव्हां तुम्हांस भारी जाईल. भोसले उलटे तुमचे शत्रू होतील. मग म्हणाल कीं भोंसल्यांनीं आम्हाशीं सख्य करावें, तर कदापि होणार नाहीं. येणेंप्रमाणें गृहस्थ यांजला पेंचदरपेंच समजावीत आहेत; निदानीं पाहावें काय जाबसाल होतो; परंतु रुकनुदौला जगंनाथपंताचा रोख त्याजकडे फार करून दिसत नाहीं. राजकारणाचे रीतीनें लाऊन ठेवितील तर ठेवोत. हे विज्ञापना. कचेंपकें वर्तमान सेवेसी श्रुत व्हावें म्हणून विनंती लिहिली असें. हे विज्ञापना.

¶*The writer discusses the attitude of the Bhonsles if negotiations were carried on with the Nizam.*

---

* For determining date of letter No. 9 see Nos. 160-165 of Selection 38.

5941

No. 10] [December 1773 ?

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामींचे सेवेसी

विनंति. सेवक नागो सिवदेव साष्टांग नमस्कार विनंति. येथील क्षेम कुशल. स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. पूर्वी विनंतिपत्रें सेवेसीं लिहिली होतीं तीं पावलींच असतलि. आम्ही श्रीयात्रेनिमित्य आलों होतों. आतां श्रीराम क्षेत्रीं आहोत. पूर्वापासून स्वामीच्या आनाचे आहोत. राजश्री सेनासाहेब सुभा याचें वर्तमान तरी आपलीं पत्रें यांस येतात कीं, फौजेसुधां सत्वर यावें. त्यासी यानी आपले तर्फेचे गणेशपंत व सरकारचे नीलकंठ गोपाल सेवेसी पाठविले आहेत कीं फौजेचीं खर्चाची बेगमी व दिल्हे मुलकाची बंदोबस्ती वगैरे काजकामें मुद्यानरूप होतील तर सेवेसीं येऊं. प्रस्तुत वराड प्रांतीं दोन महिने आहेत. यानी मोंगलासी सल्ये करून आहेत. स्वामीकडील जबरदस्ती पाहिलियावर हे पूर्ववत-प्रमाणें मोगलाकडे जाणार. धातुपोशणास्तव येथून पत्रें लिहितात सेवेसीं येतो. परंतु चित्तांत यावयाचा नाहीं. स्वामीच्या उत्कर्शास साहत नाहीं. तेथून राजश्री रामाजी बलाल करनाटक प्रांतीचे व हिंदुस्थान प्रांतीचें वगैरे कितेक बारीक मोठें वर्तमान लिहितात, त्याजवरून याच्या ध्यानास येत नाहीं. सेवेसीं श्रुत होये बहुत काय लिहिणे कृपा लोभ असों दीजे हे विज्ञाति.

¶*Nago Sivdeo to Dadasheb, informing him of the Bhonsle being in league with the Nizam and that he does not wish to help the addressee though he may profess to do so outwardly.*

No. 11] [12-1-1774

पो छ + ८ जिलकाद
आर्बा

श्री

सेवेसीं विज्ञापना. तागायत छ २८ सवालपावेतो मुकाम मौजे देवठाणे परगणे ब्राम्हणी नजिक लोणार येथें स्वामीचे कृपाकटाक्षें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान छ २९ सवालीं जासूद पुण्यास गेले त्याजबरोबर पाठवावयाकरितां पत्र लिहून ठेविलें होतं त्यास जासूद न पुसतां गेले. पत्र आम्हांजवळी राहिलें. त्या आलीकडील वर्तमान तरी मौजे

+ पो नानाच्या हातची.

मुसलबीड परगणे मलकापूर पागेर येथील देशमुख मवासगिरी या प्रांतीं बहुत करीत होता, सबब मौजे मजकूर हें ठाणें तोफा लाऊन घेऊन परगणे मलकापूर पागेर जागीर मोगलाई सबब सरकारांत जफ्त करून राजश्री खंडेराव त्रिंबक पैठणकर यास जफ्ती सांगितली आहे. कळावें. दुसरीं वर्तमाने तरी

राजश्री रघोजी भोसले मुधोजी भोसले सेनाधुरंधर यांचे पुत्र व दर्याबाई याणी श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचा निरोप घेऊन वराडात नागपूर प्रांतीं जात आहेत. त्यास श्रीमंतानी राजश्री मामास लिहिलें कीं राजश्री साबाजी भोंसले याची व दयाबाई व रघोजी भोसले याची भेट करून देणे म्हणजे साबाजी भोसले यांचे कबिले वगैरे वस्तवानी वराडांत आहेत, त्यास लढा पडणार नाहीं असें लिहिलें. त्यास दर्याबाई व रघोजी भोसले फौजसुधां धारूरचे सुमारें आलीं आहेत. त्याजकडे येथून कारकून तिलगूल देऊन पाठविला आहे, परंतु त्याचा खुलासा कसकसा आहे तो शोध लागला पाहिजे याजकरितां पाठविला आहे, कळावें.

कलमं
१

मी स्वामीकडे पत्र पाठवितों त्याचें उत्तर पाठवावयासी आज्ञा जाली पाहिजे.

राजश्री सुमेरसिंग व महमद इसब गाडदी यांजबरोबर च्यार तोफा व पांचसे स्वार व दीड हजार गाडदी याप्रमाणें श्रीमंतानी मामाकडे रवाना केले ते आठदाहा दिवस होते. त्यास कसबे सिवणे व कसबे धावडे ही दोन्ही ठाणी सरकारांत घेतलीं. त्यापैकीं सिवण्याचे ठाण्यांत फैजुलाखान ठाणेदार होता तो महमद इसब याचे वोळखीचा औरंगाबादेचा राहणार त्याविसी महमद इसब रदबदल करीत होता, ते समई कांहीं गोष्टीवरून उगी तूट खाऊन गाडदी व स्वार व सुमेरसिंग मिलोन यास न पुसतां उठोन श्रीमंताकडे गेले. येक दोन कारकून माघारे फिरोन आणावयासी पाठविले होते, परंतु आले नाहींत. कळावें. तोफा च्यार तोफखान्याकडील होत्या त्या मात्र येथें ठेऊन घेतल्या आहेत. गाडदी आगदींच नाहींत.

येणेप्रमाणें वर्तमान निवेदन व्हावें म्हणोन सेवेसीं लिहिलें असे. श्रृत होय हे विज्ञापना.

¶*The writer gives news about the village Beed being attacked on account of the rising of the Deshmukh there. He also mentions the interview arranged by Trimbakrao Mama at Raghunathrao's direction between Sabaji Bhonsle and Raghuji and Daryabai. The writer further reports that Raghunathrao has asked Sumersing and Muhammad Isaf to attack two other outposts.*

No. 12] [29-1-1774

श्री

वेदशास्त्रसंपन्न राजश्री शिवभट खरे यांसी

सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणे विशेष. तुम्हीं पत्र पाठविले ते पावले. नवऱ्या-मुली पाहिल्याचा मजकूर लिहिला तो कळला. ऐशास लग्न करावयाचा निश्चयच आहे ऐसे नाहीं. समक्ष मुली पाहिल्यानंतर विचारेकरून मर्जीस आल्यास निश्चय होईल. सविस्तर जनार्दन मुकुंद काला व पांडू जेठी याचे जबानीवरून कळेल. जाणिजे छ १६ जिलकाद सुाा आर्बा सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Raghunathrao to Shivbhat Khare, asking the latter to keep marriageable girls ready for inspection.*

No. 13] January 1774

श्री

शेवेसी विज्ञापना. लस्करचे वर्तमान पुणियांत सावकारी आले ते कसकसे ते लिहून पाठवणे म्हणोन रा। रंगोपंताबरोबर आज्ञा रुबरू आली. त्यास कागद कोणे सावकाराचे किती दिवसाचे आले हे काही पता लागत नाहीं. परंतु वर्तमान बहुत लोक बोलतात त्याचा बयाज श्रीमंत श्रीकार्तिकस्वामीचे दर्शनास गेले होते, तेथे सुचे जाले, त्यावरून पाचसाहा हजार फौज समागमे होतीच तीसहवर्तमान घेऊन पलोन मुरारराव घोरपडे याजकडील गुती किला आहे त्यांत गेले. लस्करात श्रीमंत सौ. मातुश्रीबाई व चिरंजीव आहेत. त्यांचे डेऱ्यासभोवती गाड्यानीं चौकी बिकट बसऊन बंदोबस्तीने आहेत. या प्राा मजकूर दाट बोलतात. कागदाचा शोध बहुत सावकाराकडे केला परंतु लागत नाही. जे वर्तमान बाजारात उघड बोलतात त्याप्रो सेवेसी विदित व्हावे यास्तव लिहिले आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. रा। छ १ जिल्हेज हे विज्ञापना.

¶*The writer reports that Raghoba, getting information of the intention of the Barbhais to capture him, sought refuge in the fort of Gootu with his wife and son.*

No. 14] [*8-2-1774*

पो छ २ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे
शेवेसी

पोष्य नारो शंकर कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता। छ २६ जिलकाद पर्यंत आपले कृपेकरून येथास्थित असे विशेष. कृपा करून पत्र पाठविले ते पावोन संतोष जाहाला. पत्री लेखन केले कीं ज्याचे पदरीं पूर्वापार कालक्षेप केला त्यांजवर अतिशये जाल्या सर्वत्र येकचितें होऊन त्यांच्या पायासीं निष्ठा धरून हा प्रकार केला. पुढें तुम्हींहि लौकर यावें. येसियांस याप्रसंगी आम्हीं यावयास सिध्धच. परंतु शरीरवेथेचा प्रकार विलग जाणोन हे पत्र शेवेशी पाठविले आहें. आम्हीं सर्व प्रकारे आपल्या वेगले नाही. चिरंजीव फौजसुध्धां राजश्री त्रिंबकराव यांजपासी त्यांचे आज्ञेत आहेत. आपलें पत्र आल्यावर आन्वये त्यांजकडे लेहून पाठविले आहे. आमचा निजध्यास सर्व स्वामीचरणी आहे. आपले विरहित नाही. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Naro Shankar while expressing himself in favour of the League regrets that his failing health deters him from actively participating. He has however deputed his son to accompany Trimbakrao with his contingent.*

No. 15] [*9-2-1774*

पो फाल्गुन शुा १० मुा पुरंधर.

श्री

तीर्थस्वरूप राजश्री तात्या
वडिलांचे शेवेसी

आपत्ये गोपालाचे सां ना विा ता माघ वा च्यतुर्दसी बुधवारपर्यंत मुा ठाणे लातूर वडिलाचे आसीर्वादेकरून सुखरूप असो विशेष. सांप्रत वडिलाकडून आसीर्वादपत्र येऊन साभाल होत नाही, याकरितां स्वार पाा आहेत. तर आसीर्वादपत्री सविस्तर ल्याहावयासी आज्ञा जाहाली पाहिजे. हिकडील वर्तमान तर श्रीमंत दादासा याचा वेढा बेदरच्या

किल्यास बसला. ते समई आत नवाबाजवल रा। माहाराव जसवंत निंबाळकर होते, त्याजकडे येथील सिलेदार व घोरपडे याची पागा चाकरीस जाईल म्हणून राउलाकडील ऐवज व विष्णुपंताकडील ऐवज घेतला तो, ऐसा घोरपड्याचे नेमणुकी प्रा। पागेची व सिलेदाराची समजाविसी करून लोक रा। मालोजी घोरपडे याजकडे सैन्याल रा। केले. ते लोक त्याणी माहाराजाकडे रवाना न करिता आपणाजवल ठेऊन घेतले. पुढे नवाबाचा व श्रीमंताचा सला जाला ते समई माहाराव श्रीमंताचे भेटीस आले, हे त्याजकडे ते याजकडे जाऊ येऊ लागले. तेव्हा रा। मालोजी घोरपडे यानी माहारायाकडे जाऊन त्यासी समाधानाच्या रीतीने च्यार गोष्टी सांगोन तेव्हा तरी लोक चाकरीस घ्यावे ते न केले. म्हणो लागले जे माझा लेक केदारजी घोरपडा मृत्य पावला, त्याणी माझे डेऱ्यास येऊन समजाविसी करावी. ही आलाड (आकड?) धरून त्याजकडे जाऊन बंदोबस्त केला नाही. श्रीमंताचे कूच होऊन कर्नाटक प्रांते चालिले, ते समई मालोजी बावानी लोक आपणाजवलून माहारायाकडे रवाना केले. तेव्हा माहाराव लोकास आपल्या गोटात उतरू न देणे, म्हणो लागला जे, सारा प्रसंग उरकालियावर आता चाकरीस आला तेव्हा चाकरी कोणे ठिकाणीं करितों? मग लोकास आपले गोटातून लाऊन दिल्हे. तेव्हा लोक रा। धोंडो राम यांजकडे गेले. त्यांस मार सांगितला. त्याणे आपल्याजवळ ठेऊन घेतले जे, माहारायास सांगून तुमचा बंदोबस्त करून देतो. या प्रा। बोलून लोकास आपल्याजवल ठेविले. हे तावार वर्तमान आम्हास कलले जे, माहाराव लोकापासून चाकरी घेत नाही आणि लातूर त्याजकडे सरंजामासहि ठेवीत नाही, तेव्हा सीतारामपंत म्हणून घोरपडेयाकडील कारकून होते त्यास मालोजीबावाकडे पा। जे बंदोबस्त करणे. तेथे गोविंद खिजमतराव आहेत आणि श्रीमंत आहेत, कलेल त्या रीतीने बंदोबस्त करणे. त्याणी अमलात न आणिता कारकुनास सांगितले जे तुम्ही जाणे, बंदोबस्त करून घेऊन मागून पाठवितो. त्यावर कारकून निघोन नवाबाच्या लस्करात धोंडोरामाकडे आले. हे वर्तमान माहारायास कलले जे, घोरपडे याकडून कारकून धोंडोरामाकडे आला, तेव्हा माहारायास आगोधर नवाबाचा निरोप जाहालाच होता. मग धोंडोरामाकडे न येता परभारा उठोन परांड्यास आला आणि पेसजी केदारजी घोरपड्यास जमीदारानी मूठ मारून मारिला त्यास पत्रे पा। जे तुम्हीं पा। मारी दंगा करणे. त्यावरोन त्याणी बखेड्याचा प्रसंग योजिला, तों रा। गोपालराव केशव नि। कवडे हे फौज दीड हजार घेऊन आपला आमल बसूल करावयासी बालेघाट प्रांते आले. त्यास सदरहू जमीदार भेटून

काही आंतस्त कबूल करून गावखेड्यास उपद्रव करावा ऐसे ठीक केले. हे वर्तमान आम्हास कळलियावर येथून आम्हीं कारकून पाठविला जे, मामलत तात्याची, त्याचा तुमचा स्नेह, बखेडा असल्यास सुरलीत करावे आणि तुम्ही जमीदारास हाताखाले घेतले याचा अर्थ काये? तेव्हा त्याणी अंतस्तावर दृष्ट देऊन जमीदाराचे ऐकून पो मजकुरी आले आणि तमाम पाटील धरून नेले आणि दोन गाव झाडून लुटले. घरे देखील जाळली. ठाण्यांत प्यादे व कारकून आमचे होते त्यांची हत्यारे घेऊन कारकुनाची आबरू घेतली. आतील वाडा होता तो पाडून टाकिला. या प्राा त्याणी साहित्य केले. सांप्रत ते रा त्रिंबकराव मामा व साबाजीबावा भोसले नजीक बीड संगम दुधनापूर्णा येथे गेले. सांप्रत काली रा भिवराव मंत्री व सुलतानजी निंबालकर व गोपालराव नलेगावकर ऐसे दोन हजार मिळोन दंगा मांडला. आमचे स्वार माहारायाकडे चाकरीस गेले होते ते धोंडो रामाजवळ होते त्यास पत्रे पाठऊन आणिले. आणिखी तीनच्यारसे स्वार व आठ नऊसे प्यादा चाकरीस ठेऊन. नित्य जुजे होतात. त्याणी पो मारी दोन च्यार ठाणी बसविली होती ती आम्ही उठऊन आपली बसविली. आम्हाकडील दाहा-पंधरा ठार जाहाले. त्याजकडील दाहावीस ठार जाहाले परिछिन्न ठाणे सोडा म्हणोन म्हणतात. कसबा अफाट, रखवालीचे संकट पडतात. मालोजीबावास दोनच्यार पत्रे पो जे ठाणे द्यावे की काये? त्यास त्याचे उतर येत नाही. येथे तो निकड. भोजनास फुरसत नाही. पुढे परिणाम कोणता? च्यार रुा वसूल केले ते सिबंदीच्या भरीस पडले. या प्राा घोरपड्याचा बंदोबस्त आणि कारभार येविसी पेसजीच विनंति केली होती जे, घोरपड्याचा कारभार शाषवती नव्हे. सांप्रत येऊन जिवावर गुजरली आहे, याउपरी काही वडिलीच बंदोबस्त केला तरीच बरी गत आहे. नाही तर जीव जगणे संकट आहे. घोरपड्याकडील तो बंदोबस्ताचा प्रकार समजोन गेला. त्यास कागद लिहून कंटाला आला, परंतु काही सोये दिसत नाही पत्र वाचून बंदोबस्त जाहालिया लिाा पाठवावे. जाहानलीया(?) ठाणे देणे म्हाा लिाा पाठवावे. दम धरवत नाही. बहुत काय लिाा सो श्रुत होा हे विाा.

¶*Gopal writes to Haripant Tatya, narrating a detailed account of the disturbed condition of affairs. He says that a contingent was lent to Maharao Nimbalkar when Raghunathrao laid siege to Bedar and that Nimbalkar refused to entertain the men into service and give them their wages after peace was declared with Raghunathrao. The affair was somehow settled by the intercession of the Nizam. The writer refers to a rising of Nimbalkar and to its being quelled by Trimbakrao Mama and Sabaji Bhonsle.*

5947

No. 16] [9-2-1774

पो छ १२ जिल्हेज

श्रीशंकर

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
सखारामपंत बापू स्वामींचे सेवेसी

पोा त्रिंबकराव विस्वनाथ सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जाणे विशेष. आम्हासमागमे फौज आहे, त्यास खर्चास पाहिजे; यास्तव येथून राजश्री राघोपंत आइतोले यास पथकसुधा आपणाकडे पाठविले आहेत. तरी याजबरोबर यैवज तूर्त तर भरणा रुपये ३००००० तीन लक्ष रुपये पाठवा. पुढे आणखी यैवज लागेल. लोकाची सोय मागे काहीच जाली नाही. आम्हीं हरतरेन रो+ मात्र युक्तीने पुण्याहून पनास हजार मागे आले त्यासुधा आजपर्यंत चालविला. पुढे रो चालून नालबंदी लोकास दिल्ही पा. रा साबाजी भोसले केवल खाली, त्यांचा खर्च चालविला पा. याउपर देऊनहि आर्जव सर्वांचे करून हे मसलतीचे दिवस निभावले पा; व काही फौजहि नवी ठेविली पा. प्राप्त जाला प्रकार आकाश कवळून जसा सेवटास जाईल तसा कडेस लावावा, तरच सर्वांची आबरू; नाही तर कलतच आहे. राजश्रीचा बंदोबस्त किला साताारा वगैरे किलेसुधा उतम व्हावा. वरकड किल्यास घाटावर व कोकणात सावधता व्हावी. आशेर दौलताबाद नगर हे इकडे; त्यांत वरकड स्थलांचे संकट नाहीं. आपली पत्रे गेली असतील. आम्हीहि पा. आशेर बराणपुर नारो कृष्ण दर्वे याजकडे, तेवढें संकट. त्यास जैनाबादेस रा त्रिंबकराव सिवदेव खासाच आहेत. त्यास आम्ही लिहून, बराणपूर हस्तगत करून, बंदोबस्त करा ऐसे लिा आहे. आशेर पाहाडी तेथे उपाये चालणार नाहीं. पुढें होईल ते खरे. कलावे या करिता लिा असे. रा छ २७ माहे जिलकाद बहुत काये लिा हे विनंती.

¶*Trimbak Vishvanath writes to Sakharam Bapu, requesting funds for paying his forces and recommending vigilance in guarding the forts of Satara, Burhanpur, Ashirgad and Nagar.*

\+ रोजमरा.

No. 17] [12-2-1774

पौ छ १९ जिल्हेज.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बापू स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराव नारायेण कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील कुशल फालगुन शुध २ म(द)वासर मुा। नजीक का। वरवाल पा। मार जाणौन स्वकीये कुशललेखन करीत आसिले पाहिजे विशेष. राजश्री त्रिबकराव मामा व राजश्री साबाजी भोसले सेनासाहेब सुभा व मातुश्री दर्याबाई फौजसह नजीक नांदेड येथून सौम्यवासरी कूच करून खंदार नजीक मुकाम जाहाला. मजल भारी जाहाली (म्हणून) तोफखाना मागे राहिला. याजकरिता गुरुवारी मुकाम जाहाला. काल भृगुवारी कूच होऊन मुकाम मजकुरी आलो. हेहि मजल भारीच जाहाली. तोफखाना आला नाही. याजकरिता आज मुकाम जाहाला. उदईक कूच करून तुलजापुरच्या रोखे येत आहेत. वरकड वर्तमान तीर्थरूप राजश्री नाना व राजश्री बाबूराव वैद्य यांस लिहिले आहे ते निवेदन करितील. बहुत काय लिहिणे लोभ करीत जावे हे विनती.

¶*Krishnarao Narayan reports the arrival of the Bhonsles and Trimbakrao Mama at Varwal. The writer's father Nana Joshi, of the Baramati family, was with the Barbhais.*

No. 18] [13-2-1774

पौ छ ९ जिल्हेज.

श्री

श्रीमंत राजश्री सखारामपंत
बापू स्वामीचे शेवेसी

पोष्य भवानी सिवराम कृतानेक सां नमस्कार विनती उपरी. येथील कुशल फालगुन शुध त्रितीया रविवार मुकाम सनिध नांदेड येथास्थित आसे विशेष. राजश्री कृष्णराव नारायण तात्या आपणापासोन आले. खर्डेयाजवलून त्याचे पत्र आले त्याजवरून सविस्तर कलले. त्यास आणावयाबदल स्वार पा। आहेत. आज उदईक येतील. येथे कुडीमात्र आहेत; प्राण आपणाजवळ आहेत. राजश्री नाना व बाबूराव याणी पहिले निवेदन केलेच आहे, व हली त्यास पत्र तपसीलवार लिा। आहे, त्याजवरून आद्योपांत श्रवण होईल. जगंनिवासाचें

कर्तुत्व, ज्या काली जे होणे तदनसार साहित्य प्रकार घडतात. येथील लक्ष आपणास निवेदन आहे; तपसील ल्याहावा यैसे नाही. आपण वडीलपणे पहिले सांभाल जाहला, पुढें होईल हा भरवसा. उदकापासोन वृक्ष जाहाला, त्यास उदक तारते; बुडवीत नाही. वनच्यरांस व्यसन प्राप्त जाहाल्यास कुरंग चंद्राकडेसच पाहील, आणि वराह पाताळाकडेसच पाहातो. मनुष्य आपल्या मुरब्बियास कैसा विस्मरणीं आणील? आम्ही तपसील काय ल्याहावा? पत्रामागेच येऊन पोहोचलो जाणावे. आम्ही स्थापित आणि हे सरदारी आपली आहे. लक्ष दुसरें नाही. +सर्वस्वे स्थापित. तेथे बहुत लिहिण्यास कारणच नाही. आपन वडील मुरबी, या सरदारीचे आभिमानी. तेथे स्थापिताने वारंवार ल्याहाविसे नाही. श्रुत व्हावे. बहुत काये लिहिणे. लोभ कीजे हे विनंती.

¶*Bhavani Shivaram, one of the Nagpur Bhonsles' officials, writes to Sakharam Bapu of his own devotion to the cause of the Barbhais.*

No. 19] [*13-2-1774*

श्री

राजश्री सखारामपंत बापू
गोसावी यांसी

ऽ॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री साबाजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असावे विशेष. राजश्री नानाजी कृष्ण जोसी व बाबुराव व विश्वनाथ वैद्य यांच्या पत्रावरून सकलार्थ कलेल. येथील मजकूर उभयतानी श्रवण केलाच आहे. आपणाजवळ येण्याविसी क्षणाचा विर्मर्ध नाही. राजश्री भवानी सिवराम याच्या पत्रावरून तपसीलवार कलेल. पत्रामागेच यऊन पोहोचलों यैसे जाणावे. रा छ १ माहे जिल्हेज. साराश पंथ चालोन येणे इतका मात्र उशीर. येरवी आम्ही आपणाजवळ आहो यैसे जाणावे. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Sabaji Bhonsle informs Sakharam Bapu that he is soon leaving Nagpur.*

+ यापुढील मजकूर निराळ्या वळणाचा   १ विलंब.

No. 20] *[14-2-1774*

पो छ २ जिल्हेज.

श्री

शेवेसी रंगो गोपाळ विज्ञापना. ता। छ २ जिल्हेज. मकुंद जासी यास पागेपैकी घोडे मणुश देऊन आपणाकडे आज येऊन पोहोचतील. रा॥ नारो आपाजी, बाळाजीपंत लेले व आपाजीपंत यास सांगितले जे, सावकारात लस्करची बातमी जलद आल्यास किल्यास बातमी वरचेवर पोहोचावीत जाणे. आज्ञेप्रमाणे त्याणी सावकाराचे गुमास्ते बोलाऊन ताकीद केली. माव वद्य शष्टीचे पत्र आले ते बाळाजीपंतानी कालच आपणाकडे पाठविले. आष्टमीचे पत्र आले त्याचे ठिकान काही लागत नाही. नारो आपाजीनी शोध बहुत केला. दाहा घटका रात्रपर्यंत मी त्याजवळ होतो. कागदाचे ठिकान लागेना. मग बाजारचे वर्तमान ऐकिले ते रात्री नारो आपाजीनी व आपाजीपंतानी लिहिले त्यावरून सर्व कळेल. कागद सावकारात आला खरा. परंतु भयेकरून दाखवीत नाही. साता दिवसाचे पत्र आहे. पत्राचे दर्शण होत नाही. तीन प्रकारचे वर्तमान. पुण्याहून तुम्ही निघाले ते समईची बातमी आगोधर केशोरायाची पोहोचली. ते समई दादासाहेब कार्तिकस्वामीस होते. देवाचे दर्शण घेऊन बुणग्यात येत होते. ऐकोन तेथे थबकोन उभे राहिले. नानाप्रकारचे वल्गना करू लागले जे, बंदीत होतो तेथे शांभानी रक्षिले. आताहि ईश्वर आहे. तितक्यात मालोजी घोरपडे होते. हळू बोलावे, तुमचेजवळच शत्रू आहे. लवकर निघोन गुतीच्या ठाण्यात जावे. तैसच आडवाटे निघोन पाचशे राऊतानसी गेले. वामनरायास कळताच पाठी लागले. हे वर्तमान अनंदीबाईस कळले, गारद्यास बोलाऊन आपल्याबहुता+ बंदोबस्त केला. चिरंजीवहि त्यात आहे. महमद इसफ याणी मनावर धरून बाईच्या डेऱ्याबहुता बंदोबस्त चांगला केला. झुजून मरावे हे मानस. वामनराव याचे मंडळीचे लोक होते ते बाईजवळून निघोन दो कोसावर (थां)बले. याप्रा। बातमी येक. दुसरी बातमी: हे वर्तमान कळताच बुणग्यात येत होते. विसा कोसावर थबकोन मुकाम केला. दाहा हजार फौजेनसी लोक तेथून रात्री पळाले. तिसरे बातमी: देवाचे दर्शण घेऊन बुणग्यात आले. हे वर्तमान कळताच मऱ्हाठे मंडळी पाटणकर, निंबाळकर, घाटगे, माने वगैरे यांस बोलाऊन सांगितलें जे, आम्हाभोवते वामनराव याणी आरिष्ट मांडले. याचे पारपत्य तुम्ही करावे. येविसी शपत द्यावी. मऱ्हाटे मंडळीने उतर केले जे, तुम्ही प्रभु येक उरले. वामनराव किमपि करणार नाही. आम्ही तुमचे सोबती आहो. वामनराव यास च्यार गोष्टी समजोन सांगू. येथ

+ भोवता,

रात्र जाली. उदईक याचा बंदोबस्त करू. तूर्त आमच्याने वामनराव याजवर जावत नाही. आपल्यातच लढावे हे विहित नाही. त्याची कल्पना आसेल ती उदईक काढो, ऐसे बोलोन आपले गोटात गेले. दादासाहेबी आपले गारदी बोलाऊन भोवता बंदोबस्त करून रात्री राहिले. तेथून बायेकासुधा व गारदी च्यार हजार फौजनसी निघोन गेले. वामनराव मऱ्हाठे मंडळी सारे येक होऊन तेथे थबकले. लोक बोलतात ते लिहिले. चिंतो विठल वामनरायाकडे आले हेहि ऐकिले. थोडकी मसलत मऱ्हाठेजवळून गेली. दादा जातो हे कळताच पाठिलाग न केला. त्यांस राखले. वामनरायास मसलत भारी पडली. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Rango Gopal writes that Wamanrao Patwardhan's objective of capturing Raghoba by surprise was defeated as the latter got wind of the plot against him and was allowed to make good his escape by the betrayal of the Maratha sardars.

No. 21] *[14-2-1774*

पौ[१] छ २ जिल्हेज

आर्बा फालगून

श्री

विनंती[२]. आस्टमी शुक्रवारचा प्रातःकाल. वलभसुंदर यांचा कागद लस्करचा आला, त्यांत मजकूर. श्रीमंत पंचमीस मध्यरात्री प्रतिनिधीवर हला करावयाचा हुकूम जाला. प्रतिनिधि तयार जाले. वामनराऊ वगैरे सरदार प्रतिनिधीस सामील जाले. इतका मजकूर जाला, तों मुरारराव येऊन रात्रीची हला महकूब करविली. दुसरे दिवसी वामनरायावर हला करावयाचा हुकूम जाला, तोहि मुराररायानी राहाविला. प्रतिनिधि व वामनराऊ तिही कोशावर जवल दुसरे दिवसी जाऊन राहिले. सुमेरसिंग व महमद इसफ लस्करांत श्रीमंतांस येऊन भेटले. सुमेरसिंगास हती श्रीमंतानी दिल्हा. लस्करात फितूर गलबल फार आहे म्हणऊन लिा आहे. याप्राा पत्रांतील मजकूर आहे. विदित व्हावे. बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनती. पाा चितापुराजवल मुधोजी भोसले यांची पिछाडी नवाब निजामआलीखान यानी लुटले म्हणऊन आतांच वर्तमान आले आहे. म्हणऊन त्याच पत्रांत लिा आहे. हे विनती.

¶Naro Appaji informs Nana Fadnis how an attack against Pratinidhi and Wamanrao was stayed by the intercession of Murarrao Ghorpade. He also refers to the rear of Mudhoji Bhonsle being plundered by Nizam's forces and to the presents given by Raghoba to Sumersing.

१ पौ नाना फडणविसाची. २ पत्र नारो आपाजीचें.

5952

No. 22] [15-2-1774

श्रीशंकर

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बापू स्वामीचे सेवेसी

पो कृष्णराव नारायेण कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशललेखन करीत गेले पाहिजे विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जाहालो ते नांदेड नजीक लस्करात पावलो. पत्रे दिल्ही व मुखोतरे सविस्तर सांगितले. त्यास याचे लक्ष सर्व आपणाकडे आहे. गंगातीराहून कूच करून सोनवती पा। लातूर वानरातीरास आले. येथून तुळजापूर आठरा वीस कोश आहे. मजल दरमजल येऊन पोहचतील. येण्याविसी याजकडे गुंता किमपि नाही. सांगितल्या ठिकाणास सत्वरच येऊन पोहोचतो. बहुत काय लिहिणे लोभ करीत जावे हे विनंती.

¶*Krishnarao Narayan informs Sakharam Bapu that the Bhonsles are completely agreeable to the Barbhais and that they have already started for Poona.*

No. 23] [15-2-1774

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
हरिपंत तात्या स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराव नारायेण कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। फाल्गुन शुध पंचमी मुकाम लस्कर नजीक नांदेड जाणौन स्वकीये कुशललेखन केले पाहिजे विशेष. आपणापासून निघालो त्यास मार्ग दुर्घट. लस्कराची बातमी ठीक न लागे. याजकरिता येक दोन दिवसा हेलपटा खाऊन काल लस्करात येऊन पोहचलो. राजश्री सेनासाहेबसुभा याची भेट जाहाली. पत्रे दिल्ही व वर्तमान सांगितले. त्यावरून बहुतच समाधान पावले. पत्रदर्शनीच कूच करावे ऐसे मानस, परंतु राजश्री त्रिंबकराव मामा यानी मातुश्री दर्याबाईस यास बोलाऊन आणिले. त्याचा प्रकार उरकून खातरजमा करून द्यावी आणि कूच करावे, ते न होता कूच करिता न ये हे संकट मामास पडले. त्यामुळे काही दिवस लागले. काल निश्चय ठराऊन याच्या त्याच्या भेटी जाहाल्या. दर्याबाईने समागमे चालावे ऐसे जाहाले. उदईक कूच दाहा दाहा कोशाचे करितात. सारांश याचे लक्ष पूर्वीपासून आपणापासी होते तेच आहे.

कायावाचामनसा दुसरा प्रकार नाही. बहुता दिवसीं आपले पत्र यावे यैसे भगवंते घडविले. मनोमय गोस्टी घडल्या. अक्षर आपले पाहोन आनंदित जाहाले ते काये ल्याहावे ? तात्यांची पत्रे येऊ लागली. आता आपली ऊर्जित दशा प्राप्त जाहाली, यैसे भाशण श्रीमंतानी व राजश्री भवानी सिवराम याणी बहुतच हर्षेकडून केले. ज्या कामांत तात्या आहेत (त्या)कामाची कालजी करणे लागत नाहीं; यैसे कितेक प्रकारे निशा जाहाली. उभयेता आपणाजवलच आहेत. यैसी निशा आपलीहि आहे. तोच प्रकार याचा दृढतर आहे. अंधाची काठी अंधास सापडली म्हणून बोलून पत्र पाहून बहुत संतोसी जाहाले. सारोष हिकडील गुंता अत:पर किमपि नाही. पत्र वरचेवर येत असिले पाहिजे. बहुत काय लिहिणे लोभ करीत जावे हे विनंती.

¶Krishnarao Narayan writes to Haripant Tatya assuring him of the full support from the Bhonsles of Nagpur.

No. 24] *[Recd. 18-2-1774*

छ ६ जिल्हेज

श्री

विनंती. मामा[illegible]डील राजकारण करून साबाजी भोसले यांच्या त्यांच्या भेटी केल्याचें वर्तमान लिहिले त्याजवरून कलले व त्यांचे लस्करचे पत्र त्रिंबक हरि यानी लिहिले होते. हे गोस्टी फार उतम जाली. मुधोजी भोसले यांजकडील निमे खूल मोडले. याउपरी त्यांची गर्मी राहाणार नाही. मामा लस्करचे रोखे जालेयावर तिकडीलहि दुफली मोडेल. तहावर येईल. दो चौ रोजाआलीकडे पत्रे येतील. पुढील सुमार सारा समजेलच. बहत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.[१]

¶Naro Appaji writes how the internal differences in the Bhonsle family of Nagpur were made up by Trimbakrao Mama prior to their march to Poona.

No. 25] *[19-2-1774*

पौ छ १४ जिल्हेज

श्री

राजश्री बालाजपंत नाना गोसावी

यासी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री साबाजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असावें

---

१ चिठी नारो आपाजीची.

5954

विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले. लिा अर्थ सर्व कळला. राजश्री कृष्णराव नारायण यांचे मुखे सविस्तर कळले. खर्चाची बेगमी करून देतों स्वार व उंट भारदारी पाा म्हणोन लिा. त्यास राजश्री त्रिंबकराव मामा यांसी सर्व गोष्टीची माहितगिरी आपल्या लिहिल्यावरून व आम्ही तिळमात्र ठेवीत त्यासी नाही, त्याजवरून जाहलीच आहे. याउपरी यैवज आणवणें तो त्यांणीच आणऊन आम्हास द्यावा आणि आपण त्याजकडेस पाठवावा. आम्ही यैवजाकरितां श्वतंत्र स्वार पाा आणणें हे उचित नाही. आम्ही व मामा सामील येकत्रच आहो. आपली पत्रे त्यास येतात तोहि मजकूर सर्व आम्हास कळतो व आम्हाकडील रतिमात्र प्रतरणा न करितां सागतों. याद पाठविली ते पावली. आम्ही मामापुढें नेऊन ठेविली. येथें मनसबेयाचे सुकाण त्याणी धरिले आहे त्यापक्षी आपली व मामाची मांया आम्हावर तेव्हां सेनासाहिबसुभा लांब आहे यैसे नाही. आधी योजिली मतलब सिधीस जावी. मामाची व आपली भेट व्हावी. मग उभयेता व राा बापू मिळोन करतील तेच कबूल होईल. तूर्त मसलतीवर नजर देऊन सर्व महकूफ केले आहे. येथे आम्हास ज्याप्रमाणें आपला लोभ आश्रा त्याचप्रमाणें मामाचा आहे. दुसरा विचार नाही. जे लिा ते खर्चाविसी वगैरे मामास ल्याहावे. राा छ ७ माहे जिल्हेज बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Sabaji Bhonsle writes informing Nana of his complete acquiescence in the measures of the Barbhais.*

No. 26] *[20-2-1774*

पौा छ १९ जिल्हेज.

श्री

पुाा[+] उभेता श्रीमंताचे सोा

विनंती. नरसिंगराऊ मागून सेवेसी येतात. यांचे विनंती केल्यावरून सर्व विदित होईल. इकडील वर्तमान येथास्थित आहे. हे विनंती

¶*"Narsingrao Dhaigude proceeds to see Nana Fadnis and Sakharam Bapu", writes Dhondo Ram.*

+ पुाा पत्र धोंडो रामाचें.

No. 27] [20-2-1774

पौ छ १९ जिल्हेज

श्री

पु॥+ राजश्री कृष्णरावजी
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. रुकनुदौलास ईस्वराक्षे ऐवज देणे तो अवरंगाबादेस शेरजंगापासी पावता करावा. साहुकाराकडे ठीक पडत नाही. अवरंगाबादेस साहुकारा देवणे. त्यास लिहावे की शेरजंगापासी पावता करावा. हे विनंती.

¶Dhondo Ram advises Krishnarao to pay the sum secretly promised to Ruknuddaula at Aurangabad.

No. 28] [20-2-1774

पो छ १९ जिल्हेज

श्री

श्रीमत राजश्री बापू स्वामीचे सेवेसी

सेवक जिवाजी रघुनाथ कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता। छ ८ जिल्हेज मु॥ जिरपली प्रा। यादगीर भीमातीर येथ स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीकडोन पत्रे रुकनुदौलास व राजश्री धोंडोराम यास छ ३० जिल्कादची छ ७ जिल्हेजी पावली तेच वेलेस मी व धोंडोपंत मिलोन रुकनुदौलाकडे जाऊन त्यासी पत्राअन्वये बोलोन त्याची उतर पाठविली आहेत. सेवेसी येऊन पावतील. येथून राजश्री नरसिंगराव याची रवानगी आजच केली. स्वामीपासी येतील. सारांश इकडील काही गुता राहिला नाही. स्वामीचे विचारासिवाये रुकनुदौला नवाब नाहीत. याचा विस्तार नरसिंगराव विनंती करतील. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Jivaji Raghunath Khasgivale assures Sakharam Bapu of Ruknuddaula's sincere support.

\+ पु॥ पत्र धोंडो रामाचे. १ गुप्त (?)

No. 29] [20-2-1774

छ १९ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक धोंडो राम कृतानेक सां नमस्कार विनंती. प्रथम जासुदासमागमे श्रीमंत बापूचे व आपले पत्र आले त्याजवरून वर्तमान कलले. त्याचे उतर व रुकनुदौलाचे उतर त्यास जासुदासमागमे पाठविले आहे त्याजवरून विदित जाले असेल. आलीकडे राजश्री चिमणाजीपंत व नरसिंगराऊ आले त्याजसमागमील पत्रे पावली. त्याचे जुबानीवरूनहि कलेल. त्यांची रुकनुदौलाची भेट जाली. परस्पील बोलणे जाले. रुकनुदौलानी येका दो गोस्टीची दिकत घेतली होती. तिचे तोड सांगून ठीक जालें. सारांश बापूनी व आपण योजिल्या कार्यास रुकनुदौला शामील आहेत. याचे आर्थ नरसिगरायाचे विनंती केल्यावरून व रुकनुदौलाचे पत्रावरून विदित होतील. कोणे गोष्टीचा गुंता राहिला नाही. इत:पर ईश्वरी सता प्रमाण. वर्तमान वरचेवर येतच आहे. इकडून वरचेवर वर्तमान येत जाईल हे विज्ञापना.

¶*Dhondo Ram to Nana Fadnis assuring him of the full support of Ruknuddaula for the cause of the Barbhais.*

No. 30] [20-2-1774

पो छ १९ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे
सेवेसी

सेवक जिवाजी रघुनाथ कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता छ ८ जिल्हेज मुा निरपली प्रा यादगीर येथे स्वामीचे कृपेकरोन यथास्थित असें विशेष. स्वामीची पत्रे रुकनुदौलास व धोंडो राम यासी छ ३० जिल्कादची छ ७ जिल्हेजी मुा मजकुरी पावली. तेच वेलस धोंडोपंत व मी मिलोन रुकनुदौलाकडे जाऊन पत्राचे अन्वयें विस्तार बोलोन त्याची व पंत मारनिलची उतर सेवेसी रवाना केलीं. सारांश नवाब व रुकनुदौला श्रीमंत राजश्री बापूचे व स्वामीचे विचारासिवाये नाहीत. राजश्री नरसिंगराव याची रवानगी आज केली ते येऊन

पोहचतील. सविस्तर विनंती करिता ध्यानास येईल. त्या रोक नवाबाचे कूच आज नव कोसाचे केले. इकडील दुसरा विचार नाही. बहुत काये लिहिणे? आज आबाजी माहादेव येणार म्हणून वर्तमान आहे. हे विज्ञापना.

¶*Jivaji Raghunath informs Nana Fadnis that both the Nizam and Ruknuddaula are in complete agreement with the Barbhais.*

No. 31] [*20-2-1774*

पा छ १९ जिल्हेज

श्री

पुा राजश्री कृष्णरावजी स्वामीचे
सेवेसी

विनंती उपरी. स्वामीनी लिहिले की, चाकरी करून दाखवावयाचा समय आहे, त्यास यामागें चाकरी केली नाही आताच चाकरीचा समय आहे असे दिसते. आस्तु. चाकरी करावयाची ती आजपावेतो करीत आलों. पुढेहि जो पावेतो चाकर आहे तो करीतच आहे. सर्फराजी[1]ची उमेद नाही. धण्याची शब्दाशब्दी कृपा होत आली हीच पुरे. मजलाहि पुढे कोणी गोस्टीची उमेद संचय करावयाची नाहीं. परंतु दोही राज्याचा कारभार करितो, यात लक्षावधी मेलवितो हा अवध्यास संशय. त्यास धण्याचे देणे काय हे स्वामीचे ध्यानात व मोगलाइतून काये मिळते हेहि स्वामी जाणतात. बारा हजाराची जागीर मोगलाकडील ती दरोबस्त सरकारात. आस्तु. लोकास भ्रम हजारो मेलवितात म्हणून- आणि मजला तरी कर्जदारी. ही गोस्ट दुसरियासी प्रमाण वाटत नाही. दाहा हजार रुा कर्ज व्यंकोबा नाा याचे विद्यमानचे वारले हे स्वामीस ठावके आहे. माझी वर्तणूक स्वामीचे ध्यानात असिली तरी माझे प्रमाण मानावे. नाही तरी लोकास तरी संशय आहेच. आस्तु. या समई हे बोलणे ठीक नाही. आवध्यानी आरंभिली गोस्ट सेवटास जाऊन धण्याचा बदोबस्त जाला म्हणजे निरोप दिल्हास हजार सर्फराजी जाली. हे विनती.

¶*Dhondo Ram strongly repudiates the charge levelled against him of personal gratification in the discharge of his duties. On the contrary he says he is immersed in debt.*

---

१ सन्मान, बढती.

No. 32] [22-2-1774

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
सखारामपंत स्वामी गोसावी यांसी

पोष्य आबाजीराव कृष्ण प्रतिनिधि नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावोन परम संतोष जाहला. ऐसेच सदैव पत्रद्वारे संतोषावाप्ति करीत असावें. यानंतर पत्री लिहिले जे सौभाग्यवती मातुश्री पार्वतीबाई व मातुश्री गंगाबाई यांस पुणेयाकडून घेऊन आम्ही व राजश्री नाना फडनीस ऐसे किले पुरंदर येथें आलों. वरकड लहान मोठे सरदार राज्यांतील एकवाक्यता जाहली आहे, व राजश्री त्रिंबकराव विश्वनाथ यांजबाार सरकारची फौज दहा पंधरा हजार व राजश्री साबाजी भोसले सेनासाहेबसुभा गंगातीरी होते तेहि इकडे लौकरच येतील. सिंदे होळकर हिंदुस्थानांत आहेत, तेहि सत्वरच येतील. व लष्करातील राजश्री वामनराव वगैरे सरदार यांची एकवाक्यताच आहे, म्हणोन लिहिले. ऐसास सर्व राज्यातील भिस्त आपणावर आहे. तेथे बंदोबस्ताविसीं कोणे गोष्टीचे अगाध आहे ऐसा अर्थ नाहीं. सविस्तर वरचेवर पत्री लेहून संतोषवीत असावें. येथी-लहि सर्व मजकूर आपणावरच आहे. तेथें विस्तारे लेहून कळवावें ऐसे नाहीं. रवाना छ १० जिल्हेज. बहुत काय लिहिणे, लोभ असो द्यावा हे विनंती.

¶*Abajirao Pratinidhi acknowledges to Sakharam Bapu the receipt of a letter communicating him the news of the safe arrival at Purandhar of Gangabai and Parvatibai, and of the formation of the league against Raghoba.*

No. 33] [22-2-1774

पो छ १० जिल्हेज
पुरंधर.

श्री

श्री हरिपंत गोसावी यांसी

ऽ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री साबाजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावें विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन संतोष जाहला. बहुत दिवस पत्र येत नाही * *

(आपलं) लेखनात आले. दैवछा प्रमाण. दिवसाचा योग काही यैसाच घडला. निरोपाये रावसाहेब कैलासवासी जाहले त्याणी आम्हांस तो येथे ठेविले, परंतु चितें उल्हास सर्व घेऊन गेले. याजमुले पत्र येण्यास आंतर जाहले. सांप्रत मातुश्री गंगाबाई सगर्भ आहेत. उभयेता मातुश्रीसुधां किले पुरंधरास गेलीं, यैसी पत्रे राजश्री बालाजीपंत नाना व राजश्री सखारामपंत बापू यांची व तुमची आली आणि पंढरपूरच्या सुमारे जलद येणे, मसलत सेवटास नेणे, या घराची जोड तुमच्या वडिली केली त्याचे सार्थकसमय हाच आहे हे अन्वये पाहोन आनंद जाहला. अकृत्रिम कैलासवासी याचा श्नेह यैसे भाव खुणेच्या गोष्टी आपण लिहिल्या, त्यास या पत्रामागेच उदईक कूच करून दरमजल येत असो, किमपि अतःपर गुंता नाही. राजश्री त्रिंबकराव मामासी सांप्रत वोलख पुरली तेहि उदित जाहले. मातुश्री दर्याबाई परभारी वराडांत जात होती हाहि प्रकार वाईट होता तो देवानें अनकूल केला. या उपरी दरमजल येत आसो. सविस्तर राा कृष्णराव नारायण यांच्या पत्रावरून कलेल. सारांश दरमजल पत्रामागेच येत आसो. बहुत काये लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Sabaji Bhonsle writes to Haripant promising that he would soon start and join.*

No. 34] [*26-2-1774*

श्री

श्रीमंत राजश्री बापू
स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक चिमणाजी नीलकंठ दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १४ जिल्हेजपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. आपला बेलभंडार आणिला तो नवाब व रुकनुदौलाबहादर यांस देऊन, सर्व अर्थ बोलोन, चिठी स्वदस्तुरची घेऊन पाठविली आहे. कलावे. इकडील कोणेविसी दुसरा विचार नाही. रुकनुदौलाबहादर याचें वारंवार सांगणे की, आरंभिली गोष्ट सेवटास न्यावी. आम्ही सर्व प्रकारे आपले आहो. जे येक वेल वचन जाहाले आहे तेथें दुसरेयाने कोटी प्रकारे लोभ दाखविले तरी आइकावयाचे नाही, याप्राा निश्चय आहे. दिकत नाही. शेवेसी श्रत होये हे विज्ञापना.

¶*Chimnaji Nilkanth writes to Sakharam Bapu assuring him of the full support of Nizam Ali and Ruknuddaula in the new undertaking.*

No. 35] **[26-2-1774**

पौ छ २० जिल्हेज

श्री

सों नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १४ माहे जिल्हेज मुकाम मटकी माहागांव पो कलबुर्गे जाणून स्वकीय कुशल लिहीत गेले पाा विशेष. आपण पत्र जोडागिरीचें विस्तारे पाठविलें तें पावोन सविस्तर वर्तमान कललें यापूर्वीहि दोन पत्रे याच आन्वयाची आली होती, त्याची उतरे पाठविली आहेत तं पावली आसतील. त्याजवरून कललें असेल. नरसिंगराऊ येऊन त्यांची भेट होऊन संविस्तर वर्तमान कललें असेल. इकडील वर्तमान नवाबानी आनुराहून कूच करून दर मजल दाहा दाहा कौसाच्या मजली करीत काल छ १३ रोजीं येथे आले. आज धुलोडीकरिता मुकाम जाला. वाईदेकरितां येक मुकाम केला होता. येथून उदैक रविवारीं कूच करून दर मजल आवसे लोहरे वरवाल लातूर या प्रांते जातात. राजश्री त्रिंबकराव व साबाजी भोंसले रेणापूर, लातूर या प्रांते आल्याचे वर्तमान आले होते. त्यांचा रूख पाहोन जिकडे जातील. वरकड मार राजश्री चिमणाजीपंताचे लिहिल्यावरून कलेल. बहुत काये लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Dhondo Ram writes to Nana Fadnis informing the latter of Nawab Nizam Ali having left Anur and arrived near Gulburga.*

No. 36] **[26-2-1774**

पौ छ १४ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे
सेवेसी

पो[१] येसाजीराम कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ ६ जिल्हेज भृगुवासर जाणून स्वामीचें कृपेंकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी छ १८ जिल्कादचें पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहलें. आपण पुण्याहून निघोन किले पुरंदरास आलों. तुम्हीं आपले तालुकेयाचा बंदोबस्त राखोन हुशार राहावें. श्रीमंत राजश्री दादासाहेब याजकडून वराता वगैरे जाहलियास येवज येकंदर न द्यावा. वर्तमान वरचेवर लिहीत जावे म्हणून लिहिले. त्यास आज्ञेप्रमाणें किले धारवाड वगैरे किल्याची चवकीपाहारेयाची खबरदारी करविली. सिबंदीची नेम-

---

१ पत्र धोंडो राम याचें.

णूक कमी आहे याकरिता दोन च्यारशे माणूस नवे ठेऊन किल्याचा बंदोबस्त करवितो. लस्कर या प्रांती आहे. उभयेतां चिरंजीव लस्करात आहेत, लस्कर फिरले म्हणून वर्तमान आहे. परभारें लस्कर गेल्यास चिंता नाहीं. यामार्गे आले तर संकटच्च आहे. बातमीस लस्करास माणसे पाठविलीं आहेत. वर्तमान येईल ते सेवेसी लिहोन पाठवितों. सेवेसी विदित होये. लस्कर माघारे फिरले. मजल दरमजल कोपलावरून कपाटसंगमावर येणेची आवई आ(हे). बातमीस माणसे पाठविली आहेत. वर्तमान येताच्च होईल वर्तमान ते सेवेसी लिहोन पाठवितो. सेवेसी विदित होये हे विनंती.

¶*Yesaji Ram, Commandant of Dharwar, reports to Nana the measures of defence taken by him and says that the forces of Dadasaheb were going back from the Karnatak and that they would encamp at the confluence of Kapat.*

No. 37] *[Recd. 27-2-1774*

पो छ १५ जिल्हेज

श्री

राजश्री सखारामपंत बापू गोसावी

यांसी

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री साबाजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असावे विशेष. आपणाकडून राजश्री कृष्णराव नारायण आले ते फाल्गुन शुध चतुर्थी इंदुवारी पोहोचले. पत्रावरून व मुखोद्गत सविस्तर कलले. त्याचे प्रत्योत्तर येथून मुजरद सांडणीश्वाराबा पाठविली आहे त्याजवरून कलो येईल. नांदेड गंगातीरीहून दोन कुचे तीस कोस घाट चढोन हेडगुल पा उदगीर येथे आलों. उदईक छ ९ जिल्हेज इंदुवारी दाहा कोस मुकाम नेमिला आहे. दरमजलीनें पंढरपूरच्या सुमारें येत असों. राजश्री त्रिंबकराव मामा व आम्ही समागमे येकचित आहों. मसलतीच्या उपयुक्तविसी जिवेप्राणे अर्थ सोडून सादर असों. लक्ष दुसरें नाही. मामाच्या कह्यास[1] तिलमात्र प्रतिकूल नाही. दरमजलीने येत असों. सविस्तर राजश्री नानाजी कृष्ण श्रवण करितील. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Sabaji Bhonsle writes to Sakharam Bapu informing him that he has reached Hedgul near Udgir and together with Trimbakrao is marching towards Pandharpur.*

१ कह्या=(पु.) आज्ञा.

No. 38] [पो 27-2-1774 ?

पौ छ. १९ जिल्हेज.

श्री

+ पुा राजश्री कृष्णरावजी

स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी रुकनुदौलास फारसी पत्रे श्रीमंत बापूचे व श्रीमंत नानाचे व स्वामीचे होते ती प्रविस्ट करून रुकनुदौलानी स्वहस्तेच उतरे पाठविली आहेत त्याजवरून कलेल. हे विनंती.

¶*Dhondo Ram informs Krishnarao Kale that letters for Ruknuddaula have been delivered to him and his replies enclosed.*

No. 39] [February 1774

श्री

राजश्री त्रिंबकपंत काका स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. आपणापासून आलियावर रुकनुदौलाकडील जाबसाल सिध केला. अनयासे जिवाजीपंत तेथे आले होते त्यास सांगितले, कीं बाईविसी आमची खातरजमा जाली. हरिपंताकडे तुम्ही जाऊन खातरजमा करणे आणि बाईचा बंदोबस्त करून देणे. ऐसी जिवाजीपंतास शफत घातली कीं, परिछिन्न तुम्ही जाणे आणि खातरजमा करणे. आतां काय कर्तव्य करणे ते करणे. कूच तर लोक होऊ देत नाहीत याचा विचार काय करणे तो करावा. पुरंधरीहून बापूची व नाना फडनीस याची पत्रे तात्यास आली आहेत ती आपणाकडे आली असतील. त्याचा अन्वये आपणास कललाच असेल. उत्तर लवकर यावे हे विनंती.

¶*Trimbakpant is informed that Jiwajipant has been deputed to Haripant and asked to convince him regarding the affair of the Bai (Daryabai Bhonsle, wife of Janoji Bhonsle).*

No. 40] [12-3-1774

पो छ २९ जिल्हज

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री त्रिंबक-

पंत स्वामी गोसावी यासी

सेवक सखाराम भगवंत नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २८ जिल्हेज जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणें विशेष. श्रीमंतानी फौज बऱ्हाण-

+ पुा पत्र धोंडो राम याचें.

पुरास रवाना करावयास आज्ञा केली त्यास तुम्ही फौजेस फार करून निरोप दिला असेल. राहिले असतील लोक ते व पागा सुधा तुम्हीं बराणपुरास जाणे. श्रीमंतानीं मलबा बा फौज देऊन रा केले आहेत. तुम्हीं त्यास जाऊन मिळणें. तूर्त तुम्हाखेरीज दुसरा जावयास कोणी नाहीं. रामसिंग व जाधवाचा कारकून दोघावरी काम चालेसें आसिलियास रवानगी करावी. सिलेदार गेले आसतील. जे बाकी राहिले असिले तितके व पागा येैसें जावे, परंतु चाकरीस नाहीं म्हणूं नये. या मनसब्यास फार दिवस लागत नाहीं. थोड्यासाठीं तुम्हीं अलस न करावा. कोणेही प्रकारें चाकरी घडे ते करावे. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Sakharam Bhagwant asks Trimbakpant to proceed with the forces that he has at his command to Burhanpur.*

No. 41] [*27-3-1774*

पैवस्ती

१६ मोहरम

श्री

राजश्री बालाजी पंतनाना

गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री साबाजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असावें. राजश्री रघुनाथराव दादा याणी माघारे पंढरपूरच्या सुमारें कूच करून चालिले. त्याजवरून राजश्री त्रिंबकराव मामा सडे जाहाले आणि मागें गेले. राजश्री वामनराव येऊन भेटले हें वर्तमान त्याणी लिहिलेच असेल. छ १३ मोहरमी वेणुनाद गोपालपूर येथें दादाचा मुकाम होता. कासेगावावर राजश्री सेनाधुरंधर वगैरे कांहीं फौज होती तेथें मामा गेले. आम्ही मागें होतों, कारण जे दव्याची संद+ मुसलमान लोकांची येऊन पडली याजबद्दल राहिलों. तेरावे तारखेस वीस कोस आम्ही येऊन नाझरे याजपुढें दोन कोस मुकाम केला. त्यास त्याच दिवशीं दोन प्रहरां मामासी व दादासी मोकाबला जाहाला. त्यांत गफलतसारिखी घडली हें सविस्तर वर्तमान राजश्री हरिपंताच्या पत्रावरून कलेल. सारांश हरिपंत बा फौजसुधां आम्ही येकत्र वामनराव व रास्ते व नारो शंकर याचे पतक व राजश्री

---

¹ येथून अक्षर सखारामपंताचें. + डोल्यांची संधि = ताबुतांचा समय.

सिवराव विठल देखील आसो. मोगलहि आज छ १४ मोहरम रविवारी चौ घटका आम्हांजवळ येणार. दादानी कूच मात्र न करावें. ईश्वर सर्व गोष्टी अनकूल करील. आपणांस कलावें म्हणून लिहिलें असे. रवाना छ १४ मोहरम. सारांश इकडील मसलतीविसीं आपण चिंता न करावी. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंति.

¶*Sabaji Bhonsle after referring to the death of Trimbakrao assures Nana Phadnis that it was an easy work to finish up Raghoba provided he does not slip away.*

No. 42] *[December 1774*

श्री

सेवेसी सां दडवत विनती. आताच वर्तमान आले की बडोदियाहून फौज या प्राती यावयास कूच करून निघाली. येक मजल अलीकडस आली. सत्य मिथ्य न कले. आले वर्तमान ते लिहिले आहे. आपण तिकडील बातमी राखिलीच असेल. सारांष सत्य मिथ्य न कले, यास्तव नरोतमास पर्वतारूढ जलदीने करावा. लटका लफरा[१] लस्करात ठेऊ नये थैसे आमचे विचार. मग आपली मर्जी. परतु रवाना करावा हे उतम. समई रखवाली करण नलगे, थैसे आहे हे विनती. आज गायकवाडाकडीलहि ठाणे दखल होणार ऐसे आहे. आपला कूच होऊन शहरासनिध कधी मोकाम होणार ते लिहावे. हे विनती. साष्टीकडील वर्तमान मेस्त्र वाटसन इग्रेज सरदार आला होता तो ठार पडिला. इग्रजाचे मोर्चे माघारे हटविले. तीनसे माणूस इग्रेजाचे ठार मारिले, या प्राो वर्तमान आले आहे व जागा जागा सरकारचे किल्याचे लोक मदतीस पावले व हुजूरची मदत आली, थैसे वर्तमान आले आहे. याउपर इंग्रेजाचा उत्कर्ष नाही. याप्राा जनवार्ता आहे. हे विनती.

¶*The writer (Dattaji Narayan) suggests that Narottam should at once be imprisoned and removed to a mountain fort in order to avoid further trouble. The news from Salsette about the English having lost their general Watson and some 300 men in the battle is also reported in the letter.*

---

१ भानगड ?

No. 43] [About March 1774

श्री

यादी राजश्री बाबराव सदासिव याजकडील बोलणे विद्यमान राजश्री कृष्णराव बलाल सुा आर्बा सबैन मया व अलफ

तुम्ही बारामतीस स्वस्थ राहावे १	टोक्यास जावयाचा प्रकार तर आमची मसलत सेवटास जाईल तोपर्यंत टोक्यासच स्वस्थ राहावे. १
आबाजी नाईक यांचे चिरंजीव शंभरा स्वारानिसी कृष्णराव बलाल यांजबराबर येथे पाठऊन द्यावे.	पागेचे राउतांचा करार सरकारचा आहे त्यापैकी शंभर हुजूर यावे. वरकड आपल्याजवल ठेवावे. नवे राऊत ठेऊ नयेत. बारामतीचे रक्षणास प्यादे फार ठेऊ नयेत. कार्याकारण ठेवावे कलम १

येकून च्यार कलमे लिहिली आहेत.

त्यास आम्ही मसलत आरंभिली आहे. यास शफतपूर्वक तिलमात्र मनात वाकडे न आणिता अनकूल असावें. श्रीमंत राजश्री दादासाहेबां-कडील लक्ष धरू नये. याप्राो मसलत सेवटास जाई तोपर्यंत निखालस असावे याप्राो घडावें. पुढेंहि दौलतीचा बंदोबस्त जाल्यानंतर इकडील लक्ष असावें. श्रीमंत दादासाहेबांकडील लक्ष धरू नये. निर्वलपणे[१] वर्तावें म्हणजे तुमचे स्वरूपायोग्य काम घेऊन तुमचे कर्जाचे परिहारास पाच लक्ष रुा तीन वर्षांत देऊ. याप्राों सरकारांतून घडेल. यास दरम्यान सखारामपंत व नानाफडनीस व शफत बेलभंडार. तुमची शफत पार्थिवपूजा जाल्यावर सिधेश्वराची शफत वाहून पार्थिवावरील बेल उचलून द्यावा.[२]

¶*The paper mentions the terms imposed upon Babuji Naik Joshi, by Sakharam Bapu and Nana Fadnis, who managed to win him over to the cause of the Barbhais.*

---

१ निखालसपणें. २ सबंध यादी हरीपंत फडके याच्या हातची आहे.

श्री

+विनंती विशष. सुर्तेहून आताच आपले ठाणयातोन बातमी आली की, सुर्तेहून इंग्रजाचे लोक जाहाजातोन भडोचस जाणार व काही भडोजेचे लोकास मिलोन आपणाकडेस मोकाबला घेणार यैसे वर्तमान आताच आले. मग न कले आपणाकडस येतील किंवा श्रीमंताकडस मदतीस जातील हे न कले. परंतु बातमीचे मनुश आले, त्याणे सागितले की लोकाची तयारी जाली आहे. हे वर्तमान आपणास कलावे म्हणून लिहिले आहे. श्रीमंत राजश्री बापू स्वामीकडील वर्तमान व राजश्री हरिपंत तात्या व होलकर सिंदे याचे फौजेचा वर्तमान कलत नाही. आपणाकडील काये वर्तमान आले असेल ते लिहावयास आज्ञा करावी. पाठीवरील फौज कोठे नाही, येणेकरून फार विलग गोष्ट घडोन आली आहे. साष्टीचा मजकूर पेशजी घेतल्याचे लिा होते. परतु मध्ये आहे नाही यैसेहि वर्तमान आले. परतु सावकारी थोवन धनजीचे पत्र व मुजरद माणूस साष्टीहून रा। बहिरोपंत मेहेंदले याचे माणूस आठा दिवसाचे परवाचे दिवसी आले. तो नजरेने पाहून इकडे आला. अत:पर संशये राहिला नाही. किल्याची बंदिस्त करीत आहे. आपल्याकडील विसाजी कृष्ण फौजसुधा साष्टीस कुमकेस आले होते ते कलवे खाडी आलिकडे उतरले होते. तेथेच राहिले. उपराला जाला नाही. हाली रा। विसाजी केशव लेले ठाणे घेतल्यावर दाखल जाले. बसईस आहेत. इंग्रजाचा विचार साष्टीचा बंदोबस्त करून वसईचे तर्तुदेत आहे. पुढे जे वर्तमान येईल ते लेहून पाठऊ. आम्ही सुरतेतून बाहेर निघोन आलो. तेथे दाहा पंधरा माणसे व फारसी कारकून माहालास आहेत व येक कारकून यैसे ठेऊन आलो. ठाणे उठऊन नरोतमाचे पुत्रास आमल दखल द्यावा व पहिले परगणे उरपाड, हसोट, अकलेसर घेतले होते ते पुन्हा घ्यावे, यैसी मसलत इंगरज मोगल मिलोन साप्रत घाट घडीत आहेत. त्यापैकी सुरतेची मामलत तो स्वाधीन आहे. ते हवाला करणार. याप्रो विचार आहे. आम्ही आलो म्हणौन इगरज व नरोतमाकडील फारच श्रमी जाहाले, ते लिहिण्यात येत नाही. नरोतमाचे मुबदला कैद करावे यैसा विचार पहिल्यापासोन चितात होता, तो हाली व्यर्थ जाला. आम्ही या अनर्थापासून

+ पत्र दत्ताजी नारायेण वगैरे यांचें.

मुक्त जालो हे स्वामीचीच कृपा. सूचना केली नाही तर फसलो असतो स्वामीचे पदरीचे आसो. बहुत काये लिा कृपा केली पाा हे विनंती.

¶Dattaji Narayan reports that the English force at Surat has been removed to Broach but he is ignorant of their destination and objective. He enquires about the real state of affairs at Salsette.

No. 44A] [*7-4-1774*

घडणी रुमाल नं. ४९९

नारो शंकर राजेबहादर

श्री

सुाा आर्बा सबैन मया व अलफ छ २२ माहे रबिलोवल अखेर मुाा पुणे विाा नारो आपाजी. सदासिव विठल याणी विदित केले की पाो यगरी येथील मामलत आपण हमीदखान ठोके याजकडून केली. ते समई सरकारातून तह ठरला की मानिलेनी सरजाम खाऊन चाकरी करावी आणि शाहाजखान व गुलज्यारखान पालक यास दोन गाव नेमून दिल्हे ते खाऊन हुजूर चाकरी करावी. येणे प्राो बंदोबस्त जाला असता दाजी बालकृष्ण याणी उभयतास श्रीमत राजश्री दादासाहेबाकडे लस्करात नेऊन बारा हजार रुाो नजर कबूल करून सरदारी शाहाजखान व गुलज्यारखान याजकडे करार करावी असे केल. परतु सनदपत्र जाली नाहित. उभयता लस्करातून पळून खानदेशात गेले. गुलज्यारखान मौजे लासूर पाो चोपडे हा गाव बलकाऊन बसले. पागा व पथक सरकार चाकरीस यावे ते नारो बालकृष्ण दाजी बालकृष्ण याचे भाऊ याचे स्वाधीन होते ते जाऊन शाहाजखान याजकडे मिलोन पाो मारी मवासी करितात. मौजे तलवाडे येथील बावाजी पाा सटवा चाभार पागेचा चाकर होता तो व येक मुसलमान मुसाफर असे तिघे जण जिवे मारिले, परगणा लुटिला. लोक परागंदा जाहाले. आपण रसद भरली ते बुडाली. सरकार चाकरीस ठिकाण नाही. येविसी सरकारचे पत्र सादर जाहाले असता त्याच्या ध्यानात येत नाही. अन्याय कर्मे करितात त्यांचे पारपत्य करून महालचा बंदोबस्त करावा म्हणून. त्याजवरून हे सनद सादर केली असे. तरी शहाजखान व गुलज्यारखान याणी गढ्या बलकाऊन धामधूम करितात. खून खराबी करून माहाली उपद्रव करितात. रयेतेचे दाणे वगैरे लुटून नेतात. साा त्यास कैद करून त्याची चीजबस्त घोडी वगैरे जफ्त

करून जावता हुजूर पाठवणे आणि त्या दोघास कैद करून ठेऊन सरकारात लेहून पाठवणे. परगण्यांत कोणविसी उपसर्ग न लागे ते करणे म्हणन मारनिले याचे नावे छ २९ मोहरम सनंद [नारो शंकर राजेबहादूर यास]

¶*This is an order from the newly formed Council of the Barbhais, asking Naro Shankar to capture Shahajkhan and Guljarkhan who had made common cause with Dadasaheb and acted against the Peshwa's Government. The paper supplies useful information about the antecedents of Guljarkhan and his patron Hamidkhan.*

No. 45] [*27-4-1774*

श्रीसीताकांत

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी

यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो मुधोजी भोसले सेनाधुरंधर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आपणाकडून पत्रे वरचेवरी आली ती प्रविष्ट होऊन लिहिला अभिप्राये कलो आला. अपल्या व सेनासाहेबसुभा व सेनाबाहादर याच्या भेटी जाहाल्या. उतम जाले. बोलण्याचे करारप्रमाणे लौकर यावयाचे करावे. ज्यापक्षी मसलतीचे वोझे आपण घेतले, तेव्हा सर्व गोष्टीची चिंता आपल्यासच आहे. हरिपंत दरमजल नेमल्याप्रमाणे जाणार. मोरो गोविंद याजबरोबर बापूजी मोरेस्वर देऊन बुंदेल्याकडे रवाना केले. तिकडील उतर येईल ते लेहून पाठवावें. सनदाप्रो बुंदेले अमल देतील, न दिल्हास ताकीद केली जाईल. वकिलासहि सांगितलेच आहे, दिकत पडणार नाही. वरकड समक्ष बोलणी जाली आहेत म्हणोन लिहिले यास बराडात आलियावरी बहुतकरून * * वर गावेल प्रकर्णीच लागलें; व नरनाल्याचा प्रकार आपले लिहिल्याप्रमाणे पर्यायावरी टाकून तेथे लोक चहूकडे त्याचे बदोबस्तास विदा केले. अद्याप तेथील काही सोये व मार्ग नाही. जैसे होईल तैसे बेगडा खाल्लून कूच करून सिंगणापूर नजीक खोलापूर येथे मारुतीचे दर्शनास्तव येणे जाहाले. तोफखाना वगैरे सरंजाम खेमेज्यात[१] व लोकाची बोलणी व देण्याघेण्याची तोडजोडी करितां याच जाग्यावरी कितेक मु(का)म जाहले. येथून कूच होऊन आलजपूरचे पिराचे दर्शन घेऊन आबंडापूरचे सुमारें कूच करावें यैसे होते. तो मध्यंतरी जो प्रकार घडला तो

---

१ तंबू वगैरे सामान.

आपल्यासहि कललाच असेल. याजकरिता १२ दिवस गुंता पडला. तेरावे दिवसी जरिंदा आलजपुरी पिराचे दर्शनास जाणे होऊन दो दिवसात तेथील गुंता उरकून पुन्हा मुकामास येणे जाहाले. येथून कूच होऊन मार्गातच जे लोकांची बोलणी व रवानगी बंदोबस्त जो घडत जाईल तो घडून आंबडापुरास येत असो. तेथेही अलजपूरचे मंडली आदीकरून यांची बिदाई करितो. मुकाम दोन च्यार होतील. तेथून दरमजलीने येणे घडत असे. मंडल्याचे प्रकर्णी अद्याप मोरो गोविंद व बापूजी मोरेश्वर याजकडील वर्तमान आले नाही. जे गोष्ट आपण निश्चयात आणली ते सिद्धीस जाईलच हे खातरजमा आहे. परंतु पला लांब. जे गेले, त्याजकडून काही वर्तमान कलत नाही. या सालाचा प्रांताचा यैवज बिलकूल बुंदेल्याकडे गेला. तेव्हां याच्या पर्याये व इकडील तेथे अमल करारवाकई[1] दाखल होणे हे सर्व करणें आपणाकडे आहे. सलाबतखान प्रकर्णी व बगाजी रघुनाथ यासी मोईनतदौला बाहादराचे बोलणे जाहले ते मशारनिलेनी येथे लिहिले, त्याचा मजकूर राजश्री हरिपंत तात्या यासी लिहिला आहे, त्याजवरून कलो येईल. रा छ १५ माहे सफर बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Mudhoji Bhonsle writes to Nana Fadnis the state of affairs in his province and says that he would soon start and gives his probable halts on his way. Senasaheb Subha (Raghuji), Sena Dhurandhar (Mudhoji) and Sena Bahadar (Sabaji) were the three titles of the three Bhonsles. But Sabaji seems to have been given by the Barbhais the title of Senasaheb Subha for a time to conciliate him and secure his help.*

No. 46] *[Received on 29-4-1774*

पौ छ १६ मोहरम
अर्बा सबैन

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी तुम्ही पत्र पाठविलें ते पावलें. राजश्री आनंदराव धुलप याणीं सालमजकुरीं गुराब धरिली. त्याजवर दरोबस्त माल गोविकराचा, कठडा व दोन हजार रुपयांचा माल मात्र मुंबईकर साहुकाराचा. तो धुलपानी मुंबईकरास माल देऊन पावत्या घेतल्या. ऐसें असतां मुंबईकराचा वकील म्हणतो कीं, कठडा आमच्या बंदराचा व कौल आमचा आहे. तेव्हा वरील माल आमचा, तो आम्हांस द्यावा. ज्याअर्थी माल आम्हांस देत नाहीं तेव्हां आमचे येथे राहावयाचे

---

१ दुरुस्त, योग्य=करारायोग्य,

कारण काय? ऐसें म्हणतो. त्यास गोविंकराचा माल सांपडेल तो सरकारांत ध्यावयाचा ऐसें असतां यांचे गुराबेवर होता म्हणोन मागतात याचें कारण काय? व सरकारी वाजबी कलमे सुरतेचा अंमल सुरलीत सुदामतप्रमाणे द्यावा तो देत नाही व भडोचचे सालाबादी शाहातरशे रुो द्यावयाचे असतां मनमाने तैसा ऐवज घेऊन कमावीसदारांचे ठाणे उठऊन आपलें बसविलें आणि मनास येईल तैसा पैका घेतात व बाणकोटचे खाडींतून सरकारचें भात वगैरे गलबतांवरून तालुक्यांत आणितात त्यास अडथला करावयाचें कारण नसतां अडथला करितात. या गोष्टींचा बंदोबस्त त्यांच्याने कांहींच होत नाही आणि गैरवाजबी कलमाचा जाबसाल घालून वकील जातो म्हणतो याचे करण काय? तरी येविसींची जाबसाल त्यास पुसोन काय तें त्याचें उतर घेऊन लिहून पाठवावें हे+ विनंती.

¶Nana Fadnis asks Naropant Nana to make enquiries as regards the differences that had arisen between Dhulap and the English and to find out why the English Vakeel has adopted quite a strange attitude.

No. 47] *[11-5-1774*

श्रीशंभुप्रा

राजमान्य राजश्री सखाराम भगवंत यासी श्रीमन्महाराज मातुश्री दुर्गाआईसाहेब याणी आज्ञा केली यासी जे. साहेबाची सर्व भिस्त तुम्हावरी असतां यखादी गोष्टी सरकारात न कलता घडावी हे विहित की काय, समजोन पाहाणे. तीर्थरूप मातुश्री ताराऊसाहेब व माहाराज राजश्री स्वामी व मातुश्री आईसाहेब कैलासवासी यांचे सेवेसीं बालाजी पंडित तागायत कसे अर्ज करीत आले व यादीहि ठराऊन शफतक्रिया दिल्ह्या आहेत याची माहितगिरी तुम्हास पुर्ती आहे. बालाजी पंडित व राजश्री रघुनाथ पंडित उभयता करविरी आले ते समईच्या शफतपुरसर यादी करारमदाराच्या आहेत त्याच्या नकला वेदमूर्ति राजश्री माहादेवशास्त्री पोंडेकर (?) यांजकडे पाठविल्या आहेत. तरी त्याची पुर्ती चौकशी करून सुज्ञपणास उचित आसेल तेच करावे. क्रियालोप वगैरा वर्तणूक आज्ञान लोकापासून घडती. परंतु त्यात कांहीं विशेषता नाहीं. सारांश क्रियेस व जातीस दोश न लागे ते करावे. सिवशाई रक्षण करावी यदंनिमित्य सेवेविसी निर्माण श्रीजगदंबेने तुम्हांस केले आणि प्रस्तुत काली शिवशाईत यक साहेब यांजकरितां देशादेश पाहोन जे कर्तव्य ते करणे. जर करिता तोच अगत्यवाद धरून केलेस साहेबाची अपकीर्ति

+ पत्र नाना फडणविसाचें.

तुम्ही घेता हे पुर्तेपणें समजणें. सर्वप्रकारें विस्वास साहेंबी तुमचा मानिला आहे. तरी तुम्ही हुजूर येऊन साहेबाचे सेवेसी अर्ज करून साहेबाची स्वारी सत्पुरुषीस करविली तरी इहलोकी उत्तम आणि परलोकीहि इमान, हे दोन्ही साधिलीस होतील. हे अदिपश्चात ध्यानात आणोन उतर सत्वर पाठवावे म्हणिजे साहेबाचे सेवेसी विदित होऊन स्वस्तता मानिली जाईल. विनंति. लिहिण्यात आपली क्रिया स्मरोन दिगर न कर्णे. यविसी चिरंजीव+ राजश्री यशवंतराव सिंदे सरसुभेदार यांणी आज्ञेप्रो लिहिले आहे त्यावरून कलेल. जाणिजे रा। छ २९ सफर बहुत काये लिहिणे.

¶*Durgabai, Rani of Kolhapur, complains to Sakharam Bapu about the Peshwa's breach of promise towards Kolhapur.*

No. 48] [*Received 23-5-1774*

पा। छ ११ रबिलावल

श्री

यादी श्रीमंत राजश्री दादा साहेबाकडील जाबसालाचीं कलमें येणे प्रो. सुा आर्बा सबैन मया व आलफ.

१ सिबंदी वारायासी यैवज कमबेश साहा लक्ष रुपये द्यावे आणि सिबंदी दूर करावी कलम

१ पोटाचे बेगमीस तूर्त लाख रुपये द्यावे. पुढे शागीर्दपेशा व पीलखाना व धर्मादाव व भोजनखर्च वगैरे नेमणूक करून दरमाहाचा दरमाहा द्यावा. या यैवजी जागीर लाऊन द्यावी आथवा नख्तच दरमाहा देत जावा कलम

१ सिबंदी वारावार जाहाल्यावरी उभयता सरदार देसी येतील तेसमई श्रीमंतासहि समागमे घेऊन येतील कलम.

१ श्रीमंताजवल उभयता सरदाराकडील स्वार प्यादे मिलोन पाचसे चाकरीस राहावे. यैबज सिबंदीस लागेल तो सरकारांतून द्यावा. सरदार हिंदुस्थानात स्वारीस जात तोवर सरदाराकडील सिबं(दी) आसावी कलम.

१ कबिले ब्राम्हणाचे व मऱ्हाव्याचे कैदेत असतील ते उभयता सरदार देसी येतील आणि रदबदल करितील ते सोडावे.

+ येथून अक्षर निराळें. अशाच मजकुराचें दुसरें पत्र करवीरकर शिवाजीचें सखारामबापूस रा. श. १०० जयसंवत्सर, वैशाख शुद्ध ३, सौम्यवासरचें आहे, म्हणजे ता. ११-५-१७७४ येतें.

१ फितुरियांचें पारपत्य येथायुक्त करावे

१ नवाब बसालतजंग याचे पुत्रास सोडऊन द्यावे

येणेप्रो सरदाराचे मते याद ठरली ते पाठविली असे. दादास उभयेता सरदारानी पुण्यास घेऊन यावे. येविसी उभयताचे सिक्यानसी दस्ताथैवजी कागद लेहून घेतले आसेत. आपणास कलावे.

¶*These are the terms that were mutually agreed upon between Raghunathrao and the Barbhais. Raghoba however refused to abide by these terms and fled.*

No.'49] *[24-5-1774*

पो छ १७ रोवल सन
आर्बा

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
उभयेता स्वामींचे सेवेसी

पो कृष्णराव बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १२ रावल पो वर्तमान येथास्थित असे विशष. इंदुराहून राजश्री उभयेता सरदारांची पत्रे व गुरुजी, नागो राम, मोरो गिरमाजी याची पत्रे आली ती व श्रीमंत रा दादासाहेबाचे मजकुराची याद व पत्रें पा आहे * * * * * * दित * * * श सरकारच्या फौजा मातबर व मोगल मिलोन दिवसगत लागल्यास भारी खर्च, यास्तव मसलत लावणें यास करोडो रुपये पाहिजेत, यास्तव श्रीमंताची सिबंदी लौकरच वारून त्यांजकडील जाबसाल उरकून घ्यावा, या अर्थी सिबंदीचा यैवज कबूल करावा लागला. त्यासी लौकरच कामाचा उलगडा तेच करण्यांत आणावे लागते. याचे विस्तार अर्थ रा हरिपंत तात्यानी लिा आहेत त्याजवरून कलों येतील. बहुत काये लिहिणें लोभ आसो दीजे. हे विनंती.

¶*Krishnarao Ballal communicates to Nana Fadnis and Sakharam Bapu the terms proposed by Raghoba through Sindia and Holkar and requests their acceptance as protracting the negotiations will be most costly in the end.*

5973

No. 50] [29-5-1774

पौ छ १७ रौवल
सन आर्बा रविवार
त्रितीये प्रहर

श्री

राजश्री बालाजीपंत नाना गोसावी
यांसी

᳚ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री माहादजी सिंदे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. श्रीमंतामागें सरकारची फौज लागली, यामुळें तडक आजंठ्याचा घाट उतरून पल्त पलत खांदेशात गेले. कदाचित नर्मदा उतरतील तरी तुम्ही घाटाची बंदोबस्ती करून आडवें व्हावें म्हणोन आपली पत्रें येत गेली. त्यावरून लोकांचे तोडीस उजनीत कारकून टाकून बाहेर निघालो. लोक पागा तयार होऊन यावयासी येक दोन दिवस लागले. इतक्यात श्रीमंत बऱ्हाणपुराहून पंचवीस पंचवीस कोसांच्या मजली करून सेमरुडीस आले. राजश्री तुकोजी होलकर जाऊन भेटले. दुसरे दिवसी आम्ही आलो. भेटी जाहल्या. श्रीमंत आपण होऊन आले, त्यासी निकर्ष करावा अगर भीड धरून जाऊ द्यावे, हे दोन्ही अर्थ न घडेत, तेव्हां भानगडीचा जाबसाल लाविला आहे. लोक श्रीमंतासी सिबंदीची निकड करितील तरी त्यांस नख्त रुपया देऊन तोड पाडली पाहिजे. येविसी राजश्री माहादाजीपंत गुरुजी आपणास लिहितील, त्याचे उत्तर पाठवावें. आमचे वोढगस्तीचा प्रकार आपले ध्यानातच आहे. श्रीमंतास अनेक प्रकारे संबोधने देऊन वाटेवर आणावे, हीच विवंचना रात्रंदिवस आहे. रा छ ३ रौवल बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*In reply to Nana Fadnis who asked him to prevent Dadasaheb proceeding northwards, Mahadji Sindia says that he could neither allow him to proceed nor join issues with him. He has however,—he says,—detained him on the way.*

No. 51] [1-6-1774

पौ छ २७ रोावल सन
खमस

श्रीरामोजयति

सेवेसी बालाजी नारायण सोवनी कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २० रौवल मुकाम बऱ्हानपूर यथास्थित आसे विशेष. सेवेसी

दोन च्यार पत्रे पाठविली ती पावली असतील. इकडील वर्तमान तर श्रीमंत इंदुरास आहेत. सिंदे होळकर यांची पत्रे परवाचे दिवसी आली होती की, येथील बोलण्याचा गुंता बहुतकरून उरकला आहे. याउपरी श्रीमंतास घेऊन लवकर निघोन येतो. इंदुरातून निघाल्यावर पुढे फौजा नरमदेवर आहेत, त्यानी मावारे जावे याजप्रमाणे लिहिले होते. सेवेसी निवेदन व्हावे म्हणौन लिहिले आसे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Balaji Narayan sends news about Raghunathrao from Indore.*

No. 52] [*2-6-1774*

असल प्रा नकल

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री गोविंद हरि कादार पा साखरखेडले गोसावी यासी प्रति मातुश्री गंगाबाई असीरवाद सुा आर्बा सबैन मया व अलफ. सिलेदार निा सरलस्कर * * * कडे पा मजकूर येथील मोकासा देखील जकात * * * बेगमीस सरजाम बितपसील.

१ सुभानजी आटोले धुरंधर समसेरबहादर यांजकडे फुट मोकासी खेरीजकरून अमल आहे तो

१ हणमंतराव आटोले सफेजंगबाहादर ता नानेफल पैकी देहे ९ नव

१ हणमंतराव बिन गिल्यानजी (?) आटोले यांजकडे मौजे निसरूल

३

येकूण तीन आसामी याकडे लिहिल्याप्रा अमल चालत आहे त्यास मारनिले तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे चाकरीस आहेत, सबब सदरहूची जप्ती करून कमाविश तुम्हास सांगितली असे. तर अमल चौकसीने करून आकार होईल, तो सरकारात पावता करणे. जाणिजे छ १ रोवल आज्ञाप्रमाण मोर्तब.

¶*Government orders to Govind Hari to take possession of the villages granted to Subhanji and Hanamantrao Atole as they have joined Raghoba Dada.*

No. 53] [*2-6-1774*

पो छ २९ रोवल

सन खमस

श्रीगणपति

राजश्रियाविराजित राजमान्य राजेश्री

उभयेता स्वामीचे सेवेसी

पोष्य पुरुषोतम कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ २१ रबिलावलपरियेत श्रीत्रिंबकेश्वरी क्षेमरूप असो विशेष. आपण पत्र सोलावे रबिलावलचे पाठविले तें चंद्र येकुणिसावे रबिलावली प्रातकालीं प्रहर दिवसास पावले. लिहिले वर्तमान कलले. किलेचे वर्तमान हस्तगत जाहालेचे लिहिले आहे. कोणाचे स्वाधीन करणे म्हणून पत्र येईल त्या पत्रांचा मार्ग पाहत आहे. माहागांई फारच जाहाली आहे. आज्ञेप्रमाणे राजश्री आबा हशमनिसाचे पत्र मोलेरीस रवाना केले. राजश्री कासीपंताची रवानगी गंगापुरास करतील. येथील लोकहि मोलेरीस रवाना केले आहेत. लक्षुमणपंत किलेकराकडून राजश्री आबाकडे आला आहे. आपणाकडे किलेकराचा कारकून आला आहे, असे कलले, त्यावरून लिहिले आहे. श्रीमताकडील व उभयेता सरदाराचा मजकूर लिहिला तो कलला. सदैव पत्री सांभालीत जावे. कृपेचे इछक आहो. श्रीमंत मातोश्री बाईसाहेब गंगापुरी आहेत. किला कोणाचे स्वाधीन करावा म्हणून विनंती केली, त्यानी आज्ञा केली की उभयेता आज्ञा करतील त्याप्रमाणे वर्तणूक करणे. येथे सतंत्र काही कारभार करावा ही वासना काही त्याची नाही. प्रातःकाली श्नान करून देवदेव करावा, धर्म करावा, हीच वासना आहे आणि करीतहि आहेत. भूतदया आहे. कोणावर राग करावा हे मानस नाही. आपण उभयेता करिता हे उतम मानीत आहेत. बहुत काय लिहिणे कृपा लोभ करावा हे विनंती.

¶*Purushottam Krishna (Patwardhan) awaits orders from Poona as to whom he should hand over the fort of Trimbak. He also says that Gopikabai does not wish to interfere in political affairs but leaves them to the two addressees at Poona. She passes all her time in religious occupations.*

No. 54] [*7-6-1774*

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रणसोड कृष्ण संजगिरे मो मुंबई कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २६ माहे रबिलोवल पावेतों स्वामीचे कृपावलोकनेकरून

सेवकाचे वर्तमान येथास्थित असें विशेष. देवजी सिरोले व येसाजी काले जासूद-जोडी यासमागमे सेवेसी बातमी वर्तमानाचे विनंतीपत्र रवाना केले आहे. त्याचा मजकूर निवेदन जाहालाच असेल. उपरांत कितेक दिवसीं मल्हारी जासुदाबरोबर आज्ञापत्र पाठविले ते छ २१ मजकुरी सादर जाहाले. लिहिला अर्थ सविस्तर कलला. यैशास सरकार ममतेचे सध्या तीन इंग्रेज मातबर कोसलदार पहिले-पासोन आहेत. त्यास काही बहुमानाची यादगिरी व्हावी व पुढे हरयेकविसी विशेष सरकारउपयोगास पडावे म्हणोन वारंवार सेवेसी विनंती केली की, बहुमानाची व पत्राची मर्जीस येईल ते आज्ञा करावी. त्याजवर सेवकास हालीं आज्ञा केली जे बहुमान काये पाठवावा, त्याची योगता काये? त्यास आम्ही काये सांगावे? धन्याचे नाव व मानिले त्रिवर्गाची मातबरी व येकनिष्ठता समजोन कोणास न कलता येकांती काये ते मेहरबान व्हावे. रोख ऐवज घेणार नाही. काही तोफे[1] जिनस अथवा दागिने असिल्यास खूश होतील. यानंतर तीपैकीचा इंग्रेज पुण्यास येणार व सरकार कामकाजे करून देणार येविसी पेसजी येकदोनद स्वामीची आज्ञा आली होती, की आमचा येक कारकून शाहाणा पाठऊन द्यावा मनसुबा मनास आणून काये ते उतर केले जाईल. त्याचा जाब तेंच समई पाठ विला यैसा जे, बोलीचाली इंग्रजाकडिल आहे त्यांची पांच कलमें सेवेसी रवान जाहाली. मर्जीस आल्यावर सरकारचे पत्र जनरालास असावे त्याप्रमाणे इंग्रेजाची रवानगी होईल. व तेथे रुबरू मोडतोड करून करार करणार स्वामी धनी समर्थ आहेत. यैसे असतां शब्द लाऊन लिहिले तर आम्ही आज्ञासिवाई काडी मात्र कोणे गोष्टीची वर्तणूक करणार नाही व इंग्रेजासहि परवानगीखेरीज नेणार नाही. जे कलमे इंग्रेजाची मागें पाठविली होती, तींच आलाहिदा सेवेसी जात आहेत इंग्रेज घडीघडी जाबाविसी पुसतात, यास्तव सेवेसी ल्याहावे लागते. व दोकडेस (दोनहीकडे) आंग पाहून प्रविष्ट करितो. वरकड दुसरेकडून बातम्या जातात त्यात हा विकल्प नाही. असो आम्हास जे आढळतें तेंच वरचेवर विदित करितो. स्वामीचे पायाजवल सहसा लटके लिहिणारच नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ranchod Krishna, Peshwa's agent at Bombay, requests that some presents—cloth and ornaments—should be sent to three councillors at Bombay in order to secure their good will in favour of the Peshwa.*

---

१ भेट, नजराणा.

5977

No. 55] [11-6-1774

पैवस्ती छ ९ रबिलाखर सुरु खमस सबैन जेष्ट.

श्री

राजश्री राऊ पंडित
प्रधान गोसावी यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल राम राम विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीनी कृपा करून पत्रिकाप्रेषण केली ते उत्तम समई प्रविष्ट जाहाली. श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याणी पेशवाईचीं वस्त्रें बहुमानपूर्वक दिल्हीं तीं छ १६ रबिलावल वैशाख वद्य चतुर्थीस वीस घटिका रात्रौ सुमुहूर्तें करून घेतलीं म्हणोन पत्रीं आज्ञा. ऐशास पत्रार्थ श्रवण होऊन कोट्यावधि आनंद जाहाला. एसेंच सदैव पत्रद्वारें लेखनाज्ञा केली पाहिजे. रवाना छ १ माहे रबिलाखर बहुत काय लिहिणे कृपा करावी हे विनती.

¶*Raghoji Angria congratulates the Peshwa on receiving the robes of the Peshwaship from the King.*

No. 56] [12-6-1774 ?

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री हरिपंत तात्या स्वामींचे
सेवेसी

पो सिवाजी विठल कृतानेक सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २ राखर रविवारपर्यंत येथास्थित आसो विशेष. येथील वर्तमान राजश्री आपाचे पत्रावरून कललें. रविवारी श्रीमताचे कूच उभयेतां सरदारसुधां व्हावे येैसे गुंता आठ पंधरा दिवस पडलेच. आमच्या खर्चाचा प्रकार दरमाहा तीस हाजार पाहिजेत. त्यांज पैा कैलासवासी मामानी पंधरा तूर्त देविले. बऱ्हाण-पुरचे मुाा आपल्यास सरदारीची वोढगस्ती सांगतलीच होती. त्याजवरी आपण दाहा हाजार पाठविले तों येक रोजमरा सिलेदारीचा जाला. पुढे चंदीस व दीढमाहीस ठिकाण नाहीं. लोकाचा गवगवा, अखेरसालचे दिवस, लोक संडे, येथें साहुकारा नाहीं, कर्ज न मिले; चहूंकडून संकटांत आहोंत. माहालची अवस्ता तो सिहूर दुहारा वगैरे च्यारी माहाल पेंढारी याणी लुटून पस्त केले.

लावणीचा हांगाम माहाली बखेडा, पो उरपाड प्रांत गुजरात येथील ठाणे राजश्री बाबूराव हरि याचे पुत्रानी उठविले, तेथील मामलेदार उठून सुरतेस आले. माहालची अवस्ता आपण परस्परे ध्यानांत आणावी. येविसई वारंवार ल्याहावे यैसे नाही. खर्चाची विपत्य बहुतच आहे. माहागाई जाली आहे. श्रीमंताची मसलत तो लांबली; यांजकरितां आपण चितावरी घेऊन तूर्त रुपये तीस हाजार द्यावे म्हणजे आमची स्थित राहील. येथे कर्जवाम मिलतें तरी आघल्यास संकट घालावे यैसे नाहीं. काही उ (अपूर्ण).

¶*Shivaji Vithal asks for a supply of funds in order to pay his troops.*

No. 57] [*25-6-1774*

पो छ ६ जोवल सन
खमस सबैन

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक जगनाथ नारायेण मो किले अशर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १९ रााखरपावेतो किले मजकूरचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र छ २० रबिलौवलचे सादर जाहालें की श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याणी पेशवाईची वस्त्रें छ १६ रोावल वैशाख वद्य चतुर्थीस वीस घटका रात्रीस दिल्ही. पत्र पावोन बहुत आनंद जाहाला. पत्री आज्ञा कीं किले आशेर येथे साल मजकुरी गडबडीमुलें बेहेड्याचे नेमणुकेपेक्षा जाजती लोक ठेवणें म्हणोन हुजूरची आज्ञा नाही व तुम्हीहि ठेविले नसतील. कदाचित ठेविले असिल्यास त्याचा पैका परिछिन मजुरा पडणार नाही म्हणून आज्ञा. यैसियास आवईने सेवक कचापका व्हावयाचा नाहीं व दरकार नसता सिबंदी ठेऊन सरकारनुकसान करणार नाही. परंतु श्रीमंत राजश्री दादासाहेब तीही कोसावरून किल्यापासून गेले. किल्याचा व पेठेचा बंदोबस्त राहिला पाहिजे हे जाणून पनास साठ माणूस जाजती ठेवणे पडले. मागाहून फौज आली ती तमाम मुलूक लुटीत जालीत चालली, तेव्हा रयेत पाहाडात गेली. तेथे चोरट्याचें भय. मैदानात फौजेचे भय. तेव्हां रखवालीस माणूस ठेवणे पडले. परंतु बेहेड्यासिवाये बहुतसा जाजती खर्च होणार नाही. कसोसी होतां होईल ती करून वर्तणूक करीत आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Jagannath Narayan, keeper of fort Asher, explains to the Peshwa why he was required to strengthen the garrison.*

5979

No. 58] [June 1774

श्री

पुा श्रीमंत तात्या स्वामीचे शेवेसी

विनंती यैसीजे. उभयता सरदारांची पत्रे आपणाकडे सर्वदा येतात; त्यावरून याचे येण्याचा निश्चय बोलण्यातहि येतो. आंतरंगाचा भावार्थ की, उभयता धणी. आपण कोणासी जुंजावे? समान बल जबर आहेत. जोपर्यंत जुजतां. येक धणी सबल ठरल्यास त्याज कडे सहजच जाणे पडेल किंवा दोन्ही थकतील आणि सलुखावर येतील तर आपण दरम्याने पडोन सलूख करून द्यावा. तोपावेतो आपण आपलाल्या जागाच श्वस्त राहावे. यैसेकरिता आपण देसी जावयास निघोन गेलों, तर श्रीमंत सौवती आनंदीबाई वर्तमानकाली जबर जागेस धारेच्या किल्यात बसली आहेत ती आपल्या जाहागिरीत दंगा करितील. घरदाखल मालवा आहे त्यात बखेडा जाल्यावर शेवट कसा लागतो? येणेप्रा या उभयताचा भावगर्भ दिसतो. वारंवार आपण लिहावयाकरितां आज्ञा होईल यास्तव मथितार्थ यैसा आहे. श्रीमंत दादाकडील सरदार व इम्रजा भेदार्थ ज्या द्वारे होईल ते बुध्धी विचारणी आनेक प्रेत्नी आलस नसावा. बुध्धीबलें सर्वार्थप्राप्ति आहे. कदाचित युध्धप्रसंगच कर्तव्यता जाल्यास दावयावे प्रथमता फत्ते होय यैसाच योग घडल्यास सर्वत्र द्वामुशणी जे आसतील ते आपल्याकडे येकाग्रतेने साहेकार होऊन सर्वार्थ होतील. आपण सर्वज्ञ मी अल्पज्ञ, परंतु शेवकाही यथामति विनंती करावी. सूर्यापुढे काढवात त्याप्रो लेखन आसे. निरंतर पत्रीं साभाल करावा. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶The writer reports to Haripant Tatya the attitude of Sindia and Holkar who are reluctant to espouse the cause of either of the two—the Barbhais or Raghunathrao. He further advises the addressee to try to effect defection in the following of Dadasaheb.

No. 59] [July 1774

श्री

राजश्री दिनकरपंत स्वामीचे सेवसी

विनंती उपरी. सुलतान सांडणीस्वारासमागमे पत्र पाठविले ते पावले असेल. पुरंधरास जाण्याचे निमित्य इंदुराकडील कांही विशेष वर्तमान नाही. सिंद्यासी व मानाजी फाकडा यासीं काही कटकट जाली. होलकर दुरोखी आहे. त्याचा भरवसा नाही. आपल्याआपल्यांत संषये धरितात. याच्या फौजा आलीकडे

आहेत. श्रीमंत लवकरच इंदुराहून निघोन कराराप्रमाणे इकडे येणार. संषयाची गोष्ट अद्याप दिसत नाही. मग न कले. सासवडाहून पुरंधरास यावयास कारण गावात राहाणे ठीक नव्हे. माचीस राहिल्यास बंदोबस्त खातरजमेचा; यास्तव निघोन गेले इतकाच अर्थ. विशेष नाही. आपणास कलावे म्हणोन लिहिले आहे. बंगल्याचे बागेचे काय जालें? बागाचा फरचा कसा जाला ते सविस्तर लिहावें. चिरंजीव नीलकंठराव पुणियास आज येतील. किल्याची हवा सोसेणा यास्तव च्यार दिवस पुणियास येणे तरी येऊ. राजश्री नारोपंत नानाहीं कारकुनाविशीं राजश्री नानास सांगितलें. त्याणी कबूल काही केलेसे जालें. त्यास हाली नाना म्हणतात राजश्री बापूजवल बोलावयास नाना जवल असल्यास उतम. आम्ही बोलू, परंतु ते असल्यास उतम. त्याजउपरी आम्ही उतर केले की ते पुणियाहून आज्ञेसिवाये कसे येतात. उगेच येणार नाहीत. याप्रो बोलिलो. परंतु पुढे उतर जाले नाही. हे वर्तमान नारोपंत नानास सांगावे. बेहाड्याचे[२] वेलेस जरूर यावे लागेल. आपण येत नाहीत तरी कारकुनाचे वगैरे काम येथास्थित होणार नाही. येक दिवस येऊन जावे. याची बेहाड्याविशीं ताकीद फार आहे, की लवकर समजा (अपूर्ण.)

¶*The writer explains why Nana and Bapu left Saswad and went to Purandhar. He refers to a quarrel between Mahadji and Manaji Sindia and to the vacillating temperament of Holkar.*

No. 60] *[17-7-1774*

पौ छ १२ जावल.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे
सेवेसी

पोष्य जंगनाथ नारायण मो किले आसेर कृतानेक सा नमस्कार विनंती. येथील क्षेम ता छ माहे जावलपावेतो आपले कृपेकरून असे विशेष. बहुतां दिवसी कृपा करून पत्र पा ते पावले. राजश्री हरिपंत तात्याकडील बातमी वरचेवर लिहावी व नवाबाकडील वगैरे वर्तमान लिहावे म्हणून लिा त्यास, तात्या फौजसुधा सुखरूप महेस्वरास दाखल जाले. अहिल्याबाईनी मेजवानी केली होती.

---

१ रघुनाथराव दादा परत येण्याचा करार इंदुरास जून १७७४ त ठरला.

२ बेहाडा = Budget estimates.

मर्दानेयाचे घाटे नर्मदा उतरणार. बराणपुराकडून येणार आहेत. अहिल्याबाईनी सिंदे यांस भेटावयास तात्यास राहाऊन घेऊन बलाविले आहेत म्हणून बातमी. कलावे. नवाब बालापुरावर आहेत. अवरंगाबादेस छावणीस येणार. राजश्री मुदोजी भोसले याचा तह नवाबानी केला आहे की, नागपुरास स्वस्त राहावे, श्रीमंत दादासाहेबाचा पक्ष धरू नये याप्रो करार केला आहे. पुढे होईल ते पाहावे. मा इसफ गाडदी भोसले याजवल चाकर होता तो दूर करविला. तो सौभाग्यवती श्रीमंत मातुश्री आनंदीबाई धारेस आहे त्याजकडे गेला. हांडे सरकारात गेला आहे. जमयेत गाडदी २५०० व स्वार ५०० बराबर आहेत. राजश्री तात्यास त्याचे पारिपत्याविसी लिा आहे. सोई पडेल तर करितील याप्रो मजकूर आहे. स्वामीस कलावे म्हणून लिा: बहुत काय लिा लोभ करीत जावा हे विनंती. तुम्हाकडील जासूद येथे आले होते, त्याजबराबर माणसे देऊन महेस्वरास रवाना केले. कलावे हे विनंती.

¶*Jagannath Narayan informs Naropant that Haripant Phadke has arrived as far as Maheshwar and has been asked to stop there by Ahilyabai in order to confer with Sindia. He also writes that the Nizam has prevailed upon Mudhoji Bhonsle not to join Raghunathrao. " Muhammad Isaf has been dismissed from service by Bhonsle and gone over to Anandibai at Dhar with his force."*

No. 61] [*28-7-1774*

पो छ २६ जमादिलावल
सुा खमस अशाढ मोक-
लिकेची यादी लिहिणें.

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी गोसावी

विनंती उपरी. राजश्री रामचंद्रराव पवार सिलेदार हे तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबांकडे चाकरीस होते, सबब यांच्या सरंजामाची जप्ती केली आहे; त्यास मशारनिले तिकडून सरकारचे फौजेंत हजीर जाहाले, सबब यांच्या सरंजामाची जप्ती जाहाली आहे ती मोकली करणें. जाणिजे छ १८ जमादिलावल सुा खमस सबैन मया व अलफ, बहुत काय लिहिणें हे विनंति.

¶*Naro Appaji is asked to release the Saranjam of Pawar which had been confiscated as he has left the side of Raghoba and returned to the Barbhais.*

---

१ येथून तेरीख नाना फडणविसाचे हातची. २ यापुढील मजकूर सखाराम बापूचे हातचा.

No. 62] [7-10-1774

पौ छ ८ सवाल
सन खमस सबैन

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंत
प्रधान साहेबाचे सेवेसीं

विनंती सेवक शंकराजी खंडेराव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा आस्विन शुध्ध द्वितीया माहाराजाचे कृपावलोकने यथास्थित असें विशेष. आज्ञापत्र सादर जाले ते शिरसावंदन केले. पत्री आज्ञा राजश्री मुधोजी भोसले व हैदरनाईक व गोविंदराव गायेकवाड यांजकडे वगैरे फितुरी जागा सिलेदार वगैरे चाकरीस गेले असतील त्यांची घरे ठिकाणी लाऊन जप्त करून त्यास कागद लेहून लवकर घरी आणावेत व पुढे फितुरी सरदाराकडे चाकरीस जाऊ नये यैसे, आणिक सिलेदार राहत असतील त्यास जमीदार जामीन घ्यावेत म्हणौन आज्ञा; तदनुसारे जागाजागा शोध करून वर्तनूक करू. साहेबी स्वकीय प्रतापाधिक्य लेखनद्वारा आज्ञाधारकास संतोषवृद्धि केली पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Shankraji Khanderao to the Peshwa, saying that he has executed the orders regarding the confiscation of property of men who had joined Mudhoji Bhonsle, Haidar and Govindrao Gaikwad.*

No. 63] [November 1774

श्री

श्रीमंत राजश्री बापू
स्वामींचे सेवेसी

सेवक बाबूराव विस्वनाथ वैद्य कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. ताा छ सवाल मुाा (ना)गपूर स्वामीचे कृपेकडून वर्तमान येथास्थित आसे वि(शेष). (आ)पण पत्र छ १३ रमजानचे पाठ * * * * * छ २६ मिनहूस पावले. तेथे आज्ञा (श्री)मत कासारबारीच्या सुमारें (आले त्यांजक)डील जाबसाल उभयेता सरदारा * * (वि)द्यमाने आहे. परंतु त्यांतील जाब स्वा(ल) * * * थून तेथून लेहून जावयास दिव * * * लागेल. लौकर निकाल पडणार नाही याजकरिता आंम्ही उभयेता कार्तिक वद्य ५ पंचमीस येथून निघोन कार्तिक आखेर टोकेयास येतो. तुम्ही राजश्री सेनासाहेबसुभा यास घेऊन

लौकर आपले फौजेत मिळोन मलकापूरचे सुमारे राहावे. राजश्री हरिपंत लिहिती त्याप्रा सावध आसावे म्हणोन आज्ञा. त्यास इकडील वर्तमान तरी राजश्री विठलपंत सुभेदार वगैरे सरदार बाळापूरचे सुमारे राजश्री हरिपंत तात्या याचे आज्ञेप्रा होते, त्यांत याणी येऊन येकत्र होऊन मलकापूरच्या सुमारे आसावे, जैसी मसलत पडेल तैसे करावयास येईल हे योजनेत होतो. येथील फौजेची समजावीस नाही. पैकेयास जागा नाही. काम सुस्तीखाले पडले. याअर्थी येजमान कारभारी यात विक्षेप. त्यातहि कारस्थानी करून उपयोगी पडावे यैसे विचारणेत आसतां राजश्री सेनाधुरंधर व इस्माइलखान व महमद इसफ व झामसिं(ग) याणी फौजेची समजावीस करून श्रीमंताकडे जावे यैसे योजिले. दरम्याने * * * निभाव न पडे किंवा उभयेता * * * * करारत गोष्ट नाही ते जाहाली * * * * घड पडेल ते कैसे येऊ देतील? या * * * * तिकडील रोख टाकून नागपूरची * * (ध)रिली विसंच फौजेचा गल्ल * * (फा)टका कारभार ठीक नाही, हे बातमी त्या * दीनच्ययेंची होतीच या संधीत गाठावे या मनसबेयावर राजश्री सेनाधुरंधर व गार(दी) मजल दरमजल किले आमनेरास आले. तेथील किलेदार भेटले. तेथे बुलगे टाकून येतात हे बातमी आली. तेव्हा छ १० रमजानी राजश्री सेनासाहेबसुभा डेरेदाखल जाहाले. राजश्री विठलपंत यांस निकडीची पत्रे व हातचिठ्या गेल्या, की रात्रीचा दिवस करून समयास येऊन पोहचावे त्यावरून ते आडवे आले. यानी येथून कूच करून पुढे जावे तरी विनापैका कैसे घडते? पैकेयास तर ठिकाण नाही. संकटात पडले. आपण व कारभारी यानी सावकाराच्या घरास जावे परंतु ताल न पटे. दिक जाहाले. मोठ्या संकटे येजमानानी व दिवाकरपंत व उभयेता भवानीपंत व सर्व मुछदी मिळोन दाह लक्षाचा यैवज ठराविला. आम्ही व राजश्री नाना नित्य जात होतो. पुढे हिसेब पाहोन लोकास पैका द्यावा आणि निघावे. विठलपंत व आपण येक होऊन गाठ घालावी त्यास दोन वर्षा(चे) हिसेब, देणे मबलग, यैवज थोडका, वरचेवर कैसे उरकते? परंतु * * * चिठीवर घेऊन करीत आहेत तो विठलपंत * * * वोजी मो कठवलावर आले. दोन तीन * * * डके आहेत. ही बातमी त्यास लागली * * * * * चे करून छ २२ रमजानी गाठ पडली * * * * * जाब सुभेदारास भालेयाची * * * * गेली व रात्रहि जाहाली. हे थोडके ते * * * घलले त्यानी तेथेच मुकाम केला * * * * दिवसी सुभेदार व वरकड सरदार कलंबेश्वरचे मुकामी येकत्र जाहाले. फौज जमा केली. येथे बातमी आली, तेव्हा

काम विलग पडले येसे जाणोन सर्व सरदार व लोक मुछदी येकत्र होऊन आळा केला. पुढे जावे तरी समजावीस नाहीं. पैका दिल्हाखेरीज कूच कैसे होतें ? याजकरिता सुभेदार वगैरे सरदार यास आलीकडे बोलाविले. राजश्री मानसिंगराव मोहिते व आपलाजी नारायेण मागे होते तेहि आले. च्यार पाच हजार जथले. तेलंगखेडीवर याजपासून तीन कोशावर पुढे आहे ते हे येथेच आहेत. फौजेची समजोती करतात. सेनाधुरंधर यानी विचार केला की नागपुरास जाऊन फलादेश नाही. लोक नामी आहेत. तोफ व गारद व सरजाम आहे, आपण वर (?) येणार नाही. याचे फोजेची समजिवीस नाही तोपरयेत नागपूर सोडून आपणावर येवत नाही. यावत्काल मुलकात पैका ध्यावा, फौजेचा जथ पडावा व चंद्रपुरीहून काही तोफा आणविल्या आहेत या मसलतीवर आजीवर गेले. मुलकात पैका घेतात. नागपूर चद्रपूर आलजपूर तिनी रोख धरून आहेत, पुढे कोणीकडे जातील पाहावे. हे तर अद्यापि स(म)जाविसीच्याच घोरात आहेत की * * * * आणखी आठ दाहा दिवस लागतील हा * * * * ल तेव्हा याचे येणे मलकापुराकडे * * * * त यास हे मसलत भारी आहे. ईश्वरी * * * * व श्रीमत राजश्री पंतप्रधान * * * प्रतापे व आपले ममतेच्या योगे * * * धर याचे पारपत्य करून भेटीस या * * * छितात. याची चितवृती सर्व * * * * कडे आहे. परतु आवघडोन कुपेची * * * हेत. याचा पेच (वारणे) आगत्य स्वामीस आहे. आपणाकडून पत्रे येतात तेव्हा राजश्री सेनासाहेबसुभा विव्हल होतात की आम्ही काहीच केले नाही. त्याकडून पत्रे निकडी (अपूर्ण)

¶*Baburao Vishvanath Vaidya writes to Sakharam Bapu about the straitened conditions of the Bhonsle brothers, on account of which, he says, the forces could not be mobilised and kept ready. He further says that Mudhoji along with Ismailkhan and Muhammad Isaf wishes to join Dadasaheb who has already gone as far as Kasarbari.*

No. 64] [*About 6-11-1774*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

बाबूरावजी स्वामांचे सेवेसी

पोष्य बाबूराव विस्वनाथ वैद्य कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील क्षेम तागायत छ रमजान मुकाम नागपूर जाणोन स्वकीये कुशल लेखन केलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तें पावलें. लिहिलें वर्तमान कळलें.

यैसेंच सदैव पत्रोतरी परामृष करीत जात्रा. इकडील वर्तमान तरी पेशर्जी येक दोन पत्रीं लिहिलेंच आहे त्यावरून कललेच असेल. आलिकडील वर्तमान तरी राजश्री सेनाधुरंधर व इस्माईलखान व महमद इसफ गारदी व झामसिंग याणी मसलत करून फौजेची समजावीस केली. काही फौज गारद नवे मेळऊन फौजेचा जथ केला. याणी श्रीमंताकडे जावें यैसें योजिलें. त्यास वाटेवर राजश्री हरिपंत तात्या व विठल बलाल सुभेदार सोय न होय याजकरितां श्रीमंताकडे पत्रें पाठविलीं कीं मानाजी फाकडे व आणखी कांहीं फौज तिकडून यावी. त्याणी याणी येक होऊन मग जावें. त्यास तो प्रकार तिकडून न घडला. तेव्हां नागपुरावर यावें. येथील गर्गशा त्यास समजलाच होता, त्याअर्थी मजल दरमजल इकडे चाल धरिली. येथें बातमी आली त्यावर येथें गडबड फार जाहाली. कोणेही प्रकारें सेनासाहेबसुभा यानीं बाहिर निघावें त्यास येथील फौजेची समजोती नाहीं. पैका नाहीं चौंकडून विलग, तेव्हां सर्व मुछदी व सावकार यानी पैकेयाची सोय करून दिली. आतां फौजेची समजोती करून पुढें चालत आहेत. सविस्तर अर्थ श्रीमंतास लिहिला आहे त्यावरून ध्यानांत येईल. आम्ही तेथून आलों तेव्हां आपली आमची भेट न जाहाली, त्यास रावजी! आम्ही आपले भरवसियावर निश्चित आहों. कोणे-विषई फिकीर करीत नाहीं. वस्त्रें देऊन माघारें यावें, त्यास मार्गांत दंगा याजकरितां राहिलों व येजमानहि कृपा करितात. त्यास हलीं मार्गाचा सुभता आहे. येथील कामकाज उरकून सत्वरच यावयाचें करितों. निरंतर आपणांकडील वर्तमान लिहीत जावें. बहुत काय लिहिणें कृपा लोभ करावा हे विनंति.

¶Baburao Vishvanath Vaidya writes to Baburaoji, probably the Nagpur agent at Poona, that Ismailkhan and Muhammad Isaf, who were mobilizing additional forces and thinking of making common cause with Raghoba, were prevented from doing so by Haripant Phadke.

No. 65] [*22-11-1774*

श्री

राजश्री नारो आनंदराव गोसावी यासीं सुा खमस सबैन मया व अलफ. तुम्ही विनंतीपत्रे छ १३ रमजानची पाठविली ती पावोन लिहिला मार विदित जाहाला. फौज नेमणुकेपैकी काही सामानानिसी आली. झाडून लोक अद्याप आले नाहीत. बालाजी खंडेराव पागासुधा अद्याप आले नाहींत. त्यास लौकर यावयाविसी आज्ञा व्हावी. बलवंतराव धोंडदेव नासिक प्रांती आहेत. तलेगावापासी घाट उतरोन कोकणातून सुरत अठाविसीत जाणार होतो. त्यास घाटाखाली दाणा मिलणार

नाही. झाडी बहुत; मागाहून सिलेदार येतील त्याची सोय नाही. याजकरिता राजश्री गोपाल नाईक याचे विचारे त्रिंबकेस्वरापासी घाट उतरोन जावे असें ठरले. त्यास मुकाम न करिता त्रिंबकेस्वराजवळ घाट उतरून जातो म्हणोन लिा ते कलले. उतम आहे. मध्ये मुकाम न करिता चोहीकडील बातमी चांगली राखोन जाणे. बालाजी खंडेराव व बलवंतराव धोंडदेव यास पत्रे तेथून पाठऊन लौकर आणवणे. आपाजी पायगुडे याचे पथकाचे स्वार आसामी १९२ येकूण आठवडा रुपये ५८८ पाचसे आठ्यासी रुपये आकारात आले नाहीत म्हणोन लिहिले. त्यास सनद येथून जाईल त्याप्रमाणे आठवडा गणती घेऊन देत जाणे. जाणिजे.[1] छ १७ रमजान. आज्ञा[2] प्रमाण.

बार

¶*Naro Anandrao is asked to proceed to Surat expeditiously.*

No. 66] *[22-11-1774*

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यास

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर येथील क्षेम जाणून श्वानंद लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. तुम्ही फौजसुधा दिव्याच्या घाटाखाले येऊन उतरले. राजश्री जनार्दन रायाजी फौजसुधा आफटी फुलगांवावर होते ते तुम्ही येकत्र होऊन पुढे दर कूच आलेच आसाल. परतु भीमातिरीहून निघालियाचे पत्र राजश्री गोपाल नाईक तांबवेकराचे आलें नाही हा संदेह वाटतो. सुरतेहून सावकारी वर्तमान आले, की फैजपुरीचे मुकामी सोडून कासीद आले, परतु तुमचें व राजश्री जनार्दन रायाजी यांचे पत्र आले नाही हाहि संदेह. न कले कासीद कोठे धरले गेले की दुखण्या पडले हेहि न उमजे, किंवा तुमचें आगमन गोदातीरी जालेंच नाही हेहि उमजत नाहीं. यास्तव सविस्तर लेहोन वर्तमान सत्वर आम्हास पावे तें करणें. राजश्री दौलत बाबूराव वगैरे सिलेदार मिलोन च्यार हजार फौज कनिष्ठापासून निघोन रेवातीरास गेले, पुढे रेवा उतरून सुरत माहालांत वराता करून घेतल्या आहेत. त्याचबदल धामधूम करणार आणि मुल्क खराब करणार, यास्तव तुमचे आगमन सत्वर सुरत प्रांते होये तो अर्थ करणें, म्हणजे ते माहालात धामधूम करूं पावणार नाहींत.

---

१ नाना फडणिसाचें अक्षर. २ येथून निराळें वळण.

5987

यास्तव सत्वर आगमन फौजसुधा होये तो आर्थ कीजे. रा। दौलतराव गेले यांजमुळें गकारीयापासी फौज अहे त्याचा धर सुटला. यास्तव तुमचें आगमन फौज सुधा सत्वर जालिया महदकार्य सहजात सिधीस पावेल यैसा समये आहे. येविसीं विशेष ल्याहावे यैसे नाहीं. श्रीमंत तापी उतरले. भडगाव पाचोरे येथं आले यैसे वर्तमान आले आहे. यास्तव त्याची बातमी वरचेवर राखावी. त्याचे फौजेची व आपले फौजेची धडक भेट न होये तो आर्थ कीजे. सारांष फौजसुधा आगमन सुरत माहालात सत्वर होये तो आर्थ कीजे. निरंतर वर्तमान वरचेवर लिहीत जावे. रा। छ १७ माहे रमजान बहुत काय लिहीणें.

¶Fatesing Gaikwad to Naropant Keskar, asking if he had left the river Godavari and when he could be expected to arrive in Gujarat, where Doulat Baburao was sent ahead by Raghunathrao to help Govindrao Gaikwad.

No. 67] *[29-11-1774*

पौ छ २ सवाल मार्ग.
सीश सुध ४

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सां। नमस्कार विनंती उपर. येथील कुशल ता। छ २४ रमजान जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २१ रमजानचे पत्र सगमनेरचे मुकामचे पाठविले ते पावले. लिहिला मजकूर सविस्तर कलला. आपण लिहिल्याप्रो। मुकाम मजकुरास आलो. येथेच मुकाम करून राहावे तरी सरकारच्या माहालास उपद्रव लागतो यास्तव सिनरचे सुमारे जात आहो. त्यास श्रीमंत कोठे आहेत, आपला मुकाम कोठे आहें, कोणत्या रोखे येणार, आम्ही पुढे वर्तणू (क) करावी म्हणौन लि। ते सविस्तर कलले. त्यास इकडील मनसुबा लाबणीवर आहे. सरदार श्रीमंतासी बोलतात, परंतु ताल्यावर येत नाही. किती दिवस लागतील पाहावे. आम्ही नवाब तयार आहो. श्रीमंत राजश्री बापू नाना पुरंदराहून निघाले, इकडे येत आहेत. श्रीसतेने घडेल ते खरे. तुम्ही गुजराथेस जाणार. त्यास इकडे बलावे तर लाबण दिसते. याजकरितां तुम्ही लवकर सुरत प्रांती जाऊन शह द्यावा ही येक मसलत आहे. उभयतां लिहीत असतील

5988

व तुम्ही पुमले असेल त्याप्रो करावे. लौकर जावे हेच चांगले. तिकडील दरवाजा तुम्ही फौज घेऊन गेला असतां बंद होईल. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶Haripant giving Naropant Keskar news of the movements of Raghoba, of Bapu and Nana and their plans, urges him to proceed to Gujarat at once.

No. 68] [*November 1774*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामी चे शेवेसी

पोष्य हरि बलाल कृतानेक सां नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत आसिले पाहिजे विशेष, तुम्ही पत्र पाठविले ते पावले. लिहिले वर्तमान कलले. आपण घरीच होतो. त्यास गडास बोलाऊन नेऊन, समागमे फौजेची नेमणूक करून देऊन, गुजराथ प्रांते फतेसिंग गाइकवाड याचे कुमकेस जावयाकरिता रवानगी केली. त्याजवरून निरोप घेऊन आलो ते लोणीस दाखल जाहालो. पुढें दरमजल नासिकचे सुमारें येऊन राहातो. पुढें आपले पत्र येईल त्याप्रो करू म्हणून लिहिलें व सरकारची फौज दोन हजार व फतेसिंगाकडील रा गोपाल नाईक तांबेकर यांणी साडेच्यार हजार फौज ठेविली ती येकूण साडेसाहा हजार फौज देऊन रवानगी केली ते सविस्तर कलले. आपले पत्र तिकडे येण्याचे आल्यास येऊ, नाही तर नासिकाजवल गंगा उतरून पुढें जाऊ म्हणोन लिा, त्यास श्रीमंत कासारबारीने येतात. समागमे सरदार आहेत. परंतु वर्तणूक सुधी दिसत नाहीं. मुलूक लुटितात यावरून परिणाम ठीक दिसत नाहीं. आम्ही फुलबारीवरून[१] येरूलचे सुमारे येत असों. इतक्यांत श्रीमंत कोठपर्यंत येतात, काय करितात हेहि कलेल. तुम्ही संगमनेरास आलियावर आम्हास लिहून पाठवावे. आम्ही लिहून पाठऊ त्याप्रो करावे. वरकड पत्र आले नाहीं म्हणोन मनात वारंवार येत असे. परंतु तुम्ही लिहिले कीं गावी होतो यामुले पत्र पाठविले नाही. त्यास मनोमन साक्ष, तेथे पत्र कशास पाहिजे? फौज लौकर जमा करून संगमनेरास येऊन लिहून पाठवावें. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती. दुसरे पत्र सोनोरीचे मुकामचे पाा ते पावले. हे विनंती.

---

१ फुलंब्री.

सेवेसी बाजी गोविंद सां नमस्कार विनंती. उपरी, आपण पत्र पाठविले ते पावले. सविस्तर राजश्री तात्यानी लिा आहे त्यावरून कलेल. लोभ कीजे हे विनंती.

¶Haripant writes to Naropant Keskar; informing him of the movements of Dadasaheb and asks him to communicate, on arrival at Sangamner, for further orders.

No. 69] *[26-11-1774*

श्री

श्रीमंत राजश्री बापू
स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक हरि उमाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापन तागायत कार्तिक वद्य ८ परियेंत आपले कृपेकरून यथास्थित असो विशे स्वामीची आज्ञा होऊन स्वार जालों त्यास लस्करांत पावलों. राजश्री गोविंद राव गायकवाड सेनाखासखेल समसेरबहादुर याची भेट जाली व राजश्री खंडोज आवजीं याची भेट जाली. श्रीमंत साहेबाची व आपलीं पत्रें दिल्हीं. वाचू परम समाधानाते पावले. आम्हीं जाबसाल येथाज्ञानेंकरून बहुता प्रका समजाविलें. श्रीमंत राजश्री दादासाहेबाकडून कारकूण व खिजमतगार जासू येऊन बसले. पत्रें आलीं आहेत कीं फौजसहवर्तमान सत्वर यावें, आमच मनसुभा नीट जाला तर तुमचाही मनसुभा सेवटास जाईल, ऐसी बहुता प्रकारें प येत असताती. स्वामीकडेहि सल्लख करितात आणि इकडे याप्रमाणे पत्रें पाठविता हें काय वर्तमान तें ध्यानास आनावें. आम्ही राजश्री गोविंदरावबावास खंडोपंतास प्रबोध करून सेपता करून आपल्या लगामी लाविले. तिक जावयाचा विचार किमपि होत नाहीं. आपल्या गोत्रीं मेळविले. आज्ञाप्रमा तयार होऊन सेवेसीं यावयासी तयार आहेत. परंतु सिबंदीचा कैच्या भारी पनास लक्ष रुपये लोकाचे देणे. लढा मोठा. यामुळें सिबंदीवाले येऊं देत नाहींत थोडेबहुत सिबंदीचा कैच्या हलका होईल तेव्हां त्यांस कांहीं सुचेल. आम्ह कार्तिक श्रुा ७ याचा निरोप घेऊन बडोद्यास जाऊन राजश्री फतेसिंगरा गायेकवाड यांची भेट घेऊं. सरकारचीं व आपलीं पत्रें त्यास आहेत ते देऊं त्याची खातरजमा करून त्याच्या ध्यानांत बाहेर निघावयाचें असल्यास बाहेरील तजवीज करतील. सोनगडापासून काठेवाडपरियंत आमल याचा आणि अर सिदी रोहेले याचा गवगवा रोज आहे. फतेसिंगाकडे बडोदें व पटन व खे ऐसीं तीन सेहर मात्र आहेत. वरकड झाडून याजकडे. येथें रोज लडाई होते

राजश्री आपाजी गणेश याजकडील आमल पेटलाद व खंबायत दो ठिकानचा वसूल घेतला होता. आतां पेटलाद खंबायत याची याजकडे दिल्ही. वसूल घेतला त्याची निशा पत्री करितात. याचे कारकूण आम्हांजवळच आहेत. सावली मात्र राहिली तेहि मागतात. आपल्या चेरणासी दुसरा विचार याचा नाहीं. हेहि इच्छा करीत होते कीं आम्हांवर सरकारची कृपा असावी. त्यास पत्रें व सेवक येऊन पोहचलियाउपर फारच समाधानातें पावले. अडीच लक्ष रुपये पेटलाद खंबाईत मिलोन वसूल घेतला. त्याचा निकाल त्याजकडून करवितो. सारांश रा गोविंदराव बावा स्वामीच्या गोत्री कायावाचामनेकरून लागले यांत आंतर नाहीं. परंतु येक अपूर्व भाशतें कीं श्रीमंत राजश्री दादासाहेब सलूखाच्या गोष्टी सिंदे होलकर याचे विचारें स्वामीकडेस येतात आणि इकडे तिकडे भानगड करितात, थागाथुगी करितात, पु हां येत्न विरोधाचे करितात हें अपूर्व असे. या स्तली यौक्ति परियौक्ती बोध करून आहे. याचीहि स्वामीच्या चेरणासी येकनिष्टता करून ठेविली आहे. याणीहि सेवेसीं पत्रें लिहिलीं आहेत ते वाचून पुन्हां समाधानयुक्त अतिसत्वर पाठवावीं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶Hari Umaji was sent to Govindrao Gaikwad to bring him over to the side of the Regency Council. He informs Sakharam Bapu that he has succeeded in his mission beyond expectation. Govindrao would have immediately taken field against Raghoba but for his mutinous army clamouring for its arrears.

No. 70] *[Soon after 5-12-1774 ?*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य

राजश्री बापू स्वामीचे सेवेसी

पोष नारो कृष्ण जोसी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागायत छ सवाल मुकाम नागपूर जाणोन स्वकीय कुशललेखन करीत असिलें पाहिजे. विशेष * * * रमजानचें पाठविलें तें छ २६ मिनहू * * * तेथें आपण लिहिलें, कीं श्रीमंत कासारबारीचे सुमारें आले. त्याकडील जाबसाल उभयतां सरदाराचे विद्यमाने आहे. परंतु त्यांतील जाबस्वाल * * * येथून लेहून जाण्यास दिवसगत लागेल, लौकर निकाल पडणार नाहीं, याजकरितां आम्ही उभयतां कार्तिक वद्य ५ पंचमीस येथून निघोन कार्तिक अखेर टोके यास येतों. तुम्ही राजश्री सेनासाहेबसुभा यास घेऊन लौकर आपले

फौजेंत मिळोन मलकापूरचे सुमारें रहावें, राजश्री हरिपंत लिहितील त्याप्रमाणें सावध असावें म्हणोन लिहिलें. त्यास इकडील वर्तमान तरी, राजश्री विठलपंत सुभेदार वगैरे सरदार बाळापूरचे सुमारें राजश्री हरिपंत तात्या याचें आज्ञेप्रमाणें होते. त्यांत याणी येऊन येकत्र होऊन मलकापूरच्या सुमारें असावें, जैसी मसलत पडेल तैसें करावयास येईल हे योजनेंत होतों. येथील फौजेची समजावीस नाहीं, पैकेयास जागा नाहीं, काम * * सुस्तीखाले पडले, याअर्थी यजमान कारभारी यांत विक्षेप. त्यांतही कारस्थानी करून उपयोगी पडावें यैसे विच्यारणांत असतां राजश्री सेनाधुरंधर व इस्माईलखान व महमद इसफ व झामसिंग याणी फौजेची समजावीस करून * * * कडे जावें यैसें योजिलें. दरम्यान फौजा निभा * * * किंवा उभयेतां सरदाराच्या करारांत गोष्ट नाहीं ते जाहाली याने उघड पडिल ते कैसे * * * आर्थी तिकडील रोख टाकून नागपूरची * * येथील विसंच फौजेचा गलाटा, पैका टका कारभार ठीक नाहीं, हे बातमी त्यास दिनचर्येची होतीच. या समई गाटावे या मनसबेयावर राजश्री सेनाधुरंधर व गारदी मजल दरमजल किले आमनेरास आले. तेथील किलेदार भेटले. तेथें बुनगें टाकून येतात हे बातमी आली. तेव्हां छ १० रमजानी राजश्री सेनासाहेब सुभा डेरे दाखल जाहाले. राजश्री विठलपंत यास निकडीची पत्रें व हातचिठ्या गेल्या कीं रात्रीचा दिवस करून समयास येऊन पोहचावें. त्यावरून ते आडवे आले. यानीं येथून कूच करून पुढें जावें तर विना पैका कैसे वडतें? पैकेयास तर ठिकाण नाहीं. संकटांत पडले. आपण व कारभारी यानी सावकाराच्या घरास जावें, परंतु ताल न पटे. दिक जाहले. मोठ्या संकटें येजमानानी व दिवाकरपंत व उभयेतां भवानीपंत व सर्व मुछदी मिळोन दाहा लक्षाचा यैवज ठराविला. आम्हीं व राजश्री बाबूरावजी, नित्य जात होतों. पुढें हिशेब पाहोन लोकांस पैका द्यावा आणि निघावें, विठलपंत व आपण येक होऊन गाठ घालावी, त्यास दोन वर्षाचे हिशेब, देणें मबलग, यैवज थोडका, खर्चेवर कैसे उरकतें. परंतु चालीवर * * * आहेत. तो विठलपंत सटवोजी भाटे काठ * * * दोन तीन हजार थोडके आहेत ही बातमी त्यास कळली. यानी कूच करून छ २२ रमजानी गांठ पडोन लढाई जाली. सुभेदारास भालेयाची जखम लागली * * * हे थोडके ते फार, हे उधलले. यानी तेथेंच मुकाम केला. दुसरे दिवशीं सुभेदार व वरकड सरदार कलबेश्वरचे मुकामी येकत्र जाहाले. फौज जमा केली. येथें बातमी आली. तेव्हां काम विलग पडलें, यैसे जाणोन सर्व सरदार व लोक मुछदी येकत्र होऊन आळा केला. पुढें जावें तरी समजाविस नाहीं. पैका दिल्याखेरीज कूच कैसे होतें. याजकरितां

सुभेदार वगैरे सरदार यास आलीकडे बोलाविल. राजश्री मानसिंगराव मोहित व आपलाजी नारायेण मागें होते तेहि आले. च्यार पांच हजार जथले. तेलंगखेडी-वर याजपासून तीन कोसावर पुढें आहेत हे येथेंच आहेत. फौजेची समजोती करितां सेनाधुरंधर यानी विचार केला कीं नागपुरास जाऊन फलादेश नाहीं. लोक नामी आहेत. तोफा व गारद सरंजाम आहे, आपण बार येणार नाही. याचे फौजेची समजावीस नाहीं तोंपर्यंत नागपूर सोडून आपणांवर येवत नाही. ताव-त्काल मुलकांत पैका घ्यावा, फौजेचा जथ पाडावा, चंद्रपुरीहून कांही तोफा आणविल्या आहेत या मसलतीवर आजीवर गेले. मुलकांत पैका घेतात. नाग-पूर चंद्रपूर आलजपूर तीनी रोख भरून आहेत, पुढें कोणीकडे जातील पाहावें. हे तर आद्यापि समजाविसीच्याच घोरांत आहेत. किमान पक्षी आणखी * * * दिवस लागतील. हा शह वारेल तेव्हां याचे * * * (मल?) कापुराकडे होईल. प्रस्तुत यास हे मसलत भारी आहे. ईश्वरी कृपेनें व श्रीमंत राजश्री * * * स्वामीच्या प्रतापें व आप * * * सेनाधुरं-धर याचें पारपत्य करून * * * तात त्याची चित्तवृत्ति सर्व आपणां-कडे आहे. परंतु आवघडोन कुपेचीं पडिले आहेत. याचा पेंच वारणें अगत्य स्वामीस आहे. +उभयतां कारभारी नवे जुने यांस आजपर्यंत घेऊन चालविले, सेनाधुरंधर यांचे येण्यामुलें निकड जाऊन गाठावें हें संकट प्राप्त. घडतां घडेल ते खरें. मेहनतीस कसुर करीत नाहीं. होईल तें वर्तमान वरचेवर लिहीत आहे. बहुत काय लिहिणें? लोभाची वृद्धि जाहली पाहिजे हे विनंति.

¶*Naro Krishna Joshi writes from Nagpur to Sakharam Bapu, explaining the situation of the Bhonsle brothers and their monetary difficulties, and assuring that they were trying their utmost to come and join the Peshwa's forces as soon as possible. This letter appears to be a copy of No. 63.*

No. 71] *[8-12-1774*

पौ छ २४ सवाल
खमस सबैन
मार्गेश्वर मास

श्री

राजश्री नारो आनंदराव गो यासी

सुा खमस सबैन मया व अलफ. तुम्ही छ २८ रमजानचे पत्र पाठविले ते खरवडीचे मुकामी पावले. लिहिले वर्तमान सविस्तर कललें. उदईक टोक्याचा

\+ From here the writer's hand.

मुकाम आहे. सुरत अठाविसीत लौकर जातो म्हणोन लिा ते कळले उतम आहे. लौकर जाऊन पोहचणे. तीर्थस्वरूप खानदेशांत आहेत. कदाचित पलोन गुजराथेकडे जाऊ लागल्यास तुम्ही बातमी राखोन वरचेवर लिहीत जाणें. तुम्हीं सावधतेन राहात जाणें. जाणिजे छ ४ सवाल.

¶*Naro Anandrao Keskar is asked to proceed to Surat and to watch the movements of Dadasaheb.*

No. 72] [10-12-1774

श्री

तीर्थस्वरूप राजश्री तात्या
वडिलांचे सेवेसी

अपत्ये जनार्दन राम ठोसर दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ताा छ ६ सवाल मुकाम पुरंदर येथे वडिलाचे आसीर्वादे सुखी असे विशेष. वडिलाकडून पत्र येऊन साभाल होत नाही. तरी सदैव आसीर्वाद पत्री संतोषविले पाहिजे. श्रीमंत दादासाहेब सुरते आलीकडे आले म्हणौन ऐकितो. त्यास इग्रजानी सलुकाची बोली लाविली असतां त्यास आलीकडे घेऊन आले. तस्मात् त्यांची लबाडीसी वाटते. मागे सुज्यातदौल्यासी सलूकाची बोली लाऊन त्यांस दगा केला. अशा नाना प्रकारे इग्रज्याच्या लबाड्या लोक सागतात, आण खरेपणाहि बोलतात. परंतु ह्या कालात विस्वास ईश्वराखेरीज कोणाचाहि धरावयाचा नाही. आपले फौजेतहि प्रकार आसतेचा थोडकाच आसेल. याजकरिता कालासारखी सावधता बहुत राहिली पाहिजे. ईश्वर सर्व गोष्टी पार पडीलच. कोणे गोष्टीची चिंता नाही. मी लेकराने आपणास ल्याहावेसे नाही. सर्व अर्थ वडिलाचे चितात आहेतच. परंतु आमचे सर्वांचे लक्ष आपले ठाई आहे, यास्तव लिा आहे. तीर्थरूप दादांची शरीरप्रकृत बरी आहे. तीर्थस्वरूप अंताजीपंत व चिरंजीव विठोबा व सर्व मनुष्ये सुखरूप आहेत. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Janardan Ram Thosar reports to Haripant Tatya the rumour about the English having joined Raghoba, contrary to the negotiations which they have opened with the Barbhais, which clearly shows—says the writer—that they mean some treachery as was seen in their dealing with Suja-ud-daula.*

5994

No. 73] [9-1-1775

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यांस

अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्री॥ फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर—येथील क्षेम आणून श्वानंदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. छ १ सवालचें पत्र पाठविले ते छ ४ सवाली पावले. लेखनार्थ ध्यानास येऊन परम संतोष जाला. राजश्री जनार्दन रायाजीहि येऊन सामील जालेच आसतील आथवा आकलेसरपावेतों येऊन सामील होतील. आकलेसरापुढें थोडक्या सामानानसी न यावे. सर्व फौज येकत्र होऊन बुणगे मागे ठेऊन सडे होऊन यावे. रेवेचा उतार जो सोईस पडेसा आसेल तेथे उतरोन रातवा खपून जलद येऊन पोहचावें. बुणगे व्यारे सोनगड या रानात आथवा राजपिपलेकर भेटलीया त्याच्या रानात चारापाणी याची सोये पाहोन ठेवावें. दोनहि फौजा मिलोन यांचा जथ तुम्हापेक्षा भारी, यास्तव खडे होऊन रातवा खपून यावे, हे सूचना लिहिली आसे. मग तुमच्या विचारे ठराव होईल तो खरा. राजश्री हरिपंत तात्या यांची पत्रे छ २७ सवालची आली. त्यांतील मजकूर राजश्री गबाजी बलाल यास लिहिला आहे त्याजवरून कलू येईल. ते समीप आले, यैसी वदंता श्रीमंताच्या लस्करातहि आहे व आम्हाकडेहि आहे. चापानेर प्रांतीचे लोक गुरेढोरे पलवितात. परंतु आमचे कासीद गेले आहेत ते पत्रें घेऊन आलिया तुम्हास लेहोन पाठऊ. साष्टीस इगरेज आहे इतके मात्र आपण लि॥ होते, परंतु त्याने बिघाड करून साष्टी घेतली किंवा उगाच येऊन ठरला आहे हे सविस्तर ल्याहावे. वरचेवर पत्री कुषल वृत लेहोन संतोषवीत आसावें. तुमचे पत्र हरिपंतास लिहिले ते त्याजकडे रवाना केल. कलावे. रा॥ छ ६ माहे जिलकाद. बहुत काय लिहिणे कृपा आसो द्यावी हे विनंति [मोर्तब]

¶*Fatesing Gaikwad to Naropant Keskar, communicating to him the route by which he should enter Gujarat.*

No. 74] [12-12-1774

श्रीशंकरप्रसन्न

श्रीमंत राजश्री तात्या

स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक राजाराम खंडेराव कृतानेक सा॥ नमस्कार विनंती. येथील कुशल ता॥ छ ८ सवाल मु॥ नामपूर जाणौन स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिंजे विशेष.

---

१ रात्रीं.

आमची माणसे बातमीस नवापुरास रा। शकराजी खडेराव याजकडे गेली होती, ती काल आली. बजिनस पत्र त्याचे आले ते सेवेसी पा। आहे. प्रा। होईलच व पालेकर सिपाई मुजरद फकीर होऊन श्रीमताचे लस्करात गेला होता. लस्कर झाडून पाहून आला. त्याण सांगितले की दाहा हजार फौज आहे. सरदार मानाजी फाकडा व सखाराम हरि व मानाजी गाईकवाड वगैरे आठ दाहा हजार आहेत. इंग्र(ज) दोन हजार आहे. खासा इंग्रज सुरतेस गेला आहे. लग्नाचे निमित्य करून सुरतेस जाऊन बसला आहे. हे त्याचा मार्ग पाहातात. फौजेचा मुकाम व्या-याहून पलीकडे साता कोसावर मांडवीचे सर्देत कडोदचे आसपास आहे. व्यारियावर आद्याप कोणी आले नाही. फौजेतील बोलवा की, इंग्रजाचे याचे आंतःक्रण शुध नाही, म्हणौन लग्नाचे निमित्य करून सुरतेस गेला. दोन हजार याजवळ रखवालीस ठेविले आहेत. त्याची चौकी श्रीमंताचे गोटासभोवती आहे. आलीकडे पाय द्यावयाचा विचार नाही. याप्रो। बोलवा माणसाने सांगितली. आपणास कलावे. तळेगावाने कोकणचे मार्गे च्यार पलटणे गेली म्हणौन आपले लस्करात बाजारी वर्तमान आहे, तें खोटे येणेप्रा। सेवेसी कलावे म्हणौन विनंतीपत्र लि। आहे. बहुत काय लिहिणे कृपेची वृधि करावी हे विनंती.

¶*Rajaram Khanderao writes to Haripant Tatya, communicating news acquired by spies from the camp of Raghoba.*

No. 75] *[14-12-1774*

श्री

सेवेसी रावजी अनंत. चेरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना येसी जे. सेवकाचें वर्तमान छ १० सवालपावेतों येथास्थित असें. अज्ञा घेऊन निघालों तो छ २४ रमजानीं हातगडास पावलों. आज्ञेप्रमाणें घाटाचा बंदोबस्त करून मौजे राहुडें येथें राहून मार्गाचें नाकें धरून बसलों असों. रहदारी गेल्या आल्या माणसाचा झाडा चौकशी * * * * * रहदारी पुणें नाशिक [दोन ओळी मजकूर फाटला आहे.] कागद गुजराथी मारवाडी यांचे अतिशये सांपडतात; वाचत नाहीत, म्हणून सेवेसी पाठविले असेत. वरकड उदमी वाणी चांदवड धोडप नाशिक प्रांतींहून सुरगाण वासदें रामनगर जव्हारपावेतों लमाणदेखील ह्याच मार्गें जातात येतात. वरकड गांव अठवडे बाजारकरी नेहमीच जात येत आहेत. श्रीमंत दादासाहेब कडोद तापी तीरानें आहेत. गोविंदराव गाइकवाड पेटलादेसच आहे. फत्तेसिंग बडोदियास आहेत. तिकडील मारवाडी येतात ते

सांगतात. सेवेसीं कळावें. अवरंगाबाजेहून नबाबाकडून हची दोन सुरतेस गेले होते. त्याजबराबर सरकारचे जासूद राजश्री जिवाजीपंताकडील व दस्तकें आपलीं होतीं ते सुरतेहून ह्याच मार्गे गेले. इकडे चिमणरायाचा दंगा आहे. दो गांव जाहाडून नेले. कावनईकडे कोलियाचा दंगा आहे म्हणून येकतों, त्यास सेवेसी कळावें. जासूदजोडी व गाडदी येक रोजमुऱ्याकरिता पाठविले आहेत. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶" *Dadasaheb is at Kadod on the Tapti, Govindrao Gaikwad is at Petlad and Fatesing Gaikwad at Baroda," writes Ravji Anant.*

No. 76] *[15-12-1774*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना
स्वामीचे शेवेसी

पो कोनेर रघुनाथ कृतानेक सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ ११ सवाल गुरुवार प्रहर रात्र जाणून स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. दौलतराव घाटपार जाला. याउपर त्याचे मागे लागू नये. आता उलटून सुरतेचे नजीक यावे. इकडे आल्यावर जसी मसलत करणे त्याप्रमाणे केली जाईल. तूर्त तापीपार पाचसे स्वार पाठऊन नरोतमाचा पाठिलाग करून उधळून द्यावा आणि आपण खासा स्वारी फौज सुधा सुरतेकडे यावे. चहूकडे धावधाव केल्यास मसलत लांबणीखाली पडती. आधी तापीपार पाचसे स्वार पाठविले म्हणजे नरोतमाचे खूळ मोडलेसे होईल; म्हणजे सुरतेची मसलत कलेल; तैसी केल्यास गुंता नाही. दुसरे माहालचा बंदोबस्त होऊन तूर्त रुपया हातास येईल. हांगामाचा दिवस गेल्यावर रुपया येणे कठिण पडेल; यास्तव सर्व वेध टाकून सुरतेचे नजीक येऊन माहालचा बंदोबस्त व सुरतेची मसलत करावी यात उतम पक्ष आहे; तर आधी तापीपार पाचसे स्वार रवाना करावे. आपण खासा इकडेस यावे. पुढे येकदोन पथके चांगली निवड करून पुढे पाठवावी. ते धोबी घाट व छिपा घाट लुटून शहरचे आसपास झाडझपट करून माघारा उलटून च्यार कोस मुकाम करावा, याप्रमाणे तूर्त केल्यास उतम आहे. वरकडी मार आपणासी बोलिलो त्याप्रमाणे पत्रे लिहून पाठविले आहे. त्याचे

उतर आल्यास लिहून पाठऊ. आपण नजीक आल्यावर आम्हीच येऊन पोहचतो. कलावे बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶Koner Raghunath to Naropant, proposing to him the steps to be taken to arrest the progress of Narottamdas and defeat him when he crosses the Tapti.

No. 76A] *[15-12-1774*

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी गो यांसी

विनंती उपरी. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब पलोन जात आहेत. दरमजल जातात. आपल्या फौजा सब्या होऊन जात आहेत. त्यांजकडील मंडळी झाडून त्यांजबा गेली. त्यास सदाशिव रामचंद्र व भिडे व काणे व आबाजी महादेव, नातू वगैरे मंडळीची मुलेमाणसे पत्र पावताच किलोकिल्यास बंदोबस्तीनें रवाना करणे. सदाशिव रामचंद्र याची किले रायगडावरी घालणे. आधी काम हे करणे. कोणाची रदबदल न आईकतां काम करून कोणाची कोठे माणसे रवाना केली त्याचा जापता लेहून पाठविणे. पत्र+ पावतांच भीड न धरतां करणें. जाणीजे. छ ११ सवाल. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶Nana Fadnis orders Naro Appaji to arrest and imprison at different forts the families of Sadashiv Ramchandra and other helpmates of Raghunathrao, who had accompanied him in his flight into Gujarat. The paper supplies the names of the principal adherents of Dadasaheb.

No. 77] *[16-12-1774*

पौ छ १२ सवाल
खमस सबैन

श्री

विनंती विशेष. आपण लिहिले की तुम्ही व मोगल मिलोन नरोतमास शहरां येऊ न देणे. यैसियासी हे सामर्थ्य आम्हास असल्यास आम्ही प्रतिबंधात कशास बसतो? चातक पक्षाप्रमाणे फौजेची प्रतीक्षा करीत होतो; त्यास आवर्षणाच प्रकार दिसोन आला. इंग्रेज व मोगल सरकारचे ममतेत असते, तर सरकारचं मामलत काढून नरोतमाचे स्वाधीन मामलत काये म्हणून करिता? आणि नरोत-

+ येथून अक्षर नाना फडणिसाचें.

मास उत्तेजन काये म्हणून देते? तुमचे मामलतीविसी मोगल इंग्रजास पत्रे पाठवितो म्हणून आपण लिहिले. त्यास केवल पत्र पाठविल्यानेच मोगल दहशत खाऊन मामलत स्वाधीन करितो येसे दिसोन येत नाही. येविसीचे हुजुरचेहि पत्र मोगलास व इंग्रजास आलेच होते; परंतु घडोन आले नाही. हा प्रकार जाणून फौजेची रवानगी जाली आहे. आपणास विदितच असेल. लिहावेसे नाही. नरोतमदास हसोटचे मैदानात आहे तो फौजेचा जोर पोहचाऊन हस्तगत होईल. दौलतराव या प्रांती होते तेव्हा त्यास नरोतमदास आपले मदतीस बोलावीत होते, परंतु त्यानी मान्य केले नाही. कूच करून गेले. नरोतमास फौजेसी लडावयास सामर्थ नाही हे जाणून नरोतमाने च्यार दिवसाचा कासीद अजुरदार अजुरा सेंभर रुपये करार करून श्रीमंत राजश्री दादासाहेब याजकडेस पाठविला आहे. दौलतराव यानी मदतीस सामील व्हावे याप्रमाणे दौलतराव यास पत्र आणविले आहे. माारनिले तो कूच करून गेले. त्याचा मोकाम काल बुधवारी सोनगडचा होता येसे येकतो. कदाच श्रीमंताचे पत्र दौलतराव यास मार्गी येऊन पोहचल्यास माघारे फिरतील यास्तव तिकडील बातमीत असावे. काल येथे बाजारी वर्तमान आले आहे की उभयेता श्रीमंताची लडाई होऊन जेष्टाचा मोड जाला. जेष्टानी काढावा काढून पिंपलनेराचे रोखे निघोन आले आहेत. पाठीवर सरकारची फौज आहे, येसे वर्तमान आले आहे. सत्यमिथ्य न कले. वर्तमान आले ते लेहून पाठविले आहे. आमचे विचारे आपण अद्यापि गायेकवाडाचे परगणियाचे जफ्तीचाच प्रकार चितात आणून त्या खोऱ्यातच मोकाम आहे हे उपयोगी नाही; यास्तव आपले विचारास येईल तर शहरानजीक दुकोसी तीकोसी येऊन मोकाम करावा. येणेकरून मोगल इंग्रेज याजवर. इबरत पडोन जाबसाल करतील. येथोन जफ्तीचा जो बंदोबस्त करणे तोहि घडोन येईल; यास्तव आधी हसोटाकडेस फौजेची रवानगी करून व रासे कुंभारी येथे येऊन मोकाम करावा हे उपयोगी आहे. मग जे आपली मर्जी व धण्याची आज्ञा ते प्रमाण. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

पो गोविंद रघुनाथ व गंगाधर रघुनाथ साा नमस्कार विनंती. लिाा परिसोन सविस्तर ध्यानास येईल. फौज हे प्रांती आलियासारखे सरकार तालुकेचा बंदोबस्त शत्रूचे पारपत्य होऊन आपला नक्ष व्हावा म्हणोन विस्तरें लिहिले असे. मनन करून जे कर्तव्य ते करावें. बहुत काये लिाा. कृपा केली पाा हे विनंती.

¶*The writer reports that Narottamdas of Hasot has sent an appeal for help to Raghoba. He also refers to a skirmish between the Peshwa's troops and those of Raghoba.*

Bk Ca 12—9 5999

No. 78] [16-12-1774

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यास

ℓ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फत्तेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपरी. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत असिले पाहिजे विशेष. तुम्ही व राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविंद वासुदेव फौजसुधा छ ८ सवालीं प्रा चिखली येथे आलेस. कसबे वणदेवीनजीक मुकाम केला यैसे उभयेतानी लिहिले होतें परतु आपले पत्र नव्हतें. यैसे नसावे. सदैव पत्रीं कुशलवृत लेहोंन संतोषवीत असावे. हे कासीद तातडीने रवाना केले. आपल्याकडील पत्रास उशीर लागेल याजमुले रवाना केले किंवा आपल्याकडूनच पत्र ल्याहावयास आलस आला हे न कले. याउपर जो कासीद येईल त्याज-समागमे आपले पत्र आगत्य पाठवीत जावे. कितेक आर्थ उभयेतास लिहिले आहेत ते निवेदन करतील त्याजवरून कलो येईल. साराष कोणेविसीं गुंता न करितां दालभ्ये मार्गी टिकोन राहिले तर त्याजपासीं येऊन त्यांचे पारपत्य करावें. कदाश्चित तापीतीरी न टिकले आणि व्यारे सोनगड याच्या [शिक्का] आसरियास जाऊन टिकले तर तेथे जाऊन त्यांचे पारपत्य करून तो वेध तोडावा. तो वेध तुटल्याविना मुलूकचे जमीदार येऊन रुजू होणार नाहीत यास्तव ते कार्य आविलंबे करावें अथवा ते टाला देऊन सोनगडची सरद टाकून नवापूरच्या सरदेत गेले मग त्यांचा पाठिलागहि करावयाचें प्रयोजन नाही. तो आर्थ दोहीतून येका प्रकारें जालिया आविलंबे रेवातिरास यावे. इकडीलहि सामान रेवातिरी येऊन सामील होईल. जथहि पडेल. शत्रूचे पारपत्यहि होईल. यैवजहि प्रविष्ट होईल. यैवजाविसीं चिंता न करावी. आपल्यासी राजश्री गोपाळ नायेकांनीं मान्य केलें आसेल तेणेप्रमाणे यैवज दोन दिवस आगे मागे प्रविष्ट होईल यांत आतर होणार नाही. आज आकरा महिने माहा संकटांत यास्तव आपल्यास इतके लिहिणे लागलें. आपणहि विवेकी आहेत विशेष काये लिहिणें. रा छ १२ माहे शवाल बहुत काय लिहिणें कृपा कीजे हे विनंती.

¶*Fatesingrao Gaikwad to Naropant Keskar asks him to oppose Daulat Baburao the Prabhu Sardar and punish him.*

6000

No. 79] [13-12-1774

पौ छ २३ सवाल खमस
सबैन मार्गेश्वर मास

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य हरि बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ ९ सावल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे. विशेष. राजश्री फतेसिंगराऊ गायकवाड याणी राजश्री आंतोबा बाबा याचे वधूस तस्ती देतात. आरबाच्या वराता केल्या आहेत म्हणौन कलले. त्याजवरून तुम्हास लिहिले आहे तर तुम्ही राजश्री फतेसिंगराऊ यास लिहून उभयेता बंधू मारनिलेचे तेथे त्याजवल आहेत त्यास आपणाजवल आणून आम्हाकडे पाठवावे. कदाचित सोडावयास दिकत करतील यास्तव तुम्हास लिहिले आहे, तर उभयेताची सुटका होऊन आम्हाकडे येत ती गोष्ट करावी. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal writes to Naropant Keskar asking him to release Antobc Baba and his brothers from the confinement of Fatesing Gaikwad and senc them on to the writer.*

No. 80] [19-12-1774

पौ छ १९ साबान सुा
खमस सबैन

श्री

राजश्री नारोपंत गोसावी
यांस

६७ अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण फौजसुधा प्रा तेलाडी येथे येणें जाले. पुढे तापीतिरास आगमन जालेच असेल. तदनंतर सर्व कामे येकीकडे ठेऊन राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविद वासुदेव यास फौजसुधा घेऊन आधी आकलेसरास येणे. नरोतमदास यानें श्रीमंताची ठाणी व कमाविसदार उठऊन श्रीमंत राजश्री

दादासाहेबांचे तरफेची ठाणी बसविली. वसूलहि घेत आहे. यास्तव आमचे काम राहिले तर च्यार दिवस आगेमागे होईल परतु हे सरकारचे काम आधी केले पाहिजे. नाहीतर दिवसगत लागल्या तो जमेल व कारभारी सरकारचे त्यांचा शब्द आम्हास व तुम्हास लागेल. म्हणतील की फौज सरकारची व तुमची जवल असतां त्याचे पारपत्य कसे न केले. यास्तव आधी नरोतमाचे पारपत्य करून प्रा उरपाड प्रा हासोट व प्रा आकलेसर येथील ठाणी त्यानें उठऊन आपली ठाणी बसविली आहेत ते मारून काढून सरका [शिक्का] रची ठाणी वसवावी. जुने कमाविसदार सरकारचे नरोतमाने काढून दिल्हे आहेत त्यांची स्थापना करून त्यांची पत्रे उभयेता कारभारी यास लेहोन घेऊन राजश्री गोपाल नायेकाकडे रवाना करणें ते प्रविष्ट करून उतरे पाठऊन देतील. या कर्मास च्यार दिवस लागतील तर लागोत परतु नरोतमाचे पारपत्य आगत्य करणे. त्याने चौदा माहाल श्रीमंताच्या विभागाचे तितकेच्या सनदा आणिल्या आहेत तो फैला कामाचा नाहीं. कदाचित तुम्ही म्हणाल कीं आम्हास सरकारची आज्ञा नाही, आणि ते काम आम्ही कसे करावें? तर हा ठाणी घेईल हे काही भविष्य त्यास उमजले नव्हतें की त्यानी तुम्हास आज्ञा करावी. सरकारची ठाणी उठविली आणि वसूल माहालापैकीं घेतो. दिवसेदिवस सिबंदी अधिकच ठेवील. सर्व पैका सरकारचा सिबंदीस खर्च करील. तो बलावल्या राजश्री गोविंदराव गाईकबाडहि त्यांस साह्य होतील. तेव्हा फैलावाखाले गोष्ट पडेल. मग भारीच प्रेत्न करावा लागेल. यास्तव सरकारचे आज्ञेची वाट न पाहाता आधी त्याचें पारपत्य करणे. त्याने वसूल तुम्हादेखता न्यावा हे विहित नव्हे. उपहासकारण आहे. यास्तव तो वसूल घेत असेल तो जफ्त करून तुम्ही व उभयेता येक बिचारे वसूल घेऊन दोही फौजेस रोजमरा देणे. याचा जाबसाल सरकारात पडला तर आम्ही करूं परतु ते कार्ये आगत्य करावे. तो जातीने हास्तगत जाला तर फारच उतम आहे. तो निमकहराम धरून कारभारी याकडे पाठविल्या फारच संतोषी होतील यैसे आहे. यास्तव सत्वर आकलेसरास यावें. यैवजाकारितां गुंतोन न रावे. तेथे आलिया सुरत माहाल पाठीमागे पडेल. आमित्रावर दबाव बसला. जमीदारहि येऊन भेटतील. यैवजाचीहि तरतूद करून आपल्यास देतील परंतु सरकारकाम न बिघडे ते आधी कीजे. सा छ १९ सवाल.

¶*Fatesing Gaikwad to Naropant: presses with urgency the chastisement, without loss of time, of Narottamdas of Hasot who he adds if neglected would prove a great source of trouble.*

6002

No. 81] [19-12-1774

पौ छ १९ साबान खमस सबैन

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यास

अखंडितलक्ष्मीआलक्रुत राजमान्ये श्नो फतेसिंगराव गाइकवाड दडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंद लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपल्यास दोन च्यार पत्रे पाठविली परतु येकहि उतर न आले यैसे नसावे. सदैव पत्रीं कुषळ वृत लेहोन संतोषवीत असावे. सविस्तर वृत राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविंद वासुदेव यास लिहिले आहे तो आर्थ ध्यानास आणून सत्वर रेवा उतरतिरास यावें म्हणजे सर्व घडोन येईल. कनिष्टाकडील फौज रेवातिरास येणार यैसा विचार आहे. ते रेवातिरास पोहोचली नाही तो आंपण रेवा उतरले म्हणजे मसलत सिधीस गेली या प्रा आहे. यास्त(व) कोणेविसी गुंता न करिता रेवा उतर तिरास यावे हे तर्क[1] फार उतम आहे. यैसी येणार नाहीं. कदाश्चित कनिष्टाची फौज रेवातिरास आली तर मग उतरावयास गुंता पडेल. दिवसगत लागेल. शत्रु जमतील यास्तव पत्र पावताच रेवा उतरतिरास यावे. हे लग्न घटिका आहे तो समये चुको न द्यावा. इतका प्रेत्न उभयेता कारभारी यानी व राजश्री गोपाल नायेकानी करून तुमची रवानगी फौजसुधा केली त्याचे सार्थक हे आहे. तक चुकलिया मनसुबियास धका आहे. सूज्ञास न समजे यैसे नाही. विशेष लिहिणे उपरोध आसे. आवसर चुको न द्यावा. आवसर गयो मेहुडा बरसे काह करेस यैसा मासला आहे. तो आवसर हाच आहे. पैका न पावला म्हणवून हे तक जाऊ न द्यावी. पैका पविल परतु हे तक गेलिया येणार नाही. आपल्या न कले यैसे नाही. रवाना छ १९ माहे सवाल बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad to Naropant asking the latter to move immediately to the Northern bank of the Nerbudda.*

No. 82] [20-12-1774

श्री

श्रिया विराजित राजमान्य राजश्री

नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

सां बहिरो रघुनाथ मेहदळे कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील क्षेम जाणोन स्वकीये कुशल ल्याहावयासी आज्ञा करून साभाल करीत असिले पाहिजे विशेष.

---

[1] तक = संधि, वेळ; Opportune moment.

सुरतचे आमलाचे बदोबस्ताकरिता सरकारच्या सनदा स्वामीस आहेत त्या व आम्ही आपले पत्र आलाहिदा लेहून खेप्याबराबर रवाना करणार तो सास्टीस इंग्रेज आला. त्याणी मदतीस सुरतहून लोक आणिले आहेत म्हणौन सरकारात लेहून आले. त्यावरून सरकारची पत्रे आपणास व गाईकवाड याचे फौजेस परस्परे सामील होऊन सुरतेस बंदी करावी म्हणजे सास्टीस इग्रजास मदत येऊन पावणार नाही याप्रो लिा आहे. त्याप्राा आपणास हे मातबर काम करण अवशक, त्यातच आमचे आमलाचा बदोबस्त होऊन जाबसाल उगऊन घ्यावयाची सोई आहे. मोगलाकडे दुसाला सरकारचा थैवज चालीस पनास हजार रुा येणे. त्याचा निकाल होऊन येई ते गोस्ट करावयाची सोईच आहे. बदीचा मजकूर तरी शहरची बदी करालच. यासिवाये बदर बलसाड व घणदेवी व नवसरी व उरपाड व जंबूसर इतक्या खाड्याचा बदोबस्त येक येक कारकून व से पनास माणूस ठिकाणो ठिकाणी पाटवाल तेव्हा येथास्तित बंदी होईल. काडीमात्र जिनस शहरात जाऊ देऊ नये. येणेकरून आपली सलाबत टोपीकरावरी मातबर पडेल. येविसी सध्या येथहि इतकी बदी जाली म्हणजे सास्टीस कदापि मदत येणार नाही. पायेबद लागोन इकडील मसलतीस टोपीकरांची कमती पडोन आपला लौकी (क) चांगलाच होईल. सुरतचीच बंदी करू म्हटल्यास परिणाम नाही. सदरहू ठिकाणें लिहिली आहेत इतके स्थलाची बंदी जाली म्हणजें सुरतची जाली आसा विचार आहे. माहीतगारीने विनंती लिा आहे. आमचे कारकून आपण आपले जवल आणविले म्हणजे तेहि सविस्तर निवेदन करितील. आम्ही आपले खेप ठेऊन सरकारचे कासिदांबराबरच आम्ही आपली पत्रे रवाना केली आहेत. कृपा करून आमल सुरलित चाले ते गोस्ट केली पाो. बहुत काय लेहू हे विज्ञापना.

¶*Bahiro Raghunath requests Naropant Nana to blockade the city of Surat and the creeks of Ghandevi, Orpad, Balsad and Naosari, to prevent succour reaching the English at Salsette.*

No. 83] [*22-12-1774*

श्री

श्रिया विराजित राजमान्ये राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

सो बहिरो रघुनाथ मेहदले मुाा पुणे कृतानेक साा नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १८ सवालपावेतो येथास्तित जाणून स्वकीये कुशल लिहीत

आसेले पाहिजे विशेष. शहर सुर(त) येथील आमल आम्हाकडे आहे. त्यास नरोतमदास याणी श्रीमत राजश्री दादासाहेबाकडून सनदा आणून मामलेतीत बखेड केले. त्यावरून सरकारात बदोबस्ताविसी विनंती केल्यावरून आपणास सनद दिल्ही आहे त्या अन्वये स्वामीस पत्र पूर्वी लिा होते; उतर आले की आपण यावे बदोबस्त करून देऊ. तेव्हाच यावे तरी शरीरी पथरा विसी दिवस समाध नव्हते. त्यानतरी निघोन यावें यैशास इग्रज सास्टीस येऊन मोर्चेबदीचे उदेगात लागला आहे. आज दाहा दिवस जाले. सास्टीसनिध्ध बेलापूर तालुका, त्याचा बदोबस्त होऊन लडवई सरंजाम सुध्धा खबरदार असिले पो याजकरिता राहाणे जाले. यास्तव पेसजीचे सनदची नकल व प्रस्तुत लस्करातून दुसरी सनद स्वामीस आली ती पाठविली आहे, त्याप्राा नरोतमदास यासी तबी पोहचोन बदोबस्त स्वाम करितील, केला पाहिजे. सरकारचे कारकून दरकदार व आमचे निाचे कारकून शहरात आहेत त्यास मोगल इंग्रज याही अटकाव केला आहे. याजकरिता शहरानजीक मुकाम करून उभयेतास पत्रे लेहून कारकून आपले जवल आणवावे. सविस्तर निवेदन करून चाकरीत हाजीर राहातील त्या अन्वये आमल सुरत चाले, नरोतमदास ठिकाण लागे, हे येश स्वामीस येईल. आपण येशश्वी आहेत तेथे विस्तारे काये ल्याहावे? दुसरा अर्थ की इंग्रज सास्टीस आला आहे. त्याणी सुरतहून मदत आणविला असे. याजकरिता शाहारची बंदी केल्यास तंबी पोहचोन तिकडे पायेबंद लागोन लोक येणार नाही. हे सरकारकाम मातबरच आहे. येणे करून दोन्ही कार्ये सिध्धांतांत येतील. तीहि सत्वरच सेवेसी येऊन दाखल होवे येसा विचार आहे. परंतु इकडील मसलत कितीक लाबल हा प्रकार कळत नाही. टोपीकराचे पारपत्यास येथून सास्टीस हशमी लोक, गाडदी व विसाजी कृष्ण बिनीवाले मातबर फौज रवाना जाले आहेत. थोडकेच दिवसी श्रीकृपेने परीमर्द जाल्यास जलदच निघोन येतो. राजश्री नारो आपाजीची येथूनहि लस्करात सुरत व भडोज येथे पायेबद देण्याविसी पत्रे गेली आहेत. तिकडून फौज येईल. येणेकरून तिकडील माणूस इकडे इग्रजाचे कुमकेस येणार नाही व येथेहि पराभव होईल. स्वामीनी कृपा करून आमचे कारकून आणऊन शहराची बदी केल्यास बाहेर निघोन त्याच्याने लडाई करवत नाही. गैरा हरयेक दगा होणार नाही. बदोबस्त होऊन येईलच. नरोतमदास बाहेरचे आमलास बखेडा करीत होता तो पलोन शहरात गेलाच असेल. शहरचे आमलात बखेडे मात्र त्याणी माडिले असेल. त्याचा बदोबस्त जाला म्हणेजे त्या प्राती सलाबत पडोन दुसरा कोन्ही लबाडी करणार नाही. सरकारची पत्रे मोगले व इग्रजे यासी आहेत ती आपलेकडे

पा आहेत. ती व आपण जरबची पत्रे लेहून बदोबस्त जाल्यास उतम आहे. न होये नरी हरयेक प्रकारे तबी पोहचऊन कारकून आमचे आपलेजवल आणऊन ते माहीतगारीने विनती करितील त्या अन्वये कर्तव्यात आणिले पाहिजे. बहुत काये लेहू हे विज्ञापना.

¶Bahiro Raghunath Mehendale asks Naropant Nana to attend promptly to the affairs of the city of Surat with which Narottamdas was interfering on the strength of the orders given him by Raghunathrao Dada.

No. 84] *[22-12-1774*

पो छ २९ सवाल सन खमस सबैन.

श्री

सेवेसी नारो आपाजी कृतानेक नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान तागाईत छ १८ सवाल पावेतों येथास्थित असें विशेष. साष्टीहून छ १६ सवालचीं पत्रें आलीं तीं व आनंदराव शिंदे यांचें पत्र रेवदंडीहून आलें तें व खेम सावंत भोंसलें वाडीकर यांचें व बालाजी गणेश तालुके देवगड व सुवर्णदुर्गेहून पत्रें आलीं तीं पाठविली आहेत; त्याजवरून निवेदन होईल. श्रीमंत राजश्री दादा-साहेबांकडील मसलत लांबली यामुळें चाल करून शत्रूंनीं चाल केली. हिंदुस्था-नांत सुज्यातदौले अंतरवेदींत येऊन यमुनेस पूल बांधतात, कर्नाटकांत हैदर नाईक बंकापुरास येतो म्हणऊन तिकडील वार्ता येतात. इंग्रेजांहीं साष्टीस मोर्चे लाविले. फिरंगी हबशी त्यांचे सामिलातीस; गुजराथेंत दंगा याप्रमाणें होते. आजिपावेतों सरदारांनीं लांबविले म्हणऊन म्हणावयास जागा होता. आतांच्या लांबण्यामुळें सरदार यांणीं लांबऊन बालगला (?) तऱ्ही होता. आतां इतकी फौज असोन कोणी जाऊन आडऊन गांठ घाल्लून मसलत न लांबे असें होत नाहीं. ते गेले तेव्हां पुढें तऱ्ही याप्रमाणें फौजा नेहमी कोठवर राहाणार? तेव्हां प्रथम दिवसच आहे. खानदेश अवघा पायमल्लीखाले गेला व पैकाहि त्यानें घेतला. याप्रमाणें चहूंकडून रयतेस उपद्रव व खर्चाचें तोंड भारी. पैका सावकारींत कोणी कर्ज द्यावयासी दिकतच आहे. देशीं पांच हजार फौज असती तर इंग्रेज इतकें न करितां, नेमणूक फौजाची जाली ते कागदांपत्रांतच फार करून आहे. येऊन समयास पोहचऊन कार्य होणें ते श्रीमंताच्या प्रतापें होईलच. परंतु लौकिकांत नीट दिसत नाहीं. धुळपकडील अरमार अद्यापि येत नाहीं. तीन कागद त्यांस जलद जलद पाठविलें ते येत तरी इंग्रेजाचें पारिपत्य मुंबईस (सांप्रत्य) करून व लोक आंत घाल्लून चहुंकडून येलगार होता; परंतु येतील. स्वामीच्या प्रतापें

नसरुडाचें पारपत्यें होईलच, परंतु संधि पाहून त्यानें बेइमानी केली. याउपरी निकड केली असतां दादासाहेबांकडील मसलत आटोपली म्हणजे सर्व गोष्टी चांगल्याच आहेत. फार लिहिलें म्हणऊन रागास न यावें. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Naro Appaji writes to Nana that enemies are raising their heads in several quarters owing to the long protracted affair of Raghoba. He therefore urges the necessity of dealing with Raghoba in a speedy manner.*

No. 85] [*23-12-1774*

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यांस

॥ अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. छ १९ सवालचे पत्र गल्याचे मुकामचे पाठविले ते पावोन लेखनार्थ आवगत जाला. राजश्री दौलत बाबूराव पलोन गेला. उभयेता कारभारी फौजसुधा आवरंगाबादेस आले. नवाबाची त्याची भेट झाली. सिंदे होलकरहि जाऊन कारभारियास भेटले. श्रीमंत राजश्री दादासाहेब प्रा बेटावद तापीतिरीं माघारे आले. तिकडील सल्लख सत्वरच होईल म्हणऊन लिहिले ते कलो आलें. नरोतमदास साठोद्रा याने प्रा आकलेसर हासोट व उरपाड येथील ठाणी उठऊन आपली ठाणी बसविलीं होतीं त्याच्या पारपत्यास दीड हजार फौज व गारदी व तोफा पाठविल्या आहेत. त्याचा बंदोबस्त व सुरतेस कमाविसदार आटकेत ठेविले आहेत त्याची मुक्तता होऊन तेथील बंदोबस्त करावा हे दोन्ही कामे जाल्यावितरिक्त रेवातिरास येता नये, शब्द लागेल म्हणऊन लिहिले त्यास नरोतमदासाचे पारपत्य करावें. आकले (श्वर) व हासोट व उरपाड येथील ठाणी महताची उठऊन जुने कमाविसदार यांची स्थापना करून त्यांची पत्रे राजश्री बापूस व राजश्री नानास घेऊन रवा(ना) * * * * * * तुम्हास व राजश्री जना(र्दन) * * * * राजश्री गोविंद वासुदेव यांस * * * * आहे ते काम टाकून दुसरे करता नये [शिक्का] हे आम्हासहि उमजतें. त्याची पैरवी अगोधरच तुम्ही केली आहे उतम केले. आकलेसरचें ठाणें मजबूत ते फौजेच्या वाटेवर यास्तव ते सोडून हसोटास गेला. ते ठाणें कांहीं मज(बू)द नाही. त्याचा पाये सुटला. तो पलोन सुरतेस गेलाच आसेल आथवा जाईल. ते कार्य उरकलेच आसेल. सुरतेचा

विचार तर मोगलासीं व इंग्रेजासीं गाठ, ते दिवसगतीचे कर्म. केवल फौजेच्या दबावानें करूं म्हणाल तर होणें नाही. त्या शहास फौज गुंतली म्हणेजे खराबीस मूल आहे. लोकांचे देणे माथा चढेल, इकडील मोठी मसलत बिघडेल. तेथील पारपत्य होणें नाही. श्रीमंत राजश्री दादासाहेब तीस पस्तीस हजार फौज व तीर्थरूप कैलासवासी दोन महिने बसले तेव्हां बंदी करून जो जाबसाल जाला तो करून घेतला. त्याजवर राजश्री नागो राम दोन हजार फौज घेऊन आले. त्यानीं च्यार महिने बंदी केली तेव्हां धेंडे पलसे येसा बंदोबस्त करून गेले. तेथील बंदी करून जो जाबसाल होईल तो करून घ्यावा लागतो. दुसरा उपाये चालत नाही. यास्तव राजश्री गोविंद वासुदेव याजपासीं काही आमचे व काही सरकार फौजपैकी मिलोन हजार श्वार ठेवावे ते बंदी करतील. दाणा, घांस, लकडी शहरात जाऊं देणार नाहीत म्हणजे कमाविसदारहि मुक्त होतील व आमलाचाहि बंदोबस्त होईल. नरोतमाचेहि पारपत्य होईल. वरकड फौज घेऊन आपण व रा जनार्दन रायाजी येसे रेवा उतरतिरास यावें. राजश्री गबाजी बलालहि येथून थोडेसें सामान देऊन पाठविले आहेत. त्याची आपली भेट जालियास विस्तार सागतील. राजपिपलीयाच्या मुलकात फौज आली म्हणजे तेहि सामानसुधा सामील होतील. त्यास लिहीणें ते लिहिले आहे. रा गोविंदराव गाईकवाड यांच्या पारपत्याची तक हेच आहे. राजश्री लालजी पा महीपार आहे. तो तुम्ही रेवा उतरलेस म्हणजे राजश्री आपाजी गणेश व हाजू महता आम्हाकडील खेड्यास आहे तो रा लालजी पाटलास इकडे येऊ देणार नाही. सर्व मदार आपल्या आगमनावर आहे. रा छ १९ माहे सवाल बहुत काय लिहिणे.

¶*Fatesing Gaikwad advises Naropant Keskar to try a blockade rather than involve himself in an open engagement with the English at Surat to bring them round as it would require less number of troops.*

No. 86] *[24-12-1774*

पौ छ २३ सवाल खमस
सबैन मार्गेश्वर मास

श्री

राजश्री नारोपंत गोसावी
यांस

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनती उपरी. येथील क्षेम जाणऊन श्वानद लेखन करीत असिले पाहिजे विशेष.

सविस्तर वृत राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविंद वासुदेव यास लिहिले आहे तो आर्थ पुरतेपणें ध्यानास आणून राजश्री गोविंद वासुदेव याजपासी आपल्याकडील व आम्हाकडील हजार राऊत ठेवावे म्हणजे ते मुलकाचा व सुरतेचा व व्यारे सोनगड याचा बंदोबस्त करतील. वरकड फौज घेऊन आपण व राजश्री जनार्दन रायाजी थैसे सत्वर रेवा उतरतिरास यावें म्हणजे मसलत सिधीस पावल्यादाखल आहे. दिवसगत रेवा थैलतिरी यावयास लागली म्हणजे मसलतीसहि धका व खराबीस मूल थैसी तक आहे. राजश्री हरि उमाजी कनिष्टाकडून शकटभेदास येणार कीं आम्ही राजश्री गोविंदरायास फौजसुधा घेऊन कारभारी याकडे जातो, तुम्ही रेवा न उतरणे, थैसे सागोन तुम्हास गुंता करावयास आले आहेत. त्याच आतर्गत हाच कीं तुम्हास दिवसगत रेवा दक्षणतिरी लागली म्हणजे राजश्री लालजी पाा कदम सामानसुधा कनिष्टापासी येतील. फौजेचा जथ होईल मग कनिष्ट रेवातिरास येऊन तुम्हास रेवातिरीच गोवतील. थैलतिरी उतरणे होऊ देणार नाहीत म्हणजे महसलतीस धका बसला. कनिष्टाची बाजी सेर जाली. मग आपण दरबारी लेहोन त्याचा बंदोबस्त करून घ्यावा. काही पाऊ दिल्हे आसतील, काही पुढे देऊ थैसेहि बोलले आसतील याजवरून या कर्मास प्रवर्तले आहेत. परंतु ज्या कार्यास तुम्हास फौजसुधा कारभारी यानी पाठविले आहे त्या मसलतीस धका बसोन नामर्दी आमच्या तुमच्या पदरास येईल थैसे हे कर्म आहे. यास्तव त्या न थैकता रेवा उतरतिरास फौजसुधा यावे. आपली आमची भेट जालिया जो मनसुबा उतम दिसेल तो करावयास येईल र्रा छ २० माहे सवाल बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶[*Fatesing Gaikwad importunes Naropant to cross to the North of the Nerbudda before his younger brother Govindrao steals a march on him.*

No. 87] [*25-12-1774*

श्री

राजश्री नारोपंत गोसावी
यांस

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर येथील क्षेम जाणून श्वानदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. छ १९ सवालचे पत्र पाठविलें तें पावोन लेखनार्थ ध्यानास आला. नरोतम किशोरदास बंधुसहीत हस्तगत करून फिरोन गल्यास फौजसवर्तमान आलेत,

बहुत उतम जाले. नरोतमासमागमे खबरदार माणसें व श्वार देऊन उभयेतां कारभारी याकडे रवाना करावा आथवा त्यास वर्तमान लेहोन उतर आणऊन ते लिहितील त्याप्रमाणें करावें परतु तोवर त्यास पारनेरीयास पाठऊन बहुत खबरदारीने रक्षावा. तो बखेडिया आहे यास्तव सूचना लिहिली आसे. विशेष लिहिले कीं याउपर सुरतेस सरकारचे कमाविसदार आटकाविले आहेत यास्तव सुरतकराचे पारपत्य करून कमाविसदारास स्थापून मग तापी रेवा फौजसुधा उतरूं. त्यास सुरत हसोटाप्रमाणे नव्हे की वरचेवर पारपत्य होईल. यास्तव पूर्वी लिहीले आहे त्याप्रमाणें हजार राऊत ठेवावे आणि सुरतेची बंदी करून तेथील बंदोबस्त करूंन घ्यावा. सर्व फौज घेऊन सत्वर रेवा उतरतिरास यावे. इकडील कार्य मोठें खराब होतें. येविसीचा विस्तार पूर्वी [शिक्का] राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविंद वासुदेव यास व तुम्हास लिहिले आहे तो आर्थ ध्यानास आणून ज्यात विशेष आर्थ साध्ये होये तें करावें. व्यारे व सोनगड या दोही स्थलांचा मजकूर उभयेतास लिहिला आहे तोहि ध्यानास आणून जे सोईस पडेल तेणेप्रमाणें योजून फौजसुधा सत्वर आगमन रेवा उतरतिरी होये तो आर्थ करावा. सुरतेच्या शहास येकरूप गुंतो नये. ते कार्य सावकासीचे आहे. बलेकरून साध्य होये यैसें नाहीं. तजविजेनेच तेथील बंदोबस्त पूर्वोपासून होत आला आहे. त्याप्रमाणेच प्रस्तुतहि केलिया उपयोगी. त्या शहास गुंतलिया निवता नये. खराबीस मूल होईल. विशेष ल्याहावें तर आपण सूज्ञ असत. विस्तार काये लिहिणें. सुरतेस आडखावयाचे तूर्त न करावें. बाहेरील मुलकी बंदोबस्त जालाच आसेल. त्वरेने यावयाचे करावें. रा छ २१ माहे सवाल बहुत काये लिहीणे.

¶*Fatesing Gaikwad congratulates Naropant on the capture of the rebel Narottam and asks him to come to his assistance without involving himself in an attack on Surat which he thinks would be a protracted affair. He advises a blockade in its stead.*

No. 88] *[23-12-1774*

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य दताजी नारायेण कृतानेक साष्टांग दंडवत विनंती. येथील वर्तमान ताा छ १९ माहे सवालपर्यंत आपले कृपेकरून येथास्तित असे विशष. आपण पत्र पाठविले ते पावले, नरोतमाचे रखवालीची चौकसी उतमच आहे. लौकरीच पर्वतवासी करितो म्हणून लिहिले. यैसियास आपण हे महतकृत्य संपादोन येश

घेतले तेथे कोणेविसी चौकसीस अंतर होणार नाहीं. वसई साष्टीकडील बातमी पकी लिहीत जाणे म्हणून आज्ञा. त्यास खुशकीने वर्तमान यावयाचा मार्ग बंद जाला. तरीहि बंद जाल्या. कासीद वगैरे बंदी जाली. माणूस व कागदपत्र कोणाचा येऊ पावत नाही. वसईकडून माणूस व कागदपत्र पोहचत नाही यैसा प्रकार घडला आहे. परंतु हा कालपर्यंत हस्तगत नाही. किला बेजरब लडत आहे. कालपासोन वर्तमान आले आहे की, इंग्रजाने तल्यावर मोर्चा लाविला होता तो तोफाचे मारगिरीने उठऊन मागे हटविला व काही लोकहि इंग्रजाकडील मारिले. किला खबरदार आहे. पुणियाहून सरकारची मदतहि येऊन पोहचलीच आसेल व वसईहूनहि मदत गेली यैसे वर्तमान चहूकडून आले आहे. जिनसाची यादीप्रमाणे आणऊन पाठवितो. कृष्णमूर्तिका[1] व सिसेगोल्या सचीन (?) सत्रा गावास पावते जाले. कृष्णमूर्तिका पके पाच मण व गोल्या पके दोन मण येणे प्रो महत येत्न करून पावते केले. आमची बहीण कोहजगोर येथोन रेवाश्नानास आली होती. लस्करचे हंगामा यैकोन येथे आम्हाजवल आली. हाली जाणार त्यास कृपा करून मार्गीचे दस्तक घोडी २ दोन स्वारीचे व पडतल माणसे यैसे दस्तक द्यावयाची आज्ञा केली पाहिजे. दस्तक आले म्हणजे रवानगी करू. साष्टी शत्रूस हस्तगत जालियास येथें तोफा सरबती होईल हा येक प्रकार आहे तो प्रकार हा कालपर्यंत नाही. स्वस्त आहे. इंग्रजाचे विलायेती जाहाज लोक भरून साष्टीवर आले होते ते फुटले हेहि वर्तमान आले आहे. सारांष साष्टीचा किला खबरदार आहे. चौकीचे दोन बुरूज घेतले होते ते तोफाचे मारगिरीनें सोडविले. मोगलास आपण पत्र पाठविणार आहेत. आतां ते सहसा न पाठवावे. पत्र पाठविल्यास आपणाकडूनच जाबसाल लागला यैसे दिसोन येईल. नरोतमास हस्तगत केला. येणेकरून दबाव बराच पडिला आहे. यास्तव पत्र पाठविल्यास विलग दिसोन येईल. फौज शहरावर येईल हे येथे वर्तमान आहे. त्यास धोबी घाटाचे रखवालीनिमित्य चालीस पनास बरकदाज गाडदे दरवाज्याबाहेर धोबीघाटपर्यंत फिरत असतात. फौज आलियावर त्याचा टिकाव होणे नाही. परतु न कले. राऊता धाऊन येतील आणि येखादा राउतास जाया करून जातील. यास्तव सूचना लिा आहे. बहुत काय लिहीणे लोभ करावा हे विनती.

¶*Dattaji Narayan writes to Naropant Keskar complimenting him on the capture of Narottam. He also writes about the brave defence put up by the garrison of Salsette.*

---

१ कृष्णमृत्तिका=दारू. 1 Gunpowder.

6011

No. 89] *[24-12-1774*

श्री

श्रीमत राजश्री नाना स्वामीचे
सेवेसी

पोष्य दताजी नारायेण कृतानेक साष्टांग दंडवत विनती. येथील वर्तमान ताा छ २० माहे सवाले पावेतो आपले कृपे करून येथास्तित असे विशष. आम्ही बाहेर लस्करात यावयाचा पैगाम मोगलासी लाविलाच होता. आपणासहि लिहिले होते. त्यास काल भृगुवारी मोगलाने अजम जफर याबखान याचे विद्यमानें आम्हास बोलाऊन रुबरू बहुत प्रकार समाधान करून सांगितले की, तुम्ही आपले ठाणियात जाऊन मामूलमाफीक मामलितीचे कामकाज करणे. आम्ही उतर केले की, तुम्ही श्रीमंताचे निसबतीची मामलत काढून जेष्ठ श्रीमंताकडेस मामलतीचा दखल दिधला हे वर्तमान आम्ही हुजूर श्रीमंतास लेहून पाठविले. श्रीमंतानी येविसीचे बंदोबस्तास फौज रवाना केली. सरदार फौजसुद्धा येऊन पोहचले असता हाली तुम्ही आम्हास म्हणता की, ठाणिया जाऊन आपला आमल करणे. त्यास हे गोष्ट आम्हास कसी घडल? श्रीमंतानी फौजसुद्धा सरदार येविसीचे बंदोबस्तास पाठविले. त्यास बंदोबस्ताची कोणे प्रकार आज्ञा आहे त्याप्रो बंदोबस्त जाल्याविना आम्हास ठाणेयात जाता येत नाही. असो. तुम्ही म्हणता तर आम्ही लस्करात सरदारास लेहून पाठविती त्याचा जाब येईल त्याप्रमाणे घडेल. यैसे जाबसाल जाले. तेव्हा मोगलाने उतर केले की तुम्ही आधी ठाणियात जाऊन पत्र लिहिणे. त्यास आपले विद्यमान नाही. आम्ही ठाणियांत कसे जावे? त्यास येविसी मोगलाने फारच दुराग्रह केला तेव्हा त्याचीहि मर्जी रक्षून सरकारचेहि कामकाज बंदोबस्त होऊन यावा ये अर्थी आम्ही ठाणियात न जाता कारकून पांच माणसे ठाणियात पाठविली. ठाणे मात्र स्वाधीन करून घेतले आणि हे पत्र आपणाकडे पाठविले आहे. आपली काये मर्जी ते आज्ञा करावी. त्याप्रमाणे घडल. त्यास आमचे विचारे आपले मर्जीस येईल तर मोगलास पत्र लेहून पाठवावे की, तुम्ही सरकारचे ठाणे कमावीसदार याचे स्वाधीन केले, परंतु हुजुरून आज्ञा आहे की, आजतागाईत सरकारचे बाकीचा यैवज व मामलतीचा बंदोबस्ताविसी कितेक प्रकार श्रीमंताची आज्ञा आहे त्याप्रमाणे बाकीचा यैवज, झाडून फौजेच्या खर्चास देविला आहे तो, वसुलात आला पाहिजे. हा पुढील बंदोबस्त हुजूरचे आज्ञेप्रमाणे बंदोबस्त घडला पाहिजे. यास्तव आपणाकडील भला माणूस लस्करात पाठऊन देणे. जाबसाल होईल. हुजूरचे आज्ञेप्रो घडोन आलियास उतम. हे गोष्ट न घडल्यास शहरची बंदी

होईल आणि हुजूरचे आणेप्रमाणे अमलात आणावे लागल. यैसे पत्र उतम प्रकार दाब दबावणीचे पाठवावे. आम्ही ठाण्यात जावे न जावे तेहि आज्ञा करावी. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Dattaji Narayan reports to Naropant Keskar that he has been released and sent back to his Thana by the Mughal Subha of Surat. He asks the addressee to demand peremptorily from the Subha the Peshwa's share of revenue.*

No. 90] [*25-12-1774*

श्री.

राजश्री नारो आनंदराव गोसावी यासी

सुा खमस सबैन मया व आलफ. इंग्रजाचा तह होता त्यास हाली इंग्रजाने साष्टीस मोर्चे लाविले सबब बिघाड जाला असे; तरी इंग्रजाचा माहाल भडोच जफ्त करून ऐवज बेजरब वसूल घेऊन पाठवणे; व माहालोमाहाली याचा ऐवजाची नेमनूक आहे तो ऐवज त्याजपासून घेऊन सरसुभ्याकडे देणे. ते हुजूर रवाना करितील. जाणिजे छ २१ सवाल आज्ञाप्रमाण.

¶*The Peshwa orders Naro Anandrao Keskar* to confiscate the share of revenue accruing to the English from the province of Broach since hostilities have been declared with them.*

No. 91] [*27-12-1774*

पाो छ २६ सवाल सन
खमस सबैन मार्गसीरष
मास

श्री

सेवेसी माहादाजी विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायेत छ २३ सवाल मुकाम किले सिहीगड वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ १६ सवालचे सादर झाहलें ते छ मजकुरी पावलें. तेथें आज्ञा की "सखाराम हरि यांची मातुश्री व रामचंद्र विठल कारकून निसबत चिटणीस यांची मुलेमाणसे देखील भावाच्या बाइका व मल्हार येशवंतराव, विठल येशवंतराव यांचे बंधु यांची बाइको व मुलें मौजे उरवडे ताा मुटेखोरे येथे आहेत त्यास किले

---

* Related to the Panses.

मजकुराहून लोक व शाहाणा कारकून पाठऊन कैद करून किले मजकुरी पके बंदोबस्तानें अटकेत नेऊन ठेवणें आणि पोटास सिधा मध्यम प्रतीचा देत जाणें. पत्र पावतांच लोक पाठऊन किले मजकुरी अटकेंत नेऊन ठेवणे " म्हणोन आज्ञा. त्याजवरून मौजे मजकुरास लोक व कारकून पाठविले आहेत कैद करून आणून किल्यावर आज्ञेप्रमाणें ठेऊन बंदोबस्त करितों. परंतु माणसे कैद करून आणलियाबर त्याचे घरीं वस्तभाव दाणा असेल त्याचा तसनस होईल याजकरितां माणसे कैद करून आणविली, घरीं वस्तभाव जे असेल ते पाटील कुलकर्णी मौजे मजकूर यांचे हवाला करून यादी घेऊन येणें म्हणोन कारकुनास सांगोन बंदोबस्त करविला आहे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Vishvanath informs the Peshwa from Sinhagad that in accordance with instructions from him soldiers have been sent to seize the families of Sakharam Hari and Ramchandra Vithal.*

No. 92] *[28-12-1774*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री भवानजी लोखंडे दिमत राजश्री शाहाजी बावा भोंसले दंडवत विज्ञापना. तागायत छ २४ शावाल परियेंत येथास्थित आसे विज्ञप्ति जे. कृपा करून पत्र पाठविलें तेथें आज्ञा निरोपिली जे छ २० रोजीं इंग्रेजानी मध्यरात्रीं हाला केली परंतु सरकारचे लोकानी हाला मोडून काढिली. इंग्रेजाचें माणूस दीडसेंपरियेंत ठार जाहालें. हाला केली परंतु त्यांचें तोंड चांगलें फुटलें, बेमोहर व्हावा परंतु बाहेरील लोक आजून पोचले नाहींत. त्यास निकडीचे कामांत निकड करावी म्हणजे त्याचें पारपत्य जलदीनेंच होईल. राजश्री विसाजी कृष्ण साष्टीस पोहोंचले व राजश्री राघोजी आंगरे सरखेल हेहि जाऊन पोहचले. तरी तुम्ही रात्रीचा दिवस करून साष्टीस जाऊन पोंहचणे. कामाचे उपयोगी पडणे याजकरितां जलद जाणें म्हणून आज्ञा. तर बहुत उत्तम आहे. आम्ही सोमवारी चिंचवडच्या मुकामास आलों. काल मंगलवारी नानेंमावल येथें आलों. छ मजकुरीं घाटा खालें गेला. उदईक जाऊन पोहोंचतों. आपले पुण्यें प्रतापें करून सर्व गोष्टी उत्तमच घडोन येतील. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विज्ञापना.

¶*Bhavanji Lokhande as directed by the Peshwa proceeds to Salsette to reinforce Visaji Krishna.*

No. 93] [28-12-1774

श्री

राजश्री नारो आनंदराव गो यांसी

सुा खमस सबैन मया व अलफ. तुम्हांबरोबर सा सात आठ हजार फौज देऊन गुथराथेतील कितेक कामेकाजे करावयाची आज्ञा करून रवानगी केली. त्यास तुम्ही जाऊन कोणती कोणती कामेकाजे बंदोबस्त केला व करणें राहिले काये, हे काहीच हा कालवरी लिहिलें नाही, हे कोण गोष्ट? यावरून तुम्हांस काये म्हणावे? इतकी चांगली फौज बरोबर असता कामाकाजाविसी सुस्ती होणे ठीक नाही. तरी प्रस्तुत कोणे ठिकाणी आहां? गेल्यापासून कामेकाज बदोबस्त काये केले व पुढें करणार कोणते ते सविस्तर लिहिणे व वरिचेवरी लिहितहि जाणे. इकडील मार तरी तीर्थस्वरूप हजार दोन हजार फौजेनसी पळून नर्मदे-पार लांब गेले. त्याचे पाठीस सरकारची फौज उभयेता सरदार व राजश्री हरि बलाल मिळोन तीस पस्तीस हजार लागलीच आहे. सरकारचीहि स्वारी तापी-पार आली. नवाबहि येऊन भेटले. समागमेच आहेत. जाणिजे छ २४ सवाल.

¶*Sakharam Bapu takes Naro Anandrao to task for not reporting his activities and movements.*

No. 94] [28-12-1774

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यास

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्नो फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. तुमचे पत्र छ २१ सवालचे आलें तें पावोन लेखनार्थ ध्यानास आला. सुरतकराचा वकील उदईक येणार तो आला म्हणजे तेथील बंदोबस्त करून व व्यारे व सोनगड येथील बंदोबस्त करून फौजा घेऊन सत्वरच रेवापार येतो म्हण-ऊन लिा त उ(त)म आहे. व्यारे व सोनगडच्या बंदोबस्ताचे परियाये दोन, ते राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविंद वासुदेव यास लिहिले आहेत ते ध्यानास आणून तुमच्या त्यांच्या विचारे ठरेल तो विचार करून तिकडे आमित्राकडील श्वार आहेत त्याचा वेध तुटोन मुलकांत बखेडा न होये. सुरळीतपणें वसूल चाले यैस बंदोबस्त दोहीतून येका प्रकारे करून फौजसुधा आगमन सत्वर रेवा उतरतिरी होये तो आर्थ करावा. आमचे आज्ञेची मार्गप्रतीक्षा उभयेता करितात

तेणे करून दिवसगत लागते ते उपयोगी नाही. तुमच्या त्याच्या विचारें उतम दिसेल ते करून सत्वर या प्रांते फौजसहवर्तमान यावे. इकडील विचार पूर्वी सविस्तर लिहिलाच आहे. कबिले व बुणगे नडियादेस पाठऊन सडे होऊन राहिले आहेत. दोन च्यारसे स्वार व पाच सातसे पायेदल रेवातिरासहि पाठविले आहे. इतके दिवस कनिष्ठास मुलकाची आषा होती यास्तव मारकूट करून वसूल घेत होते, परंतु मुल्क लुटीत नवते. तुम्ही फौजसुद्धा आलियाचे वर्तमान कललियापासून मुल्क लुटितात, गुरे ढोरे आणून सिबदीस देतात, तेणे करून गाव उज्याड होत चालिले. माल जोरी कपास वगैरे रबीचा रानात आहे तो चोरपोर लुटून खातात यैसा प्रसंग आहे. छाणी, पादरे दोन्ही मातबर गाव येथे दो लक्षाचा वेरा घातला आहे. तो मारकूट करून वसूल करितात तो रुपया फौजेस व सिबदी देऊन तुमचे सन्मुख जावे इतकियांत रा। लालजी पाटील आले तर बरेच जाले. जथ भारीच जाला. यैसाहि विचार करितात. इकडील खराबी या प्रकारची होते. तिकडील मुल्क हाताखाले आला आहे, तिकडील वेध न तुटला तर तेहि खराबीस मूल आहे. यास्तव जो मुल्क हाताखाले आला आहे त्याचा बंदोबस्त करून इकडीलहि समये सांभालिला पाहिजे. यास्तव आमच्या पत्राच्या उतराची मार्गप्रतीक्षा इतक्याउपर न करावी. हेच पत्र सहश्र पत्राचे जागा मानून तुमच्या व उभयेताच्या विचारें जे आगत्य कर्तव्य ते सत्वर करून रेवा उतरतिरास फौजसुधा आगमन होये तो आर्थ करावा म्हणजे श्री महदयेश तुम्हास देईल. वारंवार तोच मजकूर किती म्हणोन ल्याहावा? इगरेज नरोतमदासास कुमक पाठऊन तो बखेडा लांबणार होते तो आपली फौज सत्वर पावली. नरोतमाचे पारपत्य जाले. हे कर्म श्रीमंतांच्या पुण्येप्रतापे जाले. तुम्हास येश श्रीने दिल्हे. इग्रजाची पत्रे सापडली ते सरकारांत रवाना केली, उतम केले. परंतु इगरेज व सुरतकर मोगल श्रीमंत राजश्री दादासाहेबांच्या लक्षात. निमित्य नरोत(म) * * * * * देऊन सरकार मुलकांत दाखला * * * * * हि भाव उभयेता कारभारी यास व राजश्री भीवरावजीस ल्याहावा. आम्हीहि लिहिले आहे. मुंबईकर इंगरेज यास लेहोन येविसीचा बंदोबस्त करवा की फिरोन यैसे बखेडिये न राहात. कनिष्टाकडील काकोबा परभू वगैरे सुरतेत राहून कुचाली करितात. याजविसीहि सूचना ल्याहावी की त्यास सुरतेतून काढून देत हे मुबईकरास लेहोन त्याचे पत्र सुरतकरास येविसी येते कीजे रा। छ २४ माहे सवाल.

¶Fatesing Gaikwad writes to Naropant Keskar that Govindrao Gaikwad is getting bolder and levying contributions all round. He therefore requests the addressee to march to his assistance with all possible haste.

6016

No. 95]   [28-12-1774

श्रीशंकर

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे
सेवेसी

सेवक नारो गणेश वाडदेकर कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। मार्गसीर वद्य दसमीपावेतो मुकाम बडोदे सुखरूप असो. यानंतर आपण कृपा करून पत्रे पाठविली ती पावली. लिहिले वर्तमान विदित जाहाले. इकडील समाचार तरी तूर्त फौज तिकडे न(?)येत. ताबेकराची फौजेने दाटी केली तरी तिकडे फौज येईल. नाही तरी येत नाही. सुखरूप राहाणे. फौज आली तरी तुमचे वाटेस कोणी जात नाही. आम्ही तिकडे येणार होतो परतु काही कार्यमुले राहाणे जाहाले. यास्तव येणे जाहाले नाही. येथे आम्ही स्वार व प्यादे तयार करून ठेविले होते परतु तुमचे प्रतिउपर आले नाही. मग तैसेच राहिले. चिरजीव भाऊस देसी रवाना करणार म्हणून लिहिले उतम आहे. आम्हाविसीहि तीर्थरूप दादास पत्र ल्यावे की सुखरूप आहेत म्हणून लिहिणे. रा। कचोपतानी पत्र लिहीले आहे त्याजवरून कलो येईल. बहुत काये लिहिणे कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

चिरजीव रा। भाऊ यासी आसीर्वाद. पत्र लिहिले आहे त्यावरून कलेल. हे आसीर्वाद.

¶Naro Ganesh Vadadekar communicates to Naropant his own arrangement of forces at Baroda, and says that the forces even though they proceed to the addressee will in no way molest him.

No. 96]   [29-12-1774

श्रीम्हाळसाकांत

राजश्री सुखानंद मेहता गोसावी
यासी

(मो) अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री गोविंदराऊ गायेकवाड सेनाखासखेल समसेरबाहादर दंडवत सु॥ सन खमस सबैन मया व आलफ. राजश्री रणा भगवंतसिंगजीस व तुम्हास पूर्वी पत्रें पुणेकडील फौज आली तिचें पारपत्य करावयास राजश्री त्र्यंबकराव गायेकवाड तुम्ही येके विचारे जमाव करून

त्या फौजेचे पारपत्य रात्र[शिक्का]विर्त करून करणे, चैन पडों न देणें म्हणून लिा होते. त्याप्राा तुम्ही करीतच आसाल. खासा स्वारी वीस हजार फौजेनसी मार्गसीर्ष वद्य १३ मुहूर्ते त्या फौजेचे पारपत्य करावयास येत आहे. त्या फौजेचे मुकाबला. रात्रविर्त करून उपद्रव करीत जाणें. इतकियांत फौज येऊन खासा स्वारी पोहचली जाणावें. राा छ २९ माहे सवा[१]ल.

¶*Govindrao Gaikwad requests several Chieftains in Gujarat to check the advance of the Poona army and to harass it in all ways.*

No. 97] *[29-12-1774*

श्रीम्हाळसाकांत

राजश्री त्रिंबकराव गायकवाड
गोसांवी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री गोविंदराव गायेकवाड सेनाखासखेल समसेर बहादर राम राम. सुहूर सन खमस सबैन मया आलफ. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. लेखनार्थ सविस्तर ध्यानास आला व राजश्री रंगो बलवंतराव यांचे जबानी वरूनहि कलले. तुमच्या लिहिल्याप्रमाणे राजश्री भगवंतसिंग रणा वगैरे यांसी पत्रे लिहून पाठविली आहेत. पाठऊन पागा सरंजाम आणऊन फौजेच्या तोंडावर राहाणे आणि रात्रदिवस हुलड करून, चैन पडू न देणे. खासा स्वारीहि त्रयोदसीच्या मोहूर्ते निघोन तिकडे येत आहे. तुम्ही हिंमत धरून सरजाम जथून आसावें. वर्तमान वरचेवरी लिहीत जाणे. वरकड रंगोपंतास समक्ष आज्ञा केली आहे. त्याप्राों तुम्हास लिहितील त्याजवरून कलेल. राा छ २९ [शिक्का] माहे सवाल.

¶*Govindrao Gaikwad asks Trimbakrao Gaikwad to lose no time in harassing the hostile forces.*

---

१ याच तारखेचीं व याच मजकुराचीं पत्रें त्रिंबकराव घोरे, कृष्णाजी चवाण, भगवंतराऊ गायेकवाड, भगवतसिंग रणा यांस आहेत. त्यापैा एकांत 'तांबवेकराची फौज सुरत माहालांत आली आहे' हा व घोरे याच्या पत्रांत 'तुम्ही भीलवान कोली वगैरे घेऊन, राजश्री त्रिंबकराव गायेकवाड यांजकडे जाऊन त्या फौजेच्या तोंडावर राहाणे' हा मजकूर जास्त आहे.

No. 97A] [31-12-1774

श्री

सेवेसी विज्ञापना. गोविंद नरसिंह सा। नमस्कार विनंती. येथील कुशल छ २७ सवाल दर जागा नवापूर सुखरूप असो. यानंतर इकडील वर्तमान श्रीमंत दादांचा हा काळपावेतो मुाच आहे. फिरंगी सुरतेहून आला म्हणऊन सोनगडीहून मात्र वर्तमान आले. लस्करास बातमी आमची गेली आहे. अस्तमानपावेतो येईल. आली म्हणजे तहकीक सेवसी लिहून पाठऊ. सौ आनंदीबाईहि आंकलेश्वरावर आली म्हणऊन वर्तमान आले आहे. सते मिथ आमची माणस लस्करातून आलियावर कलल. बखतराम येऊन आज पोहचला. उदईक पुढे लाऊन देतो. डोकेचे जासूद पाठऊन देतो म्हणऊन लिा तर उतम आसे. ते आले म्हणजे येथील अजारी सेवसी पाठऊन देतों. वरकड वर्तमान येथास्तित असे. बहुत काये लिा हे विज्ञाप्ति.

¶*Govind Narsinha writes news about Raghunathrao, the English and Anandibai.*

No. 98] [December 1774

श्री

सेवेसी नारो गणेश कृतानेक सा। नमस्कार विनंती यैसीजे. श्रीमंत राजश्री दादासाहेब यानी राजश्री नरोतमदास यास पत्र पाठविले व गोविंदराव गायकवाड यासहि पत्रे हाती. त्यास जे दिवसी ठाणे बसवावयास गेले ते घालमेलीत आले. तो नरोतमदास याजकडील भावदास याजकडे दिल्हा. दक्षणी म्हणून वाचावयास घेतला. ठाणेयातून ते निघाले. कासीद इतकेयात गोविंदराव गायकवाड याजकडे गेले. त्यास कागद बाजिनस पा. हा वाचून पाहून श्रीमंत राजश्री बापूकडे रवाना करावा. यात सर्व पुढील ब (म?) न सबा श्वदस्तूरचा आहे. बडोदयास माणसे बातनी आजच रवाना केली आहेत. श्रीमंत रा। सयाजी गायकवाड यास स्वामीनी पत्र दिल्हे तें पावते केले. परंतु त्याचे मानस कूच करावयाचे साफ नाहीत. गावात दाहा पाच हजार रुा मागतात आणि लुटितात. जर जबरदस्ती पोहचली तरच जातील. हे गेलेविना गावात कोणी येत नाही. परगणेयातहि राहात नाही. याची तजवीज करणार आपण आहेत. सत्वर तजवीज जाली पा. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. नेहमी दोनसे राऊत तीन च्यारी घाटास आसेल तर कागदपत्र सापडेल हे विनंती.

¶*Naro Ganesh refers to the proposals made by Raghunathrao to Govindrao Gaikwad and Narottamdas and further asks for severe action to be taken against Sayajirao who has been harassing the ryots.*

श्री

विनंती विशेष. सुरतकर इंग्रेज याची खासगत खरिदी खादी व कापूस सालाबाद दोन लक्ष रुपयाचा माल परगणे जंबूसर व पा अमोद व पा देहेजबर व पा डबई वगैरे खरिदी आगाऊ होऊन सरसाल[1] माल गाडियावर भरून भडोच व जंबूसरचे बंदरी होडीत भरून सुरतेस येतो व खुशकीचे मार्गेहि सुरतेस येतो. त्या मालाची चौकसी मनास आणून सरकारात जफ्त करावा. याचा प्रकार जागा जागा परगणे मजकुरी खादीकर वणवाट व खरिदीचे दलाल आहेत ते जकातीचे कमाविसदारास ठाऊक आहेत. यास्तव जकातीचे कामाविसदाराचे हाते मालाचे खरिदीचा ठिकाणा लाऊन माल जफीत (जफतीत?) आणावा. मालाचे जफ्तीचा बोभाट पडालियावर दलाल लबाड व जकातीचे कमाविसदार जकाती करिता इंग्रजाचा माल सावकाराचे नावे काढितील. यास्तव खादी व कापूस दरोबस्तदेखील साऊकार अटकाव करावा म्हणजे सहजच इंग्रेजाचा माल ठिकाणी पडेल. जरूर या कामाची चौकसी करावी. दोन लाख रुपयाचा माल इंग्रजाचा सापडेल. कादारहि कृत्रिम करितील. पुरतेपणे चौकसी होऊन माल जप्त जाल्याने इंग्रजाचे नुकसान बहुत होईल. येविसीचा बोभाट शहरांत पडेल. लोभ करावा हे विज्ञापना.

¶*Certain measures to be adopted for confiscating the merchandise of the English at Surat and thus bring them in loss are suggested by the writer.*

No. 100] [December 1774

श्री

सेवेसी सा। दंडवत विनंती. येथलि वर्तमान तर मोगलाचा आम्हचा करारदाद जाला की, वकील समागमे घेऊन गुरुवारी लस्करात जाणे. त्याप्रमाणे आपणास लिहून पाठविले आणि काल बुधवारी रात्रीस चंद्रोदई ठाणियातोन बाहेर ब्राह्मणाचे घरी प्रस्तानी आलो. प्रात:काली मोगलाकडेस वकील समागमे घ्यावयास चोपदार पाठविला. त्यास मोगलाने सागोन पाठविले की, इंग्रजाकडून कोसले येणार आहेत त्या गडबडीत आम्ही आहो. कौसल येऊन गेले म्हणजे वकील पाठवितो घेऊन जाणे. वकील आल्याविना न जावे यैसे सागोन पाठविले यास्तव वकिलाची प्रतीक्षा करीत बसलो. इंग्रजाचे कौसलदार दरबारास येऊन गेले.

[1] वर्षभर.

हे बातमी आणऊन फिरून चोपदार पाठविला तो जाब दिधला की आता दोन प्रहर जाले. आजचा दिवस मोकाम करून उदईक प्रात:काली जाणे. कागदपत्र सर्व सिध जाले आहेत परंतु उदईक जाणे ऐसे चोपदाराबराबर आम्हास सांगोन पाठविले. आम्ही लस्करास येणार. सुरंजामाचा गाडा जलदीने पावणार नाही यास्तव सामानाचे गाडा भरून पुढे रवाना केला. गाडा दरवाज्याबाहेर निघाला. तो फिरून दरवाज्यावरून मोगलाची माणसे जाऊन मावारा फिरून आणिला याचा विचार काये तो पुर्ता कलो आला नाही. समई याजप्रमाणे प्रकार घडला यास्तव आज राहाणे जाले. येविसीचा भावगर्भ काये असल तो उदईक कलेल. उदईक जाणे म्हणून सांगोन पाठविले आहे. त्यास उदईक येतो. येऊ न देत तर काये प्रकार दिसोन येईल त्याप्रमाणे आपणास लेहून पाठऊन. येथे इंगरजाचे प्राधान मोगल त्याचे ताबे आहेत. इंगरजाकडून कौसलदार दरबारास मोगलाकडे येऊन काये मसलत करून राहाविले हे समजत नाही. आम्ही यावयाकरिता तर्तूद करावयासी आलस करीत नाही. परंतु निर्वीउपाये यांचे प्रकार (?) लिहावे. आलीकडे खूळ जाल्यापासोन आपले पक्षास खातरेत आणीत नाहीत. साष्टीवर मोहीम केलीच आहे. त्याचें निवारण अद्यापि जाले नाही तेव्हा दुसरा आर्थ चितात कसा आणितात? सांप्रत याचे चितात विशम दिसतें भेटी अंती सविस्तर निवेदन करून. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The writer (Dattaji Narayan) regrets that he is delayed owing to the dilatoriness of the Nawab who first agreed to allow his Vakeel to accompany the writer but who tried to put it off on some plea or other. He is therefore—he says—sending his things and will soon follow when the Vakeel is ready to accompany him. He refers to the great influence the English wield at the Court of the Nawab.*

No. 101] [*Dec. 1774?*

श्री

+विनंती विशेष. आपण पूर्वी पत्र लिहिले तेथें लिहिलें होते की, नरोतम हस्तगत जाला नव्हता तेव्हा लोक तुम्हास हासत होते; हाली काये म्हणतात? त्यास बद्नक्ष पाहून भाषण करीत होते. श्रीमंताचा नक्ष व इब्रत सर्वत्र आहेच. त्याप्रमाणे आपणा येश या स्थली प्राप्त होऊन इब्रत फौजेची बसावी हे इच्छा धरून आपणास विनती करीत होतो. ईश्वरकृपेने आपण आमचा मनोदये

+ पत्र दत्ताजी नारायण यांचें.

सिधीस पाववीला येणेकरून बहुत समाधान. आज ताा श्रमाचे दिवस 'काढिले त्याचे त्याचे विस्मरण जाले. याउपर येथील ग्रहस्थाचे पारपत्य येथास्तित होऊन येई हे इच्छा धरितो. ईश्वरकृपेकरून हेहि इच्छा पूर्ण होईल तो सुदिन हे विनती. नालदबे व मेणा पाा म्हणून लिाा त्याचे उतर पेशजी लिाा आहे. येथे बाजारात. पुणियाप्रमाणे मिलत नाहीत. नालबंद येथील आहेत तेच नालमेख लोहार येक आहे त्याजपासोन करऊन तेच नालबंदी करितात. दुसरेयास देऊ देत नाहीत. त्याचा इजारा आहे यास्तव लोखंड बाहेर नेऊन परगणियाचें लोहार आणऊन नाल मेख तयार करवावे ते सोईस पडतील हे विनंती. पालखीचे व झालरी सरंजाम तयार करविला आहे तो आला म्हणजे राा करून हे विाा.

¶*Dattaji Narayan compliments Naropant Keskar on his success over Narottam of Hasot.*

No. 102] *[1774*

[पहिला बंद गहाळ.]

२

श्रीमंत नानाचे सेवसी

वाचलो.+ त्यास आता तो आपण व बापू हे मजला वडील. उभयेताचे पाये कैसेहि येकदा मजला दिसावे हे च्यातकन्याये आहे. याचा साक्ष श्रीहरि आहे. स्वधर्मावर पुन्यावर आपन उभयेतानी मसलत उचलली, श्रीहरि याचा सेवट करीलच यांचे जे विभागी काया-वाचा-मने आसतील त्यांच श्रीहरि उतम करील. आनि जे नसतील त्यांचा येहपर उतम होनार नाहीच. त्यास मसलतीचे आरंभी प्रथम मामाजवळ मी आहे. ते वेळेचा जो प्रकार तो तिघा जनाचे मातबराचे साक्षीने सांगेन आगर आपरोक्षि आपन पुसावा. त्यावर मग मी नाहीसा जालो. हे मी काये लिहू ? परंतु उतम आचेरण केले त्याचे फळ उत्तम होईल. मधे ग्रहदशा आनी मामा गेले यास उपाये नाही, त्यास विस्तार काये ल्याहावा ? श्रीमंत बापूचे पत्री मजकूर येथील कचा जो आहे तो लिहिला. श्रेमास आळस करणार नाही. परतु येथील कामाची खराबी हे आपणास कोन लिहिलेच नाही. मी ल्याहावे तर तर आपले कारभाराकरिता आगर कसेहि कारभारात सिरावयाकरता लिहितात हे चिलात येईल. परंतु मी तात्यास बरानपुरावर साफ सागितले होत आनि येथून

+ पत्र दिवाकर पुरुषोत्तमाचें.

साफ लिहिले होत. यासहि अंतर केले नाही. दवलतकरण सावधाइ आनि समये कसा, देशकाल जानून जलदी आगर आळस करावा ते काहीच नाही तूर्त पेच. आमनेरावर सेनाधुरंधर आलेत आनि येथे येक मनुशाचा आला नाही. मोकाबला पंचेवीस कोस राहिला. याची तजवीज आपण तेथून करावी. सात आठ हजार फौज आगर ज्याबतजेग वराडात जलेद दर मजल यावा. नाहीतर येजमानाची यासी येत (?) सिपाईगिरी त्याहीवर सेनाधुरंधर व याची जागा नास होता विलंब नाही बाबूरावजी सर्व लिहितील उभयेता बधू येक (अपूर्ण)

¶*This fragmentary letter of Divakar Purushottam gives the good wishes of the writer for the successful undertaking of the Barbhais.*

No. 103] [*1-1-1775*

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यांस

(७) अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत असिले पाहिजे विशेष. पूर्वी तुम्हास पत्र लिहिले आहे कीं श्रीमंत राजश्री दादासाहेब चापानेरास आले. त्रयोदसीस मंदवारी राजश्री गोविंदराव गाईकवाड भेटीस सुक्रवारी रात्रौ भेटीस जाणार म्हणऊन लिहिलें होते. त्यास तो बिचार न ठरला. मग श्रीमंत राजश्री दादासाहेब मार्गसीर्ष वद्ये १३ मंदवारी बडोदियापासून गाव मौजे कोटंबी प्रा वोघोडे येथे येऊन मुकाम केला. त्रयोदसी मंदवारी संध्याकाळीं राजश्री गोविंदराव गाईकवाड हजार स्वार व चिरजीव राजश्री मल्हारव गाईकवाड यैसे गेले. आमचे पित्रव्य व त्याचे कारभारी राजश्री कुसाजी सिंदे यास लस्करात ठेऊन गेले. रात्रौ इष्ट ठरलिया भेटी घेणार. श्रीमंतासमागमें फौज थोडकीच आहे तेहि थकली आहे. मालव्याचा घाट चढले त्यादिवसापासून नवे दिवसीं चांपानेरास आले. विसा पंचविसा कोसाच्या मजली करीत आले. तेणे-करून मनुष्ये घोडे मृतप्राये जाले आहे. पाठीमागें सिंदे होलकर व राजश्री हरिपंत फडके यैशा फौजा आहेत परतु लांब आंतर त्यासी व श्रीमंतासी पडले आहे. परतु त्या फौजा सत्वरच येतील. यास्तव तुम्हापासी जितकी फौज आसेल तितक्यानसी तुम्ही व राजश्री गबाजी बलाळ यैसे स्वार होऊन येणे. राजश्री जनार्दन रायाजी व्याऱ्याचा बंदोबस्त करून माघारे आले आसले तर त्यासहि

घेऊन येणे. उतमच जालें. कदाचित ते आले नसले तर त्यांची वाट न पाहाणे. ते मागाहून येतील परतु तुम्हापासी जे सामान आसेल तितकेच घेऊन रेवातिरास येणे. रोजची रोज तुमचे वर्तमान आम्हास व आमचे तुम्हास कले ऐसे करणें. इकडील वर्तमान वरचेवर आम्ही लिहीतच आहो. परतु तुम्हाकडील ल्याहावयावयास आलस न करणें. सुरतेचा बंदोबस्त काही बाकी राहिला आसिला तर पुढे करूं परतु पत्र पावतांच श्वार होऊन येणे. राजश्री बापू व राजश्री नाना फौजसुधा पिंपलनेरासमीप आले ऐसे वर्तमान कनिष्टाच्या लस्करांत उठले आहे. यास्तव उभयेतास पत्र लिहिली आहेत. तुम्ही पत्रें लेहोन रवाना सत्वर करावीं. याउपर दुसऱ्या पत्राचा मार्ग न पाहाता कूच करून लांब लांब मजली करून रेवातिरास येणे तो इकडीलहि वर्तमान कलेल. येथून लेहो त्याप्रा करावयास येईल. र्‍हा छ २८ माहे सेवाल बहुत काये लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad to Naropant Keskar communicating the movements of Raghunathrao and of his pursuers and asking the addressee to hasten to his assistance to oppose the forces of Raghunathrao.*

No. 104] [*2-1-1775*

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यांस

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत आसिले पाहिजे. विशेष. श्रीमत राजश्री दादासाहेब दाहा हजार फौज व गाडदी हस्ती डेरे दांडे व बाजार बुणगेसहीत मार्गेश्वर वद्य आमावाशा रविवारी बडोदिया नजीक मुकाम केला. पुढे कर्तव्यार्थ तो सविस्तर राजश्री गबाजी बलाल व राजश्री जनार्दन रायाजी व राजश्री गोविंद वासुदेव यांचे पत्री लिहिला आहे ते ध्यानास आणून फौजसुधा रेवातिरास सत्वर यावे. आनमान न करावा. आपले आगमन फौजसुधा जालिया बहुत उपयोगी पडेल. यास्तव जलदीने यावे. उभयेता कारभारी व राजश्री भीवरावजी यास पत्रे लिा आहेत. ते आवलोकन करून आपणहि पत्रे त्रिवर्गास ल्याहावी आणि सत्वरच लाख जोडी बरोबर रवाना करावी. आम्हाकडील कारकून राजश्री राघो बावाजी व राजश्री भिकाजी लक्ष्मुमण लस्करात पावले नसले तर राजश्री भीवरावजीस सूचना ल्याहावी की उभयेता कारकनास

अम्ही पत्र लिा आहे ते उभयेता कारभारीयास वाचून दाखऊन फौजा सत्वर या प्रांते येत तो आर्थ करावा व फौजा रवाना केलियाचे वर्तमान आम्हास सत्वर प्रविष्ट होये यैसे करावे. यैसे आगत्य ल्याहावें. वरचेवर आम्हाकडील पत्रे येऊन आपल्यास वर्तमान कलेल. आपणहि पत्राची उतरे सत्वर पाठवीत जावी. रा छ २९ माहे सेवाल बहुत काये लिहीणे लोभ करावा हे विनंती.

¶Fatesing Gaikwad reports to Naropant Keskar that Raghoba has arrived near Baroda and asks him to lose no t me in jcining him (the writer).

No. 105] [*4-1-1775*

श्री

राजश्री नारोपंत गोसावी
यांस

ॐ अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्रो फतेसिंगराव गाईकवाड दडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत आसिलें पाहिजे. विशेष. श्रीमत राजश्री दादासाहेब बडोदियास आले हे वर्तमान तीन च्यार पत्रीं वरचेवर लिहिले आहे. तुम्हापासी जितकी फौज आसेल तितक्यानसी रेवातिरास येणे म्हणऊन लिहिले, परतु तुम्ही तेथून कूच केलियाचें वर्तमान लिहिलें नाही. या उपर तुम्ही सत्वर कूच करून पत्र पावताच श्वार होऊन यावे. रेवातिरास आलिया मग जसें लेहों तसें करावयास कार्यास येईल. तुम्हापासीं थोडकें सामान तेवढ्यानसीं कसें यावें यैसा विचार कराल, न करावा. इकडील फौज रेवापार येत नाहीं. यास्तव तुम्ही सत्वर कूच करून रेवातिरास येणें. येविसी संशये येकरूप न धरणें. राजश्री जनार्दनपंत मागाहून येतील. इकडील वर्तमान तर श्रीमंती आम्हाकडे खिजमतगार व कारकून पाठविले होते कीं भेटीस येणें. तुंम्ही सागाल तेणेंप्राा मान्ये होऊन सनदा देऊं. अंतस्ते घाटितात कीं हला करून स्थल घ्या(वे). हाहि विचार खरा. दुसरे दगा करून धारेचा किला घेतला, तेथे कुटुंब ठेविले, तैसेहि बनल्यास करावे हाहि हेत खरा परतु श्रीसतेनें घडेल तें खरे. परतु तुम्ही तेथे राहिल्या कनिष्ट वर्तमान उडवितात कीं वसई व माहीम व साष्टी श्रीमंत इगरेजास दिल्ही. त्यानीं वसईकडे दंगा केला यामुलें फौज सुरत माहालांत आली होती ते वसईकडे जाणे म्हणऊन कारभारी यांचीं पत्रें आलीं त्याजवरून फौज वसईस गेली. यास्तव तुम्ही श्वल्प सामानानसी रेवातिरास आलेस म्हणजे शह बसेल. मागाहून राजश्री जानर्दन रायाजीहि

सत्वरच येतील चिंता नाहीं. दुसरे प्राा जंबूसेर व आमोद येथे श्रीमंताचे कमाविसदार गेले. राजश्री आपाजी गणेश यांसहि भेटीस बोलाविलें आहे. येतील न येतील हे न कले. प्राा डबईचे कमाविसदार व किलेदार यासहि पत्रें लेहोन भेटीस बोलाविले आहेत. त्याचा कारकून आम्हास पुसावयास आला होता. त्यास आम्ही सांगितलें आहे की आपली फौज ये तोंवर दम धरणें. यास्तव तुम्ही सत्वर रेवातिरास आलिया त्यासहि धीर होईल आथवा त्यानीं आंत घेतल्यास दोन च्यारसे श्वार पाठऊन तेथील बंदोबस्त करावयास कार्यास येईल. तेहि कार्य मातबर व नाजूक आहे. यास्तव जलद आलिया उपयोगी फार आहे. जागा जागा कमाविसदार पाठविले. डबई घेऊन राजश्री गोविंदराव गाईकवाड यांस कबिला ठेवावयास स्थल देणार, हे वर्तमान आगत्य कारभारी यास ल्याहावें. ता छ १ माहे जिलकाद बहुत काये लिहीणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad to Naropant Keskar communicating the troubles started by Raghunathrao and asking him to come immediately.*

No. 106] [*4-1-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे

सेवेसी

पोष्य गोविंद रघुनाथ व दताजी नारायेण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ १ माहे जिलकाद बुधवार प्रातःका(ल)पर्यंत आपले कृपेकरून येथास्तित असे. विशेष. आपण पत्र पाठविले ते काल संधाकाली पावले. तेथे लिहिले की, श्रीमंताच्या व राजश्री गोविंदराव गायेकवाड याच्या भेटी जाल्या. यामुले येथे मोकाम उपयोगी नाही यास्तव येथोन कूच करून रेवातिरास मोकाम होईल म्हणून लिहिले ते सविस्तर कलले. आपण लिहिले ते प्रमाण. ऐसियास आपले पत्रापूर्वी श्रीमंताचे वर्तमान काल प्रातःकाली येथे आले त्यावरून आपणास पत्र लेहून मुजरत सरकारचा जासूद आपणाकडस पाठविला तो पावलाच असेल. असो. जे समई जसा प्रसंग घडोन आला त्याप्रमाणे करावेच लागेल. त्वरा करोन तुम्ही आपला जाबसाल, त्याची समजुती व आपले कार्य घडोन येई ते करणे. त्यास हे लबाड, सुप्रवृत्तीने जाबसाल करितील ऐसे पहिल्यापासोन याचा मनोदये नाही. आ(ता) तो बखेडा श्रीमंताचे आलियाचा त्यास दिसोन आला. काल त्रितीये प्रहरी आम्हास बोलाऊन नेऊन जाबसाल

करावा यैसा प्रकार होता. त्यास हे वर्तमान आलियावर कालचा दिवस घालविला. याप्रमाणे याचे फैल आहेत. हाली आपणास तो कूच करून रेवातिरी जाणे प्राप्त जाले आणि गेलेच पाहिजे. हे वर्तमान आइकोन पुढे कोणता मनसबा करितील हे न कले. असो. आपले आज्ञेप्रमाणे तूर्त सामदाम आपले कार्य घडोन येईल आणि त्याची समजुती होय त्याप्रमाणें जाबसाल करितो. मग घडोन येईल ते खरे. आपणास लेहून पाठऊ. यैसे असता येथास्तित घडोन न आल्यास चिंता काये आहे? श्रीमंताचा पुण्यप्रताप समर्थ आहे. श्रीमंत या प्राती आले यामुले सरकारतर्फेच्या फौजा चाकरीस येतीलच. ते समई सर्व मनोदयानरूप घडल, चिंता नाही. आताच वर्तमान आले की, श्रीमंतासमागमे दाहा हजार फौज व सोला हती आहेत म्हणून कासी(द) आला त्याणे मोगलाकडील वर्तमान सागितले व मागाहून सरकारच्या फौजा येतात हेहि सागितले. सिसे दोन मण तूर्त पाठवणे. राहिला जिनस मागाहून पाठवणे म्हणून लिहिले. सिसे दारूची बंदी फार आहे परतु येत्न करून तजविजेने बाहेर काढून गाडा भाडे करून कामरेजस पावता करितो. आपण कामरजकर कमाविसदार यास पत्र पाठवावे की सिसे सुरतेहून येईल त्यास गाडी देऊन जेथ लस्करचा मुकाम असेल तेथे पावते करणे. याप्रो पत्र पाठवावे. साष्टीचे वर्तमान अद्यापि तथ्य आले नाही. आलियावर लेहून पाठऊ. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶Naro Anandrao is informed of the developments in the affairs of Gujarat especially with reference to the relations between Raghunathrao and the Gaikwads and also of the possible changes that will have to be made in the line of action to be followed there.

No. 107] *[14-1-1775*

श्री

श्रीमत राजश्री नाना स्वामीचे
सेवेसी

पोष्य गोविंद रघुनाथ व गंगाधर रघुनाथ व दताजी नारायेण कृतानेक साष्टाग नमस्कार व दंडवत विनंती. येथील वर्तमान छ ११ माहे जिलकादपर्यंते मुा कामरज यथास्तित असे विशष. आपण पत्र पाठविले ते काल भृगुवारी संध्याकाली वराछियासी पावले. श्रीमंताकडील कारकून सुर्तेस आले आहे, येविसीचा मजकूर लिहिला तो सविस्तर कलला. त्यापूर्वी आम्ही उभयता सुर्तेस असता जलमार्गे भडोचहून कारकून सुर्तेस आलियाची बातमी आम्हास आलीच होती, परतु कोण ठिकाणी येऊन उतरले हे ठिकाणाचा शोध लागला नव्हता. शोध

मनास आणिता भडोजेस होडीत बसोन इग्रजाचे वाडीत जंगी बंदरात उतरले हे ठिकाण लागले. दोन दिवस गुप्तरूप होते, यास्तव सदेहात- होतो. त्याजवर येविसीचे पत्र आपण राजश्री गंगाधरपंत यास येविसीचा मजकूर लेहून पाठविला. त्यावरून मारनिले याचेहि पत्र सविस्तर आम्हास येऊन पावले. त्यावरून निश्चयात्मक होऊन आमची माणसे नजरेने पाहून आली. आम्हासी बदमामली करावी, करणार, हे बातमी आम्हास गुरुवारी प्रहर रात्रीस कळली. त्यावरून आम्ही शुक्रवारी तापीस्नानाचे निमित्य करून आम्ही उभयेता व राजश्री कृष्णराव यैसे त्रिवर्ग प्रातःकाली स्वार होऊन सडे पण घोडी मात्र घेऊन प्रहर दिवसास वराछियास आलो. तेथोन आज मंदवारी प्रहर दिवसास कामरजेस स्वामीचे आज्ञेप्रो आलो. येथे राजश्री गंगाधरपंत होते त्याची भेट जाली. नंतर राजश्री गोविंदपंत आणा याचीहि भेट जाली. मोगलाकडील जाबसाल म्हणता साल मजकूरचे यैवजाची मात्र रजा जाली. त्याचे वसुलास येक मास पाहिजे. मोकातीचे यैवजाविसी व कलमबंदीचा जाबसाल करून घ्यावा येविसी बहुत येत्नामध्ये जाबसाल करीतच होतो. परंतु श्रीमंतांचे येणे बडोदियास जाले. सरकारच्या फौजा पाठीवर नाही. गुजराथ प्रांती श्रीमंतानी आपली ठाणी बसविली ही पत्रे सावकारी आलियावर आमचे जाबसालास दिसगत काढो लागले. मोकातीचा यैवज द्यावा कलमबंदीचा फडशा करावा यैसे नाही. हे पुर्ते वर्तमान दिसोन आले. येविसीचे जाबसालास, च्यार दिवस राहून करून घ्यावा तर श्रीमंताचे कारकून येऊन पोहचले. आम्हासी बदमामली करणार हे पुर्ती बातमी कलली. यावर शहरात राहाता न ये. हे चितात आणून सर्व जाबसाल सोडून निघावे लागले. निघोन वरासियास आलो तो आपलेहि पत्र पावले की निघोन येणे. त्या प्राच आलो. आम्ही निघोन आलियावर मोगलास व इंगरजास नरोतम याचे पुत्रास कलले. त्यावरून आम्हाकडील चोपदार यास बोलाऊन त्याजवर मोगलाने फारच हंगामा केला. याचे कारण इंग्रजास वर्तमान कलले. त्यावरून इंग्रजाने मोगलास सागोन पाठविले की, हा प्रकार कसा घडो दिधला? यास्तव लौकिकार्थ आमचे चोपदारावर फार कोपायेमान होऊन सिवीगाल केली. बेआब्रू केला नाही. आम्ही प्रातःकाली निघालो नसतो तर प्रहर दिवसास आम्हास हस्तगत इग्रजाने करवावे यैसा प्रकार घडला होता, परतु श्रीमताचे पुण्यप्रतापे व आपले कृपेकरून निघोन आलो. बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Naro Anandrao is informed how the writers foiled the attempts, made by Raghoba, to capture them.*

---

१ मक्का.

6028

No. 108] [5-1-1775

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो आनंदराव गोसावि यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार मुा खमस सबैन मया व आलफ. तुंम्ही फौजसुधा कोणे ठिकाणी आहा? काये वर्तमान? तिकडील कामेकाजे बंदोबस्त करावयाची तुम्हास आज्ञा होती त्याचे कस कसें हे काहीच लिहिलें नाहीं. यावरून तुमचे कर्तुत्वास काये म्हणावें व हे रीत काये कामाची? याउपरी सविस्तर वर्तमान हुजूर लेहून पाठवणे. इकडील वर्तमान तरी तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब मालव्यात गेले. पाठीस राजश्री तुकोजी होलकर व माहादर्जी सिंदे व हरि बलाल पंचवीस तीस हजार फौजेनसी लागलेच आहेत. प्रस्तुत तीर्थरुपाचे जाण्याचा रोख गुजराथचा दिसतो म्हणून बातमी आहे. त्यास तिकडे जातात तेव्हा राजश्री गोविंदराव गायकवाड याचे भरवशावरी, दुसरा तिकडे जाण्यास आश्रा आधार नाही. त्यास ते तिकडे येतात न येतात याची बातमी राखून बहुत खबरदारीने असणे. इंग्रजासी बिघाड जाला याजकरिता सुरतेकडील बंदी करावयाविसी पेशजी तुम्हास येक दोन पत्रे सादर जालीच आहेत. त्याप्रमाणें तो बंदोबस्त करीत असिल्यास तिकडे तीर्थरूपाकडील पेच पडावयाचा नाही. हरि बलाल फौजसुधा त्याचे पिछयावर आहेत. त्याजकडेहि तुम्ही आपलेकडील सविस्तर वर्तमान लिहून पाठवणे. जर त्याणी तुम्हास आपलेकडे बोलाविले तरी त्याजकडे जाणे. बातमी राखणे. वरचेवरी वर्तमान हुजूर लिहिणे. गोविंदराव गायकवाड दादासाहेबास मिळून ते ते पुढे चालल्यास तुम्ही सुरतेकडील पेशजी लिहिल्याप्रमाणे बदीचे वगैरे कामास दीड दोन हजार फौज ठेऊन वरकड फौज सुधा तुम्ही हरि बलाल फौजेनसी त्याचे पाठीवरी आहेतच त्याजकडे जाऊन मिलणे. जाणिजे. छ २ जिलकाद आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa to Naro Anandrao asking him to be on the look-out for Raghoba who is proceeding to Gujarat to join Govindrao Gaikwad and not to relax the blockade of Surat. He further says that Raghoba is already being pursued by Hari Ballal accompanied by Sindia and Holkar and enjoins upon the addressee to join the latter.*

No. 109] [5-1-1775

श्री

राजश्री नारोपत गोसावी
यांस

॰ अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्रो फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष,

6029

राजश्री हरिपंत फडके धारेआलीकडे आले. तेथून छ २४ सवालची पत्रे आली. मौजे नाणसे धारे आलीकडे आठ कोस आहे म्हणऊन जासुदाने जबानी सागितले. राजश्री जयेवतराव यानी तुम्हास पत्र लिहिले आहे तेंच बजिनस पाठविलें आहे त्याजवरून सर्व आर्थ कलो येईल. सारांष आपल्यास पाच पत्रें लिहिलीं की सत्वर कूच करून रेवातिरास फौजसुधा यावे परंतु येकहि उतर आपले न आले हे आपूर्व आहे. याउपर तऱ्ही पत्र पावताच कूच करून सत्वर यावें. आनमान न कीजे. विशेष लिहिणे उपरोध आसे. रा। छ २ माहे जिलकादे [शिक्का] बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad expresses his exasperation with Naro Anandrao for not replying his urgent messages.*

No. 110 [6-1-1775

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी

पो कोनेर रघुनाथ कृतानेक सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २ माहे जिलकाद मु॥ ठाणे सचीण पा। सत्रागाव जाणौन स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. इकडील वर्तमान येथास्तित आसे. साष्टीकडील वर्तमान सुरतकर इंगरजाचे घरीचे वर्तमान साष्टीचा किला घेतला म्हणौन आफवा उडविली आहे. साहुकारी लिहिले कोण्हाचे आले नाही. त्यावरून खोटे वर्तमान आहे यैसे आहे. मागाहून दुसरी बातमी आल्यावर आपणाकडेस लिहून पाठऊ. श्रीमंत दादासाहेब बडोद्यास आले. उभयता गाईकवाड श्रीमंतास भेटले म्हणौन वर्तमान यैकतो, ते पत्री लिहिले पाहिजे. श्रीमंत बापू व हरिपंत फडके हे कोणे स्थली आहेत ? बडोद्याकडील विचार याउपर काये आहे ते सविस्तर वृत लिहून तोषविले पाहिजे. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

¶*Koner Raghunath enquires about the outcome of the meeting between Raghunathrao and the Gaikwads.*

No. 111] [*7-1-1775*

श्री

श्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

सो बहिरो रघुनाथ मेहेंदळे मुा बेलापूर साष्टाग नमस्कार विनंती. येथील कुशल तागाईत छ ४ जिलकाद जाणौन स्वकीये कुशल ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. साष्टी इगरजाने घेतली याचे वर्तमान आपणास कळलेच असेल. येणार यैसे वर्तमान होते, त्याअन्वये सरकारच्या सनदा दोन आपलेकडे बंदीविसी रवाना जाल्या आहेत की सुरतेस पायबंद देवोन जरबेची बंदी करावी त्याप्रो आपण केले असेल. सरकारचे कासिदाबराबर आमचीहि पत्रे स्वामीस आहेत. प्रस्तुत सरकारात बातमी आली आहे की, इग्रेजास साष्टीस सुर्तेहून मदत येणार. लडाईचे सामानाची तर्तुद होत आहे. त्याजवरोन आम्हास निकडीने आज्ञा जाली आहे की, तुम्ही हजार पाचशे माणूस नवे देऊन मारानिल्हेकडे जलद जावोन ते व तुम्ही येक विचारें रस्ते बंद करोन शहरची बंदी यथास्तित करावी. शह चांगला द्यावा. इग्रेजाकडे मदत येऊन न पोहेचे येविसी आपणास व गाईकवाडास व माहालकरी यासी ताकीदपत्रे आहेत. मीहि जलदच सेवेसी येऊन पोहोचतो. भेटीनंतर सविस्तर विदित होईल. सरकारकामाचे लक्षाप्रमाणे स्वामीनी कार्य केलेच असेल. मलाहि निकडीने आज्ञा आपणाकडे जावयाची जालेयावरोन निघोन बेलापुरास आलो, तो इतकेयांत साष्टीचे वर्तमान या प्रकारें जालें. त्यावरोन सरकारात विनंतीपत्र लिहून पाठविले होते. पुन्हा आज्ञापत्र आपणास व आम्हास सादर जाले आहे की, साष्टीस मोर्चेबंदी करावी लागते, तरी तुम्ही उतमप्रकारे पूर्वीचे आज्ञेप्रमाणे बंदी शहरची करावी. ते आज्ञापत्र व पूर्वीचे आज्ञापत्राची नकल सेवेसी पाठविली आहे त्याजवरोन कलेल. साराश सरकारचे लक्ष आधी हे काम करावे. गाईकवाडाकडील मसलत राहू द्यावी. आपण तो केलच असल. मी येथील बंदोबस्त जाला म्हणजे निघोन येतो. आमचे कारकून शहरात आहेत त्यासी आणवावे, म्हणजे बंदीची माहीतगारी निवेदन करितील. तिकडे शह बसला म्हणजे इंग्रेजाकडे कुमक येऊ पावणार नाही आणि आपला लौकिक होऊन सरकारचे काम होईल. मोगलाई अमलाची जफ्ती माहाली अमल आहे त्याची कर्णे, त्यांजविसी गाईकवाडास माहालकरी यासी सनदा घेतल्या आहेत. समागमे घेवोन येतो. आल्यानंतर माहीतगिरीने अपल्ये विचारे बंदोबस्त होईल. सारांश सरकारचे आज्ञापत्र पावताच उतम प्रकारे बंदी होय ते केले पाहिजे. तेथील सरकार चौथाईचा अंमल आम्हाकडे आहे.

येशास सालमजकुरी नरोतम किशोरदास याणे श्रीमंत दादासाहेबाच्या सनद आणोन बखेडा केला आहे. त्याजविसी पूर्वी विनंतीपत्र आपणास लिा होते त्याजवरोन ध्यानात आलेच असेल. त्याप्रमाणे बंदोबस्त होऊन अमल आपणाकडे चालला पाहिजे. मोगलाकडे सरकारी यैवज पनास साठ हजार पर्यंत यैवज येणे आहे. तोहि वसुलात आला पाहिजे. येविशी शहरांत कारकून आमचे आहेत त्यास पत्र लिहून पाा आहे. पावते करविले म्हणजे सेवेसी येऊन हाजीर होतील. सहश्रप्रकारे हाजीर जालेच असतील. नरोतमास आपण कैद करोन बिडी घातली म्हणौन सरकारात वर्तमान आले, परंतु आपले लिहिले आले नाही त्याजवरोन आपणास सरकारातोन लिहिलेच आहे. तिकडील गायकवाडाकडील वगैरे वर्तमान ल्याहावयासी आज्ञा करावी. लस्करचे वर्तमान तिकडोन कलतच असेल. हालीं साष्टीवर मोर्चेबंदी होणार. टोपीकराचे पारिपत्य बरे वजेन होणार येविसी सरकारचे लक्ष बहुतच आहे. मुंबईची बंदी जाली आणि लौकरच पारिपत्य होईल. तोफा व गाडदी वगैरा फौजा फारच रवावनगी होत आहेत. इतकेयात आपणाकडील बंदी जालेयाचे वर्तमान आलेयाजवर फार संतोष होईल. सरकारचे जासूद सनद घेवोन आले तेच बाजिनस स्वामीकडे रवाना केले आहेत. सरकारचे उतर व पत्राचे उतर पाा पाहिजे. उतर लौकर पाठविले पाा. बहुत काय लिा लोभ करावा हे विनंती.

¶*Bahiro Raghunath communicates to Naro Anandrao the Peshwa's instructions regarding the blockade to be effected round about Surat and to stop succour being sent to the English at Salsette from Surat. He congratulates the addressee for having captured Narottam and requests him to write what steps he has taken in collecting the dues from the province.*

No. 112] *[8-1-1775*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य

राजश्री नारो आनंदराव गोसावी यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सबैन मया व अलफ. तुम्ही छ २० सवालची पत्रे राजश्री भिवराव येसवंत यास पाठविली ते पावली, लिहिले वर्तमान सविस्तर विदित जांहाले. नरोतम किशोरदास यास धरून बेडी घातली म्हणौन लिा ते सर्व कलले. मोठे काम केले. त्यास विसा सेराची बेडी घालून खबरदारीने ठेवणे. किले त्रिंबकास पोहचाविल्यास फार उतम आहे. जेथे ठेविला असाल तेथून चौकसीने त्रिंबकास पोहोचवणे. कदाचित न पोहचे

6032

तर तुम्ही आपणाजवळ मा^१^फजतीने खबरदारी करून ठेवणे. तुम्ही सुरतेची बंदी करून गायिकवाडाकडील माहालचा यैवज वसूल घेणे. तीर्थस्वरूप दादासाहेब मालव्यातून गुजराथेस आले. त्यास गोविंदराव ते येक होतील तर राजश्री हरि बलाल व उभयता सरदार याच्या भेटी जाहाल्या, ते त्याचे मागाहून येत आहेत, आलेच असतील. त्याचे आगोधर तुम्हावर त्याची फौज आलियास तुम्ही बातमी राखोन टाला देणे. हरि बलाल याजवळ काम पडिले आणि त्याचे पत्र आले तर त्याजकडे जाणे. येथून दोन तीन हजार फौज तुम्हांकडे पाठविली आहे. लौकरच येऊन पोहचेल. हरिपंत जवल आसिलियास त्याजकडे जातील. नाही तर तुम्हापासी राहातील. सास्टी इंग्रजाने घेतली. याउपर पुढे काय करितो हे बातमी राखोन वरचेवर लिहीत जाणे. तीर्थस्वरूप दादासाहेब इंग्रजाचे घरीं आले तर मोठे कामच जाहाले. तेच ठिकाण धरावयास येईल. सुरतेची बदी तुमच्याने होईल तितकी करणे. आजपर्यंत पाच सात पत्रे तुम्हाकडे पाठविली परंतु उतर येकहि आले नाहीं. वर्तमान वरचेवर लिहीत जाणें. +त्रिंबकास पाठवावयास लांब पडिले तरी पारनेरा किला विसाजी केशवाकडे आहे तो सुरतेजवल आसपास आहे तेथे ठेवणे. जाणिजे छ ९ जिलकाद बहुत काय लिहिणे.

¶The Peshwa after congratulating Naro Anandrao for effecting the capture of Narottam Kishordas instructs the latter to send the prisoner to the fort of Trimbak with heavy chains. He also informs that Dadasaheb has descended into Gujarat with Sindia, Holkar and Haripant hotly pursuing him.

No. 113] [*8-1-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत दाजी
स्वामीचे सेवेसी

सेवक हरि उमाजी कृतानेक सा। नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ता। छ ९ जिलकादपरियेंत येथास्थित आसो विशेष. आपण कृपा करून पत्र पाठविले ते पावले. सविस्तर वर्तमान कलले. श्रीमंत राजश्री दादासाहेब येथे आले. रा। गोविंदरावबावा याच्या त्याच्या भेटी जाल्या. कोसाच्या आंत्रे राहिले आहेत. समागमे फौज बुनगेसमेत दाहा हजारपरियेत आहे. आमची बातमी त्याजला कलली. त्याणी आम्हास धरावयाचा येत्न केला होता. त्यास आम्ही पेशजी

१ काळजीपूर्वक. + या पुढील मजकूर सखाराम बापूच्या हातचा.

येथे आलो ते समई रा गोविंदरावबावा याजपासून बाहदर[+] घेऊन मग लस्करात आलो. याजमुळे आम्ही स्वस्त होतो. साहेबानी आम्हास धरून कैद करावे हे त्याचे मानस व त्याच्या कारभारियाचे मानस होते. रा गोविंदराव याजला सांगितले. त्याणी सांगितले की याणी आम्हापासून बाहदर घेऊन राहिले, त्याजला बोलता येत नाही. मग रा गोविंदरावबावा याणी लस्करात जाऊन सांगितलें. त्यावरून त्याणी आम्हास भेटीस बोलाविले. आम्ही लस्करात जाऊन भेटलो. त्याचे मुत्सदी रा सखाराम हरि व आबाजी माहादेव व सदासिव रामचंद्र वगैरे कितेक ग्रहस्त समागमे आहेत ते भेटले. आमचे समाधान केले. यावर आम्हास लस्करात श्रीमंत रा बापू व श्रीमंत रा नाना याजकडे जावे लागते. दो ती रोजानी येथून कूच करून आपली भेट घेऊन सर्व वर्तमान निवेदन करून जाऊ. रा हरिपंत फडके व सिंदे व होलकर यांच्या फौजा चालसा कोसावर आल्या. आपण बहुत सावध राहावे. यांचा व इंग्रजांचा विश्वास किमपि न धरावा. बहुत बहुत सावध राहावे. रो हरिपंत तात्या व सिंदे होलकर आले यामुळे तुम्हावरी येत नाहीत. परंतु सावध असावे हेच उचित. वरकड वर्तमान सेवेसी लिहलिया निवेदन् करू. सर्वज्ञास बहुत काये ल्याहावे हे विनंती.

¶Hari Umaji reports to Naro Anandrao his meeting with Dadasaheb in he camp of Govindrao Gaikwad and the efforts that he made to capture he writer. "Haripant and Sindia and Holkar are also drawing quite near" says he.

No. 114] *[9-1-1775*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य

राजश्री नारो आनंदराव गोसावी यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सबैन मया व अलफ. नरोत्तम किशोरदास तुम्हांकडे सापडला आहे, त्यास त्याजला पके बंदोबस्ताने वाटेचे खबरदारीने किले त्रिंबक येथे रा नारो माहादेव गजरे याजकडे पोहचावणे. ते न होये तरी किले पारनेरा येथे आटकेत ठेऊन तेथील अंमलदारास खबरदारी-विसी चांगली ताकीद करणें व तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब याजकडील कागदपत्र चिठ्या राजकारणी नरोतमदासाजवळ सापडल्या म्हणून लिहिलें. त्यास त्या चिठ्याच्या व कागदपत्राच्या नकला करून हुजूर पाठवणें. तीर्थ-स्वरूप बडोयाकडे आले आहेत त्याचे पाठीवरी राजश्री हरि बलाल फौजसुधा

+ बाहदर=जामीन.

आहेतच, त्याजकडे तुम्ही आपलेकडील वर्तमान व कोठे ठिकाणी आहा ते लिहीत जाणे. सुरतेची बंदी जरूर करणे. तीर्थरूपाकडील बातमी राखून खबरदारीने असणे. जाणिजे छ ६ जिलकाद आज्ञा प्रमाण. नरोत्तमदास मारास पारनेरावरून किले कोहज येथे राजश्री भिकाजी गोविंद याजकडेहि पाठविल्यास उतम आहे जाणिजे छ मार.

¶*The Peshwa instructs Naro Anandrao to send Narottam Kishordas to fort Trimbak with a strong escort. Hari Ballal has followed Dadasaheb to Baroda and the addressee is expected to keep in communication with Haripant.*

No. 115] [*9-1-1775*

पो छ ८ जिलकाद

पौष मास.

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत दाजी

स्वामीचे सेवेसी

पो हरि उमाजी कृतानेक सा नमस्कार विनंती. उपरी, येथील ता छ ६ जिलकाद जाणून स्वकीये कुशल लिहीत असावे विशेष. येथून जासूदजोडी श्रीमंत बापू व नाना याजकडे रवाना केली आहे. आपल्यापासी येतील ते समई दस्तक आपण करून देऊन त्याची रवानगी सत्वर करावी. मागाहून दो ती रोजानी आम्ही येऊ तेव्हा सविस्तर विदित होईल. आपण सावधपण राहावे. बहुत काये लिहिणे, लोभाची वृध्दि करावी, हे विनंती.

¶*Hari Umaji informs Naropant that two messengers have been despatched to Sakharam Bapu and Nana Phadnis and requests the addressee to furnish them, on their reaching him, with the necessary permits for their journey onward.*

No. 116] [*10-1-1775*

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यांस

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून स्वानंदलेखन करीत असिले पाहिजे. तुमचे पत्र छ २९ सवालचे व छ १ जिलकादचे यैसी दोन छ ९ जिलकादी

सध्याकाळीं पावली. लेखनार्थ सर्व ध्यानास आला. सुरतकर ग्रहस्ताचे पत्र आलें तें पाठविलें तेहि पावलें. तोच अर्थ भंडोचेस आमचे राजश्री राघो जिवाजी आहेत त्यानीहि लिहिला आहे. परंतु तिकडे जावयाचा आर्थ दिसत नाहीं. श्रीमंत ती कोसावर उतरले होते, ते काल पौष सुध ७ रविवारीं कूच करून बडोदियाचे उतरेस जेथे पूर्वी राजश्री गोविंदराव उतरले होते हरणीनजीक, तेथे येऊन मुकाम केला. ते या शहास गुंतले. पुढें विचारहि केला आहे कीं राजश्री हरिपंत फडके यांचा पराभव करावा हाहि हेत. ते जालियावांचून हे येथून उठत नाहींत यास्तव तुम्ही विचारितां की श्रीमंत सुरत मुंबईकडे जावयास आले तर यांच्या तोडावर आसावे. याजवरून दिसते की, रेवातीरी फौजसुधा तुम्ही राहावे, हा मनसुबा दिसतो. परंतु श्रीमंत येथून निवत नाहीत. यास्तव तुम्ही दुसरा विचार न करितां सर्व फौज [शिक्का] घेऊन बावाप्यारा, अथवा चाडोद करनाळी या दोही स्थली पार जाला आहे, दोहीतून तुमचे सोईस जे स्थली उतरायाचे येईल तेथे उतरून सावधतेनें सत्वर बडोदियास येणे. कदाश्चित लांब मजल कसी आटोपल यैसे म्हणाल तर मधे डभई मुकाम करावयास जागाहि आहे. परतु तेथे न जातां एक दिवस कसाला करून बडोदियास येऊन पोहोचणे होये तोच अर्थ जालिया उतम. दुसऱ्या पत्राची मार्गप्रतीक्षा न करिता सत्वर येऊन पोहचावे. राजापिपल्याच्या बंदोबस्ताकरितां गुंता कराल तर न करणे, ते काम दोन दिवस राहिलें तरी येईल. चिंता नाही. ते दंगा अथवा दुसरे काही करीत नाहीत. कर्नालीस मुकाम करून आसुदे होऊन आस्तमानी कूच करून माडवेवाले बरोबर घेऊन प्रहर रात्र आसतां येथे दाखल व्हावें. राजश्री गबाजी बलाल जातेसमई गेला आहे त्यास दखल आहे. येक क्षणाचा आवकाश न करावा. रा। छ ७ माहे जिलकाद बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad asks Naropant Keskar to proceed immediately to Baroda to face the mischievous activities of Raghunathrao and mentions the routes and fords by which the addressee should march.*

No. 117] *[12-1-1775*

श्री

पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी आपण नरोत्तमदास यांस धरून किले माहुली येथे पाठविला. तो किले मार येऊन पोंहचला. आम्ही येथून मामलेदारास ताकीद करून त्यास व त्याचे लेकास मोठ्या मोठ्या बेड्यां घालून किल्यावर निराले निराले ठेवावयाविसी

6036

तर्तूद करविली, त्याप्रमाणें अमलदारानी किल्यास ताकीद करून येकास किले मारावर व येकास त्याच किल्यावर भंडारदुर्ग आहे तेथे, याप्रमाणे दोहो जागा दोघास ठेऊन कोठडीत घालून त्याजबरोबरची माणसे दूर ठेऊन दुसरे लोक सरकारममतेचे चौकीस ठेविले असेत. तुम्हास कलावे म्हणोन लिहिले असे. तुम्ही नरोत्तमास धरिले मोठी गोष्ट केली. रा गोविंदराव गायेकवाड याची फौज कोणीकडे गेली ? राजश्री फत्तेसिंग गायेकवाड कोठे आहेत ? आपल्या फौजा हरीपंत तात्या व रास्तें व वामनराव व सिंदे होलकर गुजराथेत आले आहेत, ते कोठे आहेत ते लिहावे. आम्ही वर्तमान यैकतो की श्रीमंत दादासाहेब भडोचेत इंग्रजाकडे गेले. तेथे सर्व टाकूण जलमार्गें मुंबईस येणा(र) म्हणोन यैकतो. तरी तहकीक वर्तमान आसेल ते लिहून पा. आपण जवल आहा याजमुले आपणास कलेल म्हणोन लिा आहे. रा छ १९ जिलकाद बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनती.

¶*Letter addressed to Naropant Nana (Keskar) informing him of the close confinement in which Narottamdas was kept at fort Mahuli and inquiring news of the various Commanders on duty in Gujerat.*

No. 118] [*12-1-1775*

श्री

आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो आनदराव गो यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सबैन मया व अलफ. तुम्हीं राजश्री भिवराव येशवंत यांस छ ३० सवालीची पत्रे पाठविली ते छ ७ जिल्कादी बऱ्हाणपुरास पावली. लिहिले वर्तमान सविस्तर विदित जाहाले. राजश्री फत्तेसिंगराव गायकवाड याची पत्रे पाठविली ते पावली. तीर्थस्वरूप दादासाहेब तेथे आले. राजश्री गोविदराव गायेकवाड यांच्या भेटी जाहाल्या. आतां ते जमीन फत्तेसिंग गायकवाड याजवर शह बसलेयामुळे ते दहशत घेतील असे म्हणावे तर सिंदे होलकर व हरिपंत येक होऊन मागाहून येतात, हेहि वर्तमान त्यास कललच आहे. त्यापक्षी उभयता येक जाले तरी चिंता नाही. आजपर्यंत मागाहून येतात ते पोहोचलेच असतील. तुम्हांस मदतीस बलाविले आहे. त्यास विचार प्रसंग पाहून तुम्ही जावे. सरदार हरिपंतामागाहून आलेच असतील, त्यापक्षी फिकीर आहे आसे नाहीं. ते येऊन पोहचत तो मध्ये

आवकाशांत गोविंदरायानीं काय केले ? फत्तेसिंग कसे ठरले ? काय जाले ? हे सर्व तुम्हास समजलेच आहे. वरचेवर बातमी येत जाईल तसें तुम्ही जाण्याचे करणे. जाणिजे छ ९ जिलकाद.

¶*The Peshwa informs Naro Anandrao that Dadasaheb has reached Baroda and effected union with Govindrao Gaekwad. The addressee is instructed to keep in readiness to join Haripant who is pursuing Dada.*

No. 119] [*14-12-1774*

पौ छ १३ सवाल मंदवा-
सर मार्गेश्वर मास खमस
सबैन.

श्री

राजश्री नारोपंत गोसावी
यास

ऽ अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्नो फत्तेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. आपले पत्र मार्गसीर्ष सुध २ चे आले. पावोन परम संतोष जाला. दर कूच सुरत माहालात येतो म्हणऊन लिा. त्यास आलेच आसाल. राजश्री दौलत बाबूराव तापी दक्षणातिरी आहेत म्हणऊन बातमी आली होती. तुमच्या आगमनाचे वर्तमान यैकोन टाला देऊन गेले आसले तर उतमच जाले. कदाश्चित खमखम चितात आसली तर तुम्हीं व राजश्री जनार्दन रायाजी येकदील होऊन सर्व लोकांचा दिलासा करून त्यास सिक्षा करणे म्हणजे राजश्री बापू व राजश्री नाना यासी तुमचे चाकरीचा मुजुराहि होईल व राज्यांत लौकिक होईल. येवसी राजश्री जनार्दनपंतासहि लिा आहे, परंतु बहुधा दालभ्ये ठरणारच नाहित. ते बेदील होऊन गेले आहेत व श्रीमत राजश्री दादासाहेबांकडे जावयाची उत्कंठा त्यास विशेष आहे. तथापि ठरले तर पारपत्यास आंतर न करावे. तो गुंता नसलियास सत्वर रेवातिरास यावे. मध्ये गुंता करू नये. रेवातिरास आलेस म्हणजे सुरत आठाविसी मागे पडली. रेवाउतरतीर [शिक्का] च्या माहलास दबाव बसतां ते येऊन रुजू होतील. राजश्री गोविंदराव गाईकवाड यांजपासी सामान थोंडके राहिले आहे तेहि बेदील आहे. सिबदीचा गवगवा विशे(ष) आहे व आम्हीहि त्यास येथून हलो देत नाही. कदाश्चित येथून निघाले तर आम्ही पाठलाग करितो. दोहोकडील शह त्यास सोसवणार नाही व सिबदी त्यास येथून निघो देतच नाही.

येविसी चितात संकल्प विकल्प न आणितां सत्वर रेवातिरास यावें. रेवातिरास आलियां यैवजाचीहि तरतूद होईल. यैवजाकरतां गुंतो नये. हे तक येणार नाही. येविसी विशेष काये ल्याहावे ? कार्तिक वद्य त्रयोदशी मोहुली नजीक माहालक्षुमीचे मुकामची पत्रे पाठविली ती पावली. सविस्तर कलले. त्याची उतरे साद्यात मागाहून लिहू. परतु दिवसगत न लागता तापितिरी येखादा दुसरा मुकाम करून रेवातिरास जावयाचा विचार आसावा. सोनगड वगैरे कोठेहि गुंता नसावा. रा छ १० माहे शवाल बहुत काय लिहीणे कृपा लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad writes to Naropant Keskar asking him to take account of Doulat Baburao, Sakharam Hari's nephew, and in case the latter takes flight he asks the addressee to join him near the Nerbada.*

No. 120] [*14-1-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

नारोपंतनाना स्वामीचे सेवेसी

पो विसाजी केशव सा। नमस्कार विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत आसले पाहिजे विशेष. राजश्री बहिरोपंत सुरतचे कमावीसदार याची रवानगी हुजुरून जाली. त्यास आपलेकडील फौज सुर्तेचे बंदीस याजकडे देविली आहे. तरी हे आपणास सांगतील त्याप्रमाणें बंदी फौज देऊन करावी. यात सरकारकाम फार आहे. इकडे मुंबईची बंदी केली, साष्टीस मोर्चे दिल्हें. आपणहि सुर्तेस पायबंद चांगला द्यावा. सविस्तर राजश्री नारोपंतनाना याणी आपणास पत्र लिहिले आहे त्यावरून कलेल. नाना, बंदी जरूर करावी. रा छ ११ जिलकाद. बहुत काये लिहिणे, लोभ करावा, हे विनंती.

¶*Visaji Keshav Lele, the Sar-Subha of Konkan. instructs Naro Anandrao to blockade Surat.*

No. 121] [*15-1-1775*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य

राजश्री नारो अनंदराव गो यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ खमस सबैन मया व अलफ. राजश्री हरि बलाल फौजसुधा बडोदेयास आलेच असतील व तुम्ही नर्मदातिराहून

जाऊन त्यास सामील जालेच असाल. नसाल गेला तर तुम्ही व राजश्री फते-सिंगराव गाईकवाड मिलोन जाऊन मारनिलेस सामील होऊन कर्तव्यार्थ आहे तो करणे. तिकडील बातमी सत्वर कलत जावी यास्तव सोनगडास डाक सांडणी-स्वाराची व जासुदाची बसविली आहे, तरी हरिपंताकडील पत्रे सोनगडास पोहचावीत जाणे व तुम्हीहि तिकडील वर्तमान लिहीत जाणे. जाणिजे छ २२ जिलकाद आज्ञा प्रमाण.

¶*Naro Anandrao is asked to join Haripant Phadke along with Fatesing Gaikwad and to help him in the work undertaken.*

No. 122] *[15-1-1775*

श्री

राजश्री नारोपंत गोसावी

यांस

॥ अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्री फतेसिंगराव गाईकवाड दंडवत विनंती उपर. येथील क्षेम जाणून श्वानंदलेखन करीत आसिले पाहिजे विशेष. तुमचे पत्र छ ९ जिलकादचे आले ते पावोन लेखनार्थ आवगत जाला. तुम्हास इकडील कचेपकें वर्तमान लिहीत गेलों, परंतु तुम्हास यावयास आनकूल न पडले. राजश्री हरिपंत तात्या यांचे पत्र छ १० जिलकादचें चापानेराच्या आलीकडे आलियाचें आलें. त्याची नकल बजिनस पाठविली आहे त्याजवरून सर्व आर्थ ध्यानास येईल. सारांष आज त्रयोदसी शनवारी राजश्री तात्या बडोदि-यानजीक येणार. कदाश्चित आज न आले तर उदईक तो खामखा रविवारी येतील. श्रीमंत राजश्री दादासाहेब व चिरंजीव राजश्री गोविंदराव गाईकवाड आज शनवारी कूच करून येकाग्रेकीं गेले. आपण यापूर्वी येऊन आम्हास उपयोगी पडावें येविसीं बहुत [शिक्का] प्रकारे बहुत वेळा लिहिलें, परंतु आपल्यास यावयास आनकूल न पडलें. तथापि राजश्री तात्याची आमची भेट उदईक रविवारी चतुर्दसीस होणार. त्या समयासहि आपले आगमन न जालें. उतम आहे. जे गोष्ट आपल्यास उतम दिसोन आली आसेल तेच आपण केली आसेल. आथपर विशेष काये ल्याहावें ! पेसजी तुम्ही सुरतकर कमाविसदाराचे पत्र हरपिंत तात्याकडे रवाना करावयास पा होतें ते पावतें करून उतर आलें ते तुमचे नावचा लाखोटाच बजिनस पा आहे पावल. रा छ १२ माहे जिलकाद बहुत काय लिहीणे हे विनंती.

¶*Fatesing Gaikwad to Naropant Keskar communicating the movements of Haripant Phadke and of Govindrao Gaikwad.*

No. 123] [17-1-1775

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो आनंदराव गोसावी यासी.

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सैबन मया व अलफ. तुम्ही छ १ जिलकादचे विनंती पत्र पा ते छ १३ मिनहूस पावलें. नरोतमदासास कैद करून कोहजेस पाठविला. सुरतकर मोगलाचा वकील आला आहे. तेथील बंदोबस्त करावा तों श्रीमंत बडोद्यास आले. गोविंदरायास भेटल्याचें वर्तमान रा। फतेसिंगराव गाईकवाड याणी लिहिलें, त्यावरून रेवातिरी घाटबंदी करावयास जात आहो. उदैक कूच करितों. सुरत शहरातील सरकारअमल चालता करून बहिरो रघुनाथ यांजकडील कारकून मोकले केले. बाकीचा जाबसाल करावा तों श्रीमंताकडील मनसबा प्राप्त जाहाला म्हणून लिहिलें तें सावंत विदित जाहालें. यैशास तीर्थस्वरूप तिकडे आले. त्यांच्या पाठीवरी राजश्री हरि बलाल व सिंदे होलकर मातबर फौजेनसी आले आहेत. त्यास तुम्ही हरि बलाल यास लेहून पाठऊन तिकडून फौज आणऊन भडोजची व सुरतेची बंदी करणे. हरदू जागाची बंदी जाहाल्यानी फार उपयोगी पडून टोपीकरास चांगला ताण बसेल. सा। जरूर जरूर हे काम आधी करणे. सुरतेचा सरकार आमल च्यार रोज न चालल्यासहि कामास येईल. चिंता नाहीं. पुढें सर्व समजोन घेतले जाईल. जाणिजे छ १४ जिलकाद बहुत काय लिहिणे.

¶*The Peshwa pays Naro Anandrao a compliment for what he did and asks him to strengthen the blockade of Surat and Broach and to defer if necessary the work of administering the province round about.*

No. 124] [18-1-1775

श्री

राजश्री नारो आनंदराव गो यासी

सुा खमस सबैन मया व अलफ तुम्ही फौजेविसी लि। त्यावरून राजश्री हरि बलाल याजकडील फौजेतील लोक येथे आले होते ते हुजरात व सरंजामी मिलून अडीच हजार फौज चिंतामण माधवराव व महिपतराव नरसी धायेगुडे यांजबरोबर तुम्हाकडे रवानगी केली आहे. लौकरच येतील. सोनगडच्या मार्गे येतील. तुम्ही यांजकडे पत्र पाठऊन मार्गाचा सुमार लिहिणे. जाणिजे छ १५ जिलकाद.

¶*This is an intimation to Naro Anandrao of contingents being detached to strengthen his position.*

No. 125] [18-1-1775

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो आनंदराव गोसावी यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुाा खमस सबैन मया व अलफ. तुम्ही छ १ जिलकाद व छ २ जिलकादची दोन पत्रे पाठविली तीं ब्ऱ्हाणपूरचे मुकामी पावली. लिहिले वर्तमान सविस्तर विदित जाहाले. सोनगड व व्यारे दोनी ठाणी घेतली म्हणौन लिा उतम केले. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब बडोद्याजवल आले, थकले. त्याचे जाणेयेण्याचा व इंग्रजाकडील मसलतीचा प्रकार विस्तारे करून लिहिले ते सर्व कलले. दादासाहेब बडोद्यासमीप आले. सरदार मालव्यात राहिले. मागाहून हरि ब्रलाल मालव्यात गेले. त्याचे भेटीकरितां च्यार मुकाम जाहाले. भेटी जाहाल्या आसे कलताच दादासाहेब जलदी करून बडोद्यास गेले. पुढील त्याचा मनसबा राजश्री गोविंदराव मिलून करितात की येकटेच करितात? इंग्रजाचे घरी गेल्यास सडे जातील. फौज आगदीच राहिली किंवा फौजसुधा बाहेरच फिरतात याचा विचार काय केला? हा निश्चये जाहालाच आसेल. सरदार व हरिपंत येऊन पोहचलेच आसतील. राजश्री फतेसिंग गायकवाड बडोद्यात आहेत. त्याची मजबुदी चांगली आहे. त्याचे लिहिण्यात बरे आहे. आपली फौज येऊन पोहचलियावर चिंता नाही. मध्ये आवकाशांत कसे जाहाले असेल ते पाहावे. गोविंदरायांची दादाची भेट जाहाली, परंतु त्यास सामील जाले किंवा भेट मात्र घेऊन राहिले? गोविंदरायाजवल हरि उमाजी आहेत त्याणी बोलूनचालून गोविंदरायास इकडील लक्षांत आणिले आहे. येविसीची पत्रेहि त्याची निखालसतेची आली होती. परंतु दादा आल्याच्या पूर्वी आलीकडे कसे जाहाले याचे वर्तमान तुम्हास वरचेवर कललेच आहे. तुम्ही तिकडील बातमी पाहून आजपर्यंत करावयाचे रितीने केले असेल. कदाचित आजपर्यंत लाबणीवर पडिले आसिले तरी हरिपंत कोठपर्यंत आले? कोठे आहेत? गोविंदराव कोठे आहेत? दादासाहेब काय करितात हे सर्व बातमी राखोन विचार पाहून करणे. तुम्ही थोडक्या सामानानिसी फार मेहनत करून सरकार कामे केली उतम केले. पुढेहि विचार पाहून चहूकडील बातमी राखोन करीत जाणें. तुम्ही थोडक्या सामानात मेहनत केली हे ध्यानात आहे. जाणिजे छ १९ जिलकाद.

¶*Peshwa's letter to Anandrao seeks information of the developments of Dadasaheb's plans after his meeting with Govindrao Gaekwad.*

No. 126] [20-1-1775

पौा छ २९ ज़िल्हेज
खमस सबैन.

श्री.

राजश्री पंत प्रधान साहेबाचे सेवेसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित फत्तेसिंगराव गायेकवाड कृतानेक दंडवत विनंती. येथील क्षेम जाणून स्वानंदवैभवलेखन करावया आज्ञा केली पाहिजे, विशेष. कृपाकरून बराणपूरचे मुकामींहून पत्र पाठविलें तें पावोन संतोष जाला. श्रीमंत राजश्री दादासाहेब इकडे आले. चिरंजीव राजश्री गोविंदराऊ गायकवाड भेटून सरंजाम सुद्धां कूच करून मही-उत्तरतिरास गेले. राजश्री हरिपंत फडके सर्व फौजांसुद्धां पूर्णिमेस दाखल जाले. आज्ञेप्रमाणें आम्ही सरंजाम सुद्धां बाहीर निघोन मशारनिलेबरोबर प्रतिपदेस कूच-करून महीतीरीं वांकानेरास आलों. तृतीयेस त्याचा आपले फौजेचा मुकाबला+ जाला. सायंकाळ पाा लढाई जाली. त्यांनीं महीच्या खल्या पारचे कांठीं धरल्या आहेत. आपल्या फौजा दक्षिणतीरीं कायेम असों. येका दो दिवसांत पारपत्य किंवा येथून निघोन पुढें पळतील, त्यासारखी पैरवी होऊन सेवेसी विनंती मागाहून लेखन होईल. निरंतर पत्रीं सांभाळ करावयास साहेब समर्थ. रवाना छ १७ जिलकाद[१]. बहुत काय लिहिणें कृपा लोभ कीजे हें विनंती.

¶*Fatesing Gaikwad to the Peshwa reports a battle between Dadasaheb assisted by Govindrao Gaikwad and Haripant Phadke assisted by the writer at Vakaner on the Mahi.*

No. 127] [20-1-1775

पौा छ २२ ज़िलकाद सन
खमस

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री बालाजीपंत दादा स्वामीचे सेवेसी

पो बगाजी रघुनाथ कृतानेक साा नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १७ जिलकाद मुाा शहर बराणपूर जाणोन स्वकीये लिहीत जावे विशेष. आपण भास्करपंताचे लाकडाविसी श्रीमंतास पत्र दिल्हे होते त्याजवर श्रीमंतानी

+ येथें शिक्का आहे. १ महीची लढाई फेब्रुवारींत झाली. जिलकादऐवजीं जिल्हेज पाहिजे. पैवस्ती जिल्हेज महिन्याचीच आहे.

विनंती करावयासी येक रोज अनमान केला होता. मग दुसरे दिवसी पत्रावर विनंती करून घेऊन जयरामपंतास पत्र देऊन त्याची चिठी घेऊन भास्करपंताचे भावाकडे पाठविली असे. कलावे. इकडील वर्त(मान) तरी श्रीमंत बडोद्यास गोविंदराव गाईकवाड याजपासी गेले. भेटी जाहाल्या. तात्यासी श्रीमंतासी चालीस कोशाचे अंतर आहे. गाठ घालितो म्हान तात्याची पत्रे छ ६ जिलकादची छ १४ जिलकादी आली. धोसा कालच तात्याकडून आला. नवाबाचे लस्करात दाखल जाहाला. उभयेता श्रीमंतास नवाबाची मेजमानी छ १९ जिलकादी जाली. नवाबास येथे मजमानी उदईक होणार. मेजमानी जाली म्हणजे मजल दरमजल पुण्यास येणार. तहवरजंग यास बिडाकडे मुधोजी भोसले याची फौजे येऊन दगा केला आहे म्हणौन नवाबानी रवाना केला. त्याजबा सरकारची फौज दीड हजार दिल्ही. बा सरदार खंडेराव दरेकर याचा पुत्र दिल्हा. श्रीमंतानी मजला येथे ठेऊन घेतले. रा गंगाधरपंत व सिवरामपंत याची रवानगी छ १४ जिलकादी केली. बा फौज तीन हजार तात्याकडे जावयाची होती ते दिल्ही. चिरंजीव कोनेरपंताचा समाचार घेत जावा. आम्ही लवकरच आपल्यापासी येऊ. घरचा समाचार घेत जावा. बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶The movements of Raghunathrao, his meeting with Govindrao Gaikwad, the interviews between the Nabab and Nana Fadnis and Sakharam Bapu and their mutual entertainments are reported by Bagaji Raghunath to Balajipant.

No. 128] *[21-1-1775*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य

राजश्री नारो आनंदराव गोसावी यां

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सबैन मया व अलफ. तुम्ही छ ९ जिलकादचे पत्र पाठविले ते छ १४ जिलकादी पावले. लिहिले वर्तमान विदित जाहाले. राजश्री हरि बलाल फौजसुधा कोठे आहेत त्याची बातमी देखील नाही म्हणौन लिा ते कलले. यैशास सरदार सुधा दाहोद्याहून कूच करून पायागडचे मार्गे बडोद्याकडे जातो म्हणौन त्याची पत्रे आली. ते आलेच आसतील. तुम्ही त्याजकडील वर्तमान वरचेवर आणवीत जाणे. सखाराम हरि याचे पत्र बालाजी येमाजी यास आले ते पाठविले ते पावले. तुम्ही चहूकडील बातमी राखोन सावधगिरीने राहात जाणे. फौज येथून तुम्हाकडे

पाठविली आहे ते लौकरच पावेल. येथून जासुदाची व सांडणीची डाक सोनगडे-पर्यंत बसिवली आहे. वर्तमान वरचेवर लिहीत जाणे. चिंतामण माधवराव व महिपतराव धायेगुडे याजबरोबर तीन साडे तीन हजारपर्यंत फौज पाठविली आहे. लौकरच पावेल. जाणिजे छ १८ जिलकाद.

¶*The Peshwa asks Naro Anandrao to secure news about Haripant who he promises must have reached Baroda. The Peshwa also sends him some forces under Chintaman Madhavrao and Mahipatrao Dhaygude.*

No. 129] [*21-1-1775*

श्रीगजानन

श्रिया विराजित राजमान्ये राजश्री

नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोा बहिरो रघुनाथ मेहदळे सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १८ माहे जिलकाद जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आम्ही पौश सुध्ध सतमीस बेलापूराहून स्वार जाहालो, ते वसईचे मार्गे मजल दरमजल छ १७ जिलकादी कोा बलसाड येथें अस्तमानी दाखल जालो. यैसियासी आज छ मजकुरी कोा धणदेवी येथें येतो. तेथोन मजल दरमजल कामरेज-पर्यंत येऊन उपरातिक तैसाच निघोन आपले भेटीस येतो. त्यास आपण फौज-सुधा रेवापार जाणार म्हणौन वर्तमान कळले. त्यास साष्टी इग्रजाने घेतली याजकरिता पुन्हा साष्टी घ्यावी या मसलतीस राजश्री विसाजी कृष्ण व राजश्री विसाजी केशव या उभयताची हुजुरून रवानगी जाली आहे. त्यास साष्टीस मोर्चेबंदी करावी व मुंबईस शह द्यावा, क्षेपनिक्षेप साष्टी घ्यावी याप्राा हुजूरची मर्जी आहे. याअन्वये इग्रेज ज्या ज्या ठिकाणी आहे त्या त्या ठिकाणी शह देऊन चहूकडोन हगामा करावा म्हणौन हुजुरून आज्ञा व उभयेतानीहि सागितले आहे की, आध्वी सुरतेची बंदी करावी. येविशीची पत्रे आपल्यास हुजूरची आहेत. त्यास हुजूरचे पेसजी पत्र आपणाकडे रवाना केले ते पावलेच आसेल. त्यास आपले आगमन मजल दरमजल मुख्याचे शहास्तव होत आहे. त्यास आपण तिकड लांबल्यास इकडील शहास वेध पडतो यास्तव सेवेसी विनंती लिहिली आहे. तरी आपण रेवापार न जावे. येक दुसरा मुकाम केला पाहिजे. इतकीयांत मी मजल दरमजल येऊन सेवेसी पोहचतो. तदनंतर इकडीलहि बंदीचा बंदोबस्तास (अपूर्ण)

¶*Bahiro Raghunath Mehendale to Naro Anandrao communicating to him the Peshwa's instructions about checking the aggressive attitude of the English and recapturing Salsette from them. He urges him to effect the blockade of Surat.*

No. 130] [21-1-1775

श्री

राजश्री नारोपंत गोसावी
यासी

श्नो माहादजी सिंदे दंडवत विनंती उपरी. पदाजी सेलके इकडील सिलेदार त्याचा बंधू दौलत बाबुराव याजवल होता. त्याचे स्वार देशीं जाताना आपणाकडील लोकानी घोडी घेतली म्हणून कलले. त्यावरून आपणास लिा आहे तरी पदाजी सेलके याची घोडी आसतील ते सोडून देवावी. घोडी सा व उटे दोन घेतली आहेत ते देवावी. रा छ १८ जिलकाद हे विनंती.

¶*Mahadaji Sindia requests Naro Anandrao to restore to Padaji Shelke the horses captured by the men of the addressee.*

No. 131 [22-1-1775

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंतनाना स्वामीचे सेवेसी.

पो विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. उपरी, येथलि कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आपण गुजराथ प्रांते गेलियावर बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाही. तरी प्रस्तुत तुम्ही कोठे आहा, काय वर्तमान? श्रीमंत राजश्री दादासाहेब ते प्रांते बडोद्यास गेले, राजश्री गोविंदराव गायकवाड याच्या व त्याच्या भेटी जाहाल्या, त्यांचे पाठीवर राजश्री हरिपंत फडके होलकर सिंदे सुधा आहेत म्हणोन लस्करातून सरकारचे लिहिले आलें. त्यास, गोविंदराव गायकवाड श्रीमंतास किती फौजेनसी भेटले, श्रीमंतासमागमे किती फौज आहे, हरिपंत होलकर सिंदे सुधा कोठे आहेत, श्रीमंत व गायकवाड कोठे आहेत? तुम्हास राजश्री फतेसिंग गाईकवाड भेटून ते व तुम्ही येके जागा जाहालांच असाल. श्रीमंत तिकडे गेले याजमुले तुम्ही नर्मदेचे घाटबंदीस गेला म्हणोन वर्तमान ऐकिले. त्यास, नर्मदातीरास गेला की काय? घाटबंदी कसी कसी केली? साष्टिस इंग्रेजानी दगा करून बेइमानीस येऊन किला घेतला याजमुले इकडील माल मुंबईस जावयाची बंदी केली आहे. आपणास गुजराथ प्रांतीचा माल सुरतेस जातो त्याची बंदी करावयाविसीं लस्करातून व पुण्याहून आपणास लेहून पाठविले आहे. त्यास आपण फौज व गादडी पाठऊन

नाकेबंदी केलीच असेल. ते कसी केली? कोण्हे कोण्हे ठिकाणी चौक्या ठेविल्या? माल जावयाची बंदी अगदी जाहाली किंवा नाही? आपणाकडून बंदी जाहाली असल्यास आणिखी कोण्हेकडून सुरतेस रस्त पोहचती किंवा काय ते सविस्तर लेहून पाठवावे. आम्हाकडील वर्तमान तरी साष्टीस लागावे, टापूत फौजा व लोक घालून टोपीकराचे पारपत्य करावे असी सरकारची आज्ञा आली व राजश्री सिवाजी विठल व आपाजी हरि वगैरे पथके फौजसुधा लस्करातून रवाना केली ती येऊन पोहचली. पुण्याहून फौज व गाडदी वगैरे पायदल व माहाकाली व मार्तंड तोफा येत आहेत. आमचा मुकाम साष्टी व कल्याणचे दरम्यान आहे. वसईस वगैरे ठिकाणोठिकाण स्वार व लोक पाठऊन इतके दिवस बंदोबस्त करविला. याउपरी साष्टीस लागोन टोपीकरास तंबी पोहचवावी हेच तरतूद होत आहे. तुम्हास कलावे म्हणोन लिहिले असे. सविस्तर लिहावे. तिकडील आधिकोतर आढलेल ते लिहीत जावे रा छ १९ जिलकाद सन खमस सन सबैन. बहुत काये लिहिणे, लोभ असो दिल्हा पाा हे विनंती.

¶*Visaji Krishna inquires of Naro Anandrao how far he has succeeded in effecting the blockade of Surat and reports his own disposals round about Salsette.*

No. 132] [*26-1-1775*

श्री

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक रावजी अनंत चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना यैसिजे छ २२ सवाल पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री फतेसिंगाकडील राजश्री रुद्राजीपंत व कुशाबा छ ११ सवाली तिकडून येक पाणक्या मात्र समागमे तेथू(न)पाई श्रीमंत दादासाहेबाचे पेचात येऊन दंग्यामुले निवोन ते राजश्री कुशाबा चौकीवर आले. मी गैरमाहित तिकडून निभावले म्हणोन व पाये सुजले, फोड आले, चालावयाची शक्ती नाही, च्यार रोजाचे उपासित यैसे जाणून थोडी मनुष्यें देऊन त्याचे कुलकर्णपणाचा गाव तेथे पावते केले. सेवेसी लस्करात जाईन म्हणून बोलले आहेत. तिकडील साद्यंत निवेदन करितील. श्रीमंत दादाचे लस्कर तापीतिराहून पार गेले. मुकाम महिना आहे. पुढे सोनगडचे मार्गे जाणार. उनहईस फौज आली म्हणोन आवई इकडे जाली होती ते सर्व अफवाच. कही

आसपास बावीस कोस आली. त्याणी दोनतीन गाव वासदेकराचे लुटले. वासद्यास ठाणे बसले. आनंदराव कोण आहे तो पनास माणसानसी तेथे आहे. त्याणी कोसी दोकोसी चौक्या बसविल्या आहेत. इकडील तिकडे कोणी जाऊयेऊ देत नाही. आनंदराव दलवी रामनगराकडे वासदेकराचे सेपनास माणूस घेऊन गेला आहे. कोणते कार्यास गेला हे कलले नाहीं. बातमी लागलियावर सेवेसी लिहून पाठवितो. सांप्रत सावकारी वर्तमान आले आहे की तापीपार होऊन पायागडाचे रोखे जाणार. कावनईकडे कोल्याचे मलईत त्याचे दोन खिजमतगार व त्रिंबक सूर्याजीचे पुत्र व भाऊ समागमे आहेत. छ १७ सवाली परगणे चांदवड मौजे नादुरडीकर भले माणूस श्रीमंत दादाचे लस्करात जात होते. दोन तटे व आकरा आसाम्या त्यात दोन भले माणूस आहेत. राहुड्याचे गढीत तीन दिवस होते. न पुसता गेले. कमाविसदाराने वाटाड्या देऊन श्रीमंत दादाचे लस्कराकडील दिल्हे असतां प्रात:काली आम्हास कलता जासूद पाटोपाट पाठविले. सुरगाणात गाठ पडली तेथून माघारे आणून सेवेसी रवाना केले असेत. जाले वर्तमान राणू जासूद निवेदन करील. सेवेसी कलावे हे विज्ञाप्ति.

¶Raoji Anant reports to Haripant that Dadasaheb has crossed the Tapti and is heading towards Payagad

---

No. 133] *[27-1-1775*

श्री

श्रिया विराजित राजमान्ये राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी.

पोष्ये बहिरो रघुनाथ मुकाम कामरेज तापीतीर सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २४ माहे जिलकाद जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आम्ही छ ७ जिलकादी पुणियाहून स्वार जाहालो ते मजल दरमजल मुकाम मजकुरी छ २० मिनहूस दाखल जालो. यैसियासी सुरतेची बंदी जलद करावी म्हणौन हुजूरची आज्ञा. त्यास येविसीची पत्रे आपणास होती ती आम्ही पाठविली ती पावलीच असतील. त्याजवरून मजकूर ध्यानास आलाच असेल व हालीहि आपणाविशी विनंतीपत्र श्रीमंत राजश्री हरिपंत तात्या याणी लिहिले आहे तरी आपण यावयाचे लवकर केले पाहिजे. मार्गप्रतीक्षा करीत असो. बेलापूरचे मुकामीहून राजश्री कृष्णराव आपणाकडी वकिलीस आलें होते. त्याजंबराबर आमचे कारभारी याणी पत्रे पाठविली ती व बलसाडचे मुकामीहून पत्र

पाठविले ते यैसी पत्रे आपल्यास पावलीच असतील. सहश्र प्रकारे आपण आले पााजे. कदाचित तिकडील वेधामुले आपणास यावयासीं विलंब असिला तरी हजार फौज चांगली जलदीनें रवाना करावी. सारावंश इंग्रेजाची या प्राती ठिकाणे सुरत व भडोज. त्यास सुरतेहून सर्व सरंजाम मुबईस जातो. मातबर शहर, यास्तव यांसी पायेबंद लौकर बसल्याने सरजाम, लोक, दाणा जिनस मुबईस पोहचणार नाही. येविशी सरकारची मर्जी निक्षूण आहे. सारावश साष्टी हस्तगस्त लौकर व्हावी या मजकुरास इकड पायेबंद जरूर बसला पाहिजे. स्वाम सर्वज्ञ आहेत. विस्तारे काय ल्याहावे. सारांश लौकर स्वारी आपली आली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶Bahiro Raghunath to Naropant Keskar from Kamrej, points out the necessity of closing the port of Surat to checkmate the English at Salsette.

No. 134] [*27-1-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंतनाना स्वामीचे सेवेसी

पो गणेश हरि कृतानेक सां नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल छ २४ जिलकाद मुा गल्हे नजीक तापी दक्षणतीर जाणोन स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले. पत्री लिा कीं, बुणग्यासमागमे रेवापार येणे. त्यावरून आम्ही सरभुवनीहून कूच करून मुकाम मजकुरी बुणग्यात आलो. आठ दिवस जाले, बुणगे राहिले, तापपािर येत नाही, त्यावरून आम्ही येत होतो. त्यास पर्वाचे दिवसी राजश्री बहिरो रघुनाथ कादार शहर सुरत हे पुण्याहून आले. त्याणी सरकारची पत्रे आणून दाखविली त्यांतील अन्वयें पाहाता बंदी सुरतेची करावी, सरकारकाम सोडून यावे हे ठीक नाही व येविसी आपले बोलणेहि जाहाले होते, त्यावरून राहिलो. तर आपण तेथून हजार स्वार रोजमरेयाची वगैरे बेगमी करून जलद पाठऊन द्यावे. आपणास सरकारची पत्रे आहेत त्याचा अर्थ राजश्री बहिरोपंत लिहितील त्यावरून कलेल. सरकारचे पत्राचा अन्वय श्रीमंत राजश्री तात्यास आम्ही लिा आहे व फौज पाठवावयाविसी लिा ते आपणास स्वार पाठयाविसी सांगतीलच. आमचे मानस फार

करून तिकडे यावयाचें परंतु रा बहिरोपंतापुढें, उपाय नाहीं. फौज आली, तेथलि बंदोबस्त जाहला म्हणजे तिकडे येऊ. उतर सत्वर पाठवावे. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Ganesh Hari writes to Naropant that he would join him as soon as the blockade of Surat, according to instructions from Poona, is effected.*

No. 135] *[28-1-1775*

श्री

श्रियांविराजित राजमान्ये राजश्री
नारोपंतनाना स्वामींचें सेवेसी

पोा बहिरो रघुनाथ मुकाम कामरेज सां नमस्कार विनंती. येथील कुशल तांा छ २९ माहे जिलकाद जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. आम्ही पुणियाहून सुरतेस यावयासीं निघाल्यानंतर आपणास पत्रें पाठविली ती पावलीच असतील. त्याजवरून सर्व अर्थ आपले ध्यानांत आलाच असेल व हालीं आपणाकडेस राजश्री गंगाधरपंत मजमदार यांसी पाठविले आहेत. भेटीनंतर इकडील मजकूर निवेदन करितील त्याअन्वये आपण यावयाचे सत्वर केले पाजे. दिसगत लागल्यांस कामास बल पडेल यैसा विचार आहे. सविस्तर विनंती माारनिल्हे करितील त्याजवरोन कलेल. श्रुत होय हे विनंती.

¶*Bahiro Raghunath, writing from Kamrej, asks Naro Anandrao to come and join him soon. Delay on the part of the addressee, the writer adds, will render the task more difficult.*

No. 136] *[17-2-1775*

श्रीगणपति

विनंती उपरी. आज श्रीमंताचा मुकाम येथून तीन कोसांवर जाहाला तेव्हा उद्या महीवर वांकानेरावर अथवा वासदचे आरेस (?) जातील. मधें पाणी नाही. आपले बुनगे थोरले वांकानेरचे आऱ्यास गेल्याने त्यास फार जवळ पडेल. यास्तव प्रात:काळींच अंधार असतां त्यास चिठ्ठी पाा आणि ते लांब जाय तें करावें. वासदचें आऱ्यास गेल्यानें मग कांहीं चिंता नाही. आपली तयारी फार पाहाटेस होऊन पुढें जावें. उद्यां नदी पावेतों प्रात:कालापासून मेहनत करावी. फलदाता ईश्वर आहे. गायेकवाड व होळकर यांसहि सूचना आसावी. आपले बनगे

येथेंच असूं द्यावे. श्रीमंताचा रोंख महीचा कोणीकडे गेल्याचा समजेल त्याप्रमाणें येथून कूच करऊन न्यावासी येईल. आज तीन कोसाचें अंतर आहे. रात्रीची सावधगिरी असावी. गणेशपंत बरे जाहले. दोन तीन टोल्या हजारा दो हजाराच्या करून उद्यांचा दिवस तीहींकडून लगट करून पाहावा. सुचला प्रकार लिहिला आहे. लोभ कीजे. हें विनंती.

¶*Letter of Vamanrao Patwardhan giving news that Dadasaheb will probably move towards Vankaner on the Mahi and asks the addressee to advance rapidly in the early hours of the morning and close upon Dadasaheb.*

No. 137] [*January 1775 ?*

श्री

पुरवणी : साल मजकुरीं नको म्हणत असतां माहालचें काम गळीं पडलें. शेटसाहबाचा लोभ पूर्ण. त्यास कसेंहि करून पार पाडिलें पाहिजे. येविसीं तुम्हांस लिहून तुम्ही करावें असें नाहीं. माझी खातरजमा आहे. नाना काका व गारदी काल गोसावीपुन्याहून धरून आणिले. पाहाऱ्यांत आहेत. भाटाचें ठिकाण लागत नाहीं. पेस्तर सालीं कबूल करावयाचें नाहीं. सालगुदस्ताप्रमाणें कसेंहि करून सांल मजकूर पार पडलें पाहिजे. आमोदचे काम सालमजकुरीं काढावयाचें शेट साहेबाची व इंग्रजाची पत्रें घेऊन येऊन जंबुसरचें गिरासे वगैरे याचा बंदोबस्त ठेऊन येक पैसा त्याच्या हातास न जाई तो करावा. रवाना छ मजकूर हे विनंती. राजश्री मानसिंग जोगीदास यास रामराम विनंती उपरी. तुजला यजमानानी पोशाख दिल्हा आहे; घेऊन येतों. सविस्तर लक्ष्मणपंतास लिहिलें आहे त्याप्रमाणें करावें. हे आसीर्वाद.

¶*The writer asks for proper defence of some places in Gujarat—Jamboosar and Amod.*

No. 138] [*January 1775*

श्री

सेवेसी केसो माहादेव साष्टांग नमस्कार विनंती. काल आपली आज्ञा घेऊन निघालों तें लस्करांत पावलों. आपलें पत्र मागाहून आलें कीं जगथापाची पागा व भोंसले व आमची पागा तीनीं पतकें व टोक! असें मिळोन वारसे याजकडेस जावें. त्यास आज प्रातःकाळीं पत्रें पाठविली आहेत. उदयिक आले म्हणजे तिकडेस

पाठवितो. राजश्री हरिपंतनाना सरलस्कर याजकडील देऊलघाटांतून मुजरद माणूस आलें कीं मानाजी शिंदे व सटवोजी भोंसले ऐसें आजिणठाचे घाट उतरोन खालीं आले आहेत; सुरतेकडे यावयास निघाले आहेत. त्याजकडील देऊळ-घाटी ग्रहस्त आहे त्याणें मुजरत कागद राजश्री हरिपंतास पाठविला आहे. आम्हीहि उदईक पागा आली म्हणजे राजश्री लक्ष्मुमणपंत पिंपळनेरकर याजकडे पाठवितो. शोधास माणसें पाठविलीं आहेत. तीहिं बातमी घेऊन येतील, व सुरतेहून परशा निसबत भावसिंग याजकडील माणूस गेला होता. आपाजी शिंदे याची आई व बायको व बहीण घेऊन आला. त्याणें सुरतेकडील वर्तमान भाले-राव श्रीमंताजवळ होता तो वासदे याचे घाटानें निघोन गेला. श्रीमंताजवळ तीनशें माणूस कवाइती मात्र आहे व पन्नास स्वार आहेत; बाकी सरंजाम कांहीं नाहीं, याप्रमाणें वर्तमान आहे. पलटणें च्यार आहेत, व तोफा आठरा आहेत. सलेयाचें बोलणें लागलें आहे. व सरकारचा कारकून श्रीमंत दादासाहिब याज-वळ आला आहे. राजश्री माहादाजीपंत करमरकर श्रीमंताजवळ होते, त्यास देवाज्ञा जाहाली म्हणोन परशा आला त्याणें वर्तमान सांगितलें. आपणाकडील वर्तमान घ्याहावयासी आज्ञा जाहाली पाहिजे. आज दो दिवसाचें वर्तमान कळलें नाहीं, त्याजवरून चिंता लागली आहे; तरी कृपा करून पत्र पाठवीत जावें. बहुत काये लिहिणें हे विनंती. * राजश्री अंताजीपंत नाना व माहादाजीपंत व कृष्णाजीपंत व धोंडोपंतास नमस्कार. वर्तमान वरचेंवर लिहीत जावें; कृपा लोभ करीत आसावा; बहुत ल्याहावें असें नाहीं. मानाजी फांकडा वेतालवाडीस आला आहे, याची बातमी पकी आहे. माणूस त्याचें लस्करांतून आला आहे. हा वर्तमान सांगता कळो येईल. बहुत काय लिहिणें (हें विज्ञापना.)

¶*Keso Mahadeo writes about the movements and the strength of the forces of Dadasaheb and his accomplices in Gujarat.*

No. 139] [*January 1775*

श्रीशंकर प्रा

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी

पो राजाराम खंडेराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करावे विशष. आपण कृपा करून पत्र पाठविले ते उत्तम

स(म)ई पावोन भेटीसमान लाभ जाहाला. यैसच संदैव पत्र पाठऊन परामर्ष करीत जावा. यानंतर नरोतम व आंबादास येथून दोन मजला पावल्याचे वर्तमान आले. पुढे ज्या ठिकाणी रवानगी केली आहे तेथील पावल्याची पत्रे आली म्हणजे आपणाकडे पाठवितो. मार्गी कोणेविसी चिंता नाही. सरकारचे ठाण्यानी पाठविला आहे. रात्री ज्या ठाणियासी जातील त्याणी चवकीपाहारा देऊन प्रात:काली कबज घेऊन रवानगी करावी. याप्रो किलेदार व कमाविसदार यासी पत्रे लेहून दिल्हीं आहेत. कोणेविसी चिंता नाही. सुरक्षित पावेल. कदाचित दगाफटका जाला आणि त्याचे संरक्षण न होये, हातचा जातो, यैसेच जाल्यास रा कमलाकरपंत यासी आपली आज्ञा निक्षूण आसेल त्याआन्वये वर्ततील; परंतु हातचा जाईल हे घडणार नाही. जाब आल्यावर प्रा होईल. आपण या प्रांती आहात इतकियात वसूल झाडून घेतो. मोगलास यैवज पावला तो पावला, बाकी राहिला यैवज देत नाहीं. श्रीमंत बडोद्यास आले. सरकारचे माहाली नवे कादार पाठविले व सरजामी माहालातहि पाठविले यैसे परस्परे यैकिले व आपले पत्री आर्थ कलला. त्यासी आम्हास तूर्त काही चिंता नाही. आपण दरम्यान आहात तो पंधरा दिवसात गुता उरकून घेतो, मग चिंता काये आहे. इकडील गुंता उरकून मीहि लौकरच सेवेसी येतो. दुसरे वर्तमान, इंग्रजाचे येथे कौसल जाले. तेथून भडोचकर मिस्तर शाहा यासी लिहिले की तुम्ही श्रीमंताची भेटी घेऊन पंचविसा स्वारानसी भडोचेस घेऊन येणे. तेथू(न) ममईस पावते करू. याप्रो वर्तमान आपणास कलावे. साष्टीचा कि(ला) मार्गेश्वर वद्य १० बुधवारी घेतला. माणूस फार मेले. रा आनदराव रामाजी सापडले. ते ममईस पाठविले. किलेदार मृत्य पावला. त्याचा पुत्र सांपडला. राजश्री विसाजी कृष्ण जवलं होते परंतु तोंड पाहात राहिले. मदत न केली. किलेदार जातीने लढून सोला दिवस शर्त केली. सेवटी बुरूज आगदी भोईबरोबर पाडून हाला केली याप्रो जाले. उभयेता विसाजीपंत वसईस आहेत. याउपरी साष्टी घेतली याजमुलें इंग्रज मोगल शेर जाले. वसई घेतो म्हणौन आवई घातली आहे. त्यास वसईस सामान राजश्री विसाजी केशव याणी चांगले केले आहे. फौजहि जमा जाली आहे. बहादरपुन्याच्या हावेल्या पाडून मैदान केले. झाड तोडली याप्रो केले आहे परंतु परिणाम काये करितील ते पाहावे. नाना, साष्टी गेली हे फारच वाईट जाले. याउपरी साष्टी माघारे घेऊन ममईची तजवीज श्रीमंत करितील तरीच दाब बसेल आणि इंग्रजाचे पारपत्य होईल. ईश्वर काये करील ते पाहावे. सांप्रत्य गुजराथ प्रांती अरिष्ट उभे राहिले आहे. कैसे होईल ते पाहावे. साष्टीचे वर्तमान खोटे नाही. तेथून मुजरद माणसे तेथील

6053

राहणार आली त्याणी कचे वर्तमान सांगितले. आपणाकडील सविस्तर वृत लिहीत जावे. आपण तिकडे आहां याजमुळे आम्ही इकडे स्वस्त आहोत. बरा वाईट प्रकार आसिल्यास आम्हास तेच क्षणी ल्याहावे. नेहमी दोन माणसे आमची राजश्री महिपतराव याजवल ठेविली आहेत. सुरत संमधी जाबसाल काये ठरला ते ल्याहावे. आपणाकडून वकील गेला होता त्याचा जाबसाल कलला नाही ते ल्याहावे. बहुत काये लिहिणे कृपा लोभाची आभिवृधि करावी हे विनंती. मिस्तर शाहा भडोचकर पनास माणसानी बडोद्यास गेला. कलावे हे विनंती.

¶*Rajaram Khanderao reports to Naropant Nana the safe despatch of Narottam and Ambadas in proper custody and assures him that there was no fear of their escape. He also writes about the development of affairs of the English. The writer regrets the capture of Salsette by the English in spite of the valiant efforts of the Killedar and is afraid that Bassein may soon follow the same fate.*

No. 140] *[January 1775*

श्रीगजानन प्रा

राजश्रिया विराजित राजमान्ये राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोा राजाराम खडेराव कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीय लेखनाज्ञा केली पाहिजे विश(ष). आपले आज्ञेप्रमाणे नरोतम व आंबादास याची रवानगी सुक्रवारी केली. समागमे पनास माणसे दिली. सुक्रवारी आर्जुनगडचा मुकाम, मंदवारी बलालगडचा मुकाम, रविवारी चिंचल्याचा मुकाम, सोमवारी गोरे कोहज येथे जातील. तेथून पुढे जेथे स्वामीची आज्ञा आसेल तेथे सरकारच्या ठाण्याठाण्यानी पाठविले. तमाम ठाण्यास पत्रे लिहिली आहेत. आर्जुनगडास भगवंतराव व दाहा स्वार आम्ही आपले पावते करावयासी दिल्हे होते ते मदवारी स्वार होऊन तिकडे गेले आणि भगवतराव माघारे आले याप्रोा त्याची रवानगी केली. दुसरे आपले जासूद पुणियासी गेले त्याणे जबानी सागितले कीं श्रीमत साहेब बडोद्यास आले. रोा गोविंदराव व फतेसिगराव यैसे येक जाले. श्रीमंतास भेटले म्हणौन वर्तमान सागितले. त्यासी सत्यमिथ्य काये ते ल्याहावे. जोपर्येत आपला या प्राती टिकाव आहे तोपर्येत आमचाहि आहे. तैसाच प्रकार आसिल्यास आम्हासहि सूचना करावी. उभयेता बंधू गाईकवाड येकत्र जाले असिले तेव्हा आपण काये विचार केला ते ल्याहावे. श्रीमंत राजश्री बापूस हा मार आम्ही लिा आहे. आपली पत्रे गेलीच आसतील.

तेहि समीप थालनेरावर आहेत. बांड्याचे तारखेडे घेतले. माधवराव भिलाणात पलोन गला. आपणाकडील मसलत बरी वाईट आम्हास सुचवीत आसावी. सूज्ञाप्रति विस्तारे काये ल्याहावे. आम्ही आपले आधारावर आहोत. साष्टी इंग्रजानें घेतली. कलावे बहुत काय लिहिणे ? कृपावृधि करावी हे विनंती.

¶Rajaram Khanderao to Naropant Nana writing about Narottam and Ambadas having been sent to Kohaj as directed. The writer enquires whether the two Gaikwads have joined Raghoba and settled their differences.

No. 141] [*1-2-1775*

पौ छ १ जिल्हेज सुा

खमस माघ

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी

गोसांवी यांसी

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. हैदर नाईक याजकडील ऐवजापैकी आपाजी राम याचे मारफातीने कृष्णाजी नाईक दातार यांचे हवाल्याबाबत दोन लक्ष रुपये येणे. त्याजविसी बाजीराव गोविंद बर्वे याणी कर्णाटकातून तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यासी व चितो विठल यांसी पत्रे लेहून पाठविली, ती चौकीवर सांपडली, ती पुरंधरास दफ्तरी आहेत. त्याचा शोध करून पुणियासी पाठवावयाविसी तुम्ही लिहिले त्याजवरून चिंतो विठल यांचे पत्र दोन बंदावर व तीर्थस्वरूपाचे नावाची च्यार पत्रे पांच बंदावर येणेप्रमाणे दफ्तरी होती ते पाठविली आहेत. पावतील. सदरहू ऐवज बदामीकरांचे हातून आणविला होता तो आला की नाही याचा मार तपसीलवार लेहून पाठवणे. जाणिजे छ २९ जिलकाद सुा खमस सबैन मया व अलफ हे विनंती.

¶The writer sends to Naro Appaji a few intercepted letters of Bajirao Barve's intrigue with Haidar.

No. 142] [*2-2-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना

स्वामीचे सेवेसी

सेवक नारो गणेश सां नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ १ जिल्हेज जाणून स्वकीये कुशल लिहीत असावे विशेष. आपणाकडून पत्र येऊन परामृष

होत नाही त्यास यैसे नसावे. सदैव पत्र पाा संतोषवीत असावे. यानंतर राजश्री आनदराव यास पाा होते की बुणगे येईल त्यासमागमे येणे. त्यास बुणगे आद्यापि येत नाही. आपणाकडूनहि येणे म्हणून उतर नाही त्याजवरून दुग्धा पडली आहे. आपण फौजसुधा येणार म्हणून वर्तमान आईकिले. त्यास सविस्तर मजकूर लेखन केला पाहिजे. बहुत काय लिहिणे. श्रीमंत राजश्री विसाजीपंत बिनीवाले यानी जासूदजोडी साष्टीहून पाा आहे. पत्रावरून सविस्तर भावगर्भ ध्यानास येईल. लोभ असो द्यावा हे विनंती.

¶*Naro Ganesh to Naropant Nana asking information of his whereabouts.*

No. 143] [*3-2-1775*

पौ छ १० जिल्हेज सुाा
खमस सबैन माघ मास

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विसाजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २ माहे जिल्हेज पावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे व किले पारनेरचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्र छ १७ जिलकादचे सादर जालें तेथें आज्ञा की तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब गुजराथ प्रांती आले, त्याची बातमी लिहीत जाणें म्हणोन आज्ञा. त्यास श्रीमंत राजश्री दादासाहेब बडोद्यास येऊन दाखल जाले. राजश्री हरिपंत फडके फौजसुधा चांपानेरास येतांच राजश्री गोविंदराव गायेकवाड यासी बराबर घेऊन श्रीमंत महीपार गेले. राा हरिपंत फौजसुधा महीआलिकडेस इकडील काव्यास आहेत. महीचे घाट त्याणी बंद केले आहेत. नित्य याची त्याची टपाटपी होतच आहे. उभये पक्षीचें युद्ध होणार आहे. राजश्री फतेसिंगराव गायेकवाड बडोद्याहून निघोन तोफखाना वगैरे सरंजाम घेऊन राा हरिपंतास सामील जाले. महीपलीकडील मवास श्रीमंतास सामील जाले आहेत. श्रीमंत बडोद्यास आले होते, ते समई भडोचकर इंगरेजाकडेस लक्ष्मुमणपंत नातू बोलीचालीस पाठविले होते. सरंजाम वगैरे साहित्य माघा घ्यावयाचा करार जाला होता. त्याप्राो इंगरेजाकडून जावें तों सरकारची फौज येऊन पावली, त्यामुळें काहींच घडोन आलें नाही. रामचंद्र नारायेण व आपाजीराम कारकून जव्हेर घेऊन सुतेंस गाहाण ठेऊन किंवा विकोन यैवज न्यावयाअर्थें श्रीमंताकडून आले होते; परंतु सुतेंत सावकारानी

जव्हेर ठेऊन यैवज दिल्हा नाही. कारकून फिरोन गेले. सुर्तेहून दारूगोली वगैरे सरंजाम इंगरेजाकडून पोचला नाही, याप्रो इकडील वर्तमान आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Visaji Keshao reports to the Peshwa Raghoba's flight beyond the Mahi with Haripant Phadke closing on him.

No. 144] [*4-2-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य

राजश्री अंताजीपंत स्वामीचे सेवेसी

पोष्य धोंडो बलाल कृतानेक सा। नमस्कार विनंती. येथील कुषल ता। माघ शुध ४ चतुर्थी मंदवारपावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. तुम्हाकडील वर्तमान कलत नव्हते. त्यास तिकडून जासूद आले त्याणी मुखजबानी सविस्तर सागितले त्यावरून कललें. यानंतर इकडील वर्तमान तर चिरंजीव राजश्री कृष्णराव श्रीमंत बापू व नाना यांच्या लस्करांत सुखरूप आहेत. ते उदईक पंचमीच्या मुहूर्ते पुरंधरास उभयतां येणार त्याजबरोबर हेहि येतील. तुमच्या घरचे वर्तमान तर सर्व सुखरूप आहेत व काल्याकडील वर्तमान तर जी मुले देवी यावयाची होती त्यास देवी येऊन वारली. अनंत व राघोबा व मथुरा व वासुदेव इतकी चौघे मुले गत जाहाली. होणारास उपाय काय? आणखी सर्व क्षेम आहेत. तुम्हाकडील वर्तमान कलत नाही. तर सविस्तर लिहित जाणे. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

पोष्य जगनाथ धोंडदेव कृतानेक सां नमस्कार विनंती लिखितार्थ परिसोन कृपा करीत जावी. बहुत काये लिहिणे कृपा कीजे हे विनंती.

¶Dhondo Ballal Phadke (brother of Haripant) informs Antajipant of Krishnarao enjoying good health in the camp of Nana and Bapu.

No. 145] [*8-2-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना

स्वामीचे सेवेसी

सेवक नारो गणेश कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता। माघ शु। ८ सौम्यवार मु। आंकलेश्वर येथे स्वामीचे कृपावलोकनेकरून क्षेमरूप असो

विशेष. आपणाकडून पत्र येऊन परामृष होत नाहीं यैसे नसावें. सदैव पत्रद्वारे कुशलतेचे वृत लेहून सांभालीत असावे. यानंतर राजश्री बलवंतराव धोंडदेव व राजश्री बालाजी खंडेराव याणी श्रीमंताचे पत्र आम्हास साहित्याविसी आणिलें. त्यास आम्हाकडून जे साहित्य होणे ते आपले आज्ञेप्रमाणे होईल. परंतु आपण फौजसुधा आल्यावितरिक्त इकडील बंदोबस्त यथास्थित होणार नाही. पांच सातसे राउतानसी दोही ठिकाणची बंदी कसी होईल? जेव्हा बंदी करणे तेव्हा नाक्याच्या नाक्यास राऊत ठेऊन बंदोबस्त करावा तेव्हां रस्ता जाऊ पावणार नाही. परगण्याचा रुपया थोडाबहुत मामलेदाराकडून पेसजी पावता जाहाला आहे. बंदी होऊन जफ्ती जाहाली म्हणजे रुपया पोहचणार नाही. यास्तव आपण येत तोपर्यंत राजश्री बलवंतराव धोंडदेव व राजश्री बालाजी खंडेराव फौजसुधा कामरजेचे मुकामी जाऊन राहणार. त्यास आपण सत्वर यावे. दिरंगावर गोष्ट घालू नये. या मागेच बंदीचा बंदोबस्त जाहाला असता तर फार उतम होते. बरे, आतां तरी आपण फौजसुधां यावें म्हणजे सर्व गोष्टी अनकूल होतील. आम्हास आज्ञा कराल त्यांत सेवेसी अंतर होणार नाही. बहुत काय लिहिणे कृपा लोभ कीजे हे विनंती. बंदी करावयाचे दिवस फार करून गेले. पुढें आठ पंधरा दिवस पावेतो हंगाम आहे. इतकियात बंदी जाहालियानें सामान जावयाचे राहील. नाके भडोजेचे आहेत. त्याची बंदी पोख्त पकी केली पाहिजे. नाहींतरी परगणेयासी मात्र उपद्रव यैसा प्रकार आहे व सुरतचे बंदीचेहि दिवस हेच आहेत. यास्तव मुख्य गोष्ट सत्वर यावे. येण्याचा प्रकार लौकर जाहल्यास कामकाज होऊन येईल. ते पंधरा दिवसानंतर घडावयाचे नाही. तरी आपण यावयाची सिद्धता सत्वर करावी. हे विनंती.

¶*Naro Ganesh requests Naropant Nana to go to the succour of Balwantrao Dhondadeo and Balaji Khanderao. Without his arrival, he says, it is impossible to arrange for the proper defence of Ankaleshwar and send help to them as well.*

No. 146] [*11-2-1775*

पैवस्ती छ १९ जिलकाद सन खमस सबैन

पौष मास.

श्री

शेवेसी. येथील तागायत छ १० जिलकाद पावेतों येथास्थित असे विशेष. स्वमीनी पत्र पाठविले तें पावलें. तेथें आज्ञा कीं परांड्याचे वाटेंत हैदर नाईकाकडील कारकून व लाला कायेत जाऊन राहिले आहेत. त्याजपासी कसबे

बारामती येथील लोक चाकरीस राहातात व पांगरीस लोक कांहीं जमा जाले आहेत म्हणोन विदित जाले. त्यास हैदर नाईकाकडे लोक जाऊन चाकरीस राहतात, हे बातमी राखून बंदोबस्त करीत नाहीं, व वर्तमानहि हुजूर लिहून पाठविले नाहीं हें आपूर्व आहे! हलीं हें पत्र लिहिलें आसे, तर तुमचे प्रांतांतील लोक त्याजकडे जाऊन राहिले व राहावयास जातात, त्याची पुर्ती चौकसी करून जे गेले आसतील, आथवा जे जाणार आसतील, त्यांची घरें व मुलें माणसें वतनदेखील जफ्त करणें. मुलांमाणसांस तसदी देऊन जे गेले आसतील, ते माघारे येत, त्याजकडे न राहात यैसे करून, तपसीलवार नांवनिसी जे गेले आसतील त्यांची लिहून हुजूर पाठवणें म्हणोन आज्ञा केली. त्यास येविशी पूर्वी पत्र पाठविले होतें. त्याजवरून कसबे मजकूरची व परगण्याची ताकीद करून जे गेले ते माघारे आणविले. व जे जाणार त्यांस ताकीद केली हें वर्तमान पूर्वी सेवेसी लिहिलेंच आहे. हलीं पागरीविशीं लिहिलें तेथेंहि पूर्वी ताकीद केली व हलींहि आज्ञेप्रमाणें ताकीद लिहिल्याआन्वयें करवितों. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer is desired by the Peshwa to take severe measures against those who have deserted to Haidar Naik.*

No. 147] [*16-2-1775*

छ १९ जिल्हेज.

श्री

विनंती. राजश्री फतेसिंग गायेकवाड यांजकडून बडोद्याहून सरकारांत पत्रें आलीं आहेत त्यावरून सर्व आर्थ ध्यानात येईल. आम्हासहि पत्र आलें. गोविंदराव गायेकवाड यांची व त्यांची लढाई होऊन फतेसिंगबावा बडोद्यास गेले. तेथे त्याचा जमाव बराच जाला आहे. गोविंदराव यांचे व त्यांचें सल्ये करावे येविसीची मध्येस्ती राजश्री खंडेराव गायेकवाड करितात. त्यास फतेसिंगबावा इकडील लक्ष धरून सल्याचा प्रकार करीत नाहीत. त्यापक्षी सरकारांतून फतेसिंगबावाकडील पुस्तपन्हा केल्याने पुढे मसलतीस उपयोगी आहे. गोविंदराव याजबराबर सरकारची फौज गेली आहे त्या सरदारास व गोविंदरायांकडील पथके आहेत त्यास सरकारची जरबेची पत्रे गेलियाने तेथे दाब पडोन फतेसिंगबावा याजकडील बलाबल विशेष होईल याजकरितां तिकडे येविसीच्या साधनाचीं पत्रें व फतेसिंगबावा यांसहि हिंमत चढे अशा रीतीची पत्रें लौकर जावी हे उत्तम + + +

+ पत्र नारो आपाजीचें.

मजकूर काये आहे? याउपरी लिहिल्याआन्वये सरदारास, गोविंदरावबाबा आहेत त्यांस पत्रे दिल्हियाने निमे बल मोड होईल व नरसिंगराऊ गोविंद व दौलत बाबूराऊ याजकडील तरी बोलणीच आहेत. कांही दाब व काही समाधान आशा आन्वये पत्र द्यावी. आज्ञा आलियास पत्रे देऊ. बहुत काये लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Naro Appaji writes to Poona about a battle that took place between Fatesing and Govindrao Gaikwad and requests the Barbhais to support the cause of Fatesing as he was favourably inclined to the Peshwa.*

No. 148] *[18-2-1775*

श्री

राजश्री तमापा स्वामीस

विनंती. येथील क्षेम तागाईत माघ वद्य ३ मंदवार प्रातःकालपर्यंत मुकाम महीतीर येथें बुणग्यांत असों. श्रीमंत तात्या व तमाम फौजा व * * * * गबाबा ऐसे येकत्र होऊन सल्ला बिघडला. लढाईचा सिद्धांत करून शुक्रवारीं काल कूच करून महीवर आले तों श्रीमंत दादासाहेब पैलतीरीं फौजसुद्धां आले. तृतीय प्रहरीं आम्ही समस्त फौजसुद्धां महीपार जालों तों त्याच्या याच्या गांठी पडल्या. च्यार घटिका लढाई चांगली जाहाली, त्यांचा मोड जाहाला. तोफा दाहा व हत्ती दाहा घोडीं उंटें सुतरनाला घेऊन आले. मानाजी फांकडा व सदाशिव रामचंद्र व सखाराम हरि यांस जखमा भारी लागल्या. ठार जाहाल्याचें वर्तमान आहे. त्यास तेथून श्रीमंत पळून मागें बुणग्यांत गोविंदराव खंडेराव, हरि भिडे वगैरे गेले. त्यांचे पाठीमागें सडी फौज गेली. मेले गेले धरले सर्वहि समजेल, मग उदयिक लेहून पाठऊं. शुक्रवारीं सायंकाळीं बुणग्यांत येऊन वर्तमान लिहिल असें. बाबूराव पाटणकर धरून आणिले.

कृष्णाजी नाईक कडु याचें पत्र त्याचे गुमस्त्यास आलें त्याची नकल आली तें छ २९ जिल्हेज सोमवार.

¶*A heavy engagement between Haripant and Dadasaheb on the Mahi is reported in this letter.*

No. 149] *[22-2-1775*

श्री

राजश्री नारो आपाजी स्वामी गो

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. केशवराव बलाल याची स्त्री व पुत्र किले सिहीगड वर अटकेस आहेत. त्यास स्त्रीस फार बरे वाटत नाही

साखरपाणी मांत्र घेत असत्ये. पका जामीन घेऊन खाली उतरावयाची असल्यास उतरू. येविसी आज्ञा येईल त्याप्रमाणे करू म्हणौन लिा ते कलले. त्यास किल्याखाली उतरावयाचे नाही. स्त्री साखरपाणी घेत्ये त्यास भोजन करणे म्हणौन सांगोन पाठवणें. जाणिजे छ २१ जिल्हेज सुाा खमस सबैन मया व अल्फ हे + विनती.

¶*Naro Appaji is asked by Sakharam Bapu not to set at liberty the wife of Keshavrao Ballal kept in confinement at Sinhagad even though she is ill.*

No. 150] [*26-2-1775*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो आनंदराव गो
यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुाा खमस सबैन मया व अल्फ तुम्ही विनंतीपत्र पाठविले ते पावले. राजश्री फतेसिगराव गाईकवाड व आपण राजश्री हरि बलाल यास भेटोन गाईकवाड व आपण येक विचारे चाकरी सरकारची करितो म्हणून लिहिले ते कलले. उतम असे. सुरतेच्या बंदीस रा बालाजी खंडेराव व बलवंतराव धोंडदेव आले. मागाहून तुम्हीहि येणार. त्यास सुरतेची बंदी गाईकवाड याणी कबूल केली. येविसी मागाहून पत्रे सादर होतील त्याप्राो करणे. तुम्ही तूर्त न येणे. जाणिजे छ २५ जिल्हेज आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa to Naro Anandrao complimenting him upon his having persuaded Fatesing Gaikwad to join Haripant.*

No. 151] [*27-2-1775*

श्री

वडिलाचे शेवेसी आपत्ये केसो नारायेण चरणावरी मस्तक ठेऊन सिर साा नमस्कार विज्ञापना. ताा छ २६ जिल्हेज संध्याकाल पो मुाा कागले येथे सुखरूप आसो विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेब काल येकादसीचे

+ पत्र सखाराम बापूंचें.

6061

दिवशी संध्याकाळी सुरतेस दाखल होऊन सलाबतपुऱ्याची बाग शहरात आहे तेथे येऊन राहिले. इंग्रज याचे बोलणे होऊन कोकणपटी दर्याकिनाराचे किले-कोट याच्या सनदा करून इंग्रजास दिल्या याप्रो बातमी शहरातून राजश्री गोविंद पंत आणा याजकडे आली. तेथे आम्हाकडून वसुलाबदल लिंगोपत हुकरीकर आहेत त्याणी लिहून पाठविले त्याजवरून वडिलास लिहिले आहे. वडिलाकडील बडोद्याचे मुकामाची पत्रे आली ती काल संध्याकाळी पावली. येथील सुरतेचा बदोबस्त करणे, त्यास वीस हजार फौज व तोफा पाच सात असल्याखेरीज तापी-तीरची बदी होणार नाही. शहराची बदी केल्यास परभारे तापीची खाडी उतरून बाहीर जातील. याजकरिता या बदोबस्ताविसी श्रीमंत राजश्री तात्यास पत्र लिहून बदोब (स्त) करावा. शेवेसी शृत होय हे विज्ञापना.

सेवेसी गोपाल गणेश याचे कृतानेक सा। नमस्कार. सर्व राजश्री केसोपत याणी लि। आहे त्याजवरून कलो येईल. सेवेसी शृत होय हे विज्ञापना. सेवेसी चिटको विठल व आपाजी हरि याचे सा। नमस्कार लि। परिसोन लोभ करावा हे विज्ञापना.

¶*Keso Narayan sends news of Raghunathrao having arrived at Surat and taken residence at Salabatpura.*

No. 152] [*27-2-1775*

श्री

श्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो बहिरो रघुनाथ मु। वरिसे नजीक सुरत सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ २६ जिल्हेज जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण साणीचे मुकामचे पत्र राजश्री बालाजी खंडेरांव यासी पत्र आले की श्रीमंत राजश्री तात्यानी आमची रवानगी सुरत प्रातात केली. श्रीमत सुर्तेस आले म्हणौन वर्तमान भावनगराहून आले. आम्ही मजल दरमजल येऊन पोहोचतो म्हणौन रावजीस पत्र आले त्यावरून सविस्तर कलो आले. हिकडील वर्तमान तर श्रीमंताचा मोड जाल्यावर खंबाइतेस गेले. त्याणी घेतले नाही. भावनगरास पावते केले. भावनगरकर राज्याने च्यार जाहाजे देऊन सुर्तेस रवाना केले. हती व घोडी वगैरा सामान भावनगरास ठेऊन सडे जाहाजात बसोन बाऱ्यावर आले. छ २२ गुरुवारी सायंकाळी दोन घटका दिवसास येऊन दाखल जाले. सुरतकर इंग्रजाकडून दुसरे दिवसी येक कोशल्या गेला. सामान सरजाम

6062

सर्व भाडीसुधा सुतेंहून गेली. पाच सातसे माणूस आजपरयंत जमा जाले आहे. मुजरद दोन जोड्या आपणाकडे सविस्तर लिहून पाठविल्या. ती पत्र पावलीच असतील. साप्रत त्याच्या व इंग्रजाच्या चितात आहे की येक वेल या फौजेवर वालावे ऐसे त्याचे चितात आहे. बातम्या रोज येतात. आपण जलदीने येऊन पोहोचावे. भेटीअंती सविस्तर निवेदन करू. कलले पाहिजे. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती. काल श्रीमत बाऱ्यावरून उतरोन शहरासमीप वाडी पश्चमेस आहे तेथे येऊन राहिले. आज इदुवारी शहरात येऊन राहिले. यैसी पकी बातमी आली. कलावे हे विनंती.

¶*Bahiro Raghunath informs Naro Anandrao that Raghunathrao after his defeat proceeded to Cambay and from thence to Bhavnagar. At Bhavnagar he embarked for Surat and has taken asylum with the English.*

No. 153] [*27-2-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसी

पो बालाजी खंडेराव कृतानेक सा नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणोन ता छ २६ माहे जिल्हेज पावेतो मुा वरासे वर्तमान येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान काल संध्याकालपावेतो जी बातमी श्रीमंताकडील वरचेवर जी आली ती कालच लिहिली आहे. हालीच्या लिहिण्याचे सारांश हाच की, जितकी जलदी होईल तितकी उतम आहे. सुरतेबाहेर होते ते आज आत येणार असी बातमी आताच गायेकवाडाकडील का सुरतेत आहे त्याचे पत्र आले त्याजवरून लिहिले आहे. तरी सत्वर यावे. आपले पत्र छाणीच्या मुकामीहून आले ते आजच पावले. पावोन संतोष जाहाला. भेटीअंती सविस्तर परस्परे कलेल. बहुत काये लिहिणे, विनंती.

पो सदासिव रघुनाथ व गोपाल त्रिंबक कृतानेक सा नस्कार विनंती. लिा परिसोन सत्वर येणे होईल ते उतम आहे. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Balaji Khanderao reports to Naro Anandrao that Raghoba has arrived in the City and asks him to come quickly to his help.*

No. 154] [February 1775

श्री

+पुा नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी आपण दर पत्रीं लिहितात कीं मनसुबा कलेल तसा आटोपणे. त्यास लवकर आटपावे हे सर्वांचे मानस, परंतु गायकवाडानी लांबविलें त्यास इलाज नाहीं. सेवट काय करितात कलत नाहीं. काल पत्रें आली की येक मजल कूच केलें, दर मजल येतो. त्यास इकडून पत्रे निकडीची गेली आहेत. लौकर यावेसे आहेत. होईल ते लिहून पाठऊ. श्रीमंत खबाइतात आहेत, फौजेची मार्गप्रतीक्षा करितात. आम्ही येथे असतां फौज जात नाही. जसे गायकवाडानी म्हटले तसे ऐकिले. भेटावे या तजविजेत आसो. हे भेटले म्हणजे श्रीमंत काय करितात हे समजेल. तसे पुढे करावयास येईल. होईल ते लिहून पाठऊ. पैका नाहीं. मसलत लांबली. ईश्वर परिणाम लावील तो खरा. नाना, मोठे संकट येऊन पडले आहे. इतका प्रकार इंग्रजाचे पक्षामुले जाला आहे. श्रीकृपेने प्राप्त लागेल तो खरा. आपण मजबुदीने असावे. हे विनंती.

¶*Haripant to Naro Appaji communicating the troubles created by the Gaikwads and hoping that the undertaking would prove successful.*

No. 155] [February 1775

श्रीगजानन

स्वामीचे शेवेसी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येसीजे. राजश्री हरि रघुनाथ भिडे काली बुधवारी आले. यावरी मुतसदी यांस बोलाऊ पाठविले, ते दोन घटका रात्र गेल्यावरी आले. जाबसाल बहुत जाले. कांही निश्चयाची गोष्ट आज्ञेप्रमाणे व्हावयाचा ठराव जाला आहे तो राजश्री केशो गोविंद शेवेसी येतील ते विज्ञाप्ति करिता सविस्तर श्रवण होईल. शेवेसी आंबे पिकले सुमार १०० येकसे पाठविले आहेत. प्रविष्ट होतील. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Probably Wamanrao Patwardhan to Haripant writes that Hari Raghunath Bhide has opened negotiations with the Barbhais on behalf of Raghunathrao.*

+ पत्र हरिपंतांचें आहे.

No. 156] [February 1774

श्रीगजानन

राजश्री माणको(जी) पंत स्वामी गोसावी यास

विनंति उपरी. तुम्ही चिठी पा। ते पावली. श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधि यांचा मुक्काम लष्करापासोन चार कोसावर आहे. प्रातःकाली मुक्काम व्हावयाचा मजकूर लि।. यैशास श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे कूच आज पंधरा कोसाचे जाले. एक मुक्काम जाल्यास आणखी पंधरा कोस जातील तेव्हां सात आठ गांवाची तफावत सहजात पडत्ये. नवाब कूच लांब होते म्हणोन आधीच पाय खोऊन बोलतात. त्याहीमध्यें आज त्याचा निश्चये ठरला आहे जे परंडेचे मुक्कामास लांब कूच करून आज जावे. तेथें बुणगे टाकून सडे व्हावे; आणि श्रीमंत दादासाहेबाचा पाठीलाग बेजरब करावा याप्रमाणें ठरले आहे. याजकरितां बहुत प्रकारें श्रीमंत प्रतिनिधीस सांगोन कूच करून यावे. राजश्री हरिपंत तात्या व आम्ही सारे फौजसुधा तलावर पंताची वाट पाहत बसलो आहो. लष्करापासोन कोसाचे सुमारे याल तेव्हां आम्हाकडे एक स्वार पाठवून देणे. पंत आल्यासिवाय आम्ही कोणी जात नाहीं. +बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Dadasaheb is marching on with his army and is being pursued by Haripant and Pratinidhi.*

No. 157] [1-3-1775

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २८ जिल्हेज मुकाम नजीक कपाटबंद जाणौन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. पो। आमोद येथे श्रीमंत राजश्री दादसाहेब यांची जफ्ती आली तेव्हा पो। मजकूरच्या जमिनदारानी तेरा हजार रुपयाची पटी करून दिल्ही. त्याचा हवाला भडोचकर इग्रजाच्या गुमस्त्याने घेऊन तेरा हजार रुपयाच्या यैवजास पो। मजकूर गावगना सतावीस हजार रुपयाचा कापूस लेहून घेतला. त्यावर सरकारच्या फौजा या प्रांती आल्यावर श्रीमंताची जफ्ती उठून गेली. तेरा हजारापैकी त्यास काही पावले नाही, आसे असता इग्रजानी सतावीस हजार रुपयाचा कापूस लेहून घेतला

+ येथून अक्षर निराळे वळणाचें.

आहे, त्यासाठी पो मजकुरी जफ्ती पाठऊन जमिनदारास भडांचेत नेऊन बसविले आहेत व तहसीलहि चालीस लाविली आहे म्हणौन माधव सेट याणी लिहिले होते. त्यास तुम्ही त्या प्रांती गेला आहा. साराच बंदोबस्त तुम्हाकडे लागला. मग आमोदची काळजी कशास करावी? बंदोबस्त आमोदचा आधी करून देऊन आम्हास लिहून पाठवावे. वरकडहि सरकारचे माहालचा बंदोबस्त करावा. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal to Naro Anandrao asking him to adjust all the disputes and losses caused by Raghunathrao in the district of Amod.*

No. 158] [*2-3-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य हरि बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरि. येथील कुशल तागायत छ २९ जिल्हेज मुकाम नजिक कपटबंद प्रांत गुजरात यथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचा सल्लक सिंदे होलकर याचे विद्यमानें येक महिना पावेतों बोलणे होऊन होत होता, परंतु ठरावांत येऊन फडशा न जाला. तेव्हां छ १६ जिल्हेजीं लढाई संध्याकालपर्यंत होऊन श्रीमंताचा मोड जाला आणि पलोन गेले. पाठलाग करावा तो अंधारी रात्र त्याजमुळें न केला. श्रीमंत से दोनसें लोकांनसी खंबायतावरून घोग्या बंदरास जाऊन तेथे पंनास पाऊणशानिशीं गलबतांत बसोन मुंबईकडेस गेले या प्रमाणे वर्तमान आहे. राजश्री वामनराव व रास्ते व आणखी पथके ऐसी दाहा पंधरा हजार फौज त्यांच्यामागें रवाना केली आहे. लढाईत तोफखाना व व दाहापंधरा हती पाडाव जाले. बाबूराव पाटणकर व गणेश विठल जखमी होऊन पाडाव जाले. सखाराम हरि व मानाजी सिंदे व सदाशिव रामचंद्र वगैरे मंडली व सरकारचे कारखाने राजश्री गोविंदराव व खंडेराव गायकवाड या समागमें आहेत. गायेकवाड कडी म्हणोनु ठाणे आहे त्या प्रांती आहेत. आम्हांपासून पंचवीस कोसावर आहेत. गायेकवाडाचा कारकून राजश्री आपाजी गणेश याजकडे येऊन कांहीं सलुकाचे सूत्र लाऊन आपाजी गणेश याचा कारकून व आमचीं पत्रें खातरजमेचीं घेऊन गेले आहेत. आद्याप उत्तरें आलीं नाहींत. आल्यावर काये मजकूर असेल तो समजण्यांत येईल. आपणांकडील बहुत

दिवस पत्र येऊन परामर्ष होत नाहीं तर सदैव पत्रीं कुशल वृत्त व तिकडील वर्तमान लिहून पाठविले पाहिजे. बहुत काय लिहिणे. कृपा करावी हे विनंती.

¶Hari Ballal writes to Naropant Nana of an encounter which he had with Dadasaheb when the negotiations that were opened with him through Sindia and Holkar had failed. He reports that Dadasaheb having been defeated in the fight was proceeding towards Bombay.

No. 159] [3-3-1775

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो। हरि बलाल नमस्कार विनती उपरी. येथील कुशल ता। छ ३० जिल्हेज मुकाम नजीक कपटबंद प्रांत गुजराथ जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. इकडील वर्तमान तरी श्रीमंत लढाई जालियावर पलोन घोग्याकडेस गेले होते. त्यास त्याजकडील वर्तमान घोग्या पलीकडे जाऊन समागमे हती वगैरे सरंजाम होता तो भावनगरास ठेऊन आपण चालीस पनासानिसी व पाच सात घोडी याप्रा गलबतात बसोन सुरतेस गेले. सुरतवाल्याने राहावयास वाडा देऊन ठेविले. हे वर्तमान मुमइवाल्यास कलल्यावर त्याणीहि दोन हजार गाडद सुरतेस रवाना केले. याप्रा बातमी छ २९ मिनहूस आमदाबादेहून व खंबायताहून व घोग्याहून कमाविसदाराची लिहिली आली. तुम्ही त्या प्रांती याच मनसब्याच्या राजकारणास गेला आहा. श्रीमंत छ २० जिल्हेजी गलबतात बसोन गेले, तेव्हा या गोष्टीस आठ दाहा दिवस जाले. तुम्हास वर्तमान कलोन इकडे लिहून पाठविलेच असेल परंतु जासुदाचा निभाव होऊन आम्हापासी पावले नसतील. याजउपरी श्रीमताची बातमी पुरती सुरतेस पावलेयाची बारकाईने लाऊन मुजरत जासूदजोडी समागमे आम्हाकडे लिहून पाठवणे. दुसरे वर्तमान राजश्री साबाजी भोसले व मुधोजी भोसले यांची लढाई नागपुरानजीक होऊन मुधोजी भोसले याचा मोड जाला. दोन हजार गाडदी कापून काढिले. महमद इसफ यास पाच जखमा लागल्या. मुधोजीची फौज सिकस्त होऊन मुधोजीस धरून आणून आबारीत घातला आणि आंबारी साबाजीबावा याणी आपले आबारीजवल आणून पाव कोस पावेतो नोबती वाजवीत माघारे गेले, तो मुधोजी भोसले याचे कमरेस पिस्तुल होते ते काढून साबाजीबावा याजवरी गोल्या चालऊन ठार मारिले. याप्रा दगा केला, तेव्हां सहजातच फौजा साबाजीच्या पलाल्या. हे वर्तमान नवाबास कलताच सटवाजी

भोसले यास पत्र पाठऊन आपणापासी बोलाऊन आणिले व आपणहि आलजपुराहून कूच करून पुढे गेले. तमाम साबाजीबावाकडील सरदार होते त्यास कौल पाठऊन आपणापासी आणून सात आठ हजारपावतो जमा केले. त्याजबराबर जाबितजंग यास देऊन मुधोजीवर रवाना केले. त्याचा पाठलाग चादेपावेतो खामखा करावा याप्रा नबाबाचा मनसबा आहे. तमाम साबाजी भोसल्याचे लोक होते त्यास वराड प्रांती भोसल्याचा मुलूक होता तो जागीरसुधा सरंजाम करून देऊन आपले फरमाने करून दिल्हे आणि पाठ थोपटन सांगितले की मुधोजींचे पारपत्य चागले करावे. याप्रा नवाबानी करून आपणहि त्याच प्राती आहेत. साबाजी भोसले याचे वर्तमान श्रीमतास कळल्यावर सुरतेहून मुधोजी भोसले याजकडे नाना प्रकारे राजकारणे करून कागदपत्र खेळवितील, खटपट करावयास चुकणार नाही. परंतु नवाब वराड प्रांती असल्यास राजकारणेहि केली तर तरी तूर्त येणे जाणे कलतच आहे, परंतु प्रेत्नास चुकणार नाहीं. तुम्ही जागा जागा वाटाच्या नाकेबंद्या असतील त्याची चौकशी राखोन कागदपत्र न जात याप्रा बदोबस्त करून बारीकसारीक बातमी राखोन वरचेवर वर्तमान लिहून पाठवीत जाणे. राजश्री गोविंदराव गायेकवाड व खंडेराव गायेकवाड याजकडील सलूकाचा प्रकार राजश्री आपाजी गणेश याजकडून लागोल(ग) कागदपत्र गेले आहेत परंतु आद्याप उतर आले नाही. गायेकवाडास व आम्हास पनासा कोसाचे अंतर आहे. राजश्री वामनराव व रास्ते व आणखी पथके मिलोन दाहा पधरा हजार फौज पुढे खंबायेताकडे रवाना केली आहे. तुम्ही गेल्यापासून पाच सात पत्रे पाठविली आहेत पावली असतील. श्रीमंत सुरतेस राहिले तर तिकडे दंगाच आहे, त्यापक्षीं तुम्ही बहुत सावधपणें सुरत भडोचचा बंदोबस्त करावा. वर्तमान लिहीत जावें. पुण्याकडे ल्याहावें. मुंबईहून कांही सरजाम सुरतेस आला की काय तें ल्याहावे. साराश सावध असावे. इकडील गुता उरकता तर आम्ही सुरत प्रांती येतों, परंतु गायकवाडचे होय नाही कळल्याखेरीज कसें करावे? जलदी करावयाची तों करीतच असो. श्रीकृपेने घडेल तें खरें. साष्टी वसईकडील वर्तमान कलत जाईल ते लिहीत जावे. तुम्ही बदोबस्त कसकसा केला ते ल्याहावे. राजश्री गणेशपंत पेठे सरसुभेदारांकडील यास ऐवजाविसी लिहिले होते त्यास काहीं तर्तूद केली की काय ते ल्याहावे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant writes to Naropant full details of the flight of Raghunathrao from Cambay to Ghoga and from thence to Surat and of the fight between Mudhoji and Sabaji Bhosle and warns him to be always careful and circumspect since the troubles were on the increase. The letter is important for the full details it contains.*

6068

No. 160] [4-3-1775

पौ छ ६ मोहरम खमस
सबैन फाल्गूण मास

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता छ १ मोहरम मुा नजीक कपडबंद जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेस दाखल जाले. याप्रो पत्रे राजश्री बालाजी खंडेराव व बालाजी धोंडदेव व बहिरोपंत व गणेश हरि यांची छ २६ जिल्हेजची आम्हास व तुम्हांस आली तीं छ २९ मिा पावली. दोन्ही पत्रे वाचून पाहिली. वर्तमान कलले. डुमस पाा सत्रागांव येथे खुसकीस येऊन मुकाम केला. स्नान संध्या करून दुध प्राशन केले. वरकडानी भोजने केली. इंग्रजानी भांडींकुंडी पाठविली. हजार माणसाची चौकी इंग्रजाची आहे. मेस्त्र गंभीर भेटीस गेला होता. बहुत खुसीची बोलणी जाली. शहरांत येणार, परंतु मोगल इंग्रजास म्हणतो कीं माझे वरास अरिष्ट आणू नको; त्यावरून मुंबईस इंग्रजानी पत्रें पाठविली आहेत. जाब येईल त्याप्रो मुबईस जातील अगर येथे राहातील. इकडे फौज पांच हजार येती तर फैसला होता म्हणोन लिहिले होते. त्यास पहिली फौज त्या प्रांती आहे व तुम्ही फौज घेऊन गेला ते पावलाच असाल. तुम्ही जा तोंपर्यंत खुसकीस असेल तर पांच हजार फौज तुम्हाजवल आहे. निकड करावी. शहरांत गेले आसिले तर बंदोबस्त करावा. सुरतकर मोगलास ही गोष्ट मानली नाहीं असे लिहिण्यात आहे. त्यास मोगलाचे मानस आपल्याकडे मिलावें असें असल्यास त्यासी संधान लावावे. सरकारचे पत्र मोगलास द्यावी. पत्रांत इतकेंच लिहिलें आहे कीं, तुमचा स्नेह पहिल्यापासून सरकारांत चालत आला आहे. दादासाहेब तेथे आले आहेत, चिंता काय? आपलेच घरीच आहेत, अटकाव करून ठेवणे, असे लिहिले आहे. तुमचे विचारास आल्यास द्यावें. नाही तर ठेवावे. पांच हजार फौज तुम्हाजवल आहे व तुमची तर्तूदहि अधिक आहे. त्यास ज्या गोष्टीने सरकार काम होय ती गोष्ट करावी. जर श्रीमंत सुरतेत राहिले तर बंदी करावी. आम्हास वर्तमान लिहून पाठवावे. दुसरी फौज पाहिजे तर पाठऊ. आम्हास इकडे गायकवाडाचे कारभारामुले गुता आहे. हा उरकल्यावर आम्ही तिकडे येतो. पुण्याकडे वर्तमान वरचेवर लिंहीत जावे; आम्हास लिहीत जावें. भडोच

6069

सुरतची बंदी करावी. जितकी तर्तूद होईल त्यास तुम्ही चुकणार नाहीं. खातरजमा आहे. बहुत काय लिहीणें लोभ आसों दीजे हे विनंती.

¶*Haripant asks Naro Anandrao to watch the movements of Dadasaheb and not allow him to escape. He also asks him to induce the Mughal Governor of Surat not to give shelter to Dadasaheb there.*

No. 161] [*9-3-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ ६ मोहरम मुकाम नजीक कपटबंद जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. राजश्री माधोजी नानासेट आमोदकर याणी आम्हास पत्र लि॥ की राजश्री नारोपंत नाना यास आम्हाविसी पत्र पाठवावे त्याजवरून तुम्हास लि॥ आहे. त्याणी पेशजी तुम्हाकडे पत्र व कारकून पाठविला आहे. त्यास ते सागतील त्याप्रमाणे त्याजकडील कामकाज करीत जाणे. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal to Naro Anandrao recommending to his notice one Madhoji Nanaset of Amod.*

No. 162] [*9-3-1775*

पौ छ १४ मोहरम
सन खमस सबैन

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी.

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता छ ६ मोहरम मुकाम नजीक कपडबंद च्यार कोस जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही गेल्यापासून पत्र येत नाही व आम्ही दोन च्यार पत्रे पाठविली त्याचेहि उतर येऊन काहीच तिकडील वर्तमान कलत नाही. ऐसियास प्रस्तुत तुम्ही कोठे आहा, तिकडील वर्तमान काये? श्रीमंत कोठे आहेत? हे सविस्तर ल्याहावें.

6070

तिकडील बंदोबस्त कसकसा केला हे कलावे. इकडील वर्तमान तरी राजश्री गोविंदराव व खंडेराव गायकवाड पुढे येडुरास गेले होते तेथून राजश्री आपाजी गणेश याचे मारूफातीने येत आहेत. येथून तिसा कोसावर आले आहेत. तेथून त्याणी कुसाजी सिंदे व खडे आवजी यास रवाना केले आहेत ते आज येऊन पोहचतील. आलियावर तह ठरेल त्याप्रो लेहून पाठऊ. तुम्हाकडील काहीच वर्तमान कलत नाही याजकरिता मुजरद कासीद जोडी रवाना केली आहे. त्यास तुम्ही तिकडील व पुण्याकडील व साष्टिकडील सविस्तर ल्याहावे. श्रीमंतानी सात हती व शे दीडशे घोडे वगैरे काही सरंजाम भावनगरास टाकून गलबतात बसून सुरतेस गेले म्हणोन कलले, त्यावरून राजश्री वामनराव बाबा फौजसुधा भावनगरास गेले. सरजाम हातास लागला तरी घेऊन लवकरच येतील कलावे. तुम्हाकडील दिनचर्येचे वर्तमान कलावे याजकरितां लिहिले असे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal from Kapadwanj to Naropant inquiring where he was and how he was faring and informing him of the intended meeting of the writer with Govindrao Gaikwad.*

No. 163] [*10-3-1775*

पौ छ ९ मोहरम

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नारोपत नाना
स्वामीचे शेवेसी

सेवक राजाराम खंडेराव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ ७ मोहरम मुा कसबे बलसाड जाणौन स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीचे आगमन सुरत प्रांती जाले. यैकून परम समाधान जाले. पारचोलचे मुकामीहून पत्र पाठविले ते प्रविष्ट जालेच आसेल. पत्रोतरी पाठऊन सांभाल केला पाहिजे. यानंतर साष्टीकडील वर्तमान तरी प्रथम दिवस आहे. राजश्री विसाजी केशव चिरंजिवाचे लग्नानिमित्य पुणियास गेले आहेत. धारावीचे बुरजास इग्रजाने काम लाविले आहे. वसईचे बरोबरीस काम आणून मारगिरी करणार. दोह चौ रोजी पांच सात गोले टाकितो. विशेष लागू नाहीत. याप्रो वर्तमान आहे कलावे. सुरतकराचा वकील भांजगडीस आला आहे म्हणौन यैकिले. त्यास बलसाडचा तह करून घ्यावा, दरसाल पांच हजार रुा आहेत त्याप्रमाणे घ्यावे यैसा करार यादीत आणावा. मौ सारोली पो सत्रागाव येथील तह तीा

राजश्री कोनेरपंत आबा सांगतील त्याप्रो करारात आणावे. आपणाकारणे सेवगियाच्या सेगा सुमार ५० पाठविल्या आहेत, प्रा होतील. आम्ही आपले पदरचे कुटुंबातील जाणौन कलल तैसा सांभाल करावा. बहुत काय लिहिणे कृपेची वृध्दि करावी हे विनंती.

¶*Rajaram Khanderao supplies news about Balsad, Salsette, Dharavi and other places in Konkan.*

No. 164] [*10-3-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे
सेवेसी

पोष्य हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ७ मोहरम जाणून स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. हरि-भक्ती याजपासून मालव्यांत आलो तेव्हां दोन लक्ष रुा घेऊन आपणावर चिठी दिली. कारण समयास याणी ऐवज दिला. आपण देतील असे समजोन सावकाराची खातरजमा करून चिठी दिली, परंतु ऐवज पावला नाही म्हाणौन सांगितले. त्यास येथील वोढीचा प्रकार आपणांस ठाऊक आहे. राजांत सावकाराची मिनत करावी लागते. खर्च भारी कसे करावे. सर्व प्रकार आपले ध्यानात आहेत. आमची पत राखणार आपण आहेत. चिठीप्रो ऐवज पावे, याचा बोभाट न ये ती गोष्ट करावी. आपले भरोशावर बेफिकीर आसों बहुत काय लिहिणे कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Hari Ballal to Naropant Keskar asking him somehow to make payment to Hari Bhakti of the loan which he unhesitatingly gave when it was most urgently wanted.*

No. 165] [*14-3-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी

पो हरि बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ११ मोहरम जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ ४ मोहरमचे पत्र

वराशाचे मुकामचे पा ते छ १० रोजी सायंकाली पावले. लिहिले वर्तमान सविस्तर कलले. श्रीमंताकडून कुकाजी सिवराम आले होते त्याणी बारा सरदारांचीं नावे लेहून दिल्ही आहेत. याणी पत्रे लेहून देऊन आम्हास न्यावे-करार प्रो अर्थ घडोन आल्यास आमचे जिवाचे सोबती व्हावे असे भाषण जाले म्हणोन लिहिले व नावनिसीची याद पा ती पावली. त्यास सरदारानी पत्रे लेहून देऊन न्यावे असे म्हणतात, त्यास नेऊन करावे काय? द्यावे काय? हे काहीच नाही. मोघम लिहिले यांत काय समजावे? कुकाजीपंताचे भाषणांत आले नाहीं. आले नसिलें तर बोलण्यात काय हे मनास आणावें. दाहा लक्षाचीं जागीर द्यावी. गंगातिरी राहावे. फौज जवल असणे ती आमची असावी, तो प्रकार जाला नाही. आतां जागीर देणे तर पांच लक्षांची निखालसपणें राहिले तर द्यावीं ही गोष्ट मनांत ठेऊन त्यांचे बोलण्यांचा भाव काढून लेहून पा. सरदारानी पत्रे पाठवावी म्हणौन लिा त्यास श्रीमंतानी कसे वर्तावे हा आशय कललयावर पत्रे लिहून द्यावयास येतील. पुर्ते मनास आणून लिहिणे. श्रीमंतानी हजार पंधरासे माणूस इंग्रेजाकडील जमा केले आहे व मुबईहून दोन अडीच हजार माणूस तोफा आल्या. येथे जमाव पाडून बाहेर निघावे, छापा घालावा या उद्योगात आहेत. आम्ही सावध असो. फौज दाहा पंधरा हजार पुढे लौकर पाठवावी. तिकडील गायकवाडाचा गुता उरकून आपण लौकर यावे म्हणौन लिा. त्यास ते जमाव करितील. राजकारणे करतील. छापा घालवयास चुकणार नाहीत. तुम्ही सावधपणे असावे. बातमी चहूकडील राखावी. फौज पाठवावयाचा प्रकार तर उभयतां गायकवाडांची समजावीस करावी तर खंडेरायाचे सुधे आहे. गोविंदराव निमे वाटणी मागतात यास काय करावे? सोडता नये, धरता नये, असे प्राप्त जाले आहे. बोलतच आहो. प्रसंगानरूप जसे ठरेल तसे करून भेटीस बलावयाचे करितो. हे खूल ठेवणे ठीक नाही. जसे म्हणतील तसे ऐकून इकडील खूल मोडतो. वामनराव भावनगराकडे गेले आहेत ते तिकडे आहेत, लौकर येण्याविसी पत्रे पाा आहेत येतील. तुम्हाकडे फौज लौकर रवाना करितो. मुधोजीकडे श्रीमंतांची पत्रे गेली आहेत त्यास या काली मुधोजीनी यांची कुमक करावी असे दिसत नाहीं. श्रीमंत बापूची पत्रे येतात त्यांत नवाब व मराठी फौज साबाजीकडील येकत्र होऊन तमाम वराडांत ठाणी घातली. मुधोजीजवल जमाव फार नाही. त्याचे पारिपत्य करणार असें आहे. त्यापक्षी मुधोजीस आपली गाड साभालतां पुरे होईल. तुम्ही लिहिले की नवाब भागानगराकडे गेले ही गोष्ट प्रमाण नाहीं. वरचेवर पुण्याची लिहिली

घेतात की नवाबानी जमाव चांगला केला. मुधाजीचे पारपत्य करतात असें असतां भागानगराकडे गेले असे कसे होईल? श्रीमंत गपा उठ (अपूर्ण)

¶*Hari Ballal to Naro Anandrao discussing the terms of an agreement with Raghunathrao and asking him to ascertain definite details of those terms and cautioning him against a surprise attack.*

No: 166] *[15-3-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना
स्वामीचे शेवेसी

पो कोनेर रघुनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १२ मोहरम मुा मौजे बलसाड नजीक ठाणे सचीण पा सत्रागाव जाणून स्वकीये कुशल लेखन करावे विशेष. आज छ मजकुरी दोन प्रहरा आम्हाकडील प्रहस्त डुमसेहून आला. श्रीमंत कूच करून गेले. रा गोविंदराव गाईकवाड यासी सामील व्हावें हे वर्तमान आहे. दुसरे बडोदियासी जाणार. तिसरे वसईस जाणार याप्रमाणे आवई आहे. खरेखोटे न कले. इंग्रजास आठाविसीच्या सनदा करून दिल्ह्या. सुरतेची चौथाई काकोबा परभू यासी सनद करून दिल्ही. येणेप्रमाणे वर्तमान आहे. आम्ही आपले ठाण्यास यावे किंवा कोठे आसावे हे ल्याहावे. तुम्ही नजीक असल्यास आम्ही ठाण्यास जाऊ. नाहीतर आमच्याने ठाण्यात राहावत नाही. कारण की, सुरतेचे नजीक, रात विरात दगा करितील. दोन च्यारसे स्वार नेहमी तुम्हाकडील नवसरी रस्त्यावर चौकी राहील तर आम्ही ठाण्यात राहू. याचा विचार काय तो लिहून पाठवावे. वहुत काये लिहिणे कृपा वृ(धी) कीजे हे विनती.

¶*Koner Raghunath sends news to Naro Anandrao about the movements of Raghunathrao.*

No. 167] *[15-3-1775*

श्री

अखंडितलक्ष्मी आलंकृत राजमान्य
राजश्री नारो आनंदराव गो यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा खमस सबैन मया व अलफ तुम्ही छ ४ मोहरम व छ ५ मोहरमचे पत्रे पाठविले ते पावले. लिहिले वर्तमान

विदित जाहाले. तुम्ही लिहिला मजकूर तूर्त काही करावयाचा नाही. आपली खबरदारी करून सावधगिरीनें राहाणें. तुम्हापासी कोणी बोलावयास म्हणून येईल तो तुमची बातमी घेऊन जाईल अगर लेहून पाठवील, याकरितां सावधगिरीने राहाणे. सुरतेपासून दोन तीन कोसावर मुकाम करून राहाणे. हरिपंत तिकडून आलियावर बनेल तसे केले जाईल. तूर्त सुरतेची व भडोचची बंदी चांगली करणे. जाणिजे छ १२ मोहरम

¶*The Peshwa asks Naro Anandrao to encamp near Surat and to continue the blockade of Broach and Surat. He is further asked to allow no news to be filtered to the enemy.*

No. 168] *[15-3-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १२ मोहरमपर्यंत मुा नजीक कपटबंद प्रां गुजराथ वर्तमान येथास्थित असो विशेष. सुभानजी नाईक याजबार पनास जासूद तुम्हाकडे पाठविले आहेत. त्याचे रोजमरेयाची याद आलाहिदा पाठविली आहे. येक रोजमरा येथे दिल्हा आहे. पुढे दीड माही भरल्यावर यादीप्रो रोजमरा तेथे द्यावा आणि कामकाज घेत जावे. बंदोबस्त चांगला करावा बहुत काय लिहीणे लोभ कीजे हे विनती.

¶*Hari Ballal sends fifty messengers to Naropant Nana and asks him to remunerate them according to their service.*

No. 169] *[16-3-1775*

पौ छ २० मोहरम खमस
सबैन फालगुण मास गुरु-
वार सायंकाल.

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी+

विनंती उपरी. तुम्ही पत्र पा ते पावले लिहिले वर्तमान कळले. बारा जणांची नावनिसी पा ती पावली त्याचे उतर पा आहे, ते पावलेच असेल. चांगोजी

+ पत्र हरिपंत तात्याचें.

कदम यांस फौजसुधा तुम्हाकडे पा आहेत, पावतील. काल येथे वर्तमान ऐकिले की सुरतेतून तोफा व पायचे माणूस बाहेर निघाले. तुमची त्यांची गाठ पडली. तुम्ही हटून आठ कोस माघारे गेलेस त्यावरून चिंता लागली आहे. लिहून पा चांगोजी कदम याजबा सुभानजी नाईक व पंनास जासूद पा आहेत. आम्हास बातमी कलविणे व तेथील बदोबस्त करणे यास उपयोगी पडतील. वामनराव भावनगराकडे गेले. तेथे सात हती व पाऊणसे घोडे हाती लागले. त्यास येथे बलाविले आहे. लौकरच येतील. उभयतां गायकवाडाचे कारभारी आले. त्यांसी खातरजमेचे बोलणे बोलून भेटीस आणावें असे केले. पत्रे गेली येतील. भेट जाल्यावर कांही फौज इकडे ठेऊन आम्ही तुम्हाकडे येतो. वर्तमान वरचेवर लिहीत जावें. बहुत सावधपणे असत जाणे. देशातील कोकणांतील वर्तमान कलेल ते लिहीत जावें. रा छ १३ मोहरम, बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal inquires of Naro Anandrao details of a fight which the latter had with Raghoba's troops. He also informs him that the Vakils have been sent to him by the Gaikwad.*

No. 170] *[18-3-1775*

पौ छ १९ मोहरम दोन
प्रहर सन खमस सबैन पत्रे.

श्री २

[पहिला बंद गहाळ.]

पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी त्रीत असतील असो. कसेहि असले तरी इकडील गुता उरकून लौकर येणे प्राप्त आहे. येतो. पुढे फौज पाठवितो. तुम्ही सावध राहात जावें. येथून पनास जासूद व जासूद नाईक तुम्हाकडे रा करितो. बातमी व नाकेबंदी करावी. बातमी चागली राखावी. ही मोठी गोष्ट आहे. सरदारानी निरोपाचे लाविले आहे. काय करतील पाहावे. काल फतेसिगाकडे वर्तमान आले की सु(रते) तून तुम्हावर छापा घालावयास लोक आले होते. तुम्ही मारून काढिले व कुकाजी सिवराम बापूकडे गेले. तुम्ही लिहिले नाहीं. त्यास दिनचर्येचे वर्तमान आम्हास लिहून पाठवीत जावे. श्रीमंत बोलतात वगैरे वर्तमान तेथे आढलत जाईल ते पुण्यास डाकेबराबर लेहून पाठवीत जावे. बहुत काय लिहिणें लोभ

असो दीजे. सुरतेत कागदपत्र बाहेरील माणूस जाईल याची चौकसी पुर्ती करावी. कांही पायाची माणसे ठेऊन बाहेरील नाकेबंदी केल्यास कागदपत्र जाऊ पावणार नाहीं. हे विनंती.

¶*Haripant to Naro Anandrao writing that he would soon be coming to him and asking him to supply him details about the skirmish which he had with troops from Surat. He advises him to communicate to Purandar everu now and then news about Dadasaheb.*

No. 171] [*19-3-1775*

श्री

पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी. साष्टीकडील वर्तमान व फरासिसाकडील वकील पुरंदरी नेऊन त्यासी राजकारण पक्के केले. वसईस दोन वेळा इंग्रजाने मारगिरी केली. त्यास किल्यांतून सरंजाम बाहेर निघोन लागू होऊ दिल्हे नाहीं. इंग्रजाची गलबते माघारी गेली. खर्चाचे वोढीचा प्रकार लिहिला तो कलला. त्यास तुम्ही गेल्यावर फौजेस येक रोजमरा मोठे प्रेत्ने करून वाटिला. पैशास ठिकाणा नाहीं. श्रीमंत खंबाइतास आले तेव्हा फिरून मसलत पडली असे दिसते. ऐवजाचा मजकूर श्रीमंताकडे लिहून तेथून तर्तूद करून आणावी. गायकवाडाचे फौजेस पोटास नाही. उठून जातात म्हणौन लिा. त्यास तुम्ही जातेसमई खर्चाचा प्रकार गायकवाडास पुसून घेतला असेल. माहालचा वसूल घेऊन द्यावा. तुम्ही लिहिले की दोन चार दिवस ज्वर येत होता, आता आरोग्य आहे म्हणौन लिा ते कलले. सुरतकर मोगलास तूर्त पत्र ल्याहावयाचे प्रयोजन नाही म्हणौन लिा ते कलले. चहूकडे अडचणीचा प्रकार दिसतो, ईश्वर प्रात लावील तो खरा. पुरंदराहून पत्र आले होते कीं दाहा हजार फौज देसी पा. त्यास इकडे असा प्रसंग तेव्हा फौज कसी पाठवावी. असो, होईल ते खरे, पत्र पाठवीत जावे. रा छ १६ मोहरम हे +विनंती.

¶*Haripant gives instructions to Naropant on the points referred to him, pertaining to the movements of Dadasaheb, the attitude of Gaikwad and the payment to the armies.*

\+ पत्र हरिपंताचें.

No. 172] [20-3-1775

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत

नाना स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो गणेश कृतानेक सां नमस्कार विनंती उपरा. येथील कुशल ताा छ १९ मोहरम जाणोन स्वानंद लेखन करावयास आज्ञा केली पाा विशेष. स्वामींनी कृपा करोन पत्र पाा ते पावले. लिाा वर्तमान कळले. पाा वसराई येथे हरयेकविसी आमच्याकडून उपसर्ग लागतो म्हणोन यैकिले. यैसियास पाा मारास येकदर उपसर्ग न लागे ते करणे म्हणौन आज्ञा. त्यास आम्हाकडून उपसर्ग वसराईकडे कोणी येक माणूस जात नाहीं. वसराईचे गावचे भील येऊन हासोट पााचे गाव व पाटील ठार मारला हे वर्तमान पेशजी आपणास लिाच आहे. याप्राा तिकडून दंगा या दोही महालास होतो आणि आपणाकडे कोणी जाऊन खोटे वर्तमान सागोन आपण पत्रे लिहीतात तरी हे वर्तमान आपणास, त्यास व आम्हास बोलाऊन याची वाजीपुसी करावयाची सेवेसी उचित आसे. बहुत विस्तार काय लिहावा, सर्व तिकडील इकडील वर्तमान सेवेसी विदितच आहे. आम्हांकडून कांही वसराई पोयात माणूस उतरत नाही आणि आमचे तो माणूस बेकैदी नाही. त्याकडीलच भील रोज उठोन दगे करितात. येविशी मुदे परभारे रतनपूरकर पुंजाजी वाघेला यानीच पाा वसराई येथिल बरेदराव, भरण व दिणोद या तिहीं गावांस मागहि नेऊन लाविले आहेत आणि त्यांचे मुदेहि शाबूत आहेत. यैसे असोन तेच पत्रे धमकावणीची लिहीतात व आपणहि आज्ञापत्र पाो सिरसा बंद आहे. परंतु याचा विचार आपणच मनास आणावा. रतनपूरकर पुजाजी वाघेला याजकडे आम्ही त्याजकडेच माग लाविला. माग नेऊन बाजिनस तेथील पत्रे पाो आहेत. ती पेसजी बजिनस पोचहली, आपण पाहिलीच आसतील. कळावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*On being asked to stop plundering the province adjoining Vasrai from whence complaints were made to the addressee by the ryots, Naro Ganesh explains that it was the Bhils and not his men who were responsible for the harassment of the people.*

No. 173] [21-3-1775

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य

राजश्री नारो आनंदराव गोसावी यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुाा खमस सबैन मया व अलफ. राजश्री गोपाळ नाईक तांबवेकर यांजपासून सरकारांतून तुमचे मारफतीने फौज-

ठेऊन राजश्री फतेसिंगराव गायकवाड याचे कुमकेस तुम्हाबरोबर फौज देऊन रवाना केले. त्याप्रमाणे त्या प्रांती तुम्ही जाऊन आमल बसविला. रेवा उतर तीर भडोच निकोरेसुधा व सिनोर व कोरेल व राजपिंपले व दक्षणतीर सोनगड-पावेतो दरोबस्तदेखील सुरत आठाविसी येथिल सरकारांतून जप्ती तुम्हाकडे सांगितली आहे. तरी फौजेचे देणे व सरकारचे कितेक लढे गायकवाडाकडून उगऊन येणे. सबब सदरहू माहालची वैवाट सरकारतर्फेने गोविंद वासुदेव याचे गुजारतीने करणे. राजश्री गोविंदराव गायकवाड याजकडे वसूल काय पडिला व फत्तेसिंगराव याजकडे काय पडिला व फौजेस काय पावले, माहाली बाकी साल मजकूरपैकी काय येणे, फौजेचा पैका काय देणे हा अजमास समजोन लेहून पाठवणे. फतेसिंगराव याजकडून वराता जाल्या असतील ते मना करविल्या आहेत. दिकत पडणार नाही. वरातदार दिकत करतील तर त्याचे म्हटले न आइकणे. येविसी रा। हरि बलाल यांस लि। आहे. तेहि तेथे सागोन निवारण करितील. येविसी तुम्हीहि त्यास लिहीत जाणे. गायेकवाडाकडे सरकारचा यैवज येणे याकरिता माहालचा बंदोबस्त करून यैवज जमा करणे; जाणिजे छ १८ मोहरम आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa appoints Naro Anandrao to administer the Surat province and asks him to recover arrears from Fatesing Gaikwad.*

No. 174] [*23-3-1775*

पौ। छ २६ मोहरम फाल्गून
मास खमस सबैन.

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो आनंदराव गो। यांसी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ खमस सबैन मया व अलफ. तुम्ही विनंतीपत्र छ १२ मोहरमचे पाठविले ते छ १९ तारखेस प्रविष्ट जाले. श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेहून जलमार्गे भंडोज खबाईताकडे गेले. समागम इंग्रजाने लोक वगैरे सरंजाम दिल्हा आहे. येविसीचे बातमीचे वर्तमान लिहिले ते सविस्तर विदित जाले. राजश्री हरि बलाल यास व वसईस वगैरे जागा बातमी लिहून पाठविली. उतम केले. याउपरीहि तीर्थस्वरूपाकडील बातमी वर्तमान लिहीत जाणे. गायकवाडाकडील फौजबंदी पुरती आहे, आम्हास आज्ञा होईल

तर येऊ, येविसीचा व खर्चाचे आडचणीचा प्रकार लिहिला. त्यास तुम्हास तेथून येता नये. तूर्त तेथेच असिले पाहिजे, तरी यावयाचे येकंदर न करणे. सुरतचे मोगलाचा व इंग्रेजाचा ऐवज नेमणुकेचा माहाली आहे तो बेजरब वसुलात आणून खर्चाकडे लावणे. छ ९ मोहरमचे वगैरे येक दोन पत्रे बातमीची पाठविली तीहि पावली. मुंबईसहि आल्याची बातमी इकडून आली. तथ्य कोणती होईल पाहावी. जाणिजे छ २० मोहरम आज्ञा प्रमाण.

¶*Naro Anandrao is asked not to leave the place but keep on watching the movements of Raghunathrao who is reported to have reached Bombay.*

No. 175] [*23-3-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत
नाना स्वामीचे सेवेसी

बिनंती सेवक नारो गणेश कृतानेक सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ २० मोहरम जाणौन स्वानंदलेखन करावयास आज्ञा केली पा॥ विशेष. मौजे जालंदी पा॥ आकलेश्वर येथील गुरे आपले लस्करात गेली आहेत. पाटील मा॥र याणी वोलखली. त्यास पाटील व येथून माणूस दिल्हा आहे तरी कृपा करून गुरे सोडून देवावी. पाटलानी वोलखली आहेत. पायगुडे याचे लस्करात आहेत. ती मा॥रनिलेस सांगून सोडून देवावी. बहुत विस्तार काये लिहिणे, लोभाची वृधि केली पा॥ हे विनंती.

¶*Naro Ganesh to Naropant Keskar requests cattle being released which had been captured and kept confined.*

No. 176] [*25-3-1775*

पौ छ २६ मोरम खमस
सबैन

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी

पोष्य हरि बलाल कृतानेक सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ २२ मोहरम मु॥ खेडा येथे येथास्थित असे विशेष. तुम्हाकडील छ ८ मोहरमचे

पत्र आले होते त्याज आलीकडे पत्र येऊन वर्तमान कलत नाही हे आपूर्व आहे. इकडील वर्तमान तरी श्रीमंत खबाइतास आहेत. लढाईची तरतूद करीत आहेत. येथून वीस कोश आहे. राजश्री वामनराव भावनगराकडे गेले होते ते माघारे आले. श्रीमंत सुरतेस जातेसमई घोडी व हाती तेथील राज्यापासी ठेऊन गेले होते, ते घेऊन आले. उदईक येथे दाखल होतील. उभयेता गायकवाड याजकडून खंडो आवजी आले हे वर्तमान पेशजी लिा होते त्याजवरून कललेच असेल. साप्रत त्याजकडे निखालस्तेची पत्रे पाठविली त्याचे प्रतिउतर आद्यापि आले नाही. येका दो रोजात येईल. तुम्ही कोणे जागा आहा वर्तमान काय हे काहीच लिहिले नाही यावरून अपूर्व वाटले. सुरतेचे व भडोचेचे बंदीचे काय केले, तिकडील वर्तमान काय ते लिहीले पाहिजे. तुम्ही दिनचर्येचे वर्तमान लिहावे असे असता पंधरा दिवस कागद नाही यावरून काय समजावे? इकडील प्रकार तर उभयता गायकवाड भेटणार, त्यांचा अद्यापि येक प्रकार नाहीं. काय भेटतात किंवा श्रीमंताकडे जातात हे काही समजत नाहीं. तूर्त लाबणीखाली गोष्ट पडली आहे. श्रीकृपेने घडेल ते खरें. सुरतेहून श्रीमंत सरजाम घेऊन निघाले. त्यास गोरा किती व वरकड गारद किती, तोफा वगैरे सरंजाम काय, पुस्तपन्हा कसकसा करणार, खर्चाची तजवीज काय केली, जो पैका लागेल तो इंग्रज देणार किंवा श्रीमंत जवाहीर देऊन घेणार, याचा मुली मनसुबा कसकसा जाला आहे याचा शोध सुरतेत करून कचे वर्तमान लिहून पाा. देशचे वर्तमान नवल विशेष्र आढलत जाईल ते लिहीत जावे. आम्ही कसकसे करावे ते सुचवावे. मुख्य गोष्ट दररोज येक पत्र तुमचे यावे ते येत नाही ये गोष्टीचा अचंबा आहे. वरचेवर लिहीत जावे. बहुत काय लिहीणे; लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant reprimands Naro Anandrao for not sending him constant communications about the movements of Raghunathrao, the English and the blockade of Surat and Broach. He informs him that the attitude of the two Gaikwads is not yet decided.*

No. 177] [*29-3-1775*

पौ छ ८ सफर मुाा नाा

काा उरपाड डाकेबराबर

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पाो हरि बलाल साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २६ मोहरम मुकाम कोतरा नदी नजीक खेडे कोस च्यार. येथास्थित जाणौन स्वकीय

कुशल लिहित जाणे विशेष. तुम्ही कसबे कामरेज तापीतीर येथील मुकामीहून पत्रे येणे प्रा।

१ छ ९ रोज
१ छ ११ रोज
१ छ १२ रोज
१ छ १६ रोज

येकूण सदरहू तेरखाची मोहरमची पत्रे पाठविलीत तीं छ २९ मिनहूस पावली. श्रीमंत राजश्री दादासाहिब सुरतेस आले, तेथून मुमईस पत्रे पाठविली. उतर येईतोपावेतो इकडे आम्हाकडे राजश्री कुकाजी सिवराम यास पाठऊन सलुकाचा सदर्भ लाऊन बारा सरदार दरम्यान घ्यावे याप्रा। बोलणे लाविले आणि आंतरयामी दोन च्यार हजार इग्रज व गाडदी व तोफा याप्रा। जमा करून छापाहि घालावयास सांगितले. छापा आला तो आम्ही राखोन सावध होतो. साभाळून निघोन गेले हा मजकूर याप्रा। जाला. मुमईहून इंग्रजाने फिरगी व गाडदी व इंग्रज व तोफा वगैरे जंगी सामान रवाना केले ते येथे पोहोचताच भडोजेचे वगैरे माणूस मिलाले. आवघे पाचसात हजार व तोफा वगैरे सरजाम घेऊन वसईस जाणार असी आवई होती परंतु तिकडील मसलत राहोन खंबाइतास गेले आणि गायकवाड यास व त्यांजकडील कारभारी आहेत त्यास पत्रे लिहून पाठविली की तुम्ही येकंदर सलूक न करावा, आम्ही खंबाइतास दाखल जालो, तुम्ही आम्हापासी येऊन पोहोचावे या प्रा। जाले. सलुकाचा प्रकार राहिला. आपणाकडे गायकवाडाकडील कारभारी सलूक करावयाकरिता आले होते त्यास कोणेक प्रकारे समजूत पाडून गायकवाड आपले करावे म्हणजे गुंता लवकर उरकेल. तिकडील गुंता उरकून लौकर देशी यावे यात उतम. श्रीमंतानी इंग्रेजेयास पधरा लक्ष्याची जागीर देऊन सनदा करून दिल्या. तुम्हासी लढाई करून मग श्रीमतास पुणियात नेऊन बसवावे, च्यार हजार माणूस नेहमी जवल असावे, दरमाहाचा दरमाहा देत जावा. गोविंदराव गायकवाड याची व श्रीमताची गाठ पडली नाही तो गायकवाडाच्या भेटी होऊन फडशा करावा. नागपुराकडील वर्तमान सविस्तर पेशजी कललेच आहे. नवाब तिकडे आहेत मुधोजीचे पारपत्य करितील परंतु तो लाढाई समोर देणार नाही, देशी उपद्रव करील. कर्नाटक प्रांती धारवाडाकडे पालेगारानीहि काही उपद्रव माडिला आहे. तिकडे तूर्त फौजा पाठवावयास सोये नाही. हैदरखानहि बल्हारी वगैरे इकडे उपद्रव देत आहे. वसईकडील व साष्टीकडील मजकूर तरी आद्यापि काही सरकारचे मोरचे साष्टीस बसले नाही. धुलप व राघोजी आगरे व सिवाजी विठल व राजश्री विसाजीपंत दादा पाच सात हजार फौज व काही पायेचे माणूस याप्रा। सभोवते

उतरोन राहिले आहेत. राजश्री विसाजीपंत लेले याणी वसईचा बंदोबस्त चागला केला आहे. श्रीमंत सुरतेस आले, याजकरिता आणखी दोन हजारपावेतो फौज आम्हाकडे रवाना करावी म्हणोन पेशजी लिा होते परंतु श्रीमत खंबाइताकडेस गेले तेव्हां मसलत तिकडे पडली. आम्हाजवल फौज आहे त्यास रोजमरा पाहिजे आम्हाजवल तो ऐवज नाही. पुरंदरास श्रीमंत राजश्री नाना व बापू यास पत्रे पाच सात पाठविली परंतु ऐवज पाठविला नाही. बंदी करणे म्हणौन मात्र पत्रे येतात. आपली मार्गप्रतीक्षा करीत आहे. खर्चाविसी काही उपाये चालत नाही. खर्चाची बेगमी जाल्यास महिनाभर राहावयास येईल. सरंजामी फौज दोन हजार इकडे पाठवावी व त्यासमागमे दोन तोफा सरजामसुधां पाठवाव्यां. खबइताकडे सरकारच्या फोजा आहेत त्यास पत्रे पाठऊन आपणापासी आणवाव्या. रातबिरात छापा घालितील. सारांश प्रकार हाच की आपण तिकडील गुता उरकेल तसा उरकोन घ्यावा आणि देशी लौकर यावे म्हणजे सर्व गोष्टी ठीक होतलि. ऐसे कितेक प्रकारे तपसिले लिा ते अक्षरशा कलले. त्यास श्रीमंत सुरतेस गेले. इकडील गायेकवाडाकडील सलुकाचे राजकारण राजश्री आपाजी गणेश आम्हास येऊन भटले आणि गायेकवाडाकडे कारकून व पत्रे त्याणी पाठवेली त्याजवरून गायकवाडाकडून राजश्री खडो आवजी वगैरे दोन तीन ग्रहस्त आले. उपरांतिक आठ च्यार दिवस बोलता बोलता राजश्री माहादजी सिंदे व तुकोजी होलकर याचे विद्येमाने ठराव होऊन कागदपत्र गेले. बोलण्याचा गुंता काही राहिला नाही. खडो आवजी व आणखी ग्रहस्त आले होते ते आम्हापासीच आहेत, परंतु अद्याप त्याजकडलि कागदाचे उतर व तेहि आले नाही. खडो आवजी मात्र खातरजमा करितो की काही गुता पडणार नाही. करारापा येतील. परंतु कागद पाठविले त्यचे उतर नाही व तेहि समीप येत नाही व श्रीमतानी त्याजकडे पत्रे पाठविली, तेव्हा चितात आंदेशा करितात किंवा श्रीमंताकडीलहि ग्रहस्त तेथे आहेत त्याणी अडथला त्याच्या येण्यास केला हे काही समजत नाही. बरे. असो. आपल्ये तर्फेने जे करावयाचे ते करीत असावे. सिधीस नेणार श्रीगजानन आहे. राजश्री वामनरावबावा व रास्ते वगैरे फौजा भावनगराकडे गेल्या होत्या त्या आवघ्या छ २३ मोहरमी आम्हापासी येऊन दाखल जाल्या. राजश्री माहादजी सिंदे डाकोरास श्रीच्या दर्शनास गेले आहेत ते अद्याप आले नाही. पुढे लोणावाड्याकडे गेले. त्यासहि पत्रे लौकर येण्याविसी गेली आहेत येतील. खर्चास नाहीं म्हणौन जाण्याची उतावली कराल तर न करावी. आगेमागे खर्चास पोहचेल. गायकवाडाचे माहाल आहेत. सरकारचे आहेत. तजविजेने काम चालवावे. चांगोजी कदम यास

6083

इकडे बलाविले होते. त्यास फिरोन लिहिले की नारोपंताकडे जाणे. त्यास तुम्ही व ते मिलोन सुरत भडोचची जफ्ती बंदी जरूर करावी. आम्ही इकडे आहो तजविजेस कमी करीत नाही. श्रीमंत खंबईताबाहेर येक डेरा देऊन दोन च्यार हजार माणूस समागमचे आहे ते घेऊन बसले आहेत. आपले फौजेची वाट पाहातात. आम्ही फौजसुधां मधी आहों, तेव्हां खंबइतास फौज त्यांची जाते कसी? गायकवाड आम्हाकडे येऊन मिळाले तर मग दिकत पडत नाही. आम्हास खर्चास नाही, मोठा पेच येऊन पडला आहे. प्रांत ईश्वर लावील तो खरा. तुम्ही तिकडे आहा यामुळें आम्ही स्वस्थ असो. उतावली न करावी. वर्तमान वरचेवर लिहीत जावे. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

राजश्री बालाजीपंत स्वामीस साा नमस्कार पत्र पाा ते पावलें वर्तमान लिहीत जावें हे विनंती.

¶*Hari Ballal to Naro Anandrao communicates the news about the negotiations carried on with the Gaikwads—Govindrao and Fatesing through Mahadaji Sindia. He also advises him to raise money from the Gaikwad's province for the maintenance of his army and to tighten the blockade of Surat and Broach with the help of Changoji Kadam.*

No. 178] *[March 1775?*

श्री

राजश्री महिपतराव खवडे गो-
सावी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री हरि बलाल आशीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. तुम्ही आम्हाजवळ आला तेणेकरून बहुत संतोष जाहाला होता. हलीं तुम्ही गेला त्यामुळे चितास परम वाईट वाटलें आहे. तुम्ही आम्हापासून जाऊं नये. सध्या दिवस वोढीचे आले आहेत. तुम्ही जाणतच आहां. तशांतहि तुमची सोय थोडी बहुत करून यादी पाठविली आहे. वरकड गोष्टी चितांत आणितां तुम्ही आले पाहिजे. तुमच्या करण्यास दुसऱ्याने कोणी सांगावे लागणार नाही. प्रसंग वोढीचा याजकरितां उपाय नाही. सर्वथैव पुढें न जावे. चाकरीच्या प्रसंगी तुमचे स्वरूपानरूप करून चाकरीची योजना घडेल. तुम्ही मोठेपणे असावे हीच इच्छा आहे. परंतु प्रसंग वोढीचा याजकरिता थोडे बहुतानें

च्यार दिवस गुजराणी करावी. श्रीकृपेने अनकूलता सर्व होईल. जरूर यावे. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal urges upon Mahipatrao Kavade the necessity of his presence in the army and assures him that he would try to meet his demand for funds as far as possible.*

No. 179] [*March 1775*

श्री

पुा॰+ राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी. येथील वोढीचा प्रसंग आहे. तो काय लिहून? सर्वत्र असीच गत जाली आहे. तथापि आपण आम्ही येकत्र जालो असतां कांही तोड काढितो. परंतु येथून पाय निघेना. याजकरितां गुंतलों. लोकांची धरणी पारणी नित्य लागली आहेत. असो. श्रीमंतांचे प्रतापेकडून सर्व पार पडेल. श्रमाचे दिवस सर्वकाल राहाणार नाहीं. रास्ते येकीकडे वोढितात. कोणास बोलता येत नाही. ते तुम्हांत मिलोन असते तर आज सुरतेकडे गेला असता. असो जे आहे ते बरेच आहे. इतके दिवस तुंम्ही दमं धरला तसा च्यार दिवस धरावा. माझी तुमची भेट जाल्यावर करणे तसे करू. गुजराथची बातमी पकी राखावी. मजकडे लिहीत जावी. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Haripant asks Naro Anandrao to pull on somehow or other with the hard times which he assures will not continue long. The writer complains of the attitude of Rastia.*

No. 180] [*March 1775*

श्री

विनंती[1] विशेष. रा दौलतराव हरि[2] रा गोविंदराव गायेकवाड यासमागमे श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे निसबतीने बडोद्याचे मसलतीस, तेथोन रुसवा तलाबेमुले करून श्रीमंताकडस जावे या उदेश नर्मदा उ(त)रून तापीतिरास आले. पुढे श्रीमंताकडस जावे, त्यास दक्ष(ण) दिशेहून श्रीमंताचे पत्र मारनिलेस पहिले

\+ पत्र हरिपंताचें. १ पत्र गोविंद रघुनाथ व दताजी नारायण यांचें.

२ 'हरी' नको 'बाबूराव' पाहिजे लेखकाचा हस्तदोष आहे.

आलेच होते तिकडस जावे, तों उतर दिशेस श्रीमंताकडेस चुलता सखाराम हरि आहेत त्यास प्रतिबंध होऊन येईल यास्तव दक्षणेस जाता नये. उत्तर दिशस जावे तर बाबुराव हरि दक्षणेस अटकस आहेत त्यास उपद्रव होईल यैसा प्रकार दौलतरायास घडला आहे. यास्तव उभयेता श्रीमंताचा प्रकार कसा घडोन येतो, तोंपर्यंत आठ पधरा रोज याच प्रांती दिवस काढावे. उपरांत ज्या पक्षी जाणे तिकडस जावे, यैसा विचार होता. त्यास आपण फौजसुधा या प्रांती आला. लटका हर्शामर्ष कही काबाडामुले घडल हे जाणून कूच करून गेल्यावर गेले. तेथे मोकाम आहे. दौलतराव याजसमागमे दोन अडीच हजार कमीच फौज आहे. यासिवाये हजार बारासे पाहुणे आले होते ते निघोन गेले. कदाप आपले चितात दौलतराव याचा संदेह असेल तर तो प्रकार त्याचे चितात नाही. याप्रमाणे वर्तमान आहे कळावे हे विनंती.

¶*The writer communicates news about Doulat Baburao and Sakharam Hari and their movements.*

No. 181] *[1-4-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक नारो गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ता। छ २९ माहे मोहरम येथास्थित कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. मी आपली आज्ञा घेऊन स्वार जाहालो ते आज दोन प्रहरी ठाणे मारी दाखल जाहलो. येथील वर्तमान तर भडोचकराचा फार दंगा आहे. येका दो रोजानी आकलेस्वरी चढाई करावी यैसा इत्यर्थ ठरला आहे. तेथून बातमी तथ्य आली आहे; तर आपल्याकडील शंभर स्वार उद्‌ईक पा। द्यावे. येक दोन रोज ठेऊन घेऊ. दो चौ रोजानी पा। देऊं, कलावे; तर खामखा शंभर स्वार पा। द्यावे, अनमान करू नये. बातमीहि तथ्यच आली आहे; आणि तो उपद्रवहि करावयास चुकणार नाही; तर राऊत पा। द्यावयास अनमान करू नये. दुसरे श्रीमंत तात्या खंबाईतास आले म्हणून बातमी आली आहे; व आपणाकडून सांडणीस्वार आले ते दाहा राऊत व दोघे सिपाई देऊन आज रवाना केले. त्यानी वर्तमान सांगितले

की राजश्री नारो आपाजी यास देवआज्ञा जाहाली म्हणून स्वार माराने सांगितले. आपल्यास कळलेच असेल. इकडील वर्तमान नवल विशेष आल्यावर लिहित जाईन. कळावे, सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Naro Ganesh informs Naropant Keskar of the hostile attitude of the Subhedar of Broach. He further gives news of the arrival of Haripant Phadke at Cambay, and refers to the death of Naro Appaji Tulsibagwale.*

No. 182] *[2-4-1775*

पौ छ ७ सफर सुा परिया
पा उरपाड शनवार

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १ सफर मुकाम साबरमती प्रा गुजरात जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २१ मोहरमचे पत्र पाठविले ते पावले. श्रीमंत खंबइतास गेले. त्यास पोहोचवावयास सुरतकराची गलबते गेली ती माघारी आली. सुरत शहरात इग्रज माणूस ज्याजती ठेवीत आहे. मातबर जमाव करणार, पुढे काय करणार हे कळत नाही. रातबिरात आम्हावर गलब करणार, आम्ही तो खबरदारीनेच आहों. आपण तिकडील गुंता गायकवाड याचा उरकून काही फौज आमदाबादे-लगती टाकून आपण फौजसुधा इकडे यावे. श्रीमंत कदाचित सुरतेकडे आले तरी भारी पडेल. दोन च्यार हजार फौज तूर्त आम्हाकडे पाठवावी. चागोजी कदम यास तो रवाना आपण केले ते बडोद्यानजीक राहिले आहेत. त्यास पत्र पाठवावे म्हणजे लौकर येतील. आम्हाबराबर राजश्री फतेसिंगराव गायकवाड याजकडील फौज होती, त्यास तिकडे अताजी नागेश कारभारी जाले सा तजावजा होऊन काही देशास गेले. काही आहेत त्यास खर्चास ऐवज नाही. आठा-विसीच्या माहालांत बाकी होती ती वसुलात येत नाही. बंदीमुळे खराबी जाली. यापुढे त्या फौजाचा भरवसा चाकरीचा येत नाही. सरकारची फौज आहे ते आपणास विदितच आहे. सुरतेस स्वदेश वराड व खानदेश तिनी नाक आहेत. श्रीमत आले तरी कोणीकडे राजकारण करितील ते कळेना. उरपाड व आकलेस्वर वगैरे सुरत आष्टाविसीतील माहाल दाहा लक्ष्याची जागीर श्रीमंतानी इंग्रजास देऊन सनदा करून दिल्या. इंग्रज ठाणी बसिवणार आसे वर्तमान आहे. श्रीमतानी

दाहा लक्षाचे जवाहीर इग्रजाजवळ ठेविले होते त्याजपैकी तीन लक्ष रुपये घेऊन गेले. श्रीमंतास पुरंदरास फौजेच्या खर्चाविसी लिा होते. त्यास उतंर आले की मोगलाई आमल सरकारचे माहाली आहे तो वसूल घेऊन खर्च करणे. त्यास मोगलाई आमलाचा वसूल मागेच झाडून त्याणी नेला. हा प्रकार सर्व आपल्या ध्यानात आहे. साराश आम्हास चहूकडून आडचण याचा परिणाम करणार आपण आहेत. ऐसे कितेक प्रकार लिा त्याजवरून सविस्तर कळले. त्यास गायकवाडाकडील प्रकार तरी रा खंडो आवजी येऊन बलोन ठराव होऊन कागदपत्र गेले, परंतु आद्याप आले नाहीत. श्रीमंतहि खंबइतास येऊन त्यास पत्रे पाठविली आहेत हाहि प्रकार आहे. तूर्त आसा प्रकार असता तिकडे यावयाचे घडत नाही. रा चागोजी कदम तुम्हाकडे रवाना केले होते ते बडोद्यापावेतो गेले. तेथून माघारे येणे म्हणौन पत्र गेले होते+ परंतु ते आम्हापासी आले. पत्र पावले नाही. माघारें आणावयाचे कारण हेच कीं राजश्री वामनराव काठेवाडाकडे गेले. आम्हाजवळ फौज नाही. राजश्री माहादजी सिंदे लोणवाडाकडे गेले आहेत. याजकरितां चागोजी कदम (अपूर्ण)

¶Haripant notes the contents of a letter from Naro Anandrao regarding the journey of Dadasaheb to Cambay under English protection and the assembling of English troops at Surat and gives him instructions regarding the line of conduct he should adopt. He also explains why Changoji Kadam was asked to return from Baroda.

No. 185] [*2-4-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. रा सटवोजी आटाले व हिरोजी आटाले हे राजश्री गोविदराव गायकवाड याजकडे होते ते दौलत बाबूराव यासमागमे देशी जात होते, तेव्हा तुम्ही स्वार लुटिले. त्यास तुम्ही येथे आला होता त्यासमई घोडी द्यावी असा करार जाला तेव्हा काही घोडी येथे होती ती दिल्ही. बाकी तेरा राहिली ती द्यावी याप्रा करार जाला आहे. त्यास जे घोडी व उटे पाच

\+ व मागती तिकडे जाणे म्हणोन पत्र गेले होते.

याची यास देणे. करार जाल्याप्रो निभावावे. याउपरी हिसका देऊ नये. रा छ १ सफर बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal asks Naropant to return the horses to the Atoles who were deprived of them when going from Govindrao Gaikwad to Daulat Baburao.*

No. 184] [*5-4-1775*

पौ छ ८ जोवल
सीत आषढ

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ४ रबिलोवल वर्तमान येथास्थित असे विशेष. रा मनोहर भिवराव दिा निबाजी पांढरे हे राजश्री गोविंदराव गायेकवाड यांजकडे होते. मधी गोविंदराव इकडे येणार तेव्हां बोलण्यांतहि होते; परंतु ते यांस दगा देऊन गेले. मारनिले राजश्री खंडोपंतासमागमे आम्हाजवल आले. यांचे मुलामाणसास तगादा होऊन जामीन घेतला आहे म्हणोन ऐकिले. त्यास मारनिले येथे आहेत. सरकार लक्षाखेरीज नाहीं. याजकरितां याचे घरी कोणेविसी अडथला न करावा. जामीनकतबा घेतला असेल तो माघारा देवावा. हे स्वामीचे सेवक आहेत. दुसरा विचार नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal informs Nana Fadnis not to molest the family of Manohar Bhivrao who has of late deserted Govindrao Gaikwad's party and joined the Barbhais.*

No. 185] [*9-4-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ८ सफर मुकाम नजीक ढवलके जाणौन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही छ २३ व छ २४ व छ २६ व छ २७ मोहरमची व छ १ सफरचीं पत्रे पाठविली तीं पावली. श्रीमंत खंबाइतास गेले ते समई गोरे व गाडदी मिलोन पाच हजार माणूस व तोफा चालीस पनास वगैरे लढाईचा सरजाम घेऊन गेले.

उरपाड व हासोट व आकलेस्वर तीन परगणे इग्रजास जागीर देऊन सनदा करून दिल्या. इग्रजाने तूर्त कुमक करावी, खर्चास मागो नये, आपली लढाई फते करून पुणियासी नेऊन बसवावे, च्यार हजार सरंजाम नेहमी श्रीमंतापासी असावा, त्यास रोजमरा द्यावा, उपरातिक सुरत आठाविसी झाडून द्यावी. हाली सरजाम इग्रजाचा समागमे आहे त्यास खर्चास दाहा लक्ष रुपयाचे माहाल उरपाड, हासोट व आकलेस्वर येथील सनदा करून दिल्या. तेथे आमल बसवावे या उदेशे बाहेर निघणार. श्रीमंतानीं तीन लक्ष रुपये आपले फौजेस व गोविंदराव याजकडील मिलोन पाठविले. बडोद्याहून सा लक्ष्याचे जवाहीर इग्रजाकडे पाठविले होते ते श्रीमंत समागमे घेऊन गेले. गायकवाडास व आपले कारभारी यास आगोधरच पत्रे पाठविली होती की आम्ही खंबाइतास जातो, तुम्ही हर तजवीज करून आम्हापासी येणे. येकत्र होऊन येकदा लढाई करून याप्रा मनसबा केला आहे. आवघे येकत्र जाल्याने भारी पडेल. तूर्त इंग्रजास येक पैसा श्रीमंतानी खर्चास दिल्हा नाही. माहालच्या सनदा मात्र दिल्या. नख्त तीन लक्ष रुपये श्रीमंतापासी खर्चास आहेत. आपण हरतजवीज करून उभयता गायकवाडाच्या भेटी घ्याव्या म्हणजे मनसबा लांबणार नाही. श्रीमंत माघोरे सुरतेस येतील. आपण दाहा हजार फौज छावणीस ठेऊन सुरत प्रांती यावे. श्रीमत राजश्री बापू नाना याजकडील पत्रे छ २० मोहरमची आली होती. देशी स्वस्त आहे. नवाब चाद्यावर गेले. मुधोजी भोसले याणी दर्याबाई वगैरे छतीसगडी ठेऊन आपण सडे होऊन मुल्लूक मारणार. वसई साष्टीकडील वर्तमान आहे त्याप्रा आहे. छ ८ मोहरमापासून नित्य वर्तमान लेहून पत्रे पाठवीत जातो, परंतु पावतात न पावतात हे कलत नाही. डाकेचा बदोबस्त चागला करावा. आम्ही इकडे राहोन आपणास पत्रे वरचेवर पोहोचत नाही तेव्हा आमचा उपयोग काये? शब्द लागतो. मल्हार बाबूराव व जासूद यास येक रोजमरा देऊन बंदोबस्त करविला. चौहूकडील बातमीचा बदोबस्त वरचेवर करीत आहे. रिकामा बसत नाही. हाली सुरतेत जमाव होत आहे. बाहेर आमल बसवावयास निघणार. बंदी राहून माहालची कालजी, कमाविसदार चहूकडून वर्तमान आणून घाबरे करितात. याजकरिता येक जागा जमा होऊन बातमी राखोन आहो. ठाणियावर आल्यावर बेजरब गला पडून येक वेल त्याचे पारपत्य केल्यासिवाये परिणाम नाही. आपण राजश्री चागोजी कदम रवाना केले तेहि माघारा नेल ऐसेहि वर्तमान ऐकिले. आम्हापासी फौज किती, काम मातबर, इंग्रजासी संमध, स्वदेश समीप, येथे वाकडी गोष्ट पडली म्हणजे ठीक नाही. नाना प्रकारे वदंता उठोन आपल्याकडील कागदपत्र डाक बातमी काहीच

चालणार नाही. येथील मजबुदी चागली आसावी. बहुत वेळा लिहिले, परंतु फौज न आली. आह्मी इतक्यानिसी रात्रदिवस श्रमास अंतर करीत नाही. बापूजी जनार्दन परभू, थोपटे, सूर (?) वगैरे पथके दिा फतेसिंगराव गायकवाड याजकडे होती. त्याची कारकुनी करीत आसतां सखाराम हरि याजकडे सूत्र सुरतेहून केले. कागदपत्र सापडले त्याजवरून कैद केला. त्याजपासी काही कागदपत्र सखाराम हरि व आबाजी माहादेव व विठलदास रामदास सावकार याजवर हवाला इदुरी सिंदे होलकर याच्या मारफतीने ऐवज पावला. त्याजपैकी बाकी ऐवज पाऊण लक्ष्यपर्यंत गुमस्ते याजकडे राहून गुमस्ता उठोन पुणीयास गेला म्हणौन उभयतानी सराफ श्रीमंताच्या बाजारात होता त्याने पत्रे व हुड्या पाठविल्या त्या सापडल्या. कागद पाहून पुरंधरास रवाना केले. ऐवज हातास लागला तरी उतम. पतेवार आहे. ऐवज पावला नाही असे स्पष्ट बापूजी जनार्दन याच्या पत्रात आहे. चौहूकडून सावधगिरीस अतर करीत नाही. सुभानजी नाईक पाठविले ते पावले. जागा जागा नाकेबंदी पाहोन कागद (प)त्राच्या चवकसीस ठेवितो. खर्चाची मोठी आडचण आहे. आपण तिकडील मसलत आटोपून येतील तो सुदिन. दोन हजार फौज जरूर पाठऊन द्यावी. आनमान केल्याने मसलत भारी पडेल. मार्ग सुरक्षित होणार नाहीं. आम्हावर नाकारेपण येईल. सखाराम हरि याची स्त्री व चिरजीव मुबईहून सुरतेस आली. मुंज चैत्र सुधात होणार. आज छ १ सफरी सुरतेतील सरंजाम बाहेर निघणार. निघाला. उरपाडास जाणार किवा आम्हावर येणार पाहावे. स्वार बातमीस पाठविले आहेत. श्रीमताची पत्रे पुरंदराहून येतात की बंदी करून इग्रजास व मोगलास तंबी पोहोचवणे. आमचा भ्रम आजपावेतो या प्रांती आहे. गाई कुणबिणी वगैरे चागोजी कदम याणी रवाना केल्या. त्यासमागमे स्वार देऊन पुढे रवाना केल्या. सिंदे होलकर निरोप घेऊन जाणार ऐसे ऐकितो. गायकवाड व सखाराम हरि वगैरे उदेपुराकडे गेले म्हणौन ऐकितो. खर्चाविसी पुरंदरास लिा होते त्यास उतर आले, की मोगलाईचा ऐवज वसूल घ्यावा. त्याजवरून मामलेदारास आणून ऐवज मोगलाई वसूल घ्यावा तरी माहाली बाकी राहिली नाही. आपली मार्गप्रतीक्षा करितो. गायकवाडमधील फौज आहे. त्यास सिवरात्रा येकादशी आहे. आम्हास परिछिन्न पुरदराहून ऐवज येत नाही. मोगलाई आमलाचा प्रकार तरी समजलाच आहे. यात आपण काये बुधिवाद सागोन लिहावयाचे ते लेहून निभावणी होये ते केले पाहिजे, म्हणौन तपासिले सविस्तर वर्तमान लिा ते कलले. त्यास मोगलाई आमलातील वसूल हात पोहोचेल तितका करून पैका घ्यावा. इकडील वर्तमान तरी श्रीमंत सुरतेहून खंबाइतास दाखल जाले. जमाव

6091

करीत आहेत. गायकवाडास व सखाराम हरि वगैरे यास पत्रे पाठविली की येकदर सलूक न करणे, आम्हापासी येणे. हे वर्तमान आम्हास कलताच कपटबंद येथून कूच करून साबरमतीवर ढवलक्यानजीक मुकाम करून राहिलो. खंबइतास आम्हास बारा कोसाचे अंतर आहे, तेव्हा मध्ये असतां ते येऊ सकणार नाही. राजश्री खंडो आवजी गायकवाडाकडील येऊन भेटोन बोलोन करारमदार ठराऊन कागदपत्र गेले त्यासहि फार दिवस जाले. आद्याप येत नाही. खडोपत म्हणतात की गुंता नाही, येतील. परंतु त्याचा प्रकार लाबणीचा दिसतो. आम्ही येथून भगवतराव, आपाजी गणेश याजकडील गायकवाडाकडे पाठविले आहेत. त्यास साहा सात दिवस जाले. गायकवाड आम्हापासून चालीस कोसावर आहेत. होलकर तो आम्हापासीच आहेत. सिंदे लोणवाड्याची खडणी आपली घ्यावी म्हणौन गेले आहेत. महीतिरी बडासीपूर येथे आहेत. लौकर येतील. मसलत सिधीस गेल्याप्रो त्यास निरोप देत नाहीं. तुम्ही बहुत सावधगिरीने चौकसी करून बातमी राखत जाऊन खबरदारीने राहाणे. तुम्हाकडे फौज पाठवावी खरी, परंतु इकडे श्रीमंत खंबाइतेस, गायकवाड येकीकडे, यामुले जागाजागां नाकेबंदी करावी लागली. आपली पत्रे निकडीची आली याजकरितां फौजेची तयारी केली आहे. रवाना करितो. तुम्ही तिकडे आहां म्हणून आम्ही निश्चित आहो. वर्तमान रोजचे रोज डाकेबराबर लिहीत जावें. बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal notes the contents of a long letter from Naro Anandrao about the state of affairs in Gujarat and gives his instructions about them. " Raghunathrao has proceeded to Cambay from Surat. Negotiations have been opened with Gaikwad but are not progressing well. Holkar is in the camp. Sindia has gone to Lunawada for collecting his dues ", writes Haripant in the letter.*

No. 186] [*10-4-1775*

पौ छ १९ रबिलोवल खमस
सबैन वेशाख.

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक भागोजी बलकवडे मुकाम किले डबई कृतानेक विज्ञापना. तागायत छ ९ सफर पावेतों सेवकाचें व किले मजकूरचें वर्तमान यथास्थित असें निशेष. इकडील वर्तमान श्रीमंत राजश्री दादासाहेब खंबाइतेस आहेत व राजश्री गोविंदराव

व खंडेराव गायकवाड हे कडीवर आहेत. राजश्री हरिपंत तात्या कविटेनजिक खेड येथें आहेत. खंबाईतेपासून दाहा कोशावर आहेत. व भडोजकर इंग्रज याणे परगणे हसोट व उरपाड व परगणे जंबुसर व आमोद येथें ठाणी बसविलीं. राजश्री नारोपंत केसकर गल्याकावल्यावर आहेत. आम्हांपासून भडोज वीस कोश आहे. त्यास येथें भरती आहे ती स्वामीस कलतच आहे व जकीराही आहे तो विदितच आहे व आसपासचे मवासी याणी उपद्रव मांडिला आहे. स्वामींचे पुण्येकरून बंदीबस्त आहे, विस्तारे काय लेहूं. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bhagoji Balkavade to Nana Fadnis writes about the movements of Dadasaheb, Gaikwad, Haripant, etc.*

No. 187] [*12-4-1775*

पौ छ १६ सफर

सन खमस सबैन.

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. छ १ सफरचे पत्र तुमचे आले त्याजवर पत्र आले नाहीं. उरपाडेस इंग्रजाने ठाणे घातले वगैरे ठाणी बसवितो. जबूसरास ठाणे घातले म्हणौन ऐकिले, तुम्ही काही लिहिले नाहीं, ल्याहावें. गायकवाड तीन कोसावर आले. काल पत्रे आली. भेटीस येतात. लिहिण्यांत संशय नाही. श्रीमंत खबाइतास आहेत कलावे. फौजेविसी दोन च्यार पत्रीं लिहिले त्यावरून राजश्री गंगाधरराव रास्ते पथकसुधा आजच येथून रा केले, पोहचतील. याची मर्जी बहुतां प्रकारे रक्षावी. आपण वाकीफ आहेत. तिकडील वर्तमान लिहीत जावे. गायकवाडानी लौकर भेटावे या प्रेत्नास असो. श्रीकृपेकडून घडेल ते खरे. रा छ ११ सफर बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant communicates to Naropant news about Raghunathrao, Gaikwad and the English and requests him to corroborate the last item especially pertaining to the English capturing Olpad and Jambusar.*

No. 188] [*13-4-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ता छ १२ सफर मुकाम नजीक ढवलके प्रा गुजरात येथास्थित जाणोन स्वकीय कुशल

लिहीत जावे विशेष. तुम्ही छ ४ सफरचे उरपाडचे मुकामीहून पत्र पाठविले ते पावले. श्रीमंतानी इंग्रजास दाहा लक्ष्याचा मुलूक उरपाड व हासोट व आंकलेस्वर हे माहाल दिल्हे, त्यात ठाणी इंग्रज बसविणार, सरंजाम करीत आहेत, येविसीं पेशजी लिहिले. काही फौज पाठवावी त्यास इंग्रजाने उरपाडास दोन हजार गाडदी व तोफा पाठऊन उरपाडचे ठाणे घेतले. कमावीसदार उठोन आम्हाकडे आले तेव्हा सडे होऊन ठाण्यानजीक आलो. आम्हाजवल तोफा नाहीं, त्याजपासी तोफा आहेत, याजकरिता ठाण्यावर जावयाचा लाग नाहीं. सभोवती गिर्दनवाई करीत आहो. बाहेर निघाले म्हणजे पारपत्य करावयास चुकणार नाहीं. या प्रांती त्यांचा आमल जाला म्हणजे वाटा चालणार नाही याजकरिता पत्र आपणास लिा आहे. फौज जलदीने पाठऊन द्यावी म्हणजे मग काहीं गुंता पडणार नाही. खर्चाचाहि मोठा पेच आहे. सर्व प्रकारे नाकारेपण मजकडे पावे ऐसा प्रसंग प्राप्त जाला आहे म्हणोन कितेक प्रकारे लिा ते कलले. त्यास, मागेच तुमची पत्रे आली होती त्याची उतरे व राजश्री आनंदराव रास्ते याची फौज तुम्हाकडे रवाना केली आहे. काल छ ११ सफरी येथून कूच करून गेले. लौकरच येऊन पोहोचतील. आलाहिदा पुरवणी पत्रीं लिहिलें आहे त्याप्रो करावे. वर्तमान वरचेवर लिहीत जावें. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Hari Ballal writes to Naro Anandrao Keskar that a detachment under Anandrao Rastia has been despatched to help him to recover Olpad from the English.*

No. 189] [*13-4-1775*

श्री

पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी. तुम्ही पत्रीं लिहिले की फौजेविसी अनास्था केली. त्यास त्याची कारणे प्रथम तुमचे पत्र आले तेव्हां चांगोजी कदम रा केले. त्याजवर श्रीमंत खंबाईतास आले. वामनराव वगैरे पंधरा हजार फौज काठेवाडांत गेली. सिंदे लोणवाडियाकडे गेले. आम्हाजवल ऐवज किती राहिला याजकरितां चागोजी कदम माघारे आणविले. आठा दिवसी वामनराव आले. फिरोन चागोजी कदम पेटलादेस पा. रास्ते याची तयारी करून आपणाकडे रा केले. तों आज वर्तमान आले की, जबूसर इंग्रजाने घेतले, तेव्हा चागोजी कदम जबूसरास पा. रास्ते येक मजल गेले होते, त्यास पेटलादेस राहावयास सांगितले.

कारण आद्यापि गायकवाडाची भेट नाही. श्रीमंत खंबाइताहून तीन कोस पुढे पायदलसुधा आले, याजकरितां रास्ते पेटलादेस ठेविले. फतेसिंगाकडील काही राऊत व गारदी बडोदियास उदैक रा। करूं. तोफाविसी लिहिले. त्यास फते-सिगास सांगून बडोद्याहून दोन तीन तोफा आपणाकडे रा। करितो. तुम्ही नर्मदेपलीकडे आहा. बडोदे व जबूसर डबई याजवर शह पाहिजे याजकरिता चागोजी कदम व गायकवाडाकडील फौज या सुमारे राहील. गायकवाडाचे भेटीचा प्रकार तर तीस कोसावर आले आहेत. पत्रे काल आली, भेटीस निश्चय-रूप येतात. खडोपंत येथे आहेत त्याचे बोलणे निखालस आहे. लक्ष प्रकारे भेटतील असे आहे. पंधरा कोसावर आल्यावर खडोपंत पुढे जाऊन खातरजमा करून घेऊन येतील. भेट जाली म्हणजे रास्ते आपणाकडे रा। करितो. फौज तुम्हाकडे पाठविण्यास आलस होईल की नाही याचा विचार करावा. करावे काये? चहूकडे अडचण यामुळे असे होते. उरपाड त्यांणी घेतले. तुम्ही भोवते राहिल्याने आटापाणी बंद होईल. इताकियांत जबूसरचे पारपत्य चांगोजी कदम याणी केले तर मग इकडे काम नाही. तुम्हाकडे येतील, नाही तर इकडेच राहातील. गाईकवाड भेटले म्हणजे रास्ते तुम्हाकडे पाठवितों. तिकडील वर्तमान लिहीत जावें. रा। छ १२ सफर बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Haripant mentions the difficulties in his way in sending succour to the addressee Naropant which he was in great need of. " Changoji Kadam will be despatched after recovering Jambusar from the English or Rastia will be asked to go after the meeting with Gaikwad ", he writes further.*

No. 190] [*15-4-1775?*

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नारो गणेश सां। नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ता। छ १४ माहे सफर मु। आंकलेस्वर येथास्थित जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. स्वामीनी कृपापत्र पा। ते उतम समई पावले. लि। मा।र कलो आला. यैसेच निरंतर पत्री सांभाल करीत गेले पा। विशेष. आपण लि। की बावापिराचे घाटावर फौज कोण्हाची आली व सरदार कोण बा। आला म्हणून पत्री आज्ञा. त्यास बावापिराचे घाटांवर काही फौज

आली नाहीं. आवई ऐकिल्यांतहि नाहीं. जंबुसरावर मात्र फौज आली; त्या फौजेने जंबुसरचे ठाणे घेतले. तेथील गाडदी मारून इंग्रजाकडील सरदार मिस्तर पारट तेथे होता तो जातीने मात्र पळाला. सर्वच लुटून घेतले. जातीने मात्र येकला भडोचेस आला. तेथून फौज जंबुसर पाा ठाणे गोधरा येथे इंग्रजाकडील हजार बारासे गाडदी आंत आहेत त्याजभोवताला वेढा घालून बसले आहेत. हेहि येका दो रोजानी हस्तगत करितील. आमोदचेहि ठाणे सोडून इंग्रज पळाले, याप्रमाणे वर्तमान बातमीचे आले ते सेवेसी दोन तीनदा पाा आहेत. पावतील; परंतु बावापिराचे घांटावर फौज आली आसती तर सेवसी बातमी वरचेवर पोहचती करितो; परंतु आली नाही. कळावे उरपाड वगैरे तिकडील वर्तमान सेवकास लिहीत जावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Naro Ganesh from Ankalesar to Naro Anandrao while denying the report of the advance of a Maratha force at Bawapir ford says that Amod and Jambusar have been evacuated by the enemy and that Godhra is being invested.

No. 191] *[15-4-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे
सेवेसी

विनंती. सेवक नारो गणेश साां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा छ १४ माहे सफरपर्येंत मुाा ठाणे आंकलेस्वर येथास्थित जाणून स्वकीये कुशल लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. आज प्रात:काली बातमी आली जे, श्रीमंत तात्याकडील फौज नारो शंकर याची फौज, चांगोजी कदम वगैरे च्यार हजार फौज घेऊन येऊन जंबूसर ठाणे चढाघोड्यानसी घेतले. इंग्रजाकडील मिस्तर पारट हा मात्र जीव घेऊन पळून भडोचेस आला. चीजबस्त त्याजकडील झाडून लुटली गेली व पो माार ठाणे गोधरा येथे हजार बारासे गाडदी ठाणियात आहे, त्याजभोवताले फौज पडली आहे. त्याचे कामहि येका दो रोजानी करितील. वीस पचवीस हजार रुा लुटले गेले. मिस्तर पारट याचे टोपीदेखील पडिली. इतकी आवस्ता होऊन जातीनसी पळून गेला आहे. कळावे. याप्रमाणे बातमी आली आहे कळावे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Naro Ganesh informs Naro Anandrao that Jambusar was captured by the combined forces of Haripant Tatya and Naro Shankar and that Mr. Perrot had to run away for his life.

No. 192] [17-4-1775

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंतनाना स्वामीचे सेवेसी.

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ता छ १६ सफर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ ८ सफरचें पत्र उरपाडचे मुकामचे पाठविले ते पावले. या प्रांती आपला निरोप घेऊन आलो, त्याजपासून काही फौज आणखी पाठवावी म्हणोन वरचेवर पत्रे पाठवितो, परंतु आद्याप फौज रवाना न केली. सांप्रत इंग्रजाने सुरतेत व भडोजेत जमाव करून उरपाडचे ठाणे येऊन घेतले. हे वर्तमान आम्हास कलताच सडे फौजेनिसीं उरपाडास येऊन ठाण्याभोवता तलावा करीत आहो. मोर्चे बसवावे तरी फौज थोडी, तोफाहि नाहींत. आहे फौज यानिसी जीवादारभ्य श्रम करीत आहो. आपण आमची आनास्ता करून कुमकहि पाठवीत नाही, पुरंदराहूनहि कुमक येणे कलतच आहे. आपणा खेरीज कुमक व केले चाकरीचे श्रमपरिहार कोणे करणार? आमचे लक्ष सर्व आपलेजवल आहे. आद्यापि तरी कुमक पाठवावी म्हणजे इंग्रजाचे पारपत्य आपले कृपेकरून होईल म्हणोन तपसिले लिा ते सविस्तर कलले. ऐशास, तुमची पत्रे मागे आली, तेव्हाच रा चांगोजी कदम यास फौजसुधा रवाना केलेच होते. त्यास बडोद्यापावेतो गेले, परंतु इकडे काहीयेक काम पडले याजकरिता माघारे आले. दुसरी पत्रे तुमची येताच राजश्री गंगाधरराव रास्ते यास फौजसुधा तुम्हाकडे रवाना केले ते बडोद्यास जाऊन पोहोचले. आजच पत्र आले. लौकरच तुम्हापासी येऊन पोहोचतील. तुम्ही ते येकत्र होऊन इंग्रजाचे पारपत्य करून येकादे ठाणे कापून काढिले म्हणजे सहजातच उठोन जातील. रा चांगोजी कदम जंबूसराकडे फौजसुधा जाऊन जंबूसरचे ठाणे इंग्रजाने घेतले होते ते घेतले. आमोदचेहि घेतील. येकदोन ठाणी घेतली म्हणजे सहजातच जे ठाणी त्याणी घेतली आहेत ती टाकून जातील. वरकड आनास्तेचा मजकूर तरी कागदीपत्री लिहून आस्ता आनास्ता आहे नाही हे समजल्यात यावी असा प्रकार नाही. तुम्ही सरकार कामकाजे मागे केलीच आहेत व पुढेहि कराल यात दुसऱ्याने सांगणे काये आहे? सारांश, तूर्त प्रसंग येकतरेचा पडला याजमुले उपाये नाहीं. इकडील वर्तमान तरी गायेकवाडाच्या भेटी आठा चौहो रोजात व्हाव्या असा मजकूर आहे. रा खंडो आवजी यासहि छ १५ सफरी त्याजकडे रवाना केले आहेत. खंडोपंतानी निशा केली आहे कीं, खामखा घेऊन येतों. लोक वदंता आहे की, श्रीमंताकडे जातील. प्रत्न केला

आहे; श्रीकृपेने घडेल ते खरे. राास्त्यांचे फौजेचा मजकूर तुम्हांस लिहिला होता की, तूर्त पेटलादेस राहावितों. चांगोजी कदम जंबूसराकडे गेले आहेत त्यास आम्ही रास्ते [पुढील बंद गहाळ].

¶On being requested by Naro Anandrao to send forces, Haripant sends two contingents, one under Changoji Kadam and the other under Gangadharrao Rastia, and asks him to check the progress of the English at Urpad.

No. 193] *[18-4-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १७ सफर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ ११ सफरचे पत्र पाठविले ते पावले. उरपाडच्या ठाण्यात इंग्रजाकडील लोक होतेच. दुसरे लोक व गाड्यावरून सरजाम सुरतेहून कुमक येत होती. त्यास आम्ही बातमी राखोन बालाजी खंडेराव याजकडील छबिना होता त्याणी गाड्या लुटिल्या व टोपीवाले दाहा पाच ठार मारिले. याप्रा पारपत्य जाले. आम्हाकडील दाहा पाच स्वार जखमी जाले. त्याच दिवसी राजश्री आणाजी आबाजी दिा गायकवाड याचा छबिना सुर(त) शहरा नजीक होता त्याजवर रात्रीस छापा येऊन दाहा पाच घोडे गेले. दाहा पाच माणूस जखमी जाले. जबूसर व आमोद येथील ठाणी घेतली. आणखी सात आठशे माणूस भडोजेहून बाहेर निघाले आहेत, कोणीकडे जाणार हे कळेना. आपण कोठे आहा? तिकडील काये वर्तमान आहे, काही कुमक पाठवावी म्हणोन लिा ते कळले. इंग्रजाचे लोक टोपीवाले कुमकेस येत होते ते मारिले व गाड्या लुटिल्या, याणेकरून दहशत पडोन पैसाव करणार नाही. राजश्री गंगाधरराव रास्ते फौजसुधा तुम्हाकडे रवाना केले ते लौकरच येऊन पावतील. जबूसरचे ठाणे रा चागोजी कदम याणी घेतले. इंग्रज मारून काढिले, कळावे. वरकड वर्तमान तरी श्रीमत खंबाइतास आहेत. गायकवाड आद्यापि भेटीस आले नाहीत. येतात आसा मजकूर आहे. आमचा मुकाम ढवलक्यानजीक आहे. पुढे होईल वर्तमान ते लहून पाठऊ. घाटावर फौज राजश्री वामनराव व मलबा बापू पा आहेत. खंडोपंत गायकवाडास आणायास गेले आहेत येतील. भेटतील तेव्हा खरे. आपणाकडील वर्तमान लिहीत जावे. छ ८ सफरचे पत्र

पा तेहि पावले. रास्ते पा. आतां जनार्दन रायांजींचें काय प्रयोजन व प्रस्तुत घाटाचे चाकरीवर आहेत, कळावे बहुत काय लिहीणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*The capture of the two places—Urpad and Jambusar—from the English by Naro Anandrao and Changoji Kadam is referred to in this letter.*

No. 194] [*21-4-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राज-
श्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा। नमस्कार विनती उपरी. येथील कुशल ता। छ २० सफर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ १४ सफरचे पत्र पाठविले ते पावले. वसईकडील व नागपुराकडील व उरपाड वगैरे सुरत प्रांतातील वगैरे बातमीचे वर्तमान लि। ते कळले. राजश्री गंगाधरराव रास्ते फौजसुधा तुम्हाकडे रवाना केले आहेत ते येऊन पावलेच असतील. तुम्ही व ते येकत्र होऊन इग्रजाचे पारपत्य करून तिकडील बदोबस्त करावा. इकडील वर्तमान तरी श्रीमताकडील मंडळी निराली होऊन खबइतास गेले याप्रा। वर्तमान आहे. उभयता गायकवाड निराले होऊन विरमगावाकडे आहेत. येथून रा। खडो आवजी व भ(ग)वतराव त्याजकडे गेले आहेत. त्याच्या भेटी होऊन आद्यापि उतर आले नाहीं. आपणाकडील वर्तमान लिहीत जावे. बहुत काय लिहीणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal deputes Gangadharrao Rastia to help the addressee against the English. The news about the movements of Raghunathrao and Gaikwad is also communicated. " Khando Avaji and Bhagvantrao have been sent to Gaikwad ", he adds.*

No. 195] [*23-4-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत दाजी स्वामीचे शेवेसी

सेवक बाजी बलाल परांजप्ये कृतानक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता। चैत्र वा। आष्टमी रविवारपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नवतें. त्यांस हाली स्मरण होऊन छ १४

सफरचे पत्र उर्पाडचे मुकामीहून पाठविले ते छ २० सफरी पावोन लिहिले वर्तमान सविस्तर कळलें. ऐसेच हमेशा पत्र पाठऊन संतोषवीत असावें, इष्टत्वास उचित आहे. राजश्री हरिपंत तात्याकडील फौज आणविली, परंतु येऊन कुमक होत नाही म्हणोन लिहिले. त्यांस तुम्हाकडेस फौज रवाना च्यार हजार जाली आहे. इतक्या रोजात येऊन पावलीच असेल. आम्ही सर्व मंडली येकदील आहो म्हणून लिहिले ते कलले. योग्य हेच आहे. तुम्हावर तेथील लोकांचा भार सरकारातून ठेविला आहे, त्यापक्षी येकदील आहा यांत अपूर्व नाही. तुम्ही खावंदशेवेसी कोणे गोष्टीस चुकणार नाही येविसी लिहून कलवावेसे काय आहे? तिकडील सविस्तर लिहून पाठवीत असावे. इकडील अधिकोतर वर्तमान ल्याहावेसे नाही. राजश्री भिवराव आबा व सर्व मंडली सुखरूप आहेत. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ करावा, हे विनंती.

¶*Baji Ballal Paranjpe informs Naro Anandrao that a contingent of 4,000 men has been sent to him as succour.*

No. 196] [*24-4-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २३ सफरपावेतो वर्तमान येथास्तित असे विशेष. छ १८ सफरचे पत्र पाठविले ते पावले. लिहिले वर्तमान कलले. इंग्रजाची आमची लडाई जाहाल्याचे वर्तमान आइकण्यात आल्याचा प्रकार लिहिला तो कलला. त्यास आजपावेतो त्याची आमची गाठ पडली नाही. श्रीमंताची मंडळी गोविंदराव गायकवाडसुधा येऊन मिळाली. याउपर त्याचा इरादा लडाईचा आहे, तेव्हा आम्हासहि त्याचे समोर होणे प्रातच आहे. श्रीमत रावसाहेब याचे पुण्यप्रतापेकडून येथास्तितच होईल. बुणगे पाठीमागे टाकून सडे जाहालो. गनिमी कावा करितो. सुरतेतील सलुकाचा प्रकार जाहाल्यास त्याचा पर्याय लिहिला, यैशास काही साधन हाती लागत असल्यास जरूर करावे; आतील आर्थ समजोन घेऊन लेहून पाठविल्यावर कर्तव्य न कर्तव्य लेहून पाठऊ. गायकवाडाकडील माहालचे जफ्तीच्या सनदा पुरंधराहून आल्या. त्याची याद पाठविली ती पाहिली. त्यास तूर्त जफ्ती करून पैसा प्रात होणे कलत आहे. त्यात राजश्री फतेसिंगास वाईट वाटेल, याजकरिता आठच्यार दिवस दम धरल्याने उतम आहे. बात (इतकी?) की

6100

इकडीलहि मजकूर समजेल तैसे आपणास लेहून पाठऊ. खंडेराव गायकवाड इकडे येतात, अमदाबादेकडून येणार येतील. गोविंदरायानी नादी लाऊन सेवटी दगाबाजी केली, चिंता काय आहे. श्रीकृपेने सर्व उतम होईल. नाना रास्ते यांची भेट जाली असेल. सरंजाम चागला जाला. तिकडील खूल मोडावे. आलीकडे चांगोजी कदम आहेत. आम्ही इकडे सभालीतच आहो. माहादजी सिंदे लोण-वाडांत आहेत. लवकर येतो असी पत्रे येत असतात, येतील तेव्हा खरे. श्रीमंत् इंग्रजाचे बलावर हावभरी जाले आहेत. असो घडेल ते खरे. तुम्ही इग्रजासी राजकारण करून भोक पाडाल तर मोठेच साधान आहे. जसे होईल तसें लिहून पाठवावे. बहुत काय लिहीणे लोभ दीजे हे विनंती.

सेवेसी बाजी गोविंद सां नमस्कार लिा परिसोन लोभ कीजे हे विनंती.

¶*Haripant complains about the treachery of Govindrao Gaikwad in going over to the side of Dadasaheb and the dilatoriness of Sindia in joining the writer. He also advises the addressee to seduce the English and thus weaken the side of Dadasaheb. This, he says, will be a great achievement.*

No. 197] [*24-4-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा समस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ता छ २३ सफर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही येकदोन पत्रे पाठविलीं होती ती पावोन त्याची उतरे गेली आहेत. ती पावलीच असतील. इकडील वर्तमान तरी गायकवाडाचा सलुकाच्या मजकूर होत होता. आम्हाकडेस बाहेत्कारी सलुकाचा भाव दाखऊन अंतरंगी श्रीमंताकडे सूत्र राखोन श्रीमंताकडील कारभारी याच्या मसलतीने आजपावेतो आपली काबू साधून सेवटी निबडी जवल येतो म्हणोन आवघे येकत्र होऊन आले. काही बोलणे आणखी होते सा राजश्री खंडो आवजी व सिवरामपंत व भगवंतराव यास येथून रवाना केले. ते जात तो आगोधरच श्रीमंताकडील मंडलीसीं येक प्रहरपावेतो खलबत करून गायेकवाडानी त्यास माहितगारीने तरलापूर म्हणोन नदीचा आरा आहे त्या आऱ्याने पार करून दिल्हे, ते खंबाइतास जाऊन दाखल जाले. उभयता गायेकवाड मागे राहिले होते, त्यास दुसरे तिसरे दिवसीं राजश्री गोविंदराव गायेकवाडहि निघोन गेले. खंडेराव मात्र राहिले आहेत ते निबडापासी आहेत. ते येणार, भेटणार म्हणोन त्याची

6101

पत्रे येतात. परंतु भेटतात किंवा तेहि खंबाइतास जातात हे कळत नाही. श्रीमंताकडील मंडली जाल्ये, हे बातमी कासिदानी येऊन मुखजबानी सांगितल्यावरून राजश्री वामनराव व राजश्री मलबा बापू व हुजरात याप्रो रवाना केले होते, परंतु गाठ पडली नाही; निघोन गेले. सारांश की सलुकाचे बोलणे बोलोन सेवटी परिणाम याप्राा केला. बरें; ज्या गोष्टी जाल्या त्या उतमच जाल्या. श्रीमंतांच्या पुण्यप्रतापे सर्व गोष्टीचा बंदोबस्त होणे तसा होतच आहे. तुम्ही व रास्ते येकत्र होऊन तिकडील बंदोबस्त येथास्थित करून इंग्रजाच्या लोकांचे पारपत्य करावे. याउपरी इकडील होईल मजकूर तो लिहून पाठऊ. दगाबाजी करून गेले खरे. इतकी फौज आम्हाजवल असतां. त्याणी जावे ही गोष्ट लाजिरवाणी आहे. परंतु गैरमाहितीमुले गांठ पडली नाहीं. आपणांकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावे. सावध असावें. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Hari Ballal vehemently denounces the treachery of the Gaikwad who, rejecting the negotiations with the writer, went over to the side of Dadasaheb whom he allowed a free and safe passage to Cambay. He asks the addressee—Naro Anandrao—to watch carefully the movements of the English.*

No. 198] *[25-4-1775*

श्री

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य

राजश्री नारो अनंदराव गोसांवी यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुाा खमस सबैन मया व अलफ. तुम्ही पत्रे छ १४ सफरची पाठविली ती पावली. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबाकडील ऐवज रामदास विठलदास साहूकार याजकडे येणे, त्याविसीं मारनिलेचे गुमास्ते रूपचंद मोतीचंद याणी बडोद्यास तीर्थस्वरूप होते ते समई लस्करांतून लिहिले तो ऐवज वगैरे मिलोन रुपये ७९१७०॥। येकूण असी हजार येकशे पावणेयेकाहातर रुाा याच्या हुंड्या गुजराथी लिपीच्या व ज्याचा ऐवज त्याचे कागद बापूजी जनार्दन परभू सखाराम हरि याचे आप्तविषई याजवल होते. त्याचा मुदा लाऊन धरिले. कागदपत्र झाडून घेऊन त्यास अटकेंत ठेवावयास व्याहरे किला येथे पाठविले. हा गोपाल नाईक तांबवेकर याजकडील फौजेत धीपटे वगैरे याजकडील कारकुनी करीत होता. फितुरी त्वरेने धरिला, यामुले सर्व कागदपत्र हातीं लागले. हा सदरहू ऐवज तेथे घेऊन येथील फौजेचे

6102

खर्चास पाठवावयाची आज्ञा व्हावी म्हणोन लिहिलें ते सविस्तर विदित जाहालें. बापूजी जनार्दन फितुरी याचा पता पाडून धरून कैद करून त्याजवळील कागदपत्र घेऊन इकडे पाठविले फार गोष्ट चांगली केली. ऐवज सावकारापासून घेऊन हिकडे पाठवावा म्हणोन लिा, त्यास सर्व कागदपत्र पाहातां भरण्यापैकी बतीस हजार रुो रामदास विठलदास याजकडे निघतात. बाकी ऐवजाचे जाबसाल पुसोन घ्यावयाचे आहेत. त्यास दामोदरदास येथे आलियावर याची व रामदासाची रुजुवात करून समजोन काही निघाल्यास तो ऐवज व ऐनबतीस हजार त्याचा यैवज देणे आहे त्यांत रदकर्ज ल्याहावयाचे, सबब यैवज घ्यावयाचा राहिला. वरकड इंग्रजाची तरांडी थोर सुरतेच्या बाऱ्यावर च्यार हजार माणसानिसी आहे येविसींचा व आपल्याकडील माहालचा मजकूर लिहिला तो सविस्तर विदित जाहाला. जाणिजे छ २४ सफर.

¶Raghoba had deposited heavily with Ramdas Vithaldas, a money-lender in Poona; papers in this connection were secured from a spy of Raghoba by Naro Anand Keskar who requested that the amount to be recovered from the Sowkar be made over to him for disbursement. The Peshwa replies that the moneys will go to settle his own debts and Naro Anand was not to use the money.

No. 199] *[29-4-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरी बलाल साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २८ सफर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २० सफरचे पत्र पाठविले ते पावले. राजश्री गंगाधरराव रास्ते फौजसुधा रवाना केले ते पावले. ते आम्ही येकत्र होऊन इकडील बंदोबस्त करितो, परंतु तोफा दोन असल्या म्हणजे ठीक पडते. गायकवाडाकडील मजकूर कसाकसा जाला. पुरंदराहून मोगलाई आमलाचा वसूल घेऊन फौजस खर्चास वेणे म्हणौन पत्रे आली आहेत. श्रीमंत खंबाइताहून गलबतात बसोन माघारे सुरतेस येणार असी बातमी आहे. इंग्रजाकडील वकील आम्हाकडे आला होता. आम्ही आपलेकडील येक कारकून त्यासमागमे देऊन ते गेले. पुढे होईल वर्तमान ते लेहून पाठऊ म्हणौन लिा ते कळले, उतम आहे. तिकडील बंदोबस्त करून वर्तमान वरचेवर लेहून पाठवीत जाणे. श्रीमंताकडील मंडली व गायकवाड येकत्र होते. आम्हासी सलुकाचे

बोलत, परंतु आवघ्या गोष्टी लबाड. शेवटी गोविंदराव व श्रीमंताकडिल मंडिली निघोन श्रीमंतास जाऊन मिलाली. आवघे येकत्र होऊन साबरमतीवर येऊन मुकाम करून राहिले. आम्ही सडे होऊन सा कोसाचे तफावतीनें तकवे करितो. येक दिवस थोडीसी छ २७ सफरी गोलागोली जाली. याप्रा वर्तमान आहे. रा खंडेराव गायकवाड याची व आपाजी गणेश याची भेटी जाली. येका दोहों रोजानी आम्हाकडे येणार आहेत. भेटी जाल्यावर लेहून पाठऊ. रा खंडो आवजी येथून पाठविले होते, परंतु त्याचे आगोधरच गोविंदराव निघोन गेले. याजमुळे मारनिले खंडेराव यासमागमे आहेत. काल श्रीमंत साबरमतीचे पली-कडून चालले. तोफांची मारगिरी आम्ही आलीकडील काठी उभे होतों तेथे केली. पंचवीसपर्यंत घोडी जाया जाली. येक नगाऱ्याचा हती ठार पडिला. आम्ही आपलेकडील तोफाची मारगिरी केली. त्याचे गटांत गोले पडून से पनास माणूस जाया जाली व आपले तोफानी गारद्याचे गोल फोडिले. त्यांचा मुकाम साबरमतीचे संगमावर जाला. आम्ही पांच कोस अंतरानें राहिलो. आज शनवारी तयार होऊन आलो तो मुकामच आहे. कुचाचे दिवसी लागभाग पाहून करणे ते करूं. कूच जाल्यावर अमदाबादचा रोख धरितात किंवा कोणता हे कलेल. लिहून पाठऊ. तुम्ही लिहिले कीं सुरतेत कारकून नेला आहे. काय बोलण्यात येईल ते लिहून पाठऊ. त्यास काय बोलणे जाले ते लिहून पाठवावे. बहुत काय लिहीणे; लोभ कीजे हे विनंती.

¶Hari Ballal informs Naro Anandrao of the negotiations opened with him by Govindrao Gaikwad on behalf of Dadasaheb. The negotiations were abruptly terminated and Govindrao joined forces with Dadasaheb and attacked Hari Ballal. The skirmishes on the Sabarmati between the two forces are further described.

No. 200] [*April 1775*

श्री

पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी. इकडे आणविले व श्रीमंत खंबाईतास आले तेव्हां तिकडे फार फौजेचे प्रयोजन नाहीं असे वाटले याजकरितां आणविले. तुम्ही खर्चाची तंगचाई म्हणोन लिा. त्यास मोगलाचा ऐवज माहाली बाकी असेल ती निकड करून घेतल्याने दोन महिने चरितार्थ चालेल. गायकवाडाचे फौजेचा प्रकार तर त्याचे खर्चापुर्ता ऐवज गायकवाडाचे माहाली मिलेल. तुम्हास आम्ही

त्याहावें असें नाही. हर तजवीज करावी. सुरत भडोचची बंदी करावी. इकडे श्रीमंत आले आहेत पाहावे काय मसलत होते. तूर्त लावले खरे. तुम्ही तिकडे असला म्हणजे आम्हास कालजी करावी नलगे. तुम्ही लिहिले जे वर्ष-प्रतिपदेपावेतो वाट पाहू. नाही तर पुण्याकडे जाऊ. त्यास ही गोष्ट ठीक नाहीं. कस्त करावी. राहावे. म्हणजे आम्ही इकडे निश्चित राहू. पैक्याचा तोटा सर्वत्र जाला आहे. येथे कर्जदेखील मिलत नाही. श्रीकृपेने प्रांते[१] लागेल तो खरा. वामनराव फौजसुधा आले. कलावे. तिकडील वर्तमान लिहीत जावे. उतावली जाण्याची करू नये. इंग्रेजास माहाल श्रीमंतानी लिहून दिल्हे आहेत खरे, परंतु तुम्ही तिकडे असता ते काय करणार. आम्ही ढवलक्याचे अलीकडे च्यार कोस साबरमतीचे काठी आहों. श्रीमंताकडे फौज जाणार ती वाट येथे राहिल्याने बंद होते असें पाहून राहिलो आहो. देशचे वर्तमान आढलत जाईल ते लिहीत जावे. बहुत काय लिहीणे लोभ कीजे हे विनंती.

¶Haripant learns the monetary difficulties of Naro Anandrao and points him how he could raise money. He explains he has encamped on the Sabarmati to block the way of Raghunathrao.

No. 201] *[2-5-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ १ रावल जाणौन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही छ २३ सफरचे पत्र पाठविले पावले. राजश्री गंगाधरराव रास्ते येऊन दाखल जाले. त्याची मर्जी रक्षून सरकारकाम करितो. उरपाडचे बोलणे लागले आहे. सलुकाने ठाणे उठऊन नेले तरी उतम. नाही तरी ब्यारे येथील तोफा येका दोहो रोजात येतील त्या आणून पारपत्य करितो. गायेकवाडाच्या भेटी जाल्या म्हणजे बहुत काम जाले. मुमईहून इंग्रेजाकडील दोन वकील पुरंदरास जाऊन तेथून दोन कारकून घेऊन गेले आहेत. तेथे आपल्याकडेहि बोलतात. इकडे आम्हाकडेहि मोगलाच्या विद्येमाने बोलणे आहेच. ऐसे ती जागा बोलो लागले आहेत. त्यास आपल्यापासी मुदे कोणते घातले ते ल्याहावे म्हणजे त्या आन्वये बोलावयास येईल. मोगल आपली ममता धरून बोलतो. त्याचे विद्येमाने जावसाल

---

१ प्रांत=शेवट.

जाल्यास पुढे ठीक पडेल. आपल्याकडील व पुरंदराकडील बोलण्याचा ऊर्ती धरून बोललो. साष्टीचा जाबसाल, दुसरा श्रीमंताचा बंदोबस्त, तिसरा १० लक्ष्याचा मुलूक दिल्हा, हा न द्यावा, त्यात तोड मोड करावी. हे तीन साल जाब मातबर. वरकडे किरकोल. सरकारी मसलत जाऊ देत नाही. पत्राचे उतर सत्वर पाठवावे म्हणौन लिा ते कलले. उरपाड येथील सलुकाने काम जाल्यास उरकून ठाणे बसवावे, न जाल्यास पारपत्य करून ठाणे घ्यावे. इग्रजाकडील सलुकाचा मजकूर तरी पुरदराहून काये बोलणे होते ते कलले नाही. तुम्हाकडेस बोलतात त्यातील खुलासा काढून लेहून पुरदरास पाठवावे म्हणजे ते तुम्हास लिहितील. आम्हाकडील बोलण्याचा मजकूर तरी वकील आला होता, परंतु त्या बोलण्यात जीव नाही. येक दिवस राहून माघारा गेला. श्रीमंताकडील मडली व गोविंदराव गायकवाड ऐसे श्रीमतास मिलाले. श्रीमत त्यासह इग्रेजसुधा खंबाईताहून कूच करून साबरमतीच्या पाण्यावरून आज छ मजकुरी खेड्यानजीक तीन कोसावर वात्रा नदीच्या पाण्यावर आले. साबरमतीवर आले. त्या दिवसी आम्ही सडे जातो. नित्य तलावे त्याच्या आसपास करितो. येक दिवस गोला गोली जाली. आमच्या तोफा दीडसे पावेतो त्याच्या लस्करावर मारिल्या. त्याच्याहि जाल्या. याप्रो होऊन दोहीकडील काइमी राहिली. रा खडेराव गायकवाड छ २९ सफरी येऊन भेटले. त्या-समागमे खडो आवजी आहेत. बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*On being asked by Naro Anand about the particular lines of negotiation with the English, Haripant advises the addressee to refer the matter to the authorities at Purandar and to await their decision. He also asks him to capture Urpad from the English either by negotiation or by fighting.*

No. 202] *[3-5-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २ रााोवल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावोन त्याचे उतर अलाहिदा पत्री लिा आहे त्यावरून कलेल. इकडील वर्तमान तरी श्रीमत राजश्री दादासाहेब व गोविंदराव गायकवाड, सखाराम हरि

वगैरे मडली येकत्र होऊन इग्रजसुधा कूच करून साबरमतीवर आले. तेथून पुढे पाण्याच्या आश्रयाने चालतात. त्यास येक दिवस त्याची व आमची गोलागोली होऊन दोहीकडील काइमी राहिली. आम्ही च्यार कोसाच्या आंतऱ्याने त्याचे आघाडीस सडे होऊन राहात असतो. ते साबरमतीचे पाणी टाकून वात्रा नदीच्या पाण्याने खेड्यानजीक आले. छ १ रोवली त्याची आमची लढाई जाली. ते नदीपलीकडेस होते. आम्ही आलीकडेस होतो. त्याणी तोफा व पायेचे माणूस व फौजा याप्रा सरंजाम घेऊन आलीकडे आले, तेव्हा त्यांची आमची लढाई होऊन त्यास मोडून नदीपलीकडे घातले. से दोनसे घोडी आपल्या लस्करात आली. दोन हाती आले. कुकाजी सिवराम पाडाव सापडले. नदीपलीकडे जावे तरी नदी फार आवघड. घोडी घालावयास सोये नाही. याजमुळे जाली तितकी जाली. ते त्या मुकामींचे काईम, आराबा पसरून राहिले आहेत. पुढे होईल वर्तमान ते लिहून पाठऊ. तिकडील वर्तमान लिहीत जावे. बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal describes to Naropant Nana the encounter which he had on the river Vetra with the combined forces of Dadasaheb, Govindrao Gaikwad and the English in which the latter were repulsed with loss.*

No. 203] [*6-5-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक नारो गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा छ १९ माहे रोवल मुाा ठाणे आंकलेस्वर येथास्थित आसो विशेष. स्वामीकडून छ १४ तारिखेचे पत्र पाो ते आस्तमानी येऊन पोहोचले. लिहिले वर्तमान कलल. यैसियांस आपण लिहिले कीं जासुदास दोघे माणसे बाा देऊन भालोदास फार करून देणे म्हणून पत्री आज्ञा. त्याजवरून रतनापुरावरून जासूद लाऊन दिल्हा आहे. पार होऊन जाईल कलावे. दुसरे श्रीमंतांनी नडियादेवर मुाा केला आहे व राजश्री हरिपंत तात्या यांचे फौजेचा मुाा खेडियावर आहे. त्यांची यांची जुझे दोनतीन मातबर जाहाली. आतांहि नाडियादेहून श्रीमंताचे कूच जाहाले तरहि यांचा त्यांचा मोकाबला होणार म्हणून बातमी आली आहे. भडोचकराचा प्रकार तो आम्ही आपल्यास पत्री

6107

वरचेवर लिहीत   वावेला यास बोलाऊन आणून त्यास च्यार गोष्टी बऱ्या वजेने सांगोन मार्गे चाले तो अर्थ करावा. तिकडील व इकडील डाकेचा रस्ता बंद जाहला आहे. कळावे. बहुत काये लिहिणें हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh gives Naro Anandrao news of the happenings of the opposing forces in Gujarat.*

No. 204]   [*6-5-1775*

श्री

श्रीमंत राजश्री   नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ता। छ ५ माहे रोवल मु॥ ठाणे आंकलेस्वर येथास्थित आसों विशेष. स्वामीकडून आलीकडे पत्र येऊन सेवकाचा परामर्ष होत नाही तरी यैसे नसावें. सदैव पत्री कृपेची वृद्धि करीत जावी. श्रीमंत राजश्री हरिपंत तात्याची फौजेची व श्रीमंतासी लढाई जाहाली. तात्या फौजेसुधा पंधरा सोळा कोस आलीकडे आलें, परंतु उभयेताहि साम्ये राहिले यैसी वर्तमान यैकिल्यांत आलें. आवंदा आपण उरफडच्या शह सोडून कामरेजेस गेले म्हणून वर्तमान यैकिले, त्यावरून चित चिंतातुर जाहाले; त्यास याचे काये ते वर्तमान सेवकास ल्याहावें. दुसरे आम्ही वर्तमान यैकिले कीं सुर्तेहून हजार बारासे गाडदी व तोफा येक दोन च्यारसे स्वार यैसे हसोट आंकलेस्वरी येणार म्हणून बातमी ऐकिली आहे. त्यास याचाहि आपल्याकडे बातमी आसेलच, याजकरितां आपण आपल्याकडील शंभर स्वार ठाणे मारी कृपा करून पा। द्यावे. आठ च्यार रोज राहतील, मागती सेवेसी पा। देऊ. तरी आपण आनमान स्वार पाठवावयाविशी करू नये; खामखा स्वार पा। द्यावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh communicates to Naro Anandrao news of a battle between Haripant and Raghunathrao. An English detachment, one thousand strong, is reported to be marching towards Ankalesar with some pieces of artillery.*

No. 205]   [*9-5-1775*

श्रीशंकर प्रसन्न

राजश्री हरिपंत तात्या

स्वामीचे सेवेसी

विनंति उपरी येथील कुशल तागायत वैशाख शु॥ नवमी भौमवार मुक्काम कामरेज तपतीतीर जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष.

आपण छ २ रबिलावलचे पत्र पाठविले ते रविवारी सहा घटका पूर्वी रात्रीस प्रविष्ट जाहाले. श्रीमंत गाईकवाड व इंग्रजसुद्धां खंबाइताहून कूच करून साबरमती व माया नदी संगमावर आलियाचे व पुढें खेडच्या सुमारे आलियावर लढाई होऊन त्यास नदीपलीकडे घालविले. कुकाजी सिवराम व दोन अडीचशे घोडे व गोविंदराव गायकवाड याचा जरी पटका पाडाव आला. राजश्री खंडेराव गायकवाड हिंमतबहादर सात आठशें स्वारानशीं येऊन भेटले म्हणून सविस्तर लिहिले त्याजवरून बहुत संतोष जाहाला. श्रीमंत रावसाहेबाचें पुण्य समर्थ आहे. सर्व गोष्टी उत्तमच घडोन येतील पुढें कर्तव्य व होईल मजकूर तो वरचेवरी कलवीत जावा. इकडील वर्तमान सविस्तर राजश्री नारोपंत नाना लिहितील त्याजवरून कलो येईल. आपलेकडील सर्व लक्ष लागले आहे. आपणास बहुत मेहनत पडली आहे, याचे श्रमपरिहार ईश्वरेकरून कार्य सिद्धि करावी हा सर्वत्राचा मनोदये आहे. इश्वरे आपणास येश देईल, कांहीं चिंता नाहीं. बहुत काय लिहिणें. कृपा लोभ करीत जावे हे विनंति+.

¶*The letter reports an action between the Peshwa's forces and the English. The latter were pushed back beyond the river near Kheda and the colours of Govindrao Gaikwad were captured.*

No. 206] [*9-5-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील ताा छ ८ माहे रोवल मुाा आंकलेस्वर येथास्थित आसो विशेष. स्वामीनी कृपा करून पत्र पाो ते उत्तम समई पावोन परम समाधान जाहाले. आपण कागदांत मार की राजश्री हरिपंत तात्याकडील लस्करचे कागद लखोटे फोडितात म्हणून आपण कितेक अर्थे सेवकास लिहिले. यैसियास डांकेच लाखोटे सरकारचे आम्ही कांही फोडति नाही. आमर्यादा सेवकापासोन होणार नाही. दुसरे भडोचकर इंग्रज व राजपिंपलेकर हे येकत्र जाहाले. राजपिंपलेकर याचा वकील भडोचेस आला होता. ते हे येक होऊन जागेचे पासोन बावापीरच्या घाटापर्यंत रस्ता बंद केला आहे. जागाजागा उतरावर दोनसे तीनसे भील व कांही स्वार

+ पत्र पुण्याहून कोणा कारभाऱ्याचें हरिपंतास गुजरात स्वारींत.

यैसे ठेविले आहेत. याप्रमाणे रस्ता तो बंद केला आहे. त्यास आपण राजपिंपलावाल्यास पत्र लेहून जाबसाल आणवावा व रस्ताचा प्रकार कांहीं आपल्या सोईस पड़ला तर याचा बंदोबस्त करावयाचा आसिला तर दोनचारसे राऊत घाटावर ठेवावे म्हणजे रस्ता चालेल. नाही तर यांची तो बंदोबस्ती फार कठिण केली आहे. आपणहि परस्परे यैकितीलच. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh assures Naro Anandrao that he did not open letters addressed to Haripant and advises measures being taken against the ruler of Rajpipla, who was favouring Raghunathrao.*

No. 207] [*9-5-1775*

पौ छ ११ रावल खमस
सबैन वैशाख

श्री

राजश्री जनार्दन आपाजी गोसावी यासी

सुा खमस सबैन मया व अलफ. खरगसिंग याचे घर पुण्यांत काल्यां वावरांत आहे ते लक्ष्मणसिंग यास देविले असे. तरी ते घर याचे स्वाधीन करणे. जाणिजे छ ८ रावल.

¶*Janardan Appaji is asked to hand over Khargsing's house to Lakshmansing.*

No. 208] [*9-5-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल साां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ २७ रावल जाणन स्वकीये लिहीत जावे विशेष. पाा आकलेश्वर हसोट बलसाड हे माहाल श्रीमंत राजश्री माधवराव नीलकंठ याजकडील. त्यास तुम्हाकडील कहीचा उपद्रव फार लागतो. गाव मोड़िता म्हणोन येथे बोभाट आला. त्यास सरकार तालुका असता रखवाली करावी ते उपद्रव लाविता हे काय? तर यांचे गावची रखवाली करावी. श्रीमंत येऊन लुटतील या अर्थे आधीच आपण लुटून टाकावे येसे असेल तर केवल आपणच आपली रयेत लुटावी हे

ठीक नाही. मग ते करितील तर करूत. तुम्ही बंदोबस्त न केला तर राजश्री आन्याबा रागे भरतील असें न करावे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶Hari Ballal administers a strong reprimand to Naro Anandrao for plundering the villages belonging to Madhavrao Nilkanth—Peshwa's partisan.

No. 209] *[10-5-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्ये हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ ९ रावल जाणौन स्वकीये कुशल लिहीत आसिले पाहिजे विशेष. तुम्हाकडून आलीकडे पत्र येऊन वर्तमान कलत नाही तर सविस्तर लेहून पाठवावे. इकडील वर्तमान तर श्रीमंत इंग्रजसुधा नडयादेस परवाचे दिवसीं आले. काल त्याचा मुकाम तेथेच जाला. आजहि अद्यापि कूच जाल्याची बातमी आली नाही. आमचा सडे स्वारीचा मुकाम नडयादे आलीकडे च्यार कोसावर आले. दोन तीन लडाया त्यांच्या आमच्या जाल्या. श्रीकृपेने त्याजवर जरब चांगली बसली परतु इंग्रजाचे पायचे माणूस, आगीचे बल भारी, यामुले फिरोन जमतात. नडियादेहून कूच जाल्यावर कोणता रोख तो समजेल. मसलत लांबली. लस्करांत पैसा नाही. च्यार रोजमरे तटले आहेत. लोक गवगवा करितात. ईश्वर प्रांत लावील तो खरा. तुम्ही कोठे आहा, तिकडील वर्तमान काय, ते लिहून पाठवावे. बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

राजश्री बालाजीपंत केलकर स्वामीस सां नमस्कार लिा। परिसीजे हे विनंती.

¶News about the skirmishes which the writer had near Nadiad with the combined forces of the English and Raghunathrao is despatched to Naro Anandrao by Hari Ballal.

[11-5-1775

श्री

सेवेसी बालाजी बापूजी केलकर सां नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता। छ १० रबिलोवल गुरुवासर मुकाम कसबे कामरेज तापी दक्षणतीर येथास्थित असे विशेष. येथे सुरत शहरातून बातमी आजच आली की छ १ रोावली लढाई

जाली. त्याआलीकडे लढाई श्रीमंताचे फौजेची आपली होऊन इंग्रेज हजार पांचशे मारिले. यापुढे इंग्रेज खंबाइताहून श्रीमंतास घेऊन शहर सुरत येथे येणार. खंबाइतास राहन परिणाम नाही. पर्जन्यकाल जलमार्ग मोडतो, यास्तव सुरतेस यावे असा त्याची बातमी आली आहे. दुसरियाने इंग्रेज मोडला ही बातमी आपणाकडील पत्रे अद्याप आली नाही. आपणाकडील पत्रे आली म्हणजे सविस्तर कळेल. श्रीमंत सौ पार्वतीबाई शरीरी समाधान नाही यास्तव पुण्यांत आली आहेत. सौ दुर्गाबाई बरोबर आली आहेत. याप्रो जासूद येथे आले ते सांगत होते. लिहिले वर्तमान आले नाही. दोन तोफा ब्यारे नि॥ गायकवाड यांच्या आणिल्या. गाडदी वगैरे शेपनास माणूस येथे जदीद करार केले. सुरत शहरातून दारू गोळी आणविली. येणेप्रो सरंजाम तयार होत आहे. उरपाडास यापुढे जावे असे सर्वांचे मानस आहे. राजश्री गणे(श)पंत पेठ्ये दि॥ सरसुभा व राजश्री बहिरो रघुनाथ मेहेंदले का॥दार चौथाई शहर सुरत बरोबरच आहेत. सरकारचे कामकाजास फारच उपयोगी पडतात. गणेशपंत आपणास पत्रे लिहीत असतात. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Balaji Bapuji Kelkar writes news about the battle with the English fought on the river Mahi.*

No. 210] *[11-5-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्ये हरि बलाल सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ १० रा॥वल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. राजश्री अंताजी रघुनाथ यास लस्करांतून पुण्यात पाठविले आहेत. हे तुम्हापासी आल्यावर यासमागमे माणसे व स्वार देऊन मोल्हेरीस पोहचाऊन द्यावे. बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal asks Naro Anandrao to arrange for the safe journey to Mulher of Antaii Raghunath who is asked to proceed to Poona.*

No. 211] *[12-5-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंतनाना स्वामीचे सेवेसी

पो॥ हरि बलाल सा॥ नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ता॥ छ ११ रा॥वल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २७ सफरचे पत्र पाठविले

ते पावले. छ २२ सफरचे पत्र पाठविले ते पावोन त्यात लिा की, गोविंदराव गायेकवाड श्रीमंताकडील मंडलीसुधा श्रीमंतास मिलाले. विस्वास देऊन हे गोष्ट केली. इंग्रजाकडील वकील येऊन बोलणे लागले आहे. त्यास उरपाड व आमोद येथील ठाणी उठऊन त्याणीं न्यावी आणि पके बोलणे बोलोन श्रीमंतास खंबाइताहून माघारे आणावे, सुरतेस आले म्हणजे बोलणे पके असे ठरल्यावर लेहून पाठवितो. आपण बहुत सावध राहून मसलत करणे ते करावी. सडी स्वारी जाली त्यपेक्ष्या बुनग्याचा बंदोबस्त कोल्याच्या दंग्याविसी चांगला करावा म्हणोन व आणिखी कितेक मजकूर लिा तो कलला. त्यास गोविंदराव वगैरे मंडली येऊन मिलाल्यावर ते कूच करून नड्यादपावेतो आले. तीन वेल त्याची आमची तोफाची मारगिरी जाली. येक वेल आम्ही मोडून नदीपार घालून दोनअडीचसे घोडी व कुकाजी सिवराम पाडाव व गोविंदरायाचे जरीपटक्याचे निशाण याप्रा आणिले. त्याजकडील आगीचा मार फार, याजमुले निकड करिता येत नाही. लागभाग पाहोन जे करणे ते करीत आहो. सावध राहणे वगैरे कितेक मसलत करणे ते युग्तीने करीत आहो. सिधीस नेणार धण्याचे पुण्य. तुम्ही तिकडील बंदोबस्त हरयेक कामकाजाचा करणे तो पोख्तपणे करून वरचेवर लेहून पाठवीत जाणे. चार वेला त्यांची आमची गांठ पडली. त्यासच जरब बसली. परंतु आगीचे सामान भारी यामुले जमतात. नडियादेस प्रस्तुत आहेत. तेथे कांही पैका घेतात. पुढे महीतीरास जावे असे ऐकतो. त्यास हे मही उतरल्याखेरीज आम्हांस उतरता येत नाही. नडियादेहून कूच जाल्यावर आमचे पाठीमागे येतात किंवा महीतीराकडे जातात पाहावे. आम्ही सडे चहू कोशाचे अंतरे असतो. सुरतकराचा वकील तुम्हासी बोलत होता त्याचे बोलणे सिधांताचे काय ते कलले असेल; लिहन पाठवावे. आम्ही सावधगिरीस चुकत नाही; मग श्रीसता प्रमाण. मसलत लांबणीस पडली. ईश्वरी इच्छेने घडेल ते खरे. पैका नाही; वोढ मोठी पडली आहे. गायकवाडाचे माहालचा मजकूर लिहिला तो कलला. त्यास. तूर्त जफ्ती न केली, फार चांगले केले. महीकाठी कोलवण जाले आहे. कागदपत्र निभावत नाही. तुम्ही हरकसा कागद आम्हांस पोहचे असा पाठवीत जावा. सलामसलत लिहीत जावी. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Hari Ballal informs Naropant that three engagements were fought near Nadiad, between his army and the combined forces of Raghunathrao and Govindrao Gaikwad, in one of which a number of horses and the ensign of the latter were captured.*

No. 212] [*15-5-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ताा छ १४ रावल मुा ठाणे आंकलेस्वर येथास्थित आसो विशेष. इकडील वर्तमान तर भडोचकर इंग्र(ज) व राजपिंपलेकर पुंजाजी वाघेला हे येकत्र जाहाले व गोविंदराव गायकवाड यांजकडील भडोचेत काादार जीवन गोलचिया रजपूत तेथे आहे. हे येकत्र होऊन हजार पाचसे भील जमा केले व गाडदी यैसे जमाव केला आहे आणि काही या भाटियात उतरले आहेत. त्यांची बातमी यैसी आहे की, आपल्यावर रात्रीस घालावे. याप्रमाणे मनसबा करून तेथे बसले आहेत. आणि डाकहि बंद केली आहे. त्यास आपण सावधता राखावी. हे त्रिवर्ग येकत्र तों जाहाले, यांत संशये धरूं नये. त्यास येथे काठ्यावर काही आपले राऊत आसले तर बातमी पकी राखून वरचेवर सावधगिरीत आसावे. रस्ता तो केवल बंद जाहाला आहे. कलावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पुंजाजी वाघेला याजला आपणाजवल बोलाऊन आणून त्यांजला सांगून रस्ता घाटाचा बंद जाहला तो सुरलीत चालता करावा हे विज्ञापना. दुसरे जंबूसरचे ठाणे इंग्रजाने घेतले व तेथे आनाजीपंत वगैरे फौजा होत्या त्या उठोन गेल्या. दिवसे दिवस इंग्रजाचे बल आधिक होते. तरी याचा विचार करणे तो करावा. परंतु पुंजाजी वाघेला याजला बोलाऊन आणून राजवाडियाकडील बंदोबस्त करावा व नदीस उतारहि गुढग्याइतकेच पाणी आहे. उतारहि जाला आहे; आणि नित्य उठोन सिबंदीची जारी भडो(च)कर नवी ठेवितो. कलावे हे विज्ञापना. सावकारी कासीद येथे आले. त्यानी वर्तमान सागितले की, श्रीमंत नडियादेवर मुा आहे व राजश्री तात्याचा मुकाम खेडीयावर आहे. पांच साहा रोज जाहाले. कलावे. पुढे तिक[डी]ल काही बातमी आली नाही. कलावे हे विनंती.

¶*Naro Ganesh informs Naro Anandrao that the English at Broach, Punjaji Vaghela of Rajpipla and Govindrao Gaikwad have all made a common cause and propose a night attack on his post against which he is asked to be on his guard.*

6114

No. 213] [15-5-1775

पौ छ २४ रावल सन श्री
खमस (स)बैन वैशाख वा ११
मु॥ कामरेज.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सां नमस्कार विनती उपरी. येथील कुशल ता॥ छ १४ रावल जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ ७ रावलचे पत्र पाठविले ते छ १२ मिनहूस पावले. इंग्रज लोक रातबिरात दगा करावयास चुकणार नाही. आपण सावध असावे. गोविंदराव श्रीमतास भेटल्यामुले इग्रजास चढ लागला आहे. सूर्त स्वस्त बसले आहेत. मोगलाने मुबईस पत्रे पाठविली आहेत, त्याजवर द्रिष्टी आहे. व्यारे येथील दोन तोफा आणिल्या. फर्माबा॥ गोले पाहिजेत. त्यास सुरतेत गुप्तरूपे खो॥ केली. येका दोहो रोजात दारू गोली आली म्हणजे उरपाडास तोफा घेऊन जातो, म्हणौन लि॥ व मुधोजी भोसले याजकडील मजकूर लि॥ तो सविस्तर कलला. तोफा घेऊन जाऊन युग्तीने उरपाडचे ठाणे घेऊन तंबी पोहोचवावी. इकडील वर्तमान तरी श्रीमंताचा मुकाम नडयादेनजीक आहे. नडयादेपासून काही खडणी घेतली म्हणौन वर्तमान आहे. आम्ही सडेच च्यार कोसाच्या अंतराने आहो. पुढे होईल वर्तमान लेहून पाठऊ. काल नडियादेहून येक कोस कूच केले. याउपरी कोणता रोख धरतील तो लिहून पाठऊ. पैक्याचा तोटा भारी पडला आहे. तिकडील वर्तमान लिहीत जाणे. बहुत काय लिहीणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke asks Naro Anandrao to attack Olpad with the cannons he has secured from Vyara.*

No. 214] [15-5-1775

पौ छ २४ रावल वैशाख
वा॥ ११ सन खमस सबैन
मु॥ को॥ कामरेज.

श्री

पु॥ राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनती उपरी येथील कुशल ता॥ छ १४ रावल जाणौन स्वकीय लिहीणे विशेष. राजश्री नारो गणेश याणी आकलेस्वराहून पत्र लिहिले की भडोजकर

व राजपिंपलेकर येकत्र होऊन बावापिराचा घाट कोली मेलऊन बंद केला. त्या मार्गाने स्वार वगैरे कोणी येकदर जाऊ देऊ नये याप्रा कलेले आहे. येविसी राजश्री नारोपंत व रा गगाधरराव रास्ते यास लिहून बदोबस्त करावा म्हणजे मार्ग चालेल. त्याजवरून आपण लिा आहे तरी सर्व कामे येकीकडे आणि मार्गाचा मजकूर येकीकडे. मार्ग चालोन कागदपत्र निभावला पाहिजे, याजकरिता राऊत पाच सातसे पावतो घाटाच्या बदोबस्तास ठेऊन मार्गास कोणेविसी दिकत न पडे ते करावे. हे गोष्ट आधी आधी करावी. घाट त्याणी बंद केलियावर ठीक पडणार नाही. घाटाचा बदोबस्त करून उतर पाठऊन देणे. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Naro Anandrao is instructed to capture and keep open for transmission of news the ford of Babapir.*

No. 215] [*15-5-1775*

पौ छ २४ रावल वैशाख
वा ११ सन खमस सबैन
मुा को कामरेज तापी
दक्षिणतीर

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १४ रावल जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. भडोजकर इग्रज व राजपिपलेकर येकत्र होऊन कोली मेलऊन बावापिराचा घाट बंद केला. त्याचा बदोबस्त केल्यासिवाये मार्ग चालणार नाही. याजकरिता रा नारोपंत नाना व राजश्री गगाधरराव रास्ते यास बदोबस्ताविसी लिहावे म्हणौन लिा ते कलले. त्यास येविसीच्या बदोबस्ताचा मजकूर उभयतास लिहिला आहे. तुम्ही लिहून आधी ये गोष्टीचा बदोबस्त करणे. वर्तमान लिहीत जाणे. श्रीमत नडियादेआलीकडे येक कोस आले. पुढे कोणीकडे जातात पाहावे. नित्य गोलागोली होतच आहे. श्रीसतेने घडेल ते खरे: बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*"Naropant Nana and Gangadhar Raste have already been asked as desired to defend the Babapir ford against the combined attack of the English, the Raja of Rajpipla and the Kolis", writes Hari Ballal to Naro Ganesh.*

No. 216] [21-5-1775

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना
स्वामीचे सेवेसी

सेवक नारो गणेश सां नमस्कार विनंती येथील कुशल ता छ २० रावल मुा कसबे अकलेश्वर येथे स्वामीचे कृपेकरून सुखरूप असो विशेष. राजश्री गोविंदपंत अणानी आम्हास पत्र लिा त्यात मार की मौजे बोरादरा पो वसराई हा गांव लुटिला, ते समई तुमचे सिपाई दिा धानसिंग याणी बैल आणिले ते विकले. त्यास बोरीद्याचे बैल सोडिले. त्यास तीन बैल सिलेदाराजवळ वोळखिले ते सरकारास सोडून घेतले. ते तोफखान्यास दिल्हे. त्यास सिलेदाराचे रुपये देवणे म्हणौन पत्री लिहिले. त्यास सिलेदार येथे आले. धानसिगास बोलाऊन आणिले. चौकशी मनास आणिता मौजे सारंगपूर पो मजकूर येथील कुणब्याचे तीन बैल गोपालभट मौजे मजकूर याचे मारफतीने व धानसिंगाचे गुजारतीने कुणब्यानी सिलेदारास विकत दिल्हे. बोरीद्याचे बैल नव्हत ऐसी पुरती चौकशी करून सारगपूरकर कुण(बी) भटजी व सिलेदार सेवेसी पाठविले आहेत. हे कुणबी आपले बैल म्हणौन बैलाचे सेपूट वोरपतील, नसले तर न वोरपतील. स्वामीपासी कुणब्यानी क्रिया केली म्हणजे सरकारात बैल पाहिजेत तर सिलेदारास रुा देवऊन बैल सरकारात ठेवावे किंवा सिलेदारास बैल माघारे द्यावे. सिलेदारास बैल नकोत तर बैल पाठऊन द्यावे. आम्ही कुणबियाचे हवाली बैल करून सिलेदारास रुा देवऊ. यास स्वाम सर्वज्ञ आहेत. सरकारात बैल पाहिजेत तर गोविंदपंत आणाकडून आणवावे. खरे लटके ते म्हणतात त्याची चौकसी स्वामीनी करावी. सेवेसी श्रुत होय बहुत काये लिहीणे कृपा लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Naro Ganesh reports to Naro Anandrao his findings in a case of an inquiry of bullocks taken away by men in the army.*

No. 217] [23-5-1775

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत
नाना स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक नारो गणेश कृतानेक सा नमस्कार विनंती येथील कुशल ता छ २२ रबिलावल मुा आकलेस्वर वर्तमान येथास्तित असे विशेष. स्वामीनी

आज्ञापत्र पाठविले तेथे आज्ञा की, आकलेस्वरापुढे डाक चालत नाही. पत्रे माघारी आली. त्यासी त्याचा शोध करून लेहून पाठवणे म्हणून आज्ञा. त्यास पुणियांहून डाकेचे कागद घेऊन येथे आले. ते येथील रामजी कासीद याणे उबर्यांचे डाकेस गेला तो तेथे डाक नाही. गावकरी यासी विचारले त्यानी थाक लागू दिल्हा नाही. रेवीपलीकडे च्यार कोस उबरे आहे. त्यापलीकडेहि साहा कोसावर डाक आहे, तेथेहि गेला. तो तेथेहि डाकीचा ठिकाण नाही. तेहि गाव भडोच परगणियाचे आहे. तेव्हा माघारा आला. लोकिकात वदंता आहे की भडोचकराने जासूद येते जाते कैदेंत घातले आहे त्यामध्ये हेहि नेले की काये हे न कले. स्वामीनी आज्ञा केली की स्वार देऊन डाक पावती करणे. त्यासी दाहा वीस स्वाराचा निभाव व्होणार नाही. याजकरिता जासूद स्वामीकडे आले आहेत त्यास च्यार पाचसे स्वार देऊन डाकेचा बदोबस्त करावा. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh complains about the difficulties in the way of keeping communications and suggests means to remove them. He asks for military help.*

No. 218] *[24-5-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २३ रावल मुकाम गोरवे नजीक बडोदे दोन कोस जाणौन स्वकीय कुशल लिहीत जाणे. विशेष. तुम्ही पत्रे छ १९ छ १६ रावलची पाठविली ती छ २२ मिनहून पावली. प्रथम येक लढाई इंग्रजाची जाली त्याचे वर्तमान लिा ते कलले. त्याजवर आणिखी येक दोन लढाया ज़ाल्या म्हणौन परस्परे एकितो, परंतु पत्र येत नाही तरी लिहावे. नवाब निजाम आलीखान याजकडील व रुकनुतदौला व इस्मालखान याजकडील व कितुराकडील व साष्टी वसईकडील वगैरे कितेके वर्तमान लिा ते सविस्तर कलले. ऐशास नवाब निजाम अलीखान याजकडील वर्तमान तरी तुम्ही लिाअन्वये दोहो चौहोकडील वर्तमान आलेच आहे. धारवाडाकडे कोनेरराव याची रवानगी पाच हजार फौजेनिसी जालीच आहे. राजपिपलवाला यास परभारे राजश्री फतेसिगराव गायकवाड याचे पत्र गेले आहे. बदोबस्त करितील. इकडील वर्तमान तरी छ १७ रावली श्रीमंताच्या फौजेची व आमची

लढाई जाली. आम्ही तोफा लाविल्या होत्या.. तोफावर फिरंगी यानी चालून घेतले तेव्हा आपल्याकडील लोकानी घोडे चालऊन हजार दीड हजार फिरंगी तुडऊन टाकिला. त्यात काही ठार व काही जखमी पाच सरदार ठार जाले. याप्रा होऊन मोडून माघारे घातले. आपलेकडीलहि लोक व घोडी जखमी व ठार जाली. नापाडचे मुकामी जुज जाले. तेथून श्रीमंत कूच क(रून) भडोजेच्या सुमारे दरकूच चालले. आम्हीहि पाच कोसाचे अंतरानें पिछावर आहो. आज त्याचा मुकाम पादरे म्हणौन गाव बडोद्यापासून आठ कोस आहे त्याजवर आहे. आम्ही लागभाग पाहोन सोये पडल्यास येक वेल गाठ घालतो. हरीपंत भिडे यांस फितुरी असे फिरंग्यानी ठराऊन जिवे मारिले. श्रीमंत रजबदल करित होते, परंतु ऐकिले नाही. मराठे लोक भयाभीत आहेत. आम्ही मेहेनत करावयास चुकत नाही. श्रीकृपेने घडेल ते खरे. तिकडील वर्तमान लिहीत जावे. रुकनुदौला दग्याने मारले गेले. त्याजवर नवाबानी पुरंदरास खातरजमेने लिहिले की इमान येक आहे. जो करार तुम्हासी केला आहे त्यात अंतर होणार नाहीं. राजश्री मुधोजी भोसले नवाबास भेटले, अलजपूरकर भेटले, मुधोजीची पत्रे व बोलावया (अपूर्ण)

¶*Haripant Phadke describes the engagement which he fought with Dadasaheb at Napad and says that even after the severe fighting he has not slackened in the pursuit of the enemy. The execution of Haripant Bhide by the English for treachery and the murder of Ruknudaula and the assurance of good will by the Nizam to the Peshwa and Mahadji's fight at Ujjain are some of the items reported by the writer. (For the concluding portion see letter No. 227.)*

No. 219] [*25-5-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक नारो गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ २४ राबल मुाा ठाणे अकलेस्वर वर्तमान येथास्तित असे विशेष. काो मजकूरचा गाव मौज बोहलाव व प्रोा हासट येथील गाव मौजे चाजरोली व मौजे परवत येकूण तीन गाव आपले लस्करचे कहीने लुटले. आम्ही तो गावास लावणीचा कौल देऊन वस्ती करितो आणि स्वामीच्या लशकरची कही मन माने तिकडे जाती आणि गाव मारितात. मग आम्ही येथे बसून काये करावे. आम्ही जे वर्तमान होते ते स्वामीस श्रुत करितो. प्रोा याची वसाहात व्हावी यैसी

स्वामीच्या मर्जीस असले तरी वस्ती राहील. नाही तरी तैसेच आम्हास आज्ञापत्र आले म्हणजे आम्ही स्वामीजवळ येऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति. प्रा मजकूरचे रखवालीस राऊत सुमार २९ पाठविता. तर बंदोबस्त होतो. यास्तव राऊत पाठवणे. बहुत काय (लिा) हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh complains against the raiding activities of the men in the army and requests the addressee Naropant Nana to stop them, otherwise it will go very hard for the writer to settle the province.*

No. 220] *[29-5-1775*

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत नाना
स्वामीचे सेवेसी

सेवक नारो गणेश सा नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ १९ रावल पावेतो मुा काो अकलेश्वर येथे स्वामीचे कृपेकरून सुखरूप जसो विशेष. आपण लिा की नर्मदातिरी बंदोबस्ताकारिता फौज आली आहे. त्यास नर्मदातिरी काही फौज आली नाही. दुसरे इकडील वर्तमान तरी भडोचकर इंग्रज याणे पाो जंबूसर व पाो आमोद ऐसे दोनी ठाणी बसविली आणि नारो शंकर याची फौज मौज सारग पाो बडोदे येथे आहे. त्याणी जबूसर परगण्याची व अमोद परगण्याची खराबी केली. यानतर तवऱ्याचे बेटात इंग्रजाचे माणूस च्यार पाचसे आले होते, त्यामुले मार्ग बंद जाहाला होता. प्रस्तु नारो शंकर याचे फौजेने भडोच परगण्याचे दोन च्यार गांव मारिले. जरबेने इंग्रजाची माणसे उठून गेली. अलीकडील तिरीचा मार्ग मोकला जाहाला. लोक येऊ जाऊ लागले. परतु पलीकडचे तिरी दिकत पडती. त्यास केसोपंतास आपण पत्र पाठवावे की भडोचे भवताले गांव मारणे आणि झाडेश्वरावर मुकाम करणे त्यामुले पलीकडीलहि मार्ग चालता होईल आणि भडोचवाल्यासहि जरब पोहोचल. त्यास आपण लिा की नर्मदातिरी बदोबस्ताकारिता हज़ार राऊत पाठविती. त्यास फार उतम आहे. त्यास फौजेमधे जो सरदार असेल त्यास सागावे की परभारे वसराई परगण्यातून जावे आणि रेवातिरी कडव्या वडावर मुकाम करावा म्हणजे मार्गाचा बदोबस्त होईल. यानतर श्रीमंत राजश्री तात्याकडील अजूरदार कासीद पाईक कालचे दिवसी आला. तो पुण्यास साहा रोजाचा करार करून पुण्यास कागद घेऊन गेला. त्याणे मुखजबानी वर्तमान सागितले की श्रीमंत राजश्री दादासाहेब महीपलीकडे दाहा

कोसावर व नडियादेच्यामधे मुकाम आहे. सोभोवोती आपली फौज चौ पाचा कोसावर आहेत. पावसामुळे फौजेचा कूच जाहला नाही. राजश्री तात्याकडून फौज मार्गाचे बंदोबस्ताकरिता रवाना केली आहे म्हणून त्याणे सागितले. त्यावरून आम्ही जासूद बावापिराचे घाटास पाठविला आहे. वर्तमान आले म्हणजे आपणाकडे पत्र लिहून पाठऊ. त्यास आपण केसोपंतास पत्र लिहून पाठवावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. दुसरे थोरले लस्करचे वर्तमान तरी श्रीमत राजश्री दादासाहेब याचे लस्करात तीन पायेलीची धारण आहे आणि आपले लस्करात पाचा पायेलीची धारण आहे. आपले फौजेत खर्चाची तगचाई आहे यामुळे अमदाबादेस पटी केली आहे. यानतर भडोचे सेजारील गांव आपले फौजेने मारिले म्हणजे तो आपोआप दोही परगणियाची ठाणी टाकून पलेल आणि माघारा भडोचेस येईल येविसी केसोपंतास पत्र ल्याहावे. बहुत काये लिहीणे लोभ असो दीजे हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh communicates to Naro Anandrao the real state of affairs at Broach and asks for reinforcements to capture the posts occupied by the English.*

No. 221] [*30-5-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा॥ नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ छ २९ रावल जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २५ व छ २६ रावलची पत्रे पाठविली ती पावली. हाली श्रीमंत व इग्रज कोणीकडे जाणार, आपण कोठे आहेत, छावणी कोण्या ठिकाणी होणार म्हणौन व नवाबाकडील व इग्रजाकडील व पुरंदराकडील वगैरे कितेक वर्तमान तीन च्यार बंद लिहिले व राजश्री जैवंतराव याची जखम कसकसी आहे हे लेहून पाठवावे म्हणौन लि॥. त्यास नवाबाकडील वर्तमान तरी छ २८ रावली पुरंदराहून पत्रे आली. त्यात लि॥ आहे की इस्मालखान आलजपूरकर यास नवाबानी धोशा व तहवरजंग यास सागोन मारून टाकिले. वरकड इकडील वर्तमान तरी श्रीमत भडोजेनजीक छ २७ रावली येका कोसावर जाऊन राहिले आहेत. पुढे नावा मेळऊन नर्मदापार होणार ऐसी बातमी आहे. आमचा मुकाम नर्मदा उत्तर तिरी बावापिराचा घाट पाच कोस टाकून जाला आहे. तेथून भडोज दाहा बारा कोस

6121

आहे. श्रीमंत नर्मदापार जाले म्हणजे आम्ही पार जाऊ. कडावदाच्या घाटावर आम्ही जाणार होतो, परंतु तेथे पाणी फार आहे याजकरिता गेलो नाही. पुढें ते कोणीकडे जातील त्या सुमारे आम्हासहि जावे लागेल. रूकनुदौला मारले गेल्यावर मोगलाकडील व भोसल्यांकडील संशय होता, परंतु नवाबाची पत्रे पुरंदरास खातरजमेची गेली व मुधोजीसी करार केला जे दादाचे लक्ष धरू नये. मुधोजी-कडील बोलणे व शफत घेऊन पुरंदरास गेले आहेत. पुरंदरीहून आम्हास लिहिले की मोगल भोसले आपले लक्षांत, इकडील कालजी न करणे. अलजपूरकर मोठा कुफर होता. मारला गेला, मोठी गोष्ट जाली. आपणास कलावे म्हणौन लिहिलें असे. इंग्रजाची दोन गलबते धुलपानीं धरली असे वर्तमान. त्याजवर इंग्रजाचा जावई व कन्या सांपडली. खासा कोपीनीची म्हणून श्रीमंताचे लस्करातून तुलाजी आगरे याचे पुत्र संभाजी आगरे पलोन आले ते सागत होते. असे वर्तमान आल्यास सुरतेस आधी यावे. याची चौकसी करून लिहावे. संभाजी आगरे म्हणत कीं आम्ही इंग्रजाचे येथे तहकीक ऐकिले. सत्यमिथ्य ईश्वर जाणे. पुण्याहून काही लिहिले नाही. सरसुभा कोकणचा विसाजीपंत लेले यांस सांगितला. सात हजार माणूस पायचे त्याचे हवाली केले. साष्टीचे टापूत उतरणार याप्रो लिहिले होते. कलावे बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती. सुरतकर मोगलाचा स्नेह होऊन कांही सरकारकाम होयसें असल्यास भोक पाडावे, हे विनंती.

¶*Haripant Phadke answers some of the queries of Naro Anandrao about the Nizam, the Bhonsle and the English. "Ismailkhan of Ellichpur has been done away with and therefore there is no fear from that side. The Nizam and the Bhonsle have promised to stand by the Peshwa. Dhulap has captured two English ships carrying important personages on board." These are some of the items mentioned by the writer in this letter.*

No. 222] [*27-5-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २६ रावल जाणौन स्वकीय कुशल लिहीत आसिले पाहिजे विशेष. तुम्ही छ २१ रावलचे पत्र पुरवणीसुधा तिन बंद लेहून पाठविले ते पावले. प्रस्तुत आपण

कोठे आहेत, इंग्रज कोठे आहे, इग्रज भडोजेस जाणार म्हणौन ऐकितो. नवाब व मुधोजी भोसले अजपुरावर म्हणौन वर्तमान आहे. सरकारातहि बिघाड दाखवीत नाही. परंतु खानदेशात येणार. त्याजकडील कागदपत्र श्रीमंताकडे येत जात असतात म्हणौन सुरत शहरातील बातमी आहे. व आणखीहि कितेक देशची अनुसंधाने मागील पुढील ध्यानात आणून नर्मदा पार व्हावे आणि बुलगे तापीपार करावे म्हणौन बहुत तपसिले वर्तमान लिहिले ते सर्व आक्षरशा वाचून पाहिले. त्यास आपण लिहिले मजकूर हे सर्व यथार्थच आहेत. परंतु नवाब व मुधोजी भोसले याजकडील राजकारणे पुरंदरच्या लक्ष्यात आहे. दुसरा प्रकार व्हावयाचा नाही असे वाटते. त्यात हे दिवस अखेरचे आले, याजमुले तूर्त घडावयाचे नाही. इकडील वर्तमान तरी नापाड नजीक लढाई जाली. यावर श्रीमत इग्रजसुधा मही उतरोन दरकूच भडोजेच्या सुमारे आले. येका दोहो रोजात दाखल होतील. आम्हीहि त्याच्या पाठीवर तीन कोसाच्या अंतराने आहो. भडोजेस दाखल जाल्यावर पुढे मनसबा करून कोणीकडे जातात तो प्रकार समजात आल्यावर पुढे त्याप्रमाणे आपणास मनसबा करावा लागेल. तूर्त बुलगे नर्मदापार करून द्यावे असा मजकूर आहे. याजकरिता आपण व रास्ते फौजसुधा नर्मदा दक्षण तिरास यावे आणि पत्र पाठवावे म्हणजे बुलगे समागमे फौज देऊन रवाना करूं. आपण सडे मात्र राहो. पुढे जसी जसी सोये दिसेल तसे करावयास येईल. तुम्ही येऊन घाटाचा बदोबस्त जलद करावा. राजश्री जैवतराव यास गोलीची जखम लागली आहे, परंतु बरी होत आहे. काही चिंता न करावी. तुम्हांस नर्मदा तिरास यावयास लाब पडेल परतु काही राऊत पाठऊन बंदोबस्त बावापीरचे घाटाचा जाल्यास करावा. नाही तर तर आम्ही इकडून करूं. उरपाडचे बोलणे मोगलाचे व तुमचे जाल्याचे वर्तमान लिहिले ते कलले. मोगलास मायेत घेऊन त्यास काही लालुच दाखऊन आपले मायेत येई, इंग्रजास च्यार गोष्टी सांगून दादाचा पक्ष सोडीत असे जाल्यास जरूर करावें. तुम्ही देसचे वगैरे वर्तमान लिहिले व नदीपार व्हावयाचे प्रकार लिहिले ते प्रमाण आहेत. भडोचेस गेल्यावर नदी उतरावयाचा विचार करितो. कलावें बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*On being informed by Naro Anandrao of letters passing between Dadasaheb and the Barbhais' allies Mudhoji Bhonsle and the Nizam, Haripant Phadke assures Naropant of their firm loyalty to the Peshwa. The writer further refers to the engagement with Dadasaheb at Napad and asks the addressee to start negotiations with the Mughal Subha of Surat and the English to induce them to leave Dada's side.*

6123

No. 223] [29 May 1775

श्री

राजश्री हरिपंत तात्या स्वामीचे सेवेसी

विनंति उपरी. आपण दोन पत्रे पाठविली ती पावली. आम्ही काल मह्रीतिरास उत्तरतीरी वासदा नजीक मुक्काम केला. आज पुढें जावयाविसी बहुत येत्न केला, परंतु राजश्री बावाचे विचारे आपले येणे जाहाल्यासिवाय येत नाहीं. श्रीमंताचा मुक्काम काल उडेरा काइली नजीक छाणी साहा कोशावर येथून मुक्काम होता. आज पुढें कूच करून भाइली गोत्री तले विहीरीचे पाणी चार कोसावर आहे तेथें जाणार. प्रातःकाली कुच्याची तोफ जाहाली, आणखी चार पांच घटिका दिवस आल्यावर वीस पंचवीस तोफाचे बार जाहाले. मग बडोद्या-जवल गेले कीं कोठें गेले हे कलले नाहीं. श्रीमंताचे लष्करांतून बातमीचा जासूद आला त्याणें सांगितले कीं धर फौजेचा व इंग्रजाचा सुटला. पलतात, लवकर भडोजेस जाणार. पाठलाग कराल तर गांठ पडोन सर्व काम होते यैसें आहे. परंतु सुस्तीमुलें उपाय नाहीं. पांच असामी इंग्रज मातबर ठार पडले. हरिपंत भिडे यांस इंग्रजानें फितुरी ठराऊन जिवे मारिले. लडाईचे वेलेस फौजेस सर्वास तुरे लावावयास सांगितले होते. याणें तुरा लाविला नाहीं. त्यास आमचे लष्करचा असेल म्हणून गोल्या देऊन मारले असेल. परंतु सर्वावर इभरत बसोन दहशत पडली आहे. आमचा पाठलाग होत नाहीं इतकाच मात्र कमी पक्ष पडला. या उपर आपण आलियावर जो ठराव होणे तो होईल. कलावे. रवाना इंदुवार दीडप्रहर दिवस सकालचा हे विनंति.

¶Haripant Tatya is informed of the movements of Raghunathrao and is further advised to pursue him as far as Broach where it is expected he would be completely overcome. Haripant Bhide was taken to be a traitor and was shot by the English.

No. 224] [May 1775?

श्री

सा। नमस्कार विनंती. आपली आज्ञेप्रमाणे काल सांकाली शहरी प्रविष्ट जालो. आजी भेट सकाली प्रहरा दिवसा जाली. साद्यंत वर्तमान सांगितलें. सरंजामाविषई आज्ञा होती ती सांगितली. त्याचे उत्तर उदईक सांगो. घोडी अरबी येथे सवदागराच्या घरी दाहापाच आहेत ते त्यानी पाहावयासी आणिवले आहेत. बकसीच्या मर्जीस चांगला आला तर लेहू; अथवा आपला परीक्षक

चांगला असेल तर पाठवावा. कागद जरी आहेत ते झाले (के?) आहेत. कारण की दोचौ महिन्याचे आहे. तयास्तव (ब)कसिजीनी * नवे सध्या करिवले आहेत. त्याच्या तयारी पाचा दिवसात होईल. वरकड कितीक तोफा-तिफी जिनस सर्व फराचिसाच्या कोठीत आहे. तेथेच आम्हास आजी पाठविणार आहेत. पाहोन सर्व लेहून पाठवितो. मुमईची पत्रें आद्याप आली नाही. आज उद्या येतील असे सांगत होते. दुसरे आज खेड्याचे मुकामचा कासीद आला त्याचे वर्तमान यांची त्याची त्रितियेस लडाई जाली. सा घटका राजश्री हरिपंत तात्या होते. मग महमदाबादेवर गेले. खेड्याचा किला इंगरजाने घेतला. राजश्री फतेसिंगबावाहि मागे गेले, असे वर्तमान आहे. पहिली लडाई तरतूद व मागील तरतूद असली (?) आली आहे ते जबानी श्रुत करीन. पहिल्या लडाईच्या तिसऱ्या दिवशी दुसरी लडाई जाली; व मिस्तर बेचर काल रात्री स्वार होऊन रातोरात उरपाडेस गेला. शे दीडशे माणूस आणिक घेऊन गेला. कळावे; यानी दोन पत्रे मुमईस पा। आहेत. उतर आलियावर सर्व कळेल. वरकड वर्तमान जासूद जबानी सांगता कळेल. दालचिनीचे तेल तेरा चवदा रुपया तोळा आहे त्याप्रा। रुपया पाठवाल तितके घेऊ. लवंगाचे रुपयी दीडा रुपयी तोळा मिळते. दालचिनी सा रुपयाची शेर मिळते. यंदा दालचिनीचा तोटा आहे. वरकड सर्व मिळेल हे विनंती.

¶*The letter refers to some skirmishes between the English and Haripant Tatya and Fatesing Gaikwad in Gujarat near Kaira and Mehmedabad.*

No. 225] [*May 1775*

श्री

सां। नमस्कार विज्ञापना ऐसीजे. आज मंदवारी दोन प्रहर रात्रीस पुरंधराकडून डाकेन येथे पत्रे आली. सेवकास सरकारचे छ २० रौवलचे आज्ञापत्र आहे. त्यांत मजकूर की, रुकनुदौला यांस दगा गाडद्यानी केला. नवाबाचा व मुधोजी भोसल्याचा सलूख जाला. येथून उभयेतासी सलूख आहे. तिकडून खातरजमेची पत्रें आली. कोणेविसी दिकत नाही. इस्मायेलखान आलजपूर न द्रेई यास्तव हला करून मारले. जाबतजंगास सांगोन इसमालखानाचे डोके कापिले. इस्मायेलखानाने रुकनुदौलास दगा केला यास्तव इस्मायेलखानास मारले. मुधोजी भोसले नागपुरास गेले. नवाब आलजपूरचा बंदोबस्त करून छावणीस जातील याप्रा। वर्तमान तहकीक आले. श्रीमंत राजश्री रावसाहेब यांचे पुण्यप्रतापे दुष्टाचे

पारपत्य आपले आपूणच होत आहे. काही चिंता नाही. स्वामीसहि सरकराचे पत्र आहे ते जासुदाबार पाठविले आहे. प्रविष्ट होऊन श्रुत होईल हे विज्ञापना. आपणाकडे आंकलेस्वरापुढे डाक वसवायास जासूदजोडी म्या काल रात्री पाठविली होती. स्वामीनी येक जोडी देऊन चौकडा[1] तेच क्षणी लस्करातून ताकीद करून पाठवायाचे होते. त्यास जासूद प्रहर दिवसास लस्करातून घोरपड घेऊन येथे आले. कठोर पैकी जोडी देविली आहे. हे जासूद दिकत घेतील आधीच सांगितले होते. सेवटी येथून येक जासूद देऊन दोन प्रहर दिवस चढता येथून डाकेवर रवाना केले जासूद. हे विज्ञापना.

¶*The letter mentions Ruknudaula being put to death by Ismailkhan who in turn was murdered by Jabitjang (Dhausha). Later on the letter also refers to a compromise between Mudhoji Bhonsle and the Nizam.*

No. 226] [*May 1775*

श्री

पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी. यास पत्र पाठविले ते पावले परंतु पेटलादेस राहिले नाही. नदी उतरोन पलीकडे गेले. असो पलीकडे गेले हे कामच जाले. त्यास लेहून पाा आहे. आपणहि त्यास पत्रे पाठऊन आपल्याजवळ घेऊन जावे आणि बंदोबस्त करावा. जंबूसर चागोजी कदम याणी ठाणे बसविले म्हणोन पत्रे आले. त्याजकडे पत्र वरचेवर पाठऊन बंदोबस्ती राखावी. इकडील जसे द्रिष्टीस पडेल तसे लिहून पाठऊ. तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावे. उतावली कोणे गोष्टीची न करावी. तजविजेने लाग पाहून येकाधे जागा निकड करून पारपत्य करावे म्हणजे फिरोन लबाडी करू पावणार नाहीत. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke informs Naro Anandrao that Jambusar has been captured by Changoji Kadam and advises him to proceed very cautiously.*

No. 227] [*May 1775*

श्री

पुा[2] राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी. स कारकून गेले आहेत. बहुत नरमाईनें पत्रे लिहिली होती. स्नेहच करू. रुकनुदौला गेल्यामुळें कांही वाकडे पडत नाहीं म्हणौन श्रीमंतांचे

१ चहूंकडे. २ पत्र हरीपंतांचें.

पत्र पुरंदराहून आले. आपणास कलावे म्हणौन लिहिलें असे. श्रीमंताचे मानस भडोचेस जावयाचें. तोच मार्ग धरला आहे. भडोचेस गेल्यावर तुमची आमची भेट होईल. मग जसा विचार करणे तसा करूं. राजश्री माहादजी सिंदे उजनीस गेले. चतुर्थीस लडाई जाली. याची जरब त्याजवर चांगली बसली. आपलेकडील लोकांनी शर्त केली. राजश्री जयवंतराव बाबास गोली लागली हे वर्तमान पेशजी लिहिले आहे. गोलीं आंत राहिली आहे परंतु चिंता नाही. आपण कालजी न करावी. मालोजी घोरपडे जखमानीं जेर होते परंतु वाचायाचे पंथास लागले. चिंता नाहीं. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे. विनंती.

¶*This is the concluding portion of letter No. 218.*

No. 228] [*5-6-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ ६ रबिलाखर मुकाम बावापिराचा घाट रेवा उतर तीर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २९ रावलचे व छ ४ रबिलाखरचे येकून दोन पत्रे पाठविली ती पावली. बावापिराचा घाट मोकला आहे. राजपिपलेकराचे भील पलोन आपल्या जाग्यास गेले. श्रीमंत नर्मदा उतरले म्हणजे आपण उतरोन यावे. इंग्रेज यांजकडील व साहुकारी मिलोन येकशे येकवीस गलबते वादलाने बुडोन काही बंदरोबंदरी जागा जागां लागली तेव्हां काही धुलपासहि सापडली असतील. गलबते साहुकारी बुडाली याजमुले कितेक सावकाराची दिवाली निघाली. सुरतकर मोगलाचा सरकारात श्नेहच आहे, परंतु परस्वाधीन यास्तव त्याचा उपाये नाही. मी प्रेत्नास आलस करीत नाहीं. मिस्तर मुष्टीन पेशजी पुणियास गेला होता तोहि लवकरच येत आहे. इंग्रजाचे मानस सलूक करावा ऐसे आहे. परंतु सुरतकर हरामज्यादा आहे. सुरतेत ग्रहस्थ आहे तेथून बातमी आम्हास येत्ये. मिस्तर मोष्टीन आलियावर होईल वर्तमान ते लेहून पाठऊ म्हणोन वगैरे कितेक वर्तमान लिा ते सविस्तर कलले. रास्ते बुनगे पोहोचवावयास गेले. रा आनंदराव निबाजी व कृष्णाजीपंत हजार स्वारानिसी येथे आहेत म्हणौन लिा ते कलले. इकडील वर्तमान तरी श्रीमंत इग्रेजसुधा झाडेस्वरावर उतरतीरी मुकाम करून राहिले आहेत. उतरोन जावे असी बातमी आहे, परंतु आद्याप दम धरिला आहे. याचा भाव काये आहे हे समजत नाहीं.

आम्ही आज छ मजकुरी घाटावर आलो. पुढे होईल मनसबा तो लेहून पाठऊ. तुम्ही तिकडील बारीक मोठे वर्तमान चौकसीने वरचेवर लिहीत जाणे. बुनगे पोहचवावयास खासा रास्ते गेले याचे कारण काय व बुनगे पलीकडे का लाविले ? छावणी करणें तेव्हा बुनगे माघारे आाणतील की काय ल्याहावे. नदीस पाणी दोन दिवस आले आहे. उतार पाण्यास लागला आहे. उतार जाला म्हणजे पलीकडे उतरतो. श्रीमंत भडोचेस छावणी करितील किंवा सुरतेस येतील हे समजत नाही. बोलवा तर नदी उतरावयाचा आहे. वडेल ते लिहू. आकलेश्वराकडे पायेगुडे व रास्ते यांजकडील हजार राऊत बुनगे उतरले ते सांभाळून आणावयास पाठविले आहेत म्हणौन लिहिले ते कलले. नदीचे पाणी दोन दिवस वाढले आहे. आज उतार लागला आहे. उतरावयाजोगे जाले म्हणजे उतरून तुम्हाजवल येऊ. पुढे करणे तसे करूं. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶The havoc done by a storm to the English ships and other cargo ships and the consequent bankruptcy of some of the merchants is communicated to Naropant by Haripant Phadke. "Raghunathrao is at Zadeshwar along with the English and intends shortly to cross the river. It is not certain whether he will encamp at Broach or come down to Surat", says the writer.

No. 229] *[8-6-1775*

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. दोन च्यार दिवस तुम्हाकडील वर्तमान कलत नाही, लिहावें. श्रीमंत दादासाहेब झाडेश्वराजवल होते ते शुक्रेश्वरावर आले. आम्ही बावापिराचे घाटी आहो. पाणी आले होते ते उतरत चालले. येक दोन दिवस पाऊस नाही पडला तर उतार होईल. कालपासून कांही पथके उतरावयास लाविले आहे. तुम्हाकडील फौज रास्ते याजकडील आनदराव व पायेगुडे आले आहेत ते आकलेश्वराजवल आहेत. त्यास आम्ही राहिला या सुमारे दक्षणतिरी बलाविले आहे. येतील. श्रीमंतांचा उतरावयाचा बोलवा आहे. कधी उतरतील पाहावें. बडोदे डबई वगैरे माहालचे रखवालीस फौज ठेवणे, त्यास तुमची भेट जाल्यावर रवानगी करूं. रास्ते बुनगे लावावयास गेले होते ते आले की नाही ते ल्याहावे. तुम्ही राहिला तेथे रास्ते अगर बालाजी खंडेराव ठेऊन तुम्ही सडे आम्हांस येऊन भेटतां तर कितेक गोष्टी बोलण्यांत येत्या. त्याप्रों करावयास

6128

येईल. तेथील बंदोबस्त करून जरूर पुढे दक्षणतिरास यावे. मुष्टीन मुंबईहून सुरतेस येणार होता. आला कीं नाही ते लिहावे. नवल विशेष वर्तमान लिहीत जावें. रा। छ ९ रबिलाखर दोन प्रहर दिवस बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke gives his own movements and also of Raghunathrao—especially the possibility of his crossing the river. He further enquires whether Mostyn has arrived at Surat from Bombay.*

No. 230] *[22-6-1775*

श्री

राजेश्री राणोजी नाईक निंबालकर

गोसावी यांस

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो सिदोजी नरसिंगराव सितोले देशमुख प्रा। पुणें रामराम विनंति उपरी मुकाम डबई नजीक नदीवरी येथें जेस्ट वद्य दसमीपर्यंत सुखरूप असो विशेष. आपणांकडोन बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नव्हतें. सांप्रत्ये पत्र आलें त्यावरोन सविस्तर कळों आलें. यानंतरी आपण लिहिलें जे आपण तेथें जावोन बसला आणि येथें नानाप्रकारचे उपद्रव जाले आणि अपाये जाला. त्यास येविसई गुदस्तां आपणांजवळ दोन महिणे बसलों. परंतु आपणांस ती गोष्ट अणकूल न पडली. बरें असो. आपण लिहिलें जे आपण येथें यावें, सर्व बंदोबस्त होऊन येईल. त्यास इकडे सांप्रत्ये प्रजेण बहुत लागला आहे. अस्विन कार्तिक मासीं येऊन पोहोंचतों. कलावें. इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री दादासाहेब यांसी हरिपंत फडके याणी सात आठ लढाया घेतल्या. परंतु मोडले गेले. हजार दोन हजार घोडे माणूस पडले त्याकडील. यानंतरी बावापिराचे घाटावरी खासा हरिपंत उतरत होते ही बातमी श्रीमंतास कललियावरी रात्रीचे भडोचेहून कूच करोन प्राथकालीं दिवस दोन तीन घटका येतांच उतारावरी गाठले. त्यास दोन तीन हजार घोडे पाणियांत बुडाले. माणसें बुडालीं. पलीकडे बुनगे व दारकोजी निंबालकर वगैरे सरदार उतरले ते कोलियानी लुटले. हजार पांचसें घोडे व तोफा सात आठ लूट लस्करांत आली. हरिपंत पलोन मालवियाकडे गेले. कलावे. श्रीमंतांनी तमाम ठाणी या प्रांतीं बसविलीं. फतेसिंग व खंडोजी गायेकवाड याच्या आज उद्यां भेटी होणार. फौज तीस बत्तीस हजार व फिरंगी वीस बावीस हजार पाईचा व पांच सात हजार वोडीं पावील (?) व तोफा संभर सवासें

बरोबर आहेत. डबई बडोदियांत ठाणी बसलीं. कलावें दुसरें वर्तमान शाहाजी नाईक निंबाळकर गोळा लागून पडले. राजश्री माळोजी घोरपडे वगैरे सरदार फार जखमी जाले व पडले याप्रमाणे वर्तमान आहे. आपण कागद देऊन माणसें पाठविलीं तीं आम्हांपासीं आलीं. त्याची याची गाठ न पडली. कलावें. आम्ही अस्विनमासीं खामखा ये देशास आलों. कलावें. वरकड जबानी माणूस सांगतां कळों येईल. बहुत काय लिहिणे हे विनंति.

¶*The skirmishes between Raghunathrao and Haripant Phadke in Gujarat and the defeat and woeful plight of the forces of the latter are communicated by Sidoji Shitole to Nimbalkar.*

No. 231] [*22-6-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा। नमस्कार विनती उपरी. येथील कुशल ता। छ २३ रबिलाखर मुकाम धर्मपुरी नर्मदा उतर तीर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्हाकडून पत्रे आली ती पावोन त्याची उतरे गेलीच आहेत, पावतील. इकडील वर्तमान तरी आजच आम्ही मुकाम मजकुरास आलो. पुढे नावा जमा करावयाविसी पत्रे गेली आहेत. ज्या घाटास नावा जमा होतील त्या घाटाने रेवा उतरावी असा मजकूर आहे. काही फौज व बुलगे तिकडे उतरोन तुम्हाजवळ आले आहे. त्यास बुलगे आधिक उणे असले ते लावावे. फौजानी राहावे म्हणौन राजश्री मलबा बापू यास सागितले आहे. त्यास बुलगे लाविले की न लाविले, फौज आहे त्याजपैकी राहिली किती, गेली किती, हे वर्तमान सविस्तर लेहून पाठवावे. आम्ही रेवा उतरोन दक्षणतिरास आलो म्हणजे तुम्हास लिहून पाठऊ. सोनगडास गोविंदराव यांचे ठाणे आहे. त्याणे मार्गास अवरोध होतो. त्यास मलबा तुम्ही मिलोन सोनगड घेऊन तेथील बदोबस्त व सयाजी गायकवाड आपले स्वाधीन राहात असे करावे. सुरतेची बंदी आहेच. चांगली आसो द्यावी. वर्तमान लिहीत जावे. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal informs Naropant Keskar of his arrival at Dharmapuri and of the arrangements that he made for crossing the river Narbada. He advises a strict and close blockade of Surat.*

No. 232] [23-6-1775

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. सुरत प्रांतचे माहाल गायकवाडाकडे आहेत. त्यापैकी कांही माहाल फौजेस त्याणी दिल्हे आहेत. तेथील अमल चालविण्याविसी सरकारचे पत्र आपल्यास आहे. येथून मामलतीचे कामास रा लक्ष्मण रघुनाथ पा आहेत. हे आपल्यास भेटतील. यांचा अमल बसऊन द्यावा. सिलेदार फतेसिगबावा बराबर जात नवते. मोठ्या प्रयासें करून हा प्रकार काढून त्याजबा लाऊन दिल्हे. याजकरितां आपण बंदोबस्त करून द्यावा. भाणा धनजी व कल्याणजी नथू देसाई परागंदा जाले आहेत. त्यास हे कौल देऊन आणितील. तुम्ही त्यास दिलासा देऊन ते येऊन आबादी होय ती गोष्ट करावी. अगत्यवाद धरून कार्य करावे. रा छ २४ रबिलाखर बहुत काय लिहीणे लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Hari Ballal asks Naro Anandrao to help Lakshman Raghunath in settling and assessing the rent from the province round about Surat given by the Gaikwad for the maintenance of the army.*

No. 233] [27-6-1775

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २८ रबिलाखर मुकाम नजीक धर्मपुरी नर्मदा उतर तीर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. आम्ही बावापिराच्या घाटावरून कूच करून इकडे आलो. काही फौज व बुलगे नर्मदा उतरोन तापीतिरास गेले. त्यापासून तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान काहीच कलत नाही. आम्ही इकडून येक दोन पत्रे पाठविली होती ती पावली न पावली हेहि कलले नाहीं. तुम्हीहि पत्रे पाठविलीच असतील, परंतु मार्ग दुर्घट झाडी बहुत, माणूस निभावत नाही, याजमुले कागद पावत नाही. आम्ही धर्मपुरीनजीक जाऊन तेथे उतरावयास नावा जमा फार जाल्या तरी तेथे उतरो, नाही तरी बडव्यास जाऊन तेथे उतरोन तुम्हास लेहून पाठऊ. बावापिरावरून माणूस निभावत नाही याजकरिता तिकडून आमच्या सुमारे कागदपत्र पाठवीत जावे म्हणजे पावतील. राजश्री मलबा बापू व तुम्ही मिलोन तिकडील बदोबस्त

6131

राखावा. सोनगडचा बंदोबस्त करून आपले हवाली करून ठेवावा. उपयोगी पडेल. मधीच खूल कामाचे नाही. तुम्ही बदोबस्त केलाच असेल. लिहून पाठवावे. आम्ही फार लांबलो, इलाज नाही. नदी उतरून येत आसो. पाऊस फार. च्यार दिवस अधिक लागतील. चिंता नाहीं. वर्तमान वरचेवर लेहून पाठवीत जावे. सविस्तर बापूचे पत्रांत लिहिले आहे त्यावरून कलेल. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶Hari Ballal complains about the difficulties in the way due to jungles, etc., which is responsible for the delay in correspondence. The writer suggests some measures to be adopted for the defence of Surat and for wresting Songad from Govindrao.

No. 234] *[27-6-1775*

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. आपण छ १८ राखरचीं पत्रें पा। ती पावली. वर्तमान कललें. राजश्री मलबा बापू बुनगेसुधा पावले म्हणौन लि। ते कलले. आम्ही इकडे आल्यामुले थोडेसे विस्कलीत पडेल, चिंता नाहीं. आम्ही निकड करून नदी उतरून येत असो. तुम्ही बापू फौजसुधा सोनगडाजवल राहून सोनगडचा व सुरत आठाविसीचे माहालचा बंदोबस्त करावा. आम्ही निकड करून येतो. सर्व भरवसा तुमचा आहे. रा। छ २८ राखर हे विनंती.

¶Haripant Phadke asks Naropant to make proper arrangements for the defence of Songad and Surat district till his arrival there.

No. 235] *[26-6-1775*

श्री

यादी नावनिसीवार. येणेप्रमाणे कुटुंबे धरून किल्यात कैद करावी घरे लुटावी बि।।

१ लक्षुमण नरसी कुळकर्णी वोतूरकर. जर कुटुंब वोतुरी नसेल तरी जुनरात बालाजी नाईक पांडे सावकार यांचे येथे. जर तेथेहि नसेल तरी मौजे आंबेगव्हान खदारमाल नादुरापासी मुळखळीस आंबेघारगावाचे आसपास. तिन्हीतून येके जागा आसेल.

१ बाळाजी नाईक पांडे सावकार जुनरकर यांचे कुटुंब हवेली जुनरात आहे. मारनिले श्रीमंत दादासाहेबाचे लस्करात दुकान घालून आहे. पेशजी खरगसिंगानी श्रीमतास पुन्यात दगा केला, त्याजला नाइकानी दाहा हजार रुो कर्ज दिल्हे होते. हाली धारेचे किल्यात बाईसाहेबास कर्ज देतो. कारभार करितो.

१ विसाजी हरि बाम निा आंताजी माहादेव मेंदळे याचे कुटुब कल्यानात आहे.

१ आंताजी माहादेव मेंदळे विसाजी हरीचे धनी यांचे कुटुंब कल्यानात आहे. धारेची मामलत मारनिलेची आहे. बिसाजी हरि मेंदळ्याचा कुलकुला कारभारी आहे. घरचा सुखी आहे. सधन आहे.

१ नारो बापूजी रिसबूड यांचे कुटुंब मुरूड सोनदुर्गापासी आहे.

१ आपाजी गणेश भागवत यांचे कुटुंब कोकनात आहे. स्त्री शांत जाली. भावाची कुटुंबे व मारनिलेचा पुत्र आहे. यांचे घर राजश्री सिवराव माहादेव यांसी पुसावे. ठीक लागेल.

१ नेतोजी जगताप पागया यांचे कुटुंब मौजे मरकळ तुळापुरापासील, तेथे नसले तरी डोळस नेबाळेश्वरे पोखरीपासील तेथे आसेल.

—

७

यो सात जनाचा कुटुब धरून घर लुटून उतम प्रकार पारपत्य हाइल तरा धारेचे किल्यात बाईसाहेब आहेत ते मसलत पुढे हालकी पडेल. नाही तर मसलत भारी पडेल. झाडून माळव्यात खुळ मातेल. पुढे जड जाईल रा छ २७ माहे राखर.

¶*This is a list of persons whose families were put into confinement and properties confiscated for being accomplices of Raghoba.*

No. 236] *[29-6-1775*

श्रीशंकर

श्रियाविराजित राजश्री नारोपंत दादा

पोष्ये खंडेराव बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा आशाढ शुद्ध २ जाणून स्वकीये लेखन करीत आसिले पाा विशेष. नवाब याचे कूच आलजपुरीहुन होऊन आलीकडे आले. औरंगाबादेस छावणीस येणार

याप्रा लस्करातून पत्र. राजश्री जिवाजीपंत वकाल याचे आले. महमद इसब गाडदी रा भोसले, याजकडे होता. त्याजपासून गेला म्हणून यैकिले. राजश्री मुधोजी भो हे निरोप घेऊन नागपुरास जाणार म्हणून यैकिले. सेवेसी श्रुत होये. विशेष काये लिहिणे लोभ आसो द्यावा हे विनंती.

¶*Khanderao Ballal to Naropant, informing him that the Nizam has left Ellichpur and is expected to encamp at Aurangabad. He also writes about Muhammad Isaf having left the Bhonsles.*

No. 237] [*June 1775*

श्री

+
पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी. इंग्रेजाचा काही जमाव मुंबईस जाऊन तेथून पुण्याकडे गडबड करावी, दुसरे त्रिंबकाकडे गडबड करावी असी बातमी पुण्यास आहे म्हणौन आम्हास लिहिले होते. त्यास तुम्ही घाट चढोन वरते आलेत. आम्हाकडे यामुले बातमी ठीक कलत नाही. त्यास तुम्ही जवळ आहा. सुरतेत सारी बातमी कलते. तेथे हर कोणाचे द्वारे पकी बातमी राखोन आम्हाकडे व पुरंदरास लिहीत जावे. बातमीविसी आलस करू नये. च्यार रुो खर्च पडला तरी करावा परंतु खामखा बातमी राखावी. नाना, काल येक प्रकारचा आला आहे, सावध असावे. आम्ही तापी उतरून लौकर येतो. परंतु इकडे आपा वामनराव कामगारीस गेले आहेत. ते आले म्हणजे तापी उतरून येतो. आपण तेथे मंडली आहे त्याणी सर्वांनी येकमते असावे. बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Haripant writes to Naro Anandrao asking him to keep a good look out for the English who are reported to be planning an attack on Poona or Trimbak.*

No. 238] [*2-7-1775*

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ राखर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २७ रावलचे पत्र पाठविले

+ पत्र हरिपंत तात्याचें.

ते छ १ राखरी पावले. बापूजी हरि याजबरावर पाच सातसे गाडदी व हशमी माणूस व देवजी आवधूतराव जठारकर येसे येऊन गंभीरगड कोल्यानी घेतला होता तो माघारा घेतला, व बालाजी विठल फडके याचे बरावर जजीरकर शामलाने दरवडा घालावयासी लोक पाा होते. ते दिवसी बालाजीपत कुटुबसुधा वसईस गेले. बचाव जाला. वरकड कोणाचे वाटेस गेले नाहीत. सरकारचे पत्र इस्मालखान नवाबाने मारल्याचे आले. त्याची नकल पाठविली आहे त्यावरून कलेल म्हणौन लिा ते कलले. इकडील वर्तमान तर श्रीमंत इग्रजसुधा आद्यापि भडोजेसच आहेत. उतरावयाच्या विचारांत आहेत. ते नदी उतरले म्हणजे आम्ही उतरू. श्रीमंत भडोचेस छावणी करूत किंवा सुरतेस जाऊत. बडोदे प्रांती गायकवाडसुधा दाहा हजार फौज ठेविली पाहिजे. त्यास गायकवाडाचे फौजेचा गवगवा, आमचे कोणी ठेवावे तर नाही नाही म्हणतात. तदोतर नदी उतरावे. तापीपलीकडे यावे, तुमची भेट होईल मग करणे तसे करावे असे आहे. तुमचे मते कसा विचार करावा ते लेहून पाठवावे. बहुत काय लिहिणे लोभ असों दीजे हे विनंती.

¶*"Raghunathrao is at Broach along with the English but thinks of crossing the river", writes Haripant Phadke to Naro Anandrao, promising him that he would also push beyond the river after Dadasaheb.*

No. 239] [*4-7-1775*

पौ+ छ २१ जोवल

सीत

श्री

सेवेसी हरि बलाल साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ५ जमादिलोवलपावेतो स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष. राजश्री कोनर झिमदेव याणी श्रीमंत राजश्री दादासाहेब याजकडे ग्रहस्त आहेत, त्या ग्रहस्ताची याद लेहून पाठविली ती स्वामीकडे पाठविली आहे. पावल्यावर यादीप्रमाणे बंदोबस्त जाला पाहिजे. पवाराचे माहालचा बंदोबस्त त्रिंबकराव सिवदेव यांचे विद्यमाने व्हावा म्हणून कोनेर झिमदेव लस्करांतून पाठविले. स्वामीनीं चिंतो कासी पाठविले ते व कोनेर नाईक येक होऊन बंदोबस्त करीत आहेत. धारेस मातुश्रीजवल पवाराकडील ग्रहस्त आहेत. फार करून त्रिंबकराव शिवदेव याचे

+ पैबस्ति नाना फडणीसाचे हातची.

मारूफातीचे परंतु बखेड्यास अनकूल जाले आहेत. त्याची याद पाठविली आहे, त्याप्रो जप्ती करावयास आज्ञा करावी. तिकडील जफ्तीचा बोभाट इकडे आला म्हणजे सारी मंडली कोनेर नाईकाकडे मिलोन सरकारचे काम होईल. बंदोबस्त लौकर करावा. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant encloses a list of the names of certain individuals who were committing treason and asks the addressee to get them properly punished. The list is probably the one printed at No. 235 above.*

No. 240] [*6-7-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारोपंत
नाना स्वामीचे शेवेसी

पो मल्हार जगजीवन सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ७ जोवल मुा गलनिंब प्रवरातीर जाणून स्वकीयें कुशल लिहा जावें विशेष. तुम्ही पत्र पाठविले ते पावलें. राजश्री हरिपंत तात्या फौजसुधां आलीमोहनचे रानातून महेश्वरचे सुमारें आले. रेवा उतरण्यास चिखलदे व आकबरपूर येथे आले, ऐसी बातमी रनाल्याहून यादवराव रघुनाथ याचे कारकुनानी लिहा म्हणौन लिहा, उतम आहे. त्यास आम्ही मजल दरमजल तिकडेच येतों. तुम्ही पिंपलनेराजवल मुकाम करून राहाणे. पोटास नाही, सबब बुणगे झाडून लोकाचे देसास गेले. कोन्ही कोन्हास पुसले नाही. लोकहि फार गेले. थोडे राहिले ते तशात तुम्ही पत्र लिहा हे पाहून मावारे फिरले. मजल दरमजल येतो. पुरंधरचीहि आज्ञा आली. आपण पिंपलनेरा आलीकडे पलीकडे राहावे तो आम्ही येतो. येक सांडणीवर पोटासच पागेच्या चंदीबदल सात हजार रुा पाठवावे. आम्ही आले वाटेने माघारे येतो. तात्यासहि लेहून मुजरद पाठवावे. भेटीनंतर सर्व वर्तमान कलेल. हे विनंती.

पो सदासिव अनंत सा नमस्कार विनंती. लिहिले परिसोन सदैव पत्र पाठवावे. आम्ही आपले पत्रावरोन मावारे फिरलो. दरमजल येतो. बातमी लिहिली ते कलली; आणखी कलेल ती लिहावी. लोभ करावा हे विनंती.

राजश्री बालाजीपंत स्वामीस सा नमस्कार. लोभ कीजे हे विनंति.

¶*Malhar Jagjivan learns from Naro Anandrao the arrival of Haripant and his army near Maheshwar and says that he will also soon proceed to meet the addressee.*

6136

No. 241] [*7-7-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल छ ९ जमादिलाखर मुकाम नजीक बऱ्हाणपूर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही छ २ जमादिलाखरचे पत्र पाठविले ते छ जमादिलाखरी पावोन लिा। वर्तमान सविस्तर कलले. श्रीमत इग्रजसुधा रेवा उतरोन आंक्लेस्वरावर आले म्हणौन वर्तमान बातमीचे आले. येक मनसबा कोकणातून जावे, येक मनसबा सोनगडच्या सुमारे यावे असाहि मजकूर आहे. त्यास आपण तापी उतरोन लौकर यावे म्हणजे ठीक पडेल. आम्हास आपण लिहितात की राजश्री गंगाधरराव रास्ते व तुम्हीं नवापुराकडे जाऊन ठाणे घेऊन पुढील बदोबस्त करणे, तो आम्हीहि येणे, म्हणौन लिा। त्यास फौजेचा प्रकार तो वारंवार आपणास लिहीत गेलो. तिकडे कोणत्या ऐवजावर जावे ? गेल्यासासारिखे कामकाज जाले म्हणजे उत्तम. नाही तरी बदलौकिक. ऐसे कितेक तपसील लिा। ऐशास सोनगड प्रांतींहून तुम्ही येकदर न येणे म्हणौन पत्रे जात आसता तिकडील शह टाकून आला, त्याजमुले तिकडे दगा होऊन नवापूरपावेतो देशमुखाने ठाणी बसविली. तुम्ही असता तरी दगा न होता. आसो ज्या गोष्टी जाल्या त्या उत्तम जाल्या. याउपरी तरी तुम्ही व रास्ते मिलोन नवापूरचे ठाणे घेऊन तिकडील बदोबस्त करणे. राजश्री आपा व वामनराव आले म्हणजे आम्ही लौकरच तिकडे येतो. आपाची व महमद इसफ याची आद्याप गाठ पडली नाही. साता कोसाचे आतर आहे. आम्ही तुम्हाकडे लवकर यावें. तुम्ही आम्ही येक होऊन तिकडील मसलत करावी हेच मानस, परंतु इसफाचे काम मध्री पडले यामुले दिसगत लागली. त्वरा होईल तितकी करीतच आहे. लवकर येतो. आपण तिकडील बातमी राखोन वरचेवर लिहीत जावे. सावध असावें. सावधगिरीविसी आपणास ल्याहावें असे नाही. पत्रांच्या सिलसिला वरचेवर असावा. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke notes the lines of action suggested by Naropant Nana to meet the contingencies arising from Dadasaheb's plan either to go to Konkan or to go to Songad after having crossed the Nerbada with the English. He asks the addressee to return to Navapur as his absence there has enabled the Deshmukh of that place to reoccupy some of the posts.*

6137

No. 242] [9-7-1775

श्री.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना केसकर स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ १० जमादिलोवल मुकाम नजीक मडलेश्वर नर्मदा तक्षणतीर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. छ २९ राखरचे नवापूरचे मुकामीहून पत्र पाठविले ते पावले. बावापिराच्या घाटास नर्मदा उतरोन बुलग आले ते तापी उतरोन देशी रवाना केले. आपण डबईच्या सुमारे गेले. तिकडे जासूद पाठविले परंतु निभाव जाला नाही. परतोन आले. आलीमोहनच्या रानातून महेस्वरच्या सुमारे नर्मदा उतरावयास गेले असे वर्तमान जासुदाने सांगितले, त्यास आपण कोणे ठिकाणी आहा, रेवा कोणत्या घाटाने उतरणार हे लेहून पाठविले पाहिजे; बुलगे तापीतिराहून देशी रवाना केले. आम्ही तापीतिरी राहिलो, परंतु प्रज्यन्य बहुत, छावणीस जागा चागली नाही याजकरिता पिपलनेरास मुकाम केला. आपले पत्र येईल त्याप्रा। पुढे करू. सिलेदाराची वगैरे गुरे व किरकोल बुलगे देशी जाईल. राजश्री मलबा बापू व दोन तीन पागा आहेत ते व राजश्री सदासिवपत करमरकर मालगावासमीप राहावे असा त्याचा आमचा करार आहे. राजश्री गोविंदराव सदासिव पागा व आणखी सिलेदार आपल्या खर्चास ऐवज काही नस्त काही हुड्या ऐसा आला आहे. आपली बातमी पकी कलल्यावर त्या सुमारे रवानगी करू, या आन्वये पुरंधरास वर्तमान लिहिले आहे. आपण बहुत सावधपणे नर्मदा उतरावी. राजश्री विसाजीपंत जोगदंड याचे पत्र बातमीचे आले तेच आपलेकडे पाठविले आहे त्याजवरून सर्व वर्तमान ध्यानात येईल. सारांश आपण कोठे आहेत, काये वर्तमान हे तपसीलवार लेहून पाठवावे म्हणौन लि। ते सविस्तर कलले. त्यास आम्ही मंडलेस्वरानजीक दोहो कोसावर नर्मदा उतरावयास आलो. नर्मदा दक्षणतिरास फौजसुधा उतरोन आलो. थोडी बहुत फौज राहिली ती आज संध्याकालपावेतो उतरेल. राजश्री तुकोजी होलकर यास निरोप देऊन आशाढ सु॥ त्रयोदशीस कूच करून बऱ्हाणपूरच्या सुमारे तापी उतरावयास यावे असे मानस आहे. महमद इसफ गाडदी आलजपुराहून दोन तीन हजारानिसी नर्मदा उतरावयास बडव्याच्या घाटास येत होता, तो आमचे फौजेची बातमी कलल्यावर हाड्याच्या घाटे उतरावयास गेले असी बातमी आहे. त्याजवर हाड्याच्या घाटापावेतो फौज काही पाठवावी असा मनसबा आहे. तोफखाना पुढे बऱ्हाणपुरास रवाना केला. दोन दिवस जाले. तुम्ही व रास्ते सोनगड

प्रांती राहून सुरतेची बंदी राखावी असे असतां आगदींच सोडून आलीकडे आला हे कसे केले ? सुरत अठाविसीचा बंदोबस्त कसा राखिला हे कलत नाही. आमचा मनसुबा फिरोन फौजेनसी सोनगड प्रांती छावणी करावी असा होता. हा मजकूर राजश्री मलबाचे बोलण्यात आले होते तथापि (अपूर्ण).

¶On being asked by Naro Anandrao as regards his whereabouts, Haripant Phadke informs him of his arrival at Mandaleshwar after having crossed the Nerbada. He asks the addressee for a contingent being sent against Muhammad Isaf. He also inquires as to what arrangements were made by the addressee for the defence of Surat.

No. 243] *[12-7-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना केसकर स्वामीचे सेवेसी

पों हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १३ जमादिलोवल मुकाम नर्मदा दक्षणतीर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशष. तुम्ही छ ३ जमादिलोवलचे पत्र का दहीवले नजीक पिपलनेर येथील मुकामीहून पाठविले ते छ ११ मिनहून पावले. बुलगे व पागा राजश्री मलबा बापू व राजश्री सदासिवपंत करमरकर मालेगावासमीप आहेत. त्यास आम्ही आलीकडे आणविले आहे. राजश्री गोविंदराव सदासिव पागा व सिलेदार हजार बारासे स्वार पुरंदराहून खर्चास घेऊन आले आहेत ते उदईक आम्हापासी येतील. आपले पत्र येताच बुलगे व खर्चाचा ऐवज रवाना करितो म्हणौन व भोसले नवाब याजकडील वगैरे कितेक वर्तमान लिा ते सविस्तर कलले. इकडील वर्तमान तरी आम्ही फौजसुधा दक्षणतिरास नर्मदेच्या आलो, ब्न्हाणपूरच्या सुमारे येत आसो. राजश्री कृष्णराव बलवंत यासमागमे पाच हजार फौज देऊ(न) हाड्याचे सुमारे महमद इसफ गाडदी आलजपुराहून धारेस जावयाकरिता आले आहेत म्हणौन त्याजवर रवाना केले आहेत. गाठ पडल्यास पारपत्य होईल. आपण व राजश्री नाना रास्ते यांणी सुरतेचा बंदोबस्त करून राहावे असे असता अगदीच उठोन पिंपलनेराकडे आलां हे कसे केले ? तिकडे तुम्ही असतां तर फार चांगली गोष्ट होती. चहूकडील बातनी येती. नाना, तिकडून आला हे ठीक नाही. खजिना आला तो मलबाकडे पाठविला असेल. मलबा बापूनी बराणपुरचे सुमारे यावे म्हणौन लिहिले आहे. येतील. आपण सुरतेकडील बंदोबस्त, करावा. आम्ही मलबा

बराणपूरी येकत्र जाल्यावर छावणीचा ठराव होईल तो आपणास लिहून पाठऊ. तिकडील वर्तमान आपणाकडे येत असेल ते लिहन पाठवावे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶Haripant Phadke to Naro Anandrao reporting his arrival on the southern bank of the Nerbada. He further writes that he himself is proceeding to Burhanpur having deputed Appa Mehendale against Muhammad Isaf. He expresses surprise as to why the addressee proceeded to Pimpalner instead of guarding Surat.

No. 244] [13-7-1775

श्री

पुा राजश्री नारोपंत नाना केसकर स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. येथील कुशल ता़ा छ १४ जमादिलोवल जाणौन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे. राजश्री फतेसिंगराव गायकवाड यासी व राजश्री खंडेराव गायकवाड या उभयेतासी बोलोन दोघाची गोडी करून दिल्ही. फतेसिंगराव याणी बडोद्यात राहून बंदोबस्त करावा. खंडेराव याणी नडियादेत राहून आमदाबाद येथील कितेक कामकाज असेल त्याचे साहित्य हरयेकविसी करावे, याप्रो बोलोन आण शपत क्रिया होऊन निरोप दिल्हा. सुरत प्रांते फतेसिंगराव याजकडील माहाल आहेत. त्याजपैकी दोन लक्षाचे माहाल सिलेदारास त्याणी लाऊन द्यावे. बाकी माहाल राहातील तेथील बंदोबस्त सरकारातून करावा, आणि ऐवज त्याजकडे पाठवावा. याप्रो करार आहे. त्यास तुम्ही सुरत प्रांतीं राहोन मारनिले याजकडील माहालचा बंदोबस्त करावा म्हणजे तिकडील कितेक राजकारणेहि समजण्यात येतील. फतेसिंगराव बडोद्यास गेल्यावर श्रीमंत राजश्री दादासाहेब फौजमुधा जाऊन नजीक उतरोन मोर्चे लावणार असे कलल्यावर फतेसिंगराव याणी सलुकाचा पेगाम लाविला आहे म्हणौन वर्तमान आहे. त्यास बहुतकरून ते सलुकाचा मजकूर करणार नाही. तुम्ही सुरत प्रांती असल्याने तिकडील मजकूरहि कसकसे होतात हे कलतील आणि बंदी केली आहे त्याचा बंदोबस्त राहील. याप्राा प्रकार आहे. हा तुम्हास कलावा म्हणौन लिा असे. +बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶Haripant informs Naropant Keskar of an agreement having been effected between Fatesing and Khanderao Gaikwad.

+ पत्र हरिपंत तात्याचे.

No. 245] [13-7-1775

श्री

सेवेसी बाहिरो रघुनाथ सा नमस्कार विनंती. ता छ १४ जमादिलोवल गुरुवासर दोन प्रहर येथास्थित असे विशेष. आपली आज्ञा घेऊन निघालो ते आज दोनप्रहरा येथे ठेंगोडेयास दोन प्रहरां आलो. सायंकाळीं चांदवडबारीखाली मुकामास जातो. उदईक चांदवडबारी चढोन कोकमठाणावर गंगा उतरावयास जाऊ. मदनेश्वरचे नांदुरावर गंगा उतरोन झोळीचंदनचे वाटे जावे तर मार्ग ठीक नाही. यास्तव निंबदेव्हारियाचे वाटे जाऊ. दोन मजला अधिक पडतील. दौलताबादचा किला नवाबास दिल्हा. त्याचे लोक वर चढले म्हणौन वर्तमान आहे. नवाबाचे बुनगे औरंगाबादेस आले. मागाहून सडेहि औरंगाबाजेस छावणीस येणार म्हणौन येथे वर्तमान औरंगाबाजेकडील भला माणूस आला त्याणे सांगितले. कलावे. गुजराथेस वर्तमान कलत नाही म्हणौन आपण कोंडाईबारी व घोडेघाटचा बंदोबस्त कागदपत्र कासीद धरावयाचा करोन मल्हार बाबूराव कारकून ठेविले आहेत. त्यास गुजराथेतील माणूस त्या दोही घाटे येत नाही. वरसेयास घाटाखाली येऊन वरसेयाचे वाटे वर चढोन पिंपळनेर गावातोन किंवा पिंपळनेर डावे टाकून कासीद, जासूद ब्राम्हण वगैरे ताहराबादेस येतात. आमदाबाद, भडोज, बडोदे चोहोकडील व सुरत देखील माणसे त्या मार्गे येतात, त्यास पिपळनेर आथवा ताहाराबादेस चौकी व कारकून ठेऊन कासीद व कागद धरावे, म्हणजे तिकडील श्रीमंताकडील वगैरे वर्तमान वरचेवर कलत जाईल. आद्याप बडोदे श्रीमंतानी घेतले नव्हते. फतेसिंग बडोद्यात आहेत. राजकारण लागले आहे. महीपार श्रीमंताकडील कोणी आद्याप गेले नाही म्हणौन महीपारचे ब्राम्हण सुतेवरून आले, कालच विरमगावी भेटले, त्याणी जबानी वर्तमान सागितले. कलावे. सदरहू कागदपत्र कासिदाचा बंदोबस्त जाला म्हणजे आपणास वर्तमान वरचेवर कलेल. नवापुरास चिमणराव हजार माणसानिसी मंगळवारी गेला आहे कलावे. जाणे ते पकी बातमी आणऊन जावे. श्रुत व्हावे हे विनंती. राजश्री बालाजीपंत फडणिसास सा नमस्कार विनती. लिा परसोन सदैव पत्री तोषवावे हे विनंती.

¶*Bahiro Raghunath writes about the dangers that people had to face when coming down from Gujarat and therefore suggests another safer path. He further informs that none from Raghoba's side has so far been able to cross the Mahi.*

6141

No. 246] [19-3-1775

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही छ ६ मोहरम छ ८ मोहरमची पत्रे पाठविलीं ती पावोन लिहिले वर्तमान सविस्तर कलले. श्रीमंतानी शहरांत राहून माणूस जमा केले. पाईचे माणूस व तोफ शहराबाहेर निघाल्या आहेत. आम्ही सुरतेची नाकेबंदी केली आहे. आणखी फौज दाहा हजार पाठवावी म्हणजे सर्व बंदोबस्त होईल. भडोचची बंदी झाली पाहिजे म्हणौन लिा. त्यास तुमचे लिहिल्यावरून चांगोजी कदम याची रवानगी तुम्हाकडे केली. मागाहून दुसरी फौज पाठवावी तों काल शनवारी खंबईतहून पत्रें आली की श्रीमंत गलबतात बसून शुक्रवारी खबइतेस दाखल जाले. पंनास साठ गलबत सरंजाम भरून आली. त्यावरून खंबाईतचा बंदोबस्त जाला पाहिजे. याजकरितां आंम्ही फौजसुधा ह्या सुमारे जातो. राजश्री वामनराव भावनगराहून फिरले. आम्हाकडे येणार. त्यास लेहून पो आहे की तुम्ही खबाईतचे सुमारें राहावें. चांगोजी कदम यास लिहिले आहे जे तुम्ही बडोद्याचे सुमारे राहाणे. गायकवाडाकडील मजकूर तर उभयतांचे कारभारी आले. त्याची निशा पकेपणे केली. त्याणी भेटीस यावे असा निश्चय जाला. येऊन भेटावे असे आहे. मग ईश्वरी सता. श्रीमंत खंबाईतीस आले तेव्हा आम्हांस तिकडे जाणे प्राप्त. तुम्ही सुरत भडोचची बंदी चांगली करावी. वर्तमान वरचेवर लिहीत जावें. सुरतेहून छापा घालावयास तीन हजार माणूस व तीन च्यार तोफा निघाल्या होत्या, परंतु आम्ही सावध होतो, माघारे गेले म्हणौन लिा ते कलले. तुम्ही रात्रदिवस बहुत सावधपणें राहात जाणे. श्रीमंतांचे कागदपत्र त्या प्रांतीं जातील येतील याची चौकसी जितकी होईल तितकी करीत जावी. तुम्ही सावध आहा, फार ल्याहावेसें नाही. देसचे वगैरे वर्तमान अधिक आगलें आढलेल ते लिहीत जावे. रा छ १६ मोहरम बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke informs Naro Anandrao that he has detached Changoji Kadam to his assistance and that he himself is following Raghoba to Cambay. He reports favourably about the negotiations with the Gaikwads and asks the addressee not to slacken in his vigilance.*

+ पत्र हरीपंताचें.

No. 247] [*22-7-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना केसकर स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा. नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २३ जमादिलोवल मुकाम नजीक आशेर जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ १३ जमादिलोवलचे कां दहीवेल पा मजकूर येथील मुकामीहून पत्र पाठविलें तें पावले. पाच सात पत्रे लेहून जासूदजोड्या आपणाकडे पाठविल्या परंतु पावोन उतरे आली नाहीत. नर्मदा उतरोन कोणत्या सुमारे येणार? छावणी कोणत्या ठिकाणी होणार? राजश्री मलबा बापू बुलगे घेऊन गंगापार गेले होते. त्यास पुरंदराहून पत्रे आलियावर फिरोन माघारे साखरीवर येऊन मुकाम केला आहे. आपले पत्र येईल त्याप्रा करितील. राजश्री गोविंदराव सदासिव ऐवज घेऊन पुरंदराहून आले ते आम्हापासी आहेत. राजश्री मलबा व गोविंदराव ऐवज देऊन आपणाकडे रवाना करितो. पत्राची मार्गप्रतीक्षा करीत आहो. सुरत शहरात आठरा लक्ष्याची पटी जाली आहे. निकडीने वसूल होत आहे. सरंजाम करावयास लागले आहेत. श्रीमंत बडोद्यास जाऊन मोर्चे लाविले आहेत. फतेसिंगराव याजकडून भानगडहि लागली आहे. बहुतेक करून गुता उरकला असेल. तेथून आमदाबादेस जाणार व दुसरा मनसबा सुरत प्राती यावे, सोनगडी जमाव होत आहे. आपण सोनगडाकडे छावणीस (जा)वे ऐसे पुरदराहून लिा आले आहे. आपण येत * * आम्हास येथेच मुकाम करावयास सांगितले आहे. आपली मार्गप्रतीक्षा करीत आहो म्हणोन लिा ते कलले. ऐसियास आम्ही येका दोहो रोजानी बऱ्हाणपुरास येतो. तेथे आलियावर लेहून पाठऊ. राजश्री मलबा बापू व खजिना बऱ्हाणपुरच्या सुमारे पाठऊन द्यावा. छावणीस तुम्हाजवल यावे, तुमचे विचारे होईल तेथे महिना दोन महिने राहावे आसे आहे. मलबा बापू बाा बुलगे होते ते देशास गेले ही गोष्ट वाईट जाली. असो कसेहि करून तुम्हाजवल येतो, मग करणे तसे करू. तुम्ही गुजराथची बातमी राखोन वरचेवर आम्हास व पुरंदरास लिहीत जावी. मा इसुफ भोसल्यापासून रुसकत होऊन धारेस जात होता. सरकार माहालास उपद्रव करू नये आसा करार, त्यास माहालास उपद्रव फार केला, पैका घेतला. हांड्याकडे आहे असे वर्तमान आम्ही नर्मदा उतरत असतां कलले. त्याजवर नर्मदा उतरून राजश्री आपा व वामनराव आठ हजार फौज रा केली आहे.

गांठ पडल्यास पारपत्य करतील. नदी उतरला तर माघारे येतील. आम्ही बराणपुरास येतो. तेहि मागाहून येतील मग तापी उतरूं. आम्ही व मलबा बापू बा फौज आली ती सुरत प्राती राहातेस म्हणजे मोठे काम होते. बापूचे फौजेस पोटास नाही म्हणून आले. तुम्ही मागाहून आला येणेकरून तिकडील (अपूर्ण).

¶Haripant Phadke informs Naropant Nana that he would soon proceed to Burhanpur as desired by the writer and that Appa Mehendale and Wamanrao Patwardhan have both been sent against Muhammad Usaf who, while on his way to Dhar, ravaged the country. He further asks the addressee to send Malba and the treasures from Poona to Burhanpur.

No. 248] *[24-7-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २५ जमादिलोवल मुकाम नजीक आशेर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही को दहिवेले येथील मुकामीहून छ १५ व छ १६ जमादिलोवलची पत्रे पाठविली ती छ २३ मिनहूस पावली. राजश्री मलबा बापू यास सोनगडच्या सुमारे राहावयास सांगितले आहे. ते तुम्ही मिळून सोनगड घेऊन बंदोबस्त करणे म्हणोन लिा त्यास खर्चाची वोढ भारी, याजकरितां मलबाची फौज देशी गेली. मागून थोडी बहुत राहिली ती घेऊन राजश्री मलबाहि घेऊन गंगापार गेले होते. त्यास पुरंदराहून पत्रे आली की माघारे जाणे. त्याजवरून राजश्री सदासिवपंत व मलबा माघारे आले ते साखरीवर आहेत. ब्ऱ्हाणपूरच्या सुमारे येणे म्हणोन आपली पत्रेहि आली. त्याजवरून तिकडे खजिना घेऊन येत आहेत. पुरंदराहून आज्ञा आम्हास आली आहे कीं नवापूर येथील बंदोबस्त करून सोनगडावर दबाव घालणे. तोपर्यंत राजश्री हरीपंतहि येतील. तिकडे छावणीस येतील. हली आपणहि लिा त्याजवरून चाकरीस बेउजूर असो. जे येतील तितक्यास घेऊन नवापूरचा बंदोबस्त करून देऊन सोनगडाकडे स्वारी येक दुसरी करितो. तोपर्यंत आपण लौकरच यावें. अशांत निकड केल्यास सोनगड हस्तगत होईल. शत्रूचा थारा मोडेल; लौकर न येणे जाले तरी दाहा हजार फौज व तोफखाना रवाना करावा. पुढें सोनगड येणे कठिण पडेल.

जमाव होईल. सोनगडचे पारपत्य जाले म्हणजे सयाजी गायकवाड सहजच येतील. आपली मार्गप्रतीक्षा नवापुरी करितों म्हणोन कितेक तपसिले वर्तमान लिा ते कळले. ऐसियास सुरत अठाविसी येथील बंदी आजपावेतो राखिली असतां तिकडील अगदीच शह सोडून आला हे गोष्ट, आजपावेतों जाली ते निर्फळ. आम्ही तिकडे येतों ऐसी पत्रे वारंवार जात असतां शह सोडून अलीकडे आला त्याजमुळें तिकडे रान मोकळे जाले. असो जे जाले तें जाले. आतां तुम्ही नवापुराकडे जाऊन तिकडील बंदोबस्त करून सोनगडाकडे दबाव देणे. आम्ही त्वकरच येतो. परंतु राजश्री वामनराव व राजश्री आपा फौज देऊन महंमद इसफ याजवर रवाना केले आहेत त्यास आठ च्यार दिवस लागतील. ते आले म्हणजे तिकडे छावणीस येतों. राजश्री मलबा बापू व सदासिवपंत यास बऱ्हाणपूरच्या सुमारे बलाविले आहेत. येतील. तुम्ही तिकडे असतां आम्ही काळजी करावीसे नाहीं. वर्तमान वरचेवर लिहीत जावें. आम्ही लौकरच येतों. बहुत काय लिहिणें. गुजराथची बातनी पकी राखोन लिहीत जावें. बहुत काय लिहिणें, लोभ असो दीजे हे विनंती.

¶Hari Ballal to Naropant Keskar reprimanding him for leaving his station and asking him to go and capture Navapur, which was easy to be attacked as Dadasaheb had retired.

No. 249] *[26-7-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथिल कुशल ताा छ २७ जमादिलावल मुकाम आशेर जाणौन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ १८ मिनहूचे पत्र पाठविले ते पावले. सुरतेची बंदी करून राहिलो होतो. त्यास सोवती राहिनात, कूच करून जाऊ लागले, व आम्हाबराबर फौज आहे त्यास खर्चास नाही. पुरंदराहून सत्रा हजार रुा मात्र पाठविले. लोकाचा पोटाचा गवगवा मोठा याजमुले तेथोन निघोन मुकाम मजकुरास आलो. मागे सोनगड-करानी नवापूर वगैरे ठाणी घेतली, कमाविसदारांचे बोभाट येतात याजकरिता घाटाखाली गेल्याखेरीज आब राहात नाहीं. सोबती घाटाखाली येत नाहीत यास्तव राजश्री जनार्दन रायाजी ठेऊन घेतले. त्याचे सात रोजमरे चढले. त्याचे बेतालीस हजार रुा जाले ते तीन महिनियाने दरमाहा चवदा हजार रुा द्यावे,

याखेरीज पुढे सरकारचे फौजेबराबर पुढे रोजमरा देत जावा, ऐसा करार करून ठऊन घेतले आणि तूर्त वीस हजार रुो दिल्हे तेव्हा समजाविसी जाली. येक दोन दिवसी घाटाखाली जाऊन ठाणी सोनगडकरानी घेतली आहेत ती घ्यावयाचे मनसब्यात आहो. आपले येणे जाल्यास उतम. नाही तर सात हजार फौज व पाच तोफा पाठऊन द्याव्या म्हणजे सोनगडचाहि समाचार घेऊ म्हणौन विस्तारे लिहिले ते कलले. ऐसियास तुम्हास दोनतीन पत्रे गेलीच आहेत की नवापुरास जाऊन ठाणे हस्तगत करून तेथे मुकाम करावा आणि पुढे जसजसी सोये जाण्याची पडत जाईल तस तसे जाऊन तिकडील बंदोबस्त करावा आणि तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावे. राजश्री आपा व राजश्री वामनराव बाबा महमद इसफ याजवर रवाना केले आहेत ते आले म्हणजे आम्ही तिकडे सोनगडच्या सुमारे छावणी करावयास येतो. तुम्ही तिकडील शह सोडून रान मोकले न पाडणे. नवापूरचे ठाणे घेऊन बंदोबस्त केला म्हणजे सहजा-तच पुढे शह पडत जाईल. तो आम्ही मागाहून येत आहो. आलो म्हणजे. सोनगडासहि पायेबद यावयास येईल. नवाब छावणी करावयास औरंगाबादेस छ १५ जमादिलोवली दाखल होणार. छ ९ मिनहूचे पत्र जिवाजीपत याचे आले. मोगलाकडील व भोसल्याकडील राजकारण ठीक आहे. श्रीमंताकडील बातनी चांगली राखोन आम्हाकडे व पुरंदरास लिहीत जावे. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶Haripant Phadke notes the contents of a letter from Naropant Nana about his movements and some monetary difficulties and advises him to plan an attack on Nawapur which only—he says—would check the movements of Dadasaheb. He further says that he himself would march to Songad.

No. 250] *[28-7-1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो गणेश हरि साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथिल कुशल ताा छ २९ जमादिलोवल मुकाम पुरंदर जाणोन स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आपली आज्ञा घेऊन पुण्यास आलो. श्रीमत राजश्री नानाचे दर्शन घेतले आपल्याकडील सविस्तर सांगावे तो पुरंदरास आले. समागमेच येणार होतो परतु कामामुले राहाणे जाले. पर्वाच्या दिवसी पुरंदरास आलो. श्रीमत

राजश्री बापूचेहि दर्शन जाहालें. आपल्याकडील सविस्तर वर्तमान निवेदन करितो. आपण म्हणतील की तुम्ही आम्हासी करार केला असता दिवसगतीवर कसे घातले ? त्यास आम्ही पुण्यात आलो त्याचे दुसरे दिवसी राजश्री चिमाआपाची भेट घेतली. आपले पत्र त्याजला दिल्हे. वर्तमान सागितले. त्याणी जाबसाल केला त्याजवरून सावकासीवर धरिलें. त्याणी आपल्यास लिहिलेच असेल. स्वामीचे बोलणे असे होते की तुम्हास आम्ही वर्तमान डाकेबराबर लिहीत जाऊ. आपलियापासून स्वार जाहालियास येक मास जाहला, परतु विस्मरणच जाहाले. असोत. भरवसा होता. याउपर तरी लिहिले पाहिजे. आम्ही आपल्यास पत्रे मार्गाहून च्यार पाठविली ती पावलीच असतील. इकडील वर्तमान नवल विशेष ल्याहावेसे नाही. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती. रा वहिरोपंत मेहदळे यास पत्र लिा आहे. पावते करावे हे विनती.

राजश्री बालाजीपंत दादा स्वामीचे सेवेसी सां नमस्कार विनंती उपरी लिा परिसोन लोभ करावा. आपली फार पत्रे आम्हास आली. दादा, आपणास स्मरण आमचे फार राहिले. बोलल्याप्रोच केले. असोत. अतःपर तरी पत्र पाठऊन परामर्ष करावा. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनती.

¶Ganesh Hari goes to Purandhar and communicates the message from Naro Anandrao to Bapu and Nana. He also explains that it was his visit to Chimaji Appa that caused delay in his way.

No. 251] *[31-7-1775*

पौ छ ६ जमादिलाखर

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री तात्या
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक माधवराव बहिरव साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागायत छ २ जमादिलाखर पावेतों माहाराजाचे कृपेकडून येथास्थित आसोन विशेष. इकडील वर्तमान तर श्रीमंत दादासाहेब याजकडून मातुश्रीस व राजश्री तुकोजीबावांस पत्रें आलीं, त्यांतील आर्थ कांहीं कलला नाहीं. श्रीमंत बडोद्यावरच आलीकडे साता कोसावर आहेत. त्याजकडे याणी आपलाहि काल छ १ रोजीं वकील पाठविला. राजश्री फत्तेसिंग गाईकवाड याचें व गोविंद-राव गाईकवाड या उभयताचें सख्यत्व करून दिल्हें म्हणोन बोलवा आहे. निमे मुलकांत उभयेताणी आसावें. बाकी सरकार हिसा निमे राहिला, त्याचेंहि कामकाज

6147

गोविंदरायाकडेच सांगितलें म्हणतात. पंचवीस लक्ष रुपये फतेसिंगबाबापासीं घेतले हेंहि वर्तमान आहे. तिकडील बंदोबस्त करून धारेस पुत्रमुख पाहावयास येणार. महमद इसफ धारेस आलियानंतर सौभाग्यवती मातुश्री आणंदीबाई हेही दैकारास ? याचमार्गे जाणार. परस्तुत त्याजकडून कुक्षी धर्मपुरीच्या बंदोबस्ता-करितां राजश्री लक्ष्मणपंत पागा सरंजाम घेऊन मांडव्यास आलेत. तेथून धर्मपुरीस पागा पाठविल्या आहेत. आपली पत्रें येथें राजश्री तुकोजींबाबास व बाईस आलीं. त्याचीं उत्तरें राजश्री यादोपंतीं घेऊन सेवेसीं पाठविलीं आहेत. त्यावरून श्रुत होईल. याणी तमाम आपल्या लोकांस निरोप दिल्हा. बेदिल होऊन देशास गेले. सिंदेहि उजणीस आहेत. त्याजकडेहि दादासाहेबाचा वकील आला आहे. याजकडेहि आला परंतु शोध लागत नाहीं. सुज्ञाप्रति विशेष काय लिहिणें हे विज्ञप्ति.

¶*Madhavrao Bahirav writes to Haripant Tatya news from the court of Indore and informs him of the intended journey of Raghunathrao to Dhar to meet his newly born son.*

No. 252] [*July 1775 ?*]

श्री

पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी. दाब कमी पडला. मलबा बापू नदी उतरले ते दिवसीं आमचे बोलणेंहि जाले होते की तुम्ही पलीकडे जाणे. इंग्रेज चालोन आले तर नदीस उतार नाही. याजकरितां आम्ही लांब उतरावयास जाऊ. च्यार दिवस अधिक उणे लागतील परंतु तुम्हाजवळ येऊ. परंतु पैका नाही म्हणून न राहिले. तुम्ही ते मिलोन कर्जवाम करून येक महिना दम धरतेस तर मोठीच गोष्ट होती, परंतु होणार त्यास इलाज नाहीं. असो. तुम्हीं आम्ही येक जाल्यावर फिरोन आव वाढ, चिंता नाही. मोगल छावणीस शहरास गेला. भोसले नागपुरास गेले. याजकडील राजकारण ठीक आहे. चिंता न करणे म्हणौन पुरंदराहून पत्र आले होते. तुम्हांकडे लिहिले येत असेल. बाबूराव हरि भोसल्याकडे गेला आहे हा संशय आहे. त्याचा परिहार भोसल्यानी लिहिला कीं मजकडे आला तो हाती कसा द्यावा? याचे आबरूस खता नाहीं, याचे चालवावे, असे येका मातबराचे विद्यमाने जाले तर पाठऊन देतो असे लिहिले होते. आम्हास जिवाजीपंतानीं लिहिले होते. आम्ही पुरंदरास लिहिले की कसेहि करून बाबुराव हरीस आपल्या-जवल न्यावा. मग कसे करितील पाहावे. तुम्ही आहा तेथेच राहून तिकडील

बातमी लिहीत जावी. असा प्रकार आहे. यांत सोनगडचा बंदोबस्त होता तर फार उपयोग पडता. आम्हासमागमे फौज आहे. यास रोजमरा नाही. पैका समयास येऊन पोहचला नाहीं. कर्जवाम काही मेळऊन थोडे थोडे खर्चास देतो. खजिना येऊन पोहचला म्हणजे उस्तवारी होईल. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke to Naropant Nana saying that a tactical advantage would have been gained had the addressee remained round about Surat. He informs him that Baburao Hari has taken refuge with the Bhonsle of Nagpur.*

No. 253]. [*July 1775*

श्री

सेवेसी बहिरो रघुनाथ सां नमस्कार विनती विशेष. आज्ञापत्र पावले. जंबूसरचे ठाणे राजश्री चांगोजी कदम याणी इंग्रजाचे लोक कापून काढोन घेतले. आमोदचे ठाणे आपधाकेच टाकोन इंग्रजाचे लोक पळाले. गजरे याचे ठाणेहि येका दोहो रोजा घेतील ह्मणौन वर्तमान लिा, ते कळोन फार संतोष जाहाला. उरपाडचे ठाणें आद्याप हस्तगत होत नाही म्हणौन आपण चितामध्ये बहुत खिन, पुरंदरास व राजश्री तात्याकडे काय ल्याहावे म्हणौन कित्येक प्रकारे पर्याये लिा. त्यास प्रेत्न मेहनतीविसी स्वाम कमी करितात की काय? वरकड आपले मर्जीप्रो ईश्वर कृपा करोन येशहि आपणास लौकरच येईल. इंग्रज मांडवीहून आद्याप येत नाही म्हणोन लिा. त्यास इंग्रज मांडवीकर सिध्र आहे. परंतु विना तोफाचे येण्याचे निश्चयासिवाय त्यास आणोन तोफाचे आनकूल न जाहाले तर माघारे त्यास जा म्हणावे. आला आणि माघारा गेला तरी आपल्यास पैका येकमाहा उगाच कार्यावेगळ खावा लागेल आणि तोफासिवाय त्याणे च्यालीस पंनास माणसानिसी काय करणे तो विचार कळतच आहे. या आर्थे आगोधर त्यास बोलाविला नाही. तोफा येण्याचा निश्चय होताच वरचेवर इंग्रेज जलद येईल. गुंता नाही. सिध आसण्याविसी त्यास सूचना केलेली आहे. तोफा सोनगडास पत्र रा आणानी लिा परंतु त्यांचे यख्तयारीत नाहीत. व्याहारेयास आहेत त्या लाहान. बिलिमोरेयास तोफा उपयोगी आहेत त्या गलबतावर याजकडील लोकानी चढविल्या आहेत. तेथे राजश्री गोविंदपंत आणाची मुजरत माणसे पाा आहेत. परंतु गलबताचा सरदार घासीखान आहे तो तोफा देईलसा निश्चय नाही म्हणौन आणा म्हणत होते. काय उतर बिलीमोहरेयाचे येईल ते सेवेसी लेहून पाठऊ.

आणि तोफा बिलीमोरेयाच्या येतात येसे जाले तर इंग्रजास वरचेवर जलद आज्ञेप्रो आणवितो. तोफा जरूर आल्या पाहिजेत. येविसीची सेवकासहि निकड आहे. तर्तुदीस आंतर करीत नाही. परंतु परस्वाधीन कारभार त्यास उपाय काय? आपण लिा की तोफा येत नसल्यास ईश्वरावर हवाला टाकोन उरपाडावर गाडे सामानानसीच हला लगट करू. येशास आपण सर्वज्ञ आहेत, परंतु तोफा आथवा दुसरी कांही फौज आल्यासिवाय आपले सामान आहे इतक्यानिसी लगट करू. कार्य जाले तर बरे नाही तर ठीक नाही पुर्तेपणे करावे. आपणास ल्याहावेसे नाही, परंतु लगट हला करावयास सामान आपले जवळ थोडके आहे. उतावली करू नये. पारचाळेस जंबुरे आहेत. गाडे देखील सिध परंतु लाहान आहेत. कलावे हे विनती.

¶*Bahiro Raghunath expresses his delight at the news of some places being captured from the English and further says that unless he secures good guns he should not call the English from Mandvi. The writer does not approve of the plan of the addressee to attack Urpad without siege guns.*

No. 254] *[July 1775*

श्री

राजश्री नाना स्वामीचे
सेवेसी

सेवक बहिरो रघुनाथ सां नमस्कार विज्ञापना. आज्ञापत्र पावले. तोफा आणावयासी आपणाकडील व रा गोविंदपंत आणाकडील कारकून ब्याहारेयास गेले आहेत. मांडवीसहि पत्रे इंग्रजास आणावयासी लेहून पा आहेत. आज्ञेप्रो तर्तूद केली आहे. राजश्री गोपाळराव रास्ते पथकसुधा तिकडोन आपणाजवल येत आहेत म्हणौन लिा फार उतम. उरपाडेकडे रात्री स्वारी जाली होती, त्याचे वर्तमान कळले नाही. श्रीमंतास खंबाइताहून मावारे आणावयासी होड्या इंग्रजाकडील च्यालीस पनास गेल्या म्हणौन वर्तमान आहे. कलावे श्रुत व्हावे हे विज्ञापना.

¶*Bahiro Raghunath says he has arranged to bring guns as desired by Naropant Keskar. He also informs him that some boats have been despatched by the English to bring Raghunathrao from Cambay.*

No. 255] [*January 1775*

श्री

पुरवणीपत्र.

विज्ञापना विशेष. श्रीमत राजश्री दादासाहेब बडोदियासी आले. राजश्री गोविंदराव गायेकवाड व खंडेरावबावा गो यांच्या भेटी जाल्या. त्यास पिछावरी आपली फौज आली, याजकरिता श्रीमंत व गायेकवाड मंडलीसुधा महीपार जाऊन मुकाम करून राहिले आहेत. महीकाठा कोतारे[१] भारी आणि अवघड ठिकाण पाहून वाटा रोखोन बसले आहेत. आपणाकडील फौज अलीकड सावली परगणियाचे सर्देने मुकाम करून राहिली आहे. राजश्री फतेसिंगराव गो बडोदियाचा शाह उठतांच बाहेर निघोन तात्याकड जाऊन सामील जाहाले आहेत. फौजेची जमयेत इकडील भारीच आहे. पुढे याचा त्याचा रंग कसाकसा होईल तो पाहावा. श्रीमंताकडील दोघे कारकून जवाहीर विकावयासी बंदर सुरत येथे आले आहेत. जवाहीर अद्यापि विकले नाही. कारकून सुरतेसच आहेत. कुमकेविशीं इंग्रजास श्रीमंताकडून संदर्भ आला आहे. त्यास त्याणे उतर केले कीं, तूर्त मजला साष्टी मुंबईस शह मातबर बसला आहे व सुरतेची बंदी करणार व भडोजेस शह देणार, याजकरिता मजला कुमक करावयाची सोई बनत (ना)ही, म्हणौन जाबसाल कारकुनासी करीत आहे. कारकून अद्यापि शहरात बसले आहेत. मद्राज बंगाला येथोन लोक आणविले आहेत. ते आल्यानंतरी कुमक द्यावयाची सोई पडेल. ऐसे भाशण त्याजकडील होत आहे. पत्राची उतरे सत्वर द्यावयासी आज्ञा केली पाहिजे, कारण की बंदीचा हंगाम जातो. माल तमाम शहरात विकावयासी नित्यानित्य जात आहे. कलावे[+] यास्तव लौकर पत्राची उतरे पा आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bahiro Raghunath reports that the forces of Dadasaheb and of Govindrao Gaikwad have combined and encamped beyond the Mahi and that Fatesing has joined Haripant who is pursuing Dadasaheb. The English could not promise any help to Dadasaheb as their attention was directed towards Salsette and Surat.*

No. 256] [*1-8-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ ३ जमादिलाखर मुकाम बऱ्हानपूर जाणोन स्वकीये कुशल लिहित जावे विशेष.

\+ पत्र बहिरो रघुनाथ याचें. १ कोतारे=काठावरील खाचखळगे.

आपण छ २९ जमादिलावलचे पत्र पाा ते पावले. आम्ही व रास्ते याणी सुरत प्राती बंदोबस्तास राहावे त्यास आम्हाजवल सरंजाम किती आहे हे आपणास ठाऊक आहे. आपण त्या प्रांतीहून आला. श्रीमंत तिकडे सनिध, सुरतेतहि जमाव होऊ लागल. पाऊस भारी याचे वर्तमान मलबानी पाहिले. ते भेटीनंतर सागतील यास्तव येथे आलो. पुरंदराहून यैवज खर्चास न ये. माहाल सरंजामी तेव्हा यैवज कोठून आणावा? याजकरिता घाटमाथा येऊन राहिलो. आपण सोनगड प्रांती छावणीस आल्यास भेट होईल. आम्हास पत्र आल्यास आम्ही बराणपुरास येऊ. ताबवेकर याजकडील लोक करार करून ठेविले होते. त्यास करारापेक्षा आधिक मागो लागले साा निरोप दिल्हा. जनार्दनपंतास घेऊन गेले. पाच हजार रुो मात्र खर्चास दिल्हे होते. राजश्री फतेसिगराव गायकवाड श्रीमंतास भेटले म्हणौन बडोद्याहून माणसे आली ती सागत होती म्हणौन लिहिले ते सविस्तर कलले. आपण तिकडे आहेत त्यास पायगुडे व बालाजी खंडेराव व बलवंतराव धोंडदेव मिलोन राऊत किती आहेत व रास्त्यांची फौज किती आहे ती लिहून पाठवावी. हुजरातचे पथकाची गणती घ्यावी. गणतीखेरीज रोजमरा देऊ नये. वरकड पुरवणी पत्रावरून कलेल. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke learns why Naro Anandrao left the vicinity of Surat despite orders and encamped near Navapur.*

No. 257] [*16-8-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्रि नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल साा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १८ जमादिलाखर मुाा नजीक बऱ्हाणपूर जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. तुम्ही छ १२ जमादिलाखरची पत्रे पाठविली ती छ १७ मिनहूस पावली. जयराम नाईक रघुनाथ हरि याजकडील व दुसरे कारकून व मनाजीपंत वगैरे

डबईस श्रीमंतास सापडले त्याजवरून गुन्हेगारी घेऊन सोडिले ते आले. त्यांतील जयराम नाईक यास समक्ष आणून पुसिले, त्याणी बातमी वर्तमान सांगितले.

फतेसिंग गायकवाड इंग्रेजाचे विद्यमाने भेटोन पंचवीस लक्ष रुपये श्रीमंतास चहू वाईयानी द्यावेसे कबूल केले आणि बडोद्यास गेले. गोविंदराव गायेकवाड याचे जाबसालात मानाजी फाकडा व सदासिव रामचंद्र व आबाजी माहादेव, सखाराम हरी होते, ते रुष्ट आहेत. गोविंदराव कूच करून छाणीचे तलावरी गेले. महीपार जाणार आमदाबाद सुरत आठाविसी मिरज याच्या सनदा देत होत त्या त्याणी घेतल्या नाही. म्हणौन लिा ते कलले.

आमदाबाद घ्यावयास आमीन साहेब कबूल होऊन पाचसे स्वार व पाचसे गारदी देऊन रवाना जाला. मागाहून अमृतराव यासमागमे फौज देऊन रवाना करणार. आपाजी गणेश सरजाम पोख्त करून आठ नव हजार आरब सिदी वगैरे ठेऊन खबरदार आहेत. कादार माहालातील आणून आपले जवल ठेऊन लढाईची उमेद चागली आहे म्हणून लिा ते कलले. आपाजीपंतास येथून पत्रे पाठवीत असतो. घडेल ते खरे.

श्रीमंतानी डभईत ठाणे घातले. भागोजी बलकवडे मिलोन बालाजीपंत कैद करून पंचवीस हजार खंडणी केली. डभईत जमिदार वगैरेसुधा चहू लक्षाची पटी करून ऐवज इंग्रेज

मानाजी फाकडे हिशेब करून मागतात. ऐवज द्यावयास नाही. म्हणौन सिवाजी विठल व त्रिंबकराव सिवदेव याच्या सरजामाच्या सनदा करून देत होते तो घेत नाही, निरोप मागतो व गोविंदरायाकरि(ता) कारभारी नाउमेद होऊन उठोन येणार म्हणौन लिहिले ते कलले.

धारेस श्रीमंत सो मातुश्री आनंदीबाई आहेत. त्याणी खंडेराव पवार याची सिबंदी तेथील बाहेर काढून आपला बंदोबस्त केला यामुले खंडेराव श्रमी आहेत. सरकारात संधान करितील म्हणून लिहिले ते कलले.

सुरत आठाविसी व गुजराथीतील इंग्रेजास दाहा लक्षाची जागीर जबूसर हसोट वगैरे पाच माहाल दिल्हे. बाकी महाल रसद घेऊन कामाविसदारास देतात म्हणून लिा ते कलले.

होलकर सिंदे यास सरजा(म) सुधा येणे म्हणौन श्रीमंताची पत्रे गेली आहेत म्हणून लिहिले ते कलले. त्यास आम्ही आपले बुधीने सरदारांचे मनोधारण करितो. त्यास ईश्वर बुधी देईल तसे करतील.

फतेसिंग पुरतेपणे श्रीमंतास मिलोना गोविंदराव तूट खाऊन गेले ते संधान सरकारात करितील. येविसी आपाजी गणेश यास पत्र यावे म्हणून लिा ते कलले. आपाजीपंतास लिहिले आहे.

व श्रीमंत दीड दीड लक्ष घेऊन बाकी फौजेस रोजमरा दिल्हा म्हणौन लिा ते कळले.

सोनगड फतेसिंग याजकडे द्यावयाविसी गोविंदराव सोडचिठी न देता गेले. याजकडील भिवराव कद्रू व शकजी किलेदार जमाव करून लढाई करितील. तूर्त बखेडा आहे. दोहीकडील सूत्रे येतील म्हणौन लिा ते कळले. आम्ही खंडेराव यास व आपाजीपंतास गोविंदरायाविसी लिहितो. तेथे घडेल ते खरे.

कर्नाल किटण इगरेज मुबईस जाऊन मनसबा ठराऊन कार्तिक मासापासून मसलत करणार. डबई पासष्ट हजार रसदे घेऊन भागोजी बलकवडे यास सागितली म्हणौन लिा ते कळले.

बैरागी गुजराथ प्रांती बातमीस पाठविले आहेत म्हणून लिहिले ते कळले.

पुढेहि नवल विशेष वरचेवर लिहीत जावें. बहुत काय लिहीणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*The movements and plans of Dadasaheb, his agreements and negotiations with the Gaikwads and the English are communicated by Naro Anand to Haripant who in this letter gives his own views and instructions on them.*

No. 258] [*16-8-1775*

श्री

पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. ताा छ १८ जमादिलाखर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. राजश्री फतेसिगराव गायकवाड इंग्रजाचे विद्येमाने श्रीमतास भेटोन आपले मुलकाचा वगैरे बदोबस्त केला. रा खडेराव गायकवाड याजकडील कुसाजी सिंदेहि श्रीमतास भेटले. राजकारण करून पुढे खडेरावहि भेटतील. गोविंदरायानी खडेराव याजकडे काही सूत्रहि सलुकाचे लाविले आहे म्हणौन कितेक तपसिले लिा ते कळले. ऐसियास राजश्री फतेसिंगराव श्रीमंतास भेटले, परंतु नाईलाज साा बच्याव त्याणीं केला. त्याजकडील पत्रे आली होती त्यास पधरा दिवस जाले. सर्व लक्ष त्याचे श्रीमत राजश्री रावसाहेब याच्याच मसलतीवर आहे. खडेरावहि सरकार लक्ष्यात आहेत. कुसाजी सिंदेहि भेटले तरी चिंता नाही. समये पाहोन बच्याव करून घेतील, परतु आह्मासी बोलिले आहेत

त्यात आंतर होणार नाही, याप्रा खातरजमेचे बोलणेहि जाले आहे. तत्रापि न कले-काळ येक प्रकारचा आहे. त्यास कोणाची बुध कसी कोण्या समई होईल हा तो भरवसा नाही. बहुत करून दुसरा विचार त्या उभयताच्याणे सरकारकामाविसी होणार नाही. असो जे वर्तमान तुह्मास आढळले ते लिा उतम केले. याप्रा पुढेहि लिहीत जावें व गोविंदराव सूत्र करितील परंतु परिणामास जाणे कठीण. फतेसिगानी लिहिले होते त्यावरून तुह्मास लिहिले आहे. आपले मतलबासाठी माणूस लिहीतच आहे. परिणाम लागेल तो खरा. आपण खबरदार असलियावर सर्वेहि आपलेच आहेत. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke writes to Naro Anandrao that though Fatesing avowed allegiance to Raghoba his heart was with the cause of the Barbhais He however expresses doubts about his sincerity.*

No. 259] [*16-8-1775*

श्री

पुरवणी राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी तुम्ही पत्र पा ते प्रविष्ट जाहाले.

सोनगडाकडील व गोपाळराव व जनार्दन अनंत व लक्ष्मणपंत फडनीस पिपलनेरकर आपली पत्रे घेऊन आले आहेत. आम्ही घाटाखाली गेलो म्हणजे समागमे येतील. त्यास तिकडील मजकूर येक प्रकार दृष्टीस येतो. आपण आज्ञा करितील तैसी रवानगी त्या प्रांती करावयास येईल म्हणौन लिहिले ते कलले. तूर्त तुम्हीं घाटावर तेव्हा रवानगीचा प्रकार कलला आहे. आंम्ही तिकडे येऊ तेव्हा काय करणे ते करू. तूर्त तुम्हाजवलच असतील.

आम्हास हिंदुस्थानात पाच वर्षे छावणी जाहाली. पुढे आम्हास निरोप ममता येऊन देतील. भेटी होये नवापूरचे ठाणे ब्यावयास सिबंदी च्यारसे प्यादे व आरबा करार करून ठेविले. लौकरच नवापुरास जातो. आणि आणखी काही गाडदी व दोन तोफा आपणाकडून येते म्हणजे दिकत ठाणी ब्यावयास न पडती म्हणून लिहिले ते कलले. त्यास तुम्ही मनसबा करितां तोच उपयोगाचा, परंतु इसफामुले आम्ही इकडे गुंतलो. दोन तोफा तिकडे गेल्या आहेत. आपणाकडे दोन तोफा पाठवाव्या तर फौज समागमे पाहिजे. फक्त तोफा दोन पाठवा म्हणाल तर पाठवितों. लिहून पाठवावे.

पुरंधराहून पत्रे आली की गणती घेऊन रोजमरा देणे. त्याजवरून

तोपर्यंत दम धरितो म्हणौन लिहिले ते कळले. त्यास हे मला ठाऊक नाही असे नाही. परंतु मसलत पडली यास इलाज काय? आपणासारखे कृतकर्मे मसलतींत असले म्हणजे आम्हांस काहीं अवघड नाहीं.

येथील फौजेस अर्जबाब येक रोजमरा दिल्हा ते जमादिलोवलचे दोन रोजमरे देणे त्यात वजा करणे म्हणौन श्रीमंताची आज्ञा जाली आहे. त्यास फौजेस नालबंदीपैकी काही पावले नाही यास्त(व) तो रोजमरा नालबंदीत पावेल म्हणून लिहिले ते कळले. रोजमरा आधिक पावला तो नालबंदीत धरावा.

गणतीस प्रारभ केला. तेसमई आपाजी पायेगुडे गणती न देता नगारा करून मजलीस गेले. यामुळे गणती झाडून फौजेची राहिली म्हणौन लिहिले ते कळले. लोक लबाडी फार करितात, इलाज नाही. तजविजेने गणती घ्यावी.

आमदाबादेस गोविंदराव गायेकवाड व खंडेराव याजकडील राजकारण आपाजी गणेश यास पत्रे पाठऊन पक्के करवावे. सरकार लक्षात येतील गुता पडणार नाहीं म्हणौन लिहिले ते कळले. लिहिल्याप्रा करितो.

रा छ १८ जमादिलाखर बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶Hari Ballal gives to Naro Anandrao instructions on the points referred to by the addressee, e.g. the muster and the remuneration of the army.

No. 260] *[18-8-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ २० जमादिलाखर मुा नजीक बऱ्हाणपूर जाणून स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. महमद इसफ याचे पारपत्यास राजश्री आपा व वामनरावबाबास फौजसुधा रवाना केले होते. तो झाडीत होता. त्यास सरकारचे फौजेने त्याजवर येक दोन वेळ घालोन अडचणीत असता त्याकडील पंचवीस तीस ठार व काही जखमी होऊन तीसच्याळीस घोडी व गुरे बल च्याळी(स) पंनास आणिली. त्या दहशतीने पळून गोंडवणच्या सुमारे गेला. पाठीमागें सरकारची फौज गेली आहे. ते येई तावत्काल येथे मुकाम आहेत. आपण नवापूरचे उद्योगास पुढे जाणार होतेस ते पुढे

गेला न गेला, श्रीमंत कोठे आहेत, त्याजकडील सरदार मुछदी व इंग्रेज याची पैरवी प्रेरणा कसकसी आहे हे सविस्तर बातमी पकी लेहून पाठवावी. बहुत काय लिहिणे कृपा लोभ कीजे हे विनंती.

¶Hari Ballal informs that Muhammad Isaf was hard pressed by Appa Balwant and Wamanrao Patwardhan and fled in the Gond forest for his life.

No. 261] [*26-8-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पाष्य हरि बलाल सा। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २८ जमादिलाखर मुकाम नजीक बऱ्हाणपूर जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. आलीकडे तुह्माकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही तरी सविस्तर सुरतेकडील व श्रीमंताकडील लेहून पाठवावे. इकडील वर्तमान तरी राजश्री आपा व वामनराव बाबा फौज घेऊन महमद इसफ याजवर गेले होते. त्यास त्याची याची गाठ पडोन थोडीबहुत झटपट जाली. उपरांतिक तो पलोन झाडीत गेला. पाठीमागे फौजा गेल्या आहेत. दोनच्यार मजली पाठलाग करितील. फारच झाडी, उपाये नाही, तरी माघारे येणे म्हणौन पत्रे गेली आहेत तेहि लौकरच येतील. गणेशचतुर्थीपावेतो येथे मुकाम होतील. उपरांतिक कूच करून तापी उतरोन सोनगडच्या सुमारे यावे असा मनसबा आहे. तुह्मी तिकडील वर्तमान वरचेवर लेहून पाठवावे. गणतीविसी लिहिले होते, जालीच असेल, ल्याहावे. तिकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावे. बहुत काय लिहिणे लोभ असो दिजे हे विनंती.

राजश्री बालाजीपंत स्वामीस सा। नमस्कार विनंती उपरी लि॥ परीसोन लोभ असो दीजे हे विनंती.

¶Hari Ballal communicates to Naropant Nana the news of a skirmish between Muhammad Issaf and a contingent under Appa and Wamanrao, after which Issaf disappeared in the forest.

No. 262] [*28-8-1775*

श्रीमार्तंड

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

सेवक नारो लक्ष्मण व लक्ष्मण गोविंद सां। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ १ रजब मु॥ रनाले जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असावे

विशेष. अहमद व नूर नारोगी बेपारी हे सुरतेहून हरजिनस आणितात. सालाबादचे बेपारी आहेत. साप्रत नवापूरचे दग्यामुळे वसवास खाऊन अमदनी बंद आहे. त्यास हे कुले सालाबाद रनाले नदुरबार येथे माल आणितात. त्यास आपले ठाणे नवापुरी बसले आहे. मार्गाची सुभेता जालियाने हे अमदनी अणीत जातील. त्यास येविषई आपला कौल बेपारीयासी देऊन येक वेल याचा माल सुरक्षित नवापुरीहून नदुरबारेस पावता करून दिधल्याने यासी पत राहून दरमाह अमदनी आणीत जातील. येणेकरून आपणासहि नवापूरची अमदनी आहे याजकरिता लिाअन्वये बेपारीयाचे नावे कौल आपला लिहून द्यावा व मार्गात सुरक्षित येत थैस येक वेल बदोबस्त जाल्याने मार्ग चालेल. आमदनी होईल. येंदा सुरतचे बदीमुले आजपावेता मार्ग बंदच राहिला. हाली आपल्या कौलाने अमदनी येत आसल्यास करावी यास्तव लिा आहे. तरी लिाअन्वये बंदोबस्त करोन अमदानी ये ते केले पाहिजे. बहुत काये लिहिणे. श्रीमंत राजश्री तात्याचा मुकाम बराणपुरानजीकच आहे. तिा राजश्री यादवराव रघुनाथहि लस्करात गेले. गुजरात प्रांतीचे वर्तमान नवल विशेष लिहीत जावे. आपण नवापूरचे ठाणे वेऊन पुढे व्यान्यापावेतो काही फौज गेली म्हणौन यैकिले. उतम आहे. राजश्री शंकराजी खडेराव याचे सुटकेविसीचा विचार काय केला तो लिहावा. बहुत काय लिहीणे लोभ करावा हे विनंती.

¶Naro Lakshman and Lakshman Govind request Naropant Nana to allow free passage and a guard to Nandurbar to two Boharis, Ahmad and Noor Narogi, and their merchandise.

No. 263] [*July 1775*

श्री

पुा राजश्री नारोपंत नाना स्वामीस

विनंती उपरी. फौज फार, पोटास नाही म्हणून मलबा बापू आदीकरून मडली आलीकडे आली, बरे केले. तुम्ही अगदीच सोडून आलीकडे आला हे कांही समजत नाहीं. पुरंदराहून आज्ञा जाली म्हणौन आला किंवा कसे हे ल्याहावे. मलबा मालेगावाजवल राहातील म्हणौन लिा. त्यास आमची पत्रे वरचेवर जातच आहेत. मग राहातील किंवा देशास जातील कलत नाँहीं. आपण तरी पुढे येऊ नये. सुरतेचे बंदाची तर्तूद असल्यास मग चिंता नाही. कसा विचार केला तो ल्याहावा. आम्ही बराणपुरास येतो. छावणी कोणे स्थली करावी असे पुरंदरास लिहिले आहे. तेथील आज्ञा कसी येते पाहावे. आम्ही इकडे आलो. मलबा

वगैरे फौज तिकडून गेली इतकाच प्रकार. दुसरे कांही कोणाचे नेले गेले नाहीं. मडलेश्वराजवल आल्यावर बढव्यास उतरावयास जावे त्यास पाऊस नाही. रेवेचे पाणी दिवसेंदिवस उतरू लागले तेव्हां येथेच उतारा लाऊन उतरलो. हती पायाब आले. आतां उतरावयाचा गुता राहिला नाहीं. खजिना आपणाजवल आला असल्यास बराणपुरास पाठऊन द्यावा. खर्चाची हैराणगत फार आहे. होलकराचे मते छावणी बुराणपुरास करावी म्हणजे चहूकडे दबाव. आमचा पहिला मनसुबा सुरत आठाविसीतील होता. तुमचे मते कसें करावें ते लिहून पाठवावे. नवाबाकडील व भोसल्याकडील वर्तमान विसाजीपंताचे पत्रावरून कलेल. असो आम्ही बुराणपुरास येतो. मोगल छावणी शहरास करणार असे आहे कलले. आपणाकडील वर्तमान वरचेवर लिहीत जावे. तुम्ही सुरत प्रांती असतां म्हणजे तिकडील वर्तमान दिनचर्येचे कलते. अगदी रान सोडून आलेत कीं कसे केले हे समजत नाही. जलद् लिहून पाठवावे. राजश्री बापू पानसी तोफखाना घेऊन बराणपुरास गेले. समागमे आन्याबा व चांगोजी कदम आहेत. कलावें. सुरतेची बंदी राखोन तुमची आमची भेट होती तर बरें होते. होलकर सांप्रत काली भजनात निखालसपणें आहेत असें दिसते. सिंदे उजनीस आहेत. त्यांचे लक्ष दुसरीकडे असे भासते. श्रीसतेकडून घडेल ते खरे. या मसलतीस मोगल पुर्तेपणे मेलऊन पुढें करून लडाई घेतली तर परिणाम लागोन सेवटास जाईल. मुधोजी सुरलीत चालतील असें दिसते की काय हाटेबाज आहेत. आम्ही इकडे आलो यामुलें मसलतीस हिसका बसला. असो सर्व येकरूप असल्यास अगाध आहे असे नाही. फीतूतराचा (फितुराचा?) प्रकार तर स्वतसिधच आहे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant gives Naro Anandrao a mild rebuke for giving up the blockade of Surat and moving up the Tapti. He further explains to him the indifferent attitude of Sindia and Holkar towards the campaign against Dadasaheb.*

No. 264] [*6-9-1775?*

पो. छ १६ रजब

श्री

श्रीमंत हरिपंत तात्या स्वामीचे सेवेसी

प्रा विठल बलाल सा नमस्कार विनंती. येथील कुशल ता भाद्रपद शुध १२ मुा पेट उबरावती जाणोन स्वानंद लेखन केले पाहिजे विशेष. श्रीमंत

सेनासाहेबीं आम्हास बिदा केलें त्यापासोन निघालियानंतर सेवेसी पत्रें पाठविली त्याचे उत्तराची प्रतीक्ष्या करीत असों. जैसे पत्र येईल त्याप्रमाणे वर्तणूक करो. कृपा वृधि(यु)क्त पत्रे येत असावी. बहुत काय ल्याहावे हे विनंती.

¶*Vithal Ballal informs from Umraoti Haripant of his departure according to the instructions of Bhonsle and solicits orders for further action.*

No. 265] [*Sept. 1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बल्लाल सां नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लिहीत जावे विशेष. विजयादशमीचे पोशाग रास्ते याचे दोन व आपाजी पायगुडे याचा येक व तुमचा येक, येकूण च्यार पोशाग पाठविले आहेत. त्याची याद आलाहिदा असे त्याप्रमाणे जिकडील तिकडे प्रविष्ट करून पावलियाचे उतर पाठवावे. +बहुत काये लिहिणें, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Haripant sends the Dasara costumes for Naropant Nana, Rastia and Apaji Paygude.*

No. 266] [*2-10-1775*

(श्री)

राजश्रिया बिराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे शेवेसी

सेवक अंताजी नागेश साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता आस्विन श्रुा ८ मी मुकाम मालपूर जाणौन स्वकीये कुशल लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. सांप्रत आपणाकडन पत्र येऊन वर्तमान कलत नाही तर सविस्तर ल्याहावें. आम्हाकडील वर्तमान तर पेशजी श्रीमंत राजश्री फतेसिंगराव बावा यांस श्रीमंत राजश्री हरिपंत तात्यानी उकसीच्या मुकामीहून बडोदेस जावयास निरोप दिल्हा. मागाहून च्यार रोजी आमचीहि रवानगी केली. आम्ही झांबव्याच्या सुमारें गेलो. तों वर्तमान यजमान म्लेछास भेटले. बडोदेनजीक इंगरेजाच्या फौजा आल्या. नाइलाज. न भेटता इलाज नाही. आम्ही

येकायेकी जावे हेहि ठीक नाही. इकडे राजश्री तात्यास लिहिलें तों यजमानाचीहि पत्रे आम्हास व तात्यास आली कीं, आविलबे उपराला जाहाल्यास उतम. आपण दिवस काढितो. आमचेहि पत्री हेच की तुम्ही राजश्री तात्याकड मजल दरमजल जाऊन शैन्य आगमन अविलंबे होये ते करणे. त्यास * * * * * तात्यास पत्रे लिहिली येणे म्हणौन * * * * त्र आम्हास आली. त्यावरून बढवाणीच्या मार्गे मुकाम मजकुरीं आलो. येथूनहि शैन्यात पत्रे पाठविली. भेटीस लौकर यावें म्हणौन उतरे आली. विजयादसमी जाहालेयावर जाऊ. आपण नवापुरीहून फौजसुधा माघारे कूच करून आले म्हणौन कलले. त्यास शाहावरील फौज येकायेकीच कूच करून आली याचे कारण ल्याहावें. श्रीमंत राजश्री तात्याचे पत्री मजकूर कीं, आम्हीच सुरत प्रांताच्या रोके येतो. तेव्हा राजश्री रास्ते व आपण आले याचा मजकूर सविस्तर ल्याहावा. रा। जनार्दन आनंत आपले श्वार समागमे घेऊन गेले म्हणून कलले. ते कोणीकडे आहेत? त्याचे वर्तमान काये? श्रीमंत व इगरेज कोणत्या ठिकाणी आहेत? सुरत प्रांती तूर्त बखेडा फार कोण करितो? श्रीमंताकडील सुभा आला त्याचे मिलणीस कोण आहेत? चिमणराव कोठे आहे? ह्या सर्व बातम्या आपणाकडे आहेतच. ईकडेहि सविस्तर ल्याहाव्या. आपली आमची भेट व्हावी हा हेत फार आहे. भेटीहि लवकरच होतील. बहुत काय लिहिणे कृपा लोभ करावा हे विनंती.

¶*Antaji Nagesh tries to justify the visit of his master—Fatesing Gaikwad—to Raghoba and the English. He explains he had to pay the visit being surrounded by enemies.*

No. 267] [*6-10-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो। हरि बलाल सां। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ १० साबान मुकाम जैनाबाद जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही पत्र छ १ साबानचे पाठविले ते छ ६ मिनहून प्रविष्ट जाहालें. फौजेचे देणे रोजमरे दुमाही मिलोन पंचावन साठ हजार ऐवज चढला यास्तव नवापुराहून कूच करून आपणाकडे यावयास भादडच्या मुकामास आलो. आपण दसरियास कूच करून इकडे येणार तेव्हा हेलपटा पडेल याजकरितां येथून शंकराजी खंडेराव

6161

यास सोडऊन आणण्याची विचारणा पाहातों. महमद इसफास भूपालकरानी धरिला म्हणौन वर्तमान. चंदरराव पवार पाच सातसे स्वारानसी श्रीमंतानी सुरत प्रांती रवाना केले ते आकलेश्वरास आले. जनार्दनपंत मांडवीस आहेत. लक्ष्मणपंत त्रिबकराव गायेकवाड याणी धरून नेले, ते कामरजेस आहेत. फौजेच्या देण्यास तूर्त पंचवीस तीस हजार रुपये पाठवावे. आपण कोणत्या सुमारें येतां ते ल्या म्हणोन लिहिले ते कलले. ऐशियास आम्ही येथून विजया-दशमीच्या मुहूर्तें कूच करून तिकडेच दरमजल येत असो. तुंम्ही इकडे न यावें. शंकराजी खंडेराव याचे सुटकेचा उद्योग करणार तो करावा, तों आम्ही लौकरच येऊ. भेटीहि तिकडे आल्यावर होतील. पैक्याचा मजकूर तरी तेथे आम्हांस पैक्याचा बहुत वोढा आहे. फौजेचे रोजमरे देणें चढले आहेत. पुरंदराहून पैका येणार आहे तो लौकरच येईल. आल्यावरी तुम्हासहि देऊ. मह(मद) इसफाचा मजकूर, त्यास तो पलोन जाऊ लागला तेसमई सरकारची फौज माघारे आली. त्यास धरून पाठवावयाविसी राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर यास लेहून पाठविले होतेच. त्याणी आपलेकडील पटा ताजखान रोहिले आडवे पाठऊन त्यास धरून आणून सिवण्यात ठेविला होता. बहुतसी अटक असता येक दिवसी रात्रीस दग्याने पलोन गेला. दुसरे दिवसी ताजखान यास कलताच बारा खासे दर आसामीस दोन तीन राऊत घेऊन बारा जण बारा वाटेने शोधास गेले. त्यातून फतेखान रोहिला याणे च्यालिसा कोसावर दुसरे दिवसी गाठिला. त्याची त्याची लढाई बरीच जाली. फतेखानास त्याच्या तीन च्यार जखमा भारी जाल्या. याच्या इसफावरी तीन. जखमा चढल्या. त्या हलक्या, यामुले इसफ नव कोस पलोन गेला. तेथे गोंडानी धरिला. मागाहून फतेखान व ताजखान जाऊन पोहचले. त्याणी त्यास चतुर्भुज करून छपारियाचे ठाण्यात शृंखला घालून ठेविला आहे. सेनाधुरंधर त्यास इकडे रवाना करणार. इकडून-हि पाच सातसे राऊत जाऊन आणितील. आम्ही काल जैनाबादेहून कूच करून आठ कोस मजल केली. येथून च्यार कोस येदलाबाद आहे. पौर्णिमा येदला-बादेस करून दरमजल तुम्हाकडे येतो. भेटीनंतर सविस्तर कलेल. शकराजी खंडेराव सुटोन आले म्हणोन लिहिले ते कलले. उतम गोष्ट जाली. बहुत काय लिहिणे लोभ असो हे विनंती.

¶*Hari Ballal writes to Naro Anandrao about the movements of Dadasaheb and Muhammad Issaf. He describes the thrilling chase of Muhammad Issaf by a contingent of Mudhoji Bhonsle sent under Tajkhan. He advises the addressee that he should not move but await his arrival there.*

6162

No. 268] [6-10-1775

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य
राजश्री बालाजीपंत स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १० साबान जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. तुंम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. मुख्य इंग्रेज श्रीमंताबराबर आहे. त्यास मुंबईहून बोलावणे आले. त्याजबाार लक्ष्मणपंत नातू मुंबईस रवाना केले आहेत. राजश्री फतेसिंग गायेकवाड यासी व इंग्रेजासी सख्य आहे. चंदराव पवार पांच सातसे स्वारानसी आकलेश्वरी आले. लक्ष्मणपंत नेले ते कामरजेस आहेत. श्रीमंत व राजश्री गोविंदराव गायेकवाड छाणीवर आहेत म्हणोन लिहिले ते कलले. ऐशास आम्ही आज विजयादशमीचे मुहूर्ते तेथून कूच केले. दर मज(ल) त्याच प्रांते येत असो. तिकडे गेल्यावर पवार वगैरे किरकोलीचा पराश्रम होणार नाही. लक्ष्मणपंत नातू गेले ते मुबईकरासी बोलोन पुढे काये मजकूर करितात, श्रीमंत कोणीकडे जाण्या करण्याचा विचार करितात, बातमी सविस्तर लेहून पाठवावे. जैनाबादेहून शुक्रवारी कूच केले. पौर्णिमा येदलाबादेस करून तुम्हाकडे दर मजल येत असो. बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Haripant to Balaji Pant making enquiries about the English and Dadasaheb and especially about the outcome of negotiations between the English and Lakshmanpant Natu, Dada's envoy who had gone to Bombay.*

No. 269] [10-9-1775

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १४ रजब जाणौन स्वकीये कुशल लिहित जावे विशेष. तुंम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहालें. श्रीमंतानी राजश्री फतेसिंग गायेकवाड याजकडे ऐवज करार केला तो मुदतीस न ये म्हणोन इंग्रेजसुधा येऊन बडोद्यास मोर्चे लाविले. फतेसिंगराव बाहेर येऊन दाहा लक्ष रुा सोने रुपे काही नख्त देऊन बडोद्यास गेले. बाकीच्या

ऐवजास वोला मानाजी नाईक व आरबाचे जमातदार ठेविले. ऐवज देणे प्राप्त. आपले येण्याची मार्गप्रतीक्षा करितात. आपाजी गणेश यांणी श्रीमंताकडे कारकून पाठऊन सात लक्ष रुापर्यंत कबूल जाले, परंतु ठराव जाला नाही. श्रीमंतानी आमदाबादेत बारा चौदा लक्ष पर्यंत पटी करून ऐवज घेतला तो मागतात, तह न पडे म्हणोन कारकून उठोन गेला. आमदाबाद घेऊन गोविंदराव गायेकवाड यास देणार, ते मात्र घेणार नाही म्हणतात. श्रीमंताचे मानस आमदाबाद घेऊन धारेकडे जावे. इंग्रजाचे मानस तिकडे न जावे, समुद्रकिनाराने घाटाखालून पुण्यास जावे. लक्ष्मणपंत जनार्दन अनंत याजबराबर आपाजी पायेगुडे देऊन व्याहारीयास पोहचाऊन दिल्हे. तेथे चढी लागोन पुढे ठाणी सोडवीत गेले. तिकडून श्रीमंताकडून विश्वासराव परभू व त्रिंबकराव गायेकवाड सरसुभा होऊन आले. दोन प्रहरा मोह्याच्या ठाण्यात लक्ष्मणपंत व जनार्दन अनंत व आपाजीबावाकडील केसो कृष्ण शंभर सवासे स्वार होते याजवर चालून आले. केशो कृष्ण बाहेर पडोन येक दोन वेला चांगली झटपट जाली. सात आठ जखमी जाले. च्यार पांच घोडी पडली. ते भारी हे थोड यामुले हे निघोन व्यारीयास आले. आपाजीबावा बलसडेस होते तेहि येऊन येकत्र जाले. लक्ष्मणपंत सोबत सोडून निराले नदी उतरून गेले ते परभारे त्याणी धरून नेले. माडवी व वासदे येथील वरात आम्हाकडे पाठविली होती. ते उगवावयास आपाजीबावा गेले होते. परंतु ते हालाखी दाखऊन कालहरण करितात. पैका उगवत नाही तेव्हा आपाजीबावा निघोन आले. जनार्दनपंत व्याहारीयात राहिले. आम्हाजवल फौज थोडी भारी सामान असिल्यासिवाये अबरू राहाणे कठीण. रोजमरे देणे चढले, गवगवा बहुत. फौज उठोन जावयास सिध जाली. सोनगड घ्यावा म्हणोन लिहिली येतात, कुमक व खर्चास येत नाही. तेव्हा सोनगड घ्यावयाची उमेद राहून नवापूर वगैरे ठाणी कसी राहातील? लौकर या प्रांती येणे जालिया स्तित राहील. नाही तर उपाये नाही म्हणोन लिहिले ते सविस्तर कलले. ऐशास आम्ही तुम्हाजवल मागेच यावे परंतु राजश्री आपाचे येण्यामुले दिसगत लागली. प्रस्तुत आपा आले. लस्करांत त्यांचे दुखणे फार जाले आहे. याउपरी येथे कांही काम नाही. लौकरच येत असो. तिकडील वर्तमान लिहीत जावे. लक्ष्मणपंत धरून नेला तो कोणीकडे घेऊन गेले ते शोध करून ल्याहावे. बहुत काय लिहीणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke learns from Naro Anandrao's letter that Fatesing capitulated after putting a feeble defence and that Raghoba proposes to march upon Ahmedabad.*

6164

No. 270] [10-10-1775

पो ३ रमजान
सुा सीत

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वमीचे सेवेसी

विनंति. सेवक नारो बलाल भुसकुटे कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १४ माहे शाबान पावेतो सेवकाचे व सरकार हांडे येथील वर्तमान येथास्थित असे विशेष. सेवकास राजश्री हरिपंत तात्या याही महमद इसफ गारदी याचे पारपत्यासी पाठविले. सरदार तिघेजन सात आठ हजार फौज घेऊन गेले. परंतु गारदी मोठा मर्द माणूस आहे. हा या फौजेने बुडण्हार नाहीं ही धशत सरदारास आणि काही माया येत असे. परंतु सेवकाच्याने जेथवर सरदारास समजावयाचें तें समजाऊन गाठ घातली. खावदाचे प्रतापें गारदी पलोन सडा गेला, तो सिवणी सोपारें मंडेल्या अलीकडे तेथे धरला गेला. पायांत बेडीहि पडल्या. मोठा मर्द होता. तो खावंदाचे प्रतापें लये पावला. फौजा घेऊन मागती लस्करांत आलो. हांडे सरकारचे गांव खराब केले. गुरें वगैरे आणिलीं, सेतें चारिलीं तें सविस्तर वर्तमान राजश्री हरिपंत तात्यास निवेदन केलें. त्याण्ही आज्ञा केली कीं गारदी याणें नगदी यैवज घेतला आहे तो आम्हीं फडशा करितो. मग सेवकानें कबूल केलें. मग जें त्याचे विचारास आलें तैसा फडशा केला. तो सेवकानी मान्य केला, परंतु रयतेवरी रुपये साधावे यैसें सांगितलें. यैसियासी प्रांत मजकूर पाऊस कमी, त्यांत दीड महिना तो पडलाच नाहीं. त्यामुलें ज्वारी बंडी (?) व दुसरी पायेमाली जाली, जेथवरी साधतील तेथवरी साधून घेतों. शेवेसीं आलियावरी सर्व निवेदन करीन. त्याचा निर्वाह करण्हार खावंद समर्थ आहेत. राजश्री हरिपंत तात्या यांहीं पायेमालीची चवकसी करून यैवज रयेतीस मजरा द्याल तो यैवज वाजवी सरकारांतून मजरा देऊं यैसें बोलले, तेहि सेवकानी मान्य केले. जमिदारीचे चौकसीस राजश्री सर्वोत्तम शंकर सर सुभेदार याजकडोन राजश्री त्रिंबक गोविंद कारकून माहालीं आले. त्यासी गारदी याचे कामकाज करून आलियावरी त्याजला जमिदारीची जैसी त्याणी तमाम प्रगणियाची चवकसी केली त्याप्रमाणें सेवकानें करून दिल्ही. सरमंडल सुद्धां कागदपत्र घेऊन सेवेसीं आले आहेत. ते निवेदन करितील. जुज जमीदारास खर्च किमपि मजुरा दिल्हा नाहीं. आकार करून आणिला आहे. जमिदार नेमाड प्रांतींचे आहेत. यासी कांही खर्च न दिल्हा तरी सेवकाची विपत्य पाडितील, पळून जातील, तरी याचा निर्वाह करण्हार खावंद समर्थ आहेत. मी त्याहावेसे नाहीं. जमाबंदी

पैकीं खर्च सन आर्बा व सन खमस दोन्ही साला पायेमाली सूट दिल्ही. ते सर्व जैसा कागद चवकसी करून घेतला तो दिल्हा याप्रमाणें परगणें बरई व परगणें कान्हापूर व परगणे भामगड व परगणे मुधी सुधां दिल्हा. हाडे सरकारचा इजारा आहे परंतु आमीन याही चवकसी जमाखर्च याची पाहिली त्याप्रमाणें कागद दिल्हे आहेत. हे सर्व निवेदन करितील त्यावरून सर्व ध्यानास येईल. हांडे सरकारची पायेमाली फौजेची जाली तोहि आकार जाहाला तो कागद यासी दिल्हा. याप्रमाणें साल मजकुरीं रयेतीस वाजबी पायेमली मजरा रयेतीस देऊन रयेत राखितों. खावंदाचे प्रतापे हांडे सरकार बुडालेच होते, परंतु प्रतापें राहील. गारदी याचे पारपत्य भगवंतानी उत्तम केले. सरकारहि खावदाचे प्रतापें राहिले. परंतु हांडे सरकारास गारदी याचे दगियामुळें यैवज सावकारापासून घेतला आहे आणि रयेतीवरी तसदी बहुत जाली आहे, यास्तव सेवकास तेथे जाऊन सर्वाची खातरजमा करून यैवज घेतला आहे तो द्यावा आणि रयतीची खातरजमा करावी. सालहि आफतीचें आहे. सालमजकुरीं पाउसाची कमती बहुत, याजमुळें जमाबंदी करून यैवज घ्यावयाचे बंदोबस्तास दोन तीन महिने लागतील. यास्तव विनंति सेवेसी लिहिली आहे. सरकारची आज्ञा येईल कीं जमाबंदी करून रयेतीचा बंदोबस्त करून यावे, तर येथील कामकाज़ करून येईन. येनदा सेवकानें चाकरी येथें राजश्री हरिपंत तात्या याजवल येथाशक्ति जाली ते केली. सरकारचीं कामें केलीं तीं सविस्तर राजश्री हरिपंत तात्या सेवेसी लिहितील. मी सेवक पदरींचा चरणरज आहे. माझी निष्ठा स्वामीचे चरणापासीं आहे. जमीदार यांचाहि यैवज वसूल घेतला पाहिजे. येथें राहिल्यानें मामलतीचा बंदोबस्त होईल. मग स्वामीची जैसी आज्ञा सादर होईल त्याप्रमाणें यावयाची आज्ञा जाहली तरी माघमासी येईन. येथें राहिल्यानें सरकारकाम येथास्थित होईल. मग जैसी आज्ञा येईल तैसी वर्तणूक करीन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Naro Ballal Bhuskute writes to the Peshwa how he helped the Peshwa's troops to overcome Muhammad Isaf. He asks for a remission of a part of the revenue from the district as much of it was laid waste by the soldiery.*

No. 271] [*10-10-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी.

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ १४ साबान मुकाम नजीक येदलाबाद जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष.

तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. कुकरमुंढेकर शंकराजी खंडेराव सुटोन आले म्हणोन लिहिले ते कलले. ऐशास त्याची निष्ठा श्रीमंताच्या चरणासीं होतीच त्या पुणेंकडून ते सुटोन आले. फार उतम गोष्ट जाली. आम्ही जैनाबादेहून कूच करून येथे आलो. पुढे सोनगड सुमारे लौकरच येत असो. तुमचीहि भेटी लौकरच होईल. तिकडील वर्तमान ल्याहावे. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

राजश्री बालाजीपंत स्वामीस सा। नमस्कार लोभ कीजे हे विनंती.

¶Hari Ballal learns with pleasure the news communicated to him by Naro Anandrao of the release of Shankraji Khanderao. He says that he has just arrived near Edlabad and will soon proceed to Songad.

No. 272] *[11-10-1775*

पौ छ ३९ साबान शु॥ खमस

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक येसाजी सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १९ साबानपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे व प्रांत मजकूरचे वर्तमान यथास्थित असे विशेष. छ २६ रजबचे आज्ञापत्र सादर जाले ते छ ८ साबानी पावले. तेथे आज्ञा की, रा। माधवराव बेलोसे याचे तुमचे न बने, यावरून तुम्ही लोक नाके आहेत तेथे चौक्यास ठेऊन बंदोबस्त केला व अर्नालियाचे बंदरावर च्यारपाचसे माणूस नेहमी ठेऊन मोर्चेबदी करून गोलागोली करीतां त्यास याप्रो॥ करावयाचे नव्हते. शत्रू संनिध असता आपणातच कलह वाढऊन ठिकाणास मोर्चेबंदी करून माहीतगारी करून द्यावी हे उत्तम न केले. हुजूर ल्याहावयाचे होते. बंदोबस्त करून दिल्हा असता. याउपरी चौक्यास व मोर्चेबंदीस लोक ठेविले असतील ते उठऊन नेणे. किले अर्नाला येथील लोकाच्या नेमणूक बा। रोजमुऱ्याचा ऐवज * * त्याप्रो॥ देत जाणे व रा। माधवराव बेलोसे यास कलह न वाढवा येविसी हुजूरून पत्र लिहिले आहे. तरी रा। गंगाधर बलाल यास अर्नालियास येक गलबत देऊन समागमे पत्र पावते करणे. ऐसी कितेक प्रकारे सेवकास शब्द लाऊन आज्ञा आली. ऐशास येविशीचे कचे हरद्द पूर्वी लिहिले आहे. त्यावरून सेवकाकडे कलह वाढवावयाचे कारण अथवा शब्द कोण तो हे सर्व समजण्यात आलेंच असेल. स्यतीचा बऱ्याव व्हावा याअर्थे

लोक ठेऊन बंदोबस्त केला. त्यावरून त्याणी लोक पाठऊन नि:कारण कलह केला. उपरांत नित्य गोळे लोकावर मारावे, गोल्यानी काही जखमी व ठार जाले, इकडून गोलागोली तिलमात्र न करिता लोक नाना प्रकार समजावितात. आसो. राजश्री गंगाधरपंत निवेदन करिता निष्ठापूर्वक वर्तणुकीचा प्रकार विदित होईल. आज्ञेप्रो मारनिलेस येक गलबत व बराबर माणसे देऊन जंजिरा रवाना केले व चौक्यास व नाकेबंदीस लोक ठेविले होते ते उठविले. रोजमुऱ्याचा वगैरा आकार सेवकाकडे आल्यावर इकडून ऐवज अथवा गला द्याव * * * * क्रिमपिहि नाही हे विनंती. पेशजी * * * * होती. राजश्री माधवराव बेलोसे याकडून जंजिऱ्याहून आकार येईल, त्यास सालाबादचे अन्वये ऐवज व गला आज्ञेप्रो बेगमी करून देत जाईन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

हे विज्ञापना.

¶*Yesaji Shivdeo writes to the Peshwa why it was that a discord had arisen between him and Madhavrao Belose at Arnala.*

No. 273] *[16-10-1785*

पो छ २६ जिल्हेज
आश्विन सीत समानीन
गारपीर

श्रीसीताकांत

राजश्री हरिपंत तात्या गोसावी यांसी

ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो मुधोजी भोसले सेनाधुरंधर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत आसावे विशेष. भीमा उतरोन राक्षेसवाडी ता कडेबाळील येथे येणे जाले. त्या मुकामीहून आपणाकडे पत्रे पाठविण्यात आलीच. त्याजवरून कळले असेल. तेथून कूच केलें ते सीणा नदीवर मुकाम केला. तेथे काही फौज व कारखानेजात राजश्री बळवंतराव विष्णु व भवानी नागनाथ याचे समागमे ठेऊन आम्ही स्वारीणसी गंगेवरी आलो. उंट वोझ्यासुधा पाण्यातून उतरावयाचे होते म्हणोन कुल सडे स्वारीचे कारखान्यासुधा यैल तीरी येऊन मुकाम केला. तेथून लांब लांब मजलीने छ २९ तारखेस व्याल्यास येणे जाहले. चिरंजिव राजश्री बापू व चिरंजीव राजश्री चिमणाबापू यासी वराडात येणियाविसी पूर्वी पत्रे पाठविण्यात आलीच होती त्याजप्रो त्याचे येणे वर्धेवरी जाले. भेटीचा दिवस आस्विन शुध्य द्वितियेचा, यास्तव उभयेता चिरंजीव वर्धेहून येके दिवसात पनास कोस मुहूर्ताची सांधि

आटोपून व्याल्यास आलेत व सुमुहूर्त भेटले. चिरंजीव राजश्री बाबा व राजश्री भवानी काळोजी आदिकरून कुरूंदखेडास आले होते. आम्ही व उभयेता चिरंजीव येथेच आलो. त्याच्या आमच्या भेटी जाहाल्या. बलवंतराव विष्णु व भवानी नागनाथ हे उभयेता मशारनिले कारखाने जात, व फौजसुधा विजयादशमीस आम्हांजवळ येऊन पोहचलें. आम्हीं पुण्यांत आसता गाविलगडाकडील काहीयेक वर्तमान आले होतें त्याचा इतला आपणास दिल्हाच होता व इतक्या त्वरेनी इकडे येण्याचे कारणहि हेच. याजकरिता त्या सुमारे जात आसो. पाहावे कैसा प्रकार घडतो. इकडील लक्ष तो सर्वप्रकारें बोलण्यास आले त्याजवर व दिवसाची अवधि दिसत नाही. मध्येंतरी हा प्रकार व घरचा बंदोबस्त व मंडळे वगैरे याजकडील रवानगी करणे त्यास मोरो गोविंद तिखे व नानको कृष्ण तेथून रवाना जाहले आहेत. परंतु ते आले नाहीत. ते आलियावर तिकडील रवानगी करणियात येऊन सत्वरच बोलल्याप्रमाणे तयारी व सिध्धता येणियाची होत असे. चिरंजीव राजश्री मनाबापू यासी येथून पूर्वी लिहिण्यात आले होतें की पुण्याहून येण्याविसी पत्रे आली म्हणजे तुम्ही जावे त्याजप्रमाणे आपणाकडून पत्रे चिरंजीवाकडे जाऊन त्याचे येणे येथे घडलेच आहे. येतद्विषयी ल्याहावेसे नाही. रा छ १२ माहे जिल्हेज बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Mudhoji Bhonsle writes to Haripant Tatya of his arrival as far as the river Sina. He also says that he has asked his son Chimna Bapu to come and see him (the writer).*

No. 274] [*26-10-1775*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १ रमजान जाणोन स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही दोन पत्रे पाठविली ती प्रविष्ट जाली. फौजेचे देणे आठवडे दुमाही मिलोन पंचावन साठ हजार रुा चढले. त्यास परभारे मांडवी बाा व पाा नंदुरबार वगैरे मिलोन पंधरा हजार मिलोन बाकी देणे, त्याबदल व नागोपंत आपणाकडून आले त्याबरोबर नक्त ऐवज न आला यामुले लोक गवगवा करितात. आपलेकडे यावे त्यास त्यासुमारे लौकर येतो म्हणोन पत्रे आपली येतात व पुरंधराहून आज्ञा सुरत प्रांती न जाणें ऐसी आली, त्यावरून तूर्त येथे मुकाम केले. लोक येथेच राहिल्यास सडे भेटीस येऊन म्हणोन लिहिले

ते कळले एसियास, येथे तूर्त पैका नाही, वोढ आहे, यास्तव राजश्री नागोपंत याजबरोबर कापड देऊन रवाना केले. ऐवज येणार. आल्यावरी तुम्हांकडे पाठऊ. तुम्ही यावयाचे न करावें. आम्हांस समाधान नाही. यामुळें तीन च्यार मुकाम जाले. आरोग्य होताच येथून कूच करून सोनगडचे सुमारे लौकरच येत असो. तुमची भेट सत्वरच होईल. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*On being informed by Naro Anandrao of his monetary difficulties, Haripant writes to him saying that money will soon be sent on to him when received from Purandar. He further says that he would soon proceed to Songad when free from illness.*

No. 275] [*26-10-1775*

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवसी

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. भेटीस मुहूर्त मध्यम प्रतीचा मगलवारचा व शनवारी द्वादशीस रात्रौ मुहूर्त चागला आहे. त्यास कोणते दिवसी भेटीस यावे म्हणून लिहिले ते कळले. ऐसियास फौज तेथे ठेऊन तुम्ही सडे भेटीस यावे. उदैक मगलवारी आमचा येथे मुा आहे. आपण सडे यावे. रा छ ४ रमजान बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Haripant Phadke gives Naro Anandrao time and place for a meeting.*

No. 276] [*27-10-1775*

पो छ ४ रमजान कार्तिक
मास सीत सबैन

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही बाहालेस आला म्हणौन कळले. त्यास तेथेच मुकाम राहावे. आम्ही कूच करून त्याच सुमारे तुम्हाकडे येतो. परगण्यास कहीचा वगैरे उपसर्ग लागो न द्यावा. रा छ २ रमजान बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Haripant informs Naro Anandrao that he would soon be there at Bahal, and asking him to see that the province does not suffer from anu ravages at the hands of the army.*

No. 277] [29-10-1775

श्री

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. पा बहाल येथील जागिरीचा अमल राजश्री रामचंद्रराव पवार यांजकडे सरंजामास आहे. त्यास तुमचा मुकाम पा मजकुरी आला आहे. यास माहालास काडीमात्र उपसर्ग लागो न द्यावा. सेतास हिरवे दाणा खेरीजकरून गवत कडबा मात्र आणावा याप्रो ताकीद लस्करास करावी. यांचे सरंजामाचा ऐवज येवढाच आहे. आणा समागमे चाकरीस येणार यास्तव बंदोबस्त जरूर करावा. रा छ ४ रमजान हे विनंती.

¶*Naropant Nana is asked by Haripant to see that the jagir lands of Ramchandrarao Powar do not suffer owing to the camping of his army there.*

No. 278] [20-11-1774

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंतनाना स्वामीचे सेवेसी.

पो बहिरो रघुनाथ मुा पुरंधर कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ १९ माहे रमजानपर्यंत जाणौन आपणाकडील कुशल ल्याहावयासी आज्ञा करावी विशेष. प्रांत गुजराथ येथील बंदोबस्तास फौजेसुध्धां आपली खासा स्वारी जाली आहे. ऐशास शहर सुरत येथील चौथाई सरकार तर्फेची मामलत आम्हाकडेस आहे. तेथे नरोतम किसोरदास याणी श्रीमंत दादासाहेबाकडील सनदा आणोन मोंगल व इंग्रेज साह्य करून घेऊन आमचे तर्फेचा अमल उठऊन त्याणी आपला बसविला, हे वर्तमान साद्यंत सरकारांत निवेदन केले. त्यावरून येथील बंदोबस्ताविसी आपणास पत्रें द्यावयाची आज्ञा जाहाली आहे व मजलाहि स्वामीचे समागमे जावे ऐसी आज्ञा आहे. त्याप्रो पत्रें घेऊन वगैरे कामकाज उरकोन सेवेसी येतो. पुढें बंदोबस्त करून देणार आपण आहेत. त्यास स्वामीचे जावयास अवकाश किती दिवसाचा आहे, फौजेची वगैरे जमीयत होणे त्यास दिवसतगत किती लागेल, स्वारी मजल दरमजल जलदीने जाईल किंवा किती मुकाम पडतील ते सविस्तर ल्याहावयासी आज्ञा करावी. त्याप्रो येथील कामकाज

उरकोन सेवेसी येऊन हजर होतो. स्वामीचे जाण्यास आठपंधरा दिवसाचा अवकाश असिल्यास येथील कामेकाजे सर्व करून घेऊन येऊ. जाण्यास जलदी असिली तरी जे कामकाज होतां होईल तेच करून येईन यैसे आहे. याकरितां. पत्रोतरी सविस्तर आज्ञा लेखन करावी त्याप्रों निघोन येतो. मजला कसकशा (?) होऊन सुरतेचे आसममंता सुरत आठाविसीत पोहचावयास विलंब कितीक दिवसगत लागेल ते सविस्तर ल्याहावयास आज्ञा करावी, त्याजप्राो निघोन सेवेसी येईन; तर उत्तर काय ते लिाा पाहिजे. सर्व प्रकारे स्वामीचा असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bahiro Raghunath communicates to Naro Anandrao the Peshwa's instructions about proceeding to Surat where the collection of Chauth dues assigned to the writer was being appropriated by Narottam by the orders of Raghoba. The writer wants to know the addressee's programme of march so that he may also join him as instructed by the Peshwa.*

No. 279] *[28-11-1775*

श्री

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक श्रीनिवास त्रिंबक साष्टांग नमस्कार विज्ञापना. यैसीजे सेवकाचें वर्तमान ताा छ ४ सवालपावेतो मुाा मोजे भोडगाव प्रांत दहिवले येथे सुखरूप असो विशेष. कोंडाईबारीचा बंदोबस्त आपले आज्ञेप्रमाणे केला. कमाविसदारास पत्र छ १ सवालचे पाठविले ते त्यास दिल्हे. त्यावरून त्यानी गावोगाव दोनदोन माणसे करून दिल्ही आहेत. एकोण त्याची सहासात माणसे व आपली मिलोन रात्रंदिवस बारीवर चौकी देतो. आम्ही सकालपासोन संध्याकालपावेतो राहतो. संध्याकाली गावात येतो. व राजश्री सदासिव रघुनाथ यास धनेरीस खाटक्या वडाचे बारीक दोन तीन वाटा आहेत तेथे राहिले. पलीकडे घोडेघाट दोन कोस आहेत. तिकडेस नित्य येक येरझारा करितात व या चौकीवर रात्रंदिवस असतात. त्याच्या हाताखाली गावकराची च्यार माणसे व आपले गाडदी मिलोन बंदोबस्त केला आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब अद्यापि खडक्याबेहऱ्याचे पलीकडे सात कोसावर आहेत. कांहीं फौज मात्र चार येक हजार अलीकडे तीन चार कोसावर आली आहे. त्याची खर्चाची तंगचाई आहे, व फिरंगी सुरतेस गेले आहेत, त्याची वाट पाहतात. गाईकवाड आद्यापि कोणी आले नाहींत, ऐसा विचार आहे. आपण शंकरोबास

बातमीस पाठविला तो आजी सकाळीच पहाटे उठोन गेला. आम्ही त्याजबरोबर येक भिल दिल्हा आहे. आजी नवपुन्यास जाईल. सेवेसी श्रुत होये. बहुत काये लिहिणें. कृपा निरंतर सेवकावर करीत असिले पाहिजे, हे विज्ञापना.

¶*Shriniwas Trimbak writes to Haripant Phadke mentioning the measures that he took for guarding the pass of Kondai Bari and other villages. The writer also mentions the movements of Raghunathrao and his allies the Gaikwad and the English.*

No. 280] [*Received on 8-12-1775*

श्री

पैवस्ती छ १४ सवाल
सीत.

नाना फडणिसाचे हातची

सेवेसी माहादाजी बलाल साष्टांग नमस्कार विज्ञापना. भिखनखान श्रीमंताजवल होते यास फोडावयाचा संदर्भ सिंद्यानी लाविला. तुमची तलब श्रीमंताकडे निघत असेल ती देऊं व कदीम जाहागीर व इनाम गाव आसतील ते सुदामतप्रमाणे चालतील व नवी आणखीं दोन हजाराची जाहागीर देऊं, याप्रमाणे करार करून वचनप्रमाण देऊन आणिलें. याणी सेज पाडिलें याजमुळें राजश्री मालोजी घोरपडे वगैरे मानकरी आले. खानाची तलब श्रीमंताकडे चौपन हजार रुपये निघत होते. त्यांत सिंद्यांनी च्यार हजार रुपये वजा करून पनास हजार करार केले. सिंद्याकडील करार ठरला त्याजवरून खानानी कांहीं स्वाराचा हिसेब करून निरोप दिल्हा. यैवज निघाला त्याच्या चिठ्या घरीं औरंगाबादेस दिल्हा. त्यास पुढें राजश्री हरिपंत तात्यानी फडशा केला तेव्हां चौथाई सूट घातली. बाकी सदतीस हजार रुपये ठराविले, हें सविस्तर आपणास विदित केलें. त्याजवरून आपण बिडावर बत्तीस हजाराची वरात बाकीचे यैवजावर दिल्ही. त्याजवरून निरोप घेऊन शहरास गेले. घरीं गेल्यावर लस्करांतून वराता केल्या. त्यास यैवज पावला नाहीं. याजमुळें त्याचे तगादे व नेहमी पंनास साठ स्वार होते. त्याणी मागील तलबेविसीं व आलिकडील श्रीमंताचे लस्करांतून निघाल्यापासून चाकरी जाहली त्याजविसीं तगादे करूं लागले व सेंदुरणीस घोडीं गेलीं ते घोड्याविसीं तगादे करितात. सरकारांतून बतीस हजाराची वरात दिल्ही होती ती मना जाहली. त्याजवरून शहरांतून काल पुण्यास आले. बराबर चालीस पनास स्वार आहेत त्यास खर्चास नाहीं. मार्गी फाके करीत आले. लोकांचा तगादा बहुत आहे.

श्रीमंतास सोडून बरें होईल म्हणोन आले. त्यास अलीकडील चाकरीचे यैवजास ठिकाण नाहीं. मागील यैवजास हा हिसका पडला. इनाम व जहागीर गांव पेसजीचे आहे त्याची आद्याप मोकलीक नाहीं. नवी देणे त्याचा जाबसाल मोघमातच आहे. याजकरितां फिरोन आले त्यास वरात मना केली आहे. त्याची फिरोन चिटी द्यावयाची आज्ञा करावी व पेसजींपासून मौजे माल सावली परगणे फुलवरी हा गाव इनाम व मौजे पिंपळगांव काले त्यापैकीं दाभाडी हा जाहागीर गांव आहे त्यास सदरहू माहाल मोगलाकडे गेले. त्यास गांव मोकले करावयाविसी नवाबास पत्रें देविलीं पाहिजेत व नवी जहागीर दोन हजाराची द्यावयाचा करार आहे त्याचा बंदोबस्त करून देविला पाहिजे. याप्रमाणे न जाल्यास ते आमची स्थित ठेवीत नाहींत, याजकरितां हे आपणांस विनंति लिहिली आहे. तपसीलवार ध्यानांत आणावे आणि घालघसरीखालीं न घालावें. स्पष्टच उत्तर ल्याहावे. मग आमचा जीव घेतील तर घेवोत. चाकरी वर्[१]वाज आणि गुन्हा लाजम याप्रमाणे जाहलें. आपली प्रशस्त मर्जी असेल तसेंच ल्याहावें. आम्हीच यैवज द्यावासा असल्यास आम्हीच घरदार विकून याचा फडशा करून देऊं. उत्तर पाठवावें. पंचवीस तीस माणूस येऊन घरीं बसतें त्यास काय सांगावें? त्याजवल येक पैसा खावयास नाहीं. याजकरितां कराराप्रमाणें याचे यैवजाची सोये करून द्यावयाची असेल तर द्यावी. उत्तर पाठावायास आज्ञा करावी हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal writes that a settlement of compensation and of Saranjam to Bhikhankhan who was won over from the side of Raghoba by Sindia should be effected without loss of time.*

No. 281] [*11-12-1775*

श्री

विनंती सेवक नारो कृष्ण कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १७ शवालपावेतों आपले कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. कलकतेकर इंग्रजांकडून करनेल इटफैन बाहादर वकालतचे कामास हुजूर जावयाकरिता आले. ते नर्मदा उतरल्याचे वर्तमान पेशजी लिा (पाठविलेच) आहे. त्या उपरी इंग्रेज मजकूर शहरास आले तों पुरंधराहून आज्ञापत्र सादर जाले की, इंग्रजाकडून येतात त्यास सामोरे पाठऊन आणून गेरप[२]रदास्तर करणे. किरकोली साहित्य व पडतालाची उंटे तटे बैल थकले असतील ते अडो न देता, विशये थो(ड) का आहे देऊन कासारबारीचे मार्गे हुजूर रवाना करणे म्हणोन

१ योग्य. २ बरदास्त.

मुजरद जासूद जोडी पत्रे घेऊन आले. त्याजवरून सरकार आज्ञेप्रो वकिलास सामोरे ग्रहस्त पाठऊन सन्माने करून आणून जैनाबादेस उतरविले. ज्याफतीचे सामान रितीप्रो पाठविले. दुसरे दिवसी इंग्रजास दौलतखान्यांत आणून मेजवानी वस्त्रपात्र वगैरे त्याचे खुशीप्रो केली. त्यांस खर्चाची वोढ. वाराणशीहून हुंड्या आणिल्या त्या औरंगाबादेच्या, त्याचा कावादावा येथे साहुकारियांत न होय, याजकरिता औरंगाबादचे मार्गे जावे असा त्याचा विचार दिसोन आला आणि सरकारची आज्ञा की कासारबारीने रवानगी करावी. यास्तव ऐवज पुणियांत द्यावयाचा करार करून तीन हजार रुो येका ग्रहस्थाकडून देविले, आणि समागमे कारकून माणसे नेहेमी पुरंधरपावेतो देऊन कासारबारीचे मार्गे रवानगी केली असे. बातमी सेवेसी कळावी याजकरिता लिा असे. येथून छ १४ तेरखेस त्याचा मुकाम बाहादरपुऱ्याचा जाला. छ १५ रोजीं ऐनापुरास गेले. तेथून पुढे दरमजल जातील. सत्रा मजलीनी पुरंधरी पोहोचावे असा निश्चय जाला आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Naro Krishna reports that arrangements are made for the safe journey of Col. Upton, the English ambassador proceeding to Poona and that he is provided with funds till his cheques are cashed at Aurangabad.*

No. 282] *[21-12-1775?*

श्री

सेवेसी विज्ञापना गोविंद नरसिंह साा नमस्कार विनंती. येथील कुशल छ २७ शवाल तीन प्रहर दर जागा नवापूर सुखरूप असो. यानंतर इकडील वर्तमान तर तूर्त बातमी बारीयाहून आली. ते बजिनस पत्र पाठविले तें पाहावें. फिरंगी सुरतेहून सरंजामसुधां लस्करास आला. तेथून पुढे मनसुबा करण ते करतील. चांदरात जालियावर कूचे होणार म्हणऊन लिा आहे. सौ आनंदीबाई पावागडानजीक आली. चांपानेरावर आली. लस्करास येणार म्हणऊन माणूस तोंडजबानी सांगत होता. सेवेसी कळावे. वरकड वर्तमान येथास्थित असे. बहुत काये लिा हे विज्ञाप्ति.

¶*Govind Narsinh writes that Anandibai has arrived as far as Champaner and will shortly be in the camp.*

No. 283] [30-12-1775

श्रीनिवासो जयती

श्रीमंत राजश्री बापूसाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंति सेवक राजो तमाजी व आणाजीराव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति विज्ञापना. येथील कुशल तागायत छ ९ जिलकाद मो सवणुर जाणून स्वकीये कुशल लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. कृपापत्रें न येतां बहुत दिवस जाहाले. सेवकावरी दया करून पत्रें पाठवावयास आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान सेवेसीं नवाबाची जोडी समागमें सेवेसीं लिहून पाठवीत असतों, श्रुत होईल. प्रस्तुत वर्तमान तरी हैदरखान पटणांत दीपावलीच्या मुहूर्ते पेशखाना[१] बाहेर देऊन मोहिमेचे सरंजाम होत आहे. जवळी च्यारी पांच हजार फौज दाहा बारा हजार गाडदी आहे. कलिकोट प्रांतें माघें धामधूम कलीकोटकर यानी केली होती. हैदरखानानी फौज व गाडद्री पाठऊन बंदोबस्त केला. तूर्त तिकडे जात नाहीं. बिदनुरास यावयाची बोली दाट आहे. किलेत थोर तोफा पैकीं तिनी तोफा थोर व लहान मधेम प्रतीचे पंचवीस येणेप्रमाणे किल्या बाहेर कावेरी अलीकडे फौज व पेशखाना दिल्हा आहे. तेथ तोफा पाठविल्या आहेत. पौश सुध दसमीचे मुहुर्ते डेरे दाखल होऊन बिदनुरास येणार. कडपेकर याजकडून वकील पटणास जाऊन आडीच लाखाची खंडणी केली. त्याच प्रमाणे कनोजकराकडील वकील जाऊन बोली लाविली आहे. स्नेहभावास्तव बसालतजंगानी वकिलासमागमे वस्त्र जवाहीर हैदरखानास पाठविलीं आहेत. रायेदुर्ग व चित्रदुर्ग व हरपनहली वगैरे पालेगाराचे वकील जाऊन रुजू जाहाले आहेत. रायेदुर्गची बोली पनास हजार रुपयावरी उरकली. चित्रदुर्गची खंडणी दीडलाख होनावरी बोली जाहली. येरडकेर दुर्गकराकडे आहे तें सोडून देणें, रायेदुर्गकरास देणे आहे म्हणून दुर्गकरास तगादा लाविला आहे. तुंगभद्रापलीकडे अरकाट परियेंत हैदरखानाचें राज्य जाहालें आहे. त्याचा हुकूम दुसरेचे गुज्यांसीं नाहीं. आरकाटकर महमद अलीखान चेनापटणांत आहे तो देखील हैदरखानासी सलुकेनें आहे. टिपूचीं रवानगी गुरमकोंडेस करिताना दाहा हजार फौज पंधरा हजार गाडदी पंधरा तोफा देऊन पाठविले. गुरमकोंडा घेऊन कडपे प्रांतास गेले. कडपेची खंडणी करिता तगादा केला तेव्हा हैदरखानाजवळी वकील जाऊन आडीच लाखावरी बोली उरकून घेऊन

१ तंबू वगैरे स्वारीचें सामान.

मनाचिठी टिपूस आली. इतकियांत बसालतजंग व कर्नोलकर हे साहा सात हजार फौजेनिसी कडपेकर याचे कुमकेस कडपेचे सरहदेस गेले. हें वर्तमान टिपूस कळून त्याजकडे शामराव इगळ त्या समागमें पांच साहा हजार फौज सिबंद वगैरे यास बसालतजंगावरी पाठविलें. हे दरमजल जाऊन बसालतजंगाचे लस्करापासून च्यार पांच कोसावरी जाऊन मोकाम केला. नित्य कहीवरी लढाई होत होती. बेदे[1] नित्य उंटे व बैल घेऊन जात होत आणि लोकांस तोडून जखमी करीत होते. येक दिवस बसालतजंग खूप तयार होऊन गेले. लडाई जाहाली, सिकस्त खाऊन माघारे सरले. इगल शमराव बैद वगैरे घेऊन चारा व दाणा बंद करूं लागला. माहागाई बसालतजंगाच्या लस्करांत जाहाली. तेव्हां कूच करून कर्नोल प्रांतास आले. त्याच्या पाठी लागून इगल शामराव फौज सुधां लागला आहे. आदवानी प्रांतास बसलातजंग जाणार. टिपू कडपे प्रांताचे जमीदार मातबर त्याची खंडणी घेत फिरतो. कडपेकर हैदरखानासी रुजू जाहाले. कर्नोलकर रुजू नाहींत म्हणून टिपूस हैदरखानाचीं पत्रें जातात जे, कर्नोलेस ठाणें घालून मुलूक बांधणे. याप्रमाणें वर्तमान सेवेसीं कळावें करितां लिहिले आहे. राजश्री मुरारराव घारपडे गुतीस आहेत. जवली च्यारी पांचसें स्वार आहेत. स्वामीकडील फौजेची वाट पाहात बसले आहेत. प्रस्तुत कोठहि जाणेची मसलत दिसत नाहीं. पटणांत हैदरखानाजवली बाजीराव बरवे व विठल विश्राम पांचसें स्वारानिसीं पाटणाबाहेर कोसावरी उतरले आहेत. खर्चास देत आहे. आठा दिवसा येकदां भेटायास किलेस जाऊन येतात. त्याची मधेस्ती आपाजी रामाकडे आहे. श्रीमंत राजश्री दादासाहेब गोसावी यांजकडून कर्ज घेऊन हुंडी हैदरखानावर करितात त्याप्रमाणें चिटी घेऊन रुपये देत आहे. श्रीमंताकडील पत्रें हैदरखानास वरचेवरी बाजीराव याचे विद्येमाने जातात जे, तुंगभद्रापलीकडे बकापूर व धारवाड वगैरे ठाणी घालणें. त्यास हैदरखान स्वामीचे लक्ष पाहून उतावली न होतां तालामाला पाहतो. बिदनुरास हैदरखान आलियावरी बंकापुरास व धारवाडास उपद्रव द्यावेयाची दाट बोली आहे. निघून बिदनुरास आलियावरी सेवेसीं विनंति लिहून पाठवितों. सवणूर तालुकीयास तिनी च्यार महिने उजनी आपा बिदनुर देत होता, त्यावरून व बाजी तिमाजी राम म्हणून कारकून त्याला वकीलीचें काम सांगून वस्त्रें हैदरखानास देऊन पाठविलें. हैदरखानाजवली आपाजी राम आहे त्याचे विद्येमाने बोली लाऊन दोनी लाख रुपये ऐन व दरबार खर्च पंचवीस हजार रुपये येणेप्रमाणें आपाजी

---

१ हैदराचे सैन्यांतील लुटारू लोक.

6177

रामाचे मारिफात बोली निवडली. पैक्याच्या खटपटींत येथील दिवाण आहेत. आम्हांकडील माघील दिवाण राजश्री माधराव भास्करराव यास कैद करून बसविलें आहे. पैका मागतात. सविस्तर निवेदन व्हावें याकरितां विनंति लिहिली आहे. पेशजी दोनी तीनी वेळां खंडेरायास स्वामीनी पत्र लिहिलें जे सरकारचें लक्ष धरून कार्यभाग करणें म्हणोन पत्र खंडेरायास आलीं, परंतु सरकारचें लक्ष न धरतां पटणकराचे लक्षांत आहेत. राजश्री बापूजीपंत हे बोदवटास येऊन पावले. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶Rajo Tamaji and Anajirao supply Sakharam Bapu with information regarding the negotiations of Raghoba with Haidar carried on through Bajirao Barve and view with apprehension his growing power.

No. 284] [*1775*

श्रीं

विनंती विशेष. राजश्री सिवबा बाजी येथे येऊन दशा चालावयाचा निश्चय करून गेले. निघतात कधी पाहावें. आम्हासीं बोलून गेले कीं आम्हीं जाताच मुहूर्ताची त्वरा करून डेरेदाखल यजमानास करितों. आठ रोज यांची वाट पाहूं येतील बरोबर कूच करूं. न आल्यास आम्हीं कूच करून जाऊ, याप्रो बोलून गेले. या प्रो घडल्यावर यांस बोलावयास जागा राहणार नाहीं. पौष मासाचा अनमान केल्यास माघ आलाच, तों पावेतों आपणाकडून प्रसंग कसकसा निवडतो? सध्या आपण व श्रीमंत राजश्री दादासाहेब व फौज सज्य आहेत. इंग्रजाचा वकील किल्यास गेला त्याचा दारमदार ठरतो किंवा काय होतें हा पडदा दरम्यान आहे. दारमदार ठरला तर मुंबई व सुरतकर इंग्रज श्रीमंत दादासाहेबांचा पक्ष करणार नाहीत. यांचें बोलणें त्यांस पथ्यावर पडणार नाहीं, तेव्हा आणिखी विचार पाहतील, किंवा इंग्रजाचा जाबसाला पुरंदरी लागताच सावध जाल्यास रेवापार होऊन, गुजरातेत आल्यावर गाईकवाडास समागमें घेऊन या उभयता सरदारावर येतील तर हे सहजच निरोपाय होतील. याजवळ फौजाचे भरणे नाहींत. देशी गेल्यावर ठराव जाल्याप्रमाणे पुढे वर्तणूक करावी हा विचार, तेथे हजारो फौज आजच जमा कशास करितील? होत्या फौजा त्या हिंदुस्थानास रवाना केल्या. थोडथोडके राहिले तितक्यानसी घरी आसले आगर देशास गेले. इंग्रजाचा वकील पुरंदरास गेलाच आहे. इतकाच बशा+ खाऊन श्रीमंत दादासाहेबानी रेवापार होऊन याच्याच चालून आल्यास संकटच आहे, यैसी

\+ दहशत.

पेचाटीच दिसते. उगीच कल्पना उठली त्यावरून लिहिले आसे. राजकारणाचे अनेक मार्ग आहेत. आपले ध्यानातच आहे; कदाचित लिहिल्याप्रमाणे गोष्टी घाडिल्या तर आपण तोडहि योजितील. जर करितां सांबानी+ जागा सोडून इकडे रोख धरिल्यास पाठीमागें दाहापांच कोसाचे अंतरेयाने आपण मुकाम करीत चाल-ल्यास सरदारांचा बचाव होईल. याजवर जड न पडे ते आपण करितीलच. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶The English envoy having gone to Purandhar for carrying out negotiations with the Peshwa the plans of Dadasaheb after either the success or failure of the negotiations are further discussed in this letter.

No. 285] *[1775*

श्री

विनंती उपरी. तुम्ही लिहिले की, इंग्रेजाकडील वकील तेथे बोलावयास आला होता. त्याचे बोलण्याचे भाव असतील ते आम्हास कलवावे म्हणौन लिा. त्यास आम्हाकडे वकील आलाच नाहीं. खंबाइताची बात कलावी म्हणौन फतेसिं-गाकडील कारकून पाा होता. त्याचे इग्रजाचे बोलणे जालें. त्यांत भाव की दौलतीचा कारभार दादानी करावा. आम्ही इग्रेज दरम्यान पडून तह करून देतो. फतेसिंगानी पुढे येऊन भेटावे. त्यास यांत कोणती गोष्ट आम्हांस कबूल करणे की फतेसिंगानी पुढे जावे. ती गोष्ट राहिली. त्यांजकडील येक इग्रज आपले लस्करांत आला होता. फतेसिगानी पुढे चलावे. इंग्रजास भेटावें ती गोष्ट काय म्हणून करावी? त्यास निरोप दिला, लिहिले याहून बोलणे कांहीच नाहीं. तुम्हाजवळ बोलतात त्यात भाव काय? कसी स(म)जावीस पाडावी हे कांही बोलण्यांत आले तर त्यास होय नाही म्हणावे. त्यास मोगल आपलेकडील लक्ष धरून तह करावा असे असेल तर ते कसा तह करावा म्हणतात हे मनास आणून लेहून पाठवावे. या गोष्टी घडणे दुर्घट आहेत. तथापि शोध करावा हे विनंती. इंग्रजाचे बोलण्याचे भाव मनास आणून जरूर लेहून पाा हे विनंती.[१]

¶Haripant Phadke refers to the attempts made by the English for opening negotiations on behalf of Raghoba.

\+ दादासाहेबानी

१ पत्र हरिपंत फडक्याचें.

No. 286] [1775 ?

श्री

पुरवणी राजश्री नारोपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. सुरतेच्या तहाचा मजकूर उरकल्यावरी आमोदाकडे जाऊन भडोजवाल्याचा बंदोबस्त व गिराशाचे पारपत्य करावे म्हणून आलाहिदा सरकारचे पत्री विस्तारे लिहि(ले) (आहे) (त्या) प्रमाणे तिकडे जाऊन ती कामे लौकर करावी हे[१] विनंती. पत्रे तुमची अक्षरशाहा वाचून पाहिली हे विनंती.

¶*Naro Anandrao is asked by Nana Fadnis to proceed to Amod after settling the Surat affair to treat with the Nawab of Broach and to quell disturbances created by marauders.*

No. 287] [1775

श्री

श्रीमंत राजश्री नारोपंत दाजी
स्वामीचे सेवेसी

सेवक हरि उमाजी कृतानेक रा नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणन आपले स्वकुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेब व राजश्री गोविंदराव गाईकवाड यांच्या भेटी जाल्या उपरी आम्हास भेटीस साहेबानी बोलाविले, त्याजवरून राजश्री गोविंदरावबावा यास समागमे घेऊन त्यांची भेट घेतली. आम्हासी कितेक भाशेन केले आणि उभयेतानी आम्हास सांगितले की, तुम्ही श्रीमंत राजश्री बापू व श्रीमंत राजश्री नाना याजकडे जाऊन सांगितल्याप्रो बंदोबस्त करून सत्वर येणे. त्याजवरून आम्ही येथे झाडेश्वरी आलो. पुढे रेवापार उतरून श्रीमंताकडे जाणे; त्यास ते कोठे आहेत हे बातमी आपणास ठावकी आसल ते सविस्तर ल्याहावी. आम्हास मजल दरमजल जाणे. आपण त्यांच्या लस्करचे मुकामाचे वर्तमान तेथे ल्याहावे व आपला आत्मिक कारकून आम्हापासी पाठवावा की त्याजपासी सविस्तर वर्तमान सांगू. पत्री लिहिता येत नाही याजकरिता बारीक मोठ वर्तमान मुखतरे सांगू व आंकलेस्वरापुढें आम्हास जाणे; तापीतीरी व सोनगडी आपले कोण्ही आसतील त्याजला पत्रे द्यावी. सोन-

---

१ पत्र नाना फडणविसाचें.

गडापुढे कोल्याचा उपद्रव फार आहे, आम्हास तो जरूर जाणे; याची सोये करून द्यावी. मी नवापुरास जाऊ पोहचे यैसे आपण करावे. मर्जीस आले तर काही स्वार आथवा पाईची माणसे सोनगडाहून नवापुरापावेतो देऊन आमची रवानगी करावी. येथून सोनगडापावेतो तर आपण पोहचते करतील. परंतु पुढे नवापूर-पावेतो पोहचो यैसे करावे. आपण सरदार आहेत. आम्हासमागमे कोण्ही फारसे सिपाई नाहीत. आपला आत्मिक कारकून पा। त्याजपासी नाजूक वर्तमान सांगू. आपणास कलले पाहिजे, यास्तव आनमान सहसा न करिता मंगलवारी दोन प्रहरपरियेंत पाठऊन द्यावे. आमचे रवानगीची सोये करून वाटेचे दस्तक देऊन आम्हाकडे पा। बहुत काय लिहिणे, लोभ कीजे, हे विनंती.

¶*Hari Umaji, who has got some message from Raghunathrao and Govindrao Gaikwad to be delivered to Sakharam Bapu and Nana Phadnis, requests Naro Anandrao to arrange for his safe journey up to Navapur*

No. 288] [*1775*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो। गणेश हरि कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी, येथील कुशल जाणोन श्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. पा। अमोद येथे इंग्रजाने बखेडा करून मालाची खली बंद केली. बंदोबस्तास फौज पाठवावयाविसी श्रीमंत राजश्री हरिपंत तात्यास पत्रे पाठविली. त्याणी उतर पाठविले की, रा। चांगोजी कदम फौजसुधा पाठविले आहेत, सर्व बंदोबस्त होईल. त्यास प्रस्तुत येथे फौज नसल्यास चिंता नाहीं. सरकारचा परगणा खराब होऊन लुकसानी होत्ये, याजकरिता चांगोजी कदम यास अमोद परगण्याचे बंदोबस्ताविसी पत्र ल्याहावे म्हणजे ते भडोच परगणियात राहिले म्हणजे सहजात बंदोबस्त होईल. जरूर लिहिले पा। येकादोहो दिवसी आम्हीहि सेवेसी येतो. बहुत काय लिहिणे, लोभ असो दिल्हा पाहिजे, हे विनंती.

¶*Ganesh Hari requests Naropant that Changoji Kadam should be despatched to protect the Pargana of Amod from the troubles created by the English.*

No. 289] [*1775*

श्री

स्वस्ति श्रीमत्सु

निरंतराभीष्टचिंतकाश्रित गंगाधर दीक्षित विहितानंताशीस्ततयः सुमुख्संतु विशेषस्तु

विशेष कोंडाईबारीचे मुकामची पत्रे व कारभारी जमातदार याचे पत्राचे डौल पाठविली ती पावली. त्यास पावती केली त्याजवरून सर्व संतोष जाहले. आपले लिहिल्याप्रमाणे सर्वास दिलासा दिल्हा. पुढेहि देत आहो. राजश्री गोविंदराव गाइकवाड सेनाखासखेल श्रीमंत बडोद्यास असतां रुसोन येऊन पेटलादेस सरंजामासुधा राहिले. राजश्री आपाजीपंत सुभेदार याजकडे राजश्री हिंमतबाहादर याचे मा संधानहि लाविले. त्यावरून येथून त्याजकडे हिमतबाहादर याचे व सरकारचे कारकून पा त्यासी भानगडीचे बोलणे बोलतच होते. श्रीमंत बडोद्याहून कूच करून नर्मदापार सोनगडानजीक जात तोवर पेटलादेस होते. उपरांतिक कूच करून खेड्यास आले. तेथे मोर्चे लाविले. पठाणाने दोन चार वेला येथील कुमकेस बोलाविले. त्यास सांगितले की आम्ही कुमकेस येत नाही. आपणाकडे यावयाचे संधान दाट लाविले, की गुदस्ता राश्रजी हरिपंत तात्या याणी करार केला आहे त्याप्रमाणे हाली सरकारातून आमचा बंदोबस्त करून द्यावा. येविसी बाहेदर[1] द्यावे म्हणजे आपण येऊन पठाणास उठऊन देतो. पठाणासीहि संधान ठेविलें की खेडे घेतल्यावर तुमचा उपराळा करून. त्याजपासून तोफा मागोन नेली. खेड्याचे मसलतीचे नाव करून तेथेच बसले. श्रीमंताची पत्रे पठाणाचे साहित्याविसी येतच होती. याणी श्रीमंतास उतर लिहीत गेले इकडे येकायेकीच उठोन यावे तर त्याजपासी इमान बेलभंडारी क्रियेस गुंतले. सरदार, पदरी नाव वडिलाचे, पुढेही सरदारीच करणे, तेव्हा निमित्याविना सोडून यावे कसे? बाट लागतो, त्याजमुळे इतके दिवस दोहीकडे संधान राखोन होते. हाली श्रीमंताकडे कितेक तपसिले वर्तमान लिहून आपले इमानाची सुटका करून घेतली. श्रीमंताचीहि त्यास पत्रे आली की पठाणाच्याने आमदाबाज घेवते असे नाही. त्यास आबरूने काढून महीपार करून द्यावा येविसी सेनाखासखेलास पत्रे आली. त्यावरून पठाणासी त्यासी बोलणे जाले. पठाणाने जाब दिल्हा की सिबंदी बहुत चढली आहे याचा फडशा करून द्या म्हणजे उठोन जाऊ. विना कसे जावे? गोविंदराव याचे मानस आपणाकडे येऊन मिळावे, परंतु आपलें जाबसालास धनी करून घेऊन मग यावे असा प्रकार. येथील प्रकार

---

१ जामीन.

6182

तरी सिबंदीचे देणे बहुत चढले. पैशास + जागा नाही. आज आठ मास जाले. वेराहि (?) जाला. रयतेत जीव नाही. हुजरून कुमक आठ महिने होते त्यासहि आजवर ठिकाणा नाही. कसे करावे? तेव्हा सर्व मडली हिंमतबहादुर आदिकरून येकत्र होऊन विचार केला कीं गोविंदराव यास इमानप्रमाण देऊन त्यास तूर्त मुलेमाणसे ठेववयासी सरकार तालुकियात जागा देऊन आणावे म्हणजे पठाणहि उठोन जाईल. मुलकाचा बदोबस्त होईल. हुजरून फौज येऊन बंदोबस्त होणे त्यास पर्ज्यन्यकालहि जवल आला. फौज येते असाहि भरवसा कशावरून प्रमाण? आज आठ महिने कुमक फौजेची व येवजाची झाली, पुढेहि होतच आहे. तूर्तहि गुदस्ता कराराप्रमदार जाहला आहे त्याप्रो आपण सर्वांनी मिलोन त्यास वचन द्यावे जे सराकारातून निभावणी करून देऊ, असे लिहून देऊन त्यास आणावे हेच उतम. याप्रो विचार करून सेनाखासखेलास कागद लिहून दिल्हे. त्याणी निखालसपणें सरकारकामासी अंतर न करू, येकपक्षीं असावे याउपरी दुगधा नसावी. त्याणी इमानपूर्वक लिहून दिल्हे त्याजवरून त्याणी रा लाल पाटील यास येथे पा. त्याणी येऊन सामदाम करून पाहिला. जरबेविना उठत नाही, तेव्हा त्याणी खेब्यास लिहून पाठविले. त्यावरून सेनाखासखेल सरंजामसुधा शहरापासून दोन कोसावर येऊन मोकाम केला. सुभेदाराची व आमची भेटी जाली. बोलणे जाले. समक्ष शपतक्रिया जाली पाहिजे, तेव्हा दुसरे दिवशी मागती सुभेदार व आम्ही गेलो. बेलभंडार होऊ लागला तेव्हा गोविंदराव याणी सांगितले कीं हुजूरचे दीक्षितबावा आहेत ते तात्याचे जागा आहेत. याचे हाते बेलभंडार द्यावा जे, गुदस्ता तात्यानी करार केला आहे त्याप्रमाणे निभावणी करू व तात्याचे तर्फेचा जिमा आपणाकडे, असा आड घातला. तेव्हा समयास मागे व्हावे तर सरकारकामास हिसका बसतो आणि सरदार दिलगीर होतात असा विचार करून आम्हीहि बेलभंडारात गुतलो. याउपरी गोविंदराव याचा गुंता राहिला नाही. फारच निखालस जाले. बहुत प्रकारे आम्हासी बोलणे जाले. लालपाटीलहि सरकारचाकरीत राहून कारस्ताई करून निखालसपणा केला व पुढेहि तेच कारस्ताईत राहून सरकारकाम करितील हे निशा पुरली. येक दोन दिवसात सलुकाने पठाण उठला तर उतम. नाही तर हला करून मारून काढावासा निश्चये जाला, गुंता राहिला नाही. इतक्यावर आपण इकडील बदोबस्तास फौज पाचे कारण नाही. चिंता न करावी. इकडील बंदोबस्त होईल, मग फौजेचे कारण काये? आमचे वचन गुतले आहे, याचे सार्थकता आपण केली पाहिजे. गोविंदराव येकपक्षी आहेत. श्रीमंताकडे होते तोवर त्याचे म्हणविले. हाली इकडे मिळाले तेव्हा तिकडील पक्ष क्रियापुरस्कर सोडिला. त्यास आपले बरे करून घेणे, तेव्हा चाकरी चांगली

करून दाखवितील हे आपली पुर्ती निशा असावी. आपण कृपापुरस्कर खातरजमेचे येक पत्र तूर्त पाठवावे. मागाहून कररामदाराच्या सनदा पाठवाव्या. सनदा येऊन उभयता भावाची वाटणी होऊन समजूत पडे तोवर त्याची मुलेमाणसे ठेवावयासी जागा बोरसदेचे ठाणे पठाणाने सरकाराचे घेतले तेथे लागोन ठाणे घेऊन त्याचे हवाला करावे. तूर्त खेड्याचे कुमकेस शभर स्वार व दोनसे माणसे द्यावी येसा करारमदार जाला आहे. बोरसदचे ठाण्यात सिबंदी त्याणी द्यावी, आमलदार सरकारचे. त्याचा बदोबस्त जाला म्हणजे ठाणे सरकारचे सरकारात घ्यावे. यास बहादर हिमतबहादूर जाले आहेत. आम्हास शपतक्रियेचे दरम्यान पडावयास कारण आपली पत्रे सुभेदारांस व हिमतबाहादर यास हमेशा येतात व सांप्रतहि अली कीं गोविंदराव अनकूल जाल्यास करून घेणे व गोविंदरायास श्रीमत दादासाहेबानी डबईचा किला द्यावयाचा करार करून सनदा देखील पाठविल्या असता त्याहि सनदा आमान्य करून इकडे येकनिष्टेने मिलावे हा निश्चये पाहिला आणि सर्वादेखताही शपतपूर्वक बोलिले की, यामुळे मी मध्ये पडून बेलभडार दिल्हा. विनोदार्थ त्यासी बोलले की तुमची तात्याची भेट जाल्यावर आम्हास पुसणार देखील नाहीत. त्याही तुम्हासारिखे मातबर सरदारासी स्नेहच संपादून राज्य करणे आहे. मग ते बोलिले जे मी तुम्हावाचून सरकारातील जाबसाल आन्येत्रासी करणार नाही. असे बहुत प्रकारे बोलले. इथपर निभावणी करणे आपले स्वाधीन आहे. याचे येण्याविशी बहुत प्रेत्न लागला. गोविंदराव आल्यावर पठाणास दबाव पडून दुसरे दिवशी पठाण बोलू लागला, मजला आबरूनिसी जाऊ द्यावे. त्याजवर तिसरे दिवशी कालूपूरचे दरवाजाचेसंनिध मसिदीत मोरचे सोडून सरसपुऱ्यात गेला. लढाई येक मातबर झाली. पुढे भानगड त्यासी लाविली आहे की पनास हजार रुपये द्यावे. तेहि त्यानी मान्य केले. वराता देणार. परतु तो सावकारी निशा मागतो. ते घडत नाही. येका दो दिवसी न आईकिल्यास हाला करून पारपत्य करणार आहेत. श्रीमंत बापू व नाना याण्ही याचे खातरजमेविशी आपले हाते पुर्ते देणे मिळाले असे लिहून पाठवणे म्हणजे निसंशये होईल. आपण छ २२ सफरची पत्रे पाती छ १ रबिलावली साइकाली पावली. ज्याची त्यास पावोन बहुत संतोषी जाले. याप्रो फौज पो तरी शहरच्या बंदोबस्ताविसी फौजेचे कारण नाही. मुलकी बंदोबस्त केवल कुमकी फौजेने होणार नाही, याअर्थे रवाना कर्तव्य ते करावी. अलमतिविस्तरेण किं बहुनेत्याशी:सहस्रं विलसतु.

¶*Gangadhar Dikshit writes how he persuaded Govindrao Gaikwad to give up Raghoba's cause.*

6184

No. 290] [3-1-1776

पो छ २१ जिल्काद

श्री

श्रीमंत राजश्री तात्या स्वामीचे सेवेसी

विनंती शेवक गोपाल विश्वनाथ कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना. ता छ ११ माहे जिल्कादपावेतो मु॥ उजन जाणून स्वकीय कुशललेखनाज्ञा केली पाहिजे. विशेष. आपली पत्रे छ २६ सवालची आली ती छ २९ जिलकादी रात्रीस आली. राजश्री पाटीलबावा यास व रा। नारो सिवदेव यास व गोविंदपंतास पत्रें पाठविली ती पावली. ज्याची त्यास पावती केली. सरकार पाटीलबावाचे पत्राचा जाब घ्यावयास एकाद रोजाचा विलंब, विचार करून पत्र देणार. मागाहून विस्तारे कचे पके लिहून पाठऊ. छ १० मि॥ची पत्रे लि॥ त्यात विस्तारे मजकूर लिहिला आहे त्यावरून निवेदन होईल. राजश्री पाटीलबावा व रा। सुभेदार यांचा देसी यावयाचा मात्र येके मुहूर्ते यावे. माव सुधात येण्याचा विचार आहे. कलकत्याहून वकील देसी पुरंदरास गेला. हा काय इत्यर्थ ठरतो हाहि विचार. कितेक सलुखाची तोड घडल्यास तोहि पक्ष आहे. यास्तव काही दिवस दिरंग आहे. राजश्री पाटीलबावाचे लक्ष की होलकरा अगोदरच यावे ऐसीहि सला घडेल ऐसा योग आहे. याविसीहि आम्ही प्रेत्नात आहों. राजश्री नारो सिवदेव देसी जाण्याकरिता पाटीलबावापासी निरोप मागत आहेत; परंतु हे समागमेच चालतील, आगोदर जाणार नाही. या नंतर रा। गोविंदराम कारकुनाचा पत्ता लिहून पाठवणें. त्यास पंत मशारनिले पुरातन औरंगाबादकर माधवराव याचा भाचा, हे माधवराव गोविंदराम उज्जनीतच आहेत. वर्षे तेरा चवदा कुटुंबसुधा तेथे आहेत. आलीकडे पाच सात वर्षे रा। पाटीलबावाचे दरबारी चाकरी रोजगार वगैरे किरकोल वकिली काम करीत होते. हाली बेकार आहेत. कलावे. आमचा पता लिहून पाठवणे ऐसी आज्ञा; तरी पुण्यात रा। बाजी बाबूराव पर्वतीवाले आमचे माऊसबंधु रोजगारनिमित्ये रा। माहादाजी सिवाजी गर्जे याजसमागमे इकडे आलो. माहादाजी सिवाजी हे रा। विष्णु माहादेव यांचे चुलतबंधु बाबाकडून मामलती इकडे पांच साहा वर्षे करीत होते. आलीकडे ते देवलोक जाले. आम्ही त्याचे पुतण्या रा। आपाजी कृष्ण याजवल बेकार बसलो. इतक्यात देसीहून राजश्री गुरुजीबावा आले. त्यासी पूर्व परिचये, तेहि कृपा करू लागले. जातेवेलेस आपले म्हणोन त्याजकडील आसामीं होती ते काम आम्हास सांगितले; परंतु हाली सरकार तुम्हाकडील लोकावर विशेष कृपा आहे. आम्हा बेकार केले. कलावे. यानंतर आम्हाविसी विस्तर आम्ही लिहीत उपयोगाचे

शेवक यक कार्यावर आल्यास शेवकावर नजर राखावी. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. गंगाजी आव्हाड स्वामीशेवेत सर्वदा मेहेनत करीत आहेत. बूज धणी करणार समर्थ आहा. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Gopal Vishvanath to Haripant Tatya giving news about Sindia and Holkar who the writer says, are watching the result of the negotiations started by the English envoy, before proceeding to the South, The writer also recommends to him Govindram for service.*

No. 291] *[17-1-1776*

पो छ २९ जिल्काद
सन सित सबैन पौष
मास बुधवार.

श्री

सेवेसी विज्ञापना. इंग्रजाचा वकील पुणियास गेला ते समयी श्रीमंत गडाखालतें उतरत नवते, कीं तुह्मी भेट घ्यावी आणि तह न ठरल्यास काये करावें. त्यास त्याणे जाबसाल केला जे, आपण खालते उतरावें, तुम्हाकारणे जव्हाईर साता लक्षा रुपयाचे आणिले ते व हती यैसे नजर घ्यावे आणि आपण आज्ञा करतील त्याप्रमाणे सलुखाचा बंदोबस्त करून देईन. तेव्हां श्रीमंत खालते उतरोन भेटी जाल्या. त्यांचे यांचे बोलणे जाले. मग त्या वकिलानें ममईस पत्रे पाठविली. ममईकराने सुरतवाल्यास पत्रे पाठविली. सुरतवाल्याने श्रीमंत दादास पत्रे पाठविली. बोलण्याची भानगड लागली आहे. पहिले रावसाहेबाचे वेलेस ठरले होते त्याप्रमाणें ठरल. परंतु इंग्रेज म्हणतात कीं या मसलतीस दोन क्रोड रुपये आमचे खर्च जाले आहेत ते द्यावे. वरकड बोलणे निश्चयांत आले. परंतु रुपयाचा बंदोबस्त जाला म्हणजे निश्चयांत येईल. मग सर्वांही नासिक त्रिंबकापासी जमा व्हावे, तिकडोन त्याणीहि यावें, याप्रमाणें बोलण्यांत आहे यैसे पत्र पुरंधरचे आले. स्वामीस कलावें. हे वर्तमान यैकिलें त्याप्रमाणे स्वामीस लिहिले आहे. यैवज पुरंधरीहून येणार, आलियावर खर्चास मिलेल. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

सेवेसी धोंडो नारायण व शंकराजी रुद्र सां नमस्कार राजश्री नागोपंत यानी वर्तमान लिहिले त्याजवरून कलेल. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*The letter mentions negotiations carried on between the Peshwa and the English at Purandhar.*

6186

No. 292] [23-1-1776

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री नारोपंतनाना
स्वामीचे सेवेसी

पो विसाजी कृष्ण सां नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ताा छ १ जिल्हेज मो मौजे कोढीत ताा करेपठार जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नवते. त्यास, सांप्रत पत्र व शंक्रमणाचे तिलशर्करा पाा ते पावोन संतोष जाहाला. ऐसेच सदैव पत्र पाठऊन संतोषवावे. इकडील वर्तमान तरी श्रीमंत राजश्री बापू व नाना कोढितावरच आहेत. इंग्रजाकडील वकील आहेत. भेटी जाहाल्या. त्याजकडील बोलणे होत आहे. आम्ही फौजसुध्धा पुणियावर होतो. त्यास, येथे यावयाविसी पत्र आले त्यावरून तूर्त फौजसुध्धा श्रीमंताजवल आहो. आपण प्रस्तुत कोणे ठिकाणी आहेत, पुढे काये कर्तव्यता आहे, राजश्री हरिपंत तात्या कोणे ठिकाणी आहेत, ते साद्यंत लेहून पाठवावे. पूर्वस्नेहास ममतेस आविस्मर आसावे. वरकड इकडील वर्तमान राजश्री भिवराव आबा लिहितील त्याजवरून कलेल. बहुत काये लिहिणे, लोभ आसो दिल्हा पाहिजे, हे विनंती.

पो महिपतराव विस्वनाथ सां नमस्कार. बहुता दिवसी पत्र पो ते पावोन संतोष जाहाला. याप्रो पत्र पाा आनंदवीत असावे हे विनंती.

¶*Visaji Krishna writes to Naro Anandrao of an interview that took place between Nana, Bapu and the English envoy.*

No. 293] [1-3-1776

पो छ २४ मोहरम
सन सीत सबैन फालगुन मास

श्री

राजमान्य राजश्री राजश्री राघो केशव यासी रघुनाथ बाजीराव प्रधान नमस्कार सुाा सीत सबैन मया व अलफ. तुम्हीं विनंतीपत्र छ १२ जिल्हेजचे पाठविले ते छ २ मोहरमी येऊन प्रविष्ट जाले.

फितुरियाकडून रंगराव माहादेव हजार स्वारानसी आले, त्याचे कुमकेस सिंदे होलकर याणी पाचसे स्वार दिल्हे. ते राजाराम गोविंद यांजवर

सिंदे होलकर फितुरियाकडे जाणार म्हणोन लिहिले तें कलले. याउपरीहि अधिकोतर बातमी आढलेल ती लेहून पाठवीत जाणे. कलम १

जाऊन जतीस खलेल करणार म्हणोन लिा ते विदित जाले. यैशियास येथून सिंद्यास व होलकरास पत्रे पाठविलीच आहेत. तथापि त्याचा आग्रह असल्यास करणे. त्याजविसी पेशजी मुजरद पत्र तुजला सादर केलेच आहे त्याप्रो करणे कलम

नारो तुकदेव व राजाराम गोविंद भेलसे व मल्हारगडावर आहेत म्हणोन लिा ते कलले. उभयेतापासी जमेती किती आहे, फितुरी त्याजवरी गेले, त्याचे काये वर्तमान ते लिहिणे कलम १

राजाराम व नारो तुकदेव याजपासी जमेत जबरदस्त असलियास याणी जाऊन काय करावयाचे आहे. कलम १

चिरंजिवाची प्रकृत उतम आहे म्हणोन लिा ते कललें. जन्मकाल घटिका पले लेहून पाठवणे कलम १

इकडील वर्तमान अधिकोत्तर नाही आहे तेच आहे. जनरालाचें बोलणे भरवसियाचे असे. श्रीकृपेने होणे ते होईल. कलम १

बालाजी पाडुरंग काादार मौजे केसोदे याजकडून यैवज आणविला आहे म्हणोन लिा ते कलले. उत्तम आहे. यैवज सत्वर आणवणे कलम १

येकूण कलमें सात जार्णाजे छ १० मोहरम आज्ञा प्रमाण.

¶ *This appears to be an intercepted letter of Raghunathrao to Ragho Keshav making enquiries about people who have joined the Barbhais against him.*

No. 294] [*9-3-1776*

पो छ २० मोहरम
सन सीत सबैन

श्री

सेवेसी बालाजीराम कृतानेक साा नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १८ मोहरमपावेतो येथास्थित असे विशेष. कर्नेल आपटेन इंग्रजाकडील वकील यास द्यावयास आतर गुलाबी उंच सिलकेस असल्यास ते, नाही तर खरिदी करून पाच तोले पाठऊन देणे म्हणोन स्वामीचे पत्रीं आज्ञा. त्यास सिलकेस अतर नाही, याज-करिता राा बाबूराव जिनसखान्याकडील याजकडून चांगले अतराचा गावात शोध केला. तेव्हा दोन तीन प्रकारचे अतर आणिले, त्याप्रो तीन तोले अतर चांगले पेशजी राजश्री माधवराव जाधवराई याजकडून अतर आणऊन महमदअलीस पाठविले त्याप्रोच राहिले होते ते हाली पेशजीच्या दराप्रो दर तोला रुा ५५ पंचावन प्रो येकसे पासष्ट रुा द्यावयाचे करून कुपीत घालून कुपी सुधा वजन

ताल ४॥।॰ पाा कुपा वजन १॥।॰ बाकी तीन तोळे अतर भवानजी जासूद जथे खंडोजी गुळदगड याज बाा पुरंधरचे रवानगीस लिहून पाठविले आहे. प्रविष्ट जाहल्याचे उतर ल्याहावयासी आज्ञा व्हावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

अत्तर जमा धरून
इंग्रजाचे नावे खर्च
ल्याहावे. कलकतेकर.

Attar of roses is purchased for the reception of Colonel Upton at Rs. 55 per tola.

No. 295] *[12-3-1776*

पैवस्ति छ ११ मोहरं

श्री

पुरवणी राजश्री गणेशपंत दादा स्वामीचे सेवेसी विनंति. सस्थान वासद यथाल सर्व * * * आपण समागमें आणिली आहे. परवतसिंग जो संस्थानीं बसला आहे त्याजला वारसा पोंचला नाहीं. परवतसिंग येथील राजेयाचे वंशीचा रणमल बारिया मियेकर याचा जावई. आपण परवतसिंग याजला बोलाऊन नेलें हें चांगली गोष्ट केली. येणेंकरून सरकार किफाईत आहे. त्यास व सत्या राठोड हा परवतसिंग याचे तर्फेनें तेथें गेला, हा कांहीं दिवस तेथें होता, याजकडे सरकारची बाकी अंताजी गबाजी याचे वेळची असावीशी वाटत्ये. त्याचा जाबसाल व अंताजी गबाजी सरकारचा कमाविसदार उदेसिंग याणें मारिला, त्याचा जाबसाल जो राजी असेल त्याजला पुसावा. अंताजी गबाजी याचे वेळची बाकी असल्यास त्याचा जाबसाल व सत्याकडें बाकी नाहीं म्हणोन व सत्या म्हणेल त्याजला माहालचा हिशेब पुसावा. राजश्री पांडुरंगपंत गडबोले यांणीं सरकारांत या मामलतीचें फाजील काढिलें आहे. सिबंदीखर्च फार केला आहे असें त्याजला जाबसाल पुसावयाचे, आपणास कळावें यास्तव लिहिलें आहे. त्यास परवतसिंगास स्वामीचें चित्तांत निश्चयरूप बसवावयाचें असल्या(स) आणि हें काम सेवकाचे हातून घ्यावयाचें असल्यास पत्र पाठवावें म्हणजे रणमलसिंग अथवा त्याचा कोणी भला माणूस स्वामीजवळ घेऊन येतों. सरकार किफाईतचे बाबीं चिंता नाहीं. दुसरें वांसदें गुजराथ तालुकियांतील यास्तव सेवकाचें हातून काम करवावें, याचें भूष(ण) आपलेंच आहे. या प्रांतीं असें आहे कीं गणेशपंत जें सांगतात तें आपण ऐकतात. तो लौकिक राहील. आम्ही कामांत असल्यास स्वामीची सेवा चागले प्रकारें होईल. रणमल बारिया मातबर गिराशा आहे.

आणि प्रमाणिक सचोटीदार आहे. हा या कामांत असल्यास सर्वच गोष्टीचा बंदोबस्त होईल, असें आम्हास वाटतें. रणमलची गाठ पडल्यास सारें समजेल. परवतासिंग याचा जावई, याजकरितां आम्हास त्याणें दीनवाणें होऊन लिहिलें आहे. त्याचें काम आमचे हातून घेतल्यास सरकार उपयोगीं; आणि आपली कृपा आम्हावर आहे असें होईल. फार काय ल्याहावें. उत्तर पाठविलें पाहिजे. खाश्री व खारवे खरेदी करावयास पाठविलें आहे; खरेदीकारितां नवार पक्या मणाची करविली आहे. पांच साहा दिवसांनीं येईल. तयार जाहाली म्हणजे समागमें घेऊन येतों; किंवा येक दिवस अगोधर पुढें रवाना करितों. आपणांस सरंजाम किती लागतो त्याची याद आतिसत्वर पाठऊन द्यावी. या गोष्टीस अलस करूं नये. पत्र पावतांच रवाना करावी. आपले भेटीस सत्वरच येतों. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हें विनंति.[१]

¶*The claims of succession of Parvatsing to the Bansda State are discussed and reported to Ganeshpant Behere by some agent of his in Gujarat.*

No. 296] [*19-4-1776*

पौ छ १२ रावल.

श्री

राजश्री हरिपंत तात्या गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रौ खंडेराव गायेकवाड हिमतबाहादुर दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत आसिलें पाा विशेष. आपण छ ६ सफरचे पत्र पाठविलें तें छ १६ मिनहूस पावोन लेखनाभिप्राये ध्यानास आला. इंग्रजाचे वकील पुरंदरीं आले. त्यांचा तह पका जाला. मुमईहून इंग्रजाची पत्रे श्रीमंताजवळ इंग्रज आहेत त्यांस आली कीं, उठोन येणें. इंग्रजाचा वकील श्रीमंताचेंहि बोलणे बोलत आहे. यैकिल्यास चांगले, न यैकिले तरी श्रीमंत निघोन जातील. कोणीकडे जातील हें न कळे. तुम्ही हिमतीनें स्थळाचे संरक्षण केले तैसेंच करून आसावें. थोडक्याच दिवसांत बंदोबस्तांत येईल. श्रीमंत निघोन जातील, पाठीमागें फौजा लागतील. आपल्याकडेहि फौज रवाना करितों. आपण मेहनत केली याचे सार्थक श्री लौकरच करील म्हणून लिहिलें. यैश्यास येथेंहि बातमी आली कीं, इंग्रेजाचा तह पका जालियामुळें सुरतेस गेले. श्रीमंतहि कूच करून शहराजवळ मुकाम जाला. फौजासह

---

१ पत्र गणेश विश्वनाथ बेहरे गुजरात प्रांतीं असतां त्यांच्या कोणा हस्तकाचें.

आपण घाटमाथाच आहेत. इकडें फौज येणें त्यास गुंता होत गेला तो मार वेदशास्त्रसपन्न राजश्री गंगाधर दीक्षित यांचे पत्रावलोकनें कळलें. त्यास स्थळाचे संरक्षण होय कीं श्रीमंत प्रभु दैववान आणि आपला सरळ स्वभाव त्यायोगे त्या मेहनतीस फलदाता ईस्वर प्रमाणच होये. दुसरें पत्र राजश्री नारो गणेश यांचे पत्रासहित चिरंजीव राजश्री गोविंदराव गायेकवाड सेनाखासखेल समसेरबाहादुर यांसी. आपले पत्रीं आशय कीं, राजश्री गोविंदरायांसी समजाऊन सांगोन मायेत घेऊन उतर ल्याहावें. त्यास आपण मौजे कडास लेवासण्याचे मुकामाहून देसीं जातेसमई हा मार सांगितलाच होता. त्यावरून श्रीमंताचा मुकाम बडोदियावरी आसतां कारकून पाठऊन चिरंजिवास आपले मायावादाचे व निखालसतेचे आर्थ सांगितलेवरून ये प्रांती स्थिरता जाली. लक्ष सोडिल्यामुळें समागम तुटला. पेटलादेस आले. कुटुंब लोणावाड्याहून आणविलें. तेथून खेड्याचे शहास गुंतले. हें वर्तमान पेशजी विस्तारें लिहिलेंच होते. चिरंजिवाजवळ कारकून ठेऊन या लक्षीं आनुसरावें, त्यांचे कल्याण आपण करावें, याचा करार रो खंडो आवजी यांचे विद्यमानचा तह तुमचे आनुभवास आणावयाचा, आपले सत्याप्रमाणें रो दीक्षितबाबा व राजश्री आपाजीपंत आपा व आम्ही वचनी गुंतलों ते आपणच, यैसी त्यांची खातरजमा होऊन या लक्षाचा प्रत्यये पठाणाचे पारपत्य करावे, आमदाबादेहून उठऊन द्यावा, त्यावरून खेड्याहून कूच करून छ २३ सफरीं शहरानजीक श्रीनागनाथ आहे तेथे मुकाम जाला. येविशीचे विस्तारें रो दीक्षितबावानी व आपानी लिहिलें आहे त्यावरून आवगत होईल. इतःपर पठाणांचे पारपत्याचे आवघड नाहीं. फौज इकडे येण्याचा मोठा लोभ कीं, आंत बाहेर येवनमये, दक्षणी फौजेविना खातरखा काम न होये, तें तरी चिरंजिवचे आगमनें घडलें. आपलें वचन प्रत्ययास येणे म्हणून लिहिले आसे. तरी खंडोपंताचे विद्यमानचा कराराच्या सनदा आति सत्वर येऊन त्रिभागांत किले स्थलें याची दखलगिरी होये तें लौकर केले पाहिजे. वरकड ये प्रांती पठाणाची ठाणीं महीउतरतिरीं माहालानिहाये होती तीं तरी सरंजाम बाहेर काढून पंचमाहाल व पेटलाद येथें सरकारची ठाणीं कायम जाली राहिली, महमदाबाद व बोरसद येक पठाणासच उठऊन दिल्हियानें तीं सहजांत स्वाधीन होतील. इकडील चिंता नाहीं. आपलेकडील सविस्तर सदैव लिहीत आसावें. रा छ २९ माहे सफर. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Khanderao Gaikwad expresses his gratification on hearing of the treaty of Purandhar and reports the subsequent movements of Raghoba. He further writes how he succeeded in bringing round Govindrao and requests that necessary Sanads should be sent without delay.*

No. 297 [21-4-1776

पो छ १२ रावल

श्री.

राजश्री हरिपंत तात्या गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो खंडेराव गायेकवाड हिंमतबाहादर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत आसिले पाहिजे विशेष. आपण छ २२ सफरचे पत्र पा तें छ १ रावली पावोंन लेखनार्थी इंग्रजाकडील वकील कलकत्याहून पुरंदरी येऊन तह पका जालियामुळें श्रीमंताजवल इंग्रज होते त्यांस मुमईहून पत्रें आली कीं, उठोन येणें, त्यावरून निघोन सुरतेस गेले. श्रीमंतापासी सरदार आहेत त्यांची आंत्रे अली. त्यांस गौरवतेचींच पत्रें लिहिलीं. फुटोन येतील. श्रीमंत कारनेलसमवेत मुमईस जाणार. आपण मेहनत करून स्थळाचें संरक्षण केले तैसेंच थोडकेच दिवस करून आसावें. आपण स्थळ संरक्षणास्तव मेहनत बहुत करितात म्हणून राजश्री आपाजी गणेश यांणी लिहिलें आणि आम्हासहि भर्वसाच आहे. फौजेची रवानगी लौकरच होईल. भेटीहि आविलंबेंच घडोन मनोपूरित श्री सिधीस नेईल. राजश्री गोविंदराव यांजकडील संधान आसोन मायेंत घ्यावे म्हणून हाच मार रो आपाजीपंत आपा यांचे पत्री पाहून सर्व कलोंन आमीनखानाचेहि आंत्र आले. त्यासहि उतर लिहिलें आहे म्हणून लिहिले. यैश्यास श्रीमंतापासून इंग्रज सुटले त्या काली मसलत पस्तंच+ पडली. सरदारांस मायेत घ्यावयाची आपली गौर्यता[1] विशेषें त्या योगे श्रीमंतासीं विटले. स्थळाचे संरक्षणामुळें मेहनतीची तारीफ रो आपानीं लिहिली. त्यास या प्रसंगात स्थळ रक्षण होये. आपला प्रभु सिकंदरताले, आपणा यैसे राजकारणीं, तेथे आमचे मेहनतीचे विशेष नाहीं. आपा पुण्यसील पुरूष आपले पदरीं, पहिले पेंचांत. हालीच्या फितुरामुळें आधिकच त्यांची ब्रम्हस्वापासून मुक्तता आणि आमचे मेहनतीचे पूरीतरूप करणें भर्वसा आपला. त्यापक्षी विस्तारें लिहिणें न लगे. भेटीची आपेक्षा श्री घडवील तो सुदिन. रो आपाचे पत्रीं व आम्हास चिरंजीव रो गोविंदराव गायेकवाड सेना-खासखेल समसेरबाहादुर यांसी मायेत घ्यावयाचे येथून लिहिलें. त्याचे उतर विस्तारे सुचविले. त्यांत सरकार नक्ष त्याप्रों गुदस्तां राजश्री खंडो आवजी यांचे

\+ नि:शेष; मसलतीचा जोर नाहींसा झाला. १. गोडबोलेपणा.

6192

विद्यमानें करार ठैरला आहे. तो चिरंजिवानी या लक्षीं वर्तावें म्हणजे सनदा आणऊन विभागाचे ठाण्यांची व स्थळांची दखल देवणें म्हणून वेदशास्त्रसंपन्न राजश्री गंगाधर दीक्षितबावा व राजश्री आपा व आम्ही व च्यार जमातदार दरमियान देऊन यादी ठैराऊन कारकुनास पाठऊन या लक्षीं वर्तावें. गुंता नाहीं. त्यांची यादी करार करून छ २३ सफरी खेड्याहून चिरंजिवानी सरंजामसह कूच करून शहरानजीक श्रीनागनाथासमीप मुा जाला. परस्परें यादीच्या आन्वयें श्रीभूषण दीक्षतबावाजवल देवऊन देविले. दिल्हे. उपरांतिक दोनच्यार रोज कुयोग जाऊन छ २८ सफरीं रात्रीस विचार केला कीं, प्रात:काली पुन्यावरी व मसिदींत मोर्चा होता त्याजवरी हला करावी यैसे ठरून सूर्योदये शहरचा सरंजाम बाहेर निघून चिरंजिवाकडीलहि स्वारी तयार करून चल द्यावा हे बातमी पठाणास कळून मोर्चे शेष रात्रीस उठऊन सरसपुन्यांत येकवटले. इकडून तोफा जारी जाल्या. त्याजकडूनहि यंत्रें चालु जाली. स्वार पदाती मुकाबल्यानें अले तें स्वल्पच. जातीनसी पठाण सरसाई करून आले, तों इकडील सरंजामाने त्याहून आधिकाई करून येवनाचे स्वारचा घोडा ठार केला व मारनिलेचा बंधु व नसरतखान जखमीं, नसरतखानाचा जावाई व आणीक पठाण कामास आले. दांत खटे होऊन वकील पाठविला कीं, आम्ही जातो; परंतु गुजराथची सिबंदी मजल आबरूनें जाऊं देत याची पैरवी कांही खर्चास द्या. इकडून तरी उतर आनकूल पडत नाहीं. आपले मोर्चे त्याचे मोर्चे होते ते जागा कायम करून रदबदल आहे. परंतु इकडील बोलणें हेंच कीं देसीहून फौज येऊन तुमचे पारपत्यच करावें यैसी सरकार मर्जी. फौजेची मार्गप्रतीक्षा आहेच तों श्रीमंत प्रभु दैववान त्यायोगे चिरंजिवाचे आगमन जाले. त्यापक्षी तुमचा मुलाहिजा होणे नाहीं. यैसेहिकरितां आबरूची दरकार तरी सुखेनैव उठोन जावें यैसे बोलणे होत आहे. सारांश इत:पर श्रीकृपेकडून पठाणास उठऊन द्यावयाचे आवघड नाहीं. शिरोभाग चिरंजिवाकडून लक्षाची वर्तणूक प्रत्ययास आली. आपले सल्याप्रों रो दीक्षितबावा व आपा व आम्ही व जमातदार दरमियान होऊन वचनीं गुतलों तें पार पडायास्तव दीक्षितबावाहि व राजश्री आपानीं विस्तारें लेहून यादीहि कराराच्या पा आहेत. त्याचे उतर सनदासहित दखल होये यैसे उतर आति सत्वर अलें पाहिजे. या करारास दरमियान दिल्हे आहेत. त्यांसी सचोटी जतन होऊन राज्यास सरदारांचा उपयोग तेंच आपण करितात म्हणून सविस्तरें लिहिल्याआन्वेयें चिरंजिवाचे माराची उतरें लौकर लौकर पाठवावीं. पठाण येथून निराष जाले. परंतु आपण उतर पाठविले आसेल त्या आधारें आपल्या-जवल यावयास करील तरी न कले. आपल्याकडील सविस्तर लेहून चितास

6193

अनंदवीत आसावें. पठाणाचे पारपत्य जालियानंतर मुलुकगिरीस लौकरच निघणें होईल. रा छ २ रावल बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Khanderao Gaikwad to Haripant Tatya expresses his delight at the news that Raghoba lost the support of the English according to the treaty of Purandhar. An expedition to recapture the city of Ahmedabad has been planned in which Govindrao Gaikwad, recently won over to the Peshwa's cause, heartily co-operate:*

No. 298] *1-5-1776*

पौ छ १६ रोवल
सीत वैशाख

श्री

सेवेसी विज्ञापना, ता छ १२ रावल वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री गोविंदराव गायेकवाड अमदाबादेस दाखल जाले. त्यांजकडून पत्र आले तें व त्याजकडील नारोपंतास पत्र आले होते त्याची नकल करून पाठविली आहे. त्यावरून सविस्तर ध्यानास येईल. गोविंदराव अमदाबादेस गेल्यामुळें मोर्चे उठले. शहर मोकले जाले. परंतु फतेसिंगास वाईट वाटले. त्यास समाधान करून लिहिले आहे. गोविंदरायाचे पत्रात भात्र खेडे वगैरे फतेसिंगा * * * * * * येविसीं गोविंदरायास लिहिले आहे की ठाणी द्यावयाची उतावली न करणे. खंडोपंत येथे येतील त्यासी बोलोन तुम्हास लिहून पाठऊ याप्रो करावे. कसे होईल पाहावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. खंडोपंत देसी आहेत त्यास स्वामींनी बोलाऊन आणून त्याची खातरजमा करून तूर्त फतेसिंगाचे ठाणियासी कजिया करू नये याप्रों उपदेश करून लस्करांत लौकर पाठऊन द्यावें. नारोपंत गोविंदरायाचे येथे आले. त्याजवल आम्ही * * * * * * गुदस्ता करार केल्याप्रो चाल * * * * * त्याजकडे होतेच. नारोपंताचा कागद आतांच शहरास गेले. खंडोपतासी बोलावे कीं दादासाहेबाचा बंदोबस्त जाला म्हणजे तुमचा बंदोबस्त करून देऊ. असे बोलोन खातरजमा करून पाठऊन द्यावे हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke informs Nana Fadnis of Ahmedabad having been relieved by Govindrao Gaikwad.*

No. 299] [30-5-1776

पौ छ २१ राखर सन
सबा सबैन

श्री

विनंती उपरी. गणेशपंतानी अमदाबादेस जरूर जावे. (महीपार) मठी फार (?) आहेत. गुंता नाही. सुरत आठाविसीत काही फौज जावी. परंतु या दिवसात आठाविसीत फौज मोठी लावणीचे दिवस काहीच प्रयोजन नाही. श्रावणमासीपासून तजवीज करावी म्हणजे पोटासहि बरे, शहहि बसेल. सांप्रत उपयोग नाही. अमदाबादेस पोहचल्यावरी फतेसिगच यैकेल. आंताजी नागेश आले आहेत. जाबसाल जाला तर होईल. गणेशपंत आपाजीपंत व गोविंदराव खंडेराव येक जाल्यावरी आमदाबादेचे काहीच होणार नाही. चिंता नाहीं. याप्रो ल्याहावे. रवाना छ १० रबिलाखर हे विनंती.

¶[*Sakharam Bapu discusses the proposal of concentrating forces on Ahmedabad.*

No. 300] [2-6-1776

श्री

राजश्री[1] मालसिकारे मंडली
गोसावी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री रघुनाथ बाजीराव प्रधान आसीर्वाद सुा सीत सबैन मया व आलफ. तुम्ही पुरातन सरकारचे सेवक. बहुत दिवस निष्ठेने सेवा करीत आला. कालवशात आडंचणीस्तव फितुर्‍याकडे राहिला. आसो. जाले ते जाले. याउपरी तिकडे राहाणे उचित नाही तरी कोणेविसी वसवास न धरिता खातरजमेने निघोन येणे. सर्व प्रकारे तुम्हावरी कृपा करून चालविले जाईल. जाणिजे छ १४ राखर बहुत काय लिहिणे.

¶[*Raghunathrao, in order to rally them round himself, gives assurances to many people about amnesty and good treatment even though they had for some time past joined the Barbhais.*

+ सबंद पत्र सखाराम बापूच्या हातचें.

१ यात्र मजकुराची व याच मितीची. १ मानाजी कदम १ विरापा खताल वगैरे यांना पत्रें आहेत.

No. 301] **[29-6-1776**

पैवस्ती छ २३ जमादिलावल
सुा सबा सबैन
जेष्ठ+ मास.

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक बाजी गंगाधर मो बेलापूर चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १२ माहे जमादिलावलपर्यंत स्वामीचे कृपाद्रष्टी करून सेवकाचे व प्रांत मजकूरचें वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाहालें तेथें आज्ञा कीं, तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडील कागद पत्र मुंबईहून इकडे येतात व इकडून मुंबईस जातात व शागीर्द वगैरे येतात जातात, म्हणोन हुजूर विदित जाले. यैशास येविसीची बातमी राखोन कागद-पत्र सांपडतील ते धरून हुजूर पाठवावे ते गोष्ट तुम्हांपासून न जाहाली; तरी या उपरी लिहिल्या अन्वये बारकाईनें बातमी येविसीची राखोन नाजूक कागदपत्र सांपडेल तो हुजूर पाठवीत जाणें; व शागीर्द वगैरे कोणी जाईल येईल त्यास जामीन घेऊन जाऊं न देणे, म्हणोन आज्ञा. ऐशास प्रांत मजकूरचे नाके याजवर चौक्या नेहेमी ठेऊन बंदोबस्त आज्ञेप्रमाणें केला आहे. यथेंही कारकून येविंसीचे चौकसीवर नेहेमीच ठेविला असे. नाजूक कागदपत्र सांपडेल तो हुजूर पाठऊन देऊं. साष्टीस मार्ग काल्हेरचे तरीने चालत आहे, व उरणचाहि मार्ग परभारा चालतो. मेस्त्र मोष्टनि पुणेयासी गेलियापासोन त्याचे कागदपत्र बहुतेक उरणचे मार्गें जात असतात. तिकडून कदाचित श्रीमंत दादासाहेबांकडे कोणाचे कागदपत्र व शागीर्द वगैरे जात येत असती तरी नकले; वरचिल तालुके मजकूरचे चौक्या नाकेयाचा बंदोबस्त सेवकानीं उत्तम प्रकारें केला आहे. सेवेसीं श्रृत होय हे विज्ञप्ति.

¶*Baji Gangadhar strongly refutes the charge of negligence in keeping a close watch on secret correspondence of Raghoba passing through his post Belapur. He suggests Kalher and Uran offer a more easy passage to Dada's communications.*

+ पैवस्तींत जौवल जेष्ठ लिहिले आहे परंतु आषाढ पाहिजे.

No. 302] *[8-7-1776*

पौ छ २६ जावल आषाढ
मास

श्री

सेवेसी माहादाजी रामचंद्र कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ २१ जमादिलोवल मुकाम कल्याण स्वामीचे कृपादृष्टीकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान आजच राजश्री सरसुभेदार यांस तल्याहून राजश्री गोविंदराव माणकर यांचें पत्र छ १४ जमादिलोवलचें आले. त्याणी वर्तमान लिहिले आहे तेंच पत्रे बजिनस तीन सरसुभाहून सेवेसी रवाना केले आहे, त्यावरून ते प्रांतीचे वर्तमान विदित होईल. सरसुभाकडील जमाव रतनगड व कोथला येथे मोर्च्यास आहे. त्यास ते लोक अद्याप मोकले जाहाले नाहीं. गोपालपंत केतकर यांचे लिहिल्यावरून सरसुभाकडील कारकून मोर्चे उठवावयास पत्रें घेऊन गेले आहेत, की किले गोपालपंताचे हवाली जाहालियावर मोर्चे उठऊन येणे. त्यास आद्याप तिकडील बंदोबस्त होऊन लोक आले नाहीत. तेथील गुंता कधीं उरकेल पाहावें. आणखी बातमीचे वर्तमान आल्यावर सेवेसी लिहीन. सेवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ramchandra writes news about the force of the Sarsubha which was engaged in reducing the forts of Ratangad and Kothla.*

No. 303] *[22-7-1775*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री मल्हार जगजीवन गोसावी
यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा सीत सबैन मया व अलफ, तुम्ही विनती पत्र छ १२ जावलचे पाठविले ते छ १८ मिनहूस पावले. पिंपलनेरचे सुमारे जाऊन राहातो. राजश्री हरि बलाल याजकडे पत्रे पाठविली आहेत. बातमी आल्यावर लिहून पाठवितो म्हणौन लिहिले ते कलले. त्यास मारनिले याची पत्रे छ १० जावलची नर्मदा दक्षणतीरची आली. इतक्या रोजात आलीकडे आले असतील. तुम्हास बातमी लागलीच असेल. खजिना व बुनगे

6197

बंदोबस्ताने मारनिलेकडे रवाना करून तुम्ही व रा नारोआनदराव व राजश्री गंगाधरराव भिकाजी नवापुरास दंगा सोनगडवाल्यानें केला आहे त्याचे पारिपत्य करून तिकडील बंदोबस्त करणे. जाणिजे छ २३ जावल.

¶*The Peshwa asks Malhar Jagjivan to proceed along with Naro Anandrao to Navapur against the commandant of Songad.*

No. 304] [*August 1776 ?*

श्री

विनंती उपरी. तुम्ही गेल्यावर इकडे चहूकडून वरचेवर बातम्या आल्या की इंग्रेजाची गलबते साहा दीढ हजार माणूस जलालपुरास आज उदईक येणार, त्याजवरून आम्ही सारे रात निजलो नाहीत. चवकी पाहारे काठ्याची बंदोबस्ती करीतच राहिलो. याप्रो रात्रौ जाहाले. आज पाहावें कसे प्रसंग पडतो. वाऱ्यावर आमची गलबते आज आम्ही बातमीनिमित्य पाठविली आसेत. वर्तमान आल्यावर लिहू. सावधच आहोत. राजश्री महिपतरावजीस दोन दिवस लस्करात जाऊ न द्यावे. जवलच राखावे. बरे चिन्ह दिसत नाही. दुष्ट स्वप्न आहे. श्रीमंत कोणीकडे गेलेत ते समजत नाही. त्याजकडील वर्तमान पुर्ते कलल्यावर निरोप द्यावा. त्याची मसलत पार पडल्यास आपल्यास आवघड आहे. यास्तव तथ्य समजल्यावर जाऊ द्यावे. शहरातून बातमी आणून आम्हास लिहित जावे. रा भाऊ तूर्त येत नाहीत. आमची तुलसीची माल तुमच्या गवाल्यात आली आसली तर पाठऊन द्यावी. तुम्ही व रावजी तूर्त लस्करात न जावे. येक दोन रोज तेथेंच असावे. श्रीमंताची बातमी पकी कलल्यावर समयानरूप जें करणें ते करावे. आम्हास खाडीच्या वाटेचा मोठा घोर आहे. पाण्यातील बातमीहि लवकर कलत नाही. अस्तु; होतां होईल तें पाहातच आहों. तुम्ही उपराल्यास आसावें. बहुत काय लिा कृपा करीत जावी हे विनंती.

रा महिपतरावजी स्वामीचे सा सां नमस्कार लिा परिसोन कृपा करीत जावी. दोन दिवस सत्रागावींच आसावें हे विनंती.

¶*The news of Raghunathrao's flight to some unknown destination is communicated in this letter.*

श्री

नवाब हैदरआलीखान बहादूर यास पत्र जे. आपण खते चार पाठविली ती पोहचली; ऐसेच हरवख्त आपले खैरखुषीचे वर्तमान कलमी करून दिलशादगी करीत जावे. दिगर आपण मुलुकाचे सनदेचा व ऐवजाचे पावतीचा मजकूर व मसलतीस करोडो रुपये खर्च लागतात ते लिहिला तो कलला; व बाजीराव गोविंद याचे खतावरून व त्याजकडील कारकून आला आहे त्याचे जबानीवरून मुफसले[१] जाहीर जाले. त्यास मागाहून तहनामा करार करून पाठऊन देत असो. लौकरच येऊन पोहचेल. इकडील वर्तमान तरी आम्ही सुरतेहून मोहिमेस बाहेर निघालो. हमराह इंग्रजी पोख्त सरंजामा आहे. त्यास या वेलेस आपण आपली फौज व तोफखाना वगैरे भारी सरंजाम पाठवून बारभाईस मिरजपर्यंत शह द्यावा व आपले मनसब्यास आल्यास आपण मागाहून फौजेच्या पाठीमागे चाल देऊन आल्यास उत्तम आहे.

¶*Raghoba informs Haidar of his march from Surat accompanied by the English against the Barbhais and asks him also to march as far as Miraj with his army and attack them.*

No. 306] *1-9-1776*

पो छ ४ साबान.

श्री

राजश्री गोविंदराव मोरे मुतालिक
हवालदार व कारनकू किले सिंहीगड
गो यासी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रो माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद व नमस्कार सुा सबा सबैन मया व अलफ. रा मल्हारराव भगवंत याचे बाईकोविसी व बाबूराव हरि व सखाराम हरि याचे मातुश्रीस हजीर जामिनकीचे राजश्री विठल येसवंतराव खासनिसी याचे कागद लेहून किले मजकुरी घेतले आहेत, त्यास उभयतांचे मुलामाणसाची व वस्तभावेची मोकलीक जाहली. सा मारनिलेचे जामीनकतबे तुम्हाजवल किले मजकुरी असतील ते याचे यास माघारें देणे, जाणिजे छ १७ रजब आज्ञा प्रमाण.

¶*The Peshwa releases the wife of Malharrao Bhagvant and the mother of Baburao and Sakharam Hari.*

---

१ तपशीलवार, सविस्तर.

No. 307] [17-9-1776

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य हरि बलाल सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। छ ३ साबान जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष. तुम्ही छ २७ रजबचे पत्र नवापूरचे मुकामीहून पाठविलें ते छ २ साबानी पावलें. श्रीमंत राजश्री दादासाहेब याजवळ इंग्रज आहे, त्यास मुंबईहून पत्रे आली की तुम्ही उठोन येणे. हे वर्तमान श्रीमंतास कलल्यावर लक्ष्मणपंत नातू व इंग्रजाकडील येक मातबर माणूस याप्रमाणे मुमईस रवाना केले. छ २१ रजबी सुरतेस आले. येथून मुमईस जाणार. इंग्रेज सामील जाल्यास बल धरितील. न जाल्यास धारेकडे जातील. अमदाबादेची खंडणी सात लक्ष रुपये जाली. सिवाय दरबार खर्च वसूल तीन लक्ष दिल्हा. बाकी ऐवज राहिला त्यास इंग्रजाचे वर्तमान ऐकोन टाळाटाळ करितात. गोविंदराव गायकवाड यास सुरत प्रांती सरकार हिशाचे माहाल आहेत ते श्रीमंतानी दिल्हे. ठाणी बसत आहेत. वसूल चालीस लागला. इंग्रजानी श्रीमंतास सोडिले तरी धारेस जाऊन उभयता सरदारास अनकूल करून घ्यावे या प्रमाणे लक्ष आहे. त्रयोदशीच्या पक्षाकरितां रेवातीरास आले. सुरत प्रांती कांही फौज रवाना करणार. आपण दसरापावेतो कूच करीत नाहीं असें दिसतें. येथील खर्चाची मोठी वोढ आहे याजकरितां आस्विन सु॥ प्रतिपदेस कूच करून आपणाकडे येतो म्हणोन कितेक तपसिलें लिहिलें ते सविस्तर कललें. ऐसियास इंग्रजाचा मजकूर तरी पुरंदराहून मुमईवाल्याचे सलुकाचे बोलणे होऊन ठरावात आले, त्याजवरून श्रीमंताजवळ इंग्रेज आहेत त्याणी उठोन मुमईस जावें याप्रमाणें पत्रें गेलीच असतील. त्यास येकायेकीं उठोन कसे जावें याजकरितां श्रीमंतानी लक्ष्मणपंत नातू व इंग्रजाकडील मातबर माणूस पाठविला असेल. च्यार दिवस मसलतीवर घालतील. परंतु इंग्रजाचे बोलणे पके जाले असल्यास श्रीमंताजवळ इंग्रज राहणार नाहींत. इंग्रज गेले म्हणजे त्या प्रांती राहणार नाही. धारेकडे जातील अगर जिकडे त्यास सोय पडेल तिकडे जातील. या उपरी अमदाबादेकडेहि जाण्यास पेच पडेल. आपाजी॥ गणेश यांणी खंडणी केली. कांही वसूल दिल्हा. बाकी ऐवज राहिला तो इंग्रजाकडील मजकूर ऐकिल्यावर टालाटाल करितात म्हणोन लि॥. त्यास खंडणी केली हेच खरें वर्तमान वाटत नाहीं. पूर्वी त्यास सूचना येथून इंग्रजाच्या राजकारणाची जालीच होती. तत्राप न जाणो पकी बातमी येईल ते खरे. गोविंदराव यास सुरत प्रांतीचे

सरकार हिशाचे माहाल श्रीमंतांनी दिल्हे. वसूल चालीस लागला आहे. असा. सुने रान पडल्यावर स्वापदाची प्रबलता होते. आम्ही फौजसुधां त्या प्रांती आल्यावर सहजातच गोविंदराव याजकडील अमल उठेल. चिंता नाही. फौजेस खर्चास नाहीं याजकरितां आम्ही आपणाकडे येतो म्हणोन लिा. त्यास आम्हीच तिकडे येत असतां तुम्ही इकडे माघारे यावे हे उत्तम नव्हे. येथें आल्याने रोजमरा मिलेल, तेथे असल्यानें न मिलेल असा अर्थ नाहीं. येथेहि खर्चाची वोढ आहे. ऐवजाची तरतूद केली आहे. आला म्हणजे तुम्हासहि पाठऊं. तुम्ही तिकडून न येणे. नाना तुम्ही इतके लिहीत असतां मी न यावें की काय, परंतु लाइलाजीस उपाय नाहीं. आपण तिकडून आल्यानें अगदी आब जाईल. यास्तव न यावें. दसरियास मुहुर्तेकरून कूच करून दरमजल आपणाजवळ येऊन पोहचतो. कापड पैठण जालनापूचे आणविले आहे. दसरियास येईल. कांही पाठवितो. (अपुरें).

¶*Hari Ballal explains the queries put forward by Naropant Keskar saying that the sudden change in the attitude of the English towards Raghunathrao is due to negotiations having been opened with the Peshwa by the English, that he (the writer) is not sure whether the revenue from Ahmedabad was realized by Raghunathrao and lastly that though the Peshwa's province round about Surat has been made over to Govindrao Gaikwad, there would be no difficulty in recovering it from him.*

No. 308] *[3-1-1767*

छ ३ साबान सबा

श्री

राजश्रिया विराजित राजमान्ये
राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पो अको सखाराम कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा पौष शुध ३ पर्यंत जाणौन स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाा विशष. किले वंदनगड येथील बेगमीस लाकडे जालाऊ वोंडे पाहिजेत त्यास असपास वोंडा कोठे मिलत नाही: यास्तव पत्र लिाा असे. तरी मेढे खोरियांत कमावीशदारास पत्र द्यावे म्हणिजे तेथून मजुरीने तोडून आणऊ. जरूर पत्र देवावे (बहुत) काये लिहिणे लोभ असो दीजे हे विन(ती)

¶*Ako Sakharam, son of Sakharam Bapu, requests Nana to issue instructions to Kamavisdars of Medhe to supply fuel to Vandangad.*

6201

No. 309] [3-10-1776

पौ छ २९ साबान

सबा भाद्रपद मास

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे

सेवेसी

पो माधवराव नारायण साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १९ साबानपावेतो वर्तमान येथास्थित आसे. यानंतर राजश्री पतंगशाहा राजे सवस्थान जवार याचे पत्र तीाा राजश्री धोंडोपंत दादा यास आले कीं, श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचे ठाणे छ १३ साबानी तळाश्रीस आले. आम्हास पत्र आले की, जवारीस ठाणे येते. आल्यास आम्ही पुढे उपाये काय करावा? पेशजी आपणास लिहिले की, पांचसे लोक दारूगोळीसुधा पाठवावे, बंदोबस्त राखून ठासून राहू. त्यास लोक न आले. सांप्रत निकट येऊन लागली आहे. याचा विचार काये करावा, ते लिहावे. श्रीमंताचे ठाणे डाहाणूस आले म्हणून पत्र आले, त्याची नकल पाठविली आहे, त्यावरून कळेल. धोंडोपंती लिहिले आहे की, श्रीमंताचे ठाणे जवारीस आले तरी त्रिंबकापासून बारा पंधरा कोसावर शह आला. यास्तव जवारीस पांचसे लोक ठेऊन बंदोबस्त केला पाहिजे. नवे लोक ठेऊन पाठवावे तर त्यास यैवज पाहिजे. इकडे कर्ज घेईन म्हटल्यास लोक जिकडील तिकडे सावध जाले आहेत. कर्ज कोण्ही देत नाही. जवार जागा चांगली आहे. तेथे ठाणे येऊन बसल्यास पुन्हा लौकर हस्तगत होईल यैसे नाही. जवारीपासून बारा कोसावर श्रीमंताचे ठाणे येऊन बसले. श्रीमंत आर्जुनगडासच आहेत. परंतु रामनगरकर कोळी वगैरे त्यास जाऊन भेटले यामुळे ठाणी बसवितात. येविसीचे वर्तमान हुजूर लेहून पाठवावे. ठाण्याचे बंदोबस्तीविसी सरकारची आज्ञा काये होते ते लिहून पाठवावे. सरकारची फौज शाहावर होती ते हाली कोठे आहे न कळे. ते तोंडावर आसती तर इतका पेच न पडता म्हणौन पत्र आले. त्यास जवारीच्या ठाण्याचा बंदोबस्त जाला पाहिजे. याजकरितां सरकारातून यैवजाची तरतूद होऊन धोंडोपंतास आज्ञा जाल्यास पांचसे लोक ठेऊन जवारीस पाठऊन बंदोबस्त करवितील. येविसी जसे उतर येईल त्याप्रमाणे त्यांस लिहून पाठऊ. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनती.

¶*Madhavrao Narayan to Naropant Keskar writes, measures are being contemplated to strengthen Jawhar to remove the possibility of its falling into the hands of Raghoba, now moving in that direction.*

6202

No. 310] [8-10-1776

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री भिवराव येशवंत
गोसावी यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा सबैन मया व अलफ. तुम्ही विनंती पत्र छ २१ शाबानचे पाठविले ते छ २२ मिनहूस पावले.

सिंदे याची फौज चिंचोलीवर आहे व होलकराची फौज तळेगावावर आहे. ते जऱ्ही आले तऱ्ही रास्ते वगैरे पथके आल्याविना खाली जात नाही. परकाले आले, मुसा नारज उद्या येईल म्हणून लिहिले ते कळले. रास्ते यास निकडीचे पत्र पाठविले असे तेहि लौकरच तुम्हाकडे जातील. वरकडासहि ताकीद होत असे. येतील ते वरचेवरी लिहीत जाणे.

कुरोड्या घाटावर सुबराव बुरूड-कर दोन तीन हजार लोकानसी आला. हे वर्तमान कळताच आम्ही तयार होऊन गेलो. बाण व गोळे टाकिले. त्यास खाली जावयास गडबड जाली. उतरून गेले म्हणून लिहिले ते कळले.

इंग्रेजाचा बतेला सुरतेस जात होता त्यास गावी होऊन रेवदंड्यास सापडला. रेवदंडा हुशार आहे. आनंदराव सिंदे याचे पत्र राजश्री विसाजी केशव यास आल्याचा मजकूर लिहिला तो कळला. सिंदे यास हुशारीविसी विसाजी केशव याणी लिहिलेच असेल. इंग्रेजाचा बतेला धरिला आहे त्याविसी रदबदल पडेलच.

बोरघाटावर पांच सातसे माणूस आले होते. त्याजवर दोन पथकें पाठविली तेव्हा तेहि खाली गेले. म्हणून लिहिले ते कळले.

सारांश तुम्हाजवळ भरणा भारी होऊन खाली उतरल्यावर त्याच्यानें फौजेपुढे दम धरवेल असे नाही. रात्रीस बहुत सावधपणें राहून वर्तमान तिकडील वरचेवर लिहीत जाणे. ऐवजाचा मजकूर लिहिला तो कळला. ऐवजाची तरतूद होत आहे. जाणिजे छ २४ शाबान बहुत काय लिहिणे.

¶The Peshwa writes to Bhivrao Yeshwant that orders have been issued to Sindia, Holkar and Rastia to join him. Bhivrao Yeshwant was despatched against the Pretender.

6203

No. 311] [*17-10-1776*

पो छ ४ रमजान आश्विनमास.

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री भिवराव येशवंत गो। यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार. सुा सबा सबैन मया व अलफ. तुम्ही विनंतीपत्र छ ३० साबानचें पाठविलें ते प्रविष्ट जाले. छ २९ तारखेस बोरघाटाखाली जाऊन, तोतयाचे लोकासी लडाई जाली; व दोन प्रहरा फिरून घाटमाथा आल्यावर त्याचे दुसरें दोन आडीच हजार माणूस आले त्यासीहि लडाई केली. संभाळून मुकामास आलों. सरकारचे लोक फार जाया जाले नाही. तिकडील नासाडी बरीच जाली म्हणून विस्तारें लिा तें विदित जाले. ऐशास वाटास आडचण होती ते मोकली करून, खाली जाऊन, गाठून झुंजला व संभाळून घाटमाथा आल्यावरीहि दुसरी लडाई मारिली. उतम केले. घाटाखाली व घाटमाथा जागजागा त्याचे लोकानी फैलाव मांडिला आहे. रातबिरात येऊन हुलड करावयास चुकणार नाहीत. याजकरिता चहूकडील त्याचे लोकाची बातमी रोजच्या रोज पकी राखून, आपले जागा बहुत खबरदारीने असणे. फौजेविसी लिहिले, त्याजवरून सिंदे याजकडील आणखी येक हजार फौज तुम्हाकडे रवाना केली आहे. लौकरीच येऊन पोहचल. यासिवाय दुसरी फौज पाठवावयाची तर्तूद होत आहे. वरिचेवरी रवानगी होऊन तुम्हाकडे येत जाईल. जाणिजे छ ३ रमजान. बहुत काय लिहीणे.

¶*The Peshwa Madhavrao Narayan compliments Bhivrao Yeshwant for having inflicted two successive defeats upon the Pretender and asks him to be on his guard against the marauding activities of the Pretender and his forces. The Peshwa promises him prompt succour.*

No. 312] [*17-10-1776*

पो छ ४ रमजान आस्विन मास

श्री

राजश्री भिवराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी : पत्र पाठविले ते प्रविष्ट जाले. छ २९ साबानी घाटाखाली व घाटमाथा तोतयाचे लोकासी लढाई जाहाल्याचा मार वगैरे वर्तमान लिा ते

सविस्तर कळले. लडाया मारून संभाळून मुकामास आला. साहिला, उतम केले. त्याचे लोकानी फैलाव केला आहे, याज्करिता त्याची बातमी चांगली राखून रातबिरात फार सावध असावें. सविस्तर सरकारचे पत्रावरून कळेल. रा[1] छ ३ रमजान हे विनंती.

¶*Nana Fadnis congratulates Bhivrao Panshe on the success attained by him over the Pretender of Sadashivrao Bhau.*

No. 313] [*25-10-1776*

पौ छ २७ रमजान सन
समान सबैन अस्विन

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक बालाजी गणेश तालुके देवदुर्ग कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ताा छ ११ माहे रमजानपावेतो यथास्थित असे विशेष. गलिमाचे लढाईचे वगैरे पेसजी विनंतीपत्री सविस्तर वृत लिहिले आहे, निवेदन जाहालेच आहे. हाली काल छ ९ रमजानी गलीम सात आठशे खाली श्रीलिंगाचे देवलात मोजे हिंगवले ताा सालसी येथे येऊन राहिला. त्याचे पारिपत्याकरिता लोकसुधा आजच छ मजकुरी निघोन दोन कोश गेलो. इतक्यात किले भगवंतगडाहून बातमी आली की, राम परभू निा सिंधेदुर्ग जमावसुधा सर्ज्या-कोटास आला आहे. अरमार दोन च्यार गलबते व माहागिऱ्या तयार आहेत. भगवंतगडचे लक्ष त्याचे बोलण्यात दिसते. बहीरवगडचा सूड घ्यावा. यात बाल सावंत भोसला देखील आहे. जलमार्गे सरज्याकोटाहून येक कोस भगवंतगड. भरतीचे समई बुर्जासी माहागिऱ्या आणून आडवाव्या यैसा मनसबा आहे. पाहाता हाहि मजकूर खराच. दुरोखे शह द्यावा. गलिमाचा रेट भारी. घाटावरून व दऱ्यातून येकवेळ लगट करावा यैसे सर्व अमित्राचे मानस आहे. इतक्याचे कारण भगवंतगड जागा केवल नाजूक आणि मालवणकरास लगता, याकरिता गडबड करितात. भान सावंताचे स्वारीचा मजकूर मोघम पेसजी लिहिलाच आहे. हाली मनास आणितां राजश्री गंगाधरपंत सुभेदार याची आज्ञा नसतां दोनी स्वाऱ्या भान सावंत याणी मध्येच केल्या यैसे

---

१ अक्षर येथून नाना फडणिसाचें.

देखण्यातहि येत्ये व राजश्री सुभेदारानी याच अन्वये लिहिलेहि आहे. मुख्य गोष्ट या स्वारीमुळें गनीम सेर जाहाला. सालसी प्रांतावर कैप्रत घालून बदनक्षा करून आपण जिवानिसी गेला. हाली गनिमाकडील लोक हावभरी होऊन गोविंदराव निा तोतया व माहादाजी राम व येसनाक म्हार वगैरा सरदार तोतयाकडील हजार माणूसपावेतो जमा होऊन घाटमाथा कसबा पाटगाव व ठाणे पाले येथे बसले आहेत. मालवणात त्याणी पका सरजाम करून पाचसे माणूस सिवाकडून नवे आले. अरमारकरी लोक हजार माणूसपावेतो व गलबते पराजू करून सिधतेत आहेत. भगवंतगड, देवगड दऱ्याकिनाराचे जागे येथे येऊन लागावे. बहीरवगडचा सूढ घ्यावा या आन्वये दुरोख शह दिला आहे. मुंबईकडील बीर[२] त्यास यामुळे वलवल करितात. साहेबाचे पुण समर्थ आहे. मी त्याचा मार धरीत नाही. साहिबी बेगमी मात्र करावी हे विज्ञापना.

¶*Letter of Balaji Ganesh to Nana Fadnis reports risings in the Konkan in behalf of the Pretender.*

No. 314] [*1-11-1776*

नकल

श्री

राजश्री बाळाजीपंत नाना गोसावी यासी

६७ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो महादजी सिंदे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये लिहीत जावें विशेष. तोतिया बेलापुराहून पळोन तराव्यांत बसोन ममईस जात होता ते बातमी राजश्री राघोजी आंगरे यास कै[३] * * * * शंभर माणसानसी तराव्यांत[४] * * * जाऊन मोठे मेहनतीनें तोतिया काल संध्याकाळीं गुरुवारीं धरिला. त्याच वेळेस भावसिंग चोपदार व रामरतन परदेसी या दोघांबराबर आपले कमरेचे पेशकबजे[५] खुणेस देऊन पाठविले ते आज भृगुवारीं दीड प्रहर दिवसास आले. त्याच समई रा बाळाराव गोविंद व राणेखान आंगरे याजकडे तोतियास आणावयासीं फौजसुधां पाठविले आहेत. आपणास कळावे म्हणून लिहिले असे. रा छ १८ रमजान. परांजपे वगैरे मंडळी सांपडली म्हणोन सांगतात. तपसीलवार मागाहून लेहून पाठविले जाईल. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji Sindia communicates to Nana Fadnis details of the capture of the Pretender by Raghoji Angria.*

---

१ कप्रत—तेढ, तंटा. २ भर. ३ कळल्यावर. ४ बसोन.

५ कट्यार. × पत्र नानाफडणिसास.

6206

No. 315] [27-11-1776

पौ छ २९ सवाल सबा
सबैन कार्तिक

श्री

श्रीमंत राजश्री नाना
फडनीस साहेबांचे सेवेसी

विनंती सेवक आनंदराव धुलप मुा जंजिरे विजयदुर्ग दंडवत विनंती. येथील कुशल ता छ १९ माहे शौवालपर्यंत सेवकाचें वर्तमान यथास्थित आहे विशेष. छ २ शौवालचें आज्ञापत्र छ १३ मिनहूस सादर जाहालें. तेथे आज्ञा कीं अरमारची तयारी सत्वर करून अरमारसुधा वसईस राजश्री विसाजी केशव यांकडे जाऊन सरकार काम बुज्याऊन दाखवावें समय आहे. येविसीं राजश्री गंगाधर गोविंद यासी बोलावयाची आज्ञा केली आहे. बोलतील. अरमारची तयार करून निघोन जावें म्हणौन आज्ञा. यैसियासी पाहिल्यापासून श्रीमंताच्या चरणापासीं येकनिष्ठेन हा कालपर्यंत व पुढेहि येकसारिखेच आहे. तोतयाकडील सखाराम केशव तीन च्यार हजार माणसांनिसी देवदुर्ग तालुका बलकाऊन राहिला होता. त्याणें ब्राम्हणांस व रयतास बहुत उपद्रव दिल्हा. त्याचे पारपत्यास तीर्थस्वरूप राजश्री जानराव काका हजार माणसांनिसीं व राजश्री बालाजीपंत सुभेदार तो देवदुर्ग उभयता येथून निघोन गेले. त्यांची आण यांची रामगडास गांठ पडोन मातबर लढाई जाहाली. त्याकडील पंधरा आसामी ठार व चालीस पंनास जखमी होऊन सखाराम केशव व सूर्याजी भाव्या वगैरे सरदार धरून कैदेत ठेविले आहेत. त्याच हल्यास रामगडावर निशाणहि चडविलें. वरकडहि किल्हा कोटांचा बंदोबस्त करून लौकरच निघोन येतील. राजश्री गंगाधरपंत तात्या येथें आल्यावर सर्व यथास्थित बंदोबस्त तात्याहीं केला. अरमारची तयारी होऊन कुल सरंजाम सुधा सिध्ध आहे. आज्ञेप्रमाणें अरमारसुधा वसईस राजश्री विसाजीपंत सर सुभेदार याकडेस निघोन जातों. लोकास अडीसेरीस गला नाही व खर्चासहि द्यावयासी नाहीं. दर्यावर्दी याचा भरणा साल मजकुरी कमी व आहेत दर्यावर्दी यांसी आगाव पावलें नाहीं येविसींचे सविस्तर तात्यास समजाविलें आहे. बंदोबस्त करून देतील. तूर्त काही खर्चास व अडीसेरीस भाताची बेगमी करून दिल्यानंतर अरमारसुधा निघोन जातो. सेवेसी श्रुत होये +हे विज्ञापना.

¶*Anandrao Dhulap assures Nana Fadnis that he would, as desired by him, soon proceed to Bassein to assist Visaji Keshao. He further reports a skirmish between Janrao and a supporter of the Pretender at Ramgad where the latter sustained a defeat.*

+ हीं अक्षरें बाळबोध आहेत.

No. 316] *[1776*

श्री

सेवेसी विनंती. रामचंद्र नाइकाचे बायकोची आवस्ता फार कठिण आहे. याचा शोध परस्परे मनास आणावा, यैशास वाड्यात पाच माणसे चवकीस ठेविली म्हणजे पुरे. किलास रवाना करिता मार्गी निभावणार नाहीत यैसी अवस्ता जाली आहे. आठा पंधरा दिवसाचा प्रकार. आयुषमर्यादेकरून पुढे वाचल्यास कलेना. रात्रंदिवस मुले चढपढतात, काही जीव राहिला नाही. मेल्यात संख्या आहे. यास्तव विनंती लिहिली आहे. कृपा स्वामीचे ध्यानात आल्यास आहेत तैसीच ठेऊन. पाच माणसे चवकीस नेमून देविली पाहिजेत हे विनती.

¶*The letter mentions the serious condition of the wife of Ramchandra Naik, the principal supporter of the Pretender.*

No. 317] *[1776*

श्री २

पुा सेवेसी विज्ञापना. आवजी यांस बलाऊन आणून गुदस्ता त्याजवल करार करून यादी दिल्या आहेत. त्या पाहून फतेसिंगाची त्याची वाटणी करणे ती कसी करावी याचा ठराव करावा. नाही तर उभयतानी स्वामीकडे यावे, मग वाटणी करावी. कोणताहि येक प्रकार ठरावात आणावा. फतेसिंग पहिल्यापासून लक्षांत, गोविंदरावहि समयास येऊन अमदाबादचें काम केले. तेव्हा त्याचेहि * * * * खंडोपंताचा * * * येक गोष्ट ठरावात आणिली म्हणजे गोविंदरायांजवल गुंता पडणार नाही. अम्ही गोविंदरायास लिहिले आहे जे, तुमचा बंदोबस्त करून देणे अम्हाकडे. खंडोपंत आल्यावर लेहून पाठऊ. तूर्त तुम्हाजवल फौज आहे व आपाजीपंताकडील फौज घेऊन काठेवाड प्रांती जाऊन मातबर पैका मेलवावा. फौज फेडावी. असे प्रकार लिहिले आहेत. विदीत जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter refers to the division of Jahgeer between Fatesing and Govindrao Gaikwad.*

No. 318] *[1776?*

श्री

राजश्री जगंनाथ पंत स्वामीचे सेवेर्स

पोष्य बाबूराव बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी. आमच्या शरीरीं स्वस्त नाहीं. मंबईचें पाणी माहा वाईट. आमच्या समागमें गडी होंते त्यांतून येक

मलबारी मात्र उठतो; बाकी झाडून पडले. आम्हास वाकाच (वांखाच) आहे, यास्तव काय करावें, उपाय नाहीं. चिरंजीव बावास वरचेवर भेटावयास मात्र पाठवावें. भेटल्यानंतर दोनच दिवस राहून पुण्यास त्यास पाठऊं; येथें ठेवीत नाहीं. श्रीमंताची सलतनत राजश्री भिवराव यास भेटली. येथील ठराव होईपर्यंत आठ च्यार पंधरा दिवस पर्यंत आसपास मुंबईच्या ते राहतील. त्याजबरोबर तुम्ही असावें. वरचेवर त्यास सांगत जावें कीं बोलणें असतां जाऊं नये. त्यासहि समजत आहे. सरकारची आज्ञा याप्रमाणें येईलच; परंतु तुम्ही असल्यावर ठीक आहे. आठ च्यार दिवशीं येथील मजकूर कसकसा ठरण्यांत येतो त्याप्रमाणें तुम्हास लिहून पाठऊं. मग यावें. रावजीसहि सांगावें. श्रीमंतांकडील मंडलीची वस्तावाणी झाडून न सोडावी. बंदोबस्त करवावा, संभाळून असावें हें विनंती.

¶*Baburao Ballal complains about the unhealthy climate of Bombay. He advises Jagannathpant to protect vigilantly plunder recovered from Raghoba's camp as it has to be accounted for.*

No. 319] [*1776 ?*

श्री

सेवेसी राजश्री मोरोबादादा स्वामीचे सेवेसी

सेवक सटवाजी नाईक तुलसानाईकाचे फटनाईक साष्टांग दंडवत विनंती. विनवावया प्रार्थना ऐसा जे. माहाराजाच आसीर्वाद कडून सुखरूप आसो. सांप्रत रा। जगनाथपंत बरावर जासूद जोडी दिल्हे होता. आज्ञेप्रमाणे डाकचौकी बसवीत आल त्याप्रमाणे वत्रनुक करीत आलो. येथे कोलाहारास दाखल जाहल. दुसरे दिवशी महमद अलीखानचे भेट जाहलवर पुसल तुम्हासंग किती मानुस आहे? सांगितल दोनसहे मानुस आहे. यासी जे पाहिजे सरंजाम पाहिजे ते सर्वहि पाठऊन दिल्हे. ते सर्वहि ठेऊन घेतल. जासूद याणी पुसल, आम्हासी काही मिलल? बहुत राग भरल, रोजमरा खात आहे यामधे तुमच कडले देण काये म्हणून राग होऊ लागल. बर चिंता काये? आमचे प्रपति [प्राक्तनी] किती असेल ते मिलल. येताना गावागावी सर्वसी दानावेरण सर्व साहितसुधा घेत आला तेव्हां येक मानुसाचे सिदा न दिल्हे. येथील काही दिल्हे नाही. आम्ही बोलण सोडल. यावर महमद अलीखान पुसल साहेबच हुकुम डाकचौकी बसऊन बातमी लिहिणार पाठविले बहुत उतम जाहल. खुसाल आसा. पाच ५०० सहे रुपये खर्चास दिल्हेवर आम्हासी सांगितल, तुम्ही हैदरच लस्करास जाऊन आपल

देषाच फौज आहे. फितूर करून आणणे. आम्ही सांगितले आम्ही धणीचे मीठ खालल आस. आमच्याने हे काम घडणार नाही. त्याणे हे मुलकाचे येक ब्राह्मणास आणून दोन रुपये खर्चास देऊन पत्र लिहिलावर त्याचेहि पत्र आल. येथे पावेतो येऊन भेट घेत जाणे. येथून रातोरात दोन जोडी जासुदाचे घेऊन गेलावर हैदराणी वर्तमान ऐकूण येक भला ग्रहस्तास पाठवून बलाऊन लस्करामधे घेऊन गेल. ते वख्ती भेट जाहल. हकीकत पुसल. याणी सांगितल आम्ही श्रीमंत साहिबचे सोईरधारे आसो. चाकरलोक सारीख न देखण. आणखी किती येक येताती, चाकर मानुस होऊन येत आहे. आम्ही मांडीस मोडा देऊन बराबर बसणार. आमचे हुकमात सर्वेहि आहे. तुम्ही काही चिंता न करणे. श्रीमंत साहेबचे हुकुम आहे, येथील काये हकीकत आहे ते ध्यानास आणून लिहून पाठवणे. फौज पाठवीत आसो. हे काम नाजूक आहे म्हणून आम्हासी पाठविल. आम्हास तुम्ही देतील ते साहेबास दिल्यासारिख होईल ऐसा गोष्टी बोलिला. हैदर खरेच आहे मानून येक मोतीचे माल ९००० हजार रुपयेचे, दोन साल जोडी, येक पागोटा, येक रुमाल, नगद ९०० होन नगद दिल्हे. आणखी तुम्हास देऊ बहुत भरवसा दिल्हे. तेथून मिरसाहेब येक साल जोडी, येक पागोटा तेहि दिल्हे. हे घेऊन ठिकाणेस आला. मग हैदरास सांगितल कोलाहारामधे कोणी नाही. महमदअलीखान मुरारराव दोघ हे समई घेण म्हणून सांगितल. याचे ऐकून विष कोष पासोन धावणी करून गेला. तेथ बहुत साहेबच आण खात आस हे बावा ब्राह्मण गोसाई अस सिपाई मानुस येकदा कामात येणार. धाव चालवीत नाही. साहेबास विनंती करून खामखा आसामी करून पाठविणे. आपलासाठी येक बटीक पाटऊन देऊ.

¶*One Satvaji Naik deputed to Haidar to negotiate terms refers to the reception he was given by Haidar. The writing is incorrect in many places.*

No. 320] *[1776?*

श्री

विनंती. राजश्री बाबूराऊ हरि गोविंदराव गायेकवाड यांजबा आहेत. त्याजकडील राऊत असतील ते व वरकडहि कारस्तानी तजविजेने होईल ते करून फौज फोडावयाची तजवीज करून यावे, याप्रा त्यांजकडील राजकारण आलें आहे.

त्यांचा बच्याव करावा. सखाराम हरि यांजकडील रदबदल करणार नाहींत याप्रा आहे. मर्जीस आल्यास मध्यस्तासी बोलून ते उठोन येत व फौजहि फुटे आसे मधस्तासी बोलून करू. उतर पाठवात्रयाची आज्ञा जाली पाहिजे. बहुत काये लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*The note mentions that Baburao Hari has been seduced from Dadasaheb's allegiance and that he was prepared to come over to the party of the Barbhais, leaving all connection with his brother Sakharam Hari. The writer asks a reply of approval of the plot.*

No. 321] [*2-1-1777* ?

श्री

चिरंजीव राजश्री बाळाजीपंत लेले यांसी

प्रति अनुबाई आसीर्वाद. उपरी, येथील कुशल ता छ २१ जिलकादपर्यंत वर्तमान यथास्थित आसे विशेष. सांप्रत तुम्हांकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही, तरी सविस्तर लेहून पाठवावें. वरकड इकडील इचलकर्जीकडील वर्तमान तरी राजमंडळची फौज सात आठ हजार व तोफा यैसे येऊन ठाण्यानजीक उतरले आहेत. नित्य उठोन गोळागोळी होत्ये. दररोज तोफाचा मार करिता चौहूकडून मार्गदेखील बंद केले. सर्व प्रकारे आकर्शण केले. त्याकडील फौजा भारी आणि वरचेवर आणिखी फौज जमा करीत आहेत. आम्हाकडील फौज थोडी. ईस्वर काये परिणाम लागेल ते पाहावें. वरकड वर्तमान राजश्री नारोपंतनाना यांस लिहिले आहे. त्याजवरून कलल. येथे साहित्यपत्रे कुमकेविसी पाहिजेत, त्याची याद आलाहिदा पा आहे. त्याप्रो साहित्यपत्रे नानांस समजाऊन पत्र पावतांच लिहिल्याप्रमाणे राजश्री भास्कर वासुदेव व लक्षुमण माहादेव आपणाकडे येतील त्यांचे स्वाधीन करणे म्हणजे आम्हाकडे जलद रवाना करितील. तुम्ही तेथे आहा तरी हरयेकविसी आम्हांकडील कामाकाजाविसी मारनिले सांगतील त्याप्रमाणे करून देत जावे. भरोसा जाणौन लिा आहे. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Anubai requisitions help for the relief of Ichalkaranji besieged by forces of the Kolhapur Prince.*

No. 322] [25-1-1777

श्री

राजश्री हरिपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी

भिकाजी नाईक कोल्टकर याचें बोलण्याचा प्रकार लिा तो कळला; यैसियास त्याचे पोटाची सोय करावयाची आहे. करावी, परंतु तोतयाचें राजकारणांत पुर्ते होते, सखे बंधु तिकडे पाठविले होते.

श्रीमंत दादा मुबइत आहेत. त्यांणीं फिरंग्याकडे राजकारण केलें आहे. आंतून इंग्रजांनीं साध्य व्हावें आणि वसई घ्यावी याजप्राा निश्चये आहे: येविशीची बातमी कळल्याचा मजकूर लिा तो कळला. ऐशियास येविशी तुम्ही राजश्री विसाजीपंतास पत्रें ल्याहावीं व राजश्री बापूस लेहून त्याजकडून पत्रें पाठऊन बंदोबस्तानें राहात असें करावें.

रवाना छ १९ जिल्हेज हें विनंती

¶*Nana Fadnis learns from Haripant the plan of Raghoba for surprising Bassein with the help of the English and asks him to intimate it to Visaji Keshav.*

No. 323] [27-1-1777

श्री

राजश्री हरि बल्लाल स्वामी गोसावी यासी

विनंती उपरी. तुम्ही पुणें प्रांतांत मुक्काम केला आहे, त्यास फौजेमुळे बहुत खराबी होत्ये. दोघे कुणबी लष्करचे लोकांनीं तोडिले म्हणोन बोभाट आला आहे. यैशास तुम्ही प्रांत मजकुरांतून कूच करून पुढें फौजसुद्धा जाणे. पुणें प्रांतास उपसर्ग न लागे ते करणे. जाणिजे छ ११ जिल्हेज सुरसन सबा सबैन मया व अलफ हे विनंती

¶*Hari Ballal is asked to move his camp from the vicinity of Poona to save the ryots being molested by the army.*

+ येथून अक्षर नाना फडणिसाचें आहे.

No. 324] [*January 1777*

[पहिला बंद गहाळ.]

ये श्रीमंतीं येकोन तह करावा असी गोष्ट श्रीमंतास आपण होऊन थोडीसी नेटून सांगितल्यास यैकतील; परंतु सरकारचें बोलणें वकिलासी आम्हांकडे येविसीचे मजकुराचें आगर पत्रही येत नाहीं, त्यापक्षीं कांहींका करीतना, आपल्यास गरज काय, असेहि दाखवितात. सारांश तहाविसीं मुंबईकराचे नेट जाल्यावर श्रीमंत न यैकतील आथवा कोणीकडे जातील असा पक्ष नाहीं. यास्तव हा प्रकार युक्तीपर आसालियास तेथें वकिलासी बोलण्यांत येऊन त्यांचें पत्र मुंबईकरास येविसीं यावें, व आपलेकडील मुंबईतील टोपीकरांचे रीतीस माहित वजनदार राजश्री बाजीपंत मेहेंदल्यासारिखा आथवा दुसरा कोणी पाठविल्यास युक्तिवर मुंबईकर आणून तहास दिवसगत लागणार नाहीं असें वाटतें. यांतील कर्तव्य आसेल तें गुण दोष मनन करून करणें जाल्यास करावें. उगेच सुचला मजकूर लिहिला.

कलम १

तोतयाकडील च्यारपाशें लोक साष्टीतील कौल वचन देऊन आणिले त्यास भिवराव आबाचे समत घेऊन निरोप दिल्हे. श्रीमंत त्यास राहवीत होते; परंतु त्यांतील मुखमुख्य वचन कौल घ्यावयास आले ते कौल पाठऊन येथें गुंतोन पडले, त्या आर्थी सारे तिकडील लोभास न गुंततां उठोन आले. तेथील जड मोडली. घोरपड्यां बा हत्ती व पागेची घोडीं वगैरे तोतयासमधीचे गोसाव्याचें चेल्यानी दिकत पाडून श्रीमंताकडे नेलें, त्याजविसीं सरकारचें पत्र आम्हांकडील गेलें आहे. काय घडेल पाहावें.

१

आम्हांस येथें राहावयाची आज्ञा त्या प्रमाणें येथें आहों. परंतु प्रयोजन कांहीं दिसत नाहीं. आपणांस वरवर लिहून खर्चास आणून रिकामे पैका मात्र खावा. चाकरीचें फल आथवा सरकारकाम दिसत नाहीं. तथापि आज्ञेप्रमाणे आहों. स्वारी लवकर निघणार त्यापक्षीं आम्हांस आज्ञा येईल तसें करूं.

१

येकूण पांच कलमें शेवेसीं विदित होऊन तिकडील सविस्तर ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter refers to the proposals of peace made by the Marathas to the English of Bombay. The other item mentioned herein is with regard to the men of the Pretender that were given protection at Salsette. The first sheet of the letter is missing.*

No. 325] [5-2-1777

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब[1]

रोजीं बापूजी नाईक दिा भावे हेहि बिदा केले. बाळारायास घेऊन बेचोम्यांत[2] बसले. आम्ही बाहेर लागूनच बसलों होतों. बापूजी नाईक म्हणाले की, नारो सिवदेवानी काये लिहिले ? बाळाराव म्हणाले की, बापू म्हणत होते की पाटिलबावानी गडास यावें. आपला फडच्या करून कितेक कामें करणें तें करावीं. त्यांचे मुदे आसतील ते सांगावे. कोणतें करून देयाचें कोणते न देयाचें हें पाहावें. उगेच फिरतात; इच्छा त्यांची. इतकें लिहिलें मग बापूजी नाईक बोलले की, तिसऱ्या बंदात काये लिहिलें. मग हळूच काये बोलले हें कळलें नाहीं. दुसरें म्हणाले की, वकील पुरंधरी होते ते गेले. मुमईवाल्याचा यांचा बिगाड जाला. श्रीमंत इंग्रेजास घेऊन परिस्छिन्न बाहेर निघणार. हैदर नाईकानी हे केली. बाजीपंत येसाजी सिंद्यावर गेले होते ते माघारे आले. येसाजी सिंदे फौज जमा करितात. मोगल यांचा नव्हे हे आम्हास परिस्छिन्न कळलें. सिंद्यासारका सरदार हातचा गमावला. वरसा सा महिन्यांत मुलुक किलेसुधां गेला हें बापूजी नाईक दिा भावे हें परिस्छिन्न जाणावें. नारो सिवदेव यानी लिहिलें की, प्रस्तुत मनसुबा काही करीत नाहींत, स्नानसंध्या करून निश्चित बसलेत. तस्मात राज्ये बुडावयाचें चिन्ह हेंच आहे. हें वर्तमान तों मोठ्यानें बोलले. मग हळूच येकांत दोन घटका होऊन बिदा केले. शालजोडी पागोटे पाटीलबावानी दिल्हें, यानी निराळे दिल्हें. बिदा केले. इतकियांत आंगऱ्याकडील कारकून आला. गोस्टी आणिक जाल्या. मग बोलला की, मीच मुमईस गेलों होतों. येके दिवसीं श्रीमंत व आबाजी माहादेव व मी यैसे बसलों होतों. गोस्टी हरिपंताकडील निघाल्या की हरिपंत सरदारी लायेक आहे. च्याहता तर सुरतवाले सुधां आम्हास लुटून पस्त करून

[अपूर्ण.]

¶*This is only the fifth sheet of a long letter addressed to Haripant Phadke, and already printed at No. 86, Selection No. 5.*

---

१ पे. द. नि. का. ५. ८६ चा पांचवा बंद.   २ राहुटींत !

No. 326] [18-3-1777

पो छ ९ सफर सबा फाल-
गुन मास

श्री

सेवेसी मोरो बापूजी कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ ८ सफरपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. सुवर्णदुर्गाहून बातमीची पत्रे आली त्यातील मजकूर

छ ३ सफरचे आली त्यातील मजकूर विलायतेस किरण करणेर इंग्रेज गेला होता. तेथील पत्रे मुख्याची मुंबईस आली. भाव काही समजला नाहीं, परंतु बाहेरील तरांडे बंदरात व बंदरातील बाहेरील जाण्यायेण्याची दिकत फार पडू लागली. सामान जलदीने करीत आहे. किटण मागाहून आठा दिवसी येणार याप्रो तेथील आले व बाणकोटवाल्याने सांगोन पाठविले. बाणकोटासहि सरंजाम करीत आहे. तस्मात् त्याचे मनोदयानरूप घडेल असे वाटते. बातमी पकी फुटली नाही.

मेस्त्र मोष्टीन पुण्यास वकिलीचे निमित्ये पाचसे माणोन (माणोस ?) घेऊन येणार आहे असे वर्तमान पत्रात आहे

छ ५ सफरचे पत्र आले. त्यातील मजकूर मुंबईस माहांगिरी बातमीस होती ते येके दिवसात आली. इंग्रजाकडील सात तरांडी मध्यम प्रतीची व थोर सरंजामसुधां काल प्रातःकाली हाकारून वसईचे रोखे गेली. मेस्त्र मोष्टीण सरदार वर गेला आहे. कोणे ठिकाणी गेला हे वर्तमात अद्याप नाही. तोडचे माहागिरीकराचे वर्तमान आहे. मुंबईचे बंदरांत सावकारा वगैरे चालीस पनासपर्यंत गलबते होती त्याची हावी (?) उतरोन घेतली आहेत. सुरतेहन येक पलटण नवे आणविले आहे व मुंबईत जाजती लोक सिबंदी ठेवीत आहे.

सदरहू वर्तमानाची पत्रे आली त्याजवरून सेवेसी लिहिले आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Moro Bapuji (Phadke?) writes to Poona news from Bombay about Col. Keating returning shortly to India and about Mr. Mostyn proceeding to Poona on embassy with 500 men.*

No. 327] [6-4-1777

पो छ २७ सफर सन
सबा सबैन

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री लक्ष्मणपंत देशमुख स्वामीचे सेवेसी

पो माहादाजी रामचंद्र सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता छ सफर मुा अमोद जाणून स्वकीय लेखन करावे विशेष. आपली आज्ञा घेऊन जंबुसरास जावयास आलों ते दरमजल सुरतेस आलों. तेथून पुढें आंकलेश्वर येथे आलों. तेथून भडोच दोन कोश आहे, तेथें इंग्रज मेस्तर गांभीर मामलेदार आहे, त्याचे स्वाधीन जंबुसरचा इंग्रज, याकरितां कर्नेल आपटेन याचें पत्र त्यांस होतें तें दिल्हे, व सुरतकरास श्रीमंताचे पत्र होते तें दिल्हे. त्यास काम जाहाले नाहीं इतकियात मुंबैहून जनराल कोर्णायेक[1] व सुरतवाला मेस्तर बाडेम[2] व रामसी[3] ऐसे तिघेजण इंग्रज मुंबैचे कोशली भडोजेस आले. त्यांकडे जाबसाल सारा कारभार इकडील करूं लागले, याकरितां त्याकडे कारकून पाठविले व पत्रेहि पाठविलीं. तथापि तहाच्या कराराप्रमाणें काम जाहलें नाहीं. याकरितां मुजरद येविसीचे वर्तमान लिहून श्रीमंतास विनंतीपत्र पाठविलें, व आपणासहि पत्र पाठविलें होते, व आनंदराव मुकुंद कारकून यास पाठविलें होते ते पावलेच असतील. याउपरी इकडील वर्तमान जनराल वगैरे इंग्रज भडोचेहून आमोदेस जाणार. तेथन जंबुसरास जाणार. आमोद व हासोट व देहजबारे इंग्रजास द्यावयाची नेमणूक सरकारातून जाहाली ते माहाल त्यांचे हवालीं करावयास राजश्री गणेश हरि दिा चिंतामण दीक्षित यांस सरकारची आज्ञा होती. त्यामुळें तेहि अमोद येथें आज अडीच तीन महिने राहिले. त्यास तीन महाल तीन लक्ष तेहतीस हजार कमाल बेरीज जमा आहे. त्यास तीन लक्ष कमाल जमाबंदीप्रमाणे इंग्रजास माहाल द्यावे व ज्याजती ऐवज राहील तो त्याचे गाव सरकारात ठेवावे याअन्वयें यांस आज्ञा. याकारितां इंग्रजांसी यांचे बोलणे आजपावेतों होत आले. त्यास तीन लक्ष आज वसुली महाल नाहींत, याची कची माहितगिरी इंग्रजांस जाहाली, यामुळें ते माहाल घेईनात. वसूल आहे त्याप्रमाणें घेतों असे म्हणतात, यामुळे सरकारांत ही गोष्ट कबूल नाहीं. कमाल सालाप्रमाणें तो इंग्रजास घ्यावयास अनुकूल पडेना, यामुळें आजपावेतों त्या कामाचा राडाच पडला. त्यास हालीं जनराल कर्णाइक वगैरे तेघे इंग्रज मुबैहून येल्तयारी होऊन आले आहेत. त्यांस ते इंग्रज आमोदेस

1 Gen. Carnac. 2 Boddam. 3 Ramsay.

येणार. येथें आल्यावर फडशा पाडावा असे गणेश हरि यांचें व त्यांचें बोलणें जाहालें. हा फडशा करून मग जंबुसरास जाणार, हे वर्तमान अगोदर आम्हास समजलें. याकरितां अमोद येथें आलो. गणेशपंताची भेट घेतली; इतक्यांत जनराल वगैरे इंग्रज अमोदेस इकडे येणार होते ते न आले आणि परभारेंच जंबुसरास जावयास गेले. याकरितां गणेशपंती कारकून त्याकडे पाठविला, तेव्हां त्याणी सांगितलें कीं तुम्ही व माहादाजी रामचंद्र ऐसे मिळोन जंबुसरास येणे. तेथें दोनहि जाबसालाचा फडशा करूं ऐसें कारकूनासमागमे सांगोन पाठविलें; तेव्हां जंबुसरास जावें असा सिधांत गणेश हरि यांणी केला. आम्हासहि जावें लागलें. उभयतां मिळोन गेलों. इंग्रज सारे तेथे भेटले. प्रथम जाबसाल तीन लक्षांचे महाल त्यांस द्यावे त्याचा जाहला. त्यास वसुली ऐवज असेल त्या प्रमाणें घेऊं, कमाल बेरीज सांगतां ते आपणास कबूल नाही, याप्रमाणें त्यानीं सांगितलें. हल्लीं वसूल आले त्याप्रमाणें म्हटलें तर अंतर बहुत. इंग्रज म्हणतात तिन्ही माहाल सवादोन लक्षांचे. तेव्हां तो मजकूर फडशात न आला. मग-जंबुसरचा जाबसाल लागला. त्यास आम्हास पाठविलें तेव्हांचा करार जे जमाबंदी आम्ही करावी, ठाणे जकीरासुधां इंग्रेजाकडे आहे ते आम्हाकडे द्यावें. वसुलाचा हवाला जर इंग्रजांनीं घेतला, तर हवाला कबज पावलियाचें लिहून द्यावें. इंग्रजांचे बारा लक्ष रुपये सरकारांतून द्यावयाचे ठरले आहेत, त्यास जंबुसरचा ऐवज बारा लक्ष रुपये फिटत तोपावेतों वसूल त्याकडे द्यावा. मामलत अमल कारभार आम्ही करावा. ऐवज मात्र त्यांकडे देऊन, पावल्याचें कबज त्यांणीं आम्हास द्यावें, या तऱ्हेनें आमची रवानगी जाहाली. फक्त ऐवज मात्र इंग्रजाकडे वसूल जसा होईल तसा तसा देत जावा, याअन्वये करार. दुसरे तहाची तेरीख छ १० मोहरम सन सीतात तह जाला. त्या दिवसापासून आम्ही माहाली पैवस्ता होऊं तोपावेतों इंग्रजाकडे वसूल महालपैकीं घेतला असेल तो जमीदारांचे विद्यमानें रुजुवात करून त्याचेंहि कबज घ्यावें. हा पहिला करार होऊन सनद पत्र आम्हांस देऊन रवानगी पुण्याहून जाहाली. हा मजकूर आपणांस ठाऊकच आहे. त्या उपरी आम्ही इकडे आल्यावर, मागाहून दुसरा करार इंग्रजासीं जाहाला जे, जंबुसरचे ठाणें इंग्रजाकडे असावें, जमाबंदीचा ठराव आम्ही करावा वसूल घेणे तो इंग्रजांनीं घ्यावा. व जंबुसरचा इंग्रज व आम्ही मिळोन एका विचारें असावे. याअन्वयें श्रीमंताची सनद पुरंदराहून आली तेहि छ २ सफरी पावली. सारांश इंग्रजासी जंबुसरचा जाबसाल होता; ते बोलिले की ठाणे आम्हा-कडे जमाबंदी आम्ही करून वसूल आपणच घेऊं. सर्व मामलत कारभार आम्हीच करूं. तुम्हास पावती, ऐवज पावेल, त्याची लिहून देऊं, यापेक्षां अधिक

नाहीं. या कामास एक कारकून छोटेखानी असला तर पुरे. तुम्ही मातबर माणूस, याकरितां कारकून ठेवावा. याप्रमाणे त्यांनीं जाबसाल केला. तेव्हां कांहींच या कामामध्यें स्वरूप राहिलें नाहीं, व सरकार कामाचेंहि नाहीं. ठाणे जमाबंदी वसूल कारभार त्याकडे, तेव्हां काय वेतलें हें आपणास कसें समजेल? जमीदार रयत त्याच्या कबज्यांत, ते ज्याप्रमाणें बोलावयास सांगतील तसे बोलतील. अधिक बोलिल्यास पारपत्यास उसीर नाहीं असें त्याचे भय रयतेस आहे, तेव्हां आम्हास कांहीच कळणार नाहीं. याकरितां हलीं जो तह ठरला त्यास तो विरोध न यावा आणि काम सरकारचे स्वरूप राहून अमल दखल व्हावा अशा तऱ्हेनें यादी लिहून पाठविली आहे. त्या यादीप्रमाणें जर काम अमलांत येईल तर सरकार-काम होईल. व त्यामध्यें इंग्रज काईल होईल असीच कलमें आहेत. त्याची यादी निराळी पाठविली आहे. ते आपण ध्यानास आणावि, म्हणजे सरकारकाम होते, व इंग्रजासी अलीकडे जो करार जाहला आहे त्यासहि विरुद्ध पडत नाहीं. ठाणें जंबुसरचे त्याकडे राहावें असा करार जाहला, त्याप्रमाणें ठाणे इंग्रजाकडे राहावें. वसूलहि त्याकडे हवाला देवावा, तोहि कराराप्रमाणें त्यांणी वसूल घ्यावा यांत गुंता नाही; परंतु जमाबंदीचा कारभार त्याकडे परिछिन नसावा. त्यामधें इंग्रज यांणी मन घातलें म्हंजे सरकारनुकसानी आहे. केवळ मी आपल्या स्वार्थाकरितां लिहितों असें नाहीं. यामध्यें आपण नीट उमजोन पाहावें. जबरदस्त इंग्र(ज) व ठाणे त्याकडे वसूल त्याकडे, जमाबंदीहि त्यांणीं करावी, असें जाहल्यास आपल्या सरकारात मग कोणताहि प्रकार राहिला नाहीं. याकरितां कांही साधकबाधक पाहून त्याणी व आम्ही कसें वर्तावें येविसीची कलमवार यादी लिहन त्याची तडजोड काढून याद लिहून पाठविली आहे, त्यास यादीप्रमाणें जर काम आम्हाकडे जाहालें तर अमल दखल होईल. जमाबंदीचा रुपया जाणार नाहीं ऐसे आहे. यामध्यें खावंदाची मर्जीस येईल तैसा बंदोबस्त करून पाठवितील. आम्हास जे सुचलें ते लिहावें म्हणून लिहिलें असे. तरी यादीची कलमें पुर्ती चितात आणून त्याप्रमाणें मुंबैकराचे पत्र व कर्नेल आपटेन याचें पत्र याविसी जनराल वगैरे तिघे इंग्रेज आले आहेत यांस आले तर उतम आहे. पत्र न आले तर आमचे येणें व्यर्थ आहे. असो इश्वरइच्छा जसी असेल त्याप्रमाणें वडोन येईल. असा हिस्का पडेल हे कानीमनी नव्हतें. या कामास इंग्रजांनीं हिसका घातला आहे. पला लांबीचा, यास्तव बंदोबस्त करून सत्वर पाठवावा. येविसीं यजमान स्वामीस विनंती करून काम होई ते करावें. यादी कलमबंदीची सरकारच्या पत्रांत घालून पाठ-विली आहे. व दुसरी ते यादीची नकल करून आपणांस समजावयाविसीं आनंदराव मुकुंद कारकून यांच्या पत्रांत घालून पाठविली आहे. ते आपणास समजाऊन

माहीत करतील त्याप्रमाणे बंदोबस्त करून उत्तर पाठवावें. बहुत काय लिहिणें लोभ करावा हे विनंती.

बो

हो राजश्री बजाजीपंत भाऊ स्वामीस सां नमस्कार विनंती लिा तरी काम लौकर करून पाठवावें. राजश्री देशमुखास पत्र लिा आहे त्यावरून ध्यानास येईल. लोभ करावा हे विनंती.. हो राजश्री मल्हारपंत भाऊ स्वामीस सां नमस्कार विनंती. साद्यंत वृत लिा आहे यावरून ध्यानास येईल. सदैव पत्रीं संतोषवावें हे विनंती.

¶Mahadaji Ramchandra informs that a difficulty has arisen over the districts to be ceded to the English in Gujarat according to the treaty. It is contended on behalf of the English that they are entitled to territories yielding a revenue of three lacs ordinarily and not assessed at their maximum value.

No. 328] *[30-4-1777*

श्री

सेवेसी विज्ञापना. ताा छ २० सफर मुकाम रेवदंडा वर्तमान येथास्थित असे विशेष. फरासिसांचे वकील हे मातबर माणूस आहेत. याणी वर्तमान स्वामीचे ऐकून बहुत संतोश जाहले आहेत. भेटी अंतीं फारच संतोष होतील. लवकर भेटी घ्यावी हें त्याचे मानस आहे; परंतु पालख्या अद्याप आल्या नाहींत. दुसऱ्याने येथून आणीक जासूद पालख्या आणावयास पाठविल्या आहेत. पालख्या वगैरे सरंजाम दोन तीन दिवसात जमा जाला म्हणजे, कूच करऊन दरमजल वेऊन येतो. घोडी उंट हती वगैरे सरंजाम लोकांचा जमा होईल त्यास खर्चाची बेगमी करून स्वामीनी पाठवावी. फरासिसाचे वकिलाचे वोझें शंभर संदुक वगैरे वोझें फार आहे. याची बेंहेदी[१] झाली पाहिजे, याजमुळें दोन दिवस लागतील. फरासिसाचे वकील त्याणी आपला ठिकाणा सोडून सहा महिने तेरा दिवस आज जाहाले म्हणून सांगितले. तरांड्यातील दारू उतरून, फरासिसानी रेवदंड्याचे किल्यांत आणून ठेविली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶The Peshwa's agent at Rewdanda requests him to arrange for a conveyance for the French envoy St. Lubin proceeding to Poona. He has guns and ammunition with him, adds the writer.

---

१ तरतूद.

No. 329] [May 1777

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
बाजीपंत जोशी स्वामीचे शेवेसी

पोष्य बालाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती. उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहिणें विशेष. तुम्ही राजश्री चिमणाजी माहादेव याजवळ कितेक अर्थ पुढील कर्तब्याचें वगैरे सांगोन रवाना केलें, त्यास मशारनिलेनीं येऊन सविस्तर निवेदन केलें. फौजेस खर्चास नाहीं, अखेरीचे दिवस आले, फौज राहात नाहीं, शिंदे येणार तेहि येत नाहीं(त), छावणी करून परिणाम नाहीं म्हणोन, त्यास आजपर्यंत हरकसें करून दम धरून राहिला; त्याप्रमाणें पुढें महिना दोन महिने फौजसुद्धां जथ आहे तसा राखून असावें. राजश्री माहादाजी शिंदे श्रीगोंदे येथें आहेत. त्यांणीहि आपली फौज जमा केली. वैशाख शुद्ध त्रयोदशीस मजल दरमजल तुम्हांकडे येतात. तोफा त्यांच्या लिहिल्यावरून रवाना जाल्या. लौकरच येऊन पोहचतील. तूर्त चालीस हजार रुपये तुम्हाकडे रवाना केले आहेत. पुढें ऐवजाचे तर्तुदेत आहों. शिंदे यांच्या बोलण्यांत कीं करवीरकरांची मसलत पतकरली. हरकसें करून उलगड्यांत आणितों. याप्रमाणें लिहिण्यांत बोलण्यांत आहे, तेव्हां आजपर्यंत हालहवाल सोसून राहिला. थोडक्याकरितां जथ फोडल्यास शिंद्यास बोलावयास जागा होते. याजकरितां हरकसें करून राहावें. वरकड चिमणाजी माहादेव लिहितील त्याजवरून कळेल.

¶*Balaji Janardan Fadnis asks Bajipant who has been despatched against Kolhapur to pull on for some time more in spite of difficulties. He further says that Mahadji Sindia has promised to go to the help of the addressee.*

No. 330] [14-5-1777

पौ छ १२ राखर
सुन सबा सबैन
वैशाख मास

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी आपाजी आठवले कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ६ राखर मुकाम कवठे सातसैदाचे स्वामीचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. संक्राजी घोरपडे घाटगे वगैरे करवीरकर

येसाजी सिद्यास मिळाले, याजकरितां तुम्ही फौजसुधा सध्या कर्नाटकांत न जाणें, राजश्री रामचंद्र गणेश यांस जाऊन मिळणें, म्हणौन पेशजी सरकारची आज्ञा सादर जाल्यावरून हिकडे आलों होतो. प्रस्तुत घाटगे घोरपडे वगैरे सरदार फौज त्यांजकडील उठोन आली. राहिले त्याचा बंदोबस्त करितां येईल. आत:पर विशेष फौजेचे प्रयोजन येथे नाही, याकरिता तुम्ही फौजसुद्धां राजश्री हरिपंत तात्याकडे जावे, आम्हीहि देशास सत्वरच जाऊ, म्हणौन राजश्री रामचंद्रपंत तात्या व बाजीपंत आणानी आज्ञा केल्यावरून निघोन तात्याकडे गेलो. येथे चाकरीस आस्तां वोढीमुळे पोटाची फौजेची हलाखी होतीच. हाली अखेरी आली आस्तां आणि पैसा खर्चास नाही, आणि कर्नाटकांत जाणें पडिलें याजमुळें लोकांचा गवगवा पडला, ते सविस्तर काय ल्याहावें? हरकसे करून जातों. घरकड राजश्री बाजीपंत आणा शेवेसी लिहितील, त्याजवरून विदित होईल. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Visaji Apaji Athavle informs Nana Fadnis he has joined Haripant according to instructions and solicits funds to pay his troops.*

No. 331] [*9-6-1777*

पो छ ४ जोवल सन
समान सबैन जेष्ट मास

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक नारायेणराव कृष्ण सां नमस्कार विनंती विज्ञापना. ताा छ २ जमादिलावलपावेतो येथास्थित आसो विशेष. राजश्री बाबराव हरि याचे पुत्र दौलत बाबूराव किले चाकण येथें आटकेत आहेत, त्याजबराबर दाहा सिपाई देऊन हुजूर पाठवणे म्हणोन छ १९ रबिलाकरची सनद सादर जाली, त्यावरून आज्ञेप्रमाणे मारनिलेस पाठविले आहे. प्रविष्ट होतील. उतर पाठविले पाहिजे, सेवेसी श्रृते होये हे विज्ञापना.

¶*Daulat Bapurao confined at Chakan is sent to the Peshwa under escort.*

No. 332] [*9-7-1778*

श्री

श्रीमंत राजश्री तातासाहेब
स्वामीचे शेवेसी

विनंती. शेवक बाजीराव गोविंद क्राा सां नाा विाा. ताा छ १४ जमादिलाखर पावेतों मुाा श्रीरंगपटण येथें सेवकाचें वर्तमान स्वामीच्या कृपावलोकनेकरून

येथास्थित असे विशेष. स्वामीकडून आज्ञापत्र येऊन तिकडील वर्तमान काहीच समजलें नाही. इकडील मजकूर तरी फालगुण वद्य पंचमीस उत्राजी नरसिंह रवाना केलें व वैशाखे पौर्णिमेस माहादजी जैना यास स्वामीकडे रवाना केलें. या उभयेतांजवल सर्व मजकूर समजाऊन सांगितला व पत्रीं लिहिला आहे तो, उभयेतां शेवेसी येऊन दाखल जाहाले असतील. सर्व अर्थ त्याणी निवेदन केलाच असेल. हालीचा मजकूर तरी नवाब आम्हांस खर्चास आजपर्यंत देत होते तें त्याणे बंद हली केलें. पावत्या व कबजें आणून देणें आणि निघोन जाणें यैसे म्हणतात. खर्चास देत नाही तेणेकरून आम्हां उभयेतांचे विपत्य पत्रीं लिहितां येत नाही. याजवरून हें विनंतीपत्र शेवेसी लिहिलें आहे. उत्राजीपंतासमागमें यादी पाठविल्या, त्याप्रमाणें कबजें व पावत्या आम्हां उभयेतांच्या नावांच्या आल्यासिवाये येथून सुटका होत नाही. केवल प्राणाश्वर येऊन गुदरले आहे. खर्चास देत नाही. टालाटाल करितात. आणि कबजासिवाये पावत्यासिवाये येथून मुक्तता नाही, यैसे परम संकटीं पडलों. घोडी दाण्यासिवाये खराब जाहाली. स्थीर्त[1] वाचत नाही हें जाणून सेवेसी विनंतीपत्र लिहिलें आहे. त्यास उत्राजीपंताजवळील यादीप्रमाणें कबजे व पावत्या द्यावयासी आज्ञा करावी आणि मीं पुढें वर्तणूक कसी करावी ते आज्ञा पत्रीं निरोपिली पाहिजे, त्याप्रमाणें वर्तणूक करीन. याजउपरी येथे राहावयाचा अर्थ राहिला नाही. परतु कबजसिवाये व पावत्यासिवाये निरोप देत नाही यैसे साफ सांगितलें. खर्चास नाही. परम पेचीं घातलें. निदान जाणून शेवेसी विनंती लिहिली आहे. कबजें व पावत्या आल्या तर चरण दृष्टीस पडतील. नाही तरी आम्हांवर तों केवल प्राणसंकट येऊन गुदरलें आहे. याजकरितां सेवटील हे पत्रीं विनंती लिहिली आहे. येथे मानाजी सिंदे आल्यामुलें व आणखी मसलतीमुलें लहान थोर च्यार जमा केले होते त्यामुलें सवालक्ष रुपये साहुकारी कर्ज देणे आहे, त्याची पावती निरालीच नवाबाच्या नावें लेहून पाठवावया आज्ञा करावी. सोईस पाडिल्यास प्रसंगानरूप द्यावी लागल्यास देऊन मुक्त होऊन येऊ. नच देणे पडल्यास आम्हांजवल राहील ती हुजूर पाठऊ आणि कोणत्याहि मार्गे * * निघोन स्वामीकडे येतों. स्वाम मुंबईच्या मुकामी होते तेव्हा मसलत लौकर सिध होईल यैसा साहुकारास भरवसा होता, त्यामुले च्यार रुपये कर्ज देल होते. हालीं स्वामींचे जाणें हिंदुस्थानांत जाहाले. साहुकारास धीर पुरेंनासा जाहाला, यास्तव कर्ज पैसा मिलेत नाही. सरकारातूनहि याणी खर्चास मना केले. तेणेकरून हाती व घोडीं झाडून खराबीत आलीं. माणसास अन्न चहूं रोजां येक वेल संकटें करून कोणास मिलते कोणास नाही याप्रमाणें जाहालें

[1] आब्रू, आब, प्रतिष्ठा,

आहे. साहुकार तिकडील मसलत सिद्ध होईल म्हणोन आजपर्यंत धीर धरून राहिले होते. हाली त्यांच्या समजणियांत आलें, जे तूर्त मसलत लांबली त्यामुळें रोज सावकार दारीं येऊन बसतात. त्याणी धीर सोडिला आहे. रोज धरणें-पारणें सावकाराचे होते व पुढें पैसा मिलत नाहीं. सर्व स्वामीच्या भरवसियावरी येथं ठाकुरेकी[१] होती. स्वामीची मसलत सिधीस जाईल याजमुलें नवाबानीच थोडें बहुत जे खर्चास दिल्हे तितकेंच घेतलें आणि सावकारी कर्ज घेऊन च्यार लोक नामी देसीहून आले ते पदरी बालगिले जे, लाख दोन लाग रुपये कर्ज जाहालें तरी स्वामीजवल येतांच परिहार होईल हा पूर्ण भरवसा होता, याजमुले च्यार माणूस नामी बालगलें. नवाबानी जें संतोषें खर्चास दिल्हें तेंच घेऊन च्यार रुपये कर्ज करून राहिलों. तिकडील मजकूर येकप्रकार[२] जाहाला व नवाबहि खर्चास देत होते ते टालाटाल करूं लागले. साहुकारी अडचण. चहूंकडून संकटें येकदाच प्राप्त जाहाली आहेत. परम संकटांत जाणून शेवेसी विनंति लिहिली आहे. तरी पावत्या व पांच लक्षाचें कबज मानाजी सिंद्याच्या नावांचें व साहुकारी कर्ज सवालक्ष जाहाले आहे त्याजविसी नवाबास येक पत्र जे, 'सावकाराचे कर्ज बाजीराव याणी सवालक्ष रुपये तेथील सावकारांचे देणे आहेत, त्याचा हवाला तुम्ही घेऊन मारनुले यास निरोप देऊन पाठवावें. सावकाराचा यैवज तुम्ही द्याल तो अमचे सरकारातून मजुरा आहे, हे पत्र पावतीदाखल आहे, म्हणून पत्र लेहून पाठवावयासी आज्ञापिलें पाहिजे. नवाबानी मागेंच निरोप आम्हास दिल्हा असता, तरी कर्जेहि बाहेरमार्गी फेडून स्वामीजवल येऊन पोहचलों आसतो. पूर्वी निरोपाविसी बहुतप्रकारें निकड करून बोलत गेलों, परंतु निरोप देईनात. याजमुलें संकटी पडलो आहे. यास्तव विनंतीपत्र लिहिले आहे. याजप्रमाणें पावत्या व कबजें पांचलक्षाचें व साहुकारी देणे सवालाख आहे त्याविसीचे पत्र पावतीदाखल यैसी द्यावयासी आज्ञा करावी. येथून निरोप घेऊन मार्गी (ये)तांच फेडून सेवेसी येऊन पोंहचतों. येथील कचे वर्तमान रामजी हुजरे शेवेसी निवेदन करील * सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Bajirao Govind Barve writes to Raghunathrao from Seringapatam of the hard straits to which he, Manaji Fakde and their followers were reduced on account of lack of funds, as Haider not only stopped advancing them any money but asked for Dada's guarantee for the amounts already advanced. The writer laments the suspicions entertained by Haidar since Raghoba's flight to the North and asks for more remittances.*

---

१ आब, प्रतिष्ठा, पत,   २ भलताच, अनपेक्षित.

No. 333] [5-8-1777

श्री

राजश्री गणेशपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही पुरवणीपत्रीं बाजत बरसात मसलतीचा मजकूर लिहिला तो सर्व कळला. तूर्त राजश्री विसाजी आपाजी उज्यनीकडून बऱ्हाणपुराकडे येतील. त्याणी फौजसुधां कोंडाईबारीकडे यावे. ते व आम्ही एकत्र व्हावें; दुसरे राजश्री खंडेराव त्रिंबक व खंडेराव पवार व कृष्णाजी जिवाजी पवार या तीही पथकानी कोंडाईबारीवर यावे. याखेरीज रामचंद्र पवार व नारोशंकराचे पथक यास आज्ञा व्हावी. आ(ण)खी या प्रांतीची सरंजामी पथकें असतील त्यांनीं तमाम कोंडाईबारीवर जमा व्हावें. म्हणजे पंधरा हजार फौज इकडून व दुसरी पंधरा हजार हुजरात तिकडून याप्रो येलगार करावा, आणि इंग्रज बुडवावा. राजश्री परशरामभाऊ कर्नाटक प्रांती आहेत. तसेच त्यानीं त्या तोंडावर असावें म्हणोन विस्तारे लिहिले ते सर्व कलले. मनसब्याचा मजकूर लिहिला हा चांगलाच आहे. येथेहि त्याचअन्वये तर्तूद होत आहे. रा छ १ रजब हे विनंती.

¶*Nana Fadnis approves of the proposals of Ganeshpant Behere for posting the army at various centres against the English.*

No. 334] [15-9-1777

पौ छ १२ साबान भाद्रपद

मास मुा बोलवण ताा नाणेमावल.

श्री

राजश्री भिवराव येशवत गोसावी यांसी

सुा सबा सबैन मया व अलफ. तुम्ही विनंतीपत्रे छ ४ साबानची छ ५ मिाची पाठविली ती प्रविष्ट होऊन लिहिला मजकूर विदित जाहाला. तोतयाकडील बातमी लिहिली ती कलली. धोंडजी सिंदे व आनंदराव गोपाल आले नाहीत म्हणौन लिहिले ते कलले. त्यास उभयेतास ताकीद बरेवजेने जाली. जलद येऊन पोहचतात. मुसा नारंजहि येत आहे. वरकड फौजास ताकीद जलदीच्या होत आहेत, येतील. सिंदे होलकर याजकडील फौजा निघाल्या. दरमजल येतात. राजश्री विसाजी केशव याजकडील लोकांचा जथ पाडवणे.

---

१ गणेश विश्वनाथ बेहेरे यास हें पत्र नाना फडणिसाचें आहे.

याउपरी जथाची निकड करणे. वातमी राखोन लिहीत जाणे. खर्चाची बेगमी व्हावी म्हणौन लिा. त्यास त्याची तर्तूद होत आहे. लौकरच ऐवज येईल. विसापुराहून सिसे व गोले देविले आहेत. त्याविसी किलेकरी यानी तपसील लिा म्हणून लिा. त्याजवरून किलेकरी यांस ताकीदपत्र दिल्हे आहे. सामान देतील. जाणिजे छ ८ साबान.

¶*Bhivrao Yeshwant is informed of some contingents being despatched to him, so also money and ammunition.*

No. 335] [*21-10-1777*

श्री

श्रीमोरया+

पूर्वीचा संप्रदाय आपणांस विदितच आहे विशेष. येथील वर्तमान आश्विन बहुल पंचमी भौमवासरपर्यंत यथास्थित असे. स्वकीयानंद वर्तमान लेखन करून तोषवीत असिलें पाहिजे. यानंतर आपणांकडोन पत्र आलें तें प्रविष्ट जालें. "वेदमूर्ति राजश्री सदाशिव भट सिंत्रे यांस तोतयाचा संसर्ग जाला, यास्तव त्यांजला दोषानरूप प्रायश्चित च्यांद्रायणें चार येकूण प्राज्यापत्य बतीस तीळ होम ब्राह्मणद्वारा व दोनशत ब्राह्मण संतर्पण व मुंडणपूर्वक उतरांग करऊन प्रायश्चित जाल्याचें उत्तरलेखन करावे" म्हणोन लेखन केलें, त्यावरून लेखन केल्यान्वयें च्यार प्राज्यापत्य तीळहोम ब्राह्मणद्वारा व ब्राह्मणसंतर्पण व मुंडणपूर्वक उतरांग विधियुक्त यथाशास्त्रशिष्टविद्वज्जनब्राह्मणांच्या विद्यमानें श्रीसान्निध्य वेदमूर्तिपासून करविलें. वेदमूर्ति राजश्री बापुभट सिंत्रे आपणांकडे पाठविले आहेत. सविस्तर निवेदन करतील. पूर्ववतप्रमाणें यांजवर ममता केली पाहिजे. विशेष काय लिहिणें.

¶*The Dev of Chinchvad sends back Sadashivbhat Shintre after making him undergo the penance for having joined the Pretender of Bhausaheb.*

No. 336] [*23-12-1777?*

श्री

राजश्री तात्या स्वामीचे सेवेसी

साष्टांग नमस्कार विनंती. तागायत छ २२ जिल्काद येथास्थित आसे विशेष. राजश्री विसाजीपंत बापू व नरसिंगराव याचें पतक पाठवावें म्हणून सरकारचें पत्र पाठविलें त्यास आज्ञेप्रमाणें सिद्ध आहेत; परंतु इकडे प्रयोजन नाहीं; त्यापक्षीं

+ एवढीं अक्षरें बाळबोध आहेत.

बंदोबस्त सरसुभियाकडून करवावा. अगर कोणी शहाणा माहितगार कोणी पाठऊन नाजूक जागे आहेत त्याचा बंदोबस्त व सें पनास गाडदी लोक ठेवणें तेथें ठेवावे. सारी फौज वर न्यावी; दोन तीन हजार फौज संरजामी आगर कोणती ठेवणें ती घाटमाथां ठेवावी म्हणजे फौजेचा दबा राहातो. येकाणी येकाणी फौज न्यावी येथेहि खर्च ठेवावा हें ठीक दिसत नाहीं. मला सुचला मजकूर लिहिला, याचा पुर्ता विचार करून लिहिणें तें लिहावें. बापू सिद्ध आहेत, येतील, पत्राचें उत्तर तिसरे दिवशीं यावें. ज्याअर्थी दादासाहेब मुंबईस, त्याअर्थी फौजेचें प्रयोजन नाहीं. न कले प्रसंग कैसा पडतो, ज्या आर्थी फौज ठेवणें ती हे लोंडघाटावर ठेवावी म्हणजे मुलकाची वसात होईल. इकडील रयतेने फौजेची दहशत भारी घेतली आहे. सर्व अर्थ ध्यानांत आणून काय लिहिणें ते लिहावें. चाकरीस सिद्ध आहे, परंतु उपयोग गैरउपयोग ध्यानांत आणून जें करणें तें करावें. मुबईकराचें ठीकसें नसलिया च्यार दिवस साराच जमाव असावा हें खरें आहे. इभ्रत आहे ती सोडूं नये, सर्व अर्थ ध्यानांत आणून लिहावें त्याप्रमाणें करूं. बहुत काय लिहिणें कृपा असावी हे विनंती. सांप्रत मनसबा काय? आपण कधीं निघणार हें कांहीच आपण लिहीत नाहीं. उपयोगाचीं पतकें जवल न्यावीं. मी खर्च खात पोटास नाहीं, उपयोग नाहीं. उष्णकालीं माझ्याही फार होतील. उगेच बसावें ही मर्जी दिसती. उपयोग आसलिया सरकारचाकरी आहे. जास्त गुंता नाहीं; नाहीं त्यापक्षीं त्या पावसाल्यांत निघालों तो दुसरा पावसाल्याची हाद पोहचे तो येथें न ठेवावे. दादाचे समेटून घ्यावें, किंवा मुबईकराचें पुतें मेलवावें हें बरें दिसलें. हे अभिमानास फार आहेत. तिकडील गृहस्ताचे गुढगे फार. उझ्यासीं कटकट असा प्रकार दिसण्यांत दिसते; याचेवरचे दुसरे ठिकाणीं जातील तर बरें आहे. सर्व आपले चित्तांत येत असेल. सुचलें ते लिहिलें आहे हे विनंती.

¶*Haripant Phadke is advised to effect a reconciliation with the English and Raghoba as the safest course out of the present impasse.*

No. 337] [*1778*?

श्रीगणपति

पुा राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री नरसिंगराव धायगुडे याजकडील तीन गावची पुन्हा जफ्ती जाली म्हणौन आपणास पत्र लिहिल्यास आपण विस्तार पत्री फारच लिहिला. यैसियास ते सर्व प्रकारे आपराधी, त्याच्या आपराधास उपमा नाहीच. परंतु आम्ही आपल्या हवाली करून घेतल्यावर गावची रदबदली करून मोकलीक

करून घेतल्यावर आमचे हवाली आसतां फिरोन जफ्ती जाहाली येणेकरून लौकीक वाईट. याजकरिता तिही गावची मोकलीक करून मोकलचिठ्या आम्हाकडे पाठवाव्या. नरसिंगराव आदीकरून किरकोल आपराधी बहुतच होते. आतां मोठ्या आपराधापुढें याजकडेच केवल शब्द लावावासा नाही. सर्व आपल्या ध्यानात आहे. परंतु मागें राज्यांत चाकऱ्या करून इनामे मेलविली, मुलाबालास कामास येतील, ती तूर्तच नाही आसे होते, यास्तव विनंती ल्याहावी. नाही तर आपराधी यांजविसी नच ल्याहावें आसेच त्यांचे आपराधहि आहेत. आपण थोर आहेत, कृपा करावीच. बहुत काये लिहिणे कृपा निरंतर आसावी हे विनती.

¶*Nana Fadnis is requested by Parashram Bhau to release the villages of Narsingrao Dhaygude, confiscated for his support to the pretender's rising.*

No. 338] [*10-1-1778*

पौ छ २२ जिल्हेज

समान सबैन पौष मास.

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी विनंती. सेवक धोंडो माहदेव सां नमस्कार विज्ञापना. ताा छ १० जिल्हेजपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाहाले तेथे आज्ञा की, येशवंतराव म्हसके यास किले त्रिंबक येथे आटकेस ठेवावयास पायात बेडीसुधां गाडदी दिमत सैद अमद याजबरोबर पाठविले असेत. तरी यास किले त्रिंबकीं पक्या बंदोबस्ताने बेडीसुधा आटकेस ठेऊन पोटास सेर देत जाणे म्हणौन आज्ञा. त्यास, आज्ञेप्रमाणे येशवंतराव म्हसके यास किले मजकुरी पक्या बंदोबस्ताने अटकेस पायात बेडीसुधा ठेऊन पोटास सेर देतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Dhondo Mahadeo writes to the Peshwa that, as instructed, Yeshwantrao Mhaske will be kept in confinement at the fort of Trimbak.*

No. 339] [*15-1-1778?*

श्री

राजश्री हरिपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. "होलकराकडील हिसेब निवडून नवलक्ष येकतीस हजार रुो ठरावात आले. काही मुदत मागतील ऐसे आहे. होलकरास किला व जाहागीर

१ येथून परशरामभाऊचें अक्षर.

देणे त्याचा निश्चये जाला पाहिजे व किले सिहगड येथील बोलण्याप्रो निभावल्या-वर खटे राहाणार नाही" म्हणोन लिा ते कलले. ऐसियास ऐवजाचा ठराव केलात, उत्तम केलत. ऐवजाच्या मुदती लाब लाऊ नयेत. जवलच्या लावाव्या म्हणजे फार उपयोगी पडतील. किला व जागीर देणे तो कराराप्रमाणे द्यावयाचा आहेच. किला मोल्हेर तालुक्या पो व जागीर हिंदुस्थानात द्यावयाची. त्यास किल्यास गेल्यावर त्याची योजणूक करून देविली जाईल. तुम्ही त्याचे समाधान करून किल्यास रवाना करावे. त्याचे समाधान करून रवानगी केली जाईल. त्यानी सिहीगडाचा करार त्यानी केला त्याजप्राा निभावला जाईल, मग त्यानी वाकडे का मानावे ? [१] सिंद्याचे पत्र नारो शंकर त्याकडील आहेत त्यास आले. ते त्याणी येथे पाहावयास पाठविलें. त्यांत लिहिलें आहे की "आम्ही तोतयास मारले, ब्राह्मण होते त्यासहि बिड्या घालून किल्यावर पाठविले आणि होलकरानी हारामखोरास वचनें देऊन वाचविले. तेव्हा आम्ही वाईट केले हा लौकीक व होलकरानी बरे केले असा जाहाला. पुढे सिवाजीपंत व धोंडोपंत होलकर सोडविणार. असें जालें तर उभयतां कारभाऱ्याची भेट फिरोन होणार नाही," असे फारच विस्तारें लिहिलें आहे. होळकराकडील फडशा लौकर करून पैका येई तें करावे. रा छ १९ जिल्हेज हे विनंती.

¶*Nana Fadnis approves of the settlement of the account of dues from Holkar made by Haripant Phadke. He also communicates to him Sindia's wrath at the lenient attitude taken up by Holkar towards the supporters of the Pretender whom he had seized.*

No. 340] [*25-1-1778*

पौ ७ मोहरम समान
हस्ते सांडणीस्वार.

श्री

सेवेसीं विज्ञापना तागायत छ २९ जिल्हेज वर्तमान येथास्थित असे विशेष-लोकांस गांव द्यावयाचा करार केला.

१ सेलगांव मानाजी सिंदे यांजकडे होते ते दारकोजी निंबालकर याजकडे बदल मुा.

१ रावोपंत आइतोले यांस गांव मानसिंग मान्याचा दिला.

---

१ पत्र नाना फडणविसाचें असून यापुढील मजकूर खुद्द त्यांच्या हातचा आहे.

१ फकीरजी फडतरे यांस पागेकडे मानाजी सिंद्याचे पागेचा गांव.
१ बाबूराव पाटणकर यांस यशवंतराव मान्याचा गांव देतो.

येणेप्रमाणें सनदा करून देतो. स्वामीनी चालवावयास आज्ञा करावी. गांव जप्त करावे, परंतु ज्यास कबूल केलें आहे त्यास द्यावे लागतील. विनंति लिहून पाठवीत असें. विनंतिपत्र पूर्वी लिहिलें आहे जे उपयोगी त्यास देऊन चालविलेंच पाहिजे. हरामखोरी केली त्याचें काढिलें, उपयोगी त्यास दिल्हें. दुसरें फकीरजी फडतरे यांस पाचशांचा गांव इना(म) स्वामीचे आज्ञेवरून दिला तो चालत नाहीं येविसीं विनंतिपत्र लिहिलें, परंतु चालत नाहीं. त्यास फकीरजी-बावा सारखा माणूस स्वामिकार्यास येकनिष्ट, मामाची लढाई पंढरपुरावर बिघडली ते समई फकीरजी फडतरे नीलकंठराव थोरात तोंडास उभे राहून जुजले, म्हणून आम्हीं पळणार वाचलों. फकीरजी फडतरे यास गांव अधिक नाहीं. यांचे जोडीचा सालसूद मिळणार नाहीं. या उपरी तरी कृपा करून गांव चालता केला पाहिजे. सटवोजी गावडे यास गांव देऊं केला आहे तो निश्चयांत आल्यावर लेहून पाठवीन. पत्राचे उत्तराची आज्ञा केली पाहिजे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. अशा वोढी ताणीचे दिवसांत सालसूदपणें वर्ततात त्यांचा परामर्ष स्वामी खेरीज कोण करणार ? हे विज्ञापना.

¶*The letter refers to the grant of some villages as inams to Manaji Sindia, Aitole and Fadtare, the last having played a heroic part in the battle of Kasegaon.*

No. 341] [*6-6-1778?*

श्रीहेरंब

श्रीमंत राजश्री दादा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक आबाजी महादेव सोवनी साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १० माहे जमादिलोवल जाणोन सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामींची आज्ञा घेऊन स्वार जालों ते श्रीमंत महाराज राजश्री दादासाहेबाचे चरणापासीं सुखरूप पावलों. महाराजांचे आज्ञेप्रमाणे राजश्री हरिपंततात्याहीं सेवकास रोजमरा दिल्हा. आपले आज्ञेप्रमाणें येथें आहे. विदित जालें पाहिजे. मी सेवक हा प्रकार तरी उघडाच आहे; परंतु केवळ पदरचा कुटुंबांतर्गत जाणोन माझा सांभाळ करणार महाराज समर्थ आहेत. विशेष काय लिहूं हे विज्ञप्ति.

राजश्री नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी, साष्टांग नमस्कार विनंती. लिा परिसोन सेवकाचा सांभाळ करीत जावा. पदरचा असे हे विनंती.

¶*Abaji Mahadev informs Moroba Dada of having reached the camp of Dadasaheb.*

No. 342] [*26-10-1776*

पो छ १३ रमजान

आस्विन मास

श्री

राजश्री भिमराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री माहादाजी सिंदे याची (तु)मची भेट जाला म्हणान कळले. उत्तम जाले. तेथील बातमीचे वगैरे अर्थ पाटीलबावास तुम्ही सांगितलेच असतील. अशांत त्यासी बोलून कोकणात कोणी उतरावयाचा तो विचार करून लौकर उतरावे. पाटीलबावा उतरत असिले तर उतम, अथवा तुम्हांस सागितले तर तुम्ही उतरावे. ते वरते राहातील. तुम्हाजवळ पहिले सामान आहेच. त्याहून अणखी पाहिजे असिल्यास फौज मागोन घ्यावी. तोतयाजवल च्यार पांच हजार माणूस आहे. अधिक (ना)हीं. त्यापक्षीं दोहीकडे जाल्यास चिता नाही. त्वरा केलियाने काम व्हावे असेच आहे. याकरितां लिहिले अर्थ त्यासी बोलून त्यांच्या तुमच्या विचारे होईल तसे करावे. को+कणांतील बंदी लौकर जालियाने कामच होते. धान्य वरते गेलियावर दिवसगतीवर पडेल. असा समय पुढे येणार नाही. रा छ १२ रमजान हे विनती.

¶*Nana Fadnis writes to Bhivrao, discussing the proposals regarding the campaign against the Pretender.*

No. 343] [*4-12-1774?*

श्री

राजश्री माधवराव सुभेदार

जंजिरे अरनाळा गोसांवी यांसी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित बच्याजी वामन फडके रामराम विनंती. येथील कुशल तागाईत छ २९ रमजानपावेतों सुखरूप असीं

+पत्र नाना फडणविसाचें.

विशेष. आपली आज्ञा घेऊन निघालों तों सा घटका रात्रीस पावलों. पाऊस पडोन हलाखी फार केली. कळावें. आजच बातमी आली कीं येणेप्रमाणें कलमें.

कोळी याणें दोन किल्ले घेतले त्यांची नावनिशी. मंदवारी घेतले किल्ले २

१ किले जाग (?)
१ किले मदगड

कलम १

२

मोकाशी गारावे (?) आपण सांगितलें, त्यास राजश्री येसाजीपंत तात्याचे कानावर घातलें. त्यास आपण सांगितलें त्याप्रमाणेंच सांगितलें. त्यास उत्तर केलें कीं गणपतराव यासी ताकीद करितों. त्यास त्या गावचें नांव व मोकाशी कोण त्याचें नांव लिहून पाठवावें. आपण लिहून दिल्हें होतें तें पावसानें भिजलें, याजकरितां लिहून पाठवावें. १

सोटेयाचे हटकिले, त्यास देतो म्हणोन बोलिले आहेत, मागाहून सनद घेऊन पाठवितों. कलम १

श्रीमंत दादासाहेब तापी उतरून पुणियासी येतात; याजकरितां पंधरावें दिवशीं राजश्री भिकाजीराव यांसी पाठवावयाचें करावें, प्रस्तुत न पाठवावें.

श्रीमंत राजश्री सखाराम बापू यांसीं फार बरें वाटत नाहीं, याप्रमाणें वर्तमान कागदीं पत्रीं आलें. आपणांस कळावें.

कलम
१

आपण दोन गलबतें धरून आणिलीं, त्यांचीं पत्रें आज येथें आलीं. वेगळे हुजुरेहि आले कीं गलबतें इंग्रजांचीं सोडावीं. माल सुद्धां सोडावीं याप्रमाणें हुजूरचें पत्र आलें आहे, तेंहि आपणांकडेस हुजुरे घेऊन येतील. याजकरितां मालांची उतावली करावयाची नाहीं. इंग्रजांचा तह होतो याजकरितां आपणांस लिहिलें असें. १

राजश्री वेंकाजीराव सुर्वे यांसी पुणियासी न पाठवावें. वैकट(?)मात्र पाठवावी. मशारनिलेस न पाठवावे. मागाहून लिहून पो——कलम
१

गलबताच रामप्रसाद याच कानावर घातलें. त्यास उत्तर केलें कीं खासा बाहेर जाऊं नये. गलबत सोय पाहून आठांदिवशीं देतों; व अरमार, गुराबा व गलबते वसईपैकी आहेत

गलबत चोसरी तरती केली, कोठी उजरी केली, परंतु दोन गाबडी पडली याजकरितां कांठी उतरली. गाबडी जाहाली म्हणजे तर मागती उजरी करितों. आज्ञा प्रमाणें दर्यावर्दी व सिपाई चढवितों. कलम १

आडेशेरी लोकांस पाहिजे त्याचे विचारिले ; त्यास साबानपैकी भात आणवावें. त्यास मागाहून जाबसाल घेऊन पाठवितों. कलम १

तींहि देतों. याप्रमाणें बोलले आहेत. जाब घेऊन पाठवितों. १

गला गणेश हुजरा (?) येतो कळावें. भात विकिलें म्हणोन येसाजीपंत पुसत होते. लागला नाही. (?)

¶Bachaji Vaman Phadke writes to Madhavrao, Subhedar of Arnala, some news of his place—particularly the capture of two forts by the Kolis, the rumour of Bapu's illness, the capture of two English vessels and of Dadasaheb proceeding to Poona etc.

No. 344] [*6-11-1778*

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री तात्यासाहेब

स्वामींचें सेवेसी

आज्ञांकित सेवक विठल सामराज चेरनावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना. ताा छ १६ सवालपरियंत मुाा महेश्वर येथे वर्तमान येथास्थित आसे विसेष. इकडील वर्तमान पेशजी श्रीमंतास विनतीपत्री लिहिले आहे. सांप्रत श्रीमंत राजश्री दादासाहेब सुरतेसच आहे. खानदेशातील तर सुलतानपुरीहून चेंदरराव पवार दसऱ्याचे दिवसीं निघून गेला. सुलतानपुरांत होळकराचे ठाणे बसले. होळकराची फौज हाजार आठसे जमली आहे. ते रो गणेशपंत बेहरे यांस जाऊन सामील होणार. ते ते मिलून नंदुरबारेस जाणार. येथे राजश्री बाळाराव गोविंद आहेत. त्यानी बाईसी बोलू(न) रो पाटीलबावास पत्रे व कारकूण पाठविले आहेत. तेथून उतर आलियावर काये ठरेल तें लिहून पाठवीन. मीहि काल बालारायास भेटायास बाईस पुसोन गेलों होतो. भेट जाली. कितीक मजकूर ते बोलिले ते 'श्रीमंताच्या विनंतीपत्री लिहिला आहे. रो चिंतो विठल पाटीलबावाजवलून निघून गेले होते, ते फिरून उजेनीतच कोनी

ब्राम्हणाचे घरीं सांपडले. त्यास व आणीख तिघेजन पेशजी पत्रीं लिहिले आहेत ते येकूण चौघाजनास पुण्यास पाठवणार. बाळाराविहि ल(व)करीच येथून उजेनीस जानार. वरकड वर्तमान पेशजी पत्रीं लिहिले आहे. सेवकाची खर्चाची फार विपते आहे. वारंवार लिहितो म्हणून स्वाम रागास येतील. मी तरी स्वामीसिवाये कोणास ल्याहावे? हे विज्ञाप्ति.

¶*Vithal Samraj writes to Haripant news about Raghunathrao being at Surat, Holkar capturing Sultanpur and Balarao Govind sending communications to Mahadji Sindia about concentration of troops.*

No. 345] [*Dec. 1778*

श्री

दंडवत विनंती उपरी. आपली चिठी प्रविष्ट जाली. इंग्रेज पनवेली अलीकडे आहे. च्यार घटिका रात्रीस उदईक स्वारी निघावी म्हणौन लिा. ऐसियास आपल्या लिहिल्याप्रमाणे तयारी असे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*The English have left Panwel and are advancing, reports the letter.*

No. 346] [*11-12-1778*

श्री

श्रीमत राजश्री तात्या

स्वामीचे शेवेसी

पोो विसाजी आपाजी साां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २१ जिलकाद मुकाम नजीक बेलापूर सुखरूप असे विशेष. हिकडील वर्तमान यैकण्यात आढलात येते ते वरचेवर डांकेबराबर व मुजरत लिहून जाते, त्याचे उतर काहीच येत नाही. त्याजवरून पत्रे पावतात न पावतात याचा संदेह पडून हाली सविस्तर लिहिले आहे.

श्रीमंत राजश्री दादासाहेब मुंबईत आहेत. तहाचे बोलणे बाबूराव काणे याचे विद्यमाने होत आहे. त्यांतील मजकूर आपणाकडे लिहून जात आसेल तो खरा. परतु माारनिलेची पत्रे येथे येतात त्यातील व

वसईचे किल्यांत राजश्री विसाजीपंत सरसुभेदार यांजकडील येसोबा चांगला माणूस आहे, परंतु उभय पक्षीं वैमनस्य पडून संशय वाढला आहे. आपलाले हुशारीविसीं उभयता सावध आहेत. विश्वास परसपरे नाही, असें

ठिकाणची बारीक शोधा पाहातां हैदरखान, गोवेकर फिरंगी व हिकडे राजकारणांचे घाट घाटीतच आहेत. त्यातील बलकटी होयें तों हिकडे तहाचे बोलणे लाऊन दीर्घसूत्रावर घालोन बनल्यास मसलत बसवावी. काहीच न बनल्यास तहाचा मजकूर प्रातच आहे. किटणास विलायतीस पाा आहेच. तो येई तों मुंबईकर बाह्यात्कारे निस्पृत्व दाखऊन आपण होऊन आपले आश्रयास आला तो परसपरे आपण होऊन समजोन तह करून गेल्यास संतोष. तह न करी तर बलात्कार नाही. कोणीकडे जलमार्ग खुषकीने जाऊ लागल्यास मना नाही. यथाशक्ती पोंहचऊन द्यावे असाहि प्रकार दिस्तो. कदाचित राज्यांतील फितूर मोडून सरकारचे कल्माचे आन्व बीज वाढत आहे. शत्रूची संधी समीप. स्थल नामी. यास्तव येविसीची सावधता कर्तव्य आसेल ती करावी. यैकिला मार लिहिला आहे, परंतु खरा आहे. राजश्री भिवराव आबास सांगितला आहे व त्यास समजला आहे. त्याणीहि लिहिलेच आसल व येथे विसाजीपंत सुभेदारासहि त्याणीं सांगितले लिहिले आहे. काय घडेल पाहावे. कलम

१

राजश्री भिवराव आबा येथे आले. लोभ कर्तात. प्रस्तुत ते मी येथेच आहों. हिकडील सदरहू लिहिल्या कलमाचा मजकूर त्यासहि सांगितला व समजला त्याणी लिहिलेच आसेल.

१

(अपूर्ण)

¶ *Visaji Apaji writes to Haripant Tatya about Raghunathrao carrying peace negotiations with the Poona Government and at the same time intriguing against them with the Portuguese and Haidar. The writer also mentions the differences that had arisen between Visaji Keshav of Bassein and Yesoba who was formerly a very trusted man of his.*

No. 347] [*19-12-1778*

श्री

राजश्री[१] भिवराव स्वामीचे शेवेसी

विनंती उपर. आलीकडे दोन दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नाही तर मुकाम कोठे आहे, पुढील बातमीचें वर्तमान काय हे लिहून पाठवावे. लोहगडची बातमी काल आली की, श्रीमंत खोपवलीस आलें. सरंजाम लोक सांगतात इतका

१ सर्व पत्र नाना फडणविसाचे हातचें.

नाही. राजश्री बाळकृष्णपंतासहि लोहगडास लिहून पाठविले की, वर्तमान येईल ते तुम्हाकडे लिहून पाठवीत जावें. हुजूरचे गाडदीहि[१] रवाना केले, पावलेच असतील. मुसा नारंजाचीहि रवानगी करतो. कापडहि थोडे बहुत तुम्हाकडे रवाना करविले. लौकरच पावेल. सिंधानी अलंदीहून कूच करून भोसरीवर मुकाम केला. होलकरहि आज कूच करून तेथेच गेले. उदईक आम्ही कूच करून तेथे जावें असा विचार आहे. तुम्ही पत्र पाठविलें ते पावलें व यादहि पावली. अमबास्या गेली, अतां चिता नाही. रा छ २९ जिलकाद हे विनंती.

¶*Nana Fadnis sends to Bhivrao Yeshwant, Gardis, Monsieur Noronha and also Sindia and Holkar.*

No. 348] *[20-12-1778*

पौ छ ६ जिल्हेज तिसा

सबैन पौष मास.

श्री

राजश्री भिवराव येशवंत स्वामी

गोसावी यांसी

विनंती उपरी. हुजूर गाडदी दिमत हाय यांस तुम्हांकडे रा केले आहेत. आा

८६ दिा सेखलाल

५० दिा उमर चाहूस

५२ दिा इसफबेग

१९ दिा हाजी हुसेन

१२ दिा इमामखान

२८ दिा दरवेस ममद

११ दिा मोहिदीखान

६५ दिमत बाहादरजंग

२७ दिा नूरखान

१ विसाजी माहादेव कारकून कामकाजास

३४७

येकून तीनसे सत्येचाळीस आसामी पा आहेत. याची हाजिरी घेऊन चाकरी घेत जाणे व यास दारूगोली लागल्यास पाहून देणे. जाणिजे[१] छ ३० जिलकाद सुा तिसा सबैन मया व अलफ हे[२] विनती.

¶*This is a list of Gardis ordered to join Bhivrao Yeshwant.*

---

१ नेरील नाना फडणविसाच्या हातची. २ यापुढील मजकूर बापूच्या हातचा.

No. 349] [*22-12-1778*

पौ: छ ३ जिल्हेज तिसा पौष

श्री

राजश्री भिवराव येशवंत स्वामी
गोसावी यांसी

विनंती उपरी तुम्ही पत्रें पाठविलीं तीं पावलीं. भोमवारी तलाव्यास[१] जाऊ म्हणौन लिा ते कलले, व खर्चास छ १ जिल्हेजचे आठवड्याकरिता ऐवज पाठवावा म्हणौन लिा ते कलले. त्यास फौजेचे आठवड्याचा आकार किती होतो ते तपसीलवार लेहून पाठवणे त्याप्रमाणे ऐवज रवाना होईल. कोकणातील बातमीचा मजकूर व फौज कोकणात रवाना व्हावी येविसीचा मजकूर लिहिला तो कलला. त्यास फौज रवाना व्हावयाची तर्तूद होत आहे. जाणिजे[२] छ २ जिल्हेज सुा तिसा सबैन मया व अलफ.

¶*Nana Fadnis asks from Bhivrao Panse weekly estimates of expenses of the troops under him.*

No. 350] [*23-12-1778*

पौ छ ३ जिल्हेज तिसा सबैन

श्री

राजश्री बाजीपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते व बातमीचे पत्र कोकणातून तुमचे कारकुनाचे आले ते, ऐसी पाठविली ती पावली. लिहिला मजकूर सविस्तर कलला. कोकणांत फौज लौकर रवाना व्हावी येविसी लिा ते कलले. त्यास फौज रवाना व्हावयाची तर्तूद होत आहे. राजश्री नागो राम तल्यानजी आहेत, त्यासहि जांबुलपाड्याकडे लोक आले आहेत त्याचे पारिपत्याविसी लिहि गेले आहे. रा छ ३ जिल्हेज हे[३] विनंती

¶"*Forces are being dispatched to Konkan*", *writes Nana Fadnis t Bajipant Joshi.*

---

१ टेहळणी. २ पत्र नानाचें. ३ पत्र नाना फडणविसाचें.

No. 351] [23-12-1778

पौ छ ३ जिल्हेज

सन तिसा सबैन पौष

श्री

राजश्री[+] भिवराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपर. तुम्ही मंगलवारचे पत्र पाठविलें तें पावलें. सारे सरदार तयार करऊन इंग्रजाचे मोहल्यावर जाऊन तोफा व बाण लागू केले. पुढे आले होते त्यास माघारे घातले. प्रतिनिधीची फौज व गाडदी आले नाही. व खर्चास पाठवावे म्हणोन लिहिलें ते कळलें. इंग्रेजावर मारगिरी करून अजमास पाहिला, फार चांगले केले. पुढेहि मजबुदीनें सावधतेने जात जावे. प्रतिनिधीची फौज काल पावली असेल, अथवा आज तर पावेलच. गाडदी येथून रवाना केल्यास च्यार दिवस जाले पावले असतील. खर्चास ऐवज उदईक रवाना करतो. चिंता न करावी. वरचेवर वर्तमान लिहून पाठवीत जावें. आम्ही आज कूच करून चिंचवडापुढे दोन कोस पवनेवर येतो. होलकराकडील फौज तुम्हाकडे जावयाविसी त्यास ताकीद केली आहे. तेथे त्याकडील किती आहे हे लिहून पाठवावें. रा छ ३ जिल्हेज हे विनती.

¶*Nana Fadnis compliments Bhiwarao Panse for the first victory gained over the English and informs him that the Pratinidhi's contingents and Holkar's forces are being rushed to his assistance with all possible dispatch.*

No. 352] [24-12-1778

पौ छ ५ जिल्हेज

तिसा सबैन पौष प्रातःकाल.

श्री

राजश्री[+] भिवराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपर. तुम्ही छ ४ जिल्हेजची पत्रें पाठविली ती पावली. लोहगडकरी याकडील वगैरे व खर्चाविसीचे लिहिले ते कळले. त्यास तूर्त पांच हजार रुपये पाठविले आहेत. आम्ही, सिंदे, होलकरसुधा आज गुरुवारी तलेगाव येक कोस येथे आलो. प्रतिनिधीची फौज किती पावली हे लिहून पाठवावें हे विनंती.

¶*Nana Fadnis sends money to Bhivrao and says that he has advanced as far as Talegaon with Sindia and Holkar.*

\+ सर्व पत्र नाना फडणविसाचें.

No. 353] [24-12-1778

पौ छ ९ जिल्हेज तिसा
पौष

श्री

विज्ञापना. ताा गुरुवार च्यार घटका दिवस सायेंकालचा पावेतो वर्तमान येथास्थित आसे विशेष, वडिली आसीर्वादपत्र पाा ते पावे लिाा वर्तमान कलले. सरकारची पत्र आपण लिाा ते पाहिले. मी आपलेहि दाखविले. आज कूच करून कानेवाडीस आलो. सविस्तर उदईक लिहीन. आणीक पागा वगैरे याची रवानगी उदईक करवितो हे विज्ञाप्ति.

¶*This is a despatch from the field of action intimating the arrival of a contingent at Kanewadi.*

No. 354] [25-12-1778

पौ छ ७ जिल्हेज तिसा
सबैन पौष मास.

श्री

राजश्री भिवराव येशवंत स्वा-
मी गोसावी यांसी

विनंती उपरी. तुम्हाकडील फौजेतील लोक मुलकात लुट करून उपद्रव करितात व सरकारची माणसे बातमीस जातात त्यास व आणखी वाटसरास लुटितात म्हणोन हुजूर बोभाट येतात. त्यास हे ठीक नाही. तरी[१] तुम्ही फौजत ताकीद निक्षूण करून गावगना मुलकात व वाटसरास व सरकारचे माणसास कोण्हेविसी उपद्रव करू न देणे. बोभाट येऊ न देणे. जाणिजे छ ६ जिल्हेज. सुाा तिसा सबैन मया व अल्फ. तांकिदीस आपण आलस करू नये हे विनती.

¶*Sakharam Bapu to Bhivrao Yashwant, asking him to enforce strict discipline in the forces under him so that there should be no complaint from the ryots.*

---

१ या पुढील मजकूर सखाराम बापूच्या हातचा.

No. 355] [28-12-1778

पौ छ १२ जिल्हेज तिसा
सबैन पौष

श्री

राजश्री बाजीपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्हाबरोबरचे फौजेत कहीस ताकीद नाही. ब्राह्मणाचे गाव उकसाण, करंजगांव वगैरे गाव कहीवाले लुटितात. घरोघरचा गला मनस्वी नेला. असे असोन रोजमरियाचा बोभाट लिहितां, यैशास फौजेत लूट गांवगना न व्हावी येविसी चांगली ताकीद करावी. गावगनाचा गला वगैरे लस्करांत लुटीस काय गेले याच्या यादी आणविल्या आहेत. त्या आलियावर ऐवज होईल तो त्या यादीप्रमाणे लोकांच्या रोजमरियांत वजा करावा लागेल. रा छ ९ जिल्हेज. [1]तुम्ही तेथे असता गावाचे गाव लुटून घरातील गला वगैरे झाडून नेले हे ठीक न जाले. याउपर तरी बंदोबस्ती चांगली करावी हे विनंती.

¶*Nana issues a sharp reprimand to Bajipant Joshi for the want of discipline in his forces.*

No. 356] [29-12-1778

श्री

राजश्री भिवराव येशवंत स्वामी
गोसावी यांसी

विनंती उपरी. तुम्ही पत्र छ १० जिल्हेजचे पाठविले ते पावले. चंदीचा मजकूर व खर्चाचा प्रकार व इंग्रजाचे पलेटणाचे चौकीचा अर्थ लिहिला तो कलला. त्यास चंदीविसी बापूजी वामन यास निक्षूण ताकीद जाहाली. त्याणे खर्चासहि ऐवज नोबतराव याजकडे पाठविला. चंदी त्यापासून घेत जाणे. खर्चास तूर्त तुमचे तसलमातीस लिहून पोतापैकी आबू मा व उमरखान सांडणीस्वार दिमत पागा हुजूर याबा रुपये ५००० पाच हजार पाठविले आहेत, घेऊन पावल्याचा जाब पाठवणे. कोकणात फौज नेमिली निघाली. दरमजल जाईल. गरनालेविसी सागितले आहे. रवाना होईल. [2]जाणिजे छ १० जिल्हेज सुा तिसा संबैन मया व आलफ. हे[3] विनती.

¶*Nana Fadnis and Sakharam Bapu communicate to Bhivrao Panse the arrangements made by them for the expenses of the army.*

---

१ यापुढील मजकूर नानाच्या हातचा. २ तेरीख नानाची.

३ 'हे विनती' बापूची.

No. 357] [4-6-1779

श्री

तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यांजकडे तळेगावचे मुकामी इकडे आले. ते समई खर्चास द्यावयाचा ठराव माहादजी सिंदे याचे विद्यमाने जाला त्याप्रमाणे का बा सरंजामी सरदार वगैरे दरकदार यांजपासून घ्यावयाचा करार केला ते देविले. छ १८ ज्यावल आखेर सन तिसा सबैन

रुा

२२५०००

पौ खंडेराव त्रिंबक सरंजामी यांजकडे करार केले २५००० रुा पैकी हरि बावाजी यांस पाा इटावे येथील फाजिलाबाा रदकर्जी देविले रुा ५००० बाकी वरात छ ६ सफरची आहे. परंतु ऐवज पावला ना (अपूर्ण).

¶*Arrangements for paying off the expenses of Raghunathrao are mentioned in this paper.*

No. 358] [1779?

श्री

सारांष कीं जनराल माणसाची मनसबी करीत असल्यास आम्ही बोलतों तें शहरचे हजारों माणसांस ठाऊकच आहे; आणि जनराल याचे मनांत टाला द्यावयाचा असल्यास इनसाफ करावा असें जनरालास संकट घालीत नाहीं. गाडर्ड तेथें लटकें बोलतात, त्यास ते मातबर मनुष्य, तेव्हां त्यास आम्हीं खोटें म्हणावें हें उचित नाहीं; व त्याणीही कौशलांत लटक्या गोष्टी बोलाव्यो यांत त्याची काय शानी? जर करितां आम्हीं मनसबीस राजी नसतो तरी तुम्हांपासी फिर्याद कशास करितों? त्यास हा मजकूर तुम्हीं जनराल यासी बोलणे छ १० जिल्हेज.

¶*This appears to be Raghoba's complaint against Goddard made to the General (Hornby).*

No. 359] [Jan. 1779?

श्री

विनंती विशेष. चिठी पाठविली ती पावली. रात्रीस इंग्रजाची तीन पलटणे छाप्यास येत होती. त्यास खिंडीत होलकराची चवकी होती, त्याजमुळे बातमी

कलताच माघारी गेली. त्यास छबिन्यास व गोटात सावधगिरी करावी म्हणोन लिा त्याप्रो केली. प्रात:काली भेटीस यावे म्हणौन लिा त्याप्रो येतो. हे विनती

¶*The writer informs (Nana) that three English platoons that had come for a night attack had to retire before Holkar's guard posted at the mountain pass.*

No. 360] [*Jan. 1779*

श्री

राजश्री भिमराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही होतां तेथून निघोन आमचे लस्कराजवल आला म्हणौन ऐकिले. त्यास तुमची भेट जाली पाहिजे याजकरिता तुम्ही व बाजीपंत यावें. हे+ विनंती.

¶*Nana asks Bhivrao Panse and Bajipant to see him.*

No. 361] [*1-1-1779*

श्री

राजश्री भिवराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही पत्र पो ते पावले. लिहिले वर्तमान कलले. आज इंग्रजास आम्हास अंतर फार पडले. उदैक कूच करून बाजूस जातो म्हणौन लिा ते कललें. येक दिवस अंतर पडले, चिंता नाही. आज सडी स्वारी करावी असा निश्चय जाला. उभयता सरदार पुढे गेले. आम्ही लौकरच निघोन येतो. कलावे. तिकडील वर्तमान वरचेवरं कलवीत जावे. रा शुक्रवार सा घटका दिवस हे[१] विनती.

¶*Nana acknowledges the receipt of military intelligence from Bhivrao Panse regarding the movements of the English army.*

\+ चिठी नानाची. १ अक्षर नाना फडणविसाचे.

No. 362] [3-1-1779

पौ छ १४ जिल्हेज सन
तिसा सबैन पौष

श्री

राजश्री भिवराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही दोन तीन पत्रे पा। ती पावोन लिहिले वर्तमान सविस्तर कळले. इंग्रज कूच करून दोही घाटाचे चिमट्यांत येऊन राहिले आहेत. आम्ही खबरदारीने आहो. खासा स्वारीचे कूच होऊन पुढे आले म्हणजे बुनगे पाठीमागे ठेऊन सडे पुढे राहू. फौजेची रवानगी होत असावी. कोकणांतील फौज जावी म्हणौन लिहिले ते कळले. त्यास कुचाचा मजकूर ठरत आहे. तुम्हाकडे लोक रवाना करितो. कोकणातील फौज रवाना जाली. तुम्ही नित्य गोळागोळी हिमत धरून करितां त्याजवर जरब आहे. रात बिरात सावध राहात जावें. रा। छ १४ जिल्हेज हे+ विनंती.

¶*Nana Fadnis to Bhivrao Panse that forces meant to operate in Konkan are on their way and reinforcements are being sent to him.*

No. 363] [4-1-1779

पौं छ १५ जिल्हेज
सन तिसा सबैन .

श्री

राजश्री भिवराव स्वामीचे शेवेसी.

विनंती उपरी. नित्य तुमचा व इंग्रजाचा प्रसंग होऊन तोफा होतात. त्य यैकण्यात हलक्या बाजेबाजे येतात. परंतु आज प्रात:कालापासून तोफाचे आवाज दाट यैकण्यात येतात. आपलेकडील बातमी काहीच आली नाही याजकरितां सांडणी स्वार पा। आहे तर सविस्तर लिहून पाठवावे. बातमी वरचेवर येत असावी. , रा॥ इंदूवार बारा घटका दिवस हे[१] विनंती.

¶*Nana Fadnis hears distant cannonading and asks Bhivrao to send frequent news of the fighting.*

+ पत्र नाना फडणिसाचें. १ पत्र नाना फडणविसाचें.

No. 364] [6-1-1779

पौ छ १८ जिल्हेज
सन तिसा पौष.

श्री

+राजश्री भिवराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपर छ १७ जिल्हेजचें पत्र पाठविलें तें पावले. लिहिले वर्तमान कळले. गोवित्रीवर त्यांचा मुकाम जाहाला. वाटेने मारगिरी चांगली केली. उतम जाहाले. उद्या कूच करतात किंवा मुकाम करतात लिहून पाठवावे. गोवित्रीवर मुकाम वाकडासा वाटतो, याचे कारण काय लिहून पाठवावे. रा छ १७ जिल्हेज मध्यानरात्र हे विनंती.

¶Nana congratulates Bhivrao Panse on the splendid work of his artillery and enquires why the English should have selected Govitri for camping as it lies rather out of the usual route.

No. 365] [10-1-1779

पौ छ २१ जिल्हेज

श्रीमोरया प्रां

राजश्री बळवंतराव गोसावी
यांसी

दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकाय कुशल लिहीत जावे विशेष. इंग्रेजाकडील व नबाबाकडील फौजेच्या कद्या तळेगांवचे आसपास होतात त्यास राजश्री नानासी बोलोन तळेगाव व इंदोरी या हरदू गावास कहीचा वगैरे उपसर्ग न लागे ऐसा बंदोबस्त करून घेऊन पत्राचें उतर पाठवावें. बहुत काये लिहिणे लोभ करीत जावा हे विनती.

¶Balvantrao is asked by Holkar to see that Talegaon and Indori are not molested by the foraging parties of the English and the Nizam.

No. 366] [13-1-1779

श्री

राजश्री भिवराव स्वामीचे सेवेसी

विनंती उपर. चिठी पाठविली ती पावली. लिहिला मजकूर सविस्तर कळला. आम्हीं आता भोजनास जातों. राजश्री पाटीलबावाकडे तोफ लांब

+ पत्र नाना फडणविसाचें.

पत्याची नाही. याकरता त्याकडे येक पाठविली, परंतु तिचा पला थोडा याकरता मारगिरी जाली नाही. सायंकाली सविस्तर लिहून पाठऊ. रा मंदवार अडीच प्रहर दिवस हे विनंती.

¶*Nana informs Bhivrao Panse that Sindia's fire proved ineffective owing to lack of long range guns.*

No. 367] [*13-1-1779 ?*

श्री

राजश्री भिवराव स्वामींचे सेवसी.

विनंती उपरी. तुम्ही आज कूच करून चिंचवडानजीक गेला म्हणौन कलले. त्यास उद्याचा दिवस तेथेच मुकाम करावा. मागील पुढील सारे जमू द्यावे. आज तुम्हाजवल पथके कोण कोणती आली हे सविस्तर लेहून पाठवावे. पुढील बातमीचे लक्ष वरचेवरी राखीत जावे. +सिंद्याची फौज किती आली व होलकराची पुढे आहे म्हणतात ती किती, हे लिहून पाठवावे. रा मंदवार हे विनंती.

¶*Nana Fadnis to Bhivrao Panse, making enquiries about the forces under him and advising him to encamp at Chinchwad.*

No. 368] [*14-1-1779*

श्री

यादी नारो गणेश यांस तुकोजी होलकर याची दिवाणगिरी सांगितली. सा सदरेस वस्त्रे वि बालाजी जनार्दन व सखाराम भगवंत छ २९ जिल्हेज सुा तिसा सबैन सनगे याो आख

८८	तिवट १
१४९	जाफरखानी १
३६	शेला धुवट १
१००	किमखाप ॥
३६९	३॥

¶*Robes of honour are conferred on Naro Ganesh on his appointment as Divan of Tukoji Holkar.*

+ पत्र नाना फडनविसांचें.

No. 369] [*14-1-1779*

श्री

श्रा नारो गणेश दिमत तुकोजी होळकर यांजकडे नजरेचा ऐवज व्यावयाचा करार केला. त्यास मानिलेचा ऐवज तुकोजी होळकर याजकडे येणे त्याचा हवाला आबाजी नाईक वानवले यांणी घेतला ते जमा सुा तिसा सबैन मया व अलफ

रुा

९००००० गुा आबाजी नाईक वानवले हवाल्यापौ

१४००० माहादेवभट शारंगपाणी यांजकडे मानिलेचा ऐवज अमानत होता तो सरकारांत व्यावयाचा करार केला. ते नवा लक्षाखेरीज

९१४०००

यासी भरणा

८६४००० नख्त

८५६९०० जमा परभारे वरात

७९०० खासगीकडे

८६४०००

५०००० कापड जमा जामदारखा किमत रुो

९१४०००

¶*The paper refers to the settlement of Nazar to be received from Naro Ganesh Shouche on the occasion of his appointment to the Diwanship of Holkar.*

No. 370] [*28-1-1779 ?*

श्री

स्वामीचे सेवेशी विनंती सेवक कृष्णाजीराम निसबत नारो कृष्ण सरसुभेदार सां जप्ती सर कानगोई कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ९ माहे मोहरमपावेतो मुकाम सुलतानपूर येथें सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री चिंतो विठ्ठल याजकडील सर कानगोईचे वतन सरकारात जफ्त

करून जप्तीची सनद सरसुभा सादर जाली त्यावरून जागोजागा कारकून गेले. सुलतानपूर व नंदूरबार येथील काम आम्हाकडे सांगितले. त्यांवर आषाढमासी दोहो महालचा सनदा घेऊन आपणास मौजे भातखेडे याचे मुकामी भेटोन नंदुरबारेस गेलो. तेथें गेल्यावर अठा दिवसानीं केसो कृष्ण दातार याची गर्दी जाली. एक महिना गांवांत भटकून राहिलो होतो. सोये पाहून बराणपुरास गेलो. कार्तिक मासीं राजश्री बाबूराव दामोदर निसबत राजश्री बाबूराव देवस्थले याणें सुलतानपूरची मामलत करून बराणपूरावरून आले. त्याचे समागमे आम्ही कानगोईचे कामावर आलो. ते समई चंदरराव पवार याचे लोकांनीं प्रगणियांत धामधूम फारच केली होती. रात्रदिवस त्याचे स्वार व लोक गांव मारीत होते. त्यावरून मामलेदार आम्हास म्हणूं लागले जे, तुम्हाजवल सरकार जप्तीची सनद फत्तेपूरची आहे, त्यास आमचे दोनसे स्वार व लोक आहेत, दारू गोली लागेल ती आम्ही देऊ, परंतु हा सरंजाम घेऊन फत्तेपूरचे पारपत्य करून तुम्ही आपला आमल बसवणे, म्हणजे प्रगणियातील दंगा तुटेल. त्यावरून सदरहूप्रमाणें सरंजाम येऊन एक महिना रात्रदिवस स्वारी फिरत होती. दोन तीन लडाया जाल्या. त्याजकडील सात आठ माणसे कामास आली. जागोजागा नाकेबंदी केली होती. तोफाची मारगिर फार होत असे, त्यामुले गांव लवकर हातास आला नाहीं. चदरराव लडाईत पडला हे वर्तमान ऐकोन गांव तजावजा जाला. ही बातमी राखोन पहाटेची स्वारी करून मागती जागोजागा नाकेबंदी केली. रात्रीं जाऊन छयापा घालावा ऐसी तयारी केली, तेच दिवशीं सायंकालीं राजश्री तुकोजी होलकर याचे तीनसे स्वार व मकाजी गिते व मकाजी लाबहाते व आनंदराव व बलवंतराव परभू ऐसे आले. तेच रात्रींस गांव अगदीं पलोन गेला. लोकानीं घरातील वस्तभाव कांहीं नेली नाही. जीव मात्र घेऊन गेले. गांव भरले राहिला होता. गांव पलोन गेला व हे वर्तमान मध्यान रात्रीं कलले ते समई स्वारी करून फत्तेपुरास गेलो. आमचे अगोधर घटिका होलकराकडील भले माणूस व स्वार व पेंढारी ऐसे गेले. आम्ही गेलो तोपर्यंत *· * मधे करूं लागले. आम्ही गढी राखून परवाने देऊन बसलो तो मकाजी गिते वगैरे आले. त्याणीं काठ्याचा मार करून आम्हास काढून दिल्हे. आम्ही श्रीमंताची द्वाही दिल्ही, परंतु कोण्ही मानले नाहीं. बेलासेक मारून काढले. त्याजवर बाहेर येऊन मागती चोरानीं एकटा गढीत गेलो आणि तोफा वीस मोजिल्या. बाकी सरंजाम मेला त्याची याद कोठवर धरावी. जे दृष्टीस पडेल त्याची याद अलाहिदा लिहिली आहे त्यावरून ध्यानास येईल. आम्हाजवल सनद होती ती घेऊन दुसरे दिवशीं होलकराचे लष्करात गेलो. त्यास सनद दाखविली. त्याणी सनद फेकून दिली आणि आम्हावर क्रोधायमान जाले आणि म्हणाले कीं आम्ही गांव

ठवांत नाही आणि तुम्हास देत नाहीं. याप्रमाणें उत्तर केले. कासिबा होलकर पाठवून गांव जाळून निमे गढी पाडोन टाकिली. तोफा होळकरानीं झाडून नेल्या. जमीनीत पंचवीस तोफा आहेत म्हणून ऐकिले आहे. त्यास तेथें आपले ठाणें घाळून रयतीस कौल देऊन गांवची अबादी केल्यास तोफेचा शोध येथास्थित लागेल. गांव बसल्यानें सरकारची नक्ष राहील. जमीनीचा झाडा पुरता निघाला नाहीं. वस्ती जाल्यास सोईसोईनें सर्व ध्यानास येईल तूर्त गांवचे रखवालीस दोनसे माणसे पाहिजे, तेव्हां रयेत येईल. रयेत सिद्ध आहे. ये विसींची आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. आपले लस्करांत आले होतो भेट जाली नाहीं. हल्ली तापानें मजला हैराण केले आहे. कालपासून तफावत पडली आहे. पत्राचे उत्तर आले म्हणजे पाणी घेऊन भेटीस येईन. तेथे आल्यास सविस्तर निवेदन करीन. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*Krishnaji Ram narrates the hardships which he had to encounter in suppressing the ravages of Keso Krishna Datar and Chandrarao Pawar in the province of Nandurbar where the writer had gone to attach the property of Chinto Vithal Rairikar.*

No. 371] [*After 2-2-1779 ?*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
गणेशपंत स्वामीचे सेवेसी

पोष्य बालाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावें विशेष. तुम्ही छ १४+ मोहरमचे पत्र पाठविलें तें पावलें. केसो कृष्णाचें पारिपत्य होऊन येकटा पळोन गेला; तों समशेरखान कोंडाईबारीकडे होता, तें हे येकत्र कानपुराजवळ होऊन सुरतेस गेले. सुरतेचा बंदोबस्तास दोन पलटणें मांडवीस होतीं, त्याणी तयारी करून समशेरखान च्यार पांचशें रावतांनशीं मिळोन नवापुरास आले. आणखी सरंजाम सोनगडास येणार. ते हे मिळोन जमाव करून पुढें येणार. आठ तोफा समागमे आहेत, म्हणोन बातम्या आल्या. त्यास आम्हांसमागमें होलकराची फौज होती, ती होल्कर घेऊन गेले. येक सरदार दोन हजार फौजेनशी ठेवावा व पेंढार ठेवावें तेहि न केलें, व दुर्गोजी भापकरहि आले नाहीत. त्यास पत्रें यावीं म्हणजे सारे मिळोन त्याचे रोंखावर जाऊ. फौजेची खर्चाची बेगमी करावयास आज्ञा करावी म्हणोन

+ २–२–१७७९.

विस्तारेंकरून लिहिलें तें सविस्तर कळलें. त्यास केसोपंताचें पारिपत्य जालें. त्याच दमानें तुम्ही फौजसुधा घांटाखालीं उतरतेस म्हणजे सुरतेकडे दगाण जाला नसतां. मध्यें मंद पडलें, याजमुळें त्यास सवड सांपडली. बारी चढोन वरतें आले. फिरोन स्वराज्यांत दंगा होईल, याजकरितां भापकरास पत्रें तुम्हाकडे लौकर जाण्याविशीं पाठविली व भापकर व तुम्ही मिळोन फौजसुद्धां लौकर जावें, म्हणोन पेशजींच पत्रें पाठविलीं आहेत, त्याप्रमाणें तुम्ही फौजसुद्धां तिकडे लौकर जावें म्हणजे त्यासहि दहशत पडेल. भापकरहिं फौजसुद्धां तिकडे जाऊन तुम्हांस भेटलेच असतील. सारांश तुम्ही त्याचा जमाव जहाला नाहीं, तों फौजसुद्धां जाऊन पोंहचावें. पेशजीं चालीस हजार रुपये तुम्हांकडे सांडणीवर घालून पाठविले तेहि पावलेच असतील. यास्तव लौकर सुरतेकडे हंगामा सुरू करावा, विलंब लागू नये, सावध फार असत जावें. रवाना छ २ सफर बहुत काय लिहिणें लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Nana Fadnis writes to Ganeshpant Behere : notes the contents of a letter from him about the joining of Keso Krishna with Samsherkhan and gives the addressee instructions to proceed against them along with Bhapker.*

No. 372] [*2-2-1779*

श्री

राजश्री हरिपंत स्वामीचे सेवेसी+

विनंती उपर. गुरुवारीं माहुलीस आलों. शुक्रवारी ईश्वरीकृपेकरून कार्यसिधिहि जाली. इंदुवारी रात्रौ येथून निघावयास मुहूर्त आहे. शनिवारी पुण्यांतील घरांत यावयास मुहूर्त आहे. तुम्हास कळावें याकरितां लिहिलें आहे. पुण्यांत कांही गलबल असलियास पुरंधरासच जाऊं. नसली तर तसेंच लिहून पाठवावें. मुख्य घर पुण्याचे, तेथें जाऊन मग पुरंधरास जाऊं. राजश्री कृष्णराव बलाळ मध्यस्तीस आले आहेत तिकडील वर्तमान तुम्हास कळतच असेल. होळकराकडील फडशा करून तुमचे जाण्याचें कसे वर्तमान लिहून पाठवावें. रा छ १४ मोहरम हे विनंती.

¶*Nana Fadnis in his autograph letter to Haripant intimates to him that he has arrived at Mahuli and that he would shortly proceed to Poona and Purandhar.*

\+ नाना फडणीस यांचे हातचें पत्र.

No. 373] [3-2-1779

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
खंडेराव त्रिंबक स्वामी गो।

पो। माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहिणे विशेष. तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेब यास खर्चास द्यावयास सरंजामी याजवर ऐवजाची पटी घातली. पैकी तुम्हापासून घ्यावे ते बा। देणे ता। विश्वासराव येशवंत याजकडे राजश्री माहादजी सिंदे याचे विद्यमाने तीर्थस्वरूपास द्यावया बा। रु। २५००० पचवीस हजार रु। देविले असेत, तरी पावते करून पावल्याचे कबज घेणे. जाणिजे छ १५ मोहरम सु॥ तिसा सबैन मया वं अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

बार

सदरहू पंचवीस हजार पो। पाच हजार रु। हरि बाबाजी यास इटावाचे फाजिलाबा। रद कर्ज देविले सा। वजा ५००० बाकी दादासाहेब याजकडे २००००

याप्रा। यादीस करावे.

¶*The Peshwa asks Khanderao Trimbak to pay 25,000 Rupees to Raghunathrao.*

No. 374] [7-3-1779

पौ। छ २१ सफर फालगुन
मास सु॥ तिसा सबैन.

श्री

राजश्री नरसीपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविलें तें पावलें. घाटास जाऊन बंदोबस्त करून राहिलों आहों, येविशीचा व मुंबईस सलाबत पडल्याचा अर्थ लिहिला तो कळला. त्यास घाटाचा बंदोबस्त करून राहिला. उत्तम केलें. बंदोबस्त चांगला असों देणें. बाळाजी विश्वनाथ फाटक यास घाटास आल्याचा मजकूर लिहिला. उत्तम केलें. काम पडल्यास जावें न जावें म्हणोन लिहिलें; त्यास

त्याजवळ काम पडावयाचें नाहीं. न जाणें. रोजमरेयाविशी लिहिले त्यास बेगमी करून देविलीच आहे. वराताचा ऐवज पटेसा करून देविला आहे रवाना छ १८ सफर हे विनंती.

¶*Instructions are issued herein for protecting the Bombay-Poona passes (ghats) with the utmost vigilance.*

No. 375] [*4-4-1779*

पौ छ २७ रोवल

श्री

राजश्री नरसिंह श्रीपत चौकी बोरघाट
गोसावी यासी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो माहादजी सिंदे दंडवत सुा तिसा सबैन मया व अलफ. इंग्रेज याकडील कासीद व माणसें इकडे येतात व इकडून मुंबईस जातात; त्यास तुम्ही दिकत करून अटकाव करिता म्हणून विदित जालें, त्याजवरून हें पत्र लिहिलें आहे; तर इंग्रेजाकडील कासिद इकडे येतील व इकडून मुंबईस जातील, त्यांस अटकाव येकंदर करीत न जावें. जाणिजे छ १६ रबिलावल. इकडून दस्तक घेऊन जातील त्यांस अडथळा न करणें. छ मजकूर बहुत काय लिहिणें.

¶*Mahadji Sindia to Narsinh Shripat, asking him not to detain the messengers of the English passing through the Ghat.*

No. 376] [*5-4-1779*

पो छ २९ रोवल चैत्र
सन तिसा सबैन.

श्री

सेवेसी कृष्णराव अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागायत छ १७ रबिलोवलपर्यंत येथास्थित असे विशेष. तीर्थस्वरूप राजश्री-दादासाहेबाकडील बातमीचे ब्राम्हण असामी दोन व माणसे तीन एकूण पांच असामी राजेश्री हरि बल्लाल याणी स्वारीतून कैद करून सातार्‍यास पाठविले आहेत. ते हल्ली सोडावयाचा करार केला असे; तरी सदरहू पांच असामी सोडून देणे. याखेरीज बंदिवान सातार्‍यास असतील त्याची सबब लाऊन नावनिसीवार ज्ञाडा

लेहून पाठवणे म्हणोन आज्ञा. त्यास पांच असामीचा येथे शोध केला; परंतु येथें येऊन त्यास कैदेत ठेविले याचा कोठे पथा लागत नाहीं. बाकी फिरकोल बंदिवान असतील त्याचा नांवनिसीवार जाबता लेहून मागाहून पाठवून देतो. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnarao Anant reports that five spies of Raghoba alleged to have been confined at Satara have not been traced at the fort.*

No. 377] [*9-4-1779*

पौ छ २१ रावल सन
तिसा चैत्र.

श्री

यादी बंदिवान किल्ले विसापूर येथें आटकेंत आहेत ते सुा तिसा सबैन मया व अलफ

१ तुळाजी आंगरे याची बायको.

१ बाबूराव आपाजी बावडेकर हा तोतयाकडे मिळोन खोपोली येथील वाड्याचे व गांवचे जलीस आला. तो तोतयाचें पारपत्य जाहाल्यावर आपटे येथील बंदरीं धरून किले करनाळा येथें आटकेंत होता, तो हुजूर नेऊन पुरंधर येथें ठेविला होता; त्याप्रमाणें बाबूराव सांगतो; व साल-गुदस्तां सनसमान श्रावणमासीं किले मजकुरीं हाजीर जामीन घेऊन, जामीनकतबा व बाबूराव यासी हुजूर पाठवणें म्हणोन आज्ञापत्र होतें, त्याप्रमाणें येथें चौकशी केली. येथें जामीन कोण्ही न मिळे, तेव्हां हुजूर लेहून पाठविलें. आज्ञा आली कीं जामीन न मिळे तरी पायीं बेडी घालून किल्ले मजकुरीं ठेवणें, त्याप्रमाणें ठेविला आहे.

२

येकूण दोन बंदिवान किले मजकुरीं आटकेंत आहत.

¶*Tulaji Angria's wife and Baburao Bavdekar are imprisoned and kept at the Visapur fort.*

6251

No. 378] [Oct. 1779

श्री

विज्ञापना सुरतेहून सराफी कागद आले; त्यांत तिकडील वर्तमान श्रीमंत कडोदावरच्च आहेत. राजश्री गोविंदराव गाइकवाड आद्याप वर आले नाहींत, पेटलादेस आहेत. अमदाबादेस लढाई जाली. राजश्री आपाजी गणेश याजकडील सें दोनसें माणूस कामास आलें. बोहरल्याचे पांच्यारसें ठार जाले. सराफाचे कागदीं लिहिलें आहे, सेवेसी कळावें. श्रीमंतापासून फिरंगी सुरतेस अगदींच गेले. लग्नामधें दारूचा उपद्रव जाला. तेथें दोन तीनसें फिरंगी उडाला म्हणोन गावांत वदंता दाट आहे. आपले गाळण्या आसपासच बहुत मुकाम जाले. यास कारण मागील पुढील सर्व येकत्र व्हावें व श्रीमंताचा रोख कोकणचे मार्गें जावयाचा व इकडे यावयाचा याअर्थी तेथें मुकाम असतील. त्यास भोंडगांवहि नजीक आहे. तेथें मुकाम जाल्यास हे आर्थ जात नाहींत; आणि तिकडेही दाब बसलो, आणि तृण काष्ट विपुल आणि चिमणरावहि पाये पसरूं पावणार नाहीं; येकूण या मुकामाहून दोनतीन आर्थ तेथें मुकाम केल्यानें अधिक होतात. यावर मर्जी. धोशा कोठें आहे, कोठवर आला, हे कृपापत्रीं लिहिली पाहिजे. आम्ही मागील फाजिलाकरितां सेवेसीं तीन महिने विनंती करीत होतो. त्यास कांही यैवज देविला नाहीं. पुढें खर्च उणा करावा तेंहि होत नाहीं. याची तरतूद जाली पा. तूर्त दाभाडियाचे इसमाचा मुकासा नंदुरबार परगणियांत आहे तो यैवज रुपये अठरा हजार होतो, त्याची नेमणूक राजश्री गोविंद हरिकडे आहे त्यास इतकारी (?) यैवज कृपा करोन लाऊन देविला पाहिजे; व बाळाराव याजकडोन यैवज परिछिन्न येत नाहीं, याजकरितां कृपा करोन पुण्यास चिटी देवावी. माझ्यानें मुरवतीकरितां बोलवत नाहीं; परंतु तात्या! चव महिन्याचा करार, त्यास येक वर्ष च्यार महिने होऊन गेले, आतां दम किती धरूं? हे ध्यानास अणोन यैवज देवावा. फार परीक्षा पाहिली. याउपर अंत न पाहावा. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*A news-letter giving news about Ahmedabad being taken by the English from Apaji Ganesh who suffered a heavy loss. An explosion at Surat during marriage festivities is also reported. The writer finally asks for some monetary help.*

No. 379] [29-10-1779

श्री

सेवेसी कृष्णाजी नारायेण, दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ १८ माहे सवालपावेतो, मुक्काम रनाळें क्षेम असो विशेष. आपलें

आज्ञापत्र आलें तें छ १७ सवाली, दोन प्रहरीं पावलें. बहुत संतोष जाहला. बातमीचा मजकूर आधिक उणा असेल तो लिहीत जाणें म्हणोन आज्ञा. त्या, छ १६ रोजीं, आमदाबाजेहून कासीद जोडी निघोन दादांचे लष्करांतून येथें येऊन पुढें बराणपुरास गेली. त्यांणीं जबानीं वर्तमान सांगितलें कीं, आमदा(बा)ज शहर बाहेरच्यानीं घेतलें. किल्यांत खंडेराव व आपाजी गणेश उभयेतां आहेत. हें वर्तमान चवदा रोजाच म्हणोन त्याणें सांगितलें. दुसरा मजकूर सुर्तेकडील साता रोजांचे कासीद सावकारी आले, त्याणी सांगितले इंग्रजानें बाहेर निघावयाचा मुहूर्त पाहिला होता. त्यांत दारूखाना उडालियावर बाहेर निघावयाचे तूर्त राहाविलें आणि दादासाहेबांस लिहोन पाठविलें कीं, कांहीं खर्चास द्यावे. नाहीं तर आमचें येणें तूर्त होणार नाहीं. याचे कारण आपले कुमकेस धोसा येतो. हा प्रकार खरा जर आहे तर आपण सुर्ते बाहेर निघो नये. नाहीं येत अशी बातमी इतक्यांत आलीतर मग सामील व्हावे. तोंपावतों उगच भ्रमांत असावे. याप्रमाणें तेथें लोक बोलत होते म्हणोन, कासिदानें जबानीं सांगितलें तें लिहिले. फत्तेसिंग यांस पत्रें गेलीं कीं, तुम्हीं तयार होऊन येणे. त्यास त्यांणीं लिहिले कीं, गोविंदराव या प्रांतांतून आपणांकडे गेलियावर मीहि सत्वरच येतों. त्याजवरोन गोविंदराव यांस पत्रें गेली आहेत. परंतु येतां दिसत नाहीं. ऐसी खबर येथें लोक बोलतात. ते सेवेसी लिहिलें आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Narayan reports news from Gujarat, especially the attempts made by Raghoba to enlist the help of the Gaikwad and the English.*

No. 380] [*1-11-1779*

श्री

सेवेसी कृष्णाजी नारायेण दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २१ सवाल पावेतों, मुक्काम रनाळें क्षेम असो विशेष. आज्ञापत्र आले तें पावले. त्यांत लिहिलें कीं, तोरखेड्याचें काम बहुत चौकशीनें करून राजश्री यादवराव यांजबरावर येणें. त्यास आज्ञेप्रमाणें बहुत चौकशी जोशी यांचे विचारें राजश्री यादवराव यांज * * * येतां, इकडील बातमीचा प्रकार रोज दहा रोज जाले, उज्यनीचा गोसावी सवदागर साल गुदस्ता उंटे घेऊन, दादांचे लष्करांत गेला. त्याचे उंट सरकारांत घेतले. शंभर उंट दर तीनसें प्रमाणें त्यापैकीं निमे रुपये दिल्हे. बाकी राहिले ते पुढें देऊं, याप्रमाणें करार केला.

तो गोसावी येथें आला. त्याणें जबानी सर्व मजकूर सांगितला. दादा सुरतेस तीन पलटणें बरोबर घेऊन गेले. बाकी लष्करांत आठ, दहा हजार फौज व चार पलटणें मानाजीबरोबर आहेत. मुक्काम गढे कांबळ्याचे अलीकडे आहे. सुरतेंत कांहीं नवी शिबंदीची तरतूद नाहीं. त्यांत आपली फौज गेली तर सुरतेंतून बाहेर निघावें आणि धोसा आलियास आपले जाग्याचा बंदोबस्त राखोन राहावें. याप्रमाणें त्याचा मजकूर आहे. वरकड पेशजी अमदाबाजेचें वर्तमान आले तें खोट; अलीकडे दुसरें कागदी येतात. परंतु कांहीं कोणी शहर घेतल्याची खबर सांगत नाहीं. अलीकडे उभयेतां गाईकवाड एकमत जाहले म्हणोन गोसावी सांगत होता. राजश्री गोविंदराव कूच करून आमदाबादेकडे राजश्री खंडेराव याचे सूत्रानें जाणार, हा मजकूर गोसावी यांणीं सांगितला, तो शेवेसी लिहिला आहे. मी रविवारी फिरोन तोरखेड्यास जातों. तूर्त तेथें काम चालावयाचें नाहीं. लोक सारे स्वारीस गेले, यामुळें काम राहिलें. स्वारी फिरोन आली म्हणजे काम लागेल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Narayan reports that Dadasaheb proposes to advance into Gujarat from Surat, should the Peshwa's army retire from the province. He also refers to the siege of Ahmedabad.*

No. 381] [*2-11-1779*

श्री

सेवेसी कृष्णाजी नारायेण दोनी कर जोडून साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाइत छ २२ सवाल, प्रहर दिवस पावेतों स्वामीचे कृपेंकरून वर्तमान येथास्थित असें विशेष. छ २० सवालचें पत्र आलें, तेथें आज्ञा कीं बांड्यावर स्वारी गेली ती फौज कुकुडमुंढ येथें आहे. सरकारचे लोक आले त्यास कांहीं दारूगोली देऊन त्याजकडे रवाना केले (आहे)त. त्या फौजेंत सरदार व कारभारी आहेत त्यांस पत्रें गेलीं कीं, जिकडे बांड्या गेला असेल तिकडे पाठलाग करून पारपत्य करणें. त्याजवरून त्यांणीं कूच करून त्याचे मागें जातों म्हणोन पत्र आलें; तिकडील बंदोबस्त येथास्थित आहे. दुसरा मजकूर श्रीमंताचे फौजेकडील बातमी राखीन लिहोन पाठवावयासी आज्ञा; त्यास येथून गुजरत राजश्री यादवराव भाऊ यांणीं दोन जोड्या रवाना केल्या आहेत. दोन तीन रोजेंत येतील. आलीयावर सविस्तर सेवेसी लिहितों. मार्गें लोकांचे कासीद श्रीमंताचे लस्करांतून येतात. इकडे बराणपुरास व नागपुरास जातात. वरकडही बहुत

सावकाराच कागदा यतात जातात, त्याचें वर्तमान मनास आणितों; परंतु अलीकडे कूच करून आले. तळ मौजेला होता याजकरितां कूच केलें; परंतु इंग्रेजांचे घरीं लग्नास श्रीमंत गेले हें निमित्य; परंतु इंग्रज तूर्त धोशाची बातमी आलिया-खेरीज पक्की मसलत येण्याची देत * * * * धोशा आपले कुमकेस येतो हा प्रकार खरा आहे, तर इंग्रज सुरत सोडून पुढें येत नाहीं. बाहेर सामान आहे तेंहि घेऊन जावें. असा त्याचा मजकूर आहे; याजकरितां मसलतीस तेथें श्रीमंत गेले आहेत. फौज तिकडे आहे व सरदार आहेत तेच आहेत. पोटभरू उगेच मिळाले आहेत, यामुळें तळ फौज फारशी वाटत्ये; परंतु दाहा हजारांअलीकडे आहे. बरकंड प्यादे वगैरे पाईचे आहेत. मानाजी तूर्त फौजेंत आहे. श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Krishnaji Narayan supplies news about the Peshwa's army proceeding against Bande and also about future possibilities and relations between Raghoba and the English.*

No. 382 [*3-11-1779*

श्री

राजश्री दादासाहेबाचे
सेवेसी

श्रीमंत सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये स्नो आज्ञाधारक चंदरराव पवार दंडवत विनंती. येथील कुशल तागायत छ २३ सवाल मुकाम अमोद येथें साहेबाचे कृपावलोकनेंकरून येथास्थित असो विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जालों ते रेवा उतरून कारवान प्रांत डबई येथें मुकाम केला. तो राजश्री फत्तेसिंग गायकवाड याणी सांगून पाठविलें, कीं डबई प्रगणियांत धामधूम न करणें. त्यांत आम्हांपासीं जमाव नवता. यास्तव कूच करून परगणे अमोदेस येऊन ठाणें बसविलें. जमाव स्वार प्यादे येतात ते ठेवितों; आणिकहि लोक बोलाविले आहेत, पुर्तेपणें जमाव करून डबईस जाऊं. आपल्या प्रतापेंकरून बंदोबस्त करूं. जे वेलेस आपलें आज्ञापत्र येईल ते वेळेस येऊन पोंहचू. निरंतर पत्र पाठऊन सांभाल केला पाहिजे. बहुत काये लिहिणे, लोभ कीजे हे विज्ञापना.

¶*Chandarrao Pawar informs Raghoba of his arrival at Karvan near Dabhai and of his efforts to mobilise army for him.*

No. 383] [8-11-1779

श्री

सेवेसी विनंती सेवक शंकराजी खंडेराव साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल छ २८ सवाल दीड प्रहर दिवस आपले प्रतापेंकरून येथास्थित असो विशेष. श्रीमंताचा मुकाम आहे तेथेंच आहे. इंग्रज सुरतेहून लस्करांत आले. श्रीमंताचा व त्याचा विचार होऊन चांदरात जाल्यावर कूच मुकाम होणार, याप्रमाणे वर्तमान आहे ते सेवेसीं लिहिलें आहे. आणिखही माणसें बातमीस लस्करांत पाठविलीं आहेत, ते आलियावर जैसें वर्तमान येईल. त्याप्रमाणें लिहून पाठऊं. कृपा लोभ करावा हे विज्ञापना.

पेंढारी पूर्वी इकडे आले होते ते येथून पलीकडे गेले नाहींत. नवापूर परगणियाची येक दोन गांवें झांबडाझांबड करून माघारे लस्करांत आले, हे वर्तमान सविस्तर गोविंद नरसी यानी आपणास लिहिलें आहे त्याजवरून विदित जालें आसेल; जर पेंढारियासी ताकीद होऊन वस्तभाव द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे हे विज्ञापना.

¶Shankraji Khanderao writes about the English having left Surat and joined the Raghoba's army.

No. 384] [21-12-1779

मंजूर

श्री.

भास्कर भिमाजी व जिवाजी माहादेव यास पत्र जे. आम्ही कजियाची हकीकत मुंबईस लिहिल्यावरून मेस्तर बाडम आम्हावर बहुत दिक आहेत व जनरेल गाडर्ड मेस्तर बाडम याचे बहुत दोस्त, सबब तेहि रुष्ट होऊन तेथें पंचाइतीच्या कौसलांत बोलतात कीं, श्रीमंतांचे माणसाची बेज्या वर्तणूक अशी श्रीमंतांची खातरनिशा होऊन माणसाचें मेस्तर बाडम याणीं पारपत्य केले. ते गोष्ट श्रीमंतांनीं मंजूर केली ऐसे जनराल हार्नबी याणीं आम्हास लिहिले आहे. यैशास हे गोष्ट आम्हास मंजूर असती, तरी आम्ही मुंबईस कशास लिहितों? ऐसें असोन तेथें गाडर्ड कौसलांत हे गोष्ट बोलतात. तेव्हां मेस्तर बाडमाची गाडर्ड वोढ धरितात ऐसें आम्हास समजले. प्रस्तुत मेस्तर बाडम याणीं आम्हांस सांगोन पाठविलें कीं आपण मुंबईस जनराल कौसलास पत्र द्यावें कीं आम्ही आपल्या माणसाची हकीकत तुम्हास लिहिली होती, परंतु मागाहून चवकशी करितां आमचे माणसाचा

6256

अन्याय; सबब मेस्तर बाडम याणा माणसाचें पारपत्य केलें, ऐसें पत्र मागतात. त्यास आमची गोष्ट खरी असोन ऐसें पत्र आम्ही कसे द्यावे? यास्तव दिल्हे नाहीं. तेव्हां हल्ली मेस्तर बाडम बहुत भीड घालून आपलें नांवें चिठी मागतात त्याची नक्कल पाठविली आहे. ती पाहून जनराल हर्नबी यास समजावणें की अशी चिठी बाडम मागतात, त्यास वाजबी असतां याप्रमाणें चिठी देऊ तर नये. परंतु बाडम खरे राहून त्याकरितां जनरेल गाडर्ड नाखुष होऊन कोण्हे वेळेस काय पेच घालतील हे न कले. गाडर्ड याजवर आमच्या कामाचा अखत्यार, सबब तुम्ही येविशी जनराल यास पुसणें कीं गाडर्ड याचा पेच आम्हावर न चाले अशी आपण आम्हास सलाह सांगावी. याप्रमाणें जनराल यास पुसोन ते काय उत्तर करितील तें जलद लेहून पाठविणें. जनराल याणीं सांगितले कीं बाडम पत्र मागतात तसें द्यावें तरी आम्ही देऊ आणि न द्यावे म्हणतील तरी देणार नाहीं. तरी हे तुम्ही त्यास समजाऊन उत्तर करितील ते लिहिणें. तोपर्यंत बाडम यास आम्ही थांबऊन राखतों. सारांष की बाडम पेचांत येत असल्यास मनसुबी सांगितल्याचा नफा आहे आणि ते पेचांत येत नसल्यास त्यांचे मुलुखांत राहाणें, तेव्हां त्यास नाखुष राखणें यांत फायदा नाहीं. तरी याचें उत्तर जनराल हार्नबी यास पुसोन लिहिणें. छ १२ जिल्हेज.

¶Raghunathrao, regarding the rowdism of some of his followers, seeks the advice of General Hornby with a view to avoid falling under the displeasure of General Goddard and Mr. Boddam.

No. 385] [*23-12-1779*

२

[पहिला बंद मिळाला नाहीं.]

र्धी याणी स्वामीबद्दल बहुत श्रम दिल्हे ते कोठवर ल्याहावे. याचा परिहा सांब करणार समर्थ आहे. मागां गुंडो सयाजी व जयराम दिनकर व सदाशि बाबूराव वगैरे आले गेले. त्या वेळचे बहुत करून श्रम व्यर्थच गेले. इस्माई- लखां व मोरो बाबूराव व शेरजंग वगैरे मंडळी उभी करून रुकुद्दौला मेल्यावर+ थोर मनसुबा रचोन उद्योग केला; परंतु काळ साह्य नसतां सिद्धीस न गेलें. यानंतर कालचक्रप्रयोगें येथपर्यंत नवबत पोहचली, कीं वैरी स्वहस्तें यादवन्यायें निमाले. बाकीहि त्यां मार्गेच जाणार. आपण सुरतेस दाखल जाले ते समयीं इकडे एक आवस्था जाली होती. मग सुस्ती जाल्यावर यांजला फिरून जीव आला.

+ अक्टोबर १७७५

आसो. आथ:पर आपणाकडे उद्योगहि जाला पाहिजे. एक एक दिवस रिकामा वर्षाचा जातो. सखाराम भगवंत कोशकीटकाप्रो कैद जालेयावर राहिल्यांची केवळ आब गेली आणि इतबार राहिला नाहीं. फौजेस कपर्दिक देत नाहींत. जीव मात्र राजी नाहीं. आणि आश्चीर्य करितात कीं या निर्माल्याचा आंदेशा करून तांब्र आदीकरून दिवसगतावर घालितात. अपूर्व आहे. पैका पेश नाहीं. आहे त्यांत बंदोबस्त नाहीं. कांहीं मिळत नाहीं. सरदार राहिले नाहींत. फौज नाहीं. आहे त्यास खावयास मिळत नाहीं. पागेचीं घोडीं उंट बज्या जालीं. पथ्याखालें वस्ती राहिली नाहीं. किलेदार सर्व बेदील. हजार पांचशें मनुष्य त्यांचें काय जें आहे त्यांणीं काय कर्तव्य? तेहि दैवहत बुद्धिहत जाले आहेत. सिंद्यासीं इद्रायेणें[१] फलवत् स्नेह होता. आलीकडे बहुतच विटलें आहे. तूर्त तुळजापुराकडे जाऊन उजेनीचा उद्योग दर्शविला आहे. त्यांचें आचरन फंदावांचोन नाहीं; व आलीकडे त्यास बुधीनेंहि टाकिलें आहे. आपण त्याजकडे निरोप आदीकरून पाठवितां परंतु निरर्थक जाणावें. होळकराचा प्रकार तर जघन्य. कृष्णापारचा शहे तर यांजमागें लागलाच आहे. मोगलाकडील साहित्य व्हावें तर तिकडे त्यांचे सहोदरावर गाठ आहे, म्हणून तहवरजंग वगैरे दाहा पांच सहस्र स्वार पैदळ तिकडे गेले. मंडापलीचे घांटी कृष्णातीरीं पांच पलटनें आलीं आहेत. त्याजवर चिरंजीव व धवसा पाठवणार. गोलकुंड्यात द्रव्यादि करून संचये केला आहे. त्या * * * खंदक खोल रुंद आधिकोतर करितात. भोसले तर कोन्हीहि मोजूच नये. इकडील वर्तमान या प्रकारचें आहे. तेव्हां आपणाकडोन आलस्य व्हावा हे यांचे दैवावांचोन काय योजावें! आस्तु.

सध्यां आपण बोरघाटावर शये देऊन खांसा स्वारी सुरतेहून सोनगडावर आली म्हणजे इकडे गर्भगळित होऊन कांहींचे बहींच होतें आणि फौजेची निगादास्त पन्नास सहस्रपर्यंत परिच्छिन्न करावी. हे गोष्ट ऐकतांच निंबाळकर मोगलाकडील वरीं बसले आहेत. ऐसेसे सरदार व चांगलचागले लोक सहस्रावधि स्वामीस येऊन भेटतील. खलक[२] चातकन्यायें लक्ष धरून आहे. आंगरेजांनीं आथ:पर दिरंग न करितां दाहावीस लक्ष तूर्तचे प्रसंगीं खर्चास मागे न पाहवे आणि त्याजला यावत्. * *

(पुढील बंद गहाळ; पुढें उलटून पाठीवर शेवटाकडून मागें.)

उद्भव बोरघाटीं काळिमा लागली आहे त्याचा डाग दूर करावा. येणेंप्रमाणें त्याचे कुनसल आदीकरून आपण खांसा बसोन विनंतिप्रा उद्योग करावा. जर

---

१ अत्यंत कडू असें एक लहान फळ आहे. पिकलें म्हणजे सुंदर दिसतें. २ दुनिया, रयत.

आतां न होय मग कोणता समय येनार? जीवितेचा भरंवसा काये? कोन्ही सहस्त्रायु नाहीं जे सें पंनास वर्षे आनीख वाट पाहवी. म्हणून लवनिमिष्य आलस्य न होतां कार्य घडलें पाहिजे. इकडील आंदेशा तिळप्राय न करावा. कोणास त्रान नाहीं. सर्व निस्तेज आहेत. व यदारंभी (अशा समयीं) नवाबास व धवसा यांस येकयेक पत्र आपलें आणि येकयेक आंगरेजांचे भयेप्रीतियुक्त जबाणी सेवकाची आगत्यरूप पाठवावी. आणि येक पत्र आपले हैदर नाईक यांसी असावें. सेवक इकडील सर्व बंदोबस्त करून घेतों. पत्रें बहुत युक्तीनें तेथील येवन आधिकारी आहे त्याचे विद्यमानें आगर आन्य प्रकारें सेवकाजवळ पाठवावी. हें जे संकलित विनंतिगर्भी जालें त्याचा विस्तार यापूर्वी चिरंजीव आनंदराये सेवेसीं पाठविला आहे, तो विनंती करील. त्याचे पाठवावयाचें कारण हेंच कीं पत्रोत्तर कोठवर ल्याहावें? समक्ष विनंती करतील. आलीकडे आपली आज्ञा जाली आणि शंकराजी मोरेश्वरास हुकूम जाला म्हणून या युक्तीनें सविस्तर लेहून पाठविलें आहे. विदित होऊन कृपा करून मुरंबा श्वीकारिला पाहिजे. सखाराम भगवंत याजलाहि बहुत श्रम आहेत; आणि मोरो बाबूराव यांस कोठडींत ठेविलें आहे. फार श्रमांत आहेत. घरें दारें लुटलीं. नगद तर दोन अडीच लक्ष रुपे व वस्तभाव आदीकरून पांघुणें बहुत निघालें. सखाराम भगवंत यांचें द्रव्य म्हातारपणचे, वीस लक्ष साहुकारियांतून आणि घरांतून सोने व मोहरा तीसांचें निघालें. नानाचें द्रव्यतर सिंद्याचें कपाळीं होतें. आपणास विदितच आहे. +धवसा छ १४ जिल्हेजेस डेरे दाखल जाले. हैदराबादेस जाणार विदित होय हे विज्ञापना.

¶*This is a long fragmentary letter with the first and some intervening sheets missing. It refers to the confinement of Sakharam Bhagwant, to the general hard times for all, to the attempts of the English in the Borghat and lastly to the confiscation of property of Moro Baburao and Sakharam Bapu.*

---

१ सल्ला?

+ येथून अक्षर निराळें. पत्र त्रुटित बंद २-५ सांपडलें. पहिला बंद गहाळ व पांचव्याचे पुढें आणखी एकादा बंद असावा. प्रथम एका बाजूनें सर्व बंद लिहिला जाऊन पुढें शेवटाकडून मागें पाठीवर लिहीत आणून बंद ३ वर पत्र पुरें झालें आहे. सखाराम बापू नुकता कैद झाल्याचा उल्लेख असून त्यानंतरचा १४ जिल्हेज म्हणजे पत्राची ता. २३-१२-१७७९ येते. रघुनाथरावाची तरफदारी इतक्या आतुरतेनें करणारा हा लेखक बहुधा पुण्याहून लिहीत असावा. रघुनाथरावाच्या पक्षाची व बारभाईंच्या पक्षाची सन१७७९ अखेरची परिस्थिति या कागदांत फार चांगली दिसून येते. भाषा सुंदर व अलंकारिक आहे.

No. 386] [1780?

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नारोपंत काले स्वामीचे सेवेसी

पो हरि बल्लाळ साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष. तुम्हीं पत्र पाठविलें तें पावलें. राजश्री खंडोजी भोसले सेनाबाहादर याणीं ढेकानालास मोर्चेबंदी करून हाला करून ठाणे घेतलें. लोक जखमी व ठार जाले. त्याचा मजकूर इंग्रज बालेश्वरास आल्याची बातमी आल्यावर त्याचे तोंडावर गेले. त्याजकडील वकील आला. बोलणें जालें. त्यावर इंग्रजांनी कूच केलें. पांच पलटणें व बारासें तुरकस्वार चेनापटणाकडे दरमजल चालले आहेत. त्याचा मार पलटणे चिलकापार गेलीं म्हणजे मुलूख तारा(ज) करावा असा विचार आहे, व बेणिरामाचा भाऊ कलकत्यास रवाना जाला आहे. पुढें जाण्याचा विचार वैशाखमासीं जाला तर होईल म्हणौन लिो वगैरे विस्तारें सविस्तर मजकूर लिहिला, तो कलकत्यास (अपूर्ण)

¶*Hari Ballal to Naropant Kale, writing about Khandoji Bhonsle attacking Dhekanala and the English and about the latter proceeding to Chenapattan with their army.*

No. 387] [16-1-1780

श्री

राजाराम दिनकर व त्रिंबक दादाजी यास पत्र जे. तुम्ही विनंती पत्रे छ ११ सवालची पाठविली ती छ ८ मोहरमी हुजूर पोहोचली. हिष्टीन बहादुराची भेट होते ते दिवसी दक्षिणेकडील खबर पुसतात, तेव्हां यास येथार्थ वर्तमान सांगितलें पाहिजे, याजकरितां महिन्याचे महिन्यास हुजुरून पत्रे यावी म्हणोन वगैरे मजकूर लिहिला तो कलला व दुहेरी दुसरे पत्र पाठविले त्यातलिहि मजकूर समजला. ऐशास हुजुरून महिन्याचे महिन्यास हिकडील मजकुराची एक दुसरी रवानगी तुम्हाकडे होतच आली आहे व सांप्रत या महिन्यांत हे तिसरे रवानगी पत्राची तुम्हाकडे जाहली आहे. येथील वर्तमान तरी करनेल गाडर्ड याजबराबर चिरंजिवास दिल्हे आहे. त्यास हे डबईस गेले. डबईचा किल्ला घेऊन इंग्रजानें आपले ठाणें बसऊन तेथून बडोद्यानजीक गेले. फत्तेसिंग गायकवाड गाडर्ड यास भेटले. पुढें आमदाबादेकडे जाणार म्हणोन आजच तेथोन वर्तमान आले

आहे. त्यास गायकवाड याणीं गाडर्ड यासी सल्ला कसा केला, करारमदार कोणत्यां प्रकारे ठरला, हे समजण्यांत आलें नाहीं. समजल्यावर लेहून पाठवूं; परंतु गाडर्ड याणी साराच कारभार आपलेकडे वोढावा हा लोभ धरला आहे. मुलुकांत आपलीच ठाणी बसवावी हा पाया घातला असे. उचल्या हाते आम्हास खर्चास मात्र देतात, तेहि माफकच पोहोचते. देशांतून मातबर फौजेचे सरदार आणावे म्हणोन आम्हास सांगतात. त्यास लहान मोठे सरकार निष्ठेतील सरदार व फौज आहे त्याची खातरजमा कसे होती?, साराच मुलुकांत अमल इंग्रेजाचा व किल्लेहि घेऊन तेच आपलेकडे ठेवितात ऐसे जाले, तेव्हां हिंमत करून जावे यात नफा काय? श्रीमंतापासून सेवानरूप गांव परगणे मिलावे हे समजतच आहे * * * उचल्या हाते श्रीमंतासच खर्चास मिलल यात आपण जाऊन फायदा तो काय? हा अंदेश सरदारास पडून इकडे कोण्ही यावयाचे तेहि येणार नाहींत. आजपर्यंत बारभाईच्या फौजा इकडे आल्या असता पंत होलकरासी व नानाफडणीस यासी वाकडे पडले आहे.

¶*Raghunathrao informs his agents (with Hastings) at Calcutta of the movements and the gradual subjugation of the province by Goddard.*

No. 388]

श्री

राजाराम दिनकर व त्रिंबक दादाजी

आम्हास फौजा मिलल. लहान मोठे सरदार कित्येक निष्ठेतील आहेत ते संशयांत पडणार नाहींत, येऊन मिलतील. मसलत सेवटास जाईल. यांत इंग्रेजाचे व आमचे नफेच आहेत; तरी हे पर्याय हिष्टीन बहादुरासी तुम्ही समजाऊन सांगोन आधी गुजराथेतीलच निमे मुलकास कबूल होऊन गाडर्ड यांस ताकीद दिलयास उत्तम; नाहीं तरी सेवटी दुसरा दस्त निमे मुलकाचा इंग्रेजाचा असावा. हा बलानें काम करून घेऊन गाडर्ड यांस त्याची ताकीद पाठवणे व मसलत करणे आमचे व गाडर्ड याचे विचारे ठेवावी. येविसी हिष्टीन बहादुरानीं गाडर्ड यास ल्याहावे. सारांश कीं,

कारभार चांगलाच
जाहाला.

¶*Raghunathrao asks his agents at Calcutta to sound Hastings whether a promise of half the territory of Gujarat would satisfy the English as a rich reward and urge them to exert in his behalf.*

6261

No. 389] [1775

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक नारो गणेश सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १० माहे मोहरम येथास्थित असो विशेष. आपण कृपा करून पत्र पाा ते पावोन पत्रार्थ लेखन आवगत जाहाला. आपण लिाँ की इंग्रज छापा घालावयास आला होता, तो आम्हांस बातमी लागली तेव्हा सांभालून निघोन सा कोसावर जाऊन मुकाम केला. ईश्वरे आपली खैर केली. राजश्री आपाजी बावा पायेगुडे याचे राऊत शंभर येथे ठेविले; उतम आहे. आपण लिाा कीं इंग्रजाचे यैवजी हे दोन हजार देणे म्हणून आज्ञा. त्यास इंग्रजाची बाकी आम्हाकडे तीन हजार राहिली आहे व त्यांजकडील वकीलहि ठाणे मारी आहे. इंग्रजांचा बंदोबस्त जाल्यासिवाये आमच्याने काही इंग्रजाचा यैवज देवत नाही. सुर्तेहून इंग्रजाने भडोचकरास लेहून पाा आणि आम्हासी कजिया करावा हे उतम नव्हे. तूर्त येथे आपण राऊत ठेविले त्यांस खर्चास रुपये ६०० साहासे राजश्री केसोपंताची चिठी लेहून घेतली आहे आणि त्याजला हे दिल्हे. पेसजी आपण ठाणे माारचे तालावर होते तेव्हां पाा वेलासे येथील पाो मौजे बोरीदरा याचे पारपत्य केले असतां पाो हसार येथील मौजे इलाव येथील पाटलास जिवे मिलानी व सरावी पांतील गांव बोरीबरा व भरोन व दिणोद हे तीही गांवचे भिलांनी मौजे माारचे पाटलास जिवे मारिले आणि गाव लुटून नेला, याप्राा दंगा मांडला आहे. त्यास आपण राजश्री गोविंदपंत नानास सांगून पाो माारचे कमाविसदारास ताकीद करावी की पाो हसोट येथील गावचा पाटलास मारावयास कारण काये? यविशीची मागहि तीहि गावात नेऊन घातला आहे. त्यास आपण पूर्ती ताकीद केल्याविना कमाविसदार यैकणार नाहीं. तर निक्षूण ताकीद करावी नाही तर आम्ही याचे उसणे घेऊ कलावे; बहुत काये लिहिणे लोभ करीत जावा हे विज्ञापना.

¶*Naro Ganesh writes to Naro Anandrao about some money transactions with the English.*

No. 390] [Feb. 1780?

श्री

बाजीराव गोविंद यास पत्र जे. तहनामा व ऐवजाची रसीद बलवंतराव भिकाजी व हरबाजी मुरार कारकून व महादू जायेनाक व कासीराम चोपदार याजबराबर

देऊन तुम्हाकडील अंबाजी सदाशिवसुद्धा रवाना केले आहेत. त्यास हल्ली लढाईचा मनसबा ज्यारी केला. चिरंजीव आमृतराव याचे हमराह इंग्रेजी पलटणे देऊन आमदाबाद प्रांती रवाना केले आहेत; हे गुजराथ सर करऊन आला नंतर (आत्रानंतर) आम्हीहि बाहेर निघणार. अशा वख्ती तिकडून नवाब बहादुराची भारी फौज व पोख्त सरंजाम मिरजपर्यंत येऊन दुतर्फा बारभाईस शह ध्यावा. दुसरे त्याचे मनसब्यास आम्हास नवाबानींहि चल देऊन फौजेच्या पाठीमागें यावे, म्हणजे दोहीकिडून बारभाईस जबरदस्त ताण बसेल. बहुतकरून बारभाईच्या फौजा इकडेच तोंडावर येतील, त्यास बारभाईचेच पुढे आम्हासहि फौज धरावी लागते. तेव्हां त्यास फौजेस पैका दिल्हा पाहिजे. अगोधर खर्च करावा लागतो. जेव्हां पैका पाठवावा तेव्हां इकडील वोढा धरून फौज येईल. याजकरितां तुम्ही नवाब बहादुरासी बोलोन पंधरा लक्ष रुपयेपर्यंत ऐवज ठरावणे. कारकुनास कदाचित मार्गी दिवसगत लागतील, याजकरितां हे तुम्हास सूचना लिहिली आहे; तरी अगोधर बोलून करारमदारांत आणोन ठेवणे. तहनामा व ऐवजाची रसीद येऊन पोहचताच सदरहू ऐवजाची हुंडी सुर्तेची करऊन समयास लौकर ऐवज येऊन पोहचे ते करणे. सारांश की फौजेनें व पैक्यानें या वेळेस नवाब बहादुरानीं साहित्य करावे हे त्यास उचित असे.

¶*This is a letter drafted by Raghoba to Bajirao Govind in which he give out his plans of holding in check the forces of the Barbhais on all side by forming alliances with the English and Haidar.*

No. 391] [*Feb. 178*

श्री

पुरवणी राजाराम दिनकर व दिनकर व त्रिंबक दादाजी यास पत्र जे. हिष्टीन बहादुर यास अंतस्थ पन्नास लक्षपर्येंत रुपये देणे पडले तरी कबूल करून सारी दौलत आमची आम्हास साधून घ्यावी, हे त्यासी बोलोन काम करून घेणे म्हणोन पेशजी तुम्हास लिहिले होते. त्यास हल्ली गाडर्ड याणी साराच मुलुकांत अमल ईंग्रजी बसवावयाचा डौल धरला आहे; तेव्हा मराठी फौज आम्हास येऊन सामील होणार नाहीं. मसलतीस धक्का पोहचेल याजकरितां तुम्हास लिहिले आहे; तरी अंतस्ताचा मजकूर तुम्ही त्यासी बोलला असाल व त्याचे विचारे आमची सारी दौलत आम्हास काईम करून द्यावी, हुकुम आमचा चालावा व मुलुकांत आमल आमचा बसावा, हे त्याचे विचारे करून जाले असल्यास आम्हास पत्र पाठवावे; व

गाडर्ड यास त्याचा हुकुम यावा म्हणजे अतंस्त बोलली आहे ते कबूलच आहे. या शिवाय दौलतीचा बंदोबस्त जाल्यावर त्याचे फौजेस खर्चहि लागला असेल तो वाइचा फुरसतीनें देऊ; तर अद्यापवर अंतस्ताचा मजकूर व फौजेचे खर्चाचा मजकूर बोलला नसाल तरी बोलोन गाडर्ड यास हिष्टीन बहादुराचा हुकुम घेऊन पाठविणें, मुलुकांत श्रीमंताचा अमल बसवावा; श्रीमंत व तुम्ही एकविचारे असावे. दौलत श्रीमंतास साधून द्यावी, याप्रमाणें करून घेणे. यांत त्याचे नफे व आमची कामे होतील. मसलत सेबटास पोहचेल. कदाचित साराच इंग्रजी अमल बसवावा असेच त्याचेहि चितात असेल तरी, मग अंतस्ताचा मजकूर बोलावयाचे कारण नाहीं. अंतस्त लिहिले आहे हे घेऊन आमचे लिहिलेप्रमाणें कबूल असल्यास उत्तम आहे; कारण कीं जेव्हां त्याचाच अमल जाहला, तेव्हां आम्हास पैका कोठोन मिलणार? व अंतस्तही काय म्हणोन द्यावे? फौजेखेरीज कामहि होणार नाहीं, तर हे मजकूर तुम्ही त्यासी बोलणे. +कदाचित अंतस्ताचेहि बोलल्यावरहि त्यास आमचा अमल बसवावा हे गोष्ट कबूल नसल तरी त्याची मर्जी; परंतु हे त्याच्या चित्तात नसल्या ठाणीं मात्र बसतील; परंतु बारभाईची फौज येऊन, अंतस्तातहि बोलली ते कबूल मान्य अमल बसवावा हे त्याचे चित्तात नसल्यास.

¶*Raghunathrao offers a bribe of Rs. fifty lakhs to Warren Hastings if, in return he would undertake to reinstate him in the Peshwaship.*

No. 392] *[11-2-1780*

श्रीहेरंबसमर्थ

अपल्ये आमृताने चरणावरी मस्तक ठेवून नमस्कार. विज्ञापना ता। माघ शु॥ सष्टीपावेतो मुकाम आमदाबाद येथे वडिलाचे आसीर्वादेकरून सुखरूप असे विशेष. इकडील वर्तमान तरी आमदाबाद लढत आहे. पुढे काय होईल ते पाहावे. जमाखर्चाची आज्ञेप्रो याद पाठविली आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶ "*Ahmedabad is still putting up a fight,*" *writes Amritrao to Raghunathrao.*

No. 393] *[13-2-1780*

मंजूर.

श्री

राजाराम दिनकर व त्रिंबक दादाजी यास पत्र जे: येथील प्रस्तुत वर्तमान तरी जनरेल गाडर्ड आमदाबादेजवल पोहचले. चिरंजीव राजश्री आमृतराव समागमे

\+ यापुढील मजकूर तुटक वाक्यांत लिहिल्यामुळें विसंगत वाटतो.

6264

आहेत. गार्डर्ड याचा व फत्तेसिंग गायकवाड याचा तह जाहाला. त्याचा याचा करारमदार कसा काय ठरला हे पुर्तेपणे सारे समजले नाहीं; परंतु अमदाबाद प्रांत सरकारचा मुल्क फत्तेसिंग गायकवाडास दिल्हा. तेथें फत्तेसिंगाची ठाणी बसविली. सुरत अठाविसींत सरकारचे मुलुकांत इंग्रजानीं आपला अमल बसविलाच आहे व हल्ली फत्तेसिंगाकडील सुरत अठाविसीतील मुल्क आपण घेऊन तेथें आपली ठाणी बसवावी हे ठरले आहे. गायकवाडापासून पैकाहि घेतला. अमदाबाद सर करून फत्तेसिंगाचे हवाली करावी असे गार्डर्ड याचे मानस दिसते म्हणोन ऐकतो. त्यास आमदाबाद घेतल्यावर जसे होईल ते लेहून पाठवूं. सध्या फत्तेसिंगानीं इंग्रेजास साधून घेतले आहे, व त्याचे नफ्याचीच गोष्ट इंग्रेजाकडून घडून येत असे. परंतु अशा मनसब्यानें परिणाम लागेल तो खरा. आमच्या कामाची यात तरी एक गोष्ट दिसत नाहीं. त्याचे मसलतीस येते ते करितात. आम्हास तरी इंग्रेज कोणतेहि गोष्ट पुसत नाहीं व आमच्या फौजेचाहि दरकार बालगीत नाहीं. कांहीं कांही फौज चिरंजिवाकडे येते ते ठेवावी तरी इंग्रेजाकडून फौजसारखे जाजती खर्चासहि मिलत नाहीं व थोडीथोडी फौज ठेवावयाचेहि काम नाहीं म्हणोन सांगतात. त्यास सध्या आम्हास इंग्रेज दरमहा सुरतेत वीस हजार रुपये देतात व चिरंजिवास तेथें तीस हजार रुपये पावतात, तेव्हां तितक्याचे आजमासे खर्च बाळगणे प्राप्त आहे. मातबर सरदार आणवावे म्हणोन गार्डर्ड याचे सांमणे. त्यास फौजेच्या कामास अगोधरहि कांहीं पैका दिल्हा पाहिजे. आजपर्यंत थोडीथोडी फौज धरली असती तरी सात आठ हजार जमली असती. देशांतीलहि मातबर सरकारनिष्ठेतील सरदार आसेत, त्याची राजकारणे हुजूर आहेत. त्यास पोटापुर्ता पैका पाठविला पाहिजे. दुसरा त्याचा मजकूर ते जेव्हां दाहा पांच हजार फौजेनसी येतील, तेव्हां त्यांच्या जाहागिऱ्या मागे बारभाई जप्त करतील. इकडे आल्यावर त्यास मुल्क परगणे लावून द्यावे, तरी मुलुकांत साराच अमल इंग्रजाचा व फौजेच्या खर्चासारीखे इंग्रेजाकडून खर्चास मिलणे तेहि कमतीच. तेव्हां जाऊन नफा ते काय? हे समजोन फौजेची यावयाविसी खातरजमा ते कसी होते? असा येथिल मसलतीचा विचार आहे. देशाकडील वर्तमान तरी सिंदे होलकर याणी कूच करून खानदेशांत येऊन पोहचले. मालव्यातून पायागडच्या मार्गें इंग्रज अमदाबादेकडे गेले आहेत, तिकडे त्यावरी यावे. दुसरा बारभाईचा मजकूर पंधरा हजारपर्यंत फौज पुण्याहून रवाना जाहाली. कांहीं पारनेरा व अर्जुनगड येथें येऊन पोहोचली, व कांहीं सात आठ हजार फौज कोंडाईबारी उतरून मांडवीच्या मैदानांत येऊन पोहचली. सुर्तेपावेतो मुलुक उजाड करून घ्यावा हा त्याणी प्रारंभ केला आहे. दोतर्फा त्याच्या फौजा जाहाल्या आहेत. त्यास फतेसिंग गाईकवाड गार्डर्ड

6265

याणी साधून घेतले आहेत, याजमुळे आमच्या फौजेचा दरकार नाहीं असे समजोन मनसबा करितात. आम्हास फौज ठेऊ दिल्ही नाहीं. त्यास बारभाईच्या फौजा येऊन पोहचल्या, तेव्हां आतां गाडर्ड आपणच होऊन मसलत करितात. याचा परिणाम काय होईल ते पहावे. असो, जाहले वर्तमान ल्याहावे, कारण जे पुढें इंग्रेजास धक्का पोहचल्यास हिष्टन बहादूर आम्हाकडे शब्द ठेवू लागतील, यास्तव प्रसंग पाहून हे मजकूर तुम्ही यासी बोलत जाणे. फत्तेसिंग गाईकवाड काबूयार, त्याचे लक्ष बारभाईकडे. सध्या वक्तावर नजर देऊन इंग्रेजास मिलाले आहेत; परंतु बारभाईची दाटी होईल तेव्हां फत्तेसिंग बारभाईस मिलतील असे आमच्या तर्कानें दिसते. पुढें होणे जाणे ईश्वरसत्ता. त्यास हे पत्र तुम्ही तीन वेल वाचून याचे कोशल करून जसा प्रसंग तुमच्या नजरेस पडेल तसे त्यासी बोलत जाणे. सारांश कीं त्याचा शब्द आम्हाकडे न लागावा, यास्तव हे मजकूर तुम्ही वरचेवर बज्याऊन ठेवीत जाणे. प्रसंग पाहून हिष्टन बहादूरासी बोलत जाणे, व प्रसंग पाहून कोसलदारासीहि बोलत जाणे; कारण कीं पुढें जर मनसबा बिघडला तरी गाडर्ड आमच्या मनसब्यानें चालले नाहीं हे त्यास समजले पाहिजे. सबब खोलून लिहिले आहे. +छ ७ सफर.

¶*Raghunathrao is dissatisfied with the way in which Goddard was conducting affairs in complete disregard to the writer's advice or interest. He urges his Calcutta agent to appraise Hastings of the situation and thus bring pressure to bear upon Goddard.*

No. 394] [*26-3-1780*

श्री

राजश्री भगवंत मल्हार गोसांवी यांसी

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित खंडेराव गायेकवाड हिमतबहादर दंडवत सुा समानीन मया अलफ. तुम्ही आज्ञा घेऊन श्रीदर्शनोदेशें गेलियावरी येक दोन पत्रें आलीं कीं कुळदेवतांचीं दर्शनें घेऊन लौकर येतो; परंतु अद्याप न आलेस हें काये? इकडील वर्तमान शहर आमदाबाद इंग्रेजानी घेतलें. देशीहून राजश्री होळकर व सिंदे आले, त्यांणी वाटेचीं गांवें जालीतच रेवातिरीं आले, इतकियांत

+ हा शब्द राघोबाच्या हातचा आहे; यावरून व आंतील मजकुरावरून हें पत्र कलकत्त्यास राघोबाच्या तर्फेनें काम करण्यास लिहिलें आहे हें स्पष्ट ठरतें. बारभाईनीं राघोबाचे जासूद पकडून त्यांपासून हिराऊन घेतलेल्यांत या पत्राचा समावेश होईल.

इंगरेज इकडून बडोद्याचे सुमारें गेले. फौजा बडोद्याहून दाहा कोशी आहेत. अद्याप लढाई जाली नाहीं. परस्परें रहस्याचीं बोलणीं होत आहेत. सारांश फौजाचा उपमर्दामुळें मुल्क पायेमालीखाली आला. श्रीइछेने घडणार घडत आहे. तुम्ही इत:पर येक दिवस वरीं न राहता पत्रदर्शनीं लौकर येणे; तेथून निघतांच आमके मार्गी येतों यैसें पत्र पुढें पाठवणें म्हणजे इकडील शुभ त्यासारिखें उत्तरीं लेहून. तुम्हास मार्गीं पत्र पावेल त्यामार्गे येणें. वरकड तुमचे कारकुनाचे लेखावरून कळलें. सारांश कामाचे दिवस आहेत; यास्तव अतिसत्वर येणे. जाणिजे छ १९ माहे रबिलोवल. बहुत काये लिहिणें.

¶*Khanderao Gaikwad informs Bhagvant Malhar of the English having captured Ahmedabad and having proceeded to Baroda. Sindia and Holkar have also arrived in Gujarat, but the two armies have not yet met, adds the letter.*

No. 395] [*19-5-1780*

श्रीगजानन

विज्ञापना छ १४ जमादिलोवलपावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी काल संध्याकालपर्यंत इंग्रजाचा मुकामच होता. आज प्रात:कालीच बातमीस शिपाई पाठविले आहेत. ते आलियावर बातमी येईल, ती लिहून पाठवीन. येथे लोकास तांदूळ वगैरे काहीच जिनस मिलत नाही. दोन दिवस दोन सिपाई रुो देऊन पाठविले परंतु तांदूळ कोठें मिलत नाही. रिकामें परतोन आले तेव्हां आज लस्करांत सिपाई पाठविले आहेत. लोकास तांदूल वगैरे जिनस मिलावयाची तरतूद लौकर जाली तरी येथे राहाणे होईल. कुब्याची फुले भाजीस पाठविली आहेत पावतील. लोकाची खर्चाविसी फार तारांबळ आहे. कलावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer gives news about the English and complains about the scarcity of foodstuffs in the camp.*

No. 396] [*June 1780*

श्री

सेवेसी गणाजी चंद्रराव मोरे व हेराजीराव येरूणकर विज्ञापना यैसिजे. मौजे सिरढोणचा कुणबी यास कांहीं बक्षिस देऊं केले आणि त्याजबरोबर एक सिपाई बातमी आणावयास पाठविले त्याची बातमी येणेप्रमाणे :

तूर्त तल्यावर सडा आहे. आठा चौहूं रोजीं उठोन जाणार. कलम १	मद्रेचा इंग्रेज व सुरतकर साष्टीस व केलवे येथें जाणार. कलम १

---

^ सुपथ.

6267

मुंबईकर[1] इंग्रेज किल्ले उरण व बेलापूर येथें जाणार. कलम १

बाजारांत धारण

ऽ।१॥ तांदूळ कैली सो मापे

ऽ।.॥ गहूं कैली सो खारीक सुपारी पैशाच्या सुपाऱ्या ३ गुळ तीन पैसे भार, तूप दीड पैसे भार खजूर बानगी पैशाची फुटाने बानगी

कलकत्याचा[2] इंग्रेज याणी कल्याण वसई येथें रहावे म्हणावे बातमी आहे. कलम १

बातमीदारास पांच रुपये देऊं केले आणि त्याणे आपला सरकाराचा सिपाई यास येक रोज लस्करांत राहून सारा कोठ दाखविला त्यावरून पांच रुपये रोख दिल्हे. फिरोन जावयास तयार आहे. कलम

सदरहू येनेप्रमानें बातमी आहे. त्याचा गोटांत रायाजी राव खोपकर सरदार पाठविले होते, तै सेवेसी पाठविले आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This letter gives news brought by a spy about the English proceeding to Salsette, Uran, Belapur. It also gives the rates of some articles.*

No. 397] [*September 1780*

२ पुा श्रीमंत राजश्री तात्या स्वामीचे सो

झासी प्रांतीचे व ग्वालेरचे बंदोबस्ताकरितां फौज राजश्री पाटीलबावाही पूर्वीचे मान्याचे पथक रवाना केले ते सुरंजेपार गेले. हालीहि आणखी स्वार पांचेकशे राजश्री गिरमा मल्हार बोकील हिवरेकर श्रीमंत सखाराम बापूचे सखेचे[३] चुलतभाऊ यासमागमे स्वार व येक हत्ती निशाणास देऊन रवानगी करीत आहेत. पांचसात रोजात बिदा होऊन झाशीच्या सुमारे जाणार. पुढे मान्याचे पथक गेले तेहि याचे तैनातेस चाकरी करणे येसी पत्रे याजवल लेहून देणार. श्रीमंत होळकर तुकोजीबावाही बापू होलकरासमागमे दोन पावणेदोन हजार फौज देऊन बिदा केले सुज्यालपूरनजीक गेले. तेहि व श्रीमंत पाटीलबावाकडून गिरमाजी मल्हार रवाना होत आहेत. हे येकत्र येकविचारे राहू झासी व कछवाधारेचा व गोरचे (?) मुलुकाचा बंदोबस्त करावा यैसे बोलण्यात आहे. जफ्ती धारेहून आष्टेइछावर प्रांतीची

---

1 Hartley. 2 Goddard

३ सखले.

करविली. यावर माजी काादाराही गोविंदपंत म्हणौन प्रहस्त येथे पाठविले. येथे सरदारास भेटोन वर्तमान सांगो धारेस गेले. श्रीमंत सौ आनंदीबाईस भेटोन त्यांचे मनोधारण रक्षून परगण्याची सोडचिठी जफ्तीवाल्याचे नावे घेऊन जाऊन येथूनही येक कारकून घेऊन गेले आणि रा। विठल सिवदेव याचे पांच परगण्याची जफ्ती उठऊन देऊन पूर्ववत आपला आमल बसविला. हाली जफ्तीवाले भेलशाचे परगण्यात गेले. भेलसेवाल्याने शहरचा बंदोबस्त चांगला केला. आहे. जफ्तीवाल्यास कोण्हीच वर्जता भय नाही. आपल्याकडून पांचच्यार हजार निदानी दोन हजार तरी फौज आल्यास इकडे कितेक आपले आहेत. काादार वगैरे येकत्र होऊन पारिपत्य करून परभारा खर्चहि निवेल. आलस जाल्यास गांठ जमेल. हाली जफ्तीवाले तुटपुंजी कसबली वरगु व फुटकळ बारा घरचे जमा जाले. कोणी कोणात नाही. आपल्याकडून फौज आल्यास उभयता सरदारहि आपला पक्ष करितील. परंतु निमित्यास आपला कोणी आसल्यास सर्व आर्थ होईल. केवल आपला कोणी न येता उभयता सरदार बदना मी घेता नये. धारेत नजीक बाई आहेत. दुरंदेशी पाहावी लागत्ये. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. पत्रांतरी सर्व निवेदन होईल.

¶*Haripant Phadke is informed of fresh contingents being sent by Sindia and Holkar for restoring order in province round about Jhansi by taking over the management from Raghoba and his followers*

No. 398] [*0-6-1780*

श्री

विनंती उपरी. इंग्रजाकडील च्यार आसाम्या आल्या त्या पाठऊन द्यावे म्हणौन आपण चिठी पाठविली. त्यास आपले चिठी अगोधरच पाठविले आहेत. पोंचले आसतील हे विनंती.

¶*The writer intimates that some four persons from the English have been already despatched to the addressee.*

No. 399] [*30-9-1780*

श्री

राजश्री हरीपंत तात्या
गोसावी यासी

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो माहादजी सिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावें विशेष. आपण पत्र

6269

पाठविलें तें प्राचीन लेखनार्थ कळला. यैसियासी राजश्री तुकोजीबाबा होलकर व आम्हीं इदुरी एकत्र होऊन देशीं जावें हाच निश्चये ठराविला. त्यास झांसीकडे फौज रवाना करून बंदोबस्त राखावा याकरितां फौजेची नेमणूक होऊन कांहीं फौज गेली, राहिली तेहि जात आहे. सांप्रत उदेपूर प्रांती चिरंजीव बहिरजी ताकपीर आहेत, तिकडे उदेपूरवाल्यानी बखेडा केला, यास्तव फौज तिकडे रवाना करावी लागली. . झांसी व उदेपुराकडील बंदोबस्तास रवानगी करून लौकरीच आम्ही व तुकोजीबाबा देशी येऊ. या उपरी येण्यांत गुंता पडणार नाहीं. वरकड राजश्री यैसाजी बलाल यास लिहिले आहे त्यावरून कळेल. रवाना छ १ सवाल +बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji Sindia writes to Haripant promising shortly to return to the South along with Tukoji Holkar.*

No. 400] [*15-10-1780*

श्री

सेवेसी आज्ञाधारक भास्कर भिमाजी व जिवाजी माहादेव चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना येथील कुशल तागाईत छ १६ माहे सवालपावेतों साहेबाचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असें विशेष. छ १० रमजानचीं आज्ञापत्रें रवाना जालीं तीं छ १७ रोजीं पावलीं. सा पुरवण्या लिहिल्या आहेत. दोन तीन वेळां वाचून पुर्ता मजकूर समजोन घेऊन तुम्ही आपलें समक्ष भवानजी विसाजी व शरीफ आली यांजकडून जनराल याची मर्जी व रंग पाहून बोलोन उत्तरें घेऊन पाठवणें म्हणोन. आज्ञा. आज्ञेप्रमाणें या उभयतांचे जवळोन आपले समक्ष जनराल याचें बोलणें जालें, त्याचा तपशील :

जनरेल गाडर्ड येथें आल्यावर जे फ़ौज हजर जाहाली आहे याचे खर्चाविशी त्यासी बोलत गेला; यास गाडर्ड याणी बडोद्यास जातेसमयीं वीस हजार रुपयाची चिठ्ठी मेस्तर बाडम याजवर दिल्ही, आणि मागाहून तेव्हांच सांगितलें कीं आपल्यास दरमाहा दाहा हजार रुपये देतों. त्यांत हे वसि हजार रुपये दोहा महिन्याचे आगाव

जनरेल गाडर्ड येथें आल्यावर प्रथम पांच च्यार रोज बोलत गेले कीं आपल्यांस फौज धरावयास पैका देतों व कांहीं मुलुकहि देतों, असा नाद लाविला. उपरांतिक तें बोलणें सोडून फौजेस द्यावयास अम्हांजवळ पैका नाहीं असें म्हणों ल ले व मुलुकहि आमचेकडे नाहीं. मुलुकाचा जाबसाल पुढें बोला असें म्हणतात. सध्यां

+ येथून अक्षर निराळे वळणाचें. बहुधा महादजीचें.

दिल्हे आहेत. त्यास असें जेव्हां यांणीं सांगितलें तेव्हां हे दोहो महिन्याचे आगाव रुपये आजच घेऊन फौजेस खर्चास द्यावे हें ठीक नाहीं; कारण कीं दरमाहाचा ऐवज आतांच खर्च केल्यानें पुढें आमचें चालेल कसें? सबब आम्ही सकटांत आहों. याप्रमाणें जनराल यासी बोललों. याचें उत्तर जनरालांनीं केलें कीं माझी व श्रीमंताची भेट होईल तेव्हां समक्षच बोलो. १

जनराल याचे भेटसि यावयाची मर्जी होती म्हणोन सरकारचें पत्र जनरालास आलें होतें; त्याचें उत्तर दिल्हें तें सेवेसी रवाना केले आहे त्याजवरून विदित होईल. पत्रीं लिहिलें आहे कीं (ये)ण्याचा मजकूर गाडर्ड याचे मनसब्यानें चालावें म्हणोन लिहिलें आहे. याचें कारण सरकारचें पत्रीं लिहिलें होतें. जनरेल गाडर्ड याणी सांगोन पाठविलें कीं आम्ही बडोद्याहून येऊं तोंपर्यंत स्वारी मकूब असो द्यावी. आम्ही आल्यावर आपली मर्जी जावयाची असली तरी आम्ही व आपण समागमें जाऊं म्हणोन पत्रीं लिहिलें आहे, त्याजवरून यांणींहीं त्याचे मनसुब्यानें चालावें म्हणोन लिहिलें आहे. १

विश्वनाथ नारायण याजकडून सरकारचा ऐवज येणें, त्याजविशी आम्ही त्यास पत्र लिहिलें होतें कीं सरकारचा ऐवजा फडशा करीत असल्यास उत्तम; नाहीं तरी जनरालाचे कानावर घालावें लागेल. त्याजवरून विश्वनाथजींनीं राजश्री बाजीराव गोविंद व सटवाजा भोंसले हे दोन सरदार फौजसुद्धां येथें आले आहेत; याचेहि खर्चाचा बंदोबस्त नाहीं. आज तीन महिन्यापासून फौजेचीं सूत्रें राखावीं, आपले निष्ठेतील फौजेस इशारा करावा, हें राजश्री केसो कृष्ण याजबरोबर जनरेल कशास सांगोन पाठवित होते? याचें वचनांवर आम्ही लोकांशीं राजकारणें केलीं जें येथें फौज आली त्यास आजपर्यंत कर्ज काढून खर्च केला. तीस हजारपर्यंत रुपयांचा पेंच साहुकाराचा अंगावर पडून शेवटीं लोकांस निरोप देणें प्राप्त जाहलें. त्यास हे अगोधर आम्हांस सूचना करिते तरी या आम्ही खटपटींत न पडतों. वरकड फौजेच्या खर्चास मुलुक दिल्हा असतां अगर पैका देते तरी आठ दाहा हजार फौज जमती; मसलहतीच्या उपयोगीं पडती. त्यास हा कांहीं वख्त पुढें यावयाचा नाहीं. सध्यां जे लोक आले आहेत हे खराब होऊन उठून गेल्यावर दुसऱ्या फौजेनें कोणत्या उमेदीवर यावें? दोन तीन वेळां कांहीं लोक इकडे आले त्यास येथेंहि जागा नाहीं. देशांत जावें तरी बारभाईशीं दुस्मान जाले, तेव्हां मधेंच तरंगोन खराबींत आले. पुढें लहानमोठे सरदारांनीं इकडे कोणत्या भिस्तीवर यावें? असो. सध्यां हे आमची फौज चाहात नाहिंशी दिसते. सांप्रत गाडर्ड बडोद्याकडे गेले, पुढें काय करतील तें पाहावें. आयते वेळेस कार्तिक मासीं

आम्हांस पत्र लिहिलें आहे कीं ऐवजाचा निर्गम करितों; परंतु सरकाराचा हिशेब लक्ष्मण रणसोड याचे रुजुवातीचा आम्हाकडे ऐवज किती व लक्ष्मण रणसोड याजकडे यैवज किती? व आम्हापैकीं वसूल वरातीचा लाऊन निकीबाकी राहिली किती, असा हिशेब आणवावा म्हणजे फडशा करितों म्हणोन पत्र लिहिलें, त्याजवरून शेवेसी विनंती लिहिली आहे; तरी लक्ष्मण रणसोड याचे रुजुवातीचा हिशेब व किल्ले इनप्रसाद उर्फ प्रबळ पैकी ऐवज नारोबा कोलटकर याचे विद्यमानें पावला असेल तो हिशेबीं जमा धरून हिशेब पाठवावयाची आज्ञा. १

माणसाच काजयाचा मजकूर तरी सरकारचें पत्राची इंग्रेजी करून कोशलांत दिल्ही आहे. इनसाफ कोशलांत ठरेल तो सेवेसी लिहून पाठऊं. १

विश्वनाथ नारायण यांणीं सरकारांत पत्र लिहिलें आहे तें सेवेसी पाठविलें असें, त्यावरून विदित होईल. १

फौज धरावयाची तरतूद करूं लागल्यास ते वक्तीं दुपटहि पैका खर्च करणें लागेल, तेव्हां कांहीं फौज मिळेल. ज्येष्ठ आषाढ मासापासून फौजेची तरतूद केली असती तरी पैका थोडा खर्च होऊन काम होतें, तो कांहीं रंग दिसत नाहीं. याप्रमाणें जनराल यांसी बोलणें म्हणोन आज्ञा; आज्ञेप्रमाणें जनरालासी बोललों. याचें उत्तर जनरालांनीं केलें कीं फौज धरावी, पैका आम्ही देऊ, म्हणोन गाडर्ड याणीं पत्र लिहिलें होतें कीं काय? तेव्हां आम्ही उत्तर केलें कीं पत्र तों लिहिलें नाहीं, परंतु केसो कृष्ण यांजवळ बोलत गेले व हल्लीहि सुरतेस आल्यावर समक्षहि बोललें कीं फौजेस पैका देऊं, फौज ठेवावी व मुलुकहि देऊं. याप्रमाणें बोलत होते म्हणोन आम्ही बोललों. हें ऐकोन जनराल बोलले कीं माझी व श्रीमंतांची भेट होईल तेव्हां याचें उत्तर समक्ष बोलों. १

पांचा गांवचा मजकूर तरी भवानजी बिसाजी हे म्हणाले कीं तूर्त हा मजकूर बोलावयाचा नाहीं, याजकरितां बोललों नाहीं. पुढें समय पाहून कांहीं मजकूर बोलतो. उत्तर होईल त्याप्रमाणें सेवेसी लेहून पाठवीन १

सेवेसी श्रुत होय हें विज्ञाप्ति.

¶Bhaskar Bhimaji and Jiwaji Mahadev from Bombay inform Dadasaheb of the talks the writers had with the Governor regarding differences that had cropped between the addressee and Goddard.

6272

No. 401] [*28-10-1780*

श्री

राजश्री गणेशपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपरा. तुम्ही छ १ सवालचे व छ २ मिनहूचे यो दोन पत्रें पा ती पावली. राजश्री यादवराव भागवत यांचा ऐवज पावता करण्याविसी व गाडर्ड बडोद्यास गेला, उजनीकडे जाणार म्हणून व श्रीमंत राजश्री दादासाहेब अश्विनी-कुमारावर आहेत, फौज व गारदी ठेवितात, दसरेयाचे मुहुत तीन पलटणे व दोन हजार फौज खानदेशांत येणार, याची तरतूद हंगामसीर करावयाचा मजकूर लिा तो सविस्तर कलला. यादवराव याचा ऐवज काही देविला. राहिला तोहि तरतूद करून देवितों. गाडरचे वगैरे बातमीचा मजकूर तर, कलकतेवाला खासा सलतनत कबिले सुद्धां कासीस आला होता. त्याचा व कासीचे राज्याचा बिगाड होऊन लढाया जाल्या. कलकतेवाल्याचे लोक ठार मारून दौलत व कबिले सर्व लुटून घेतले. मुलकात अमल राज्याचा बसला. याचप्रमाणें अंतरवेद व गंगापारचे अमिरानी जमिदारानी जागां जागां इंग्रजांचे लोक मारून आमल घेतला. तिकडे इंग्रजांचा आब जाऊन गर्दी जाली आहे. राजश्री महादजी सिंद्यानी कुलारसची पलटणे जेरदस्त केलीं आहेत. त्यांचा फडशा लवकरच होऊन सिंदे अंतरवेदीस उतरणार. चेनापटणाकडे आज पो लढायात हैदरखानांनीं इंग्रज सिखस्त करीतच आले. सांप्रत बंगल्यातील कल कुमक भारी चेनापटणास जाऊन पहिले व हे मिलोन लढाई मातबर जाहली. त्यांतहि इंग्रज सिखस्त होऊन चेनापटणाचे आश्रयास गेले. इंग्रजांचा आब चहूकडे गेला. तेव्हां नवी मसलत उपस्थित करण्यास त्यास विचारच पडेल. तथापि याउपर त्यांची चाल समजेल तसा विचार करावयास येईल. सविस्तर तुम्हांस कलावें म्हणून लिा आहे. सरंजामी फौज लवकर जमा करावी, इतलाखाचीहि तोड पाडून रवानगी होईल. रा छ २९ सवाल हे विनंती.

¶*The reverses met by the English in all theatres of war especially the one at Benares at the hands of Chetsing, another at Kularas at the hands of Mahadaji Sindia and a third one at Chenapattan at the hands of Haidar, are reported to Ganesh Vishvanath Behere in this letter.*

ले. *No. 402*] [*11-1-1775*

पौ छ ९ जिलकाद तिनि प्रहर रात्र पाहटेची.

श्री

सेवसी विसाजी कृष्ण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. ताा छ ८ जिलकाद पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री विसाजीपंत लेले बसईहून लस्क-

6273

रांत छ ४ जिलकादीं आले होते. हिकडून पुण्याहून राजश्री बाळाजीपत ठोसर तींहे आले, आल्यानंतर साष्टीवर व इंग्रेजावर शह देऊन तंबी पोहोचवावयाचा मजकूर कोणे तऱ्हेने काम कसे करावे या कामास मजबुदी लोकांची वगैरे सरंजामाची कोणे प्रकारची असावी ती सर्व मजकूर बाळाजीपंत ठोसर यांजवळ विसाजीपंताचे मनोगतानरूप सरकारकाम व्हावें येविसींच्या कितेक प्रकारच्या युक्तीच्या तोडजोडी बोलोन सेवेसी विनंती करावयास सांगितलें आहे. सेवेशी येऊन विनंती करितलि त्यावरून निवेदन होईल. येथून विसाजीपंत छ ६ जिलकादी वसईस गेले. तेथील बंदोबस्त नित्यानित्य अधिकोत्तर होतच आहे. इंग्रेजाची तरांडी वसईचे बाऱ्यावर आली आहेत. त्यावरून वसईहून मारनिल्हेची पत्रें आलीं तीच बजिनस सेवेशी पाठविली आहेत. त्यावरून निवेदन होईल. आम्हांस फौज व लोक वसईस पाठवावे म्हणून लिा आहे त्यावरून कांही फौज व हशम लोक पाठवितो. तिकडून लस्करातून फौज राजश्री शिवाजी विठल वगैरे दीड हजारपावेतो आले, तेहि परभारेंच तिकडे जातील. त्यास येथून पत्रे पाठविली आहेत की जलदीने जाऊन वसईस दाखल होणे. त्याप्रमाणे तीहि फौज जाऊन पावेल ÷ व कांगोरीकर आले, पांचसे म्हणोन पत्र आहे. आज हजरी घ्यावयास लाविली आहे, त्यास राजश्री बळवंतराव जिवाजी याजबराबर देऊन रवाना करितों व आपाजी हरि याचे पत्र आज वोझरचे मुकामीहून आलें त्यास त्याजलाहि जलदीने लोक घेऊन वसईस जाण्याविसी लिहिलें आहे तेहि जाऊन पोहोचतील. फारच निकड असली आणि आम्हांस बलाविलें तरी जाऊं. येथें तो घटकेघटकेस एक एक विचार येऊन पडतो त्याप्रमाणें करावा लागतो. तेथे आमच्या नालीसी व बोभाट तेथें सांगणार सांगतात व येथून लिहितात. त्याणी खरा असेल तो लिहावा. लटका सांगितल्याने त्यास आपणास पुसावे लागेल. रात्रदिवस मेहनत तरतूद करून याप्रमाणें गैरवाके सरकारांत लटके सांगतात. त्याचा बैयाज आलाहिदा पत्री लिहिवितों. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Visaji Krishna reports to Nana Fadnis at Poona the preparations that were being made to defend Bassein against an attack on the place planned by the English.*

÷ येथून अक्षर वेगळें. १ तपसील

No. 403] [*29-11-1780*

पौ छ १९ जिल्हेज
सुा इहिदे समानीन

श्री

शेवेसी सदासिव धोंडदेव चरणावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ४ जिल्हेजपावेतो माहाराजाचे कृपेकरून यथास्थित असे विशेष. इंग्रजाची वसईवर खराबी जाली. दोन गलबते दारूची धारावी(स) आपोआप जलोन गेली. गाडर्ड याणी बंदरा(चे) आत जाऊन मोर्चे घातले आहेत. तीन मोर्चे तयार केले. तोफा चढऊन मार करावा इतकात आतून इकतीने हजार माणूस उतरोनि येक मोर्चा मारू(न) साफ केला. इंग्रजाचे दोन अडीचशे माणूस मारले. याचे तीनसे च्यारशे पडले. त्याजव(रून) गार्डरड घाबरा जाहाला. वसईकरा(नी) गार्डरास सागोन पाठविले * * * इमत नाही. तुम्ही इग्रज तीन * * * * वसात नेम करून किला घ्यावा त्या * * * * नेम करावा आणि किला घ्यावा तुझे * * * मात आम्ही किला जगविला तरी * * * सरजाम तू आम्हास द्यावा ऐसी प्रति(ज्ञा) करून लढाई कर. वसई आमचे जीव आ(हे) तोपरियंत तुझे हाती येणे कलतच आहे. वरकड बारभाईकडील फौच पंचवीस हजार फौज खाली उतर(ली). खोपवलीपासून मु(ल)कात इग्रजाचा अमल होता तो उठविला. आता कल्याण बेलापुर, कलवे, पारसकि येथे अमल आहे. लढाई होणे मातबर कल्याणावरी होईल. मुलकातहि शे दोनशे माणूस मारिले. शे दोनशे पलोन गेले. अद्यापपरियंत इंग्रजाचा जय दिसत नाही. आजपरियंत याप्रो मजकूर आहे. हाली गोंदजी चिखले खिजमतगार व बाजीराव बर्वे याजकडील खिजमत(गार) नारायणजी मान्या दोघेजण पाय * * श्रम करून येथे आले. सुर्तेस ग * * * व याची हाली निघाली. त्याजवर याची * * * केली आहे. शेवेसी पावोन सर्व मजकूर नि * * * करितील. पुण्याकडूनहि बातमी आली. सुरापूरवाला व मानाजी फाकडा व सटवोजी भोसले वगैरे सरदार जमियत श्रीपंढरपूरपरियेत आले ऐसे वर्तमान आहे. मजला बरे वाटत नवते. आता आरोग्य आहे. आंगात शक्त आद्यापि आली नाही. माहाराजाचे कृपेने आठापंधरा दिवसात बरा होईन. सिंदे होलकर यासी खटखट जाहाली. सिंदे यास कैद केले. अइल्याबाई यास कैद. ऐसे येथे

साबकारी वगैरे वर्तमान तहकीकात आहे. यैसी तिकडील वर्तमान सेवकास ल्याहावयासी आज्ञा जाहाली पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Sadashiv Dhondadeo describes how Goddard was repulsed at Bassein. He also adds that the English fell back on the descent of Maratha troops into Konkan.*

No. 404] [*Dec. 1780*

श्री

राजश्री बाजीपंत स्वामींचे सेवेसी

विनंती उपरी. तुम्हीं पत्र पाठविलें तेथें लिहिलें कीं वसईस राजश्री नागोराम व राघोपंताकडील गारदी रा केले. त्यापैकीं कांहीं गारदी व राऊत उठोन आले. आम्ही फिरोन बदलापुरास आलों म्हणून लिहिलें. त्यास वर इकडे गडबड, त्यापक्षीं इतकी जलदी करावयाचें नवतें. वसईसारिखी राज्यांतील जागा, पूर्वी महत्प्रेत्नें-करून साध्य केली. तिचें रक्षण संकटेंकरूनच केलें पाहिजे. पाऊस पडूं लागला तर चिंता नाहीं. वसईस फौजेची छावणी व्हावी असी (जागा) फाटलेले * * * * चा मुलूक घे * * * * नाहीं. याजकरितां काल तुम्हांकडे पाठविलीं आहेत. त्यांत फौजसुधां तुम्हीं यावें म्हणून लिहिलें आहे. ती पत्रें पावल्यापूर्वीच तुम्हीं माघारे आला. पत्रें पावलींच असतील. निदान पक्ष येक हजार राऊत पावसाळा वसईस छावणीस असावे. इंग्रजास फौजेचा दबाव भारी आहे, याजकरितां विसाजीपंतास लिहून पाठऊन हजार राऊतांची सोय तेथें करऊन फौज जरूर ठेवावी. इंग्रज सेजारी, कोणेसमई काय करील कळत नाहीं. ते समई घाटावरून राऊत पाठवीन म्हटल्यास समयास पोंहोंचणार नाहीं. तुम्ही कोंकणास वाकीफ * * * * करितां वसईस फौज ठेवावयाची आज्ञा जरूर करावी. पारनेऱ्याकडील वर्तमान विसाजीपंतानी लिहिलें होतें त्याजवर कांहीं वर्तमान कळलें नाहीं. तुम्ही बदलापुरास आल्यावर तेथेंच मुकाम करून राहणें. पारनेऱ्याकडील, पकें वर्तमान कलेल, पुढें येतात किंवा मागें जातात हें समजेल. मागाहून पायगुडे आईतोले काले जाधव निगडे मुसा नारंज पाा आहेत हेहि तुम्हांजवळ येतील. यांत निवड करून वसईस हजार फौज कनिष्टपक्ष राही असें करणें. कासीपंत खऱ्या * * नाहीं म्हणून

तुम्हांसमागमें आले असले * * त्यास वसईस लोकसुधां लव * * * * खर्चास बारा हजार रुपये * * * * आहेत पावतील हे हजार व रावोपंताकडील पांचसें येकूण दीड हजार पाईचें माणूस व हजार राऊत याप्रमाणें पावसाल्यात तेथें असावें. मग कसाहि पेंच पडला तर चिंता नाहीं. वसई म्हणजे राज्यांतील स्थल, तेथील मजबुदीविसीं आळस कोणी करूं नये. श्रम पडले तर सोसावे. परंतु मजबुदी करावी. तुम्ही सर्वा गोष्टीस माहीत, त्याहावें असें नाहीं. ×जरूर लिहिल्याप्रमाणें करावें. रवाना छ ११ जमादिलाकर हे विनंती.

¶*The writer Nana Fadnis advises Bajipant to keep a strong reinforcement at Bassein as there is no knowing when the English would attack it.*

No. 405] [*1781-1782*

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री नारो माहादेव गो

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा इसने समानीन मया व अलफ. सुरत व मुंबई येथील बंदरची सरकारातून बंदी केली. असता जोहरी याणी माल आणून विकिला. साा अटकेस ठेवावयाबदल पाठविले आा

१ स्वरूपचंद
१ किपू दीपचंद
१ मूलचंद उपरडा
१ जाईता फूलचंद

४

येकूण च्यार आसामी किले सिंहीगड येथे पाठविले असेत. तर पक्या बदोबस्ताने ठेऊन पोटास सिरस्ते प्राा सेर देत जाणे.

¶*The Peshwa orders four jewellers to be confined at Sinhagad for selling articles at Surat while the city was under blockade.*

× येथून नाना फडणिसांचें अक्षर.

No. 406] [1-1-1781

श्री

यादी विसाजी केशव सुा इहिदे समानीन मया व अलफ मारनिलेपासून सरकारात घ्यावयाचा करार

रुा

५००००१

यादी हप्ते बंदी

२००००१	पौष अखेर
१०००००	माघ अखेर
२०००००	चैत्र अखेर
५००००१	

इंग्रेजाचे मसलतीमुळे सरकारांत नजर पांच लाख येक रुपया सदर मुदती प्रों घ्यावें. येणेप्रों करार करावे छ ९ मोहरम पौष मास

¶*Visaji Keshav is made to pay Rs. five lakhs in three instalments.*

No. 407] [13-2-1781

पौ छ १० रावल इहीदे
समानीन फ़ालगुन मास

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोविंद येशवंत व जनार्दन माहादेव मुकाम विजयदुर्ग चरणावरी मस्तक ठेऊन कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २९ माहे सफरपावेतों स्वामींचे कृपावलोकनेकरून वर्तमान यथा(स्थित) आहे विशेष. गोवेकर फिरंगी याचे वकील राजश्री नारायण विठल धुमे हुजूर आहेत. त्याचे चिरंजीव पुण्याहून गोव्यास जावयाकरितां कोंकणच्या मार्गे देवगडीं आले. त्यांस अरमारी दोन गलबतें पावणीस देऊन गोव्यास पोहोचऊन देणें म्हणून छ १८ मोहरमचे आज्ञापत्र सादर जाहालें. त्यास दोनच गलबते पावणीस द्यावीं तरी मालवणकरी

+ यापुढील मजकूर खुद नानाफडणविसाच्या हातचा.

व वाडीकर सावंत यांचीं गलबतें वाहीर दुर्बुध्धीन फिरतात. गुदस्तांपासून जपतच आहेत. यास्तव पांच गलबतें सिलेपोस देऊन आज्ञेप्रमाणें मशारनिले यांची गोंव्यास रवानगी केली. त्यांस तेथे पोहोचऊन गलबतें माघारी बंदरी यावयासी निघालीं, परंतु उत्राणे[1] वाऱ्याचे तुफान भारी गेलें. यास्तव गोव्याचे हेट[2] वाऱ्याचे सोईवर होती. इतकियांत हैदर नाईक याकडील गलबतांची गाठ पडली. त्यांणी पांच साहा दिवस याचा पाठलाग केला. त्यावर दुसरी इंग्रजी तरांडी भेटलीं, त्यांणींहि गलबतांचा पिछा राखोन आंगावर आलीं. उत्राणीमुले उपरचा पला तिलभर न ये. तेव्हां सरकारचा आणि फिरंगी याचा हाली तह आहे, त्याअर्थें फिरंगी याचे बंदरी जाऊन आश्रा करावा ऐसा गलबतकरी याणीं विचार करून फिरोन गोंव्यांस गेलीं. फिरंगीयाणे गलबतांची तोडमोड जाली होती त्याची उस्तवारी करून दिल्ही. परंतु इकडे यावयासी निरोप देत नाहीं. तालुके विजयदुर्गाकडे गोव्याचे बदरची सिबाड धरून नेली आहे, त्याचा जाबसाल जाहालियावर निरोप होईल. निखालस तों बोलत नाहीं. परंतु कारण हें दिसतें. याचा विचार व्हावा. याप्रमाणें गलबतांवरील लोकांनीं सांगोन पाठविलें. त्याजवरून गंगाधरपंत सुभेदार यासीं हे वर्तमान सांगितलें कीं, सिबाड त्याचे बंदराची तुम्हासहि गोवेकराची पत्रे येतात व हालींहि फतेमारी आली आहे. सिबाड सोडून देणे म्हणून सरकारचे आज्ञापत्रहि सादर जालें तें तुम्ही पाहिले. अल्प गोष्टीसाठी तहाचे गोष्टीस अंतर येऊं नये. ही गलबते सरकारची पांच, लोकसुधा तेथे गुंतलीं. त्यास सिबाडेवरील जिनस आगोधर विकला. खटाराहि हाली सावकारास देतां हा देऊ नये. याजप्रमाणें त्यांस सांगोन सावकारासहि ताकीद केली आहे. ऐशास सदरहू सिबाडेविसी गंगाधरपंत यासी आज्ञापत्र सादर होऊन व त्यांकडील वकील हुजूर आहेत त्यास गलबताविसीं आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Govind Yeshwant and Janardan Mahadeo report to Nana Fadnis the difficulties that were encountered by the ships sent to Goa with the son of Dhume, the Portuguese envoy. These ships while returning from Goa were pursued by a flotilla of Haidar and also by some English ships. The ships therefore sought shelter in the harbour of Goa where they were detained by the Portuguese who refused to allow them to leave the port unless a Portuguese vessel captured by the Marathas was released.*

---

[1] उत्तर वारा. [2] दक्षिण वारा.

No. 408] [21-4-1781

श्री

राजश्री सरनाईक व भवानराव माने
व समस्त सरदार व बारगीर गोसावी

यांसी

आशीर्वाद विनंती उपरी. इंग्रज आज खालापुराहून कूच करून पुढें चालला. यास तुम्ही आपले किल्यापैकीं वीस माणूस बोरघाटी ठेवावे व विसापूरपैकीं राजश्री भिकाजीपंत अणास सांगोन पंचवीस माणूस ठेवावे व विठोजी नाईक जाधव हेटकरी याजकडील रामजी नाईक जांबुळकर वीस लोकसुधां खोपवलीस वाड्यांत ठेवावे आणि तुम्ही लोकसुधां किल्यास निघोन यावें. आपले किल्यापैकी वीस लोक येणे प्रा। ठेवावे.

किता

१ बहिरजी नाईक पारटे
१ बापूजी जाधव
१ निंबाजी सावंत
१ बावाजी चव्हाण
१ रतनोजी नान्हेवे
१ खंडोजी केदारी
१ अपाजी माडेकर
२ निंबाजी नाईक सावळे याजकडील.
२ इंदापूरकर याजकडील
१ मुराजी नाईक याजकडील

—

किता

२ शाबाजी नाईक गोळे व खास बारदार याजकडील.
२ गंगाजी नाईक याजकडील.
२ पीर मा। याजकडील.
२ मढकर याजकडील.
२ खंडोजी नाईक वच्ये याजकडील.

—

येणेप्रमाणें ठेऊन बाकी लोक झाडून घेऊन यावे. रा। छ २६ राखर हे विनंती.

¶*Arrangements are made to post piquets at Khopavali as the English were advancing from Khalapur.*

No. 409] [11-5-1781

श्रीगजानन

विज्ञापना. इंग्रजाचे बहीरबुनगे बुधवारी रात्रीस गेले म्हणून काल प्रात:काली चार घटका दिवसास बातनी आली. ती तेव्हांच आपणाकडे पत्र लिहून पाठविले

आणि मी लोक घेऊन तिकडे गेलो. त्यास पुढील तोंडचे डेरे, राहुट्या वगैरे लस्कर तिसरी तक्षीम गेले. पुढे निवडुंगाची बारी होती ते झाडून तोडिली. कल्याणचे मार्गे त्याचे बुनग्याची रव पडली आहे की काय म्हणोन डोंगर-किन्याराने पुढे बातमीस लोक पाठविले होते. त्यास दिवसाची तिकडे बुनग्याची रव नव्हती. त्याचे गोटाजवलचे खाडीपर्यंत गेले होते. तेथे त्याजकडील दोन भोई सापडले ते धरून आणिले त्याणी सागितले की, वणजारा वगैरे बुनगे बेलापुरास गेले. मुंबईकराचा सरंजाम मुबईस जखमी सुधा गेला. बंगालवाल्याकडील जखमी व मदरासवाल्याकडील होते ते पनवेली बापटाचे वाड्यात ठेविले आहेत. छावणीचा मजकूर नाही. कपितान ओर्कर[१] खालापूरचे तल्यावर गोली लागली तो पनवेलीस गेल्यावर मेला. मदरासकर होता. त्याजवल आपण चाकर होतो. हाली त्याचेच डेन्यात राहातो म्हणून सागतात. भोई बराबर सिपाई देऊन लस्करांत पाठविले आहेत. चवकसी करितां सविस्तर विदित होईल. स्वारी घाटावर जाईतोपर्यंत यास सोडू नये. याणी आमचा गोट येऊन पाहिला आहे. येथून लोक स्वारीस जातात असी त्यास बातनी कळेल, याजकरिता सूचना लि॰ आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter refers to the capture of two Kolis who gave news abou[t] the strength of the English force.*

No. 410] [*11-5-1781*]

श्रीगजानन

विज्ञापना[+] ता॥ छ १६ जमादिलोवल वर्तमान येथास्थित असे विशेष. इंग्रजाचा मुकाम आहे. मुबईकराची पलटणे वगैरे सरजाम होता तो झाडून मुंबईस गेला. कलकते, बंगाला व मदरासकर मिलोन पाच साहा पलटणे आहेत. इतका अजमास दिसतो, व मुंबईहून ग्रहस्त आला त्याणेहि सागितले. सुर्तेकडून जलमार्गे गहू, हरभरा, जोरी, बाजरी, तूप, तेल वगैरे जिनस मुंबईस फार आला. आज प्रात:कालीच सिपाई बातमीस पाठविले आहेत. ते आलियावर अधिकोतर असल्यास लिहून पाठवीन. सेवेसी शृत होय हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke writes about the strength of the combined English forces—news which he got from a man from Bombay.*

---

१ कॅप्टन वॉकर. + पत्र हरीपंत फडक्याचें.

No. 411] *[2-6-1781?*

३

पुरवणी तीर्थस्वरूप राजश्री अबाजीपंत दादा. तेव्हां करणे ते करितील याची चिंता नाहीं. बाबाजीपंत सहस्त्रबुद्धे याचा मजकूर लिहिला त्यास हल्ली ते कोठे आहेत ते ल्याहावे, त्याप्रमाणें सरकारचे पत्र पाटवून देऊं. मनोरची मामलत् कमावीस सांगितलीच तर धनीपणा वडिलाकडे. कमाविसदार जो होणे तो होईल अगर न होईल, याप्रमाणेच श्रीमंताची मर्जी आहे. कृष्णाजीपंत दादरकर याचा काल जाहाला म्हणून लिहिले, यास त्याची असामी त्याचे लेकाचे नांवें कृपा करून द्यावी. कृष्णाजीपंत जवारकर याचा मजकूर फार लिहिला तो श्रीमंतास श्रृत केला व मीहि समजलो. याची चिंता नाहीं. राजश्री त्रिंबकराव मलहार यासी आपले विचारास येईल व चाकरीची मेहनत पाहून बक्षीस अगर तैनात इजाफा करणे असेल तो करावा. हुजूर इजाफा करणे कठिण आहे. यास्तव हुजूर पार पडे असे करावे व बक्षीस द्यावे. सारे लोकाचा भरणा आपणाकडे किती, त्यापैकीं आपले ठेवणुकेचे किती व हुजुरून किती गेले, हे सविस्तर लेहून पाठवावे. व कारकून मोसंबेकरी लौकर पाठवावे. खर्चाची निवड असेल तर माणसे पाठवावी. ऐवज पांच हजार रुपये दिल्हे आहेत त्याजवर कर्ज काढून पाठवीन. सारांष सरकारचे काम निर्लोभ करीत असावे व गरीबाचा दुवा घेत असावे. रवाना छ ९ जमादिलाखर बहुत काय लिहिणे कृपा असो दीजे हे विनंति. केशव नाईक याचे चालवावे. राजकारण हाती असो द्यावे. लेहून पाठवू तेव्हां करणे ते करावे. तूर्त केल्यास फिरोन राखणे कठिण पडेल. फरासीस व वलेंदेज व दुसरा एक टोपीकर येकूण तिघें टोपीकर चेनापट्टणचे काम काढून मुंबईवर येणार. दक्षिण समुद्रास चालीस मनेवार[1] फरासीसाचे आले आहेत. भाद्रपदमासीं आश्विन कार्तिक मासीं जे होणे ते मुंबईवर हगामा होईल. हिंदुस्थानांत सिंदे गेले. त्याजकडे इंग्रजाची अनुसंधानें सलुकाची लागली आहेत. श्रीमंताचे दैव थोर आहे. पुढें बीर्द[+] बसावा ऐसा आहे. कळावे हे विनंति. महिमाजीराव सुर्वे यांचें गांव याजविषयीं विनंति करीत आहे होतील तेव्हां खरे. कळावे हे विनंति.

¶*Second sheet of a mutilated letter addressed to Abajipant Dada. The paper refers to a naval expedition of forty men-of-war against the English sent by the French, the Dutch and another European power.*

---

[1] Man-of-war. + बेत.

6282

No. 412] **[9-6-1781**

विरेकटर[१]

श्री

हे पत्र माहाराज्या रघुनाथराव
श्रीमंत साहेब

आपले पत्र इंदुस्थानचे कोंपनीस पोहचले. ते पत्र दिसोन येते की फार मुदतीचे आहे. तीन वर्षे दोन महिने ते पत्र कोडतच दिल्हे. हणमंतराव व मनवर पारसी या दोघाचे हातून पोहचले. पत्रातील अन्वय सर्व कलोन आला. त्याजवरून विचार केला व आमचे चाकर इंदुस्थानामध्ये आहेत. त्यास त्याचे पत्रामधे लिहिले की, श्रीमंताचे काम त्याचे अबरूलायक करावे व खुषी होऊन, सोया पाहून, आपल्यास दिलासा देऊन आमचा स्नेह आपले बरेपणास आहे. आपल्यास काही न्यून जाल्यास आम्हास खुषी नाही. आपले सर्व अर्थ जनराल कलकतेकर यास समजत आहे व त्यास पुरा येखत्यार (आहे). आपला तफावत आहे, त्याची बंदोबस्ती करावी. आपली सला करावी ते असी कीं, हिदुस्ता (नात) राजे आहेत त्यास पसंद पडावी. दुसरी आपली हकीकत लिहिली होती तरी त्यात आम्हास पडावयास दरकार[२] नाही. परंतु त्या समजावयास आम्ही त्याची नकल करू(न) गवनर जनराल कोशल यास पाठऊ. झगड्याचा उजाला फिरफिरोन जाहाला व आपले पत्रास मुदत फार जाहाली व झगड्याचे जे भांडण आहे त्याचा सेवट काय होईल ते कलत नाही. आम्हास असी ताकत नाही की, येथून त्या जाग्यास तफावत फार आहे व जनराल कोसिले याचे यख्तियारांत अटकळीत आपले मर्जीमाफक कसे आले आहे हे काही आम्हास सांगवत नाही. परंतु आम्हास तेथून तपसीलवार त्याचे हाली पत्र आले, त्यात त्याणी लिहिले त्याचे आम्ही शोधन केले त्यात की, आम्हाजवल त्याणी हुकूम मागितला की, दादासाहेबास फार जोरावार सरंजाम पाहिजे आणि आम्ही च्याहातो की, सर्वविसी आपल्या मर्जीस व मातबरीस अनकूल व्हावे. या पत्रावर आमची साक्ष शुध्द राजपणाची थोरली मोहर येथे मारली. शहर लांडण तरीख ९ जून सन १७८१.

¶*This is a reply from England to Raghunathrao's letter to the Company sent with his agents Hanmantrao and Manwar Parsi; it appears to be a broken Marathi translation of the original English, which is already before the readers in print.*

---

१ या पुढील मजकूर निराळ्या वळणाचा. २ अधिकार.

No. 413] [10-8-1781

नकल.

श्री

राजश्री बाबूराव साळोंखे व
हरजी ना। पाटील गो। यासी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद सु॥ इसने समानीन मया व अलफ. तुम्ही राजश्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल याजकडे चाकरीस होता. त्यास तेथून रजा घेऊन हुजूर आला. त्यास तुम्ही पहिलेपासून सरकारचे पदरचे, सा। तुम्हास चाकरीस ठेऊन तुम्हाबरोबरी दाहा गलबते सरकारची देऊन, मुबईची बंदी जाली आसतां हरयेक जागाहून साहुकार माल मुंबईस नेतात व तेथून आणितात त्याचे वगैरे बंदोबस्ताचे काम सांगून स्वारीस पाठविले आहेत, त्याविसी कलमे

दरमाहा खर्चाची नेमणूक रु॥

४० खुद तुम्हास

२५ बाबूराव साळोंखे
१५ हरजी नाईक पाटील
—
४०

१५ बाजी धोंडदेव कारकून
—
५५

येकूण पंचावन रु॥ दरमाहा नेमणूक करार करून दिल्ही आसे. तरी तुम्ही पैदास्त कराल त्यापैकी घेत जाणे. मजुरा पडेल. पुढे चाकरी करून दाखविल्यावर तैनातेचा बंदोबस्त करून दिल्हा जाईल कलम १

समुद्रात फिरता मुंबईस कोणी माल नेईल व तेथून आणील त्यास व बेकौली सिबाड, डगी, माहागिरी आढळल्यास खेरीज गोवेकर फिर्गी

तुम्हास नवे लोक आ। ५० पनास ठेवावयाची आज्ञा केली आसे, तरी दीड माही अडसेरीसुधा दर आसामी रु॥ ८ आठ प्रा। करार करून बारमाही चाकरी. सालाचे आठ रोजमरे येणे प्रा। चाकरीचे तेरखेपासून व तुम्हाबरोबर सरकारचे खिजमतगार व ढलाईत दिल्हे आहेत त्याचा रोजमरा अरमारचे पैदास्त पौ। देत जाणे मजुरा पडेल. कलम

तुम्ही सरकारात चाकरीस राहिला. त्यास येकनिष्टपणे सेवा करीत जाणे. तुम्हास राघोजी आंगरे याजकडे चाकरीस पाठविणार नाही. तिकडील वसवसा न धरितां चाकरी बज्याऊन दाखवणे. कलम १

करून दस्त करणे आणि सरकार
जाब घेत जाणे. कलम
१

येकूण च्यार कलमे करार केली आसेत. तरी सदरहू प्रो वर्तणूक करणे. जाणिजे छ १९ साबान आज्ञा प्रमाण.

¶The Peshwa entertains into his service Baburao Salonkhe and Harji Naik and fixes their remuneration. The work assigned to them is to watch the coast and to stop goods going to Bombay.

No. 414] [*20-10-1781*

पौ छ १२ जिल्काद
सन इसने समानीन कार्तिक मास.

श्री

राजश्री गोविंदराव व चिमाजी
माणकर गोसावी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री माधवराव नारायण प्रधान आसीर्वाद सुा इशने समानीन मया अलफ. तुम्ही विनंतीपत्र छ २८ सवाल्चे पाठविलें ते प्रविष्ट जालें. धोंडो भास्कर तीर्थस्वरूप राजश्री दादासाहेबाचा मेहुणा म्हणवितो. तो च्यार पाचसे माणसानसी जंजिरकर शामलाकडे राहून पेशकर जाले आहेत. त्याचा बाप भास्कर बाबजी मतगडानजीक मौजे रातवन या गावी होता. त्याचे शोधात होतोच. त्यास बातमी राखून स्वारी पाठऊन धरून आणिला म्हणोन लिहिले ते कळले. यैशास धोंडो भास्कर याचे बापाची बातमी राखून धरून आणिला, उतम केले. त्यास पके बस्तानी हुजूर पाठऊन देणे. याउपरीहि त्यांजकडील मुबादला वरचेवरी करीत जाणे. वर्तमान वरचेवर लिहीत जाणे. जाणिजे. जाणिजे छ २ जिलकाद बहुत काय लिहिणे

¶The Peshwa asks Govindrao and Chimaji Mankar to imprison Bhaskar Babaji, the father of Dhondo Bhaskar who called himself Raghoba's brother-in-law and who joined the Sidi with five hundred men.

No. 415]

श्री

राजश्री[१] हरिपंत स्वामीचे सेवेसी

विनंती उपर सिंहीगडची याद पाठविली. त्यावर करार करून पाठविली. राजश्री बापूकडे पाठऊन त्यांचेहि हातचें करार करून घ्यावे जे, सुभेदारानी केले ते आम्हांस मान्य व संतोष आहे. याच कामावर मदार काय? मोठी मोठी कामे करतील हा भरवसा मानितो. तुम्ही त्याची खातरजमा केलीच असेल करावी. रा छ १६ जिल्हेज हे विनंती

¶*Nana writes to Haripant to secure Sakharam Bapu's approval to the arrangement proposed for Sinhagad.*

No. 416] [3-1-1782

श्री

राजश्री राऊ पंडित
प्रधान गोसावी यासीं

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री राघोजी आंगरे वजारतमाब सरखेल रामराम विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करावयासी आज्ञा करीत असिलें पाहिजे विशेष. पत्र पाठविलें तें पावलें. तुम्हांस पेशजीं सरंजाम दिल्हा त्याजविसीं वगैरे कलमें :

तुम्हास लाख रुपयांचा सरंजाम सन सबा सबैनांत व सन तिसा सबैनांत. त्यास सरंजाम देतेसमई सरकारांत गांवगनावार अकार समजला नव्हता; येकंदर माहालावरून लाऊन दिल्हा. हालीं तुम्ही पाहाणी करून जमाबंदी केली आहे, त्या प्रमाणें रुजुवात होऊन येकंदर जावता जाहाला पाहिजे. सबब गांवगनावार खराब जमीन घडणीस लाऊन तपसिलवार कागद पत्र पाठवावे. कलम १

इंग्रजाचा सरकारचा बिघाड, याजमुळें सरकारातोन मुंबैची बंदी केली आहे कीं इकडोन जिनस वगैरे जाऊं नये व तिकडील माल आणूं नये, याप्रमाणें बंदी जाहाली आहे; असें असतां कोणी जिनस नेला आणिला हे समजल्यावरी त्याचीं पारपत्येंहि होत आहेत. याअन्वयें तुम्हांकडोन बंदीचा बंदोबस्त असेलच. तथापि बंदोबस्त कसकसा आहे हे समजलें पाहिजे. कलम १

---

[१] सबंध पत्र नाना फडणिसांचे हातचे.

येकूण दोन कलमें सदरहूप्रमाणें लिहिलीं असत. याच्या जाबसालास व आणखी कितेक मजकूर समजला पाहीजे, यास्तव माहितगार शाहाणा माणूस मातबर सालजाब उगवी असा लौकर पाठऊन द्यावा म्हणोन आज्ञा. ऐशास लाख रुपयाचा सरंजाम स्वामींनी लाऊन दिल्हा, त्याचा अर्थ पेशजीं निवेदन होऊन लाख रुपयाचे बेरजेस कमी आला, त्याचे ऐवजीं दुसरा मुलुक दिल्हा. तत्राप त्यांतहि कांहीं विनंती करणे आहेच. येविसीं ते समई विनंती करावी तर सरंजाम लाऊन दिल्हा, त्यापासून गडबडीमुळें प्रांतास चोलण होऊन मुलूक खराबीखालीं आला. प्रांताची पाहाणी होऊन संचणी जाहाली म्हणजे जमीनजुमल्यांचा झाडा निघोन सविस्तर सेवेसीं निवेदन करावें, याअर्थी पाहाणी करविली, ते कागद गुदस्तां सन इहिदेंत चैत्रमासीं दफ्तरास वन्हिप्रवेश होऊन विल्हेस लागले. याजकरितां हालीं आज्ञेप्रमाणें कागद तयार करविले आहेत. जाहालें म्हणजे पाहोन कागदपत्र सुधां रवाना होऊन येतील; व बंदीचा मजकूर तर पेशजींपासून इकडील तालुक्यांचा बंदीचा बंदोबस्त आहेच. स्वामींचे सूचनेप्रमाणे बातमी वर्तमानाबद्दल हरयेक नित्य माहागेरी मचवा पाठऊन आणीत जावें. त्यास सरकारचीं गलबतें रेवदंड्यापासून मुंबैचे नस्तपावेतों दाहापाच नेहमी आहेतच. तेव्हां चोरी छपीनें सावकाराचा निभाव होणे कलतच आहे. * * चे मामलेदार सरकारचे आज्ञेनें काय करीत असतील तें नकले. वरचील इकडिल बंदोबस्त आज्ञेप्रमाणे आहे. येथें सामान सरंजाम पाहिजे तो दिगर बंदरींतून येतो जातो, त्यास देखील सरकारचीं गलबतें छबिन्यास आहेत तीं छडाछड करितात. वरचील मुंबैची बंदी असतां जो सावकार आमदरफ्ती करितो त्याचें पारिपत्य होतच आहे, व असल्यास आज्ञेप्रमाणे पारिपत्य करावयास अंतर होणार नाहीं. सेवेसीं निवेदन होऊन आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. रवाना छ १८ माहे मोहरम बहुत काय लिहिणें कृपा करावी हे विनंती.

¶*[Raghuji Angria furnishes an account of what he had done in settling the Saranjam granted to him by the Peshwa. He also writes that he has adopted measures to prevent goods going to Bombay.*

No. 417] *[21-4-1782*

श्री

शेवेसी आज्ञाधारक भास्कर भिकाजी चरणावरी मस्तक ठेऊन सिर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ ७ जमादिलावलपावेतों सेवकाचें वर्तमान

येथास्थित असें विशेष. छ २१ राखरचे आज्ञापत्र रवाना जाले ते छ २ जावली सादर जाले, तेथे आज्ञा.

पाच हजार ऐवज कमी जाला त्याचा मजकूर रा। उमाजी नरासिंह हाजूर आले आहेत, विनंती करितील * * * विदित होईल

* * * टोपी का.
* * लागली आठे ठी-
* * आहे आद्याप वरी
तिकडस सलुक जाला नाहीं.

वसई वगैरे छ २६ तारिखेस द्याव-याचा करार जाला आहे म्हणोन बोलतात. आइकिले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. १

पुण्याकडील वर्तमान जिबाजी माहा-देव याणी विनंती लिहिली आहे, त्याज-वरून विदित होईल.

सरकारची मर्जी येथे येण्याची आसल्यास पुढे जाग्याजुग्याची सोई करणे म्हणौन सेवकास आज्ञापत्र रवाना करावयाची आज्ञा आसावी व अजम जनराल हर्नबी यास पत्र की विस्वना-थजीकडील ऐवज * खर्चास देवावा खर्चाची * * * पत्र आल्यास
* * * वल्यास उगवेल
* * * पाठवावयाची

सलुक सिंदे याचे विद्य (मा) ने जाला म्हणौन कलला. त्याहून जनराल कोशलास पत्रे आली ती छ ४ जावली वाचून सलुक जाल्याच्या तोफा मा-रिल्या आणि दरवाज्यावर कागद मारिले, शहरात परगात फिरविले. सर्वांमुखी सलुक जाला म्हणौन जाले. १

टोपीवाल्यानी सलुक करून घेतला. त्यांत सरकारचा जाबसाल तरी मेस्तर आपटन कारनेल याणी तह केला आहे. त्या बमोजीब सरकारचा जाबसाल याप्रो येथे बोलतात. आईकिले वर्तमान सेवेसी लिहिले आहे.

मजकडे सरकारची सिलक आहे. माझे विद्यमानाचे हिसेब हजूर पाठविले आहेत. त्याजवरून विदित जालेच असेल. आज्ञा होईल त्याप्रो हजूर रवाना करीन.

विस्वनाथजीकडील ऐवजाचा मज-कूर तरी प्रस्तुत ऐवज हातास येत नाहीं. निग्रह केल्यानी परिणाम ला-गेल असा अर्थ दिसोन येत नाहीं. युक्तीयुक्तीने जे घडेल ते करून ऐवज वसूल होईल तो हजूर रवाना करीन. १

विलायेतेस पत्रे व कारकून व ऑविंद[1] पाठवावयाचा आहे तरी गलब-तास नोरे[2] काये पडतो तो मनास

[1] मुसलमान. 2 Freight.

आणोन हजूर लिहिणे म्हणौन आज्ञा. आज्ञेप्रो मनास आणिले. त्यास पागोटेवाला जावयाचें परम कठिण. घडणे दुरापस्त आहे. त्याहीमधे येथील आधिपत्याचे हुकुमावर जाणे घडेल तरी नोर पंधरा हजारपावेतो पडल. याप्रो मनास आणिले आहे त्यावरून लिहिले असे.

शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Bhasker Bhikaji mentions several incidents in this letter—especially the treaty effected with the English at Salbai by Mahadaji Sindia.*

No. 418] [*April 1782?*

श्री

यादी कलमें

आम्ही तिकडे येतो, परंतु आम्हास तूर्त खर्चास पाच लाख रुा पाहिजेत. त्यापैकी तीन लाख रुपये सुर्तेस द्यावे, व येक लाख रुपये पायागडाच्या मुकामी द्यावे, व येक लाख उज्जनीस द्यावे, येकूण पाच लाख रुा आम्हास पोहचते करावे म्हणजे तिकडे येणे होईल.

अमदाबाद अगर डबई आम्हास द्यावी किल्या—

मातुश्री बाईनी व तुम्ही व होलकरानी शफत द्यावी. मुलेरीचा किला आम्हास द्यावा. किल्याचा माहालचा खर्च जाऊन नकी वसुली खानदेश बागलाण प्रांती बारा लक्षाचे माहाल आम्हास द्यावे. तूर्त सामान सरंजामास आम्हास यक लक्ष रुा सुर्तेस द्यावे.

अगर त्रिंबकचा किला व लगते बारा लक्षाचे माहालसिवाय किल्याची व माहालची सिबंदी वगैरे खर्च जाऊन निके वसुली द्यावे. बाईनी व तुम्ही व होलकरानी शफत द्यावी. तूर्त आम्हास सामान सरंजामास सुर्तेस लाख रुा पाठऊन द्यावे. म्हणजे आम्ही आनंदवेली व त्रिंबक वगैरे जागाशी.

(अपूर्ण)

¶*This appears to be a draft of terms which Raghunathrao proposed to Mahadji Sindia and wished that they should be ratified before he could leave the protection of the English.*

No. 419] [May 1782

श्री

इलिस ब्रो सकटताल यास पत्र जे हणमंतराव व मनवर पारसी याजबराबर आपण आमचे पत्राची उत्तरे दोघाजवळ दोन पाठविली ते पोहचली. त्यांत मजकूर कीं पातशहानी बहुत मुदत जाहली, तेव्हा सारा हिंदुस्थानचा तालुका या कंपनीस दिल्हा आहे. तरी त्या लोकानी तुमचा जाबसाल केला असेल म्हणोन कलमी केले व दोस्तीचे मेरात[1] लिहिले ते जाहीर जाहले. त्यास आपल्यास आम्ही बहुत दोस्त जाणत आहो. आपल्या खुबीचे व दुरंदेसीचे जे मरातब आहेत ते आपल्यास योग्य आहेत. आमची दरखास्त[2] हेच कीं -आपले दोस्तीचा सिलेसिला[3] हमेशा जारी असावा. हिंदुस्थानचा कंपनीकडे यखतियार हे गोष्ट येथार्थ आहे. लेकिन कंपनीवरहि हुकूम करणार पातशहा खावंद आहेत, त्यासही ताकीद करणार खावंद आहेत. त्यास आम्ही इंग्रजाचे स्थलास आपले कामाची उमेद ठेवून बसलो आहों. त्यास येथील मजकूर तरी

(जागा कोरी)

येणेप्रमाणे दोन कलमे लिहिली असत. तरी दोस्तीचे जागा आमचे कामाविशी कोषीस करून काम होऊन येई ते करावें, तुम्हास मुनासब असे. इकडे हैदरखानाचे वगैरे लढाईमुळें आमचे काम करावयास दिरंग असला तरी जोपर्यंत आमचे काम करावयाचा वख्त येईल तोंपर्यंत आमचे पर्वीची बेहबुदी व्हावी, आणि फितुरियास सलाहच करावयाचे ठरल्यास आम्हास मुलूख द्यावयाचा ठरेल तो फितुरियानजीक न द्यावा. कारण कीं त्याचे नजीकच दिल्हा तरी ते आम्हास दगा करतील. आणि आम्ही इंग्रजाचे आश्रयास आलो असतां आम्हास फितुरीयाचा दगा न व्हावा हे इंग्रजास योग्य आहे. सबब हिंदुस्थानच्या यख्तियारीस ताकीद पातशहापासून करावी कीं जर सलूक केला तरी श्रीमंतास मुलूक देणें तो गुजराथ प्रांतीं इंग्रजांचे मुलकाचे नजीक द्यावा म्हणजे हिंदुस्थानच्या फौजेशी इंग्रजाचा बिघाडहि करावयाचा जाहल्या आम्ही उपयोगीच पडूं.[4] *

¶*This appears to be a draft of a letter intended for Ellis Browe, Secretary, by Raghoba who expresses his thorough reliance on the protection of the English and requests him to arrange to incorporate in the treaty with the Peshwa, if it comes off at all, terms by which he (Raghoba) could get such districts assigned to him as would be adjoining to the territory of the English and away from his enemies.*

---

१ मजकूर. २ मागणी अर्ज. ३ दळणवळण. ४ योग्य; रास्त.

+ सन १७८२ च्या उन्हाळ्यांत सालबाईचा तह ठरत असतां राघोबाचे वकील पत्रें घेऊन परत आले त्यांस जबाब म्हणून त्यानें हे मसुदे तयार केलेले दिसतात.

No. 420]

श्री

उइलिम जिमसि (जेम्स्) यास पत्र जे मनवर पारसी याजबराबर तुम्ही पत्र पाठविलें तें पोहचले, कितेक मरातब कदीम दोस्तीचे व आमच्या कामाचा खुलासा लिहिला व जुबानी मनवर पारसी याचे जुबानी सांगून पाठविले ते सविस्तर जाहीर होऊन बहुत खुषी जाहली. ऐसियास तुम्ही आमचे कदीम दोस्त व जे दोस्तीस लायक तेच तुम्हाकडून अमलांत येईल हे आम्हास खातरजमाच आहे. आम्ही येथील मजकूर सविस्तर कंपनीस लिहिला आहे. त्यातील सर्व अर्थ तुम्हास कळतील त्याप्रमाणे कामाची सरबराई करावी हे उचित असे.

¶*Raghoba's draft letter to William James expressing his reliance on his friendship with the English.*

No. 421] [31-1-1783?

पौ छ ६ रोवल

श्री

तीर्थरूप राजश्री आबाजीपंत दादा सुभेदार
वडिलांचे सेवेसी

अपत्यें भिकाजी गोविंद मुकाम पुणें साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशललेखन करीत असिलें पाहिजे विशेष. तांदुळवाडीचे मुकामचीं पत्रें पेशजी व अलीकडे पाठविलीं तें पावलीं; साकल्य मजकूर कळला. व श्रीमंताचीं पत्रें प्रविष्ट केलीं व साकल्य वर्तमान श्रुत केलें, त्याचे जाबसाल मागाहून पाठवितों. वडिलीं राजश्री रामचंद्र गणेश काजाकामाकरितां पाठविला त्यास आजारी पडला आहे. हाली राजश्री राघोपंत यासी पाठविलें आहे. ते येऊन पोंहचलें नाही; पावलियावर सारे कामदांची उत्तरें पाठवितों. वरकड कार्य लिहिलें होतें तें प्रस्तुत करूं नये, याप्रमाणें आज्ञा आहे. बलालगड घेतल्याचें व इंग्रजाचे लोकाशीं लढाई जाहल्याचें राजश्री कृष्णाजीपंतीं पत्रें पाठविलीं व आपण लिहिलें तें सविस्तर श्रीमंतास निवेदन केलें. हली हजार माणूस आपलेकडे रवाना केलें आहे, लौकरच येऊन पोंहचेल. राजश्री महिमाजीराव सुर्वे यांसी सोन्याचें कडें बक्षिस द्यावें लागतें म्हणोन लिहिलें, त्याप्रमाणें विदित केलें. आज्ञा जाहाली कीं करार केला आहे त्याप्रमाणें द्यावें. मिठाचीं वगैरे मजकुराचीं उत्तरें श्रीमंतांची घेऊन पाठवितों. मकरसंक्रमणाचे तिळ शरकरा पाठविली ते पावली.

आज्ञेप्रमाणें स्वीकार केला; व ज्यांस प्रविष्ट करावयाची त्यांस प्रविष्ट श्रीमंत यजमानास व नानास व तात्यास प्रविष्ट केली, उत्तरें घेऊन पाठवितों. तीन हजार रुपये हुजुरून दिल्हे ते वसूल जाहाले आहेत. दुसरे सात हजार देविले आहेत त्यास मुदत आहे. गंभीरगडच्या सनदा व घांटावरून जिनस आणून द्यावा याप्रमाणें देणीं करून घेतलीं आहेत, कोणी मजजवळ चांगला कारकून झटोन काम करी ऐसा नाहीं. मी जावसालास गुंततों तेव्हांच दफ्तरचें काम होत नाहीं. राघोपंत पाठविले ते आलियावर सर्व उलगडा करून पाठवितों. जीवधण व कामणदुर्ग वसवितों म्हणून लिहिलें, त्यास आपले दृष्टीस येईल तसें केलें पाहिजे. रवाना छ २७ सफर. बहुत काय लिहिणें कृपा असो दीजें हें विनंती. इंग्रज पांच कोशलदार हुजुर बोलणें बोलावयासी आले आहेत; ठरेल मजकूर तो आपणांस लेहून पाठऊं. हे विनंती.

¶*Bhikaji Govind to Abajipant Dada giving news from Poona and accepting receipt of the customary exchange of sesamum and sugar.*

No. 422] [*20-4-1783*

श्रीगजानन.

श्रीमंत राजश्री नाना फडणीस
साहेबाचे सेवेसी

सेवक जानराऊ धुलप मुकाम जंजिरे विजयदुर्ग कृतानेक दंडवत विनंती. येथील कुशल तागायत छ १७ जमादिलावलपावेतों यथास्थित असे विशेष. फिरंगियाचें मोसंबी तराडे मालवणच्या किनाऱ्यास आले, तेव्हां मालवणकरांहीं गलबतें पाठऊन तरांडे नेले, ते इर्षा फिरंगीयासी येऊन आपलें आरमार घेऊन फिरंगी याणें जंजिरे सिंधुदुर्ग येथें वेढा दिल्हा. स्वराज्यांतील स्थल, या समईं कुमक करावी म्हणून मालवणकरांचें पत्र आम्हांस आलें. टोपीकर तेथें सेर जाहाल्यानें उत्तम नाहीं हें समजोन खुस्कीने जमाव रवाना केला, जलमार्गें गुराबा घेऊन आम्ही गेलों. सरकारचें आरमार मालवणच्या उपराल्यास येतें असें समजोन फिरंगी याणें आपलें आरमार काढून बाहेर गेला तों आम्ही जाऊन पोंहोंचलों. बेजरब गुराबासुधां चालोन घेतलें. युध्ध च्यार दिवस मातबर जाहालें. युध्ध होत होत धावणी मुंबईच्या बाऱ्यावर गेली. युध्धाची रात्र जाहाली. जूझ होतां फिरंगीयाची तरांडी साहुकाऱ्या दोन मंज्या दस्त करून आणिल्या. नारळ वगैरा किरकोळ जिनस आहे. पेशजी वीस गलबतें सुधां चिरंजीव राजश्री

भगवंतराव धुलप यांसी स्वारीस पाठविलें. सारांश गलबतें स्वारीस गेलीं. भारी आरमार नव्हतें; परंतु असल्या सरंजामामध्यें खुस्कीने जमाव रवाना करून जलमार्गें गुराबासुधां जाऊन, फिरंगीयाचा वेढा मालवणाहून उठऊन पराभव जाहाला, हें वृत्त आपणांस अवगत जाहालें पाहिजे. सर्व भरंवसा आपला धरून स्वस्थचित्तें संतोषरूप राहोन स्वामीसेवा करीत आहों. आपण सर्व प्रकारें दरबारीं आमचें साहित्य करीत आहां, तेव्हां किमपि चिंता नाहीं. आम्हीं आपले पदरीचे असो. विस्तारें काय लिहावें. कृपा करीत असिलें पाहिजे हे[१] विनंती.

¶Janrao Dhulap reports to Nana Fadnis how he forced the Portuguese to raise the siege of Sindhudurg.

No. 423] *[4-8-1783*

पौ छ २२ रमजान

सन आर्बा श्रावण मास.

श्रीसीताकांत

राजश्री हरिपंत तात्या गोसावी यांसी

अखंडितलक्ष्मीआलकृत राजमान्य श्नो मुधोजी भोसले सेनाधुरंधर दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लिहिला अभिप्राये कळो आला. राजश्री दादा गंगातीरास येणार, येविसीची बोलणीयाचे अर्थ राजश्री बलवंतराव विष्णु व जिवाजी माहादेव यानी लिहिलेच असतील. त्यास पुण्याहून निघोन घोडप किल्याजवळ येऊन मुकाम केला. दादा बारीखाली राहिले. भेटी आशाढ शुध द्वादसीस जाहाल्या. भाशणे वहुत स्वछतेची जाली. पुढे जो निश्चये होईल त्याप्रमाणे लिहिण्यात येईल. वरकड वर्तमान बालाजी सिवदेव याचे पत्रावरून कलेल म्हणोन लिहिले. ऐशियास, आपण येशस्वी आहेत व ज्याप्रसंगी आपले जाणे घडले त्या प्रसंगी येशाच प्राप्त होईल यैसा पुर्ता भरवसा. राजश्री दादाच्या व आपल्या भेटी जाहाल्या हे यैकून बहुत संतोष जाहाला. जेथे स्वछतेची बोलणी तेथे सर्व मनोदयानरूप घडेल. पुढे गंगातीरी राहावयाचा आथवा पुण्यास जावयाचा निश्चये त्याजकडील जो होईल तो लिहिण्यात यावा येथून वरचेवरी पत्रे राजश्री बलवंतराव विष्णु व जिवाजी माहादेव याजकडे आपले नावे पाठवण्यात आली ते तिकडून त्यानी आपणाकडे पाठविलीच

---

१ येथून अक्षर जानराव धुलपाचें.

असतील व इकडूनहि मुजरद सुतरस्वाराची जोडा पत्रे देऊन रवाना केली आहे, ते पोहचून सविस्तर मजकूर कलला असल. त्यास आपले जाण्याचा योग सत्वर पुण्यास घडावा आणि तेथील पत्रे आपली यावी. तदनुसार येथील विचार सर्व घडावा हे मानस. येदर्थीच पूर्वी सूचना लिहिण्यात आली आहे. तेथील प्रसंगानसार येथे उतरे यावी. रा छ ५ माहे रमजान. आपणाहून वर्तमान वरचेवर लिहीत असावें. येथील लक्ष सर्व आपले सल्हामसलतीवर असे. बहुत काये लिहिणें, लोभ असों दीजे, हे विनंती.

¶*Mudhoji Bhonsle learns with delight the news of an interview between Haripant Phadke and Raghoba and makes enquiries about the outcome of it.*

No. 424] [*21-9-1783*

पौ छ १६ मोहरम
आर्बा रामजी पाटिल
याणी दिल्हे.

श्री

राजश्री बालाजीपंत नाना
गोसावी यासीं

दंडवत विनंती उपरी. इंद्रसेन यास दीड लक्षाची जाहगीर द्यावयाचा करार केला आहे. त्याची नेमणूक करून सनद पाठऊन द्यावयाविशी येथून लिहिलें होतें. त्याचें उत्तर आपण लिहिलें कीं, कलकत्याहून पांच कलमाचा करार होऊन यावयाचा आहे, तो आला म्हणजे दीड लक्षाची जाहगीर द्यावयाची सनद पाठऊन देऊं. दीड लक्षाची जागीर आंतरवेदीस त्याचे मुलकास लगती नेमून पाठऊं म्हणोन तें कळलें; ऐशी पांच कलमांपो दोन कलमांचा जाबसाल होऊन आला. त्याच्या नकला व तीन कलमांचे ठरावाचा मजकूर पूर्वी आपणास लिहून पाठविला आहे त्याप्रो पांच कलमांचे पत्र शिक्यानिशी पाठवावें म्हणजे पांच कलमाचें पत्र इष्टिनाचे दस्कतानिशी व कंपनीचे मोहरेनिशी घेऊन आपणांकडे पाठऊन देऊं. पांच कलमांचा मजकूर करारांत आला आहे त्याप्रमाणें पक्केंच आहे; गुंता नाहीं. इंद्रसेन याचें मानस दीड लक्षाची जागीर सुरतेलगती द्यावी असें आहे व बोलण्यांतही असेंच आलें आहे. त्यास सुरतेलगती सोय होईशी असल्यास करून सनद पाठऊन द्यावी, नाहीं त्यापक्षीं यमुने आलीकडे कालपीचे

\+ नाना फडणीसाचे हातची.

लगती दीड लक्षाची जागा नेमून सनद पाठऊन द्यावी म्हणजे इंद्रसेनास समजोन सांगावयास येईल. इंद्रसेन शाहाणा प्रमाणिक, ज्या गोष्टी करारांत आल्या त्याप्रमाणें त्याणें आमलांत आणून दिल्ह्या; पुढेंहि सरकारचा व इंग्रेजाचा स्नेह चालावा या गोष्टीस फार जपतो. यास कराराप्रमाणें जागीर लाऊन दिल्यानें सरकारउपयोगींच आहे. दीड लक्षाची जागा नेमून सनदा पाठऊन द्याव्या. रवाना छ २९ जिल्हेज बहुत काये लिहिणें. लोभ कीजे हे विनंति.

¶*Mahadji Sindia writes to Nana Fadnis about the jagir promised to Anderson for his exertions in negotiating the peace treaty. He suggests it should be situated either near Surat or near Kalpi.*

No. 425] *4-10-1783*

पो छ जिलकाद सन
आर्बा समानीन कार्तिक
मास.

श्री

राजश्री बालाजी पंत नाना
गोसावी यांसीं

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री माहादाजी सिंदे दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. उरपाड माहाल इंग्रजांकडून सुटला, त्यास पूर्ववतप्रमाणें राजश्री विसाजीपंत बापू याचा याजकडे द्यावा, येविसीं पेशजी आपणांस दोन च्यार वेळां लिहिलें; परंतु महालची सनद होऊन माहाल याचा याजकडे होत नाहीं. राजश्री रामजी पाटीलहि आपणासी बोलतच आहेत; आपण नानाप्रकारच्या दिकती काडितात म्हणोन ऐकिलें. त्यास याचा वेढगस्तीचा प्रकार. आमचेहि वचन माहाल सुटल्यानंतर तुमचा तुम्हाकडे देतों म्हणून गुंतलें आहे, तरी महालची सनद करून द्यावी, येविसीं वारंवार आपणास लिहावेंसं नाहीं. याचा अर्थ आपल्याहि ध्यानांत आहे. त्यास आनमान न करितां सनद उरपाड माहालची करून देवावी. रवाना छ ७ जिल+काद. बहुत काय लिहिणें लोभ कीजे हे विनंती.

¶*Mahadji Sindia to Nana Fadnis requesting the latter to give back the Pargana of Orpad to Visaji Bapu.*

+ येथून अक्षर निराळे वळणाचें, बाजूस महादजीचा शिक्का.

No. 426] [1782 (?)

पौ छ ११ रबिलाखर

श्री

तीर्थरूप राजश्री आबाजीपंत दादा

सुभेदार वडिलांचे सेवेसीं

अपत्यें भिकाजी गोविंद मुकाम पुणें साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे, विशेष. पत्र पाठविलें तें पावलें. शिरगांवचा कोट सरकारांत फते जाहाल्याचें वर्तमान सविस्तर लिहिलें तें कळलें, व श्रीमंताचें पत्र प्रविष्ट केलें. श्रीमंताचें बोलण्याचा भाव इंग्रजाचा तह ठरत नाहीं, त्या अर्थी जमीनदोज किले ठाणीयांचे अवघड पडेल, परंतु न केले तर त्यास चैन पडों द्यावयाचें नाहीं; यांत काय जें घडेल तें घडो. राजश्री आबाजी भगवंत जाऊन उत्तर आपणांसी लिहिलें होतें तें काम हलीं करावें न करावें याची विनंती करून मागाहून लेहून पाठवितों. आजच जासुदाबराबर सविस्तर लेहून पाठविलें आहे त्यावरून कळेल. शिरगांवांस घोडी सांडलीं ते आपण बसावयासी ठेवावी याप्रमाणें आज्ञा जाहाली आहे. कळावें रवाना छ २९ रबिलौवल. पत्रें आपलीं फार आलीं. जाबसाल लिहिला तो फिरोन स्मरणाने तुसवत् जाहला असेल. करणें तें चित्तांत आणून करीत जावें. बहुत काय लिहिणें कृपा असों दीजे हे विनंती.

¶*Bhikaji Govind advises Abaji Pant to create trouble for the English and to give them no rest as there is no possibility of amicable relations being established with them.*

No. 427] [19-2-1782 ?

श्री

राजमान्य राजश्री भास्कर भिमाजी यासी रघुनाथ बाजीराव नमस्कार सुा सलास समानीन मया व अलफ. राजश्री महादजी सिंदे याजकडून सलुकाचे बोलणे बोलावयास हुजूर कारकून आले होते. त्यांचे बोलणे कीं खासा स्वारी इकडे यावी, आम्ही चाकरी करून दाखऊ, असे कितेक स्नेहाचे बोलणें बोलतात; परंतु त्याचे आम्हास प्रमाण वाटत नाही. आम्हास तिकडे नेऊन दगा करावा किंवा फितुरी याचा व त्याचा पेच पडला आहे हा काही खुलासा समजत नाही. सबब त्याचा शोध घ्यावयास हुजुरून सिंदे याजकडे कारकून पाठविले असेत. त्याजकडील जसा जाबसाल आम्हास कलेल तसे आपल्यास कलऊ म्हणोन तुम्हीं जनराल हनेवी यास बोलणे. जाणिजे छ ५ रोवल.

¶*Raghunathrao informs Bhaskar Bhimaji that he is awaiting the return of his agents from Mahadji Sindia before deciding about his future plans.*

Index to Selection No. 36

The First Maratha War

(Figures denote numbers of letters)

B—*contd.*

B—*contd.*

B—*concld.*

C

D

E

E—*contd.*

F

F—*contd.*

G

G—*contd.*

G—*concld.*

H

H—contd.

H—concld.

I

J

J—*contd.*

K

K—*contd.*

L

N—*contd.*

R—*contd.*

R—*contd.*

S

S—*contd.*

S—*concld.*

T

T—*contd.*

U

V

V—*contd.*

W

Y

Z

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

(HTP)

00037092

4.4. m 8

37092

0

C. S. Sardesai

Jangiraychi Mohim

B.P. Kothari 28/9/77 31/10/77
do. 31/10/77 27/12/77
do 17/1/78 12/5/